# ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील

# पुरुषचित्रण : एक आकलन

कला आणि ललितकला अभ्यास मंडळ पीएच.डी.

(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध

विषय : मराठी


: संशोधक :

मनीषा उमाजी बटवाल

: मार्गदर्शक :

डॉ. पांडुरंग भोसले

: संशोधन केंद्र :

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे



जानेवारी २०१५

# ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील

# पुरुषचित्रण : एक आकलन

कला आणि ललितकला अभ्यास मंडळ पीएच.डी.

(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर केलेला शोधप्रबंध

विषय : मराठी

: संशोधन केंद्र :

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

जानेवारी २०१५

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी या विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) या पदवीसाठी मनीषा उमाजी बटवाल यांनी **''ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण : एक आकलन''** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधाचे काम पूर्णपणे वस्तुस्थितीवर आधारित असून या विषयातील त्यांचे हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तेथे संदर्भनिर्देश केले आहेत. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

**मार्गदर्शक**
**डॉ. पांडुरंग भोसले**
मराठी विभाग प्रमुख
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
महाविद्यालय, औंध, पुणे–७.

ठिकाण : पुणे

दि.

# प्रतिज्ञापत्र

मी **मनीषा उमाजी बटवाल** या प्रतिज्ञापत्राद्वारे घोषित करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यास मंडळांतर्गत मराठी या विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी **''ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण : एक आकलन''** या विषयावर माझा शोधप्रबंध सादर करीत आहे.

सदर शोधप्रबंध मी डॉ. पांडुरंग भोसले (भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध, पुणे–७) यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला असून असे घोषित करते की, सदरच्या शोधप्रबंधात नमूद असलेली माहिती सत्य असून ती आजवर मी कोठेही प्रकाशित केलेली नाही. तसेच कोणत्याही विद्यापीठाला कोणत्याही पदवीसाठी सादर केलेली नाही.


**संशोधक**

**मनीषा उमाजी बटवाल**

९५/५६२, संत तुकाराम नगर,

पिंपरी, पुणे–१८.


ठिकाण : पुणे

दि.

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी ‘‘ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण : एक आकलन’’ हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी व्यासंगी, कुशल आणि तेवढेच विनयशील मार्गदर्शक डॉ. पांडुरंग भोसले यांचे बहुमोल मार्गदर्शन आणि वेळोवेळी प्रेरणा मिळाली. त्यामुळे मी माझे संशोधन पूर्ण करू शकले. याबरोबरच माझ्या संशोधन कार्यासाठी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रेरणा दिली, प्रोत्साहन दिले त्यांचे ऋण मानणे मी माझे कर्तव्य समजते.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. श्रीपाद भट, डॉ. कल्याण काळे, डॉ. द. दि. पुंडे यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना संशोधनाची दिशा स्पष्ट करण्यास सहाय्यभूत ठरल्या. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (जयकर ग्रंथालय, पुणे), मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय (दादर), पुणे मराठी ग्रंथालय, शासकीय ग्रंथालय (पुणे), महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), महात्मा फुले महाविद्यालय (पिंपरी), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील ग्रंथालय, यांच्या ग्रंथालयांचे ग्रंथपाल व त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

माझी वाढती अभ्यासाची जिज्ञासा जोपासण्यासाठी जिद्दीने माझ्या पाठीशी उभे राहणारे माझे पती श्री. शिरीष कोल्हे, माझे सासू–सासरे, दीर–जाऊबाई, आई–वडील, भाऊ–वहिनी, याबरोबरच माझी मुले, मित्रपरिवार यांनी मला वेळोवेळी संशोधन कार्यास प्रोत्साहित केले त्याबद्दल या सर्वांना मनापासून धन्यवाद देते.

मी माझा प्रबंध माझे गुरू परमपूज्य विष्णू महाराज पारनेरकर, योगगुरु शैलाताई (गायत्री माँ) भाले यांना समर्पित करते.

प्रबंध वेळेत व उत्तम रीतीने टंकलिखित करून देणाऱ्या सौ. विद्या पतंगे यांचे मन:पूर्वक आभार.



**मनीषा उमाजी बटवाल**

९५/५६२, संत तुकाराम नगर,

पिंपरी, पुणे–१८.

मो. ९४२२००९१२९

# अनुक्रमणिका


**भूमिका** **पृ. I –III**

**प्रकरण पहिले** **पृ. १ ते ४८**

**ह. मो. मराठे : व्यक्ती आणि वाङ्मय**

१ जन्म – बालपण – शिक्षण

२ पत्रकार – संपादक

३ ह. मो. मराठे यांची साहित्यसंपदा

३.१ कथासंग्रह

३.२ व्यंगकथासंग्रह

३.३ संपादित कथासंग्रह

३.४ कादंबरी

३.५ आत्मचरित्र

३.६ व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रह

३.७ स्फुटलेखन संग्रह

३.८ वैचारिक लेखसंग्रह

३.९ इतर लेखन

३.१० अनुवादित साहित्य

**प्रकरण दुसरे** **पृ. ४९ ते २०५**

**ह. मो. मराठे यांच्या कथा– कादंबऱ्यांमधील पुरुष व कुटुंबव्यवस्था**

१ पुरुषांचे कुटुंबातील स्थान व महत्त्व

२ पुरुषांचे कुटुंबातील नातेसंबंध

३ पुरुष आणि संघर्ष

३.१ मानसिक संघर्ष

३.२ आर्थिक संघर्ष

**प्रकरण तिसरे** पृ. २०६ ते २८४

**ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष व समाजव्यवस्था**

१ पुरुषांची सामाजिक बांधिलकी

२ पुरुष आणि नोकरी व्यवसाय

३ पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन

४ पुरुषांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन

५ पुरुषांचे समाजातील स्थान व महत्त्व

**प्रकरण चौथे** पृ. २८५ ते ३८४

**ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचे विविध पैलू**

१ पुरुषांची श्रद्धाशीलता

२ पुरुषांची बंडखोरी

३ पुरुषी मानसिकता

४ पुरुष आणि नैतिकता

**प्रकरण पाचवे** पृ. ३८५ ते ५६१

**ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील निवेदन आणि भाषा**

१ निवेदनाचे स्वरूप

२ स्वगत

३ संवाद

४ भाष्य

५ वर्णन

६ शैली विशेष

६.१ म्हणी व वाक्प्रचार

६.२ शब्दकळा

| | |
|---|---|
| **प्रकरण सहावे** | **पृ. ५६२ ते ५७०** |
| **उपसंहार** | |
| ❖ साधनग्रंथ | **पृ. ५७१ ते ५७४** |
| ❖ संदर्भग्रंथसूची | **पृ. ५७५ ते ५७८** |
| **परिशिष्टे** : | |
| परिशिष्ट १. ह. मो. मराठे यांचे हस्ताक्षर | **पृ. ५७९** |
| परिशिष्ट २. ह. मो. मराठे यांना मिळालेले पुरस्कार | **पृ. ५८०** |
| परिशिष्ट ३. संशोधनासंदर्भात लेखक व मार्गदर्शक यांच्याशी चर्चा करताना | **पृ. ५८१** |
| परिशिष्ट ४. ह. मो. मराठे यांची लेखनसंपदा | **पृ. ५८२ ते ५८४** |
| **निर्देशसूची** : | |
| ग्रंथकार सूची | **पृ. ५८५** |
| स्थलनाम सूची | **पृ. ५८६, ५८७** |

## भूमिका :

### १. विषयाचे प्रयोजन, महत्त्व आणि भूमिका :

साहित्यात व्यक्ती आणि समाजमनाचे प्रतिबिंब उमटलेले असते. समाजातील परिवर्तनाचे, माणसाच्या विविध नात्यांचे, त्याच्या विचार–विकारांचे प्रतिबिंब उमटलेले असते. लेखक हा समाजातच वाढत–घडत असतो. स्वातंत्र्यपूर्व कालखंडापेक्षा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील जीवन बऱ्याचअंशी वेगळे असल्याचे पदोपदी जाणवते. साहजिकच साहित्यानेही ते वेगळेपण टिपले. साहित्यातून मांडण्यात आलेला आशय, येणारी पात्रे, त्यांच्या समस्या, अभिव्यक्ती याबाबत हे साहित्य वेगळे ठरते.

यातूनच ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरीय अशा विविध प्रवाहांची निर्मिती झाली. या प्रवाहातून प्रामुख्याने माणूस, त्याचे जगणे, त्याच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, वैफल्यग्रस्तता, निराशा, मानसिक कोंडमारा, उद्ध्वस्तता, एकाकीपण, बेकारी, दुष्काळ, आत्महत्या, औद्योगिकरण, माहिती–तंत्रज्ञान, नवीन तंत्रज्ञानाला सामोरे जाण्यासाठी पारंपारिक कामगारांच्या समस्या अशा विविध विषयांना त्यातून शब्दबद्ध करण्यात येऊ लागले.

ह. मो. मराठे हे बहुअवधानी असलेले असे व्यक्तिमत्त्व आहे. एक पत्रकार, संपादक आणि लेखक म्हणून वावरत असताना त्यांना अनेक माणसे भेटली. त्यांचे जीवन जवळून पाहिले, अनुभवले. त्यांनी शब्दबद्ध केले. साहजिकच कथा–कादंबऱ्यांच्या आणि इतरही लेखनाच्या माध्यमातून त्यांनी माणूस जाणून घेण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान आहे. त्यात पुरुषाला विविध पातळ्यांवर वावरावे लागते. पुरुषी अहंकारामुळे त्याचे व्यक्तिगत आणि सामाजिक स्थानही वेगळे ठरते. त्याची जबाबदारी वाढते. समाजाचा एक घटक म्हणून त्याचे वेगळेपणही जाणवते. त्यामुळे पुरुष, त्याचे व्यक्तिगत जीवन, कुटुंबातील स्थान, समाजव्यवस्थेतील स्थान, पारंपरिक मानसिकता, धर्मकारण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, जीवनधारणा, तत्त्वज्ञान जाणून घेण्याच्या दृष्टिकोनातून “ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण : एक आकलन” हा विषय निवडला आहे. हीच या विषयनिवडीची भूमिका आहे.

## २. अभ्यासविषय निवडण्याची कारणे :

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ह. मो. मराठे यांची निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी ही कादंबरी वाचण्यात आली. जीवन जगत असताना संघर्ष ही गोष्ट अटळ आहे. पण वाट्याला आलेले प्रखर जीवनावास्तव तितक्याच ताकदीने मराठे यांनी या कादंबरीत मांडलेले दिसते. साहजिकच त्यांच्या इतरही लेखनाकडे एक वाचक म्हणून ओढले गेले. काही कथासंग्रह, कादंबऱ्या वाचल्या. कुटुंबातील एक पुरुष वैचारिक आणि सामाजिक जीवनात विविध नात्यांनी वावरत असतो. त्यांचे अंतर्बाह्य जग ह. मो. मराठे यांनी आपल्या कथा–कादंबऱ्यांमधून कसे चित्रित केले आहे ते जाणून घेण्याच्या दृष्टीनेच ''ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमील पुरुषचित्रण : एक आकलन'' हा विषय पीएच. डी. संशोधनासाठी निवडला आहे.

## ३. पूर्वसंशोधनाची थोडक्यात पाहणी :

ह. मो. मराठे हे मराठी साहित्य क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव. पत्रकार, लेखक, संपादक या नात्याने काम करीत असताना त्यांनी बहुविध स्वरुपाचे लेखन केले. त्यांच्या लेखनावर पुणे विद्यापीठात ''ह. मो. मराठे यांचे साहित्य: एक अभ्यास'' या विषयावर प्रा. राजेंद्रसिंह देवरे यांनी डॉ. अविनाश आवलगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. साठी संशोधन केलेले आहे. त्यांच्या साहित्यावर समीक्षात्मक, संशोधनपर लेखन झालेले असले तरी त्यांच्या पुरुष व्यक्तिरेखांवर स्वतंत्रपणे अभ्यास झालेला नाही.

## ४. संशोधनाची उद्दिष्टे :

❖ ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्याचे निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेणे.

❖ ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्याचे आशयविश्व जाणून घेणे.

❖ ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषविषयक जीवनजाणिवांचे स्वरुप समजून घेणे.

❖ ह. मो. मराठे यांनी रेखाटलेल्या पुरुष – व्यक्तिचित्रांचे अनुभवविश्व उलगडून दाखविणे.

❖ ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यामधील धर्म, राजकारण, समाजकारण, शिक्षण, तत्त्वज्ञान, संस्कृती, परंपरा, कुटुंबव्यवस्था व समाजव्यस्थेतील पुरुषांची भूमिका जाणून घेणे.

## ५. संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

ह. मो. मराठे यांनी पत्रकार, लेखक व संपादक या नात्याने काम करी असताना आपल्या लेखनीद्वारा विविध वाङ्मयप्रकारातून लेखन केलेले आहे. माणसांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना विविध नियतकालिकातून सदरे चालविली, त्यातून माणसाला जाणून घेण्याचा प्रयत्न केला. कधी व्यंगात्मक पद्धतीने मानवी जीवनातील विसंती, व्यंग्य, विनोद शब्दबद्ध केला. माणूस केंद्रवर्ती मानून कधी कथेच्या तर कधी कादंबऱ्यांच्या माध्यमातून समाजवास्तव जाणून घेण्याचा प्रयत्न केला. विविध व्यक्तींची व्यक्तिचित्रे रेखाटली. वैचारिक लेख लिहिले. तामिळनाडूतील पर्यटनाच्या निमित्ताने तमिळ लोकांचे जगणे, वंशविद्वेष जाणून घेण्याच्या दृष्टीने श्रीलंकेतील वास्तव जाणण्याचा प्रयत्न केला. स्वत:च स्वत:च्या जीवनाकडे मागे वळून पाहताना त्याला आत्मचरित्र म्हणायचे की नाही या संभ्रमात न पडता जे जीवनवास्तव गवसले त्याला शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. हे सर्व जाणून घेणे स्वतंत्र अभ्यासाचा, संशोधनाचा विषय ठरेल.

तथापि त्यांच्या कथा–कादंबऱ्या केंद्रवर्ती ठेवून त्यातील पुरुष, त्यांचे वैयक्तिक, सामाजिक आणि विविध पातळ्यांवरील भावविश्व उलगडून दाखविणे, त्याचे जगणे समजून घेणे, दृष्टिकोन तपासणे, एकूणच काय पुरुषांचे अंतर्बाह्य रुप तपासून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्या निमित्ताने लेखकाचा दृष्टिकोनही लक्षात येण्यास मदत होणार आहे. हीच या संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आहे.

## ६. वापरावयाच्या संशोधनपद्धती व स्वीकारावयाचे धोरण :

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण समजावून घेण्यासाठी प्रामुख्याने चरित्रात्मक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतींचे आवश्यकतेनुदार उपयोजन केले आहे. त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली, कोणत्या प्रेरणांमुळे मराठे कथा–कादंबरी आणि एकूणच लेखनाकडे वळले हे चरित्रात्मक संशोधन पद्धतीच्या आधारे समजून घेतले आहे. त्यांच्या वाङ्मयातील पुरुषचित्रण अभ्यासाला त्याची मदत झाली.

# प्रकरण पहिले

# ह. मो. मराठे : व्यक्ती आणि वाङ्मय

## प्रास्ताविक :

मराठी साहित्यविश्वात ह. मो. मराठे या नावाला वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान आहे. ह. मो. मराठे हे बहुअवधानी असे व्यक्तिमत्त्व आहे. एक पत्रकार, संपादक आणि लेखक म्हणून वावरत असताना त्यांना अनेक माणसे भेटली. वडिलांच्या भटकंती आणि तीर्थाटनाच्या निमित्ताने त्यांनाही भटकंती घडली. कौटुंबिक अनेक संघर्षांना त्यांना सामोरे जावे लागले. विविध घटना प्रसंगांनी त्यांचे जीवन ढवळून निघाले. वाट्याला आलेल्या भ्रमंतीत त्यांना अनेक माणसे भेटली. त्यांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले, अनुभवले ते जीवन त्यांनी शब्दबद्ध केले. क़था–कादंबऱ्यांच्या आणि इतरही लेखनाच्या माध्यमातून त्यांनी त्यांचे जगणे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. माणूस, त्यांचे विचार, विकार, भावना, वासना, विविध नातेसंबंध, माणसांचे जीवन, कुटुंब, समाजव्यवस्था, धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, माणसांच्या जीवनधारणा अशा विविध पातळ्यांवर माणसाला जाणून घेण्याचा प्रयत्न ह. मो. मराठे यांची लेखणी करते.

### १. जन्म–बालपण–शिक्षण :

माणूस आणि समाज यांना केंद्रस्थानी ठेऊन त्याच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणाऱ्या मराठे यांचा जन्म १ मार्च १९४० रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ‘झोळंबे’ या गावी झाला. प्रारंभीची ‘झोळंब्यातील’ आर्थिक स्थिती चांगली होती. ह. मो. मराठ्यांच्या घरी माडा–पोफळींची, केळी–भिरडांची, पपया–पानवेलींची बाग होती. झोळम्याचं घर मोठं होतं. त्याला लांबलचक पडवी, माजघर, चुलीची खोली, आणखी एक दोन खोल्या, माघची पडवी आणि दोन खळी होती. त्यात सुपारी, भिरडांची सोलं, भात, द्रोण, पत्रावळी, लाकडं, झाप, झुडपं होती. अंगणात तुळशी वृंदावन, फुलझाडं, जास्वंदी, कर्दळी, चाफा, केळीची बेटं, पोफळी, फणस, पपयांची झाडे होती. घरी दुभत्या गायी, त्यांची वासरं होती. ठिकाणात कामासाठी गडीकामेरी असत. या सर्व पार्श्वभूमीवर शेतीवाडी आणि इतर कामांसाठी अनेक मजुरांचा राबता होता.

ह. मो. मराठ्यांच्या वडिलांचा स्वभाव तापट होता. त्यांच्या स्वभावाचं एक चक्र होतं. दर दीड दोन वर्षांनी अतिउत्साहित मन:स्थितीत तर दीड दोन वर्षांनी आत्यंतिक नैराश्य. त्यांची सतत शेजाऱ्या–पाजाऱ्यांशी, गावकऱ्यांशी भांडणं होत. जुगार खेळणं, स्त्रीलंपटपणा या सगळ्या स्वभाव वैशिष्ट्यांचा परिणाम म्हणून जुगार खेळण्यावरून एका व्यक्तीशी भांडण होते. त्या भांडणाचे पर्यवसन ह. मोंच्या वडिलांना (काकांना) ठार मारण्याची धमकी देण्यात होते. परिणामी भितीपोटी झोळम्यातील सर्व इस्टेट त्यांनी विकून टाकली आणि कुरूंदवाडला येऊन निलकंठ महाराजांच्या घरी रामाच्या देवळात सर्व कुटुंब राहिले. पत्नी व मुलांना सोडून ह. मोंचे वडील सुर्ल्याला गेले. बरेच दिवस झाले तरी ते परत येत नाहीत असे लक्षात आल्यानंतर आईने मुलांना वेदपाठशाळेत घातले. काका सुर्ल्याहून परत आल्यानंतर मुलांच्या भवितव्याचा कोणताही विचार न करता त्यांचे शिक्षण बंद करून सर्व कुटुंबासह नरसोबाची वाडी, कोल्हापूरची अंबाबाई, देहू, आळंदी अशी तीर्थटने केली. आपल्या मुलांनी बाबलने कीर्तनकार व हनुने प्रवचनकार व्हावे अशी त्यांची इच्छा होती. इंग्रजी शिक्षणाला तर त्यांचा कडाडून विरोध होता. दरम्यानच्या काळात बहीण क्रिष्णी व आईला त्यांनी पुण्यात ठेवले. त्या दरम्यान बहीण क्रिष्णी व आईची तब्येत बरीच बिघडली. अशा स्थितीत ते सर्व कुटुंब काकांच्या आग्रहाखातर नाशिकला जाते. तेथेच क्रिष्णीचे निधन होते. नाशिकहून ते पुढे नर्मदा नदीच्या काठावरील ओंकारेश्वर, उज्जैन, प्रयाग, अयोध्या, मथुरा अशी तीर्थटने करीत अखेरी बेळगावमध्ये रामचंद्र नावाच्या चुलत भावाकडे काही दिवस वास्तव्य करून सुर्लं या ठिकाणी गोठ्यात राहण्याची वेळ त्यांच्यावर येते. गोव्यातील अस्वस्थ करणाऱ्या वातावरणाचा परिणाम तीर्थाटने करीत असताना बिघडलेल्या तब्ब्येतीला अधिकच बाधक ठरते. बाळवयातच ह. मोंच्यावरती आईची शुश्रुषा करण्याची वेळ येते. अखेरी नानोड्याला आत्याकडे आईचे निधन होते.

ह. मो. मराठे यांचे शालेय शिक्षणच मुळात वयाच्या बाराव्या–तेराव्या वर्षी सुरू झाले. वडिलांची भटकंती आणि परिस्थिती यामुळे कुरूंदवाड, नरसोबाची वाडी, सुर्लं, नानोडा इ. ठिकाणी शाळेत जाऊनही ह. मो. पहिलीतच होते. पुढे देऊळवाड्यात सातवीपर्यंत, मालवण

तालुक्यातील भंडारी हायस्कूलमध्ये माध्यमिक (जुनी मॅट्रिक), मालवणला बी.ए. व कोल्हापूरमध्ये एम.ए. चे शिक्षण पूर्ण झाले.

बी.ए. चे शिक्षण चालू असताना भंडारी हायस्कूलमध्ये त्यांना वर्षभर शिक्षकाची नोकरी करण्याची संधी येते. कोल्हापूरमध्ये एम.ए. चे शिक्षण चालू असताना राजाराम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी करण्याची संधी मिळते. वरील सर्व गोष्टी लक्षात घेता शिक्षण घेत असताना कितीही अडचणी आल्या, कितीही संघर्ष करावा लागला, कितीही ससेहोलपट झाली तरी त्यांचा शैक्षणिक प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावत गेल्याचे दिसून येते. राजाराम कॉलेजमधील प्राध्यापकाची नोकरी सुटल्यानंतर ते पत्रकारितेकडे वळलेले दिसतात.

बालवयापासूनच त्यांना वाचनात रूची होती. प्रामुख्याने गोष्टींची पुस्तके वाचण्याचा छंद त्यांना अधिक होता. त्या वाचनाचा फायदा शाळेत निबंधलेखनात होत असे. शिक्षकांकडून त्यांना शाबासकी मिळे. देविदास ऊर्फ बाबल हा त्यांचा भाऊ फारसा शिकलेला नसला तरी त्याला वाचनाची आवड होती. शेजाऱ्यांकडून किर्लोस्करचा अंक मागून आणून तो वाचत असे. कधी 'नवयुग', 'विवेक', 'स्वराज्य', 'मार्मिक' ही नियतकालिके, तर कधी नाटकाची पुस्तके आणत असे. बाबलला नाटके मोठ्याने वाचण्याची सवय होती. ह. मो. मराठे बाबलचे ते नाट्यवाचन मन लावून ऐकत. साहजिकच वाचनाचे हे संस्कार बाबलकडून कळत नकळतपणे झाले.

**२. पत्रकार / संपादक :**

इ. स. १९६४–१९६५ च्या दरम्यान पत्रकारितेसंदर्भात शिक्षण घेण्याची फारशी संधी नव्हती. त्या काळात महाराष्ट्र टाईम्सचा 'प्रशिक्षणार्थी पत्रकार' भरावयाचे असल्याची जाहिरात त्यांच्या निदर्शनास येते. लेखी परीक्षेत उत्तम गुण मिळूनही मुलाखती इंग्रजीमध्ये घेतल्या गेल्याने आणि इंग्रजीच्या अल्पज्ञानामुळे मुलाखतीमध्ये ते पास होऊ शकले नाहीत. कोल्हापूरला एम.ए. चे शिक्षण घेत असताना पत्रकारितेची संधी त्यांना मिळते. कोल्हापूरातून 'इंद्रधनुष्य' नावानं सुरू होत असलेल्या नियतकालिकाला उपसंपादक हवा असल्याची जाहिरात त्यांच्या वाचनात येते. त्या जाहिरातीच्या निमित्ताने संपादकीय विभागात प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणून मासिक १७० रू. स्टायपेंडवर त्यांच्या नोकरीचा एक पत्रकार म्हणून प्रारंभ होतो. वि. स. खांडेकरांसारख्या श्रेष्ठ

साहित्यिकाच्या भाषणाचा रिपोर्ट तयार झाल्यानंतर खांडेकरांपर्यंत पोहोचतो. साहजिकच एक चांगला रिपोर्टर म्हणून त्यांचा नावलौकिक होतो. वर्ष दीडवर्ष या प्रक्रियेत काम करीत असतानाच त्यांच्या सिनियरशी त्यांचे भांडण होते. पर्यायाने 'इंद्रधनुष्य' हे नियतकालिक त्यांना सोडावे लागते. 'इंद्रधनुष्य' सुटल्यानंतर 'पुढारी' या वृत्तपत्र कचेरीत कार्यकारी संपादकाचा सहायक म्हणून रात्रपाळीत काम करण्यास प्रारंभ करतात. दरम्यान राजाराम कॉलेजमध्ये प्राध्यापकाच्या नोकरीची संधी आल्याने पुढारीतील नोकरी संपते. प्राध्यापकाची नोकरीही पुढे एक वर्षात संपते. या सर्व पार्श्वभूमीवर पत्रकारितेत आपण नाव कमवायचे असे ठरवून टाकतात. मात्र कोल्हापूर सारख्या ठिकाणी पत्रकारितेत रमण्यापेक्षा पुणे-मुंबई गाठले पाहिजे असा विचार त्यांच्या मनात येतो. पुढे कोल्हापूर सोडून पुण्यात 'तरूण भारत' या वृत्तपत्रासाठी ते काम करू लागतात. बातमीतील एका शब्दाच्या अक्षम्य चुकीमुळे ५-६ महिन्यातच त्यांना 'तरूण भारत' च्या नोकरीला मुकावे लागते. त्यानंतर 'मनोहर' मासिकासाठी बरेच लेखन केले. एखाद्या साप्ताहिकासाठी काम करण्याची त्यांची इच्छा होती. मात्र मुकुंदराव किर्लोस्कर ह. मो. मराठे यांना किर्लोस्कर या मासिकाच्या संपादकपदाची जबाबदारी सोपवितात. त्यांच्या साहित्यिक वाटचालीसही किर्लोस्करमध्ये प्रकाशित झालेल्या माधुकरी नावाच्या कथेने प्रारंभ होतो. दोन वर्षानंतर दि. ३१ मे १९८५ रोजी ह. मो. मराठेंनी किर्लोस्कर मासिकाचा निरोप घेतला.

पुढे इ. स. १९८६ मध्ये 'लोकप्रभा' या साप्ताहिकाचा संपादक म्हणून काम करण्याची संधी येते. सव्वाअकरा महिन्यानंतर लोकप्रभा चे काम सुटते. दरम्यान कौटुंबिक संघर्षही सहन करावा लागतो.

इ. स. १९८८ मध्ये सोशल पब्लिकेशन फर्म्स् च्या 'घरदार' मासिकाचे कन्सल्टिंग एडिटर म्हणून ह. मो. मराठे जबाबदारी स्विकारतात. नियतकालिकाचे संपादक, पत्रकार म्हणून कार्य करीत असताना त्यांच्यातील साहित्यिकही सातत्याने जागता ठेवलेला दिसतो. 'घरदार' या मासिकाचे स्वरूप वैचारिक, प्रबोधनात्मक अशा स्वरूपाचे होते. साहजिकच तेथे काम करीत असताना ह. मो. मराठेंना लेखनाचा एक नवा फॉर्म सुचला. तो म्हणजे 'एक माणूस-एक दिवस!'

त्याचे स्वरूप एखाद्या प्रसिद्ध माणसाच्या सहवासात एक दिवस घालवून त्याचा दिवस कसा जातो, तो निर्णय कसे घेतो, तो विचार कसा करतो याचे निरीक्षण करायचे आणि त्याला अंतर्बाह्य जाणून घेऊन शब्दांच्या माध्यमातून शब्दांकित करायचा. हा शिरस्ता त्यांनी पुढे अनेक दिवस चालविलेला दिसून येतो.

पुढे 'रूपेरी', 'मार्मिक', 'घरदार', 'पुढारी', 'नवशक्ती' अशा विविध नियतकालिकांमध्ये एक पत्रकार, संपादक व विविध सदरे चालविणारे लेखक म्हणून त्यांनी आपली कारकीर्द मोठ्या जोमाने चालविली.

## ३. ह. मो. मराठे यांची साहित्यसंपदा :

ह. मो. मराठे यांनी कथा, व्यंगकथा, कादंबरी, आत्मचरित्र, व्यक्तिचित्रे, वैचारिक अशा स्वरूपाचे लेखन केले आहे. त्यातून समाजजीवनातील विविध पापुद्रयांचे दर्शन घडविले आहे त्याचा परामर्श घेऊ.

## ३.१. कथासंग्रह :

समाजकारण, अर्थकारण, राजकारण, उद्योग–व्यवसाय, समाजातील विविध प्रश्न, उद्योग क्षेत्रातील विविध प्रश्न, माणूस–त्याचे विचार–विकार, कौटुंबिक नातेसंबंध, हेवेदावे, हे आणि यासारखे मानवी जीवनसंबंधीचे विविध पैलू मराठे यांना आवाहक ठरतात. त्याचेच दर्शन त्यांच्या कथांमधून प्रत्ययाला येते. त्याचा परामर्श घेऊ.

### ३.१.१. सापेक्ष : (सापेक्ष–मॅलेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८६) :

माणसांचे जीवन संघर्षांनी भरलेले आहे. तो संघर्ष पचवणे प्रत्येक वेळी शक्य होतेच असे नाही. अशावेळी माणसाला ज्या मानसिक व्दंव्दाला सामोरे जावे लागते. त्याचे चित्रण या कथा संग्रहात आले आहे.

या कथासंग्रहात अनुक्रमे सापेक्ष, अँकर, बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह, जी सरकार, प्रतिनिधी, देशात सालं काही घडतच नाही, भले गृहस्थ, पंडित अशा काही कथा आलेल्या आहेत. मालक कामगार यांच्यातील संघर्ष आणि त्या संघर्षाकडे पाहण्याची पत्रकार, संपादक यांची दृष्टी कशी असते, सत्य आणि असत्य परिस्थितीमुळे कसे संघर्ष निर्माण करते आणि सत्य कितीही दाहक

असले तरी माणसाला परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते, जुवळून घेताना मानसिक संघर्ष करावा लागतो, परिस्थितीमुळे शरणागती पत्करावी लागते, भावनांचा बळी द्यावा लागतो, तो देताना कोंडमारा सहन करावा लागतो, तो ज्वाला बनून बाहेर पडण्यासाठी खदखदत असतो, या अस्वस्थ करणाऱ्या जीवनजाणिवा या कथासंग्रहात आल्या आहेत.

**३.१.२. वीज: (वीज – सन पब्लिकेशन्स्, पुणे, १९८६) :**

वीज या कथासंग्रहात अनुक्रमे 'वीज', 'दृश्य तेच आहे', 'बाई कशाला रडतील', 'बाजार', 'स्वप्नभूमी', 'कुंती', 'पूर्णचंद्र', 'परमाणू', 'लष्कर आलं!', 'खुर्ची', 'हे असंच' अशा अकरा कथांचा समावेश आहे.

घराबाहेर पडून काहीतरी करून दाखवावं अशी महत्त्वाकांक्षा बाळगून या कथासंग्रहातील नायिका घराबाहेर पडते. काहीतरी करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा मनात बाळगणाऱ्या स्त्रीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या कथासंग्रहातील नायिकेचे घर कण्हणारे, खंगणारे, पिरंगणारे, सतत आजारपण असलेले जग आहे. मुलांचा चिडण्याचा, रडण्याचा आवाज तिच्या महत्त्वाकांक्षेपायी तिच्यापर्यंत पोहोचत नाही. समाजसेवा करण्यासाठी बाहेर पडलेली या कथासंग्रहातील स्त्री स्वतःच्या घराचे मात्र कोणतेही दुःख हलके करू शकत नाही. घराच्या स्वास्थ्यात, आनंदात स्त्रीचाच सर्वात मोठा वाटा असतो असे ह. मो. मराठे या कथासंग्रहातून सूचित करतात. मृत्यू, खून, हिंसाचार, दारिद्रय, दैन्य, भूक ही आजच्या अर्थव्यवस्थेने मानवाला दिलेली देणगी आहे हे ह. मो. मराठेंच्या कथांमधून सतत दिसते.

**३.१.३. ज्वालामुख : (ज्वालामुख–मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई १९८६) :**

ज्वालामुख हा कथासंग्रह आधुनिक लोकजीवनातील अर्थपूर्ण अनुभवांचा कलापूर्ण वेध घेणाऱ्या जीवनानुभवांचा हा संमिश्र आविष्कार आहे. या कथासंग्रहात 'ज्वालामुख', 'निशाण', 'ज्वाला', 'आजोबा', 'कीटक', 'कर्मफल', 'काळ', 'भिंत खचली', 'उजाड', 'शाई' आणि 'रक्त' अशा वैविध्यपूर्ण कथांचा समावेश आहे.

औद्योगिक जगत, वृत्तपत्रीय क्षेत्र, तरूण पिढीच्या मनातील असंतोष, स्त्री जीवनातील विविध संदर्भ, वार्धक्यातील जीवन, कामगार जीवन, शेत–मजुरांचे प्रश्न, झोपडपट्टीतील जीवन

अशा विविध प्रश्नांना 'ज्वालामुख' मधील कथा वाचा फोडताना दिसतात. आपापल्या क्षेत्रात काम करत असताना कधी कधी विवेकच नाहीसा होतो. उरते ती फक्त ज्वाला आणि तीच ज्वाला वेगवेगळ्या पद्धतीने बाहेर पडण्याचा प्रयत्न करते. ती लेखणीतून उतरविण्याचा प्रयत्न ह. मो. मराठे करतात. कधी ते वृद्धांच्या मनातील खळबळ शब्दबद्ध करतात, तर कधी कामगार नेत्यांच्या, कधी शेतमजुरांच्या संघर्षाची गाथा टिपतात. सामाजिक जाणिवेने जेव्हा ते समाजाकडे पाहतात, तेव्हा झोपडपट्टीतले निराधार लोक दैनंदिन जीवनात कसे पोखरले जातात, हिंसाचक्रात तरूण पिढी कशी ओढली जाते, त्यामागे कोणती भावना काम करते, हे सर्व कधी एखाद्या विचारवंत लेखकाच्या माध्यमातून व्यक्त करतात, तर कधी कंपनी एक्झीक्युटीव्हच्या माध्यमातून व्यक्त करतात.

### ३.१.४. हद्दपार : (हद्दपार – मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९९१) :

'हद्दपार' हा कथासंग्रह पती–पत्नीच्या नात्यांवर प्रकाश टाकतो. पती–पत्नीच्या नात्यातील परस्पर भावना, मन, मते, संघर्ष, एकमेकांविषयीचे प्रेम, मत्सर, शारीरिक अभिलाषा, मानसिक कोंडमारा 'हद्दपार', 'पुन:हद्दपार' आणि 'तिसरा अंक' या कथांमधून व्यक्त होते.

नवरा, मुलेबाळे, संसार याच स्त्रीच्या विश्वाला सर्वस्व मानणारी स्त्री या विश्वात खोल गुंतत जाते. स्वत:चा विचार करायलाही तिला उसंत मिळत नाही. परंतु ज्या दिवशी तिला जाणीव होते की या आपल्या मानलेल्या विश्वात आपणाला काडीमात्र स्थान नाही, तेव्हा ती स्वत:च्या अस्मितेचा शोध घेऊ लागते. त्यावेळी ती संघर्ष करते. आधुनिक व सुशिक्षित स्त्रीलासुद्धा स्वत:च्या अस्मितेचा शोध घ्यावा लागतो, संघर्ष करावा लागतो. त्या संघर्षाचे विविध परिणाम समजून घेताना समाजजीवन आणि तेथील माणसे समजून घेताना कौटुंबिक, सामाजिक, राजकीय जीवनाबरोबरच समाजविघातक प्रवृत्तींवरही प्रकाश टाकण्याचे कार्य ह. मो. मराठे 'हद्दपार' या कथासंग्रहातून करतात.

वरील तीन कथांमध्ये एक विशिष्ट अंत:सूत्र असलेले जाणवते. जयवंत दळवी त्यासंदर्भात म्हणतात, ''मराठे यांनी प्रास्ताविकात म्हटले आहे की, 'हद्दपार' लिहिताना ते त्या पुढील कथा लिहिणार आहेत हे त्यांना माहिती नव्हते. तसेच दुसरी कथा लिहिताना त्यांना तिसऱ्या कथेची

कसलीच कल्पना नव्हती. त्यामुळे तिन्ही कथांत आता असलेले सूत्र त्यांना कथा लिहिताना जाणवले नव्हते. एक–एक कथा लिहिताना ते निर्माण होत गेले. पहिली कथा लिहिताना पती–पत्नीमधील नात्यांचे काही रंग त्यांना जाणवले नव्हते. तेवढ्यापुरती पहिली कथा लिहून झाली. मग त्याच जोडीच्या संबंधातले आणखी काही धागे जाणवले त्यावर दुसरी कथा झाली. मग आणखी काही वळसे सांगता येतील असे त्यांना वाटले आणि तिसरी कथा झाली.''[१]

या तिन्ही कथांचा सारासार विचार करता जाणविलेले अंत:सूत्र मांडताना जयवंत दळवी पुढे लिहितात, ''विशेषत: पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची आणि खास करून संसारात स्वत:ला गाडून घेतलेल्या स्त्रीची स्थिती किती करूणाजनक होते हे मराठे यांनी फार चांगले दाखवले आहे.''[२] एकूणच 'हद्दपार' मधील कथा परिणामकारक उतरल्या आहेत.

**३.१.५. पक्षिणी : (पक्षिणी – पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९७) :**

'पक्षिणी' या कथासंग्रहात अनुक्रमे 'माधुकरी', 'पाट', 'हर–हर गंगे', 'क्ष: ', 'कभिन्न', 'मी थोडासा आश्वत्थामा', 'व्रणार्त', 'विरूप', 'सावित्री–१, सावित्री–२', 'मृगया', 'पक्षिणी' या कथा येतात.

ह. मो. मराठे यांना समाजातील उपेक्षित घटकांविषयीचा कळवळा आधिक्याने जाणवतो. त्यातही पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीला मिळणारी तुच्छतेची, अवहेलनेची, दुय्यम अशी वागणूक त्यांची कथा अधिक लक्ष वेधून घेते. माता, भगिनी, पत्नी, प्रेयसी अशा विविध नात्यांनी वावरत असताना तिला अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागते, याचे लक्षवेधी चित्रण ह. मो. मराठे यांच्या या कथा करतात.

**३.१.६. दावं : (दावं – लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ.,१९९८) :**

स्त्री खेड्यातील असो वा शहरातील, तिच्या जीवनात पुरुषांचा संपर्क अटळ असतो. कुटुंब असो वा कार्यालय, तेथे तिला वेगवेगळ्या गोष्टींना सामोरे जावे लागते. स्त्री–पुरुषांच्या भाव भावना, विचार–विकार यांचे दर्शन 'दावं' मधील कथांमधून घडते. स्त्रियांच्या व्यथांच्या कथा या संग्रहात दिसून येतात. या संग्रहात 'भूमिकां', 'कापुरुष', 'वाल्या कोळी व बायको', 'दावं',

‘कृमी’, ‘भीमाशंकर चाळीतील जोशी काकू’, ‘ससा’, ‘देऊळ’, ‘समाधी’, ‘विहीर’ या कथा येतात.

गरिबी, दारिद्रय, उपासमार आणि यांच्या जोडीला वाट्याला येणारी अवहेलना, अपमान, माणसांचे षड्विकार, त्यातून वाट्याला आलेले दु:ख यांचे मन हेलावून टाकणारे चित्रण मराठे यांची कथा करते. ‘दावं’ सारखी प्रतीकात्मक कथा विशेषत: स्त्री जीवनाला असलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीतून आलेल्या विविध बंधनांचा पाश म्हणून येथे दावं ही संकल्पना पुढे येते.

### ३.१.७. इतिहासातील एक अज्ञात दिवस : (इतिहासातील एक अज्ञात दिवस – पारस पब्लिकेशन्स् कोल्हापूर, २००९) :

या कथासंग्रहात ‘डोळा’, ‘पुत्रजन्मोत्सव’, ‘पायाशी’, ‘दंगल’, ‘कुटुंब’, ‘गोकुळ’, ‘पत्ता’, ‘पोस्ट बॉक्स नंबर XXX’, ‘तो एक क्षण’, ‘अयोध्या’, ‘मोक्ष’, ‘पक्षी’, ‘भारतातील उन्हाळा’, ‘मैत्र’, ‘माती...मूर्ती’, ‘कुपुत्र’, ‘इतिहासातील एक अज्ञात दिवस’ अशा सतरा कथांचा समावेश आहे. उद्योग जगत, पत्रकारिता, जाहिरात, झोपडपट्टी, कामगार, स्त्रीसमस्या, राजकारण, शिक्षण, अर्थकारण, मानवी–भाव भावनांची गुंतागुंत अशा विविध विषयांवरील या कथा आशय आणि अभिव्यक्तीदृष्ट्या लक्ष वेधून घेतात.

### ३.१.८. घोडा : (घोडा – अजब पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, २००९) :

कारखाने, कामगार, व्यवस्थापन यांच्यातील संबंध, कालप्रवाहाबरोबर बदलत जाणारे दबाव अशा प्रश्नांवर आधारित घोडा मधील कथा आहेत. या संग्रहात ‘घोडा’, ‘मशीन’, ‘अग्नि’, ‘सापळा’, ‘टार्जेट’, ‘मानवतावादी लेखकाचा मृत्यू’, ‘सस्ती गंमत’, ‘हुतात्मा’, ‘बातमी’, ‘न्यूज स्टोरी’ अशा विविध विषयांवर या संग्रहातील कथा आलेल्या आहेत.

यंत्रामुळे औद्योगिक जीवनात क्रांती झाली. शेकडो लोकांची कामे एका मशीनवर झटपट होऊ लागली. त्यामुळे लोकांवर बेरोजगारी, उपासमारीची पाळी आली. त्यातूनच संप, दंगली होऊ लागल्या. मालक – कामगार असंतोष निर्माण झाला. मालक – कामगार दरी वाढतच गेली. त्यातूनच खून, मारामाऱ्या होऊ लागल्या. माणूस सत्ता व प्रतिष्ठेपायी दुसऱ्याच्या जीवावर उठू लागला. त्यातूनच दुसऱ्यांबरोबर स्वत:चीही अधोगती करू लागला. मोठमोठे बिल्डर्स, कंपन्या,

राजकीय व्यक्ती, भांडवलदार स्वत:च्या हितासाठी गरीब जनतेचा वाट्टेल तसा वापर करून घेतात, त्यांना बेघर करतात. त्यात जर कोणाचा मृत्यू झाला तर त्याची साधी बातमीसुद्धा पेपरमध्ये खरीखुरी वस्तुनिष्ठ छापली जात नाही. हे वास्तव 'न्यूज स्टोरी' सारख्या कथेवरून लक्षात येते.

'घोडा' या कथा संग्रहातील एकूणच कथा वेगळ्या आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा आहेत. या एकूणच कथांचे मूल्यमापन करताना राम मंत्री म्हणतात, "ह. मो. मराठे यांच्या घोडा संग्रहातील कथा विषयाच्या अन् भाषाक्षेत्राच्या दृष्टीने तर नवीन आहेतच, पण त्यांच्यात एकप्रकारचा ताजेपणा आहे. संवेदनाक्षम मनाने रूक्ष वास्तवातून टिपलेले हे अनुभव जिवंत होतात. हा लेखक आपला आहे असे कोणालाही वाटेल. अशा या कथा वाचणाऱ्यांना वाटेल, लेखक कोणतीही पोझ घेत नाही. या कथांत सवंग प्रणयभावना नाहीत. रचनेचा कृत्रिमपणा नाही, वास्तवाचे यथातथ्य दर्शन घडविले तरी त्याची मीमांसा हा त्यावर भाष्य नाही. आपल्यासमोर लेखक आरसा धरतो आणि फक्त त्यात जीवनाची यथातथ्य रूपे दाखवितो. या कथांत कारूण्य आहे, उपरोध आहे, मनाला सुन्न करणारे वास्तव प्रसंग आहेत. पण कशाचाही अतिरेक नाही. या संयमामुळे, लेखकाच्या तटस्थ, अलिप्त पण संवेदनाक्षम मनाच्या उमटलेल्या प्रतिबिंबामुळे या सर्व कथा यशस्वी झाल्या आहेत."[३] राम मंत्री यांनी मराठे यांच्या 'घोडा' या कथासंग्रहाचे मांडलेले वेगळेपण यथोचित असेच आहे.

### ३.१.९. युद्ध : (युद्ध : अजब पब्लिकेशन्स्, कोल्हापूर, २००९) :

'युद्ध' या कथासंग्रहात भांडवलदार, कारखानदार, व्यवस्थापन, कामगार, अधिकाऱ्यांची दडपशाही, कारखानदार व कामगार यांच्यातील संघर्ष, पत्रकार, वृत्तपत्रे, बातम्या, कामगारांचे शोषण, राजकारण या विषयांवरील कथा आलेल्या आहेत. या संग्रहात 'युद्ध', 'चौथा', 'माकडीण आणि पिल्लू', 'छोटे मासे', 'केळकर हसला', 'अंगार', 'लाव्हा' अशा एकूण सात कथांचा समावेश आहे. 'युद्ध' या कथासंग्रहातील एकूणच कथांविषयीचे मूल्यमापन करताना उमेश तेंडूलकर म्हणतात, "आजच्या व्यापारी आणि औद्योगिक संस्कृतीत माणसाचे स्थान व या

संस्कृतीशी उमलणारे त्याचे नाते शोधता शोधताच माणसाचे जगण्यासाठी चाललेले सनातन युद्ध नव्या संदर्भात, नव्या अन्वयार्थासह चितारणाऱ्या सात दीर्घ कथा हा युद्ध या संग्रहाचा गाभा आहे."[४]

ह. मो. मराठे यांची कथा माणूस, कुटुंब, त्यांचे नातेसंबंध, भावभावना, विचार, विकार, समाजव्यवस्था त्या अनुषंगाने राजकारण, अर्थकारण, शिक्षण, संस्कृती या अनुषंगाने माणसाच्या अंतर्बाह्य जगण्याच्या आणि जीवनजाणिवांच्या विविध तऱ्हा टिपते.

याबरोबरच उद्योग, भांडवलदार, कारखानदार आणि कामगार यांच्यातील सहसंबंध, कामगारांचे शोषण, त्यातून निर्माण होत असलेला संघर्ष, वृत्तपत्रे, शेतमजूर, झोपडपट्टी, स्त्रियांचे शोषण, स्त्रियांचा होणारा कोंडमारा, त्यांचा असंतोष, समाजातील अपप्रवृत्ती, कालप्रवाहाबरोबर बदलत जाणारे तंत्रज्ञान, पारंपरिक पद्धतीने काम करणारे कामगार, नव्या तंत्रज्ञानाला सामोरे जात असताना त्यांना पडणाऱ्या मर्यादा, त्यांचे संप, प्रसंगी घडत असणारे गुन्हे, विविध कार्यक्षेत्रातील व्यवस्थापन आणि व्यवस्थापकांच्या अरेरावींचे अनेक नमुनेही मराठे यांच्या कथांची आशयसूत्रे आहेत. त्यांची कथा कधी उत्तरे देते तर कधी तटस्थ राहून वस्तुनिष्ठपणे वास्तवाचे भान आणून देते.

## ३.२. व्यंगकथासंग्रह :

विनोद आणि व्यंग यात फरक करता येईल. विनोदी कथा माणसाला हसविते, कधी अंतर्मुखही करते, तशी व्यंगकथा विनोदाच्या जोडीला एखाद्या राजकीय, सामाजिक, साहित्यिक व्यंगावर, अपप्रवृत्तींवर अप्रत्यक्षपणे, सूचकतेने भाष्य करते. ह. मो. मराठे यांची लेखणी चौफेर वावरताना दिसते. समाजाची सूक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षणे करून समाजजीवनातील विविध गोष्टींवर परखडपणे मांडणी करते. तसेच समाजातील विविध अपप्रवृत्तींवर उपहासात्मक भाषेत भाष्य करण्याचे कार्यही करते. त्यातूनच प्रसंगानुरूप विविध व्यंगकथा निर्माण झालेल्या आढळतात.

ह. मो. मराठे यांच्या या व्यंगकथा 'लोकप्रभा', 'सामना', 'गावकरी', 'चौफेर', 'स्पंदन', 'दक्षिण युग', 'सागर', 'दीपलक्ष्मी', 'मार्मिक', 'महानगर', 'विपुलश्री', 'अनुभव', 'किस्त्रिम', 'समाचार', 'विशाखा', 'प्रभात', 'संस्कृती', 'चित्रछाया', 'कथाश्री', 'आपले

वसंतश्री', 'मिळून साऱ्याजणी', 'गोमंतक', 'पुढारी', 'जीवनज्योत', 'समुद्र', 'दामिनी', 'तरूण भारत', 'कृषीवल' अशा वेगवेगळ्या दिवाळी अंकांमधून १९७५ ते २००९ या काळात प्रसिद्ध झालेल्या दिसतात.

या दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध झालेल्या कथा पुढे 'दि बिग बॉस'(१९९४),'मुंबईचे उंदीर'(२०११),'चुनाव रामायण'(२०११),'श्रीमंत श्यामची आई'(२०११) या कथा संग्रहांमधून प्रकाशित केल्या गेल्या आहेत.

**३.२.१. दि बिग बॉस : (दि बिग बॉस – सायली प्रकाशन, पुणे, दु. आ. २००८) :**

या कथासंग्रहात विनोदी आणि उपहासात्मक पद्धतीने राजकारण, प्रशासन, विज्ञान–तंत्रज्ञान, व्यवस्थापन अशा क्षेत्रातील अनुभवविश्वावर प्रकाश टाकला आहे.

या कथासंग्रहात अनुक्रमे 'दि बिग बॉस', 'व्यसनमुक्ती', 'फायु डे वीक', 'वर्किंग डे', 'कॉँप्युटर म्हणजे काय', 'राजज्योतिषी', 'भाड्याने घर', 'अस्थिकलश', 'राज्याचं हित', 'खुले सरकार', 'स्वातंत्र्य दिन', 'फॉर हायली डेव्हलप्ड सुपर ब्रेन्स ओन्ली', 'घरच्या घरी', 'ब्लॅक फ्रायडे' अशा चौदा कथांचा समावेश आहे. मराठे यांचा पिंड मुळातच वास्तवाकडे झुकणारा आणि गंभीर असल्याने सभोवतालच्या जीवनातील विविध घटना–प्रसंगांवर विनोदी आणि उपहासात्मक मांडणी करताना त्यांची लेखणी योग्य तो परिणाम साधायला काही अंशी अपुरी पडताना दिसते. या संदर्भात नवशक्ती या नियतकालिकात पुस्तक परिचयात्मक आलेल्या लेखनात असे आढळते की, ''ह. मो. मराठे हे नाव तसे मराठी वाचकाला चटकन आकर्षित करणारे पक्षिणी, हद्दपार, देवाची घंट्टा, नो सेंटिमेंटस् प्लीज, काळेशार पाणी, सॉफ्टवेअर अशा कितीतरी साहित्यकृती त्यांनी घडविल्या आहेत. मराठी कथा व कादंबरीला समृद्ध केलेले आहे. त्यामुळेच वाचक सदैव त्यांच्या नव्या पुस्तकाकडे डोळे लावून बसलेले असतात, या पार्श्वभूमीवर त्यांचा 'दि बिग बॉस' हा नवा कोरा कथासंग्रह वाचक अगदी उत्कंठेने हाती घेतो परंतु वाचनाअंती मात्र असे जाणवते की लेखक ह. मो. असले, कथासंग्रहाचे नाव 'दि बिग बॉस' असे

असले तरी कथासंग्रह हा रंजकता, वाचनीयता, आशय या साऱ्या दृष्टीने 'खुजा' आहे. ह. मोंच्या वाङ्मयीन लौकिकाला साजेसा असा तो निश्चितपणे वाटत नाही.

ह. मों. चा पिंड मुळातच गांभीर्याकडे झुकणारा, वास्तववादी, विषयांना यथार्थतेने व प्रत्ययकारकपणे चितारणारा! असे विषय, आशय, शैली हे ते सदैव समर्थपणे हाताळतात. परंतु या कथासंग्रहाचा साज काहीसा विनोदी तर काहीसा विज्ञान काल्पनिक स्वरूपाचा आहे.''[५] एकूणच या कथासंग्रहाचे आशयविश्व पाहता 'नवशक्ती' या नियतकालिकात पुस्तक परिचयात्मक आलेल्या मांडणीतून या कथासंग्रहावर आलेली ही प्रतिक्रिया समयोचित अशीच आहे असे म्हणता येईल.

### ३.२.२. **मुंबईचे उंदीर : (मुंबईचे उंदीर – डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २०११)**

या संग्रहात अनुक्रमे 'मुंबईचे उंदीर', 'शेवटचा जन्म पुरुषाचा!', 'महान देवभक्त', 'वास्तू शास्त्रज्ञ', 'इतकं कळतं म्हटलं सामान्य माणसाला!', 'श्रुयुत पुरस्कारभूषण', 'सरळ मार्गाने', 'लक्षात म्हणून ठेवायचं नाही!', 'निवांत जागा', 'भक्तजन येती', 'राखीची साडी', 'एखाद्याचे नशीब', 'छोटी जाहिरात', 'करोडपतीची शिकवणी', 'चौथीची परीक्षा' या पंधरा कथांचा समावेश आहे. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राष्ट्रभक्तीपर, जाहिरात, चित्रपट नायिका, यांसारख्या विषयांना अनुसरून समाजजीवनातील व्यंग–विसंगतीकडे सूक्ष्म दृष्टीने पाहून या कथांमध्ये जी मांडणी येते ती हसता–हसता अंतर्मुख करणारी आहे.

### ३.२.३. **चुनाव रामायण : (चुनाव रामायण – डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २०११)**

या कथासंग्रहात अनुक्रमे 'चुनाव रामायण', 'राखीव मतदारसंघ', 'सरकारी काटकसरीचा मास्टर प्लॅन', 'तिसरी कुऱ्हाड', 'अज्ञात आजार', 'सरकारच्या व्यंगकथा', 'तंटामुक्ती', 'समाजवाद कोण आणील?', 'उपोषण सुटलं!', 'सोन्याचं सिंहासन', 'दुसरे वैकुंठगमन', 'प्रामाणिक उमेदवार', 'भ्रष्टाचार बंद!' या तेरा कथांमधून ह. मो. मराठे यांनी विविध विषय हाताळलेले आहेत.

या कथासंग्रहातील कथा प्रामुख्याने राजकारण, राजकारणातील रिझर्वेशन, सरकारचे काटकसरीचे प्लॅन, निवडणुका, समाजवाद, भ्रष्टाचार यांसारख्या विषयांवर प्रकाश टाकत हसवता हसवता ती कथा अंतर्मुख करते.

**३.२.४. श्रीमंत श्यामची आई : (श्रीमंत श्यामची आई – डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २०११):**

'श्यामची आई' चित्रपटाचा आजच्या वातावरणात झगझगीत रिमेक, मूळ कथेत बदल, या चित्रपटातील डान्स् कसा फिट करता येईल अशा विषयांवर येथे लक्ष वेधले आहे. तसेच भरपूर प्रसिद्धीसाठी मरणवेळही प्लॅन करता येईल काय? व्याख्यानाच्या गर्दीसाठी कोणती युक्ती करता येईल? चौफेर वाचन आहे असं भासवण्यासाठी पुस्तकांचे ग्रुप्स् अक्कलहुशारीने कसे करावेत? क्रिकेटपटूंप्रमाणे नामवंत लेखकांनाही विकत घेऊन दिवाळी अंकात खेळवता येईल का? अशा वेगवेगळ्या भ्रष्ट, अनैतिकता या विषयांवरचे काही पैलू लक्षात घेऊन मराठे यांनी सूक्ष्म नजरेने साहित्यसृष्टीतील व्यंग – विसंगतीच्या हसता हसता अंतर्मुख करायला लावणाऱ्या कथांचा संग्रह 'श्रीमंत श्यामची आई' मध्ये केलेला आहे. या कथासंग्रहात अनुक्रमे 'श्रीमंत श्यामची आई' 'वाचनसंस्कृती', 'माझा साक्षेपी कुत्रा', 'लेखकाची मरणवेळा', 'गोड गोष्टीची गोष्ट', 'दिमाखदार कवितासंग्रह', 'लिटररी ब्रँड', 'चौफेर वाचन', 'अलोट गर्दी', 'नॉट पेड पत्रप्रयोग', 'लेखकाचं आर्थिक हित', 'साहित्याचा दर्जा' अशा बारा कथांचा समावेश आहे.

ह. मो. मराठे यांचे समाजजीवनातील सभोवतालच्या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण आहे. त्यामुळे समाजजीवनातील विविध अंगोपांगे त्यांच्या लेखनाचा विषय होतात. मानवी जीवनातील विविध घटकांवर, समाजातील दंभावर, एखाद्या घटनेवर उपहासात्मक आणि विनोदी अशा स्वरूपात ते भाष्य करतात. हेच त्यांच्या या कथासंग्रहामधून प्रकर्षाने जाणवते. त्यांचा हा उपहास भाष्य करीत कधी रंजनाच्या माध्यमातून अंतर्मुख करतो. मात्र हा उपहास वैयक्तिक स्वरूपाच्या टिकेकडे झुकत नाही असे म्हणता येईल.

## ३.३. संपादित कथासंग्रह :

ह. मो. मराठे यांचा पिंडच मुळी समाजाभिमुख असलेला दिसून येतो. समाजातील विविध वृत्ती, प्रवृत्ती, माणूस, त्याचे विचार –विकार हे मराठे यांना सातत्याने आवाहक वाटत असल्याचे

दिसते. साहजिकच त्यांची कथा समाजजीवनाचे विविध पैलू शाब्दांकित करते. त्यामुळे त्याची दखल घेऊन प्रसिद्ध अभिनेते रवी पटवर्धन यांच्या कल्पनेतून मराठे यांच्या काही कथा मालिका स्वरूपात प्रसारित करण्याचे ठरले. त्यातूनच डिसेंबर १९९३ ते मार्च १९९४ या काळात काही निवडक कथांवर आधारित 'आजची नायिका' ही मालिका मुंबई दूरदर्शन केंद्रावरून प्रसारित झाली. त्याच कथा पुढे 'आजची नायिका' या नावाने प्रसारित झाल्या.

### ३.३.१. आजची नायिका : (आजची नायिका–नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, १९९४) :

दूरदर्शनवरून प्रसारित झालेल्या या कथा अनुक्रमे 'दावं', 'वीज' व 'युद्ध' या कथासंग्रहांमधून घेतल्या आहेत. या कथासंग्रहात संपादित केल्या गेलेल्या मूळ कथा व मालिकेचे नाव यांचा अनुक्रम पुढीलप्रमाणे – 'वाल्या कोळी आणि बायको'(वाल्या कोळी आणि बायका), 'भूमिका' (भूमिका), 'कापुरुष' (कापुरुष), 'दावं' (दावं), 'ससा' (दोन माणसं, चार पात्र), 'कृमी' (किंमत), 'वीज' (वीज), 'बाई कशाला रडतील?' (नवं घर), 'स्वप्नभूमी' (स्वप्नभूमी), 'कुंती' (नवं नातं), 'माकडीण आणि पिलू' (अधांतर), 'कुटुंब' (कुटुंब), 'भक्ष्य' (भक्ष्य), 'अधांतर चा स्क्रीन प्ले' (अधांतर), 'कथा आणि पटकथा' (कथा आणि पटकथा) असा आहे.

ह. मो. मराठे यांच्या कथांमधून स्त्रीचित्रप्रधान अशा कथांची निवड आशा साठे यांनी या मालिकेसाठी केली. मालिकेसाठी कथा निवडताना आजची नायिका गेल्या पंधरा–वीस वर्षात कसकशी बदलत गेली, तिच्या भोवतीचे कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण कसे बदलत गेले, आजच्या स्त्रीच्या समस्या काय आहेत आणि त्या काळाबरोबर कशा बदलत गेल्या असे विषय समोर ठेऊन कथांची निवड केली गेल्याचे दिसते.

### ३.३.२. ह. मो. मराठे यांच्या निवडक कथा : (ह. मो. मराठे यांच्या निवडक कथा–संपादक– दीपक घारे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००५):

नवनागर औद्योगिक वास्तवाच्या निवडक कथा या संग्रहात प्रसिद्ध झाल्या आहेत. या कथासंग्रहात 'पक्षिणी', 'विहीर', 'भीमाशंकर चाळीतील जोशी काकू', 'घोडा', 'न्यूज स्टोरी', 'ज्वालामुख', 'कर्मफल', 'हद्दपार', 'घरच्याघरी' अशा नऊ कथांचा समावेश आहे.

नागरी जीवनातील अनुभवांचे अनेक पदर ह. मो. मराठे यांच्या साहित्यात दिसतात. परिस्थितीचा दाब आणि महानुभाव, कुटुंबसंस्था आणि स्त्रीचे स्वातंत्र्य, स्वप्न आणि वास्तव यांच्यातल्या अंतर्विरोधांना त्यांनी कलात्मक रूप दिले. बाह्यसंघर्ष हा मराठ्यांच्या कथाचित्रनातील महत्त्वाचा घटक येथे प्रत्ययाला येतो. बाह्यसंघर्षामागील मानसिकतेचा, मानवी भावनांचा धागाही त्यांनी विचारात घेतला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत भांडवलशाही, मुक्त अर्थव्यवस्था, संघटन तत्त्वाचा प्रभाव अशी जी स्थित्यंतरे झाली त्याचे सामाजिक परिणाम मराठे यांच्या कथांमध्ये प्रतिबिंबित झाले आहेत. बदलत्या वास्तवाचे चित्रण स्वागतशील वृत्तीने, काळाला अनुरूप अशापद्धतीने ते करीत राहिले. औद्योगिक क्षेत्राइतकीच वृत्तपत्रेही नव्या अर्थव्यवस्थेचा भाग बनली. पैसा आणि प्रतिष्ठेची प्रलोभने वाढली. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने नोकरी करू लागल्यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात वेगळ्या प्रकारचे ताण निर्माण झाले. स्त्री–पुरुष संबंधामधील आणि अर्थार्जनाच्या संदर्भातील नैतिक चौकट, विचारस्वातंत्र्याच्या नावाखाली बदलू लागली. ऐंशी आणि नव्वदच्या दशकातील विज्ञान–तंत्रज्ञानाची प्रगती आणि आर्थिक सुबत्ता या बदलत्या वास्तवाला साहित्यात नव्या संवेदनशिलतेने ह. मो. मराठे यांनी स्थान दिले आहे.

## ३.४. कादंबरी :

ह. मो. मराठे मानवी मूल्यांचा शोध घेणारा एक संवेदनशील लेखक म्हणून अधिक लक्षात राहतात. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून माणूस, त्याची विविध नाती, समाजव्यवस्थेतील अनेक दुवे, सत्तास्पर्धा, स्त्रियांचे प्रश्न, पुरुषप्राधान्यामुळे स्त्रियांना मिळणारी दुय्यमतेची वागणूक, प्रसंगी होणारे शोषण, स्त्रीचा प्रक्षोभ, प्रसंगी जीवनमूल्यांशी केलेली तडजोड, बाह्य जगतातील मूल्यहीनता, औद्योगिक जगत, कारखानदार, कामगार, कामगारांचे शोषण, वरिष्ठांची दडपशाही,

कंपन्यांच्या जीवघेण्या स्पर्धा, कंपन्यांच्या वाढ आणि विकासासाठी झटत असताना त्यामध्ये काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचे कुटुंबाकडे होणारे दुर्लक्ष, त्यातून निर्माण होणारे कौटुंबिक प्रश्न, पद, पैसा आणि प्रतिष्ठा यांच्यापायी कुटुंबाच्या वाट्याला येणारे उद्ध्वस्तपण, बेकारी, बेकारीमुळे होणारी मनाची तगमग, वृत्तपत्रे, वृत्तपत्रांच्या अनुषंगाने येणारे विविध संदर्भ, भूक आणि वासना यांची अस्वस्थ करणारी चित्रणे, जीवनातील कारूण्य आणि दुःख या आणि यांसारख्या विविध प्रश्नांना ह. मो. मराठे यांची कादंबरी वाचा फोडताना दिसते.

### ३.४.१. निष्पर्ण वृक्षावर भर दपारी : (निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी – मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७२) :–

साठोत्तरी मराठी साहित्यातील एक वाद्ग्रस्त पण महत्त्वपूर्ण कादंबरी. श्लील–अश्लीलतेच्या कचाट्यात सापडली असली तरी चार दशकांनंतरही मराठी साहित्यातील स्थान आणि महत्त्व निर्विवादपणे सिद्ध केलेली कादंबरी म्हणून तिला ओळखले जाते. ही कादंबरी एका मध्यमवर्गीय संवेदनशील माणसाची शोककथा आहे. पदवीधर असणाऱ्या या नायकाला छोटीशी नोकरी होती. वसू ही त्या नायकाची बायको असून ती गरोदर असते पण नायकाची नोकरी जाते. महिनाभर तो ऑफिसला जातो असे खोटे सांगून नोकरीसाठी वणवण फिरत असतो. निदान काही दिवसांसाठी तरी आपल्या पत्नीला–वसूला नोकरी मिळावी असे नायकाला वाटते. गोडसे काकूंच्या नातवाच्या बारशाला येणाऱ्या मिसेस देसाईंच्या शाळेतील शिक्षिकेची जागा वसुला मिळेल या आशेने तो त्यांच्या पतीची, मुलाची स्तुती करतो. मिसेस देसाईंबरोबर तो पगारासाठी घासाघीस करतो. काकू, देसाई यांची अपमानास्पद बोलणी ऐकतो. आपल्या दुःखाला वसूच कारण आहे असे त्याला वाटते. चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी या नायकाची अवस्था झालेली आहे. ढोणकर नावाचा मित्र भेटल्यावर वसूला पपई खाऊ घालावयाची व गर्भपात घडवून आणावयाचा असे तो ठरवितो. मिसेस देसाईंची शाळा म्हणजे शाळा नसून कुंटणखाना आहे असे त्याच्या लक्षात येते. या साऱ्या प्रकाराने त्याला वेड लागल्यासारखी स्थिती होते, म्हणून तो दवाखान्यात वसूला न भेटताच पायऱ्यांपासून मागे वळतो. कादंबरीच्या शेवटी वसूचे मातृत्व व आपले पितृत्व उद्ध्वस्त करतो. ह. मो. मराठे यांची 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' ही कादंबरी

आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी गेल्या चार दशकांपासून सतत चर्चेत राहिलेली आहे. या कादंबरीविषयी आपली भूमिका मांडताना शरणकुमार लिंबाळे म्हणतात,

“ ‘निष्पर्ण वृक्ष’ हे नायकाच्या बेकारीचे प्रतिक आहे, तर ‘भर दुपार’ ही प्रतिकूल परिस्थितीचे प्रतिक आहे. कादंबरीच्या शीर्षकातच नव्हे, तर संपूर्ण कादंबरीत प्रतीकांची रांग लागलेली दिसते. एकीकडे उत्कट काव्य, तरल चिंतन, विस्मयचकित करणारी फँटसी, स्वप्नं आहेत, तर दुसरीकडे असभ्य शिवराळपणा, बीभत्स अश्लीलता, परिस्थितीचे दाहक चटके आणि आक्रोश आहे. एकाच वेळी कुरूप आणि रम्य याचा अनुभव देणारी ही कादंबरी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक, आर्थिक आणि जातीय संघर्ष अधिक तीव्र होत गेल्याचे दिसते. अशा संघर्षाचे पडसाद ह्या कादंबरीत उमटलेले दिसतात. बेकार ब्राह्मण तरूणाच्या मनातील उद्वेग या कादंबरीत प्रकट झाला आहे. ह. मो. मराठे ह्यांनी ‘निष्पर्ण वृक्षावर’ ची निर्मितीप्रक्रिया सांगताना म्हटले आहे, ‘बेकारीच्या यातना काय किंवा भ्रमनिरास काय, हा माझा एकट्याचा अनुभव नाही. माझ्यासारख्या हजारो भारतीय तरूणांना याच प्रकारच्या मन:स्थितीतून जावं लागत असणार. नव्हे, जावं लागत आहे.’ (पृ.२०) गरिबी आणि जीवनातील अनिश्चितता ह्यामुळे भविष्याविषयी वाटणारी चिंता, समाजाविषयीची अश्रद्धा, जीवनाविषयी वैफल्य आणि भ्रमनिरास ह्या भावनेचे थैमान ह्या कादंबरीत प्रकट झालेले दिसते.”[६] एकूणच या कादंबरीचा विचार करता मानवी जीवनातील बेकारीच्या प्रश्नाचे अस्वस्थ करणारे विदारक असे चित्र अत्यंत उपहासात्मक भाषेत शब्दांकित केल्याचे दिसते.

### ३.४.२. काळेशार पाणी : (काळेशार पाणी – नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९७२) :

‘काळेशार पाणी’ ही कमळीच्या भावजीवनाची शोकात्म कहाणी आहे. कोवळ्या निरागस, हळव्या स्वभाववृत्तीमुळे तिचा शेवटी करूण अंत होतो. तिला भाबड्या स्वभावाच्या सामंतबद्दल जवळीक वाटू लागते. त्याचे वागणे भावाच्या मायेचे आहे, असे समजणाऱ्या कमळीला आईच्या दबावाखाली त्याची रखेल होणे भाग पडते. पण जेव्हा तो जीव द्यायला निघतो तेव्हा ती त्याला पुन्हा असे कृत्य करणार नाही असे मनापासून सांगते. अर्धवट तारूण्याने मुसमुसणाऱ्या,

हळुवार वृत्तीच्या कमळीचे सुरूवातीपासून अखेरपर्यंत मानसिक व शारीरिक धिंडवडे काढले जातात त्याचे चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

कमळीची आई भिकीचे जीवनही दयनीय आहे. परिस्थितीनेच तिला धंद्याला लावलेले असल्यामुळे नाजूक भावनाची दखल घेण्याबाबत तिचे मन जणू मरून गेलेले असते. जिव्हाळ्याच्या नात्यांची, लैंगिक नीतीमूल्यांची चाड तिला वाटत नाही. शारीरिक व मानसिक पातळ्यांवर तिचे वारंवार शोषण होते. पोटाची खळगी भरण्यासाठी पोटच्या गोळ्याचाच बळी भिकी घेते. भूक आणि वासना या मानवाच्या प्रबळ आणि उपजत प्रेरणा. शृंगार, भावनेतील हळुवारपणा, भावुकता नि संवेदनशीलता, कामुकतेमधील क्रूरता, पशुत्व, ओंगळपणा, मनुष्यस्वभावाची अनाकलनियता, जीवनातील कारूण्य व दु:ख यांचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीत आले आहे.

'काळेशार पाणी' या कादंबरीचे आशय आणि अभिव्यक्तीदृष्ट्या दुवे मांडताना गो. ग. कुलकर्णी लिहितात, "कमळी आणि विशेषत: भिकी यांच्यासारख्यांच्या जीवनानुभवांचे स्वरूप प्रकृतीत घटनाप्रधान असते. त्यांचे भावजीवन तीव्र, स्पष्ट व बरेचसे ढोबळ असते आणि बहुधा ते घटनाप्रसंगरूपाने प्रगट होत असते. भिकी कमळीचे हे जीवन चित्रण सूक्ष्म – तरल भाव स्पंदनाच्या पातळीवर वावरत नसल्यामुळे त्याला एकापाठोपाठ घटना – प्रसंग उलगडत जाणाऱ्या, काहीशा भडक वाटणाऱ्या एखाद्या चित्रपटासारखे रूप प्राप्त झालेले आहे. पण भिकी कमळीच्या गडद भावजीवनाचे रंगच त्यातून निर्माण झालेल्या घटना – प्रसंगांना, आपापत: प्राप्त होत जातात. म्हणून या कथावस्तूचा याहून अधिक विस्तार झाला असता तर तो तिच्या प्रकृतीला अन्यायकारक ठरला असता असे वाटते. ह्या कथावस्तूचा दर्शनी भडकपणा घालविण्यासाठी किंवा अन्य काही हेतूंनी तिचा विस्तार करायचे योजिले असते तर लेखकाला ठिकठिकाणी विश्लेषणात्मक पुरके जोडावी लागली असती पण मग त्यामुळे ह्या कथावस्तूचे प्राकृतिक सौंदर्य डागळले गेले असते. तसे न करण्यात लेखकाने मोठे कलात्मक धाडस दाखविले आहे."[७] परिस्थितीने असहाय्य बनलेल्या स्त्रीच्या परवडीचे आणि उद्ध्वस्थतेने मन हेलावून टाकणारे चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

### ३.४.३. इतिवृत्त : (इतिवृत्त – मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९८२) :

या कादंबरीचे कथानक श्रीरंग नाडकर्णी या संपादकाला केंद्रवर्ती ठेवून त्याची धडपड, त्याची प्रतिज्ञा, त्याची बांधिलकी आणि माघार अधोरेखित केली आहे. या कादंबरीत श्रीरंग नाडकर्णी मुख्य संपादकाच्या भूमिकेत आहेत. गोविंदराव दळवी हे मोठे कारखानदार आहेत. विश्वासराव मयेकर हे राज्यातील खाजगी वाहतूक व्यवस्था पाहतात. कविराज मधुकर हे राजकवीचा किताब मिळालेले राज्याचे भूषण आहेत. भास्कर वैद्य संपादकांच्या ऑफिसमध्ये काम करतात (चीफ सब) आणि अण्णासाहेब जगदाळे हे मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेत आहेत.

श्रीरंग नाडकर्णी हे संपादक म्हणून काम करीत असताना त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. संपादकाच्या माध्यमातून त्यांनी पाणीप्रश्न, हॉटेल मालक व कामगार यांचे प्रश्न, हॉटेल व्यावसायिकांचे प्रश्न, राजकीय नेत्यांचे भ्रष्टाचार इ. प्रश्नांवर सडाडून टीका केली आहे. वरिष्ठ नेते कशाप्रकारची कामे करतात, शिक्षण नसतानाही वेगवेगळी क्षेत्रे कशी गिळंकृत करतात व एकमेकांना भ्रष्टाचारात कसे पाठीशी घालतात याचे मार्मिक दर्शन या कादंबरीतून होते. गांधीवादी विचारसरणीत पिंड तयार झाल्याने बाह्यजीवनातील मूल्यहीनता, भारतातील स्वातंत्र्योत्तर राजकीय संकृतींनी निर्माण केलेल्या राजकारण्यांचा बेछुट आणि विधीनिषेधशून्य आचार, वाढत्या उद्योगसमूहांचे व्यावसायिक हितसंबंधांचे चित्रण, व्यक्तिगत मूल्यभावनांच्या मर्यादा अशा गोष्टींवर 'इतिवृत्त' या कादंबरीद्वारे प्रकाश टाकलेला आहे.

### ३.४.४. कुरूक्षेत्र : (कुरूक्षेत्र – सन पब्लिकेशन्स्, पुणे, १९८५) :

शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार व सत्तेसाठी खालच्या थराला जाऊन मिळविलेला विजय या कादंबरीतील पहिल्या भागात आला आहे, तर अंध स्त्रीची जीवनकहाणी या कादंबरीच्या दुसऱ्या भागात अधोरेखित केली आहे.

कादंबरीच्या पहिल्या भागात प्राचार्य बेलसरे हे डॉ. म्हसकर व प्राध्यापक उल्हास भावे यांच्या खुनांचे मूक साक्षीदार आहेत. एका गोसावी नावाच्या विद्यार्थ्याने, आपल्या संस्थेकडे थकलेल्या स्कॉलरशिपच्या पैशांची मागणी केली होती. त्याला बेदम मारहाण करण्यात येते. क्रांतिकारी युवक दल (क्रांयुद) संघटनेतर्फे गोसावीला मारहाण करण्यात हात असलेल्या तुकाराम

फराटेंविरूद्ध मोर्चा काढला; मूक निदर्शने केली. शैक्षणिक संस्थांना सरकारी खजिन्यातून हजारो – लाखो रूपये अनुदान मिळत असल्याने सेक्रेटरी तुकाराम फराटेंनी आपली संस्था मोठी करू, गावोगावी कॉलेज आणि शाळा खोलू, पैसा मिळवू या गोष्टींचा उल्लेख डॉ. म्हस्करांकडे केला. म्हसकरांना ते मान्य नव्हते. त्यांना शांतीवन कॉलेज आपल्या कल्पनेनुसार चालवायचे होते, तेही शक्यतो सरकारी मदतीशिवाय. या सर्व गोष्टींचा परिणाम डॉ. म्हसकरांचा खून तुकाराम फराटेंकडून केला जातो. तुकाराम फराटेंच्या मार्गदर्शनाखाली चालविण्यात येत असलेली ही संस्था विद्यार्थी, प्राध्यापक यांचे वेगवेगळ्या प्रकारचे मिळालेले पैसे खात होती. त्यातच गोसावी या विद्यार्थ्याचे स्कॉलरशिपचे पैसे मिळाले नाहीत म्हणून भावे यांनी जोरदार आंदोलन छेडले होते. शांतीवन महाविद्यालय प्राध्यापक संघटनेचे प्रमुख उल्हास भावे झाले होते. शिक्षकांचे पगार वेळेवर होत नव्हते. होस्टेल निवासी विद्यार्थ्यांना जेवण चांगले मिळत नव्हते म्हणून उल्हास भावे व संघटनेने वेगवेगळी आंदोलने केली. (रेशन कार्ड मोर्चा, ताटवाटी मोर्चा) याचा परिणाम स्वरूप तुकारम फराटेंच्या माणसांनी जीपची धडक देऊन उल्हास भावेला जिवे मारले होते. उल्हास भावे नंतर प्राचार्य बेलसरेंचा मुलगा राजू याने आंदोलनासाठी पुढाकार घेतला. मोर्चा, घोषणा, उपोषण, सत्याग्रह, निवेदने, वर्तमानपत्रातील प्रसिद्धी हे सर्व चक्र निरंतर चालू राहण्यासाठी, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी एकामागून एक लिडर तयार होतात हे ह. मो. मराठे सूचित करतात.

कादंबरीच्या दुसऱ्या भागात सुमा नावाची अंध नायिका ह. मो. मराठे यांनी रेखाटली आहे. सुमाचा शालेय वयात रेटिना सरकल्यामुळे डोळ्यांचे ऑपरेशन होते. त्यातच तिचे डोळे अधू झालेले असतात. तिचा विवाह वसंतराव दामले नावाच्या विक्षिप्त माणसाशी होतो. तो व्यवसायाने शिक्षक असतो. तो सुमाला शिक्षिका बनविण्याची अट सुमाच्या वडिलांना घालतो. पण सुमाला डोळ्यांची साथ नसल्याने व नवऱ्याच्या जाचाला कंटाळून तसेच गर्भवती असल्याने ती शिक्षण अर्धवट सोडते. तिच्यावर मारहाण, उपासमारीची पाळी येते. तिच्या बाळालाही मारहाण होते. तिचे स्त्रीधनही तिच्याकडून फसवून तिचा नवरा काढून घेतो. दोन वेळा ऑपरेशन करूनही नवऱ्याच्या मारहाणीमुळे तिची दृष्टी पूर्णपणे जाते. शेवटी ही नायिका नवऱ्याकडून घटस्फोट घेते. घटस्फोटानंतर बाळाचाही विरह वाट्याला येतो. त्याची गडबड, रडणं, ओरडणं नव्हतं. त्यामुळे

सुमा मनावरचं संपूर्ण आयुष्यावरचं ओझं उतरतं. मारहाण, शिवीगाळ, उपासमार, उपहास, टिंगल या सर्वांतून तिची मुक्तता होते. घटस्फोटानंतरही नवरा मोलकरणीकरवी सुमाला निरोप पाठवितो, दुसऱ्या बायकोची सेवा चाकरी करून रहा आणि नांदायला येणार असेल तर लवकर ये, तरूण आहेस तोपर्यंतच मला उपयोग होईल असा स्त्रीलंपटपणाचा आणि कामुकतेचा प्रत्यय देतो.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता कुरूक्षेत्र ही कादंबरी पहिल्या भागात शिक्षक, प्राचार्य, विद्यार्थी, विद्यार्थी संघटना, शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचार, सत्तेची कमालीची ओढ या विषयांवर प्रकाश टाकते, तर दुसऱ्या भागात एक अंध स्त्री केंद्रवर्ती ठेवून पुरुषी मानसिकतेमुळे तिच्या जीवनाची होणारी परवड टिपते.

### ३.४.५. कलियुग : (कलियुग – मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९१) :

कलियुग ही औद्योगिक जगतातील अनुभवविश्व मांडणारी कादंबरी आहे. या कादंबरीतील नायक व्यवस्थापक पदावर आहे. संप, मोर्चा, निदर्शने वगैरे प्रकरणातून संघर्षशील कामगार जगत इ. ह. मोंनी रेखाटलेले आहे. कलियुग कादंबरीमधले असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट सी. एम. कत्रे सामान्य कामगारांमधून ढोरकष्टावर वर आलेले आहेत. त्यांची भाषा शिकारी कुत्र्यासारखी तिखट आहे. कलियुग ही कादंबरी कारखान्याच्या शॉप फ्लोअरवर घडणारी कादंबरी आहे. असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट (ऑपरेशन्स्) सी. एम. कत्रे या टेरर असणाऱ्या व्यवस्थापकाची ही शोकांतिका आहे. कत्रे सामान्या कामगारांतून वर आलेला रफ आणि टफ कामगार आहे. त्याला काम टाळणाऱ्या जगतात बापू पाटील या कामगार लीडर्सना धडा शिकवायचा आहे. प्रधानांची कामगार पुढाऱ्यांना फूस आहे. मालकांपैकी मल्होत्रांना कत्र्यांच्या जागी आपल्या जावयाला आणायचे असते. काब्रांचा पाठिंबा कत्र्यांना आहे. ही मालक मंडळी एकाच वेळी व्यवस्थापक व कामगार पुढारी यांना झुंजवत ठेवतात. कत्रे हाकलले जातात. कामगार जगतापच्या तीन अश्राप मुलांचा खून होतो. कामगार पुढारी बापू पाटील याच्यावरच संशय येतो. कारखानदार, कामगार आणि कामगार पुढारी यांचे वेधक चित्रण करणारी अशी ही कादंबरी आहे. कलियुग या कादंबरीविषयी परेन शिवराम जांभळे म्हणतात,

"आजकालच्या गतिमान जीवनात औद्योगिक प्रगतीचा मोठा वाटा आहे. औद्यागिक क्षेत्राने आपल्याला चहुअंगाने घेरले आहे. त्यातील चढउतार, ताणतणाव, संप, टाळेबंदी, अशांतता, कामगारसंघर्ष आणि त्यातून उद्भवणारा हिंसाचार हे आता नित्याचे झाले आहे. शिवाय भांडवलदार, कारखानदार, कामगार, कामगार नेते यांच्यातील स्वार्थ, स्पर्धा, चढाओढ, वाद, प्रतिवाद, प्रतीशोध असा हा जीव घेणारा सूडाचा प्रवास आहे. प्रतीस्पर्ध्याला बुद्धिबळाच्या खेळात अडकवून त्याच्यावर मात करण्यासाठी प्राणांतिक कोंडी करण्याचे प्रकार घडतात. खरेदीविक्रीसाठी उंटाच्या तिरक्या चाली चालल्या जातात. आपलेच घोडे दामटण्यासाठी शत्रूलासुद्धा वेळप्रसंगी जवळ केले जाते. या तमाम लहानसहान संघर्षांची मालिका म्हणजे कलियुग ही कादंबरी होय."[८]

परेन यांनी या कादंबरीचे यथोचित असेच मूल्यमापन केले आहे. कारखानदारी, कामगार, कामगारांचे प्रश्न, कामगार कार्यकर्ते, त्यांच्यातील हेवेदावे, मोठेपणासाठी धडपड, वरिष्ठांची तडजोड, कामगारांचे शोषण, कौटुंबिक नातेसंबंध या गोष्टी येथे अधोरेखित केल्या आहेत.

### ३.४.६. देवाची घंटा : (देवाची घंटा – अमोल प्रकाशन, पुणे, १९९४) :

'देवाची घंटा' या कादंबरीचा विषय प्रामुख्याने शारीरिक भूक हा आहे. कोकणातील एका छोट्या गावातील मारूतीचे देऊळ सांभाळणाऱ्या गोप्या भट नावाच्या भिक्षुकाची ही कहाणी आहे. मूळ गाव सोडून गोप्या भट एका गावात येतो. खाजगी मालकीचे मारुतीचे देऊळ सांभाळतो. मालकाच्या मृत्यूनंतर देऊळ पंचांच्या ताब्यात जाते. त्यातून मिळणारे उत्पन्न, प्रसादाची फळे, तांदूळ सर्व काही मिळेनासे होते. या काळात गोप्या भटाचा 'येसू' नावाच्या तेलीण स्त्रीशी संबंध येतो. त्याला येसूपासून शंकऱ्या व चंद्री ही मुले होतात. परिस्थितीमुळे तो शंभर रूपयांची चोरी करतो आणि पकडला जातो. नंतर गोप्याचा बाप त्याला आपल्या गावी घेऊन जातो. त्यावेळी वासनाधीन झालेला गोगटे वकील आणि वासू भटजी या गोप्या भटाच्या मित्रांच्या दोघांच्या वासनेचा बळी झालेल्या येसूला मुलगी होते. केळीचा घड चोरताना येसू विहिरीत पडून मरते. मुलीची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार होत नाही. शेवटी ही मुलगी पाबळीच्या साठलेल्या थंड पाण्यामुळे मरते.

या कादंबरीतील भिक्षुक ब्राह्मण पुजाऱ्यांच्या जीवनातील कारूण्याचे दर्शन घडविले आहे. याबरोबरच निराधार स्त्री–जीवनातील अगतिकता येथे चित्रित केली आहे. कोकणचे ग्रामजीवनही यातून प्रत्ययाला येण्यास मदत होते.

**३.४.७. नो सेंटिमेंटस् प्लीज! : (नो सेंटिमेंटस् प्लीज!– अमोल प्रकाशन, पुणे, १९९६) :**

रमेश पंडित आणि नलू या कादंबरीतील विवाहित जोडपे आहे. त्यांना डॉक्टरांनी तुम्हांला मूल होणार नाही असे सांगितलेले असते. रमेश पंडित यांच्यामध्ये दोष असतो. डॉक्टरांचा सल्ला घेतला जातो. रमेश पंडित यांची पत्नी – नलू मूल दत्तक घेण्यासाठी नकार देते. मग डॉक्टर दुसरा पर्याय सुचवतात. दुसऱ्या पुरुषाचे वीर्य इंजेक्शनद्वारे स्त्रीच्या ठिकाणी सोडायचे. परंतु नलू अज्ञात, अनोळखी माणसाचे बीज पोटात वाढविण्यास नकार देते. मग रमेश पंडित त्यांच्या ओळखीच्या मित्राचे विष्णूचे बीज नलूच्या पोटात वाढविण्याचा विचार करतो. परंतु डॉक्टर ओळखीच्या व्यक्तीचे बीज वापरण्यास नकार देतात. मग रमेश पंडित आपल्या पत्नीला (नलूला) विष्णूबरोबर फक्त गर्भधारणेसाठी शरीरसंबंध ठेवण्यास भाग पाडतो. फक्त गर्भधारणा होण्यापुरतेच! तिघांच्या परस्पर संमतीने तसे करण्यात येते. गर्भधारणा होते पण त्यानंतर विष्णू आणि नलू यांचे शरीरसंबंध सुरूच राहतात. नायकाला म्हणजेच रमेश पंडितलाच बाजूला व्हावे लागते. शरीरसंबंध ही एक भावनाशून्य अशी यांत्रिक क्रिया नाही. कामक्रीडेतून स्त्रीपुरुषांत भावनिक गुंतागुंत निर्माण होऊ शकते. स्त्रीपुरुषांचे नाते केवळ तर्काने समजून घेता येत नाही असा आशय ह. मो. मराठे यांनी या कादंबरीतून सूचित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**३.४.८. नरिमन पॉईंटचा समुद्र :(नरिमन पॉईंटचा समुद्र–नवचैतन्य प्रकाशन, मुंबई,२००२):**

सनशाईन आणि एव्हर फ्रेश या दोन सोपच्या कंपनीच्या स्पर्धा या कादंबरीत रेखाटल्या आहेत. औद्योगिक क्षेत्रातील स्पर्धा दर्शविणारी ही लघु कादंबरी आहे. या दोन प्रतिस्पर्धी कंपन्यातील एकाच वस्तूची विक्री करण्यासाठी पती–पत्नी आपल्या पदाच्या अधिकारामुळे परस्परांचे वैरी होतात. परिणामत: त्यांचे वैवाहिक जीवन विस्कटून जाते. भावजीवन उद्ध्वस्त होते. बाजारपेठेतील हे शत्रुत्व त्यांच्या सांसारिक जीवनात येते. गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन आणि त्यांची विक्री करताना जाहिरातबाजीचा आधार घ्यावा लागतो. हे जाहिरातयुद्ध चांगलेच भडकते.

'नरीमन पॉईंटचा समुद्र' कादंबरीत केतकी साने आणि अविनाश साने यांच्या स्पर्धक कंपन्यांमध्ये मार्केटिंग मॅनेजर्स म्हणून काम करणाऱ्यांचा मोडत चाललेला संसार दाखविला आहे. ज्याप्रमाणे नरीमन पॉईंटच्या समुद्राचा थांग लागत नसतो, येणाऱ्या वादळांचा तो अंदाज देत नाही त्याप्रमाणे तत्त्वनिष्ठ व्यक्तींची शोकांतिका ही कादंबरी प्रकर्षाने मांडते. पद, पैसा आणि प्रतिष्ठेपायी कौटुंबिक जीवन कसे उद्ध्वस्त होते याचे विदारक चित्रण या कादंबरीत आले आहे.

**३.४.९. मार्केट : (मार्केट – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. २००७) :**

ह. मो. मराठे यांची मार्केट ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. एस. के. केळकर हे 'हायटेक प्लास्टिक्स्' या बॅग्ज् बनविणाऱ्या कंपनीचे मार्केटिंग मॅनेजर. अत्यंत हुशार, चाणाक्ष, आपल्या क्षेत्रात विलक्षण तरबेज आहेत. आपल्या कारखान्यात तयार झालेल्या वस्तू सुमार दर्जाच्या असल्यातरी त्या कुणाच्यातरी गळ्यात मारण्याचं कसब केळकरांच्यात आहे. आपल्या कामगारांना भेट देण्यासाठी दोन हजार बॅगांची ऑर्डर एका कंपनीकडून मिळते. परंतु या बॅगा हलक्या प्रतीच्या, सॅम्पलशी न जुळणाऱ्या असल्याने त्या कंपनीचे पर्चेस मॅनेजर अहुजा हे सगळा लॉट परत करण्याची भाषा करतात. हे एम. डी. ना कळल्यावर ते संबंधित अधिकाऱ्यांना फैलावर घेतात. परंतु या सर्व गोष्टींमागे असलेले टेक्निकल डायरेक्टर आपले जावईच आहेत हे समजते तेव्हा त्यांचा पारा झरझर खाली उतरतो.

शंभर टक्के नफा मिळविण्यासाठी डायरेक्टरनी हलक्या प्रतीचा कच्चा माल वापरायला भाग पाडले. तीस हजारांची रक्कम लाच घेतल्यामुळे अहुजांच्या घराचं स्वरूप पालटते. माल परत करण्याची भाषा करणाऱ्या अहुजांनी तो कसा काय स्विकारला याची सर्वांना शंका येते. शेवटी केळकरांची एक फित वाढते. पण अहुजांचा बळी जातो. केळकरांची पत्नी अश्विनी बँकेत कर्ज मंजूर करून पार्ट्या, गिफ्टस् मिळविते. केळकरांची मुलगी तनुजावर दिल्लीत बॉसकडून बलात्कार होतो. त्या बदल्यात केळकरांना दिवानसाहेब (बॉस) प्रकरण दाबून ठेवण्यासाठी एक लाख रूपये देतात. आपल्या नाकर्त्या, बेजबाबदार, स्वार्थी वडिलांच्या लांच्छनास्पद वागणुकीमुळे अगतिक होऊन ती आत्महत्या करते. नेहमीप्रमाणे अश्विनी केळकर एक लाखात निम्मा वाटा मागते.

मराठ्यांनी या कादंबरीतून आपल्यासमोर उच्चभ्रू समाजाची बदललेली मूल्ये, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, येणारी वैफल्ये यांचे चित्रण केले आहे.

वैज्ञानिक प्रगती आणि औद्योगिकरण यामुळे माणसांची प्रगती झाली मात्र ही प्रगती करीत असताना वैयक्तिक स्वार्थ, हितसंबंध जपत असताना निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर मराठे यांची ही कादंबरी प्रकाश टाकते. या कादंबरीविषयीची भूमिका मांडत असताना अजित मगदूम म्हणतात, "इथे खऱ्या अर्थाने संघर्ष आहे तो मूल्यांचा. आदर्शवादी मूल्ये पावलोपावली पराभूत होत असताना दिसत असल्यामुळे त्यांवर श्रद्धा कशी ठेवता येईल असा प्रश्न मराठ्यांनी आपल्यापुढे उभा केला आहे. दुसरीकडे या आदर्शवादी मूल्यांना मानवतावादी तत्त्वज्ञानाला तिलांजली दिली गेली तर कुटुंब, समाज, राष्ट्र याचं अस्तित्व धोक्यात येईल याची रूखरूख वाटते. मराठ्यांनी आपल्यासमोर एका उच्चभ्रू नवश्रीमंत समाजाची बदललेली मूल्ये, त्यातून निर्माण होणारे प्रश्न व त्यांच्या सोडवणुकीतून येणारं वैफल्य याचं चित्र मोठ्या ताकदीनं उभं केलं आहे."[१]

एकूणच या कादंबरीचा साकल्याने विचार करता उत्पादक, विक्रेते, उत्पादने, ग्राहक, कंपनी व्यवस्थापन, अधिकारी, विक्रीकला, उत्पादकांची मनमानी, ग्राहकांची फसवणूक, अधिकारी लोकांची घसरलेली नैतिकता, स्वीकारलेल्या तडजोडीला आलेले विकृतीचे स्वरूप अशा विविध विषयांना ही कादंबरी स्पर्श करते. एकूणच काय समाजातील विविध गोष्टींचे होत असलेले विकृतीकरण, मूल्य – जाणिवांचा ऱ्हास, रक्ताच्या नात्यांचे होत असलेले व्यापारीकरण यांचे मर्मग्राही चित्रण या कादंबरीत आलेले आहे.

**३.४.१०. सॉफ्टवेअर : (सॉफ्टवेअर – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु. आ. २००७) :**

या कादंबरीतील देशमुख हा नायक उद्योगसमूहात फसला जातो. औद्योगिक संस्कृतीत प्रामाणिक असलेल्या देशमुखांच्या वाट्याला आलेली वंचना येथे मांडण्यात आली आहे. देशमुखांच्या मुलाची शिक्षणातील फसवणूक, कॉपी करून मार्कस् मिळविणाऱ्या मुलांसमोर देशमुखांचा मुलगा अपयशी होतो याचेही चित्रण आले आहे. मुलगी प्रेम प्रकरणात फसते. देशमुखांची पत्नी स्वत: काही अर्थार्जन करावं या प्रेरणेतून घरच्याघरी काहीतरी व्यवसाय सुरू

करते. पण भांडवल नसल्याने तिला व्यवसाय गुंडाळावा लागतो. अशातऱ्हेने या चौघांची प्रामाणिक जीवन जगताना वाट्याला आलेली वंचना येथे मांडली आहे.

आधुनिक स्पर्धाप्रधान अर्थव्यवस्था, औद्योगिकीकरण, व्यापारीकरण यामुळे वाढत असलेले ताणतणाव आणि त्यांचा माणसांच्या जीवनावर होणारा परिणाम या कादंबरीत रेखाटला आहे. देशमुख आधी एका छोट्या कंपनीत काम करीत होते. नंतर ते बीवायपी ग्रुप कंपनीच्या उद्योगसमूहात काम करतात. नव्या कंपनीत खूप काम करून कल्पकता वापरून मालकांचा म्हणजेच एस. बी. चा विश्वास संपादन करतात. नंतर अकार्यक्षम म्हणून ज्या कामगारांना कामावरून काढून टाकावे असे कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटते. त्यात देशमुखांनी टाळाटाळ केली व महिला कर्मचारी श्रीमती गांधी या वरिष्ठांचे समाधान करू शकत नाही, त्यांना पाठीशी घालण्याच्या आरोपावरून देशमुखांना कामावरून काढून टाकण्यात येते.

उद्योगप्रधानतेकडे वळणाऱ्या, हळूहळू चांगल्या–वाईट स्वरूपातील औद्योगिक संस्कृतीला सामोरे जाऊ पाहणाऱ्या आपल्या समाजातील बदलत्या मानवी अनुभवांचा वेध या कादंबरीतून घेतला आहे. एकूणच धकाधकीच्या या जीवनात माणसाची होणारी कोंडी या कादंबरीत चित्रित केली आहे.

**३.४.११. प्रास्ताविक : (प्रास्ताविक – विभासा पुस्तक महाल, पुणे, नवीन आवृत्ती २००९) :**

झोपडपट्ट्यांमधील भीषण वास्तव, झोपडपट्ट्यांची निर्मिती, झोपडपट्ट्या एक शहराला लागलेला बट्टा तर दुसरीकडे झोपडपट्ट्यांच्या निर्मितीची अपरिहार्यता, निर्माण होणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाय तसेच मध्यमवर्गीय सर्वसामान्य माणूस या झोपडपट्ट्यांकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो यावर प्रकाश टाकणारी प्रास्ताविक ही कादंबरी आहे.

एका मध्यमवर्गीय सोसायटीच्या समोर रातोरात आठ – दहा झोपडपट्ट्यांची भर पडते. त्या सोसायटीतील पै, पेंडसे, इतर सभासद ती झोपडपट्टी हाकलण्यासाठी प्रयत्न करतात. झोपडपट्टीमुळे घाण, दुर्गंधी, सुरक्षा हे प्रश्न उभे राहिले होते. साळोखे नावाच्या साहेबाला पैसे देऊन झोपडपट्टीत नवे–जुने लोक राहायला आले होते. त्यांच्यातही पाण्यावरून भांडणे होत होती. एकूणच झोपडपट्ट्यांमधील बकालपण येथे येते.

'मनोहरपंत' त्यांचे मालक भिकीशेठ परांजपे यांच्या साठीनिमित्त एका हाऊस मॅगेझीनचा विशेषांक काढण्याचे काम हाती घेतात. प्रेसमध्ये संप असल्याने काम थांबते, समारंभाच्या दिवशी अंक प्रसिद्ध होऊ न शकणे म्हणजे साफ बेअब्रू होणार असते. आपली सुखदु:खे मोठ्या प्रमाणात बाह्य घटकांवर अवलंबून असतात. आपण आपल्या दु:खाकडे नव्या डायमेन्शन्स्मधून बघायला शिकले पाहिजे असे मनोहरपंत विचार करतात. अंक प्रकाशनाच्या निमित्ताने येणाऱ्या संभाव्य अडचणींवरही लेखकाने प्रकाश टाकला आहे. अंक प्रकाशनाच्या निमित्ताने येणारे अडथळे, निर्माण होणारे प्रश्न याबरोबरच मनोहरपंतांना कौटुंबिक जीवनातही निर्माण होणाऱ्या प्रश्नांना ही कादंबरी अधोरेखित करते. एकूणच आजच्या बुद्धीजीवी वर्गाच्या जीवन प्रेरणांमधील अंतर्विरोधाचा शोध आणि ठाव घेणारी प्रक्षोभक अशी ही कादंबरी आहे.

ह. मो. मराठे यांची कादंबरी माणूस, त्याची विविध नाती, त्यांचे विचार, विकार, भावना, परिस्थिती यांचा शोध घेते. विशेषत: कारखानदार, कामगार, विविध संघटना, त्यांचे कार्यकर्ते, माणसांचे एकमेकांविषयीचे हेवेदावे, यशस्वी होण्यासाठीची धडपड, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, पदासाठी विविध पातळ्यांवरही स्त्री–पुरुष यांच्याकडून होणारी विविध प्रकारची तडजोड, विविध कंपन्या, त्यांच्यातील स्पर्धा, त्यातील पदाधिकारी, उत्पादक, विक्रेते, उत्पादने, व्यवस्थापन, ग्राहक, माणसांवर परिस्थितीपोटी वाट्याला येणारी अस्वस्थता, व्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य नसल्याची जाणीव एकीकडे तर दुसरीकडे अन्याय करणारी व्यवस्था उलथवून टाकण्यासाठीचा प्रक्षोभ अशा विविध प्रश्नांवर मराठे यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून प्रकाश टाकला आहे. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्ट्या त्यांची कादंबरी वेगळेपणा सिद्ध करते.

## ३.५. आत्मचरित्र :

ह. मो. मराठे यांनी कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रण असे विविध साहित्यप्रकार हाताळत असताना समाजातील विविध कार्यक्षेत्रातील अनेक माणसे पाहिली. त्यांचे विचार, कृती अनुभवल्या. एकूणच त्यांचे व्यक्तिमत्त्व अनुभवसमृद्ध असे बनले. साहजिकच इतरांचे जीवन समजून घेत असताना समाजातील विविध प्रश्न हाताळत असताना त्यांची लेखणी बरीच अंतर्मुख होताना दिसते. त्यातूनच स्वत:च्या जीवनाकडे मागे वळून पाहत असताना जे साहिले, पाहिले,

अनुभवले त्याचा आलेख रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातूनच आत्मचरित्रपर अशा 'बालकाण्ड' आणि 'पोहरा' या साहित्यकृतींची निर्मिती झालेली दिसते.

### ३.५.१. बालकाण्ड : (बालकाण्ड : मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु. आ. २००८):

ह. मो. मराठे यांनी बालकाण्ड या आत्मचरित्रपर लेखनात चित्पावन बोलीच्या माध्यमातून कोकणातील त्यांचे बालपणीचे जीवनमान रेखाटले आहे. वयाच्या साधारणत: सातव्या वर्षापासून बाराव्या वर्षापर्यंतची ह. मों. च्या आयुष्याची हकीकत या पुस्तकात आली आहे. ह. मों. चे आई, वडील, भावंडे यांची ती कहाणी आहे. कोकणातल्या सावंतवाडी जवळचे तळकट या गावाला लागून असलेले झोळंब, सुर्ल, तेलबांध, नानोडा, नरसोबाचीवाडी अशा ठिकाणी ही कहाणी घडते. ह. मो. च्या बालपणी झोळंब्याला माडा पोफळीच्या बागा होत्या. त्यांचा वडिलांचा स्वभाव विचित्र व तापट होता. त्यांच्या वाईट सवयी व तीर्थाटनाच्या सवयींमुळे त्या कुटुंबावर वणवण करण्याची पाळी येते. त्यामुळे शिक्षण अर्धवट राहते. आई आजारपणातच लेखकाच्या लहानपणीच मरते. शेवटी वडीलही मरतात. अंगजात हुशारीमुळे ते शिक्षण चालूच ठेवतात. कधी बांधावर, कधी झाडाखाली, कधी खोपीत राहावे लागते. कधी कंदमुळांवर व कधी माधुकरी मागून दिवस काढावे लागतात.

आपल्या बालवयातील अभावग्रस्त आयुष्याचे, वडिलांच्या विक्षिप्त, उग्र स्वभावामुळे, हुकूमशाही वृत्तीमुळे अधिकच खडतर झालेल्या जगण्याचे, स्वत:च्या व कुटुंबियांच्या पराकोटीच्या शोषणाचे मर्मग्राही चित्रण बालकाण्ड मध्ये आढळते.

'बालकाण्ड' विषयी आपली भूमिका मांडताना डॉ. मेधा सिंधये म्हणतात, ''बालवयात भोगाव्या लागलेल्या शारीरिक, मानसिक यातना, दारिद्रय, बाल्ल्याची ससेहोलपट यांचे हृदयद्रावक चित्रण यात आहे.''[१०] मराठेंच्या या आत्मचरित्राची मांडणी व भाषा यासंदर्भात लीला उपाध्ये म्हणतात, ''लेखकाने या पुस्तकात कोकणातील चित्पावनी, गोव्यातील कोकणी बोलींचा सढळ वापर संवादलेखनात केला आहे. या बोलींशी परिचित नसलेल्या वाचकांना सुरूवातील ती भाषा थोडी ठेचकाळते; पण कथनाचा वेगच इतका ओघवता आहे की एकदा त्या बोलीची मांडणी कळली की, वाचक या कथनात अक्षरश: ओढला जातो.''[११]

घरातील कर्त्या पुरुषाच्या काही चुकांमुळे कुटुंबाची कशी वाताहत होते याचे अस्वस्थ करणारे चित्रण येथे येते.

### ३.५.२. पोहरा : (पोहरा – मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु. आ. २००८) :

'पोहरा' या ह. मो. मराठे यांच्या दुसऱ्या आत्मचरित्राच्या भागात 'बालकाण्ड' चा पुढील भाग आला आहे. 'बालकाण्ड' मध्ये 'हनू' च्या शिक्षणाचा प्रारंभ झालेला दिसून येतो. 'पोहरा' मध्ये हनूची संघर्षमय शैक्षणिक यशोगाथा, हनूच्या थोरल्या भावाची संसारकथा, वडिलांचा जीवनसंघर्ष आणि शोककथा येते. तसेच मानवी जीवनातील यशाचे गमक शिक्षण आहे हे समजल्यानंतर प्रत्यक्षातील शिक्षण, शिक्षणामुळे आलेली वैचारिक प्रगल्भता, 'स्व'चा शोध आणि जगाच्या विस्ताराला समजून घेण्याची प्रक्रिया 'पोहरा' मध्ये आलेली आहे.

'पोहरा' चा पुष्कळसा कथाभाग मालवणात घडतो. त्यामुळे मालवणी भाषेचा वापर 'पोहरा' मध्ये प्रामुख्याने आला आहे. ह. मो. मराठे यांचे कुटुंब, त्यांची विविध नाती, समाजजीवन त्यांच्या 'बालकाण्ड' आणि 'पोहरा' मधून चित्रित झाले आहे. चित्पावन बोलीच्या माध्यमातून कोकणातील पार्श्वभूमीही येथे रेखाटली आहे. बालपणापासूनच मराठे यांना शिक्षणासाठी करावा लागलेला संघर्ष, वडिलांची तीर्थाटने, त्यांचा विक्षिप्त स्वभाव हाच कुटुंबाच्या अधोगतीला कसा कारणीभूत ठरला याचे चित्रण, आईची श्रद्धाशीलता आणि संस्कारशीलता, विविध नात्यांमधील भावसंबंध, शालेय अन् महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांची झालेली कुचंबना आणि संघर्ष यांचे अनोखे दर्शन या आत्मचरित्रपर लेखनातून प्रत्ययाला येते. ह. मो. मराठे यांच्या या संघर्षमयी कहानीविषयी आपली प्रतिक्रिया देताना वृन्दा भार्गवे म्हणतात,

"ही गोष्ट दोन भावांचीच, बाईमाणूस नसलेल्या घराची, दैन्य, दारिद्रय – हलाखी असलेल्या ब्राह्मण कुटुंबाची म्हणून निराळी असं म्हणता येणारं नाही ..... दोघं भाऊ स्वयंपाकात भात – उप्पीट. क्वचित आमटी, सोलकढी करतात. एकूण विपन्नावस्था; पण या जगण्याबद्दल दोघांची तक्रार नाही. हनुच्या स्वप्नात पैसा – श्रीमंती नाही. गरिबी दूर व्हावी ही त्याची प्रार्थनाच नव्हती. शाळेत वेळेवर पोहोचणं, पुस्तक, वह्या, पेन्सिली, सुतकताईचे समान ठेवण्यासाठी एक पेटी असणं, ओल्या लाकडांऐवजी सुकी लाकडं मिळणे, आपला कायम पहिला नंबर टिकणं

जेणेकरून शिक्षणात खंड पडता कामा नये. एवढ्याच हनूच्या अपेक्षा. या अपेक्षांची पूर्ती व्हावी म्हणून स्वत: पूजा उत्तरपूजा सांगू लागतो आणि वेळ मिळेल तसं – तेव्हा अभ्यासात, वाचनात स्वत:ला झोकून देतो. चवली – पावलीसाठी पायपीट करणाऱ्या हनूचे शोषण कोकणातले त्याचेच इतर भाईबंद करतात. त्याचं एखादं काम करताना त्याला दोन कळश्या पाणी आणायला लावून, एक रूपया दक्षिणा ठरवून प्रत्यक्षात बारा आण्यात त्याच्याकडून भला मोठा स्वयंपाक करून घेण्यापर्यंत त्याचं शोषण चालतं, मात्र हा मुलगा कधी शाळा बुडवत नाही. मास्तर दक्षिणेबद्दल चेष्टा करतात, त्याचा राग तो मानत नाही. आतल्याआत रडतो, पण स्वत:चा क्षोभ, संताप, आक्रोश यांचं भांडवल ५४४ पृष्ठांत कोठेही येत नाही. त्याची गरिबी, त्याचं शोषण यावर अवाक्षर टीका तो करत नाही, इथे विद्रोहाची भाषा नाही.

चित्रकलेच्या भीतीमुळे मनावरचा तणाव, त्यातून उद्‌भवलेला पोटाचा विकार, ऐन मॅट्रिकच्या वेळेस डोळ्यांचे अधुपण यामुळे दुसरा कुणीही उन्मळून पडला असता; पण शब्दांचे अप्रूप, शिकण्याची जिद्द आणि पहिला नंबर टिकवण्याची धडपड असणाऱ्या हनूला लेखक हनुमंत मोरेश्वर मराठे बनायचं होतं. त्यामुळेच भोगलेली हलाखी पृष्ठस्तरावर तो नेत नाही. शोषण परिसराबद्दल मूक आक्रोश अधेमध्ये येतो. 'पोहरा' चं मर्मस्थळ हनूच्या स्मरणशक्तीच्या, पाठांतराच्या, बुद्धीच्या जोरावर मोठं होणं हे आहे. त्याचा अभ्यास, त्याचे वाचन त्याला सर्वच कोसळक्षणातून बाहेर काढते. त्याची जात त्याला पैशाच्या रूपात काहीही देत नाही. देते संस्कृत श्लोक, मंत्र, त्यांचे अचूक उच्चार करण्याची शिस्त. त्यामुळे पोहरात मंत्र–श्लोक अनेकदा विखुरलेले दिसतात. हे पाठ करून हनू पूजा सांगतो, या पूजेच्या पैशातून लेखनाचे सामान विकत घेतो, या सामानाच्या आधारावर त्याला जगावेसे वाटते.

हनूची म्हटलं तर ही वैयक्तिक गोष्ट, पण यात कोकणातील सामाजिक – सांस्कृतिक वास्तवाचे दर्शन घडते. माणसा–माणसातील संबंध–व्यवहार, भिन्न भिन्न प्रकृती, प्रवृत्तीची माणसं यातून सामाजिक आशयाचा पट उभा राहतो. कुठेही प्रतिशोध नाही. जो लढा, संघर्ष आहे तो स्वत:मधील सर्जनशीलतेला बाहेर काढण्याचा.''[१२] वरील सर्व गोष्टींचा विचार करता ह. मो. मराठे यांची ही प्रारंभीची संघर्षकथा अंत:करण हेलावून टाकणारी अशी उतरली आहे.

### ३.६. व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रह :

धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, नाट्यकलावंत, चित्रपटकलावंत, शास्त्रज्ञ अशा विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने दैदिप्यमान ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींच्या सहवासात एक दिवस घालवून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजून घेणे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण सिद्ध करणे या भूमिकेतून ह. मो. मराठे यांनी व्यक्तिचित्रणपर असे लेखन केले आहे. साहजिकच या लेखसंग्रहांमधून आलेल्या व्यक्तींच्या या मुलाखती नाहीत, त्याला व्यक्तिचित्रे म्हणता येतील असेही नाही, तर ह. मो. मराठे यांच्या मते हे लेख म्हणजे 'पर्सनॅलीटी रिपोर्ट्स' आहेत. अशा स्वरूपाची 'एक माणूस–एक दिवस' या शीर्षकांतर्गत व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रहाचे तीन भाग आहेत.

या व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रहांच्या निर्मितीचे निमित्त होते, 'घरदार' या मासिकाचे ह. मो. मराठे यांचे संपादकपद. जानेवारी १९८८ पासून 'घरदार' हे मासिक सुरू झाले. त्यांचे संपादकपद मराठे यांच्याकडे आले. या मासिकाला उठाव यावा, यश मिळावे, त्याची जनमाणसात एक वेगळी ओळख निर्माण व्हावी या हेतूने त्यांनी 'एक माणूस–एक दिवस' ही व्यक्तिचित्रणपर लेखमाला सुरू केली.

#### ३.६.१. एक माणूस–एक दिवस–भाग १ (एक माणूस–एक दिवस–भाग १, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९६) :

या व्यक्तीचित्रणपर लेखसंग्रहात बाळ ठाकरे, अनुप जलोटा, रामानंद सागर, निळू फुले, वपु काळे, कुसुमाग्रज, शरद पवार, मृणाल गोरे, सुधीर फडके, श्रीराम लागू, सुशीलकुमार शिंदे अशी अकरा व्यक्तिमत्त्वे या संग्रहात शब्दबद्ध केली आहेत.

#### ३.६.२. एक माणूस–एक दिवस–भाग २: (एक माणूस–एक दिवस–भाग २, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९७) :

'एक माणूस–एक दिवस' या लेखमालेतील दहा लेखांचा भाग २ हा लेखसंग्रह आहे. हे लेख आधी 'किर्लोस्कर' मध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. या लेखसंग्रहात मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, प्रभाकर पणशीकर, हितेंद्र ठाकूर, विक्रम गोखले, जयंत नारळीकर, जयंत

साळगांवकर, शरद जोशी, कमल व्यवहारे, डॉ. बाबा आढाव यांसारख्या वेगवेगळ्या क्षेत्रातील दहा व्यक्तिमत्त्वांचे चित्रण या लेखसंग्रहात केले आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्ती त्यांच्या रोजच्या दिवसभराच्या व्यग्र आयुष्यात बोलतात कशा, चालतात कशा, माणसांना भेटतात कशा, खातात काय आणि कसं, निर्णय कसे देतात, त्यांचे कौटुंबिक जीवनसंबंध कसे आहेत, ते स्वत:साठी एकांत कसा साधतात यातले सर्व बारकावे ह.मो. मराठे यांनी अतिशय सूक्ष्मपणे टिपले आहेत. या सर्व लेखांविषयी वामन देशपांडे म्हणतात,

"सूर्यकिरण जसा अंधार छेदित जातो तसे ह.मो. मराठे त्या त्या व्यक्तीचा पूर्ण वेध घेत चालले आहेत. विशेष म्हणजे त्या त्या व्यक्तींचे केवळ गुण वर्णन करणे हा या लेखापाठीमागचा हेतू नाही, तर त्या त्या व्यक्ती त्या त्या क्षणी कशा भावल्या त्यांचे हे चित्रण आहे. या ज्या व्यक्ती आहेत, त्यांच्यावर आणखी कुणी कसबी लेखकाने अगोदर लिहिलेले सुद्धा आहे. परंतु माहिती घेऊन बेतलेली व्यक्तिचित्रणे आणि आपण पूर्णपणे अलिप्त राहून त्यांच्या दिवसभराच्या हालचाली निरखत त्यांना चित्रित करीत जाणे यांतला भेद फार महत्त्वाचा आहे. ह. मो. मराठे यांनी प्रत्येकाशी जमेल तेवढा संवाद साधला आहे. तो संवादसुद्धा जसा घडला तसा व्यक्त केला आहे. त्यात स्वत:च्या प्रज्ञेचे रंग त्यांनी मिसळलेले नाहीत. त्यामुळे तो संपूर्ण दिवसच मुळी वाचताना डोळ्यांसमोर उभा राहतो. ह.मो. मराठे यांची अनलंकृत धारदार लेखणी आणि वर्णनापलीकडे जाऊन मानवी मनाचा डोह आपल्या लेखणीतून समर्थपणे उलगडत जायची त्यांची लोकविलक्षण ताकद, जी आजपर्यंत त्यांच्या कथा–कादंबऱ्यांतून डोकावत होती, तिचा नेमका वापर या अभिनव चित्रणातून साधला गेला आहे. धनुष्यातून सुटलेला बाण जसा लक्ष्याचा वेध नेमकेपणाने घेत जातो तसे हे सर्व लेखन आहे."[१३]

एकंदरीत वरील लेखनात राजकारण, समाजकारण, चित्रपट, नाटक, कृषी, विज्ञान अशा क्षेत्रात आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्ती आहेत.

### ३.६.३. एक माणूस–एक दिवस–भाग ३: (एक माणूस–एक दिवस–भाग ३, औदुंबर प्रकाशन, मुंबई, १९९९) :

या लेखसंग्रहात राजकीय, सामाजिक, चित्रपट, औद्योगिक, धार्मिक क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींची जीवनवैशिष्ट्ये जाणून घेतली आहेत. ह. मो. मराठे यांनी मुलाखतवजा गप्पांद्वारे व संकलित माहितीच्या आधारे हे लेख लिहिले आहेत.

राजकारणात आघाडीवर असलेले – मधू दंडवते, सामाजिक कार्यकर्ते – अण्णा हजारे, जातिवंत कलावंत – नाना पाटेकर, उद्योगपती – अरुण फिरोदिया आणि लोकप्रिय साधुपुरुष – नरेंद्र महाराज या निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पाच व्यक्ती लेखासाठी ह. मो. मराठे यांनी निवडल्या आहेत. त्यामुळे विषयात विविधता आली आहे. या पाचही माणसांच्या लेखांविषयी बोलताना यशवंत जोशी म्हणतात, "मनाची पाटी कोरी घेऊन जावे व त्यावर शब्दांतून ती व्यक्ती टिपली जात आहे, हे प्रत्येक लेख वाचताना जाणवते. मराठ्यांचे रागलोभ कुठेच डोकावत नाहीत. प्रत्येक लेखाचा सुरुवातीचा भाग वाचताना तरी हा अनुभव येतो. पुढे पुढे वाचत जाताना ती व्यक्ती अधिक स्पष्ट होत जाते. त्यांच्या हालचालींतील, बोलण्यातील, वागण्यातील बारकावे लक्षात येत जातात. ती व्यक्ती वाचकांना पूर्वपरिचित असली तरी तिचा नव्याने परिचय झाल्यासारखे वाचकांस वाटते. मराठ्यांच्या लेखनात तर – तम भाव दिसत नसला तरी वाचकांच्या मनात त्या व्यक्तींचे चित्र उमटताना याचे प्रत्यंतर येते. एक नरेंद्र महाराज सोडले तर आपले मत लेखक कुठेच नोंदवीत नाहीत. वाचकाने त्या व्यक्तिविषयी काय ते बरे वाईट मत बनवावे अशी लेखकाची भूमिका आहे आणि हेच या लेखाच्या यशाचे रहस्य आहे."[१४] पाचही लेख प्रवाही शैलीत सहज सुंदर उतरलेले आहेत, म्हणून वाचक सहज वाचत राहतो.

ह. मो. मराठे यांनी 'एक माणूस–एक दिवस' भाग–१, २ व ३ वा व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रहांमधून सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, चित्रपट, नाटक, साहित्यिक, संगीत, औद्योगिक, धार्मिक अशा वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींच्या प्रत्यक्ष भेटीमधून त्यांच्याशी सुसंवाद साधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे जे पैलू त्यांना जाणवले ते त्यांनी या व्यक्तीचित्रणपर लेखसंग्रहात शब्दांकित केले आहेत.

### ३.७. स्फुटलेखन संग्रह :

ह. मो. मराठे हे बहुअवधानी, समाजातील विविध घटकांचे सूक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षण करून; मानवी जीवन, माणसांचे स्वभाव यांच्यातील विसंगती शोधून, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरणाकडे मिश्किल नजरेने पाहत त्यातील विनोद आणि विसंगती शोधत शोधत वाचकांशी हितगुज करण्याच्या हेतूने त्यांनी वृत्तपत्रांमधून काही सदरे चालविली, ती सदरेच त्यांनी पुढे पुस्तक रुपाने प्रकाशित केली.

**३.७.१. उलटा आरसा: (उलटा आरसा – नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, १९९६) :**

'उलटा आरसा' या नावाचे ह. मो. मराठे यांचे एक सदर 'सिंडीकेट कॉलम' म्हणून (म्हणजे एकच लेख एकाच वेळी अनेक वर्तमानपत्रातून येणे ) मे १९९४ ते मे १९९५ पर्यंत ४ – ५ वर्तमानपत्रांच्या आवृत्तीतून प्रसिद्ध होत होते. नाशिक येथील 'गावकरी', अलिबाग येथील 'कृषीवल', सोलापूर येथील 'तरुण भारत', बेळगाव येथील 'तरुण भारत', मुंबईचे 'आज दिनांक' या सायंदैनिकांमध्ये त्यांचे 'उलटा आरसा' हे सदर प्रसिद्ध झालेले आहेत. काही लेख 'पुढारी', 'महानगर' मध्येही प्रसिद्ध झालेले आहेत.

या लेखांचे स्वरुप मुख्यत: 'राजकीय उपहास' असे होते. व्यंग्यचित्रांप्रमाणे थोडी गंमत, थोडी टवाळकी करत या लेखांनी परिणाम साधला. राजकारणात आणि समाजजीवनात नाना प्रकारच्या विसंगती असतात. राजकीय नेत्यांच्या युक्तीवादातील विसंगती, हस्यास्पदता दाखवणं एवढाच मर्यादित हेतू ह. मो. मराठे यांचा होता. मराठे उपहासाने असे म्हणतात की, आरश्यात उलटी प्रतिमा दिसते ती प्रतिमा सुलटी दिसण्यासाठी विशेषत: राजकीय नेत्यांसमोर आरसाच उलटा धरावा काय? एकूण ३८ लघुलेखांचा संग्रह या उलटा आरसा नावाच्या स्फुटलेखन संग्रहात समाविष्ट आहे.

**३.७.२. पहिला चहा भाग – १: (पहिला चहा भाग – १, पुष्पक प्रकाशन, पुणे, २००४) :**

इ. स. २००१ मध्ये 'पुढारी' मधून 'पहिला चहा' या नावाने प्रकाशित झालेल्या सदरांतील निवडक मजकूर भाग–१ मध्ये आलेला आहे. राजकारणातील व्यंग किंवा विरोधाभास शोधण्याऐवेजी घटनांवर मार्मिक भाष्य, मनोरंजकता निर्माण करणारे सुप्रसिद्ध साहित्यिक, संपादक ह. मो. मराठे

यांनी पुढारी दैनिकात 'पहिला चहा' हे सदर लिहिले. त्या त्या वेळचे राजकीय, सामाजिक संदर्भ 'पहिला चहा'त वाफाळलेले दिसतात. यावर भाष्य करताना रमेश उदारे म्हणतात,

"राजकारण, समाजकारण, चित्रपटातील राणी मुखर्जी, श्रीदेवी, माधुरी दीक्षित, शेखर सुमन आदि बातम्यांमध्ये असणारी मंडळी त्यांचे अचूक मार्मिकतेने साक्षेपी संपादन ह. मो. मराठे यांनी पहिला चहा मध्ये केलेले आहे."[१५] ह. मो. मराठे हे सदर लेखन केवळ चटकदार आहे असे नाही तर, सहजशैलीत लिहिलेल्या हलक्याफुलक्या विषयांतही ते विषयाच्या मुळापर्यंत वाचकाला नेतात. ह. ल. निपुणगे सदर पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या निमित्ताने फर्मास 'पहिला चहा' या शीर्षकांतर्गत लेखनात म्हणतात,

"केवळ रंजक शैली हेच या सदराचे वैशिष्ट्य नसून समकालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, जीवनावरचे मार्मिक भाष्य हेही या सदराचे वैशिष्ट्य आहे. सर्वसामान्य वाचकांच्या मनातल्या प्रतिक्रियाच जणू मराठे यांनी या सदरातून व्यक्त केलेल्या असतात; पण त्या अग्रलेखांच्या गंभीर शैलीत नव्हे, तर चहा पिता पिता; मारलेल्या अनौपचारिक गप्पांच्या स्वरुपात. रंजकता, चटकदारपणा, अनौपचारिकता या प्रमाणेच विचारगर्भता हेही या सदराचे एक वैशिष्ट्य आहे."[१६]

समाजजीवनात सभोवताली घडणाऱ्या छोट्या मोठ्या घटना – प्रसंग – व्यक्ती यांच्यावर ह. मो. मराठे अत्यंत सहजतेने भाष्य करतात. ही त्यांची लेखनाची हातोटी वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे.

### ३.७.३. पहिला चहा भाग – २: (पहिला चहा भाग – २, पुष्पक प्रकाशन, पुणे, २००४) :

इ. स. २००२ मध्ये 'पुढारी' मधून 'पहिला चहा' या नावाने प्रकाशित झालेल्या सदरांतील निवडक मजकूर भाग – २ मध्ये आलेला आहे. केवळ रंजकताप्रधान असे या सदराचे स्वरुप नसून, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, तसेच समाजजीवनातील विविध व्यक्ती – घटना – प्रसंगांवरील मार्मिक भाष्य असे या लेखांचे स्वरुप आहे. सर्वसामान्य माणसांचा प्रतिनिधी या नात्याने त्यांच्या भावना मराठे या लेखांमधून अभिव्यक्त करताना दिसतात.

**३.७.४. स्वर्गसुखाचे पॅकेज: (स्वर्गसुखाचे पॅकेज – सायली प्रकाशन, पुणे, २०१०) :**

इ. स. २००० ते २००६ – ०७ या काळात कोल्हापूर येथून प्रसिद्ध होत असलेल्या दैनिक पुढारी या वृत्तपत्राच्या रविवारच्या पुरवणीमधून चालू घडामोडींविषयी गमतीदार, मनोरंजक पण उद्‌बोधक, काहीसे व्यंगात्मक अशा स्वरुपाचे सदर 'टिवल्या बावल्या' या नावाने चालविले.

या संग्रहातील ५२ लेखांमधून सामाजिक, राजकीय अशा विविध प्रश्नांवर मार्मिक भाष्य आढळते. तत्कालीन कालखंडात चर्चेत असलेले अनेक प्रश्न या लेखांच्या माध्यमांतून ते हाताळताना दिसतात. त्यात विशेषत: शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वीज भारनियमन, फुकट वीज, मुंबईच्या झोपडपट्ट्या, राज –उद्धव यांचे मतभेद, नारायण राणे यांचा काँग्रेस प्रवेश, मुंबईचं शांघाय करणं, जाहीरनाम्यात दिलेली अश्वासने पाळता न आल्याबद्दलचे खुलासे, सरकारवरील कर्जाचा डोंगर, इंग्रजीचा नवा अभ्यासक्रम, आबांची डान्सबार बंदी अशा विविध विषयांवरील रंजक आणि मार्मिक भाष्य ह. मो. मराठे यांनी केलेले आहे.

**३.७.५. वीज टंचाईच्या ओव्या: (वीज टंचाईच्या ओव्या –सायली प्रकाशन, पुणे, २०११) :**

'दैनिक पुढारी' च्या रविवारच्या पुरवणीमधून ह. मो. मराठे टिवल्या बावल्या या नावाचे सदर २००० ते २००६ असे लिहित होते. अशा ३०० लेखापैकी निवडक ४५ लेख या संग्रहात आलेले आहेत. केंद्र व राज्य सरकारमधील राजकीय उलथापालथी विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, सात हजार कोटींचे पॅकेज, निवडणुकांचे पोकळ जाहीरनामे, रामदेव बाबांविरुद्ध – वृंदा कारत, फॅशद स्पर्धांमधील वस्त्रगळती, रेल्वे अपघात अशा सामाजिक, शैक्षणिक अशा विविध घटना प्रसंगांवर लक्षवेधी असे भाष्य ह. मो. मराठे यांनी या लेखांमधून केले आहे.

**३.७.६. माधुरीच्या दारातील घोडा: (माधुरीच्या दारातील घोडा–सायली प्रकाशन, पुणे, २०११) :**

इ. स. २००० मध्ये कोल्हापूर येथून प्रसिद्ध होत असलेल्या 'दैनिक पुढारी' या वर्तमानपत्राच्या रविवारच्या पुरवणीतील लेखांच्या संग्रहांचा हा व्यंगलेखसंग्रह आहे. त्यावेळी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी होते आणि २४ पक्षांच्या आघाडीचं सरकार सांभाळत पाकिस्तानशी मैत्री करण्याचा (वृथा) प्रयत्न ते करीत होते. छगन भुजबळ मुख्यमंत्री होते आणि ठाकरे यांना अटक वगैरे करण्याचे प्रयत्न करीत होते. अमिताभ बच्चन यांचा कौन बनेगा करोडपती बेफाम लोकप्रिय झाला

होता. चित्रकार हुसैन यांनी माधुरीला घेऊन गजगामिनी नावाचा सिनेमा काढला होता आणि तो थट्टेचा विषय झाला होता. बिल क्लिंटन भारत भेटीवर आले असताना राजस्थानी बायकांबरोबर नाचले होते, विरप्पनने राजकुमार या नेत्याला पळवून नेवून जंगलात ठेवले अशा अनेक घटना प्रसंगांवर भाष्य या लेखांमधून आले आहे.

## ३.८. वैचारिक लेखसंग्रह :

### ३.८.१. दिनमानः (दिनमान – नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, १९९४):

साप्ताहिक 'लोकप्रभा' आणि मासिक 'घरदार' यांचे संपादक असताना ह. मो. मराठे आपले संपादकीय सदर 'दिनमान' या नावाने लिहित असत. त्यानंतर याच नावाचे सदर मुंबईच्या 'महानगर' या सायंदैनिकासह मराठीतील पाच – सहा वर्तमानपत्रांच्या रविवार आवृत्त्यांमधून एकाच वेळी प्रसिद्ध होऊ लागले. त्या सदरात त्यांनी लिहिलेल्या लेखांपैकी निवडक ६१ लेखांचा हा संग्रह आहे. मराठे एकाच वेळी वेगवेगळ्या वर्तमानपत्रात लिहित. वरील लेख मुंबईचे 'महानगर', नांदेडचे 'लोकप्रभा', साताऱ्याचे 'ऐक्य', नाशिकचा 'गावकरी', बेळगावचा 'तरुण भारत' अशा पाच – सहा वर्तमानपत्रातून एकाच वेळी एकच लेख प्रसिद्ध होत असे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, चित्रपट अशा तत्कालीन कालखंडातील ज्वलंत प्रश्नांवर भाष्य करण्याचे काम मराठे यांचे हे लेख करतात.

## ३.९. इतर लेखन :

ह. मो. मराठे हे चतुरस्त्र लेखक आहेत. भ्रमंती करीत असताना सभोवतालच्या समाजजीवनाचा ते खोलवर जाऊन विचार करतात. त्यातूनच त्यांचे लेखन आकाराला येताना दिसून येते. तामिळनाडू दौऱ्याच्या निमित्ताने त्यांनी केलेले पर्यटन केवळ तेवढ्यापुरते मर्यादित न ठेवता श्रीलंका आणि भारत यांचे संबंध, तेथील समाजजीवन, तेथील समस्या, श्रीलंकेतून निर्वासित म्हणून येणाऱ्या लोकांचे अनुभव यांना ते शब्दबद्ध करतात; तर आपल्या संपादकीय कारकीर्दीत वाट्याला आलेले अनुभवविश्व ते उलगडून दाखवितात. याबरोबरच साहित्य समजून घेताना साहित्यावरील समीक्षात्मक लेखनाऐवजी ते त्याला रंजनाचे स्वरुप देतात. पुढील काही पुस्तके त्याची साक्ष देतात.

**३.९.१. वंश विद्वेषाच्या वणव्यात श्रीलंका: (वंश विद्वेषाच्या वणव्यात श्रीलंका – चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९८६):**

तामिळनाडू पर्यटनाच्या निमित्ताने श्रीलंकेतून निर्वासित म्हणून येणाऱ्या लोकांचे अनुभव ऐकून त्यांच्या आयुष्याचे ह. मो. मराठे यांनी जवळून दर्शन घेतले. निर्वासितांच्या हकिकती ऐकून त्यांच्या निर्वासित होण्यामागची कारणे समजून घेतली.

'तमिळईलम' चे आंदोलन चालविणाऱ्या काही नेत्यांशी गप्पा गोष्टी केल्या. काही पुस्तके, नियतकालिके यांचे जुने अंक वाचले व पुण्याला परतल्यावर सकाळ वृत्तपत्राच्या रविवार आवृत्तीतून एक लेखमाला लिहिली. वसंत व्याख्यानमालेत या विषयावर भाषणे दिली. पुस्तक लिहिण्यासाठी 'टाईम्स ऑफ इंडिया' च्या संदर्भ विभागातील श्रीलंका प्रश्नाबद्दलची कात्रणे मिळविली व या पुस्तकाचे लेखन केले. या पुस्तकात श्रीलंकेचा सांगोपांग इतिहास नसून श्रीलंकेतील तमिळांच्या आणि श्रीलंकेच्या समस्यांची तपशिलाने माहिती दिली आहे. धर्मप्रसारासाठी आणि उद्योगधंद्यासाठी कित्येक शतकांपूर्वी भारतीय वंशाचे लोक श्रीलंकेत वास्तव्य करुन राहिले. पण दुर्दैवाने ते तेथील सिंहली लोकांशी एकरुप होऊ शकले नाहीत. टसहली आणि तमिळ वंशाच्या लोकांमधली वाढत चाललेली दरी आता रौद्ररुप धारण करु लागली होती. या वंश विद्वेषाचे स्वरुप यातून शब्दबद्ध केले आहे.

या पुस्तकावर भाष्य करताना मीना जोग–केतकर म्हणतात, ''लेखकाने तामिळनाडूत केलेल्या प्रवासात अनेकांच्या मुलाखती घेतल्या. श्रीलंकेकडून परतलेल्या अत्याचारग्रस्त लोकांना भेटले. पुस्तकाच्या सुरुवातीस संदर्भांची यादी दिली आहे. यावरुन शक्य तितके या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे हे समजते. भारतीयांना जिव्हाळ्याच्या वाटणाऱ्या या समस्येचा लेखकाने केलेला अभ्यास वाचकांना निश्तिच आवडेल.''[१७] यावरुन असे दिसते की या ज्वलंत प्रश्नाचा अभ्यास करुन ह. मो. मराठेंनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे.

### ३.९.२. मधलं पान: (मधलं पान: – पुष्पक प्रकाशन, पुणे, २००२):

ह. मो. मराठे लेखक, पत्रकार –संपादक म्हणून सर्वपरिचित आहेत. 'मधलं पान' मधला वृत्तांत हा त्यांच्या संपादकीय वाटचालीचा, त्यातील वाटावळनांचा, प्रश्न समस्यांचा, यश अपयशाचा, माणसाच्या भल्याबुऱ्या संबंधांचा व अनुभवांचा कादंबरीसारखा प्रदीर्घ आणि संस्मरणीय आहे.

'किर्लोस्कर', 'स्त्री', 'घरदार' ही मासिके त्यांनी संपादित केली. 'किस्त्रिम', 'अपूर्व', 'बालवाडी' हे दिवाळ अंक त्यांनी संपादित केले. 'मार्मिक', 'साप्ताहिक' आणि 'पुढारी' दैनिक येथे त्यांनी कार्यकारी संपादक म्हणून काम केले. अवघ्या सव्वा अकरा महिन्यांच्या कारकीर्दीत त्यांनी 'लोकप्रभा' साप्ताहिक लोकप्रियतेच्या शिखरावर नेले. पत्रकारितेतील उमेदवारीपासून विविध नियतकालिकांची आणि वृत्तपत्रांची संपादकपदे भूषविलेल्या ह. मो. मराठे यांच्या विविध अनुभवांच्या आणि गेल्या ३० – ३५ वर्षांतील वृत्तपत्रसृष्टितील बदलांचा वैशिष्ट्यपूर्ण, ललितरम्य, कादंबरीमय, आत्मकथनात्मक चलतचित्रपट म्हणजेच 'मधलं पान' ची निर्मिती होय. याबरोबरच वृत्तपत्रात वापरले जाणारे तंत्रज्ञान कसे बदलत गेले याचा आलेखही 'मधलं पान' मध्ये दिसून येतो.

२९ जून च्या पुस्तक परिचयात्मक आलेल्या लेखनात असे म्हटले आहे की, "मराठे यांनी आपल्या पत्रकारितेच्या कारकीर्दीत अनेक नियतकालिकांचा प्रवास केला. 'किर्लोस्कर' मासिकातील त्यांचा काळ दीर्घ आहे. नंतर मात्र पायाला चक्र. दैनिक, मासिक, साप्ताहिक, परत दैनिक असं साधारण दीड – दोन वर्षांच्या काळाने सतत बदलता हा प्रवास आहे. यातील दरवेळचा अनुभव निराळा. कधी नवे शिकविणारा, तर कधी निराश करणारा. कधी संघर्ष – वैचारिक, तर कधी स्पर्धेतून निर्माण झालेला हा सारा आलेख ते एखाद्या लेखकाच्या अलिप्ततेने मांडतात. संघर्ष नोंदवताना ते त्या त्या व्यक्तींचा उल्लेख करतात. पण कुठेही आक्रस्ताळेपणा, त्या व्यक्तीविषयी अभिरुचीहीन शब्द येऊ देत नाहीत. संपादकीय यश, कारकीर्दीची घसरण, बॅड पॅच या घटनांचे तपशील नोंदवताना ते भावनाविवश होत नाहीत. या तटस्थेतेमुळे हे आत्मकथन भावते.

सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन क्षेत्रातील नाना माणसे मराठे यांना भेटली. त्या त्या ठिकाणी त्या व्यक्तींच्या स्वभावाचे नेमके मर्म ते कथन करतात. व्यावसायिक स्पर्धेत आपल्या व्यक्तीगत आयुष्यातील समस्येचा कसा वापर केला गेलं याचे हृदयस्पर्शी वर्णन ते करतात. उर्वरित

लेखन नर्मविनोदाची झालर असलेल्या प्रसन्न व गतिमान शैलीत आहे.''[१८] सुमारे चार दशके वृत्तपत्रकारितेत काम करीत असताना आलेल्या जीवनानुभवांचा 'मधलं पान' मधून मांडलेला हा आलेख मराठे यांची जीवनकहाणी मांडत असला तरी वृत्तपत्रसृष्टीतील लक्ष वेधून घेणारे चित्रण येथे प्रत्ययाला येते.

**३.९.३. न लिहिलेले विषय: मधलं पान: (न लिहिलेले विषय –डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००५):**

या पुस्तकातील लेख साहित्यविषयक आहेत. पण ते 'साहित्य समीक्षा' या स्वरुपाचे नसून 'साहित्यरंजन' या स्वरुपाचे आहेत. संपादक ह. मो. मराठे यांनी या पुस्तकातील लेखांत साहित्यिकांच्या प्रथम दर्शनाविषयी सांगितले आहे. व्यक्तिचित्रण करताना नामवंतांच्या नकाराच्या पद्धतीतही त्याचे प्रतिबिंब कसे दिसते याविषयी सांगितले तर अर्ध शतकानंतर 'बालकाण्ड' ची कथा ज्या परिसरात घडली त्याचा पुन:प्रत्यय वाचकांना दिला. या पुस्तकातील पुष्कळसे लेख 'ललित' मासिकाच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेले आहेत. या पुस्तकात अनुक्रमे सारस्वतांची दर्शने, कॉपी, जी. ए. मूर्ती आणि माती, कवडी, खोडलेले नंबर, न लिहिलेली माणसं, औद्योगिक जगतात मी: एक लेखक, माझे असाहित्यिक प्रवास, 'न्यूज स्टोरी' ची स्टोरी, सॉफ्टवेअर ची जन्मकथा, बालकाण्ड निर्मितीप्रक्रिया, बालकाण्डात पुन:प्रवेश, 'बालकाण्ड', नंतर दिवस दिवाळी लेखनाचे!, न लिहिलेले विषय असे विविध विषयांवरील लेख यात समाविष्ट आहेत.

**३.९.४. ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?: (ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?– विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, चौथी आवृत्ती २००९ ) :**

ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार? हा मराठे यांचा लेख 'किस्त्रिम' दिवाळी अंकात २००४ साली प्रसिद्ध झाला. ब्राह्मण वर्गावर पूर्वग्रहदुषितपणे केलेल्या विविध आरोपांनी मराठे अस्वस्थ झाले आणि ब्राह्मणांवर केले जाणारे_विविध आरोप, त्याची सत्यासत्यता पडताळण्याच्या उद्देशाने विविध दाखले देत ब्राह्मण समाजाची मानसिकता कालप्रवाहाबरोबर बदललेली आहे. तरीही ब्राह्मणेतरांचा दृष्टीकोन मात्र कसा बदलत नाही त्यांचा परामर्श या लेखात घेतला गेला आहे. शिवाय या

पुस्तकात ब्राह्मण, शिवधर्म हा लेखही समाविष्ट केलेला आहे. याबरोबरच या लेखासंदर्भात विविध अभ्यासकांच्या, विचारवंतांच्या प्रतिक्रियाही नोंदविलेल्या आहेत.

**३.९.५. ब्राह्मणमानस: (ब्राह्मणमानस – विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु. आ. २०११) :**

ह. मो. मराठे यांचा 'ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?' हा लेख 'किस्त्रिम' या २००७ च्या दिवाळी अंकात प्रकाशित झाला. या लेखाची दखल घेऊन शेकडो लोकांच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या ठिकाणी प्रसिद्ध झाल्या. त्यामध्ये ब्राह्मणवाचक आधिक्याने असले तरी ब्राह्मणेतरही अनेक वाचक त्यामध्ये होते. त्यातील काही निवडक प्रतिक्रिया 'ब्राह्मणमानस' या पुस्तकात मराठे यांनी संपादित केलेल्या आहेत.

ब्राह्मण समाजाची स्थितीगती आणि ब्राह्मण – ब्राह्मणेतर जातींचे सांस्कृतिक, सामाजिक संबंध यांची मूलभूत स्वरुपाची आणि मनोधारनाचीं विविधांगी चर्चा पत्रलेखकांनी केली असल्याचे दिसून येते. विचारवंत किंवा अभ्यासकच केवळ सामाजिक प्रश्नांचे विश्लेषन करु शकतात. असे नसून सर्वसामान्य माणसेही अशा प्रश्नांचे विश्लेषण करु शकतात याचा प्रत्यय या पत्रांवरुन येतो.

**३.९.६. विद्रोही ब्राह्मण: (विद्रोही ब्राह्मण – विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, २०११) :**

'विद्रोही ब्राह्मण' हा लेख 'किस्त्रिम' या २००७ च्या दिवाळी अंकात प्रकाशित झाला. तोच पुढे पुस्तकाच्या रुपाने जानेवारी २००९ मध्ये प्रकाशित झाला. २० व्या शतकाच्या प्रारंभापासूनच ब्राह्मणांनी समाजपरिवर्तनाचे विचार धडाडीने मांडले होते. हे माहित नसल्यानेच ब्राह्मणांवर प्रतिगामी असा शिक्का मारण्यात येतो. समाजपरिवर्तनाचे विचार खूप अगोदरच ब्राह्मणांनी किती धीराने मांडले होते याचा प्रत्यय ब्राह्मणेतर समाजाला येण्यासाठी व समाजातील नेते व विचारवंत यांनी ही समजूत काढून टाकावी म्हणून ह. मो. मराठेंनी हा लेखप्रपंच केला आहे.

ब्राह्मणांविषयी एक गैरसमजूत पसरविण्यात आली होती की हे लोक जुनाट विचारांचे आहेत. ते सामाजिक परिवर्तनाला विरोध करतात, ते रुढींचे गुलाम आहेत. मात्र ह. मो. मराठे यांनी भारतीय समाजाची नवी उभारणी कोणत्या सूत्रांवर आणि मूल्यांवर आधारित असावी ते विचार या लेखात मांडले आहेत.

**३.९.७. ब्राह्मणनिंदेची नवी लाट: (ब्राह्मणनिंदेची नवी लाट – विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु. आ., २०११) :**

ह. मो. मराठे यांचा 'ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार?' या लेखात ब्राह्मणांवर आकसापोटी करण्यात येणाऱ्या टीकांचा परामर्श या लेखांत आलेला आहे. ब्राह्मणांवर विविध मार्गांनी होत असलेल्या टीका या लेखात आलेल्या आहे. तर ब्राह्मणांबद्दल विविध पातळ्यांवर गैरसमजुती पसरविण्याची प्रवृत्ती दिवसेंदिवस कशी वाढते आहे याची साधार आणि सविस्तर माहिती ब्राह्मणनिंदेची नवी लाट या पुस्तिकेत आलेली आहे.

**३.९.८. ब्राह्मण चळवळ कशासाठी? : (ब्राह्मण चळवळ कशासाठी? – 'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच', पुणे, दुसरी आवृत्ती २०११) :**

वर्णव्यवस्था आणि वर्गव्यवस्था यांचे समर्थन करणारी ब्राह्मणी मानसिकता काळाच्या ओघात बदलते आहे. मात्र त्यांच्यावर पारंपरिक मानसिकतेचा शिक्का मारून अगदी टोकाच्या टीका केल्या जात आहेत. ब्राह्मण अलीकडे समतेचा पुरस्कार करीत आहेत. ब्राह्मणेतरांची मानसिकता मात्र ब्राह्मणांच्या या परिवर्तनशील मानसिकतेकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहायला तयार नाही. उलट विविध स्वरूपाचे आरोप – प्रत्यारोप केले जात आहेत. जातवार आरक्षणामुळे जाती आपले पाय रोवून आहेत. अशा स्थितीत ब्राह्मणांनीसुद्धा आपले संघटन उभे करणे ही काळाची गरज बनली आहे. ही विचारसरणी या पुस्तिकेच्या माध्यमातून अधोरेखित केली आहे. या विचारसरणीसंदर्भात आलेल्या महत्त्वाच्या नोंदीही यात दिलेल्या आहेत.

ह. मो. मराठे 'विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच' या मंचचे कार्यकारी विश्वस्त असताना 'ब्राह्मण परकीय आहेत काय?' (नी. अ. वऱ्हाडपांडे, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, तिसरी आवृत्ती २०१०), 'महात्मा फुले यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग' (विद्याधर वासुदेव भिडे, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, तिसरी आवृत्ती २०१०), 'डॉ. आंबेडकर यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग', (प्रा. माधव पोतदार, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, तिसरी आवृत्ती २०१०), 'मराठी स्वराज्य ब्राह्मण पेशव्यांनी बुडविले काय?', (डॉ. भा. रा. अंधारे,

विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, दुसरी आवृत्ती २०१०), 'शंबूक, एकलव्य यांच्या दु:खांना ब्राह्मण जबाबदार आहेत काय?', (स्वाती देशपांडे, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, दुसरी आवृत्ती २०११), 'छत्रपती श्रीशिवाजी महाराज यांच्या कार्यात ब्राह्मणांचा सहभाग' (शामसुंदर मुळे, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, दुसरी आवृत्ती २०११), 'ही घ्या ब्राह्मणेतर तरूणांच्या शंकांची उत्तरे!', (प्रभाकर जोशी, प्रभाकर आचार्य, दत्तात्रय खळदकर, विद्याकर भिडे, डॉ. मधुसूदन चेरेकर, कमलाकर नेरूरकर आणि इतर वाचक, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, द्वितीय आवृत्ती २०११), 'परशुरामाने खरेच का पृथ्वी नि:क्षत्रिय केली होती?', (लीला दिक्षित, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच (ट्रस्ट), पुणे, द्वितीय आवृत्ती २०१२) या पुस्तिका प्रकाशित केल्या.

**३.९.९. गंध, शेंडी, जाणवे आणि ब्राह्मणचळवळ: (गंध, शेंडी, जाणवे आणि ब्राह्मणचळवळ – विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु. आ., २०१२) :**

या पुस्तिकेत 'गंध, शेंडी, जाणवे आणि ब्राह्मणचळवळ' आणि 'वाढत्या जातीवादाचा विषारी विळखा' या दोन लेखांचा समावेश आहे. ब्राह्मण संमेलनात घैसास गुरुजी आपल्या मनोगतात म्हणतात, – 'गंध, शेंडी, जाणवे आणि ब्राह्मणांची खरी ओळख असून त्यांनी गंध लावलेच पाहिजे, शेंडी राखलीच पाहिजे, जानवे घातलेच पाहिजे, संध्या केलीच पाहिजे'. त्यावर मोठ्या प्रमाणावर साधक –बाधक चर्चा प्रसिद्ध होतात. येथे घैसास गुरुजींनी अपेक्षा व्यक्त केलेली होती, मात्र त्याची चर्चा आदेश दिलं गेलं अशा स्वरुपातच अधिक झाली. ब्राम्हणमुलींनी जीन्स पॅन्ट न घालण्याचा सल्लाही त्यावेळी देण्यात आला. अशावेळी पुरोगामी विचारसरणी दर्शविणाऱ्या ब्राम्हणांची पारंपरिक मानसिकता आणि त्यांचे पुरोगामित्व मराठे यांनी विषद करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ब्राम्हण चळवळ निर्माण होण्याची गरजही प्रतिपादन केली आहे.

कालप्रवाहाबरोबर जातीप्रथा नष्ट झाल्या पाहिजेत मात्र त्या अधिकच घट्ट होताना दिसून येत आहेत. जातीनिहाय आरक्षणामुळे भारतीय समाजव्यवस्थेत जात ही आवश्यक बाब बनली आहे. जातीनिहाय आरक्षणामुळे जातीयुद्धाचा धोकाही संभवू शकतो याची जाणीव करुन देत सामाजिक

एकात्मकतेची प्रतिष्ठापना निर्माण होण्याची निकड मराठे यांनी 'वाढत्या जातीवादाचा विषारी विळखा' या लेखात अभिव्यक्त केली आहे.

**३.९.१०. संत तुकारामांजा खून खरेच का ब्राह्मणांनी केला असेल?:(संत तुकारामांचा खून खरेच का ब्राह्मणांनी केला असेल?–विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ.,२०१२) :**

संत तुकाराम यांच्या निर्वाणासंदर्भात ते सदेह वैकुंठवासी झाले अशा स्वरूपाची समजूत काही काळ महाराष्ट्र माणसात रूढ होती. बदलत्या कालप्रवाहात ही रूढ विचारसरणी तर्क वितर्काच्या कसोटीवर उतरेनाशी झाली. त्यांचा मृत्यू ही इतरांप्रमाणेच झाला असावा किंवा अत्यंत वैराग्याने ते कुठेतरी निघून गेले असावेत असा एक विचार पुढे आला. पुढे संत तुकाराम यांचा खून झाला असावा असाही तर्क केला गेला आणि तो खून ब्राह्मणांनी केला असावा असा तर्क केला गेला. त्या संदर्भात बरीच चर्चा पुढे आली. ह. मो. मराठे यांनी पौराणिक दाखले देत आणि इतरही अनेक मान्यवर अभ्यासकांच्या विचारांचा मागोवा घेत संत तुकारामांच्या निर्वाणासंदर्भात मांडल्या गेलेल्या विचारांचा, अंदाजांचा, सिद्धांतांचा परामर्श घेत संत तुकाराम यांचा खून ब्राह्मणांनीच केला या विचाराला तडा देत त्यातील फोलपणा दाखवून देण्याचा आटोकाट प्रयत्न या पुस्तिकेत केलेला आहे.

## ३.१०. अनुवादित साहित्य :

**३.१०.१. लावा : (लावा – भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नवी दिल्ली, १९९२):**

संस्कृत आणि मराठीचे शास्त्रोक्त शिक्षण घेणारे ह. मो. मराठे मराठी विषयाचे लेखक, पत्रकार म्हणून नावाजलेले व्यक्तिमत्त्व आहे. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये नोकरी करून त्यांनी वेगवेगळ्या नियतकालिकांचे व साप्ताहिकांमध्ये काम केले आहे. त्यांच्या काही कथा इंग्रजीमध्ये अनुवादित झालेल्या असून त्यांनी टीव्ही मालिकांसाठीही लेखन केले आहे. त्याचप्रमाणे 'लावा' हे हिंदीत अनुवादित पुस्तक आहे. 'लावा' या कथासंग्रहात निवडक कथांचा अनुवाद श्री. प्रकाश भातंब्रेकर यांनी केलेला आहे. एकूण अकरा कथांचा समावेश या संग्रहात आहे. मधुकरी (माधुकरी), बदौलत (दावं), कशमकश (आजोबा), स्वप्नभूमी (स्वप्नभूमी), अनुत्तरीत प्रश्न (लष्कर आलं), इन्तजार (भिंत खचली), चक्रव्यूह (घोडा), चौथा (चौथा), न्यूज स्टोरी (न्यूज स्टोरी), युद्ध (युद्ध), लावा (लाव्हा) इत्यादी.

या कथा वेगवेगळ्या कथासंग्रहातील असून त्या 'लावा' मध्ये हिंदीत अनुवाद करून एकत्र केल्या आहेत. आधुनिकीकरण आणि औद्योगिकरण या दोन भागांमध्ये मानवाची ससेहोलपट सुरू आहे. तसेच महानगरीय जीवनातील समस्या, शोषण, सामाजिक असमानता, वृत्तपत्रीय क्षेत्रातील समस्या, आर्थिक समस्या इ. विषय ह. मो. मराठे यांनी समर्थपणे हाताळले असल्यामुळे त्या कथांचा दर्जा उंचावत गेला. याच पार्श्वभूमीवर हिंदीमध्ये भाषांतरित होण्याचे श्रेयही त्यांना लाभले.

**समारोप :**

बालपणापासूनच खडतर आयुष्याला सामोरे जात लेखक, संपादक, पत्रकार अशा विविध भूमिका पार पाडत ह. मो. मराठे समर्थपणे आपल्या जीवनात उभे राहिलेले दिसतात. आईच्या संस्कारांची शिदोरी त्यांना पुरेपूर मिळाली मात्र वडिलांचा बाहेरख्यालीपणा आणि विक्षिप्तपणा, त्याला मिळालेली भ्रमंतीची जोड यामुळे कुटुंबाची बरीच वाताहत झालेली दिसून येते. यातील बऱ्याच गोष्टींना मराठे साक्षीदार आहेत. त्यामुळे बालपणापासूनच संघर्षाला तोंड देण्याची त्यांची मानसिकता तयार झालेली दिसून येते.

नोकरी, नोकरीतून मुक्तता, संपादक, पत्रकार, लेखक अशा बऱ्याच भूमिका ते जीवनभर पार पडत असताना दिसतात. त्यामुळेच समाजव्यवस्थेतील धर्मकारण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, उदयोग – व्यवसाय अशा विविध कार्यक्षेत्रात त्यांची लेखणी संचार करीत असलेली दिसून येते. कथा, व्यंगकथा, कादंबरी, आत्मचरित्र, वैचारिक, व्यक्तिचित्रणे असे विविध प्रकारचे साहित्यप्रकार त्यांनी हाताळलेले आहेत.

मराठीतील एक सिद्धहस्त लेखक म्हणून ह. मो. मराठे यांचे नाव आवर्जून घेतले जाते. त्यांनी केलेल्या लेखन कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. मानवीजीवनाचा, मानवी भाव –भावनांचा, विचार–विकारांचा, मानवी नात्यांचा, त्यांच्यातील आंतरिक संबंधांचा, भांडवलदार–कारखानदार–कामगार यांच्यातील परस्पर संबंधांचा, विविध कार्यक्षेत्रात आपल्या कार्याने ठसा उमटविणाऱ्या लोकांचा, सभोवतालच्या विविध प्रश्नांचा शोध आणि उकल करण्याचा प्रयत्न त्यांचे मन करते. तेच त्यांच्या साहित्यातही जाणवते. वरील सर्व गोष्टींचा विचार करता ह. मो.

मराठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू जाणून घेण्याचा, संपादक पत्रकार, साहित्यिक जडण–घडण समजून घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

**संदर्भसूची :**


१. दळवी, जयवंत, हमोंच्या 'हद्दपार' मध्ये विवाहितेचे भागधेय, महाराष्ट्र टाइम्स, रविवार पुरवणी, दि. २६ जुलै १९८१, पृ.३.

२. तत्रैव, पृ.३.

३. मंत्री, राम, 'वेगळेपणाने उठून दिसणारा 'घोडा'', महाराष्ट टाइम्स, दि. १८ सप्टेंबर १९८३, पृ.३.

४. तेंडूलकर, उमेश, झपाटलेपणातून आविष्कृत झालेल्या कथा, महाराष्ट टाइम्स, दि. १३ डिसेंबर, १९८७, पृ.३.

५. प्रतिनिधी, 'निराशाजनक कथासंग्रह', नवशक्ती, दि. १६ नोव्हेंबर, १९७२, पृ. १२.

६. लिंबाळे, शरणकुमार, 'वादंग', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. १७५.

७. कुलकर्णी, गो. ग., 'काळेशार पाणी', सत्यकथा, जुलै १९७४. पृ. ५४.

८. जांभळे, परेन शिवराम, 'ह. मो. मराठे यांच्या धारदार लेखणीचा बोरु होऊ लागला', नवशक्ती, ९ ऑगस्ट १९९२, पृ. ५.

९. मगदूम, अजित, 'समाजातील विकृतीकरणावर प्रकाश', महाराष्ट टाइम्स, १३ नोव्हेंबर, १९८८, पृ. ४.

१०. सिधये, मेधा, 'बालकाण्ड'– ह. मो. मराठे साहित्य सूची, सप्टेंबर २००२, पृ. ५२.

११. उपाध्ये, नीला, 'एक जळजळीत जीवनानुभव', महाराष्ट टाइम्स, ५ ऑगस्ट, २००१, पृ. १०.

१२. भार्गवे, वृंदा, 'बालकांड' चा पुढला भाग, दि. ३ फेब्रुवारी, २००८, पृ.३.

१३. देशपांडे, वामन, ‘एक माणूस एक दिवस : मनोवेधक व्यक्तिचित्रणे’, सामना, दि. १४ जुलै १९६६, पृ. ८.

१४. जोशी, यशवंत, ‘पाच माणसे – एक एक दिवस’, महाराष्ट टाइम्स, दि. १२ नोव्हेंबर, २०००, पृ. ६.

१५. उदारे, रमेश, ‘मार्मिक भाष्य’, सामना, फेब्रुवारी २००५, पृ. ४.

१६. निपुणगे, ह. ल., ‘पहिला चहा भाग – २’, पुष्पक प्रकाशन, पुणे, २००४, पृ. ५,६.

१७. जोग – केतकर, मीना, ‘श्रीलंकेचे अभ्यासपूर्ण दर्शन’, लोकसत्ता, दि. १५ मार्च १९८७, पृ.१२.

१८. प्रतिनिधी, सकाळ, दि. २९ जून २००३, पृ. ४.

*****

# प्रकरण दुसरे

## ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष व कुटुंबव्यवस्था

### १. पुरुषांचे कुटुंबातील स्थान :

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये कुटुंबसंस्थेला अनन्यसाधारण महत्त्व असून पितृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. या पार्श्वभूमीवर कुटुंबातील पुरुष हा केंद्रस्थानी असतो. घराची कुटुंबाची जबाबदारी प्रामुख्याने त्या पुरुषावर असते. कुटुंबाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक बाबींमधील कर्तव्ये व जबाबदाऱ्या घरातील कर्त्या पुरुषांवर अवलंबून असतात. घरातील कर्ता पुरुष या जबाबदाऱ्या पेलण्यास किती समर्थ ठरला किंवा नाही हे ह. मो. मराठे यांच्या कथा आणि कादंबऱ्यांच्या अनुषंगाने अभ्यासणे येथे अभिप्रेत आहे.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**अँकर :**

अँकर या कथेत भालेकर हे संपादक आहेत. त्यांना कुटुंबातील जबाबदाऱ्या पार पाडाव्याच लागणार असतात. परंतु त्यांचे त्याकडे फारसे लक्ष दिसून येत नाही. कारण पत्नी त्यांना घरातील कामांविषयी वेळोवेळी माहिती देताना दिसते, तरीही ते सर्व कामे इतर सदस्यांनी करावीत अशी अपेक्षा करतात. घरातील जबाबदारी ते तत्परतेने घेताना दिसत नाहीत. (पृ.४०,४१) त्यामुळे त्यांनी कर्त्या पुरुषाची आपली जागा टिकवून ठेवल्याचे दिसते. कर्त्या किंवा कुटुंबप्रमुख या नात्याने ते सर्वांची विचारपूस करतानाही दिसतात.

**भले गृहस्थ पंडित :**

इंडिया पेपर्स प्रा. लि. मुंबईचे जाहिरात विभागाचे प्रतिनिधी विश्वनाथ पंडित हे घरातील कुटुंबप्रमुख या नात्याने आपल्या बहिणीची व तिच्या मुलांची काळजी घेताना दिसतात. त्यांना काय हवं नको ते पाहताना दिसतात. पंडित आपला स्वत:चा संसार न करता बहीण आणि तिच्या तीन मुलांचे संगोपन करताना दिसतात. बहिणीचा संसार करता करता त्यांना स्वत:च्या संसाराची

आठवणसुद्धा रहात असताना दिसत नाही. यावरून त्यांचे कुटुंबातील स्थान आदराचे दिसून येते. बहिणीच्या संसारातसुद्धा ते पती नाहीत म्हणूनच बहिणीचा संसारही कर्तेपणाने सांभाळताना दिसतात. त्यावरून त्यांचे घरातील आदराचे स्थान कायम दिसून येते. (पृ.१४९,१५०). एवढेच नव्हे तर पंडित घरात येताच भाच्या पाय सावरून बसतात. बहिणीलाही त्यांच्याविषयी आदर असलेला दिसतो. या सर्व क्रिया पंडितांविषयी आदरभाव सूचित करतात. त्यांचा आदरभाव त्यांना त्यांच्या कार्याच्या समर्पणातून मिळालेला दिसतो. (पृ.१६८,१६९) त्यांच्या बहिणीच्या त्यांच्याविषयीच्या कृतज्ञभावामुळेही त्यांचे स्थान अढळ राहिले आहे असे वाटते.

**२. ज्वालामुख :**

**ज्वाळा :**

या कथेतील मोहिते हे पुरुषपात्र कुटुंबातील प्रमुख व्यक्ती म्हणून समोर येते. मोठ्या भावाच्या मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबाची तसेच स्वत:चे कुटुंब आई, वडील या सर्वांचीच त्यांना जबाबदारी स्विकारावी लागते. आर्थिक ताणाताण असतानादेखील प्रसंगी त्यांना जास्त काम करून कुटुंबाची जबाबदारी उचलावी लागते. वरील संदर्भ लक्षात घेता पुरुषांचे कुटुंबातील स्थान अनन्यसाधारण असेच दिसून येते. भाऊ मेल्यानंतर भावाचे कुटुंब उघड्यावर पडल्याचा उल्लेख ह. मो. मराठे यांनी केलेला आहे. त्या आधारेही पुरुषांचे कुटुंबातील स्थान अनन्यसाधारण दिसून येते (पृ.४८) वरील प्रसंगाच्या अनुषंगाने मराठे पुरुषाचे स्थान अधोरेखित करतात.

**आजोबा :**

आजोबा असलेले अण्णा नावाचे पुरुषपात्र वयोवृद्ध आहे. वयाने त्यांचे कुटुंबातील स्थान मोठे असले तरी त्यांच्या घरातील सर्व जबाबदाऱ्या त्यांचा मुलगा अरूणच घेताना दिसतो. अण्णा हे एकप्रकारे त्या घरात किंवा कुटुंबात अडगळच वाटतात. पुरुषांचे कुटुंबातील स्थान त्यांच्या वयानुसार, आर्थिक क्षमतेनुसार विद्‌वत्तेनुसार वेगवेगळे असलेले जाणवते. (पृ.७०,७२) ह. मो. मराठे यांनी पुरुषांचे कुटुंबातील स्थान कसकसे बदलत जाते ते येथे अधोरेखित केलेले आहे.

**३. हद्दपार :**

**३.२ :** मि. घाटे मिसेस घाट्यांना आनंदी ठेवीत नसल्याची तक्रार मिसेस घाटे करतात. मि. घाटे एक कर्तबगार, महत्त्वाकांक्षी पुरुष नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी त्यांच्या पत्नीला अभिमान, प्रेम, सहानुभूती वाटत नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील त्यांचे स्थान घसरलेले दिसून येते. पत्नी त्याचा तिरस्कार करत असल्याची कबुली समोर येते. (पृ.२९,३०) त्यामुळे त्यांना त्यांच्या कुटुंबात मानाचे स्थान नसल्याचे दिसून येते.

**४. पक्षिणी :**

**सावित्री १ – सावित्री २ :**

या कथेतील मोहन हे पुरुषपात्र मधुवंतीला म्हणजेच आपल्या बायकोला तिच्या इच्छेविरूद्ध त्याच्या कारखान्याच्या मालकाबरोबर संबंध ठेवण्यास तयार करतो. अगोदर तो चिडतो रागावतो पण प्रमोशन मिळणार म्हणून तो सर्व गोष्टींची तडतोड करण्यास तयार होतो. बायकोने कंपनीच्या मालकाशी संबंध ठेवले तर त्याचा कोणताही आक्षेप नाही असेही तो बायकोला सांगताना दिसतो. (पृ.९८,९९) उलट जुन्या कल्पना फेकून देऊन पत्नीनेही तयारी ठेवावी असे त्याला वाटते. खरे तर भारतीय संस्कृतीनुसार, परंपरेनुसार नवऱ्याने पत्नीचे शील जपणे, कुटुंबाचा आर्थिक भार उचलणे, कुटुंबाचे संगोपन करणे या गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. येथे मात्र हा पुरुष अपवाद ठरताना दिसतो. त्यामुळे त्याचे स्थान गौण ठरत असून तो आदरासाठीही पात्र ठरत नाही.

**५. दावं :**

**भूमिका :**

या कथेतील कुटुंबप्रमुख असलेला नायक श्रीधर हा सर्व निर्णय पत्नीलाच घेण्यास भाग पाडतो. पाहुण्यारावळ्यांच्या आगत–स्वागतापासून ते नातेवाईकांच्या भेटीगाठी, घराचा रंग, मुलांची शिक्षणं, घर विकत घेणे अशा सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही ते टाळून पत्नीवर सोडून देतात. निर्णय घेतल्यामुळे होणारे फायदे तोटे, काळज्या, जबाबदाऱ्या, ताणतणाव या सर्वच गोष्टींपासून ते अलिप्त राहतात. (पृ.८) या सर्व गोष्टींचा परिणाम स्वरूप पत्नीला काळजी चिंता

वाटू लागते. ती थकून जाते. तिला आपण बजावत असलेली कुटुंबप्रमुखाची भूमिका आपल्या नवऱ्याने म्हणजेच श्रीधरने घ्यावी असे मनापासून वाटते. या सर्व बाबींचा विचार करता हा कुटुंबप्रमुख बेजबाबदार, कर्तव्यनिष्ठ नसलेला, परावलंबी असलेला दिसून येतो.

बेजबाबदार श्रीधर अर्थातच सर्व निर्णय पत्नीला घ्यावयास भाग पाडतो. आर्थिक अडचणी, मुलांच्या शिक्षणातील अडचणी पत्नीला भेडसावतात. त्या परिणामांची भितीही पत्नीलाच वाटते. पती म्हणजेच श्रीधर मात्र निवांत जगत असतो. नोकरी सोडून स्वत:चीही जबाबादारी तो पत्नीवर टाकतो. त्यामुळे दोघांचे संबंध बिघडतात. ती श्रीधरला फक्त कर्तव्य म्हणून सांभाळू लागते. श्रीधरला पत्नीच्या या गोष्टींचेही काही वाटत नाही. उलट ते सतत पत्नीची मानहानी करतात. (पृ.११,१२,१३) खरे पाहता एक कुटुंबप्रमुख म्हणून वरील सर्व जबाबदारी व कामे पुरुषांनी सांभाळायची असली तरी येथे मात्र हा पुरुष हे सर्व टाळताना दिसतो. त्यावरून त्याची बेफिकीर वृत्ती समोर येते आणि साहजिकच कुटुंबातही त्याला सन्मानाचे स्थान नसल्याचे दिसून येते.

**वाल्या कोळी व बायको :**

या कथेतील नायक लग्न झाले त्यावेळी फार गरीब होता. पत्नी मात्र श्रीमंत घरातली. ती नायकाचा गरिबीवरून अपमान करते. 'तुम्ही गरीब आहात, ते माहित होतं पण इतके गरीब असाल अशी माझी कल्पना नव्हती.' या शब्दांत ती नायकाची अवहेलना करते. ते अपमानाचे क्षण नायकाच्या मनात खोलवर रूतून बसतात. परिणाम स्वरूप नायक वाममार्गाने पैसा कमवतो आणि पत्नीवर व गरिबीवर सूड उगविण्याचा प्रयत्न करतो. या सर्व उठाठेवींमध्ये तो पत्नीचा सतत अपमान करतो. त्यामुळे पत्नीही नायकाला आदर, सन्मान, सहकार्य, प्रेम देताना दिसत नाही. (पृ.४४,४५) नायक गरिबीतून श्रीमंतीत जीवन जगू लागतो, तरीही त्याचे स्थान आदराचे किंवा सन्मानाचे ठरत नाही.

**दावं :**

या कथेतील नायक गरीब असला तरी त्याच्याकडे एक जुनी खोली, सरकारी संस्थेत नोकरी या जमेच्या बाजू होत्या. सामान्य गरीब परिस्थितीत दोघे संसार करतात. प्राथमिक गरजा

भागवतानाही त्यांची ओढाताण होते. याचे पर्यवसान त्यांच्या वादविवादात आणि भांडणात होते. एके दिवशी नायक पत्नीला खोली माझ्या नावावर आहे तूच बाहेर जा असे सांगतो. स्वत:च्या पुरुषी अहंकाराने खोली स्वत:च्या नावावर आहे या अहंकाराने तो कुटुंबातील त्याचे वर्चस्व दाखवून देतो. (पृ.५६,५७) कुटुंबातील त्याचे स्थान आदराचे नसून अधिकाराचेच दिसून येते. या सर्वांचा परिणाम म्हणून पत्नीही त्याला शिव्याशाप देते. म्हणजेच तो आपले चांगले स्थान हरवून बसतो. नायिकेचे मन नायकाविषयी तिरस्काराने भरून गेल्याचे उल्लेख येतात. (पृ.६१)

**कृमी :**

या कथेतील नायक एक मोठा सरकारी अधिकारी आहे. त्यामुळे त्याच्याकडे बंगला, गाडी, पैसा, प्रतिष्ठा, वैभव सर्वकाही असते. त्यामुळे तो घरातील व्यक्तींना आर्थिक श्रीमंती देण्यात यशस्वी होतो. त्यामुळेच त्याची मुले उत्तम करिअर करतात. पत्नीलाही कलेक्टरच्या पत्नीचा दर्जा मिळतो. नायक मुलांच्या व पत्नीच्या सर्व अपेक्षा पूर्ण करतो. पत्नीला हवं ते सुख, वैभव, श्रीमंती व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देतो. त्यामुळे कुटुंबातील या नायकाचे स्थान उच्च व आदरयुक्त असे दिसून येते. (पृ.६८,६९) मुलांना नायकाचा अभिमान वाटतो. कारण ते कलेक्टर आहे, शिवाय त्यांच्यासाठी संपत्ती मिळवितात, त्यांना आनंदी ठेवतात. मुलांसाठी पैसे कमावतात आणि त्यांच्यासाठी ते खर्चही करतात. (पृ.८८) मुलांचा वडिलांविषयीचा कृतज्ञताभाव पाहता त्यांचे कुटुंबातील आदराचे, स्नेहाचे, अभिमानाचे स्थान कायम राहताना दिसते.

**६. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**डोळा :**

या कथेतील नायक मोलमजुरीची कामे करून म्हतारे वडील, बायको आणि तीन मुलांचा सांभाळ करतो. घरातील अठराविळवे दारिद्रय, उपासमार याने हा नायक पिंजून गेलेला दिसतो. पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्या म्हाताऱ्या वडिलांचा चांगला डोळा विकतो तो त्यांना फसवूनच. परंतु नायकाने बापाचा डोळा विकला तो बायकामुलांच्या आणि वडिलांच्या आणि स्वत:च्याही चरितार्थासाठीच. (पृ.१७,२१,२२) पैशासाठी त्याला परिस्थितीने हतबल केलेले दिसते. पुढे जाऊन कथेच्या शेवटी नायकाने स्वत:चाही डोळा विकल्याचा उल्लेख येतो, त्यावेळी

नायकाचा कपटीपणा बाजूला होऊन त्याची उदारता आणि हतबलताच समोर येते. कुटुंबप्रमुख या नात्याने कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी प्रसंगी या नायकाला इतके कठोर बनावे लागल्याचे मराठे यांनी सविस्तर विवेचन केलेले आहे. नायकाचे वडील जेव्हा कुटुंबप्रमुख होते तेव्हाही असाच दुष्काळ पडतो तेव्हा सर्वजण भूकेलेली असतानाही हे कुटुंबप्रमुख वडील पहिला घास आपल्या मुलांना भरविताना दिसतात. (पृ.१७) येथे मुलगा आणि वडील हे दोन्ही पुरुष कुटुंबवत्सल, प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ दिसून येतात. कुटुंबातील आपले असलेले स्थान ते कायम सांभाळताना दिसतात.

**कुटुंब :**

या कथेतील जयंतराव नोकरी निमित्ताने दिल्लीला कुटुंबापासून दूर राहतो. तो घरातील कर्ता पुरुष असूनही नोकरी लांब असल्या कारणाने कुटुंबासाठी जास्त वेळ देऊ शकत नाही. मुलांचे संगोपन, शिक्षण, पत्नीला मदत यासाठी त्यांना वेळ देत येत नाही. पत्नीच्या आग्रहाखातर ते नोकरी सोडून पुण्याला येतात, परंतु जेव्हा ते घरी असतात तेव्हा मुलीचे लग्न होऊन गेलेले असते, मुलगा नोकरीसाठी बाहेरगावी राहतो, पत्नी नोकरीमुळे दिवसभर बाहेर असते त्यामुळे त्यांच्याबरोबर वेळ घालविण्यासाठी कुणालाही सवड नसते. त्यामुळे त्यांच्यात विसंवाद निर्माण होऊ लागल्याने शेवटी पत्नी आणि जयंतरावांना एकाच वेळी समजते की दोघांनाही एकटे राहण्याची सवय झालेली आहे. (पृ.६७,७८,७९) हे सर्व पाहता कुटुंबप्रमुखाचे स्थान त्याच्या कर्तबगारीवर, त्याच्या कर्तव्यावर, त्याच्या जबाबदाऱ्यांवर ठरते परंतु जयंतराव याला अपवाद ठरल्याने त्यांचे कुटुंबातील स्थान नगन्य ठरताना येते.

**मोक्ष :**

या कथेतील नायक राजकीय निवडणुकीचा एक कार्यकर्ता असतो. दंगल माजल्यामुळे तो त्यात मृत्युमूखी पडतो. त्याच्या मागे त्याची तरूण पत्नी, मुले, वडील असतात. त्याच्या पिंडाला कावळा शिवत नाही. यामागील कारण त्याला कुटुंबाची चिंता सतावत असते अशी पारंपरिक मानसिकता येते. नायकाच्या नातेवाईकांना सरकारी मदत जाहीर होते परंतु त्यांच्यापर्यंत पोहचत नाही तेव्हा म्हातारे आजोबा, पत्नी यांना स्वत: काम करून कुटुंबाचे पालनपोषण करावे लागते.

(पृ.१९७,१९९,२००) या कर्त्या पुरुषाच्या निधनाने त्याचे कुटुंब पोरके होऊन जाते. त्याचे कुटुंबातील स्थान अढळ दिसते. त्याची जागा शेवटी त्याच्या वयोवृद्ध वडिलांना घ्यावी लागते. कुटुंबाची काळजी घेणारा पुरुष हा त्या घराचा आत्मा असल्याचे या आजोबांच्या वागण्यावरून जाणवते, "इथं कशाला रे आलास बाबा तु परत? तुझ्या आत्म्याला मुक्ती नाही का मिळाली अजून? कशी मिळंल? आपल्या पोरांचं, बायकोचं कसं होईल. या काळजीतूनच जर तो मुक्त झाला नसेल अजून. जा, बाबा जा. सरकार नसलं, मंत्री नसले तरी मी हाय ना तुझ्या लेकरांची काळजी घ्यायला? जा मग." (पृ.२००) आजोबांच्या या स्वगतातून लेखकाने कुटुंबप्रमुखाची भूमिका आणि स्थान अचूक टिपले आहे. एक कुटुंबप्रमुख गेला तरी दुसऱ्या पुरुषाला ती जागा घ्यावीच लागते. कारण आपणाकडे वंशपरंपरेने, संस्कृतीने पुरुषांचे कुटुंबातील स्थान अबाधित ठेवले आहे.

**इतिहासातातील एक अज्ञात दिवस :**

या कथेतील नायक कुमार देशाचा पंतप्रधान होता परंतु कुमारच्या मृत्यूने कुटुंबात एक पोकळी निर्माण केली होती. कुमारच्या पत्नी आणि मुलांना त्यांच्याशिवाय खूप एकटे एकटे वाटते. (पृ.४०६) कुमार हा देशाचा पंतप्रधान असल्याने त्याच्या कुटुंबाला पद, पैसा, प्रतिष्ठा, सुखसोयी सर्वकाही मिळाल्या होत्या. त्यांची पत्नी कधीही घराच्या बाहेर पडलेली नव्हती, परंतु कुमारच्या निधनानंतर कुटुंबप्रमुख म्हणून तिच्यावर जबाबदारी पडते. तेव्हा तिला असुरक्षित वाटू लागते. या भावनेचा विचार करताही पुरुषांचे कुटुंबातील महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.

**७. युद्ध :**

**पूर्णचंद्र :**

या कथेतील नायक रामभाऊ हे सर्वसामान्य गरीब परिस्थितीत जीवन जगत असतात त्यामुळे दैनंदिन गरजांव्यतिरिक्त कोणतीही चैन ते कुटुंबासाठी किंवा स्वत:साठी करू शकत नाहीत. या सर्वांचा परिणाम म्हणून त्यांना घरात आदराचे स्थान मिळत नव्हते. त्यांची पत्नी त्यांच्याशी कधी नीट बोलत नसते, की कधी त्यांची वाटही पाहत नसते. काळजी करण्याऐवजी त्यांना दोन शब्द त्यांच्या चुकीबद्दल ऐकवले जातात. त्यांच्याविषयी त्यांच्या पत्नीचा आदर

स्नेहभाव आपलेपणा कधीच दिसून येत नाही. पत्नी तिरस्कार करत असे, तर मुली पाणउतारा करत. रामभाऊ ऑफिसर, नाटककार अशी मोठी व्यक्ती बनू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना संसारात सुख मिळाल नाही. शारीरिक सुख मिळताना दिसत नाही. त्यामुळे त्यांचा भावनिक कोंडमारा होतो. (पृ.१२३,१२४,१२५) या सर्व घटनांमागे रामभाऊंना त्यांच्या कुटुंबात नसलेली कवडीमात्र किंमत दिसून येते. आर्थिक संघर्षाचा परिणाम त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर झालेला दिसून येतो, तर त्याच परिस्थितीचा परिणाम म्हणून त्यांना कौटुंबिक सुखापासून, सन्मानापासून दूर रहावे लागताना दिसते.

**खुर्ची :**

या कथेतील नायकाचा व्यवसाय अयशस्वी होतो. तो कर्जबाजारी होतो त्यामुळे देणेकरी आणि घरातील इतर सदस्य यांनी घेरल्यामुळे तो स्वत:ला दोषी ठरवितो. कर्जबाजारीपणामुळे तो कुटुंबाच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये, गरजा भागवू शकत नाही. स्वत:ही चांगले राहणीमान जगू शकत नाही. त्यामुळे त्याची मुले, पत्नी त्यांना घाणेरडे, तुच्छ अशा भावनेने पाहू लागतात. पत्नी नायकाला दुषने देऊ लागते. सत्यानाश झाला असे बोलू लागते, नायकाशी लग्न करून तिला पश्चात्ताप झाल्याचे बोलते. घरातला कर्ता माणूस म्हणजेच हा नायक हातपाय गाळून बसतो. त्यामुळे त्याचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. नायकाची पत्नी त्याच्याकडे तुच्छतेने तिरस्काराने पाहते. (पृ.१४९,१५०,१५२,१५३,१६०) नायकाची अशी दयनीय अवस्था व्यवसायातील अपयशाने आली असली, तरी त्याला संपूर्ण उद्ध्वस्त करण्यात, त्याची संपूर्ण अधोगती होण्यात कुटुंबातील सदस्यही कारणीभूत असल्याचे पुढे येते.

ह. मो. मराठे यांच्या कथासंग्रहातील कथांमध्ये पुरुषांचे कुटुंबातील स्थान या घटकावर विचार करता पुरुषाचे कुटुंबातील स्थान आदराचे, अनादराचे कसे आहे ते बऱ्याच गोष्टींवर अवलंबून दिसते. घरातील कर्ता पुरुष म्हणून जर त्यांने कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्या तर त्याला कुटुंबप्रमुखाचा दर्जा मिळतो नाहीतर मानहानी सहन करावी लागते. कुटुंबातील सर्व सदस्यांच्या आवडी-निवडी, छंद, शिक्षण, आर्थिक गरजा जर घरातील कर्त्या पुरुषाने व्यवस्थित पार पाडल्या तर तो आदरास पात्र ठरतो. नाहीतर अनादर, उपहास, निंदेस

पात्र ठरतो. घरातील कर्त्या पुरुषाने जर भरपूर पैसा कमावला, ऐश्वर्य, नावलौकिक प्राप्त केला तर सर्वजण त्याचा आदर करतात. परंतु त्याला जर अपयश प्राप्त झाले. नावलौकिक, पद, पैसा, प्रतिष्ठा मिळविता आली नाही, तर त्याला कुटुंबात काडीमात्र किंमत मिळत नाही. तसेच व्यसन, स्त्रीलोभ, भ्रष्टाचार या गोष्टींमुळे तर पुरुषांना घरात चांगले स्थान मिळत नाहीच पण त्यांची अधोगतीही झालेली पहायला मिळते.

'अँकर' कथेतील भालेकर कुटुंबप्रमुख म्हणून स्वत: जबाबदाऱ्या उचलत नसले तरी पत्नीच्या व इतर सदस्यांच्या माध्यमातून जबाबदाऱ्या परस्पर पार पाडून आपले कुटुंबातील स्थान अबाधित ठेवतात. 'भले गृहस्थ पंडित' कथेतील पंडित बहिणीच्या संसाराची जबाबदारी उचलून आपले आदराचे स्थान कायम राखतात. 'सापेक्ष' कथासंग्रहातील भालेकर आणि पंडित आपले आदराचे स्थान कायम टिकवून ठेवण्यात यशस्वी होतात.

'ज्वालामुख' कथासंग्रहातील 'ज्वाळा' या कथेतील मोहिते भाऊ, आईवडील यांच्याबरोबरच स्वत:चे कुटुंब सांभाळून आपले कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे आदराचे स्थान टिकवून ठेवतात. तर 'आजोबा' कथेतील अण्णांना वयोमर्यादेमुळे, आर्थिक अक्षमतेमुळे आपले कुटुंबातील दुय्यम स्थान सहन करावे लागते. 'हद्दपार' कथासंग्रहातील दुसऱ्या भागातील मि. घाटे कर्तबगार व महत्त्वाकांक्षी पुरुष नसल्याने आपले कुटुंबातील स्थान खालच्या पातळीवर नेतात. 'पक्षिणी' कथासंग्रहातील 'सावित्री १, सावित्री २' मधील मोहन हे पुरुषपात्र पत्नीचे शील हे यशाची पायरी बनवू पाहते. त्यामुळे त्याचे कुटुंबातील स्थान गौण, अनादराचे दिसून येते. 'दावं' कथासंग्रहातल भूमिका या कथेतील श्रीधर 'वाल्या कोळी व बायको' या कथेतील नायक आपल्या बेजबाबदार, बेफिकीर वृत्तीमुळे कुटुंबातील आपले स्थान दुय्यम बनवितात. विविध कथासंग्रहांमधून कथेतील पात्रांच्या माध्यमातून पुरुषांचे कुटुंबातील चांगले वाईट स्थान ह. मो. मराठे अचूक अधोरेखित करताना दिसतात.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

ह. मो. मराठे यांच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत पुरुषांच्या दृष्टिकोनातून कसा विचार येतो? कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्याला कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते? त्यात तो यशस्वी ठरतो का? हे येथे समजून घ्यावयाचे आहे. येथील नायक परिस्थितीपुढे हतबल होऊन आपल्या मनातील खदखद व्यक्त करतो. उदा. '"साल्ये, मी एकट्यानंच उपजीविकेसाठी स्वत:ला विकावं असं कुठं आहे?

तूही विकली जा. मांड लिलाव." (पृ.३६)

येथे पुरुषसत्ताक व्यवस्थेत कुटुंबप्रमुख या नात्याने स्वत:चे कुटुंब चालविण्यास असमर्थ ठरलेला नायक पत्नीकडे तुच्छतेच्या दृष्टिकोनातून पाहत तिची अवहेलना करीत 'साल्ये', 'विकली जा', 'मांड लिलाव' यांसारख्या शब्दांच्या द्वारा तो आपली असहाय्यता आणि हतबलता नमूद करताना दिसून येतो.

नोकरी नसल्याने कुटुंब चालविण्यास असमर्थ असलेला नायक जेव्हा कुटुंबाकडे म्हणजेच आपल्या गर्भवती पत्नीसाठी वेळ देत नाही. तिच्याशी नीट संवाद साधत नाही. तेव्हा ती त्याच्याकडे तक्रार करते. तिच्या मनातल्या नवऱ्याविषयीच्या भावना मोकळ्या करताना ती म्हणते, "ए–बोल की रे –असं मुळु मुळु रडत काय बसायचं. सकाळी बाहेर पडलायस तो आता येतोस. मला अगदी कंटाळा येतो. उद्यापासून ऑफिस सुटलं की लगेच घरी येत जा."

ऑफिस सुटलं की .....

"या संबंध महिन्यात एकदा तरी बरोबर नलंस का फिरायला?" (पृ.६१)

या कादंबरीतील नायक बेकार आहे. उपजीविकेसाठी हातात काहीही नसताना तो नोकरीसाठी धडपडतो. कुणाही पुढे लाचार होतो, शब्द टाकतो पण त्याला कुठेही नोकरी मिळत नाही. अशा संघर्षमयी वातावरणात तो विचार करतो की, मी या कुटुंबासाठी वणवण फिरतोय, नोकरीसाठी याचना करतोय, पण कुठेही यश मिळत नाही, तेव्हा आता मला बायकोचाही काही

उपयोग नाही. कारण ती गर्भवती आहे. भारतीय संस्कृतीत कुटुंबाची सर्वस्वी जबाबदारी पुरुषाची असते हे गृहीत दिसते. कठीण परिस्थितीतही तो काही ना काही मार्ग काढण्यासाठी सतत धडपडत असतो, परंतु येथे उलटे चित्र पहावयास मिळते. नायक स्वत: नोकरीसाठी जास्त प्रयत्न करताना दिसत नाही. शिवाय तो पत्नीच्या मदतीची अपेक्षा मनात धरून असतो. या सर्व संघर्षादरम्यान नायकाची पत्नी गर्भवती असते. तिला नवऱ्याच्या प्रेमाची सहवासाची गरज असताना तो बाहेर कशासाठी जातो याचीही पूर्ण कल्पना तो आपल्या बायकोला देत नाही. महिनाभरात त्याने बायकोला बरोबर फिरायलासुद्धा नेले नसल्याची तक्रार बायको म्हणजेच वसू करताना दिसते. यावरून असे दिसते की, कादंबरीतील नायक आर्थिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास असमर्थ ठरताना दिसतो.

जेव्हा नायकाला नोकरी मिळत नाही, तेव्हा तो पत्नीच्या नोकरीसाठी धडपड करताना दिसतो. पण आपल्या बायकोला फक्त ती गर्भवती आहे म्हणून नोकरी मिळणार नसल्याचे जेव्हा त्याला समजते तेव्हा तो तिला न सांगताच फसवून तिला पपया खायला घालतो आणि तिचा गर्भपात घडवून आणतो. खरेतर बायकोचा गर्भपात करण्याचा कोणताही अधिकार नवऱ्याला नसताना इथे फक्त पुरुषी मानसिकतेच्या आधारावर या नायकाने आपल्या पत्नीचा गर्भपात घडवून आणलेला दिसतो. (पृ.८२) स्वत: जास्त मेहनत न घेता बायकोचा आधार घेणे व तिला फसवून तिचा गर्भपात करणे हा एकप्रकारचा अन्यायच आहे. कुटुंबाचा सर्वेसर्वा असलेला नायक या कादंबरीत घटना आपल्या मनाप्रमाणे घडवून आणतो. यावरून तो कुटुंबातील त्याचे वर्चस्व सिद्ध करताना दिसतो.

या कादंबरीतील नायक परिस्थितीने हतबल झालेला दिसतो. त्यातच तो बेकारही आहे. त्यामुळे तो पत्नीने नोकरी करावी अशी अपेक्षा धरतो. परंतु पत्नी गर्भवती असल्याने त्याचा हा प्रयत्नही असफल होतो. या सर्व प्रयत्नांत त्याच्या पुरुषी अहंकाराने पत्नीचा गर्भपात करण्यास प्रवृत्त होतो. पुरुषी मानसिकतेतून तो पत्नीवर नकळत आपला अधिकारच गाजविताना दिसतो. पत्नीच्या संबंधातले सर्व निर्णय घेताना तो स्वत:चे निर्णय पत्नीवर लादताना दिसतो.

## २. काळेशार पाणी :

भारतीय संस्कृतीला अभिप्रेत असलेली कुटुंब हीच संकल्पना केंद्रवर्ती न मानता कुटुंबाबाहेरील पुरुषांचे आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, नैतिक, शैक्षणिक पातळीवरचे जीवनमान या कादंबरीत रेखाटले आहे. या कादंबरीतील पुरुषपात्र 'विष्णू' हा गावातील प्रतिष्ठित नागरिक. त्याचे स्वत:चे भारतीय संस्कृतीला अभिप्रेत असलेले एक कुटुंब असते. परंतु तो भिकी नावाची एक रखेल ठेवतो. भिकीबरोबर तो आपले लैंगिक सहजीवन उपभोगतो. त्याच्यापासून भिकी दहा मुलांना जन्म देते. परंतु अनैतिकतेने झालेल्या दहा मुलांचा सांभाळ, त्यांचे संगोपन मात्र विष्णू गावकर करताना दिसत नाही. त्याला भिकीचे उपभोगणे म्हणजे त्याचा अधिकारच आहे असे वाटते. तो मन मानेल तसे व मन मानेल तेव्हा तिचा उपभोग घेतो. परंतु तिच्या कुटुंबाची व तिची कोणत्याही प्रकारची जबाबदारी तो उचलत नाही. भिकीची दहा पोरे उपाशी असताना तो भिकीकडे उपभोगासाठी उतावीळपणे तिच्या झोपायच्या खोलीत पसरतो तेव्हा भिकी रागाने त्याला म्हणते : ''इतक्या बिगिना इलास ते म्हातारे झालास तरी वायचं धीर धरवना नाय? हंयसर तुमची रांड आनी तिची धा पोरां उपाशी मरतंहत नि तुमी इलास लवडो हातीत धरून–'' (पृ.२४) वरील भिकीच्या तोंडातून निघालेल्या वाक्यांवरून असे दिसून येते की, विष्णू गावकरला फक्त मौजमजा करण्यासाठी भिकी पाहिजे असते. परंतु तिची कोणतीही जबाबदारी नको असते. यावरून त्याची रंगेल वृत्ती दिसून येते. कुटुंब व कुटुंबाबाहेरील विष्णूचे बेछुट जीवन कायमचेच अस्वस्थ असे दिसून येते.

स्वत:च्या प्रतिष्ठेसाठी विधवा स्त्रीला (भिकीला) उपभोग्य वस्तू मानून तिच्या असहाय्यतेचा तो पुरेपूर लाभ उठविताना दिसून येतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना डॉ. पुष्पा राजापुरे म्हणतात,

''धर्माने आणि व्यवस्थेने दिलेल्या अधिकारांचा मनसोक्त उपभोग घेणारा विष्णू धर्म आणि व्यवस्था यांनी सांगितलेली पित्याची कर्तव्ये मात्र विसरतो. त्याला तशीच साथ देणारी भिकी मात्र मातेची कर्तव्ये परिस्थितीमुळे हतबल होऊन, परिस्थितीने पिंजून जाऊनही आपल्यापरीने पार पाडते. मुलांचे संगोपन करण्यात तिचे मन रमत नाही. आणि ते रमावे अशी परिस्थितीही नाही.

तिच्या घरात वाढणारी मुले केवळ तिचीच नाहीत. पण त्यांना जगविण्याची, वाढविण्याची जबाबदारी मात्र एकट्या तिच्यावर येते, त्यासाठी ती भजी विकण्याचा धंदा करते. गावातच एका भटाच्या माडांना पाणी घालण्याचे काम करते. विष्णू मात्र तिला तिची पोटापाण्याची कामेही नीट करू देत नाही. ज्या गोष्टीला ते दोघेही जबाबदार, त्या जबाबदारीची पूर्तता करण्याचे कार्य मात्र एकट्या भिकीवर म्हणजे एका स्त्रीवरच येऊन पडते. आणि मग तिची इच्छा असो वा नसो तिला ती जबाबदारी झेपेल तशी स्वीकारावी लागते. स्त्रीवर होणाऱ्या या अन्यायाकडेच निवेदक वाचकांचे लक्ष आकर्षून घेतो. तसेच पुरुषाच्या दांभिक वृत्तीलाही काही अंशी उजेडात आणतो.''[१]

विष्णू गावकर एक पुरुष म्हणून त्याच्या सर्व जबाबदाऱ्या विसरलेला आहे. तरीही भिकी मात्र त्याच्याशी प्रामाणिक राहून त्याला सोबत करते. यावर भाष्य करताना डॉ. पुष्पा राजापुरे पुढे म्हणतात,

''विष्णूचे वर्तन हे पुरुषप्रधान सामाजव्यवस्थेशी पूरक आहे. पण याच व्यवस्थेत ठेवलेल्या बाईची इच्छा नसताना तिच्याशी संग करणे, हा तिच्यावरचा बलात्कार आहे आणि त्यासाठी त्या पुरुषाला दंड म्हणजे शासन करण्याचा दंड 'याज्ञवल्क्यस्मृती' त सांगितलेला आहे. परंपरेचे पालन करीत पुरुष म्हणून विशेषाधिकारात जगणारा पुरुष परंपरा रूढ झालेल्या काळापासून जसजसा अधिक दूर जात राहिला तसतसा तो अधिकाधिक स्वार्थांध होत गेला. म्हणूनच त्याच्या अपराधासाठी सांगितलेल्या 'शिक्षा' या कालबाह्य आहेत. असे म्हणत त्याने त्या नाकारल्या. त्याचे हे दुटप्पी आणि दांभिक वर्तन स्त्रीला नेहमीच हानिकारक ठरले. भिकी, कमळी, चिमणी आणि विष्णूची बायकोही पुरुषाच्या याच वर्तनधर्माचा 'बळी' आहेत. आपण विशिष्ट समाजरचनेचे, पुरुषाच्या विशिष्ट वर्तनधर्माचे 'बळी' आहोत याचे भान अनेकदा प्रत्यक्षातील स्त्रीलाही नसते. तसे ते या स्त्रीपात्रांनाही असलेले दिसत नाही, याचे भान निवेदक वरील लहानशा प्रसंगांतूनही आणून देतो.''[२]

पुरुषप्रधान मानसिकता असलेल्या स्त्रीकडे एक वस्तू म्हणून पाहणारा विष्णू गावकर कुटुंबव्यवस्थेचा आणि समाजव्यवस्थेचा एक घटक म्हणून तो कलंक वाटत असला तरी विष्णू गावकर याच्या मृत्यूनंतर भिकीच्या वाट्याला आलेल्या जगण्याचे व परवडीचे चित्र पाहता विष्णू

गावकरचा ती बळी ठरली असली तरी तो जिवंत असेपर्यंत ती सुरक्षित असलेली दिसून येते. असे असले तरी विष्णू गावकर याचे जगणे समाजव्यवस्थेला एक कलंक आहे हे विसरता येत नाही. सामजव्यवस्थेचा एक घटक म्हणून विष्णू गवस ऊर्फ गावकर आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडत नाही. स्वत:च्या पत्नीचा शारीरिक छळ करतो. भिकीलाही अत्यंत गौणत्वाची आणि तुच्छतेची वागणूक देताना दिसून येतो. साहजिकच मुलांवरही एक वडिलधारा माणूस म्हणून अपेक्षित असे संस्कार करताना दिसत नाही. साहजिकच मुलांकडूनही त्यास गौणत्वाची वागणूक मिळते. विष्णू गावकर याचे निधन झाल्यानंतर ज्यावेळी सामंत कमळीचे सांत्वन करतो त्यावेळी त्यांच्यात जो संवाद होतो तो पुढीलप्रमाणे –

"चल असं रडायचं नसतं. देव कुणाला घेऊन जातो सांग? त्याला जे माणूस आवडतं त्याला. तुझे वडील त्याला आवडले म्हणून त्यानं नेले. देव आता त्याला स्वर्गात राज्यावर बसवील. माहिताय?"

"विष्ण्या राजा होणार?"

"विष्ण्या काय म्हणतेस? तुझे वडील ना ते?"

"पण आम्ही त्याला विष्ण्याच म्हणायचो. आई पण. सगळे त्याला विष्ण्याच म्हणतात–"

"पण आपण नस्तं म्हणायचं. बाबा किंवा दादा म्हणायचं –"

"आता म्हणेन–"

"आता केव्हा?"

कमळीला आपली चूक एखाद्या सुरीच्या घावाइतक्या तीक्ष्णपणे जाणवली. पण तिला फार फार इच्छा झाली, विष्ण्या पुन्हा जिवंत व्हावा आणि आपण त्याला बाबा म्हणून हाक मारावी.

तिनं विचारलं, "तू वडिलांना काय म्हणतोस?"

"बाबा"

आपण विष्ण्याला कधीच 'बाबा' म्हटलं नाही, आणि आपणाला बाबा म्हणायला कुणी शिकवलंही नाही, याचं त्या वेळी कमळीला फार फार वाईट वाटलं." (पृ.३२)

वरील सर्व गोष्टींचा विचार करता स्वत:ला प्रतिष्ठीत समजणारा पण प्रत्यक्षात प्रतिष्ठा नसलेला, स्त्रियांकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहणारा, आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव नसलेला आणि कुटुंबव्यवस्था व समाजव्यवस्था यांना कलंक ठरणारा एक स्त्रीलंपट पुरुष म्हणून विष्णू गावकर याची प्रतिमा पुढे येते.

**३. इतिवृत्त :**

श्रीरंग नाडकर्णी या संपादकाला केंद्रस्थानी ठेवून ही कादंबरी आकाराला येते. श्रीरंग नाडकर्णी आपले संपादकपद सांभाळत असताना स्वत:च्या कर्तव्यात पूर्णांशाने गुंतवून घेताना दिसून येतात. आपण कुटुंबव्यवस्थेचा एक घटक आहोत याचे भानही त्याला असलेले दिसत नाही. पत्नी रमाबाई यांची शाब्दीक काळजी कधी ते घेताना दिसतात, मात्र पत्नीच्या आजारपणात तिची देखभाल करण्यासाठी ते वेळ देताना दिसत नाहीत. (पृ.२१०)

समाजातील एक महत्त्वाचा घटक म्हणून, 'जनता दैनिकाचा' एक यशस्वी संपादक म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविलेला असला तरी कुटुंबातील एक कर्ता पुरुष म्हणून मात्र ते स्वत:ची जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडू शकले नाहीत हेच येथे निदर्शनास येते.

**४. कुरूक्षेत्र :**

कुरूक्षेत्र कादंबरीच्या उत्तरार्धात 'लग्न' या शीर्षकाखाली ह. मो. मराठे यांनी एका अंध स्त्रीची जीवनकहाणी रेखाटली आहे. कादंबरीतील जीवनकहाणी सुमा नावाची अंध नायिका व वसंतराव दामले या नायकाशी गुंफली आहे.

या कादंबरीतील नायक स्वत:च्या मर्जीप्रमाणे आपल्या बायकोला वागवितो. तिच्यावर एकप्रकारे हुकूमशाहीच गाजवितो. पुरुषी वर्चस्व सिद्ध करतो. स्वत:च्या कोषात राहण्याच्या सवयीमुळे तो बायको व बाळ यांचे हाल करतो. स्वत:ची जबाबदारी तो पूर्णपणे टाळतो.

या कादंबरीतील नायक बायको शिकलेली व नोकरी करणारी हवी म्हणून सुमाशी; ती डोळ्यांनी अधू असतानाही लग्न करतो. पैशाच्या स्वार्थासाठी तो खालच्या पातळीवर येऊन बोलतो. कुटुंबातील आपले वर्चस्व सर्व मार्गांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो.

'पोरीला डी. एड. करायचं आणि मास्तरीण करायचं कबूल केलंय तुम्ही – लग्नाची बोलणी करतानाच नाही तर कोण करायला बसलं होतं तुमच्या आंधळ्या पोरीशी लग्न.' (पृ.९२)

नायकाच्या इच्छेपुढ कोणाचे काहीच चालत नाही. डोळ्यांचा त्रास असतानाही सुमाला डी. एड. करण्यास हा नायक भाग पाडतो. त्यावेळी त्याच्या या निर्णयापुढे सुमाचे आई–बाबा इच्छा असूनही काहीच करू शकत नाहीत.

'तुझ्या नवऱ्याच्या इच्छेपुढं कुणाचा काही इलाज नाही.' (पृ.९२) या सुमाच्या वडिलांच्या तोंडातील वाक्यामुळे या नायकाचे या कुटुंबातील हुकमी वर्चस्व दिसून येते. पण स्वत: बायकोची जबाबदारी न घेता ती पूर्णपणे तिच्या वडिलांचीच आहे अशी वागणूक तो पत्नीला देतो. घरखर्चही तो करत नाही. सुमाची पत्नी म्हणून सर्वच प्रकारची जबाबदारी तो झिडकारतो. तिला मारहाण करून तिच्यावर उपासमारीची, मिळेल ते खाण्याची वेळसुद्धा आणतो. या कादंबरीतील नायकाला पत्नीची सर्व सुखे हवी असतात. पण तिच्याबाबतची कर्तव्ये नको असतात. बायकोला शिव्या देणे, तिला मारहाण करणे, पैशासाठी तिची पिळवणूक करणे, तिचे स्त्रीधन हडप करणे, अशी पुरुषी अधिकारशाहीची सर्व कृत्ये तो करताना दिसतो. यावरून तो खूप आत्मस्वार्थी असल्याचे दिसून येते.

या कुटुंबामध्ये फक्त नायकाचाच हुकूम चालतो. बाळाच्या दुधासाठी लागणारा खर्चसुद्धा त्याच्या म्हणण्याप्रमाणेच व्हावा अशी इच्छा तो बाळगून असतो. हे खालील संवादावरून दिसून येते.

'किती घालायच?' गवळ्यानं विचारलं.

'अर्धा लिटर' मी म्हणाले.

'अर्धा काय करायचा? पाव पुरे' हे हुकूम फर्मावीत म्हणाले.

'अहो, पाव कसं पुरेल?' मी म्हटलं, 'चहा, विरजण, बाळाला पुरेसं.'

'पावशेरातच भागवायला शीक. नाहीतर बापाकडून पैसे आण.' (पृ.१२५)

या कादंबरीतील नायक पुरुषप्रधान संस्कृतीचा एक घटक दिसून येतो. शिवाय तो खूप आत्मस्वार्थी दिसून येतो. बायकोच्या माहेरच्या माणसांकडून तो पैसे मिळविण्याची कायमच आशा

धरून असतो. यावरून तो स्वत: जास्त कष्ट न करता ऐषआराम उपभोगतो पण बायकामुलांना यांपासून वंचित ठेवतो.

**५. कलियुग :**

औद्योगिक क्षेत्रातील कारखानदार आणि कामगार यांच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जगताप–पाटील या कामगार नेत्याच्या कौटुंबिक जीवनाचे संदर्भ येथे अधोरेखित होतात. आपले नेतेपण सिद्ध करण्याच्या खटपटीत त्यांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. कुटुंबातील लोकांच्या खाजगी जीवनाचा काहीही विचार न करता अनेकवेळा तो संघटनेची (युनियनची) बोलणी अनेकांच्या सहकार्याने आपल्याच छोट्याशा घरात करताना दिसतो. एवढेच नव्हे तर काही वेळेला मद्यपानाचे आयोजनही तो घरातच करताना दिसून येतो. मद्यपानाबरोबर खाण्यासाठी पदार्थ बनविण्यासाठी तो पत्नीस भाग पाडतो. मुलांच्या अभ्यासात आपण अडथळा ठरतो आहे याचेही भान तो बाळगताना दिसत नाही.

कुटुंबाच्या मूलभूत गरजाही जगताप पूर्ण करताना दिसत नाही. मात्र आपली मनमानी तशीच चालू ठेवून पत्नीला असहाय्य बनविणारा एक आपमतलबी पुरुष अशीच त्याची प्रतिमा येथे दिसून येते. (पृ.१९,२०)

'कलियुग' ही कादंबरी कत्रे या व्यक्तीला केंद्रवर्ती ठेवून मांडलेली असली तरी त्यांच्या कौटुंबिक जीवनाचे संदर्भ अपवादानेही जाणवत नाहीत असे दिसते. या संदर्भात परेन शिवराम जांभळे म्हणतात,

"कत्रेसाहेब या व्यक्तीभोवती ती गुंफलेली आहे. इतर तपशिलांना पूर्णत: फाटा देण्यात आला आहे. कत्रेसाहेब यांचे व्यक्तिगत संदर्भ – पत्नी, संसार, नातेवाईक, घरदार यांचे साधे उल्लेखही सापडत नाहीत."[३]

मल्होत्रा अँड काब्रा प्रा. लि. चे व्हाईस प्रेसिडेंट असलेले मल्होत्रा यांच्या पत्नी व मुलांचे संदर्भही अपवादानेच येतात.

'कलियुग' या कादंबरीतील प्रमुख पात्रांचा विचार करता कत्रे व मल्होत्रा यांची कौटुंबिक पार्श्वभूमी फारशी येत नाही, तर जगताप–पाटील ही व्यक्ती बाहेर कामगार नेता म्हणून मिरवितो मात्र कुटुंबप्रमुख या नात्याने एक आपमतलबी, मनमानी करणारा पुरुष म्हणून पुढे येताना दिसतो.

**६. देवाची घंटा :**

भारतीय संस्कृतीला अभिप्रेत असलेली कुटुंबव्यवस्था आदर्श कुटुंबसंस्था आहे. त्यात भिक्षुक, ब्राह्मण यांचे कौटुंबिक जीवन कसे असते, त्यात पुरुषांना कुटुंबात कोणते स्थान असते, ते स्वत:ची जबाबदारी कशी पेलतात. त्यात ते कितपत यशस्वी होतात हे या कादंबरीच्या माध्यमातून समजून घेता येईल.

गोप्या भटाचे स्वत:चे कुटुंब असतानाही तो येसूला रखेल बनवितो. त्याच्यापासून तिला चंद्री व शंकऱ्या अशी दोन मुले होतात. या कादंबरीत भारतीय समाजव्यवस्थेला मान्य असलेले कुटुंब गोप्या भटाचे नव्हते. परंतु येशी शंकऱ्या चंद्री हे त्याच्या कुटुंबाचेच भाग होते. मारूतीच्या देवळात पुजारी म्हणून काम करीत असताना तो येसूची आणि दोन मुलांची जबाबदारी सुरूवातील व्यवस्थित पार पाडतो. त्या कुटुंबाचा तो आधारस्तंभच होता. गोप्याभटाविषयी त्याच्या कुटुंबाला (येशीला) आदर होता हे खालील संवादावरून दिसून येते.

"आये माशे नाय?" शंकऱ्यानं तक्रार करीत म्हटलं.

"मेल्या, आज शनवार न्ह्य, रे ! आज काय माशे खातात? आज मारूत्येचो दिस. भटजी आज उपास करतात. आनिक तू, मेल्या, माशे माग–" (पृ.१०)

गोप्याभट शनिवारी उपास करी म्हणून तिने शनिवारी मासे बनविणे बंद केले होते. त्याच्या कामाच्या स्वरूपामुळेही कदाचित त्याला कुटुंबात आदराचे स्थान होते.

काही दिवसानंतर परिस्थिती पालटते. गोप्या भटाला वाईट दिवस येतात. तो येसू, शंकऱ्या, चंद्री यांची जबाबदारी पूर्णपणे पेलू शकत नाही. तेव्हा त्याला येसूकडून ऐकून घ्यावे लागते. परिस्थितीप्रमाणे त्याच्याविषयी वाटणाऱ्या भावना बदलल्या. येसू त्याला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून देते.

"लगीन कोणावांगडा केलं असतय, तर निदानपक्षी त्येंनी आयची जेवखावची तरी सोय केली असत्यान. बाईला केली, म्हंजे करूयाच लागता सगळा. तुमच्या सारख्यांचा तसा नाय. मेळला मारूतिच्या देवळात फुकटचा काय, तर हाडून दिला, निहजला, की गेला निघान." (पृ.५६) यावरून असे लक्षात येते की, तो त्या कुटुंबाची जबाबदारी पेलू शकत नसतानाही स्वत:च्या भोगवादी वृत्तीमुळे स्वत:वर अशी परिस्थिती ओढवून घेतो. कुटुंबाचे पालनपोषण करता यावे म्हणून एके दिवशी गोप्या भट मारूतीच्या देवळात चोरी करतो,

"ही बघ–" तो म्हणाला.

नोट. मोठ्या रकमेची नोट एवढंच तिला कळलं.

"कितके आसत?" तिनं विचारलं.

"शंभर, पुरे शंभर !" तो म्हणला.

ती अधिकच चमकून त्याच्याकडे, त्या नोटेकडे बघत राहिली. तिच्या सगळ्या चेहऱ्यावर आनंद पसरला. आश्चर्याचा, आनंदाचा धक्का ओसरल्यावर तिनं विचारलं,

"खंटासून मेळाली, भटजीनू?"

गोप्याभटान काही उत्तर दिल नाही. तो म्हणाला,

"आधी चिमणी काढ. मग सांगतो."

"आदी सांगा–" तिनं लडिवाळ आग्रह केला, तेव्हा तो सांगू लागला,

"बापू झांट्यानं देवासमोरच्या पेटीत टाकली. त्याचा कुठलासा माल सुस्वरूप आला. अगो, किती रूपयांचा माल माहीत आहे? अगो, एका कोटीचा. एक कोट रूपयांचा! ऐकला होतास हा आकडा तू? तर तो रात्री देवास आला. येताना केळ्या – पेढ्यांचा ढीग घेऊन आला. देवासमोर बसला. देवाला त्यांन गाऱ्हाणं घातलं. जाताना ही नोट पेटीत टाकून गेला. मी बघितली होती टाकताना – तेव्हाच ओळखली होती ही शंभराचीच नोट असणार ! अगो एक कोट रूपयांचा माल आला त्याचा ! तो गेला. वकील मगाशीच येऊन गेला होता. आता येणार नव्हता. आधी मी पळीचा दांडाबिंडा घालून नोट काढायचा प्रयत्न केला. पण कसली निघते, गो ! शेवटी

धोंडा आणला बाहेरचा. लगावले चार फटके पेटीच्या कुलपावर. फाट्दिशी फुटलं कुलूप. बघितलं, तर खरोखरच शंभराची नोट ! घेतली आणि इकडे निघालो.'' (पृ.६२)

वरील संवादावरून एक गोष्ट लक्षात येते की, या कादंबरीतील नायक भिक्षुक ब्राह्मण असूनसुद्धा वासनेच्या आहारी जातो. सामाजव्यवस्थेला मान्य नसलेली कुटुंबव्यवस्था स्विकारतो. त्या कुटुंबव्यवस्थेची जबाबदारी पार पाडण्यात तो अयशस्वी ठरतो. त्यातच तो स्वत:ची अब्रूसुद्धा घालवितो. पूर्णपणे उद्ध्वस्त होतो. ही परिस्थिती तो स्वत:च्या हाताने केवळ वासनेपोटीच ओढवून घेतो असे म्हणावे लागेल.

गोप्या भटाप्रमाणेच गोगटे वकील, वासू भट, वसगडेकर नावाचा दुकानदार ही पात्रेसुद्धा भोगलोलूप आहेत. त्यांचेही कुटुंबाबाहेरील संबंध त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर डाग बनून राहतात. पुरुषांची वासनाच त्यांच्या नाशास करणीभूत झाल्याचे लक्षात येण्यास मदत होते.

**७. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

'नो सेंटिमेंटस् प्लीज' या कादंबरीत भारतीय संस्कृतीप्रमाणे कुटुंब ही संकल्पना अधोरेखित केली आहे. कुटुंबामध्ये लग्नसंस्कार हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार मानला जातो. व भारतीय संस्कृतीमध्ये परंपरेने जातींमध्ये आईवडिलांनी ठरवून दिलेल्या मुलीशी लग्न केले जाते. परंतु या कादंबरीतील नायक आईने ठरविलेल्या मुलीशी लग्न करत नाही. तो स्वत:च्या निर्णयावर ठाम असतो. आईच्या म्हणण्यानुसार लग्न केले, तर तो सुखी होणार नाही. हे रमेशच्या प्रत्युत्तरातून दिसून येते. त्याची आई जेव्हा म्हणते. मी तुला संपले, मी जीव देईन किंवा घरातून निघून जाईन तेव्हा रमेश म्हणतो,

''तू या दोनही गोष्टी केल्यास, तरी माझा निर्णय मी बदलणार नाही. मला आयुष्य काढायचंय, ते तुझ्यासाठी नाही; माझ्यासाठी तू सांगतेस, ते ऐकल्याने मी कर्तव्य बजावल्यासारखे होईल. पण मी दु:खी होईन. मी एकटाच नाही; आपण तिघंही. मी, माझ्यामुळे माझी पत्नी म्हणून तू आणलीस ती मुलगी आणि आम्ही दोघंही दु:खी झाल्यामुळं तू स्वत:ही दु:खीच होशील.'' (पृ.३४) यावरून असे दिसून येते की, आई–वडील हे कुटुंबाचेच घटक असतानादेखील तो त्यांना आदर किंवा महत्व देताना दिसत नाही, तर दुसरीकडे तो आईला

विरोध करून मी जर तुझ्या म्हणण्याप्रमाणे वागलो तर आपण सर्वजण कसे दु:खी होऊ हे सांगतो. एकीकडे तो स्वत:चा विचार करताना दिसतो तर दुसरीकडे तो कुटुंबाचाही विचार करताना दिसतो. एकीकडे तो आईला दुखावतो तर दुसरीकडे तो म्हणतो, मी मातृभक्तीच्या देखाव्यापेक्षा जगाच्या दृष्टीनं कृतघ्न राहणं पसंत करेन. जर मी आईचा निर्णय ऐकला तर मातृसेवक समजला जाईल पण, त्यामुळेही आईला अधिकच दु:ख होईल व गुन्हेगार ठरेन. मी स्वत:चं सुख पाहिलं नाही. प्रेयसीचं सुख पाहिलं नाही आणि पत्नीलाही सुख देऊ शकलो नाही म्हणून आईही सुखी होणार नाही. (पृ.३५)

रमेश पंडितच नलूशी लग्न होऊन पाच वर्षे उलटून जातात. दुसऱ्या तिसऱ्या वर्षीच त्यांनी प्लॅनिंग करण सोडून दिलेल असतानाही नलूला दिवस रहात नाहीत तेव्हा रमेश पंडित खूप अस्वस्थ होतो. आपण आपल्या पत्नीला सुख देऊ शकत नाही, तिला मातृत्व देऊ शकत नाही याची त्याला सतत बोचणी लागून रहात असे. सर्वच प्रकारची काळजी घेऊनही आपण बाबा होण्याची जबाबदारी पार पाडू शकत नाही या दडपणाखाली तो वावरू लागतो,

"मग तो दिवसाचं गणित मांडू लागला. सम दिवस, विषम दिवस. त्या दिवशी तो मनाविरूद्धही समागम करू लागला. तीही मनाविरूद्ध त्यात सामील होऊ लागली. एक आवश्यक कार्य ...... एक हेतुपूर्ण शारीरिक कामगिरी ....... एक रिच्युअल ........ एक एकमेकांच्या शरीरांनी नेमून दिलेला धार्मिक विधी ...... बस्स्. आनंद संपला. केवळ कर्तव्याची भावना उरली. मनोरंजनाची जागा कर्तव्यभावनेन घेतली. ते काम करतानाही एका विचित्र जबाबदारीच्या ओझ्याची जाणीव दोघांना होऊ लागली." (पृ.२८)

स्वत:च्या मर्जीप्रमाणे लग्न करून, नवऱ्याची सर्व कर्तव्ये पार पाडूनही तो कुटुंबात स्वत:चे अस्तित्व निर्माण करू शकला नाही. कारण तो बाबा बनू शकणार नव्हता. त्यामुळेच तो पत्नीलाही सुखी ठेवू शकत नव्हता.

डॉक्टरांचा सल्ला नलूला मान्य नव्हता. बाळ दत्तक घेण्यासही ती राजी नव्हती, तेव्हा रमेश पंडित तिला आपला मित्र विष्णू याच्याबरोबर गर्भधारणा होण्यापुरते संबंध ठेवण्यास तयार करतो. त्यातून तिला दिवस जातात, परंतु तिचे विष्णूबरोबरचे संबंध संपत नाहीत. उलट ते

अधिकच वाढत जातात. तेव्हा रमेश पंडित विष्णू आणि नलू यांना ते थांबविण्याची सूचना करतो. परंतु ते दोघेही मान्य करत नाहीत. तेव्हा एक कुटुंबप्रमुख म्हणून व नलूचा नवरा म्हणूनही रमेश पंडित काहीही करू शकत नाही. तो आपल्या बायकोपुढे अगदी असहाय्य असतो. पुरुषप्रधान संस्कृती मान्य करणारी नलू नंतर आपल्याच नवऱ्याला आपल्या आयुष्यात आणि कुटुंबात मानाचे स्थान देत नाही. कुटुंबात मानाचे स्थान मिळविण्यासाठी, स्वत:चे अधिकार व कर्तव्ये मिळविण्यासाठी तो सतत प्रयत्न करतो. परंतु स्वत:च्या शारीरिक अक्षमतेमुळे तो या सर्वांना पारखा होतो. कौटुंबिक जीवन सुखी व्हावे यासाठी तो बायकोला आपणहून मित्राबरोबर संबंध ठेवण्यास भाग पाडतो, परंतु तेच मोठेपण त्याच्या सर्वनाशास कारणीभूत होते. आणि कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होते. बाळाचा कायद्याने बाप असूनही तो बापाचे सुख भोगण्यापासून वंचित राहणार राहतो.

एकंदरीतच कुटुंबातील एक नवरा, मुलगा आणि नंतर बाप म्हणूनही तो स्वत:चे स्थान निर्माण करण्यात अयशस्वी होतो.

**८. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

दोन प्रतिस्पर्धी कंपन्यांची बाजारपेठेतील स्पर्धा सांभाळताना या कादंबरीतील पुरुष आपल्या व्यवसायाप्रमाणे कुटुंबातही मानाचे स्थान मिळवितो का? कुटुंबाची आर्थिक, नैतिक, सामाजिक जबाबदारी तो पेलतो का? वेगवेगळ्या पैलूंनी तो घरात आदर्श निर्माण करू शकतो का? याचा विचार 'नरिमन पॉईंटचा समुद्र' या कादंबरीच्या आधाराने करता येईल.

'सनशाईन क्लिनिंग सोप' या सोपच्या कंपनीचे मार्केटींग मॅनेजर असलेले अवि आपल्या कामात अयशस्वी होतात. त्यांच्या कंपनीच्या मालाचा खप व्हावा म्हणून ते वेगवेगळे उपाय, जाहिराती यांचा अवलंब करतात. आपली पत्नीही अशाच एका एव्हरफ्रेश क्लिनिंग सोप नावाच्या कंपनीत जेव्हा मार्केटींग ऑफिसर म्हणून काम पाहणार असते तेव्हा तो अगोदर तिला या पदावर काम करण्यासाठी प्रोत्साहन देतो. तिचे निर्णय तिने स्वत: एकटीने घ्यावेत म्हणून तो तिला मदत करताना दिसतो. येथे मात्र नवरेशाहीची छटा त्याच्या वागण्यात दिसत नाही.

"कशी झाली बॉस बरोबरची मिटिंग?"

“मस्त.”

“प्रॉडक्ट लौकरात लौकर बाजारात टाकू होय ना?”

“तू कसं ओळखलस?”

“तू काल मार्केटींग मॅनेजर झालीस. मी पाच वर्ष मार्केटींग मॅनेजर आहे. पहिल्या दिवशी आमच्या एम.डीं. शी माझी जी मिटिंग झाली तीत ते हेच मला म्हणाले होते. आता आपण लौकरात लौकर आपला नवा प्रॉडक्ट मार्केट करायचा. कामाला लाग.”

“मी सकाळी तुला म्हणाले एम.डीं. शी मिटिंग आहे तर तू का नाही म्हणालास काय चर्चा होईल त्याबद्दल?”

“यू हॅव टु फेस युवर प्रॉब्लेम इंडिपेंडंटली!” (पृ.२९)

अविनाश आपल्या बायकोला धीर देताना म्हणत असे,

“आपण नोकरी करतो त्या कंपन्या एकमेकांच्या स्पर्धक असल्या तरी प्रायव्हेट लाईफमध्ये आपण एकमेकांचे मित्रच आहोत. नवराबायको आहोत.” (पृ.३२)

ऑफिसच्या गोष्टी केतकीने घरी बोलू नयेत असे अविला वाटत असे पण केतकीला अविनाशला ऑफिसच्या गोष्टी सांगितल्याशिवाय चैन पडत नसे. ती स्थळ वेळ न बघता बोलू लागे तेव्हा अविनाश तिला अधिकाराच्या स्वरूपात रागावत असे. तिच्यावरील त्याचा हक्क दाखवत असे,

“झोपायच्या वेळी तरी तू ऑफिस, बॉस आणि प्रॉडक्ट विसरशील का नाही?” त्यानं रागाच्याच स्वरात विचारलं आणि म्हटलं, “नेमकं झोपायच्या वेळी ऑफिसचे विचार, मार्केटचे विचार.” (पृ.६६,६७) याच्यापुढे जाऊन शरीरसुखाची अपेक्षा व्यक्त करतो.

वरील निवेदनावरून असे वाटते की, या कादंबरीतील पुरुष अविनाश बायकोवर आपला हक्क दाखवितो पण तिच्या भावना, तिची गरज तो समजू शकत नाही. तो पत्नीला शरीरसुखासाठी गृहीत धरतो. तिच्या इच्छेचा विचार करताना दिसत नाही.

केतकी जेव्हा व्यवसायात यशस्वी होते. तेव्हा तो तिला फसवून तिच्या कल्पना चोरतो. एक नवरा किंवा मित्र म्हणून केतकी अविवर विश्वास टाकते पण तो तिचा विश्वासघात करतो. व्यावसायिक हितसंबंधांमधले ताण तो आपल्या पत्नीवर काढतो. तिची फसवणूक करतो. अविनाश आपल्या मुलांवरही रागावतो. (पृ.१३१,१३२)

अविनाश अयशस्वी झाल्यावर त्याची ट्रान्सफर होणार असते. पण ती होऊ नये म्हणून तो आपल्या बायकोला ती एक मॅनेजर असूनही राजीनामा देण्यास सांगतो. इथे बायको प्रतिस्पर्धी आहे तेव्हा कुटुंबप्रमुख या नात्याने तो तिच्यावर दबाव टाकतो,

"कोणत्याही पुरुषाला स्त्रीकडून झालेला पराभव सहन होत नाही." अविनाश म्हणाला, आणि ग्लासातील व्हिस्कीचा घोट घशात ओतत सांगू लागला, "आपण आपापल्या कंपन्यांची लढाई लढतोय. दोन प्रतिस्पर्धी कंपन्यांची मार्केटमधली लढाई. ती आपण घरात आणली. अटळ होतं ती लढाई घरात येणं. कारण? त्या लढाईतले प्रतिस्पर्धी सेनापती आपणच होतो. एक सेनापती जिंकला. दुसरा हरला. हरला तो पुरुषच आहे. पती आहे म्हणून सांगतो – तू दुसरी सेनापती. तू राजीनामा दे. आमच्या जोशाला आणि त्याच्या त्या भावाला वाटतय, तुझ्या कल्पकतेमुळं तुमच्या स्कीम्स यशस्वी झाल्या. तुझ्याबद्दल माहिती झालीय दोघांनाही. तू राजीनामा दे. त्यांना आनंद होईल माय बॉसेस विल बी हॅपी. तुझ्यामुळे आपला प्रतिस्पर्धी प्रॉडक्ट मार्केट काबीज करू शकला असं त्यांना वाटतय. मी उद्या त्यांना सांगतो. नाऊ मिसेस केतकी साने इज नॉट देअर. शी हॅज रिझाइन्ड. आता मी यश मिळवून दाखवतो. आय विल गिव्ह यू रिझल्टस्. डोण्ट ट्रान्सफर मी." (पृ.१३३)

"आय ॲम नॉट हॅपी. एक तर माझा पराभव आणि वर तुला प्रमोशन."

त्याच्या स्वरात नाराजी असलेली तिला स्पष्ट जाणवून गेली. तो सांगू लागला, "केतकी, आपला संसार नीट चालायला हवा असेल तर तू रिझाईन कर. मला डिवचू नकोस."

"काय होऊ शकेल?"

"संसार मोडेल आपला. अयशस्वी पती आणि यशस्वी पत्नी, तीही रायव्हल कंपनीत."

"यु मीन डायवोर्स?" (पृ.१३५)

केतकी मनात इच्छा असूनही अविनाशला त्याचे कुटुंबातील स्थान देऊ शकत नाही कारण ती स्वत: एक यशस्वी स्त्री म्हणून वावरत असते. स्वत:च्या चूकीच्या निर्णयामुळेच अविनाशला आपल्या कुटुंबापासून दूर व्हावे लागते. त्याच्या आपमतलबी निर्णयामुळेच त्याचे कुटुंबातील स्थान डळमळीत झालेले दिसते.

**९. मार्केट** :

बीवायपी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर असलेले एस. के. केळकर हे 'मार्केट' या कादंबरीचे मध्यवर्ती पुरुषपात्र आहे. केळकर घरी परतताना त्यांचा जिना चढताना तोल जातो. या त्यांच्या वर्णनावरून असे वाटते, केळकर मद्यपान करत असावेत. मद्यपान करणाऱ्या प्रतिष्ठित पुरुषाला पैशाची आणि पदाचीसुद्धा धुंदी चढलेली सर्वसाधारण दिसून येते. बिझनेसच्या कामांमुळे ते रात्री नेहमीच उशिरा घरी येतात. त्यांचे खाणे पिणे नेहमी बाहेरच होत असे. त्यांचा घरातील लोकांशी संवादही व्यवस्थित होत नसलेला दिसून येतो. त्यांच्या वागण्यामुळे त्यांची कुटुंबाकडूनही विशेष काळजी घेतली जात नव्हती. हे खालील त्यांच्या घरातील वर्णनावरून दिसून येते.

"टीव्हीवरचे कार्यक्रम बघत त्यांचे कुटुंबीय बसले होते. त्यांची मुलगी – वय बावीस वर्षे. मुलगा वय – अठरा. पत्नी – त्रेचाळीस. वडील – पंचाहत्तर. केळकर आल्याचे मुलाने, मुलीने विशेष अशाप्रकारची कोणतीही कृती करून दखल घेतली नाही. त्यांच्या बायकोने थोडेसे संशयाने त्यांच्याकडे बघितले. वडील थोडे अस्वस्थ झाले.

'उशीर का रे एवढा?' वडिलांनी विचारलं. आपल्या विचारण्याला काही अर्थ नाही हे त्यांना माहीत होतं, आपला मुलगा नेहमीच उशिरा घरी येतो आणि आपण त्याला नेहमीच हा प्रश्न विचारतो आणि मुलगा नेहमी कोणतंच उत्तर देत नाही – ही प्रथाच होती. पण त्यामुळेच त्यांनी मुलाला तो प्रश्न विचारला.

केळकरांनी वडिलांच्या प्रश्नाला उत्तर दिलं तेही नेहमीच्या प्रथेनुसार –'काम होतं थोडं' (पृ.३९) वरील वर्णनावरून असे वाटते, केळकरांचे घरातील स्थान कर्ता पुरुष असलेले असले

तरी कुटुंबात त्यांना त्यांचे महत्त्व मिळालेले दिसत नाही. केळकर कुटुंबाची आर्थिक स्थैर्यता राखण्यात यशस्वी झाले होते असे म्हणण्यास हरकत नाही. या कामात त्यांना त्यांच्या कुटुंबाचीही मदत झाली होती. बायको बँकेत काम करत होती. मुलगी एमबीए करून एका कंपनीत ज्युनियर एक्झीक्युटिव्ह म्हणून काम करत होती. मुलगा कॉम्प्युटर सायन्स शिकत होता. मि. केळकरांचे वडील पूर्वी संस्कृतचे शिक्षक होते. केळकर जेव्हा पार्टीला जात तेव्हा त्यांचे वडील नाराज होत. स्वतःच्या बिझनेसच्या गप्पागोष्टींमध्ये ते पत्नी व मुलीला सामावून घेत. बिझनेसच्या गप्पागोष्टी करताना त्या यशस्वी व्हाव्यात म्हणून ते त्यांच्या मुलीच्या व बायकोच्या पेहरावावर बारकाईने लक्ष देत. मुलगी व बायकोचा उपयोग करून घेत. त्याप्रमाणेच त्यांनी वडील व दोन्ही सख्खे भाऊ यांनाही फसविलेले असते,

आता दोघेही मुलगे म्हाताऱ्या वडिलांच्यासमोर उभे राहिले. म्हणाले, ‘आमचे पैसे देऊन टाकायला सांगा त्याला. म्हणावं सख्खा भाऊ असलास तरी गय करणार नाही. आणि तुम्हांलाही बजावून ठेवतोय आम्ही – बाप असलात तरी पैशाच्या बाबतीत गय नाही. तुमच्या हाडांकडून वसूल करून घेऊ पैसे. इस्टेट तुम्ही कमावली नव्हती. आमच्या वाडवडिलांनी कमावून ठेवली होती. तिच्या अन्याय्य वाटणीचा तुम्हांला काहीही अधिकार नाही. झालाय तो अन्याय मिटवून टाका – आम्हांला आणखी पंचवीस–पंचवीस हजार देऊन टाका. आज नुसत्या कपबशा फोडल्या. एके दिवशी तुमची दोघांची डोकी फोडू. सांगून ठेवतो.’ (पृ.१३३,१३४)

एस. के. केळकरांची मुलगी तनुजा केळकर हिच्यावर तिचे बॉस दिवाणसाहेब यांच्याकडून बलात्कार होतो आणि तिला कामावरून काढून टाकण्याचे आदेश देण्यात येतात. (पृ.१९९) परंतु मि. केळकरांना मि. दिवाणांकडून (तनुजाचे बॉस) बिझनेससाठी दिवाळीला मोठी ऑर्डर मिळणार असते. आपल्या बिझनेसवर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून ते मुलीवर झालेल्या बलात्काराची डॉ. सांगत असतानाही तक्रार करत नाहीत. मुलीच्या इज्ज़तीपेक्षा त्यांना त्यांचा बिझनेस महत्त्वाचा वाटतो. (पृ.२०२,२०३) मुलीची इज्ज़त लुटणाऱ्या दिवाणसाहेबांना जाब न विचारता, त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करता, उलट केळकर दिवाणसाहेबांबरोबर बिझनेस डील करतात. त्यात ते तीन लाख रूपयांचा प्रॉफिट मिळवितात. (पृ.२०९) पैशाच्या मोहापायी अंध झालेले केळकर

मुलीच्या कोणत्याही भावनेचा विचार करत नाहीत. स्वत:ची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, कुटुंबाविषयीचे प्रेम, सहानुभूती सर्व नजरेआड करतात. स्वत:च्याच मस्तीत नशापानात बुडून जातात. मद्याची आणि पैशाची नशा त्यांच्या रक्तात पूर्णपणे भिनलेली असते. स्वत:च्या लालची स्वभावामुळे ते मुलीला गमावतात. त्यांची मुलगी तनुजा वडिलांच्या या कृत्यामुळे डिस्टर्ब होते व आत्महत्या करते.

" 'तुम्ही आणखीही धंदा मिळवाल. माझ्यामुळं तुम्ही आणखीही धंदा मिळवाल. यू आर केपेबल ऑफ इट, पपा.' तनुजा कडवटपणे म्हणाली आणि तिथून उठून गेली.

सकाळी खोली झाडण्यासाठी म्हणून मोलकरणीने तनुजाच्या खोलीचं दार ढकललं. ती आत गेली आणि किंचाळतच बाहेर आली.

काय झालं म्हणून बघायला सगळी धावत आली – केळकर पति–पत्नी, म्हातारे प्रोफेसर केळकर, केळकरांचा मुलगा, स्वयंपाकीण बाई.

सर्वांनी एकदमच खोलीत बघितलं.

आणि सर्वांच्याच तोंडून आई ऽ गं ऽ असा करूण ध्वनी निघाला.

पंख्याला लोंबकळणारं तनुजाचं प्रेत बघून." (पृ.२०९,२१०)

तनुजा जेव्हा आत्महत्या करते तेव्हा केळकर दिवाणसाहेबांना जाब विचारायला जातात. परंतु दिवाणसाहेब त्यांनाच १ लाख रू. रोख व पर्चेस मॅनेजरची नोकरी देऊ करतात. या ऑफरमुळे केळकर कोर्टाची भाषा सोडून देऊन प्रपोजल मंजूर करतात. मुलीच्या मृत्यूची किंमत १ लाख ठरविलेली असतानाच त्यांची पत्नीही त्यातील पन्नास हजार रूपयांची मागणी करते. तीही आपला मुलीवरील हक्क सांगते. (पृ.२१४,२१५)

आपल्या व्यवसायाचा आपल्या कुटुंबावर कोणता परिणाम होतो आहे याचे कोणतेही भान केळकरांना राहत नाही. ते मुलीला न्याय देऊ शकत नाहीत. भावांना देऊ शकले नाहीत. वडील, सासरे यांनाही फसविण्याचा प्रयत्न करतात. कुटुंबातील एक जबाबदार नागरिक म्हणून ते पूर्णपणे अयशस्वी ठरतात. भारतीय संस्कृतीतील एक कर्ता पुरुष म्हणून ते नामर्द ठरतात. कुटुंबाची पालनपोषणाची सर्व जबाबदारी उचलायची गोष्ट तर दूरच परंतु पत्नी व मुलीच्या चारित्र्याचे रक्षण

करण्यातही ते अपयशी ठरतात. पत्नी व मुलीचे शील ते यशाची पहिली पायरी समजून चढत जातात. त्यांच्या या वृत्तीमुळे दोघीही संस्कारी जीवन जगू शकत नाहीत. दोघींच्या सर्वनाशाला या कादंबरीतील पुरुषच जबाबदार आहे. कुटुंबव्यवस्थेत कर्ता पुरुष संपूर्ण कुटुंबाचा आधारस्तंभ असतो. त्याच्यावरील आचार–विचारांचा परिणाम कुटुंबावर होत असतो. तो स्वत:च नैतिकतेच्या सर्व बाजू झुगारून देऊन धुंद होऊन फक्त पैसा आणि खोट्या प्रतिष्ठेच्या मागे लागलेला असतो. यामुळे केळकर आपल्या मुलीवरही चांगले संस्कार करू शकले नाहीत.

कुटुंबातील आपली किंमत ते स्वत:च्या हाताने कमी करताना दिसतात. नोकरी व्यवसायाचा कोणताही परिणाम कुटुंबावर होऊ नये. बाहेरची टेन्शन्स उंबऱ्याबाहेरच सोडून यावीत असे आपल्या पूर्वजांनी सांगितलेले असतानाही हा नायक बाहेरच्या सर्व गोष्टी घरात घेऊन येतो. राजकारण, अर्थकारण, पैसा, पद, प्रतिष्ठा यांच्याबरोबरच मद्यही त्यांच्या घरात शिरकाव करते. आपला व पर्यायाने आपल्या कुटुंबाचा सर्वनाश ते आपल्याच हाताने ओढवून घेतात.

या कादंबरीतील पती पत्नी आणि मुलीचा पैसा मिळविण्यासाठी उपयोग करून घेताना दिसतात. त्याविषयी अजित मगदूम म्हणतात,

"केळकरांची पत्नी अश्विनी, बँकेच्या लोन सेक्शनमध्ये मुळगांवकर साहेबांची असिस्टंट क्लार्क म्हणून काम करीत असते. तिथेही लोकांची कर्ज मंजूर करून पार्ट्या, गिफ्ट्स मिळवणं चाललेल असतं. केळकरांची एकुलती एक मुलगी तनुजा ही सौंदर्यसंपन्न उमदी तरूणी एका कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरची पर्सनल सेक्रेटरी. तिनंही बॉसला फाजील जवळ करून खूप पैसा मिळवावा असं केळकरांना वाटतं. जोशींसाठी दोन लाखांचं कर्ज मंजूर करून घेऊन दहा हजारांचं कमिशन मिळवण्यासाठी केळकर मिसेस केळकरांना उत्तेजन देतात."[४]

या कादंबरीतील मुख्य पात्र केळकर हे तर कुटुंबसंस्थेत अपयशी दिसून येतेच परंतु एस. के. केळकरांचे वडील प्राध्यापक केळकर हेही कुटुंबव्यवस्था व्यवस्थित चालवू शकलेले दिसत नाहीत. तीन मुलांमधील मतभेद, स्वत:च्या डोळ्यांसमोर आपल्या मोठ्या मुलाचा उद्ध्वस्त झालेला संसार पाहण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्यावर येते. आपली नात तनुजा केळकर हिचा झालेला

करूण अंत ते उघड्या डोळ्यांनी बघत बसतात. एस. के. केळकर हे कुटुंबातील ही परिस्थिती स्वत:च्या लालसेपोटी ओढवून घेतात. तर प्राध्यापक केळकर परिस्थितीने आणि वयाने मजबूर झालेले दिसतात. तसेच तिसरे पुरुष पात्र तात्या, अश्विनी केळकरचे वडील हेही आपल्या कुटुंबात आपले स्थान मिळवू शकत नाहीत. मुलाच्या आणि मुलीच्या संपत्तीच्या कटकारस्थानाचे ते बळी ठरतात. तीन वेगवेगळ्या क्षेत्रातील वेगवेगळ्या वयाची पुरुष पात्रे, पण या कादंबरीतील या तिघांचेही स्थान डळमळीतच राहिले आहे. एकूणच असे म्हणता येईल की, कधी पुरुष वयामुळे तर कधी सामर्थ्याने मजबूर होतो तर कधी वासनेच्या, प्रतिष्ठेच्या, पैशाच्या हव्यासापायी मजबूर होतो. त्याला जीवनात काय हवय हे त्याचे त्यालाच समजलेले नसल्यामुळे तो कुटुंबातील आपले स्थान अबाधीत ठेवण्यास असमर्थ ठरतो हेच प्रत्ययास येते.

**१०. सॉफ्टवेअर :**

मि. व्ही. एस. देशमुख हे एम. ए. इकॉनॉमिक्स फर्स्ट क्लास दोन वर्षे कॉलेजमध्ये प्राध्यापक, एल.एल.बी. लेबर लॉमध्ये स्पेशलायझेशन झालेले उच्चशिक्षित व्यक्तिमत्त्व. मि. देशमुख आपल्या उद्योग–व्यवसायामध्ये नाव कमविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. पैसा, पद, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी ते स्वत:ला झोकून देऊन काम करतात.

देशमुखांची मुले मोठी आणि स्वतंत्र झालेली असतात. बायकोही काहीतरी करण्याच्या उद्देशाने प्रयत्नशील असते. परंतु तिला काही मार्ग दिसत नाही. वयाची पंचेचाळीस वर्षे पत्नीने पूर्ण केलेली असतात. त्यामुळे लवकरात लवकर तिला काहीतरी बिझनेस करायचा असतो. तेव्हा ती देशमुखांसमोर कर्ज काढण्याचा, दागिने विकण्याचा प्रस्ताव ठेवते. परंतु देशमुख न चिडता, न वैतागता तिचे म्हणणे ऐकून घेतात आणि तिला धीर देण्यासाठी जरूर असा शब्दप्रयोग करतात. यावरून असे दिसून येते की, कुटुंबाचा समतोल साधण्यासाठी ते विचारपूर्वक निर्णय घेतात.

‘जमेल गं. जमेल उषा. तुझ्या मनात आहे ना काहीतरी करायचं? जरूर कर. विक दागिने. पैसे उभे कर. मी ही नोकरी सोडून बीवायपी ग्रुपकडे जॉईन झालो आणि काही ग्रॅच्युइटी, रजेचा पगार मिळाला तर ती रक्कमही मी तुला देईन, ओके?’

रेखा आणि अरूण ही देशमुखांची दोन्ही मुले कॉलेजचे शिक्षण घेतात. मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांनी शिकून मोठं करिअर करावं, जगाची ओळख करून घ्यावी अशी मुलांकडून अपेक्षा व्यक्त करताना ते म्हणतात,

'वा ! वा ! माणसानं असं व्हर्सटाइल असलं पाहिजे.' देशमुख म्हणाले. 'आय टेल यु. असं चौफेर व्यक्तिमत्त्वच शेवटी व्यवहारात यशस्वी ठरायला उपयोगी पडतं. आजकाल इंटरव्ह्युतसुद्धा तुमची व्हर्सटॅलिटी बघितली जाते. नुसते मार्कस् आणि पुस्तकी ज्ञान हे विचारात घेतलं जात नाही. मी रेखाला पण सांगत असतो. तू अभ्यासाबरोबर अवांतर गोष्टी पण करीत जा. वाचन तर हवंच. रोजचं वर्तमानपत्र वाचलं पाहिजे. मासिकं वाचली पाहिजेत. टीव्हीवरचे महत्त्वाचे कार्यक्रम बघितले पाहिजेत. तुम्हांला राजकारण माहीत पाहिजे, समाजकारण, अर्थकारण, माहीत पाहिजे. जगाची परिस्थिती माहीत पाहिजे, जगाचे प्रश्न माहीत पाहिजेत. कला. साहित्य, क्रीडा, नाट्य, सगळ्या क्षेत्रांत महत्त्वाचं काय काय घडतय, हे माहीत पाहिजे. अरे, आजच्या कारकुनालाही गेल्या पिढीतील कारकुनापेक्षा अधिक व्हर्सटाइल असावं लागतं.' (पृ.२७,२८) मुलांना चांगल्या संस्काराबरोबर त्यांच्या गोष्टींचे ते कौतुकही करत. एकदा उमेश सावरकर, रेखाचा मित्र देशमुखांच्या घरी चहा पित होता. तेव्हा देशमुख म्हणाले होते, ''चहा मस्त झालाय बुवा. तुम्हांला कसा वाटला, सावरकर?'' यावरून त्यांचे मुलीवरील प्रेमही दिसून येते. (पृ.६१,६२,६३,८०,८१)

मि. देशमुखांच्या पत्नीचे आणि देशमुखांचे संबंध विश्वासाचे आहेत हे त्यांच्यातील संवादावरून दिसून येते.

'अगं मी सांगायला विसरलोच आज आमची डेव्हलपमेंट ग्रुपची मिटिंग आहे. मला गेलं पाहिजे. गेल्या दोन मिटिंग्जना मी गेलो नव्हतो. आज आठवण झालीय तर जाऊन येतो.'

डेव्हलपमेंट ग्रुपचीच आहे की ड्रिंकग्रुपची? त्यांच्या पत्नीने वरवर हसत हसत पण मनातून साशंक होत विचारलं.

'डेव्हलपमेंट ग्रुपचीच आहे. दुसऱ्या ग्रुपची असते तेव्हा तुला सांगूनच जातो. मी पितो तेव्हा सांगून पितो आणि मला प्यायची नसते तेव्हा कोणी कितीही आग्रह केला तरी पीत नाही.'

‘ते माहीत आहे हो मला. सहज म्हणाले मी, जा तुम्ही; पण लवकर या. उगीच गाववाले भेटले म्हणून रात्रभर गप्पा हाणत बसू नका?’

‘नाही बरं, नाही. प्रेमाने तिच्या गालावर चापटी मारीत देशमुख म्हणाले आणि बाहेर पडले.’ (पृ.३२) मद्यपान वा इतर गोष्टींमधील पती–पत्नीमधील मनमोकळा संवाद येथे पहावयास मिळतो.

देशमुखांची पत्नी सर्व दागिने विकून व्यवसायासाठी भांडवल उभे करते, परंतु तिचा व्यवसाय चालत नाही. त्यातच देशमुखांना सस्पेंड करण्यात येते. अरूणचे मेडिकलचे शिक्षण आणि रेखाचे लग्न अजून व्हायचे असते. अशातच ही आर्थिक संकटाची परिस्थिती ओढवते.

देशमुख आपल्या कामाने कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे समाधान करण्यास असमर्थ ठरतात, तसेच ते उद्धट वागतात त्यामुळे त्यांना कामावरून काढून टाकण्यात येते. याचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक आयुष्यावरही होतो. जीवनात इमाने इतबारे आपली नोकरी करीत असताना केवळ वरिष्ठांच्या मनमानीमुळे त्यांना नोकरीस मुकावे लागते. परिणामी आर्थिक संकटात सापडतात आणि कुटुंबातील गौणत्वाचे जीवन त्यांच्या वाट्याला येते.

या कादंबरीतील देशमुख या पुरुषपात्राप्रमाणे एस. पी. पोंक्षे हेही व्यावसायिक दर्जा चांगला ठेवण्यासाठी आपल्या मुलाचे मनाविरूद्ध लग्न लावून देतात. त्यामुळे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होते. (एस. बी. – शांताराम बाळकृष्ण पोंक्षे) (पृ.८) अरूणाचलमच्या मनाविरूद्ध लग्न झाल्यामुळे ते पत्नीला, मुलीला सुख देऊ शकले नाहीत. शिवाय पत्नी आवडत नसल्यामुळे तो इतर स्त्रियांकडेही आकर्षित होतो. त्यामुळे इतर पुरुषपात्रेही कुटुंबात आपले चांगल्या दर्जाचे स्थान निर्माण करण्यास असमर्थ ठरताना दिसतात.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील ‘पुरुषांचे कुटुंबातील स्थान’ या घटकाचा विचार करता पुढील काही निरीक्षणे नोंदविता येतील.

‘निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी’ या कादंबरीतील नायकाचे कुटुंबातील स्थान लक्षात घेता तो स्वत:ची मनमानी करून सर्व निर्णय स्वत:च घेताना दिसतो. त्यामुळे त्याचे कुटुंबातील स्थान अबाधित राखण्यात अयशस्वी ठरलेला दिसून येतो. ‘काळेशार पाणी’ मधील विष्णूच्या रूपाने

भारतीय कुटुंबव्यवस्थेला तडा देणारी मानसिकता प्रत्ययाला येते. ‘इतिवृत्त’ मधील श्रीरंग नाडकर्णी या संपादकाच्या रूपाने आपल्या कार्यक्षेत्रात ते नावलौकिक मिळविताना दिसतात मात्र आपल्या कार्यबाहुल्याच्या चौकटीत अडकल्यामुळे त्यांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होते आणि त्यामुळे कुटुंबातील महत्त्वपूर्ण स्थान टिकविण्यात ते अयशस्वी झालेले प्रत्ययाला येतात. श्रीरंग नाडकर्णी आपल्या कामाच्या व्यापातून कुटुंबाकडे लक्ष देऊ शकत नाहीत. मात्र ‘कुरूक्षेत्र’ मधील वसंतराव दामलेंच्या रूपाने शिक्षकाची नोकरी करीत असताना आपले कुटुंब चांगल्याप्रकारे चालवू शकत असतानाही केवळ स्वार्थापोटी ते आपल्या पत्नीचा छळ मांडताना दिसतात. आपल्या सासू–सासऱ्यांचा तिरस्कार करताना दिसतात. अतिलोभापायी ते या सर्व गोष्टी करताना दिसतात आणि या सर्वांचा परिणाम म्हणून त्यांचे कुटुंबातील स्थान केवळ नगण्यच नव्हे तर तिरस्करणीय ठरते.

‘कलियुग’ मधील जगताप पाटील या पात्राच्या रूपाने एक कामगार चळवळीचा कार्यकर्ता, पुढारी म्हणून वावरत असताना स्वत:च्या कुटुंबाकडे मात्र दुर्लक्ष करताना आढळतो. एवढेच नव्हे तर स्वत:च्या मित्रमंडळींना घरी आणून मद्यपानासारख्या पार्ट्या घरात करताना दिसतो. त्यामुळे आपल्या पत्नीच्या होणाऱ्या कोंडमाऱ्याकडे, मुलांच्या अभ्यासाकडे तो लक्ष देताना दिसत नाही. साहजिकच कुटुंबातील त्याचे स्थान गौण ठरलेले दिसून येते. ‘देवाची घंटा’ या कादंबरीतील गोप्या भटाच्या रूपाने स्वत:चे कुटुंब नाकारून येसूसारख्या असहाय स्त्रीचे शोषण करताना दिसून येतो. त्याचे कुटुंबातील स्थान गौण ठरते. गोगटे वकील, वासू भट, वस–गडेकर यासारखी पात्रेही गोप्याभटाच्याच मार्गाने जाणारी असल्याने त्यांचे स्थान गौण ठरताना दिसून येते. ‘नो सेंटिमेंटस् प्लीज’ मधील रमेश पंडित यांचे कुटुंब एक सुखी कुटुंब असताना केवळ अपत्य सुख मिळावे यांसाठी त्याने केलेल्या चुकीच्या तडजोडींचा तो बळी ठरतो. ‘नरिमन पॉईंटचा समुद्र’ मधील अविनाश सानेंच्या रूपाने कंपनीत मार्केटींग मॅनेजर म्हणून काम करीत असताना आपल्या पत्नीसही तशाच स्वरूपाचे काम करण्यासाठी प्रवृत्त करतो. परिणामी पती–पत्नीमध्येच स्पर्धा सुरू होते आणि सुखी कुटुंबाला घरघर लागते. परिणामी कुटुंबातील स्थान गमावून बसताना ते दिसतात. ‘मार्केट’ या कादंबरीतील एस. के. केळकर या पुरुषाच्या रूपाने कंपनीमध्ये मॅनेजिंग डायरेक्टर या पदावर काम करीत असल्याने एक सुखी असणारे कुटुंब केवळ

पैशाच्या लोभापायी स्वत:ची पत्नी आणि मुलगी यांनाही आपल्या लोभाचा वाटेकरी करून कुटुंबातील आपले स्थान गमावून बसतात. ‘सॉफ्टवेअर’ मधील व्ही. एस. देशमुख इमाने इतबारे नोकरी करीत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनमानीचा बळी ठरून नोकरीस मुकतात. साहजिकच आर्थिक कोंडीत सापडल्याने त्यांना पुढील जबाबदाऱ्या पेलण्यास असमर्थता प्राप्त होते व पर्यायाने त्यांचे स्थान गौण ठरते.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील काही पुरुषपात्रे स्वत:ची जबाबदारी पार पाडत असताना आपली जबाबदारी आणि कर्तव्ये यांचे कुटुंबातील स्थान व महत्त्व मान्य होऊन ते जीवनात यशस्वी झालेले आढळतात, काही स्वत:च्या चुकांमुळे तर काही इतरांच्या चुकांचा, मनमानींचा बळी ठरताना दिसतात.

## २. पुरुषांचे कुटुंबातील नातेसंबंध :

पुरुषांचे कुटुंबातील नातेसंबंध वेगवेगळ्या पातळ्यांवर, वेगवेगळ्या पद्धतीने दिसून येतात. तो कुटुंबामध्ये कधी कुटुंबप्रमुख म्हणून वावरताना दिसतो, तर कधी वेगवेगळ्या नात्यांच्या भूमिकांमध्ये आढळतो. आजोबा, वडील, प्रियकर, काका, मामा, भाऊ, मुलगा, नातू, मित्र अशा वेगवेगळ्या नात्यांनी कुटुंबात आपले स्थान भूषवित असतो. ते स्थान भूषवित असताना त्याला कधी कधी कर्तव्ये पार पाडावी लागतात, तर कधी कधी अधिकारही वापरावे लागतात. कधी प्रेम करावे लागते तर कधी रागवावे लागते. कधी आधार बनून ठाम उभे रहावे लागते, तर कधी कुटुंबाचाच आधारासाठी उपयोग करावा लागतो. कधी तो मुलांचा पालक बनतो, तर कधी आपणच पाल्य होऊन बसतो. वयाच्या मध्यान्हात तो संपूर्ण कुटुंबाच्या उच्च पातळीवर असतो, तर कधी त्यालाच इतर लोकांचा आधार घ्यावा लागतो. कधी तो संपूर्ण कुटुंबावर प्रेमाचा वर्षाव करतो, तर कधी कुटुंबाच्या स्नेहाच्या वर्षावात स्वत:च चिंब भिजतो.

जीवन जगत असताना तो कुटुंबासाठी रात्रंदिवस झटत असतो. त्यात कधी यश प्राप्त होते, तर कधी अपयश पदरात पडते. कधी स्वत:च्या चुकीमुळे कुटुंब उद्ध्वस्त करतो, तर कधी कुटुंबातील इतर सदस्यांच्या चुका, निर्णय, वृत्ती यांमुळे स्वत:च मानहाणीला बळी पडतो. कधी तो स्वत:हून कुटुंबाची जबाबदारी, त्यांचे नातेसंबंध जोपासतो तर कधी नाइलाजाने त्याला तसे

करावे लागते. कधी तो संपूर्ण कुटुंबाचा आधारवड बनून राहतो तर कधी तो स्वत:च कुणाचा तरी आश्रित म्हणून जगतो. असे सर्वसामान्य वास्तव ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यात पुरुषांचे नातेसंबंध कसे रेखाटले गेले आहेत त्याचा सविस्तर विचार करणे येथे अभिप्रेत आहे.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**अँकर :**

या कथेतील नायक असलेले संपादक भालेराव आपल्या कामात नेहमीच व्यग्र असतात परंतु घरी आल्या आल्या ते आई, वडील, पत्नी, मुले यांची विचारपूस चौकशी करताना दिसतात. घरातील सर्व सदस्य मात्र त्यांच्याशी अधिक संवाद साधताना दिसत नाहीत. ते सर्वजण त्यांना टाळण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यामुळे नात्यांमधील मोकळेपणाही येथे दिसून येत नाही. त्यामुळेच घरातील छोट्या गोष्टीही भालेराव पार पाडताना दिसत नाहीत. जसे की, वडिलांची औषधे आणणे, मुलांची फी भरणे. (पृ.४०,४१) घरातील हे बोलके चित्रण करून ह. मो. मराठे यांनी या नायकाच्या नातेसंबंधावर प्रकाश टाकला आहे.

**जी सरकार :**

या कथेतील नायक मोहन परिस्थितीने गाजलेला. मात्र कोणत्याही प्रकारची चिडचिड न करता आईशी संवाद साधताना दिसतो. आईच्या मनातील विचारांचा, त्या विचारांच्या तिच्या चेहऱ्यावरील, वागण्या–बोलण्यातील प्रतिक्रिया तो समजू शकतो. मोहनची आई मोहनचा अपमान, त्याचे दु:ख पाहू शकत नाही हे देखील त्याचे आईबरोबर असलेले स्नेहाचे नातेसंबंध दर्शवितात. (पृ.९६,९७) मोहन घरातील छोट्या छोट्या गोष्टींकडे, समस्यांकडे पाहताना तो घरातील वडिलधाऱ्यांचा आधार घेतो. त्यांचा आदर करतो. या त्याच्या गुणांमुळे तो घरातील आपले नातेसंबंध टिकवून ठेवतो.

**देशात सालं काही घडतच नाही :**

या कथेतील रिक्षावाला अत्यंत गरीब आहे. जे पैसे तो कमावतो त्यातले बरेचसे पैसे त्याला रिक्षाभाडे म्हणून द्यावे लागतात. पोटापाण्याची आणि कुटुंबाची सर्व व्यवस्था सांभाळावी

लागते. रिक्षाचे भाडे वेळेत भरले नाही तर मालकाची बोलणी खावी लागतात. मेकॅनिकचे पैसे दिले नाहीत तर तो खूनाची भाषा बोलतो. त्याच्या रिक्षामालक आणि मेकॅनिकने पैशासाठी तगादा लावलेला असून त्यांच्याविषयी मनात भिती असूनही हा रिक्षावाला त्यांचे पैसे देण्याऐवजी अगोदर घरात किराण आणतो, आईचे आजारपणासाठी खर्च करतो. (पृ.१२२,१३४) या रिक्षाचालकाची कुटुंबवत्सलता त्याचे कुटुंबातील चांगले नातेसंबंध दर्शविते.

**भले गृहस्थ पंडित :**

या कथेतील नायक विश्वनाथ द्वारकानाथ पंडित आपली विधवा बहीण आणि तिच्या मुलांचा सांभाळ करतो. सहा महिन्यांची बेकारी सहन करूनही ते जेव्हा त्यांचा पगार होतो तेव्हा त्यांच्यासाठी खाऊ घेऊन येतात. आर्थिक परिस्थिती चांगली नसतानाही ते बहिणीचा सांभाळ करतात, तिचा संसार सांभाळतात. बहिणीच्या मुलांच्या शिक्षणाची, लग्नाची, नोकरीची ते काळजी घेतात. (पृ.१४९,१५०,१६८,१६९) पंडितांची मानसिकता, काळजी, त्यांचे कुटुंबावरील प्रेम व्यक्त करते तर बहिणीचा पंडितांविषयीचा आदरभाव, प्रेम त्यांचे असलेले नि:स्वार्थी आणि घट्ट नातेसंबंध स्पष्ट करतात.

**२. ज्वालामुख :**

या कथेतील नायक मोहिते एकत्र कुटुंबात जीवन जगतो. तो या कुटुंबातील कुटुंबप्रमुख. त्याचा मोठा भाऊ अपघातात गेल्याने भावाच्या कुटुंबाची, आईवडिलांची, स्वत:च्या कुटुंबाची जबाबदारी तो सांभाळताना दिसतो. कुटुंबासाठी तो ओव्हरटाईम करतो. इतरही काही कामे तो करतो. पैसे नसतानाही तो आपल्या आजारी आईला रिक्षात घालून डॉक्टरकडे नेतो. सर्व पैसे आईच्या आजारपणात खर्च होतात, जोंधळे आणण्यासाठीही त्याच्याकडे पैसे शिल्लक राहत नाहीत. तो मधून मधून तिला भेटायला जातो. तिची विचारपूस करतो. (पृ.४८,४९,६४,६५) सर्व परिस्थिती वाईट असतानाही तो कुटुंबाची काळजी घेतो. उपासमार होऊनही त्यांचे नातेसंबंध चांगले असल्याचे दिसून येते.

**आजोबा :**

अरूण घटस्फोटीत असून त्याच्यावर वडिलांची आणि मुलीची जबाबदारी येऊन पडते. तो नोकरी करत असतो. त्यामुळे वृद्ध वडिलांसाठी तो सकाळीच त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था करून ठेवताना दिसतो. दिवसभर वडिलांकडे लक्ष द्यायला कोणी नसते म्हणून तो बाहेरून कुलूप लावून जातो. वडिलांना चोर त्रास देतील, त्यांना काही कमी जास्त झाले तर रात्रीशिवाय काहीही समजणार नाही म्हणून ते वडिलांना घरात बंद करून ठेवतात. त्याची काळजी वाटते म्हणून अरूण शेजारच्या वहिणींना लक्षा ठेवायला सांगतात. मध्येच एकदा येऊन जायला सांगतो. आई मेल्यानंतर वडिलांचे करायला कोणी नाही म्हणून तो वडिलांना मुंबईला घेऊन येतो. परंतु येथेही तीच परिस्थिती निर्माण होते तेव्हा मात्र त्यांचाही नाइलाज होतो. तेव्हा ते वरील पर्याय नाईलाजाने स्विकारताना दिसतात. मिनूची म्हणजेच आपल्या मुलीची काळजी घेण्यासाठी वेळ मिळत नाही म्हणून ते तिला बोर्डिंगला ठेवतात.

वडील करमत नाही म्हणून गावाला जाण्याची भाषा करतात तेव्हा दुप्पट खर्च होईल म्हणून तो वडिलांना गावी पाठवत नाही. शेवटी वैतागून वडील आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. अरूणची बायको त्याला सोडून वेगळी राहते. (पृ.७०,७५,७६,७८,७९,८३) वरील सर्व घटनांचा विचार पतीपत्नी यांचा घटस्फोट म्हणजे येथे त्यांचे नातेसंबंध दुरावलेले दिसतात. वडिलांचे आणि अरूणचे मतभेद दिसतात. तरीही नाइलाजाने ते एकमेकांना सांभाळून घेताना दिसतात. परंतु शेवटी वडील मुलापासून सुटका करण्याचा प्रयत्न करतात परंतु तेथे सफल न झाल्याने ते शेवटी आत्महत्या करतात. यावरून त्यांच्या नात्यातील ओलावा नाहीसा झाल्याचे चित्र समोर येते, तर मिनूला संगोपनासाठी वेळ नाही पण कर्तव्य म्हणून तिची जबाबदारी अरूण उचलताना दिसतो. पण या नात्यामध्येही प्रेमाचा ओलावा दिसून येत नाही. पत्नी, वडील, मुलगी या तिघांशीही नातेसंबंध दृढ करण्यात हा नायक अयशस्वी झालेला दिसून येतो.

**कीटक :**

शंकरराव आणि त्यांचा मुलगा यांच्यात भाड्याच्या खोलीत राहण्यावरून वाद होतो. त्यामुळे शंकररावांच्या पत्नीने मुलाला आणि सुनेला मारले तेव्हा लोकलज्जेसाठी पत्नीला आवरावे

मुलाला आणि सुनेला घराबाहेर काढू नये असे विचार मनात येऊनही शंकरराव पत्नीला अडवताना दिसत नाहीत. उलट मुलाने घर सोडून जावे. मुलाच्या रूपातील आपले संकट टळावे असाच विचार त्यांच्या मनात येतो. (पृ.८६,८७) मुलाने टोकाची भूमिका घेतल्याने वडिलांचाही नाइलाज होतो. त्यामुळे त्यांच्यातील नातेसंबंध तकलादू असल्याचे चित्र समोर येते.

**काळ :**

या कथेतील नायक एक मजूर. त्याची पत्नी शहरात घरकाम करते. तो खेडेगावात आपला, आपल्या मुलीचा, आईचा उदरनिर्वाह करत असतो. तो आपल्या मुलीला घेऊन शहरात आपल्या पत्नीला भेटण्यासाठी निघालेला असतो. मुलीच्या पायात चप्पल नसते. त्यामुळे मुलीचे पाय भाजत असतील या जाणिवेने तो अस्वस्थ होतो. मुलीला शहरात नेले तर तिकिटाचे पैसे जास्त द्यावे लागणार असतात. तरीही आईची आणि मुलीची भेट होईल या उद्देशाने तो मुलीला बरोबर नेतो. (पृ.१२६)

मुलीला भूक लागलेली असताना त्याच्याकडे जास्त पैसे नव्हते तरीही तो नाइलाजाने आणि मुलीचा भुकेला व्याकुळ चेहरा पाहून कँटीनमध्ये पावमिसळ खाऊ घालतो. (पृ.१२७) या दोन गोष्टींचा विचार करता त्याचे मुलीशी चांगले नातेसंबंध दिसून येतात.

हा नायक आणि त्याचा भाऊ खेड्यात रहात असतात. अर्ध्या एकराच्या कोरडवाहू जमिनिच्या तुकड्यावर भावाची पाच माणसं, नायकाची चार माणसं आणि आई एवढ्या माणसांचा उदरनिर्वाह असतो. त्यामुळे उपासमारीने भावाभावांची भांडणे, पोरांना मारझोड, शिव्याशाप, इ. गोष्टी घडून येतात. (पृ.१२९) आर्थिक संकटांनी या दोन भावांचे नातेसंबंध दुरावलेले दिसून येतात.

**उजाड :**

या कथेतील नायक दिलीप हा तरूण विद्यार्थीदशेतील नायक. तो एका खुनाचा साक्षीदार. आईला सर्व हकिगत समजल्यावर ती त्याला पोलीसांना सर्व खरं सांगून माफीचा साक्षीदार होण्याची विनंती करते, परंतु तो मित्राच्या आणि बॉसच्या दहशतीने ती नाकारतो. परंतु बॉसला समजते की दिलीपने आईला सर्वकाही सांगितले आहे तेव्हा तो त्याला आईचा खून करण्यास

भाग पाडतो नाही तर त्याला संपविण्याची भाषा करतो. स्वत:चा जीव वाचावा म्हणून तो आईचा खून करतो. (पृ.१५४,१५५,१६८,१७१,१७३,१७४) सुरूवातील दिलीप आईला सर्वकाही सांगताना दिसतो. त्यावरून त्याचे आईशी नातेसंबंध विश्वासाचे, प्रेमाचे, आदराचे दिसून येतात. परंतु जेव्हा स्वत:च्या जीवावर बेतते तेव्हा तो आईबरोबरचे सर्व नातेसंबंध विसरून पशुत्वाच्या पातळीवर येतो पण हे नातेसंबंध बिघडण्यात त्याचा मित्रपरिवार, त्याची साथसंगत आणि परिस्थिती कारणीभूत असल्याचे दिसून येते.

**३. हद्दपार :**

**३.१ :** प्रोफेसर पिंपुटकर आणि त्यांची मिसेस यांच्यात वैचारिक मतभेद होतात. एखाद्या गोष्टीवर चर्चा करताना त्यांची मिसेस अगदीच मामुली आणि सामान्य स्त्रीसारखी प्रतिक्रिया देते हे पाहून ते दु:खी होतात. आपले आणि पत्नीचे वैचारिक मतभेद होतात हे पाहून त्यांची मनेही दुरावतात. (पृ.२,३) दोन भिन्न माणसे भिन्न विचार करू शकतात हे एवढेसे कारण समजू न शकल्यानेच त्यांचे नातेसंबंध दुरावताना दिसतात.

काही कालावधीनंतर ते वैचारिक चर्चा करतात त्यात त्यांचे एकमत होऊन एकमेकांना प्रोत्साहन देतात, परंतु कौटुंबिक जबाबदारी, मुले यांच्यामुळे ते एकमेकांपासून दूर जातात. (पृ.७,८,९,१०,११) पत्नीला फक्त चूल आणि मूल यातच गुरफटवून ठेवून प्रोफेसर तिला फक्त घरातच ठेवतात. स्वत:च्या मर्जीप्रमाणे वागवितात आणि पदोपदी काकुबाई म्हणून अपमानही करताना दिसतात. या सर्वांचे परिणाम त्यांच्या घटस्फोटापर्यंत जातात. (पृ.१६,१७) आपल्या कामाच्या ठिकाणी असणाऱ्या परस्त्रीशी लगट करण्याने, तिचीच स्तुती केल्याने, तिलाच प्रोत्साहन दिल्याने त्यांची वैचारिक पातळी सम होऊन प्रेम, आदर निर्माण झाला, मैत्री झाली परंतु पति–पत्नीचे संबंध तुटल्याचे मार्मिक चित्रण ह. मो. मराठे यांनी येथे केल्याचे दिसून येते.

**३.२ :** प्रोफेसर पिंपुटकर आल्या पत्नीला नोकरी करू देत नाहीत. उलट तिने घरसंसार, मुलेबाळे सांभाळावीत, आपल्यासाठी वेळ द्यावा, तिने एक चांगली गृहिणी बनून रहावे अशी अपेक्षा ते करतात. मुलांच्या सर्व जबाबदाऱ्याही ते पत्नीवरच टाकतात. नंतर आपली बायको संकुचित विचारांची आहे, गावंढळ आहे, वैचारिकता नाही अशा नावाखाली प्रोफेसर पिंपुटकर

मिसेस घाट्यांच्या प्रेमात पडलेले दिसतात. ते बायकोला घटस्फोट देऊन मिसेस घाट्यांशी लग्न करण्याचे मनसुबे रचतात. त्यामुळेच त्यांच्या नात्यात आणखीनच फूट पडते. (पृ.३०,३१,३३,३४,३५) जोपर्यंत प्रोफेसर पिंपुटकर मिसेस घाट्यांच्या प्रेमात पडलेले नसतात तोपर्यंत त्यांचे आणि पत्नीचे संबंध चांगले असतात. मुलांशी ते प्रेमाने वागतात. पूर्वी ते कधी बाहेरगावी गेले तर लवकर घरी येत असत. जाताना बायकामुलांना आनंदाने निरोप देत. ते मिसेस घाट्यांच्या प्रेमात पडल्यानंतर बायकोला तुच्छ लेखू लागतात. मुलांना दुखावतात. (पृ.३५) या सर्वांचा परिणाम म्हणून पत्नी आणि मुलगा नोकरी शोधू लागतात. पत्नी आणि मुले प्रोफेसरांचाच पुढे तिरस्कार करू लागतात.

मिसेस घाटे जेव्हा प्रोफेसर पिंपुटकरांना लग्नाला नकार देतात तेव्हा ते परत घर–संसाराकडे, पत्नीकडे लक्ष द्यायला लागतात. पत्नीकडे झालेल्या चुकांची कबुली देतात. माफ करून आपले पूर्वीचेच स्नेहाचे नातेसंबंध वृद्धींगत करण्याची अपेक्षा बायको आणि मुलांकडून करतात. पत्नी जेव्हा सगळे विसरून प्रोफेसरांना शरीरसुख देते तेव्हा ते खूप सुखावतात. परंतु यापाठीमागे पत्नीलाही ते सुख हवे होते म्हणून ती त्यांना ते सुख देत होती. परंतु दुखावलेपणामुळे शेवटी ती त्यांना एकटे सोडून आपला मार्ग शोधते. मुलेही आपआपल्या कामात व्यस्त होतात. शेवटी प्रोफेसर अगदी एकटे पडतात. (पृ.४३,४४,४५,४६) नात्यांमधले ताणतणाव, घटस्फोट, परस्त्रीकडे पाहण्याचा हव्यास माणसाला कसे संपवितो त्याचे कौटुंबिक सुख कसे हळूहळू त्यांच्यापासून दूर जाते याचे सूचक चित्रण ह. मो. मराठे यांनी या पात्रांच्या द्वारा टिपले आहे.

**३.३ :** प्रोफेसर पिंपुटकर आणि मिसेस शीला पिंपुटकर यांच्यात मतभेद निर्माण होतात. ते दोघांच्या आयुष्यात दुसरी व्यक्ती आल्याने प्रोफेसर पिंपुटकर मिसेस घाट्यांमध्ये गुंतले होते तर मिसेस शीला पिंपुटकर मि. वर्मांमध्ये गुंतल्या होत्या. मि. मिसेस पिंपुटकर यांचे दोघांचे नातेसंबंध चांगले न राहिल्यानेच या गोष्टी घडताना दिसतात. मिसेस शीला पिंपुटकर प्रौढ होत चालल्या आहेत हे सत्य त्यांना वर्मा, कर्नल भुस्कुटे, प्रत्यक्ष प्रोफेसर पिंपुटकर यांच्याकडूनही समजते. तेव्हा त्या दुसऱ्यांचा विचार सोडून स्वत:चा नवरा मुले यांच्यात पुन्हा एकरूप होण्याचा प्रयत्न करतात. पण प्रोफेसर पिंपुटकर पत्नीकडे फक्त पत्नी आणि एक गृहिणी आणि स्वत:ची पाहिजे

तेव्हा सोय या नात्यानेच पाहताना दिसतात. शेवटी तर पत्नीने सामंजस्य दाखवूनही ते त्यांच्याकडे पाठ फिरविताना दिसतात. (पृ.८०,८१,८३,८४,८५) त्यांचे नातेसंबंध त्यांच्या पत्नीशी स्वार्थीपणाचे असलेले दिसून येतात. त्यांना जेव्हा पत्नीची गरज लागते तेव्हा ते तिच्याशी पत्नीच्या नात्याने वागतात पण फक्त हक्क म्हणून, प्रेमाच्या नात्याने ते वागताना दिसत नाहीत.

**४. पक्षिणी :**

**पाट :**

या कथेतील नायक भूक लागली म्हणून तातुल्याच्या बागेतील जांब चोरून खातो. चोरी पकडली गेल्यावर तातुल्याचा व बाबांचा मार खातो. बाबांचा मार बसल्यामुळे त्याला बाबांविषयी तिरस्कार निर्माण होतो. हा नायक घर सोडून जातो पण घराच्या, आईच्या, बाबांच्या आठवणीने परत येतो तेव्हा वडील त्याची विचारपूस करतात. परत मारणार नाही याची कबुली देतात. त्याला आईचीही आठवण येते. (पृ.१४,१५,१६,१७,१८) नायकाचे आणि त्याच्या वडिलांचे नातेसंबंध चांगले दिसून येतात. बाबा नायकाला मारताना दिसतात, परंतु त्याने परत चोरी करू नये, वाईट मार्गाला जाऊ नये या भावनेपोटी, प्रेमापोटी वडील त्याला मारतात नंतर जवळ घेतानाही दिसतात.

**कभिन्न :**

हा कथानायक एका ट्रकवर ड्रायव्हर असतो. तो जिथे रहात असतो तेथील एक ब्राह्मण खूप मुली असल्याने आपली एक मुलगी त्याला स्विकारण्याची विनंती करतो तो तिच्याशी लग्न करतो पण तिला प्रेम, सहानुभूती, आधार देत नाही. तिचा वापर करून तिला मारहाण करतो. मूल देऊ शकत नाही म्हणून तिचा सतत अपमान करून तिला मारहाण करतो. परस्त्री घरात आणतो बायकोसमोर परस्त्रीशी संग करतो. पत्नी विरोध करते तेव्हा तिला शिव्या घालतो, मारहाण करतो शेवटी तिचा खून करतो. (पृ.३३,३४,३५,३९) या नायकाच्या अंगी मानवता ममता दिसून येत नाही. पत्नीकडे फक्त तो उपभोगाची वस्तू म्हणून पाहतो. तिच्यावर मालकी हक्क दाखवितो पण तिचा हक्क, तिचे प्रेम तिला देताना दिसत नाही. त्यामुळे तो पती–पत्नीचे नातेसंबंध जपण्यात अयशस्वी झालेला दिसून येतो.

**पक्षिणी :**

मि. आणि मिसेस देशपांडे यांचा प्रेमविवाह झालेला असतो. त्यांना कन्यारत्न होते. आर्थिक ओढाताण, मुलीची काळजी या सर्व गोष्टींनी ते त्रस्त असतात. परंतु मि. देशपांडे पत्नीला समजून घेत नाहीत. ती नोकरी, घरकाम, मुलगी या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना कितीही दमली असली, तरी ते त्यांना हवं तेव्हा पत्नीकडून शरीरसुख ओरबाडूनच घेतात. तिचा नकार असला तरी ते जुमानत नाहीत. पत्नीला घरकामात, मुलीला सांभाळण्यात काडीमात्र मदत करताना दिसत नाहीत. त्याला हवे असलेले सर्व सुख तो बळजबरीने मिळवितो, आनंदी राहतो. पण पत्नी आणि मुलीची अजिबात काळजी घेत नाही. (पृ.१२१,१२३,१३५) मि. देशपांडे नात्यांमध्ये प्रेम, सहानुभूती निर्माण करू शकले नाहीत. उलट जबरदस्ती, अधिकार, हक्क, ऐतखाऊपणा, जबाबदारी टाळण्याची वृत्ती या दुर्गुणांमुळे ते पत्नीशी आणि मुलीशी चांगले नातेसंबंध निर्माण करण्यात अयशस्वी होताना दिसतात.

**५. दावं :**

**भूमिका :**

या कथेतील नायक श्रीधर हा बेकार असतो. नोकरी सुटली तर दुसरी नोकरी शोधण्यासाठी तो हवी तेवढी मेहनत घेताना दिसत नाही. संसाराची, मुलांच्या भवितव्याची त्याला चिंता वाटताना दिसत नाही. त्याचे पत्नीबरोबरचे भावनात्मक नाते संपुष्टात आले होतेच, पण मुलांकडेही तो दुर्लक्ष करतो. पत्नीने संसाराचे सर्व निर्णय घेतले होते म्हणून तो संसार वाढविण्यासाठी, ब्लॉक घेण्यासाठी मुलांच्या शिक्षणासाठी काहीही मदत करीत नाही. सर्व जबाबदाऱ्या पत्नीवर टाकून तो अलिप्त होतो. त्यामुळे त्यांच्या संबंधातील उत्कटपणा, गोडवा, स्नेह संपतो. फक्त नवरा–बायकोविषयीची कर्तव्ये शिल्लक राहतात. (पृ.११,१२,१३) जबाबदाऱ्या टाळण्याची सवय, ऐतखाऊपणा या दुर्गुणांमुळेच श्रीधरचे त्याच्या पत्नीबरोबरचे नातेसंबंध दुरावलेले दिसून येतात.

**कापुरुष :**

या कथेतील नायकाची पत्नी निपुत्रिक असते. ती समाजसेवेची कामे करत असते. नायकाला आपल्या पत्नीने नोकरी करावी, चांगले कपडे घालावेत, खादीचे कपडे, शबनम वापरणे बंद करावे, संसारासाठी वेळ द्यावा असे वाटत असते. पण सुनीला या गोष्टींसाठी तयार नसते. त्यामुळे त्यांच्या विचारात तफावत निर्माण होते. तरीही हा नायक पत्नीची काळजी घेताना दिसतो. सुनीला समाजसेवा करून रात्री उशिरा घरी येते. उपाशी झोपते तेव्हा तो पत्नीला तिच्या थकण्याविषयी विचारतो. समाजसेवा सोडून देण्याविषयी सांगतो पण पत्नी तयार होत नाही. (पृ.२६,२९) नायकाला हवा असलेला सहवास, शरीरसुखही ती नाकारते. त्यामुळे त्यांच्या संबंधातील ताणतणाव अधिकच वाढल्याचे दिसून येतात.

शेवटी एक दिवस हा नायक दारूचा ग्लास तिच्या अंगावर भिरकावतो. या क्रियेने ती अधिकच संतापते आणि नायकाला सोडून जाण्याचा विचार करते. नायक क्षमायाचना करतो, तिला घर सोडून न जाण्याची विनंती करतो पण ती ऐकायला तयार नसते. (पृ.३४) त्यांचा घटस्फोट होतो तरीही नायक तिला प्रेम असल्याचे सांगतो. कोणतीही मदत करण्यासाठी तयार असल्याचे सांगतो, पण सुनिला मात्र त्याचा तिरस्कारच करते. कारण तिच्या आयुष्यात नंबुद्रिपाद नावाची व्यक्ती आलेला असते. (पृ.४०,४१) या नायकाचे त्याच्या पत्नीवर अतोनात प्रेम असते. तिच्या सर्व गुणदोषांसकट तो तिला स्विकारतो. पण ती तिच्या मर्जीप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करते त्यामुळे त्यांचे नातेसंबंध पूर्णपणे बिघडतात.

**वाल्या कोळी व बायको :**

या कथेतील नायक गरीब असतो. लग्न झाल्यानंतर त्याची बायको त्याचा गरिबीवरून सतत अपमान करू लागते. तेव्हा बायकोच्या इच्छाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी, श्रीमंत होण्यासाठी तो भ्रष्टाचार करून खूप पैसा मिळवितो. फर्निचर, गाडी, कपाट, फ्रीज, फोन, टी. व्ही., साड्या, दागदागिने, भांडीकुंडी, इ. सर्व उंची वस्तू घरात आणतो. पत्नी जेव्हा त्याला विरोध करू लागते तेव्हा तो अपमानाचा प्रतिशोध घेतल्याप्रमाणे तो म्हणतो मला गरिबीवर, दारिद्र्यावर, यातनांवर, अपमानावर, अवहेलनेवर सूड उगवायचा आहे. सर्व वस्तू घरात आल्यावर तो पत्नीला म्हणतो,

‘मिळालं ना तुला हवं होतं ते?’ त्याच्या या उपरोधपर वाक्यावरून लक्षात येते की, त्याने हे सर्व पत्नीवरील प्रेमापोटी केलेले नसून अपमानाचा प्रतिशोध घेण्यासाठी मिळविलेले असते. हे सर्व वैभव मिळविण्यासाठी तो दिवस–रात्र बाहेर राहतो. बेफिकीर वृत्तीने धन मिळवितो. मात्र पत्नीशी प्रेमाचे दोन शब्द, तिला हवा असणारा सहवास तो देऊ शकत नाही. (पृ.४२,४४,४५,४८)

लग्नाच्या पहिल्या रात्री पत्नीने केलेला अपमान तो श्रीमंत झाल्यावरही विसरू शकत नाही. त्याच्या पत्नीने त्याच्या दु:खात, काळजीत, गरिबीत सहभाग घेतला नव्हता ते त्याला खूप अपमानकारक वाटते. श्रीमंतीच्या नशेबरोबरच त्याला दारूचेही व्यसन जडते. ही दोन व्यसने त्याला पूर्णपणे उद्ध्वस्त करतात. (पृ.५२,५३) पत्नीला सुखी ठेवण्यासाठी, तिचे प्रेम मिळविण्यासाठी तो खालच्या थराला जातो. पण तो आपले पत्नीबरोबरचे वैवाहिक नातेसंबंध, प्रेम, जिव्हाळा जोपासण्यात, वाढविण्यात अयशस्वी ठरतो.

**दावं :**

या कथेतील नायक आणि नायिकेचे एकमेकांना पसंत करून ठरवून लग्न झाले होते. परंतु सामान्य गरीब परिस्थितीमुळे त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. जीवनावश्यक गरजाही त्यांना भागविताना तडजोड करावी लागते, संघर्ष करावा लागतो. याचे परिणाम म्हणून दोघांमध्ये भांडणे, रूसवे–फुगवे, अबोला, वादविवाद, उपाशी राहणे, स्वयंपाक फेकून देणे याचे रूपांतर पुढे एकमेकांचा सहवास टाळणे, एकमेकांचा तिरस्कार करणे, एकमेकांना शिवीगाळ करणे अशा गोष्टीत होतो. (पृ.५६,५७)

दोघांचे मतभेद तीव्र झाल्यामुळे त्यांचे संबंध प्रेमाचे रहात नाहीत. एकही दिवस त्यांचा सुखाचा उगवताना दिसत नाही. आपल्या पत्नीवर मी या खोलीचा मालक असल्याचा रूबाब दाखविताना दिसतो. खोली त्याच्या नावावर असल्याने तो पत्नीला घराबाहेर पडण्यासाठी सांगतो. पत्नीला दिवस गेल्यावर तिला डॉक्टरकडे नेणे, तिची काळजी घेणे, औषधोपचार करणे इ. गोष्टी हा नायक करताना दिसत नाही. पत्नीची जबाबदारी, तिला हवं नको ते पाहणे अर्थात त्याने केले पाहिजे होते, परंतु तो बेफिकीरीनेच वागतो. पत्नीने गरोदर असल्याची आनंदाची बातमी सांगितल्यावरही तो काहीही प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसत नाही. (पृ.६६,६७) या

कथेतील नायकाचे पत्नीबरोबरचे संबंध स्नेहाचे, प्रेमाचे नसून अधिकाराचे, तडजोडीचे दिसून येतात. तो पत्नीकडे फक्त गरजेची, उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहताना दिसतो.

**भिमाशंकर चाळीतील जोशीकाकू :**

या कथेतील मि. रानडे नोकरी करणारी बायको पसंत करून तिच्याशी लग्न करतात. दोघेही नोकरी करतात. दर रविवारी ते सिनेमाला जातात. मुलांना घेऊन बागेत फिरायला जातात. मुलांनी चांगले मार्क्स मिळवून इंजिनिअरींग करावे म्हणून ते मुलांना क्लासला पाठवितात. सुंदर आणि आनंदी सहजीवन मि. रानडे आणि मिसेस रानडे जगताना दिसतात. (पृ.९३) या सर्व गोष्टी करण्यासाठी पैसा लागतो आणि यांच्याकडे तो पुरेपूर असल्याने त्यांचे सहजीवन, नातेसंबंध चांगले राहिल्याचे दिसून येते. पुरुषाचे कुटुंबातील नातेसंबंध चांगले राहण्यासाठी पैसा हे महत्त्वाचे माध्यम असल्याचे मराठे नमूद करताना दिसतात.

भिमाशंकर चाळीतील मि. जोशीबुवा यांची आर्थिक परिस्थिती नाजूक असते. त्यामुळे दैनंदिन कामे करताना त्यांच्या पत्नीला खूपच तडजोड करावी लागते. त्यामुळे त्या चीडचीड करतात. जोशीबुवांवर रागवतात. (पृ.९४) कौटुंबिक सुखसोयी पत्नीला देऊ न शकल्याने, तिला समजून न घेतल्याने त्यांचे पत्नीबरोबरचे संबंध बिघडतात.

छोट्याशा घरात दोन मुलींसमवेत एकत्र राहतात. त्यामुळे त्यांना शारीरिक सुख उपभोगताना अडचणी येतात. याचा परिणाम म्हणून जोशीबुवा पत्नीला चिमटा काढतात. तिच्यावर राग व्यक्त करतात तरीसुद्धा पत्नीकडून कोणत्याही प्रकारची सकारात्मक प्रतिक्रिया न मिळाल्याने ते पत्नीवर नाराज होतात. पत्नीच्या छोट्या छोट्या चूका शोधून तिचा अपमान करतात. तिच्यावर ओरडतात. (पृ.९५,९६) एकमेकांना वेळ न देणे, परिस्थितीमुळे काही इच्छा–आकांक्षा अपूर्ण राहणे या गोष्टींमुळेही त्यांचे नातेसंबंध दुरावताना दिसतात.

**देऊळ :**

गंगाधर आणि गोदावरी लग्न होऊन दत्ताच्या देवळात येतात. सुरूवातीला दोघांचा संसार चांगला चाललेला असतो. जेव्हा गोदावरीला मूल होणार असते तेव्हा अचानक गंगाधर विरक्ती घेऊन स्वामींच्या मठात रहायला जातो. नंतर तो तीर्थयात्रेला निघून जातो. चार वर्षानंतर गंगाधर

उत्सवासाठी गावात येतो. दत्तूबरोबर गोदावरीला भेटण्याचे निमंत्रण पाठवितो. तिच्याशी शरीरसंबंध ठेवतो आणि नंतर चूक झाली म्हणून पश्चात्ताप करून स्वामींची क्षमा मागताना दिसतो. पंरतु दरवर्षी हे चक्र असेच चालू राहते. (पृ.१२१,१२२,१२३,१२४,१२५) गंगाधरला पत्नीविषयी ओढ, प्रेम दिसून येते पण मठात या गोष्टी वर्ज्य म्हणून तो पत्नीला सर्वांसमोर टाळतो. मात्र एकांतात बोलावून घेतो आणि तिच्याशी शरीरसंबंध ठेवतो. स्वत:च्या भोगी, स्वार्थी वृत्तीमुळेच तो पत्नीला आपल्याला जेव्हा पाहिजे तेव्हा उपभोगतो आणि सोडून देतो. तिची व तिच्या मुलीची जबाबदारी घेण्याचे टाळतो. पतीपत्नीच्या नातेसंबंधांना तो आपल्याच मर्जीप्रमाणे वागविताना दिसतो.

**विहीर** :

या कथेतील वासू बापाशी भांडण करून मुंबईला पळून जातो. तो घरच्यांशी वर्षभर काहीही संबंध ठेवत नाही. पण गणपतीला मोदक पाठविण्याच्या निमित्ताने त्याचे घरच्यांशी परत संबंध पूर्ववत होऊ लागतात. तो नोकरीला असल्याने आईवडील, भाऊ त्याने मुंबईवरून पैसे पाठवावेत अशा अपेक्षेचे पत्र पाठवितात. पण हा नायक उत्तर पाठविताना : मरा, उत्तरक्रिया इकडेच करतो. असे लिहितो. (पृ.१६१,१६२) या उत्तरावरून वासूचे आणि त्याच्या कुटुंबाचे नातेसंबंध जिव्हाळ्याचे, प्रेमाचे नसल्याचे स्पष्ट होते.

वासूच्या वडिलांचे निधन झाल्यानंतर त्याची आई त्याला मुंबईला येण्याचा हट्ट करते. मात्र वासू आईला मुंबईला येण्यास साफ नकार देतो. त्यावरून त्याची आणि आईची पैशासाठी वादावादी होते. तरीही आई मुंबईला जाण्याचा आग्रह धरते. तेव्हा वासू आईच्या दंडाला धरून फरफटत नेतो आणि पडवीत ढकलून देतो. त्याच वेळी वासू परत कुटुंबाशी संबंध न ठेवण्याचा निश्चय करून मुंबईला परत निघतो. (पृ.१७२,१८३,१८४) त्याचे आईविषयी प्रेम जागृत असल्याने तो पहिल्या पगारातील पंधरा रूपये मनीऑर्डर करतो परंतु आई ते परत पाठविते आणि विष पाठवून दे असा निरोप उत्तरादाखल देते. तरीही तो आईसाठी दरमहिन्याला पंधरा रूपये साठवून आईसाठी बेदाणे, पेपरमिंट जे तिने कधी खाल्ले नाही असे बरेच पदार्थ त्याला न्यायचे होते परंतु त्याला ते देण्याआधीच आईच्या मृत्यूची बातमी समजते. (पृ.१८५) या सर्व घटनांचा

विचार करता वासूचे त्याच्या कुटुंबावर मनापासून प्रेम दिसते परंतु पैशाअभावी त्याला ते पूर्ण करता येत नाही. आर्थिक परिस्थिती कौटुंबिक नातेसंबंध चांगले वाईट ठेवण्यात मोलाची भूमिका पार पाडत असल्याचे चित्र ह. मो. मराठे नमूद करताना दिसतात.

या कथेतील दुसरे पुरुषपात्र दामू आणि त्याचा भाऊ वासू, आई यांच्याशी नातेसंबंध चांगले नसल्याचे काही उदाहरणांवरून लक्षात येते. जेव्हा वासू आणि दामू यांचे वडील मरतात तेव्हा मृत्यूच्या पार्श्वभूमीवर दोघे भेटतात. पण एकमेकांशी सहा वर्षांनंतरही काही बोलताना दिसत नाहीत. वडिलांचे श्राद्ध करण्यासाठी येणारा खर्च कोणी करायचा यांवरही त्यांच्यात मतभेद होतात, तर आईच्या खाण्यावरून दामू आईला ओरडताना दिसतो, ‘म्हाताऱ्ये, तुझं बडबडणं आता बंद कर. तुझं आपलं सदाचं एकच तुणतुणं – हे खायचं अन् ते खायचं. सदाची खा–खा सुटलेली. कधी कधी तृप्ती नाही रांडेचीची.’ (पृ.१६७) आईची अशा शब्दांत केलेली मानहानी दोघांचे तिरस्काराचे संबंध सूचित करतात.

दामूच्या बायकोला आपल्या आईने सासूरवास केला म्हणून त्याचा आईवर राग दिसतो. तो आईवर बायकोला त्रास दिल्याने, तिला विहिरीत ढकलायचा आरोप लावतो. त्यांच्यात भांडणे होतात तेव्हा खरोखरच दामू आपल्या आईवर वरवंटा उगारतो. (पृ.१७६) कौटुंबिक कलह आई आणि बायकोमधील विसंवाद या कारणांमुळे दामूला पत्नीशी आणि पर्यायाने आईशी चांगले नातेसंबंध प्रस्थापित करण्यास अडचणी निर्माण होताना दिसतात.

**६. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**गोकुळ :**

मि. वासुदेव गजानन केळकर आणि त्यांची पत्नी यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यावरून वाद होतात तेव्हा ते दोघही एकमेकांना अपमान होईल, मनाला लागेल असे अपशब्द वापरतात. आईवडिलांची बाजू घेताना दोन्ही मुलांमध्येही वाद होऊ लागतो. या भांडणातूनच घर बळकाविण्यावरून भावाभावांची भांडणे पराकोटीला जातात. या भांडणांचे रूपांतर एकमेकांवर खोटे आरोप प्रत्यारोप करण्यात होते. शेवटी भांडणांचे पर्यवसन धाकट्याच्या बायकोने अंगावर रॉकेल ओतून घेण्यात होते. पण या सर्व प्रकारांचा धाकटा गैरफायदा घेऊन धाकटा थोरला भाऊ

आणि वहिनी यांना पोलिस कंप्लेंट करण्याची भाषा करतो. धाकट्यावर भलते सलते आरोप करून पत्नीला मानसिक त्रास दिला हे कारण पुढे करून पोलिस कंप्लेंट करण्याची भाषा करतो. (पृ.८१,८३,८४,९३) तीन एकत्र नांदणारी जोडपी कलहामुळे आणि जबाबदाऱ्या टाळण्याच्या वृत्तीमुळे एकमेकांपासून दुरावतात. त्यांच्यात दुराग्रह निर्माण होतो. आणि त्यांचे सर्वांचेच नातेसंबंध बिघडताना दिसतात.

**पत्ता :**

नंदाताईचा मुलगा डॉक्टर सर्जन असतो. तो आपल्या कामात खूप व्यस्त असतो. त्यामुळे त्याला आईवडिलांसाठी, भावासाठी वेळ देता येत नाही. तो आईवडिलांच्यापासून लांब रहात असल्याने वडील आजारी असतानाही तो कधीमधीच येतो. वडील निधन पावले तेव्हासुद्धा तो एका ऑपरेशनमध्ये गुंतल्याने अकरा वाजता निधन होऊनही संध्याकाळी पाच वाजता पोहोचतो. (पृ.१०४) या मुलाचे आईवडिलांशी नातेसंबंध प्रेमाचे दिसून येत नाहीत. काही अंशी त्याचा व्यवसाय या गोष्टीस कारणीभूत असल्याचे प्रत्ययास येते. परंतु दूर रहात असला तरी तो गावातल्या गावातच रहात असतो. त्याच्याकडे दोन दोन गाड्या असल्याचाही उल्लेख पुढे येतो. तरीही तो बायको–मुलांसमवेत कधीतरीच येतो. आणि आला तरी आईशी संवाद न साधताच तो टीव्हीवरचे कार्यक्रम पाहत बसतो. (पृ.१०८,१०९) या सर्व गोष्टींवरून त्यांच्या नातेसंबंधातील दुरावा स्पष्ट होण्यास मदत होते.

**तो एक क्षण :**

माधवच्या फडकेच्या पत्नीने एका म्हाताऱ्याचा खून होताना पाहिलेला असतो आणि पोलिसांना निनावी पत्र पाठवून खूनाची माहिती दिलेली असते. पण पोलिस शोधत येतील आणि आपले नाव समोर येईल या भितीने ती चिंताग्रस्त असते. तिला एकदम रडू फुटते तेव्हा माधव तिच्या पाठीवर थोपटीत तिला शांत होण्यास, रडणे थांबविण्यास सांगतो. तिला धीर देतो. तिच्या चांगुलपणाचा, तिच्या चांगल्या नैतिकतेचा तो आदर करताना दिसतो. पोलिस शोध घेत तिच्या घरी फोन करतात तेव्हाही ती खूप घाबरलेली असते, त्याहीवेळी माधव पत्नीला घट्ट कवटाळतो. तिचे डोके थोपटतो. तिला धीर देतो. तिला शांत करतो. (पृ.१४९,१५४,१७१) पत्नीची चांगली

नैतिकता, चांगुलपणा, दुसऱ्यांना दु:खात मदत करण्याची सवय, पोलिसांना खूनाची बातमी देणे या सर्व गोष्टींमुळे नवरा व मुलांनाही या चक्रात त्रास होणार असतो. परंतु पत्नीच्या त्यामागच्या भावना शुद्ध असल्यामुळ नवरा त्या प्रसंगात तिला मदत करताना दिसतो. येथे खऱ्या अर्थाने या नवराबायकोचे नातेसंबंध घट्ट असल्याचे दिसून येते.

**अयोध्या :**

सुहास आणि सुमन साठे हे दोघे पती–पत्नी एकमेकांना विचारात घेऊन संसारातील निर्णय घेताना दिसतात. मुलाचे नाव ठेवण्यापासून ते मुलाला कोणत्या शाळेत घालायचे, कोणत्या माध्यमातून शिक्षण द्यायचे इ. सर्व निर्णय ते संगनमताने घेताना दिसतात. मुलाची आजारी असताना ते दोघेजण मिळून काळजी घेतात. (पृ.१७२,१७३) संसाररथ दोन चाकांवर चालतो याची पुरेपूर जाणीव या दांपत्यांत दिसून येते. त्यामुळे त्यांचे एकमेकांशी चांगले नातेसंबंध दिसून येतात. शिवाय सुहास आपल्या पत्नीला सर्व निर्णयांत सामावून घेताना दिसतो. तिला पत्नीचा दर्जा देताना दिसतो. त्यामुळेच त्याचे पत्नीबरोबर संबंध विश्वासाचे, आदराचे, प्रेमाचे दिसून येतात.

मुलगा मोठा झाल्यावर चांगल्या मार्कांनी पास होऊन शाळेचे आणि आईवडिलांचे नाव उज्ज्वल करतो. त्यामुळे सुहास आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी सर्वप्रकारचा खर्च करण्याची तयारी दाखवितो. मुलावरील प्रेमापोटी ते म्हातारपणासाठी पैसे न साठविता सर्व पैसा मुलाच्या शिक्षणासाठी खर्च करताना दिसतात. कारण त्यांना त्यांचा मुलगाच म्हातारपणाचा आधार वाटतो. सुहास त्याची सर्व प्रकारची हौस, मौज, चैन पुरवितो. लग्नासाठी मुलगीही स्वत:च निवडण्याचे स्वातंत्र्य त्याला दिलेले असते. (पृ.१७८,१७९) सुहासचे आपल्या मुलावर अतोनात प्रेम दिसून येते. कुठलाही मागचापुढचा विचार न करता मुलावर ते सर्वस्व अर्पण करतात. यावरून त्यांचे आणि मुलाचे अतुट नातेसंबंध स्पष्ट होतात.

**कुपुत्र :**

श्री आपल्या आजीचा खून करून शिक्षा भोगून घरी परत येतो. तेव्हा तो तारूण्यात असतो. त्याला भिन्नलिंगी आर्कषण वाटू लागल्याने आणि त्याला तशी संधी मिळाल्याने तो

मोलकरणीवर हात टाकतो आणि पकडला जाऊन बाजूच्या माणसांचा मार खातो. आईवडिलांना, भावांना मान खाली घालणे भाग पडते. संतापाने थरथरतच श्रीपादराव म्हणजेच श्रीचे वडील त्याला मारतात. रागाने धुमसत असतानाच त्यांचे श्री विषयी काही उद्‌गार बाहेर पडतात त्यावरून त्यांची श्री ची त्यांच्या मनातील प्रतिमा स्पष्ट होते.

"त्याचवेळी कोर्टानं याला फाशी सुनावली असती तर सुटलो असतो. इतकं लाजिरवाणं केलं यानं आपलं आयुष्य." (पृ.३९०) असा विचार वडील करतात. सर्व मनस्ताप जेव्हा त्यांना अनावर होतो तेव्हा ते श्री ला घराबाहेर हाकलण्याच्या प्रयत्नात दिसतात. लोकांच्या पोरीबाळींना भिती वाटू नये, लोकांनी त्यांच्याकडे संशयाने पाहू नये आणि आपल्याला याच घरात रहायला मिळावे म्हणून ते श्री ला घरातून बाहेर काढण्याचा शेवटचा पर्याय स्विकारताना दिसतात. (पृ.३५३,३८०,३८९,३९०,३९७) श्री हा श्रीपादरावांचा मुलगा असला तरी तो खुनी असतो. शिक्षा भोगून आल्यानंतरही तो मोलकरणीवर बलात्काराचा प्रयत्न करतो. या दोन घटनांनी श्रीपादरावांची आणि त्यांच्या कुटुंबाची बेअब्रू होते, मानहानी होते. त्यामुळेही श्रीपादरावांना श्री विषयी घृणा, तिरस्कार वाटतो. तो त्यांच्या वागण्या–बोलण्यातून वेळोवेळी दिसून येतो. मुलाचे आणि वडिलांचे नातेसंबंध दुश्मनीचे, तिरस्काराचे, घृणा निर्माण करणारे असल्याचे दिसून येतात.

**७. घोडा :**

**मशीन** :

खाशाबा ज्या कंपनीत काम करत असतो त्या कंपनीत अमेरिकेहून एक नवीन मशीन मागविलेले असते. मशीनची पूजा झाल्यावर सर्व कामगारांना पेढे वाटण्यात येतात. खाशाबाला मिळालेले दोन पेढे घेऊन तो घरी येतो. कंपनीत मशीनचे झालेले उद्‌घाटन, साहेबांचे भाषण सर्वकाही तो पत्नीला सांगतो. दुसऱ्या वेळी जेव्हा मशीन आणले जाते तेव्हाही मिळालेले पेढे तो घरी आणतो. सर्व माहिती पत्नीला देतो. (पृ.३७,४२) नवीन मशीन आल्यामुळे कंपनी खाशाबाला काढून टाकते तेव्हाही तो आपले खाते बंद होण्याची पहिली बातमी पत्नीला देतो. (पृ.४५) खाशाबाचे आणि पत्नीचे नातेसंबंध चांगले आणि आदराचे दिसून येतात. खाशाबा जसे

पत्नीला आनंदात सामावून घेतो तसेच तो दु:खातही पत्नीला सहभागी करून घेतो. त्यांचे पती पत्नीचे नाते पारदर्शक असल्याचे चित्र समोर येते.

**सापळा :**

रणदिवेसाहेबांच्या समोर देवकुळेचा खून होतो त्यामुळे ते खूप तणावाखाली असतात. तेव्हा त्यांच्या पत्नीला त्यांची काळजी वाटू लागते. ती त्यांची विचारपूस करते. त्यांचे मन दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न करते. तरीही तो पत्नीसोबत तणावाची, विचारांची देवाणघेवाण करताना दिसत नाहीत. मुले बागेत फिरायला जाण्याविषयी विचारतात तेव्हाही ते त्यांना काही उत्तर देताना दिसत नाहीत. (पृ.८६,९१,९२) कामाचा ताण, डोळ्यांसमोर होणारे खून यामुळे रणदिवेसाहेबांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य हरविते. त्यामुळे त्यांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होताना दिसते. कौटुंबिक नातेसंबंध जपण्यात त्यांना अडचणी येतात.

**न्यूज स्टोरी :**

संपादक गाडगीळ यांची नाईट शिफ्ट चालू असते. गाडगीळांच्या वडिलांना हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केलेले असते. त्यांना सोबत म्हणून गाडगीळ पत्नीची वाट पाहत बसलेले असतात. वडिलांची काळजी घेण्यासाठी पत्नीने वेळेवर हजर रहावे अशी त्यांची अपेक्षा असते, परंतु पत्नीच्या अडचणी समजून न घेता तिच्यावर चिडतात. (पृ.२३९,२४०) एकीकडे गाडगीळ वडिलांची काळजी करताना दिसतात मात्र पत्नीवर सतत चिडतात. तिच्याही काही समस्या असू शकतात हे माहीत असूनही पत्नीवर चिडतात. दोन्ही घटनांतील साम्य पाहता असे दिसून येते की गाडगीळांचे त्यांच्या वडिलांबरोबराचे, पत्नीबरोबरचे नातेसंबंध, त्यांच्या कामाच्या व्यस्ततेनुसार आर्थिक चढउतारानुसार बदलताना दिसतात.

**८. वीज :**

**वीज :**

मिसेस शांता साठे घरादाराकडे दुर्लक्ष करून समाजसेवेचे काम अंगिकारते तेव्हा नवरा तिला सारखे अपमानास्पद बोलतो. घराकडे दुर्लक्ष होते, घरातील घाण, कचरा साफ करावा म्हणून तो बोलतो. पत्नीला संसारात रस न उरल्याने ती त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करते.

(पृ.७) शांता साठे यांच्या संघटनेची सर्वेसर्वा असलेली आशा शांताला संघटना सोडून जाण्यास सांगते तेव्हा नवरा तिला अपशब्द वापरतो. तिला तिची जाणीव करून देतो. घरसंसाराकडे तुच्छतेने बघणाऱ्या शांताकडे नवरा तुच्छतेने पाहू लागतो. पत्नीची समाजसेवा, दुसऱ्यांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे घराकडे होणारे दुर्लक्ष या गोष्टींमुळे त्यांचे संबंध बिघडलेले दिसतात.

**दृश्य तेच आहे :**

या कथेतील पहिले पुरुषपात्र म्हणजे सासरे त्यांना पॅरॅलिसीसचा अटॅक येतो. त्यामुळे त्यांचे संपूर्ण जीवन दुसऱ्यांवर म्हणजेच पत्नीवर आणि सुनेवर अवलंबून असते. त्या दोघी त्यांची पूर्ण सेवा करतात, परंतु ते चिडचिड करतात. सून सासू सासऱ्यांना सोबत रहायला घेऊन येते. कारण खोली सासऱ्याच्या नावावर असते आणि तिला आधारासाठी, राहण्यासाठी खोली आणि सासू–सासऱ्यांची गरज असते. परंतु सुनेचे सासऱ्याकडे जरासे जरी दुर्लक्ष झाले तरी ते सुनेवर रागावतात. (पृ.२९,३०) खोली आपल्या नावावर आहे ही जमेची बाजू असल्यामुळे दुसऱ्यांवर अवलंबून असलेले सासरे सुनेशी आणि पत्नीशी प्रेमाने संवाद साधताना दिसत नाहीत उलट त्यांचे ते कर्तव्यच आहे अशी भावना त्यांची झालेली दिसून येते.

या कथेतील दुसरे पुरुषपात्र म्हणजे धाकटा मुलगा. त्याला बायको आणि दोन मुली असतानाही तो एका बाईला घरात आणून ठेवतो. तिच्याबरोबर प्रेमाने राहतो आणि पत्नीला मारहाण करतो. घराबाहेर ढकलतो. सर्व घराची आणि पोरींची जबाबदारी पत्नीवर टाकून तो ठेवलेल्या बाईबरोबर आनंद लुटताना दिसतो. (पृ.३०,३१) पत्नी या गोष्टीला विरोध करते तेव्हा तो तिला थपडा लगावतो, लाथा मारतो, दोरीने तिच्या अंगावर फटके मारतो. (पृ.३२) धाकट्या मुलाचे पत्नीबरोबर असलेले संबंध प्रेमाचे नव्हते त्यामुळेच तो परस्त्रीकडे आकर्षित होऊन बायकोला त्रास देतो आणि पर्यायाने आपली कौटुंबिक नाती जपण्यात अयशस्वी होतो.

**कुंती :**

दामले पत्नी निधनानंतर दुसरी बायको करतात पण ती आजाराने त्रस्तच असते. आपल्या दुसऱ्या बायकोला अगोदरच आजार होता आणि आपल्याल फसवून लग्न केले, तिच्यात दोष होता म्हणूनच आपल्यासारख्या बीजवराला दिली गेली असा ग्रह मनात धरून ते पत्नीला

डॉक्टरकडे नेत नाहीत. तिची काळजी करत नाहीत. (पृ.१०३,१०४) बायकोचे आजारपण सहन न झाल्यामुळे ते तिच्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांचे पत्नीबरोबरचे नातेसंबंध चांगले असलेले दिसून येत नाहीत.

**पूर्णचंद्र :**

या कथेतील पुरुषपात्र असलेले झकास रामभाऊ हे आर्थिक परिस्थितीने त्रस्त असतात त्यामुळे त्यांना त्यांच्य बऱ्याच आशाआकांक्षा, मन मारून जगावे लागते. त्यांना खारे शेंगदाणे आवडतात परंतु त्यांची बायको त्यांना खारे शेंगदाणे बनवून देत नाही, उलट त्यांच्या या इच्छेवर टोमणे मारते. ती त्यांना खारे शेंगदाणे बाहेरच खाण्याची आणि शेंगदाणे खाल्ल्यावर तोंड धुऊन येण्यास सांगते. एखादी शिक्षा भोगत असल्याप्रमाणे ते शेंगदाणे खाल्ल्यावर नळावर जाऊन चूळ भरून मगच घरी जातात. (पृ.११२,११३) झकास रामभाऊ कधी बाहेर गेले तर त्यांची पत्नी वाट पाहत नाही. एकदा पावसात चिंब भिजून ते घरी आले तर पत्नीने त्यांची विचारपूस न करता पावसात भिजत येण्याचे कारण विचारते. इथे तुमची कोणी वाट पाहत नव्हते; थंडीतापाने आजारी पडला तर कोण निस्तरणार म्हणून त्यांना टोमणे मारते. पत्नी त्यांच्या सुखदु:खात कधीच सामील होताना दिसत नाही. रामभाऊंनी एक स्वप्न पाहिले होते, जेवण झाल्यानंतर पत्नीने हसतमुखाने विडा आणि रात्री दुधाचा ग्लास द्यावा. पण त्यांचं हेही स्वप्न पूर्ण होत नाही. (पृ.१२२,१२३,१२४) गरिबी आणि न जुळलेली मने या दोन कारणांनी झकास रामभाऊंचे पत्नीबरोबर प्रेमाचे संबंध दिसत नाहीत.

**खुर्ची :**

सदानंदनच्या वडिलांचे जेव्हा नवीन लग्न झाले होते तेव्हा त्यांनी व्यवसायासाठी कर्ज काढले होते, ते फेडता न आल्याने ते आणखीणच कर्जबाजारी होतात. त्यामुळे देणेकरी त्यांच्या घरी येऊ लागतात. तेव्हा बायको त्यांना जाब विचारते. देणेकरी त्यांना दम देऊन पैसे द्या नाहीतर दुकानाच्या किल्ल्या द्या असे म्हणून त्यांचे सर्वस्व असलेले दुकानही त्यांच्या हातून ओरबाडून घेतात. नंतर ते कपाट, दागिने, भांडी, टी.व्ही. सर्वकाही विकतात, तेव्हा बायको त्यांना तुमच्याबरोबर लग्न करून सत्यानाश झाला अशी दुशने देते, तेव्हा ते स्वत:ला आक्रसून घेत

घरातच खुर्चीत बसतात. ते अंधारातच बसू लागतात. असेच एकदा ते मुलाला आतल्या खोलीतला दिवा मालवायला सांगतात तेव्हा मुलगा त्यांच्या अंगावर ओरडतो. छोट्या छोट्या गोष्टींवरून त्यांची मुलगी, मुलगा, बायको त्यांचा अपमान करतात. (पृ.१४९,१५०,१५१,१५२) या कथानायकाच्या नाकर्तेपणामुळे, अपयशामुळे त्याला त्याच्या कुटुंबात प्रेम, आदर भेटत नाही. उलट अपमान, तिरस्कार पदोपदी त्यांच्या वाट्याला आलेला दिसतो. स्वत:च्या जबाबदाऱ्या नीट सांभाळता न आल्यानेच त्यांचे त्यांच्या कुटुंबातील सर्वांशी नातेसंबंध बिघडलेले दिसतात.

ह. मो. मराठे यांनी कथासंग्रहातील पुरुषपात्रांच्या माध्यमातून त्यांचे आई, वडील, पत्नी, मुले, भाऊ यांच्याशी नातेसंबंध कसे आहेत त्यावर प्रकाश टाकलेला आहे. मोहन पंडित मोहिते, मि. रानडे, माधव फडके, सुहास साठे, खाशाबा इ. पुरुषपात्रे आपले वेगवेगळ्या प्रकारचे नातेसंबंध जपण्यात, ते वाढविण्यात यशस्वी झालेले दिसतात, तर भालेराव, अरूण, दिलीप, प्रोफेसर पिंपुटकर, मि. देशपांडे, श्रीधर, गंगाधर, वासू, दामू, श्री, श्रीपादराव, रणदिवे, दामले, रामभाऊ इ. पात्रे आपले कौटुंबिक नातेसंबंध जपण्यात ते रूजवण्यात अयशस्वी झालेले दिसतात. नातेसंबंध बरे–वाईट ठरण्यामागे पद, पैसा, प्रतिष्ठा, नोकरी, चारित्र्य, संस्कार असे बरेच घटक कारणीभूत असल्याचे ह. मो. मराठे यांच्या कथांमधील पुरुष पात्रांच्या द्वारा लक्षात येण्यास मदत होते.

पुरुषांचे कुटुंबातील नातेसंबंध प्रत्येक व्यक्तीनुसार, स्थल–कालानुसार, परिस्थितीनुसार चांगले–वाईट राहिल्याचे दिसून येते. घरातील पुरुष जर चांगला सुसंस्कारी, सेवाभावी, कर्तव्यदक्ष मुलगा, पती असेल तर त्याचे आईवडिलांशी पत्नीशी चांगले नातेसंबंध राहतात. तर भाऊ, वडील, जावई अशा विविध नात्यांमध्येही तो पुरुष किती यशस्वी होतो आणि समोरून त्याला किती प्रतिसाद मिळतो या सर्व गोष्टींवर त्याचे नातेसंबंध किती घनिष्ठ आहेत की वरवरचे आहेत ते ठरते. जर कुटुंबातील पुरुषांनी आणि इतर सदस्यांनी प्रेम, आदर, सहानुभूती, कर्तव्य, हक्क, जबाबदाऱ्या व्यवस्थीत पार पाडल्या तर नातेसंबंध घट्ट रूजतात नाहीतर त्यामध्ये अंतर पडायला लागते. पुरुषांचे कुटुंबातील नातेसंबंध चांगले राहण्यासाठी प्रेम, पैसा, पद, प्रतिष्ठ, नैतिकता इ. गोष्टी कमी–जास्त प्रमाणात कारणीभूत ठरतात हेच येथे प्रत्ययाला येते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीत कुटुंब या संकल्पनेतील फक्त नवरा आणि बायको यांचाच उल्लेख येतो. अतिशय कठीण परिस्थितीला सामोरे जात असतानाच तो नोकरीसाठी वणवण फिरत असतो. त्याला नोकरी मिळत नाही म्हणून तो पत्नीसाठी नोकरी शोधू लागतो. देसाईबाईंच्या शाळेतील शिक्षिकेची नोकरी गर्भवती स्त्रियांना देत नाहीत. म्हणून तो तिला नोकरीसाठी फसवून तिचा गर्भपात घडवून आणतो. या पार्श्वभूमीवर विचार केला तर बायको गर्भवती होईपर्यंत त्यांचे नातेसंबंध चांगले दिसतात. हा नायक बायकोची काळजी घेताना दिसतो. पण परिस्थितीने हतबल होऊन तो काही निर्णय घेतो आणि त्यांच्या नातेसंबंधांना वेगळे वळण लागताना दिसते. नायिका वसू ही जेव्हा गर्भवती असते तेव्हा दोघांनाही नोकरी नसते. त्यांच्या दैनंदिन गरजाही ते भागवू शकत नाहीत. पण वसू मात्र आपण आई होणार! आपल्या नवऱ्याला नोकरी आहे! या भ्रमातच असते. पण पत्नीला सत्य सांगण्यासाठी त्याला धीर होत नाही. आपण पत्नीला सुखी ठेवू शकणार नाही. उद्याचं अन्नही देऊ शकतो की, नाही याची भ्रांत असताना त्याच्य मनातील पत्नीविषयीचे प्रेम, सहानुभूती, कर्तव्य दिसून येते त्याच्या मनातील विचारांचे काहूर पत्नीविषयीचे विचार व्यक्त करतात,

‘‘पुढच्या क्षणी तो जागा झाला. अगदी धडपडून तो ऊठून बसला. अस्वस्थ, कासावीस झाला. कातर, प्रक्षुब्ध झाला.

त्यानं एकदा निद्रिस्त वसूवरून नजर फिरवली. मग खोलीत मांडलेल्या साऱ्या वस्तूंवरून.

काय संबंध आपला या साऱ्या वस्तूंशी?

काय संबंध आपला या वसूशी?

वसू येताना काय मागून आली होतीस, म्हणून मी तुला भेटलो?

मी तुला काही देणार नाही. तू दिलेलं मात्र सारं नष्ट करणार.

तू एक बीज गर्भात धारण केलं आहेस आणि त्याच्याभोवती स्वत:च्या अस्तित्वाचा कोश करून बसली आहेस.

तुला काही माहिती नाही, काही माहिती नाही. काय आहे आपले उद्याचं रूप तुला कस सांगू? उद्या संध्याकाळी तुला जेवायला अन्न नसेल. परवा सकाळी तुला रहायला आसराही नसेल. भाडं दिलं नाही तर ही बारकी बारकी भांडी आणि तुला गर्भारशीला उचलून मालक रस्त्यावर ठेवील. मग मी काय करू?

कुठं जाऊ?

कुणापुढं तोंड वेंगाडू –

कुणासमोर ओंजळी पसरू?

कुठून पैसे आणू?

पैसा

पैसा

पैसा

पैसा

पैसा

त्यांच डोकं भणभणलं. तिथं भला मोठा वणवा भडकून ऊठला. ऊर फूटून गुदमरण्याइतका तो व्याकुळ झाला. कित्येक दु:खांचे अजस्त्र लाटांचे प्रवाह त्याच्या हृदयाच्या भिंतीवर धडका देऊ लागले. नीच आहेस तू वसू.

तूच आहेस माझ्या दु:खाला कारण. एकटाच असताना मी किती सुखी होतो.'' (पृ.६६,६७)

पत्नीविषयीच्या प्रेमापोटीच तो तिच्याविषयी काळजी करतो. पण या सर्व गोष्टींना कारणीभूत आपली बायकोच आहे असेही तो मानतो. हा नायक आपली मन:स्थिती चांगली नसल्यामुळे पत्नीशीही नीट संवाद साधत नाही. आपल्या सर्व दु:खांचे मूळ आपली पत्नीच आहे असे त्याला वाटते. त्याच्या या विचारांमुळे त्याचे पत्नीबरोबरचे नातेसंबंध तितकेसे प्रेमाचे, विश्वासाचे असलेले दिसून येत नाहीत. ते जेव्हा भविष्याविषयीची स्वप्नं पहात असतात, तेव्हा मात्र हा नायक आपल्या दु:खाला पत्नीच जबाबदार आहे असे मानतो. खरेतर बायको गर्भवती असणे हे

फक्त बायकोच्या हाती नसूनही पुरुषप्रधान संस्कृतीच्या आपल्या विचारांनी तिलाच दोषी ठरवले होते. नंतर तो पत्नीला फसवून पपया खायला घालतो व गर्भपात घडवून आणतो. या घटनेच्या मागे पत्नी शिकलेली असूनही त्याने सांगितलेल्या सर्व गोष्टी मान्य करते. याचाच अर्थ असा होतो की, तिचा आपल्या नवऱ्यावर संपूर्ण विश्वास आहे. याचाच गैरफायदा त्याने घेतलेला दिसतो. येथे तो एक कुटुंबप्रमुख आणि नवरा म्हणूनही चुकीचाच वागलेला दिसून येतो. पत्नीबरोबरच्या चांगल्या नातेसंबंधाचा, विश्वासाचाच तो घात करतो. जसा तो पत्नीला न्याय देऊ शकला नाही तसाच तो गर्भातल्या बाळालाही न्याय देऊ शकला नाही असे वाटते. जर त्याला पत्नीविषयी, बाळाविषयी खरे प्रेम असते, तर तो असे निर्णय घेण्यापासून परावृत्त झाला असता. एकीकडे तो कुटुंबाच्या व स्वतःच्या चरितार्थासाठी काहीही करताना दिसतो, तर दुसरीकडे स्वतःच्याच कुटुंबाची अधोगती करताना दिसतो. या सर्व गोष्टींमागे परंपरेने चालत आलेले काही गुण–दोष दिसतात. कुटुंबाचे सर्व निर्णय पुरुषांनीच घ्यावेत व स्त्रियांनी त्याला साथ द्यावी ही पारंपरिक विचारसरणी, यांच्या नातेसंबंधात दिसून येते.

आपल्या पत्नीकडे कुणी वाकड्या नजरेने पाहू नये. तिच्यावर फक्त आपलाच अधिकार आहे. आणि तशी वेळ आलीच तर आपण प्रतिकार करू शकतो. पत्नीचा, घरातील स्त्रीचा सन्मान करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, याचेही भान त्यात दिसून येते. स्वत: पत्नीवर अधिकार दाखवितो पण दुसऱ्यांच्या अधिकाराचे बोलणेसुद्धा तो सहन करू शकत नाही. हे खालील निवेदनावरून दिसून येते.

“भडव्या, माझ्या बायकोला रांड म्हणून तुझ्याकडे पाठवू म्हणतोस?”

“मी तसं काही म्हणालो नाही. इतकंच म्हणालो, तुमच्या मिसेसचा मी इंटरव्ह्यू घेईन आणि पे फिक्स करीन.”

“भडव्या तुझ्या म्हणण्याचा अर्थ तसाच होतो.”

सेक्रेटरी देसाईबाईंच्या शेजारून एकदम ऊठून त्याच्यासमोर आला नि त्याच्या मानगुटीवर झडप घालून म्हणाला,

“भेंचोद, भडव्या कुणाला म्हणतोस?”

"तुला, भडव्या तुला. अरे शाळा चालवता की कुंटणखाने?"

"भेंचोद–इट इज नन ऑफ युवर बिसनेस. हव्या असतील चार कवड्या तर साल्या पाठवून दे बायकोला. असली बरी तर ठेवीन. नाही तर हाकलीन."

"थुत् तुझ्या नोकरीवर भडव्या." तो रागाने नुसता थरथरत राहिला. सेक्रेटरीचा हा अपेक्षाभंग होता. (पृ.७६,७७)

या कादंबरीतील नायक आपल्या उपजिविकेसाठी आपल्या गर्भवती बायकोचा उपयोग करून घेताना दिसतो. यावरून असे वाटते, नायकाला आपल्या पत्नीविषयी प्रेम, सहानुभूती कमी असून ते एक उपजिविकेचे साधनच वाटते. यावर शरणकुमार लिंबाळे नायकाच्या भूमिकेवर, नातेसंबंधावर भाष्य करताना म्हणतात,

"बायको गरोदर असल्यामुळे नायकाच्या संकटात भर पडली आहे. त्याला बायको वैरीण वाटू लागते. (पृ.६) तो म्हणतो, 'सज्जनहो ऐका, माझी पत्नी गर्भार आहेच. तेणेकरून ती गर्भिणी जाहली' (पृ.१४) 'अहो, माझ्यापाशी पैसा नाही. माझी धर्मपत्नी गर्भार आहे.' (पृ.२०) "शेटजी, प्लीज, कृपा करा. नाही म्हणू नका. शंभराऐवजी ऐंशी द्या. पाऊणशे द्या. फार गरज आहे हो. अन्नाला लावा. मी बेकार आहे. बायको गर्भार आहे." (पृ.४६) 'गर्भार बाईला ती हेड मास्तरीण नाही म्हणाली.' (पृ.८२) म्हणून नायक उद्‌विग्न होतो. त्याला बायकोच्या गर्भारपणाची चीड येते.

त्याचा प्रश्न विधायक मार्गाने सुटत नाही, तेव्हा तो विकृत मार्गाचा अवलंब करू लागतो. तो आपल्या बायकोचा गर्भपात करण्याचे ठरवतो. तो. म्हणतो, 'या देशात जगायचे, तर असल्या लहान–लहान क्रुरतेला डगमगून भागणार नाही.' (पृ.५८)..... 'माझी बायको गरोदर आहे'; हे पालुपद अनेक वेळा ऐकायला मिळते. जणू बायको गरोदर असणे, ही एक प्रचंड समस्या आहे."[५]

लिंबाळे यांनी नायकाच्या नातेसंबंधावर सूचक असा मोठा अभिप्राय दिला आहे. हा नायक जणू सत्यापासून, आपल्या कर्तव्यापासून दूरच जाताना दिसतो. आपले नवऱ्याचे कर्तव्य निभावताना, बायकोशी नाते जपताना तो उणा पडलेला दिसतो.

या कादंबरीतील नायकाच्या जीवनाविषयी भाष्य करताना डॉ. केशव मेश्राम म्हणतात,

"नव्याने लग्न केलेले तरूण जोडपे. तो आणि वसू जिद्दीने संसार उभा केलेला. तात्पुरती त्याची नोकरी. तीही संपते. वसू तर बाळंतिणीच्या तेजाने – गर्भप्रकाशाने उजळून स्वप्नात चूर...... त्याला आपल्या बेकारीचे सांगणेही अवघड होते. आपले पुरुषत्व, तिचे गर्भारपण, चुंबनअलिंगनातली ओढ, शिश्नाचे हुळहुळणे. सगळेच निरर्थक बनते. निरर्थक अस्तित्व. खिशातला पैसा संपायला आलेला. चहाचा कपही चैनीची वस्तू बनलेला. लाडे लाडे बोलणारी सुवर्णकांती वसू एकेक लचका तोडणारं भूत वाटायला लागते."[६]

या नायक आणि नायिकेतील नातेसंबंधातील आलेला दुरावा हा परिस्थितीने आलेला आहे हेच यातून डॉ. केशव मेश्राम यांना सूचित करावयाचे असलेले दिसते.

**२. काळेशार पाणी :**

भारतीय संस्कृतीने मान्य केलेली कुटुंबव्यवस्था या कादंबरीत अभिप्रेत असली, तरी या कुटुंबातील पुरुषाचा स्वतःच्या घराव्यतिरिक्त ठेवलेल्या बाईचा (भिकीचा) घरोबा असतो. तेही त्याचेच कुटुंब म्हणावे लागेल कारण त्याने भिकीबरोबर लग्न केलेले नसले, तरी भिकीपासून तो दहा मुलांना जन्म देतो. त्यामुळे वडील म्हणूनही त्या पुरुषाचीच जबाबदारी आहे. तेव्हा त्याच्या याच कुटुंबातील नातेसंबंधावर प्रकाश टाकणे येथे अभिप्रेत आहे. मुख्य पुरुषपात्र विष्णू गवस ऊर्फ विष्णू गावकर हा गावातील एक प्रतिष्ठित मानाचा मोठा गावकर असतो. विष्णूने या मुलांना जन्म दिला आहे म्हटल्यावर पालकाची आणि बापाची भूमिका त्याचीच असायला हवी, परंतु तो आपली जबाबदारी पार पाडताना दिसत नाही. आपल्या संस्कृतीत मुख्यतः पुरुषाने नोकरी, व्यवसाय करून कुटुंबासाठी अर्थार्जन करावे आणि घरातील स्त्रियांनी कुटुंबाची पालनपोषणाची जबाबदारी स्विकारावी असे सर्वमान्य आहे, परंतु विष्णू गावकरला भिकीचा फक्त उपभोग पाहिजे असतो, भिकीची जबाबदारी नको असते. तो एवढा प्रतिष्ठित नागरिक असूनही भिकीला कुटुंबाच्या चरितार्थासाठी भजी तळत बसावे लागते. स्वतःच्या आणि कुटुंबाच्या चरितार्थासाठी भजी तळत असतानाही भिकीवर विष्ण्या आपली हुकमत गाजवताना खालील निवेदनावरून दिसून येते.

"बाजाराहून परतणाऱ्या बायांची भज्यांसाठी गर्दी असेच. भिकी कामात असायची.

विष्ण्या भिकीला त्याच वेळी घरी चलायला सांगे.

ती म्हणे, "कामाची वेळ. या येळेक काय तुजां चाळावलां?"

पण विष्ण्या ऐकत नसे. भिकीला हाताला धरून ओढत तिच्या झोपडीत घेऊन जाई." (पृ.५)

मुलांचे संगोपन करणे, त्यांना काय हवे – नको ते पाहणे, मुलांना वडिलांच्या मायेने जीव लावणे असे कोणतेही सोपस्कार विष्णू करताना दिसत नाही. त्याला फक्त भिकीशी शरीरसंबंध ठेवण्यापुरतीच भिकी पाहिजे असते. तिची मुले, तिची जबाबदारी नको असते. उलट दोघांमध्ये त्याला मुलांची किरकिर नको असते. मुलांच्या मनाचा कोणताही विचार न करता तो भिकीवर आपली सत्ता दाखवित असे. जेव्हा ते दोघे रात्री एकत्र झोपत असत त्यावेळेला जर मुलांनी व्यत्यय आणला किंवा लहान मूल रडायला लागले तर आतून ओरडत असे;

" 'अगो त्येका गप कर. नाय तर व्हाळात न्हेवून बुडवून मार. कमळी काही करत नसे. ते पोर तसच बोंबलत राही. मग पोराचं बोंबलण कमी होत नाहीसं बघून आधी विष्ण्या बाहेर येई. कमळीचा थरकाप होई. समज आलेली इतर पोरं एकदम गपगार होत. धाकट्या रडणाऱ्याला तो बकोटीला धरून वर उचलायचा नि गरगरा फिरवायचा. पोराला भोवळ आल्यागत होऊन ते गपगार पडे. ते असं गार झालं की भिकीच्या अंगावर फेकी. तिला दरडावून सांगे, "तू या पोरांका दिवसाउजेडी झोपवत जा. रोजची किरकिर नको माका." (पृ.६)

भिकीच्या आणि तिच्या लहान मुलांची खाण्यापिण्याची कोणतीही जबाबदारी विष्णू स्विकारत नाही. तेव्हा भिकी तिच्या मुलांना विष्णूकडे खायला मागायला सांगते. चिडून ती विष्णूवर, पोरांना एक पैसाही देत नसल्याचा आरोप करते. यावरून असे आढळून येते की, विष्णू गावकर आपली बापाची जबाबदारी पूर्णपणे टाळताना दिसतो. मुलांना ज्या बापाने जन्म घातला त्या बापाने पालन–पोषण, संगोपन करणे हा आपल्या संस्कृतीचा अलिखित नियमच आहे, परंतु विष्णू गावकर याला अपवाद ठरतो. उलट भिकी जेव्हा जेव्हा तक्रार करते तेव्हा तो तिच्यावर आगपाखड करताना दिसून येतो;

“विष्ण्या ताड्दिशी ऊठला आणि अक्राळविक्राळ डोळे करीत, दातओठ खात दाणदाण पावलं टाकीत भिकी होती तिकडे गेला. पोरं खडबडून पुन्हा चिपचाप झाली. “रांडे, आता लाथ घालीन आणि जमिनीत गाडून टाकीन लै बोल्लस तर –” विष्ण्या किंचाळला.

भिकीही सावध होती. ती पीठ मळता मळता उभी राहिली आणि तितक्याच जोरदारपणं म्हणाली, “लाथ घालूक तुका काय माजो लग्नाचो नव्हरो नाय हस. धगड आसस धगड. माजी मर्जी आसात तवसर ये. नाय तर दार बंद.”

कमळी बाहेरच्या पडवीत चिमणीगत आक्रसून, भयाकुल होऊन बसते. विष्ण्यापाशी शब्द नव्हते. तो नुस्ता थरथरत राहिला. तापाची कणकण भरलेलं त्याचं अंग कापायला लागतं. भिकी बोलत राहते, रांड ठेवली नि पोरां काढली म्हणजे सगळां झालां नाय. त्येंच्या जेवणाखाण्याची सोय करूक हवी. काय करतहस तुचां? काय दिलस की येक तांब्याचो पैसो दिसलं? पंदरा वर्सा तुजी रांड म्हणान जगत हय काय काय दिलंस इतक्या वर्सात? नुस्ती धा पोरां मा!”

विष्ण्यासमोर भिकी उभी होती. ती आता संतापानं चांगली थरथरत होती. तिचे डोळे रागानं लाल झाले होते. त्या लाल डोळ्यांनी एखाद्या फुटक्या अंत:करणाच्या माणसानं बघावी तशी ती विष्ण्याच्या काळसर तांबूस प्रकाशातल्या चेहऱ्याकडे बघत होती. शब्दांचे घाव विष्ण्याच्या अगदी मर्मावर घालीत होती. विष्ण्या त्या शब्दांनी आज घायाळ झाला. (पृ.२५)
वरील संवादावरून असे लक्षात येते की, घरातील कुटुंबप्रमुख म्हणून तो कोणतेही काम करताना दिसत नाही. शिवाय तो आपल्या ठेवलेल्या बाईवर प्रेमापेक्षा अधिकारच गाजविताना दिसतो. शेवटी या सर्व घटनांचा बांध फुटतो. तेव्हा त्याला त्याची जागा दाखविते. तू माझा लग्नाचा नवरा नाही, त्यामुळे तू माझ्यावर अधिकार गाजवू शकत नाहीस. माझी मर्जी असेल तोवरच तू इथे येऊ शकतोस असे सांगते तेव्हा तो घायाळ होतो. हे लाजिरवाणे जिणे तो स्वत:च्या कृतीने ओढवून घेतो. एकप्रकारे तो आपल्या लग्नाच्या बायकोचेही शोषण करताना दिसतो. कारण दोन घरोबा केल्याने तो एकाही कुटुंबाला सुख देऊ शकत नाही. जिच्याबरोबर त्याने इतकी वर्षे शरीरसुख उपभोगले आणि ज्या मुलांना स्वत: जन्म दिला त्यांच्याविषयी मात्र तो चांगले शब्दसुद्धा बोलत नाही. भिकी, मुलं उपाशी असताना भिकीने तक्रार केल्यावर, ‘हात लावणार नाही, जवळ येणार

नाही, पोटाची साय कर' असे सांगितल्यावर तो अस्वस्थ होतो. नंतर तांदळाचे एक पोते आणून भिकीच्या दारात ठेवतो आणि अपशब्द बोलू लागतो;

"ये रांडे, हयें पोतांभर तांदूळ घाल तुझ्या मड्यार. तुज्या नी तुझ्या धाही पोरांच्या." (पृ.२६) असे असूनही जेव्हा विष्णू मरतो तेव्हा भिकीला खूप दु:ख होते;

"इष्णो मेलो–मेलो." असं स्वत:शीच निरर्थक अस्पष्ट बडबडत ती एकदम किंचाळली –

"इष्णो मेलो. माजो धगड मेलो. माझ्या धा पोरांचो बापूस मेलोऽ" ती बेभानपणं किंचाळत, रडत, धावत घरात आली. तिनं आपल्या सगळ्या पोरांना पोटाशी घट्ट कवटाळलं. सगळ्यांना एकाच मिठीत कवटाळून ती ओरडली,

"पोरांनूं, तुमचो बापूस मेलो– तुमचो इष्णो मेलो या रांडेचो धगड मेलोऽ–" (पृ.२९) विष्णू खूप स्वार्थी, आत्ककेंद्री व आत्मस्वार्थी व्यक्तिमत्त्व असलेला दिसून येतो. समाजाच्या दृष्टीने एक पुरुष म्हणून तो कलंकच होता. नीती, धर्म, न्याय त्याने बाजूला सारून आत्मधुंदीत जीवन जगला होता, परंतु भिकीच्या आणि तिच्या मुलांच्या आयुष्यात विष्णूच्या जाण्याने पोकळी निर्माण होते. कुटुंबसंस्था चालविण्यात, त्यांचे नातेसंबंध जपण्यात तो अयशस्वी ठरतो. पण भारतीय संस्कृतीतील स्त्रियांच्या मनावरील असुरक्षिततेची भावना त्याला मोठेपण देत होती. कसाही असला तरी तो भिकीचा आधार होता. मुलांचा म्हणायला का होईना बाप होता. जसे म्हणतात ना की, एक व्यक्ती गेल्याने दुनिया संपत किंवा थांबत नाही, पण लाखो लोक मिळाले तरी त्या एकाची कमी भरून निघत नाही.

विष्णू आणि भिकी यांच्या नातेसंबंधावर प्रकाश टाकताना डॉ. पुष्पा राजापुरे म्हणतात, " 'काळेशार पाणी' मधील विष्ण्या भिकीवर आपला अधिकार अहोरात्र गाजवितो. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी त्याला भिकीशी संग करण्याची इच्छा निर्माण झाली तर भिकीने ते मान्य करायला हवे, असे त्याला वाटते. भरदिवसा वयात येण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या आपल्या मुलीसमोरूनच 'तिच्या' आईला घरी घेऊन जाण्यात तो पुरुषार्थ मानतो. भर दिवसा कामधंद्याच्या वेळेला विष्णूबरोबर घरी यायला भिकी फारशी उत्सुक नसते. तिच्या नजरेसमोर तिची भुकेजलेली, भुकेने वखवखलेली दहा मुलं असतात पण जन्मदाता विष्णू त्यांची दखल घेत

नाही. आपल्या दिवसाच्या अथवा रात्रीच्या रतीक्रिडेत त्या मुलांची अडचण नको म्हणून त्या दोघांसाठीच वेगळी खोली असते. आणि त्या खोलीबाहेर मुलांनी झोपायचे असते. तो रात्री येतो तेव्हा तिने आहे त्या स्थितीत त्याच्याबरोबर झोपायला जायचे असते. तसेच तो येण्यापूर्वी मुलांना झोपवायचे असते. एखाद्या रात्री एखादे मूल चिरचिरत त्यांच्या खोलीच्या दरवाजाला धडका देऊ लागलेच तर विष्णू संतापून त्या मुलाला गरगर फिरवून त्याला भिकीकडे फेकून देतो. रागाच्या भरात सर्व मुलांना गाडून टाकण्याचा सल्ला देतो. भिकी ही त्याची ठेवलेली बाई आहे, म्हणून तिने सर्वकाळी त्याच्या कामेच्छा पूर्ण करण्यासाठी तत्पर असावे, अशी अपेक्षा करणारा विष्णू भिकीची ही उघडीवाघडी, कोणतेही अस्तित्व नसलेली दहा पोरं ही आपलीच पोरं आहेत, हे मात्र विसरतो.''[७]

पुरुषांचे वर्चस्व स्त्रियांवर कोणकोणते परिणांम करतात, त्याच्या घरातील नात्यांवर काय आणि कसा परिणाम होतो याविषयी डॉ. किशोर सानप यांनी मांडलेले विचारही महत्त्वाचे वाटतात. ते म्हणतात,

''विष्णूला आपले पशुत्व गाजवण्यासाठी भिकी हवी असते. भिकीपासून झालेल्या मुलांचं पितृत्व आणि त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी मात्र त्याने कधीच स्वीकारलेली नसते. विष्णूला जेव्हा केव्हा भिकीची गरज असेल तेव्हा तो तिला तिच्याच झोपडीत नेतो आणि आपल्या वासनेची तृप्ती करतो. अनेकदा भिकी ही कामधामात असते आणि तिला जीवनाचे अन्यही व्यवहार पार पाडावे लागतात. विष्णूच्या उपभोगाची तिला मनापासून आवडही नसते. शरीरकर्म आणि विशेषत्वाने जारकर्म हा तिच्या वाट्याला आलेला रोजचाच व्यवहार असतो. तिला स्वत:ला घाणीत लोळण्याची हौस नसते. परंतु घाणीतच लोळणे हेच तिच्या वाट्याला आलेले अटळ जगणे असते. मुलांच्या भुकांची सोय लावताना किंवा मालवणच्या बाजारात आपले मोडकेतोडके भजीविक्रीचे हॉटेल चालवताना आपल्या जीवनाचे अर्थशास्त्र विस्कळीत करून तिला बरेचदा विष्ण्याच्यासोबत जोरजबरदस्तीने झोपावे लागते. विष्ण्याचा तिला अनेकदा राग येतो. ती संतापते, परंतु मनात चरकूनही जाते. विष्ण्या तिला दुसरी रांड ठेवण्याची धमकी देतो. विष्ण्या वयाने प्रौढ असतो. भिकीही दहा मुलांची आई म्हटली की काया जर्जर झालेलीच असणार.

पन्नाशीच्या आसपास असलेले हे नरमादीचे जोडपे. नरमादीशिवाय ह्यांच्यात दुसरा कोणताच व्यवहार नाही. भिकीची अगतिकता अशी की विष्णूला सांभाळणे, त्याची गरज पुरवून त्याला आपला धगड म्हणून मिरवणे आणि समाजात एका पुरुषाच्या सहाय्यानेच आपण राहतो आहोत ही सामाजिक गरज म्हणून, भिकीच्या आयुष्यात विष्णूचे स्थान आहे. विष्णू केव्हाही आपल्याला सोडून ह्या वयातही गावातली दुसरी बाई ठेवू शकतो, ह्या भितीपोटीच भिकीचे विष्णूला सांभाळणे असते. त्याकरिता ती आपल्या मातृत्वावरही अनेकदा मात करते. मुलांच्या भुकांपेक्षा मग तिला विष्णूची भूक भागवणे महत्त्वाचे वाटते."[८]

भिकीचा नवरा तिच्या तारूण्यातच मेल्यामुळे तिच्या आयुष्यात विष्णू येतो.

तारूण्यात तिच्या आयुष्यात विष्णू येणं ही तिची सर्वप्रथम दुहेरी गरज असते. या गरजाच विष्णू आणि भिकीच्या नातेसंबंधांचा भाग बनतात. याच परिस्थितीचा फायदा घेऊन विष्णू पशुत्वाच्या पातळीवर नातेसंबंध जगतो. विष्णू मेला हे कळताच भिकीला वास्तवाची जाणीव होते. निराधार झाल्याने ती आक्रोश करते, रडते. कादंबरीच्या शेवटी ती बाळ्या भटाच्या पायाला मिठी मारते, याचे कारण तिच्या भावी जीवनाचा आधार तोच दिसतो. यावरून असा निष्कर्ष निघतो की, पुरुष कुटुंबात कसाही वागत असला तरी त्याचे अस्तित्वच हा एक फार मोठा आधार असल्याचे कौटुंबिक नातेसंबंधात जाणवते. पुरुष हा स्त्रीच्या आणि मुलांच्या जगण्याचा अविभाज्य भाग आहे हे प्रत्ययास येते.

**३. इतिवृत्त :**

श्रीरंग नाडकर्णी हे अत्यंत नावाजलेलं संपादकीय व्यक्तिमत्त्व. नाडकर्णी वृत्तपत्र व्यवसायात अत्यंत जबाबदारीचे काम चोखपणे सांभाळतात. विविध प्रश्नांना ते आपल्या लेखनीने चक्काचूर करतात. त्याचप्रमाणे आपले कौटुंबिक प्रश्न ते कसे सोडवितात? नातेसंबंधाची वीण ते कोणत्या पद्धतीने विणतात? हे सर्व करत असताना वेगवेगळे प्रश्न ते कौशल्याने, प्रेमाने, सहानुभूतीने, अधिकाराने, कर्तव्याने कसे हाताळतात याचा विचार येथे अभिप्रेत आहे.

श्रीरंग नाडकर्णी आपला दिवसभरातला जास्तीत जास्त वेळ आपल्या कामात व्यतीत करतात. लग्न झाल्यानंतर वर्षभरच त्यांच्या पत्नीची तब्बेत चांगली राहते. नंतर ती सतत

आजारीच असे. त्यामुळे पत्नीच्या आजारपणाची काळजी घेणे श्रीरंग नाडकर्णींना इष्ट असते, परंतु इच्छा असूनही ते पत्नीसाठी जास्त वेळ देऊ शकत नाहीत. ते जेवायलाही वेळेवर घरी येत नाहीत. परंतु पत्नी आजारी असताना एके दिवशी जेव्हा ते घरी येतात, तेव्हा पत्नीने त्यांच्यासाठी स्वयंपाक केलेला पाहून ते पत्नीला म्हणतात,

'इतकं कशाला केलस झेपत नाही तुला तर–' (पृ.३७) यावरून त्यांचे पत्नीवरचे प्रेम, सहानुभूती दिसून येते. पत्नीची त्यांना काळजी असते, पण वेळेअभावी ते तिची काळजी घेऊ शकत नाहीत. त्यांच्या संभाषणातून त्यांच्या प्रेमाची कल्पना पुढे येते ती अशी,

"तू घे जेवून आणि पड. फार श्रम नको करूस. एखादी बाई बघायलाच हवी आता कामासाठी आणि तुझ्या सोबतीसाठी. पण मला वेळ कुठं आहे! असं कर तूच आजूबाजूच्या घरात हळूहळू जाऊन चवकशी करता येते का बघ. बाई बघ. मुलगी मिळाली एखादी तरी चालेल. तुला सोबत आणि जेवण करायला. आणि हो, चोवीस तासच आपल्याकडे राहाणारी कोणी मिळते का बघ. आता मी काही पूर्वीसारखा घरीच असेन, रात्री असं नाही. अनेकदा बाहेर जावं लागणार. महत्त्वाच्या घडामोडी घडत असतील तर ऑफिसात थांबावं लागणार. परतायला उशीर होणार. बाहेरगावाचे दौरे, परिषदा, सभासंमेलनं – राजकारणी मंडळी, मंत्री, मुख्यमंत्री यांच्याशी भेटीगाठी. तुझ्यासाठी कोणीतरी पूर्ण वेळचीच एखादी अटेंडर पाहिजे, नाही तर असे करतो मी जाहिरातच देतो – एखादी. मी कितीसा घरात थांबणार? नाहीच." (पृ.३८) नाडकर्णी स्वत: वेळ देऊ शकले नाहीत, तरी पर्यायी व्यवस्थेचा विचार करतात यावरून त्यांचे कुटुंबाविषयीची कर्तव्य ते बजावताना दिसून येतात. दिवसेंदिवस पत्नीची तब्बेत जास्तच नरम होते. तिला स्वयंपाक करणेही जड जाते तेव्हा ते पत्नीला म्हणतात, "तू माझी काळजी करू नकोस. तू तुझी काळजी घे. असु दे गं. तू नको काळजी करू. असेल ते घेतो मी. तू पड स्वस्थ." (पृ.८४) यावरून त्यांचा समजुतदारपणा, तडजोड लक्षात येण्यास मदत होते.

खरेतर जेव्हा पुरुष आपले काम करून घरी येतो, तेव्हा गृहिणी असणाऱ्या बायकोने नवऱ्यासाठी स्वयंपाक करावा; त्याची सर्व कामे करावीत असे परंपरेने सांगितलेले आहे. पण आपली घरातील कामे आपल्या आजारपणामुळे आपण करू शकत नसल्याची खंत जेव्हा

नाडकर्णींची बायको व्यक्त करते; तेव्हा नाडकर्णी न चिडता, न वैतागता तिला समजून घेतात. कामाविषयी, अग्रलेखांविषयी डॉ. देसाईंचा विचार करताच त्यांना त्यांच्या पत्नीचीही आठवण होते. मुंबईचे मोठमोठे स्पेशालिस्ट डॉक्टर दाखवूनही त्यांना गुण येत नव्हता. परंतु देसाईंच्या अनुभवी हातांचा आपल्या बायकोला गुण येईल असा आशावादही ते बाळगून असतात. यावरून त्यांचे पत्नीविषयीचे प्रेम दिसून येते. (पृ.८४)

हॉटेल कामगार संघटनेतर्फे नाडकर्णींचा सत्कार करण्यात आला. तेव्हा घरी परतल्यावर नाडकर्णी आपल्या आनंदात पत्नीलाही सहभागी करून घेतात. तिला सर्व वृत्तांत सांगतात. तिच्या तब्बेतीची सर्व चौकशी करतात. डॉक्टर येऊन गेले की नाही? औषधे घेतली की नाही? एवढी विचारपूस करून ते सत्काराची गोड बातमी आपल्या आजारी पत्नीला सांगतात तेव्हा ती त्यांचा हात क्षीणपणे दाबते आणि आपले अॅप्रिसिएशन प्रकट करते. कधीकधी नाडकर्णी कामात इतके व्यस्त असत की, त्यांना पत्नीच्या प्रकृतीची चौकशी करायचे भानही रहात नाही, पण काम संपल्यावर मात्र ते आठवणीने तिच्या तब्येतीची चौकशी करतात. (पृ.१२८,१२९,२१०,२११)

या कादंबरीतील नाडकर्णी हे मुख्य पात्र संपादकीय भूमिकेतील असून त्याचाच जास्तीत जास्त विचार येथे केला आहे. नाडकर्णीप्रमाणेच इतर अनेक पुरुषपात्रे या कादंबरीत येतात. मुख्यमंत्र्याच्या भूमिकेतील अण्णासाहेब जगदाळे, त्यांचे साडू रघुनाथ भोगले, भास्कर वैद्य, बडे कारखानदार– गोविंदराव दळवी, संपूर्ण राज्यातील खाजगी वाहतूक आणि पक्षाचे खजिनदार, राजकवी–कविराज मधुकर, आबा कर्णिक, फळणीटकर, सातव, महाबळ, आमदार–गजानन नाईक, प्रख्यात विनोदी नट–व्यंकप्पा, बाबुराव साखरे, बिझनेस मॅनेजर अभ्यंकर, हॉटेल कामगारांचे नेते–भाई गोखले, उद्योग आणि कामगार मंत्री–रामराव कदम, पर्यटन खात्याचे राज्यमंत्री–डॉ. हिरे, हॉटेल व्यावसायिक – दादा पटवर्धन यांसारखी अनेक पुरुषपात्रे या कादंबरीत आली आहेत. मात्र त्यांचे कौटुंबिक नातेसंबंध फारसे आलेले नाहीत.

**४. कुरूक्षेत्र :**

प्राचार्य बेलसरे यांचे एक छोटे कुटुंब आहे. त्यांची पत्नी व मुलगा राजू असा त्रिकोण आहे. प्राचार्य बेलसरे यांचे त्यांच्या कुटुंबावर प्रेम आहे. आणि कुटुंबाचे नातेसंबंध ते व्यवस्थित पार पाडताना दिसतात.

वसंतराव दामले हे पुरुषपात्र अतिशय विक्षिप्त असलेले दिसून येते. त्यांची सुमा नावाची पत्नी व त्यांचे लहानसे बाळ या त्रिकोणाभोवती ही कादंबरी फिरते.

लग्नाच्या पहिल्या रात्री सुमा आपल्या नवऱ्याला म्हणजेच वसंतराव दामले यांना 'अंगणी गुलमोहर फुलला' हे गाणं म्हणून दाखविण्याविषयी विचारते, तेव्हा खरे तर नवीन लग्न झालेल्या नवराबायकोत प्रेमाचे, स्नेहाचे, समजुतीचे वातावरण असायला हवे होते. एकमेकांच्या आवडी–निवडी छंद, स्वभाव गुणधर्म जाणून घ्यायला पाहिजे होते. परंतु पुरुषी अहंकाराने या सर्व बाबींना फाटा देऊन वसंतराव दामले आपल्या इच्छेप्रमाणे वर्तन करतात,

"कळलं तुझं गाणं, ते मला हिणवीत खेकसले आणि त्यांनी झडपच घातली माझ्यावर. माझ्या तोंडाला तोंड भिडवून मुका घ्यायचा प्रयत्न केला. काळोख होता तरी दिवसा–उजेडात बघितलेला त्यांचा चेहरा आठवला. देवीचे व्रण, क्रुद्ध, कठोर, उग्र, बापरे!

मला काही समजण्याच्या आतच ते बाजूला झाले. मी घाबरून ऊठून बसले. माझं शरीर थरथरत होतं. आणि मन खट्टू झालं. सुस्कारा सोडला अन् मनाला म्हटलं, मना रे, हे सगळं आवडून घ्यायची तुला आता सवय करायला हवी." (पृ.८८) लग्नाच्या पहिल्या रात्रीचे या दोघा नवरा–बायकोंचे नातेसंबंधांचे सूर जुळलेलेच दिसत नाहीत. नवऱ्याने आपल्या बायकोचा विश्वास संपादन केलेला दिसत नाही. व्यवसायाने शिक्षक असलेले दामले घरात बायकोशी मात्र संवाद साधू शकले नाहीत. शरीराची आणि मनाची भाषाही समजू शकले नाहीत असे दिसते.

'सुमा' ही वसंतराव दामलेंची पत्नी. डोळ्यांनी अधू असते. तिला सासरच्या सहा माणसांचे धुणी भांडी करणे अवघड जाते तेव्हा दुसऱ्या दिवशी ती दामलेंना धुणीभांडी करायला, पाणी भरायला बाई बघण्याची विचारणा करते, तेव्हासुद्धा दामले तिच्यावर चिडतात, ते म्हणतात,

‘मास्तर आहे मी. श्रीमंत नाही तुझ्या बापासारखा–’ हे खेकसले. त्यांचे हे उद्‌गार मला खटकले. त्यांनी माझ्या वडिलांचा असा उल्लेख करणे मला अजिबात आवडले नाही. माझा बाप कशाला काढता इतक्यातच असा प्रश्न माझ्या जिभेवर येऊन गेला. पण शब्द आवरले. कालच तर आमचे लग्न झालं होते. इतक्यातच भांडणांना सुरूवात– मलाच गप्प बसायला हवे होते. तेच मी केले. हे तिची भूमिका समजुतदार स्त्रीची दिसते.

रात्री पुन्हा मला वाटलं– काल रात्री राहिलेलं गाणं आता त्याला म्हणून दाखवावं, त्यानं दिवा बंद केला. मी त्याच्या शेजारी बसले आणि गुणगुणू लागले – ‘अंगणि गुलमोहर फुलला.’

‘गप कर तुझं गाणं आन आडवी हो–’ ते खेकसले आणि त्यांनी मला अंथरूणात खेचलं. त्याच्यासाठी माझ्या कंठात उमटू बघणारे गाण्याचे स्वर त्याही रात्री तसेच अव्यक्त राहिले.” (पृ.९०)

रूढी परंपरेने आपल्याकडे असेच सांगितले जाते की, नवऱ्याने काहीही बोलले, कसेही वागले तरी बायकांनी शांत बसायचे. नवऱ्याला प्रत्युत्तर द्यायचे नाही. या संस्कारांचा पगडा मनावर घेऊनच हे जीवनाची सुरूवात करताना दिसतात. नवीन लग्न झालेले नवराबायको हनीमुनसाठी कोठेतरी थंड हवेच्या , निसर्गरम्य ठिकाणी जातात, परंतु आपले म्हणणे मांडताना ही नायिका तक्रारवजा निवेदनात म्हणते,

‘काय खोलीतच साजरा होईल तो हनीमुन. तोही आक्रस्ताळा, ओरबाडण्याच्या प्रकारचा आणि मला भयभीत करणारा. त्यावेळी त्यांचा एकूण अवतार इतका पिसाट झालेला असे की मी भयाने गोठून जायची.’ (पृ.९०) वरील निवेदनावरून असे लक्षात येते, या कादंबरीतील नायकाला फक्त शरीरभोग पाहिजे असतो. पत्नीच्या आनंदाविषयी, समाधानाविषयी, भावनांविषयी, मनाविषयीही त्याला काही इतिकर्तव्य नसते. हे खालील त्यांच्या दोघांच्या झालेल्या संवादावरून दिसून येते,

‘काही नाही प्रॅक्टीस–बिक्टीस करायची. तंबोरा घेऊन आलीस आणि वाजवीत बसलीस तर तोच तंबोरा उचलून कपाळ फोडून टाकीन तुझं.’

'मग मी करू तरी काय – माझं गाणं –'

'सांगितलं ना! गाणंबिणं बंद. तू मास्तरीण व्हायला हवस. तुला बघायला आलो त्याचवेळी सगळं बोलणं झालं आहे तुझ्या बापाशी. तू डी.एड. हो. सी.पी.एड. हो. तुला मास्तरीण होण्यासाठी शिकवायचं कबूलच केलं आहे त्यांनी.'

'मला गाण्याची प्रॅक्टीस करायची आहे. माझ्या मनात खूप इच्छा आहे.'

'खड्ड्यात घाल तुझी इच्छा. मला काही कर्तव्य नाही तुझ्या गाण्याशी आणि तुझ्या इच्छेशी. तू मास्तरीण झालं पाहिजेस. मी मास्तर आहे, मला मास्तरीण बायको हवी. तिनं नोकरी करायला हवी. पगार कमवायला हवा– तसंच ठरलं आहे. म्हणून तर तुला पत्करली, नाही तर कोण तुझ्याशी लग्न करायला बसलं होतं?' (पृ.९१)

एवढेच नव्हे तर बायको गरोदर असताना तिची औषधपाण्याची, खाण्यापिण्याची सर्व जबाबदारी सुमाच्या वडिलांनाच उचलावी लागते, तेव्हा सुमा वैतागते. त्यांच्यात झालेल्या संवादावरून असे लक्षात येते, हा नायक सासऱ्याच्या जीवावर जीवन जगताना दिसतो आणि दुसरे म्हणजे स्वत: कोणतीही जबाबदारी तर उचलत नाहीच, पण बायकोशी भांडण करून तिला शिव्या देऊन तिच्यावर सतत आपला अधिकार गाजवितो.

'लग्नाचा खर्च वडिलांनी करायचा. शिक्षणाचा खर्च वडिलांनी करायचा. आता बाळंतपणाचा खर्च वडिलांनी करायचा.'

'होय तुझ्या बापानच करायचं.'

'काही नाही तुम्ही करायला हवा खर्च. मी बाबांना सांगणार एक पैसाही खर्चू नका. दारूवर उडवायला पैसे आहेत आणि बायकोच्या बाळंतपणासाठी नाहीत. आग्रह तुमचाच लवकर मूल होण्याचा, माझ्या प्रकृतीला झेपणारं नसताना.'

'न झेपायला काय झालं? बाप खाऊ नाही का घालत?'

'घालतो ना– बापच घालतो– नवऱ्याच्या अंगात नाही ना धमक तेवढी.'

'काय बोल्लीस? काय बोल्लीस! पुन्हा बोल, थोबाड इकडचं तिकडं करून ठेवीन भडवे.

शिव्या कशाला घालता?'

'मग काय ओव्या गाऊ? प्रेमाची असतीस तर गायल्या असत्या.'

हे त्यांच्या मनातलं दुःख होतं की काय? मी प्रेमाची नव्हते. मी फक्त बायको होते– प्रेमाची नव्हते!

'प्रेमाची नाही मी, तर आणायची होती प्रेमाची बायको.'

'आणीनसुद्धा.'

'मग मला कशाला केली?'

'केली, गाढवपणा केला. झालं? आता भोगतो त्याची फळं जन्मभर आणि तूही भोग.' ते तणतणले आणि खोलीबाहेर निघून गेले." (पृ.१०४)

वसंतराव दामलेंनी सुमाशी लग्न फक्त पैशासाठी केलेले दिसून येते. त्यांच्या हातून बायकोसाठी खर्च होताना दिसत नाही शिवाय बायकोवर प्रेम नाही हे ते तिला तिच्या तोंडावर सांगतात आणि शिव्याही देत असतात. यावरून त्यांचे नातेसंबंध हे प्रेमाचे नसून तडजोडच वाटते.

सुमाची नजर अधू होती. रेटिना सरकून दिसायचे बंद झाले होते. त्यामुळे तिचे ऑपरेशन करावे लागले होते. ऑपरेशने थोडेसे दिसायला लागले असले तरी तिला वाचताना, अभ्यास करताना, स्वयंपाक करताना धुराचा त्रास होतो. ती नवऱ्याला डी.एड. सोडून देण्याविषयी विचारते तेव्हा तो म्हणतो, 'मास्तरीण होणार नाही तर काय खुडुक कोंबडी होणार काय? काही नाही तू मास्तरीण झालं पायजेस!', पगार कमावला पायजेस! तेव्हा सुमा स्वतःच्या डोळ्यांची काळजी वाटून आंधळे होण्याची भिती व्यक्त करते तेव्हासुद्धा वसंतराव दामले तिच्याशी खूप वाईट शब्दांत बोलतात,

" 'झालीस तर झालीस. भीक मागत बस रस्त्यावर'. ते शाप दिल्यासारखं बोलून गेले पण माझ्या काळजात भीतीचा गोळा उभा राहिला. खरंच मी उद्या पुरती आंधळी झाले तर! हा माणूस खरोखर मला भीक मागायला रस्त्यावर बसवील?

ते हे बोलतानि शेजारी भिंतीशीच बसले होते. त्यांनी हातात एक ताटली घेतली. भिकारी धरतात तशी धरली आणि भीक मागण्याचा अभिनय करीत म्हणाले, 'साहेब, द्या हो दोन पैसे आंधळीला– मी मास्तरीण नाही झाले, नवऱ्याला फसवलं. द्या हो पाच पैसे आंधळीला!'

नक्कल करून चिडवून झाल्यावर म्हणाले, 'तू आंधळी झालीस की मजा होईल. मी दुसरी बाईल आणीन. तुला काही दिसणार नाही. तू बैस आंधळी होऊन कोपऱ्यात– असं म्हणून ते खि: खि: करीत हसू लागले.' " (पृ.१०६) पती–पत्नीच्या नात्याचे परस्परसंबंध अत्यंत प्रेमाचे जिव्हाळ्याचे असणे अभिप्रेत असते. इथे मात्र पतीच्या दृष्टीने पत्नी म्हणजे पैसे कमविण्याची वस्तू वाटते. आंतरिक जिव्हाळ्याची पूर्ण वाणवा येथे जाणवते.

सुमा गरोदर असताना आईकडे रहात होती. आठ–पंधरा दिवसांनी ती घरी जाऊन घराची स्वच्छता करत असे, नवऱ्यासाठी चांगला स्वयंपाक बनवत असे. असेच एके दिवशी खूप दिवसांनी ती घरी गेल्यावर खोलीचा उकिरडा झालेला पाहून ती वैतागते तेव्हा दोघांच्यात भांडण होते. त्याचा परिणाम म्हणून सुमाला मार खावा लागतो,

"त्यानं ते चिडले. कोपऱ्यात बसले होते ते उठले आणि माझ्यावर धावून आले. मी भिंतीशी टेकून बसले होते. त्यांनी माझे दोन्ही कान पकडले आणि माझं डोकं दणादणा भिंतीवर आपटलं. आपटतच राहिले. माझ्या मस्तकात कळा उठल्या. आतून सगळं गदागदा हललं. मला वाटलं मेंदू निखळलाच कवटीच्या सांध्यातून. डोळे निखळले खोबणीच्या पकडीतून– गोळा ढवळला गेला पोटातला." (पृ.१०९) घरातली आर्थिक परिस्थिती खराब असताना, घरात लहान बाळ असताना त्यांच्यात भांडणं होतं, तेव्हा 'बाळ पडला असता म्हणजे?' असे सुमा म्हणते तेव्हा 'मेला असता आणि काय झालं असतं?' असे उद्गार दामलेंच्या तोंडून निघतात. सुमा त्यांच्या या वागण्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न करते तेव्हा ते तिला मारतात. घरात बिघडलेला स्टोव्ह दामले नीट करत नाहीत. पण स्वत: मात्र दारू पितात. दारू पिऊन ते सुमाशेजारी जाऊन झोपतात तेव्हा किळस वाटते, म्हणताच तिच्या थोबाडीत मारतात. (पृ.११८,११९,१२०, १२१)

बाळ लहान असताना बाळासाठी अर्धा लिटर दूध घालण्यासाठी सुमा गवळ्याला सांगते तेव्हाही ते सुमाला विरोध करताना म्हणतात,

'अर्धा काय करायचा? पाव पुरे' हे हुकूम फर्मावीत म्हणाले.

'अहो पाव कसं पुरेल?' मी म्हटलं, 'चहा, विरजण, बाळाला पुरेसं.'

'पावशेरातच भागवायला शीक– नाहीतर बापाकडून पैसे आण.' (पृ.१२५) पत्नीसाठी व मुलासाठी लागणारा घरखर्च तो करत नाही. उलट तिला मारहाण करून तिच्या मरणाची, तेराव्याची भाषा करून तो तिच्याविरूद्धची चीड दाखवून देतो. (पृ.१३०) बायकोबरोबरच्या संबंधात रात्री बाळाचा व्यत्ययही तो खपवून घेत नाही. बाळालाही शिव्या घालताना व मारहाण करताना दिसून येतो. (पृ.१३७)

दामले घरात पैसे देत नसताना जेव्हा ती त्यांच्या शर्टपँटच्या खिशाला पैसे बघण्यासाठी हात लावते तेव्हा ते तिचा चोरटी म्हणून उल्लेख करतात. एके दिवशी ते घरात सामान आणतात, बाळाला नवे कपडे आणतात, घरात बायकोशी चांगले वागतात, पण या सर्व घटनेमागे त्यांना बायकोचे दागिने हवे असतात म्हणून केलेले कारस्थान असल्याचे लक्षात येते. ते बायकोला फसवून गोड बोलून तिचे दागिने काढून घेतात. (पृ.१४२,१४४) दागिने परत मिळणार नाहीत तेव्हा सुमा तिची आई आणि वडील त्यांना दागिन्यांविषयी विचारतात तेव्हा दामले बायको व सासरा यांना मारहाण करतात. (पृ.१४७,१४८,१४९)

लग्नानंतर चार साडेचार वर्षात दामले सुमाला फक्त मारहाण, शिवीगाळ, उपासमार, उपहास, टिंगल याच्याशिवाय काहीच देऊ शकले नाहीत. शिवाय सुमाच्या पोटचा बाळ घटस्फोटानंतर हिसकावून घेतात. (पृ.१५५,१५७)

घटस्फोटानंतर दामले मोलकरणीकरवी सुमाला निरोप पाठवतात.

''म्हणले, मी अजून तिला म्हंजे 'तुम्लांला व्ह– नांदवायला तयार हाये. यायच तर लवकर ये– दुसरी बाईल केलीय तिची सेवाचाकरी करून– हा म्हणावं, आनिक यायचं तर लवकर ये. तरनी हाईस तवरच मला उपेग हाय तुजा–' (पृ.१५८)

वरील सर्व घटना प्रसंग पाहता या कादंबरीचा नायक. खूपच स्वार्थी, हेकेखोर वृत्तीचा, वासनाध, आपमतलबी, पैशांसाठी कोणत्याही स्तरावर जाणारा असून व्यवसायाने शिक्षक असूनही गुंड प्रवृत्तीचा दिसून येतो. तो नवरा म्हणून अपयशी आणि अतिशय लोभी आहे. जावई म्हणून असमर्थ आहे. बाप म्हणून तर पराकोटीचा कंजुष दिसून येतो. या कादंबरीतील नायक कोणत्याही प्रकारचे नातेसंबंध जपण्यात अयशस्वी झालेला परंतु स्वत:चा स्वार्थ साधण्यात तो यशस्वी झालेला दिसून येतो.

**५. कलियुग :**

कामाच्या ठिकाणी वरिष्ठांबरोबर संघर्ष झाल्यानंतर जगताप बापू पाटील या मित्राला घरी घेऊन येतो. बायकोला भजी करण्यास सांगतो. जगतापची रूम छोटीशी असताना आणि मुले तिथेच अभ्यास करत असताना जगताप आणि पाटील दारू पित आणि युनियनची बोलणी करत बसतात. तेव्हा जगताप आपल्या बायका मुलांचा कोणताही विचार न करता रात्री उशिरापर्यंत गप्पागोष्टी करत बसतो. तेव्हा जगतापच्या बायकोला बाहेर बसून रहावे लागते. तीन मुलांना कॉटवरून खाली बसून अभ्यास करणे भाग पडते. यावरून असे लक्षात येते की, जगताप हा अत्यंत स्वार्थी माणूस आहे. कामाच्या ठिकाणी काम न करता कामचुकारपणा करतो आणि घरातही बायकामुलांची कोणतीही काळजी करताना दिसत नाही. स्वत:ची आर्थिक परिस्थिती चांगली नसताना काम न करणे, मद्यपान करणे अशा गोष्टी तो करताना दिसतो. यावरून तो कुटुंबाची जबाबदारी आणि कर्तव्ये पूर्ण करण्यात कमी पडताना दिसतो. कुटुंबाविषयी त्याला आस्था दिसत नाही यावरून त्याचे कुटुंबाकडे असलेले दुर्लक्ष निदर्शनास येते. (पृ.१८,१९,२०)

जगताप कत्रेविरूद्ध गेट मिटींग घेऊन कामगारांना संघटित करतो आणि कत्रे हटावची मोहीम राबवितो. प्रधान जगतापला दारू पाजून कत्र्यांना हटवायला सांगतो. (पृ.८० ते ८५) या संपाच्या काळात जगताप घरी जाताना दिसत नाही.

जगतापने तीनही मुलांना चांगल्या शाळेत घातले होते. मुलांनी हुशार व्हावे, त्यांनी कामगार राहू नये, ऑफिसर व्हावे, मॅनेजर व्हावे, इंजिनियर व्हावे अशी त्याची इच्छा होती. म्हणूनच त्याने मुलांसाठी चांगली शाळा तर निवडली होतीच पण खाजगी शिकवणीही लावली

होती. जगतापला युनियनची ताकद वाढवून लिडर व्हायचे होते. लोकांनी आपल्याला घाबरून रहावे, दाराशी मोटार असावी अशी स्वप्ने तो कुटुंबासाठीच पाहताना दिसतो. (पृ.१२२) युनियनच्या दोन गटांतील वैमनस्यातून बापू पाटीलकडून जगतापच्या तीन कोवळ्या मुलांचा खून होतो. खरे पाहता जगतापला ठार करायला गेलेल्या व्यक्तीकडून त्या तीन मुलांचा बळी जातो. (पृ.१२५)

वरील सर्व घटनांचा मागोवा घेता असे लक्षात येते की, जगतापची आर्थिक परिस्थिती गरीब होती पण त्याला श्रीमंत व्हायचे होते. पैशासाठी, पदासाठी तो घराकडे दुर्लक्ष करतो. त्याचे आपल्या मुलांवर तेवढेच प्रेम असते मात्र श्रीमंतीच्या हव्यासापोटी त्याला त्याच्या कुटुंबाचा नाश करून घेण्याची वेळ येते. यावरून जगताप कुटुंब आणि आपले काम यांच्यात समतोल राखू शकला नाही हेच लक्षात येते. कामाचे पडसाद त्याच्या कुटुंबावर पडतात. नवरा व बाप म्हणून जबाबदारी ते पेलू शकलेले दिसत नाहीत. एकूणच कुटुंबप्रमुख, पती आणि बाप या कोणत्याही नात्याने जगताप आपली यशस्वी भूमिका पार पाडताना दिसत नाहीत असेच म्हणता येईल.

**६. देवाची घंटा :**

कोकणातील एका छोट्या गावातील मारूतीचे देऊळ सांभाळणाऱ्या भिक्षुक, गोप्या भटाच्या कुटुंबातील नातेसंबंधावर प्रकाश टाकणे येथे अपेक्षित आहे. आपले मूळ गाव, आईवडील, पत्नी यांना सोडून या कादंबरीतील गोप्या भट दुसऱ्या गावात येऊन राहतो. एका खाजगी मालकीच्या मारुतीच्या देवळात तो पुजा करण्याचे काम करतो.

दुसऱ्या गावात आल्यानंतर त्याचा तेलीण स्त्रीशी संबंध येतो. लग्नाच्या बायकोप्रमाणे गोप्या भट तिला सांभाळतो. गोप्या भटाला येसूपासून शंकऱ्या आणि चंद्री नावाची दोन मुले होतात.

गोप्या भट मारूतीच्या देवळात पूजा करून, पूजेत मिळालेले साहित्य– केळी, गुळ, खारका, डाळ, तांदूळ, खोबऱ्याचे तुकडे, नारळाच्या वाट्या, पेढे इ. येसू आणि आपल्या दोन मुलांसाठी घेऊन शनिवारी रात्री घरी येत असे. पूजेत मिळालेले सुटे पैसेही तो येसूकडे देई.

कुटुंबाची गुजराण करण्यासाठी सुरूवातीला गोप्या भट सर्व तऱ्हेची काळजी घेताना दिसतो. (पृ.१२,१३,१४)

शंकऱ्याला शाळेत घालावे त्याने चांगला अभ्यास करावा म्हणून वडिलांच्या जबाबदारीने गोप्या भट त्याला पत्र्याची पाटी, वही, दुधी पेन्सिल, दप्तराची पिशवी असे सर्व साहित्य आणून देतो. (पृ.२४)

मारूतीच्या देवळाचे मालक बुवा यांचे निधन झाल्यावर वकिलसाहेबांनी देवळात एक कुलुपबंद पेटी व नोंदवही ठेवली, त्यामुळे गोप्या भटाचे देवळातून मिळणारे उत्पन्नही कमी होऊ लागते. (पृ.३२) गोप्या भट येसूला पैसे देऊ शकत नव्हता. कुटुंबासाठी तो पैसे काही सामान आणू शकत नव्हता तेव्हा येसू त्याला विचारते,

"भटजी नुं ...... " जाग्या झालेल्या येसूनं त्याला म्हटलं.

"काय?"

"अरोच चाललास? "

"म्हणजे? "

"नाय–आज पैशे नाय दिलास – दर येळेक हाडतास बचकोभर – सामान आणूक ह्या. काय नाय हा घरात–"

"पैशे नाय. रात्री पैशे घेऊनच निघालो होतो; पण गोगटे वकिलानं पिशवी काढून घेतली. म्हणाला, हे देवस्थानचे पैसे. नाही न्यायचे. त्याने एक पिशवीही काढून घेतली. त्यात होती पेढ्यांची पुडी." (पृ.४०) वरील निवेदनावरून एक गोष्ट लक्षात येते, गोप्या भटाला परिस्थितीपुढे हतबल व्हावे लागते; त्याची इच्छा असूनही तो आपल्या बायकामुलांसाठी काहीही करू शकत नाही. एके दिवशी तो मारूतीच्या देवळातील कुलूप तोडतो आणि त्यातील शंभर रूपयांची नोट चोरून देवापुढील केळी आणि पेढे घेऊन येसूकडे जातो. कुटुंबासाठी प्रेमापोटी तो चोरी करतो. (पृ.६०,६३)

या कादंबरीतील पुरुष पात्र गोप्याभट आईवडिलांनी लग्न लावून दिलेल्या बायकोला रस्त्यात सोडून देतो. (पृ.७९) आईवडिलांनाही सोडून तो मारूतीच्या देवळात येतो. म्हणजेच तो

आपल्या पत्नीची व आईवडिलांची कोणतीही जबाबदारी किंवा कर्तव्ये पार पाडताना दिसत नाही. उलट स्वत:च्या शरीरभोगासाठी मारूतीचा पुजारी असूनही येसू नावाच्या तेलीण स्त्रीशी संबंध ठेवतो. तिच्यापासून झालेल्या दोन मुलांची आणि येसूचीही जबाबदारी तो शेवटपर्यंत सांभाळत नाही. आणि वडील राजापुरास घेऊन गेल्यावर तिथे परत तो लग्न करतो. यावरून तो स्वत: फक्त स्वत:चीच गरज बघतो असे वाटते. दुसरे लग्न करताना तो येसू, शंकऱ्या, चंद्री यांच्याकडे परत येत नाही किंवा त्यांना राजापुरासही घेऊन जात नाही, की त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारत नाही. त्यामुळे त्याला कुटुंबाचे शेवटपर्यंत प्रेम, अधिकार मिळत नाहीत. आणि तोही आपले स्वत:चे एक कुटुंब प्रस्थापित करण्यास असमर्थ ठरतो. जशी परिस्थिती बदलेल त्याप्रमाणे तो स्वत:ला बदलताना दिसतो. कुटुंबातील नातेसंबंध स्थिर ठेवण्यात, सर्व नाती जपण्यात तो असमर्थ ठरलेला दिसतो.

**७. नो सेंटिमेंटस् प्लीज! :**

या कादंबरीतील मध्यवर्ती पुरुषपात्र मि. रमेश पंडित यांचा नलूशी विवाह होतो. सुरूवातीची त्यांची काही वर्षे मजेत जातात मात्र जेव्हा त्या दोघांना प्लॅनिंग करणं बंद करूनही मूल होत नाही तेव्हा प्रेमापेक्षाही, भावनेपेक्षा एक आवश्यक कार्य म्हणून ते एकमेकांच्या जवळ येतात.

''मग तो दिवसाचं गणित मांडू लागला. सम दिवस; विषम दिवस. त्या दिवशी तो मनाविरूद्धही समागम करू लागला. तीही मनाविरूद्ध त्यात सामील होऊ लागली. एक आवश्यक कार्य ...... एक हेतूपूर्ण शारीरिक कामगिरी ..... एक रिच्युअल ...... एक एकमेकांच्या शरीरांनी नेमून दिलेला धार्मिक विधी ...... बस्स्. आनंद संपला. केवळ कर्तव्याची भावना उरली. मनोरंजनाची जागा कर्तव्यभावनेनं घेतली. ते काम करतानाही एक विचित्र जबाबदारीच्या ओझ्याची जाणीव दोघांना होऊ लागली. (पृ.२८)

हळूहळू त्यांच्यातलं बोलणं कमी कमी होत गेलं. चर्चा संपल्या. एकमेकांकडे बघायचेही ती टाळू लागली. एकमेकांच्या उपस्थितीत ती फुलण्याऐवजी आक्रसू लागली. विविध ताण अनुभवू लागली. शब्दांच्या जागी सांकेतिक खुणा आल्या. आधी आधी ती एकमेकांना घास भरवीत.

एकाच ताटात जेवत. ती पान वाढलं, की त्याला हाताला धरून नेई. जेवायला जाता जाता तो तिला घट्ट मिठी मारी आणि तेवढ्या तीन पावलांच्या अंतरातही तिची पाच चुंबनं घेई.

लग्नानंतरच्या बारा वर्षांनी ती कपबशीचा आवाज करून त्याला चहासाठी बोलवू लागली. ताटाचा आवाज ऐकला की, तो जेवणासाठी निमूटपणे ऊठून जाऊ लागला.'' (पृ.२८,२९) नंतर नंतर त्यांच्यात मतभेद, भांडणे होऊ लागली असे प्रसंग पूर्वी फार कमी येत असत. रमेश पंडितचे नलूवर फार फार प्रेम होते; नव्हे त्याने तिच्याशी लग्न केले तेही त्याच्याच पसंतीने. आईने पसंत केलेल्या मुलीला त्याने नलूसाठी ठाम नकार दिला होता. त्यासाठी त्याने आपल्या आईलाही दुःखावले होते. (पृ.३३,३४)

वैद्यकीय तपासणीत रमेश पंडित कधीच बाबा होऊ शकणार नाही याची जाणीव होते तेव्हा रमेश पंडित अत्यंत दुःखाने तिला म्हणतो, ''मी कुठलाही अपराध केला नाही तरीही निसर्गानं मला शिक्षा दिलीय ...... नेचर हॅज पनिश्ड मी!''

''तुला कशाला? खरा वांझोटा असलोच, तर मी आहे– मी आणि मी ही फॅक्ट जशीच्या तशी स्वीकारत आहे. मी असमर्थ आहे मुलाला जन्म द्यायला. माझ्या आयुष्यातलं हे एक अटळ सत्य आहे. मी ते शांतपणे, विचारपूर्वक स्वीकारीत आहे. '' (पृ.३९,४०)

नलूला मातृत्व प्राप्त करून देण्यासाठी डॉ. दुसऱ्या पुरुषाचे वीर्य वापरण्याचा सल्ला देतात परंतु नलू त्याला नकार देते तेव्हा तो नलूला आपल्या ओळखीचा म्हणजेच जिवलग मित्र विष्णू याचे पुरुषबीज अपत्य प्राप्तीसाठी वापरण्याचा रमेश पंडित विचार करतो. पण या गोष्टींसाठी डॉक्टरच नकार देतात. डॉक्टर म्हणतात अशा गोष्टींसाठी अज्ञात पुरुषाचेच बीज वापरलेलं चांगलं असतं. (पृ.६४,६६,६७) या सर्व घटनेनंतर रमेश पंडित विष्णू आणि नलूला फक्त अपत्यप्राप्तीसाठी शरीरसंबंध ठेवण्यास सांगतो. (पृ.८०) परंतु नलूचे आणि विष्णूचे शरीरसंबंध वाढतच जातात. ती गर्भवती राहिली तरीही विष्णूचे नलूकडे येणे–जाणे चालूच राहते. (पृ.८५,८६,८७) रमेश पंडित नलूला विष्णूबरोबरचे संबंध थांबविण्यास सांगतो. पण ते दोघेही एकमेकांना भेटतच राहतात. नलू रमेश पंडितला सांगते, तुम्ही माझे पती– माझे प्रियकर आहात पण माझ्या पोटातील बाळाचे पिता तुम्ही नाही. यावरून असे लक्षात येते नलू विष्णूच्या

शरीराबरोबरच त्याच्या मानसिक प्रेमातही गुंतत जाते. जेव्हा असहाय होऊन रमेश नलूला आपल्याला बाळच नको, बाळाबरोबर विष्णूही तुझ्या आयुष्यात येणार असेल तर मला बाळच नको. तेव्हा नलू रमेशला सांगते,

"तरीही मला मूलच हवंय रे ..... आणि विष्णूही. नलू उत्तरली आणि बेडरूमकडे गेली. तिनं धाडकन दार लावून घेतलं.

रमेश पंडितनं क्षणकाल त्या बंद बेडरूमकडे बघितलं आणि तो घराबाहेर पडून चालू लागला." (पृ.११०,१११)

वरील सर्व घटनांचा मागोवा घेता असे म्हणता येईल की, रमेश पंडितचे त्याच्या पत्नीवर नि:स्वार्थी प्रेम होते. प्रेम हे त्यागात देखील असते असे म्हटले जाते. त्याचे एक मूर्तिमंत उदाहरण म्हणजे रमेश पंडित ठरेल. पत्नीच्या सुखासाठी, तिला मातृत्व लाभावं म्हणून सर्वप्रकारची काळजी रमेश पंडित घेताना दिसतो. एक नवरा म्हणून तो आपल्या बायकोची शारीरिक, मानसिक काळजी घेतानाही दिसतो. पतीधर्म पूर्णपणे सांभाळताना दिसतो. परंतु त्यातही तो यशस्वी होताना दिसत नाही. नलूला मातृत्व प्राप्त होते. ती आई होते. तिला विष्णू आणि रमेश असे दोघांचेही प्रेम मिळते. परंतु रमेशला मात्र त्याच्याच घरात, त्याच्याच बायकोवरचा अधिकार मिळत नाही. पिता बनूनही पित्याचा अधिकार मिळत नाही.

एकंदरीतच तो मुलगा म्हणून आईशी नातेसंबंध जपण्यात अयशस्वी होतो. नवरा म्हणून असमर्थ ठरतो, तर पुढे जाऊन वडिलांचे नातेसंबंध जपण्यातही तो अयशस्वीच ठरतो. या सर्व गोष्टींना नियती जबाबदार असली, तरी त्याने घेतलेले निर्णय पूर्णपणे चुकीचे होते. पत्नीबरोबरचे नातेसंबंध जपण्याच्या ओघात तो जीवनातील सर्वस्वच हरवून बसतो असे म्हणता येईल. नातेसंबंधासाठी त्याने केलेल्या त्यागाची त्याला खूप मोठी किंमत मोजावी लागते. त्याने काळाबरोबर घेतलेले निर्णय चूक की बरोबर याच्या वादात न पडता तो एक कर्ता पुरुष म्हणून, नवरा म्हणून, मुलगा म्हणून कुटुंबातील नातेसंबंध जपण्यात आणि ते फुलविण्यात तो अयशस्वी ठरला असेच म्हणता येईल.

८. नरिमन पॉईंटचा समुद्र :

अविनाश आणि केतकी हे दोन वेगवेगळ्य सोप कंपन्यांमध्ये मार्केटींग मॅनेजर पदावर काम करीत असतात. त्या दोघांचे कुटुंबातील, घरातील नातेसंबंध चांगले असावेत आणि त्या नातेसंबंधामुळे ते दोघे आपापल्या कामाच्या ठिकाणी आनंदी व उत्साही दिसून येतात. केतकी जेव्हा पहिल्यांदाच एक्झिक्युटिव्ह चेअरमध्ये बसते तेव्हा अविनाश तिला अभिनंदन करून प्रोत्साहनही देतो हे खालील त्यांच्या फोनवरील संभाषणावरून दिसून येते;

"डोण्ट वरी कालच तुला म्हणालोय ना. आय ॲम देअर टु हेल्प यु. मीसुद्धा मार्केटींग मॅनेजरच आहे ना? कश्शाची काळजी करू नकोस. रिलॅक्स अँड एंजॉय युवर प्रमोशन. रात्री पुन्हा कालचा अनुभव रिपीट....." (पृ.२९)

जेव्हा केतकी मार्केटींग मॅनेजर होते आणि तिच्या मिटींग सुरू होतात, तिला ॲड एजन्सीची गरज लागते तेव्हाही ती अविची मदत घेताना दिसते. दोन प्रतिस्पर्धी कंपन्या असूनही नवरा–बायकोचे चांगले नातेसंबंध असल्यामुळेच ते एकमेकांना मदत करताना दिसतात. (पृ.२९)

परंतु काही कालावधीतच अविनाश सानेच्या सनशाइन कंपनीचा सप्लाय मार्केटमध्ये कमी होऊ लागतो. त्याच्या कामाचा ताण त्याच्या कुटुंबावर पडू लागतो. त्याची मन:स्थिती बिघडू लागते, एकमेकांशी बोलणे, रात्रीचा स्पर्शही तो टाळू लागतो. (पृ.४९) केतकी रात्री ऑफिसमधल्या घडलेल्या गोष्टी अविला सांगे तेव्हा अविनाश तिला रागावून सांगत असे ऑफिसच्या गोष्टी रात्री काढत जाऊ नकोस. झोपायच्या वेळी तरी तू ऑफिस बॉस आणि प्रॉडक्टबद्दल काही बोलत जाऊ नकोस. नेमकं झोपायच्या वेळी अशा विचारांमुळे मला गरज असूनही सेक्स करता येत नाही (पृ.६१,६६,६७)

केतकीने अविच्या मदतीने आणि आपल्या हुशारीने मार्केटमध्ये आपल्या एव्हरफ्रेश प्रॉडक्टचा चांगला दर्जा आणि खप जाहिरातीच्या द्वारे केला होता. पण या घटनेमुळे अविनाश नाराज होतो, कारण एव्हरफ्रेश ही त्याची प्रतिस्पर्धी कंपनी होती. आणि त्या कंपनीची मॅनेजर केतकी होती. अविनाश केतकीच्या स्कीम्सच्या आणि इन्सेंन्टिव्हजच्या सर्व कल्पना चोरतो तेव्हा

केतकी अविनाशला असे का केले म्हणून विचारते, यावरून अविला नातेसंबंधापेक्षा आपला जॉब महत्त्वाचा वाटतो असे दिसून येते.

"यू आर टेलिंग अ लाय. खोटं सांगतोयस तू. तू माझ्या कल्पना चोरल्या आहेस, अविनाश, चोरल्या आहेस."

तो थांबला पुन्हा अधिक ठाशीव स्वरात म्हणाला, "होय चोरल्या. चोरल्या तुझ्या कल्पना मी! पुढं?"

"पण का? एवढ्या विश्वासाने त्या तुला सांगितल्या नवरा म्हणून, मित्र म्हणून!"

"नवरा आणि मित्र? नो. ओन्ली कॉम्पिटिटर्स. एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या कंपन्यांचे मार्केटिंग मॅनेजर्स. तुला तुझा माल विकायचाय, मला माझा! नवरा बायको असणं हा केवळ योगायोग. एकमेकांचे स्पर्धक ही रिॲलिटी." तो म्हणाला. (पृ.१२०,१२१)

या सर्व गोष्टींचा परिणाम अवी आणि केतकीच्या मुलांवरही होतो. अविनाश मुलांवरही काहीही दोष नसताना ओरडतो, रागावतो. तो केतकीला राजीनामा द्यायला सांगतो. तिच्याकडून झालेला पराभव त्याला सहन होत नाही म्हणून तो तिला राजीनामा द्यायला सांगतो. (पृ.१३३) स्वत: एक अनुभवी, तरूण आणि उत्साही व्यक्तिमत्त्व असलेला अवी बदली स्वीकारायला तयार नसतो. केतकी राजीनामा देणार नसते उलट ती त्याला सांगते, तुझी बदली ही राजीनामा मागण्याच्या प्रवाहातलीच एक पहिली पायरी आहे. तरीही अवीला पत्नीचा आनंद, तिचे यश यांमध्ये सहभागी होता येत नाही. खरेतर बायको यशस्वी झालेली असते आणि अवी तिच्या कल्पना चोरूनसुद्धा त्याच्या व्यवसायात अयशस्वी झालेला दिसतो. परंतु हे सत्य तो स्वीकारताना दिसत नाही. त्याच्या अनुभवांवर त्याला दुसरी नोकरी मिळाली असती परंतु तसे न करता तो यशस्वी बायकोलाच राजीनामा द्यायला सांगतो. यावरून असे म्हणता येईल की, हा नायक त्याचे नातेसंबंध जपण्यात त्याच्या व्यवसायाइतकाच कुटुंबातही अयशस्वी झालेला दिसून येतो.

९. **मार्केट** :

मार्केटींग मॅनेजर म्हणून असलेले केळकर. कुटुंबात आपले चांगले स्थान निर्माण करू शकलेले नाहीत. त्याचबरोबर त्यांनी आपले नातेसंबंधही नि:स्वार्थी वृत्तीने आणि चांगल्या पद्धतीने जपलेले नाहीत असे दिसून येते. ते म्हणतात, धंदा करताना ज्या गोष्टीमुळे धंदा करता येतो ती नीती आणि ज्या योगे धंदा करता येत नाही ती अनीती. 'एव्हरीथिंग इज फेअर इन लव्ह अँड वॉर', त्यात आता तिसरं क्षेत्र बिझनेसच जोडलं पाहिजे. 'एव्हरीथिंग इज फेअर इन लव्ह, वॉर अँड बिझनेस' त्यांच्या या कामाविषयीच्या तत्त्वज्ञानाचा आणि विचारसरणीचा परिणाम त्यांच्या कुटुंबावर आणि नातेसंबंधांवर झालेला दिसून येतो. नेहमीच्या पार्ट्यांमध्ये एस. केळकर आपल्या वडिलांसाठी वेळ देत नाहीत असे दिसून येते. ते वडिलांना सांगतात, 'आमच्या बिझनेस कल्चरमधलं हे नवं रिच्युअल आहे.' (पृ.६४)

आपली वयात आलेली मुलगी तनुजा आपले आपल्या बॉसबरोबरचे संबंध फ्रेंडली आहेत असे म्हणते. तेव्हा केळकर तिच्या या वागण्याला प्रोत्साहनच देताना दिसतात. ते तिला म्हणतात, " 'मर्जी सांभाळ, अशीच मर्जी सांभाळ.' 'प्रायव्हेट कंपनीत वरिष्ठांची मर्जी हेच तुमचं सर्वात मोठं क्वालिफिकेशन असतं. एव्हरीवन नीड्स सम गॉड फादर. प्रायव्हेट कंपन्यात तर एक गॉड फादर पुरेसा ठरत नाही दोन तीन लागतात. आणि तनू, तुला तर फॉर्च्युनेटली टॉप बॉस गॉड फादर लाभलाय. चीज करून घे. ....... अशी बड्या अँड फास्ट ग्रोइंग कंपनीत एक्झिक्युटिव्ह पोस्ट आणि तुझी पर्सनॅलिटी – एखादं हाय क्लास स्थळ चालत येईल तुला." (पृ.१०६)

तनुजाचे बॉस मि. दिवाण हे दिल्लीला तनुजावर रेप करतात आणि तिला कामावरून काढून टाकतात. तेव्हा केळकर दिवाणांना जाब विचारायला जातात परंतु त्यांनी दिलेली ऑफर स्वीकारून जाब न विचारताच परत माघारी येतात. या सर्व घटनांचा परिणाम म्हणून तनुजा आत्महत्या करते. तेव्हा केळकर दिवाणांकडून एक लाख रूपये रक्कम आणि पर्चेस मॅनेजरचा जॉब स्विकारतात. त्यामध्ये मिसेस केळकर अर्धा वाटा मागतात. (पृ.२०७,२१३,२१४,२१५)

आपली बायको अश्विनी केळकर हिनेही आपल्या बॉसची मर्जी संपादन करून लोन मंजूर करून घ्यावे, जास्त पैसा कमवावा असे केळकरांना वाटते. त्यासाठी ते तिला वरिष्ठांची मर्जी

राखण्यापासूनचे ते बिझनेस डील करण्यापर्यंतचे सर्व बारकावे शिकवितात. नीती अनितीची कोणतीही कल्पना डोक्यात न ठेवता ते आपल्या पत्नीला फक्त पैशासाठी काम करण्यास भाग पाडतात. (पृ.१५२,१५५,१८४)

मि. केळकर आपल्या व्यवसायासाठी, पैशासाठी आपल्या पत्नी आणि मुलीच्या शीलाचा विचार करत नाहीत. उलट बॉसला खूश करण्यासाठी पार्ट्या, गिफ्ट्स कसे द्यावेत, घ्यावेत या विचारांची देवाणघेवाण नि:संकोचपणे ते करताना दिसतात. आपली बायको आणि मुलीने आपल्या कपड्यांच्या माध्यमांतून बॉसला कसे आकर्षित करावे याचेही मार्गदर्शन करतात. एक कर्ता पुरुष म्हणून बायको व मुलीचे शील, चारित्र्य जतन करण्याऐवजी त्यांचाच वापर ते स्वत:च्या स्वार्थासाठी करताना दिसतात. शिवाय वडील, सासरे यांच्याही संपत्तीत वाटा मिळविण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करतात.

नीती, अनीती चांगले आचार–विचार, संस्कार, कृती या सर्वांना पायदळी तुडवून ते एक नवरा, बाप, मुलगा आणि जावई म्हणून स्वार्थी वृत्तीने जीवन जगताना दिसतात. पैसा, पद, स्वत:ची प्रतिष्ठा यांसाठी ते सर्वांचाच बळी देताना दिसतात.

आपल्या कृत्याने आचार–विचाराने कुटुंबाचा ऱ्हास घडवून आणतात. आपली जबाबदारी, कर्तव्ये विसरून ते फक्त पैशाच्या आहारी गेलेले दिसून येतात. या सर्व पार्श्वभूमीवर ते आपले कौटुंबिक नातेसंबंध जपण्यात अयशस्वी झालेले दिसून येतात असेच म्हणावे लागेल.

**१०. सॉफ्टवेअर :**

मि. व्ही. एस. देशमुख हे अत्यंत हुशार, चाणाक्ष व्यक्तिमत्त्व होते. ते आपल्या उद्योग, व्यवसायांमध्ये प्रामाणिकपणे काम करून प्रगती साधताना दिसतात. कामाबरोबरच ते आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्याही तितक्याच तन्मयतेने पार पाडतात. कुटुंबातील आपले कर्ता पुरुष, बाप, नवरा म्हणूनही स्थान मिळविण्यात आणि आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडताना दिसतात.

देशमुख घरात असताना मुलगी रेखा, मुलगा अरूण आणि पत्नी यांची आस्थेने चौकशी करताना दिसतात. ते काय करतात, कुठे जातात, केव्हा येतात यावरही त्यांचा कटाक्ष असतो. पत्नीला घरी यायला उशीर झाला तर, “ ‘काय गं, कुठं गेली होतीस इतका वेळ?’ देशमुखांनी

थोडं थट्टेच्या, थोडं कळजीच्या स्वरात विचारलं.'' या वाक्यातून त्यांच्या आतील जबाबदार कर्त्या पुरुषाची जाणीव होते. पत्नीला काहीतरी उद्योग–व्यवसाय करायचा असतो त्यासाठी ती सतत धडपडत असते. भांडवल उभे करण्यासाठी दागिने विकण्याचा विचार ती देशमुखांना बोलून दाखवते. पण मि. देशमुख आपल्या पत्नीला प्रोत्साहन देण्यासाठी, पत्नीचे वय झालेले आहे हे माहीत असतानासुद्धा पत्नीच्या उत्साहाला साथ देण्यासाठी ते म्हणतात, 'मिसेस उषा देशमुख : उद्याची एक यशस्वी महिला उद्योजक– आम्ही आपणास हार्दिक शुभेच्छा देतो.' (पृ.२९,३०)

पत्नीने काहीतरी करावे, तिला आपण मदत करावी अशी मनोमन इच्छा देशमुखांच्या मनात असलेली दिसून येते. ते पत्नीला म्हणतात, उषा, तुझ्या मनात काहीतरी करायचा विचार आहे ना, जरूर कर, दागिने विक, पैसे उभे कर, मीही तुला शक्य तितकी मदत करीन. माझे ग्रॅच्युइटीचे, रजेच्या पगाराचे पैसेही मी तुला काहीतरी उद्योग–व्यवसायासाठी देईन असे आश्वासन देतात. (पृ.४०)

देशमुखांची पत्नी जेव्हा दागिने विकून बारा हजार रूपये बिझनेसमध्ये पार्टनरशीप मिळविण्यासाठी गुंतवते तेव्हा देशमुख पत्नीला स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी, स्वतंत्रपणे व्यवहार करण्यासाठी तयार झाली म्हणून आपले तिच्यावरील चांगले मत प्रदर्शित करून आपला पैसा बुडणार नाही यासाठी काळजी घे असा बहुमोल सल्लाही देताना दिसतात. (पृ.१८७)

मि. देशमुखांचे आपल्या पत्नीबरोबरचे नातेसंबंध प्रेमाचे आणि विश्वासाचे आहेत हे त्यांच्या खालील संवादावरून दिसून येते.

'अगं, मी सांगायला विसरलोच ....... आज आमची डेव्हलपमेंट ग्रुपची मिटिंग आहे. मला गेलं पाहिजे. गेल्या दोन मीटिंग्जना मी गेलो नव्हतो. आज आठवण झालीय तर जाऊन येतो.'

'डेव्हलपमेंट ग्रुपचीच आहे की ड्रिंकग्रुपची?' त्यांच्या पत्नीने वरवर हसत हसत पण मनातून साशंक होत विचारलं.

'' 'डेव्हलपमेंट ग्रुपचीच, दुसऱ्या ग्रुपची असते तेव्हा तुला सांगूनच जातो. मी पितो तेव्हा सांगून पितो आणि मली प्यायची नसते तेव्हा कोणी कितीही आग्रह केला तरी पीत नाही.'

‘ते माहीत आहे हो मला. सहज म्हणाले मी. जा तुम्ही; पण लवकर या. उगीच गाववाले भेटले म्हणून रात्रभर गप्पा हाणत बसू नका.’

‘नाही बरं, नाही.’ प्रेमानं तिच्या गालावर चापटी मारीत देशमुख म्हणाले आणि बाहेर पडले.” (पृ.३२)

देशमुखांची पत्नी स्वत: काही अर्थार्जन करावं या प्रेरणेतून व्यवसाय सुरू करते पण ती त्यात अपयशी होते. मि. देशमुख प्रामाणिकपणे प्रयत्न करूनही वरिष्ठांचे समाधान करू शकले नाहीत म्हणून कामावरून काढून टाकले जातात. ते कुटुंबाच्या गरजा भागविण्यात त्यांचे हितसंबंध जोपासण्यास आर्थिक विवंचनेमुळे अयशस्वी होतात. ते प्रामाणिकपणे कुटुंबाची, आपल्या कामाची काळजी घेताना दिसतात. पण स्वत:च्या प्रामाणिकपणामुळे आणि सत्य वागण्यामुळे त्यांना अशा परिणामांना सामोरे जावे लागते.

कुटुंबातील नातेसंबंध जपण्यात आणि ते फुलविण्यासाठी धडपड करूनही मि. देशमुख असमर्थ ठरलेले दिसतात. परिस्थितीचा, त्यांच्या कार्याचा, त्यांच्या व्यवसायाचा, त्यांच्या कौटुंबिक नातेसंबंधावर अनिष्ट परिणाम झालेला दिसून येतो. कौटुंबिक नातेसंबंध अत्यंत जिव्हाळ्याने जपतात, मात्र वरिष्ठांच्या मनमानीमुळे नोकरीस मुकावे लागते आणि परिस्थितीचा बळी ठरण्याची वेळ त्यांच्यावर येते.

ह. मो. मराठे यांच्या एकूण कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण या एकाच अंगाचा विचार करता, त्या पुरुषपात्राचे कुटुंबातील नातेसंबंध यांचा विचार करता काही घटना, प्रसंग, परिस्थिती यांचा या पात्रांवर काही चांगला– वाईट परिणाम झालेला दिसून येतो.

एकूण कादंबऱ्यांमधील पुरुषांचे कुटुंबातील नातेसंबंध पाहता, मुख्य पुरुषपात्र कुटुंबातील नातेसंबंध जपण्यात असमर्थ ठरलेले प्रामुख्यानं दिसते. ‘निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी’ चा नायक आत्मस्वार्थी दिसून येतो. तर ‘काळेशार पाणी’ चा नायक वासनेमुळे कौटुंबिक जीवन आणि त्याचे नातेसंबंध फुलविण्यात अयशस्वी ठरलेला दिसतो. मोठमोठे उद्योगधंदे, व्यवसाय, संपादकपद भूषवलेला नायकसुद्धा येथे कौटुंबिक नातेसंबंध जपण्यात, आघाडी मिळविण्यात असफल ठरतो. कुरूक्षेत्रमधील नायक पैशाच्या हव्यासापायी अंध बायकोच्या सर्वस्वाची होळी

करतो, पण खऱ्या अर्थाने तो आपल्याच आयुष्याची परवड करून घेतो. आपल्या संस्कृतीत पूज्य समजल्या जाणाऱ्या भट–भिक्षुक ब्राह्मणांनासुद्धा कुटुंबाची व्यवस्था सुरळीत करण्यात अयशस्वीच ठरल्याचे प्रत्ययास येते.

एकंदरीत पाहता ह. मो. मराठे यांनी जीवनातील सर्व आघाड्यांवर यशस्वी दिसणारा पुरुष कुटुंबात खऱ्या अर्थाने कसा अयशस्वी होतो आणि त्यामागे घटना, पात्र, प्रसंग, परिस्थिती, समाजव्यवस्था, वासना, भूक, दारिद्र्य, प्रेम, षड्विकार यांचा कसा परिणाम होतो हे एक बेकार तरूण, स्त्रीलंपट पण गावातील मानसन्मान मिळविणारा पुरुष, संपादक, मॅनेजर, भट–भिक्षुक, एक आदर्श पती अशा वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करणारा पुरुष कुटुंबातील नातेसंबंध जपण्यात कसा अयशस्वी होतो याचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे.

ह. मो. मराठे यांची लेखणी पुरुष आणि त्या अनुषंगाने येणारे नातेसंबंध, वडील, भाऊ, काका, मामा, आजोबा, मुलगा, नातू अशा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पात्रे समोर उभी करते. हा पुरुष असमर्थ, अयशस्वी, हतबल, परिस्थितीचे कटपुतले बाहुले जरी होताना दिसले तरी या सर्व परिस्थितीमागे त्याचे स्वत:चे आचार–विचार, संस्कार, वासना कारणीभूत असतात हे सत्यच पुढे येण्यास मदत होते. काही अपवादात्मक पुरुषच आपले जीवितकार्य प्रामाणिकपणे पार पाडून कुटुंबात आपले आदराचे स्थान टिकविण्यात यशस्वी होतानाचे चित्र पहावयास मिळते.

## ३. पुरुष आणि संघर्ष :

### ३.१. मानसिक संघर्ष :

मानवी जीवनात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. परंतु यशस्वी होण्यासाठी फक्त प्रयत्नच पुरेसे नसतात. ती गोष्ट मिळविण्यासाठी सातत्याने, चिकाटीने, अनुकूल किंवा प्रतिकूल परिस्थितीत प्रयत्न करणे म्हणजेच त्या गोष्टीचा ध्यास घेणे होय. हा ध्यास, ध्येय पूर्ण करण्यासाठी एखाद्या गोष्टीचा सतत पाठपुरावा करणे किंवा ती गोष्ट मिळविण्यासाठी लढा देणे म्हणजेच संघर्ष करणे म्हणता येईल.

हा संघर्ष वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचा असू शकतो. तो शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक इ. पातळींवरचासुद्धा असू शकतो.

माणूस समाजात किंवा कुटुंबात वावरत असताना, दैनंदिन व्यवहार करीत असताना त्याला मानसिक पातळीवर काही संघर्षांशी सामना करावा लागतो. मानवाचे यश, अपयश, त्याचे वर्तन, त्याचे आचार विचार हे मनाच्या अनुषंगाने चालतात आणि त्या मनाच्या पातळीवर कोणतेही काम करत असताना काही चांगल्या वाईट विचारांची मालिका सुरूच असते. त्या विचारांच्या मालिकेत सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून समाजाने, संस्कृतीने, धर्माने घालून दिलेल्या लिखित–अलिखित नियमांचे पालन करीत असताना काही घटना प्रसंग घडतात. त्याचे पडसाद मानवी मनावर, जीवनावर उमटतात.

'सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे' किंवा 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे मानवी जीवन हे अनेक प्रकारच्या अडचणींचा, आव्हानांचा, संघर्षाचा ठेवा असते. मानवी जीवनात वाट्याला आलेल्या दुःखांनी, संकटांनी, अडचणींनी, अपयशांनी माणूस खचून जातो तेव्हा बऱ्याचवेळी माणूस हतबल होतो, असहाय बनतो, त्याचा जगण्यावरील विश्वास डळमळीत होतो. अशावेळी त्याची आप्तेष्टांवरील आणि जगण्यावरील श्रद्धाच नाहीशी होते. आत्मप्रतिष्ठेला आणि स्वत्वाला धक्का बसल्यानंतर तो खचून जातो आणि बाह्य संघर्षापेक्षा आत्मसंघर्ष, आत्मक्लेश त्याला अधिक अस्वस्थ करतो. अशावेळी त्याचे जे मानसिक पातळीवर द्वंद्व चाललेले असते त्यातून त्याची या जगण्यावरील माणसांवरील, जवळच्या रक्ताच्या नात्यांवरील, मित्रांवरील, उद्योग–व्यवसाय–नोकरी–कौटुंबिक–सामाजिक–राजकीय–आर्थिक–शैक्षणिक अशा विविध पातळ्यांवर कुचंबना होते. अशावेळी हतबल झालेला माणूस प्रत्यक्षपणे आपले विचार, समस्या, प्रश्न उघडपणे बोलू शकत नाही, मांडू शकत नाही, कुणाला सांगू शकत नाही तेव्हा वरील विविध संदर्भात माणसाची जी मानसिक पातळीवरील प्रतिक्रिया असते, ती या व्यवस्थेबद्दल आगपाखड असते, हतबलता असते, असहायता असते, जे कोंडमारा असतो तो कधी सौम्य अशा भाषेतून तर कधी अग्नीची दाहकता होऊन बाहेर पडतो.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून आलेल्या पात्रांच्या जीवनात घडणारा मानसिक संघर्ष घटना–प्रसंगांच्या, कृती–उक्तींच्या आधाराने कसा आविष्कृत झाला आहे त्याचा परामर्श घेणे येथे अभिप्रेत आहे.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**सापेक्ष :**

सिनियर असिस्टंट एडिटर यांच्याकडे जाऊन प्रधान सत्य बातमी छापण्याबद्दल आग्रह धरतात, परंतु त्यांना सर्वच बातम्यांबद्दल सर्वच गोष्टी माहीत असूनही छापता येत नाहीत कारण त्यांना वरिष्ठांच्या आज्ञा पाळाव्या लागतात. परंतु प्रधान खूपच भावनाशील, संवेदनशील, अन्याय, अत्याचार, दुःख सहन न होणारे असतात. त्यामुळे त्यांना खोट्या बातम्यांविषयी चीड आणि संताप निर्माण होतो. अनेक बातम्यांची खरी माहिती देऊन ती छापण्याविषयी प्रधान सिनियर असिस्टंटकडे आग्रह धरतात आणि त्यांना प्रतिसाद न मिळालेला पाहून ते अधिकच संतापतात, राग व्यक्त करतात. (पृ.५,१२,१३)

प्रधान यांची जाणिवपूर्वक सारखीच बदली करून नवीन नवीन काम त्याच्यावर लादून शेवटी प्रतिकार केला तर उलट बोललं म्हणून कामावरून काढून टाकतात. या अन्यायाला वाचा फोडावी, आपल्याला न्याय मिळावा, मालकांची काळी बाजू उघड व्हावी या हेतूने ते वर्तमानपत्रांची मदत घेण्याचे ठरवितात, परंतु तिथेही त्याच्या पदरी निराशाच पडते. त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार छापायच कबूल करूनही तो छापला जात नाही, कारण प्रधानांचे कंपनीचे मालक तेच या वर्तमानपत्राचे मालक असतात. न्यायाचे सर्व मार्ग बंद झाले होते परंतु त्यांना होणारा मानसिक त्रास वाढतच जातो. तेव्हा तो त्याच्या शब्दातून बाहेर पडतो.

" 'छापायचं कबूल केलय तुम्ही– मी देतो लिहून– तुम्ही सुधारून घ्या पण छापा?' तो थांबला. सद्‌गदित होत पुढं म्हणाला, 'टिल देन आय हॅव नॉट अनदर जॉब.' किती दिवस झाले? एक वर्ष बेकार. एवढा शिकलेला, वयाची पस्तिशी पूर्ण केलेला – एका पत्नीचा पती– दोन छोट्या पोरांचा बाप – बेकार. युसलेस – टोटली युसलेस – पत्नीचं पोट भरू शकत नाही – पोरांच पोट भरू शकत नाही – तिलाही नोकरी जॉब नाही – कसा चालवीत असेन मी संसार–" (पृ.२१)

प्रधानच्या तोंडून त्याची कौटुंबिक, आर्थिक, हकीगत ऐकून त्याचा चाललेला न्यायासाठीचा मानसिक संघर्ष ह. मो. मराठे मोठ्या ताकदीने उभा करताना दिसतात.

**अँकर :**

या कथेतील नायक भालेराव याचा एकही लेख चाफेकरांनी वापरला नाही. औरंगाबादच्या तरूण संपादकानेही फक्त तीनच दिवस त्यांचा अग्रलेख छापला होता. स्थानिक प्रश्न आणि स्थानिक वाचक यांच्याजवळ जाण्यासाठीच चाफेकरांनी स्वतंत्रपणे प्रयत्न सुरू केले होते. इतर एडिशन्सचे संपादकही हाच युक्तिवाद करतात. त्यामुळे भालेरावांची उपयुक्तता कमी होऊन वर्चस्वही कमी होते. ही जाणीव भालेरावांना फार फार दुःखद वाटते. (पृ.३२,३३) भालेरावांना आपले महत्त्व टिकून राहण्यासाठी करावा लागणारा संघर्ष मानसिक संघर्षात परावर्तित करतो.

**२. वीज :**

**वीज :**

मिसेस शांता साठे समाजसेविका म्हणून काम करतात त्यामुळे त्यांचे घराकडे लक्ष नव्हते, मुलांकडे लक्ष नव्हते, नवऱ्याकडे लक्ष नव्हते. शांता साठेचे घरात लक्ष नाही, संसाराकडे लक्ष नाही हे पाहून तिचे पती चिडतात. त्यांच्यात चांगले संभाषण होत नाही त्यामुळे तिचे पती तिला उडवाउडवीची उत्तरे देऊन मनातील राग व्यक्त करतात. तिच्याकडे तिरस्काराने पाहतात. 'विस्कटून विस्कटून गेलाय संसार सगळा' अशी वाक्ये वापरतात. पत्नीला कामाविषयी जबाबदाऱ्यांविषयी काही विचारले असता ती सवड नसल्याची सबब सांगते तेव्हा नाइलाजाने ते घुसमटत मान फिरवून पांघरून घेऊन झोपतात. (पृ.६,७) पत्नीचा बेजबाबदारपणा, घर, कुटुंबाविषयीची चिंता यामुळे या कथेतील पुरुष मानसिक संघर्ष करताना दिसतो.

**स्वप्नभूमी :**

धंद्यातील डील यशस्वी करण्यासाठी अशोक पत्नी मीराला पार्टीला घेऊन जातो. तेथे मीराचे बॉस असलेले दिघे अशोकबरोबर डील करण्यासाठी आलेले असतात. दिघे मीराकडे स्नेहाळ आणि कामूक नजरेने पाहतात. ते तिला सहन न झाल्याने ती त्यांचा अपमान करते. भ्रष्टाचार केल्याचा आरोप करते, त्यामुळे त्यांचे बिझनेस डील यशस्वी होत नाही. घरी आल्यावर

तो धुमसत, संतापत बसून राहतात. बायकोच्या आततायीपणामुळे दहा लाखांचे नुकसान सोसावे लागले होते. त्यामुळे ते गुदमरून स्फुंदून स्फुंदून रडू लागतात. त्यांना निराशा येऊन भितीही वाटू लागते. (पृ.८५,८७,८८) पत्नीचा आततायीपणा, दहा लाखांचे नुकसान आणि या दोन्ही गोष्टींचा परिणाम होऊन होणारे संभाव्य परिणाम यामुळे हा नायक मानसिक संघर्षात सापडतो.

**पूर्णचंद्र :**

रामभाऊ आणि त्यांच्या पत्नीचे नातेसंबंध चांगले नसल्याने, पत्नी त्यांना समजून घेत नसल्याने ते कायम दु:खी दिसून येतात. जेवण झाल्यानंतर पानाचा विडा आणि रात्री झोपताना दुधाचा ग्लास पत्नीने प्रेमाने द्यावा एवढी छोटीशी इच्छा त्यांची पूर्ण न झाल्याने ते वत्सलाबाईंना भेटल्यावर मागील जीवनातील अपूर्ण राहिलेल्या गोष्टी, प्रेम यांची त्यांना तीव्रपणे जाणीव होते आणि त्यांचे डोळे भरून येतात. एखाद्या नाटकातले पात्र बोलते त्याप्रमाणे बंध तुटल्यागत ते बोलू लागतात,

"मला चांगली, मला हवी तशी बायको मला शोधता, मिळवता आली नाही. वत्सला! कोणत्यातरी सांगून आलेल्या मुलीशी मी लग्न केलं. तिनं मला काहीच दिलं नाही फक्त माझा तिरस्कार केला. तिला कोणाबरोबर लग्न करायचं होतं देव जाणे– पण तिच्या मनातला जो कोणी होता तो मी नक्कीच नव्हतो मी अगदी साधा होतो. काहीही वैशिष्ट्य नसलेला. एका ऑफिसातला साधा कारकून – साधा टायपिस्ट. कोणत्याही सार्वजनिक सभेला हजारोंच्या संख्येने जे लोक जमतात ना, त्यातला एक. बायको माझा तिरस्कार करते. मुली पाणउतारा करतात. मी कोणीच झालो नाही. ऑफिसर झालो नाही. नाटककार झालो नाही. दुसऱ्या ऑफिसात चांगली नोकरी नाही मला मिळवता आली. संसाराचं सुख नाही मिळवता आलं – शरीराचं सुखही नाही मनसोक्त मिळवता आलं. माझ्या बायकोला ते नकोच असतं. आधी माझी जागा एवढीशी, त्यात भराभरा झालेल्या पाच मुली. त्या सुखाचा बायकोला कंटाळा. कदाचित माझ्यापासून ते सुख मिळवायच या गोष्टीचीही तिला किळस येत असेल –" (पृ.१२४) आणि तो भाबड्या, लहान मुलासारखा रडू लागला. त्याच्या मनातील भावना वत्सलाबाईंसमोर उफाळून आल्या, कारण इतके दिवस ते

मनातच संघर्ष करत असतात. मनातील भावना, कोंडमारा यांचा निचरा दाखवून रामभाऊंना कराव्या लागणाऱ्या मानसिक संघर्षाची जाणीव ह. मो. मराठे करून देतात.

**खुर्ची :**

सदानंदचे बाबा व्यवसाय अयशस्वी होतात. लोकांचे देणे देता आले नाही म्हणून त्यांचा दोष सहन करून घरातील सर्व मौल्यवान वस्तू विकूनसुद्धा ते स्वत:ला व कुटुंबाला आर्थिक संकटातून वाचवू शकत नाहीत. तेव्हा ते दोन तीन वर्षे अंधारात खुर्चीतच बसून राहतात. एके दिवशी त्यांना जाणीव होते की, आपला बाहेरच्या जगाशी काही संबंध राहिला नाही. या जाणिवेने त्यांना अस्वस्थ वाटू लागते त्याचे मन आतून खंतावून आक्रोशू लागते. त्यांची मानसिक स्थिती पुढे येते,

"त्याला वाटलं – आपण उठावं, खोलीतच इकडे तिकडे फेऱ्या माराव्या. दारात उभं राहावं. जोराने श्वास घ्यावा आणि छातीत भरपूर हवा भरून घ्यावी.

तो उठलासुध्दा खुर्चीतून.

त्याचवेळी बायको दारातून आत आली. पाठोपाठ मुलगी, पाठोपाठ टीव्ही बघायला गेलेली मुलं. त्यानं पुढं पाऊल टाकलं नाही, की जोराने श्वास घेतला नाही. पुन्हा तो खुर्चीत बसला. सगळा उत्साह हरवून गेल्यागत." (पृ.१५३,१५४) या पुरुषाच्या नाकर्तेपणामुळे, कुटुंबाच्या अवहेलनेमुळे त्याला मानसिक संघर्ष सहन करावा लागल्याचे चित्र दिसून येते.

**हे असंच :**

या कथेतील नायकाच पत्नीशी ऑफिसला निघताना भांडण होते. त्याच्या बायकोने त्याला उशीरा जेवायला वाढले. त्याची बायको त्याच्या आईला जिवंतपणीच मढं म्हणाली होती. पत्नीचे आणि आईचे सततचे भांडण पाहून त्याला कटकट करणारी, एका जागी पडून असलेला गोळा पाहून त्याला वाटे;

"बहुतेक मेली असणार आपली आई. पण छे! ती कुस बदले आणि आपण जिवंत असल्याचे दाखवून देई. त्यावेळी फारच निराशा होई. त्याला कल्पना होती, आईसंबंधी असले विचार मनात आणणं निदर्यपणाचं आणि अमानुषही आहे; पण त्याला त्याचाही नाइलाज होता.

गेली कितीतरी वर्षे त्याची आई तशी आजारीच होती. त्यातच त्याचं लग्न झालं. दोन मुलंही झाली. पण ऐसपैस हातपाय पसरून बसायला जागा नाही, तर झोपायला कुठली जागा? मोठी जागा घेण्याचा त्यानं प्रयत्न केला; पण जागांच्या वाढत्या किंमतीमुळं ती योजना नेहमीच लांबणीवर टाकत यावं लागलं होतं. तणातणी सतत तणातणी, त्यातून वैताग. मनस्ताप." (पृ.१६६) कौटुंबिक अशांतता, जागेची समस्या, पैशांची समस्या या समस्यांमुळे या कथानायकाला मानसिक संघर्ष सहन करावा लागल्याचे वास्तव येथे येते.

**३. ज्वालामुख :**

**ज्वालामुख :**

या कथेतील एका पुरुषपात्राच्या घरात आठ माणसे असतात. त्यातील थोरली मुलगीचे बाळ सतत आजारी असते. सासूला पण दम्याचा त्रास असतो. घरात सतत आजारपणामुळे, जागेच्या अभावामुळे त्याला झोप मिळाली नव्हती. त्यातच मालकाने खोली सोडायला सांगितले होते. गुंड रात्री दारावर धडका देत होते. त्यामुळे जीव मुठीत धरून आत बसला होता. या सर्व त्रासाला सहन करत तो जगत असतो. एकाएकी त्याचा राग बाहेर पडला;

"एके दिवशी मी खून करीन चाळ मालकाचा– खून आणि जेलमध्ये जाईन. तिथं झोप घेईन भरपूर. अगदी फासाच्या क्षणापर्यंत भरपूर निवांत, निश्चिंत झोप – त्यासाठी मी खून करीन चाळमालकाचा. मला छळतो, धमकी देतो, गुंड घालतो अंगावर – एक दिवस खुनच करतो साल्याचा." (पृ.११,१२) या मनातील खदखदणाऱ्या लाव्हयातून नायकाचा मानसिक संघर्ष प्रतित होता.

**आजोबा :**

नायक अण्णा यांना सुनेचा आणि नात मिनूचा विरह सहन होत नाही म्हणून ते मुलाकडे गावाकडे जाण्यासाठी पैसे मागतात. मला इकडे करमत नाही. दिवस खायला उठतो, रात्र भयाण वाटते, शेजारी पाजारी नसल्याने एकटं एकटं वाटतं. परंतू अरूणने पैसे न देता त्यांना तेथेच राहण्यास सांगितले. बारा तास अण्णा छोट्या ब्लॉकमध्ये एकटे असत. अण्णांना तो तुरूंगवास वाटू लागतो. (पृ.७९,८०) एक दिवस ते अरूणला म्हणतात, 'उचल आणि वेड्यांच्या

इस्पितळात नेऊन टाक मला. नाहीतर विष दे. नाही तर दोरी दे आणून. फास घेऊन मरतो तरी–' (पृ.८०) अण्णांच्या मनातील वैफल्य, निराशा आत्महत्येचा विचार त्यांच्या मानसिक संघर्षाची साक्ष देतात.

**कर्मफल :**

या कथेतील नायक पंतांना शेटजी फसवून स्मगलींगचा माल पोहचवण्यास भाग पाडते. एकदा मालाची बॅग घेऊन मुलगी आणि नातवाबरोबर प्रवास करतात. पण त्यांचे लक्ष मुलगी व नातवाकडे नसून सारखे बॅगेवरच राहते. बॅगेवर लक्ष रहावे म्हणून ते सतर्क राहतात. गरणाने आणि प्रवासाने जेवढे थकले होते त्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी ते मनावरच्या दडपणाने थकून गेले होते. (पृ.११४) कामाचा ताण आणि स्मगलिंगचे काम पकडले गेल्यावर होणाऱ्या परिणामांची भिती पंतांना मानसिक ताण देणारी ठरते.

**उजाड :**

या कथेतील नायक दिलीप हा विद्यार्थी असतो. मित्रांबरोबर त्याची चांगली मैत्री होते. त्यांच्यातीलच एका सारडा नावाच्या मुलाचा खून हे सर्व मित्र मिळून करतात. तेव्हापासून दिलीप अस्वस्थ होतो. त्याला नीट झोप लागत नाही. भयानक स्वप्न पडतात. खून झाल्याचे, सारडा आपल्यातून नाहीसा झाल्याचे चित्र त्याला सारखे सतावते. घरात कळल्यावर घरच्यांशी नाराजी ओढवते तर घरात सांगितले हे कळल्यावर बॉस (सुभाष) त्याला त्याच्या आईचा खून करायला सांगतो. आईचा खून करूनही तो अजूनच दुष्टचक्रात सापडणार असतो हे माहीत असूनही त्याचे मानसिक द्वंद्व त्याला आईला संपवण्यात भारी ठरते. आईचा खून करून तिची तडफड बघून त्याला असीम दु:ख होते. स्वत:ला कोणीही नसल्यासारखे त्याला उजाड उजाड वाटते. (पृ.१५३,१५५,१५९,१७०,१७४) अजाणत्या वयात केलेली एक चूक परत परत चुका करण्यास भाग पाडते आणि त्याचा परिणाम या नायकाला सतत मानसिक तणावाखाली राहून हातून चूकीच्याच कृती घडविण्यास भाग पाडतात.

४. दावं :

**वाल्या कोळी व बायको :**

या कथेतील नायक नायिकेचे लग्न होते तेव्हा हा नायक खूप गरीब असतो. नायिका नायकाची गरिबी पाहून खूप संतप्त होते. तिच्य अपेक्षेपक्षा नायक जास्तच गरिब होता. ती नायकाचा गरिबीवरून अपमान करते. तिचा अपेक्षाभंग होतो. तिने केलेल्या अपमानामुळे तो गरिबीवर, दारिद्र्यावर सूड उगवण्याची भाषा करतो. (पृ.४५,४६)

पत्नीला सुख देण्यासाठी तो वेडापिसा होऊन वैभव गोळा करत होता. त्याने वैभव मिळविले आणि आणखी मिळविण्यात मग्न होतो. त्या वैभवाबरोबरच दोघांमधली दरी अजूनच वाढत जाते. त्यांचे संवाद नाहीसे होतात. सकाळी उठल्यानंतरही तो तसाच धुमसत राहतो. त्याच्या मनात चाललेली गरिबीवर सूड उगवण्याची चलबिचल त्याच्याच शब्दांद्वारे प्रकट होते.

"डोन्ट अदर दीज वर्डस अगेन! पैसे नव्हते, तर मिळवीन, खच्चून मिळवीन; पण कृपा करून माझ्या गरिबीचा पुन्हा उल्लेख करू नकोस. सगळं मी सहन करीन; पण माझ्या गरिबीचा अपमान मी कधीच सहन करू शकणार नाही–" (पृ.४९)

हे शब्द उच्चारतानाही तो मनोमन धुमसतच राहतो.

नायिकेने पहिल्या रात्री केलेला अपमान तो विसरू शकत नाही. त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी त्याला श्रीमंत व्हायचे होते. अजूनही त्या अपमानाचा खदखदणारा लाव्हा त्याच्या बोलण्यातून प्रकटताना दिसतो,

"सूड केवळ गरिबीवर उगवायचा नव्हता, तुझ्यावर उगवायचा होता, तुझ्यावर. येस. अपमान विसरलो नाही तो – तू क्षमा मागितलीस तरी. लग्नाच्या पहिल्याच दिवशी केलेली माझी अवहेलना – माझ्या पुरुषत्वाची विटंबना. तू माझ्या गरिबीचा धिक्कार केला आणि शरीरसुखही त्या पहिल्या रात्रीच नाकारलस. म्हणालीस "या दारिद्र्यात – या ओंगळ खोलीत – नो. आय कांट एन्जॉय" हे शब्द तुझे. पाठ फिरवून झोपून गेलीस. रागाने संतापाने, धुमसतच. त्या क्षणापासून मी रागाने, अपमानाच्या जाणिवेने धुमसतोय. त्या आधी गरिबीचे चटके मी सहन केले होते. अपमान सहन केले होते; पण तू केलेला अपमान नाही सहन करू शकलो – नाही विसरू शकलो – नाही

विसरू शकलो. तू माझी बायको होतीस. आय एक्सपेक्टेड यू टु शेअर माय सॉरोज् अँड वरीज्. माझ्या गरिबीत, दु:खात तू सहभागी झाली नाहीस. ते मला फार झोंबलं. मनावर खोल जखम झाली. त्या जखमेमुळे मी धावत सुटलोय हे सर्व मिळवण्यामागं–'' (पृ.५२,५३) पत्नीने केलेला अपमान सहन न झाल्याने, गरिबीवर विजय मिळविण्याच्या झपाटलेपणाने आधीच दु:खी असलेल्या नायकाच्या दु:खात अजून भरच पडलेली दिसून येते.

**भीमाशंकर चाळीतील जोशीकाकू** :

या कथेतील जोशीकाकांचे घर छोट असते. मुलांसाठी आणि जोशी दांपत्यासाठी स्वतंत्र बेडरूम नसते त्यामुळे जोशी पती–पत्नीला एकमेकांसाठी वेळ देता येत नाही. जोशी त्यांच्या पत्नीला मुलींच्या नकळत खूणा करतात, चिमटे काढतात पण जोशीकाकू त्यांना प्रतिसाद देत नाहीत. तेव्हा जोशीकाका जोशीकाकूंचा तुला काही जमायचे नाही म्हणून अपमान करतात. त्यांना बोलून त्याची जाणीवही करून देतात. पण जोशीकाकूंचा थंड प्रतिसाद बघून जोशीकाका स्वत:वरच चिडतात. ते स्वत:च फुसफुसत राहतात. अंथरूणावर उठून बसतात. सिगारेट पेटवून चिडलेल्य मन:स्थितीत भसाभसा धूर सोडतात. (पृ.९५,१०४,१०५) या कथेतील जोशीकाकांना पत्नीसुख मिळत नसल्याने, स्वतंत्र बेडरूम नसल्याने, पत्नी त्यांना आहे त्या परिस्थितीत प्रतिसाद देत नसल्याने त्यांना मानसिक संघर्षाला सामोरे जावे लागते.

**देऊळ** :

या कथेतील नायक गंगाधर पत्नी, आई, वडील, मुलगी यांना सोडून संन्यास घेतो. अध्यात्म, तिर्थाटन, प्रवचन करतो. पण उत्सवाला आपल्या गावी आल्यावर पत्नीला निरोप पाठवून बोलावून घेतो. पत्नीशी शरीरसंबंध ठेवतो. हवे ते सुख पत्नीकडून मिळवितो. दरवर्षी तो याप्रमाणे वागतो. पत्नीही तिला हवे असलेले सुख गंगाधरकडून मिळविते. परंतु गंगाधर पत्नीला उपभोगून झाल्यावर पश्चात्तापाची भाषा करतो. एकीकडे त्याला भावना अनावर होतात. तर दुसरीकडे त्याला लोकलज्जेची भिती वाटत असते. पत्नीचा उपभोग घेऊन झाल्यावर गंगाधर स्वत:ला अपराधी मानतो. स्वत:च्य थोबाडीत मारून घेतो. (पृ.१२३,१२४) त्याला आपण पापी असल्याची जाणीव होते, पश्चात्ताप होतो हे गंगाधरच्या पुढील म्हणण्यावरून समजून येते,

'मी पापी आहे. तू मला पापाला प्रवृत्त केलंस. चल, निघ इथून! माझं पाप आज तुझ्या रूपानं उभं राहिलं. नीघ, नीघ!' (पृ.१२४) गंगाधर जेव्हा स्वत:ला गरज असते तेव्हा पत्नीचा उपभोग घेऊन सोडून देतो आणि लगेच महाराज बुवा म्हणून मिरवू लागतो. अध्यात्म आणि संसार यांची व्यवस्थीत सांगड न घालता आल्यानेच गंगाधरला मानसिक संघर्ष करावा लागतो.

**५. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**डोळा :**

या कथेतील नायक आपल्या म्हाताऱ्या बापाचा फसवून एक डोळा विकतो. म्हातारा बाप एक डोळा अगोदरच गेला असल्याने एकाच डोळ्याने सर्व जग पहात असतो. चांगल्या डोळ्यावर पट्टी बांधलेली पाहून म्हातारा वैतागतो. सगळ्या हालचाली चाचपडत करतो. वैतागून तो चांगल्या डोळ्यावरची पट्टी काढतो तेव्हा त्याला काहीही दिसत नाही. तो ओरडतो तेव्हा मुलगा म्हाताऱ्याला डोळा विकल्याचे सांगतो. ते ऐकून म्हातारा घाबरून भोवळ येऊन खाली कोसळतो. म्हाताऱ्याचा एकुलता एक धडका डोळा विकला आहे हे त्याला सहन होत नाही. (पृ.२०,२१,२२) मुलावर असलेला विश्वास, वयाची मर्यादा, परिस्थितीची मजबुरी या सर्व कारणांनी म्हाताऱ्याला डोळा गमवावा लागतो. डोळा गेल्यावर येणाऱ्या संकटांचा परावलंबीत्वाचा मानसिक त्रास म्हाताऱ्याला सहन करावा लागतो.

**पोस्ट बॉक्स नंबर XXX :**

या कथेतील नायक मि. देशपांडे घरात एकटेच रहात असतात. त्यांची मुले इंग्लंड, अमेरिकेत, मुलगी दूर पंजाबात रहात असते तर बायको वारलेली असते. त्यामुळे त्यांना माणसांचा सहवास घरात अजिबात मिळत नाही. जेवण, चहा, नाष्टा, सुख, दु:ख, सर्व काही एकट्यानेच सहन करावे लागते. त्यामुळे त्यांना भावनांची देवाणघेवाण करण्यासाठीही घरात कोणी हजर नसते. दिवसभर ते खूप काम करत असत. पण रात्री त्यांना एकटेपणा तीव्र जाणवत असे त्यामुळे ते पीत बसतात. एकटेपणा खूप त्रासदायक वाटू लागतो. (पृ.१३८) रक्ताची, नात्यातली सर्व माणसे सोडून दूर गेल्याने ते एकटेपणाच्या भावनेने त्रस्त होतात. भावना तीव्र झाल्या की, ते व्यसनांच्या आहारी जातात. वैचारिक घालमेल दूर करण्यासाठी, एकटेपणा दूर करण्यासाठी ते

मद्याची सोबत करतात. पण तिथेही त्यांना समाधान मिळताना दिसत नाही. एकटेपणा घालविण्यासाठी ते मिसेस सानेंकडे मदत मागतात. त्यांना आपण पैसा कमवतो, ड्राइव्ह करतो, घाट चढतो, दारू पितो, सेक्स जिवंत आहे इ. गोष्टी पटवून देवून आपण म्हातारे झालो नसल्याची जाणीव करून देतो. मिसेस सानेंकडून कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया येत नाही तेव्हा त्यांचे मन परत एकाकी पडून नवीन स्त्रीची ...... मिसेस काणेंची आकृती तयार करते. (पृ.१४२,१४३) मि. देशपांडे यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक गरजांची पूर्तता होत नसल्याने ते त्या गरजा भागवण्यासाठी सतत कुणाच्यातरी शोधात दिसतात. परंतु प्रत्येक ठिकाणी अपेक्षाभंग झाल्याने निराश होऊन शेवटी पुन्हा एकाकी पडतात.

**मैत्र :**

मि. खन्ना नोकरीच्या निमित्ताने मुंबईला येतात. तिथे भयानक उन्हाळा असतो आणि पाण्याची कमतरता असते. मुंबईचे दमट हवामान त्यांना आणि त्यांच्या पत्नीला सहन होत नाही. कामाच्या टेन्शनमुळे ते कोल्ड्रींक्स विकत असून हॉट ड्रिंक्स घेतात. ते कामाच्या टेन्शनमुळे अस्वस्थ होतात आणि घरीही लवकर परततात. मॅनेजर पदावर असल्याने त्यांना भरपूर पगार असतो. कंपनीने फ्लॅट दिलेला असतो. गाडी असते. परंतु सर्व सुखसोयींबरोबर कामाचे ताणही वाढत जाताना दिसतात. प्रतिस्पर्धी कंपनीचे यश आणि आपले अपयश त्यांना सहन होत नाही म्हणून ते रात्री काही न खातापिताच झोपून जातात. पण त्यांना शांत झोप लागत नाही. व्हिस्कीचा अंमल उतरताच त्यांची झोपेची गुंगीही कमी होते. त्यांची अस्वस्थता त्यांचे मानसिक तणाव अजूनच वाढताना दिसतो. (पृ.२४९,२५०,२५१) माणूस कितीही मोठा झाला, पद, पैसा, प्रतिष्ठा मिळाली तरी पुरुषांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी तर कधी घरातसुद्धा मानसिक संघर्ष करावाच लागतो. सर्व सुखसोयी पायाशी लोळण घेत असल्या तरी स्वत:च्या समस्या स्वत:लाच सोडवाव्या लागतात हेच येथे सूचित होते.

**कुपुत्र :**

या कथेतील नायकाने म्हणजेच श्री ने आपल्या आजीचा खून केलेला असतो. त्याने शिक्षा भोगून परत सुटण्याची वेळ जवळ आलेली असते तेव्हा श्री चे वडील श्रीपादराव यांना

वाटते की त्याचवेळी मुलाला फाशी ठोठावली असती तर तो सगळा अप्रिय इतिहास भूतकाळात नाहीसा झाला असता. परंतु त्या अप्रिय आठवणींनी श्रीपादराव अस्वस्थ होतात आणि खुर्चीत मान टेकवून डोळे मिटून शांत बसतात. (पृ.३५४)

श्रीपादरावांना मुलाच्या खुनाच्या कृत्याने समाजात ताठ मानेने जगता येत नाही. लोक चर्चा करतात. मित्र, नातेवाईक आठवणी उकरून काढतात. ऑफिसमध्येही लोक मुलाच्या खुनाच्या घटनेची आणि सुटण्याची चर्चा करतात. तेव्हा ते खूप दु:खी होतात,

“भरगर्दीत आपली अंतर्वस्त्र गळून पडली आहेत आणि आपल्याला संपूर्ण नग्न स्वरूपात गर्दीसमोर उभं रहावं लागलय.”

बारा–तेरा वर्षानंतरही लोक या घटनेच्या चर्चा करतात हे पाहून श्रीपादरावांना अजूनच भरून येतं. (पृ.३५९,३६०)

श्री जेव्हा जेलमधून सुटून घरी येतो तेव्हा लोक श्रीपादरावांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना खूनाच्या कारणावरून बोलू लागतात तेव्हा श्रीपादरावांना आपला मुलगा खुनी असल्याचा लोकांच्या तिरस्काराच्या गोष्टींचा खूप राग येतो.

“गच्च कपाळ धरून आत बसलेल्या श्रीपादरावांच्या कानात सगळं बोलणं पडत होतं. त्यांना घरात लाजीरवाणं वाटत होतं. येणारा, बघणारा आणि बोलणारा प्रत्येक जण आपल्या जखमेवरची खपली काढून तिथं टोकदार सुई खुपसतोय आणि त्या व्रणातून भळाभळा निघणारं रक्त बघून चिरकारतोय असं त्यांना वाटत होतं. भूतकाळाच्या भुयारात लपून बसलेली भुतं पुन्हा बाहेर येऊन आपल्या भोवती नाचू लागलीत.” (पृ.३७३) श्रीपादरावांची मानसिक अस्वस्थता आजूबाजूच्या आणि कुटुंबाच्या परिस्थितीची जाणीव करून देतात. कृतकर्मांची फळे भोगणे चुकत नसल्याने लांजिरवाणे जीवन जगणे श्रीपादरावांच्या वाट्याला आलेले असल्याचे ह. मो. मराठे मांडताना दिसतात.

**सापळा :**

या कथेतील मॅनेजर रणदिवे समोर शांताराम सोनकर सुपरवायझर रघू देवकुळेचा खून करतो. देवकुळेचा खून होताना पाहून मॅनेजर खूप घाबरतात आणि शांताराम सोनकर त्यांना एक

शब्दही कुणाला न सांगण्याची धमकी देतात. देवकुळेचा खून पाहिल्यामुळे त्याला मनात भिती बसते. घराकडे, घरातल्या व्यक्तींकडे त्याचे लक्ष लागत नाही. त्याला सारखी शांताराम सोनकरची प्रतिमा समोर दिसते. (पृ.७१,७२,७३) खूनी माहीत असूनही तो एक शब्दही कुणाला सांगू शकत नाही. एकीकडे खून करणाऱ्याची धमकी तर दुसरीकडे सोनीसाहेबांची भिती; सोनीसाहेबांनीही रणदिवेला फोनवर सांगितलेले असते की, आपल्यापैकी कुणाला काही माहीत नाही आणि असेल तर पहिल्यांदा आपणाला सांगावे अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. या सर्व गोष्टींचा रणदिवेंच्या मनावर खूप खोलवर परिणाम होतो. रात्री अपरात्री त्याला डबडबून घाम फूटू लागतो आणि सताड उघड्या डोळ्यांनी छताकडे बघत बसतो. एक महिन्यानंतर पुन्हा रणदिवेच्या समोर शांताराम सोनकरचा खून होतो. तो पवारने केलेला असतो. "साहेब, यातलं एक अक्षर कुणाला कळलं तर खबरदार." अशा शब्दांत पवार रणदिवेला सुनावतो. त्यामुळे रणदिवे शांताराम सोनकरला रक्ताच्या थारोळ्यात विव्हळत सोडून देतो. घरी येऊन तो दोन–तीन रग अंगावर घेऊन भीतीने थरथरत झोपतो. (पृ.९१,९२) रणदिवेच्या समोर दोन खून होतात पण दोन्ही खूनांची माहिती असूनही तो पोलिसांत माहिती देण्यात असमर्थ ठरतो. खून झालेल्या दोघांची तडफड आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींची ससेहोलपट त्यांना सहन होत नाही. परंतु दोन परस्परविरूद्ध गोष्टींमुळे त्याला मानसिक चिंता करण्यापलिकडे आणि स्वत:ला त्रास करून घेण्यापलिकडे काहीही उरत नाही.

**६. युद्ध :**

**चौथा :**

या कथासंग्रहातील कंपनीत केमिकलचा स्फोट होऊन सात कामगार भाजून मरतात. ही घटना भावेंच्या डोळ्यासमोर घडल्याने त्याला ते सहन होत नव्हते. त्याच्या मनातल्या भावना त्याच्या चेहऱ्यावर, डोळ्यांत प्रकटतात. तो थरथर हलू लागतो. त्या सात कामगारांची आणि भावेंची जवळीक नव्हती तरीही भावेला त्या सात कामगारांविषयी सहानुभूती वाटू लागते. त्या सात कामगारांच्या किंकाळ्या, त्यांचे तडफडणे, त्यांचे विव्हळणे रात्रभर भावेंच्या कानात घुमत असते. (पृ.६७,६८,६९) दोन कामगारांनाच मदत जाहीर होते. बाकी पाच कामगारांचे नातेवाईक

त्यापासून वंचित राहतात. हे भावेला सहन होत नाही. तो त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करायचे ठरवितो. तेव्हा कंपनी त्याला बॉंबेला बदली देऊन पगारवाढ, रहायला घर देण्याचे कबूल करते. परंतु भावे ही ऑफर नाकारतो आणि उरलेल्या पाच कामगारांच्या बेवारस मृत्यूचे प्रकरण तडीस न्यायचे ठरवितो. तेव्हा वरिष्ठ लोक त्याला पाच हजार रूपये मालाच्या चोरीच्या गुन्ह्यात अडकवितात आणि त्याला पोलिस कस्टडीत टाकतात. (पृ.९३,९४,९५) चांगली नीतिमत्ता, दुसऱ्यांना मदत करण्याची सवय, दुसऱ्यांच्या दुःखात सामील होण्याची बांधिलकीची भावना भावेला शांत बसू देत नाही. परंतु वरिष्ठांच्या कटकारस्थानामुळे त्याचा बळी ठरतो. त्यामुळे त्याला स्वतःच्या नोकरीबरोबर कुटुंबाचे पालनपोषण न करता आल्याची खंतही सारखी बोचत राहते.

या कथासंग्रहातील पुरुषांना कधी वैयक्तिक पातळीवर, कौटुंबिक पातळीवर तर कधी सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, नैतिक, आर्थिक पातळीवर मानसिक संघर्ष करावा लागत असल्याचे दिसून येते. कधी कधी आपण प्रामाणिकपणे वागणे–बोलणे–चांगले कर्म ठेवूनही दुसऱ्यांच्या चूकीच्या निर्णयामुळे – वर्तनामुळे आपल्याला मनःस्ताप सहन करावा लागतो. हा मनःस्ताप कधी कुटुंबात, मित्रपरिवारात, समाजात तर कधी कामाच्या ठिकाणी सहन करावा लागतो. असा मानसिक संघर्ष करताना कधी या पुरुष पात्रांना तडजोडीची भूमिका घ्यावी लागते, तर कधी प्रतिकार करता करता अजूनच मनःस्ताप होतो. प्रधानांसारखे पात्र समाजातील अन्याय, अत्याचार, दुःख सहन करू शकत नाही. परंतु स्वतःही काही करू शकत नाही. त्यामुळे ते सिनियर असिस्टंट एडिटर यांच्याकडे समाजातील सत्य छापण्याविषयी आग्रह धरतात परंतु तिथेही त्यांच्या पदरी निराशाच पडते. प्रधानांच्या वैयक्तिक आयुष्यातही कौटुंबिक आणि आर्थिक ताणतणावांमुळे मानसिक संघर्ष अटळ ठरतो. भालेरावांना स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी मानसिक संघर्षाला तोंड द्यावे लागते. अशोकची पत्नी मीरा दिघेसाहेबांना एंटरटेन करत नाही त्यामुळे त्याचे मोठे नुकसान होते. ते सहन न झाल्याने तो मानसिक तणावग्रस्त दिसून येतो. रामभाऊंना त्यांच्या कौटुंबिक आयुष्यात आदर प्रेम न मिळाल्याने ते मानसिक चिंतेत असतात. आध्यात्मिक कार्य तत्परतेने करणाऱ्या, प्रामाणिकपणे वागणाऱ्या पंतांच्या वाट्याला स्मगलींगचे काम येते. त्यामुळे ते सतत मानसिक दडपणाखाली वावरत जीवन जगतात. छोटे घर असलेले

जोशीकाकांसारखे व्यक्तिमत्त्व आयुष्यात सर्व सुखांना मूठमाती देत जगतात, त्यामुळे ते आनंदी, उत्साही दिसून येत नाहीत. गंगाधरसारख्या नायकाला अध्यात्म आणि संसाराची व्यवस्थित सांगड न घालता आल्यानेच मनाच्या द्विधा अवस्थेत जीवन जगावे लागते. डोळा कथेतील म्हाताऱ्या नायकाला परिस्थितीने डोळा गमवावा लागतो त्यामुळे डोळा गमावल्याचे दु:ख, परावलंबित्व सहन न झाल्याने मानसिक संघर्ष करावा लागतो. मि. देशपांडेंना कुटुंबापासून एकटे रहावे लागत असल्याने मानसिक संघर्ष करावा लागतो.

समोर घटना घडत असतात परंतु आपण हतबल असतो. कधी अधिकार नाही म्हणून तर कधी आपली शारीरिक, मानसिक, आर्थिक कुवत नसते म्हणून जेव्हा आपण काही करू शकत नाही आणि समोरची परिस्थिती सहन करू शकत नाही तेव्हा मानसिक संघर्ष अटळ असल्याचेच येथे पुरुषपात्रांच्याद्वारे लक्षात येते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीतील नायक कॉलेजात असताना गोडसे काकूंच्या म्हैस बांधायच्या शेजारच्या खोलीत काही महिने रहातो. परीक्षेच्या काळातच काकू त्याला खोली सोडण्यासाठी सांगातात. गयावया करूनही काकूंच्या निर्णयात काहीच फरक पडत नाही. उलट त्या 'उगीच कटकट करू नकोस! भिकारी ते भिकारी आणि वर पुन्हा माजोरी.' अशा शब्दांत या नायकाला सुनावतात. खोली सोडताना नायक भिंतीतला मारलेला खिळा चोरून घेऊन जाईल म्हणून स्वत: सामान आवरायला येतात परंतु नायकाची नोकरी गेल्यानंतर तो काकूंची मनाविरूद्ध खोटी स्तुती करतो; त्यांची हातातील पिशवी स्वत: घेऊन जातो. स्वत:चा पूर्वीचा आगरकरी बाणा सोडून देऊन शेणाचा लिबलिबित गोळा झाल्याची भावना होऊन सुद्धा तो देसाईबाईंकडे पत्नीसाठी काकूंनी शब्द टाकावा अशी विनंती करतो, उपकाराची भाषा करतो. त्यावेळीसुद्धा काकू त्याच्यावरचा पूर्वीचा राग, द्वेष, सूड, संताप काढतात. नायक त्यांना विनवणीच्या स्वरात, पोराचे काय मनावर घेता म्हणून त्यांची सारखी माफी मागतो. (पृ.१०,११,१२,१३)

स्वत:च्या नोकरीसाठी नायक सहस्त्रबुद्धेंना पैसे नसताना मनाविरूद्ध चहा पाजतो. त्याच्याकडे नोकरीसाठी त्याच्या सायबांना शब्द टाकायला सांगतो पण तिथेही ती जागा त्यांच्याच नातेवाईकांना मिळणार असते हे ऐकून त्याला खूप संताप येतो. पण चहाचे पैसे सहस्त्रबुद्धेंनी दिले त्यातही त्याला काहीसे सुख मिळते. (पृ.१९,२०,२१)

बायको गर्भवती असताना नायक आपल्याला नोकरी नाही ही गोष्ट तिच्यापासून लपवितो. ती त्याला सांगते, तू विनाकारण पैसे खर्च करू नकोस, आपण दरमहा थोडं थोडं सामान आणू, थोडी लोकर आणू. तेव्हा तो विचार करतो की ढुंगण टेकायला जागा नसताना आपली बायको गर्भार राहिली. तेव्हा त्याला आपलं कोणीही नसल्याचा विचार सतावतो. तो म्हणतो,

“मित्र माझे नाहीत.

जग माझं नाही.

वसू माझी नाही.”

नोकरीच्या संदर्भातील विचारचक्रात तो इतका बुडून जातो की आपली बायको गर्भवती आहे तिला आरामाची गरज आहे. तिला दगदग सहन होणार नाही हे जणू तो नजरेआडच करतो. जेव्हा त्याला याची जाणीव होते तेव्हा तो विचार करतो, चार महिन्यानंतर वसूला काम करता येणार नाही. तिचं हे पहिलं गर्भारपण आपण पिकलेल्या फळासारखं झेलायला हवं होतं. परंतु आपण एकदम अधम आहोत. या विचारानंतर तो परमेश्वराची माफी मागतो आणि पुढील जन्मी मला नरकात टाकण्याविषयी विचार व्यक्त करतो. (पृ.२४,२५)

काकूच्या नातवाच्या बारशाला पत्नीला घेऊन नायक जातो तेव्हा तो व्हरांड्यात खूर्चीवर काकू देसाईबाईंना घेऊन येण्याची वाट पाहत बसतो. तेव्हा तो या ढेकूणसम मानव–जंतूवर एक कृपाकटाक्ष टाका. असे स्वत:विषयीचे विचार मनात आणतो. (पृ.२८) आपल्याला किंवा आपल्या पत्नीला नोकरी मिळत नाही असे पाहून त्याचा जो मानसिक संघर्ष सुरू होतो ते खालील निवेदनावरून स्पष्ट होण्यास मदत होते.

“आम्हांला तुम्हीच कामाला ठेवा. आम्ही दोघंही ग्रॅज्युएट आहोत. ग्रॅज्युएट घरगडी असणारं कुटुंब असा बोर्ड मी स्वत:च्या हस्ताक्षरात दारावर लावतो किंवा रस्त्यावरही. तुमच्या

घराची शोभा एकदम वाढेल. न केवळ शोभा; पण सामाजिक आणि सांस्कृतिक प्रतिष्ठाही. आम्ही दोघं सुखानं इथं राहू. तुमची घरकामं करू. तुमची पातळं मी धुवीन. तुमच्या सुनेची वसुमती धुवील. वसू तुमच्या सुनेपेक्षा थोडीशी हुशार होती ना, म्हणून ही तिला शिक्षा. तुमच्या नातवांची ती हगणी–मुतणी काढील. म्हातारी होईपर्यंत. स्वत:च्या मुलाचं हगणं–मुतणं काढणं या स्त्रीला हव्या असणाऱ्या सुखाची ती कधीच अपेक्षा करणार नाही. केलीन तर तिचं हृदय मी कापीन आणि तुमच्या दिवाणखाण्यात टांगून ठेवीन. मी काही मागणार नाही. वसूही काही मागणार नाही. आमचं स्वत:चं आयुष्य आम्ही जगत आहोत हे आम्ही विसरू.'' (पृ.३७)

हा नायक व त्याची पत्नी सुशिक्षित असूनसुद्धा नोकरी मिळत नाही म्हणून काकूंच्या विनवण्या करतो, त्याचा काही उपयोग होईल असे वाटत नाही, तेव्हा तो मनात विचार करतो आपण काकूकडेच दोघांनाही पडेल ते काम करावं. शिक्षणाची, कामाची लाज न बाळगता त्यांच्या घरातील नोकरांप्रमाणे सर्व कामे करू अशी आशा बाळगतो. नोकरी मिळत नाही म्हटल्यावर तो ज्या ठिकाणी पूर्वी काम करत होता तेथे जातो. पण तिथेही त्याला मुनीमजींची मर्जी सांभाळून त्यांनी आपल्यासाठी शेटजींकडे शब्द टाकावा अशी इच्छा असते, पण त्या दोघांच्या संभाषणा दरम्यान त्याच्या स्वार्थी मनात मुनीमजींच्या मृत्यूनंतर त्यांची नोकरी आपल्याला मिळेल असे विचार येतात. नोकरीच्या विचारांच्या संघर्षात तो स्वत:ची विवेकबुद्धीसुद्धा हरवून बसल्यासारखे वाटते. (पृ.४३) नोकरीसाठी वणवण फिरून तो एका हॉटेलात चहा, सिगारेटसाठी थांबतो, त्यावेळी त्याचे विचारचक्र त्याला ढेकणाच्या विषाची बाटली विकत घेऊन आपण, वसू आणि आपला आगामी बाळ सर्वांनीच मरून जावं अशा विषयाकडे घेऊन जाते. यावरून या नायकाला जीवनच नकोसे झालेले वाटते. स्वत:बरोबरच आपल्या पत्नी आणि बाळाचीही या सर्वांतून मुक्तता करावी असे त्याला वाटत असते. या वैफल्यग्रस्त विचारांनी त्याला पूर्णपणे घेरलेले असते. (पृ.४९)

काय करावं?

काय करावं?

काय करावं?

काय करावं?

काय करावं?

काय करावं?

काय करावं?(पृ.५१)

अशा विचारांनी तो वसूचा, जगाचा, स्वत:चाही नसल्यासारखा सिगरेट फुंकत आणि चहा पीत तेथेच बसून राहतो. त्याला आपल्या पुरुषार्थावर, प्रेमावर, प्रतिज्ञावर, ओसाड वांझोट्या जगण्याचासुद्धा तिरस्कार वाटू लागतो. तेवढ्यात त्याला तिथे ढोणकर नावाचा मित्र भेटतो; त्यातूनच त्याला बायकोला पपया खाऊ घालण्याचा पर्याय मिळतो. बायकोचे गर्भारपण हेच आपल्या दु:खाचे, बेकरीचे कारण आहे असे समजून तो तिचा गर्भपात घडवून आणतो. निरागस वसूचे आईपण, आपले वडिलपण आणि त्या निरागस कोवळ्या जीवाचे जीवनही हिरावतो. (पृ.५३,५८,७०,७१,७२) स्वत:च्या नोकरी मिळण्याचे सर्व पर्याय संपल्यानंतर पत्नीला नोकरी मिळविण्याच्या अपयशापोटी प्रसंगी तो पत्नीच्या भावभावनांचा आणि पत्नीच्या पोटात वाढत असणाऱ्या बाळाचा बळी देतो. त्याच्या मानसिक संघर्षाचे हे पर्यवसन पुरुषी वृत्तीला काळिमा फासणारे असेच आहे.

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीच्या नायकाच्या मानसिक संघर्षाविषयी भाष्य करताना डॉ. य. दि. फडके म्हणतात,

"अनामिक बेकार नायक परिस्थितीची कोंडी फोडता येत नसल्याने वैतागलेला आहे. गरोदर पत्नीची जबाबदारीही या 'व्याकुळ, व्यथीत, निराश व चिंताग्रस्त' नायकाला पत्करावी लागत आहे. कसलीही नोकरी मिळवण्यासाठी त्याला तोंड वेंगाडावे लागत आहे; लाचार होऊन दारोदार भटकावे लागत आहे. त्यामुळे मनातल्या मनात तो साऱ्या दुनियेवर संतापला आहे. आपला संतापही त्याला सारखा गिळावा लागतो. फक्त एकदाच त्याचा हा धुमसणारा राग व्यक्त होतो. चार कवड्यांसाठी बायकोला आपल्याकडे पाठवून द्यावयास सांगणाऱ्या संस्थेच्या

सेक्रेटरीला तो एक शिवी हासडतो खरा; पण तेव्हाही सेक्रेटरीच्या हातचा मार खाऊन त्याला पराभव पत्करावा लागतो. वेड लागेल की काय अशी अवस्था असलेल्या अनामिक नायकाच्या मनाची स्पंदने मराठ्यांनी या दीर्घकथेत मोठ्या ताकदीने शब्दांकित केली आहेत."[९]

नोकरीसाठी, जीवनचरितार्थ चालवताना सामान्य माणसाला ज्या मानसिक संघर्षांना तोंड द्यावे लागते त्याविषयी डॉ. केशव मेश्राम म्हणतात,

"मध्यमवर्गीय तरूण मन जगत असते स्वप्नांवर. छोट्या छोट्या नोकऱ्या करीत संसार चालवू पाहणारा, स्वाभिमानी मनाचा तरूण, सर्व कादंबरीमध्ये त्याला फक्त, 'तो' एवढेच सार्वनामिक अभिधान लाभले आहे. त्याने केलेला प्रेमविवाह. बायको वसू–वसुमती, नवा संसार उभा करण्यासाठी नोकरी अत्यंत आवश्यक पण कितीही पदव्या आणि पात्रता असू द्या. शिक्षण संस्थांना बाजारी स्वरूप आलेले. जादा पगारावर सही घेऊन शिक्षकांच्या हातावर नावापुरता पगार टिचवण्याची रीत संस्थांना भरभराट देते. माणसांच्या गरजू वृत्तीचा सौदा – लीलावाच्या बोलीसारखा चालतो. संस्था चालवणारे विश्वस्त – सेक्रेटरी म्हणजे गुंडटोळीचा रगेल–बनेल गुंड म्होरक्याच. उपभोग, किंमत वसुलीची देवाणघेवाण हाच त्यांचा रोखठोक खाक्या. त्यामुळे या संस्था आणि शिक्षणविक्री करून जगू पाहणाऱ्या मध्यमवर्गीय सरळसोट व्यक्तींची कशी कुचंबणा व कोंडी होते. त्याच्या जगण्या वाचण्याची गणिते विस्कटून कशी जातात याचे विदारक शब्दांकन ह. मो. मराठे यांच्या अठ्ठ्याऐंशी पृष्ठांच्या ह्या छोटेखानी कादंबरीत केले गेले आहे."[१०]

आपल्याला जाणवणाऱ्या बेकारीच्या, संसार उद्ध्वस्त झालेल्या नायकाच्या मानसिक संघर्षाचे चित्रण करताना प्रा. मधू जामकर म्हणतात,

"मनाच्या एका हताश अवस्थेत केलेले हे लेखन परिस्थितीची कोंडी फोडता येत नसल्याने वैतागलेल्या नायकाचे एक वेगळे दर्शन घडविते. इथे मनातल्या मनात नायक दुनियेवर संतापतो. आपला संताप सारखा गिळत जातो. वेड लागेल की काय अशी अवस्था असलेल्या अनामिक नायकाच्या मनाची स्पंदने येथे आपण वाचतो. स्वत:वर, प्रिय व्यक्तीवर, जगावर व परमेश्वरावर चिडलेल्या नायकाच्या मनाची स्पंदने शब्दांत कशी पकडावीत? म्हणूनच लेखक भाषेचे स्वरूप बदलतो. जीवघेण्या अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी शिव्या देणारी भाषा अपरिहार्य

ठरते. अन्यथा शिवापासून शिवी उत्पन्न झाली नसती म्हणूनच या भाषेत सुन्न करणारा अनुभव व त्याची धग आपण पाहू शकतो. वाचक जेव्हा हे अनुभवतो तेव्हा आपणही जीवनप्रवाहात वाहत नसून फरफटले जात आहोत याचा प्रत्यय येतो.''[११]

निष्पर्ण वृक्षच्या बेकार नायकाच्या बाह्य परिस्थिती आणि मानसिक अंतरंगात चाललेल्या संघर्षाविषयी डॉ. स्वाती कर्वे लिहितात,

''परिस्थितीजन्य जीवनाचे आकलन, आत्मविश्वास खच्ची करणारे वास्तव, मूल्यांची होणारी विटंबना, संस्कारित जीवनाचे होणारे अध:पतन, जीवनाची बदलती गणिते – त्यातून येणारे विपर्यस्त रूप आणि त्याला प्रमाण मानू पाहणारी संधीसाधू वृत्ती याचे विराट रूप प्रकट होत होते. याचा परिणाम म्हणजे प्रत्येक मिनिटागणिक भेडसावणारे विविध प्रश्न डोक्यात थैमान घालीत होते. पावलागणिक खच्ची होणारा आत्मविश्वास, स्वचे झपाट्याने होणारे अवमूल्यन, अस्तित्वहीनता जाणून देत होती; दुसरीकडे जीवनविषयीच्या स्वप्नांचा बंगला कोसळत होता. ही दुनिया आपली नाही; आपण दुनियेचे नाही. जगण्याची तरीही सक्ती आहे, हे समजत होते, जगण्याचे मार्ग मात्र उखडून गेले होते.

हा तरूण विवाहित असेल तर त्याचा संघर्ष अधिक तीव्र होतो. एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढताना त्याची चिरफाड होते. ही चिरफाड केवळ व्यावहारिक नसते. ज्या परिस्थितीतून, संस्कारांतून, मूल्यकल्पनांतून अस्तित्वाने आकार घेतलेला असतो त्या अस्तित्वाची चिरफाड होते. चौकटीत जगता येत नाही आणि चौकट फोडताही येत नाही. पाण्यात गोते खात बुडत बुडत जाणाऱ्या घागरीप्रमाणे जीवन बुडत जाते. स्वत:ची विटंबना सहन करणे; आणि वास्तवाच्या प्रखर, उखडून टाकणाऱ्या दर्शनाने कोसळून जाणे, ही संवेदनाक्षम मनाच्या मध्यमवर्गीय तरूणाची शोकांतिका असते.......

........नायकाची मन:स्थिती, त्याची वाढती भग्नावस्था, उद्विग्न करणारे जीवनवास्तवाचे भान, वेगाने कोसळत जाणारा आत्मविश्वास, परिस्थितीशरणता, वसूचे निरागसपण, कोवळे गर्भारपण, तिची स्वप्नावस्था, त्यातून येऊ पाहणारी जबाबदारी, ती पेलण्यास आपण असमर्थ आहोत; हे समजल्याने येणारे नैराश्य, होणारी कोंडी आणि तगमग, याची गडद होऊन वाढणारी

पातळी; या मनोवस्थेला अधिक महत्त्व आहे. मराठ्यांनी आपला कॅमेरा तरूणाच्या जीवनावर, त्यातही त्याच्या मनोव्यापारांवर, एकाग्र केला आहे.''[१२]

मानवी जीवनातील प्रखर वास्तव आणि नायकाची परिस्थितीशरणता ही येथे मराठे यानी प्रत्ययकारकरित्या मांडली आहे.

**२. काळेशार पाणी :**

विष्णू गवस ऊर्फ गावकर हा गावातील प्रतिष्ठित नागरिक असून त्याचे स्वत:चे एक कुटुंब असते परंतु प्रतिष्ठित नागरिक असल्याने तो बाई ठेवणे आपल्या प्रतिष्ठेचाच भाग समजतो. भिकी नावाच्या विधवा स्त्रीला तो आपली रखेल म्हणून ठेवतो. भिकीला दहा मुले होतात, परंतु विष्णू मुलांचे पालणपोषण करण्याची जबाबदारी स्विकारत नसतो. त्याला फक्त भिकीचा उपभोग त्याला पाहिजे तेव्हा हवा असतो. एके दिवशी विष्णूचे दुसऱ्या वाडीतल्या एका गावताबरोबर भांडण आणि मारामारी होते. त्या गावताने विष्णूला भरपूर शिव्या देऊन, अंग ठणकेपर्यंत बदडलेले असते. तेव्हा विष्णू भिकीकडे अंग चोळून आणि शेकून घेण्यासाठी येतो. त्याला भिकीचा उपभोग घेण्याची तशाही परिस्थितीत इच्छा होते. परंतु मुले उपाशी असताना भिकी त्याला लग्नाचा नवरा नसल्याची, धगड असल्याची जाणीव करून देते. मुलांना ती विष्णूकडे खायला मागायला सांगते. यावेळी विष्णूला भिकीकडून प्रेमाची सहानुभूतीची, सेवेची अपेक्षा असते. परंतु त्यांचा संपूर्ण अपेक्षाभंग होतो. तेव्हा तो अक्राळविक्राळ डोळे करून, दातओठ खाऊन भिकीवर संतापतो. पण भिकीने वास्तवाची जाणीव करून देताच त्याची कृती मंद होते. नंतर तो नुसताच थरथरत राहतो आणि त्याचे अंग कापायला लागते. शब्दांचे घाव विष्णूच्या जिव्हारी बसतात. शब्दांनी विष्णू घायाळ होतो. (पृ.२४,२५)

'आता ह्यसर बसान खा नको. आज मिया अजिबात हात लावाचय नाय नी जवळपण येवचंय नाय. पोरां उपाशी हंत, त्येंच्या पोटाची सोय कर. नाय तर ह्यो पिठाचो गोळो तुज्या माथ्यार थापतय. नाय तर बायलेची बांगडी भरून येवून हंय बस. नाय तर तिकाय कोनाची तरी रांड करून टाक–' (पृ.२६) या भिकीच्या शब्दांनी विष्णू आजारी असतानाही न थांबता, न

थकता चढाची घाटी चढून डोंगर कड्यावरच्या आपल्या घरी जाऊन माजघरातले तांदळाचे पोते भिकीच्या दारात आणून टाकतो.

'घे रांडे, ह्ये पोतंभर तांदुळ घाल तुज्या मड्यार. तुज्या नी तुज्या घाटी पोरांच्या. एक नंबरची मायझयी भिकारचोट आसस. सगळ्यांका ठार मारून टाक–' असे संतापून म्हणतच तो जमिनीवर खाली कोसळतो. (पृ.२६) एकीकडे गावकराबरोबर झालेल्या भांडणाने असहाय होऊन भिकीजवळ येतो त्यावेळी भिकीकडून त्याची अवहेलना होते. तेव्हा त्याची अस्मिता जागी होते व अंगात बळ नसतानाही तो तांदळाचे पोते आणून भिकीच्या दारात टाकतो. अहंकार दुखविल्यानंतरची त्याची ही कृती मराठ्यांनी लक्षवेधी अशी मांडली आहे.

विष्णूच्या आपमतलबी वृत्तीमुळे त्याला भिकीचे बोलणे ऐकून घ्यावे लागते. त्याच्यावर ओढवलेल्या वाईट प्रसंगाच्या क्षणीही भिकी त्याला त्याची कर्तव्यहीनता दाखवून देते. आपल्या वागण्यावर सामर्थ्यावर विष्णूला चीड येते आणि शेवटी तो भिकीच्या दारात तांदळाचे पोते आणून टाकतो, तेव्हा त्याला त्याच्या बायकोलाही तोंड द्यावे लागते.

मानसिक संघर्षाला सामोरे जाताना त्याची दोनही ठिकाणी फरपट होते. घरची परिस्थिती चांगली नसताना दोन घरांचा समतोल साधणे शक्य होत नाही. परंतु एकच तांदळाचे पोते विष्णू भिकीच्या दारात नेऊन ठेवतो तेव्हा त्याची बायकोही त्याच्यावर तांदळाच्या पोत्यासाठीच भांडते. एकाच वेळी त्याला दोन स्त्रियां आणि आपली शरीराची नाजूक अवस्था यांना सामोरे जावे लागते. त्यातच त्याचा अंत होतो. शरीराच्या दुबर्लतेबरोबरच तो मनानेही खचल्यामुळेच त्याचा लवकर अंत झालेला दिसून येतो कारण आजारी असण्याची किंवा शारीरिक तक्रारींचा उल्लेख लेखकाने कोठेही केलेला दिसून येत नाही. त्याच्या जीवनसंघर्षातील संघर्षामध्ये मानसिक संघर्षही त्याच्या वाट्याला आलेला दिसून येतो.

**३. इतिवृत्त :**

मुंबईच्या एका दैनिकात श्रीरंग नाडकर्णी उपसंपादकपद भूषवित होते. या दैनिकात त्यानी फेरफटका नावाचा कॉलम लिहिण्याचा उपक्रम चालू केला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून ते भोवतीच्या घडामोडी, व्यक्ती, प्रसंग, भाषण यांविषयी रसदार, चुरचुरीत, झोंबणारी, खुसखुशीत,

गुदगुल्या करणारी लेखांची मालिका वाचकांसमोर सादर करीत होते. त्यांच्या या सदराला नियमीत आवडीने आणि आठवणीने सदर वाचणारा वाचक वर्ग लाभला होता.

या दैनिकाचे संपादक बदलल्यामुळे त्यांनी नाडकर्णींचा कॉलम बंद करून टाकला होता. इतकी वर्षे कॉलम लिहिणाऱ्या नाडकर्णींना हा स्वतःचा अपमान वाटतो. पूर्वी लिहिणाऱ्यांपैकी फक्त नाडकर्णींचाच कॉलम बंद करण्यात आला होता. पूर्वीच्या त्यांच्या एका कृत्याचा सूड त्यांच्यावर येथे उगवला जातो. (पृ.८.९)

नाडकर्णींनी मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे यांच्या घरच्या जेवणाची, पार्टीची बातमी द्यायला नकार दिला होता. त्या घटनेचे पडसाद म्हणून नाडकर्णी यांचा फेरफटका कॉलम बंद करण्यात आला होता. नाडकर्णींचा फेरफटका कॉलम बंद करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आल्यानंतर वाचकांची पत्रे येऊनही त्यांचा कॉलम पुन्हा सुरू करण्यात आला नव्हता. हा नाडकर्णींचा अपमान होता. नव्या संपादकाला आपली लोकप्रियता सहन होत नाही हे पाहून ते अधिकच अस्वस्थ झाले. त्यांचे अस्तित्वच सीमित करण्यात आले होते. वयाची पन्नाशी जवळ आलेली असताना त्यांना नवीन काहीतरी शोधावं लागणार होतं. एकीकडे पत्नीचे आजारपण आणि दुसरीकडे नवीन काहीतरी शोधायचे या विचारांनी त्यांच्या मनाचा कोंडमारा झाला होता. (पृ.९,१०) आजवर नाडकर्णींनी गरिबीतून, अडचणीतून, प्रतिकुलतेतून संघर्ष करत यश संपादन केले होते. त्यामुळे अशा प्रसंगांनी ते अस्वस्थ झाले होते. त्यामुळेच त्यांनी नोकरी सोडण्याचा आणि फळणीटकर उद्योगसमूहाच्या 'जनता' दैनिकाचा संपादक होण्याचा निर्णय घेतला. (पृ.१४)

फळणीटकरांच्या 'जनता' दैनिकाचा संपादक झाल्यावर बाळासाहेबांबरोबर बोलत असताना श्रीरंग नाडकर्णींच्या मनातील राग, द्वेष, संताप बाहेर पडतो. त्यावरून त्यांच्या मानसिक संघर्षाची, झालेल्या कुचंबनेची कल्पना येण्यास मदत होते.

'तुमची गाठ पडली नसती ना बाळासाहेब, तर मी तिथंच वैतागत, कुजत पडलो असतो. आतल्या आत कुढत, धगधगत, जळफळत. ही ट्राइड टु फिल् माय जीनिअस. माझ्या प्रतिष्ठेवरच त्यानं घाला घातला. वुई वेअर कॉंपिटिटर्स. कंपनीनं त्याला संपादक पदावर अपॉइंट केलं आणि

वैर सुरू झालं आमचं. आमचं वैर कधी संपल नसतं. कारण तो आणखी पंधरा वर्ष संपादक राहिला असता. त्यानं मला फक्त कुजवत ठेवलं असतं. कधीच मला माझ नावं काही लिहू दिलं नसतं. चांगल्या असाइनमेंटस् अन् ऑपॉर्च्युनिटीज् दिल्या नसत्या. पण तो विसरला, नाडकर्णीपाशीही बुद्धी आहे. धडाडी आहे, इमॅजिनेशन आहे, करेज आहे. तोही काही करून दाखवू शकतो. नाऊ आय कॅन शो हिम – आय विल् शो हिम – नाडकर्णी ऑल्सो कॅन बी ए पॉवरफुल एडिटर. दि मोस्ट पॉवरफुल एडिटर इन धिस स्टेट.' (पृ.६६)

नाडकर्णी 'जनता' चे संपादक झाल्यावर त्यांच्या नि:स्पृह लेखणीने सामाजिक, आर्थिक अन्यायाचे, हॉटेल कामगारांचे प्रश्न हाताळतो. मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे यांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण वाचकांपुढे आणतो. तेव्हा मुख्यमंत्र्याचे साडू भोगले नाडकर्णींबाबत 'काय वाट्टेल ते लिवायला लागलंय भडवं!' अशी भाषा वापरतात. मुख्यमंत्र्यांच्या बेकायदेशीर, अनाधिकृत बांधकामाची माहिती आणि छायाचित्रे मिळविण्यासाठी गेलेल्या 'जनता' च्या वार्ताहराला मारहाण होते. त्याचा कॅमेरा हिसकावून घेतला जातो. या प्रकरणाची पोलिस चौकशी न करता संपादकांनाच प्रकरण वाढवू नका म्हणून समजावतात. राज्यात भ्रष्टाचार, निषेध–दिन पाळला गेला पाहिजे, यासाठी नाडकर्णी कामगार पुढारी भाई गोखले, विरोधी पक्षाचे आमदार बाबूराव साखरे, समाजपरिवर्तन दलाचे डॉ. अनिल वाळिंबे, महिला कृती समितीच्या प्रेमाताई वर्तक प्रभृतींना पुढाकार घ्यायला प्रवृत्त करतात. हे सारे वृत्त छायाचित्रासह प्रसिद्ध करण्यासाठी नाडकर्णी जिवाचे रान करतात. पण मुख्यमंत्र्याचे काही लोक 'जनता' वर हल्ला करतात आणि सगळ्या प्रति नष्ट करतात. फळणीटकर उद्योगसमूहाला खत कारखान्याचा परवाना मिळालेला असतो पण मुख्यमंत्र्यांची सही व्हायची असते. फळणीटकर मुख्यमंत्र्यांचा हेतू समजून घेऊन नाडकर्णींना राजीनामा देण्यास भाग पाडतात. (पृ.१६८,१६९,१७७,२३३,२३४,२३५,२३६)

अत्यंत सचोटीने, सत्याने काम करणारे, आपल्या तत्त्वांना प्रामाणिकपणाचा, न्यायाचा अनुभव असणारे श्रीरंग नाडकर्णी आपले काम चोख बजावतात, परंतु समाजातील भ्रष्ट राजकारण, राजकारणाच्या आश्रयाने चालणारे उद्योगसमूह आपल्या फायद्यासाठी सामान्य जनतेचा बळी घेतात. परंतु सामान्य जनतेसाठी लढणारे श्रीरंग नाडकर्णी त्यात अपयशी होतात. हे

सर्व करत असताना त्यांना मानसिक संघर्षांना सामोरे जावे लागले. परिस्थितीपुढे त्यांना हतबल व्हावे लागते. श्रीरंग नाडकर्णीसारख्या संपादकांना समाजव्यवस्थेने संघर्ष करण्यास भाग पाडले त्याविषयी वि. स. वाळिंबे म्हणतात,

"सर्वंकषता हा सत्तेचा स्वभावच असतो. मग ती राज्यसत्ता असो वा अर्थसत्ता असो. म्हणूनच या दोन सत्तांमध्ये सुरूवातीला संघर्ष झाला, तरी शेवटी त्या परस्परांशी आपल्या स्वार्थी आणि आपमतलबी अस्तित्वासाठी जुळवून–जमवून घेत असतातच.

सध्याच्या वाढत्या औद्योगिकरणाच्या काळातले हे वास्तव वरकरणी विचित्र वा गुंतागुंतीचे वाटले, तरी भयानक आहे. शासकीय उद्योग आणि खासगी क्षेत्रातले उद्योग यांच्यातल्या साहचर्यावरून या वास्तवाची प्रचिती येते.

अशा परिस्थितीत, आपल्या अंत:करणातली धगधगती निष्ठा एवढाच ज्याचा एकमेव आधार आहे, अशा एकाकी माणसाचा पराभव होणे अटळ ठरते.

जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या लोकनायकाच्या नशिबी हे आले, तिथे श्रीरंग नाडकर्णी कितीसा पुरा पडणार?"[१३]

नाडकर्णींना करावा लागलेला संघर्ष राज्यसत्ता, अर्थसत्ता यांसाठी धडपडणाऱ्या राजकारणी लोकांच्या कारवायांमुळे आहे. या सर्व विरोधी पार्श्वभूमीवर स्वत:चा ठसा उमटविण्यासाठी नाडकर्णींना मोठ्या दिव्यातून जावे लागते. एकीकडे स्वत:चा स्वाभिमान तर दुसरीकडे वरिष्ठांची मर्जी सांभाळत असताना त्यांना स्वत:च्या कुटुंबाकडेही दुर्लक्ष करावे लागते. स्वत:च्या मनाचा विचार न करता प्रवाहबरोबर वाहत जावे लागते.

**४. कुरूक्षेत्र :**

शांतीवन महाविद्यालयाची स्थापना डॉ. म्हसकर करतात. या कामी डॉ. म्हसकरांना पंडित नेहरूंचे मार्गदर्शन लाभले होते. या महाविद्यालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. राधाकृष्णन हजर होते. एवढ्या मोठ्या व्यक्तींच्या कार्यास आपला हातभार म्हणून या महाविद्यालयाचे प्राचार्य बेलसरे निष्ठेने शिक्षणाचे काम करतात. प्राचार्य बेलसरे शिक्षणक्षेत्रात स्वत:च्या जाज्ज्वल्य आणि आंतरिक निष्ठेने आले होते. त्यांच्यावर डॉ. म्हसकरांच्या विचारांचा, आचारांचा, संस्कारांचा ठसा उमटला

होता. त्यांना आणि डॉ. म्हसकरांना या महाविद्यालयातून निर्मितीक्षम माणसे घडवायची होती. या महाविद्यालयातून त्यांना कल्पक, कर्तबगार आणि कार्यक्षम नागरिक घडवायचे होते. (पृ.६.७)

डॉक्टर म्हसकरांच्या आत्महत्येनंतर शांतीवन एज्युकेशन सोसायटीने पंचवीस हायस्कुलं आणि पंधरा कॉलेजं खोलली. या सर्व संस्थेचे अधिकार तुकाराम फराटे यांच्याकडे होते. तुकाराम फराटेंनी या शिक्षणसंस्थेच्या कारभारावर गाडी, बंगला, शेती, ट्रॅक्टर घेतला. साखर–कारखान्यात डायरेक्टरपद मिळवले. जिल्हा परिषदेवर निवडून आले. तुकाराम फराटेंबरोबरच त्यांच्या भावाने फर्निचरचे दुकान थाटले, तो बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर होतो. दुसऱ्या भावाने शाळा कॉलेजांना लागणारी स्टेशनरीची एजन्सी घेतली. तुकाराम फराटेंच्या बंगल्यावर पार्ट्या होऊ लागल्या, तरूण–तरूणी नोकरीसाठी बंगल्यावर फिरू लागले.

एकीकडे प्राचार्य बेलसरेंच्या समोर हा अन्याय, भ्रष्टाचार चालू होता. तर दुसरीकडे शिक्षकांचे पगार थकले होते. (पृ.२२,२३) तुकाराम फराटे नंतर विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून येतात. शांतीवन कॉलेजवर क्रांतिकारी युवक दलाची मुले मोर्चा काढतात. कॉलेजात प्राध्यापकांना पगार मिळत नव्हते, संस्था चालकांनी अनुदान हडप केले होते. डॉ. म्हसकरांचा मृत्यू संशयास्पद होता. तुकारामदादांनी जमीनव्यवहारात केलेला भ्रष्टाचार, दलित विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय, कमी पगार देऊन जादा रकमेवर शिक्षकांच्या सह्या घेणे, होस्टेलमधील जेवणाचा खालावलेला दर्जा, विद्यार्थ्यांच्या स्कॉलरशिपमधील गैरव्यवहार अशा विविध गोष्टींच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मोर्चा काढला जातो. (पृ.४४) वरील सर्व गोष्टी उघड होण्यामागे बेलसरेंचा हात आहे असा आरोप त्यांच्यावर केला जातो. वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध होण्यामागे बेलसरेंचाच हात आहे असाही आरोप त्यांच्यावर होतो. (पृ.४६,४७) या सर्व प्रश्नांवर न्याय मागण्यासाठी विद्यार्थी प्राचार्य बेलसरेंना घेराव घालतात. याच दरम्यान तुकारामदादा फराटेंना चेअरमनपदाची लालसा लागते. (पृ.५३) तुकारामदादा फराटे, त्यांचे भाऊ आणि त्यांच्याविरूद्ध कॉलेज, होस्टेलचे विद्यार्थी यांच्यात मोर्चा, निषेध, मोर्चाला प्रतिकार असे प्रसंग घडतात. या सर्व प्रकारांत काही विद्यार्थ्यांचे हात–पाय दुखावतात तर काही मुलामुलींचे कपडे फाटले जातात. वर्तमानपत्रात हे सर्व छापून येण्यामागे बेलसरेंचाच हात आहे

असे समजून तुकाराम फराटे बेलसरेंच्या घरी जाऊन त्यांना दमदाटी करतो. भावे मास्तर तुमच्या सांगण्यावरून मोर्चे, पेपरमधील लेख देतो. तेव्हा त्याला आवरण्यास बजावतात. आमच्या मार्गात येणाऱ्याला आमी पुर्ता खलास करून टाकतो अशा शब्दात बेलसरेंना फराटेंकडून धमकी मिळते.

या सर्वांचा परिणाम बेलसरेंच्या वागण्यावर होतो. प्राचार्य व्हरांड्यात, दीर्घकाळ विचार करत येरझाऱ्या घालत बसतात. उल्हास भावेबरोबर जेवण करताना ते पूर्वीसारखे गप्पा, हास्य–विनोद चर्चा करत नाहीत. (पृ.६०) बेलसरे आंदोलन थांबवण्यासाठी उल्हास भावेला सांगतात, पण भावे त्याला नकार देतो. (पृ.६२) भावेचा ठामपणा पाहून बेलसरेंना आनंद होतो. अन्यायाविरूद्ध निमूटपणे बसून प्राचार्य सर्व सहन करतात. त्यांच्यासमोर झालेल्या खुनाची ते कोठेही वाच्यता करू शकत नाहीत. त्यांचा मानसिक कोंडमारा पुढील संवादावरून दिसून येतो,

“डॉक्टर म्हसकरांचा गूढ मृत्यू. सगळेजण समजतात डॉक्टरांचा मृत्यू गूढ आहे. त्यांनी आत्महत्या केली. इच्छामरण स्वीकारलं. पण नाही आय नो दि ट्रुथ. फक्त मलाच माहीत आहे त्यांचा खून झालाय. माझ्यासमोर, माझ्या डोळ्यांदेखत आय ॲम दि ओन्ली आय विटनेस. सरकारी सवलतीचा फायदा घेण्यासाठी, शिक्षणासाठी खर्च होणाऱ्या पैशाचा ओघ आपल्याकडे वळवायचा की नाही या मुद्द्यांवर भांडण झालं. डॉक्टरांच आणि तुकारामदादाचं. डॉक्टरांचा विरोध होता. संस्थेचा व्याप आणि पसारा वाढवायला. कारण त्यामुळे क्वालिटी कमी होते. मूळ हेतू नष्ट होतो. पण तुकारामदादाला पैसा दिसत होता. कित्येक शाळा, कित्येक कॉलेजे, शेकडो शिक्षक, प्राध्यापक, इमारती, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सेवकवर्ग – सर्वांसाठी सरकारी पैसा लाखोंनी मिळणार होता. डॉक्टरांचा विरोध त्याला सहन झाला नाही. त्याने रागाने त्यांच्या अंगावर झडप घातली. त्यांचा गळा दाबला. माझ्या डोळ्यांसमोर. माझी भीतीने गाळण उडाली. क्षणार्धात डॉक्टरांचा प्राण गेला! त्याने त्यांचं प्रेत त्याच आवेगानं उचलल आणि पाठीमागच्या शेतातील विहिरीत नेऊन टाकलं – परत आला. त्याचे हात, त्याची बोटं आणखी एका गळ्याभोवती घट्ट आवळलं जायला शिवशिवत होती. माझ्यासमोर तो येऊन उभा राहिला. मी त्याचे पाय धरले. मी तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक बेलसरे – मी गीतेचा अभ्यासक बेलसरे – मी आत्म्याच्या अमरत्वावर श्रद्धा असणारा प्राध्यापक बेलसरे – मी भयाने थरथरत, प्राणभयाने

थरथरत त्याचे पाय धरले. त्याला विनवलं, तुकारामदादा मला मारू नको. मला मान्य आहे तुझी कल्पना!" (पृ.६३,६४)

या सर्व घटना प्रसंगांचे साक्षीदार असलेले प्राचार्य बेलसरे यांच्या मानसिक संघर्षाची कल्पना आपल्याला येते ती त्यांच्या विरोधाभासी स्वभावामुळे. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, खून अशी पार्श्वभूमी असलेल्या संस्थेत ते नोकरी करताना दिसून येतात. गप्प बसून स्वत:चा जीव वाचवण्यासाठी, त्यांना तुकाराम फराटेंच्या गुन्ह्यांची, संस्थेच्या भ्रष्टाचाराची वाच्यता कुठेही करता येत नाही. अन्यायाविरूद्ध आवाज उठवता येत नाही. कारण ज्या लोकांच्या विरूद्ध लढायचे असते; त्या लोकांबरोबरच ते काम करत असतात. धरलं तर चावतय आणि सोडलं तर पळतय अशी परिस्थिती त्यांची होते.

या लोकांना विरोध केला तर जीवाची भिती आणि निमूट कार्य करावे तर मनाची घुसमट. एवढ्या मोठमोठ्या घटना नजरेसमोर घडत असूनही, हे सर्व चुकीचे आहे हे समजत असूनही ते काहीही करू शकत नाहीत. इतक्या वर्षात एकदाच त्यांनी ही बातमी उल्हास भावेसमोर उघड केली पण त्यांनाही आपल्या प्राणाला मुकावे लागले. आर्थिक, राजकीय पाठबळ असलेल्या लोकांच्या शोषणाचा ते एकप्रकारे बळी ठरले होते. पद, पैसा, प्रतिष्ठेच्या मागे लागलेल्या मदांध लोकांच्या गराड्यात सापडलेले प्राचार्य बेलसरे स्वत:ची ओळखच विसरून जाताना दिसतात. शिक्षणक्षेत्रासारख्या पवित्र मानल्या जाणाऱ्या ज्ञानमंदिरात ते नंदादीपासारखे उजळत न राहता वाऱ्याच्या झोतात सापडलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणे जळत आणि थरथरत राहतात.

कादंबरीच्या उत्तरार्धात वसंतराव दामले हे सुमाचे पती व्यवसायाने शिक्षक असलेले पात्र. वसंतराव दामले आपली पत्नी सुमा हिने डि.एड. करून शिक्षिका व्हावे, पगार कमवून संसाराला हातभार लावावा अशी अपेक्षा धरून, लग्नाच्या आधी तशी बोलणी करून सुमाशी लग्न करतात. पण सुमा डोळ्यांनी अधू असल्याने तिला अभ्यासात, घरकाम करण्यात अडचणी येतात. त्यामुळे त्या दोघांमध्ये सारखी भांडण होतात. बायकोने आपली सेवा करावी, आपले म्हणणे ऐकावे, आपली मर्जी सांभाळावी असे पुरुषप्रधान विचारसरणीचे दामले यांचा सुमाकडून अपेक्षाभंग होतो.

सुमाही तिच्या अधूपणामुळे हतबल असते. सुमाची इच्छा नसताना तिला शिक्षण घ्यावे लागते. काम करण्यासाठी शारीरिक, मानसिकदृष्ट्या खचलेली असताना संसाराचा गाडा ती ओढते.

सुमाच्या रागावण्याने आपल्या मनासारखे आपली पत्नी वागत नाही या गोष्टींमुळे दामले आणखीनच चिडताना दिसतात. आपली बायको मास्तरीण झाली नाही. तिच्या बाबांनी त्यांचा शब्द पाळला नाही म्हणून दामले सतत भांडताना दिसतात. या सर्व गोष्टींना सुमा आणि तिचे बाबाच कारणीभूत आहेत असे मानून एक दिवस दामलेंचे सुमाच्या बाबांशी भांडण होते. त्यांनी आपला शब्द पाळला नाही म्हणूनच आपले नुकसान झाले हे त्यांच्यात झालेल्या शाब्दिक चकमकीवरून लक्षात येते.

'कसलं काय? थेरड्या, कसलं नुकसान? हिला डी.एड. करून मास्तरीण करायचं कबुल कोणी केलं होतं? तूच ना हरामा? ती मास्तरीण झाली नाही. पगार बुडाला. मास्तरणीशी लग्न केलं असतं तर तिनं तीन वर्षात वीस हजार रूपये दिले असते, ते बुडाले. दागिने विकून ते पैसे वसूल करून घेतले असं समजा–' (पृ.१४९)

स्वत:च्या कर्तव्याकडे पाठ फिरवून पत्नीच्या नोकरीच्या पैशात आपण सुखी रहावे अशा भ्रमात राहून अपेक्षाभंग झाल्याने मानसिक स्वास्थ्य गमावलेला एक पुरुष अशीच दामले यांची प्रतिमा पुढे येते.

**५. कलियुग :**

कामगार नेता असलेला जगताप कामगारांच्या मागण्यांसाठी लढतो. एके दिवशी ते मशीनवर काम न करता सुपरवायझर गाडगीळ यांच्या खुर्चीत बसतो. हे प्रकरण वरिष्ठांपर्यंत जाऊन पोहोचते. एक्झिक्युटीव्ह कत्रे जगतापची कॉलर धरून, मानगूट पकडून, शिवी देऊन जगतापला खुर्चीतून उठवतात तेव्हा जगताप रागाने थरथरत राहतो. त्याचा इतर कामगारांसमोर अपमान होतो. चौघुले जगतापची शाब्दिक मानहानी करण्यास सुरूवात करतात. तेव्हा जगताप त्यांच्यावर 'बस करा चौघुलेसाहेब तुमचा नाट्यप्रयोग–' अशा कडक शब्दांत संतापून ओरडतो. त्या दिवशी जगतापचे कामावर लक्ष लागत नाही. जॉब चुकला म्हणून सुपरवायझरची बोलणी खाल्ली. त्याला दंड भरावा लागला. त्याचे शरीर आणि हात थरथरू लागले. डोकं दुखू लागले.

अर्ध्या दिवसाची रजा घेऊन आणि घरी येताना पाटीलसोबत मद्यपान करण्याची तयारी करून येतात. (पृ.१३,१४,१८,१९) येथे जगतापच्या मनावरील झालेल्या आघातांचा प्रत्यय येतो.

एक्झिक्युटीव्ह कत्रे यांनी असे करण्यामागे त्यांची मानसिक परिस्थितीच जबाबदार असलेले काही प्रसंगांवरून दिसून येते. ही घटना घडल्यावर कत्रेही रात्री उशिरापर्यंत पीत बसतात. सकाळच्या प्रसंगाने त्यांच्या जीवनातील पूर्वीचा एक प्रसंग आठवतो. अगोदरच्या कंपनीत जेव्हा ते साधे फिटर होते आणि त्यांच्यासमोर एका गरजू गरीब कामगाराला कत्रेसाहेबांनी विनंती करूनही काढून टाकले होते. हा सर्व प्रकार कत्रे यांना सहन झाला नव्हता. त्यामुळेच ते कामगारनेता झाले होते. कंपनीचा राजीनामा मागून कामगारांना नुकसान भरपाईला वंचित करण्याचा डाव त्यांनी उधळून लावला होता. कामगारांना नुकसान भरपाई देऊन, लायक कामगारांना कंपनीला कारखान्यात घ्यायला भाग पाडतात. कामगारांच्या मागण्या आणि कंपनीची भूमिका यांच्यात कत्रेंनी समन्वय घडवून आणला म्हणून कंपनीने त्यांना फर्निचर, सोफासेट, खुर्च्या, कपाट, रेडिओ त्यांच्या नकळत घरी पाठवले होते. कत्रेंचा याला विरोध होता. ते कामगारांना जाहीर सभेत सर्व सत्य परिस्थिती सांगून टाकतात. कंपनीने कत्र्यांवर, व्यवस्थापनाच्या चारित्र्यावर आरोप केल्याचा परिणाम म्हणून राजीनाम मागितला जातो. (पृ.२०,२२,२४,२५,२६,२७,२८,२९) प्रामाणिकपणे वागूनही कत्र्यांच्या नशिबी अपमान, बेअब्रू, बेकारी, मानहानी येते. कामगारांचा आणि कंपनीचा रोष एकाच वेळी त्यांच्यावर येतो त्यामुळे स्वत:चाच स्वत:शी मानसिक संघर्ष सुरू होताना दिसतो.

कामगार, कामगार नेते आणि कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांच्यात मतभेद वाढतच जातात. एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप होतच राहतात. या सर्वांचा परिणाम कंपनीच्या प्रॉडक्शनवर होतो आणि प्रॉडक्शन नाही म्हणून सेल्स आणि रिकव्हरी नाही. त्यामुळे तिजोरीत ठणठणाट होतो. हे सर्व प्रश्न समोर उभे राहिलेले पाहून कत्रे यांना स्वत:चा राग येऊ लागतो. त्यांच्या मनात विचारांचे वादळ सुरू होते, “मलाच आता अधिक लक्ष द्यायला हवं. पण त्या आधी उद्या बोर्ड मीटिंगमध्ये मान खाली घालायला हवी जा तुम्ही सगळे.”

सगळे उठून भराभरा निघून जातात. कत्रे सिगरेट ओढत ते एकटेच आपल्या एअर कंडिशण्ड रूममध्ये भसाभसा धूर सोडीत बसून राहतात. अस्वस्थ, अशांत उद्याच्या मानहानीच्या कल्पनेने. उद्या आपल्याला कसं अकार्यक्षम ठरविण्यात येईल याच्या कल्पनेने .....

दुसरी सिगरेट अर्धवट चुरगाळून टाकताना त्यांना वाटून जाते – साधा कामगारच राहिलो असतो तर! पण या झंझाटात येऊन पडायचं होतं – हे एअर कंडिशण्ड ऑफिस, कंपनीची गाडी, असोसिएट व्हाइस प्रेसिडेण्टपद आणि या काळज्या, हे ताण, हे उग्र संतापाचे कट. या कत्र्यांच्या स्वगतावरून त्यांचा मानसिक संघर्ष आणि अस्वस्थता दिसून येते.

कंपनीतील काही लोकांच्या राजकारणाचा परिणाम कत्रे हटाव या मोहिमेत होतो. कंपनीचे प्रॉडक्शन वाढावे म्हणून कत्रे सतत प्रयत्नशील असतात, पण वरिष्ठांच्या कटकारस्थानांचा ते बळी ठरतात. कंपनी आपल्याला काढून टाकेल अशी शक्यता दिसताच कत्रे पुन्हा चवताळून उठतात. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांचे विचारचक्र सुरू होते, "कत्रे यांनी प्रधानांकडे रोखून बघत म्हटलं, म्हणजे मला घालवावं असा सल्ला तुम्ही कंपनीला देणार. बट रिमेंबर, प्रधान, आय विल नॉट गो. मी जाणार नाही. मी कधीच जाणार नाही. मी माझा बळी घेतला जाऊ देणार नाही. एकदा माझा बळी घेतला गेला. माझ्या उर्मीचा, माझ्या प्रेरणांचा, माझ्या श्रद्धांचा. आता दुसऱ्यांदा नाही  नो नो. दुसऱ्यांदा कुणाला मी बळी घेऊ देणार नाही. वाटेल त्या मार्गाने विरोध करीन; पण कुणाला मी माझा बळी घेऊ देणार नाही, नाही, नाही.

कत्रे खूपच मोठ्यानं म्हणाले आणि डोळ्यांत अनावर संताप, त्वेष साठवून खोलीच्या कोपऱ्यात बघत्त राहिले." (पृ.९७)

कत्रे बापू पाटीलला जगतापच्या विरोधात भडकवतो आणि बापू पाटीलच्या हातून जगतापच्या दोन मुलांचा खून होतो ही बातमी वाचून कत्रे अस्वस्थ होतात.

जगतापच्या दोन मुलांचे खून .....

आपल्याकडून गेल्यानंतर बापू पाटीलने ......

ते लख्ख जागे झाले.

त्यांनी पुन्हा बातमी वाचली.

थोडा वेळ तसेच सुन्न बसून राहिले.

मग, अस्वस्थ, अशांत होत उठले. खोलीतल्या खोलीत त्यांनी काही फेऱ्या मारल्या. मग पुन्हा बसले. पुन्हा उठले. पुन्हा फेऱ्या मारल्या.

अस्वस्थता कमी होईना, तेव्हा त्यांनी व्हिस्कीची बाटली काढली. तशीच तोंडाला लावली.

लवकरच त्यांच्या जाणिवांवर त्यांच्या नशेचा जाड थर साठत गेला. ते त्या नशेतच स्वत:ला बघू लागले.

आपल्यातून आकाराला येणारं एक हिंस्र श्वापद त्यांना दिसू लागलं. स्वत: जखमी झालेलं असतानाही दुसऱ्यावर झडप घालणारं. (पृ.१२७)

कत्रे या सामान्य कामगाराचे कामगार नेत्यात रूपांतर होईपर्यंतचे टप्पे त्यांना कसा मानसिक संघर्ष करायला लावतात याचे मार्मिक चित्रण ह. मो. मराठे यांनी कलियुगमधून केले आहे. लोभ, भ्रष्टाचर माणसाला संपवतो, मानहानीच जीवन जगायला लावतो हे माहीत असूनही कत्रे यांनासुद्धा पद, प्रतिष्ठेची हाव सुटलेली दिसून येते. आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी ते सर्व मार्गांचा अवलंब करताना दिसतात.

परिस्थितीने त्यांना संघर्ष करण्यास भाग पाडले असेच म्हणावे लागेल. सत्तेची हाव आणि आर्थिक संघर्ष कत्रेंना शेवटी मद्याच्या नशेत आणून सोडतो. ज्या गोष्टींना सुरूवातील कत्रे विरोध करतात, त्याच गोष्टी करण्यास ते नंतर उद्युक्त होताना दिसतात. संघर्ष कोणताही असो, एका विशिष्ट मार्यादेपर्यंतच मनुष्य सहन करू शकतो हेच यातून जाणवते. चांगले–वाईट समजून घेण्याचे तारतम्यही अतिसंघर्षापोटी सुटते हे वास्तव समजण्यासाठी यातून मदत होते.

**६. देवाची घंटा :**

या कादंबरीतील नायक 'गोप्याभट' मारूतीच्या देवळात रहायला आलेला असतो. तेव्हा येसूही मारूतीच्या देवळात तिच्या आईबरोबर झाडलोट करायला येत असते. गोप्याभट विहिरीवर अंघोळ करत असताना, मारूतीच्या देवळात पूजा करत असताना येसू तिथेच त्याच्या आजूबाजूला काम करत असते. तिचा आजूबाजूचा वावर गोप्याला अस्वस्थ करतो. येसूच्या

कधीकधी होणाऱ्या शरीरदर्शनाने गोप्याचे चित्त विचलित होते. मग तो तिची नजर चूकवून तिला न्याहाळतो. परंतु त्याचे मन त्याला या गोष्टींसाठी अपराधी मानत असे म्हणून तो येसूला सुरूवातीला टाळतो. तिला लांब जाण्यास सांगतो. तेव्हा येसू त्याला कारण विचारी. तेव्हा गोप्या भट सांगत असे;

"चित्त विचलित होतं. त्यात मी मारूतीरायाचा पुजारी. तो बालब्रह्मचारी आणि त्याची पूजा करताना तू समोर दिसतेस. काय होईल माझं? शाप देईल मला मारूतीराया."

त्यानं काय सांगितलं ते तिला नीटसं समजलं नाही. त्याचे शब्दच तिला अपरिचित होते. म्हणून तिनं आश्चर्यानं विचारलं,

"मी हंयसर इलंय, तर काय होता?"

"चित्त विचलित होतं"

"म्हणजे काय?"

"गडबड होते. पूजेकडे लक्ष लागत नाही. मनात भलते विचार येतात." (पृ.१९)

मानसिक भावना, विवेक, शारीरिक गरज अशा विचारांच्या गर्तेत गोप्याभटाला येसूपासून दूर राहता येत नाही आणि मोकळेपणाने तिच्याशी जवळीकही साधता येत नाही. हे मानसिक द्वंद्व मराठे यांनी प्रत्यकारकरित्या टिपले आहे.

गोप्याभट नंतर येसूच्या आईची परवानगी घेऊन, येसूच्या प्रपंचाची जबाबदारी घेईन असे सांगून येसूला एक रूम घेऊन तेथे ठेवतो. नंतर त्याला शंकऱ्या चंद्री अशी अपत्ये होतात. पूजेच्या पैशातूनच तो चौघांचा चरितार्थ चालवीतो. परंतु मंदिराच्या मालकाच्या मृत्यूनंतर मंदिराच्या उत्पन्नाचे हिस्से होतात. गोप्याभटाला कुटुंबाचा चरितार्थ चालविणे कठीण होऊ लागते. तेव्हा तो लपून लपून मंदिरातले पैसे, नारळ, पेढे, गूळ, साखर आठवडाभर साठवून शनिवारी येसूला नेऊन देतो.

नंतर त्याला येसूला काहीही नेऊन देणे अशक्य होऊ लागते. या चौघांवरही उपासमारीची पाळी येते. त्यातच येसू आणि दोन्ही पोरं गोप्या भटाकडे खायला मागण्यासाठी तगादा लावतात. येसू गोप्या भटाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देते. गोप्याभट

परिस्थितीमुळे काहीही करू शकत नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून गोप्या एके दिवशी मंदिरात चोरी करतो. (पृ.६०)

गोप्या भटावर चोरीचा आळ येतो. त्यातच तो खूप आजारी पडतो. त्याचे वडील त्याला त्याच्या मनाविरूद्ध घरी घेऊन जातात. एकीकडे कुटुंबाची जबाबदारी सांभाळायची असते. दुसरीकडे मालकांची मर्जी सांभाळायची असते आणि मंदिराचे पावित्र्यही जपायचे असते हे सर्व गोप्याभटाला माहीत असते. परंतु कुटुंबाची भूक आणि स्वत:ची शारीरिक भूक या दोन्ही संघर्षांमध्ये त्याच्या मनाची अवस्था बिकट होते आणि पर्यायाने त्याचे रूपांतर चोरी करण्याच्या गुन्ह्यामध्ये होते.

**७. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

मि. रमेश पंडित विवाहित होते परंतु त्यांना बरीच वर्षे अपत्यप्राप्ती होत नाही. अपत्यप्राप्तीसाठी जेव्हा ते डॉक्टरांकडे जातात तेव्हा डॉक्टर काय रिपोर्ट सांगतील यांकडे त्यांचे लक्ष लागलेले असते. संपूर्ण आयुष्यातील महत्त्वाचा ठरणारा निर्णय एका क्षणात समजणार असतो. डॉक्टर यावेळी आयुष्याची कोणती दिशा दाखवतील यावर संपूर्ण आयुष्याची रूपरेषा ठरणार असते. जीवनातील त्याच्याविषयीचे सत्य डॉक्टर सांगतात, नो होप्स...... नो होप्स. त्या क्षणी तो सर्वांग थरथरतो, त्याला भिती वाटते.

''डजण्ट मॅटर, डॉक्टर. कोई बात नही. नाही तरी करायची असतात काय पोरं? साल्यांना मरमरून वाढवायचं आणि ती साली, शेवटी आई–बापांच्या अंत्ययात्रेलासुद्धा येणार नाहीत. इथून पुढल्या जगात माणसाच्या आयुष्यात मूल होणं या गोष्टीला फारसं महत्त्वच उरलेलं नाही. एकप्रकारचा गुन्हाच असतो मूल जन्माला घालणं म्हणजे.

मजा करायची आईबापांनी आणि सजा भोगायची पोरांनी? मजा कोणाची, सजा कोणाला!'' तो स्वत:च गडगडत हसत म्हणाला ....... (पृ.७,८) कॅन बी फादर, हेच ना डॉक्टर? डॉक्टरांच्या बोलण्यावर आपली मोठ्या स्वरातील हास्याची प्रतिक्रिया व्यक्त करीत तो म्हणतो, ''डॉक्टर, असा ट्राय करण्यात काय अर्थ आहे? मला निसर्गानं पितृत्वाची शक्ती दिलेली नाही. इतकाच त्याचा अर्थ. जगात अशी कितीतरी जोडपी आहेत. ज्यांना मूलबाळ नाही. पण इथं ते

हवय कुणाला? मला काही उणीव वाटत नाही, पोरं नसल्यानं आयुष्यात. माय वाइफ इज आल्सो वाइज इनफ. ती दुसऱ्या कशासाठी तरी आयुष्य खर्चू शकेल. आपली पोरं उबवीत बसणं म्हणजेच काही सर्वस्व नव्हे. रिअली इट इज अ नॉनसेन्स – अर्थशून्य अशी धडपड. अर्थशून्य असा कालापव्यय आणि मूल नसणं हे बुद्धी नसण्यापेक्षा खचितच कमी तापदायक काय?'' (पृ.९) आपलं खाजगी रहस्य कोणाला सांगू नये म्हणून तो डॉक्टरांना विनवितो. रमेश पंडितच्या मनात चाललेली चलबिचल, त्याच्या मानसिक प्रतिक्रिया त्याने डॉक्टरांना दिलेल्या उत्तरातून दिसून येतात. आपल्या या रिपोर्टमुळे आपली पत्नीही नाराज होणार नाही, मुले उबवीत बसणे, वेळेचा अपव्यय करणे. आपल्या पत्नीला आवडणार नाही असेही तो सांगतो. पत्नीच्या प्रतिक्रियाही तो तिला न विचारताच डॉक्टरांना मनाच्या हताश अवस्थेत देताना दिसतो. स्वत:ला सावरण्यासाठी, धीर देण्यासाठी तो अशा शब्दांचा उपयोग करताना दिसून येतो. हे सर्व मानसिक पातळीवर चाललेल्या शरीराच्या दुर्बलतेवर पडदा टाकण्यासाठीच करताना दिसतो. मनाच्या वरच्या कप्प्यात मूल नसलं तरी चालेल म्हणारा नायक आतल्या मनाच्या आवाजासाठी डॉक्टरकडे आलेला असतो. पण इथे तो स्वत:ची समजूत घालतानाचे चित्र ह. मो. मराठे यांनी परिणामकारकपणे रेखाटले आहे.

डॉक्टरांचा रिपोर्ट ऐकल्यानंतर रमेश पंडित नेहमीप्रमाणे आपल्या मित्राकडे म्हणजेच विष्णूकडे मन मोकळे करण्यासाठी येतो. घरी आल्यावर तो विष्णूच्या मुलांशी तटस्थपणे वागतो. कोणाशी जास्त काही बोलत नाही. या प्रसंगांवरून त्याची मानसिक परिस्थिती लक्षात येते. (पृ.१३) मग दोघे मित्र हॉटेलमध्ये बसलेले असताना त्यांच्यात जो संवाद होतो त्यावरून रमेश पंडितच्या मानसिक संघर्षाची कल्पना येते. ''इतकं काय भयंकर घडलंय, की तुला आयुष्य हातातून निसटल्यासारखं वाटावं? मलाही नाही सांगणार?''

तो त्याच्या शब्दांनी उत्तेजीत झाल्यागत म्हणाला, ''आज डॉक्टरांचा रिपोर्ट मिळाला. मला मुलं होणारच नाहीत. आय ॲम नॉट केपेबल ऑफ इट ........ '' इतकं बोलून त्यानं आपलं तोंड ओंजळीत झाकून घेतलं आणि तो आतल्या आत गुदमरत हमसू लागला.'' (पृ.१६)

डॉक्टरांनी रमेश पंडित मूल जन्माला घालण्यासाठी पात्र नाही असा निष्कर्ष दिल्यापासून तो अस्वस्थ होतो. त्याचे कशातही लक्ष लागत नाही. रमेश पंडित आणि विष्णू दोघेजण बागेत बोलत असताना रमेश पंडित विष्णूसमोर आपले मन मोकळे करतो, त्यातील संवादावरून, रमेश पंडितच्या परस्परविरोधी स्वत:च्याच वक्तव्यावरून त्याच्या दु:खाची, त्याच्या संघर्षाची जाणीव होण्यास मदत होते.

"हो, या रमेश पंडितचं असं व्हायचं होतं, तो मूल निर्माण करण्यास असमर्थ ठरायचा होता. निसर्गानं मला शिक्षा दिलीय ही.

नेचर हॅज पनिश्ड मी ........ " (पृ.१८)

"निसर्गानं कसली शिक्षा दिलीय ........शिक्षा तरी कसली? हे असं असं आहे देवाच्या मनात जे होतं." "देवाच्या नाही, निसर्गाच्या. इतर सगळं माझ्यापाशी आहे. रूप आहे. विद्या आहे. नोकरीधंदा आहे. पैसा आहे. प्रेस्टीज आहे. पत्नी आहे. घर आहे. पण पुरुषत्व नाही! पत्नीच्या ठिकाणी गर्भधारणा होण्यासाठी आवश्यक असे जंतू निर्माण करणारी ग्रंथीच तेवढी माझ्यात नाही. सगळं मला निसर्गानं दिलं. जे दिलं नव्हतं, ते मी मिळवलं. त्यासाठी धडपडलो; पण निसर्गानं शेवटी अशी शिक्षा ठोठावली मला!" (पृ.१९) "मघाशी डॉक्टरांशी बोलताना वेगळंच आर्ग्युमेंट करीत होतो. खरोखरी मुलं होण या गोष्टीला काय अर्थ आहे? जग आर्थिक, सामाजिक समस्यांनी भारावलं आहे. लोकसंख्या कशी कमी होईल याचा विचारही करायचा आणि मग मुलं झाली पाहिजेत अशी अपेक्षाही बाळगायची, याला काय अर्थ आहे? मी एक मूल उत्पन्न करणे म्हणजे जगापुढच्या प्रश्नचिन्हांत भर घालणे. अशी स्थिती असताना, मी मुलं निर्माण करण्यास असमर्थ आहे. याचं दु:ख मी का मानू?" (पृ.१९) मनातील दु:ख विष्णूबरोबर बोलून झाल्यावर निरोप घेताना आपले रहस्य उणीव फक्त तुझ्यापाशीच ठेवण्याची विनंती करतो. डॉक्टरांनी रिपोर्टचा निर्णय सांगितल्यावर तो विष्णूला भेटून अस्वस्थ मनानेच घरी येतो. घरी आल्यावर मनात चाललेल्या द्वंद्वामुळे तो पत्नीला टाळण्याचा प्रयत्न करतो,

"चहा नको असं तो सांगणार होता; पण त्यान त्याच वेळी विचार केला. आपण चहा नको असं सांगितलं तर बायको समोरच बसून राहील. तिचं तसं समोर बसून राहणं म्हणजे आपल्या अस्तित्वाचं ओझं तिनं माझ्यावर टाकणं.

हीही जाणीव नवीन होती. अलीकडे, म्हणजे गेली काही वर्षे त्याला तिच्या असण्याचं ओझं जाणवायला लागलं होतं. आता तो घरी आला आणि ती समोर दिसली, तेव्हा त्याला एकदम आक्रसायला झालं. त्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावरच तिच्या असण्याचं ओझं गच्चपणे दाब देत राहिले.

स्वयंपाकाच्या खोलीतून कपबशीचा विशिष्ट आवाज येईपर्यंत तो बैठकीच्या खोलीत वर्तमानपत्र चाळत राहिला. बातम्यांवरून त्याचे डोळे फिरत होते; पण त्याच्या कानात घुमत होते डॉक्टरांनी उच्चारलेले शब्द! नो होप्स, मि. पंडित, नो होप्स, नो होप्स. तो ध्वनी आपल्या कानात प्रचंड मोठ्यानं घणघणतोय, असं त्याला वाटू लागलं. त्यानं डोकं गच्च दाबून धरायचाही प्रयत्न केला." (पृ.२४) डॉक्टरांचा निर्णय समजल्यानंतर त्यांच्या दोघांत खूप अंतर पडू लागले. त्यांच्यातील बोलणे, चर्चा बंद झाल्या. सांकेतिक खूणांनी ते एकमेकांशी व्यवहार करू लागले. रमेश पंडित समोरच्या माणसांपासून स्वत:ला लपवितो. समोरचा माणूस विशिष्ट दृष्टीने आपल्याकडे पाहतो आहे असे त्याला वाटू लागते. समोरच्या माणसाला आपले रहस्य माहीत आहे. शरम वाटायला लावणार रहस्य. अगतिक बनविणारं रहस्य. आपण पूर्ण पुरुष नाही; जननक्षम नाही. हे रहस्य माहीत आहे असाच विचार रमेश पंडित करीत राहतो.

रमेश पंडित स्वत: पुढाकार घेऊन नलू आणि विष्णू यांना अपत्यप्राप्तीसाठी समागम करण्यास प्रवृत्त करतो परंतु नलू गर्भवती राहिल्यावरही त्यांचे संबंध तसेच चालू राहतात. डॉक्टरांनी नलू प्रेग्नेंट असल्याचा निर्णय दिल्यावर रमेश पंडितची इच्छा असूनही तो नलूला मिठीत घेऊ शकला नव्हता. तिच्यावर प्रेम, हक्क दाखवू शकत नव्हता कारण नलू आता शरीराने आणि मनानेही विष्णूच्या जवळ आली होती. त्यांचे संबंध असेच चालू असलेले पाहून रमेश पंडित एके दिवशी त्यांना त्यांचे संबंध थांबवण्यास विनंती करतो पण ते दोघेही त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करतात. आजुबाजूच्या लोकांच्या नजरांचा, कुजबुजण्याचा त्रास त्याला सहन करावा

लागतो. एकीकडे लोकनिंदेची, समाजाची तर दुसरीकडे नलू आणि विष्णूचे राजरोस एकत्र येणे रमेश पंडितला त्रासदायक ठरते. रमेश पंडितच्या वेळोवेळी सांगण्यावरूनही त्या दोघांचे संबंध पूर्वीसारखेच चालू राहतात. एके दिवशी रमेश पंडित घरी परततो तेव्हा त्याला दाराला कुलूप असल्याचे तो पाहतो. नलू बाहेर आहे याचा विचार येऊन त्याचे मन सैरभैर होते. (पृ.१०५)

''त्याला एकदम वाटलं, की आपलं घर हरवून गेलं आहे. त्या जाणिवेनं तो कासावीस झाला. तसाच तो खुर्चीत बसला. दिवा न लावता. विचार करून डोकं भडकून गेलं. अंगात ताप चढल्यागत वाटू लागलं. मस्तक ठणकू लागलं. म्हणून तो उठला आणि गॅलरीत जाऊन उभा राहिला.

गॅलरीतून त्याला नलू खाली आलेली दिसली. बरोबर विष्णू होता. स्कुटरवरून ती अनेकदा जात येत असे; पण आज पंडितला ते दृश्य असह्य वाटलं. (पृ.१०६)

ह. मो. मराठे यांनी रमेश पंडितचे केलेले मानसिक संघर्षाचे चित्रण हृदयस्पर्शी आहे. मानसिक पातळीवर मनाचे आणि शरीराचे बारकावे अतिशय सहजतेने वाचकांसमोर येतात. वाचकाला नायकाच्या आतल्या कप्प्यात सहजतेने पोहचता यावे असे लेखन मराठे यांनी केल्याचे दिसून येते.

या कादंबरीचा नायक आपल्या पत्नीच्या प्रेमापोटी, तिच्याविषयीच्या सहानुभूतीसाठी सर्व प्रकारची तडजोड स्विकारतो. आपणहून आपल्या मित्राला आपल्याच कुटुंबात स्थान देतो याचे भयंकर परिणाम त्याला भोगावे लागतात. त्याचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्थ होते. पती पत्नीचे असलेले विश्वासाचे नाते मात्र नामधारी बनते. दोन जीवश्च कंठश्च मित्रांचे मैत्रीचे संबंध दुरावतात. बायको सुखी झाली तर पर्यायाने आपणही सुखी होऊ म्हणून अपत्यप्राप्तीसाठी केलेली नायकाने जी तडजोड होती; तीच तडजोड त्याला स्वत:च्या आयुष्याची परवड करण्यास कारणीभूत होते. एकीकडे त्याने सुखासाठी त्याग करून ज्या योजना आखल्या होत्या त्या सफल होऊनही नायक मात्र दु:खीच राहतो. पत्नी सुखी झाली पण नायक तिच्या जीवनातूनच हद्दपार झाला असे चित्र स्पष्ट होते.

८. नरिमन पॉईंटचा समुद्र :

'सनशाईन क्लीनिंग सोप' या कंपनीचा मार्केटींग मॅनेजर असलेले अविनाश साने आपल्या व्यवसायात जसे तत्पर होते तसेच ते घरातही तेवढेच तत्पर असलेले सुरूवातीला दिसून येतात. परंतु दोन कंपन्यांची मार्केटमधील विक्रीवर जी स्पर्धा होते ती स्पर्धा दोन कंपन्यांमध्ये तर होतीच पण पर्यायाने ती नवरा–बायकोची स्पर्धा बनते. कारण केतकी साने हीदेखील नंतर मार्केटींग मॅनेजर बनते. त्यामुळे आपापल्या पदाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना कधीकधी त्यांना नात्याकडे दुर्लक्ष करावे लागताना दिसते.

कादंबरीच्या पूर्वार्धात अविनाश साने पत्नीला खूप मदत करतात. तिला तिच्या कामात, पदावर यशस्वी होण्यासाठी सर्वतोपरी मदत आणि प्रोत्साहनही देतात. पण जेव्हा पत्नीच्या 'एव्हरफ्रेश' कंपनीने मार्केट काबीज केले तेव्हा अविनाश साने यांची 'सनशाईन क्लीनींग सोप' कंपनी मागे पडते. आपल्या प्रॉडक्टचा खप वाढविण्यासाठी अविनाश प्रयत्न करतो, परंतु तो या कामात असफल होताना दिसतो. एके दिवशी जोशी साहेब त्यांना ऑफिसात बोलावून चांगली कानउघडणी करतात. वरिष्ठांच्या चुकीच्या निर्णयामुळे कंपनी मागे पडली होती पण संपूर्ण दोष मात्र अविनाश सानेंच्या माथी पडलेलजा दिसून येतो. (पृ.९०,९२,९३)

अविनाश सानेंवर कामाचा, अपयशाचा, प्रयत्नांना यश येत नसल्याचा, आपले म्हणणे वरिष्ठ समजून घेत नसल्याचा ताण येतो. त्या तणावाखालीच ते घरी आल्यानंतर त्यांची अस्वस्थता मांडताना मराठे लिहितात,

"त्यानं कपडे बदलले. कपाटातून ड्रिंक काढलं. ग्लास घेतला. फ्रीजमधून बर्फाचे खडे काढून ग्लासात टाकले आणि बेडरूमच्या गॅलरीत इझीचेअर घेऊन बसला. त्यानं ग्लासात व्हिस्की ओतून घेतली, एक मोठा घोट घेतला आणि ग्लास टीपॉयवर ठेवून त्यानं सिगरेट पेटवली.

केतकी घरी आली तेव्हा आठ वाजून गेले होते. मुलांनी तिला सांगितल, "बाबा आज लवकर आलेत. बाल्कनीत बसलेत. बहुधा ड्रिंक घेत."

केतकी बेडरूमचं दार उघडून बाल्कनीपाशी आली. तिनं बघितलं –अविनाश पीत बसला आहे. बऱ्याच सिगारेटस् ओढून झाल्या असाव्यात. कारण बरीच थोटकं दिसत होती. बराच डिस्टर्ब झालेला असावा." (पृ.१०५,१०६) कामाचा ताण कमी करण्यासाठी पुरुषांना नशापान, सिगरेट हे अत्यंत जवळचे साधण असल्याचे येथे ह. मो. मराठे सूचित करतात.

केतकी तिच्या कामाच्या ठिकाणी यशस्वी होते आणि अविनाश अयशस्वी होतो. अविनाश केतकीला राजीनामा द्यायला सांगतो. पण केतकी ठामपणे नकार देते . उलट अविनाशच्या राजीनामा देण्याने सर्व कसे सुरळीत होईल हेही ती त्याला पटवून देते. पण अविनाशला हा पराभव सहन होत नाही. शेवटी त्या दोघांची भूमिका घटस्फोटावर येऊन थांबते. (पृ.१३५) कुटुंब सुखी होण्यासाठी अविनाशची चाललेली धडपड शेवटी अयशस्वी होताना दिसते. त्याला कौटुंबिक पातळीवर आणि नोकरीच्या ठिकाणी अयशस्वी झाल्यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागतो. अविनाशची पत्नी केतकी मॅनेजर होते तरीही ती आपल्या कामात झपाट्याने प्रगती करते. प्रतिस्पर्धी कंपनीत तिचा नवरा मॅनेजर असला तरी ती प्रामाणिकपणे कंपनीचे काम करताना दिसते. अविनाश तिच्या आयडीया चोरूनसुद्धा अपयशीच होतो. कामाच्या ठिकाणी अयशस्वी झालेला अविनाश मनाने अस्वस्थ असल्यामुळे त्याचे पडसाद कुटुंबातही उतरलेले दिसतात.

**९. सॉफ्टवेअर :**

बीवायपी ग्रुपमध्ये काम करण्याआधी मि. देशमुख एका छोट्या उद्योगसमूहात काम करत होते. तेथे त्यांच्या कंपनीचे मालक कत्रे व्यवस्थापकीय संचालक पळसोपकर होते. देशमुखांना या उद्योगसमूहात काम करणे आवडेनासे होते. त्यामुळे ते एखाद्या मोठ्या ग्रुपमध्ये काम करण्याची संधी शोधतात. छोट्या उद्योगसमूहात राहाणे म्हणजे स्वत:च स्वत:च्या भविष्याची कवाड बंद करून टाकणं अशी त्यांची धारणा होती. देशमुख आपले काम प्रामाणिकपणे करीत होते पण त्यांचे वरिष्ठ असलेले पळसोपकर त्यांच्याशी चांगले वागताना दिसत नाहीत. देशमुखांचा अपमान करण्याची व त्यांच्यावर तोंडसुख घेण्याची एकही संधी पळसोपकर सोडताना दिसत नाहीत.

रघुवीर नावाचा एक कामगार पगारवाढीच्या कराराची मुदत संपण्याआधीच संप करतो, कामात व्यत्यय आणतो, इतर कामगारांना चिथवतो. देशमुख त्याला समजावतात परंतु तो ऐकत

नाही. देशमुख कंपनीच्या हिताचा निर्णय म्हणून त्याला चार्जशीट देऊन कामावरून काढून टाकतात. (पृ.१५,१६) त्यामुळे त्यांचे मन बैचेन होते. त्यांना वाटते की आपण या कामगारावर अन्याय तर केला नाही ना? प्रत्येक वेळी देशमुख त्याला सावध करतात; त्याला सांभाळून घेतात. परंतु कंपनीचा अधिकारी म्हणून त्यांनी कर्तव्ये केलले असते. तरीही त्यांना त्यांच्या वरिष्ठांचे अपमानाचे बोलणे सहन करावे लागते. देशमुख पळसोपकरांबरोबर नम्रपणे वागतात. पळसोपकरांना भेटून आल्यावर देशमुख आपल्या जागेवर जाऊन बसतात.

"त्यांच्या पुढ्यात दोन्ही फाईल्स होत्या. रघुवीर गावडेची आणि त्यांची स्वत:ची दोन्ही फायलींवरून त्यांची नजर फिरली होती. नजर फिरवता फिरवता त्यांच्या मस्तकात सणक उठत होती. आणि हृदयात अपमानाचा अग्नी उसळत होता." (पृ.२०)

ह. मो. मराठे यांनी केलेल्या वरील देशमुखांच्या वर्णनावरून त्यांच्या मानसिक दु:खाची तीव्रता समजून येण्यास मदत होते. आत आग पेटलेली असताना डोक्यावर बर्फ ठेवून देशमुख वरिष्ठांना सामोरे जाताना दिसतात. पळसोपकरांच बोलणे देशमुखांना अपमानास्पद, लज्जास्पद होते. शेवटी ते तेथील नोकरी सोडून बीवायपी ग्रुपमध्ये नोकरी स्वीकारणार असतात. पळसोपकरांमुळे देशमुखांना सतत मानसिक संघर्ष करावा लागतो हे खालील एका संवादावरून ठळकपणे दिसून येते.

" 'माय रेझिग्नेशन' देशमुख ठाम शब्दात म्हणाले, 'माझा राजीनामा. ताबडतोब मंजूर करून मला उद्यापासून मुक्त करा. आय डोण्ट वॉंट टु सर्व्ह अ मॅन लाईक यू. ए मॅन मोस्ट अनसिव्हिलाइज्ड. ज्ञान असून, कुवत असून, एफिशियन्सी असून तुमच्या शिव्या खाण्याचा, तुमच्यासारख्या उर्मट आणि असभ्य, असंस्कृत, रानटी माणसाला सर, सर म्हणत माझी जीभ विटाळायची माझी इथून पुढं एक क्षणभरही इच्छा नाही.'

बोलता बोलता देशमुखांचा आवाज तापला आणि तसेच संतापाने थरथरत ते म्हणाले, 'मी हा चाललो, नोकरीवर लाथ मारून, मिस्टर पळसोपकर.'

पळसोपकरांच्या खोलीचं दार धाडकन उघडून देशमुख त्वेषानं तिथून बाहेर पडले. (पृ.७५) देशमुखांच्या या अचानक राजीनामा देण्याच्या कृतीतील ठामपणा; त्यांना त्यांच्या कामाच्या जागी होत असलेल्या मानसिक तणावांचा उद्रेकच वाटतो.

मि. देशमुख बीवायपी ग्रुप कंपनीमध्ये नोकरी स्वीकारतात. तेथे आपला कामाचा ठसा उमटवतात. प्रामाणिकपणे कंपनीच्या हिताचे निर्णय घेतात. पण बीवायपी कंपनीचे सर्वेसर्वा असलेले मि. एस. बी. पोंक्षे सुरूवातील देशमुखांवर पूर्ण विश्वास टाकतात परंतु नंतर मुलाच्या अनैतिक आणि भ्रष्टाचारी गोष्टींना पाठीशी घालण्यासाठी देशमुखांच्या प्रामाणिक कार्याकडे दुर्लक्ष करून कंपनीच्या हिताचे निर्णय नसतानाही मुलाच्या प्रेमापोटी चुकीच्या निर्णयांचे समर्थन करताना दिसतात. अरूणाचलम मिसेस गांधीवर वाईट नजर ठेवतात. मिसेस गांधी त्यांना विरोध करतात. म्हणून मिसेस सारिका गांधींना कामावरून काढून टाकण्यासाठी अरूणाचलम् देशमुखांना खोटे रिपोर्ट तयार करायला सांगतात. खोटे रिपोर्ट तयार करण्यासाठी देशमुख नकार देतात. कारण मिसेस गांधी या अतिशय प्रामाणिक आणि निष्पाप असतात. या घटनेचा वेगळा अर्थ लावून अरूणाचलम् देशमुखांवर अनैतिकतेचा आरोप करतात. (पृ.२३५) अरूणाचलम् आणि देशमुखांच्यात झालेल्या संभाषणावरून देशमुखांना प्रामाणिक असूनही वरिष्ठांच्या मानहानीला सामोरे जावे लागल्याचे स्पष्ट होते आणि खोटे आरोप सहन करण्याची पाळी आल्याचे दिसून येते.

" 'इनोसंट!' आरूणाचलम् कुत्सितपणे म्हणाला 'इनोसंट!' ती तुम्हांला इनोसंट वाटते याच कारण तिच्याबद्दलचा तुमच्या मनातला सॉफ्टकॉर्नर, मिस्टर देशमुख.

'प्लीज होल्ड युवर टंग, मिस्टर अरूणाचलम्' देशमुखांनी चढ्या, तप्त आवाजात अरूणाचलम्ला सुनावलं." (पृ.२३८,२३९) मानसिक, नैतिक संघर्ष सुरू असतानाच देशमुखांची नोकरीही जाते. त्यांच्यावर खोटा आरोप ठेऊन त्यांना कामावरून काढून टाकण्यात येते. पत्रातील मजकुरावरून देशमुखांना कराव्या लागलेल्या मानसिक संघर्षाची कल्पना येते,

'इथून पुढं कंपनीला, आपल्या सेवेची गरज नाही. आपण आपल्या कामाने कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे समाधान करण्यास असमर्थ ठरलो. उद्धटपणे दुरूत्तरे केली. अकार्यक्षम म्हणून ज्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकावे असे कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटत

होते, त्या कर्मचाऱ्यांबद्दल आवश्यक ते रिपोर्टस देण्यात आपण टाळाटाळ केली. उलट अशा अकार्यक्षम कर्मचाऱ्यांना आपण पाठीशी घातले. विशेषत: महिला कर्मचारी श्रीमती सारिका गांधी यांना त्या अकार्यक्षम व वरिष्ठांचे समाधान करू न शकणाऱ्या अशा कर्मचारी असूनही त्यांना आपण सतत पाठीशी घातले. यात आपला हेतू स्वच्छ व शुद्ध नव्हता. कंपनीच्या कामकाजबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी श्रीमती गांधींवर ठपका ठेवला असतानाही त्यांना संरक्षण देऊन त्यांचा स्त्री म्हणून स्वत:च्या पुरुषी स्वार्थासाठी गैरवापर करण्याचा आपला हेतू होता, असे वरिष्ठ व्यवस्थापकांचे पक्के मत झाले आहे. आपल्यासारख्या अधिकाऱ्यांमुळे कंपनीची प्रतिमा डागाळते व कर्मचाऱ्यांत व व्यवस्थापकीय अधिकारी वर्गात बेशिस्त निर्माण होते. सबब, आपणांस इथून पुढे कंपनीच्या सेवेत ठेवणे शक्य नाही. आपल्या सर्व देय रकमेचा चेक सोबत आहे... ’ (पृ.२४७,२४८)

वरिष्ठांचा आपमतलबीपणा देशमुखांच्या आणि मिसेस गांधीच्या प्रामाणिक कार्यावर शिंतोडे उडवतो. त्यांच्या स्वच्छ प्रतिमेवर अनैतिकतेचा डाग लागतो. परिणामी नोकरी गमवावी लागल्याने कुटुंबाची जबाबदारी पेलू शकणार नसल्याची खंत मनात राहते. मुलाचे शिक्षण, मुलीचे लग्न, बायकोने भांडवलासाठी दागिने विकल्याने सर्व कुटुंबाचा सर्वेसर्वा असलेले देशमुख हतबल होतात. या सर्व परिस्थितीमागे वरिष्ठांचे कटकारस्थान असते. स्वत: प्रामाणिक असलेल्या देशमुखांना सर्वांपुढे चांगले काम करूनही अन्याय, अपमान सहन करावा लागतो. मानसिक समाधान आणि प्रसन्नता मिळविण्यासाठी देशमुख एक नोकरी सोडून दुसरी नोकरी स्वीकारतात. परंतु त्यांना दोन्ही ठिकाणी मानहानी वाट्याला येते. दु:ख मिळते. वरिष्ठ त्यांच्या स्वार्थासाठी देशमुखांना बळीचा बकरा बनवतात.

कारखानदारी, उद्योग–व्यवसाय जगतात वाट्याला येणाऱ्या मानसिक संघर्षाचे चित्रण ह. मो. मराठे यांनी सॉफ्टवेअरमधील देशमुख नावाच्या पात्राच्या मदतीने जिवंत रेखाटले आहे. शिवाय कामाच्या ताणाबरोबर कौटुंबिक पातळीवरचे चित्रणही माणसाचा मानसिक संघर्ष अजूनच गडद करतो.

## १०. प्रास्ताविक :

हाऊस जर्नलसाठी काम करणारे पत्रकार मनोहरपंत आठवले उदार मनाचे आणि प्रेमळ असल्याचे त्यांच्या वर्णनावरून दिसून येते. ते जेथे राहतात तेथे रातोरात काही झोपड्या उभ्या राहतात. त्या झोपड्या हटविण्यासाठी त्यांच्या सोसायटीतले पै, पेंडसे आणि इतर सदस्य झोपड्या हलविण्याच्या उद्देशाने चर्चा आणि इतर नियोजन करत असतात. परंतु ही गोष्ट पत्रकार महाशय आठवले यांना आवडत नाही. सोसायटीतील रहिवाशांच्या सामुदायिक प्रतिक्रियेवर पत्रकारांची विचारप्रक्रिया सुरू होते.

“जरूर! आत्ताच काहीतरी करायला पाहिजे; पण कोणाविरूद्ध? या झोपडपट्टीवाल्यांच्या विरूद्ध? या गरीब माणसांच्या विरूद्ध? यांना काय वाटतं – ते मोठ्या मजेत झोपडपट्टीत राहात असतील? घरं घेण्यासारखी परिस्थितीच नाही म्हणून ते निरूपायानं तिथं राहतात – जगतात – मरतात. आणि आपण त्यांना शिव्या घालतो. त्यांच्याविरूद्ध शत्रुत्वाची भूमिका घेतो. का? तर आपणाला आपल्या गॅलऱ्यांचा वापर हवा खाण्यासाठी करता येत नाही म्हणून.

मी त्वेषाने ऊठलो आणि रागारागानेच दाढी करू लागलो.” (पृ.७) मनोहरपंत आठवले यांना त्या झोपड्या हटविण्यात किंवा त्यांना शत्रू मानण्यात रस नसतो. परंतु पत्नी आणि सोसायटीतील इतर सदस्य त्यांना हे कृत्य करण्यासाठी त्यांच्या मनाविरूद्ध त्यांना सामील करून घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्या सोसायटीतील इतर लोक त्यांची गैरसोय, घाणीचा त्रास होऊ नये म्हणून कोणतेही प्रयत्न करताना दिसत नाहीत. उलट त्यांना हाकलण्याची भाषा करतात. मानव हा समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्याला इतरांप्रमाणेच जगण्याचे सर्व हक्क असले पाहिजेत अशाप्रकारचे चित्रण ह. मो. मराठे प्रास्ताविक कादंबरीत मनोहरपंत आठवले यांच्या भूमिकेतून करून देताना दिसतात. परंतु मानवता, सर्वसमभाव हे शब्द त्या सोसायटीतील लोकांच्या ध्यानीमनीच नाहीत याचा त्रास मनोहरपंतांना होताना दिसून येतो. इच्छा असून उपयोग काय? इतर सर्वांना विरोध करून त्यांना काहीही करणे शक्य नसते.

मनोहरपंत आठवले मालकाच्या म्हणजेच भिकीशेट परांजपे यांच्यासाठी वाढदिवसानिमित्त एक अंक तयार करण्याची योजना आखतात. परंतु कथालेखक, चित्रकार, प्रेस, फोटो वेळेवर

उपलब्ध न झाल्याने फियास्कोसाहेब त्यांचा अंक प्रकाशनाचा कार्यक्रम रद्द करून ती संधी दिदीजींना मिळते. अर्धा अंक छापून होऊनही, भरपूर मटेरियल जमवून, कव्हर छापायला दिले तरीही अंक प्रसिद्ध होणार नाही हे ऐकून मनोहरपंत आठवले या लेखक–पत्रकार महाशयांना चिंता वाटू लागते. एकीकडे एवढा अनाठायी खर्च केल्याचा आरोप त्यांच्यावर येणार असतो आणि दुसरीकडे त्यांची साफ बेअब्रू होणार असते. कंपनीचे खूप मोठे नूकसान केले म्हणून त्यांना नोकरीवरून काढून टाकले जाऊ शकते. या कल्पनेने ते गलीतगात्र होतात. नोकरी गेली तर एवढं मोठ कर्ज, मुलाच संगोपन, शिक्षण, संसाराची जबाबदारी या सर्व गोष्टी आपण कशा पेलणार या विचारांनी ते व्याकुळ होतात. (पृ.१४३) शिवाय चाळीशीनंतर नोकरी गेली तर आत्मविश्वास आणि उमेद दोन्ही संपून जातील. नवीन नोकरी शोधणे, नव्याने सर्व गोष्टी करणे या विचारांनीच त्यांचे हातपाय लटपटायला लागतात. (पृ.१४४) त्यांची त्यावेळची मन:स्थिती पुढील लेखनावरून लक्षात येण्यास मदत होते.

“आणि अचानक काढलं गेलं तर –

ओह !

नुसत्या या कल्पनेनच माझा आतून थरकाप होऊ लागला.

मी टेबलावर डोकं टेकवलं आणि नोकरी जाण्याच्या भयानं थरथरणारं शरीर सावरून धरू लागलो. बराच वेळ तसाच बसून होतो.” (पृ.१४४) आपली सुखदु:खे मोठ्या प्रमाणावर बाह्य घटकांवर अवलंबून असतात याचेच प्रत्यंतर ह. मो. मराठे येथे करून देताना दिसतात.

कामाच्या ठिकाणी असे नैराश्य आलेले असताना मन मोकळे करण्यासाठी, सहानुभूती, प्रेम मिळवण्यासाठी घर आणि घरातील सदस्य ही हक्काची ठिकाणे परंतु येथेही या पुरुषपात्राला मन:स्ताप सहन करावा लागतो. (पृ.१६५,१६६) त्याच्या मनाप्रमाणे त्याला पत्नीकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्याच्या मनाचे प्रतिबिंब आणि हेलकावे मराठे ह्यांनी मोठ्या ताकदीने उभे केल्याचे दिसून येते.

भारतीय कुटुंबव्यवस्था ही पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्था आहे. साहजिकच कुटुंबावर पुरुषाचे वर्चस्व अधिक असलेले प्रत्ययास येते. वर्चस्वाबरोबरच जबाबदारीही अधिक येते. आज काळ बदलतो आहे. पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीही सर्वच पातळ्यांवर वावरताना दिसत आहे.

पुरुष कुटुंबाबाहेर वावरत असताना समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, धर्मकारण, उद्योग–व्यवसाय अशा विविध पातळ्यांवर वावरताना दिसतो. बाह्य जगतात वावरत असताना, भिषण वास्तवाला सामोरे जात असताना जिद्द, चिकाटी, परिश्रमातील सातत्य, विविध उद्दिष्टे, त्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी करावे लागणारे प्रयत्न, त्यातून वाट्याला येणारा संघर्ष, कधी अतिरेकी मोह, लोभ, हव्यास त्यातून निर्माण होणारे प्रश्न, नोकरी–उद्योग–व्यवसायातील आत्यंतिक स्पर्धा, कधी शारीरिक मोहापायी ओढवून घेतलेली दुःखे, विविध प्रकारच्या दुःखाला सामोरे जाताना वाट्याला येणारी असहाय्यता, हतबलता, हताशता, कौटुंबिक पातळीवर वावरत असताना पती–पत्नी, मुले यांच्यातील संघर्ष, पुरुषांचे विवाहबाह्य संबंध, पुरुषाकडून स्त्रीला मिळणारे गौण स्थान, एक उपभोग्य वस्तू मानणारी मानसिकता, अधिकारांचा गैरवापर, स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांचा बळी देण्याची मानसिकता, तर कधी वंशाला दिवा हवा म्हणून आपल्याकडे असणाऱ्या पुरुषत्वाच्या अभावामुळे मित्राकडून ते पूर्ण करून घेणे आणि अखेरी पत्नीला अपत्यप्राप्ती झाली, सुख मिळाले पण ती पतीची राहिली नाही, त्यामुळे वंशाला दिवा मिळाला पण तो आपला नाही, पत्नी आपली राहिली नाही या दुःखाने खचून जाणारा पुरुष अशा विविध पातळ्यांवरील पुरुषी मानसिकता, त्यातून वाट्याला आलेला बाह्य संघर्ष आणि त्यातून त्याचा होणारा मानसिक कोंडमारा, आत्मक्लेष, मानसिक संघर्ष ह. मो. मराठे यांनी अत्यंत प्रत्ययकारकरित्या रेखाटला आहे.

## ३.२. आर्थिक संघर्ष :

पृथ्वीतलावरील सर्व मानवजातीला आपल्या व आपल्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी काही घटकांची नितांत आवश्यकता असते. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असल्या तरी अलीकडे शिक्षण आणि पैसा याही मानवाच्या अत्यावश्यक गरजा आहेत. शिक्षणाने पैसा कमावता येतो आणि पैशाने शिक्षण घेता येते असा संकेत असला तरी सर्व

क्षेत्रात आर्थिक अडचणींना सर्वांनाच केव्हा ना केव्हातरी सामोरे जावे लागतेच. त्यातही आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृतीत कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी असल्या कारणाने पुरुषांना या समस्येला जास्त प्रमाणात तोंड द्यावे लागते. पुरुष हा कुटुंबव्यवस्थेचा कणा मानला जातो. तो कुटुंबात वावरत असताना त्याला कुटुंबाच्या आणि स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी आर्थिक संघर्ष करावा लागतो.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचा आर्थिक संघर्ष अभ्यासणे येथे अभिप्रेत आहे. त्यांना आर्थिक संघर्ष करण्यास भाग पाडणाऱ्या व्यक्ती, घटना, प्रसंग, परिस्थिती या सर्वांचाच येथे विचार करणे अभिप्रेत आहे. पुरुषांचा वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर चाललेला संघर्ष ह. मो. मराठे यांनी कसा रेखाटला आहे, याचा विचार येथे करावयाचा आहे.

## कथासंग्रह :

### १. सापेक्ष :

**सापेक्ष :**

प्रधान यांनी एका एका कारखान्यात दीर्घ काळ चालणाऱ्या संपामुळे कामगारांच्या कुटुंबाची कशी वाताहत होते ते लिहिलेले असते. त्या बातमीतील मजूर संपात अडकला होता. पर्यायाने त्याचे कुटुंबही संपात सापडले होते. पुरुषाच्या कामधंदा सुटण्यामुळे त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती वाईट झाली होती. त्यामुळे त्या मजुराच्या बायकोवर मोलमजुरी करण्याची पाळी येते. मुलांना शाळा सोडून किरकोळ कामावर जावे लागते. आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी त्याला जमिनीचा तुकडाही विकावा लागतो. (पृ.१३,१४) संप चालवणारे पुढारी आणि पुढाऱ्यांशी संगनमत करणारे मालक यांच्या कटकारस्थानाचा बळी पडलेला हा कामगार उपासमार, गरिबीचे चटके सोसत बसतो.

**अँकर :**

या कथेतील भालेराव हे एक मोठे संपादक. परंतु तरीही त्यांना सर्वसामान्य माणसांसारखेच आर्थिक प्रश्न सतावत असतात. घराच्या कर्जाचा हप्ता, मुलांची फी, विजेच आणि औषधाच बील अशा अनेक आर्थिक समस्या त्यांच्यापुढे उभ्या असतात. या व्यतिरिक्त त्यांच्या

पगारातून इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स, प्रॉव्हिडंट फंड, इन्शुरन्स आणि इतर कम्पलसरी सेव्हिंग्ज कापून हातात फक्त दोन हजार रूपयेच मिळतात. त्याच रकमेत सर्व खर्च भागवावे लागतात. अगदी सर्वसामान्य गरीब माणसासारखे ते पैशाचा हिशेब करू लागतात. (पृ.४१,४२). माणूस कितीही मोठा झाला तरी त्याचा आर्थिक सघर्ष चालूच असल्याचे निदर्शनास येते. उलट माणूस जसजसा मोठा बनतो तसतशा त्याच्या आर्थिक गरजाही वाढतच जातात हेच येथे स्पष्ट होते.

**जी सरकार :**

मोहन आणि त्याचे कुटुंब एका जुन्या पडायला झालेल्या चाळीतील लहानशा खोलीत रहातात. पहिल्या मजल्यावर मोहन आणि त्याचे कुटुंब रहात असते. त्यासाठी वरखाली करताना वापरायचा लाकडी जिना पावसाने भिजून कुजला होता. खोलीला खिडकी नाही. एक लहानसा झरोका, तिथंच मोरी, खोलीत फक्त पंधरा पॉइंटचाच बल्ब अशा दयनीय अवस्थेतील खोली सोडण्यासाठी मालकांचा सतत तगादा लागलेला दिसतो. जेवणातही वारंवार भाजीभाकरीच वाट्याला येते. (पृ.८३,८४) नोकरीतील कमी पगार उत्पन्नासाठी दुसरा मार्ग नाही त्यामुळे गरिबीतच मिळेल त्या जागेत, मिळेल ते अन्न खात मोहनला जीवन जगावे लागते.

**देशात सालं काही घडतच नाही :**

या कथेतील नायक रिक्षाचालक आहे. त्याची स्वत:ची रिक्षा नसल्याने त्याला ती भाडे देऊन चालवावी लागते. गावात खूप रिक्षा वाढल्याने या चालकाला कधी कधी काहीच शिल्लक रहात नाही, तर कधी कधी धंदापण मिळत नाही. शिक्षण नसल्याने चांगली नोकरीही मिळत नाही. झोपडपट्टीतच रहावे लागते. (पृ.१२३,१२४) ती रिक्षा चालविताना रिक्षाला जर काही खराबी आली तर मेकॅनिकला देण्यासाठी पैसे नसतात. तर भूक लागली तरी काही खाण्यासाठी पैसे नसतात. भूक मारून नेण्यासाठी फक्त चहाच प्यावा लागतो. मेकॅनिकचे पैसे वेळेत दिले नाही तर तो मारहाण करतो, खूनाची भाषा करतो. (पृ.१२९) मालकाचे भाड्याचे पैसे वेळेत दिले नाहीत तर मालक रिक्षा काढून घेतो. मालकाचे आणि त्याच भाडे देण्यावरून भांडण होत तर मालक त्याच्याबरोबर झटापट करून पैसे काढून घेतो. त्या झटापटीत रिक्षाचे नुकसान होते. पंक्चर

झालेलं चाक पंक्चर काढून घेण्यासाठी मेकॅनिककडे जातो तर मेकॅनिक आधीच्या पैशांची मागणी करतो. तिथे भांडणे होतात. हमरीतुमरीवर येऊन त्याच्यावर चाकूने वार होतो आणि त्यातच त्याचा मृत्यू होतो. (पृ.१४३) या रिक्षाचालकाला करावा लागणारा आर्थिक संघर्ष कमालीचा आहे. शिक्षण नाही, नोकरी नाही, स्वत:ची रिक्षा नाही, रहायला घरदार नाही या सर्व गोष्टींची कमतरता आर्थिक संघर्ष करण्यास भाग पाडते. त्या समस्यांचा सामना पूर्णपणे न करता आल्याने शेवटी या रिक्षाचालकाला स्वत:चे जीवनच संपवावे लागते. आर्थिक संघर्ष करता करता त्याला स्वत:चा बळी द्यावा लागतो.

**२. वीज :**

**बाई कशाला रडतील :**

या कथेतील नायक सामान्य माणूस म्हणून जीवन जगत असतो. त्याने माखनवाला बिल्डरला ब्लॉकसाठी तीस हजार रूपये दिलेले असतात. पण तो बिल्डर ब्लॉक वेळेवर देत नाही. त्यामुळे त्यांची राहण्याची गैरसोय होते. ब्लॉक घेण्यासाठी पैसे पाहिजे म्हणून ते काम करत असलेल्या कंपनीतून पगारापोटी ॲडव्हान्स म्हणून प्रॉव्हिडंट फंडातून कर्ज घेतात. बिल्डरला वीस हजार पावतीचे आणि दहा हजार बिनापावतीचे देतात. परंतु बिल्डर ब्लॉकही देत नाही आणि पैसेही परत देताना फक्त पावतीचेच देण्याची भाषा करतो तेही दोन महिन्यानंतर. हा नायक ज्या चाळीत पूर्वी रहात होता ती चाळ पडल्याने तो बेघर होतो. चाळमालक पुन्हा चाळ न बांधण्याची भाषा बोलतो. तेव्हा हा नायक त्यांच्याच एका नातेवाईकांकडे भाडेकरू म्हणून रहातो. (पृ.४६,४७,५२) या नायकाच्या एकट्याच्या पगारात सर्वांचे पालनपोषण, कर्जाचा हप्ता इ. गोष्टींमुळे घरातील आनंद नाहीसा होतो. या नायकाच्या पगारातून कंपनीच्या कर्जाचा हप्ता, कंप्लसरी सेव्हिंग्ज, खात्याचा हप्ता, बँकेच्या कर्जाचा हप्ता, प्रॉव्हिडंट फंडाचा हप्ता, दुष्काळग्रस्तांसाठी एक दिवसाचा पगार, बस भाड्याचा हप्ता, खोलीभाडे, मुलांचे शिक्षण, धान्य, दूध, भाजीपाला, पुस्तके, कपडे इ. खर्च होतो. त्यासाठी तो पगार पुरत नसे. त्यामुळे त्याला खूप संघर्ष करावा लागतो. (पृ.५२,५३) घरासाठी झालेली फसवणूक आणि कर्ज अशा दुहेरी आर्थिक अडचणींमुळे नायकाला त्याच्या पत्नीला नोकरीसाठी तडजोड म्हणून बाहेरगावी पाठवावे लागते.

पत्नीचा वियोग, घरातील सर्व जबाबदाऱ्या त्यालाच घ्याव्या लागतात. इतके सर्व करूनही त्याची ओढाताण सुरूच राहते.

**खुर्ची :**

या कथेतील नायक व्यवसायात अपयशी होतो. धंद्यात यशस्वी होण्यासाठी तो कर्ज घेतो, नातेवाईकांकडून मदत घेतो, सावकाराकडून कर्ज घेतो, व्याज फेडण्यासाठी दुसरे कर्ज, ते फेडण्यासाठी आणखी कर्ज अशा चक्रव्युवहात तो अडकतो. कर्जवसुलीसाठी त्याला लोक चारी बाजूनी घेरतात. लोकांची मोठ्या आवाजात बोलणी, लोकांची संशयी वृत्ती या सर्व गोष्टींना त्याला कर्जामुळे तोंड द्यावे लागते. (पृ.१५०,१५१) आर्थिक कर्जाचा बोजा त्याला समाजात मानहानी पोचवत होताच पण कुटुंबातही त्याला कुटुंबाचे पालनपोषण करण्यात अडचणी येतात. शेवटी शेवटी तर या नायकाला घरातली सामानसुमान, भांडीकुंडी विकावी लागतात. उरलेसुरले स्त्रीधनही तो या कर्जापायी गमावतो. (पृ.१५१,१५२) व्यवसायातील चढउतार, व्यवसायातील अपयश त्याला सतत आर्थिक संघर्ष करण्यास भाग पाडते.

**३. ज्वालामुख :**

**ज्वाळा :**

कामगार असलेल्या मोहितेच्या मोठ्या भावाचा अपघातात मृत्यू होतो. त्याचे हातावर पोट होते म्हणून त्याला नुकसान भरपाई मिळत नाही. उलट त्याच्या चार माणसांच्या कुटुंबाची पालनपोषणाची जबाबदारी मोहितेवर येऊन पडते. भावाच्या कुटुंबाची जबाबदारी, स्वत:च्या कुटुंबाची जबाबदारी, आई–वडिलांची जबाबदारी अशा एकूण दहा माणसांचा खर्च भागविण्यासाठी मोहितेला पहिल्या महिन्यातच कर्ज घ्यावे लागते. मालकांपुढे गयावया करून त्याला ओव्हरटाईम घ्यावा लागतो. (पृ.४८) जमा आणि खर्च यांचे व्यस्त प्रमाण या नायकाला शारीरिक मेहनत तर करण्यास भाग पाडतेच पण मालकांपुढे कामासाठीही लाळघोटेपणा करण्यास भाग पाडते.

**कीटक :**

शंकरराव प्रौढ अविवाहित मुलामुलींचे विवाह जमविण्याचे काम करतात. हे काम करण्यासाठी त्यांना सतत सायकलवरच फिरावे लागते. पण ती सायकलही जुनीच असल्याने

सतत कुरकुरत असते. त्यांच्या अंगावर चांगले कपडे नसतात. तर भूक लागली तरी चहा किंवा अधिकतर भजीवरच भूक भागवावी लागते. एका छोट्याशा अंधाऱ्या खोलीत आजारी पत्नीसमवेत ते छोट्याशा किरकोळ सामानासुमानावर गुजरान करतात. (पृ.८५,८६,८८) प्रौढ मुलामुलींची लग्नं जमविणे हे आपले सामाजिक कार्य आहे असे भासवीत ते लोकांची दिशाभूल करतात. परंतु याच कार्यावर त्यांचा चरितार्थ अवलंबून असतो. कधीकधी लोकांना ही संकल्पना न पटून पैसे तर मिळत नाहीतच उलट अपमानाची वागणूक सहन करावी लागते. (पृ.१०४,१०५) वाढते वय, पत्नीचे आजारपण, आर्थिक परिस्थिती नाजूक या सर्व गोष्टींवर उपाय म्हणून ते हे काम स्विकारताना दिसतात. समाजकार्याच्या नावाखाली त्यांची कुटुंबाची उदरनिर्वाहाची सोय चाललेली दिसून येते. आर्थिक परिस्थितीने गाजलेल्या शंकररावांना दुसऱ्यांच्या अडचणींची शिडी बनवूनच स्वत:चा चरितार्थ चालवावा लागतो.

**काळ :**

या कथेतील नायक गावाकडे मजुरीचे काम करतो. पत्नी शहरात घरकाम करते. कामातून मिळणारे पैसे कमी असल्याने त्याला काटकसरीने घर चालवावे लागते. घराच्या बाहेर पडताना पहिला खिसा पहावा लागतो. आजाराने घरातील मुली मरतात. त्यांचे क्रियाकर्म करण्यासाठी त्याच्याकडे पैसे नसतात. (पृ.१३०,१४१) या नायकाला कराव्या लागणाऱ्या आर्थिक संघर्षामुळे त्याच्या आतील बाप मेला असल्याचे प्रत्ययाला येते.

**भिंत खचली :**

शंकर झोपडपट्टीत रहात असतो. मुसळधार पावसाने झोपडीशेजारची भिंत पडते. दोन दिवसांच्या मुसळधार पावसाने झोपडीत माती, चिखल, पाणी, साठतो. दोन दिवसांच्या पावसामुळे शंकरला बाहेर जावून काम शोधता येत नाही. पैसे नसल्याने त्याला उपासमार घडते. घरातील इतर सदस्य पाण्यामुळे, थंडीमुळे आजारी पडतात. पण त्यांना डॉक्टरकडे न्यायला शंकरकडे पैसे नसतात. (पृ.१४६,१४७) कोसळलेल्या भिंतीखाली सापडलेल्या माणसांना सरकार थोडीफार मदत करते. शंकर मात्र या मदतीपासून वंचित राहतो. कारण त्याच्या घरात

कुणाचा मृत्यू झालेला नसतो. आर्थिक परिस्थितीने तो इतका त्रस्त असतो की शेवटी तो आपली मानसिकता पशूत्वाकडे वळवताना दिसून येतो.

"शंकर बघत होता : मदतीचे पैसे घेण्यासाठी उभ्या असलेल्या माणसांकडे, आपल्या आजारी मुली–आईकडे आणि कोसळलेल्या भिंतीच्या त्याच्या झोपडीजवळ भागाकडे. आज रात्रीही खूप पाऊस येईल.

उरलेली भिंत कोसळेल.

त्या भिंतीखाली सापडून आपली आई, मुलगी ....... " (पृ.१५१)

पैसे मिळविण्यासाठी लाचारीने आपल्या आईचा आणि मुलीच्या मृत्यूचे स्वप्न रंगवितो.

**४. पक्षिणी :**

**माधुकरी** :

या कथेतील नायकाच्या जन्मापासूनच त्याच्या घरची गरिबी होती. या नायकाचे वडील गरीब भिक्षुक होते. महिनाभर कसेतरी चार माणसांचे पोट भरेल इतकेच त्यांची कमाई होती. त्यामुळे हा नायकही लहान पणापासूनच माधुकरी मागून पोट भरत असे. या नायकाचे घर साध्या छपराचे असते. फक्त गणपतीमध्येच त्यांच्याकडे तांदळाची खीर होत असे. गोडधोड कधी मिळालेच तर तेही शेजाऱ्या पाजाऱ्यांनीच दिलेले. या नायकाला कधी पोटभर जेवन नाही, कधी अंगभर कपडा मिळत नाही. (पृ.८) या नायकाच्या वर्णनावरून त्याला कराव्या लागणाऱ्या आर्थिक संघर्षाची जाणीव होते.

**कभिन्न :**

या कथेतील एक पुरुषपात्र ब्राह्मण भिक्षुक असते. त्याला सात मुली असतात. मुलींच्या लग्नासाठी होणाऱ्या खर्चाची तरतूद कशी करायची याची त्याला सतत चिंता असते. मुलीच्या लग्नाच्या चिंतेने तो समोरच रहात असलेल्या एक ट्रकवर नोकर असलेल्या आडदांड व्यक्तीकडे येऊन मुलीला पदरात घेण्याची विनंती करतो. एक हजार रूपये देण्याच्या शब्दावर तो मुलीला त्या इसमाच्या ताब्यात देतो कारण पाठीमागे परत सहा मुलींचे पालनपोषण आणि लग्नाची जबाबदारी असते. (पृ.३३) जानव्याची शपथ घेऊन हजार रूपये देण्याचे ब्राह्मण कबूल करून

स्वत:भोवतीचा एक फास कमी करतो. हुंड्याची पूर्ण रक्कम देऊ न शकल्याने त्याला जावयाचा जाच सहन करावा लागतो. वाटेतच दक्षिणेची सर्व रक्कम लूबाडून जावई उरलेल्या रकमेचा तगादा लावतो. शेवटी एका रात्री सत्यनारायणची पूजा आटोपून घरी जात असतानाच जावई त्याला रस्त्यात अडवून पिशवीतले पैसे काढून घेतो आणि त्याला ठार मारतो. (पृ.३४) या भिक्षुक ब्राह्मणाला पैशासाठी मुलीचा आणि नंतर स्वत:चाही बळी द्यावा लागतो. पैशासाठी मुलीचे जीवन नरकमय बनवतो आणि स्वत: पैसे देऊ शकला नाही म्हणून मागे सहा मुलींना सोडून स्वत:चा प्रवास संपविण्याची वेळ येते.

**मी थोडासा अश्वत्थामा :**

या कथेतील नायक मि. जोशी साधी नोकरी करण्यासाठी घरापासून दूर रहातो. घरची गरिबी असल्याने जोशींना नोकरी करून थोडेफार पैसे घरी पाठवावे लागतात. पावसाळ्यात त्याला घरासाठी कडणीवासा करण्यासाठी, गरोदर वहिनीच्या औषधपाण्याला पैसे नसतात. (पृ.४५) नोकरीच्या ठिकाणी त्याला ॲडव्हान्स मिळत नाही. पैसे खर्च करूनही मेसमध्ये चांगले जेवण मिळत नाही. पैसे कमाविण्यासाठी, नोकरीसाठी घरापासून दूर रहावे लागल्याने घरच्या अन्नाला, कुटुंबाला सहवासाला त्याला वंचित रहावे लागते. (पृ.५०) एवढा सर्व त्याग करूनही त्याची आर्थिक चणचण कमी होत नाही. जीवनात तडजोड करूनही पैशासाठी कधीकधी लाचारी पत्करूनही पैसा पाठ फिरवित असल्याचे सत्य येथे ह. मो. मराठे यांनी प्रभावीपणे मांडले आहे.

**व्रणार्त :**

अविनाश नोकरीच्या शोधात मुंबईला येतो. त्याला नोकरी मिळाली असती तर त्याची आर्थिक कोंडमाऱ्यातून सुटका झाली असती. त्याचे वडिलोपार्जित घर मोडकळीस आले होते आणि त्या घरावर वडिलांनी सहा हजार रूपयांचे कर्ज करून ठेवले होते. मरताना वडिलांनी अविनाशला सांगितलेले असते की, घर विकू नको फारतर दुरूस्त कर आणि घराचे कर्ज फेडून घर मोकळे कर. त्यामुळे अविनाशला कर्ज फेडण्यासाठी आणि कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी पैशांची नितांत गरज असते. पण वशिला नसल्याने त्याची संधी जाते. (पृ.५३,५४) त्याच्या कर्जाचा त्याच्या कुटुंबावरही विपरीत परिणाम होताना दिसतो. बायकोने सत्यनारायण घालण्याची

व्यक्त केलेली इच्छा, मुलीचा वाढदिवस असा आनंदी आणि प्रसन्न क्षणसुद्धा तो साजरा करू शकताना दिसत नाही.

**५. दावं :**

**वाल्या कोळी व बायको :**

या कथेतील नायकाची परिस्थिती अत्यंत गरीब असते. त्याच्याकडे जुनाट वाड्यातली एकुलती एक खोली, एक खाट, मळकी फाटकी गादी एक पत्र्याची बादली, एक प्लॅस्टिकचा तांब्या, एक जुनाट स्टोव्ह, जुनाट पातेली, एक फुटकी कपबशी, एक सायकल इ. वस्तू असतात. या वस्तूंच्या वर्णनावरून, संख्येवरून नायकाच्या गरिबीची पूर्ण कल्पना येते. त्यातच त्याचे लग्न होते आणि लग्नाच्या पहिल्याच रात्री त्याची पत्नी त्याचा गरिबीवरून अपमान करते. (पृ.४४,४५) आर्थिक संघर्ष करण्यासाठी, पैसा मिळविण्यासाठी, गरिबीवर सूड उगविण्यासाठी, पत्नीने केलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी तो वाईट मार्गाने पैसा मिळवायला लागतो. (पृ.४६) या नायकामध्ये झालेले परिवर्तन अपमान आणि परिस्थितीचे चटके सहन करावे लागल्याने झालेले दिसते. शिवाय लग्न होऊनही त्याला संसाराचे सुख गरिबीमुळेच मिळालेले नसते हेही यावरून सूचित होते.

**६. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**डोळा :**

या कथेतील नायक मजूर असतो. त्याच्या कुटुंबात तीन मुले, वडील, बायको असा मोठा परिवार असतो. तो आणि त्याचे कुटुंब झोपडीतच रहाते. उपासमारीने आणि दारिद्र्याने त्याचे कुटुंब त्रस्त असते. हाताला काम नसल्याने हा कर्ता नायक चिंतेत असतो. शेवटी तो य सर्वांवर शेवटचा उपाय म्हणून बापाला फसवून डोळा विकण्यास घेऊन जातो. कुटुंबाचे पालनपोषण करता यावे, पोटाला अन्न मिळावे त्यासाठी लागणारा पैसा तो स्वत:चा आणि वडिलांचा डोळा विकून उभा करतो. (पृ.१०,११,१३,२२) देशाच्या दुष्काळी परिस्थितीत मिळणारी कामे कमी आणि खाणारी तोंडे जास्त असल्याने या नायकाला आर्थिक संकटातून सुटका करून घेण्यासाठी आपले

व वडिलांचे डोळे विकण्याचा पर्याय स्विकारावा लागतो. या नायकाला कराव्या लागणाऱ्या आर्थिक संघर्षाची तीव्रता लक्षात येते.

**७. घोडा :**

**मशीन** :

खाशाबा ज्या कंपनीत काम करीत होता त्या कंपनीत नवीन तंत्रज्ञानाने अद्ययावत मशीन बसविण्यात आल्यामुळे खाशाबाला कामावरून काढून टाकण्यात येते. खाशाबाची पन्नाशी उलटली तरी त्याचा संसार वाढतच होता. त्यामुळे खरे तर त्याला पैशांची जास्त गरज वाटू लागली होती. दोन मुलींची नविनच लग्ने झालेली असल्यामुळे त्यांचे सणसमारंभ, बाळंतपणं सुरू होते. तिसरी मुलगी लग्नाला आली होती. मुलाला अजून कुठे काम मिळाले नव्हते. दोन मुलींच्या लग्नासाठी फंडातील रक्कम काढून झाली होती आणि तिसऱ्या मुलीच्य लग्नासाठी आणि मुलाच्या शिक्षणासाठी त्याला पैशांची गरज होती. परंतु नोकरी गेल्याने त्याला बोनस, कर्ज काहीच मिळणार नव्हतं. (पृ.३८,३९,५४) एन गरजेच्या काळात खाशाबाची नोकरी गेल्याने त्याला आर्थिक संघर्षाशी सामना करावा लागत असतो. कर्त्या पुरुषाची नोकरी जाणे, त्याच्यावरच सर्व कुटुंब अवलंबून असणे, दुसरा उत्पन्नाचा स्त्रोत नसणे अशा कारणांनी माणसाला घेरल्यावर कराव्या लागणाऱ्या आर्थिक संघर्षाचे चित्र मराठे यांनी हुबेहूब साकारलेले या कथेतून दिसते.

**अग्नी :**

भिवा ओटवणे ज्या कंपनीत काम करत असतो त्या कंपनीतील कामगारांनी संप पुकारलेला असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती बिघडलेली असते. संपाच्या प्रतिक्रियांचा परिणाम म्हणून त्याच्या हाताला इजा झालेली असते. त्यामुळे त्याला दुसरे कामही करता येणे शक्य नसते. त्याच्यावर त्याची पत्नी, मुलगा, सून, विधवा मुलगी आणि तिची तीन मुले अशा मोठ्या परिवाराची जबाबदारी असते. भिवा यातून मार्ग काढण्यासाठी शेवटी बायकोच्या गळ्यातील सोन्याचा मणी गहाण टाकून सावकाराकडून पंचवीस रूपये आणतो. त्यातून दुकानदाराची थकबाकी दिल्याने त्याला जेवणासाठी भाकरीही मिळेनाशी होते. (पृ.६०,६१,६३,६४)

कारखानदारांच्या मनमानीमुळे, युनियनच्या संपाच्या निर्णयामुळे भिवा ओटवणेसारख्या सामान्य माणसांचा आर्थिक बळी कसा पडतो ते ह. मो. मराठे यांनी विदारकपणे मांडले आहे.

**हुतात्मा :**

या कथेतील नायक शंकर निसळ देशासाठी हुतात्मा झाला होता. त्यामुळे त्याच्या कुटुंबाची जबाबदारी वडिलांवर येऊन पडते. शंकरचा दुसरा भाऊ शांताराम सीमाप्रश्नात आत्मदहन करतो. त्यामुळे त्याच्याही कुटुंबाची जबाबदारी या म्हाताऱ्य वडिलांवर येते. शेतात पाऊस पडला तरच धान्य पिकते. छोटसे दुकान बंद ठेवून शांताराम उपोषणाला बसल्यामुळे तोही उत्पन्नाचा भाग बंद होतो. दोन मुले हुतात्मा होऊनही सरकारकडून त्य कुटुंबाला राजकारणामुळे मदत मिळत नाही. त्यामुळे अंगात त्राण नसतानाही म्हातारा नायक उठतो आणि नातवांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो आणि शंकरच्या थोरल्या पोराला परत दुकान उघडायला मदत करताना दिसतो. स्वत:चे चार मुलांचे वियोगाचे दु:ख बाजूला सारून उरलेल्या कुटुंबाच्या आर्थिक विवंचनेमुळे हा नायक अस्वस्थ दिसतो. (पृ.१९१,१९३,२००) राजकारणी कटकारस्थामुळे दोन मुलांना तर गमवावे लागतेच पण संपूर्ण कुटुंबाची परवड न पाहवल्याने या नायकाला स्वत:ला दुसऱ्यांच्या मदतीची गरज असताना ते कुटुंबाचा आधारस्तंभ बनताना दिसतात. घरातील एक कर्ता पुरुष संपला तर त्याची जबाबदारी दुसऱ्यावर येते. तोही संपला तर ती तिसऱ्यावर येते. जबाबदारीला वयाची मर्यादा नसलेली दिसते.

ह. मो. मराठे यांनी विविध पुरुषपात्रांच्या माध्यमातून पुरुषांचा आर्थिक संघर्ष रेखाटलेला दिसून येतो. घरातील कर्ता पुरुष जर आपल्या नोकरी, व्यवसाय, करिअरमध्ये यशस्वी झाला तर तो आर्थिकदृष्ट्या सक्षम होतो. आर्थिक अंगाने सक्षम असलेले पुरुष घर संसार चालविण्यात, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळण्यात, दानधर्म, परोपकार करण्यात, सामाजिक बांधिलकी जपण्यात काही प्रमाणात यशस्वी होतात परंतु आर्थिक सक्षमता नसेल तर या सर्व गोष्टी बाजूला पडतात. त्यामुळे पुरुषांचे आर्थिक सक्षम असणे अत्यंत महत्त्वाचे असलेले दिसते. या सर्व कथासंग्रहामधील कथेतील नायक कधी स्वत:च्या चुकीमुळे आर्थिक संघर्षाला सामोरे जातात, तर कधी दुसऱ्यांच्या चूकीमुळे, परिस्थितीमुळे, शैक्षणिक कमतरतेमुळे अयशस्वी होताना दिसतात.

‘सापेक्ष’ मधील पुरुष संपात सापडतो म्हणून त्याची व त्याच्या कुटुंबाची आर्थिक ओढाताण होते तर या कथासंग्रहातील अँकर कथेतील भालेराव मोठे संपादक असूनही त्यांनाही आर्थिक चिंता सतावताना दिसतात. ‘जी सरकार’ कथेतील मोहनला कमी पगारामुळे जेवणखाण – राहणीमान सर्वच स्तरावर तडजोड करावी लागते. याच संग्रहातील ‘देशात सालं काही घडतच नाही’ या कथेतील नायकाला स्वत:ची रिक्षा नसल्याने खूप कष्ट करूनही भांडणतंटे, आर्थिक तडजोडी यांचा सामना करत–करतच स्वत:चा जीवही गमवावा लागतो.

‘वीज’ कथासंग्रहातील ‘बाई कशाला रडतील’ या कथेतील नायक भ्रष्टाचारी माखनवाला बिल्डरमुळे आर्थिक नुकसान सोसतो. कर्जाबरोबर घरातील दैनंदिन समस्या पूर्ण करण्यासाठी आर्थिक संघर्ष करतो, तर ‘खुर्ची’ या कथेतील नायक कर्जाच्या चक्रव्युहात अडकल्यामुळे आयुष्यभर आर्थिक संघर्षांना तोंड देताना दिसतो.

‘ज्वालामुख’ कथासंग्रहातील ‘ज्वाळा’ कथेतील मोहिते मोठे कुटुंब आणि जमाखर्चाचे व्यस्त प्रमाण यामुळे आर्थिक संघर्ष करतो. ‘भिंत खचली’ मधील नायक जन्मत: आलेल्या गरिबीमुळे आर्थिक संकटांत असतो. ‘पक्षिणी’ कथासंग्रहातील ‘व्रणार्त’ कथेतील अविनाश बेकार असतो. शिवाय वडिलांचे घरावर असलेले सहा हजारांचे कर्ज फेडण्याची जबाबदारी त्याच्यावर असल्याने तो आर्थिक विवंचनेत दिसतो. ‘घोडा’ कथासंग्रहातील ‘मशीन’ कथेतील खाशाबा पुरेसे अद्ययावत शिक्षण नसल्याने कामावरून कमी होतो. काम नसल्याने ऐन उमेदीतच त्याला आर्थिक संकटांशी सामना करावा लागतो, तर ‘अग्नि’ कथेतील भिवा ओटवणे मनाविरूद्ध संपात सापडतो त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती कोलमडते.

वरील सर्व पुरुष पात्रांच्या आर्थिक संघर्षाचा विचार करता त्याची कारणे कधी कौटुंबिक, सामाजिक तर कधी वरिष्ठांची मनमानी अशा स्वरूपाची दिसतात.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीतील नायक हॉटेलच्या शेवटच्या पायरीवर उभा असताना त्याला हॉटेलात जाऊन चहा सिगारेट घ्यायची इच्छा असतानासुद्धा तो स्वत:ची इच्छा मनातील विचारांद्वारे दुसरीकडे वळवताना दिसून येतो. संयम पाळायचा म्हणून सिगरेटने कॅन्सर होईल आणि कॅन्सरने मेल्यावर पुन्हा चौऱ्याऐंशी लक्ष योनी भोगून पुन्हा पैशासाठी अशीच वणवण करावी लागेल या विचारांच्या गर्तेत तो सापडलेला दिसतो. बेकार असल्याने साध्या चहा–सिगरेटसाठीसुद्धा हा तो मोकळेपणाने खर्च करू शकत नाही. (पृ.१) तरीही तो जेव्हा हॉटेलात पोहोचतो आणि तेथील मालकाची श्रीमंती आणि भिकाऱ्याचे मालकाच्या गल्ल्यातील नाण्यांकडे पाहणे पाहून आपण या भिकाऱ्यासारखे गरिबाला पैसा द्या म्हटले तर काय हरकत आहे असा विचार करतो. त्याच्या विचारप्रक्रियेवरून त्याच्या मनातील पैशासाठी चाललेली धडपड दिसून येते. पैसा मिळविण्यासाठी तो एवढ्या खालच्या थराला जाण्याचा विचार करतो. (पृ.३)

गोडसे काकूंच्या स्वभावाची पूर्वकल्पना असतानासुद्धा हा नायक काकू आपल्या बायकोच्या नोकरीसाठी शब्द टाकणार म्हटल्यावर तो काकूंच्या पायावर डोके ठेवण्याचा विचार करतो. परंतु रस्ता होता म्हणून तो त्यांच्या हातातील सामानाची पिशवी घेऊन त्यांना मदत करतो. (पृ.९) एकेकाळचा आगरकरी बाण्याचा हा नायक बायकोला नोकरीसाठी काकूंची मदत होईल या अपेक्षेने मनाविरूद्ध त्यांच्याशी जवळीक साधतो. आगरकरी बाणा पूर्णपणे शेणगोळ्यात रूपांतरीत होतो.

असाच एक दुसरा प्रसंग नायक बेकार असतानाचा ह. मो. मराठे यांनी नायकाला आर्थिक परिस्थितीशी कराव्या लागणाऱ्या अनेक समस्यांपैकी एक छोटीशीच समस्या पण नायकाचासुद्धा नाइलाज असतो. नायकाचा मित्र मि. सहस्रबुद्धे नायकाच्या नोकरीसाठी मालकाकडे शब्द टाकणार असतो म्हणून नायक त्याला चहा घेऊ म्हणून विचारतो, पण त्यानी चहा घ्यायला नकार द्यावा अशीच भावना या नायकाची असते. सहस्रबुद्धे यांनी होकार दिल्यावर चहाचे पैसेही त्यांनीच दिल्यावर नायकाला कमीत कमी यावेळी आपण पैसे दिले पहिजे होते हे समजत असूनही

नायकाकडेच कमी पैसे असतात म्हणून चहाचे पैसे द्यावे लागले नाहीत यातच क्षुद्रपणा दाखवूनही आत सुखाताना दिसतो. चहाच्या तीस पैशांसाठी नायकाची चाललेली ही मनातील चलबिचल नायकाच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव करून देते. (पृ.१९,२१)

वसूच्या नोकरीसाठी नायक गोडसेकाकूंना देसाईबाईंना शब्द टाकण्याची विनंती करतो. काकूंनी देसाईबाईंना शब्द टाकावा म्हणून नायक काकूंच्या नातवाच्या बारशासाठी त्यांना देण्यासाठी पैसे नसतानाही अडीच पावणेतीन रूपयांची वाटी खरेदी करतो. काकूंचे लक्ष जाण्यासाठी वाट बघत व्हरांड्यातच खुर्चीत बसून राहतो. काकूंच्या घरच्या रामागड्याशी ओशाळ मनाविरूद्धच हसतो. त्याने काकूंना निरोप द्यावा म्हणून त्याच्या हातावर पावली ठेवतो. हा सर्व घटनाक्रम पाहता नायकाकडे पैसे नसतानाही नोकरी करून पैसे मिळविण्यासाठीच तो काकू, रामागडी यांच्यासाठी पैसे खर्च करताना दिसून येतो. (पृ.२७,२९) देसाईबाईंकडे वसूच्या नोकरीची शक्यता नाही हे पाहून तो नाराज होतो. सर्व मार्ग बंद झालेले पाहून तो बायकोकडे एक वस्तू म्हणून पाहताना दिसतो. तो म्हणतो,

“साल्ये, मी एकट्यानंच उपजीविकेसाठी स्वत:ला विकावं असं कुठं आहे?

तूही विकली जा. मांड लिलाव. ” (पृ.३६)

बायकोने स्वत:चा लिलाव करावा हे विचार करण्यास प्रवृत्त झालेल्या नायकाच्या स्थितीस त्याची आर्थिक विवंचनाच प्रामुख्याने दिसून येते.

बायको गर्भवती असताना दोघांना नोकरी नाही. बाळाची आणि संसाराची जबाबदारी पेलण्याची क्षमता नाही. तशातच रहायला जागेचा आणि खाण्याचा प्रश्नही नायकासमोर उभा राहतो. त्या आर्थिक विवंचनेच्या चिंतनाने तो रात्री अपरात्रीसुद्धा पैशाचाच विचार करू लागतो. हे नायकाच्या मनातील चाललेल्या आर्थिक विचारांच्या वादळामुळे दिसून येते;

“काय आहे आपल्या उद्याचं रूप – तुला कसं सांगू?

उद्या संध्याकाळी तुला जेवायला अन्न नसेल. परवा सकाळी तुला रहायला आसराही नसेल. भाडं दिल नाही तर ही बारकी बारकी भांडी आणि तुला गर्भारशीला उचलून मालक रस्त्यावर ठेवील. मग मी काय करू?

कुठं जाऊ ?

कुणापुढं तोंड वेंगाडू –

कुणासमोर ओंजळी पसरू?

कुठून पैसे आणू?

पैसा

पैसा

पैसा

पैसा

पैसा" (पृ.६६,६७)

पैशासाठी नायकाची झालेली अधांतरी अवस्था मराठ्यांनी मानसिक विचारांच्या आधाराने स्पष्टपणे रेखाटली असून मोठ्या आणि ठळक होत जाणाऱ्या पैसा या शब्दाच्या आधाराने ती कशी मोठी आणि गडद होत चाललेली आहे हे मराठे मोठ्या ताकदीने रेखाटतात.

आपली आर्थिक परिस्थिती चांगली नसताना तिसऱ्या जीवाची जबाबदारी नको शिवाय बायको गर्भवती नसेल तर तिला नोकरीही मिळेल या उद्देशाने झपाटून जाऊन हा नायक मंडईतून दोन पपया घेऊन येतो आणि वसूचा गर्भपात घडवून आणतो. जीवनातील आई–बाबा होणे ही सर्वात मोठी असलेली देणगी हा नायक फक्त पैसा नाही या एका कारणासाठी ही जबाबदारी धुडकावतो. यावरून त्याला पैशासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाची जाणीव होते. नायकाकडे पैसा नाही म्हणून तो आपल्या पत्नीचाही आई बनण्याचा अधिकार हिरावून घेताना दिसतो. हे क्रूरकर्म तो फक्त आर्थिक विवंचनेतून करतो ही बाब पुरुषजातीला काळिमा फासणारी आहे. परंतु परिस्थितीने ग्रासल्यामुळे तो हे कृत्य करतो हे मराठे यांनी सूचित केल्याचे दिसून येते. (पृ.७०)

पुरुषांना आर्थिक संघर्ष करताना नोकरी, कुटुंब, संसार अशा वेगवेगळ्या आघाड्यांवर संघर्ष करावा लागतो. त्याविषयी डॉ. केशव मेश्राम म्हणतात,

“मध्यमवर्गीय तरूण मन जगत असते स्वप्नांवर. छोट्याछोट्या नोकऱ्या करीत संसार चालवू पाहणारा, स्वाभिमानी मनाचा तरूण, सर्व कादंबरीमध्ये त्याला फक्त, तो एवढेच सार्वनामिक अभिधान लाभले आहे. त्याने केलेला प्रेमविवाह, बायको वसू–वसुमती, नवा संसार उभा करण्यासाठी नोकरी अत्यंत आवश्यक, पण कितीही पदव्या आणि पात्रता असू द्या. शिक्षणसंस्थांना बाजारी स्वरूप आलेले. जादा पगारावर सही घेऊन शिक्षकांच्या हातावर नावापुरता पगार टिचवण्याची रीत संस्थांना भरभराट देते. माणसांच्या गरजू वृत्तीचा सौदा–लिलावाच्या बोलीसारखा चालतो. संस्था चालवणारे विश्वस्त–सेक्रेटरी म्हणजे गुंडटोळीचा रगेल बनेल गुंड म्होरक्याच. उपभोग, किंमत वसुलीची देवाण घेवाण हाच त्यांचा रोखठोक खाक्या. त्यामुळे ह्या शिक्षणसंस्था आणि शिक्षण विक्री करून जगू पाहणाऱ्या मध्यमवर्गीय सरळसोट व्यक्तींची कुचंबणा व कोंडी होते.”[१४]

पुरुषांची आर्थिक विवंचनेमुळे जगण्या–वागण्याची गणिते कशी विस्कटून जातात यांवर मेश्राम यांनी अचूक भाष्य केले आहे.

तारूण्यातील पदापर्णात बेकारीने आणि आर्थिक संघर्षाने ग्रस्त नायकाच्या जीवनावर भाष्य करताना डॉ. स्वाती कर्वे म्हणतात,

“मध्यमवर्गीय तरूणाची स्वप्ने महालांची, पंचतारांकित नसली तरी आपल्या मर्यादित परिघातील स्वप्नांचा फुलोरा प्रत्येक मन फुलवते. अलवार संवेदनक्षमतेबरोबर कुटुंबाच्या पोषणाच्या जबाबदारीचे भानही असतेच. मनात काही कल्पनांच्या भराऱ्या असल्या तरी त्याची दोरी वास्तवातील या जबाबदारीच्या दावणीला बांधलेली असते. मध्यमवर्गीय तरूणाच्या जीवनाभोवती सामाजिक मूल्यकल्पनांची चौकट भक्कम असते. या चौकटीने त्याचे जीवन नियंत्रीत केलेले असते. वास्तवाबरोबर परिचय आणि संघर्ष जसा वाढत जातो तशी या नियंत्रणाची जाणीव तीव्र, जाचक होऊ लागते. ‘स्व’ च्या अस्तित्वाचा संकोच होता होता आपण आपलं जीवन जगत असलो तरी ते आपले नाहीच; परिस्थिती आपल्याला नियंत्रीत करीत आहे. ती दोर जसे खेचेल तसे नाचणे, वाकणे, अगतिक होणे, लाचार होणे आवश्यक आहे. तसे वाकत राहिलो तर आत्मक्लेश होतात. वाकायचे नाकारले तर संघर्ष करावा लागतो.”[१५]

नायकाची मनाची झालेली हळुवार स्थिती ही पुरुषांच्या आर्थिक संघर्षाची प्रतिमाच असल्याचे डॉ. स्वाती कर्वे येथे स्पष्ट करतात.

**२. काळेशार पाणी :**

विष्णू गवस ऊर्फ गावकर हा गावातील प्रतिष्ठित गावकर असतो. त्याचे स्वत:चे कुटुंब असूनही तो भिकीबरोबर आपला दुसरा घरोबा करताना दिसतो. स्वत:ची आर्थिक परिस्थिती चांगली नसताना दोन कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडते. परंतु तो भिकी नावाच्या ठेवलेल्या बाईबरोबर फक्त शरीरसुख उपभोगतो, परंतु भिकी आणि मुलांची आर्थिक जबाबदारी सांभाळताना दिसत नाही. हे भिकीच्या चिडण्यावरून आणि ती विष्णूवर संतापण्याच्या घटनेवरून स्पष्ट दिसते. (पृ.२५,२६) विष्णूची परिस्थिती चांगली नसल्यामुळेच तो भिकी आणि मुलांची आर्थिक जबाबदारी उचलू शकत नसल्याचे दिसते. त्याच्या आर्थिक परिस्थितीविषयी जास्त माहिती समोर येत नसली तर त्याच्या घरातील एकच तांदळाच्या पोत्याच्या उल्लेख आणि विष्णूची बायको आणि भिकी यांच्या तोंडातील वाक्यांवरून समजून येते. (पृ.२६)

पुरुषांच्या आर्थिक संघर्षावर भाष्य करताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात,

‘‘अशा निराधार गरीब स्त्रियांना रांड म्हणून ठेवणाराचीही परिस्थिती चांगली असते असे नाही. कारण त्यांचेही उत्पन्न जेमतेमच असते. सामंताच्या मामाच्या घरी कमळी जाते तेव्हा त्याचे मामा ती विष्णूच्या पत्नीची मुलगी आहे समजून तिला म्हणतात, तो महानीच माणूस. जन्मभर रांडेच्यानं तुझ्या आयशीस छळलंन. सदानकदा मेला त्या भिकीच्या पडवीवर पडलेला. कामाधामाच्या नावाने शंख. काय शेतात होईल तितक्या भातावर दिवस ढकलायचे. घराकडे लक्ष नाही....... ’’[१६]

यामुळेच मरण्यापूर्वी विष्ण्या गवस तांदळाचे भरलेले पोते भिकीच्या खळ्यात म्हणजे अंगणात आणून टाकतो. तेव्हा त्याची पत्नी ते तांदळाचे पोते पाहून म्हणते, तरी मांका वाटलांच, येक दिस ह्या तांदळाचा पोता या रांडेकडे येतला. आता माका संशय इलो म्हणान धावत इलंय तर पोता हंयसरच चलत इलाहा. घाल रांडेच्या मडयार घाल सगळा माका खांवक काय हेचो इचार करू नको. याचा अर्थ विष्ण्या गवसाचीही एकूण परिस्थिती फारशी चांगली नाही. या

ठिकाणी विष्णूला करावा लागलेला आर्थिक संघर्ष परिस्थितीने आणलेला आहे हे खरे असले तरी तो संघर्ष अधिक वाढण्यासाठी त्याचा बदफैलीपणाच प्रामुख्याने कारणीभूत ठरतो असे सूचन मराठे येथे करताना दिसतात.

**३. इतिवृत्त :**

फळणीटकर उद्योगसमूहाचे 'जनता' दैनिकाचे संपादक असलेले नाडकर्णी अतिशय जिद्दी, बुद्धिमानी, प्रामाणिक परंतु संघर्ष करत करत ते संपादकापर्यंत पोहोचतात. त्यांची परिस्थिती गरिबीची असल्यामुळे त्यांना अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागल्याचा उल्लेख ह. मो. मराठे निवेदनाच्या माध्यमातून करतात.

"गॅलरीत उभं राहून दूरवरून येणाऱ्या समुद्राचा पुसट पण संथ, गंभीर पण उच्छृंखल असा आवाज ऐकताना त्यांना आपल्या त्या उद्‌गारांची आठवण येत होती. ज्यांच्यापाशी बुद्धी आहे तो कसाही मार्ग काढू शकतो. आजवर नाडकर्णी यांनी असाच मार्ग काढला होता. गरिबीतून, अडचणीतून, प्रतिकूलतेतून, संघर्ष करून संघर्षाला सामोरे जाऊन." (पृ.१४)

नाडकर्णी संपादक म्हणून काम करत असताना काही नेते आणि त्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे उघड करतात पण याचा परिणाम म्हणून त्यांना संपादकपदाचा राजीनामा द्यावा लागतो. यावरून असे दिसते की, परिस्थितीमुळे शरणागती पत्करावी लागल्यामुळे पुरुषांना आपल्या इच्छेप्रमाणे निर्णय घेण्यात अडचणी निर्माण होतात. या सर्वांचा एकत्रित परिणाम त्यांच्या नोकरी–व्यवसायावर होत असल्याचे मराठे निदर्शनास आणून देतात. शेवटी नाडकर्णींनाही आपल्या पदाचा राजीनाम द्यावा लागतो. पदाबरोबरच काम, प्रतिष्ठा, पैसा सर्व काही गमवावे लागते. नोकरी नाही म्हणजे आर्थिक अडचणींना तोंड देणे ओघानेच येते अशाप्रकाराचा आर्थिक संघर्ष तर पुरुषांना अनिवार्यच असल्याचे येथे निदर्शनास येते. (पृ.२६४,२६५,२६७)

**४. कुरूक्षेत्र :**

शांतीवन महाविद्यालयाचे प्राचार्य बेलसरे हे आपल्या शिक्षणक्षेत्रातील प्रामाणिक कार्याने प्राचार्य पदापर्यंत पोहोचलेले असतात. ते ज्या संस्थेत काम करतात तेथे अनेक आर्थिक गैरव्यवहार त्यांच्यासमोर होतात. परंतु गुंडप्रवृत्तीच्या तुकाराम फराटेंच्या विरूद्ध ते आवाज ऊठवू

शकत नाहीत. प्रवेशप्रक्रियेतील घोळ, स्कॉलरशिपचे पैसे वरिष्ठांना खाताना पाहून त्यांना आतून खूप दु:ख होते. पण त्यांचा नाइलाज असतो. स्कॉलरशिपचे पैसे मिळाले नाहीत म्हणून एका मुलाला मारहाण होते. शिक्षकांचेही पगार वेळेवर होत नाहीत. प्राचार्य म्हणून काम करत असूनही बेलसरेंना ठोस भूमिका घेता येत नाही. (पृ.९,१०) डॉ. म्हसकरांनी स्थापन केलेल्या शांतीवन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. म्हस्करांच्या विचारांनी प्रेरीत झालेले आहेत. भरमसाठ शाळा कॉलेज न काढता फक्त शांतीवन महाविद्यालय सरकारी खर्चाशिवाय चालवायचा मानस असलेले म्हसकर आणि बेलसरे यांच्या उद्देशाला तुकाराम फराटेंसारख्या माणसांचा त्रास सहन करावा लागतो. होस्टेलच्या मुलांना सोयीसवलती न देता तुकाराम फराटेंच्या बंगल्यावर पार्ट्या होतात. एकीकडे विद्यार्थ्यांना पोटासाठी, शिक्षणासाठी आर्थिक संघर्ष करावा लागतो, तर दुसरीकडे तुकाराम फराटेंसारखे लोक स्वत:च्या स्वार्थासाठी विद्यार्थ्यांवर अन्याय करताना दिसतात. (पृ.२२,२३)

डॉ. प्राचार्य बेलसरे यांनी एका प्राध्यापकाशी केलेल्या वक्तव्यावरून समकालीन पुरुषांना आर्थिक परिस्थितीशी कसा सामना करावा लागला याची कल्पना येते. काही लोक स्वार्थाने सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार करतात. तर काही लोक उघड्या डोळ्यांनी हे सर्व पहात बसतात. 'विसर नाही पडलेला', ते म्हणाले, 'चांगलं आठवतेय ती. पण त्या ध्येयदृष्टीचा व आजच्या परिस्थितीचा काही तर संबंध उरलाय का? त्यावेळी डॉ. म्हसकरांनी आपली सर्व इस्टेट संस्थेसाठी देऊन टाकली आणि आजचे संस्थाचालक आलेली पगाराची ग्रँटसुद्धा आपल्या घशात घालताहेत. यावरून असे लक्षात येते संस्थाचालकांच्या आर्थिक भ्रष्टाचारात विद्यार्थी आणि प्राध्यापक, शिक्षक यांची ससेहोलपट होताना दिसून येते. याच संस्थेतील एका प्राध्यापकाची प्रतिक्रिया त्याला कराव्या लागत असलेल्या आर्थिक संघर्षाची कल्पना देते.

'रेशनपुरते तरी द्या म्हटलं पैसे तर म्हणाला कशाला जेवतोस आणि जगतोस? मेलास तर तुझ्या जागी माझ्या भावाच्या मेव्हणीला नेमून घेईन.' सर्वच ठिकाणी 'बळी तो कान पिळी' या न्यायाने वागणूक मिळत असल्याचे ह. मो. मराठे येथे प्रकर्षाने मांडताना दिसतात. या कादंबरीतील शांतीवन महाविद्यालयातील संस्थेतील कोणी एकच पुरुष आर्थिक संघर्ष सहन करत

नसून अनेक कर्मचारी व विद्यार्थी या शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या विळख्यामुळे आर्थिक संघर्ष करत असल्याचे चित्र येथे समोर येतो. (पृ.४१)

शिक्षणासाठी सरकारी पैसा वापरायचा नाही. संस्थेचा व्याप आणि पसारा वाढवायचा नाही. कारण त्यामुळे शिक्षणाचा मूळ हेतू नाहीसा होऊन शिक्षणाचा दर्जा कमी होतो. अशा विचारसरणीचे डॉ. म्हसकर याविरूद्ध सर्व गोष्टींना तुकाराम फराटेंना विरोध करतात म्हणून त्यांना या आर्थिक संघर्षापायीच आपला जीव गमवावा लागतो. (पृ.६३) प्रा. भावे यांनाही या आर्थिक संघर्षापायी आपला जीव गमवावा लागतो. (पृ.७५) आर्थिक संघर्ष करत असताना एक तर सगळे निमुटपणे सहन करत जाणे अपरिहार्य आहे नाहीतर विरोध केला तर जीवच गमवावा लागत असल्याचे चित्र येथे या कादंबरीच्या पूर्वार्धात दिसून येते.

कुरूक्षेत्र या कादंबरीच्या उत्तरार्धात वसंत दामले नावाचा शिक्षक असलेला नायक पैशासाठी डोळ्यांनी अधू असलेल्या सुमाशी लग्न करतो. सुमाच्या आईवडिलांनी तिला शिकवावे आणि डी.एड. करून सुमाने आपल्याला पगार आणून द्यावा अशी इच्छा धरून असतो. नायकाचे घर खेड्यात असून पत्रा आणि कौले असलेली खोली असते. त्याच्या घरात पाणी, संडास, स्वयंपाकाला गॅस, अभ्यासाला टेबल, रेडिओ, टी.व्ही., ट्युबलाईट, वर्तमानपत्र अशा सुखसोयींची वाणवा दिसते हे ह. मो. मराठ्यांनी त्यांच्या राहण्याच्य जागेच्या केलेल्या तपशीलवार वर्णनावरून स्पष्ट होते यावरून या नायकाला दैनंदिन गरजा भागवतानाही किती त्रास सहन करावा लागत असेल याचे सूचन येते. त्याच्या आर्थिक स्थितीचा आणि त्याला कराव्या लागत असलेल्या तडजोडीची कल्पना येते. (पृ.८७) बायको डोळ्यांनी अधू असल्यामुळे आणि सहा माणसांचे काम झेपत नसल्यामुळे ती नवऱ्याकडे म्हणजे वसंतराव दामलेंकडे धुणीभांडी करायला बाई ठेवण्याविषयी विचारते तेव्हा हा नायक एकदम सुमाच्या अंगावर येऊन खेकसतो; मास्तर आहे मी. श्रीमंत नाही तुझ्या बापासारखा. यावरून आणि नवीन लग्न होऊनही हा नायक हनीमुनसाठीही आपल्या बायकोला कोठे घेऊन जाऊ शकत नाही, यावरून त्याच्या परिस्थितीची आणि त्याने आर्थिक गोष्टींमुळे केलेल्या त्यागाची आणि संघर्षाची कल्पना येते. परिस्थितीमुळे तो

आपल्यासोबत आपल्या बायकोलाही हे सगळे सहन करायला भाग पाडत असल्याचे चित्र समोर येते. (पृ.९०)

या नायकाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही हे त्याच्या रहाण्याच्या जागेवरून आणि पत्नीनेही नोकरी करावी या अपेक्षेवरून दिसून येत असले तरी हा नायक शिक्षक आहे. गावाकडे घर शेतीवाडी आहे हे विसरून चालणार नाही. त्यामुळे आर्थिक ओढाताण ही त्याच्या कंजुष स्वभावामुळे दिसून येते. घरखर्चाला व बाळाच्या संगोपनालाही तो पैसे देत नसल्याने त्याच्या आपमतलबी स्वभावामुळे त्याच्या कुटुंबाला आर्थिक चणचण सहन करावी लागते. नायकाच्या आर्थिक परिस्थितीचा फटका त्याच्याबरोबर त्याच्या कुटुंबालाही सहन करावा लागतो हेच येथे स्पष्ट होण्यास मदत होते.

**५. कलियुग :**

सी. एम. कत्रे हा नायक युनियन लिडर आहे. युनियन लिडरच्या घरी म्हणजेच कत्र्यांच्या घरी खुर्च्या नव्हत्या. रेडिओ नव्हता. कपडे ठेवायला कपाट नव्हते असा उल्लेख पर्सोनल मॅनेजर यांच्याकरवी येतो. यावरून कत्रे त्यांच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येते. वरील सर्व गोष्टी या मानवाच्या घरातील गरजांपैकी महत्त्वाच्या गोष्टी आहेत. पण त्याही वस्तू या नायकाकडे नाहीत यावरून त्याच्या जेमतेम आर्थिक परिस्थितीची कल्पना येते. (पृ.२६)

कंपनीने देऊ केलेल्या वस्तू कत्रे नाकारतात आणि कामगार नेतृत्व विकत घेण्याचा आरोप व्यवस्थापनावर ठेवतात. व्यवस्थापनाच्या चारित्र्यावर हा आरोप आहे म्हणून नोकरी सोडण्यासाठी कत्र्यांवर दबाव येतो. राजीनामा दिला नाही तर वेगवेगळ्या प्रकरणात व्यवस्थापन अडकविण्याची शक्यता होती ही परिस्थिती कत्र्यांबाबत घडते ती केवळ आर्थिक परिस्थिती चांगली नाही म्हणून. त्यांच्या घरी या वस्तू असत्या तर कंपनीने त्या दिल्या नसत्या त्यामुळे पुढील प्रसंगही ओढवला नसता. आर्थिक बाजू कमकुवत असल्याचा गैरफायदा कत्र्यांच्या संघर्षाला कारणीभूत होतो. (पृ.२७,२८,२९)

**६. देवाची घंटा :**

गोप्या भट हा मारूतीचा पुजारी असतो आणि पूजेच्या उत्पन्नावरच तो आपली ठेवलेली बाई येसू आणि दोन मुलांचा उदरनिर्वाह करतो. काही कालावधीनंतर त्याचे उत्पन्नाचे साधन इतर लोकांच्या अधिकारात जाते व आर्थिक ओढाताणीस सुरूवात होते. मंदिरात येणारे भाविक पैसे कुलुपबंद पेटीत टाकीत. अभिषेकाची नोंदवहीत होऊ लागते. वकील नारळ मोजून घेऊ लागतो. त्यामुळे गोप्या भटाला कशातच वाटा मिळेनासा होतो. थेट मारूतीच्या पायापाशीच टाकलेले पैसे फक्त गोप्याभटाला मिळतात. (पृ.३२)

गोप्या भटाला व त्याच्या कुटुंबाला उदरनिर्वाह करण्यासाठीही काही मिळेनासे होते. तेव्हा तो एका रात्री मंदिरातील पेटीचे कुलूप तोडून शंभर रूपयांची चोरी करतो. त्याच्यावर चोरीचा आळ येतो. येसू ते पैसे वकिलांना परत करते परंतु तरीही त्याच्यावर चोरीचा आळ येतो. त्यामुळे गोप्या भट भितीने खूप आजारी पडतो. (पृ.६०,६७) ही सर्व परिस्थिती पैशांच्या कमतरतेने घडते. पैशांसाठीच गोप्याभट देवळातही चोरी करण्याचे धाडस करतो. देवाची पूजा करणारा, मारूतीवर श्रद्धा असणारा गोप्या भट मारूतीच्याच देवळात चोरी करतो. ही विरूद्ध परिस्थिती त्याला कराव्या लागणाऱ्या आर्थिक संघर्षामुळेच घडत असल्याचे नेमके चित्रण ह. मो. मराठ्यांनी येथे केले आहे.

**७. सॉफ्टवेअर :**

मि. देशमुख पळसोपकर उद्योगसमूहात लेबर अँड पर्सोनेल मॅनेजर म्हणून काम करत असतात. पळसोपकरांकडे नोकरी करत त्यांना पाच वर्षे झालेली असतात. त्याआधी ते चार–पाच नोकऱ्या सोडून तसेच पंधरा वर्षांची नोकरी सोडून आलेले असतात. त्यांच्या शिक्षणाला आणि गुणवत्तेला साजेसी नोकरी त्यांना मिळालेली नसते. समाधानकारक काम मिळालेले नसते. त्यामुळेच त्यांना छोट्या–छोट्या उद्योगधंद्यात नोकऱ्या कराव्या लागतात. (पृ.१३) छोट्या–छोट्या नोकऱ्या ते आर्थिक गरजा भागविण्यासाठीच करत असावेत असे वाटते. कारण एम. ए. इकॉनॉमिक्स फर्स्ट क्लास. दोन वर्षे कॉलेज प्राध्यापक, एल्.एल्.बी. लेबर लॉमध्ये

स्पेशलायझेशन आणि वकिली प्रॅक्टीस. एक-दोन केसेस जिंकलेल्या. या सर्व जमेच्या बाजू असूनही ते छोट्या-छोट्या नोकऱ्याही करताना दिसतात. (पृ.१३)

देशमुखांची बायकोही छोटा-मोठा व्यवसाय उद्योग-धंदा करण्यासाठी भांडवल नाही म्हणून स्वत:चे दागिने विकून मिसेस जोशींबरोबर क्लिनिंग सोपच्या व्यवसायात पैसे गुंतवतात. काहीतरी करून संसाराला हातभार लावण्याच्या उद्देशाने त्या हे काम करताना दिसतात, पण त्यांची आर्थिक परिस्थिती पाहता पैशासाठी त्यांना हे काम करावे लागत असल्याची जाणीव होते. या कामात देशमुख त्यांना सपोर्ट करताना दिसतात. म्हणजे आर्थिक बोजा कमी करण्यासाठी ते पत्नीची मदत नाकारताना दिसत नाहीत.

मि. देशमुखांना बीवायपी कंपनीकडून कामावरून काढून टाकले जाते कारण त्यांनी वरिष्ठांची चुकीची आज्ञा पाळण्यास नकार दिला होता. पण या सर्वांचा परिणाम सरळ सरळ त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक बाबींवर झालेला होता. कारण मिसेस देशमुखांनी धंद्यासाठी दागिने विकून पैसे गुंतविले होते पण काम नव्हते आणि मुलगी रेखाचे लग्न, हुंडा यासाठी पैसा जमा करायचा असतो. मुलगा अरूणचे मेडिकलचे शिक्षण चालू असते तेव्हा अशा अडचणींच्या प्रसंगी देशमुखांची नोकरी जाणे म्हणजे कुटुंबावर मोठेच संकट होते. पुरुषांची नोकरी म्हणजे कुटुंबाचा कणा समजला जातो. तोच जर मोडून पडला तर कुटुंबप्रमुखही मोडून पडतो आणि पर्यायाने कुटुंबसंस्थाही ढासळते हे ह. मो. मराठे यांनी कळत-नकळत सुचविले आहे.

ह. मो. मराठे यांचे माणूस आणि त्याच्या सभोवतालची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय परिस्थिती, उद्योग-व्यवयाय, त्यातील अंतर्गत स्पर्धा आणि या सर्वांमध्ये केंद्रवर्ती असलेला माणूस यांचे सूक्ष्म निरीक्षण दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांचे चांगलेच भान असलेले दिसून येते. साहजिकच माणूस परिस्थितीचा बळी असतो. तो परिस्थितीशी जुळवून घेऊ शकला नाही, योग्य मार्ग काढू शकला नाही तर कसा ढासळत जातो याचे अस्वस्थ करणारे चित्रण मराठे यांच्या कादंबऱ्यांमधून येते.

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील नायक आर्थिक कुचंबनेने असहाय झाल्यानंतर नोकरीसाठी धडपडतो, ती मिळत नाही. तेव्हा आपणच का सर्व करायचे, पत्नीनेही तो भार

उचलावा म्हणून अपत्यसुखावर पाणी सोडून पत्नीचा गर्भ पाडून अमानवीयतेची प्रचिती देतो. 'इतिवृत्त' मध्ये पत्रकार ते संपादक पदापर्यंत मजल मारणारे नाडकर्णी एक प्रामाणिक माणूस नेत्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढून पत्रकारितेशी इमान राखतात पण त्यांचे पर्यवसन त्यांच्या संपादक पदाच्या राजीनाम्यात रूपांतरित होते आणि दारिद्र्याच्या खाईत लोटणे वाट्याला येते. 'कुरूक्षेत्र' मध्ये शिक्षणक्षेत्रात सचोटीने काम करणाऱ्या प्राचार्य डॉ. म्हसकरांचा त्यातच बळी जातो, तर उत्तरार्धात वसंत दामले हे शिक्षक स्वत: कर्तव्य पार पाडून घराला हातभार लावून सुखी होण्याऐवजी डोळ्यांनी अधू असलेल्या पत्नीने नोकरी करून पैसा मिळवावा हा स्वार्थीपणा जपणारा म्हणून पुढे येतो. 'कलियुग' मधील सी. एम. कत्रे युनियन लीडर म्हणून काम करीत असताना प्रामाणिकपणे वागूनही व्यवस्थापनाचा ते बळी ठरतात. 'मार्केट' मधील मि. देशमुख लेबर अॅण्ड पर्सोनेल मॅनेजर म्हणून काम करतात. पण आपल्या गुणवत्तेला योग्य तो न्याय न मिळाल्याने अनेक ठिकाणी छोट्या–मोठ्या नोकऱ्या करण्याची वेळ त्यांच्यावर येते. अखेरी बीवायपी. कंपनीत काम करीत असताना वरिष्ठांच्या मनमानीचा बळी ते ठरतात. कामावरून काढून टाकले जाते. स्वत:च्या स्वत्वाशी तडजोडी करून, वाईट गोष्टींना खतपाणी घालण्यापेक्षा ते जगणेच नको असा बाणा असणारी माणसे प्रस्थापित व्यवस्थेचा बळी ठरून त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त होते आणि आर्थिक संघर्ष आणि त्यातून वाट्याला आलेले दारिद्र्य, उपेक्षा, अवहेलना सहन करावी लागते हे वास्तव मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रे अधोरेखित करतात. 'काळेशार पाणी' मधील विष्णू गवस ऊर्फ गावकरच्या माध्यमातून स्वत:चे कुटुंब असताना 'भिकी' सारख्या स्त्रीचा गैरफायदा घेऊन शरीरसुखाबरोबरच तिच्या पोटी तो मुलांनाही जन्म देतो. पण त्यांची जबाबदारी मात्र घेत नाही. त्यातून तो आर्थिक कोंडीत सापडतो. 'देवाची घंटा' मधील गोप्या भटाची हीच अवस्था आहे. मारूतीच्या मंदिराचा पुजारी म्हणवून घेणारा गोप्या भट 'येसू' या स्त्रीला ठेवून घेतो. आर्थिक चणचणीमुळे अखेरी मारूतीच्या मंदिरात चोरी करण्यापर्यंत त्याची मजल जाते.

कधी परिस्थितीपोटी, स्वत्व जपण्यासाठी चुकीचा मार्ग न अवलंबिता नोकरीला मुकावे लागल्याने वाट्याला आर्थिक संघर्ष येतो, तर कधी वासनेच्या आहारी जाऊन

अतिभोगलोलुपतेमुळे स्वत:ला दारिद्र्याच्या खाइत लोटणारी माणसे भेटतात. कधी स्वत:च्या कर्तृत्वाकडे डोळेझाक करून पत्नीने नोकरी करून पैसा मिळवावा या विवंचनेत अडकलेले पुरुष मराठे यांच्या कादंबरीत येतात. आर्थिक संघर्षापायी हतबल झालेले, असहाय झालेले, परिस्थितीचा बळी ठरलेले, वरिष्ठांच्या मनमानीचा बळी ठरलेले पुरुष मराठे त्यांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षणासह, स्वभाव वैशिष्ट्यांसह येथे येतात.

**समारोप :**

भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबव्यवस्थेला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ही कुटुंबव्यवस्था पुरुषप्रधान आहे. पुरुष कुटुंबात आजोबा, वडील, पती, चुलता, काका, मामा, भाऊ, पती, मुलगा अशा विविध नात्यांनी तो वावरताना दिसतो. त्यातही प्रामुख्याने कुटुंबप्रमुख या नात्याने त्याचे असणारे स्थान व महत्त्व, त्याची विविध नाती, त्याला करावा लागणार मानसिक व आर्थिक संघर्ष या गोष्टी पुरुषांना व्यापून उरणाऱ्या आहेत याचा प्रत्यय ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये येतो.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रांच्या स्थान व महत्त्वाचा विचार करता जे पुरुष आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्याशी इमान राखून प्रामाणिकपणे जीवन जगण्याचा प्रयत्न करतात त्या पुरुषांना कुटुंबात आदराचे, मानाचे स्थान मिळालेले दिसून येते. म्हणजेच जे पुरुष कुटुंबातील माणसांच्या आवडी–निवडी, गरजा, छंद यांची वेळच्या वेळी पूर्तता करतात त्या पुरुषांचा समावेश यात होतो. जे पुरुष काम, क्रोध, मद, मोह, माया, मत्सर या षड्विकारांनी ग्रासून स्वत:च्या सुखी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून परस्त्रियांच्या अधीन राहणारे, हतबल, असहाय, लाचार स्त्रियांचा गैरफायदा घेऊन त्यांचे शोषन करताना दिसतात. काही अतिहव्यासापोटी पैशाच्या मागे लागून भ्रष्टाचाराला बळी पडतात. एवढेच नव्हे तर पैशाच्या मोहापायी पत्नी, मुलगी यांसारखी नातीही पणास लावताना दिसून येतात. व्यसनांच्या आहारी जाऊन आर्थिक नुकसान करणारे तर आहेतच पण त्याचबरोबर मद्यपानासारख्या पार्ट्या घरातच आयोजित करणारेही आहेत. काही पुरुष एका विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रेरणा देऊन पत्नीला यशस्वी करण्यासाठी मदत करणारे आहेत, मात्र तिने आपली गुणवत्ता सिद्ध करून पुरुषांच्या बरोबरीचे

किंबहुना त्याच्याही पुढे जाण्याचा प्रयत्न होतो तेव्हा मात्र तिला मागे खेचण्याचा प्रयत्न करणारे पुरुषही येतात पती–पत्नीमधील अतूट नाते असले तरी, त्यांच्या काही मूलभूत गरजा असल्या तरी पत्नी ही आपल्या मर्जीप्रमाणेच वागली पाहिजे, आपल्या इच्छेप्रमाणे तिने तडजोड केली पाहिजे असा हेकेखोरपणा करणारे पुरुषही आढळतात. असे पुरुष आपले कुटुंबातील स्थान अढळ ठेवण्यात अयशस्वी ठरलेले दिसतात आणि साहजिकच कुटुंबातील त्यांचे महत्त्व नगण्य ठरलेले दिसून येते.

कुटुंबात विविध नात्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. वर नमूद केलेल्या विविध नात्यांनी तो वावरत असतो. अशावेळी त्याचे ते ते नाते जपण्यात कोणती भूमिका पार पाडतो हे येथे लक्षात येते. कुटुंबप्रमुख या नात्याने वावरत असताना अनेक गोष्टींशी त्याला सामना करावा लागतो. कधी हे पुरुष संघर्ष करतात त्यातून त्यांची मानसिकता बिघडून जाते, तर कधी आर्थिक संघर्षालाही सामोरे जावे लागते. कुटुंबप्रमुख या नात्याशी इमान राखताना कधी वात्सल्यमूर्तीची तर कधी कठोर भूमिका घेताना दिसून येतो. विविध नात्यांनी वावरणारा पुरुष स्थल–काल–परिस्थिती यांनुसार बदलताना दिसून येतो. कधी आदर्श पती, आज्ञाधारक मुलगा आधारभूत चुलता–काका, मायेची पखरण करणारा आजोबा, प्रेमळ भाऊ अशा रूपांत तो प्रामुख्याने आढळतो. यांबरोबरच विशिष्ट नात्याची असणारी भूमिका उत्तमपणे पार न पाडणारे असे नातेसंबंधही यांतून अभिव्यक्त होतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रांचा विचार करता हे पुरुष वैयक्तिक , कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक, नैतिक अशा विविध पातळ्यांवर संघर्ष करताना दिसतात. कधी वैयक्तीक चुकांचा परिणाम म्हणून, तर कधी नोकरी–व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठांच्या मनमानीला सामोरे जाताना, कधी वरिष्ठाची भूमिका पार पाडत असताना, तर कधी कामगार–सेवकाची भूमिका पार पाडत असताना, कधी स्वतःच्या स्वार्थापोटी घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे मानसिक संघर्षांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसते.

नोकरीतून मिळणारे अपुरे वेतन, कंपन्यांमध्ये काम करीत असताना नवेनवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा अभाव, बदलत्या काळाला समर्थपणे सामोरे न जाण्याची मानसिकता,

अपूर्ण शिक्षण, अतिभोगलोलुपतेच्या आहारी जाऊन निर्माण केलेले प्रश्न, स्वत: कष्ट न करता दुसऱ्यांकडून पैसा मिळवावा अशी ऐतखाऊ वृत्ती, भ्रष्ट मानसिकतेमुळे निर्माण झालेली भ्रष्टाचारी प्रवृत्ती यासारख्या गोष्टींमुळे पुरुषांना आर्थिक संघर्षांना सामोरे जावे लागत असल्याचे लक्षात येते.

अशाप्रकारे कुटुंबव्यवस्थेत वावरत असणारा पुरुष त्याच्या प्रगतीला वा त्याच्या अधोगतीला तो स्वत:च जबाबदार असल्याचे प्रामुख्याने लक्षात येते. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर तो आपले स्थान व महत्त्व बळकट करताना दिसतो. स्वत:च्या चुकांमुळे तो गौण ठरताना दिसून येतो. विविध प्रकारची नाती जपत असताना कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या याचे भान राखताना दिसून येतो, तर कधी त्यांच्यापासून दूर जातानाही तो आढळतो. त्यामुळेच कधी त्याला मानसिक संघर्षाला सामोरे जावे लागते तर कधी आर्थिक कोंडीलाही त्याला सामोरे जावे लागत असल्याचे प्रत्ययाला येते. एकूणच काय संघर्ष हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे सूचित होते.

**संदर्भसूची :**

१. सारडा शंकर (संपा.), 'काळेशार पाणी:संहिता आणि समीक्षा', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००८, पृ.१२२.

२. तत्रैव, पृ.१२५.

३. जांभळे, परेन शिवराम, 'ह. मो. मराठे यांच्या धारदार लेखणीचा बोरु होऊ लागला', नवशक्ती, (रविवार पुरवणी), ९ ऑगस्ट, १९९२, पृ. ५.

४. मगदुम अजित, 'समाजातील विकृतीकरणावर प्रकाश', महाराष्ट्र टाईम्स, १३ नोव्हेंबर, १९८८, पृ. ४.

५. लिंबाळे, शरणकुमार, 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी:हताश मनाचं रणरणतं स्वगत', 'वादंग', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. १७७,१७८.

६. मेश्राम (डॉ.) केशव, 'ह. मो. मराठे यांच्या निष्पर्ण वृक्षावर', 'शब्दव्रत', लोकसाहित्य

प्रकाशन, औरंगाबाद, २०००, पृ.१३९.

७. सारडा शंकर (संपा.), 'काळेशार पाणी', उनि., पृ.१२३.

८. तत्रैव, पृ.१७४.

९. सारडा शंकर (संपा.),'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी : संहिता आणि समीक्षा', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ.१९८३, पृ.८५.

१०. तत्रैव, पृ.९९.

११. तत्रैव, पृ.१०७.

१२. तत्रैव, पृ.२३१,२३२,२३३.

१३. वाळिंबे वि. स., 'ललित शिफारस', ललित, फेब्रुवारी, १९८४, पृ.५०.

१४. सारडा शंकर (संपा.), 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी', उनि., पृ.९९.

१५. तत्रैव, पृ.२३२.

१६. सारडा शंकर (संपा.), 'काळेशार पाणी', उनि., पृ.२०७.

*****

# प्रकरण तिसरे

# ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष व समाजव्यवस्था

## १. पुरुषांची सामाजिक बांधिलकी :

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. मग तो पुरुष असो की स्त्री असो. लहान असो की मोठा असो. कोणत्याही जातीधर्माचा असो त्याला आपले जीवनमान उंचावण्यासाठी समाजाशी बांधिलकी जपावी लागते. धर्मानं, रूढी परंपरेने, कायद्याने, वंशपरंपरेने चालत आलेले काही नीति–धर्माचे, आचरणाचे काही संकेत असतात. त्या संकेतांचे पालन करत आपली, आपल्या कुटुंबाची, समाजाची, देशाची प्रगती करून घ्यावी लागते.

समाजात सक्रिय राहून स्वत:ची शारीरिक, मानसिक, आर्थिक, नैतिक, कौटुंबिक, सामाजिक उन्नती करून घेणे व समाजाकडून ज्या गोष्टींसाठी मदत झाली त्या गोष्टींचे परत उत्तरदायित्व म्हणून समाजाविषयी आपले कर्तव्यपालन करणे, एक चांगला नागरिक सिद्ध करणे अभिप्रेत असते. समाजातील ज्येष्ठांविषयी, स्त्रियांविषयी आदर, सहानुभूती तर लहानांविषयी प्रेम, आपुलकी, सामंजस्य दाखविणे हे चांगल्या व्यक्तिमत्त्वाचे लक्षण आहे. येथे फक्त ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांच्या माध्यमातून येणाऱ्या पुरुषांची सामाजिक बांधिलकी असा मर्यादित विचार अभिप्रेत आहे. पुरुष हा समाजातील एक आदरयुक्त कर्तृत्ववान असा घटक म्हणून गणला जातो. समाजामध्ये पुरुषांना सन्मानाचे, अधिकाराचे, कुटुंबप्रमुखाचे स्थान आहे. या सर्व आघाड्यांवर पुरुष कसा आणि किती कसोट्यांवर उतरतो त्यावर त्याचे श्रेष्ठत्व ठरते. स्वत:ला श्रेष्ठ बनविण्यासाठी तो सामाजिक अनुषंगाने काय विचार–आचार करतो. समाजाच्या प्रगतीसाठी स्वत: किती हातभार लावतो. प्रगतिशील समाज बनण्यासाठी तो कायकाय करताना दिसतो की, स्वत:चीच प्रगती साध्य करताना दिसतो. याचा आढावा घेऊन समाजाविषयीच्या नीतिमूल्यांना पुरुष मुठमाती देतो की डोक्यावर मानाचा तुरा मिरवितो या गोष्टींचाही येथे विचार क्रमप्राप्त ठरतो.

पुरुषांचे समाजकारण सामाजिक मूल्यांवर आधारलेले असायला हवे. परस्पर सहकार्य, शेजारधर्म, परस्परावलंबन, समाजशीलतेची जाणीव, सामाजिक भान, सामाजिक जाण, सामाजिक ज्ञान, समाजनिष्ठा, सामाजिक जबाबदारीची जाणीव, बंधुता, सेवा, विधायकता,

स्वच्छता, मानवी हक्क व प्रतिष्ठा यांच्याबद्दल आदरभाव, सौजन्यशीलता, श्रमप्रतिष्ठा, सार्वजनिक हितबुद्धी, स्त्री–पुरुष समानता, सामाजिक बांधिलकी, सामाजिक सामिलकी, सामाजिक कृतज्ञता, सर्वधर्मसमभाव इ. मूल्यांची जाणीव ठेवून प्रेरणा घेऊन पुरुषांनी आपले समाजात वर्तन ठेवले पाहिजे. अशा विविध पातळ्यांवर ह. मो. मराठ्यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून पुरुष कसा आला आहे याचा शोध घेऊ.

**कथासंग्रह :**

**१. ज्वालामुख :**

**कीटक :**

या कथेतील शंकरराव कामातून निवृत्त झालेले. काम करत असताना छंद म्हणून ते उपवर मुला–मुलींची लग्ने जमवितात. सुरूवातील ते दहा वर्षे हे काम फक्त छंद म्हणून करताना दिसतात. हे काम करत असताना त्यांना अनंत अडचणी येतात. त्यांचे स्वत:चे ऑफिस नसते. पैसा नसल्याने जाहिरात करता येत नाही. स्वत:ची गाडी नसल्याने सायकलवर प्रवास करावा लागतो. लग्न न जमणे ही समाजातील वाढती समस्या लक्षात घेऊन शंकरराव भर उन्हापावसात, रात्री अपरात्रीही हे काम करताना दिसतात. ते स्थळांची माहिती मिळविण्यासाठी मंदिर, शाळा, कारखाने, ऑफिस, वर्कशॉप येथे जातात. तेथून माहिती मिळवून मुलामुलींची नावे गोळा करतात. कोणत्याही प्रकारची फी न घेता ते हे काम फक्त समाजसेवा, छंदातून समाजोपयोगी काम व्हावे म्हणून करताना दिसतात. परंतु काही वर्षांनंतर आर्थिक परिस्थितीमुळे पैशांची गरज म्हणून त्यांना या कामातून थोडाफार मोबदला मिळवावा लागतो. (पृ.८७,८८) शंकरराव सुरूवातीला नि:स्वार्थीप्रमाणे काम करतात परंतु पुढे जाऊन त्यांना नि:स्वार्थीपणे काम करणे अवघड जाते. तेव्हा ते कामाच्या मोबदल्यात पैसो मिळवितात. परंतु या कामातून ते एकप्रकारे समाजाची समस्या सोडवून समाजसेवा करताना दिसतात.

**२. हद्दपार :**

प्रोफेसर पिंपुटकर आणि मिसेस घाटे एका सेमिनारमध्ये पेपर वाचन करतात. त्या सेमिनारमध्ये ते शेतकी विकास धोरणावर संशोधन करून आपला पेपर वाचतात. इतर विद्वानांनी

चाळीस टक्के रक्कम शेती विकासासाठी राखून ठेवण्याचे जनता सरकारचे धोरण कसे योग्य आहे यावर आपली मते प्रकट करतात. परंतु प्रोफेसरांनी चाळीस टक्के रक्कम शेती विकासासाठी राखून ठेवली तरी त्याचा फायदा बड्या शेतकऱ्यांनाच कसा मिळतो आणि ज्या कोरडवाहू शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे ही खरी गरज आहे, त्यांना या तरतुदीचा फायदा कसा मिळत नाही हे अनेक उदाहरणे देऊन पटवून देतात. आपल्या देशातील खेड्यापाड्यांतील सामाजिक व राजकीय व्यवस्था नेहमीच गरिबांना आणि दलितांना कल्याणकारी योजनांपासून कशी वंचित करीत आली आहे हे ते प्रभावीपणे मांडतात. यापुढे शेती–विकासासाठी अर्थपुरवठा करायच्या योजना आखताना गरीब आणि अल्पभुधारक शेतकरी यांना केंद्रवर्ती ठेवावे ही भूमिका मांडतात. (पृ.१९,२०) या सेमिनारला केंद्र सरकारचे तीन–चार वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवी धोरणे ठरविताना चर्चेतील मुद्यांचा, निष्कर्षांचा उपयोग या अधिकाऱ्यांना होतो. प्रोफेसर पिंपुटकर सत्य प्रभावीपणे मांडतात. जनतेसाठी ते रिसर्च करून सत्य निष्कर्ष मांडताना दिसतात.

**३. दावं :**

**कृमी :**

गजानन बर्वे युनियनचे पुढारी ते कंपनीतील कामगारांच्या हितासाठी संप, मोर्चे काढून कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी कधी कधी स्वत: जेलमध्ये जातात. जेलमधून सुटून आल्यावर परत कामगारांसाठी लढतात. समाजासाठी ते स्वत:ला वाहून घेतात. फक्त स्वत:चा संसार न सांभाळता ते अनेकांना मदत करतात आणि या कामात कुटुंबालाही सामावून घेतात. (पृ.७६,७७,७८) स्वत:च्या सुखसोयी, संसार बाजूला ठेवून कामगारांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मागण्यांसाठी ते स्वत:ला कितीही त्रास झाला तरी धडपड करताना दिसतात. या प्रसंगांवरून त्यांचा पिंडच समाजकारणाचा असलेला दिसून येतो.

या कथासंग्रहांच्या अनुषंगाने आलेल्या पुरुषपात्रांचा विचार करता ते ज्या समाजात वावरतात त्या समाजाचे हित पाहताना दिसतात. परंतु सर्वच पुरुष समाजाचे उत्तरदायित्व निभावताना दिसत नाहीत. उलट समाजाचा आपल्या स्वार्थासाठीच उपयोग करून घेताना दिसतात. समाजसेवा, समाजोपयोगी कामाच्या नावाखाली काही पात्रे स्वत:चा आणि कुटुंबाचा

उदरनिर्वाह करताना दिसतात. तर काही पात्रे स्वत:च्या नावाचा उदोउदो होण्यासाठी, खोटी प्रतिष्ठा मिळविण्यासाठी नाटकी समाजकारण करताना दिसतात. काही मोजकीच पुरुषपात्रे नि:स्वार्थी समाजसेवा करताना दिसतात.

शंकररावांसारखे पुरुषपात्र समाजकारण करता करता स्वत:च्या कुटुंबाचा चरितार्थ चालवितात. तर दुसरी बाजू म्हणजे चरितार्थ चालविण्यासाठी गरज म्हणूनही ते समाजकारणाच्या नावाखाली लग्न जमविण्याचा व्यवसाय करतात. प्रोफेसर पिंपुटकर आपल्या विचारांच्या माध्यमातून समाजहिताची कामे करण्यासाठी सरकारला प्रवृत्त करताना दिसतात. गजानन बर्वे सर्व सुखसोयी, संसाराचा त्याग करत समाजहितासाठी स्वत:ला वाहून घेतात.

**कादंबरी :**

**१. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :**

समाजात वावरत असताना एकमेकांना भेटल्यावर प्रथम नमस्कार किंवा आदरार्थी नावाने संबोधण्याची आपली भारतीय परंपरा दिसून येते. त्याप्रमाणे हा नायक मुनिमजींना भेटल्यावर त्यांना जयरामजी म्हणून आदर व्यक्त करतो. त्याचप्रमाणे त्यांच्या दोन्ही नोकरांनीही प्रतिआदर व्यक्त केलेला दिसून येतो. त्यांची व त्यांच्या कुटुंबाची चौकशी करतानाही दिसतो. (पृ.४०,४१) त्यामुळे हा नायक समाजात आदराने व प्रेमाने वर्तन करत असल्याचे दिसून येते. सामाजिक संकेतांचे पालन करणे हा पुरुषांचा स्थायीभाव असल्याचे ह. मो. मराठे येथे नमूद करताना दिसतात.

बेकार नायक नोकरीच्या शोधात असताना सहस्रबुद्धेंना भेटतो. त्यांना चहा घेण्याची विनंती करतो. हातात फक्त तीस पैसे असताना फक्त सामाजिक बांधिलकी आणि नोकरीसाठी करावी लागणारी लाचारी यांमुळे हे सर्व सोपस्कार करताना दिसत असला तरीही आतून त्याला सहस्रबुद्‌ध्यांनी चहासाठी नकार द्यावा असेच वाटते. चहा पिऊन सहस्रबुद्धेच चहाचे पैसे देतात. तेव्हा नायकाला आपल्या क्षुद्रपणाचा राग येतो. त्याच्या या विचारांनी त्याचे समाजविषयीचे उत्तरदायित्व निभावण्याची वृत्ती जागृत असल्याचे दिसते पण परिस्थितीपुढे तो हतबल ठरतो, तर सहस्रबुद्धे हे पुरुषपात्रही समाजाची चांगली जाण असलेले दिसून येते. कारण नायकाने चहा

घेण्याची विनंती केली असली तरी नायक बेकार आहे, त्याची आर्थिक अडचण समजून घेऊन ते चहाचे पैसे देताना दिसतात. त्यामुळे एक सुजाण नागरिक त्यांच्यात दिसून येतो. (पृ.१९,२०,२१)

नायकाची पत्नी गर्भपात होऊन हॉस्पिटलमध्ये असते तेव्हा सहस्त्रबुद्धे नायकाला त्याच्या पत्नीविषयी आस्थेने विचारतो. नायकाच्या पत्नीच्या खाण्यापिण्याची चौकशी करतो. आपण ज्या समाजात रहातो त्या समाजाच्या सुख–दु:खात सहभागी होऊन, वेळप्रसंगी सर्व प्रकारची मदत करण्याची वृत्ती ही माणसाला समाजाशी बांधून ठेवते. (पृ.८३) सहस्त्रबुद्धे हे समाजातील एक सुजाण, कर्तव्यदक्ष, परोपकारी वृत्तीचे पुरुषपात्र ह. मो. मराठे यांनी अधोरेखित केल्याचे दिसून येते.

नायकाला समाजात जीवन जगत असताना कोणकोणत्या परिस्थितीला, संकटांना सामोरे जावे लागते त्या परिस्थितीचा समाजावर आणि समाजाचा नायकावर कसा परिणाम होतो यावर भाष्य करताना डॉ. किशोर सानप म्हणतात,

‘‘नायक हा सर्वसामान्य अशा गरीब वर्गातूनच शिकलेला असतो आणि आपल्याच वर्गातल्या आवडलेल्या एका मुलीसोबत लग्न करतो. नोकरी करण्यासाठी जिद्दीने शिकतो आणि शिकल्यावर त्याला नोकरी लागते. परंतु नोकरीने त्याला सोडलेले असते आणि बेकारीच्या काळात त्याला संसाराच्या गरजा पूर्ण करणे अवघड जाते. त्यातून मार्ग काढण्यासाठी तो मनाविरूद्ध बरीच लाचारीही पत्करतो. परंतु ज्या विषम सामाजिक व्यवस्थेत तो जगतो त्या व्यवस्थेला त्याची काळजी नसते. व्यवस्था आपल्याच पद्धतीने चालत आणि वाढत असते आणि अशा अवस्थेत अभावग्रस्त जीवन जगणाऱ्याच्या वाट्याला जे भोग येतात ते सर्व नायकाच्याही वाट्याला येतात. तो गांगरून जातो आणि आपल्या संसाराची विस्कटलेली घडी नीट करण्यासाठी तो अनेक तडजोडी करायला तयार असतो. परंतु त्याच्या वाट्याला सातत्याने अपयशच येते आणि तो पूर्णपणे मनाने, बुद्धीने आणि भावनेने विस्कटून जातो. मनातल्या मनात तो जगण्यासाठी स्वतंत्र असतो परंतु बाह्य जगात जगताना मात्र त्याला मार्ग सापडत नाही म्हणून त्याचे बाह्य जगातले वागणे हे व्यस्त आणि एकाकीपणाचे, तुटलेपणाचे जाणवते. अशा माणसाचे आतले वागणे

आणि त्याचा आतला आवाज मात्र अत्यंत टोकदार असतो. समाजातल्या पडझड झालेल्या मूल्यांची तो परखडपणे चिरफाड करतो. त्याच्या चिंतनातून संस्कृती आणि मूल्यांसाठी आर्त अशी हाक बाहेर पडते. सर्वत्र खराबी असलेल्या समाजाला आपण दुरूस्त करू शकत नसल्याबद्दलची खंतही असते आणि तरीही व्यवस्थेत जगण्यासाठीची धडपडही सुरू असते. व्यवस्थेच्या उद्वेगातून आलेल्या आत्मदैन्याला सामोरे जाताना त्याची होणारी तगमग ही प्रचंड ऊर्जा बनते आणि आतल्या आत अनेक विस्फोट होत जाऊन नायकाचे जीवन फरफटत जाते. जीवनाच्या दु:खाला आणि दैन्याला सावरणेही नंतर शक्य होत नाही. अशा कोंडीत सापडलेल्या नायकाची भावावस्था आणि चिंतनावस्था ह. मो. मराठ्यांनी या लेखनातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.''[१]

पुरुषांची प्रगती, मानसन्मान समाजात वृद्धींगत होत असतो तरी या कादंबरीतील नायकाचे फुलणे समाजामुळेच कोमेजल्याचे चित्रण मराठ्यांनी केले आहे. यांवर डॉ. किशोर सानप यांनी मांडलेले विचार उचितच वाटतात.

पुरुषांचे समाजातील यश अपयश हे त्या काळातील समाजपरिवर्तनावर अवलंबून असते. निष्पर्णमधील नायकाचे समाजातील अपयश हे तत्कालीन काळानुसार असल्याचे गणेश दिघे नमूद करतात. ते म्हणतात,

''निष्पर्ण लिहिली गेली ती एप्रिल १९६९ मध्ये त्यावेळी लेखक एका संवेदनशील तारूण्यातून जात होता. त्याला स्वत:भोवतालच्या समाजात स्वत:ची किंमत अजमावयाची होती. जगरहाटीप्रमाणे दुनियादारीचं दर्शन घडणारं असं ते वय असतं. काहीसं स्वप्नाळू, काहीसं कर्तबगारी दाखववायाच्या संधीची वाट पाहणारं असं ते वय असतं आणि दुसरा एक असा योग की, लेखकाच्या पिढीबरोबरच भारतीय स्वातंत्र्यही दिवसामासाने तरूण होत होतं. दिडशे वर्षाच्या गुलामीनंतर देश खऱ्या अर्थाने आपल्या समाजाच्या मालकीचा झाला होता. सत्तेचाळीसला भारत स्वतंत्र झाला. त्याचबरोबर नागरी व्यक्तिमत्त्व विकासाची स्वप्नं जनता पाहू लागली हे गैर नव्हतंच परंतु वीस–तीस वर्षानंतरही राजकर्त्यांची वाटचाल ही समाधानकारक दिशेने न गेल्याने वास्तवाचे चटके जनतेला बसू लागले. याची तीव्रता नव्या तरूण पिढीलाच जास्त सोसावी लागली. 'निष्पर्ण

वृक्षावर भर दुपारी' चा नायक हा त्या निबिड आत्मदैन्य सोसाव्या लागलेल्या हजारोंच्या समवेदनेचा प्रतिनिधी आहे."[२]

गणेश दिघे यांनी मांडलेले विचार त्या काळातील पुरुषांचे समाजातील स्थान निश्चित करतात. पुरुषांचे समाजातील यश–अपयश हे त्या काळातील परिस्थितीनुसार ठरते तर समाजाप्रती निर्माण होणारा स्नेहभाव वा तरतमभाव हा परिस्थितीशरण असल्याचेच येथे निदर्शनास येते.

**२. इतिवृत्त :**

संपादक श्रीरंग नाडकर्णी आपल्या लेखनीच्या माध्यमातून समाजजागृती करण्याचे काम करतात. आपल्या लेखनीद्वारे ज्ञान, मनोरंजन, माहिती समाजातील तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम ते करताना दिसतात. शिवाय समाजातील चांगल्या कामांना प्रसिद्धी देऊन ते काम करणाऱ्या व्यक्तीला प्रोत्साहन देण्याचे, त्या कामाची जाहिरात करण्याचे कामही ते करतात. तसेच ते दळवी फर्टीलायझर्स कंपनीच्या दोन नंबरच्या मुलाबरोबर चर्चा करताना त्यांच्यात जो संवाद होतो त्या संवादावरून त्यांची समाजाप्रती असलेली जाण दिसून येते. नाडकर्णी त्यांना मुलाखत देऊन ती छापण्याची कल्पना सुचवतात. मुलाखतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक शेतीसाठी खतांचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून हा निर्णय घेतात. (पृ.५६,५७)

नाडकर्णी हॉटेल कामगारांच्या समस्या आपल्या दैनिकामधून मांडतात. जनतेला अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांना आपल्या लेखनीच्या माध्यमातून वाचा फोडतात. मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे नवस फेडण्यासाठी देवीला सोन्याचा मुखवटा अर्पण करतात. ही बातमी मिळाल्यावर ते म्हणतात, पाचपन्नास हजार रूपये खर्च करून मुखवटा देवीला अर्पण करण्यापेक्षा या रकमेतून शाळा, विहीर बांधावी असा समाजोपयोगी विचार ते मांडतात. (पृ.६४,६९)

गावातून जत्रेच्या वेळी बकरे कापणे, नवस फेडणे, अंगात येणे अशा अंधश्रद्धावादी विचारांवर प्रहार करतात. (पृ.६९) गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा यांनी पोखरलेल्या समाजाला ते आपल्या लेखनीने विचारांची नवी वाट दाखवितात. डॉ. देसाईंसारख्या निष्णात डॉक्टरांची

मुलाखत घेऊन जनता पेपरमध्ये त्यांच्या अनुभवांची माहिती पेशंट आणि नवीन डॉक्टरांना मिळावी या हेतूने श्रीरंग नाडकर्णी स्वत: डॉक्टरांच्या घरी जाऊन माहिती मिळवितात आणि ती समाजातील इतरांना उपयोगी पडावी म्हणून प्रसिद्धीस देतात. (पृ.८३) डॉक्टरांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीची अनुभवांची शिदोरी नाडकर्णींमार्फत समाजापर्यंत पोहोचताना दिसते.

हॉटेल कामगारांचे प्रश्न मांडत असतानाच हॉटेलमध्ये काम करण्यास कामगारांना त्यांची आर्थिक परिस्थिती जबाबदार असल्याचे मत त्यांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून समाजासमोर, राज्यकर्त्यांसमोर आणलेले दिसते. हॉटेल कामगारांच्या समस्येला पैसा, विषमता, दारिद्रय, शिक्षणाचा अभाव या गोष्टी कारणीभूत असून ही समस्या सोडविण्यासाठी त्यांच्यामागे असलेली कारणेही ते समाजापुढे आणतात. मालकांची नोकरांना मिळणारी वागणूक, हॉटेल कामगारांचा राहण्याचा, खाण्याचा, स्वच्छतेचा प्रश्नही तेवढाच महत्त्वाचा मानून या विषयांवरही ते निर्भिडपणे आपली मते मांडताना दिसतात. (पृ.८७,८९)

हॉटेल कामगारांच्या प्रश्नाने वातावरण ढवळून निघाल्याने हॉटेल मालकही जागे झाले ते त्यांची समस्या नाडकर्णींना सांगू लागले तेव्हा एकेरी विचार न करता नाडकर्णी हॉटेल व्यावसायिकांच्या समस्याही समजून घेतात आणि त्यावर आपली प्रतिक्रिया म्हणून ते हॉटेल मालकांच्या माल न मिळणे, नोकरवर्ग न टिकणे, भांडवल, सरकारचा हस्तक्षेप अशा नाना अडचणींना सामोरे जाणाऱ्या मालकांनाही ते न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. (पृ.९९) राज्यकर्त्यांनी या सर्व प्रश्नांत लक्ष घालावे म्हणून ते कामगारमंत्री श्री. रामराव कदम सारख्या नेत्यांचीही मदत घेताना दिसतात. (पृ.१११) या सर्व प्रश्नांबरोबरच मंत्र्यांच्या भानगडी, मुख्यमंत्र्यांच्या नावावर असलेल्या व नसलेल्या इस्टेटी, समाजातले तणाव, गटाचे राजकारण उद्योगव्यवसायातील समस्या व भ्रष्टाचार इ. प्रश्नांवरही नाडकर्णी समाजाचे लक्ष वेधताना दिसतात. (पृ.१२३)

कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या पाण्यामुळे जलप्रदूषण वाढते. कारखान्यांनी आपले सांडपाणी, टाकाऊ पदार्थ नदीत सोडल्यामुळे नदीचे पाणी दुषित होऊन तेच पाणी माणसे आणि जनावरांनी प्यायल्यामुळे वेगवेगळ्या आजारांनी जनता त्रस्त होते तेव्हा म्युनसिपालटीने नोटिसा

देऊनही कारखानदार उद्योग व्यवसायिकांनी त्याची दखल घेतली नव्हती तेव्हा नाडकर्णी या भ्रष्टाचारी लोकांच्या राजवटीला शह देऊन गरीब जनतेला सहकार्याची हमी देऊन या प्रश्नाकडे प्राधान्याने लक्ष घालतात. (पृ.१४०,१४१) साम, दाम, दंड, भेद या सर्व गोष्टींचा वापर करून श्रीरंग नाडकर्णी समाजहितासाठीच अनेक राजकारणी नेत्यांचे भांडे फोडतात. त्यांचा भ्रष्टाचार जनतेसमोर आणतात. भ्रष्टाचारी आणि जनताद्रोही मंत्र्यांना राज्याच्या कारभारातून अलिप्त करण्यासाठीही ते लढा देतात. त्यासाठी सर्व संपादकीय लेखनात कुटनीतींचा वापरही ते करताना दिसतात. एका संपादकाची कर्तव्यनिष्ठा यामागे दिसून येते. श्रीरंग नाडकर्णी अन्याय, अत्याचार, गरिबी, भ्रष्टाचार, भ्रष्ट राजकारण, हॉटेल कामगार–मालक यांचे प्रश्न अशा विविध विषयांवर लेखन करून समाजोपयोगी कार्य घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील दिसतात. (पृ.२०१,२४७,२६३) या सर्व धडपडीमागे लढाऊ वृत्तीमागे एका संपादकाची समाजाशी असलेली सामाजिक बांधिलकी दिसून येते. समाजातील उपेक्षित आणि पिळल्या जाणाऱ्या घटकांशी असणारे माणुसकीचे नाते आणि लेकाभिमुख कार्य करण्याची ऊर्मीच त्यांना समाजाविषयी कळवळा निर्माण करते आणि समाजासाठी कार्य करण्यास भाग पाडते असे म्हणता येईल.

**३. कुरूक्षेत्र :**

डॉ. म्हसकर यांनी शांतीवन महाविद्यालयाची स्थापना करून राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्घाटन केलेले दिसून येते. ते त्यांच्या ठायी असलेले शिक्षण प्रेम आणि समाजाविषयीची आस्था यांमुळेच शांतीवन कॉलेज फक्त कॉलेज न राहता ते विद्यापीठ व्हावे आणि या विद्यापीठातील मुले नुसत्या मार्कांनी परिपूर्ण न होता ती निर्मितीक्षम माणसे तयार झाली पाहिजेत असा कळवळा, ध्येय डॉ. म्हसकरांच्या अंगी दिसून येते. मुलांना एक चांगला संस्कारक्षम, कर्तबगार नागरिक घडविण्यासाठी ते या महाविद्यालयाची स्थापना करतात; तर प्राध्यापकांनीही आपली ध्येयदृष्टी, निष्ठा, बुद्धी विद्यार्थ्यांप्रती सकारात्मक ठेवावी अशी अपेक्षा ते प्राध्यापक नियुक्त करतानाच व्यक्त करतात. (पृ.६) यावरून त्यांचे समाजातील प्रेरणादायी कार्य दिसून येते. शिवाय विद्यार्थीदशेत जर मुलांना चांगले मार्गदर्शन मिळाले तर ते चांगले नागरिक घडू शकतात. या उद्देशानेच त्यांनी

स्वत:च्या वैयक्तिक गोष्टी, स्वार्थ बाजूला ठेऊन उदात्त हेतूने ही संस्था स्थापन केल्याचे दिसून येते. या संस्थेतून निर्माण होणारे कल्पक, कर्तबगार आणि कार्यक्षम नागरिकच नवस्वतंत्र समाजात परिवर्तनाची शक्ती निर्माण करतील असा विश्वास त्यांना वाटतो. म्हणून ते आपले सर्व जीवनकार्य तेथेच वाहून घेतात. त्यांचे समाजासाठीचे प्रेरणादायी विचार, आचार, कार्य त्यांच्याच भाषणातून समोर येते,

"ते नागरिक समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत जातील आणि संपूर्ण समाजजीवनाच्या परिवर्तनाच्या चक्राला गती देतील. ही गती देण्याची प्रेरणा आणि क्षमता तुम्ही त्यांच्यात निर्माण करणार आहात. पर्यायाने अप्रत्यक्षरित्या समग्र समाजपरिवर्तनाला गती देण्याची महान भूमिका तुम्हीच पार पाडणार आहात. त्या प्रक्रियेत आपणही थोडा काळ सामील व्हावं म्हणून मी इथं आलो. माझी लाखो रूपयांची वंशपरंपरागत चालत आलेली इस्टेट विकून मी पुन्हा अमेरिकेत जाऊन सुखानं राहू शकलो असतो. पण मला वाटलं – त्यापेक्षा अधिक महत्त्वाचं काही तरी करता येईल, एक नवं विद्यापीठ उभारता येईल, एक नवं प्रेरणांचं केंद्र उभारता येईल." (पृ.६) डॉ. म्हसकरांच्या या प्रेरणादायी विचार–आचारांनी एका वेगळा आदर्श उभा केल्याचेच येथे प्रत्ययाला येते.

प्रा. उल्हास भावे प्राध्यापकांना आदर, सन्मान मिळावा, विद्यार्थ्यांना त्यांचे स्कॉलरशिपचे पैसे वेळेत मिळावेत म्हणून प्रयत्नशी राहतात. विद्यार्थी आणि प्राध्यापक हे समाजाचे घटक असल्याने त्यांचे हे कार्य समाजाच्य उन्नतीत मोलाची भर टाकणारे वाटते. विद्यार्थीदशेत असतानाच उल्हास भावे यांनी 'क्रांतिकारी युवक दल:क्रांयुद' नावाची संघटना स्थापन केलेली दिसून येते आणि त्या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी कामगारांना पाठिंबा, दारूच्या अड्ड्यांवर निदर्शने करून दारू विरोधी आंदोलन, विद्यार्थ्यांच्या फीवाढीविरोधी आंदोलन, हुंडा घेण्याच्या प्रथेविरूद्ध निदर्शने करून आंदोलनांच्या माध्यमांतून समाजजागृती करून समाजासाठी विधायक आचार–विचारांची मुहूर्तमेढ रोवल्याचे चित्र समोर येते. (पृ.१५)

डॉ. म्हसकर आणि प्रा. भावे या दोन व्यक्तींनी आपला अहंकार बाजूला ठेवून, कोणताही नावलौकिक मिळविण्याचा उद्देश बाजूला ठेवून उदात्त विचारांनी प्रेरित होऊन समाजहिताचे कार्य केल्याचे दिसून येते. समाजावर प्रेम करणारी माणसेच समाजहिताचे निर्णय घेऊन स्वत:ला त्या कार्यात झोकून देत असल्याचे चित्र ह. मो. मराठे यांनी येथे मांडल्याचे दिसून येते.

एक लेखक, संपादक, पत्रकार म्हणून ह. मो. मराठे यांचे नाव मराठी साहित्यविश्वात वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्वत:च्या वाट्याला आलेल्या उद्विग्न करणाऱ्या अनुभवांना ते शक्य तितक्या समर्थपणे सामोरे जातात. 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधून ते अधिक जाणवते. एका सर्वसामान्य माणसाची परिस्थितीशी झुंज ते त्यातून समर्थपणे मांडतात. मात्र तरीही माणूस परिस्थितीशरण आहे हे त्यातील नायकाच्या रूपाने पुढे येते. 'इतिवृत्त' मधील श्रीरंग नाडकर्णी या पुरुषपात्राच्या निमित्ताने एक संपादक आणि पत्रकार या नात्याने पत्रकारितेला अभिप्रेत असलेला सडेतोडपणा, परखडपणा, सत्याची चाड आणि असत्याचा निषेध या गोष्टी पुढे येतात. समाजविधायक कार्यासाठी ते लेखनीचा वापर करताना दिसतात. समाजातील अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा, कामगारांचे आणि व्यावसायिकांचे प्रश्न मांडून त्यावर भाष्य करतात. 'कुरूक्षेत्र' मधील डॉ. म्हसकर असेच एक ध्येयवेडे पुरुषपात्र म्हणून पुढे येते. महाविद्यालयाची स्थापना शिक्षणसम्राट म्हणवून घेण्यासाठी नव्हे, तर समाजपरिवर्तनाची प्रयोगशाळा म्हणून त्याकडे ते पाहतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही महाविद्यालयाची जबाबदारी आहे असा त्यांचा दृष्टिकोन आहे. तेथे काम करणारा शिक्षकही तेवढाच सक्षम असायला पाहिजे म्हणून ते त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांची जाणीव करून देतात.

ह. मो. मराठे हे आदर्शांचे पूजक आहेत. साहजिकच त्यांच्या कादंबऱ्यांमधील उपरिनिर्दिष्ट पुरुषपात्रे आपल्या सामाजिक बांधिलकीचे आणि सामाजिक सामिलकीचे आपले उत्तरदायित्व समर्थपणे पार पाडत असल्याचे प्रत्ययाला येते.

## २. पुरुष आणि नोकरी–व्यवसाय :

### २.१. पुरुष आणि नोकरी :

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कुटुंबव्यवस्थेमध्ये घरातील कर्ता पुरुष केंद्रवर्ती असतो. त्यामुळे घरातील सदस्यांची पालनपोषणाची जबाबदारी त्या पुरुषाचीच आहे असे समजले जाते. नोकरी किंवा व्यवसाय करून पैसा मिळवून कुटुंबाचा चरितार्थ चालवणे, कुटुंबाची आर्थिक, शैक्षणिक आणि इतरही गरजा भागवणे हे त्याचे कर्तव्यच मानले जाते. पुरुष आपापल्या आवडीप्रमाणे, कुवतीप्रमाणे, शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणे नोकरी किंवा व्यवसायाची निवड करताना दिसतात. त्यामध्ये ते यशस्वी होतात तर कधी अपयशी होतात. त्यांचा प्रामाणिकपणा, सचोटी, ज्ञान, कर्तव्यदक्षता त्यांना यशस्वी बनवते तर अज्ञान, अप्रामाणिकपणा, अनैतिकता, भ्रष्टाचार, खोटारडेपणा त्यांना आपल्या नोकरी–व्यवसायात अयशस्वी करताना दिसतो.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष आपल्या नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी अपयशी होतो का यशस्वी होऊन जीवन सार्थक करतो या घटकांकडेच लक्ष केंद्रित करणे येथे अभिप्रेत आहे. नोकरी व्यवसायाने पुरुषांना स्थिरता प्राप्त होते. त्यांना पद, पैसा, प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे सामर्थ्यही त्यांच्या नोकरी–व्यवसायावरच अवलंबून असल्याचे दिसून येते. ह. मो. मराठ्यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील नोकरी–व्यवसाय करणारे पुरुष डोळ्यासमोर ठेवून या घटकांचा अभ्यास करणे येथे अभिप्रेत आहे.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**अँकर :**

भालेराव संपादक म्हणून बॉम्बे अेडिशनच्या वृत्तपत्रात काम करतात. ते आपल्या कामात खूप वक्तशीर, नीटनेटके, जबाबदार व्यक्ती म्हणून कार्य करतात. समाजजीवनाच्या साध्या अस्तित्त्वाच्या प्रश्नापासून ते वैचारिक आणि सांस्कृतिक क्षेत्रापर्यंत विविध विषयांवर ते संपादक या नात्याने लिहितात. प्रभावी आणि सडेतोड अग्रलेखांमुळे ते नावाजलेले संपादक होतात. परंतु ते दोन वर्षांनंतर संपादक पदावरून निवृत्त होणार असतात. दुसऱ्या दिवसापासून माजी हे विशेषण

त्यांच्या संपादकाच्या नावामागे लागणार असते. माजी विशेषण नावामागे लागले की संपादकाचे महत्त्व कमी होणार असते. संपादक पदावर असताना मिळणारा मानसन्मान, कृतज्ञता, ओळख नंतर नंतर लोक विसरायला लागतात. सण समारंभांना गेल्यानंतर नेहमीप्रमाणे मिळणारी विशेष वागणूक न मिळता सर्वसामान्य लोकांप्रमाणे कुठेतरी कोपऱ्यात जाऊन बसावे लागते. संपादक असताना सगळीकडे व्ही.आय.पी. ट्रिटमेंट मिळते. लोक स्वागत करतात. वाट करून देतात. खुर्चीपर्यंत घेऊन जातात. (पृ.२७,२८) पुरुषांची नोकरी त्यांच्या शिक्षणावर, अनुभवावर, वयावर टिकून राहते परंतु नोकरीतून मिळणारे समाधान आनंद मात्र कामाप्रती असणाऱ्या जिव्हाळ्यामुळे, प्रामाणिकपणामुळे मिळतो. पुरुषांची नोकरी टिकणे, पदोन्नती मिळणे यांसाठी वरील अनेक घटक कारणीभूत ठरताना दिसतात.

**बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह :**

मि. साळवी नागपूरच्या एका मल्टी एडिशन दैनिकाचा दक्षिण महाराष्ट्राचा बिझनेस बघत असतात. त्यांचे हेडक्वार्टर पुणे येथे असते. कंपनीने त्यांना टेलिफोन, स्कुटर, ऑफिस, अधिक पगार, राहण्यासाठी जागा पुण्यातच दिलेती असते. त्यामुळे साळवी खूष होऊन नोकरी करतात. धंद्याचे कोणतेही टार्गेट त्यांना दिलेले नसल्यामुळे त्यांना टेन्शन आणि चिंता नसते त्यामुळे ते मजेत जमेल तेवढा धंदा करतात. पंरतु एके दिवशी साळवींना परिश्रमात कुचराई करतात म्हणून, पुरेसे कष्ट घेत नाहीत म्हणून बिझनेस मॅनेजर असमाधान व्यक्त करतात. त्यामुळे ही नोकरी सोडून मोहन साळवी मुंबईच्या ॲडव्हर्टायिझिंग मार्केटमध्ये नोकरी करतात. तिथेही प्रामाणिकपणे, सचोटीने काम करतात. बिझनेस वाढविण्यासाठी आपली नोकरी टिकविण्यासाठी व पदोन्नती मिळविण्यासाठी साळवी नवनविन कल्पना राबवितात. परंतु इतर सहकाऱ्यांच्या कटकारस्थानाचा ते तिथेही बळी ठरतात. (पृ.५२,७५,७६,७७) मोहन साळवीसारख्या प्रामाणिक, कष्टाळू, जिद्दी, निष्ठावान माणसाला नोकरी करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कटकारस्थानांचा बळी व्हावे लागते. शिक्षण अनुभव असूनही सहकारी आणि वरिष्ठांच्या कटकारस्थानामुळे साळवीला दोन्ही ठिकाणच्या नोकरीसाठी अडचणी येतात. संघर्ष करूनही नोकरी टिकविण्यात ते अयशस्वी ठरतात.

**जी सरकार :**

किशोर पेंडसे नावाचा कथानायक जेथे काम करत असतो तेथे त्यांच्या बॉसला सरकारस्वारी म्हणण्याची रीत असते. साहेबराव शिर्के म्हणजेच सरकारस्वारी कामगारांना अरे तुरे करून एकेरी नावाने बोलावतात. आपल्याला मात्र सर्वांनी सरकारस्वारी म्हणून संबोधावे असा दंडक करतात. कर्मचाऱ्यांना ते गुलामी वृत्तीने वागवितात. त्यामुळे किशोर पेंडसे या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न करतात. सरकारस्वारी संबोधण्यास नकार देतात. आपल्याला एकेरी नावाने न संबोधता सन्मान द्यावा अशी अपेक्षा बोलून दाखवितात. परिणामी सावकारस्वारी रागावून त्याला चालता होण्याची आज्ञा देतात. किशोर पेंडसेच्या य कृतीने त्याला नोकरीस मुकावे लागते. (पृ.७९,८०,८१) पुरुषांना नोकरी मिळविताना आणि ती टिकविताना बऱ्याच वेळा मानहानीला सामोरे जावे लागते. स्वत:चा आत्मसन्मान बाजूला ठेवून नोकरी करणे म्हणजे गुलामी करण्यासारखेच असते. त्यामुळेच या नायकाला गुलामीतून मुक्त होण्यासाठी नोकरी सोडावी लागते.

**भले गृहस्थ पंडित :**

विश्वनाथ पंडित आधी अनेक साप्ताहिके, मासिके यांचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असतात पण ती सर्वच प्रकाशने यथावकाश बंद पडल्याने ते इंडिया पेपर्स प्रा. लि. चे मुंबईचे जाहिरात प्रतिनिधी काम करतात. जेवढ्या जाहिराती पंडित आणतील त्याच्या १०% कमिशन बेसवर त्यांना पगार मिळणार होता. शिवाय कंपनीचे ऑफिस, टेलिफोन कार्ड वापरता येणार असते. (पृ.१४७,१४८) कंपनी बंद पडली किंवा अगोदरचे काम बंद पडले तर पुरुषांना लगेचच दुसरी नोकरी शोधावी लागत असल्याचे स्पष्ट चित्रण मराठे करतात. कर्त्या पुरुषाची नोकरी असणे घरात नंदनवन असल्यासारखेच असते. परंतु ती जेव्हा नसते तेव्हा संपूर्ण कुटुंबाची परवड होताना दिसते.

२. ज्वालामुख :

**ज्वाळा :**

मोहितेचा थोरला भाऊ अपघातात मरण पावल्यामुळे त्याचे चार माणसाच्या कुटुंबाचे ओझे मोहितेवर येऊन पडते. भावाचे कुटुंब, त्याचे कुटुंब आईवडील असे दहा माणसाचे त्याचे कुटुंब त्याच्या एकट्याच्या नोकरीवर उदरनिर्वाह करत असते. मोहिते अगोदर जिथे नोकरीला होता तिथे कामगार पुढारी म्हणून काम करण्याच्या त्याच्या इच्छेला ते आवर घालू शकत नाहीत. त्यावेळी त्याचे कुटंब छोटे होते. तो कामावर उशिरा जाई, कधी खाडा करी. वरिष्ठांनी कामात सुधारणा सुचवल्या तर तो प्रतिप्रश्न विचारी, ताठ मानेने चाले, गुर्मित वागे, संघर्षाची भाषा कायम तोंडात असे. मोर्चात सामील होणे, घोषणा देणे हे त्याचे आवडते काम होते.

भाऊ मरण पावल्यानंतर परिस्थिती पालटते, कुटुंब मोठे होते, जबाबदारी वाढली, खर्चाचे प्रमाण वाढले. एकट्याच्या पगारात घरखर्च भागेनासा झाला. त्यामुळे तो प्रामाणिकपणे काम करू लागतो. ओव्हरटाईम करतो. वरिष्ठांच्या सर्व आज्ञा खाली मान घालून ऐकतो. वरिष्ठांना प्रतिप्रश्न विचारत नाही. कर्जाचा डोंगर वाढल्याने तो मलिकसाहेबांकडे गयावया करून ओव्हरटाईम मागून घेतो. तरीही भागेना म्हणून गुपचूप इतर ठिकाणी कामे करतो. संघटनेचे काम, घोषणा, मोर्चा, सभा इ. बंद करून आपल्या नोकरीवर सर्व लक्ष केंद्रित करतो. (पृ.४७,४८) मोहितेची जबाबदारी, आर्थिक हतबलता त्याला नोकरी टिकवून ठेवण्यास, वरिष्ठांची मर्जी सांभाळण्यास, स्वत:त बदल घडविण्यास कारणीभूत ठरते. स्वत:ला कितीही त्रास झाला तरी जबाबदाऱ्या पेलण्यासाठी कर्त्या पुरुषाला नोकरीसाठी, नोकरी सांभाळण्यासाठी शारीरिक, मानसिक, आर्थिक संघर्ष अटळ ठरतो.

**काळ :**

या कथेतील नायक नोकरीसाठी बायको–मुलांना घेऊन शहरात येतो. बायको आणि दोन मुलींना घेऊन तो झोपडीत राहतो. नोकरी नसल्याने, सुरूवातीला तो हमाली काम करतो. कधी–कधी दुकानात, हॉटेलातही तो नोकरी करतो. नोकरीच्या शोधात तो सायकलवरून तर कधी पायी फिरतो. किरकोळ कामे करून तो संसाराचा गाडा चालवितो. त्यासाठी तो गिऱ्हाईकांच्या

घरी सामान पोहोचवणे, डॉक्टरीण बाईंची किरकोळ कामे करणे, शाळेत मुलांची ने–आण करणे, पुस्ते पोहोचवणे, दुधाच्या बाटल्या घरोघरी पोहोचवणे अशी अनेक छोटी–मोठी कामे करताना दिसतो. शिक्षण नसल्याने, कायमस्वरूपी नोकरी नसल्याने या नायकाला पडेल ते काम करण्याची पाळी येते. (पृ.१२८,१२९) हक्काची आणि कायम स्वरूपी नोकरी नसेल तर पुरुषांना कुटुंबाची जबाबदारी उचलण्यासाठी किती आटापिटा करावा लागतो, नोकरीसाठी किती संघर्ष करावा लागतो याचे विदारक चित्र ह. मो. मराठे यांनी या कथेतून या नायकाच्या रूपाने चित्रीत केलेले दिसते.

**३. पक्षिणी :**

**व्रणार्त :**

अविनाश मुंबईला वरच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह पोस्टसाठी आलेला असतो. इन्क्रीमेंट मिळाली तरी परिस्थिती पालटेल म्हणून अविनाश मुंबईला परीक्षा देण्यासाठी आलेला असतो. परंतु त्याला पर्सनल इंटरव्ह्यूसाठी थांबविण्यात येत नाही. या ठिकाणी नोकरीसाठी निवड होईल म्हणून अविनाशला अपेक्षा होती. तसेच त्याच्या बायकोनेही सत्यनारायण घालण्याची तयारी केलेली असते. परंतु अविनाशला ती नोकरी मिळत नाही. त्यामुळे त्याला मुलीचा वाढदिवस साजरा करता येत नाही. वडिलांनी घरावर सहा हजारांचे कर्ज करून ठेवले होते. तेही अविनाशला ही नोकरी मिळवून फेडायचे होते. परंतु नोकरीअभावी त्याची सर्व स्वप्ने धुळीला मिळतात. (पृ.५२,५३) अविनाशला नोकरी न मिळाल्याने तो अस्वस्थ दिसून येतो.

**मृगया :**

मि. कुलकर्णी, मि. थिटे, मि. गोडबोले एकत्र एका कंपनीत काम करत असतात. परंतु त्या कंपनीच्या मालकांचे धाकटे जावई अमेरिकेत इंजिनिअरींगची डिग्री घेऊन परतल्यावर त्यांनी कंपनीची सर्व सूत्रे जावयाच्या हाती दिली. त्यांनी कंपनीची नवीन पद्धतीने फेररचना केली. बऱ्याच लोकांना कमी करून शिकलेले कामगार घेतले, नवीन मशिनरी मागविली. ती मशिन चालवण्यासाठी नवीन लोकांची भरती केली. परंतु हे तिघेही खूप जुने कामगार असल्याने त्यांना काढून टाकण्यात आलेले नव्हते. त्यांना राजीनामा द्यायचा असेल तर कंपनी स्विकारील असेही

सांगितले जाते. तिघांसाठी कंपनीत काम नव्हते. नवीन टेक्निक्स वापरून उत्पादन केले जात असल्याने त्यांना दिवसभर बसून राहवे लागे. काम न करता पगार घेणेही त्यांच्या बुद्धीला पटेना. परंतु इकडे राजीनामा दिला तर या वयात चांगली नोकरी पगारही मिळणार नसतो. त्यामुळे ते तिघेही हतबल होतात. काय निर्णय घ्यावा ही द्विधा मन:स्थिती तयार होते. (पृ.११६,११७,११८) कालप्रवाहात बदलत जाणारे कामाचे स्वरूप, औद्योगिकरण, यांत्रिकीकरण या समस्या सामान्य माणसांना नोकरीसाठी, पोटापाण्यासाठी वणवण करत संघर्ष करायला लावतात. त्यातही वय हा घटक अत्यंत महत्त्वाचा असल्याने या तिनही नायकांना नोकरी टिकवून ठेवणे आणि नवीन नोकरी शोधणे अत्यंत कठीण होते हेच येथे स्पष्ट होते.

**४. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**पायाशी :**

या कथेतील नायक कंपनीत सिनियर एक्झिक्युटिव्ह या पदावर काम करतो. या व्यतिरिक्त तो लेखकही असल्याने वेगवेगळ्या विषयांवर कथा–कादंबऱ्याही लिहितो. कधी–कधी त्याच्या लेखनात कंपन्यांमध्ये घडणारे चांगले वाईट प्रसंग लेखांचे विषय म्हणून येतात परंतु हे प्रॉब्लेम्स सर्वच कंपन्यांमध्ये थोड्याफार प्रमाणात चालूच असतात. या लेखकाच्या लेखनामुळे कंपनीची प्रतिमा खराब होते म्हणून त्यांच्यावर जनरल मॅनेजर खोटे आरोप ठेवून त्यांचा अपमान करतात. हा नायक कंपनीत फक्त कंपनीचेच काम करतो, तरीही त्याच्यावर कंपनीत कथा–कादंबऱ्यांचे लेखन करतो हा आरोप ठेवून त्याला राजीनामा देण्यास प्रवृत्त केले जाते. लेखकाचे वय मध्यम असते. शिवाय त्याच्यावर दोन मुलांची जबाबदारी, फ्लॅटचे कर्ज असते. सर्व जबाबदाऱ्या असताना आणि प्रामाणिकपणे काम करूनही कंपनीच्या वरिष्ठ लोकांच्या कटकारस्थानामुळे या नायकाला नोकरीला मुकावे लागते. (पृ.३७,३८) नोकरीचा ताण, घराच्या जबाबदाऱ्या या सर्व ताणतणावातून विरंगुळा किंवा छंद म्हणून लेखक लिखाण करतो. प्रामाणिकपणे काम करूनही त्याच्या छंदाकडे बोट दाखवून त्याच्यावर आरोप केला जातो. यावरून या नायकाला नोकरी टिकविण्यासाठी केलेला संघर्षही निष्फळ ठरल्याचे दिसते.

**कुटुंब :**

जयंतराव दिल्लीत जॉब करत असतात आणि त्यांचे कुटुंब पुण्यात असते. ते दिल्लिला एकटेच रहात असतात. पेइंग गेस्ट म्हणून राहताना त्यांना अनेक अडचणी येतात. खाण्यापिण्याची व्यवस्था नीट होत नाही. उपासमार सहन करून ते तिथे स्वत:ला जमवून घेत होते. कुटुंबात सर्वजण आपापल्या कामात व्यग्र असतात. जयंतरावांची दिल्लीची नोकरी चांगली होती. तिथे त्यांना बढती मिळण्याची संधी मिळणार असते. त्यामुळे प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी या रकमाही वाढणार असतात. परंतु कुटुंबाचा सहवास, प्रेम मिळावे म्हणून जयंतराव वरील सर्व गोष्टींना मुठमाती देतात आणि नोकरी सोडून पुण्याला जायचा निर्णय घेतात. (पृ.६६,६९) एकिकडे नोकरी चांगली असते परंतु कुटुंबाचा दुरावा, स्वत:ची उपासमार असते. तर दुसरीकडे नोकरी सोडल्यावर प्रेम सहवास मिळणार असतो परंतु नोकरी, पैसा जाणार असतो. अशी द्विधा मन:स्थिती असूनही कुटुंबासाठी नोकरी सोडण्याचा निर्णय हा नायक घेतो. कधी नोकरीच्या ठिकाणी सहन करावा लागणारा अन्याय, अत्याचार, संघर्ष नोकरी टिकविताना सहन करावा लागतो तर कधी कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या नोकऱ्या सोडण्यास भाग पाडत असल्याचे वास्तववादी चित्रण येथे ह. मो. मराठे करताना दिसतात.

**मैत्र :**

विवेक दामले इंडिया पेपर्स प्रायव्हेट लिमिटेडमध्ये पत्रकार म्हणून काम करतात. या वृत्तपत्राचे संपादक स्वत:ला लेखक समजत असतात. विवेक दामलेचे पुस्तक परीक्षण छापलेले पाहून संपादकांना विवेक दामलेंविषयी ईर्ष्या निर्माण होते. त्यांच्या परवानगीशिवाय पुस्तक परीक्षण छापायचे नाही असा आदेश ते देऊन टाकतात. विवेक दामले या वाक्यावर आक्षेप घेतात. म्हणून संपादक त्याचा वेळोवेळी अपमान करतात. रोज काहीना काही तक्रारी, खुसपट काढून ते विवेक दामलेंना स्पष्टीकरणेही मागतात. विवेक दामलेंना सिनियर पत्रकार असूनही संपादक मेमो देतात. या घटनेचा परिणामम्हणून विवेक दामले यांच्याकडून बातम्या देताना तारतम्य सुटते. विवेक दामले संतापतात. संपादकांना उद्देशून काही अपशब्द वापरतात. हे प्रकरण ताणले जाऊन शेवटी विवेक दामले हे कायम सोडून नाशिकच्या जनसंदेश दैनिकामध्ये कार्यकारी संपादक म्हणून काम

करतात. तिथे गेल्यानंतरही त्यांची स्पर्धा परत इंडिया पेपर्सबरोबरच असते आणि जनसंदेशचा खप वाढविण्यासाठी तिथेही त्यांना संघर्ष करावा लागतो. (पृ.२६२,२६३,२६४) विवेक दामले या पात्राच्या अनुषंगाने विचार केला तर पुरुषांना कुठेही नोकरी करायची म्हटली तरी ताणतणाव, स्पर्धा, वरिष्ठांची मर्जी या गोष्टींना तोंड द्यावेच लागते. संघर्ष करत करत स्वत:ची प्रगती साधण्याबरोबरच नोकरी टिकवून ठेवणे हे मोठेच आव्हान असते हे लक्षात येते.

**५. घोडा :**

**घोडा :**

सुधाकर बापटचे बोलणे मि. जोग एम. डी. पर्यंत पोहचवितात. त्यामुळे एम. डी. बापटला केबिनमध्ये बोलावून फैलावर घेतात. सुधाकर बापटच्या डोक्यात राग धुमसतच असतो. त्यातच ऑफिस अवर्स संपल्यावर मि. जोग बापटला एक पत्र टाईप करून देण्यास सांगतात. ऑफिस अवर्स संपले म्हणून सुधाकर बापट नकार देतात. तरीही जोग त्यांच्याकडूनच टाईप करून घेण्याचा आग्रह धरतात. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून सुधाकर बापट नकार देऊन सरळ कंपनीच्या बाहेर पडतात परत एम. डी. कडून बोलणी बसतात. बापटला हा अन्याय सहन होत नाही. तो बंड करण्याचा विचार करतो, तोपर्यंतच त्याला मेमो दिला जातो. (पृ.१७,२०,२२) वरील घटना बघता खाजगी कंपनीत फक्त चमचे लोकांची चलती असल्याचे आणि ताठपणाने जगणाऱ्या लोकांना हकालपट्टी केली जात असल्याचे निर्दशनास येते. नोकरी टिकवून ठेवायची असेल तर पुरुषांना आपल्या बॉसची मनाविरूद्ध मर्जी सांभाळावी लागत असल्याचे चित्रही समोर येते.

**मशीन :**

खाशाबा लाला ग्रुपच्या कंपनीत काम करत असतो. तो अकुशल कामगार असतो. कंपनी नवनवीन मशिनरी आणून नवीन इंजिनियर लोकांची भर्ती करून जुन्या लोकांना काढून टाकते. खाशाबा ज्या मशिनवर काम करत असतो ती मशीन जुनी झाल्याने कंपनी ती मशीन विकते. त्यामुळे खाशाबाला तिथे काम मिळत नाही. (पृ.४४,४५,५४) कालप्रवाहाबरोबर स्वत:ला

बदलता न आल्याने, नवीन गोष्टी आत्मसात न केल्याने खाशाबाला आपली नोकरी गमवावी लागते.

**टार्जेट :**

गंगाराम भुजबळ कंपनीत नोकरी करत असतो. कामगारांच्या मागण्या कंपनी मान्य करत नाही. म्हणून तो इतर कामगारांना फितवतो आणि स्वत:ही मशीनचे पार्टस काढून खिशात ठेवतो आणि सरळ झोपून जातो. मशीन फेल झाल्याचे सांगून पत्ते खेळत बसतो. या सर्वांचा परिणाम म्हणून कंपनी घेतलेली ऑर्डर ठरलेल्या वेळेत पूर्ण करू शकत नाही. सुनिल साने नावाचे चीफ एक्झिक्युटिव्ह गंगाराम भुजबळाला पुराव्यासह पकडतात आणि दुसऱ्या दिवशी आठ वाजण्याच्या आधी स्वखुषीने नोकरीचा राजीनाम देण्यास सांगतात. सुनिल साने भणगेंना सांगून गंगाराम भुजबळच्या ओव्हरटाईम, बोनस, ग्रॅच्युइटी, कंपनीकडून घेतलेला ॲडव्हान्स आणि कंपनीच्या ज्या मटेरिअलचे, मशिन्सचे नुकसान त्याच्याकडून झाले होते त्याची किंमत वजा करून उरलेल्या रकमेचा चेक देतात. (पृ.९६,११६,११७) सराफांच्या सांगण्यावरून गंगाराम भुजबळ कंपनीच्या अहिताच्या गोष्टी करतो आणि स्वत:चे नुकसान करून घेतो. एकदा चुक झालेली लक्षात आल्यानंतरही आणि प्रयत्न करूनही गंगारामला आपली नोकरी टिकविणे अवघड होते.

**मानवतावादी लेखकाचा मृत्यू :**

विष्णू दिगंबर म्हसकर दैनिक हालहवाल मध्ये सहसंपादक म्हणून नोकरी करतात. त्यांच्या घरची परिस्थिती निम्नवर्गीय, वाईट, ओढग्रस्त होती. त्यामुळे त्यांनी एम.ए. सेकंड क्लास असुनही प्राध्यापक होण्याची शक्यता कमी असल्याने दैनिक हालहवालमध्ये नोकरी पत्करतात. दैनिकाचा अग्रलेख वाचून त्याचे कोणीही कौतुक करत नसे तरीही तो आपल्या कामात समाधान मानत असे. एका जबाबदार पत्रकाराची भूमिका तो प्रामाणिकपणे बजावत असतो. परंतु कंपनीची परिस्थिती वाईट असल्याने त्याला पगारवाढ झालेली नसते. सकाळी अकरापासून रात्री दीड–दोन वाजेपर्यंत विष्णू म्हसकर राबत असे. त्यांचे आवडते लेखक, नाटककार, कादंबरीकार, टीकाकार, समाजसेवक असलेले अप्पासाहेब पुणेकर यांचे निधन होते. ती बातमी मिळविण्यासाठी तो चार–पाच दिवस चकरा मारून थकतो परंतु त्याला ती बातमी मिळत नाही. आठ–दहा

दिवसांचे जागरण असल्याने त्याला अप्पासाहेब गेले त्या दिवशी त्याच्या नकळत झोप लागते आणि ती बातमी चुकते. बेजबाबदारपणे वागल्याच्या कारणावरून, महान मानवतावादी लेखक श्री. अप्पासाहेब पुणेकर यांच्या मृत्यूची महत्त्वाची बातमी बेजबाबदारपणे ऑफिसात झोपून चुकविल्याचे कारण दाखवून विष्णू दिगंबर म्हसकरला शंभर रूपये दंड आणि मेमो देण्यात येतो. (पृ.१२५,१५०,१५२) विष्णू दिगंबर म्हसकर प्रामाणिकपणे काम करत असून त्याच्या आवडत्या लेखकाच्या महानिर्वाणाची बातमी स्वत: देण्याची इच्छा बाळगणाऱ्या म्हसकरांच्या नकळत घडलेल्या चुकीची शिक्षा म्हणून मेमो आणि दंड दिला जातो. यावरून या समाजव्यवस्थेमध्ये नोकरीसाठी करावा लागणारा संघर्ष अटळ असल्याचे चित्र समोर येते.

मानवी जीवनात उपजीविका करण्यासाठी पुरुषांना काही ना काही काम करावेच लागते. आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृती असल्याने कुटुंबाची पालनपोषणाची जबाबदारी कर्त्या पुरुषावर असते. कुटुंबाचा आणि स्वत:चा उदरनिर्वाह, पालनपोषण करण्यासाठी लागणारा पैसा मिळविण्यासाठी पुरुषांना नोकरी करणे अनिवार्य ठरते. त्यासाठी शिक्षण घेऊन आपल्या कुवतीनुसार या कथासंग्रहातील पुरुष नोकरी मिळविताना दिसतात. नोकरी टिकविण्यासाठी त्यांना सतत प्रयत्नशील रहावे लागते. कधी अद्ययावत शिक्षण घेणे, ट्रेनिंग घेणे, तर कधी वरिष्ठांची मर्जी सांभाळणे, तर कधी मनाविरूद्धही नोकरी करावी लागते. असे असूनही ही नोकरी मिळविण्यात आणि ती टिकविण्यात अनेक अडचणी येतात. या कथासंग्रहातील संपादक भालेराव कामाप्रती प्रामाणिक, समाधानी असल्याने नोकरी टिकविण्यात यशस्वी होतात. विश्वनाथ पंडित, मोहितेंसारखे नायक अनेक तडजोडी करून कुटुंबाची जबाबदारी आणि आपली कर्तव्ये पूर्ण करण्यासाठी नोकरी टिकवून ठेवतात. जयवंतराव, विवेक दामलेसारखे नायक त्रास सहन करून नोकरी टिकवण्यात यशस्वी होतात तर अविनाश सारख्या नायकाला नोकरी मिळविण्यातच अडचणी येतात. साळवी, किशोर पेंडसे यांसारख्या कथानायकांना तर तडजोड करूनही नोकऱ्या टिकविण्यात अपयश येते. नोकरी हा पुरुषांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा निर्णय व घटक असतो आणि त्यावरच पुरुषांचे जीवनातील यश–अपयहशी अवलंबून दिसते. नोकरीतील अस्थिरता, असंतोष यांचा परिणाम नोकरीवर झालेला दिसून येतो.

**२.२. पुरुष आणि व्यवसाय :**

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह :**

मोहन साळवी मुंबईच्या ॲडव्हर्टायझिंग मार्केटमध्ये घुसतो. मोठमोठ्या कंपन्यांच्या पब्लिक रिलेशन्स मॅनेजर्सना भेटतो. आपल्या गोड, आर्जवी, भावनोत्कट बोलण्याने आपल्या प्रकाशनांची महती सांगतो. ॲड एजन्सीजना भेटतो. तो पूर्वीची गचाळ पद्धतीने छापलेली मराठीतली माहितीपत्रके बाद करून डिसेण्ट प्रिंटींग असलेली, आर्ट पेपरवर छापलेली आकर्षक असलेली पँप्लेटस् तयार करतो. खर्च झाला तरी क्वॉलिटी जॉब करण्याकडे त्याचा कल असतो. मोहन साळवी अशाप्रकारे विविध योजना राबवून धंदा वाढतात. (पृ.५६,५७) मोहन साळवी धंदा वाढविण्यासाठी एका पॉश हॉटेलमध्ये पार्टी आयोजित करतात. व्यवसायाशी संबंधित लोकांना निमंत्रण देतात. बाई, बाटली यांचा वापर करून तो पंधरा हजारांचा बिझनेस वाढवितो. (पृ.५९,६०) मोहन साळवी आपल्या व्यवसायात वृद्धी करण्यात यशस्वी होतो. परंतु तो वाढविण्यासाठी प्रसंगी चुकीच्या मार्गांनी जातो आणि यशस्वी होतो.

**२. वीज :**

**खुर्ची :**

या कथेतील नायकाचे लग्न झाले तेव्हा त्याचा धंदा जोरात चालला होता. त्यातून तो, घर सजवतो, सामानसुमान भांडीकुंडी, दागदागिने, साड्या, फर्निचर विकत घेतो. धंदा वाढविण्यासाठी कर्ज घेतो पण धंदा वाढत नाही. फक्त कर्जच वाढत जाते. नंतर तो नातेवाईक, बँक, सावकार यांच्याकडून कर्ज घेऊन धंदा वाढविण्याचा प्रयत्न करतो पण असफल होतो. लोकांचे कर्ज फेडता येईना तेव्हा तो स्वत:ला लपवू लागतो, भांडणे होऊ लागतात, घरात ताणतणावाचे, अपमानाचे वातावरण तयार होते. (पृ.१५०) धंद्यामध्ये चढउतार तर ठरलेलेच असतात परंतु या नायकाने सचोटीने आणि प्रामाणिकपणे धंदा करूनही त्याच्या पदरी निराशाच

येते. धंद्यात यशस्वी होणे वा न होणे हे फक्त प्रयत्नांवर, भांडवलावर अवलंबून नसून वातावरण, त्यावेळची परिस्थिती या गोष्टीही तेवढ्याचं कारणीभूत ठरत असल्याचे दिसते.

**३. पक्षिणी :**

**मृगया :**

या कथेतील नायक अमेरीकेतून इंजिनिअरिंगमधली डिग्री घेऊन येतो आणि आपल्या सासऱ्यांच्या जुन्या कंपनीचे दि. ग्लोब इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेड असे नामांतर करून त्या कंपनीची सर्व सुत्रे आपल्या हातात घेतात. त्यांनी दोन पैसेवाले भागीदार मिळवून व्यवसाय सुरू केला. बँकेच, सरकारचं धंदा वाढीसाठी कर्ज मिळवलं. गेली तीस वर्ष अगदी लहान प्रमाणावर चालणारी फॅक्टरी धडाडीने चालवण्याची जबाबदारी आपल्यावर घेतात. नीवन टेक्निक, नवीन मेथडस्, मार्केटमध्ये प्रॉडक्टस् फेकण्याची नवी स्टाईल, नव्या फॅशनची जाहिरात, क्लाएंटस् मिळवायचे नवनविन मार्ग, इ. वापरून कंपनीचा धंदा वाढवण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. जुन्या कामगारांना काढून टाकून नविन शिकलेले, कुशन कामगार भरती करताना दिसते. (पृ.१०९) साम, दाम, दंड, भेद अशा सर्व राजनितिंचा वापर करून हा नायक व्यवसायात यशस्वी वाटचाल करताना दिसून येतो

**४. घोडा :**

**मशीन** :

जनरल मॅनेजर राजवाडे साहेब आपला व्यवसाय वाढविण्यासाठी कंपनीत नवीन मशीन बसवतात. जर्मनीवरून नवीन मशीन मागवितात. ती मशीन भारतात येण्याआधीच ती मशीन ऑपरेट करण्यासाठी लागणारा माणूस ते जर्मनीला ट्रेनिंगसाठी पाठवितात. राजवाडे साहेबांनी नवीन मशीन आणून त्या लाईनमधील सगळी जुनी टेक्नॉलॉजी एकदम बाद ठरवून टाकली होती. नवीन मशिन आल्यामुळे ते जुने आगडबंब मशीन, खाडखाड आवाज, घरघर, तेलाचे डाग, जुने वर्कर्स सर्वच बदलले होते. नवीन तंत्रज्ञानामुळे या कंपनीला राजवाडे सुप्रीम पोझिशन मिळविण्याचा विचार करतात. प्रॉडक्शन फर्स्टक्लास, हंड्रेड पर्सेंट ॲक्युरसी आणि मॅक्झिमम क्वॉलिटी कंट्रोल मिळविण्यात ते यशस्वी होतात. विविध योजना, जाहिराती, सेल्सप्रोग्रॅम राबवून

तीन शिफ्टस् मध्ये मशीन चालवूनही काम आवरता येईना तेव्हा ते तसेच दुसरे एक मशीन मागवितात. (पृ.३९,४०,४१) पाश्चात्य देशांनी तयार केलेले तंत्रज्ञान वापरून अत्युत्कृष्ट प्रॉडक्शन तयार करून भारतातच नव्हे तर पाश्चात्य देशातही मार्केट मिळविण्याचा निश्चय ते करतात. आपला व्यवसाय–धंदा वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञान, अद्ययावत ज्ञान यांची सांगड घालून हा नायक यशस्वी झाल्याचे दिसते. आधुनिक टेक्नॉलॉजी ही नव्या गतिमान युगाची गरज असल्याचे प्रतिपादन ह. मो. मराठे या प्रासंगिक माध्यमातून मांडतात.

'सापेक्ष' कथासंग्रहातील 'बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह' मधील नायक मोहन साळवी बाई बाटलीचा उपयोग करून व्यवसायात वृद्धी करून त्याच्या व्यवसायात यशस्वी होतो.

'वीज' कथासंग्रहातील 'खुर्ची' कथेतील नायक व्यवसाय करण्यासाठी कर्ज काढतो आणि ते न फेडता आल्याने या चक्रव्युहात अडकतो. त्यावेळची परिस्थिती, वातावरण, मार्केट अनुकूल नसल्यानेच हा नायक प्रयत्न आणि भांडवल या जमेच्या बाजू असूनही अयशस्वी होतो.

'पक्षिणी' कथासंग्रहातील 'मृगया' कथेतील नायक उच्चशिक्षण घेऊन परदेशातील तंत्रज्ञान, साम, दाम, दंड, भेद, इ. सर्व गोष्टींचा वापर करून यशस्वी होताना दिसतो.

'घोडा' कथासंग्रहातील 'मशीन' कथेतील नायक राजवाडे नवीन तंत्रज्ञान आणि कुशल कामगार यांच्या मदतीने यशस्वी होताना दिसतो.

कथासंग्रहाच्या आलेल्या पुरुषपात्रांच्या व्यवसायाचा विचार करता काही पुरुष आपल्या व्यवसायात यशस्वी झालेले दिसतात तर काही अपयशी झालेले दिसतात. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ते साम, दाम, दंड, भेद, बाई, बाटली, भ्रष्टाचार, नवीन तंत्रज्ञान इ. सर्व गोष्टींचा उपयोग करून घेताना दिसतात. तर अपयशी झालेले पुरुष या सर्व गोष्टींपासून फायदा घेऊन हवे तेवढे यश संपादन करताना दिसत नाहीत. कधी कधी ते मोह, लाभ, वाईट सवयींमुळे अयशस्वी झालेले दिसतात. अथक परिश्रम, अद्ययावत ज्ञान, शिक्षण पुरुषांना यशाच्या मार्गावर घेऊन जाताना दिसते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :–

या कादंबरीचा नायक बेकार असला तरी तो अगोदर तात्पुरती नोकरी करत असल्याचा उल्लेख येतो. अचानक झालेल्या नोकरकपातीमुळेच त्याची नोकरी जाते. स्वत:च्या कोणत्याही गुणदोषांमुळे त्याची नोकरी जाते असे नाही. त्यामुळे तो नाकरीच्या ठिकाणी यशस्वी झाला किंवा नाही असे म्हणणे सयुक्तिक ठरणार नाही. परिस्थितीच्या प्रभावावरच या नायकाची नोकरी अवलंबून असल्याचे आणि दुसरी मिळण्याचीही शक्यता दिसून येते. (पृ.१३)

ढोणकर नावाचा नायकाचा मित्र सामान्य बुद्धीमत्तेचा असूनही अगोदरची मास्तरकीची नोकरी सोडून पोलिस सब इन्स्पेक्टरची नोकरी करतो. तो आपल्या नोकरीचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी करताना दिसतो. दारू, पैसा, पोरी, धुम्रपान अशा गोष्टी तो करताना दिसतो. तरीही तो आपली नोकरी टिकवून प्रमोशन मिळविण्यासाठी धडपडताना दिसतो. (पृ.५४,५५) नोकरी सामाजिक बांधिलकीचा वसा म्हणून करायला हवी मात्र ढोणकर तसा दिसत नाही.

शैक्षणिक संस्थेचा सेक्रेटरी आपल्या पदाचा उपयोग कमविण्याव्यतिरिक्त स्वत:च्या वैयक्तिक फायद्यासाठीच जास्त करताना दिसतो. शैक्षणिक क्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्रात भ्रष्टाचार, स्त्रीलंपटपणा, पैशाचा गैरवापर करताना दिसतो. त्याची गुंडगिरी, भ्रष्टाचारी वृत्ती असली तरी पैशाच्या जोरावर तो सर्व परिस्थिती, अधिकार आपल्या ताब्यात ठेवताना दिसतो. (पृ.७५,७६,७७)

नायकाची बेकारीच त्याच्या कुटुंबाची वाताहत करते. नोकरी नाही म्हणून पैसा नाही पैसा नाही म्हणून जीवनावश्यक गोष्टींना मुकावे लागते. शिवाय जीवनातील बाप होण्याची देणगीही तो स्वत:च्या हाताने संपविताना दिसतो. पुरुषांच्या नोकरी–व्यवसायावर त्याचे आणि त्याच्या कुटुंबाचे स्वास्थ्य अवलंबून असल्याचे चित्र ह. मो. मराठे यांनी रेखाटल्याचे दिसून येते.

पुरुषांचा – नोकरी व्यवसाय टिकणे किंवा त्यात यश–अपयश हे समाजाच्या काही घटकांवरही अवलंबून असते. पुरुषांच्या नोकरी–व्यवसायावर भाष्य करताना डॉ. आशा सावदेकर म्हणतात;

"कॉलेजमधली नोकरी संपणं हा मोठा अपेक्षाभंग होता; पण भ्रमनिरास नव्हता. भ्रमनिरास तिथून पुढं सुरू झाला......मी ज्या समाजात जगत होतो त्या समाजाविषयी भ्रमनिरास, स्वत:च्या जगण्याच्या कल्पनेविषयीचा भ्रमनिरास आणि स्वप्नातून वास्तवात येणाऱ्या प्रक्रियेची सुरूवात .... त्या दिवसांत मी प्राध्यापकीसाठी जे इंटरव्ह्यू दिले, तेथील नेमणुकीबाबत मला जे अनुभव आले त्यातून मला अनेक दाहक सत्यांचं दर्शन झालं. वशिलेबाजी, क्षुद्रता, जातपात, विशिष्ट जातीच्या माणसांसंबंधी द्वेष किंवा आकस, शिक्षणासारख्या 'पवित्र' आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार अशा व्यवसायातल्या बेकारी, गुंडगिरी, दहशत, भ्रष्टाचार, दडपशाही या गोष्टी मला नव्यानच जाणवल्या आणि समाजाच्या स्वरूपाविषयी अगदी नवनवी सत्यं मला अनुभवायला मिळाली."[३]

डॉ. आशा सावदेकारांनी नोकरीसंदर्भातील नायकाविषयी केलेले भाष्य अचूक वाटते.

**२. इतिवृत्त :**

श्रीरंग नाडकर्णी अगोदर मुंबईच्या एका दैनिकात उपसंपादक म्हणून नोकरी करीत असतात. 'फेरफटका' नावाच्या कॉलममधून ते भोवतीच्या घडामोडी, व्यक्ती, प्रसंग, भाषण यांविषयी रशिली, चुरचुरीत, झोंबरी, खुशखुशीत, गुदगुल्या करणारी कॉमेंटरी लिहीत असतात. परंतु पूर्वीच्या कुठल्या तरी कृत्याचा सूड म्हणून त्यांचा 'फेरफटका' नावाचा कॉलम बंद केला जाते. नाडकर्णींची लोकप्रियता सहन न झाल्याने प्रामाणिकपणे काम करूनही त्यांना सीमित करण्यात येते. (पृ.८,९,१०) त्यामुळे त्यांनी ती नोकडी सोडून 'जनता' दैनिकाच्या संपादक पदाची जबाबदारी सांभाळली. तेथेही ते अबोल, नम्र पण स्पष्ट आणि निर्भिड संपादकाची भूमिका चोख पार पाडतात. वृत्तपत्राचा कायापालट घडवून आणतात. जनता चा खप पंचवीस हजारांवर नेऊन ठेवतात. आपल्या नोकरीच्या म्हणजेच पदाच्या – अधिकाराच्या जोरावर ते हॉटेल कामगारांचे प्रश्न मालकांची प्रकरणे, अडचणी हाताळतात. दळवी उद्योग समूहाच्या खतकारखान्यामुळे नदीतील पाणी दूषित होऊन गावकरी आजारी पडतात, मरण पावतात, तेव्हा 'जनता' मधून परिस्थितीला वाचा फोडतात. मुख्यमंत्र्यांच्या भ्रष्टाचारावर अनेक पुढारी व्यक्तींच्या मदतीने निषेध व्यक्त करतात. तेव्हा मुख्यमंत्र्यांची माणसे त्यांना त्रास देतात. तरीही नाडकर्णी

नमत नाहीत. ते आपल्या पदाचा, कामाचा अतिशय चांगल्याप्रकारे वापर करून यशस्वी होतात. समाजहिताची कामे करतात परंतु राजसत्ता आणि अर्थसत्ता यांच्या हातमिळविणीमुळे त्यांना हतबल व्हावे लागते. आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावा लागतो. (पृ.८,६४,८८,८९,९९, ११७,१४०,१४४,१६७,१६८, २४१,२६७) संपादकाच्या सचोटी, नैतिकता, प्रामाणिकपणा, अन्यायाला प्रतिकार करणे या गुणांचाही त्यांच्या वैयक्तिक जीवनावर प्रभाव पडल्याचे मराठे यांनी निर्दशनास आणून दिले आहे. सरळमार्गी माणसांनाच संकटांचा सामना जास्त करावा लागत असल्याचे चित्रही येथे स्पष्ट होते.

**३. कुरूक्षेत्र :**

प्रा. उल्हास भावे प्राध्यापकाची नोकरी शांतीवन महाविद्यालयात करतात. प्रामाणिकपणे नोकरी करता करताच ते विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध आवाज उठवितात. लढा देतात. ते विद्यार्थी आणि शिक्षकांना न्याय देता देताच आपले जीवन संपवितात. परिणामांची तमा न बाळगता आपल्या कार्याप्रती निष्ठा ठेवणारे उल्हास भावे आपल्या कामाच्या ठिकाणी आपला ठसा तर उमटवतात परंतु त्यांना जीवन संपविणे वाट्याला येते. (पृ.९,१३, २०,६८,७५)

डॉ. म्हसकारांनी स्थापन केलेल्या शांतीवन महाविद्यालयात तुकाराम फराटे छोटीशी नोकरी करतात. पैसा, पद, प्रतिष्ठेची हाव त्यांना माणसातून पशूत परावर्तीत करते. डॉ. म्हसकरांचा खूण करून ते शांतीवन महाविद्यालयाची संस्था आपल्या अधिकारात चालवितात. विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्त्यांचे पैसे खाणे, ग्रँट हडप करणे, शिक्षकांचे पगार वेळेवर न देणे, सरकारी अनुदान हडप करणे, होस्टेल व्यवहारात गैरव्यवहार करणे अशी भ्रष्टाचाराची कामे करून ते स्वत: गाडी, बंगला, नोकर–चाकर पार्ट्या यातच खूष होताना दिसतात. (पृ.१४,२२,२३, २८,२९,५३,५९,६३) शिक्षणक्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्रात काम करणारे तुकाराम फराटे या संस्थेचे सर्वेसर्वा बनतात आणि सर्व परिस्थिती आपल्या अधिकारात ठेवून स्वत:चाच विकास करतात. शिक्षणाचे बाजारीकरणाचे चित्रच येथे पुढे येते.

**४. कलियुग :**

सी. एम. कत्रे नावाचा नायक असोशिएट व्हाइस प्रेसिडेंट (ऑपरेशन्स) म्हणून काब्रा अँड मल्होत्रा प्रा. लि. कंपनीत काम करत असतात. या कंपनीत नोकरी करण्यापूर्वी ते एका कारखान्यात फिटरचे काम करीत असतात. नंतर कामगारांचे नेते बनतात. तेथे मालकांनी त्यांना विकत घेण्याचा प्रयत्न केला म्हणून ते ती नोकरी सोडून या कंपनीत येतात. या कंपनीत आल्यानंतर स्वत:च्या कर्तृत्वाने आणि धडाडीने ते अधिकारी बनतात. ते अतिशय शिस्तप्रिय असतात. परंतु कंपनीतील व इतरांच्या कटकारस्थानामुळे त्यांना पदाचा राजीनामा देणे भाग पडते. हा अन्याय त्यांना सहन होत नाही, म्हणून बापू पाटीलची मदत घेऊन जगतापच्या विरोधात उभे राहतात आणि बापू पाटीलकडून जगतापच्या मुलांची हत्या होते. या सर्व गोष्टींच्या निष्कर्षावरून असे लक्षात येते की ही व्यक्ती स्वत:ची नोकरी सांभाळण्यासाठी प्रामाणिक काम करते. परंतु इतरांच्या कटकारस्थानाचा बळी ठरते. स्वत:चा बचाव करायच्या नादात तो पशुत्वाला जाऊन पोहोचतो. (पृ.१,२४,५७,७६,११२,१२५,१२७)

**५. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

सनशाईन क्लिनिंग सोप या कंपनीत मॅनेजर पदावर कार्य करणारे अविनाश साने आपली नोकरी प्रामाणिकपणे करून उत्पादन वाढवितात. त्यांच्या मालाची चांगली जाहिरात होते परंतु प्रतिस्पर्धी असलेली एव्हरफ्रेश क्लिनिंग सोप कंपनी सनशाईन क्लिनिंग सोपला मागे टाकते आणि या चढउताराचा परिणाम अविनाश साने यांच्या नोकरीवरही होतो. प्रतिस्पर्धी कंपनीची मॅनेजर त्यांची पत्नीच असते. त्यामुळे ते तिच्या म्हणजेच कंपनीच्या आयडीया चोरतो तरीही कंपनीचे पूर्ण सहकार्य न मिळाल्याने तो अपयशी होतो. कटकारस्थान करूनही तो अयशस्वी तर होतोच परंतु कुटुंबाच्या नजरेतूनही उतरतो (पृ.१२,१८,२८,३२,१०९,१२१). अविनाश सानेचे नोकरीतील अपयश त्याच्या कोणत्याही चुकीमुळे झाले नसले तरी परिस्थितीने तो अपयशी ठरतो असेच म्हणावे लागेल. एकतर प्रतिस्पर्धी कंपनीत स्वत:ची पत्नीच असते आणि दुसरे म्हणजे कंपनीने न दिलेला आथिक पाठिंबा ही दोन कारणे कंपनीच्या आणि त्याच्या अपयशाला कारणीभूत होताना दिसतात.

**६. मार्केट :**

एस. के. केळकर मार्केटींग मॅनेजर म्हणून काम करतात. हायटेक प्लॅस्टिक्स या कंपनीत काम करणारे केळकर अत्यंत हुशार, चाणाक्ष आणि आपल्या कामात अत्यंत तरबेज असतात. त्यांच्या कंपनीत तयार झालेल्या कमी प्रतीच्या बॅगा अहुजांना फसवून विकतात. केळकरांना पैशाची अत्यंत हाव असते. पैशासाठी ते भ्रष्टाचार करतात. नोकरीत ते आपल्या अक्कलहुशारीने पद, पैसा मिळवितात. परंतु या सर्व गोष्टींचे पडसाद कुटुंबावर पडतात आणि कुटुंबाचाही नैतिक विनाश आणि मुलगी गमावणे या गोष्टी त्यांच्या हव्यासापायीच घडताना दिसतात. (पृ.२,३,१८,३४,३५,६६)

बीवायपी कंपनीत काम करणारे अहुजा प्रामाणिक असतात परंतु मद्याच्या नशेत आणि पैशाच्या मोहापायी केळकरांच्या सांगण्यावरून भ्रष्टाचार करून पैसे खातात. नंतर हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर अहुजांना राजीनामा द्यावा लागतो. पैशांचा मोह आणि मद्याची नशा त्यांना नोकरीत अपयशी तर करतेच पण मान, मर्यादा, प्रतिष्ठा, पैसा, पद सर्व गोष्टींचीही होळे होते. (पृ.३५,६६,१४०,१४१)

मि. दिवाण आपल्या कर्तृत्वाने पद, पैसा, प्रतिष्ठा, देखणी स्टेनो मिळवितात. परंतु त्यांची नैतिकता बदलत जाते. शेवटी ते त्यांची स्टेनो तनुजा केळकरवर बलात्कार करतात. त्यांचे हे प्रकरण उघड होऊ नये म्हणून तिला कामावरून काढून टाकून तिच्या वडिलांना एक लाख रूपये, मोठी ऑर्डर देऊन प्रकरण दाबतात. एवढा मोठा गुन्हा करूनही अधिकार, पैसा हातात असल्याने ते सर्वांनाच विकत घेतात. (पृ.५३,९४,१३१,१९९,२०७,२१३) सर्व प्रकारचा भ्रष्टाचार, अनैतिकता करूनही दिवाणसाहेब स्वत:च्या अधिकाराने आणि पैशाने आपल्या नोकरीच्या ठिकाणी यशस्वी असल्यासारखेच जीवन जगतात.

**७. सॉफ्टवेअर :**

बीवायपी ग्रुपमध्ये मि. देशमुख नोकरी करतात. स्वत:च्या हुशारीवर, प्रामाणिकपणावर ते ही नोकरी मिळवितात. जातीवंत हुशार असलेले देशमुख कंपनीचाही फायदाच बघतात. स्त्रियांविषयी आदर आणि कंपनीचे हिताचेच निर्णय ते घेतात. परंतु अरूणाचलमच्या घाणेरड्या

चारित्र्याला विरोध करण्याच्या आणि चुकीच्या गोष्टींचे वरिष्ठांचे समर्थन न करण्याच्या कारणावरून शेवटी त्यांना राजीनाम द्यवा लागतो. (पृ.५,४९,५२,५३,२३५,२४६) प्रामाणिकपणा असूनही वरिष्ठांची चूकीच्या गोष्टीसाठी मर्जी सांभाळली नाही म्हणून ते नोकरीत अयशस्वी ठरतात. पुरुषांची नोकरी टिकणे वा न टिकणे हे फक्त त्यांच्याच हातात दिसून येत नाही. तर तेथील इतर सहकारी, वरिष्ठ अधिकारी यांच्या गुणदोषांमुळेही एखाद्या व्यक्तीचे नोकरीतील यश – अपयश ठरते हेच येथे लक्षात येते.

मराठे यांच्या कादंबऱ्यांमध्ये येणारी पुरुषपात्रे नोकरी–व्यवसायाशी निगडित आहेत. 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील नायकाला नोकरी लागते पण नंतर ती जाते. ती मिळविण्यासाठी त्याची चाललेली धडपड करूणकहाणी उद्ध्वस्व मानसिकतेचे विदारक वास्तव घेऊन येते. नायकाला मित्र असलेले दुसरे पात्र ढोणकर पोलिस इन्स्पेक्टर बनतो पण आपली नोकरी तो प्रामाणिकपणे करताना दिसत नाही. तर शिक्षणसंस्थेचा सेक्रेटरी शिक्षणक्षेत्राला कलंक म्हणून येतो. भ्रष्टाचार आणि अनैतिकता याचा नमुना हे पुरुषपात्र येते. 'इतिवृत्त' मधील श्रीरंग नाडकर्णी हे पात्र करीत असताना आदर्श पत्रकार आणि आदर्श पत्रकारिता याचा उत्तम नमुना म्हणून हे पात्र अधिक लक्षात राहते. 'कुरुक्षेत्र' मधील प्रा. उल्हास भावे एक सच्चा शिक्षक म्हणून लक्षात राहतात. पण त्यांच्या प्रामाणिकपणाचा, विद्यार्थी आणि प्राध्यापक हित पाहण्याचा लाभ न होता त्यांना तुकाराम फराटेंसारख्या भ्रष्ट व्यक्तीचा बळी ठरणे वाट्याला येते. तुकाराम फराटेसारखी व्यक्ती शिक्षणाकडे विधायक कार्य म्हणून न पाहता उत्पन्नाचे साधन म्हणून पाहतात. शांतीवन महाविद्यालय शैक्षणिक प्रयोगशाळा न ठरता भ्रष्टाचाराची प्रयोगशाळा ते करतात. अखेरी त्या महाविद्यालयातील भावेंना संपविणारे फराटे विद्यार्थी आणि शिक्षकांचे हित पाहणाऱ्या डॉ. म्हसकरांचाही बळी घेतात. 'कलियुग' मधील कत्रे एका कंपनीत सर्वसामान्य कामगार म्हणून काम करतात. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे पुढे 'काब्रा ॲण्ड मल्होत्रा प्रा. लि.' या कंपनीत असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट म्हणून काम करतात. आपली नोकरी सचोटीने करणाऱ्या कत्रेंना त्याचा लाभ होत नाही. कडक शिस्तीमुळे कामगारांमधील कट–कारस्थानांमुळे त्यांना नोकरीचा राजीनामा देण्याची वेळ येते. त्यावेळी स्वत:ची नोकरी टिकविण्यासाठी ते क्रूर बनताना दिसतात.

‘नरिमन पॉईंटचा समुद्र’ मधील अविनाश साने आणि त्यांची पत्नी हे दोघेही वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये नोकरी करतात. संबंधित कंपनीत ती मोठ्या पदावर जाण्यासाठी प्रोत्साहन देतात. मात्र वेगवेगळ्या प्रयोगशिलतेमुळे त्या कंपनीची भरभराट होते. तेव्हा तिच्या काही कल्पना चोरूनही तो यशस्वी होत नाही. तेव्हा तो पत्नीने राजीनामा द्यावा म्हणून प्रयत्न करतो. त्याच्या कंपनीतील अयशस्वितेमागे तो स्वत: कारणीभूत नाही, तर कंपनीकडून मिळणारा अपुरा अर्थपुरवठा कारणीभूत ठरलेला दिसतो. ‘मार्केट’ मधील एस. के. केळकर आपल्या कंपनीतल कमी प्रतीचे उत्पादन भ्रष्टाचार करून खपवितो. अधिकाधिक पैसे मिळवितो. त्याचा स्वार्थ त्या पाठीमागे आहेच पण पत्नी आणि मुलगी यांच्याकडून त्याला विरोध होण्याऐवजी त्याही त्याला बळी ठरतात. भ्रष्टाचारी प्रवृत्तीमुळे अखेरी केळकरांच्या मुलीचाही बळी जातो. पर्यायाने कुटुंब उद्ध्वस्त होते. गुणवत्तेखेरीज कोणत्याही क्षेत्रात टिकून राहणे अवघड असल्याचे प्रतिपादनच येथे येते. केळकरांच्या सान्निध्यात बीवायपी कंपनीतील आहुजाही केळकरांप्रमाणेच उद्ध्वस्त होतात. दिवाणसारखी व्यक्ती उद्योगक्षेत्रात अधिकारी पदावर काम करीत असताना केळकरांची मुलगी तनुजावर लक्ष ठेवून तिच्यावर अत्याचार करतो. अखेरी केळकर आणि पत्नी यांच्या लोभामुळे एक लाख रूपये घेऊन ते समाधान मिळवितात व तनुजा मात्र आत्महत्या करते. पद आणि पैशाच्या बळावर मनमानी करणारा दिवाण हा कंपन्यांमधील भ्रष्ट पुरुषाचे प्रातिनिधिक चित्र म्हणून पुढे येते. ‘सॉफ्टवेअर’ कादंबरीमधील पोंक्षे यांच्या कंपनीतील अधिकाऱ्याचा मुलगा अरूणाचलम हा तेथील स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहतो. देशमुखसारख्या व्यक्तीचा यात काहीही दोष नसताना, वरिष्ठांची मर्जी सांभाळली नाही म्हणून आणि अरूणाचलमच्या वाईट कृत्यांना विरोध केल्याने राजीनामा देण्याची पाळी त्यांच्यावर येते.

समाजाच्या विविध स्तरातील विविध पातळ्यांवर कसे यश मिळवितात वा अपयशी होतात हेच येथे येते. कंपनीमालक, पदाधिकारी, कामगार संघटना, कामगार, अंतर्गत स्पर्धा, कटकारस्थाने, त्यांचे ठरणारे बळी, शिक्षणासारख्या क्षेत्रातील भ्रष्टाचार, शिक्षणक्षेत्रातील विधायक कार्य, अधिकाराचा गैरवापर अशा विविध गोष्टी पुरुषांच्या नोकरी–व्यवसायाच्या निमित्ताने पुढे येतात.

### ३. पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन :

भारतीय संस्कृती पुरुषप्रधान संस्कृती आहे. आपल्याकडे पितृसत्ताक कुटुंबपद्धती दिसून येते. कोणतेही निर्णय घेताना अंतिम निर्णय पुरुषांचाच सर्वमान्यपणे झालेला दिसून येतो. असे असले तरीही भारतीय संस्कृतीने स्त्रीला आदराचे स्थान दिले आहे. स्त्रीला आदिशक्ती म्हटले आहे. स्त्री ही वंदनीय मानली जाते.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांच्या आधारे त्यातील आलेल्या पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे तो भोगवादी आहे की समतावादी आहे. स्त्रियांना समान न्याय मिळतो की पुरुषांना न्याय मिळविण्यासाठी स्त्रियांना एक साधन म्हणून वापरले जाते याचा विचार येथे अभिप्रेत आहे. पुरुषांच्या यशापयशात स्त्रियांना बरोबरीचे स्थान दिले जाते की स्त्रियांचा फक्त वापर करून घेतला जातो हे जाणून येथे अभिप्रेत आहे.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह :**

बिझनेस डील यशस्वी होण्यासाठी पॉश हॉटेलमध्ये पार्टीबरोबरच कॅब्रे डान्सर ठेवण्याची आयडिया साळवी, भिडे मिळून ठरवतात. त्यासाठी प्रसंगी जास्त खर्च करण्याची तयारीही ठेवतात. आपल्या बिझनेसमधील डिल यशस्वी होण्यासाठी नीती–अनिती असा कोणताही विचार न करता स्त्रियांना व्यवसाय यशस्वी करण्याची गुरूकिल्ली म्हणून येथे वापर करण्याचा दृष्टिकोन ठेवतात. (पृ.५९,६०,६५) स्त्रीला उपभोगाची वस्तू समजून, आसुरी आनंद मिळविण्याचे साधन ठरवून तिला नाच–गाणे करायला लावून समोरील पुरुष बिझनेस पार्टनरला खुष करून बिझनेस डिल यशस्वी करण्यासाठी हे पुरुष वंदनीय असलेल्या स्त्रीला बाजारू स्वरूप देताना दिसतात. या ठिकाणी स्त्रीकडे कटपुतली बाहुली म्हणूनच पाहण्यात येत असल्याचे दिसते.

२. वीज :

**दृश्य तेच आहे :**

या कथेतील नायकाची पत्नी पदवीधर असून नोकरी करते. त्यांना दोन मुली आहेत. एके दिवशी हा नायक एका अनोळखी तरूण बाईला घरी घेऊन येतो. नवरा बायकोप्रमाणे तो त्या बाईशी लग्न न करताच व्यवहार करतो. पत्नीने विरोध करताच तिला मुलींना घेऊन घराबाहेर पडण्यास सांगतो नाहीतर पगार स्वत:ला आणून देऊन आतल्या खोलीत राहण्यास सांगतो. त्याच्या कोणत्याही गोष्टीत पत्नीने डोकावू नये असेही तो ठामपणे सांगतो. पत्नीने परस्त्रीला घरात ठेवण्यास जोरदार विरोध केल्यावर तो पत्नीला दोरीने मारहाण करतो. सोडचिठ्ठी दिली असे समजून तो बायकोला घराबाहेर काढतो (पृ.३०,३१,३२). हा पुरुष एकाच वेळी दोन स्त्रियांची आयुष्ये उद्ध्वस्त करतो. बायकोला तर तो पैसे कमवून देण्याचे साधन बनवितो. आपल्याला कोणताही प्रश्न विचारायचा नाही, विरोध करायचा नाही, पैसे द्यायचे या अटींवर तो पत्नीचा काही काळ सांभाळ करतो. परंतु नंतर तिला कोणतीही दया–माया न दाखविता, मुलींच्या भवितव्याचा कोणताही विचार न करता घराबाहेर काढतो. परस्त्रीला लग्न न करताच उपभोगाची वस्तू म्हणून घरात आणतो. या नायकाच्या माध्यमातून ह. मो. मराठे यांनी पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार दाखवून पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा भोगवादी दृष्टिकोन रेखाटला आहे.

**बाजार :**

सुपरस्टार सुनिलकुमार आपले लग्न झालेले असताना सुषमा नावाच्या एका मुलीला फसवितो. स्वत:ची मार्केटमधली गेलेली पोझीशन परत मिळविण्यासाठी, स्वत:ची जाहिरात करण्यासाठी तो तिला फसवून तिचा वापर करतो. स्वत:ला प्रसिद्धी मिळाल्यावर आणि पत्नीने विरोध केल्यावर तो सुषमाला सोडून देतो (पृ.६७,७३). चित्रपट नायक हा समाजासाठी हिरो असतो परंतु हाच हिरो एकाच वेळी दोन–दोन स्त्रिया आयुष्यात आणतो. प्रेमिका म्हणून वापरणाऱ्या सुषमाला तो स्वत: प्रसिद्धी मिळविल्यावर वाऱ्यावर सोडतो. नायकाच्या माध्यमातून

समाजातील विकृती येथे लेखक मांडतो. समाजाचा हिरो जर स्त्रियांना सन्मान देत नसेल तर सर्वसामान्य पुरुष स्त्रियांकडे कोणत्या नजरेने पाहिल हे प्रश्नचिन्ह समोर येते.

**स्वप्नभूमी :**

मि. अशोक राजे मिस्टर दिघे यांना एंटरटेन करण्यासाठी आपल्या पत्नीला मनाविरूद्ध तयार करतात. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी प्रसंगी पत्नीचा वापर करावा लागला तरी अशोक राजेंना वाईट वाटत नाही. मि. दिघेही आपल्या ऑफिसमध्येच काम करणाऱ्या मिसेस राजे यांच्याकडे वाईट नजरेने पाहतात. परंतु नवऱ्याच्या यशासाठी ती मनाविरूद्ध दिघेंना एंटरटेन करते. त्यांची क्षमा मागण्याची भाषा करते. अशोक राजे साम, दाम, दंड, भेद वापरून बिझनेस यशस्वी करण्यासाठी धडपडतो आणि आपल्या मार्गात अडसर ठरणाऱ्या बायकोलाही घटस्फोटाची भाषा बोलतो. परिणामी पत्नी त्याला मदत करण्यासाठी तयार होते (पृ.८३,८४,८५,८८). व्यवसायवृद्धी, पैसा, प्रतिष्ठा या नशा चढविणाऱ्या गोष्टी, परंतु त्या मिळविण्यासाठी पत्नीचे शील सांभाळण्याऐवजी नवराच तिचे शील दुसऱ्यांसमोर मांडताना दिसतो.

**पूर्णचंद्र :**

वत्सलाबाईच्या आईला पाचही मुलीच झाल्या म्हणून त्यांचे वडील त्यांच्या आईवर संतापायचे. त्याचा राग पोरींवर, आईवर काढायचे. रांडेला पाच पोरीच झाल्या. गेल्या जन्मातला दावा साधला भडवीनं. दिला असतास एखाद्या पोराला जन्म तर काय मेली असतीस? आणि असतीस मेली एखाद्या पोराला जन्म देऊन तरी चाललं असतं. पण नाही पोराचं सुख नव्हतं माझ्या नशिबात. एकेक बाईच अशी हरामजादी असते. (पृ.११६) आपल्याला सर्व मुलीच झाल्या. त्यांची शिक्षणं करून लग्न करून कर्जाचा बोजा वाढतो त्यापेक्षा एखादा मुलगा झाला असता तर म्हातारपणी आधार झाला असता. (पृ.११६) स्त्रियांविषयी, मुलींविषयी या पुरुषाची भावना तिरस्काराची वाटते. मुलगी वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी न होता कर्जाचा डोंगरच तयार करून जाते अशी दुराग्रही भूमिका हा पुरुष व्यक्त करताना दिसतो.

वत्सलाबाईंचा लहानपणी वडिलांनी तिरस्कार केला तर मोठेपणी जगदीश कारेकर नावाच्या पुरुषाने तिला नोकरी देण्याच्या, नाटकात काम देण्याच्या बहाण्याने तिच्याबरोबर लग्न न

करताच रखेलीसारखे संबंध ठेवतो. ती गर्भवती झाली असताना आपली जबाबदारी झिडकारतो. वत्सलाबाईंचा नाईलाज झाल्यावर शेवटी ती जबरदस्तीने जगदीशला लग्न करण्यास भाग पाडते. लग्न केल्यावर जगदीश त्याची नाटके चालेनात, उपासमार झाली तेव्हा तो तिला इतर पुरुषांबरोबर संबंध ठेवून पैसे कमविण्यास भाग पाडतो. जगदीशचा वत्सलाबाईंकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यांच्याच शब्दांतून प्रकट होताना दिसतो;

'तुझ्याशी मी लगीन केलं ते तुझ्या प्रेमात पडून नव्हे की तू मला आवडलीस म्हणून नव्हे. देवाब्राह्मणांच्या साक्षीने लग्न करतात त्याला जे पावित्र्य असतं ते तुझ्यामाझ्या लग्नाला नाही, कधी येणारही नाही. तू माझ्यामुळे नीट बनलेली, पैसे मिळवणारी, माझ्या आसऱ्याला आलेली कुत्री. मी सांगतो तसा धंदा कर. पैसे कमाव. मला पैसे पायजेत. संसाराला पायजेत. तुझ्या पोराच्या दुधाला पायजेत. मला दारूला पायजेत. देणेकऱ्यांच देण फेडायला पायजेत. तुझा फॉर्म चांगला आहे. धंदा कर जोरात धंदा कर. कमाव पैसे कमाव' (पृ.११९). जगदीश वत्सलाबाईंच्या अडचणीचा गैरफायदा घेतो. स्वत:ची जबाबदारी झिडकारतो. तिचा उपयोग करून घेतो आणि तिला धंदेवाली बनवून स्वत:ची चैन करतो. पुरुषजातीला मान खाली घालायला लावणारी ही पुरुषी मानसिकता अत्यंत लज्जास्पद आणि पुरुषजातीविषयी स्त्रियांच्या मनात तिरस्कार निर्माण करणारी वाटते.

वत्सलाबाईंना रंगराव नावाचे दुसरे पुरुषपात्र आसरा देते. तिला जेवायला घालते, कपडेलत्ते देते, घर देते रंगराव वत्सलाबाईंना रखेली म्हणून ठेवतात. त्यांच्यामध्ये देण्याघेण्याच्या व्यवहारावरून संबंध तयार होतात. रंगराव या पुरुषपात्राच्याही तीन–चार बायका असल्याचा उल्लेख येतो. रंगराव हे पुरुषपात्रही अत्यंत विलासी, भोगवादी, स्त्रीलोलुप दिसून येते. त्यांच्या तीन–चार बायका असूनही ते वत्सलाबाईंना रखेली म्हणून ठेवताना दिसतात (पृ.११९,१२०). रंगरावांचा स्त्रियांकडे भोगवादी वस्तू, मनोरंजन करण्याचे साधन म्हणून पाहताना दिसतो.

रामभाऊ नावाचे पुरुषपात्र साधे, सरळ, गरीब, कुटुंबवत्सल आहे. त्याला पाच मुली, पत्नी असा परिवार आहे. पाच मुली झाल्या म्हणून पत्नी सारखी रामभाऊंना दोष देते. बायको रामभाऊंचा तिरस्कार करते, तर मुली पाणउतारा करतात. रामभाऊंना ऑफिसर, नाटककार, चांगला नोकरदार होता आले नाही म्हणून पत्नीकडून त्यांना कोणत्याही प्रकारचे शारीरिक,

मानसिक सुख मिळविता येत नाही. असे असूनही रामभाऊ जेव्हा वत्सलाबाईंना भेटतात वत्सलाबाई त्यांना शारीरिक, मानसिक सुख आपणहून देऊ करतात परंतु रामभाऊ वत्सलाबाईंचा आदर करतात. बायकोखेरीज दुसऱ्या स्त्रीचा विचार न केल्याचाही उल्लेख येतो. रामभाऊंना मुलींकडून आदर मिळत नाही, पत्नीसुख मिळत नाही. उलट पत्नीच त्यांचा छळ करते. अपमान करते. तरीही रामभाऊ सर्व स्त्रियांचा आदर करताना दिसतात. रामभाऊ स्त्रियांकडे स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहतात.

**३. ज्वालामुख :**

**निशाण :**

हरिहर इंडस्ट्रीजमध्ये संप चालू असतो. पेपरमध्ये टाळेबंदीची मध्यस्थी अयशस्वी झाल्याची बातमी येते. ती पाहून त्याच कंपनीतील कामगार मोरे, पावसकर ती बातमी पाहून अत्यंत दु:खी होतात. ते दोघेही रात्री हातभट्टीची दारू पितात. दारू पिऊन दोघेही आपापल्या बायकांना मारहाण करतात. (पृ.४४) या दोन कामगारांची निराशा बघता, हाताला काम नसणे ही मोठी घटना आहे. परंतु टाळेबंदी होणे, कंपनीने कामावर न ठेवणे यात कुटुंबाचा, पत्नीचा काहीही संबंध नसतो. उलट उपासमारी, दारिद्र्य सहन करत ते आपापल्या कुटुंबात दिवस काढत असतात. परंतु ही दोन्ही पुरुषपात्रे काम नसताना, पैसे नसताना दारू तर पितातच शिवाय स्वत:चा राग, चीड, संताप, पत्नीला मारहाण करून व्यक्त करतात. अर्धांगिनी असलेल्या पत्नीकडे ते अशाप्रकारे राग, संताप व्यक्त करण्याचे ठिकाण म्हणून पाहताना दिसतात.

**४. हद्दपार :**

**४.१ :** या कथेतील नायक लेखक आहे. त्याला वाचन, लेखन, चर्चा, परिसंवाद यांची आवड असते. त्याची पत्नी बी.ए. असून एम.ए. करण्याची इच्छा व्यक्त करते. परंतु हा नायक तिला वर्ष–दीड वर्ष फक्त आपल्याला हवी असलेली सुखं द्यावीत असे सुचवितो. तीन मुलांची आई असल्याने, नवऱ्याची सेवा करावी लागत असल्याने तिने स्वत:कडे दुर्लक्ष करून स्वत:ला एक सुसंस्कारी गृहिणी नवऱ्याच्या इच्छेखातरच बनविलेले असते. ते त्याला मनापासून आवडते. परंतु मिसेस घाट्यांच्या सहवासात आल्यावर तिचे निटनेटके राहणे, वैचारिक परिपक्वता पाहून तो

मिसेस घाटे आणि पत्नी यांच्यात तुलना करून पत्नीला हिनवतात. (पृ.८,१०) मिसेस घाट्यांमध्ये हा नायक गुंतलेला असल्याने पत्नीचा तिरस्कार करू लागतो. मिसेस घाटे विवाहीत असून एका अपत्याची आई असतात. तरीही हा नायक त्यांच्याकडे आकृष्ट होतो. मिसेस घाट्यांकडे आकृष्ट झाल्याने तो स्वतःच्या पत्नीला घटस्फोट देण्याची भाषा करतो. त्याची पत्नी त्याला न शोभणारी गावंढळ काकूबाई वाटायला लागते. तिने असेच रहावे हीसुद्धा या नायकाचीच इच्छा असताना तो शेवटी तिला कमी लेखतो. पुरुषी अहंकार, स्वतःच्या विद्वत्तेचा गर्व या गोष्टींमुळे हा पुरुष दोन्ही स्त्रियांकडे उपभोगाची आणि उपयोगाची वस्तू म्हणून पाहतो. स्त्री हे मनोरंजनाचे साधनच असल्याचे या पुरुषाच्या वृत्तीतून डोकावताना दिसते.

**४.२ :** मि. प्रोफेसर पिंपुटकर आणि मिसेस घाटे हे दोघे सहकारी म्हणून काम करत असतात. मिसेस घाटे हुशार, मेहनती, तत्पर, प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेल्या असतात, तर मि. पिंपुटकर यांची पत्नी घरसंसार सांभाळणारी एक सामान्य स्त्री असते. पत्नीला नोकरी किंवा इतर काही आवडीची गोष्ट करण्यासाठी तो प्रोत्साहन देत नाही. पत्नीच्या आवडी–निवडी जपताना दिसत नाही. उलट काकूबाई–गावंढळ म्हणून तिची अवहेलना करतो तर मिसेस घाट्यांकडे आकर्षित होतो. त्या आपल्या सहकारी असल्याच्या भावनेने सुखावतो. आपले विचार, आपल्या कल्पना तो मिसेस घाट्यांबरोबर बोलतो. त्यांचे मत विचारतो परंतु पत्नीला हा दर्जा देताना दिसत नाही. (पृ.२०,२३,३१,४४) परस्त्री मातेसमान समजल्या जाणाऱ्या आपली संस्कृतीचा आधार घेता हा नायक परस्त्रीकडे वाईट नजरेने पाहतो. पत्नी ही घराची शोभा, पतीची अर्धांगिनी, सावली असूनही तिचा मात्र तिरस्कार करतो. या सर्व गोष्टींचा विचार करता हा पुरुष स्त्रियांचा आदर, सन्मान करताना दिसत नाही उलट परस्त्रीसाठी तो लग्नाच्या बायकोला सोडण्याचा विचार करतो. यावरून तो स्त्रीकडे एक भोगवादी दृष्टी ठेवताना दिसतो. पत्नीचा उपभोग घेऊन तिला सोडून देऊन दुसऱ्या स्त्रीचा विचार करताना दिसतो. हा पुरुष हे सर्व राजरोसपणे कुटुंबात बोलूनही दाखवितो त्यामुळे तो पुरुषप्रधान विचारांचा असलेला दिसून येतो.

**४.३ :** मि. वर्मा मिसेस शीला यांना नोकरीसाठी मदत करतात. घरात वादविवाद होऊन मिसेस शीला नोकरीच्या शोधात असताना वर्मा तिला एका कारखान्यात नोकरीसाठी मदत करतात.

मिसेस शीलांनी स्वावलंबी व्हावे म्हणून तिची नोकरीची गरज लक्षात घेऊन वर्मा तिला मदत करतात. वर्मांना मदतीच्या, परोपकाराच्या बदल्यात मिसेस शीला पहिल्या पगारातून त्यांच्यासाठी एक पेन आणि पेन स्टँड भेट म्हणून देतात. मिसेस शीला वर्माजींचे उपकार मानण्यासाठी त्यांची जवळीक साधतात. तेव्हाही वर्मा तिला तिच्या जबाबदारीची, वयाची, नैतिकतेची जाणीव करून देतात. अडचणीत सापडलेल्या मिसेस शीलांना मदत करून देखील वर्मा त्यांचा गैरफायदा उठविताना दिसत नाहीत. यावरून त्यांच्या मनातील स्त्रियांविषयीचे विचार, त्यांच्याविषयीचा आदरयुक्त दृष्टिकोन स्पष्ट होतो. (पृ.५४,५५,५८,५९) स्त्रियांनी स्वावलंबी जीवन जगावे, अर्थार्जन करून स्वत:च्या पायावर उभे रहावे, त्यांनी आपले शील सांभाळावे असा दृष्टिकोन ते स्त्रियांविषयी बाळगताना दिसतात. त्यामुळे त्यांची स्त्रियांविषयी स्वच्छ, नि:स्वार्थी वृत्ती समोर येते.

मिसेस शीलाच्या घरी पार्टी चालू असताना त्यांचा मित्र पागे शीलाला एकेरी नावाने बोलावतो. घटस्फोट घेतलेल्या, लग्न न झालेल्या स्त्रियांशी पागे लगट करतो, त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेतो. एकीकडे तो परस्त्रियांच्या असहायतेचा फायदा घेतो, तर दुसरीकडे पत्नीच्या मरणाची भाषा करतो. मिसेस शीलांच्या मनाविरूद्ध आणि वर्मांनी रागावल्यानंतरही तो मिसेस शीलाच्या शरीराला स्पर्श करतो. (पृ.६३) पागेच्या या वृत्तीकडे कटाक्ष टाकल्यानंतर असे लक्षात येते हा पुरुष स्त्रीभोगवादी वृत्तीचा आहे.

**५. पक्षिणी :**

**कभिन्न :**

या कथेतील नायक ट्रक ड्रायव्हर असतो. हजार रूपये मिळविण्यासाठी तो एका भटाच्या मुलीला बायको म्हणून स्विकारतो. परंतु तिला पत्नी म्हणून किंवा एक स्त्री म्हणून आदर सन्मान देताना दिसत नाही. तिला सतत मारहाण करून तिचा अपमान करतो. घरात पत्नी असताना तो एका परक्या बाईला घेऊन घरी येतो. बायकोला मुल होत नाही म्हणूनही तो तिला मारहाण करतो आणि तिचा अपमान करतो. (पृ.३२,३३,३४,३५,३७) हा नायक स्त्रियांकडे उपभोगाचे एक साधन म्हणून पाहतो. पत्नीकडे तर तो तिरस्काराने आणि रागाने पाहतो. तिने आपली सेवा

करावी, आपल्या कोणत्याही चांगल्या वाईट गोष्टींना सहमती द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. तिच्या भावनांची, प्रेमाची तो कदर करत नाही. पुरुषी अहंकार त्याला स्त्रियांचा सन्मान करण्यापासून, परावृत्त करतो. त्याच्या स्वार्थी वृत्तीमुळे दोन स्त्रियांची एकाचवेळी ससेहोलपट करताना दिसतो.

**व्रणार्त :**

अविनाश आणि त्याचे मित्र नोकरीच्या शोधात मुंबईला येतात. नोकरी मिळत नाही म्हणून ते चर्चा करताना त्यांचा ओघ स्त्रियांच्या नोकरीकडे वळतो आणि त्यांच्या बोलण्याचा सार म्हणजे – सुंदर स्त्री असेल तर लगेच नोकरी मिळते, पण पुरुषांकडे ज्ञान असूनही त्यांना सहजासहजी नोकरी मिळत नाही. शिवाय सैल स्वभावाच्या स्त्रियांना पटकन् नोकरी मिळते आणि त्यांच्या साहेबांचे त्या जास्त मनोरंजन करू शकतात. (पृ.५४,५५) अविनाश आणि त्याच्या मित्रांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन म्हणजे स्त्री पुरुषांची मनोरंजन करण्याची वस्तूच दिसून येते. त्यातल्या त्यात जेवढी सुंदर स्त्री तेवढी ती मनोरंजनाचे सुखद साधन वाटल्याचे दिसून येते.

**सावित्री १ – सावित्री २ :**

मोहन आपली पत्नी मधुवंतीला शेठजी म्हणजे आपल्या बॉसबरोबर त्यांना खुश करण्यासाठी, आपले प्रमोशन मिळविण्यासाठी शरीरसंबंध ठेवण्यास परावृत्त करतो. तिची इच्छा नसतानाही तो तिला चांगले आयुष्य जगण्यासाठी बॉसला खूश करणे कसे गरजेचे आहे हे पटवून देतो. पत्नीचे शील जपणे हे मोहनचे कर्तव्य असताना तो स्वत:च तिला तिचे शील विकण्यास प्रवृत्त करतो. (पृ.९८,९९) एकीकडे मोहन पैसे, प्रतिष्ठा कमाविण्यासाठी पत्नीचा वापर करतो, तर दुसरीकडे शेटजी पैसा आणि पदाचा दुरूपयोग करून मधुवंतीकडे वाईट नजरेने पाहतो. तिचा भोग घेण्याची इच्छा व्यक्त करून त्या बदल्यात तो मोहनला पैसा, पद देऊ करतो. हे दोन्ही नायक मधुवंतीकडे मनोरंजनाचे साधन म्हणून पाहतात. मोहनला तर पत्नी यशाची शिडी चढण्याचे महत्त्वाचे साधन वाटते.

मोहन एकीकडे पत्नीचे शील सांभाळण्यात असमर्थ ठरतो, तर दुसरीकडे मिसेस मेहतांबरोबर कामाच्या निमित्ताने जवळीक साधून दिवस–रात्र तिचा गैरफायदा घेतो. जेव्हा ती

त्याला बाजूला करते तेव्हा तो खूप संतापतो. तिला शिव्या देताना दिसतो. तो या दोन्ही स्त्रियांना आपल्या मर्जीप्रमाणे वागवू इच्छितो. (पृ.१००,१०१) मोहन या दोन्ही स्त्रियांना कटपुतली बाहुलीप्रमाणे नाचवताना दिसतो.

**६. दावं :**

**समाधी :**

भिक्याभट भिक्षुकी करत असताना सिंधूचा मामा अनाथ सिंधूला भिक्याभटाला जबरदस्तीने देऊन टाकतो. भिक्याभट विवाहीत असूनही सिंधूच्या तारूण्याने वासनाधीन होतो. सिंधूने गयावया करूनही तो तिच्याकडे वासनांध नजरेने पाहतो. हा सर्व प्रकार पाहून भिक्याभटाची बायको भिक्याभटाला विरोध करते. भिक्याभटाचा नाईलाज झाल्याने तो तिचा विवाह पुर्शाबरोबर लावून देतो कारण तो त्यांच्याच घरात त्यांच्याच छत्रात राहत असतो. भिक्याभट सिंधूचे पुर्शाबरोबर लग्न लावून देतो, मात्र लग्नाच्या पहिल्याच रात्री तो तिच्यावर अत्यचार करण्याचा प्रयत्न करतो. पत्नी विरोध करू लागताच तो तिचा खून करतो आणि पुर्शाला हाकलून देतो. इतक्या सर्व घटना घडूनही तो सिंधूला आपली रखेल म्हणून ठेवतो. (पृ.१४०,१४७,१४८) भिक्याभट ब्राह्मण असतो. भिक्षुकी करत असूनही तो संस्कार, पाप–पुण्य, चांगले–वाईट कशाचीही भिडभाड न बाळगता सिंधूसारख्या परस्त्रीचे आयुष्य उद्ध्वस्त करतो. परस्त्रीसाठी लग्नाच्या बायकोचा शेवट करतो. स्त्रीला देवी मानणाऱ्या आपल्या संस्कृतीत आदरनीय असलेले भिक्षुक ब्राह्मण कवडीमोल करून ठेवतात ही अतिशय निंदनीय बाब ह. मो. मराठे या पात्राच्या माध्यमातून निदर्शनास आणतात. या कथासंग्रहातील पुरुषांच्या भोगलोलुप, स्वार्थी, वासनांध वृत्तीमुळे अनेक स्त्रियांना दु:ख, हालअपेष्टा, कोंडमारा सहन करावा लागत असल्याचे निर्दशनास आणताना लक्ष्मण रत्नपारखे म्हणतात,

"महिलांच्या व्यथांचे, दु:खाचे, कोंडमाऱ्याचे चित्रण करणाऱ्या आठ कथा व दोन दीर्घकथा या संग्रहात आहेत......... या कथासंग्रहातील 'भूमिका', 'कापुरुष', 'वाल्या कोळी व बायको', 'दावं', 'कृमी', 'भीमाशंकर चाळीतील जोशीकाकू' या कथा तशा मध्यमवर्गीय महिलांच्या व्यथा व्यक्त करणाऱ्या कथा आहेत. आपल्या सामाजिक चौकटीने या महिलांची निर्णयक्षमतासुद्धा

त्यांच्या हातात ठेवली नाही. हे या कथांतील अनेक प्रसंगांतून दिसते. 'वाल्या कोळी व बायको' या कथेतील नवऱ्याच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेखाली दडपून, गुदमरून गेलेली बायको आहे. तशा कितीतरी महिला तुमच्या आमच्या आजूबाजूला वावरताना दिसतात.

या सर्व कथांमध्ये 'देऊळ' मधील गोदावरी, 'समाधी' मधील भिक्याभट व पुर्शा या दोघांच्या बायका व 'विहीर' या कथेतील वासूची आई या व्यक्तिरेखा मात्र हलवून सोडणाऱ्या आहेत. या सर्व व्यक्तिरेखा कोणत्याही अर्थाने प्रातिनिधिक नाहीत. परंतु त्या आणि त्यांची दुःखे एवढी प्रचंड आहेत की मन हेलावल्याशिवाय राहणार नाही."[४] रत्नपारखे यांची ही भूमिका लक्षणीय वाटते.

**७. घोडा :**

**सस्ती गंमत :**

जॉन्सन नावाचा पुरुष सर्कसमध्ये काम करत असताना तेथील काही बायकांना घेऊन सर्कसमधून बाहेर पडतो आणि स्वत:ची डान्सिंग पार्टी तयार करतो. तो या स्त्रियांना जत्रेत नाचवितो, त्यांच्याकडून पैसा कमावितो. त्यांना हवे तसे, हवे तेव्हा नाचवून त्या बदल्यात त्यांना थोडे पैसे देतो. ज्या दिवशी डान्सला सुट्टी असते त्या दिवशी जॉन्सन लोकांना घेऊन येतो आणि त्यांना शरीरसंबंध ठेवण्यास प्रवृत्त करतो. त्यातून जन्माला येणाऱ्या अपत्यांचा कोणीही वाली नसतो. जॉन्सलाही हवे तेव्हा तो त्यांच्याकडून शरीरसुख उपभोगतो. या सर्व स्त्रियांचा तो मालक असतो आणि त्यांच्या संपूर्ण शरीराचा दुरूपयोग करून घेऊन पैस कमावतो. (पृ.१६८,१६९) जॉन्सन नावाचा पुरुष स्वत: काही कामधंदा न करता या सर्व स्त्रियांना समाजात उघडे नागडे करून पैसा कमावतो, त्यांचा हवा तसा वापर करतो. त्यांचे शील हा त्याचा पैसा कमाविण्याचा राजमार्ग. या कथेतील हा पुरुष म्हणजे समाजातील पुरुष जातीला कलंकच वाटतो. स्त्रियांना पैसे कमाविण्याचे, उपभोगाचे साधन म्हणून पाहणाऱ्या या पुरुषांच्या मनात स्त्रियांविषयी चांगला आचारविचारही दिसून येत नाही.

ह. मो. मराठे यांच्या कथासंग्रहामधील कथांमधून अभिव्यक्त होणारे पुरुष हे एका विशिष्ट दृष्टिकोनातून स्त्रियांकडे पाहताना दिसून येतात. स्त्री आणि पुरुष या एकाच नाण्याच्या दोन बाजू

आहेत. किंबहुना स्त्रियांशिवाय पुरुषांच्या अस्तित्वाची कल्पनाही करू शकत नाही. स्त्री आणि पुरुष हे दोन्हीही समान आहेत. हे वास्तव असतानाही प्रत्येक ठिकाणी पुरुष स्त्रीला गौण लेखताना, उपभोग्य वस्तू मानताना दिसून येतो. याचे प्रत्यंतर मराठे यांच्या कथासंग्रहातील पुरुषांच्या स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्ययाला येते.

आपल्या व्यवसायातील यशस्वीता वाढविण्यासाठी पार्टीचे आयोजन करून कॅब्रे डान्सचे आयोजन करून साळवी, भिडे, काणे यांसारखे पुरुष स्त्री हे पुरुषांचे मन रिझविण्याचे साधन म्हणून वापरताना दिसतात. एक नोकरी करणारे सुशिक्षित कुटुंब आपले जीवन सुखाने घालवित असतानाच आपल्या पत्नीच्या सुखाचा विचार न करता परस्त्रीशी लगट करून पत्नीला छळतानाही पुरुष दिसून येतात. प्रसंगी स्त्रीच्या शीलाचाही विचार न करता तिचा वापर स्वत:चा व्यवसाय वाढविण्यासाठी करताना दिसून येतात. मुलगा किंवा मुलगी जन्माला येणे हे केवळ स्त्रीच्य हातात नाही याचे भान न बाळगता मुली जन्माला आल्या म्हणून तिचा छळ करणारी पुरुषी मानसिकताही प्रत्ययाला येते. मराठे यांच्या कथांमधील बरीच पुरुषपात्रे स्त्रियांच्या अभिलाषेपोटी स्वत:च्या कुटुंबाकडे आणि पर्यायाने पत्नीकडे गौणत्वाने, कधी तुच्छतेने पाहताना दिसून येतात. प्रसंगी इतर स्त्रियांसाठी स्वत:चे कुटुंब उद्ध्वस्त करताना दिसून येतात.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीतील नायक हॉटेलात बसून चहा पितो, सिगारेट ओढतो. काड्याच्या पेटीतील काडी पेटविल्यावर जी ज्योत तयार होते त्या ज्योतीकडे तो एका स्त्रीच्या रूपात पाहतो. रसरशीत तरूण नग्न स्त्रीची उपमा त्या ज्योतीला देऊन तो रोमांचित झाल्याचा उल्लेखही पुढे येतो. (पृ.५) त्याच्या विचारांवरून स्त्रीकडे पाहण्याचा त्याचा भोगवादी दृष्टिकोन दिसून येतो.

नायक पानाच्या गाडीवर पान घेण्यासाठी जातो तेव्हा दोघांमध्ये जो संवाद होतो त्यातून दोघांचाही स्त्रियांकडे पाहण्याचा भोगवादी दृष्टिकोनच समोर येतो. त्यांच्या दोघांच्या संभाषणातून संगतीच्या बाईमुळे रात्री रंगतातच या वाक्यातून बाई ही फक्त मनोरंजनाची आणि उपभोगाची वस्तूच असल्याची भावना दिसून येते. नायक स्वत:च्या पत्नीविषयीही असा विचार करून तिचा

फक्त बाई असाच उल्लेख करतो यावरून तिच्यावरील प्रेम, आदर दिसून येत नाही. उलट अधिकारच दिसून येतो. (पृ.१७) बाईचा उपभोग घेता येतो म्हणून पुरुष लग्न करतो नाहीतर ही खिटखिट कोणी लावून घेतली नसती या वाक्यातून नायकाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिकच स्पष्ट होताना दिसतो.

ढोणकर आणि शिक्षण संस्थेचा सेक्रेटरी ही दोन्ही पात्रे स्त्रियांकडे फक्त भोगाची वस्तू म्हणूनच पाहतात. जेव्हा पाहिजे तेव्हा हे दोन्ही पुरुष स्त्रियांचा हवा तसा वापर करताना दिसतात. लैंगिक सुखापलिकडे स्त्रियांकडे पाहिलेच जात नसल्याचे चित्र या दोघांच्या बाबतीत स्पष्ट होते. (पृ.५७,७५,७६)

"यू जस्ट थिंक ओव्हर दॅट मॅटर ऑर डोण्ट थिंक. तुम्हांला पैसे हवेत ते मी देतो. यू जस्ट सेंड युवर वाईफ टु मी. ......अँड बी हॅपी. तुला सांगू. या मिस देसाई. तिचे फादर एकदा नोकरी मागायला असेच आले. म्हणाले, सेंड द गर्ल टु मी अँड बी हॅपी. हर फादर डाइड. कशानं? आपली मुलगी काय काम करते ते त्या म्हाताऱ्याला कळलं. दॅट ब्लडी ओल्ड मॅन डाइड ऑफ दॅट शॉक नॉनसेन्स नाऊ लुक टु मिस देसाई. ही इज क्वाईट हॅपी." (पृ.७६) या संवादातून स्त्रीकडे एक वस्तू म्हणून पाहण्याचा सेक्रेटरीचा दृष्टिकोन स्पष्ट होतो, तर ढोणकर आपल्या भोगवादी वृत्तीसाठी बायकोचा गर्भपात घडवून आणतो. त्यामागे त्याच्याकडे वात्सल्य वेगैरे काही नाही. जे त्याला हवे ते मिळवायचे अशी वृत्ती आहे. या पात्रामुळेच नायकाला वसूला पोपया खायला देऊन मोकळी करण्याची प्रेरणा मिळते असे दिसते.

**२. काळेशार पाणी :**

विष्णू गावकर मालवणच्या बाजारात भजी तळत बसलेल्या भिकीच्या उघड्या मांड्यांकडे तर कधी रस्त्यावरून जाणाऱ्या बायांकडे बघत बसतो. त्याच्या या कृत्यामुळे तो स्त्रीलंपट असल्याचे चित्र समोर येते आणि समोर येणाऱ्या प्रत्येक स्त्रीकडे तो उपभोगाच्या नजरेनेच पाहताना दिसतो तर विष्णू भिकीला वेळी अवेळी बाजारातून उपभोगासाठी घरी घेऊन जातानाचे चित्र त्याचा भिकीकडे पाहण्याचा उपभोगवादी चेहराच समोर घेऊन येतो. (पृ.३,५) स्वत:ची लग्नाची बायको असतानाही विष्णू असहाय भिकीला रखेल म्हणून ठेवतो. यावरूनच तो एकाच

वेळी दोन स्त्रिया उपभोगताना दिसतो. समाजमान्य नसूनही स्वत:च्या भोगलोलुपतेसाठी तो भिकीचा वापर करताना दिसतो.

पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन यांवर भाष्य करताना डॉ. पुष्पा राजापुरे म्हणतात,

‘‘धर्म, तत्त्वज्ञान, कायदा, शिक्षण, विज्ञान या सर्व क्षेत्रांमध्ये पुरुषप्रधान आणि पुरुषकेंद्री विचारांतून स्त्रीकडे नगण्य दृष्टिकोनातूनच पाहिले गेले व पाहिले जात आहे. तसेच पुरुषप्रधान समाजाने स्त्रीच्या ठायी त्याग, समर्पण, लज्ज्ञा, नाजुकपणा, अदबशीर वागणे आदी विशेष गुणांची अपेक्षा केली. इतकेच नाही तर कालांतराने हे गुण स्त्रीमध्ये जन्मत:च असतात, असे मानायला सुरूवात केली आणि स्त्रीमनावर तसे बिंबविण्याचा प्रयत्नही केला. त्याचबरोबर आरंभीच्या काळात घरातील कामे व घराबाहेरील कामे अशी कामांची विभागणी झाली. त्या विभागणीत स्त्रीला घरातील कामांमध्ये जखडून टाकले. त्यामुळे ही विभागणी स्त्रीला घराच्या चार भिंतीत कोंडणारी तर होतीच, पण पुरुषाची कामे श्रेष्ठ व स्त्रियांची कनिष्ठ असा भेदही हळूहळू करण्यात आला. त्यामुळे मुलांचे संगोपन, कुटुंबातील माणसांची सेवाशुश्रुषा, स्वयंपाकपाणी, घरातील स्वच्छता आदी कामे स्त्रीची मानली गेली. समाजाच्या जडणघडणीचा विचार करता कोणतेही काम श्रेष्ठ–कनिष्ठ मानण्याची गरज नव्हती. पण तसे मानले आणि वर्षानुवर्षांच्या सवयीने ते तसेच स्वीकारले गेले. एकूण चहुबाजूंनी पुरुषी वर्चस्व इतके लादले गेले की, त्यातून तिची सुटका करणे कोणत्याही चळवळीला शक्य झाले नाही. वास्तविक पाहता स्त्रीने कौटुंबिक कामांची सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलल्यामुळेच घराबाहेर पडणारा पुरुष आपल्या कामाच्या जागी अधिक वेळ व अधिक श्रम देऊ शकत होता. परंतु समाजाने इकडे एकतर हेतुत: दुर्लक्ष केले अथवा स्त्रीचे घराबाहेरील श्रमरचनेतील हे अप्रत्यक्ष साहाय्य त्याच्या लक्षातच आले नाही (!) तसेच ते स्त्रीलाही पूर्णपणे जाणवले नाही. कुटुंब व कुटुंबाबाहेरील स्त्रीकडे कोणत्या दृष्टीने व अपेक्षेने पाहायचे हे पुरुषांनीच ठरवले. पुरुषप्रधान संस्कृतीने राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा सर्व मार्गांनी आपले वर्चस्व आणि अधिराज्य प्रस्थापित केले. सामाजिक आणि सांस्कृतिक, कुटुंब, वर्ग, धर्म, नीती, कायदा, शिक्षण आदी सर्व क्षेत्रांमध्ये स्वत:च्या हितसंबंधाना पूरक आणि सोयीस्कर ठरणाऱ्या

मूल्यांचाच समावेश करून घेतला. त्याने सोयीस्कर ठरणाऱ्या त्या मूल्यांची प्रतिष्ठापना प्रत्येक काळातील कथा–मिथकांमधूनही केलेली आढळते. स्त्रीला आदर्शवत कल्पनांमध्ये व प्रतिमांमध्ये साकार करून पुरुषप्रधान संस्कृतीचे श्रेष्ठत्वच सिद्ध करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. इतकेच नाही तर कन्या, पत्नी, सून, आई, आजी, काकी, मामी, मावशी आदी नात्यांमध्ये वावरणाऱ्या स्त्रीचा वर्तनधर्म, तिची कर्तव्ये आणि तिचे गुणविशेष निश्चित करण्यात आले. त्याचबरोबर या नात्यांच्या चौकटीबाहेरील स्त्रियांचाही वर्तनधर्म, आचारधर्म निश्चित झाला. या साऱ्या प्रक्रियेत मुलगी, स्नुषा, पत्नी, माता, आजी आदी विविध नाती ही कुटुंबगत स्त्रीची रूपे ठरली. तर वेश्या, रखेली, रांड ही कुटुंबाबाहेरील स्त्रीची रूपे ठरली. या स्त्रीरूपांना कुटुंबगत स्त्रीला मिळणारा मानसन्मान (!) नाकारण्यात आला. ही रूपे सामाजिकदृष्ट्या अवनत रूपे मानली गेली. त्यामुळे अशा स्त्रियांच्या वाट्याला अपरिमित अन्यायाचा व शोषणाचा भोगवटा आला. स्त्रीला या रूपात जगायला लावणारा पुरुष मात्र अशा स्त्रीकडून सुखाचाच वाटेकरी झाला.''[५]

स्त्रियांकडे पाहण्याच्या पुरुषी दृष्टिकोनावर सर्व अंगांनी डॉ. पुष्पा राजापुरे यांनी प्रकाश टाकला आहे. पुढे त्या विष्णू, सामंतचा मामा या पुरुषपात्राच्या स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांवर भाष्य करताना म्हणतात,

''समाजाला विवाहित स्त्रीचे शोषण किमान कळते तरी, पण विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या स्त्रीचे शोषण कळत नाही. खरे तर विष्णूच्या वर्तनामुळे या दोन्ही स्त्रियांचे शोषण होते. दोघींवरही अन्याय होतो. तरीही विष्णूच्या पत्नीला नवऱ्याच्या वासनेचा भार वेळी अवेळी वहावा लागत नाही, सोसावा लागत नाही. याउलट हा भार नित्यनेमाने पंधरा वर्षे वाहिलेल्या, सोसलेल्या भिकीच्या पदरी निंदाव्यंजक भाषा, तिरस्कार वाट्याला येतो, तर त्याच्या पत्नीला सहानुभूती लाभते यात विरोधाभास आहे, हे समाजाच्या लक्षातच येत नाही. शिवाय प्रस्थापित समाजरचनेच्या आश्रयाने एक पुरुष दोन स्त्रियांवर अन्याय करीत आला ही गोष्टच कुणाच्या ध्यानात येत नाही. या प्रसंगात निवेदक एका पुरुषपात्राला शोषित विवाहित स्त्रीविषयी सहानुभूती, आपलेपणा वाटत आहे आणि विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या स्त्रीविषयी चीड व तिरस्कार वाटत आहे.''[६]

एकाच व्यक्तीच्या आयुष्यातील दोन स्त्रियांकडे त्या व्यक्तीचा आणि समाजाचादेखील पाहण्याचा दृष्टिकोन बदलत असल्याचे भाष्य डॉ. पुष्पा राजापुर यांनी केले आहे.

पुरुषप्रधान समाजरचनेचा स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिक्षेपावर पुढे त्या म्हणतात,

“पुरुषप्रधान समाजरचनेत स्त्रीच्या तुलनेत पुरुष नेहमीच ‘सबळ’ मानला गेला आहे आणि स्त्री नेहमीच दुर्बल मानली गेली आहे. सिमॉन द बोवाने या संदर्भात मांडलेली ‘सत्त्व’ (the essence) आणि ‘परत्व’ (the other) या संकल्पनेची येथे आठवण होते. पुरुष म्हणजे सत्त्व असे मानले गेल्यामुळेच विष्णू भिकीचे सर्वस्तरीय शोषण करू शकला आहे आणि स्त्री म्हणजे ‘परत्व’ असे समाज मानत असल्यामुळेच कोणतीही फलप्राप्ती नसतानाही भिकीला देहमन पातळीवरील जाच सहन करावा लागलेला आहे. भिकी परात्म आहे हे तर खरेच, पण तिच्या सभोवतालचा समाजही परात्म पावलेला असल्यामुळे तिचे हे शोषण तिला कळत नाही ......
........ एका पुरुषाने ठेवलेल्या बाईच्या वयात न आलेल्या मुलीकडे पाहण्याची पुरुषाची दृष्टी भोगवादी कशी असते या विदारकतेकडे निवेदकाचे पूर्ण दुर्लक्ष झालेले दिसते. तसेच निवेदकाच्या निर्मितीमागील गर्भित लेखकही पुरुषप्रधान व्यवस्थेतील ‘पुरुषीदृष्टी’ चा अवलंब करीत आहे, असे म्हणावेसे वाटते.”[७]

पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला मग ती कोणत्याही वयाची असली तरी भोगाची वस्तूच समजल्याचे चित्र समोर येते.

स्त्रियांना उपभोगाची वस्तू मानून तिचा पूर्ण उपभोग घेऊनही तिची इतर कोणतीही काळजी न करणाऱ्या पुरुषव्यवस्थेवर भाष्य करताना अंजली कुलकर्णी म्हणतात,

“एका अर्थाने भिकी हा इथल्या पुरुषी शोषणव्यवस्थेचा बळी आहे. शिक्षणाचा अभाव असलेली ही एक स्त्री आहे. तिला संततीनियमनाविषयी काही माहिती नाही, तिच्याजवळ उपजीविकेचे काही साधन नाही. तिचा नवरा मरून गेला आहे. अशी पूर्णपणे उघड्यावर पडलेली स्त्री जगण्यासाठी, जिवंत राहण्यासाठी हरतऱ्हेने पुरुषीव्यवस्थेकडून, स्वत:चे शोषण करून घेते. याचा प्रत्यय या भिकीच्या व्यक्तिरेखेतून येतो. शोषण म्हणजे काय हे कळूही शकत नसलेल्या स्त्रीच्या शोषणाचे हे चित्र आहे. विष्ण्या, बाळ्या भट, साटम ही सगळी या शोषणव्यवस्थेची प्रतीके

आहेत. परिणामांची भिती नसलेले हे पुरुष भिकीशी संभोग, वासनांच्या लीला करून निघून जातात. तिला एका पाठोपाठ एक होणाऱ्या मुलांची फिकीर, काळजी, त्यांच्या भुकेची तजवीज, कशाशीच त्यांना देणेघेणे नाहीय. हे शोषणच आहे. त्याबद्दलची तिची चीड, तिचा त्रागा पोटतिडिकेचा आहे. पण त्याचीही दखल हे पुरुष घेताना दिसत नाहीत.''[८]

असहाय स्त्री ही पुरुषांच्या आधारासाठी त्यांना जवळ करत असल्याने या परिस्थितीचा फायदा घेऊन समाजातील असे भोगवादी पुरुष अशा स्त्रियांचा वापर करून वस्तूप्रमाणे फेकून देताना दिसतात. तिच्या भावनांशी, तिच्या दैनंदिन गरजांशी त्यांचे काही सोयरसुतक नसते.

पुरुष मग ते सभ्य सुसंस्कृत असोत की नसोत ते उपभोगासाठी पशुत्वाच्या पातळीवर येऊन पोहोचल्यावर त्यांच्यातील मानव नाहीसा होतो. यांवर भाष्य करताना डॉ. किशोर सानप म्हणतात,

''समाजातले सभ्य आणि सुसंस्कृत लोक भिकीचा केवळ भोग्यवस्तू म्हणूनच वापर करतात. त्यांच्या जीवनाचा तो एक पशुत्व जागवणारा आणि गाजवणारा हिस्सा असतो. आपल्या सभ्य आणि सुसंस्कृत जीवनाशी भिकीचा दुरान्वयानेही संबंध येऊ न देता; विष्णू, बाळ्याभट, मारूती साटम असे समाजात मान्यता पावलेले लोक, आपली कामवासना भागवण्यापुरतेच भिकीकडे येतात. तेवढ्यापुरताच त्यांचा आणि भिकीचा सामाजिक संबंध, समाजाच्या कोणत्याच नैतिक आणि धार्मिक व्यवहारात त्यांना भिकीचा सहभाग मानवणारा नसतो. समाज आणि कुटुंबाशी भिकीची जवळीकही त्यांना नको असते. कुटुंबबाह्य संबंधासाठीच केवळ भिकीची त्यांना गरज असते.''[९]

जातीधर्माचा, प्रतिष्ठेचा, समाजातील स्थानाचा कोणताही विचार न करता पुरुष आपल्या स्वार्थासाठी कोणत्याही स्त्रीचा वापर करून घेऊन तिला तिचे जीवन जगण्यासाठी परत एकटीलाच सोडून देण्याचे विदारक सत्य डॉ. किशोन सानप यांनी यथोचित मांडले आहे.

**३. इतिवृत्त** :

श्रीरंग नाडकर्णी संपादकपद भूषवत असतानाच घरातील पत्नीची जबाबदारी ते टाळताना दिसत नाहीत. पत्नीला आजारपणामुळे काम होत नाही म्हणून ते पत्नीला जास्त काम करू

नकोस, आराम कर, कामासाठी बाई ठेव अशा सूचना देताना दिसतात. पत्नीला सोबत मिळावी म्हणून चोवीस तास थांबणारी बाई बघण्याचाही विचार करतात. (पृ.३७,३८,८४) बायकोवरील प्रेमापोटी ते असा विचार करताना दिसतात. पत्नी आजारी असल्यामुळे तिला कोणाच्या तरी मदतीची गरज आहे हे ओळखून आणि पत्नीकडे सहानुभूतीपूर्ण नजरेने बघण्याच्या दृष्टिकोनातूनच ते तिच्या आनंदासाठी असा निर्णय घेताना दिसतात. पुरुष कामात कितीही व्यग्र असला तरी पत्नी ही आपली अर्धांगिनी आणि घरातील एक सदस्य असल्याने तिच्या सुखदुःखाकडे जाणिवपूर्वक लक्ष पुरवणे हे पुरुषांचे कर्तव्य आहे असे मानून श्रीरंग नाडकर्णी आपले कर्तव्य बजावताना दिसतात.

**४. कुरूक्षेत्र :**

शांतीवन महाविद्यालयात शिकविणारे प्रा. उल्हास भावे संघटना स्थापन करतात. संघटनेच्या माध्यमातून ते कॉलेजच्या रस्त्यावर पोरींची टिंगल करीत बसणाऱ्या मवाल्यांचे अड्डे बंद करतात. होस्टेलच्या परिसरात चालणारा वेश्याव्यवसाय बंद करतात. गावातील एका धनाढ्य व्यापाऱ्याने हुंड्यासाठी सुनेला जाळून मारल्याच्या निषेधार्थ एक दिवस हुंडाविरोधी जनजागरण दिन पाळून हुंडा न घेण्याच्या शपथा देतात. या सर्व गोष्टी स्त्रियांच्या – मुलींच्या सन्मानासाठी केलेल्या दिसून येतात. (पृ.२०) उल्हास भावे स्त्रिया आणि मुलींकडे आदराने पाहतात. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय–अत्याचाराच्या घटनांनी ते हेलावून जातात. त्यांना सन्मानाची, आदराची, माणुसकीची वागणूक मिळावी म्हणून ते सतत प्रयत्नशील दिसतात. त्यांच्या या कार्यामुळे त्यांचा स्त्रियांविषयीचा आदराचा, स्नेहाचा दृष्टिकोन दिसून येतो.

तुकाराम फराटे आपल्याच संस्थेतील प्राध्यापिका शैला चितळे यांना कामानिमित्त ऑफिसमध्ये बोलावून त्यांच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतात. (पृ.७२) त्यांच्या कृतीमागे एकतर ते आपण कामावर ठेवलेल्या स्त्रीवर अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करतात आणि दुसरे म्हणजे आपण पद, पैसा, प्रतिष्ठा या सर्व अंगांनी सक्षम असल्याने आपल्या अधिकाराखाली काम करणाऱ्या स्त्रिया या आपल्याच म्हणण्यानुसार वागतील अशा अपेक्षेने आणि स्वार्थी, भोगी

वृत्तीने ते धुंद झाल्यानेच हे कृत्य करताना दिसतात. आपल्याच संस्थेत काम करणाऱ्या एका स्त्रीविषयी अशी घटना घडते याचे कारण ते स्त्रियांना एक भोगाची वस्तूच समजताना दिसतात.

वसंतराव दामले सुमाशी लग्न झाल्यावर मिलनाच्या दिवशी पत्नी सुमाच्या भावना समजून न घेताच, तिच्यावर जबरदस्तीने आपला हक्क गाजविताना दिसतात. (पृ.८८) लग्न केले म्हणजे पत्नीवर सर्वस्वी आपलाच अधिकार आहे. आपले प्रत्येक म्हणणे, कृती तिने स्विकारलेच पाहिजे अशाप्रकारची भूमिका वसंतराव दामले यांची दिसून येते. खरेदी केलेल्या वस्तूप्रमाणे ते पहिल्यांदाच सुमावर असा अधिकार गाजविताना दिसतात. यावरून पत्नी–लग्न म्हणजे खरेदी–विक्रीचा व्यवहारच समजतात असे वाटते.

सुमाचा गाणे म्हणण्याचा छंद म्हणजे कटकट असे समजून ते तिला गाणे बंद करून अभ्यास करून मास्तरीण हो आणि पैसे कमवून आण असा उपदेश ते करताना दिसतात. सुमाला डोळ्यांच्या आजारपणामुळे अभ्यास झेपत नसतो, तरीही वसंतराव दामले तिला तिच्या इच्छेविरूद्ध पैशांसाठी मास्तरीण होण्यास भाग पाडताना दिसतात. (पृ.९०,९१) त्यांच्या या उपदेशांवरून त्यांचे त्यांच्या पत्नीवर प्रेम नसून ते अधिकारच जास्त गाजविताना दिसतात. तिच्या इच्छा–आकांक्षा विचारात न घेताच ती म्हणजे पैसे मिळविण्याचे, काम करण्याचे साधनच ते मानताना दिसतात.

ते सुमाला मद्यपान करत मारहाण करताना दिसतात. ती आंधळी झाली तर आपल्याला मजा येईल; आपण दुसरी बायको करू असा इशारा ते देतात. तिला शिव्या देताना दिसतात. (पृ.११०,१११) बायकोला आंधळी होण्याइतपत मारहाण करणे म्हणजे बायकोला जनावराची वागवणूक देण्यासारखेच आहे. पत्नीविषयी कणभरही प्रेम, आदर वसंतराव दामलेंच्या ठायी दिसून येत नाही.

सुमाचे स्त्रीधन हडप करणे, तिला मारहाण, शिवीगाळ, उपासमार, उपहास, टिंगल करणे यातील सर्व कृती ते पशुवत करताना दिसतात. लग्नाची बायको असूनही तिची नवरा म्हणून कोणतीही जबाबदारी ते स्विकारत नाहीत. शिवाय तिच्याकडून घरातील सर्व कामे करवून घेतात.

आपल्याला पाहिजे तेव्हा तिचा भोग घेतात आणि वाटेल तेव्हा आणि तसा तिचा अपमान करतात. (पृ.१५३,१५८)

स्त्री आणि पुरुष ही रथाची दोन चाके. दोन्ही सरळ चालली तर प्रवास सुखाचा होतो. मात्र पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषी अहंकारामुळे स्त्रियांचा कसा छळ होतो हे दिसून येते. साहजिकच संसाररूपी रथ नीटपणे चालत नाही व संसाराचा गाडा एक उपचार एक उपचार बनतो हे वास्तव पुढे येण्यास मदत होते.

**५. देवाची घंटा :**

मारूतीचा पुजारी असलेला गोप्याभट येसू नावाच्या तेलीण स्त्रीला आपली रखेल म्हणून ठेवतो. देवकाच्या मिळणाऱ्या उत्पन्नावरच तो येसूचा आणि तिच्या दोन मुलांचा सांभाळ करतो. देवळात काही पैसे सामान मिळाले तरच तो त्यांची सोय करू शकतो. दुसरा कोणताही आर्थिक स्त्रोत त्याच्याकडे नाही. लग्नाच्या पत्नीप्रमाणे तो तिचा सांभाळ करताना, संसार करताना, तिची व मुलांची खाण्यापिण्याची सोय करतानाही दिसत नाही. यावरून त्याची भोगी, आळशी वृत्ती तर समोर येतेच पण उपभोगासाठी त्याला येसू पाहिजे असते पण तिची आणि तिच्या कुटुंबाची जबाबदारी उचलण्यासाठी आणखी कष्ट करण्याची तयारी दिसत नाही. जास्त कशाचीही अपेक्षा न करता येसू गोप्याभटाची सर्व इच्छा पूर्ण करते. त्यामुळे तो तिच्याकडे सुख, समाधान, आनंद मिळण्याचे, विनातक्रार सेवा करण्याचे यंत्र म्हणूनच पाहताना दिसतो. (पृ.५६) लग्नाच्या बायकोला तिची जबाबदारी नको म्हणून रस्त्यात सोडून तो येसूबरोबर संबंध ठेवतो. मनमर्जीप्रमाणे तो एका स्त्रीला सोडून दुसरीला जवळ करतो. स्त्री ही एक वस्तू असल्याप्रमाणे ज्या वस्तूचा वापर करणे विनासायास आणि सोपे तिला पहिले प्राधान्य या न्यायाप्रमाणे हा गोप्याभट स्त्रियांकडे पाहताना दिसतो. (पृ.७९)

येसू गोप्याभटाची रखेल आहे आणि तो तिला सोडून गेला आहे हे माहीत असूनही वृद्ध असलेला आणि व्यवसायाने भट असलेला वासूभट येसूवर नजर ठेवून असतो. येसूला न्याहाळण्याची, तिच्याशी लगट करण्याची प्रत्येक संधी तो मिळविताना दिसतो. असहाय येसू कोणत्याही कमी दर्जाच्या मोबदल्यात आपल्याला वश होईल हे माहीत असल्यामुळे तो तिच्या

काही गरजा पुरवून तिचा उपभोग घेतो. (पृ.९८,९९,१००,१०५) येसूबरोबर तो वस्तू देवाणघेवाण केल्यासारखा व्यवहार करताना दिसतो.

या कादंबरीतील गोगटे नावाचे पुरुषपात्र एकाच वेळी दोन स्त्रियांचा उपभोग घेताना दिसते. दोनही स्त्रिया असहाय आहेत आणि त्यांच्याकडे मदतीची याचना करत आहेत. याचाच गैरफायदा ते घेताना दिसतात. दोघींनाही मदतीची आश्वासने देऊन त्यांना कोणतीही मदत न करता त्यांचा उपभोग मात्र घेताना दिसतात. तांबेबाई वकिलाच्या या प्रकाराला वैतागून आत्महत्या करतात. (पृ.१११,११३,११४,११५) पण बाईच्या आत्महत्येचा, येसूच्या उपासमारीचा कोणताही परिणाम गोगटे वकिलांवर होत नाही. कायद्याचे रक्षक असलेले गोगटे वकील स्त्रियांसाठी कोणतीही कायद्याची भाषा उपयोगात आणताना दिसत नाहीत. उलट दोघींचाही पुरेपूर फायदा घेऊन त्यांना असहाय्य सोडनू देण्यात त्यांना कोणताही कमीपण वाटत नाही.

येसूचा उपभोग गोप्याभट, वासूभट, गोगटे वकील अशी सर्व प्रतिष्ठित मंडळी तिच्या घरी येऊन तिचा उपभोग घेतात पण तिला आणि तिच्या कुटुंबाला कोणतीही मदत करत नाहीत. कारण त्यांचा संबंध येसूशी फक्त शरीरसंबंधांपुरता मर्यादित असतो. काही क्षणच ती त्यांच्यासाठी शृंगाराचे साधन ठरते नंतर अडचण ठरते. येसूवरती एकाच वेळी तीन पुरुष नजर ठेवतात. तिचे गोप्याभटाबरोबरचे संबंध माहीत असूनही ते दोघेही तिला उपभोगताना दिसतात. या कादंबरीतील स्त्रीला कोणी मालक नाही. ती असहाय, अडाणी, अशिक्षित आहे त्यामुळे कुणीही तिला आपलेसे करून नंतर लगेच सोडून देण्याचीही तयारी दाखवितात. पुरुषप्रधान मानसिकतेचा बळी ठरणाऱ्या स्त्रियांचे प्रातिनिधिक चित्र म्हणूनच येसूची स्थिती लक्षात राहते.

**६. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

या कादंबरीतील नायक रमेश पंडित स्थिरस्थावर आहे. फक्त बाबा होऊ शकत नाही. एवढीच सल त्याला असते, परंतु आपल्या शरीरदोषाची शिक्षा आपल्या पत्नीला नलूला मिळू नये म्हणून तो प्रयत्न करताना दिसतो. आपली पत्नी सुखी, समाधानी व्हावी, तिने आनंदी रहावे, एक व्यक्ती म्हणूनही तिला सर्व अधिकार मिळावेत, एक आनंदी पत्नी, आई असावी असा दृष्टिकोन रमेश पंडित नलूविषयी ठेवताना दिसतो. नलूला मातृत्त्वाचे सुख मिळावे म्हणून तो स्वत:च्या

मनाविरूद्ध आपल्याच मित्राच्या ताब्यात तो नलूला देतो. (पृ.७९,८०,११०) स्त्रीविषयी पत्नीविषयी असलेली आदराची प्रेमाची भावनाच त्याला एवढा मोठा त्याग करण्यास भाग पाडताना दिसते. नलूला तिचे मातृत्व मिळावे, तिला समाजात सन्मान मिळावा. अपत्यहीन, वांझोटी म्हणून तिला कोणी चिडवू नये, तिच्या शरीरात कोणताही दोष नसल्यामुळे फक्त आपल्या कमकुवत विचारांनी आणि शरीर–दोषांनी ती कायमस्वरूपी दु:खी होऊ नये म्हणून स्वत: त्यागाची मूर्ती बनतो आणि नलूला एका स्त्रीच्या जीवनातील सर्वोच्च आनंदाची प्राप्ती करून देतो. एवढा मोठा त्याग फक्त पत्नीवरील प्रेमापोटी आणि तिच्या आई होण्याच्या सामर्थ्यांवरील श्रद्धेपोटीच तो करताना दिसतो.

**७. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

एव्हरफ्रेश कंपनीच्या मॅनेजरपदावर केतकी सानेचे प्रमोशन होते तेव्हा अविनाश साने तिचे एक पत्नी म्हणून कौतुक करताना दिसतात. तिला प्रोत्साहन देऊन तिचे मनापासून अभिनंदन करतात. शरीराने आणि मनाने प्रतिसाद देऊन तिचे कौतुक करतात. (पृ.८,९) त्याच्या या कृतीमागे त्याचा पत्नीविषयी आदर, सन्मान दिसून येतो. दोघेही एकाच प्रकारच्या पदावर काम करत असतात त्यामुळे तिला पडणाऱ्या कष्टांची त्याला सतत जाणीव दिसून येते.

केतकी साने आपल्या प्रयत्नांनी आपल्या कंपनीचा माल उत्पादन आणि विक्री करण्यात नंबर वन होते आणि अविनाश साने मागे पडतो. दोन प्रतिस्पर्धी म्हणून नवरा–बायको समोरासमोर असतात तेव्हा मात्र अविनाश सानेला बायकोचे यश आणि स्वत:चे अपयश सहन होत नाही. अपयश पचविण्यासाठी तो व्यसनांचा आधार घेतो आणि पत्नीलाही राजीनामा देण्यास सांगतो. पत्नीकडून म्हणजेच एका स्त्रीकडून झालेला पराभव त्याला सहन होत नाही. (पृ.१३२,१३३,१३५)

स्त्रियांनी पुरुषांच्या वरचढ होऊ नये म्हणजेच नाकापेक्षा मोती जड नको अशी अपेक्षा अविनाश सानेला केतकी सोनकडून दिसून येते. अविनाश सानेला केतकी साने बरोबरीने यश मिळविते हे खपत होते पण तिने त्याच्यापुढे गेल्याने त्याचा पुरुषी अहंकार दुखावल्याने तो तिला पुन्हा खाली खेचण्याचा प्रयत्न करतो. तडजोड करणे, कुटुंब सांभाळणे, नवऱ्याची मर्जी सांभाळणे

ही स्त्रियांची आद्यकर्तव्येच असल्याचे अविनाश सानेच्या वक्तव्यावरून दिसून येते. पुरुषी अहंकाराचा बळी म्हणूनच येथे स्त्री येते. सानेच्या रूपाने पुरुषाला स्त्रीचे मोठेपण, कर्तृत्व खपत नाही हेच पुढे येते.

**८. मार्केट :**

मि. एस. के. केळकर यांच्या ऑफिसमध्ये लेडिज स्टेनोटायपिस्ट काम करते. तिला समोर पाहिल्यावर त्यांना प्रसन्न, उत्तेजक वाटते. ती समोर काम करत असताना तिचे सौंदर्य न्याहाळणे त्यांना सोयीस्कर होते. (पृ.१४) त्यांच्या या लेडिज स्टेनोबाबतच्या विचारांवरून असे जाणवते की, पुरुष स्त्रियांना एक उत्तेजीत करणारी, प्रसन्नता देणारी वस्तूच समजतात. समोरील स्टेनोवर आपला पूर्णपणे हक्क असून तिच्याकडे पाहणे, बोलणे, तिला न्याहाळण्याचा आस्वाद घेणे यासाठीच आपण तिला कामावर ठेवलेली आहे असा समज दिसून येतो.

केळकरांना आपल्या पत्नीविषयी अभिमान दिसून येतो. राष्ट्रीयीकृत बँकेत पत्नी कर्ज प्रकरणाशी संलग्न काम करत असल्याचा त्यांना आनंद आणि अभिमान वाटतो. तिच्या या कामाच्या स्वरूपाचा केळकर फायदा उचलतात. पत्नीला देहप्रदर्शन करून, बॉसची मर्जी सांभाळून कर्जप्रकरण मंजूर करण्याचा सल्ला देतात. पत्नीला पार्ट्यांमध्ये सामील करून ड्रिंक्स करायला लावून आपले व्यवहार यशस्वी करताना दिसतात. (पृ.५०,१०४,१०६) ते पत्नीप्रमाणेच आपली मुलगी तनुजा केळकरलाही पैसा, पद, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी बॉसची मर्जी सांभाळण्याची सूचना करतात. दोन्ही जवळच्या स्त्रियांनी आपल्याला पैसा मिळवून द्यावा, आपली प्रतिष्ठा वाढवावी म्हणून सर्वप्रकारे तडजोड करावी अशी अपेक्षा ते ठेवतात. त्यांच्या या विचारांवरून ते स्त्रियांकडे पुरुषांना खूष करण्याचे साधन आणि व्यवहार यशस्वी करण्याची गुरूकिल्ली म्हणूनच पाहताना दिसतात.

स्त्रियांची अब्रू, शील, पावित्र्य राखण्याचे काम कुटुंबप्रमुखाचे असते पण तोच त्यांना या सर्व गोष्टी करण्यास भाग पाडतात. परिणामी पुढे या दोघींकडे त्यांच्या बॉसचा पाहण्याचा दृष्टिकोनही बदलल्याचे चित्र समोर येते.

अश्विनी केळकरचे बॉस मुळगांवकर आणि तनुजा केळकरचे बॉस दिवाणसाहेब हे दोन्ही या दोघींकडे मनोरंजनाचे साधन म्हणून पाहताना दिसतात. काम करताना नेत्रसुख देण्याचे आणि उत्तेजीत करण्याचे एक यंत्र किंवा वस्तू अशा आविर्भावानेच ते या दोन्ही स्त्रियांकडे पाहतात. (पृ.१०६,११४,१३४,१९९)

मि. दिवाणसाहेब तनुजा केळकरला फसवून कामानिमित्ताने दिल्लीला घेऊन जातात. तिथे तिच्यावर बलात्कार करून तिच्यावर खोटा आरोप ठेवून तिला कामावरून कमी करतात आणि तिच्या अब्रूची किंवा आयुष्याची किंमत पैशात ठरवून स्वत: काही चूक केल्याची जरासी छटाही त्यांच्या वागण्यात दिसून येत नाही. आपल्या दृष्कृत्याने एकेकाळी आपल्याला आवडणाऱ्या तनुजाला जीवन संपवावे लागते याचा त्यांना अजिबात पश्चात्ताप होत नाही. यावरून वस्तू वापरणे आणि फेकून देणे ही वृत्ती ते स्त्रियांच्या बाबतीत करताना दिसतात. (पृ.१९९,२०२, २१३,२१४)

या कादंबरीतील केळकर, मुळगांवकर, दिवाणसाहेब सर्वच पुरुष स्त्रियांचा वापर करून घेताना दिसतात. व्यवसाय यशस्वी करण्यासाठी स्वत:ला चार्ज करण्यासाठी ते स्त्रियांचा आधार घेताना दिसतात. तर दिवाणांसारखा पुरुष फसवून तनुजासारख्या स्त्रीकडून शरीरसुख ओरबाडून तिचा अंत होण्यास निमित्त होऊनही राजरोस आपली कामे करताना दिसतात. तर तनुजाच्या जागी परत नवीन लेडीजच स्टेनो त्वरीत ठेवताना दिसतात. एक स्त्री गेली तर दुसरी लगेच हजर करून स्वत:चा पुरुषी हक्क बजावताना दिसतात.

**९. सॉफ्टवेअर :**

बीवायपी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या चेअरमनांचा मुलगा अरूण वडिलांनी ठरवून दिलेल्या मुलीशी लग्न करतो. तिच्यापासून त्यांना एक मुलगीही होते पण दोघांच्यात पती–पत्नी म्हणून प्रेम दिसून येत नाही. ते दोघे नवरा–बायको म्हणून सर्व सोपस्कार पार पाडताना दिसतात. परंतु अरूण आपल्या पत्नीकडे आदराने प्रेमाने न पाहता तिरस्काराने पाहतो. तिचा उपभोग घेतो. परंतु तिला प्रेम देताना, पत्नीचा दर्जा देताना दिसत नाही. (पृ.८) इतर स्त्रियांच्या बाबतीतही ते आदर ठेवताना दिसत नाहीत. त्यांनी आपल्या म्हणण्यानुसार वागावे, हवे ते हवे तेव्हा द्यावे

अशाप्रकारचा पुरुषी अहंकारी निर्णय ते स्त्रियांवर जबरदस्तीने लादताना दिसतात. आपल्याला जी स्त्री आवडते ती आपल्याला उपभोगायला मिळालीच पाहिजे असा हटवादी सुरही त्यांच्या अंगी दिसून येतो. (पृ.१०८,१५८,१५९,१६१,१६२,१८०,२००,२३७) स्वतःच्या पत्नीचा तिरस्कार करून ऑफिसमधील मिसेस गांधी, मि. गट्टे यांची पत्नी यांच्याकडे तो वासनांध नजरेने पाहतो. समोर येणारी प्रत्येक सुंदर स्त्री ही आपलाच मालकीहक्क असल्याप्रमाणे आणि वासनेने धुंद झालेल्या पशुप्रमाणे अरूणाचलम यांचे वागणे बोलणे दिसून येते.

मि. देशमुखांना आपल्या पत्नीविषयी स्टेनोविषयी आणि इतर सहकारी स्त्रियांविषयी अपार आदर स्नेह दिसून येतो. त्यांच्या सान्निध्यात येणाऱ्या सर्व स्त्रियांचा आदर करून ते त्यांना सर्वप्रकारची मदत करताना दिसतात. स्त्रियांना पुजनीय, वंदनीय, आदरनीय मानणारा दृष्टिकोन मि. देशमुख यांच्या अंगी दिसून येतो. (पृ.१०,१२,१६३,१६४,१८१,२०३,२३८)

**१०. प्रास्ताविक :**

या कादंबरीतील लेखक–पत्रकार महाशयांना बी–१३/१४ मध्ये राहणाऱ्या जयू पर्वते – टीव्हीस्टार यांना भेटताना विलक्षण आनंद होतो. त्यांना भेटण्याची, त्यांच्याशी बोलण्याची संधी ते अजिबात दवडत नाही. त्यांच्या घरी गेल्यावर त्यांच्या कपड्यांचे, शरीराचे ते अत्यंत बारकाईने निरीक्षण करतात. त्यांच्याशी गप्पा मारल्यावर, त्यांनी आपल्याला पत्रकार–महाशय म्हटल्यावर खूप बरे वाटल्याचा उल्लेखही ते करतात. (पृ.२५,२६) त्यांना न्याहाळण्यात, त्यांच्याशी काही वेळ घालवण्यात त्यांना आनंद मिळतो.

त्यांचे शरीरसौंदर्य पहायला मिळावे म्हणून फोन न करता प्रत्यक्ष भेटणेच हे पत्रकार–महाशय पसंत करतात. (पृ.२९,३०,३१) जयू पर्वतेंना भेटणे, त्यांना न्याहाळणे, आनंद मिळविणे, उत्तेजना मिळविणे हे उद्देश मनात ठेवून जाणिवपूर्वक ते त्यांना भेटतात. यावरून ते जयू पर्वतेंना एक शोभेची वस्तू, आनंद देणारी एखादी वस्तू किंवा गोष्ट समजून तिच्याकडे पाहताना दिसतात.

ह. मो. मराठे यांच्या कथांमधून पुरुषांच्या ज्या विविध वृत्ती–प्रवृत्ती दिसून येतात. त्याचेच प्रत्यंतर कादंबऱ्यांमधील पुरुष पात्रांच्या स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्ययाला येते.

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील पुरुषपात्राचा विचार करता स्त्री आपल्या जीवनाचा मूलाधार असताना आपल्या सुखस्वप्नांसारखीच तिचीही काही सुख-स्वप्ने असू शकतात याचा विचार न करता स्त्री ही आपल्या हातातील कळसुमी बाहुली आहे तिला स्वतंत्र काही अस्तित्वच असू शकत नाही अशी मानसिकता ठेवून तिच्या जीवनाशी खेळताना दिसून येतो. 'काळेशार पाणी' मधील पुरुषपात्रांचा प्रामुख्याने विष्णू गावकरसारख्या पुरुषाचा विचार करता स्वत:चे कुटुंब सुखाने चाललेले असतानाही वासनेच्या आहारी जाऊन भिकीसारख्या असहाय स्त्रीचा अमानुषपणे वापर करताना दिसून येतो. 'कुरूक्षेत्र' मधील वसंतराव दामलेंसारखे पुरुषपात्र स्त्री हे एक उत्पन्नाचे साधन म्हणून पाहताना दिसते. ती नोकरी करून पैसे मिळविण्यास हतबल ठरते त्यावेळी सासऱ्याकडील संपत्ती आपणांस मिळावी असा स्वार्थ ठेवून तिचा छळ मांडताना दिसतो. 'देवाची घंटा' मधील गोप्या भटासारख्या पात्राचा विचार करता स्वत:च्या पत्नीपासून विभक्त राहून येसूसारख्या असहाय स्त्रीचा एक उपभोग्य वस्तू म्हणून वापर करताना दिसून येतो. हे सर्व करीत असताना आपण देवाचे पुजारी आहोत याचे भान तो बाळगताना दिसून येत नाही. 'नो सेंटिमेंटस् प्लीज' मधील रमेश पंडितसारख्या पात्राचा विचार करता अपत्यप्राप्तीच्या आत्यंतिक सुखाच्या अभिलाषेपोटी आपल्यातील असमर्थता मान्य करून त्याची प्राप्ती मित्राच्या माध्यमातून करताना दिसून येतो. अपत्यप्राप्तीचे सुख मिळते मात्र पत्नीच्या विष्णूच्या आहारी जाण्याने स्वत:चे कुटुंब उद्ध्वस्त करून घेताना दिसून येतो. 'नरिमन पॉईंटचा समुद्र' मधील अविनाश सानेच्या रूपाने पत्नी ही उद्योगक्षेत्रात आपल्या बरोबरीची असते तोपर्यंत तो तिला स्विकारताना दिसून येतो. मात्र तिच्यातील अधिक कौशल्याची जाणीव होताच प्रसंगी तिची कौशल्ये चोरून वापरताना दिसतो. त्यापुढे जाऊन तिला आपली नोकरी सोडण्यास प्रवृत्त करताना दिसतो. 'मार्केट' मधील एस. के. केळकर हे अविनाश सानेंसारख्याच प्रवृत्तीने भारलेले दिसून येतात.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील काही पुरुषपात्रे कुटुंबवत्सल असलेली दिसून येतात. 'इतिवृत्त' मधील श्रीरंग नाडकर्णी सारखे पुरुषपात्र स्वत:चे संपादकत्व यशस्वीपणे पार पाडत असताना आपल्या पत्नीची आस्थेने चौकशी करताना तिला कुटुंबात आदराचे स्थान

देताना दिसून येतात. 'मार्केट' मधील मि. देशमुखांसारखे पुरुषपात्र कुटुंबातील पत्नीला जेवढे आदराचे स्थान देतात तेवढेच आपल्या कार्यालयातील स्त्री सहकाऱ्यांना मानाने वागणूक देताना दिसून येतात. ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रांचा विचार करता ही पुरुषपात्रे विविध वृत्ती – प्रवृत्तींची दिसून येतात. काही अपवादात्मक पुरुषपात्रे स्त्रियांकडे आदराने पाहत असली तरी बहुतांशी पुरुषपात्रे ही स्त्रियांच्या असहायतेचा, हतबलतेचा गैरफायदा घेताना, प्रसंगी तिच्या हक्कांची पायमल्ली करतानाच अधिक्याने दिसून येतात.

## ४. पुरुषांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन :

शिक्षणाने माणसाला सुशिक्षीतपणा, सुसंस्कृतपणा येतो. शिक्षणच माणसाला यशाच्या उच्च शिखरावर घेऊन जाते. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाने माणसाला ज्ञान, मनोरंजन, माहिती, मान, सन्मान, पैसा, पद, प्रतिष्ठा तर मिळतेच पण उपजीविकेचे साधन मिळविण्यासाठी, दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी माणसाला शिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरते.

पुरुषांनी शिक्षण घेतले तर तो सर्वच क्षेत्रात आपला स्वतंत्र ठसा उमटवूश शकतात. शिवाय कुटुंबाचे पालनपोषण करून त्यांची आर्थिक जबाबदारी तो नोकरी, धंदा करून उचलू शकतो. शिक्षणामुळे जगाशी संबंध प्रस्थापित करणे सोपे जाते. शिक्षण माणसाला क्षणात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातील माहिती, ज्ञान करून देऊ शकते. समाजात देवाणघेवाण व्यवहार सुरळीत पार पाडण्यासाठी शिक्षण महत्त्वाची जबाबदारी पार पाडते. शिक्षित माणूस सर्वांच्या विश्वासाला पात्र ठरतो. शिक्षण घेऊन मनासारखी नोकरी–व्यवसाय करून पैसा कमविता येतो असा दृष्टिकोनही शिक्षणामागे दिसून येतो. शिक्षण–नोकरी–पद–पैसा–प्रतिष्ठा हे चक्र अव्याहतपणे फिरत असते. यांतील कोणतीही गोष्ट शिक्षणाशिवाय प्राप्त होत नाही म्हणून शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व दिसून येते.

ह. मो. मराठे यांनी त्यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून रेखाटलेल्या पुरुषांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन कसा आहे त्यावर नजर टाकणे येथे इष्ट ठरेल.

**कथासंग्रह :**

**१. पक्षिणी :**

**मी थोडासा अश्वत्थामा :**

या कथेतील नायक शिक्षण घेतो, तो फर्स्ट क्लासने पास होतो. नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण गरजेचे असले तरी या नायकाला वशिला नसल्याने नोकरी लागत नाही. एम.ए. पर्यंत शिक्षण होऊनही प्रोफेसरची नोकरी न लागता आपल्याला कारकुनीच करावी लागणार असा निराशावाद त्याच्या मनात दिसून येतो. एम.ए. करत असताना वडील नोकरी शोध म्हणून तगादा लावतात; शिक्षण बंद कर असे सांगतात. नोकऱ्या नाहीत. त्यातच घरच्यांचा नोकरीसाठी आग्रह या सर्व गोष्टींमुळे मध्याचे शिक्षणात लक्ष लागत नाही. तो इकडे तिकडे चकाट्या पिटतो. विड्या ओढतो आणि नाइलाजाने मनाविरूद्ध वर्गात बसतो. (पृ.४२,४३)

शिक्षण घेऊनही नोकरी सहजासहजी मिळत नाही. वशिला नसतो त्यामुळे नैराश्य येऊन शिक्षण घेण्याकडे या नायकाचा कल दिसून येत नाही. गरजेपुरते शिक्षण झाले की लगेच नोकरी शोधावी, नुसते शिक्षण घेऊन पोट भरता येणार नाही असा दृष्टिकोन मनाशी बाळगून शिक्षणात रस घेत नाही.

**विरूप :**

या कथेतील नायक बागुलने बी.एस्सी. सेकंड क्लास करून केमिस्ट्री ऑनर्स असे शिक्षण घेतलेले दिसते. शिक्षण घेण्यासाठी घरची परिस्थिती नसताना तो शिक्षण घेतो. परंतु बी.एस्सी. पर्यंत शिक्षण घेऊनही नोकरी नसल्याने पोट भरता येत असताना दिसत नाही. रिक्षा चालवायची म्हटली तरी बँकेतून लोन घेण्यासाठीसुद्धा वशिला लावणे ही गोष्ट त्याला आवडत नाही. एवढे शिक्षण घेऊनही रिक्षावाल्याचा युनिफॉर्म घालून रहावे लागणे ही गोष्ट बागूलला लज्जास्पद वाटते. (पृ.८२) शिक्षणाने माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला उठावदारपणा येतो, आत्मविश्वास येतो. पण त्याला मात्र लाजिरवाणे वाटते कारण रिक्षा चालविणे म्हणजे साधी राहणी आणि अपमानास्पद काम वाटते.

## २. इतिहासातील एक अज्ञात दिवस :

**अयोध्या :**

सुहास साठे आपल्या मुलाला अनिलला मातृभाषेतून शिक्षण देतो. सुमन म्हणजेच अनिलची आई अनिलला इंग्लिश मिडियममध्ये शाळेत घालण्याविषयी आग्रह धरते परंतु सुहास साठे पत्नीला समजावतो की, आपण दोघेही मराठी माध्यमातून शिकलो तरीही दोघांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या. मातृभाषेतून शिक्षण अधिक सहजतेने होते असे सुहासला वाटते. तो मुलाला शाळेत घालतो, त्याच्यावर शिक्षणाचे, आचार–विचारांचे चांगले संस्कार करतो. अनिल पहिल्या नंबराने पास होऊन दहावी–बारावीला मेरिटमध्ये येतो. शिक्षणामुळे तो चांगला नागरिक बनतो. शिक्षण घेता घेता तो इतर ॲक्टिव्हिटीजमध्ये सक्रिय सहभाग घेतो. मुलाला शिक्षण देऊन सर्वगुणसंपन्न, सुसंस्कारी नागरिक बनविता येईल. त्यामुळे त्याला उच्चपदाची नोकरी, घर, गाडी, प्रतिष्ठा सर्व काही मिळेल अशी आशा धरतो. (पृ.१७४,१७५,१७७) शिक्षणाने माणूस घडतो, चांगला सुसंस्कारी देशाचा नागरिक घडतो असा दृष्टिकोन या कथेतील सुहास साठे यांचा असलेला दिसून येतो.

विद्येचा आणि वित्तेचा एक अतूट संबंध असल्याने वरील सर्व कथासंग्रहातील पुरुष थोड्याफार प्रमाणात शिक्षण घेतलेलेच पहायला मिळतात. परंतु फक्त शैक्षणिक पदव्या घेऊन नोकरीचे किंवा चरितार्थाचे साधन मिळेलच असे मात्र सांगता येत नाही. तरीही मध्या हे पुरुषपात्र शिक्षणाकडे एक चांगले जीवन जगण्याचे साधन म्हणून पाहताना दिसतो. उच्चशिक्षित लोकांनाही नोकऱ्यांसाठी वशिला लावावा लागतो. त्यामुळे शिक्षणाकडे ज्या पवित्र आणि आदराने बघितले जायचे तितके पावित्र्य सद्यस्थितीला दिसत नसल्याचे बोलके चित्र ह. मो. मराठे यांनी पक्षिणी या कथासंग्रहातून उभे केले आहे. शिक्षण घेतलेल्या प्रत्येक व्यक्तीला मनासारखे काम मिळेलच याची अजिबात शाश्वती नसल्याने कधी–कधी शिक्षण अर्धवट सोडण्याकडे काही नायकांचा कल दिसून येतो. शिक्षण घेतले तर उच्चपदस्थ नोकरी, ऐश्वर्य प्राप्त होते त्यामुळे या कथासंग्रहामधील नायक सुहास साठे आपल्या मुलांनाही सुसंस्कारित आणि उच्चशिक्षित करण्याकडे लक्ष केंद्रित करताना दिसतात. शिक्षण हा मानवी जीवनाचा कणा असल्याचेच येथे दिसून येते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीतील नायक एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेऊन नोकरीच्या शोधात असलेला दिसून येतो. शिवाय तो बी.ए. शिक्षण झालेली मुलगी आपली पत्नी म्हणून स्विकारतो. शिक्षणामुळे दोघेही नोकरी करू शकतो, नोकरी करून आर्थिक स्थैर्यता प्राप्त होऊ शकते, पैसा कमवून जीवनावश्यक गरजा, मनोरंजन, आनंद मिळविण्यासाठीही तो धडपडताना दिसतो. नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण आवश्यकच असून शिक्षणाने आलेला प्रामाणिकपणा, स्वावलंबीपण या नायकाच्या अंगी दिसून येतो. (पृ.१५,५५) परंतु बी.ए. झालेल्या ढोणकरच्या अंगी स्वावलंबन, देशप्रेम, प्रामाणिकपणा दिसून येत नाही. शिक्षणाने सर्वांच्याच अंगी सुसंस्कारीतपणा, सुशिक्षितपणा येतोच असे दिसून येत नाही. दोन मित्रांमधील ही विचारांची तफावत त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा वेगवेगळा दृष्टिकोन निर्दशनास आणून देतो. (पृ.५६)

शिक्षणसंस्थेचा सेक्रेटरी शिक्षणक्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्राचा वापर स्वत:च्या स्वार्थासाठी करताना दिसून येतो. शिक्षणाचा वापर विधायक पद्धतीने न करता त्यामध्ये भ्रष्टाचार करून शिक्षणाचे पावित्र्य सेक्रेटरीसारखे लोकच धोक्यात आणत असल्याचे चित्र ह. मो. मराठे यांनी परिणामकारकपणे समोर आणले आहे. (पृ.७५,७६)

पुरुषांनी शिक्षण घेऊनही त्यांच्या बेकारीच्या नोकरीच्या समस्येवर भाष्य करताना डॉ. अजित मगदुम म्हणतात,

“नायकाला राहून राहून हाच पेच आहे की आपल्यासारख्या पदवीधर जोडप्याला (त्या काळात पदवीधरला अधिक महत्त्व होतं) कुठेही उदरनिर्वाहापुरतं काम मिळू नये. पदवीपर्यंतचं शिक्षण घेऊनही बेकारी? असे किती पदवीधर बेकार असतील? या घनघोर बेकारीतून राष्ट्र कसे घडणार? सुशिक्षितांची ही अवस्था तर निरक्षरांचं काय? तारूण्यसुलभ भावभावनांचं काय? ही तरूण पिढी वैफल्यग्रस्त होऊन कुमार्गाला लागली तर कोण त्यांना आवरणार? असे चक्रावून टाकणारे प्रश्नही जाता–जाता यातून उपस्थित होतात.”[१०]

शिक्षण घेऊनही भेडसावणाऱ्या समस्यांवर डॉ. अजित मगदुम यांनी उचित भाष्य केले आहे.

कादंबरी निर्मितीच्या काळात तरूणांना शिक्षण घेऊनही समाजव्यवस्थेमुळे नोकरी मिळविण्यात आणि स्वत:ची प्रगती करण्यात जे अडथळे ठरत होते त्यावर भाष्य करताना गणेश दिघे म्हणतात,

"स्वातंत्र्यानंतर आलेल्या नेहरूच्या पहिल्या सरकारने जनतेसमोर स्वप्नांचा अक्षरश: पाऊस पाडला. व्यक्तिविकासाच्या योजना सुरू केल्या. मात्र अल्पावधीतच ह्या सुंदर फुग्यांमधली हवा निघून गेली. पुढे राजकीय नीतिमूल्यं, सत्ताकांक्षा, स्पर्धा यांतून राष्ट्रीय चारित्र्यांचं एक एक नेतृत्व फटाफट उघडं पडत होतं. सरकारी खजिना देशांतर्गत औद्योगिक विकास, दळणवळण, रस्ते, पापीप्रश्न, संरक्षण आणि प्रशासन यंत्रणा उभारणीत रिकामा होत होता. नोकरशाहीला थेट उद्दिष्ट नव्हतं आणि सार्वजनिक हितासाठीच्या गंगाजळीलाही गळती लागलेली. त्यामुळे दाखविलेली स्वप्नं आणि वास्तव यांच्यात दरी निर्माण झाली आणि भ्रमनिरासाचं भलं मोठ्ठं खापर मात्र जनतेच्या हाती आलं. औद्योगिक आणि सेवासंस्थांचा अल्पविकास होऊनही वाढीव लोकसंख्येस आळा घालण्यास सरकारे असमर्थ ठरली आणि बेकारीचा प्रश्न पुढं आला. पुरेसे शिक्षण घेऊनही त्याचा उपयोग होत नाही. मुळातच राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात नीतिमूल्यांची झालेली घसरण ही पुढच्या काळातील अपेक्षांच्या गळतीस कारणीभूत झाली."[११]

फक्त पुरेसे शिक्षण घेऊनच सर्वसामान्य माणसांच्या सर्व प्रश्नांना उत्तर मिळेलच असे नसल्याचे भाष्य दिघे करताना दिसतात.

**२. काळेशार पाणी :**

या कादंबरीतील विद्यार्थीदशेतील पुरुषपात्र सामंत हुशार असतो आणि इतर मुलांपेक्षा तो वेगळा व ऊठावदार दिसून येतो. त्याचे वर्गातील उत्तर देणे, खेळामध्ये सक्रिय सहभाग घेणे हा सर्वांगीण विकासाचा एक टप्पा दिसून येतो. शिक्षणाने ज्ञानाबरोबरच संस्कारही घडले जातात. वागण्या–बोलण्याचे अचूक संवाद साधण्याचे कौशल्यही शिक्षणाने विकसित होते. (पृ.५,८, १२,३२) हेच येथे मराठे अधोरेखित करतात.

विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांनी अभ्यास करून ज्ञान ग्रहण केले पाहिजे. ज्ञानाजर्नाबरोबरच शरीरस्वास्थ्य, कला, क्रीडा, वक्तृत्व इ. गुणांचा विकास करणे म्हणजे शिक्षण. शिक्षणाने येणारा सुसंस्कृतपणा हेच खरे शिक्षणाचे उद्दिष्ट दिसून येते.

**३. इतिवृत्त :**

श्रीरंग नाडकर्णी पत्रकार–संपादक म्हणून जनता दैनिकात काम करतात. वृत्तपत्रीय क्षेत्रातील शिक्षण त्यांना पद, पैसा, प्रतिष्ठा देताना दिसते. नोकरी करता–करता ते सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, हॉटेल मालक–कामगार यांचे प्रश्न हाताळताना दिसतात. ही सर्व कामे ते शिक्षण असल्यामुळेच आणि शिक्षणाने अधिकारपद आल्यामुळेच करू शकतात.

शिक्षणामुळे कायदा, सुव्यवस्था, भ्राष्टाचार या सर्वांचे पुरेपूर ज्ञान असल्यामुळे अन्याय, अज्ञान, अत्याचार यांविरूद्ध लढता येऊ शकते. शिक्षणाने माणसाला नैतिक जबाबदारी येते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांमधील फरक शिक्षणाने समजतो. त्यामुळे जुन्या रूढी परंपरा, अज्ञान अंधश्रद्धा यांना विज्ञानाचा आधार नाही हे सिद्ध झाल्यामुळे वाईट गोष्टींना प्रतिबंध घालतानाचे चित्र समोर येते.

देवीला नवस बोलणे, जत्रा भरविणे, बकरी मारणे अशा अनिष्ठ गोष्टींना पायबंद घातला जातो तो केवळ शैक्षणिक जाण असल्यामुळेच. (पृ.६८,६९,८७) शिक्षणामुळे व्यक्तीची नैतिक, आर्थिक, आध्यात्मिक, कौटुंबिक, सामाजिक प्रगती चांगली होते हेच येथे स्पष्ट होते.

**४. कुरूक्षेत्र :**

डॉ. म्हसकर यांनी शांतीवन महाविद्यालयाची स्थापना शिक्षणक्षेत्रात विधायक काम करण्यासाठी केल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रावर आपल्या कर्तबगारीचा स्वतंत्र ठसा उमटवावा असा दृष्टिकोन समोर ठेवून ते विद्यार्थी घडविण्याचा विचार करतात. प्राध्यापकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून कल्पक, कर्तबगार कार्यक्षम नागरिक घडवून समाजपरिवर्तन घडवून आणावे असा उपदेश ते प्राध्यापकांना करताना दिसून येतात. शिक्षण घेतल्याने आणि दिल्यानेच चांगला, सुसंस्कृत, एकसंघ, प्रगतीशील समाज तयार होऊ शकतो असा आशावादी दृष्टिकोन डॉ. म्हसकर यांचा शिक्षणक्षेत्राविषयी दिसून येतो. (पृ.६) शिक्षणक्षेत्रात काम करून पैसा

कमावणे हा मूळ उद्देश न ठेवता ज्ञानदान करून आदर्श नागरिक घडविणे असा उदात्त दृष्टिकोन डॉ. म्हसकरांच्या अंगी दिसून येतो.

तुकाराम फराटे शांतीवन महाविद्यालयात आपली सत्ता स्थापन करून गुंडप्रवृत्तीने, भ्रष्टाचारी वृत्तीने अमाप पैसा मिळवितात. शिक्षणाला बाजारी स्वरूप आणून अनुदान हडप करणे, वेगवेगळ्या कारणाने सरकारी पैसा मिळविणे, देणग्यांच्या स्वरूपातील पैसा हडप करणे अशी भ्रष्टाचारी कामे करून या संस्थेत आणि राजकारणातही दहशत माजवितात. डॉ. म्हसकरांनी लावलेल्या शिक्षणाच्या रोपट्याचे तुकाराम फराटे गुंडांचे आश्रयस्थान बनवितात. वेगवेगळ्या मार्गांनी स्वत:ची प्रगती करून घेऊन सामान्य विद्यार्थी, प्राध्यापक यांना वेठीस धरतात. (पृ.२२,२३,२६,५४,५९,६३,७२) ज्या डॉ. म्हसकरांनी शिक्षणक्षेत्रात शांतीवन महाविद्यालयाचे रोपटे लावले त्या डॉ. म्हसकरांनांच तुकाराम फराटे संपवितात. त्यांचा खूण करतात. दोन्ही एकाच क्षेत्रातील माणसे पण दोघांचेही दृष्टिकोन पूर्णत: वेगळे. डॉ. म्हसकर विधायक कामे करतात, तर तुकाराम फराटे विघातक गुंडप्रवृत्ती जोपासून स्वत:चा स्वार्थ साधताना दिसतात.

प्रा. उल्हास भावे हे शिक्षणाला पुरक वातावरण तयार करतात. अन्यायाविरूद्ध स्वत: लढतात आणि विद्यार्थी, प्राध्यापक यांनाही अन्यायाविरूद्ध लढण्यास तयार करून शिक्षणक्षेत्रासाठी आपले योगदान देतात. चांगले नागरिक तयार करण्यासाठी ते विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करतात. शिक्षणाने माणूस प्रगल्भ होतो. आपल्याबरोबरच समाजाची प्रगती होते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे प्रा. उल्हास भावे. उल्हास भावेंचा शिक्षणविषयक दृष्टिकोन नेहमी सकारात्मक असल्याचे दिसून येते. (पृ.१३,२०,७२)

कादंबरीतील उत्तरार्धात असलेले वसंतराव दामले आपली पत्नी सुमाकडून डी.एड. होण्याचा आग्रह धरतात. त्यांना पत्नीने शिक्षण घेऊन मास्तरीण होऊन पैसे कमवून देण्यासाठी उपयोग करायचा असतो. ते स्वत: शिक्षक असतात. पत्नीनेही शिक्षिका व्हावे हा त्यांचा दृष्टिकोन चांगला वाटतो. पण त्यामागची त्यांची भूमिका चांगली असल्याचे दिसून येत नाही. एकतर सुमाला डोळ्यांची समस्या असते. तरीही तिने अभ्यास केलाच पाहिजे आणि शिक्षिका झालेच पाहिजे असा अट्टाहास वसंतराव दामले धरतात. दुसरे असे की, ते शिक्षणासाठी होणारा सुमाचा सर्व खर्च

तिच्या आईबाबांनीच करावा असाही आग्रह धरतात. त्यामुळे शिक्षकी पेशात काम करणाऱ्या या व्यक्तीचे विचार मात्र या व्यवसायाला काळिमा वाटतात. सुमा शिक्षण घेत असताना वसंतराव दामले तिला शैक्षणिक कार्यात मदत, प्रोत्साहन देताना दिसत नाहीत. उलट तिने शिक्षणाबरोबरच सर्व घरकाम, नवऱ्याची सेवा केलीच पाहिजे असे सांगतात. सुमाने नोकरी करून फक्त आपल्याला पैसे मिळवून द्यावेत एवढाच संकुचीत विचार ते करताना दिसतात. (पृ.८२,९१,९२, ९४,९५,१०५) एका शिक्षकाने शिक्षणाविषयी अशी भूमिका ठेवणे ही शिक्षणक्षेत्रासाठी लांच्छनास्पद गोष्ट दिसून येते. विनासायास पत्नीच्या नोकरीचा पैसा मिळविण्याची स्वप्ने ते पाहतात.

**५. सॉफ्टवेअर :**

व्ही. एस. देशमुख यांचा जन्म कोकणातील एका खेड्यात झालेला आहे. त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक. त्यामुळे खेडेगावांत राहूनही त्यांना वडिलांचे मार्गदर्शन मिळाल्यामुळेच ते पुण्यात शिक्षणासाठी येऊ शकले. वडिलांचा शिक्षणासाठी असलेला पाठिंबा आणि देशमुखांची जिद्द यांमुळे ते एम. ए. होतात. इकॉनॉमिक्स विषय घेऊन फर्स्ट क्लास मिळवितात. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग ज्ञानदानासाठी करायचा म्हणून दोन वर्षे प्राध्यापकाची नोकरी करतात. नंतर लेबर लॉमध्ये स्पेशलायझेशन करतात. नंतर प्रॅक्टीस करून कंपनीत लीगल ॲडव्हायझर म्हणून दहा वर्षे नोकरी करतात. नंतर दुसऱ्या एका मोठ्या कंपनीत लेबर अँड पर्सोनल डिपार्टमेंटचे पर्सोनेल मॅनेजर म्हणून काम करतात. आणि साइडबाय साइड व्हिजीटिंग लेक्चर देणे, वेगवेगळ्या विषयांवर वर्तमानपत्रे, मासिके यांसाठी लेखन करणे अशी कामे करताना दिसतात. (पृ.१३,४८,४९) उच्च शिक्षण घेतले तर पद, पैसा, प्रतिष्ठा आपोआप मिळतो हे मर्म जाणून घेऊन ते स्पेशलायजेशन करताना दिसतात. तर लेखन करणे, लेक्चर देणे यांद्वारे आपले विचार, ज्ञान इतरांपर्यंत पोहोचविणे हे चांगले उद्दिष्ट ठेवून ते कार्यरत राहतात. यावरून त्यांचा शिक्षणाप्रती सकारात्मक दृष्टिकोन प्रत्ययाला येतो.

स्वत: शिक्षण घेऊन, चांगली नोकरी करून ते स्वत:चा आणि कुटुंबाचा शैक्षणिक, आर्थिक स्तर उंचावताना दिसतात. आपल्या ज्ञानाचा फायदा कामगार, सामान्य जनता यांना

व्हावा म्हणून लेखन, वाचन, लेक्चरशीप करताना दिसतात. शिक्षणाने माणसाला सुसंस्कारीत्व आणि पूर्णत्व येते हेच यावरून दिसून येते.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधून येणारी पुरुषपात्रे विद्यार्थी, शिक्षक–प्राध्यापक, संस्थाचालक, कंपनी व्यवस्थापक, कंपनी मालक, कामगार अशा विविध भूमिकांमधून येताना दिसतात. 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील नायक शिक्षणाकडे नोकरी मिळविण्याचे एक साधन म्हणून पाहतो. शैक्षणिक गुणवत्ता असूनही आपणाला नोकरी मिळत नाही हे त्याचे दु:ख अभिव्यक्त होते. प्रसंगी आपणाला नोकरी मिळत नाही याची खात्री पटल्यानंतर आपणच स्वत:ला का विकावे? पत्नीनेही विकले जावे पण नोकरी मिळवावी असा दृष्टिकोन वैफल्यग्रस्ततेतून येतो. तर दुसरीकडे शिक्षणसंस्थेच्या सेक्रेटरीपदी असणारे पुरुषपात्र शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचार, अनैतिकता, फसवणूक यांसारख्या गोष्टी करताना दिसते. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे पावित्र्य न राखणारी व्यक्ती म्हणून ते पुढे येतात. 'काळेशार पाणी' मधील सामंत याचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णांशाने सकारात्मक येतो. शिक्षण हे एक संस्कारपीठ आहे अशी त्यांची धारणा येते. 'इतिवृत्त' मधील श्रीरंग नाडकर्णी पत्रकारितेत मिळविलेल्या कौशल्यामुळे नियतकालिकाची धुरा संपादक या नात्याने यशस्वीपणे पार पाडतात. समाजातील विविध स्तरातील प्रश्न समाजासमोर मांडून त्यांना वाचा फोडून सामाजिक न्याय प्रस्थापित करताना दिसतात. पत्रकारितेचे सत्यनिष्ठा आणि परखडपणा ते आपल्या कार्यात प्रभावीपणे राबविताना दिसतात. पत्रकार हा समाजात प्रबोधकाची आणि दिशादर्शकाची भूमिका पार पाडतो. साहजिकच कुणालाही भिक न घालता मंत्र्यांचे भ्रष्टाचार उघड करतात. पत्रकारितेच्या क्षेत्रातील सखोल अध्ययन हेच त्यांच्या कार्याला कारणीभूत ठरल्याचे दिसते. 'कुरूक्षेत्र' मधील डॉ. म्हसकरांसारखी व्यक्ती शांतीवन महाविद्यालयाची स्थापना करून शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र बनावे म्हणून झटतात, तर भ्रष्टाचारी मानसिकता असलेले तुकाराम फराट स्वत:च्या स्वार्थापायी शिक्षणक्षेत्रात बहुमोल कार्य करणाऱ्या डॉ. म्हसकरांचा ते खूण करतात. साहजिकच महाविद्यालयाची सूत्रे आपणाकडे घेऊन वेगवेगळ्या प्रकारे सदर महाविद्यालयातील प्रा. उल्हास भावेंसारखी व्यक्ती विद्यार्थी आणि शिक्षकांना न्याय देण्यासाठीच झटते. त्यावेळी तुकाराम फराटे त्यांचाही खूण

करतात. शिक्षणक्षेत्रात कार्यरत असलेल्या दोन भिन्न प्रवृत्तींवर प्रकाश पडण्यास मदत होते. वसंतराव दामलेंसारखी शिक्षणक्षेत्रात काम करणारी व्यक्ती जिच्याकडून समाजातील आदर्शांचे पूजक म्हणून विविध अपेक्षा असतात. मात्र हेच वसंतराव दामले स्वत:च्या पत्नीच्या शारीरिक मर्यादा–डोळ्यांचा अधूपणा लक्षात न घेता तिने डी.एड. पूर्ण करावे व त्यासाठी लागणारा पैसा तिच्या आईवडिलांकडूनच मिळवावा आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी करून पैसा मात्र आपणाला द्यावा अशी मानसिकता व्यक्त करतात. 'सॉफ्टवेअर' मधील व्ही. एस. देशमुख ही व्यक्ती प्राध्यापक म्हणून काम करीत असताना आपले शिक्षण चालू ठेवून लेबर लॉ मध्ये आपले स्पेशलायझेन पूर्ण करतात. प्राध्यापकी सोडून कंपनीमध्ये उच्चपदावर कार्यरत राहतात. तेथे काम करूनही इतर महाविद्यालयात व्याख्याने देणे, विविध नियतकालिकांमधून लेखनातून समाजप्रबोधनाचे व ज्ञानसंवर्धनाचे ते कार्य करताना दिसतात.

ह. मो. मराठे समाजातील विविध गोष्टींचे सुक्ष्मतिसूक्ष्म निरीक्षण करणारे एक व्यक्तिमत्त्व आहेत. त्यामुळे कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष शिक्षणासारख्या क्षेत्राविषयी कमालीचा आदर असणारे आणि कार्य करणारे तर पुरुष येतातच पण शिक्षणाचे बाजारीकरण करून भ्रष्टाचारास खतपाणी घालणारेही येतात. तर काही केवळ स्वार्थ साधण्याच्या हेतून शिक्षणाकडे पाहताना आढळतात.

## ५. पुरुषांचे समाजातील स्थान व महत्त्व :

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. मानवाला त्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी समाजातच देवाण–घेवाण करावी लागते. जी व्यक्ती आचार विचाराने चारित्र्याने संपन्न असते, सत्यप्रिय, न्यायप्रिय असते अशी व्यक्ती समाजात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करते.

परोपकारी व्यक्ती सर्वांना हवीहवीशी वाटते. त्याच्या कार्यकर्तृत्वाने तो समाजात स्वत:चे स्थान निर्माण करतो त्यामुळे त्याच्या अस्तित्वाला समाजात महत्त्व प्राप्त होते. त्याच्या निर्णयाला, कार्याला सर्वांचा पाठिंबा मिळतो. त्याच्या विचारांना बोलण्याला एकप्रकारचा भारदस्तपणा येतो. त्यामुळे त्या व्यक्तीचाही आत्मविश्वास प्रचंड वाढतो व दिवसेंदिवस जास्तीत जास्त सकारात्मक विचारसरणी ठेवून समाजोपयोगी कामे पुरुषांकडून झालेली दिसून येतात आणि त्यांचे कार्यच

त्यांना समाजात मानाचे, प्रतिष्ठेचे स्थान मिळवून देण्याची महत्त्वाची भूमिका बजावते. ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रांच्या अंगाने त्याचा शोध घेऊ.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**अँकर :**

चाफेकर हे बॉम्बे एडिशनचे संपादक. मुंबईमध्ये विविध समारंभांना चाफेकरांना बोलावले जाते. संपादक या पदाकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन आदराचा दिसतो. त्यांना लोक प्रमुख पाहुणा म्हणून किंवा अध्यक्ष म्हणून बोलवितात. कार्यक्रमाच्या माध्यमातून लोक काही समाजोपयोगी उपक्रम राबवितात, त्यांची जाहिरात करतात. ते बॉम्बे एडिशनचे संपादक असल्याने त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन लोक पेपर घेतात. (पृ.३५) संपादक हे पद वृत्तपत्र विभाग व समाज या दोन्हींमध्ये आदरास पात्र ठरते. संपादकाच्या माध्यमातून समाजाच्या काही समस्या, समाजापर्यंत, अधिकाऱ्यांपर्यंत पोहचवता येतात. त्यातही संपादकाने एखाद्या गोष्टीकडे निर्देश केला तर त्याचे महत्त्व अधिक वाढते त्यामुळे संपादकाला समाजात अधिक आदराचे आणि मानाचे स्थान मिळालेले दिसते.

**प्रतिनिधी :**

शौरी अखील भारतीय कीर्तीचे झुंजार पत्रकार. आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून शौरी आपल्या भाषणातून, लेखनातून भ्रष्टाचार, सार्वजनिक जीवनातील मूल्यहीनता, इत्यादी विषयांवर मांडतात. शौरी पत्रकारितेत आले आणि अल्पावधीतच स्वत:साठी मोठे स्थान निर्माण केले. एका मुख्यमंत्र्याला सत्ताभ्रष्ट करण्याचं काम शौरी करतात. एका पत्रकाराने मंत्र्याला सत्ताभ्रष्ट करणे हे मोठे काम आहे. परंतु पत्रकारिता हे पद त्यांना हे काम करण्यास सहाय्यक ठरते. (पृ.१००,१०१) पत्रकार हे समाजातील न्यायप्रिय, चांगल्या वाईट गोष्टी समाजासमोर आणणारे दूत असतात. म्हणून पत्रकारांचे समाजातील स्थान आदराचे असलेले दिसून येते.

२. पक्षिणी :

**विरूप :**

या कथेतील नायक खासदार असतो. त्याला समाजात खूप मानसन्मान असतो. त्यांच्या हातून समाजोपयोगी चांगले काम घडू शकते. लोकांच्या अडचणी सोडवू शकतात. सामान्य माणसांच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण करू शकतात, परंतु हे खासदार त्यांना निवडणुकीच्या काळात मदत करणाऱ्या बागूल नावाच्या व्यक्तीलासुद्धा मदत करताना दिसत नाहीत. त्याला नोकरीसाठी चिठ्ठी देत नाहीत. त्यांनी ठरविले असते तर बागूलला ते चांगली मदत करू शकले असते. त्यांच्या पदाचा, अधिकाराचा फायदा ते बागूलला देऊ शकले असते. (पृ.६४,६६) खासदार हे समाजातील उत्तम समाजसेवक, कार्यकर्ते आणि जनतेचे आधारस्तंभ असतात. त्यांना समाजात भरपूर मानसन्मान, महत्त्व असते. परंतु या सर्व सकारात्मक गोष्टींचा समाजाच्या प्रगतीसाठी फायदा होणे गरजेचे असते. परंतु या खासदारांच्या बाबतीत तसे चित्र दिसून येत नाही.

३. दावं :

**कृमी :**

या कथेतील नायक एक मोठा सरकारी अधिकारी. समाजातील तो एक अत्यंत महत्त्वाचा घटक आणि सरकारी अधिकारी असल्याने त्याला संरक्षण असलेला बंगला रहायला मिळतो. तो कलेक्टर असल्याने सर्व सुविधा, सुखसोयी त्याला मिळालेल्या असतात. या अधिकाऱ्याला सामाजिक प्रतिष्ठा असल्याने निमंत्रण असल्याशिवाय कुठे जात नाही परंतु विविध सणसमारंभ, कार्यक्रम इ. ना त्याला विशेष निमंत्रण मिळते. कलेक्टर असल्याने या पदावरून तो अनेक जनकल्याणकारी उपक्रम राबवितो. बुद्धी, कार्यक्षमतेच्या जोरावर तो कर्तव्यदक्ष अधिकारी बनतो. त्याच्या कर्तव्यदक्षतेमुळे तो समाजात कौतुकास, लोकप्रियतेस पात्र ठरतो. (पृ.६९) एक कल्याणकारी अधिकारी म्हणून कलेक्टरला समाजामध्ये मानाचे, अधिकाराचे स्थान मिळते. तो समाजोपयोगी कार्यक्रम राबवितो. समाजाचा हितचिंतक, सरकार आणि समाज यांच्यातील माध्यम म्हणून काम करतो. म्हणूनच कलेक्टरला समाजात महत्त्वपूर्ण स्थान मिळताना दिसून येते.

### ४. इतिहासातील एक अज्ञात दिवस :

**इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

देशाचा अत्यंत महत्त्वाचा आणि जबाबदार घटक म्हणून पंतप्रधानपदाकडे पाहिले जाते. या कथेचा नायक कुमार देशाचा पंतप्रधान असतो. त्यामुळे देशातला अत्यंत महत्त्वाची व्यक्ती म्हणून त्यांना सर्व सुखसोयी, सुरक्षा मिळालेल्या असतात. देशाचा विकास किंवा अधोगती अशा महत्त्वाच्या व्यक्तींवर अवलंबून असतात. पंतप्रधान देशाचे आधारस्तंभ असतात. तसे कुमारही देशाचे आधारस्तंभ असतात. देशाचाच एक तुकडा तोडून वेगळा देश तयार करण्यासाठी झालेल्या युद्धात कुमारचा बळी जातो. परंतु कुमारच्या हत्येनंतरही त्याच्या प्रेतावरसुद्धा सर्वप्रथम अधिकार समाजाचा असतो. कुमारचे जगणे आणि मरणेसुद्धा सार्वजनिक असते. त्यामुळेच घरच्या लोकांना मात्र अंत्यविधी चालू असतानासुद्धा परक्याप्रमाणे वावरावे लागते. या कथेचा नायक पंतप्रधान कुमार हा समाजातील प्रिय, आवडता, जबाबदार, कर्तव्यदक्ष पुरुष असतो त्यामुळे तो समाजाचा एक महत्त्वाचा घटक ठरतो.

### ५. घोडा :

**मानवतावादी लोखकाचा मृत्यु :**

अप्पासाहेब एक नाटककार–कादंबरीकार, टीकाकार, समाजसेवक असतात. अप्पासाहेब समाजातील आदरस्थान असतात. अप्पासाहेब लेखक असल्याने चांगल्या विचारांच्या माध्यमातून समाज घडविण्याचे काम करतात. त्यांच्या पुस्तकांनी विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडवलेले असतात. नवीन पिढी घडविण्यात अप्पासाहेबांचा मोठा हातभार असतो. सर्व प्राणिमात्रांविषयी सहानुभूती, अन्यायाविरूद्ध चीड, पिळवणुकीविरूद्ध संताप, दु:खितांविषयी तळमळ निर्माण करणे हे त्यांच्या कथा–कादंबऱ्यांचे उद्देश दिसतात. (पृ.१२८) लेखकाला समाजात जे जे काही चांगले वाईट दिसते. ते ते त्यांच्या लेखनीतून उतरते. त्यामुळे सामान्य माणसाला, दीन, दलित, दु:खी यांना ते प्रेरणास्थान आधारस्थान वाटतात. समाजात चांगल्या विचारांची बीजे रोवण्याचे काम लेखक करत असल्याने अप्पासाहेबांना त्यांच्या लेखनीने, विचारांनी आदराचे स्थान मिळवून दिलेले दिसते.

पुरुषाने समाजाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असताना समाजहित डोळ्यासमोर ठेवून आपल्या पदाचा चांगला वापर केला तर पद आणि पैशाबरोबरच समाजातील महत्त्वपूर्ण स्थान अढळ राहते मात्र काही चुका घडल्या तर अपमानाला, मानहाणीला सामोरे जावे लागते हेच येथे प्रतीत होते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

ढोणकर पोलिस सब इन्स्पेक्टर या पदावर काम करतो, म्हणून समाजात त्याला मान–सन्मान मिळतो. त्याच्या पदामुळे त्याला पैसा वगैरे कशाचीच कमतरता नसते. शिवाय प्रमोशन मिळवून अधिकारपद, पैसा मिळविण्यासाठीही संधी असते. त्यामुळे लोक त्याला सलाम करतात. त्याचा आदर करतात. त्याच्या शब्दालाही समाजात किंमत दिसते. (पृ.५४,५६)

### २. इतिवृत्त :

अण्णासाहेब जगदाळे हे मुख्यमंत्री. मुख्यमंत्री असलेल्या व्यक्तीच्या हातात राज्याची ध्येयधोरणे असतात. अधिकार त्यांच्या हातात असतात. पैसा, पद, प्रतिष्ठा, मान सन्मान, नोकर, चाकर, गाडी, बंगला या सर्व या मंत्र्यांना मिळत असल्या तरी त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या नाकारून चालत नाहीत. राज्याच्या विकासाच्या दृष्टिनेच त्यांना निर्णय घ्यावे लागतात. विरोधी पक्ष, सर्वसामान्य जनता यांना समोर ठेवून अचूक निर्णय घेतले जातात म्हणूनच त्यांचे पद टिकून राहते. शिवाय समाजात त्यांचे असलेले अनन्यसाधारण स्थान आणि महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांना अहोरात्र झटावे लागते. त्यात सातत्यही ठेवावे लागते. मुख्यमंत्र्यांकडे सत्तेची ताकद असते त्यामुळे त्यांच्याकडे निर्णय घेण्याची क्षमता येते. त्यामुळे सामान्य जनतेच्या नजरेत त्यांचे स्थान आणि महत्त्व अनन्यसाधारणच राहते. (पृ.४,१९,७२,७४,१६५) सत्तेचा उपयोग जसा चांगल्या कामासाठी करता येतो तसाच तो फक्त वैयक्तिक स्वार्थासाठीही करता येतो, परंतु अधिकार आणि पद पुरुषांना समाजात महत्त्व प्राप्त करून देतात. मुख्यमंत्र्याप्रमाणेच औद्योगिक आणि विकासमंत्री–गोविंदराव दळवी, खाजगी वाहतुकमंत्री विश्वासराव मयेकर, उद्योग आणि कामगारमंत्री पतंगराव कदम, आमदार गजानन नाईक, पर्यटनखात्याचे राज्यमंत्री डॉ. हिरे, इ. सर्व

मंत्रीमहाशय आपापल्या क्षेत्रात चांगली कामगिरी करताना दिसतात. त्या त्या पदावर असलेले त्यांचे महत्त्व त्यांना इतरांपेक्षा वेगळे स्थान आणि अधिकार मिळवून देतात हेच येथे प्रत्ययाला येते. (पृ.४,१०९,१५४,२५१)

या कादंबरीचा नायक आणि संपादक असलेले श्रीरंग नाडकर्णी यांना संपादक या नात्याने सर्वसामान्य जनतेपासून, मोठमोठे अधिकारी, राजकीय व्यक्ती, व्यावसायिक इ. सर्वजण आदर करताना दिसतात. श्रीरंग नाडकर्णी संपादक म्हणून जनतेचे प्रश्न मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतात. राजकारणी लोकांनी भ्रष्टाचार करू नये, जनतेच्या समस्या सोडवाव्यात म्हणून त्यांना सत्याचा आणि विकासाचा मार्ग दाखवू शकतात, तर सर्वसामान्य जनतेचे प्रश्न लेखनीद्वारे मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. लेखनीची ताकद सर्व ठिकाणी वापरता येते. ही ताकद त्यांना संपादक या पदाने बहाल केलेली असते. संपादक उच्च–नीच, गरीब–श्रीमंत, जात–धर्म, मित्र–शत्रू असा भेदभाव करीत नाहीत. त्यामुळे सर्वांच्याच नजरेत ते आदर टिकवून असतात. लोकशाहीचा चौथा खांब समजले जाणारे वृत्तपत्र हे क्षेत्र संपादकाच्या अधिकाराने समाजात विधायक कार्य घडवून आणू शकते. विघातक कार्याला मूठमाती देऊ शकते. अन्याय, अंधश्रद्धा, अज्ञान, अनिती, भ्रष्टाचार यांचा विनाश करून सत्य, अहिंसा, ज्ञान, सामंजस्य, लोकभिमुख प्रशासन, न्याय, नीती यांचा चढता आलेख निर्माण करू शकतात. म्हणूनच संपादक हे पद भूषविणाऱ्या श्रीरंग नाडकर्णींचेही समाजातील स्थान महत्त्वपूर्ण असल्याचे दिसते.

श्रीरंग नाडकर्णी मुख्यमंत्र्यांची अंधश्रद्धा दाखवून त्यांनी समाजाभिमुख कामे करणे उदा. शाळा बांधणे, विहिरी खोदणे अशी विधायक कामे करावीत अशा महत्त्वाच्या प्रश्नांना वाचा फोडल्याने समाजात त्यांचे महत्त्व अधिक वाढल्याचे दिसते. हॉटेल मालक आणि कामगार यांना आपले प्रश्न मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळते. नाडकर्णी लेखनीच्या माध्यमातून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांचे महत्त्व आणि स्थान अढळ दिसून येते. मोठमोठे व्यावसायिक, कारखानदार यांच्या भ्रष्टाचाराच्या प्रदुषणाच्या, पर्यावरण ऱ्हासाच्या कृतींवर आक्षेप घेऊन समाजासाठी योगदान देतात. म्हणूनही ते समाजात महत्त्वपूर्ण स्थान मिळवितात. नाडकर्णी चांगल्या गोष्टींचे कौतुक करून त्याला प्रसिद्धी आणि प्रोत्साहन देतात, तर दुःखद संकटग्रस्त

परिस्थितीत सांत्वन आणि मदतीची हाक जनेतपर्यंत पोहोचवितात. म्हणूनच समाजाच्या सुख–दुःखातील दुवा म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. (पृ.२९,४३,५१,५३,६४,६८,९९,१४४,१६७) पत्रकारितेच्या क्षेत्रातील आदर्श म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक लक्षात राहते.

**३. कुरूक्षेत्र :**

डॉ. म्हसकर शांतीवन महाविद्यालयाची स्थापना चांगले कर्तबगार, गुणवान विद्यार्थी पुढे जाऊन आपापल्या क्षेत्रात ठसा उमटवतील या हेतूने सरकारी मदतीशिवाय स्थापन करतात. पुढे या संस्थेच्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होते. त्यांच्या या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यामुळे ते मराणानंतरही त्यांच्या नावाने आणि कार्याने अमर राहतात. त्यांच्या कार्याने–विचाराने प्रेरित होऊन प्राचार्य बेलसरे त्यांचे कार्य प्रा. उल्हास भावेसारख्या शिक्षकांच्या मदतीने पुढे चालू ठेवतात. आपल्या कार्याने डॉ. म्हसकर समाजात आपले स्थान निश्चित करतात तर प्राचार्य बेलसरे डॉ. म्हसकरांचे कार्य नेटाने चालू ठेवतात. त्यामुळे प्राचार्य म्हणून ते आपले स्थान निर्माण करतात. परंतु तुकाराम फराटेंसारख्या गुंड प्रवृत्तींच्या लोकांचा त्यांना त्रास सहन करावा लागतो. तरीही गुंडप्रवृत्तीला न जुमानता ते विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रा. भावेंसारख्या माणसांना मदत करून आपल्या पदाचा आणि अधिकाराचा वापर चांगल्या कामासाठीच करताना दिसतात. (पृ.६,९,११,१८,७२) प्रा. उल्हास भावे विद्यार्थ्यांच्या समस्यांवर प्राचार्य, संस्थाचालक यांच्याकडे न्याय मागतात. प्रसंगी मोर्च्या, आंदोलन, यांचा सहारा घेऊन ते विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे ते शिक्षकांचे प्रश्न, त्यांचे पगार, ग्रँट, सरकारी अनुदान, इ. विषयांकडे लक्ष केंद्रित करून शिक्षकांची संघटना तयार करून शिक्षकांनाही न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. (पृ.९,१३,१६,२७,३५,४४,५४,६३) अन्याय, अत्याचार, गुंडगिरी इ. गोष्टींविरूद्ध आवाज उठवतात लढत लढत शेवटी प्रा. उल्हास भावेंचा खूण होतो, परंतु आपल्या समाजहिताच्या कार्याने विद्यार्थी–शिक्षक यांच्या नजरेत आपले अत्युच्च स्थान निर्माण करतात. अन्यायाविरूद्ध लढले नाही तर अन्याय अजूनच वाढत जाईल त्यामुळे प्रा. उल्हास भावे यांनी केलेली कृती महत्त्वाचीच वाटते. त्यांच्या निधनानंतरही एक समाजात पाहणारा माणूस म्हणून त्यांची प्रतिमा लक्षात राहते.

**४. देवाची घंटा :**

या कादंबरीतील गोगटे वकील हे मंदिराची व्यवस्था पाहतात. वकिलाचे काम कायदा आणि सुव्यवस्था राखणे, अन्याय, अत्याचार यांच्याविरूद्ध लढणे, गरीब, निरपराध जनतेस न्याय मिळवून देणे असते. आपल्या ज्ञानाच्या सामर्थ्याने सत्याचा झेंडा रोवणे ही वकिली पेशाची कामे त्यांना समाजाचे रक्षक म्हणून स्थान देतात आणि त्यांचे हे कार्य प्रामाणिक आणि अव्याहतपणे चालू राहिले तर वाईट आणि गुंड प्रवृत्तींना आळा बसून समाजात कायदा सुव्यवस्था राखली जाईल म्हणूनच वकील या व्यवसायाचे महत्त्व सदासर्वकाळ आणि सर्व ठिकाणी समाजोपयोगीच ठरते हे लक्षात येण्यास मदत होते.

गोगटे वकील मंदिराची सुव्यवस्था पाहतात. त्यामुळे मंदिरातील उत्पन्नाचे आणि गैरप्रकार होणार नाहीत याचे चोख व्यवस्थापन करताना दिसतात. गोप्याभटाने केलेली चोरी वकिलांच्या भितीनेच आणि कायद्याच्या धाकानेच समोर आलेली दिसते. समाजात गोगटे वकिलासारख्या व्यक्तींमुळे समाजात सुव्यवस्था राहण्यास मदत होताना दिसते. (पृ.३२,३३,३४,३५,६५,७३)

समाजव्यवहारातील कोणत्याही क्षेत्रात काम करीत असताना आपली नेकी आणि प्रामाणिकपणाच्या बळावर समाजातील आपले स्थान बळकट करण्यास मदत होते. हीच माणसे समाजाला विधायक वळण लावण्यात आपले योगदान देतात हेच यातून पटते.

**समारोप :**

माणूस हा मूलत:च समाजप्रिय प्राणी आहे. साहजिकच समूहप्रियतेमुळे त्याच्या अंगी विविध मूल्यजाणिवा विकसित झालेल्या दिसून येतात. पुरुष हा कुटुंबव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे आणि कुटुंब हे समाजव्यवस्थेचा घटक आहे. समाजात वावरत असताना वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरील विविध मूल्ये तो कळत–नकळत जपत असतो, तर कधी त्या मूल्यांची पायमल्लीही तो करीत असतो याचे प्रत्यंत्तर ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रांच्या द्वारा कळण्यास मदत होते.

मूल्यांचा विचार करता सामाजिक बांधिलकी, शेजारधर्म, परस्पर सहकार्य, सामाजिक भान, सेवा, बंधुता, आदरभाव, सौजन्यशीलता, स्त्रीपुरुष समानता, कृतज्ञता, सर्वधर्म समभाव

यांसारखी काही प्रमुख मूल्ये नमूद करता येतील. याची प्रचिती ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांच्या सामाजिक बांधिलकीतून प्रत्ययाला येते. इतरांविषयीचा विधायक दृष्टिकोन आणि सहानुभाव, करूणा आणि दया ही येथे अभिप्रेत आहेत. उदरनिर्वाहाचे साधन असले तरी लग्न जमविणारी पुरुषपात्रे, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी पाठिंबा देणारे प्राध्यापक, शिक्षण आणि इतर अनेक विषयांवरील प्रश्न लक्षात येऊन त्यांना विविध नियतकालिकांच्या द्वारा वाचा फोडणारे संपादक, पत्रकार अशी पुरुषपात्रे येतात. एकूणच ही पुरुषपात्रे सामाजिक बांधिलकी जपण्याच्या माध्यमातून समाजाचे उत्तरदायित्व मान्य करून त्या दिशेने वाटचाल करीत असलेली दिसतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील बहुतांशी पुरुषपात्रे ही नोकरी–व्यवसाय व त्या अनुषंगाने येणाऱ्या कामाचे स्वरूप, तेथील कार्यालये, प्रमुख व त्यांच्या हाताखाली काम करणारे सहाय्यक, तेथील सत्तास्पर्ध, हेवेदावे, परस्परसंबंध, निर्माण होणारे प्रश्न यांच्याशी निगडित येतात. नोकरी मिळविण्यासाठीची धडपड येते. नोकरी गेल्यानंतर उद्‌ध्वस्त जीवनाची लक्तरे वेशीवर टांगणारे पुरुष येतात. ज्यांना उत्तम नोकरी मिळाली, तिच्याशी प्रामाणिक राहून आपले इमान राखणारे जसे पुरुष येतात तसेच आपल्या पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचार आणि अनैतिक कृत्यास खतपाणी घालणारे पुरुषही येतात. पत्रकारितेच्या क्षेत्रात समाजाभिमुख राहून आपला वसा जपणारे येतात तर काही पत्रकारितेला कलंक लावणारे असेही पुरुष भेटतात. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी, त्यांच्या वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहणारे अध्यापक भेटतात, तर त्याच क्षेत्रात अशा प्रामाणिक अध्यापकांना अडचणीत आणून त्यांना संपविणारी, भ्रष्टाचारास खतपाणी घालणारीही भेटतात. आपली कंपनी उत्तम चालावी म्हणून कडक शिस्तीत काम करणारी, कंपनीचा दर्जा वाढावा यासाठी प्रयत्न करणारी भेटतात. कधी अशा पुरुषांना त्याचे उत्तम फळ मिळते तर कधी कामगार संघटना त्यांचे प्रमुख यांच्या कट–कारस्थानांना बळी पडणेही वाट्याला येते.

नोकरी करीत असताना आपली अधिक प्रगती साधावी म्हणून पत्नीला नोकरीसाठी प्रोत्साहन देणारे भेटतात. तसेच स्वत:च्या कौशल्यावर पुढे जाणाऱ्या पत्नीचीच प्रसंगी कौशल्ये

चोरून आपला पुरुषी अहंकार जपणारे आणि आपली मनमानी मान्य न करणाऱ्या पत्नीला नोकरी सोडण्यास भाग पाडणारेही भेटतात. अधिकाधिक नफा मिळवून श्रीमंत होण्याच्या हव्यासापोटी कमी प्रतीचे उत्पादन खपविणारेही भेटतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील नोकरी–व्यवसायाचे स्वरूप पाहता कारखानदार, कामगार, कामगार संघटना, कामगार पुढारी यांच्यातील परस्परसंबंध, शिक्षण, शिक्षणातील सचोटी, प्रसंगी तेथील भ्रष्टाचार, नोकरीसाठीचे प्रयत्न, ती टिकविण्यासाठीची धडपड, अंतर्गत हेवेदावे, सत्तास्पर्धा अशा विविध पातळ्यांवर पुरुष येताना दिसतात.

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान असल्याचे पितृसत्ताक कुटुंबपद्धती असल्याचे दिसते. स्त्री आणि पुरुष या एकाच नाण्याच्या दोन बाजू, एका रथाची दोन चाके असल्याचे वास्तव असले तरी एकूण परिस्थिती पाहता काही अपवाद वगळता स्त्रीला गौण स्थान दिले जात असल्याचे विदारक सत्य ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून प्रत्ययास येते. आपले अस्तित्व टिकविण्यासाठी पुरुषांच्या चंगळवादी मानसिकतेमुळे त्यांना रंजनाचे साधन म्हणून ते वापरताना दिसतात. आपला सुखाने चाललेला संसार भोगवादी प्रवृत्तीमुळे उद्ध्वस्त करणारे दिसतात. आपण पुरुष आहोत त्यामुळे आपल्या मनाप्रमाणेच स्त्रियांनी वागले पाहिजे असा दुराग्रह बाळगून परस्त्रियांशी संबंध ठेवणारे, पत्नीच्या मनाविरूद्ध त्यांना घरात स्थान देणारे भेटतात. स्त्री ही पैसे कमविण्याचे साधन म्हणून पाहताना दिसतात. स्त्रियांना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला फसवून गरज संपताप तिला वाऱ्यावर सोडणारे भेटतात. भारतीय संस्कृतीत विवाहानंतर परपुरुषाचा विचार करणे हाही व्यभिचार समजला जातो अशा तत्त्वविचाराला तिलांजली देऊन आपल्या प्रतिष्ठेसाठी स्वत:च्या पत्नीला वरिष्ठांची मर्जी सांभाळायला लावणारे दिसतात. मुलगा वा मुलगी जन्माला येणे केवळ स्त्रीच्या हाती नाही हे शास्त्र बाजूला सारून मुली जन्माला आल्या म्हणून स्त्रीलाच दोषी ठरविणारे पुरुष भेटतात, तर कधी आपल्या मर्यादा लक्षात आल्यानंतर तिच्या चुकांकडे दुर्लक्ष करून तिला मानाने वागविणारेही भेटतात. विवाहानंतर दुसऱ्या स्त्रियांशी तुलना करून पत्नीला हिनविणारे, तुच्छ लेखणारेही भेटतात. ज्या स्त्रिया सुंदर असतात त्यांना नोकरी लवकर मिळते असा तर्क मांडणारे काही पुरुष भेटतात.

कुटुंबव्यवस्थेत अपत्यसुखासारखे दुसरे सुख नाही अशी मानसिकता दिसते. मात्र आपल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि नोकरी मिळविण्यासाठी पत्नीचा गर्भ तिच्या नकळत पाडून स्वत:ची मनमानी सिद्ध करणारे पुरुषही भेटतात. स्त्रियांच्या असहायतेचा, हतबलतेचा गैरफायदा घेऊन त्यांचे शील ओरबाडणारेही भेटतात. पत्नीकडे वाईट नजरेने कोणी पाहिले तर कोणत्याही पुरुषाला सहन होणारे नाही हे सर्वसाधारण वास्तव असले तरी आपल्या शारीरिक असमर्थतेमुळे पत्नीला मित्राकडून अपत्यप्राप्ती करून घेणारा अपवादान्मक पुरुषही भेटतो.

एकूणच ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात घेता पुरुष स्त्रियांना गौण लेखताना दिसतात. पद, पैसा आणि प्रतिष्ठा मिळविण्याचे साधन म्हणून पाहताना दिसतात. उपभोग्य वस्तू म्हणून पाहताना दिसतात. काय बरोबर आणि काय चूक याचा सारासार विचार करण्याचा अधिकार तिलाही आहे याचा विचार न करता कळसुत्री बाहुलीप्रमाणे तिचा हवा तसा वापर करताना दिसतात. कुटुंबव्यवस्थेचे संकेत नाकारून पत्नीला दुय्यम लेखून परस्त्रियांशी आपले संबंध टिकविताना दिसतात. आपल्या पदाचा, अधिकाराचा गैरवारप करून स्त्रियांचे शोषण करताना दिसतात. तर कधी स्वत:हून त्याचा बळी ठरताना दिसतात. काही पुरुष स्त्रियांच्या हतबलतेचा, असहायतेचा, गरिबीचा गैरफायदा घेऊन तिचे शोषण करताना दिसतात. काही पुरुष मात्र स्त्रियांच्या एकूणच स्थानाचा विचार करून तिचा मान राखताना, तिची मर्जी राखताना, तिला हवे नको ते पाहताना, तिची सेवा करताना दिसून येतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात घेता अपेक्षित असे शिक्षण घेऊनही योग्य ती नोकरी न लागल्याचे दु:ख व्यक्त करताना दिसतात. अधिकचे शिक्षण घेण्यापेक्षा आहे त्या शिक्षणाच्या आधारे नोकरी शोधण्याचा प्रयत्न करणारे पुरुषही भेटतात. शिक्षण म्हणजे नोकरी मिळविण्याचे साधन असा दृष्टिकोन येथे येतो. आपल्या मुलाने मातृभाषेतूनच शिक्षण घ्यावे असा आग्रह धरणारे पुरुष भेटतात. यातून मातृभाषेवरील प्रेम व्यक्त होते. शिक्षणाने माणूस सुसंस्कारित होतो. सारासार विचार येतो,

प्रामाणिकपणा, स्वावलंबन येते असा दृष्टिकोन येथे येतो. मात्र हेच वास्तव सर्वत्र आढळत नाही असा अंगुलीनिर्देश ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यातून येणारी पुरुषपात्रे करतात. शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार करून उत्पन्नाचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहणारे पुरुषही येतात. शिक्षणाने संवादकौशल्ये आत्मसात होतात असाही दृष्टिकोन येतो. शिक्षणामुळे व्यक्तीची आर्थिक, सामाजिक प्रगती साधता येते. शिक्षणामुळे कल्पक, कर्तबगार, कार्यक्षम नागरिक तयार होऊन प्रगतीशील समाज निर्माण होतो असा दृष्टिकोन पुढे येतो. शिक्षण हे नोकरी मिळविण्याचे आणि पर्यायाने पैसा मिळविण्याचे साधन असले तरी आपली पत्नी ही पैसा मिळविण्याचे यंत्र समजून तिच्या शारीरिक व्याधींचा विचार न करता तिने शिक्षण घेऊन नोकरी केलीच पाहिजे असा दुराग्रह धरणारा पुरुषही भेटतो. शिक्षण हे नोकरी मिळविण्याचे साधन वाटत असले तरी ते ज्ञानदानाचेही एक महत्त्वपूर्ण साधन असल्याचे प्रतिपादन करणारे पुरुष येतात.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता शिक्षणात काही अपप्रवृत्ती असल्या तरी माणसाच्या सर्वांगीण विकासाचा केंद्रबिंदू शिक्षण असल्याचे प्रतिपादन पुरुषांच्या शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्ययाला येते.

माणूस हा मूलत:च समाजप्रिय प्राणी आहे आणि समाजात राहून आपले स्थान कसे महत्त्वपूर्ण आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळ्या पातळ्यांवर कार्य करून तो आपले स्थान महत्त्वपूर्ण असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. याचेच प्रत्यंतर ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये येते. वृत्तपत्र हे समाजपरिवर्तनाचे, प्रबोधनाचे, ज्ञान व माहितीचे महत्त्वपूर्ण साधन मानून वसा मानून कार्य करणारे पुरुष येथे येतात. त्यांना मानाचे स्थान मिळताना दिसते. समाजकारण, राजकारण आणि अर्थकारण यांचा निकटचा संबंध असतो. मात्र राजकारणात पद, पैसा आणि प्रतिष्ठा असूनही राजकारणाचा उपयोग समाजकारणासाठी, लोकांच्या हितासाठी न करणाऱ्या व्यक्तीस महत्त्वपूर्ण स्थान नसल्याचे दिसते. काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना समाजव्यवस्थेत महत्त्वपूर्ण स्थान व महत्त्व असल्याचे आढळते. राजकारणात राहून देशहिताची, समाजहिताची कामे केल्याने चांगले महत्त्व मिळाल्याचे दिसते. साहित्यक्षेत्रात आपले

योगदान देणाऱ्या व्यक्ती समाजउपयोगी कार्ये करीत असल्याने त्यांनाही मानाचे स्थान मिळताना दिसते. पोलिस क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीलाही मान मिळालेला दिसतो.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांचा विचार करता समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, साहित्य, धर्मकारण, नोकरी, उद्योग–व्यवसाय अशा कोणत्याही क्षेत्रात कार्य करीत असताना विघातक कार्य केल्यास मानहानी अपमान वाट्याला येतो. मात्र पुरुषांनी विधायक कार्य केल्यास त्यांना मान सन्मान, प्रतिष्ठा व समाजात महत्त्वाचे स्थान प्राप्त होत असल्याचे प्रत्ययाला येते.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष व समाजव्यवस्था जाणून घेत असताना पुरुषांची सामाजिक बांधिलकी, त्याअनुषंगाने पुरुषांचे जाणवणारे विविध पैलू, त्यांचा नोकरी–व्यवसायातील सहभाग व त्या अनुषंगाने निर्माण होणारे विविध प्रश्न, त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा विविधांगी दृष्टिकोन, शिक्षण हे मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा पैलू. त्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन, या क्षेत्रातील विविध प्रश्न या आणि यांसारख्या विविध अंगोपांगांचा विचार करता पुरुष आपले समाजातील स्थान व महत्त्व कसे टिकवितो वा त्याला तडा देतो, तसेच आपले अस्तित्व जपणारा, अस्मिता टिकविणारा पुरुष कथा–कादंबऱ्यांमध्ये कसा आलेला आहे हे समजण्यास येथे मदत होते.

**संदर्भसूची :**


१. सारडा शंकर (संपा.), ''निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी : संहिता आणि समीक्षा'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ.१९८३, पृ.१३५,१३६.

२. तत्रैव, पृ.२२६.

३. तत्रैव, पृ.११४.

४. रत्नपारखे लक्ष्मण, ''नवे साहित्य'', 'भीषण वास्तवाचे चित्रण करणाऱ्या कथा', केसरी, ३ जुलै १९८३, पृ.४.

५. सारडा शंकर (संपा.), ‘‘काळेशार पाणी : संहिता आणि समीक्षा’’, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००८, पृ.११६,११७.

६. तत्रैव, पृ.१२९,१३०.

७. तत्रैव, पृ.१४५,१४७.

८. तत्रैव, पृ.१६६.

९. तत्रैव, पृ.१७३.

१०. तत्रैव, पृ.२००.

११. तत्रैव, पृ.२२७.

*****

## प्रकरण चौथे

# ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचे विविध पैलू

**प्रास्ताविक :**

धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, तत्त्वज्ञान अशा विविध क्षेत्रात कार्य करीत असताना किंवा वावरत असताना पुरुषांचे विविध पैलू समोर येतात. माणूस हा सगुणाचा पुतळा नाही तसेच दुर्गुणांची खाणही नाही हे लक्षात घेऊन प्रामख्याने त्यांची श्रद्धाशीलता, बंडखोरी, मानसिकता आणि नैतिकता या अनुषंगाने पुरुषांचे विविध पैलू येते जाणून घ्यावयाचे आहेत.

## १. पुरुषांची श्रद्धाशीलता :

माणसांच्या ज्या विविध व्याख्या केल्या जातात त्यात माणूस हा श्रद्धाशील प्राणी आहे अशीही एक व्याख्या करता येईल. प्राचीन हिंदू धर्मग्रंथामध्ये देवांची संख्या तेहेतीस कोटी एवढी दिली आहे. मानवी जीवनातील चांगल्या–वाईट कृत्यांचा परिणाम म्हणून पाप–पुण्य यांसारख्या संकल्पनाही पुढे आल्या. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले गेले. येथे मोक्ष म्हणजे मुक्ती आणि ही मुक्ती मिळणे म्हणजे मृत्यूनंतर स्वर्गात जाणे. यांसारख्या पारंपरिक गोष्टी जनमानसात रूजविल्या गेल्या. माणूस हा तसा स्वार्थी प्राणी आहे. जीवनात वाट्याला आलेल्या अनेक गोष्टींचे संदर्भ स्वत:च्या गरजेनुसार लावले जातात. देव नावाच्या संकल्पनेवरील श्रद्धाही त्याला अपवाद नाही. याचे काही नमुने मराठे यांच्या कादंबऱ्यांमध्ये आढळतात.

**कथासंग्रह :**

**१. वीज :**

**दृश्य तेच आहे :**

या कथेतील वृद्ध नायक पॅरालिसिसने आजारी असतो. पॅरालिसिसच्या त्रासाने तो वैतागून गेलेला असतो. वृद्धापकाळामुळे डॉक्टरांची औषधे लागू पडत नाहीत. अंगात आजारपण सहन करण्याची शक्ती उरलेली नसते. तो जवळजवळ शेवटच्या क्षणांना येऊन पोहोचला

असल्याचा निर्देश डॉक्टर करतात. हा नायकही असा लोळागोळा होऊन जगण्यापेक्षा मरणे पसंत करतो. परंतु मरण येणे ही गोष्ट कोणाच्या हाती नसते. शेवटी त्याला देवाची आठवण येते आणि तो देवाला या यातनांतून सोडविण्याची विनवणी करतो. (पृ.३९,४०) स्वतःचे घरदार, पैसा, बायको, मुले, नातवंडे, सुना सर्वकाही असूनही शेवटी त्याला एकाकीपण आणि अस्वस्थता येते तेव्हा त्याची खात्री होते की, आजारातून, यातनांतून परमेश्वरच आपली मुक्तता करू शकतो, म्हणून तो त्याची श्रद्धा असलेल्या देवाला आपली शेवटची इच्छा मरण यावे अशी व्यक्त करतो.

**२. ज्वालामुख :**

**कर्मफल :**

पंत एका खाजगी शाळेत नोकरी करता करता भिक्षुकीचा व्यवसाय करतात. पूजाअर्चा, श्राद्धपक्ष, अभिषेक, सत्यनारायण, गुरूचरित्र, सप्तशती यांचे पठण करतात. पंत प्रामाणिकपणे नोकरी, भिक्षुकी करतात. भिक्षुकीच्या व्यवसायामुळे ते शेटजीच्या घरी मुरलीधराच्या मूर्तीची पूजा–पाठ करण्यासाठी तयार होतात. शेटजी देतील तो मोबदला घेत ते मनापासून त्यांच्या घरची पूजा करतात. पूजापाठ करताना सापडलेली हिऱ्यांची शेटजींची अंगठी पंत प्रामाणिकपणे परत करतात. (पृ.१०७,११०,११४) नोकरी करणारे पंत श्रद्धाशील वृत्तीचे असल्यानेच त्यांनी भिक्षुकीचा व्यवसाय सांभाळलेला दिसतो. त्यांच्या वागण्या–बोलण्यात, कामात परमेश्वरावर श्रद्धा दिसून येते. कोणतेही काम करण्याआधी ते देवाचे श्लोक म्हणतात. प्रार्थना करतात. कोणतेही संकट निवारण्याची ताकद श्रद्धेत आहे अशी भावना ठेवून परमेश्वरावर श्रद्धा ठेवून ते मनाविरूद्ध शेटजींच्या घरी जोखमीची कामे करतात. पंतांच्या श्रद्धाशिलतेमुळे त्यांची सद्‌सद्‌विवेक बुद्धीही जागृत असल्याचे दिसून येते.

**भिंत खचली :**

सतत दोन दिवस कोसळत असलेल्या पावसाने अख्खी मुंबई जलमय होते. आकाशकिरण झोपडपट्टीमध्ये सर्व जाती–धर्माची माणसे राहतात. त्यामध्येच शंकर आणि त्याचे कुटुंबीय राहतात. दोन दिवस कोसळलेल्या पावसाने झोपडपट्टीत भिंत कोसळून पंचवीस जणांचे बळी जातात. शंकर आणि त्याचे कुटुंबीय सुरक्षित राहिलेले असल्याने शंकर देवाचे आभार

मानतो. देवाच्या कृपेमुळेच आपले कुटुंब सुरक्षित असल्याची भावना शंकरची दिसून येते. (पृ.१४३,१४४,१४५) शंकरच्या डोळ्यासमोर पंचवीस जणांचे बळी जातात मात्र शंकर आणि त्याचे कुटुंब बचावते. ते देवाच्या कृपेनेच हा भाव त्याचा व्यक्त होतो.

**३. पक्षिणी :**

**व्रणार्त :**

अविनाशचे घर कर्जात असते. त्याच्या राहत्या घरावर वडिलांनी कर्ज घेतलेले असते. मरताना वडिलांनी अविनाशला शेवटची इच्छा म्हणून घर कर्जातून मोकळे करण्यास सांगितलेले असते. घर दुरूस्त कर पण विकू नको अशी शेवटची इच्छा वडिलांनी बोलून दाखविल्यामुळे अविनाश अत्यंत गरिबीत दिवस काढतो, पण घर विकण्याचा विचार करताना दिसत नाही. श्रावणबाळाचे आणि पुंडलिकाचे जग संपून गेल्यामुळेच माणसाच्या आयुष्याची परवड झाली आहे असेही तो मित्रांना सांगतो. (पृ.५३,५४) 'मातृपितृ देवो भव' अशी आपली संस्कृती. त्या संस्कृतीला साजेसे वर्तन करणारा अविनाश आपल्या वडिलांच्या शेवटच्या वचनाला जागतो. परमेश्वरावर सर्वसामान्य पुरुषांची श्रद्धा कमी–जास्त प्रमाणात असतेच पण वडिलांना देव मानून त्यांचा शब्द प्रमाण मानून तसे वर्तन करणारा अविनाश श्रद्धाळू वृत्तीचा, भाबड्या वृत्तीचा दिसून येतो.

**४. दावं :**

**देऊळ :**

या कथेतील नायक गंगाधर संसारी व्यक्ती. त्याची स्वामींवर खूप श्रद्धा असते. तो दत्तभक्त असतो. दत्ताच्या देवळात पूजा–अर्चा, धार्मिक कर्मकांड नीतिनियमांनुसार तो वागतो. गावातल्या स्वामींच्या मठात रहायला जातो. गळ्यात रूद्राक्षांची माळ घालून तो रात्रंदिवस स्वामींच्या शब्दांचे श्रवण करतो. नंतर तो भगवी वस्त्रे परिधान करून प्रवचन करताना दिसतो. (पृ.१२१,१२२) गंगाधर संसारात असताना त्याला विरक्ती येते. तो आपल्या मुलांना देवावर भरोसा ठेवून सोडून संन्यास घेतो. देवभक्तीत रमून जातो. ही त्याची कृती श्रद्धाशिलतेचाच एक भाग वाटते.

**समाधी :**

भिक्याभट पाचशे घरी भिक्षुकी करत असतो. नारळ, भाजी, धान्य, तेल, कपडे, पैसा जे जे मिळेल ते ते भिक्याभट घरी घेऊन येताना दिसतो. अहोरात्र तो पैशांच्या मागे पळतो. पैशांसाठी लाचारी करतो, पाप करतो, परस्त्रीवर नजर ठेवतो. तिला वश करण्यासाठी स्वत: वाईट मार्गाने कमावलेल्या पैशांचा पाढा वाचताना दिसतो. (पृ.१३९,१४०) तो जन्माने ब्राह्मण. ब्राह्मण वर्गाला धर्मपरंपरेने, वंशपरंपरेने, नितिनियमांनी घालून दिलेली चौकट मोडणे उचित नाही पण तो सर्व नीतिनियम मोडून स्वत:च्या स्वार्थापोटी वाट्टेल तसा वागतो. देवपूजेचे वरषांगी दर्शन घडवितो.

**५. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**गोकुळ :**

वासुदेव गजानन केळकर वृद्धापकाळामुळे एका जागी कॉटवर पडून राहतात. त्यामुळे केळकर पती–पत्नीत वाद निर्माण होतात. आपण लवकर मरावे अशी आपल्याविषयी पत्नीची भावना आहे असा अभिप्राय ते कुटुंबात व्यक्त करतात. आपले वय झाले असले तरी आपले मरण केव्हा येईल हे त्यांना माहीत नसते. देवाची इच्छा असेल तेव्हाच आपल्याला मृत्यू येईल अशी त्यांची गाढ श्रद्धा असते. मन शांत करण्यासाठी ते रामनामाचा आधार घेताना दिसतात. मन अशांत असताना रामनामाचा जप करणारे केळकर श्रद्धाळू वृत्तीचे दिसतात. (पृ.८४,८५) उतारवयात स्वत:चा आत्मविश्वास कमी होतो आणि कुटुंबातील माणसांचा आधार वाटेनासा होतो तेव्हा देवावरील श्रद्धा हा एकमेव सहारा केळकरांना असल्याने आपला सांभाळ करणारा, तारणारा, मारणारा रामच आहे अशी त्यांची श्रद्धा दिसून येते.

**मोक्ष :**

या कथेतील नायक मतदानाच्या प्रचारसभेत पोलिसांच्या गोळीबारात मृत्यूमुखी पडतो. त्याच्या कुटुंबाला सरकारी मदत जाहीर होते परंतु मदत मिळत नाही. त्याच्या पिंडाला कावळा शिवत नाही तेव्हा त्याच्या वडिलांची भावना होते की, मुलाचा आत्मा मुक्त झालेला नाही. त्याचा जीव बायको–मुलात अडकलेला आहे. मंत्रीणबाईंनी त्याच्या कुटुंबाला जवळ घेऊन मदत जाहीर

करताच पिंडाला कावळा शिवतो. मंत्रीणबाई मदत जाहीर करतात परंतु प्रत्यक्षात जेव्हा त्यांच्या कुटुंबाला मदत मिळत नाही, तेव्हा दारासमोर बसलेला कावळा पाहून या नायकाच्या वडिलांची परत भावना तयार होते की, बायको–मुलांच्या काळजीनेच आपल्या मुलाच्या आत्म्याला मुक्ती मिळाली नाही. (पृ.१८९,१९०,१९४,२००) स्वर्ग, मृत्यू, पाप–पुण्य, मुक्ती या संकल्पना या नायकाच्या वडिलांच्या मनात घट्ट रूजलेल्या दिसतात. मुलाने त्याच्या संसाराची कर्तव्यपूर्ती न करताच तो मृत झाला त्यामुळे त्याला मुक्ती मिळाली नाही असा विचार करून तो मुलाची अर्धी राहिलेली जबाबदारी आपल्यावर घेताना दिसतो. त्याच्या श्रद्धाशिलतेमुळेच त्याच्या मनावर पाप–पुण्याचा, मोक्षाचा पगडा दिसून येतो.

### ६. युद्ध :

**युद्ध :**

जनरल मॅनेजर जोग यांची प्रॉडक्शन मॅनेजर पदावरून जनरल मॅनेजर पदावर बढती होते तेव्हा भिक्षुकी करणारे वडील रामेश्वराला जोग यांनी व्यक्त केलेली एकादशीची करण्याची इच्छा असताना ते रामेश्वराला एकादशीच्या ऐवजी लघुरूद्र करतात. प्रसादाचे फूल आणि अंगारा पाकिटात मुलासाठी पाठवून देतात. मुलाला पत्राच्या प्रत्युत्तरात मोठा हो, भरपूर पगार कमव, बंगला बांध, मोटार घे असा आशीर्वाद देतात. त्यांनी रामेश्वराची खूप वर्षे सेवा केली ती फुकट न जाता त्याचे फळ म्हणून मुलाच्या आयुष्यात सर्व शुभच घडेल अशी आशा व्यक्त करतात. (पृ.११,१२,१३) मुलाला सुखी ठेवणे, त्याची भरभराट होणे, त्याच्या आयुष्यात सर्व शुभ गोष्टी घडणे या सर्व गोष्टी रामेश्वराच्या कृपेमुळेच होतात अशी त्यांची गाढ श्रद्धा दिसून येते.

ह. मो. मराठे यांच्या कथासंग्रहांमध्ये पुरुषांची श्रद्धाशीलता चांगली असल्याचे दिसून येते. या कथासंग्रहांमध्ये आलेली पुरुषपात्रे आपली कर्म करताना कधी देवावर श्रद्धा ठेवून आपले जीवन समर्पित करतात. पंत परमेश्वरावर श्रद्धा ठेवून त्यांची पूजा अर्चा, नामजप करून जीवन सार्थकी लावतात तर अविनाश सारखे पुरुषपात्र आईवडिलांनाच परमेश्वराचा दर्जा देऊन त्यांची सेवा करतात. शंकर देवावर भरोसा ठेवून आपल्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी परमेश्वरावर टाकून स्वत: विरक्त होऊन त्याची सेवा करताना दिसतो. अविनाश वडिलांचा शब्द प्रमाण मानून,

ईश्वरीय कार्य समजून वर्तन करतात. तर भिक्याभट नावाचे पुरुषपात्र भिक्षुकीच्या नावाखाली पैशांसाठी लाचारी पत्करतानाही दिसतात. वृद्धापकाळी जेव्हा माणसांचा सहवास मिळेनासा होतो तेव्हादेखील ही पुरुषपात्रे परमेश्वरावर आपला भार सोडून निवांत होतात. पाप, पुण्य, मोक्ष या संकल्पनांची भिती ही पुरुषपात्रे मानत असल्याने, श्रद्धेच्या भावनेपोटी काही वाईट कामे करण्यापासून परावृत्त होतात आणि विधायक कामांची सुरूवात होताना दिसते. पंत गंगाधर, शंकर, केळकर यांसारखी पुरुषपात्रे श्रद्धाशील असल्यानेच आणि पाप पुण्याची भिती बाळगत असल्याने स्वत: तर चांगले वागतातच परंतु समाजातही चांगले विचार पसरवतात. श्रद्धाशीलतेमुळे पुरुष वाईट गोष्टींपासून, दूराचार, पाप इ. पासून काही अंशी तरी अलिप्त राहतात हेच यातून स्पष्ट होण्यास मदत होते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

नायकाची पत्नी वसू गर्भवती असतानाही नायक तिच्याकडून नोकरीची अपेक्षा धरतो. त्यासाठी तो भरपूर प्रयत्न करतो पण शेवटी अपयशी ठरतो. या दरम्यान आपण वसूची काळजी घेतली नाही; आपण एकदम नराधम झालो आहोत याची त्याला जाणीव होते. हे सर्व पाप आहे असा विचार करून हा नायक परमेश्वराकडे प्रार्थना करतो की, या जन्माच्या या कृत्याबद्दल मला पुढच्या जन्मी नरकात ढकल पण वसूला नोकरी मिळू दे. वसूला नोकरी मिळत नाही तेव्हा त्याला परमेश्वराची आठवण येते आणि आपण कित्येक दिवसात देवळात गेलो नसल्याचीही जाणीव होते. वसूला आणि आपल्याला मुलगाच होण्यासाठी आपण रोज वसूला घेऊन देवळात येऊ, त्यानिमित्ताने आपण रोज आपले देवळात येणे होईल असा विचार करताना हा नायक दिसतो. आपल्या आयुष्यातून देव हद्दपार झाल्यामुळेच आपल्या वाट्याला दु:ख येते. देवावर श्रद्धा ठेवली की, सर्व देवाच्या मर्जीने होते असा विश्वास निर्माण होऊन निश्चित राहाता येण्याचा विचारही तो करतो आणि हाच परमसुखाचा मार्ग असल्याच्या निर्णयाला येऊन पोहोचतो. (पृ.२५,२६)

नायकाच्या या विचारप्रवाहावरून असे दिसते की, नायकाच्या सुख–दु:खाच्या कल्पनांमागे पाप पुण्याची संकल्पना दिसून येते. आपण देवावर श्रद्धा ठेवली तर आपल्या हातून

पुण्यच घडेल पाप घडणार नाही, आपल्यावर दु:ख, संकटे येणार नाहीत अशी आशा तो धरतो. त्याच्या या श्रद्धेवरून त्याची धार्मिक–देवभोळी वृत्ती समोर येते. एकीकडे तो दु:खी–कष्टी–संकटात आहे म्हणून त्याला देव–धर्म आठवतो तर दुसरीकडे आपण नोकरीच्या शोधात मग्न असल्याने, आर्थिक विवंचनेत असल्याने आपण देवळात गेलो नाही असेही प्रतिपादन तो करतो. वसूला आपण त्रास दिला असा अपराधीपणाचा सूरही त्याच्या भाविक–धार्मिक वृत्तीतून डोकावताना दिसतो. यावरून पुरुषांची श्रद्धाशीलता परिस्थितीसापेक्ष दिसते.

रोज देवळात जाऊन देवाला प्रार्थना केल्यावर मुलगाच होईल ही नायकाची भाबडी श्रद्धा दिसून येते. शिक्षण घेतलेला नायक मुलगा मुलगी होणे हे परमेश्वरावरच अवलंबून असल्याचे चित्र समोर येते.

नायकाच्या श्रद्धाशीलतेवर भाष्य करताना प्रा. नीलिमा पालवणकर म्हणतात,

“आपल्या आयुष्यातून देव पूर्णपणे हद्दपार झाल्यासारखा झाला आहे. त्यातून सारी दु:खे जन्म घेतात. देव मानला की सारं देवाच्या मर्जीवर सोपवून निर्घोर राहता येतं. खरोखर हाच परमसुखाचा मार्ग आहे. बुद्धीवाद्यांनी सालं हे माणसाच्या आयुष्यातलं सुख हिरावून घेतलं. आपण बुद्धीवादी असल्यामुळे सर्व गोष्टी देवावर सोपवून आपणाला निर्घोर राहता येत नाही. आपलं ओझं आता आपणच पेलायचं आहे. परंतु वसू मात्र अशी निर्घोर राहू शकेल. आपल्या आयुष्यातून देव हद्दपार झाल्यामुळे आपले ओझे आपण पेलायला हवे. हे नवे भान नायकाला येते हे भान मूल्यात्मक आहे.”[१]

नायकाची श्रद्धा त्याच्यावरील संकटांमुळे कमी झालेली असल्यामुळे नायक चिंताग्रस्त दिसत असला तरी नायकाच्या या विचारांमागे असलेली त्याची श्रद्धाशीलताच दिसून येत असल्याचे मत प्रा. नीलिमा पालवणकर मांडतात.

**२. काळेशार पाणी :**

या कादंबरीतील बाळ्या भट नावाचे पुरुष पात्र भटजीचे काम करताना दिसते. सत्यनारायणाची पूजा, अभिषेक अशी कामे त्याला त्याच्या वंशपरंपरेने आणि जातिव्यवस्थेने करावी लागत असली तरी यामागे त्याची धार्मिक प्रवृत्ती दिसून येते. कार्यकारण–संबंध कोणताही

असला तरी भटजीचे काम करताना पाळावयाचे नियम आचार विचार व्यवस्था यामागे धार्मिक रूढी परंपरा दिसून येतात. भटजीचे काम करताना ते काम करण्यामागे असलेली प्रेरणाही श्रद्धाशील वृत्तीत दिसून येते. (पृ.४४)

**३. इतिवृत्त :**

मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे यांचे देवीचे मंदिर कुलदैवत असते. त्यांच्या धार्मिक वृत्तीमुळे त्यांची या देवीवर अपार श्रद्धा असते. दरवर्षी अण्णासाहेब जगदाळे सहकुटुंब देवीच्या दर्शनाला येतात. मंदिरात आल्यावर ते पूजा, अभिषेक, गोवभोजन असे सोपस्कार करताना दिसतात, यावरून त्यांची देवीवरील गाढ श्रद्धा दिसून येते. मुख्यमंत्री होण्यापूर्णी ते देवीला नवस बोलतात. मुख्यमंत्री कर, मुख्यमंत्री झालो तर देवीला सोन्याचा मुखवटा देईन असा नवस ते बोलतात आणि मुख्यमंत्री झाल्यावर तो नवस फेडतात. देवीच्या कृपेमुळेच आपण मुख्यमंत्री झालो असून देवीचा नवस फेडणे हे आपले कर्तव्यच ते मानतात आणि त्याप्रमाणे आचरण करतात. (पृ.६८) मुख्यमंत्री दैनंदिन जीवनातही चहापाणी घेण्याअगोदर स्वामींची पूजा–आरती करताना दिसतात. त्यांच्या या सवयीमुळे त्यांची श्रद्धाशील वृत्ती समोर येते. (पृ.७२,७४,२६३)

**४. कुरूक्षेत्र :**

अरूण फराटे डॉ. म्हसकरांचा खूण प्राचार्य बेलसरेंसमोर करतो. परंतु प्राचार्य बेलसरे भितीने याची वाच्यता कोठेही करत नाहीत. परंतु या गोष्टीची चिंता आणि डॉ. म्हसकरांचे पवित्र कार्य पुढे नेण्यात येणाऱ्या अडचणी यांमुळे भयग्रस्त आणि चिंताग्रस्त दिसून येतो. त्यांची गीतेवर श्रद्धा दिसून येते. त्यामुळेच ते गीतेचे नित्यपठण करताना दिसतात. त्यांच्या तोडातून गीतेतीलच 'किं कर्म किमकर्मेति कवयोप्यत्रमोहिता:' सारखा श्लोक भावेसमोर मन मोकळे झाल्यावरही बाहेर पडतो. (पृ.५८,६५) प्राचार्य बेलसरे श्रद्धाशील असल्यामुळेच ते गीतेचे नित्यपठन करताना दिसतात.

**५. देवाची घंटा :**

गोप्याभट मारूतीचा पुजारी असतो. मारूतीची पूजा–अर्चा–अभिषेक करून जे उत्पन्न मिळत असे त्यावरच त्याचा आणि त्याच्या कुटुंबाचा चरितार्थ चालतो. गोप्याभट हे पुजाऱ्याचे

काम चरितार्थासाठी करत असला तरी त्याची मारूतीवर श्रद्धा दिसून येते. त्यामुळेच तो शनिवारी दिवसभर उपवास करून रात्री एकदाच जेवण करतो. आपल्यावर मारूतीरायाची कृपा आहे त्यामुळे आपल्याला चिंता करण्याची गरज नाही. मुलांना मारूतीरायांच्या कृपेनेच पेढे खाता आले असा श्रद्धाभाव तो बाळगताना दिसतो. (पृ.१०,१२,१३,१४,१७)

बापू झांटेचा एक कोटीचा माल कस्टमवाल्यांच्या तावडीतून सुटून सुखरूप आला म्हणून बापू झांट्ये मारूतीच्या देवळात केळी आणि पेढे घेऊन येतो. मारूतीच्या चरणी नतमस्तक होतो. हे सर्व मारूतीच्या कृपेनेच झाले असे तो मारूतीरायाजवळ भाव व्यक्त करतो आणि शंभर रूपयांची नोट दानपेटीत टाकतो. मारूतीरायाची कृपा झाली म्हणून एक कोटीचा माल सुखरूप आला. त्याची कृपा झाली तर आपली अजून भरभराट होईल. आपणही मारूतीच्या नावाने अकरा ब्राह्मण जेवायला घालण्याचे, देवळाला माडी बांधण्याचे, नंदादीप चालू करण्याचा मानस तो देवासमोर व्यक्त करताना दिसतो. हे सर्व तो त्याच्या ठायी असलेल्या श्रद्धाळू वृत्तीमुळेच करतो असे दिसते. (पृ.५९)

बापू झांट्येचा माल पकडला जातो तरीही तो देवच माझी परीक्षा बघतोय असे समजून मारूतीची क्षमा–याचना करतो. संकटातून तारणारा आणि मारणाराही मारूतीरायाच आहे असे बापू झांट्ये म्हणतो. यावरून त्याची मारूतीरायावरील गाढ श्रद्धा दिसून येते. (पृ.१६५)

**६. मार्केट :**

तात्या गीताई आश्रमात एकटेच राहत असत. त्यामुळे ते आपला वेळ गीताईचे श्लोक, गीता प्रवचन, वाचणात घालवताना दिसतात. त्यांच्या कार्यावरून आणि आचार–विचारांवरून त्यांची देश, देव यांच्यावरील श्रद्धाशीलता समोर येते. (पृ.१६४) तात्यांच्या मनाविरूद्ध त्यांच्या मुलाने त्यांना फसवून गीताई आश्रम विकण्यासाठी त्यांची सही घेतली होती. तेव्हा मुलाच्या आणि मुलीच्या स्वार्थी वृत्तीपुढे ते हतबल होतात. तेव्हा त्यांच्या तोंडातून एक श्लोक बाहेर पडतो; 'त्येन त्यातेन भुंजीथा:| मा गृध: कस्यचित धनम|' या त्यांच्या तोंडातून हतबलतेच्य वेळी बाहेर पडलेल्या श्लोकावरून त्यांची श्रद्धाशीलता समोर येते. (पृ.१७७) श्रद्धेपुढे तात्या स्वत:चे

वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवताना दिसतात. श्रद्धेमुळे माणसाची आसक्ती कमी होताना दिसते असे चित्र ह. मो. मराठे तात्यांच्या माध्यमातून व्यक्त करतात.

**७. प्रास्ताविक :**

लेखक असलेल्या मनोहरपंत यांच्या कंपनीचे मालक भिकशेट परांजपे यांची श्रीकृष्णावर श्रद्धा दिसून येते. शेटजी अत्यंत गरीब परिस्थितीतून वर आले होते. चाळीस वर्षात त्यांनी अनेकप्रकारचे उद्योगधंदे चालविले. श्रीकृष्ण हे त्यांचे आराध्य दैवत असल्याने त्यांच्या कृपाप्रसादानेच हा सर्व विस्तार झाला असल्याचे ते मानतात. त्यांच्या कापड दुकानाला 'श्रीकृष्ण कापडदुकान' असे नाव देतात आणि उद्योगधंद्याचा विस्तार झाल्यानंतरही 'श्रीकृष्ण इंडस्ट्रीज' हे नाव ते सुरू ठेवतात. गोकुळाष्टमीचा उत्सवही ते मोठ्या भक्तिभावाने साजरा करतात. (पृ.४७,४९) त्यांची श्रीकृष्ण भक्ती त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येते.

श्रीकृष्णाच्या भक्तीमुळे आणि श्रद्धेमुळे त्यांच्या मनात अध्यात्माचे आणि विरक्तीचे विचारही घोळत असत. गीतेमध्ये सांगितलेला कर्मयोग त्यांना आवडत असतो. गीतेचा अर्थ श्रवण करणे त्यांना आवडते. गीतेचे तत्त्वज्ञान ऐकून त्यांना विरक्तीची इच्छा उत्पन्न होताना दिसते. त्यामुळेच ते दोनतीन कारखाने नीट सुरू झाल्यावर आपण निवृत्त होण्याचा विचार करतात. एकेकाळी अन्नाला महाग असलेल्या शेटजींकडे हजारो कामगार, शेकडो प्रोफेशनल मॅनेजर्स आणि इतर हजारो लोक काम करीत असतात. हे सर्व श्रीकृष्णकृपेनेच साध्य होते असा विचार करून शेटजींनी 'कृष्णकृपा' हाऊस जर्नल सुरू केले होते आणि त्यात कंपनीतील घडामोडींबरोबरच प्रत्येक अंकात एक कृष्णकथा किंवा गीतेचा अर्थासह एखादा श्लोक छापला जाई. (पृ.४९५) उद्योगव्यवसाय सांभाळताना त्यांनी रूजविलेली कृष्णभक्ती त्यांची श्रद्धाशीलता अधोरेखित करते.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रे स्वत:च्या गरजेनुसार परमेश्वराचे अस्तित्व स्विकारतात किंवा नाकारतात याचा प्रत्यय येतो. 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील नायक नोकरीसाठी धडपडत असताना प्रयत्न करूनही नोकरी मिळत नाही तेव्हा त्याला परमेश्वराची आठवण येते. प्रारंभीच्या काळात तो देवळात जात असल्याचे सूचन येते. गर्भवती पत्नीला आपण देवळात घेऊन गेलो आणि मुलगा व्हावा अशी आराधना केली तर मुलगाच होईल अशी

मानसिकता व्यक्त होते. 'काळेशार पाणी' मधील बाळ्याभट गावातील मंदिराची पूजा करणे, अभिषेक करणे, सत्यनारायण, पूजा सांगणे यांसारखी कामे परंपरेमुळे करताना दिसतो. पुजारी हा देवाचा भक्त. त्याच्याकडून प्रांजळपणा, प्रामाणिकपणा, नैतिकता, सत्यनिष्ठा अशा विविध अपेक्षा असतात मात्र देवाची पूजा करणारा हा पुजारी अनैतिक अशा स्वरूपाची कृत्येही करताना दिसतो. 'इतिवृत्त' मधील मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे शिवकालीन देवीच्या मंदिरात जाऊन मुख्यमंत्री कर असा नवस बोलतात, तो पूर्ण करतात. एवढेच नाहीतर प्रतिवर्षी तेथे जाऊन पूजा, अभिषेक, अन्नदान करतात. यावरून त्यांची देवीवरील श्रद्धा व्यक्त होते. 'कुरूक्षेत्र' मधील अरूण फराटे यांच्याकडून डॉ. म्हसकरांचा खूण प्राचार्य बेलसरे यांच्यासमोर होतो. हा प्रसंग बेलसरे विसरू शकत नाहीत. त्यांचे मानसिक स्वास्थ्य पूर्णपणे बिघडते. अशावेळी एक उपाय म्हणून ते भगवद्गीतेचे नीत्यपठण करतात. येथे बेलसरे यांची श्रद्धाशीलता प्रत्ययाला येते. 'देवाची घंटा' मधील गोप्याभट हा मारूतीचा पुजारी आहे. अत्यंत श्रद्धेने त्याची तो नित्यपूजा करतो. त्याच मंदिरात काम करणाऱ्या येसुशी जवळीक साधतो. पुढे त्यांच्या अनैतिकतेतून दोन मुले जन्माला येतात. मंदिरातून मिळणाऱ्या उत्पन्नातून सर्वांचाच उदरनिर्वाह करणे त्याला शक्य होत नाही. तेव्हा तो मंदिरातील देणगीचे शंभर रूपये चोरतो. येथेही गोप्याभट पुजारी या नावाला काळिमा म्हणूनच पुढे येतो. देवावरील श्रद्धा म्हणून नव्हे तर उदरनिर्वाहाचे साधन म्हणून तो येतो.

'मार्केट' मधील तात्या हे पात्र खऱ्या अर्थाने धार्मिक श्रद्धा जपणारे आणि त्याप्रमाणे आचरण करणारे असे आहे. आश्रमात राहून आपला वेळ गीतेतील श्लोक, गीताप्रवचन यांमध्ये व्यतीत करताना दिसतात. 'प्रास्ताविक' या कादंबरीमधील भिकशेट परांजपे हे श्रीकृष्ण भक्त आहेत. ते श्रीकृष्ण भक्त असल्याने त्यांची उद्योग व व्यवसायातील भरभराट श्रीकृष्ण कृपेनेच होत असल्याचे ते मानतात. गोकुळाष्टमीसारखा उत्सव ते आनंदाने साजरा करतात. यातूनच त्यांची श्रीकृष्णवरील श्रद्धा प्रत्ययाला येते. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रे ही कधी गरज म्हणून, कधी उपचार म्हणून तर कधी स्वार्थ म्हणून तर कधी खऱ्या भक्तीभावाने वेगवेगळ्या देव–देवतांच्या पूजा करताना दिसतात. कधी मनापासून तर कधी बेगडी स्वरूपाची पुरुषांची श्रद्धाशीलता प्रत्ययाला येते.

## २. पुरुषांची बंडखोरी :

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याला आपले जीवन जगण्यासाठी आणि दैनंदिन गरजा भागविण्यासाठी समाजात देवाणघेवाण करणे ही नित्याचीच बाब असते. समाजाशिवाय एकटा माणूस जगू शकत नाही. त्याला जीवन जगण्यासाठी अनेक घटकांची आवश्यकता असते. त्याला जीवनावश्यक वस्तुंबरोबरच गुण आणि दुर्गुणसुद्धा समाजातच मिळतात. आपले अस्तित्व तो समाजशिवाय सिद्धच करू शकत नाही.

समाजात वावरत असताना उदरनिर्वाहासाठी पुरुषांना काहीतरी काम, नोकरी–व्यवसाय हा करावाच लागतो. त्यासाठी त्याला सतत संघर्ष करावा लागतो. कधी तो शारीरिक स्वरूपाचा असतो तर कधी मानसिक स्वरूपाचा असू शकतो. कधी शिक्षणासाठी तर कधी आर्थिक बाजू सावरण्यासाठी. अशा विविधप्रकारचे संघर्ष करत करतच मानव आपली उपजीविका चालवितो परंतु हे सर्व करत असताना कधी–कधी त्याच्या स्वत:च्या तर कधी कुटुंबाच्या स्वत्वाला धक्का पोहोचतो, नीतिमूल्यांवर गदा येते. तेव्हा तो आवाज ऊठवतो. झालेल्या अन्यायावर तो पेटून ऊठतो. सर्व शक्तीनिशी तो प्रतिकार करण्याचा प्रयत्न करतो. हा प्रतिकार म्हणजेच ही समाजाविरूद्ध केलेली बंडखोरी कशा स्वरूपाची असू शकते आणि त्याचे परिणाम काय आणि कसे होतात याचा विचार करणे येथे इष्ट ठरेल. ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांची बंडखोरी यांवर येथे दृष्टिक्षेप अपेक्षित आहे.

### कथासंग्रह :

### १. सापेक्ष :

### जी सरकार :

साहेबराव शिर्के यांनी कौसल्याबाई यांना फळबागेची जबाबदारी, मालकीत्व दिलेले असते आणि त्यांची मुलाखत घेण्यासाठी मोहन कुलकर्णी यांना गोविंदरावांनी पाठविलेले असते. परंतु मोहन कुलकर्णी कुणाचीही भिडभाड न बाळगता कौसल्याबाईंची मुलाखत घेतात. परिणामी ते साहेबराव शिर्के म्हणजेच सरकारस्वारी यांचा रोष ओढवून घेतात. मोहन कुलकर्णींना सांगितले जाते की, एखाद्या कामगिरीवर पाठवले तर मनाला पटले नाही तरी ते काम करायचे, मुलाखत

घ्यायची सरकार स्वारींच्या खानदानाची इज्ज़त घालवायची नाही. साहेबराव शिर्के म्हणजेच सरकारस्वारी कामात दिरंगाई, चुका होऊ नये म्हणून मोहन कुलकर्णीला म्हणतात,

‘आमच्या किंवा कोणाच्याच वडिलोपार्जित वारसाहक्काने आलेल्या इस्टेटीविषयी असं बोलायचं नाही. कायदेशीर मार्गांनीच आम्ही काय किंवा इतर कोणी काय इस्टेटी संपादन केलेल्या आहेत. तुमच्या वाट्याला तुमच्या वाडवडिलांनी दारिद्र्याचाच वारसा ठेवला त्याला आम्ही काय करणार?’ (पृ.९१) साहेबराव शिर्के यांनी केलेला अपमान मोहन कुलकर्णीला अस्वस्थ करतो. त्यांच्या कामाच्या ठिकाणी मिटींगला दरबार भरणे असे बोलणे अनिवार्य होते तर सरकारस्वारी स्थानापन्न झाल्याशिवाय इतरांनी बसायच नाही. चहा पिताना सरकारस्वारी कप तोंडाला लावीपर्यंत इतरांनी वाट बघत रहायचं. पण मोहन कुलकर्णींना हे मान्य होत नाही. दरबार भरल्यावर सरकारस्वारी आल्यानंतर सगळे उठून उभे राहतात. पण मोहन कुलकर्णी उठून उभा रहात नाही. साहेबरावांची नजर तापल्यानंतरही तो त्याची दखल घेत नाही. उलट, ‘तापू दे. तापायला हवी. अजूनही तापायला हवी. सवय होऊ दे. त्या नजरेला. कोणीतरी असतं सरंजामी रिवाजांना आव्हानं देणारं. ते नाकारणारं.’ मोहन कुलकर्णीच्या या कृतीवर आक्षेप घेत सरकारस्वारी दरबारात आदेश देतात,

‘आमच्या रिवाजांचे पालन सेवकवर्गाकडून झाले पाहिजे. आमच्या वाडवडिलांपासून हे रिवाज चालत आले आहेत. ते चालू राहिले पाहिजेत. मग ते संस्थान असो, जाहागीर असो की आमचं ऑफिस असो. सेवकांनी मालकवर्गाला सरकार म्हणून संबोधलं पाहिजे. सरकारस्वाऱ्यांचा योग्य तो मान ठेवला पाहिजे.’

‘याला कोणाचा विरोध आहे?’

‘आहे?’ (पृ.९३)

‘आहे’ ठाम आवाजात मोहन कुलकर्णीने प्रत्युत्तर देतात. मोहन कुलकर्णी यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरूद्ध, सरंजामशाहीविरोधी प्रथांविरूद्ध ते बंड करतात. कोणत्याही गोष्टीची भिती न बाळगता ते या अनिष्ट गोष्टींविरोधी बंडखोरी करताना दिसतात.

२. पक्षिणी :

**व्रणार्त :**

अविनाश आणि त्याचे तीन मित्र नोकरीच्या शोधात मुंबईला येतात. वशिला आणि ओळख नसल्याने त्यांना नोकरी मिळत नाही. यावर चर्चा करत ते चौघेजण मद्यपान करत बसतात. त्यावर त्यातील एकजण उपाय सुचवतो की, रात्री इंटरव्ह्यू घेणाऱ्या साहेबांच्या घरी जाऊन त्यांना सांगायचं आमची बायको एकेक रात्र तुमच्याकडे पाठवतो ताबडतोब अपॉइंटमेंट– हे सर्व सहन न झाल्याने अविनाश त्याच्या अंगावर झडप घालून त्याचं नरडं धरतो. त्याचा कोंडलेला राग उफाळून येतो. (पृ.५९) अविनाश त्याच्या मित्राच्या विचारांवर त्याची प्रतिक्रिया व्यक्त करतो. तो एका व्यक्तीविरोधात बंड करतो परंतु त्याच्या मनात संपूर्ण समाजव्यवस्थेच्या विरूद्ध राग असतो तो राग व्यक्त होण्यासाठी हे फक्त एक कारण ठरते.

**विरूप :**

या कथेतील नायक बागूल एक सुशिक्षित बेकार. नोकरीसाठी प्रयत्न करून नोकरी मिळत नाही. वशिला लावण्यासाठी ओळख, पैसे नसतात म्हणून तो भाड्याने रिक्षा चालविण्याचा धंदा नाइलाजाने करतो. इंटरव्ह्यूची तयारी करत असताना घरातील दिव्याचे तेल संपते तेव्हा रॉकेल आणण्याइतके पैसे नसतात. तो मारवाड्याच्या दुकानात रॉकेल आणण्यासाठी जातो तर रॉकेल संपलेले असते त्याला हे उत्तर अनपेक्षित असल्याने त्याला अपमानास्पद वाटते. त्याने आवेशाने दुकानाच्या पायऱ्या चढून शेठजींची कॉलर पकडली. मानगूट पकडून दातओठ खात तो शेठजीला म्हणतो,

"बऱ्या बोलाने रॉकेल देतोस की दुकान लुटू दे ते सांग. सालं यावं तेव्हा साला प्रत्येक वस्तूला नकार. रॉकेल आहे? नाही, तांदूळ आहे? नाही, साल लावलंयस काय? बऱ्या बोलानं रॉकेल दे, नाय तर बघ." (पृ.७१)

त्याच्या डोळ्यातून संताप वहात असतो. घरची गरिबी, नोकरीसाठी प्रयत्न केले तर तिथे अपयश, गरिबांना मिळणाऱ्या रेशनच्या सवलतीतही भ्रष्टाचार इ. सर्व गोष्टींचा त्रास सहन न झाल्याने आवेगाने हा नायक बंडखोरी करताना दिसतो. (पृ.६८,६९,७०,७१) एका

सर्वसामान्य, गरीब नायकाला जर छोट्या छोट्या दैनंदिन गरजा भागवतानाही संघर्ष करावा लागला तर त्याकडून कधीतरी बंडखोरी घडून येत असल्याचा प्रत्यय येथे येतो. अन्यायाचा प्रतिकार करताना कधी कधी न्याय मिळत नसेल तर बंडखोरी अटळ असल्याचे चित्रण येथे दिसून येते.

**३. दावं :**

**समाधी :**

पूर्शा आणि सिंधू यांचे नविनच लग्न झालेले असते. पूर्शा भिक्याभटाच्या घरी राहत असतो. भिक्याभट सिंधूचे पूर्शाबरोबर जाणिवपूर्वक लग्न लावून देतो कारण पूर्शा साधा भोळा आणि त्यांच्या उपकाराच्या ओझ्याने दबलेला असतो. भिक्याभटाचा सिंधूवर डोळा असतो परंतु पत्नीच्या आणि समाजाच्या दिखाव्यासाठी तो सिंधूचे लग्न पूर्शाबरोबर लावून सिंधूला जवळच ठेवण्याचा मार्ग शोधतो. त्यांचे नविनच लग्न झालेले असतानाच भिक्याभट सिंधूवर जबरदस्ती करतो. पत्नीच्या लज्जारक्षणासाठी पूर्शा भिक्याभटावर धावून जातो. एरवी तो भिक्याभटाकडे मोठी व्यक्ती म्हणून आदराने पाहतो. परंतु जेव्हा भिक्याभट पूर्शाच्या पत्नीकडे वाकड्या नजरेने पाहतो, तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा पूर्शा भिक्याभटाला त्या पापकर्मातून परावृत्त करण्यासाठी पापपुण्याची जाणीव करून देतो. तरीही तो परावृत्त होत नाही हे पाहून तो पहार घेऊन भिक्याभटावर धावून जातो. (पृ.१४७,१४८) जेव्हा स्वत:वर किंवा स्वत:च्या समोर दुसऱ्या व्यक्तीवर अन्याय, अत्याचार होतो तेव्हा पुरुषांना बंडखोरी करणे, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी उभे ठाकणे अनिवार्य ठरते हेच येथे प्रत्ययाला येते.

पूर्शाने मनात बाबांची समाधी बांधण्याचा ध्यास घेतलेला असतो. त्यासाठी खानावळीत काम करी, देवळात पूजा करी, भटपणाची कामे करतो. आजारपणातसुद्धा पैसे खर्च न करता बाबांच्या म्हणजेच भिक्याभटाच्या वडिलांची समाधी बांधण्यासाठी पै–पै साठवितो. त्याचे समाधी बांधण्यासाठी साठविलेले हजार रूपये भिक्याभट लुबाडतो. भिक्याभट पूर्शाचे हजार रूपये लुबाडतो वर समाधी बांधत नाही. हे पाहून पूर्शा संतापाने थरथरत हातात दांडका आणि कंदील घेऊन मध्यरात्रीच भिक्याभटाकडे पैसे मागण्यासाठी जातो. एखाद्या पिशाच्यासारखा तो थरथरत

भिक्याभटासमोर उभा राहतो आणि न डगमगता तो भिक्याभटाला म्हणातो, 'माझे पैसे टाक. दिवस–रात्र कष्ट करून कमावलेत. पोटाला खाल्ले नाही, का अंगाला लावले नाहीत. बाबांची समाधी बांधायचीय मला. मी आता मरतो. समाधी बांधल्याशिवाय मला सुखानं मरण नाही – टाक पैशे, टाक –' तो जिवाच्या ओढीने किंचाळतो. (पृ.१५४,१५८) स्वत:च्या कष्टाची कमाई दुसऱ्याने फसवून खाणे आणि त्या कमाईच्या नाशाने जो त्रास होतो त्या त्रासाचा, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी पुरुषांना बंडखोरी करण्यापलिकडे काही पर्याय उरत नसल्याचे येथे ह. मो. मराठे चित्रीत करताना दिसतात.

**४. घोडा :**

**घोडा** :

सुधाकर बापटला एम.डी. नी केबिनमध्ये बोलावून झापले आणि यामागे जोगांचा हात असल्याचा बापटला संशय असतो. तो मनातल्या मनात धुमसत टाईपरायटर बडवत असतो. ऑफिस सुटायच्या आधी पाच–सात मिनिटे स्वत: जोग त्याच्यापुढे येतात आणि एक अर्जंट पत्र टाईप करून द्यायला सांगतात, 'मी आज पुष्कळ काम केलंय' असे म्हणून तो जोगांना पत्र टाईप करण्यास नकार देतो. जोग डिपार्टमेंटल हेड असल्याने ते बापटला पत्र टाईप करून देण्याची सक्ती करतात. तेव्हा कोणी किती काम करायचं, याचं काही प्रमाण ठरलेलं आहे की नाही? असा प्रतिप्रश्न करतो. तुम्ही कामगार पुढारी झाल्यावर असा प्रश्न विचारा असे म्हणून जोग ते पत्र त्याच्यावर फेकतात. पण बापटही मला नाही जमणार. माय ड्यूटी अवर्स आर ओव्हर. असे भोंगा ऐकून सांगू लागतो मिसेस आंबेकर पत्र टाईप करण्यास तयार असूनही जोग बापटकडूनच पत्र टाईप करून घेण्याचा आग्रह धरतात तेव्हा बापट प्रतिकार करतो, 'इम्पॉसिबल' म्हणून तो बंदुकीच्या गोळीप्रमाणे शब्द उच्चारून तसाच बाहेर पडतो. (पृ.१६,१७) कनिष्ठ आणि वरिष्ठ यांच्यातील कामाचे ताणतणाव, मतभेद, वरिष्ठांचा मनमानीपणा, बॉसिंग या गोष्टी कनिष्ठांना बंडखोरी करण्यास भाग पाडताना दिसतात. नोकरदार आणि वरिष्ठ अधिकारी यांच्यातील दरीमुळे नोकरदारांना अन्यायाविरूद्ध बंड करणे याशिवाय दुसरा पर्याय नसल्याचे चित्र या कथेतून ह. मो. मराठे बेमालूमपणे मांडताना दिसतात.

**अग्नी :**

अतुल इंडस्ट्रीजमध्ये कामगार संप पुकारतात. मालकांनी ठाम धोरण स्विकारलेले असते ते कामगारांच्या मागण्या मान्य न करण्याचे. त्यामुळे कामगार अस्वस्थ होतात. तीन महिने कामगारांना पगार नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी येते. त्या कामगारांमधील मोहन पाटील नावाचा कामगार लीडर भाषणात म्हणतो, 'कामगार शरण येतील अशी मालकांची समजूत असेल तर ती चूक आहे. संप मागं घेतला जाणार नाही. आमचा लढा सुरू राहील. मालक मुजोरपणानं वागले तर त्यांना धडा शिकवावा लागेल. कामगारांचा अपमान करणाऱ्या मालकांचा आम्हीही अपमान करू आडमुठेपणाला आमच्यापाशी उत्तर आहे.' संप पुकारून, कामगारांचे नेतृत्व करून मोहन पाटीलने मालकांविरूद्ध बंड पुकारले होते. भाषण चालू असताना पोलिस येतात. तेव्हा मोहन पाटील कामगारांना अधिकच त्वेष चढेल असे शब्द उच्चारतो; हे मालकांचे भाडोत्री पोलिस आहेत. सरकारची ही प्यादी गुंडांवर काठी चालवणार नाहीत; पण उपाशी कामगारांवर गोळ्या झाडतील. सरकार मालकांच गुलाम आहे असे म्हणून तो कामगारांना दगड फॅक्टरीवर फेकून चीड व्यक्त करण्यास प्रवृत्त करतो. (पृ.५८,५९) कामगारांना सन्मान, कामाचा मोबदला नीट मिळाला नाही तर कामगार बंडखोरी केल्याशिवाय राहणार नाहीत हेच चित्र येथे स्पष्ट होताना दिसते.

**५. युद्ध :**

**युद्ध :**

प्रॉडक्शन सुपरवायझर कामाच्या पद्धतीवरून एका कामगाराला बोलतात. ते पाहून पांगारे युनियन मेंबरचा प्रश्न म्हणून मध्ये पडतात. सुपरवायझर त्याला त्याच्या कामाचे स्वरूप सांगून मध्ये न पडण्याविषयी बोलतात. त्यांच्यात शिस्तीच्या मुद्द्यांवरून मतभेद होतात. सुपरवायझरने कामगारांचा अपमान केला आहे असे सांगून पांगारे कामगारांना काम बंद करण्यास सांगतात. 'कामगारांचा अपमान करणाऱ्यांचा धिक्कार असो' अशा घोषणा देऊन पांगारे सुपरवायझरविरूद्ध कामगार आणि कामगार लीडर या नात्याने बंड पुकारतो. (पृ.२३,२४,२५)

## ५.२ केळकर हसला :

या कथेतील नायक आपल्या डिपार्टमेंटच्या मागण्यांचे एक निवेदन शेवडेसाहेबांकडे देतो. ग्रुपच्या मागण्यांसाठी ते साहेबांकडे जातात आणि सांगतात की, 'आम्ही सर्व इथं जनरल असिस्टंट म्हणून काम करतो, पण कंपनीन कधीच जनरल असिस्टंट पदाच्या ड्युटीज डिफाईन केलेल्या नाहीत. चेअरमन साहेबांच्या नातीच्या लग्नात अटेंडंट म्हणून राबणं हा आमच्या ड्युटीचा भाग आहे काय?' कामगारांना सन्मानाची वागणूक मिळावी, त्यांच्या ड्युटीज आणि कामाचं स्वरूप ठरवून द्यावं म्हणून केळकर मालकासमोर बंडखोरी करताना दिसतो. (पृ.१८३,१८४, १८५) आपल्या न्याय व हक्कासाठी हे कामगार आणि कामगार पुढारी बंडखोरी करताना दिसतात.

पुरुषांना दैनंदिन जीवन जगत असताना अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते. कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक क्षेत्रात काही घटना घडतात. त्या सर्वच घटना पुरुषांच्या मनाप्रमाणे घडल्या नाहीत तर त्या त्या ठिकाणचा पुरुष त्या घटनेविरूद्ध, परिस्थितीविरूद्ध आवाज उठवतो, अन्यायाविरूद्ध, चुकीच्या गोष्टींविरूद्ध बंड करत उठतो हेच येथे प्रत्ययाला येते.

'सापेक्ष' कथासंग्रहातील 'जी सरकार' कथेतील नायक मोहन कुलकर्णी साहेबराव शिर्के यांच्या आणि एकूणच व्यवस्थेच्या विरोधात बंड करतात. साहेबराव शिर्के उर्फ सरकारस्वारी यांचा अन्याय, अत्याचार, जबरदस्ती सहन न करता मोहन कुलकर्णी त्याविरूद्ध आवाज उठवतो.

'पक्षिणी' कथासंग्रहातील 'व्रणार्त' कथेतील अविनाश नोकरीच्या शोधार्थ असताना समोर येणाऱ्या भ्रष्टाचारी परिस्थितीच्या विरूद्ध, स्त्रियांना मिळणाऱ्या तुच्छ वागणुकीविरूद्ध बंड करून उठतो तर विरूप कथेतील बागूलच्या माध्यमातून सामान्य माणसांच्या सामान्य अधिकारासाठीसुद्धा बंड करावे लागल्याचे चित्र ह. मो. मराठे रेखाटतात.

'दावं' कथासंग्रहातील 'समाधी' कथेतील पूर्शा स्वकष्टाची कमाई परत मिळविण्यासाठी बंडखोरी करून आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतो.

'घोडा' कथासंग्रहातील 'घोडा' कथेतील सुधाकर बापट वरिष्ठांच्या मनमानीला, ताणतणावाला आळा घालण्यासाठी बंडखोरी करतो तर अग्नी कथेतील मोहन पाटील मालकांच्या मुजोरपणाला विरोध करण्यासाठी बंड पुकारतो.

'युद्ध' कथासंग्रहातील 'युद्ध' कथेतील कामगार लीडर पांगारे वरिष्ठांच्या विरूद्ध कामगारांच्या वतीने विरोध दर्शविण्यासाठी बंड पुकारतो, तर 'केळकर हसला' कथेतील नायक वरिष्ठ कामगारांना देत असलेल्या तुच्छ वागणुकीविरूद्ध आवाज उठवतो. सन्मानाची वागणूक मिळण्यासाठी वरील सर्व पुरुष बंडखोरी करताना दिसतात.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीतील नायक गोडसेकाकूंच्या खोलीत शिक्षणासाठी रहात असतो. परंतु जास्त पैशांसाठी गोडसेकाकू या नायकाला सारखे खोली खाली करण्याविषयी विचारतात. तेव्हा परीक्षा संपेपर्यंत तरी राहू देण्याची तो विनवणी करतो. परंतु काकू ऐकायलाच तयार नसतात तेव्हा काकू नायकाचा भिकारी म्हणून अपमान करतात. मग मात्र हा नायक संतापतो, पेटून ऊठतो आणि काकूंची जागा सोडण्याविषयी निर्णय घेतो. पण तो काकूंना जे प्रत्युत्तर करतो. त्यावरून त्याने केलेला आपल्यावरील स्वत:चा प्रतिकार दिसून येतो. "उडत गेलीस तू आणि तुझी जागा. मी रस्त्यावर बसून अभ्यास करीन. आगरकरांनी नाही केला?"

"मग केव्हा सोडतोस?"

"उद्या सोडतो. च्यायला हवी कशाला तुझी फुकटची भांचोदगिरी?" (पृ.१०,११) वरील वाक्यांतून नायकाचा संताप आणि त्यावरील त्याने ऊठवलेला आवाज मराठे नेमकेपणाने मांडताना दिसतात.

या कादंबरीतील नायक बेकार असल्याने आणि देसाईबाईंच्या शाळेत आपल्या पत्नीला नोकरी मिळावी या हेतूने तिचा गर्भपात घडवून आणतो आणि परत संस्थेच्या सेक्रेटरी आणि देसाईबाई यांची भेट घेतो, पण तेथे त्याला विचित्र प्रकार पहावयास मिळतो. शिवाय सेक्रेटरी या

नायकाच्या बायकोविषयी नैतिकतेच्या सर्व सीमा तोडून नोकरीवर ठेवण्याची भाषा करू लागतो तेव्हा हा नायक पुन्हा एकदा पेटून ऊठतो. आणि सेक्रेटरीला शिव्या देऊन त्याच्या शिक्षणसंस्था चालवण्यावर आक्षेप घेतो. तुम्ही शाळा चालवता की कुंटणखाने अशा परखड शब्दांत विचारणा करताना दिसून येतो. (पृ.७६,७७) आपल्या पत्नीचा झालेला अपमान तिच्या शीलावर आणि चरित्र्यावर येणारे संकट ओळखून हा नायक बंड करतो. त्याचा आतला आवाज त्याला आक्रमक बनायला भाग पाडतो. आपल्या पत्नीची नैतिक जबाबदारी आपल्यावर असल्याचे संपूर्ण भान या नायकाला दिसून येते. नोकरीसाठी, पैशासाठी पत्नीची मदत घेण्यासाठी नायक उत्सुक असलेला दिसून येत असला तरी तिचे शील आणि चारित्र्य अबाधीत ठेवण्याची जबाबदारीसुद्धा आपल्यावर आहे याचे भान त्याला आहे.

निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी मधील नायकाच्या बंडखोरीविषयी डॉ. केशव मेश्राम म्हणतात,

"दलित साहित्यातील विद्रोहामागे समाजाच्या एका वर्गाने आणि व्यवस्थेने, माणसांच्या तुच्छतेवर हजारो वर्षे जे सतत शिक्कामोर्तब करून, तू शूद्र वर्णाचा – वर्गाचा आहेस; अन्यवर्णियांची पडेल ती सेवा, मिळेल ते उच्छिष्टाचे बलुते प्राप्त करण्यात, मिळतील ते शब्द, अपशब्द व करतील ते वर्तन, सहन करण्यातच तुझा उद्धार आहे; ते झुगारण्याची निग्रही लढाऊवृत्ती आहे. तो एका व्यक्तीला एक नोकरी न मिळाल्याने त्याच्या स्वाभाविक सुखी जीवनाला कसे दुःखद रूप लाभले एवढ्यापुरता सीमित नाही. ह्याचा अर्थ ह. मो. मराठे यांच्या कादंबरीत तरी 'तो' च्या जीवनाची करूण कहाणी दुय्यम, हास्यास्पद किंवा नाकारण्यासारखी आहे असा मात्र नव्हे. दलित साहित्यातील विद्रोहाचा केंद्रबिंदू एक तात्त्विक, मानसिक, अनुभवजन्य, ग्रंथगत मौलिकता प्राप्त झालेली, सर्वांना स्वाभाविक वाटणारी विचारसरणी नाकारणारा आहे. ही त्याज्य व्यवस्था झुगारून, नवी मानव प्रतिष्ठेची, समानतेची मागणी ठामपणे, हक्काने व आत्मविश्वासाने मागणारा हा विद्रोह आहे. त्यामागे जागतिक वैज्ञानिक परिवर्तननिष्ठा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची – 'आत्त दीप भव' ही शिकवण आणि घटनेने सरनाम्याद्वारे बहाल केलेल्या हक्कांची सनद आहे."[२]

ह. मो. मराठे यांनी पुरुषांच्या बंडखोरीविषयी 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मध्ये जे संदर्भ येतात त्याविषयी प्रा. मधू जामकर म्हणतात, "लेखक हा स्वत:च्या काळाशी नेहमीच संवाद साधतो. पण संवादापेक्षा संघर्ष निर्माण होणे, त्यातून बंड पुकारणे हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला परिणाम देण्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. यातून केवळ अगतिकता किंवा आततायीपणा व्यक्त होत नसतो, तर त्यामागे एक विचारपूर्वक कृती असते. ती स्पष्ट करताना लेखक वाचकांपुढे काही मूलभूत प्रश्न निर्माण करतो; त्याची उत्तरे जाणून घेण्याची जिज्ञासा दाखवितो. ह. मो. मराठे यांच्या संदर्भात अशी जिज्ञासा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पुनर्रचना होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची वाटते. सामाजिक बांधिलकी म्हणून तिच्याकडे पाहता येईल अशी बांधिलकी नेहमीच गंभीरपणे, जबाबदारीच्या जाणिवेने पत्करली जाते. या संपूर्ण लेखनात लेखकाने ज्या जीवनानुभवाचा सामाजिक संदर्भाशी धागा जोडला आहे. त्यातून जी अंधश्रद्धा व्यक्त होते ती वांझोटी आहे काय? या प्रश्नाचे उत्तर वाचकांच्या आकलन शक्तीतून दिले जाईल."[३]

प्रा. जामकर यांनी येथे मांडलेले विचार पुरुषांच्या बंडखोरीविषयी आपले विचार मांडत वाचकांच्या आकलनावर ती अवलंबून असल्याचे सूतोवाच केले आहे.

'निष्पर्ण' मधील नायकाच्या बंडखोरीविषयी आपले मत मांडताना रवींद्र शोभणे म्हणतात, "मिस देसाईंच्या शाळेत गर्भवती बाई नको या एका सबबीवर तो आपल्या बायकोला पपया खायला देऊन तिच्या पोटातला गर्भ पाडतो; आणि त्यानंतर त्याला मिस देसाईंचे आणि शाळा सेक्रेटरीचे जे दिसते; तिथे तो एकदम खाड्कन जमिनीवर येतो. सेक्रेटरी त्याच्या बायकोच्या संदर्भात जेव्हा अवाजवी, अनैतिक अपेक्षा व्यक्त करतो, तेव्हा त्याच्यातला पीळदार, पौरूषयुक्त माणूस काही क्षणांकरिता का होईना, पण पेटून-चवताळून उठतो. प्रतिकारात्मक पवित्र्यात उभा ठाकतो; पण त्याचा हा प्रतिकार धनदांडग्यांच्या अर्थसत्तेपुढे, राजसत्तेपुढे आणि मनगटशाहीपुढे लूत भरलेल्या कुत्र्यासारखा लोळागोळा होऊन पडतो. एखाद्या बेवारस कुत्र्याला त्याच्या लोचटपणामुळे, लाचारपणामुळे कंटाळून जाऊन आणि तरीही त्याचे निरर्थक गुरगुरणे, भुंकणे ऐकून घरमालकाने लाठ्याकाठ्यांनी मनसोक्त झोडपावे, तुडवावे आणि अलगद उचलून

दाराबाहेर फेकून द्यावे, तसे शाळासेक्रेटरी आणि मिस देसाई त्याला लाथांनी मनसोक्त तुडवून दाराबाहेर फेकून देतात."[४]

डॉ. रवींद्र शोभणे पुरुषांच्या बंडखोरीविषयी जे विचार मांडतात त्यावरून असे म्हणता येईल की, पुरुषांची बंडखोरीही एका मर्यादेपर्यंतच चालू शकते. हा प्रतिकार आपल्यापेक्षा वरचढ लोकांपुढे निष्फळच ठरतो. पुरुष आपल्या वाट्याला आलेल्या प्रसंगांना समर्थपणे सामोरा जाण्याचा प्रयत्न करतो. बंडखोरी करतो. मात्र ज्यावेळी सर्वच गोष्टींपुढे सामोरे जाऊन इप्सित साध्य करता येत नाही त्यावेळी परिस्थितीशी जुळवून घेतो हे वास्तव मराठे यांच्या 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीतील नायकाच्या एकूणच वागण्यातून स्पष्ट होण्यास मदत होते.

**२. इतिवृत्त :**

श्रीरंग नाडकर्णी मुंबईच्या एका दैनिकात नोकरी करत असताना म्हणजेच उपसंपादक असताना 'फेरफटका' नावाचा कॉलम नियमितपणे लिहीत असतात, त्यांचे लिखाण वाचकांना खूप आवडते. परंतु सात–आठ महिन्यांनंतर नवीन संपादकांनी त्यांचा कॉलम जाणिवपूर्वक बंद केल्याने ते फळणीटकर उद्योगसमूहाच्या वर्तमानपत्राचे संपादक म्हणून काम स्वीकारतात. (पृ.९,१०) आपल्या मनासारखे काम करता येत नसल्याने व वरिष्ठांच्या मनमानीमुळे नाडकर्णी दुखावले गेले होते. परंतु या गोष्टीचा प्रतिकार कसा करावा या प्रश्नातूनच त्यांनी वरिष्ठांशी थेट बदला न घेता नवीन ऑफर स्वीकारून आपली प्रतिकाराची, नकारात्मक विचारसरणी ते आपल्या वरिष्ठांना आपल्या कृतीतून दाखवून देताना दिसतात. मानहानी सोसत तिथेच नोकरी करण्यापेक्षा तिकडे पाठ फिरविण्याचे धोरण नाडकर्णी स्वीकारतात.

जनता दैनिकाचे संपादक असताना नाडकर्णी हॉटेल कामगारांचे प्रश्न सोडवितात, नंतर ते दळवी उद्योगसमूहाच्या कारखान्यामधून बाहेर पडणाऱ्या टाकाऊ पदार्थांमुळे पाणी खराब होऊन अनेक लोकांचे आरोग्य खराब होत असल्याचे व काही लोक मरण पावल्याचे वृत्त आपल्या दैनिकातून प्रसिद्ध करतात. त्यानंतर त्यांच्यावर दळवी उद्योगसमूहाकडून हा प्रश्न दाबून टाकण्यासाठी दबाव येतो, परंतु कोणाच्याही धमकीची पर्वा न करता नाडकर्णी आपले काम चालूच ठेवतात. कोणाच्याही धमकीची पर्वा न करता नाडकर्णी आपले काम चालूच ठेवतात.

दळवी मुख्यमंत्र्याचे मित्र असतात, त्यांचे हात वरपर्यंत पोहोचलेले असल्याने नाडकर्णींना कामात व्यत्यय येतो. कारखानदारांनी दाखविलेल्या बेफिकीरीला आणि सरकारने त्यांना पाठीशी घालणे यामुळे तीन हजार लोकांचा प्रश्न निर्माण होतो पण नाडकर्णी, कोणाच्याही दबावाला बळी न पडता 'जनता' दैनिकातून लोकांच्या समस्यांना वाचा फोडतात. (पृ.१४२,१५०,१५१)

भ्रष्ट राजकारणाचा समाजाला कसा त्रास होतो आणि संतापलेली जनता नंतर नेत्यांचे कसे हाल करते याविषयीही नाडकर्णी बिनधास्तपणे आपली संपादकाची भूमिका पार पाडतात. अशाच एका बातमीमध्ये नाडकर्णी लिहितात,

"भ्रष्टाचाराचं प्रतीक म्हणून मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे यांच्या प्रचंड पुतळ्याचं दहन समाजपरिवर्तन युवक दलानं केलं. त्यावेळी जमावातून जुन्या चपला फेकून भ्रष्ट राज्यकर्त्यांबद्दलचा संताप व्यक्त करण्यात आला." (पृ.२४१) या सर्वांचा परिणाम म्हणून मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे यांच्या अनुयायी 'जनता' दैनिकाच्या कचेरीसमोर निदर्शने करतात. अंकाचे गठ्ठे जाळले जातात. अंक नेणाऱ्या गाड्या आणि ऑफिसवर दगडफेक होते. शिवाय 'जनता' चा अंक वाचकांना मिळत नाही. यावर दुसऱ्या वृत्तपत्रात बातम्या येतात. वाचकांची पत्रे येतात. वाचक संपादकावरच मर्मभेदी आरोप करतात. दुसरीकडे जनरल मॅनेजर अभ्यंकर नाडकर्णींना संपादक असूनही या घटनेची बातमी देऊ नका असा सल्ला देतात. या घटनेचा खुलासा छापू नये असे स्वत: बाळासाहेब फळणीटकरांनी सांगितल्याचेही त्यांच्या कानावर येते. त्यांची या सर्व प्रकाराने झालेली कोंडी पाहता अधिकारपद असूनही त्यांना आपले अधिकार वापरता येत नाहीत शेवटी या सर्व प्रकारावर प्रतिक्रिया म्हणून ते एका वाचकाचं पत्र जसंच्या तस छापून आपली झालेली गोची वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा निर्णय घेतात. (पृ.२४१,२४२,२४३,२४४)

आपल्यावर झालेल्या अन्यायाचा, गोचीची, कोंडमारीचा प्रश्न सोडविण्यासाठी नाडकर्णी आमदार गजानन नाईक यांना अण्णासाहेब जगदाळेंच्या विरूद्ध मुख्यमंत्री म्हणून निवडून येण्यासाठी बंडखोरी करायला प्रवृत्त करतात आणि पार्टी सुधारून तुम्ही मुख्यमंत्री व्हावे या कामी नाडकर्णी आपला पाठींबाही व्यक्त करतात. नाडकर्णींना या अन्यायाची गोष्टींची चीड येते त्यासाठी

ते बंड करून ऊठतात. याचाच एक भाग म्हणून ते गजानन नाईक यांना आपले म्हणणे पटवून देतात. यावरून त्यांनी केलेली विविध विषयांच्या विरोधातील बंडखोरी दिसून येते;

"माझं अण्णासाहेबांशी व्यक्तिगत शत्रुत्व नाही. काय कारण असायचं? मी इथं येईपर्यंत त्यांच्याविषयी मला फारशी माहितीपण नव्हती. त्यांची खरी ओळख व्हायला लागली ती तुम्ही सांगितल्यानंतरच. तिथून मला त्यांची ओळख होत गेली. त्या कविराजाची–सॉरी–कविमर्कटाची एक टेप केलेली मुलाखत आहे. माझ्याकडे एकदा त्याला व्हिस्की प्यायला घातली आणि लागला बडबडायला – मी हळूच टेपरेकॉर्डर ऑन करून ठेवला – अण्णासाहेबांच्या करप्शनच्या किती गोष्टी त्यात – त्या देशमुखाची मुलाखत परवा छापली – त्यांनी तेच सांगितलं – तुम्ही मला इन्सिडेंट सांगितला होता – सम पुलिस ऑफिसर डाइड इन दॅट ॲक्सिडेंट – होडी उलटून तोच प्रसंग देशमुखांच्या मुलाखतीत – ती कोण सुभद्राबाई – पळवून आणलेली बाई – तो भोगले – सुभद्राबाईंशी लगीन लावून त्याला घरात बाळगलं. तो वावरतो साला अण्णाचा एजंट म्हणून – तो वाळिंबे परवा घेराव घालणार होता. कोणत्यातरी एक्झिक्युटिव्ह इंजिनियरला – त्यानं धरणाचं सिमेंट वापरून एक बंगली बांधली – दूर जंगलात – कशासाठी? तर म्हणे मुख्यमंत्र्यांचा शिकारीचा शौक भागवण्यासाठी – शिकार – साधी नव्हे – मानवी माद्यांची आमदारसाहेब." (पृ.२४७,२४८) आपल्या मनातील संताप व्यक्त करीत असल्या माणसांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी, त्यांना सर्वाजनिक जीवनातून उठविण्यासाठी ते बंड करतात आणि गजानन आमदार नाईकांना पेटवतात आणि आपणही या कामी मदत करू अशी ग्वाही देतात. यावरून त्यांच्या मनातील असंतोषाचे फवारे वेगवेगळ्या मार्गांनी वेगवेगळ्या विषयांवर प्रहार करताना दिसतात. आपल्याकडे वर्तमानपत्र हे एक हत्यार असले तर त्या आधुनिक हत्याराने वार करायचा की नाही, करायचा झाला तर किती खोल करायचा, हे त्या हत्याराचा स्वामी ठरवतो. त्यामुळे त्यांना असलेल्या मर्यादांची जाणीवही ते करून देतात. पडद्याआड राहून ते सर्व चळवळीत सहभागी होतात. परंतु या सर्वांचा उलटा परिणाम होऊन अण्णासाहेब मुख्यमंत्रीच राहिले तर गजानन नाईक गृहमंत्री राहिले, तरीही ते या गोष्टीला प्रतिकार म्हणून सत्ताशुद्धीच्या चळवळीवर आघात यावर अग्रलेख लिहितात. (पृ.२५५,२५७) सर्व घटना–प्रसंग नाडकर्णींनी जनतेसमोर

जसेच्या तसे मांडले होते पण फळणीटकरांना या सर्व गोष्टींचे तोटे सहन करावे लागणार असल्याने ते नाडकर्णींना संपादकपद सोडण्यास सांगतात. बंडखोरीने पेटून ऊठलेले नाडकर्णी लोकशाही मूल्यांबद्दल आवाज ऊठवतात. त्यात ते यशस्वीही होतात. पण संपादक म्हणून ते बंड केल्यानंतर नोकरीच्या ठिकाणी अपशयी ठरतात.

यावरून असे लक्षात येते पुरुषांनी बंडखोरी करणे हे फक्त त्यांच्याच हातात नसते. आजूबाजूची परिस्थिती, समाजकारण, राजकारण, नोकरी, व्यवसाय, नैतिक मूल्ये पुरुषांना बंड करण्यास भाग पाडतात, परंतु भ्रष्ट अर्थव्यवस्था, राजकारण पुरुषांना पुन्हा मागे खेचत असल्याचे चित्रण मराठे यानी अतिशय परिणामकारकपणे मांडल्याचे दिसते. पुरुष कितीही मोठा झाला, कितीही सत्याची कास धरणारा असला तरी त्याला प्रवाहाच्या विरूद्ध बंड पुकारताना शेवटी त्यालाच बाजूला फेकले जात असल्याचे चित्र येथे समोर येताना दिसते. सत्ता आणि संपत्ती यांचा मिलाफ झाल्यास कितीही प्रामाणिक माणूस असला तरी तो बळी ठरतो हे भीषण वास्तव मराठे येथे परखडपणे मांडताना दिसतात.

**३. कुरूक्षेत्र :**

शांतीवन एज्युकेशन सोसायटी या संस्थेत बेलसरे प्राचार्य या पदावर व उल्हास भावे हे त्या संस्थेत प्राध्यापक म्हणून काम करतात. याच संस्थेतील गोसावी नावाच्या विद्यार्थ्याला स्कॉलरशिपचे पैसे मागितले म्हणून मारहाण करण्यात येते. उल्हास भावे बरेच दिवस टाळाटाळ करण्यात आलेल्या स्कॉलरशिपच्या पैशांसाठी गोसावी नावाच्या विद्यार्थ्यासाठी प्राचार्यांबरोबर भांडतात आणि गोसावी नावाच्या मुलानेही संस्थेकडे वेळोवेळी मागणी करूनही आणि तो पात्र असूनही त्याला पैसे मिळत नव्हते म्हणून आवाज चढवूनच पैशांची मागणी केली होती. या प्रसंगावरून येथे या पुरुषपात्रांना बंडखोरी करावी लागल्याचे कारण स्पष्ट होते. त्यांच्या हक्कावर, अधिकारावर गदा येते. त्यामुळे आपला हक्क दाखविण्यासाठी त्यांना बंड करावे लागल्याचे चित्र समोर येते. (पृ.९) गोसावी नावाच्या मुलाला झालेल्या मारहाणीच्या प्रकरणाची चौकशी व्हावी आणि व्यवस्थापनाशी संबंधीत कोणी व्यक्ती असेल तर त्याला शोधून काढून प्राचार्यांनी शिक्षा द्यावी यासाठी उल्हास भावे प्राचार्यांशी भांडतात. गोसावीचा स्कॉलरशिपचा अधिकार जर त्याला

मिळाला असता तर हे प्रकरण उद्‌भवलेच नसते. अर्थातच असे बंडखोरीचे प्रसंग अन्याय आणि अत्याचारामुळेच घडतात असे म्हणणे उचित ठरेल. याच संस्थेतील होस्टेलमधील मुलांवरही अन्याय होतो. खूप पैसे घेऊनही जेवण चांगले दिले जात नाही, ढेकूण–डासांचा प्रादूर्भाव, तुंबलेले ड्रेनेज, आंघोळीसाठी पाण्याचा अभाव, मुलांना दमदाटी अशा तक्रारींविरूद्ध उल्हास भावे संघटनेमार्फत विद्यार्थ्यांच्या पिळवणुकीविषयी, अन्यायाविषयी, आवाज ऊठवताना दिसतात. (पृ.२६)

डॉ. म्हसकरांच्या निधनानंतर शांतीवन महाविद्यालयाची संपूर्ण व्यवस्था तुकाराम फराटे पहात असतात. सरकारी ग्रँट शिक्षक, प्राध्यापकांना न देता तुकाराम फराटे स्वत:च्या घरासाठी त्याचा विनियोग करतात, लायब्ररीतील पुस्तके, लॅबोरेटरीतील उपकरणे, होस्टेल सुखसोयींत वाढ नाही, संडास–बाथरूम–नवीन इमारत नाही, प्राध्यापक–शिक्षकांचे पगार नाहीत. तुकाराम फराटे आपलीच पोळी भाजून घेतात. तेव्हा उल्हास भावे या सर्व अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी प्राध्यापकांची एक संघटना स्थापन करतात आणि त्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन त्याविरूद्ध आवाज ऊठवतात. (पृ.२९,३०) सरकारी अनुदानाची पुढची तारीख जवळ आलेली असताना प्रा. उल्हास भावे प्रत्यक्ष आंदोलनाची तयारी करतात. त्यामध्ये खडूफळा–बंद सत्याग्रह, नंतर एक दिवसाची सामुदायिक रजा आणि कॉलेजच्या दारात, रस्त्यावर एक दिवसाचं उपोषण, रेशनकार्ड सत्याग्रह अशी मालिकाच सुरू होते.

शांतीवन महाविद्यालयाच्या सर्व नव्या–जुन्या प्राध्यापकांनी प्रा. उल्हास भावेंच्या नेतृत्वाखाली आपापली रेशनकार्ड छातीवर लावून हातात वाणसामानाच्या पिशव्या, रॉकेलचे डबे, तेलाच्या रिकाम्या बाटल्या, हातात पुस्तक, डोळ्याला चष्मा आणि पोटाच्या फासळ्या दिसताहेत असा शिकविणारा प्राध्यापक या सर्व गोष्टींचा एक लांबलचक कापडी फलक घेऊन रस्त्यावर रांगेत उभे राहून घोषणा देतात.

'दयावंत तुकारामदादा, निदान रेशनपुरता पगार देता का?' (पृ.४८,४९)

अशा घोषणा देत. तुकाराम फराटेंविरूद्ध म्हणजे शांतीवन महाविद्यालयाच्या संस्थेविरूद्ध एकत्रित बंड पुकारतात. मुलांनी केलेल्या मोर्चावर, आंदोलनावर तुकाराम फराटेंच्या लोकांनी

मारहाण केली म्हणून प्रा. उल्हास भावे आंदोलन अधिक तीव्र करतात. विद्यार्थ्यांना मारहाण झाली म्हणून बंद पाळतात. डॉ. म्हसकर यांच्या मृत्यूच्या चौकशीची मागणी करतात. 'डॉ. म्हसकरांच्या गूढ मृत्यूची चौकरी करा!' या बातमीने लोकहितवाल्यांनी आवाज ऊठवला. त्याचा परिणामस्वरूप प्रा. उल्हास भावेला संपविण्यात येते. (पृ.६८,७५)

पुरुषांनी अन्यायाविरूद्ध बंड पुकारण्याची पाळी येते ती सर्व स्तरांतील न्याय, हक्क व्यवस्थेमुळे पुरुषांना त्यांचे हक्क मिळत नसल्याने ते बंड पुकारतात; परंतु त्यात ते यशस्वी होतातच असे नाही. स्वत:च्या न्यायासाठी, अधिकारासाठी कधी–कधी जीवनही संपवावे लागते असेच जणू काही मराठे येथे नमूद करताना दिसतात.

**४. कलियुग :**

काब्रा अँड मल्होत्रा प्रा. लि. या कंपनीत कत्रे असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट या पदावर काम करत असतात. ते जेथे काम करत होते त्या युनिटमध्ये त्यांनी आपला दबदबा निर्माण केला होता. जगताप नावाच्या कामगार युनियन नेत्याला कत्र्यांची शिस्त आणि दबदबा सहन होत नाही. ते त्यांच्या विरोधी कृत्ये करू लागतात. एके दिवशी जगताप सुपरवायझर गाडगीळांच्या खुर्चीत बसल्याची बातमी कत्र्यांपर्यंत येऊन पोहोचते तेव्हा त्यांना जगतापच्या या कृतीचा राग येतो. वरिष्ठांच्या खुर्चीचा असा केलेला गैरवापर त्यांना सहन होत नाही. कत्रे सरळ जाऊन जगतापची कॉलर पकडून त्याला खूर्चीतून ऊठवतात. कॉलर आणि मानगूट पकडून ऊठवत असतानाच ते जगतापला एक शिवीही देतात. (पृ.१४) युनियन लीडर कत्र्यांच्या दबावाच्या बाहेर गेलेला दिसून येतो. म्हणून जगतापला त्याची जाणीव करून देण्यासाठी आणि कत्र्यांना आपला अधिकार दाखविण्यासाठी बंडखोरीची भूमिका घ्यावी लागते.

याच घटनेची दुसरी बाजू बघितली तर युनियन लीडर जगताप कामगारांना संघटीत करतात. त्यांना त्यांच्या हक्काची अधिकाराची जाणीव करून देतात. कत्रेसाहेबांनी त्यांचा अपमान केला आहे असे समजून ते सभेत आपल्या वरिष्ठांना धमकी देतात. अन्याय अत्याचार सहन करणार नाही. कामगारांना दुय्यम दर्जाची वागणूक सहन करणार नाही असे ठणकावून सांगतो व कामगारांच्या मूलभूत गरजा वरिष्ठानी पूर्ण कराव्यात याचीही मागणी ते अधिक आक्रमकपणे

करताना दिसतात. (पृ.३१,३२) जगताप आणि कामगार कत्रे हटावची मोहीम राबवितात. कत्रेंविरूद्ध सगळे युनियन लीडर आणि कामगार संघटित होतात पण कत्रे यांना जेव्हा या घटनेची खबर लागते तेव्हा कत्रे संतापून म्हणतात,

'म्हणजे मला घालवावं असा सल्ला तुम्ही कंपनीला देणार. बट रिमेंबर, प्रधान, आय विल नॉट गो. मी जाणार नाही. मी कधीच जाणार नाही. मी माझा बळी घेतला जाऊ देणार नाही. एकदा माझा बळी घेतला गेला. माझ्या ऊर्मींचा. माझ्या प्रेरणांचा, माझ्या श्रद्धांचा. आता दुसऱ्यांदा नाही. नो. नो. दुसऱ्यांदा कुणाला मी बळी घेऊ देणार नाही. वाटेल त्या मार्गाने विरोध करीन; पण कुणाला मी माझा बळी घेऊ देणार नाही, नाही, नाही.' (पृ.९७) कत्रे यांचा हा संताप कंपनीने त्यांच्याविरूद्ध चालविलेल्या कटकारस्थानांविरूद्ध दिसून येतो. कामगार आणि युनियन लीडर हे जरी प्रत्यक्ष त्यांचे विरोधक असले तरी मल्होत्रा, प्रधान हे वरिष्ठही त्यांचे विरोधकच असतात. तेव्हा आपल्यावरील अन्यायाचा विरोध दर्शविण्यासाठी ते बंड करून उठतात.

कलियुग मधील जगताप, कत्रे यांसारखी पात्रे बंड करतात. पण हे बंड काही अंशी वैयक्तिक पातळीवरील असले तरी हे दोघेही एक अधिकारी म्हणून काम करीत असताना कंपनीच्या किंवा कामगारांच्या हितासाठी त्यांना बंड करणे अपरिहार्य असल्याचे मराठे येथे सूचित करतात.

**५. सॉफ्टवेअर :**

व्ही. एस. देशमुख कंपनीत काम करत असताना त्यांना त्यांचे वरिष्ठ असलेले पळसोपकर यांच्याकडून सारखा अपमान सहन करावा लागतो. प्रामाणिकपणे काम करूनही आणि आपली कुवत आणि सामर्थ्य असूनही आपला सारखा अपमान केला जातोय, आपल्यावर अन्याय होतो या भावनेने ते पेटून ऊठतात आणि आपला राजीनामा देतात. ते राजीनामा देऊन आपल्याला लवकर मुक्त करावे अशा कडक शब्दांत बोलतात. पळसोपकरांना ते त्यांनी आपल्यावर केलेल्या अन्यायाची जाणीव करून देताना दिसतात. ते पळसोपकरांना म्हणतात,

'ज्ञान कुवत असून, एफिशियन्सी असून तुमच्या शिव्या खाण्याचा, तुमच्यासारख्या उर्मट आणि असभ्य, असंस्कृत, रानटी माणसाला सर, सर म्हणत जीभ विटाळायची माझी इथून पुढं

एक क्षणभरही इच्छा नाही?' (पृ.७५) आपली योग्यता असूनही आपल्याला कामाच्या ठिकाणी सन्मान मिळत नसल्याची भावना देशमुखांना प्रतिकार करण्यास भाग पाडते. त्यांचा हा संघर्ष अस्मिता जपण्यासाठीच असल्याचे येथे स्पष्ट होते.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील पुरुष कौटुंबिक आणि सामाजिक अशा दोन स्तरांवर प्रामुख्याने वावरताना दिसतात. याबरोबरच समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, धर्म व संस्कृती अशा विविध पातळ्यांवर येथील पुरुष वावरताना दिसतात. मूलत:च पुरुषी मानसिकता असल्यामुळे परिस्थितीपोटी कधी हतबलता, असहायता, लाचारी वाट्याला आलेले पुरुष येतातही मात्र बऱ्याच ठिकाणी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडता आली नाही तरी बंडाची भाषा मात्र येते याची प्रचिती कादंबऱ्यांमधील विविध पुरुषपात्रांच्या अनुषंगाने येते. 'निष्णर्प वृक्षावर भर दुपारी' मधील नायक परिस्थितीने गरीब असल्याने गोडसेकाकूंनी खोली सोडण्यास सांगितल्यानंतरही खोली आपल्या ताब्यात राहण्यासाठी विनवणी करतो मात्र भिकारी म्हणून हिणविल्यानंतर मात्र स्वत:च्या मनातील भावना तीव्र स्वरूपात व्यक्त करतो. पुढे देसाईबाईंकडून पत्नीच्या नोकरीसाठी सहकार्य मिळत नाही तेव्हा तो अधिकच उग्र रूप धारण करताना दिसतो. 'इतिवृत्त' मधील श्रीरंग नाडकर्णींच्या रूपाने पत्रकारितेला अपेक्षित असणारा परखडपणा, वास्तवाभिमुखता, समाजाचे उत्तरदायित्व मानून काम करणारा एक पत्रकार पुढे येतो. प्रसंगी कधी शब्दांच्या रूपाने तर कधी प्रत्यक्षपणे आपल्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न होताना दिसतो.

'कुरूक्षेत्र' मधील गोसावी हा विद्यार्थी आपल्या हक्काची शिष्यवृत्ती मिळावी म्हणून संस्थेशी झगडताना दिसतो, तर विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी उल्हास भावे हे प्राध्यापक संस्थेचा रोष पत्करूनही विद्यार्थ्यांना पाठिंबा देताना दिसून येतात. पुरुष न्याय्य हक्कांसाठी बंडखोरी करतात मात्र सर्वच ठिकाणी त्यांचे बंड यशस्वी होतेच असे नाही याची प्रचिती भावेंसारख्या सज्ज्न माणसाचा पुढे बळी जातो हे प्रत्ययाला येते. 'कलियुग' मधील काब्रा अँड मल्होत्रा प्रा. लि. या कंपनीतील असोसिएट व्हाइस प्रेसिडेंट या पदावर असलेल्या कत्र्यांच्या रूपाने एक शिस्तप्रिय आणि सर्वांवर वचक असणारा अधिकारी म्हणून पुढे येतो. कंपनीतील वरिष्ठ

अधिकारी गाडगीळ यांच्या खुर्चीत जगताप हा कामगार नेता बसतो तेव्हा कत्रे जगतापला कडाडून विरोध करतात. एवढेच नव्हे तर त्याला मारहाणही करतात. जगताप वरिष्ठ अधिकाऱ्यांना मान देत नाहीत हे लक्षात आल्यानेच कत्रे त्याच्याविरूद्ध कृती करताना दिसतात. एवढेच नव्हे तर ज्यावेळी जगताप कामगार संघटना उभी करून कत्रेंविरूद्ध कारवाया करू लागतात तेव्हा त्या कारवाया हाणून पाडण्याचे काम कत्रे करतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील ही पुरुषपात्रे विविध पातळ्यांवर वावरताना दिसतात. कधी आपल्या न्याय्य हक्कासाठी, कधी दुसऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, कधी अस्मिता जपण्यासाठी तर कधी दुसऱ्यांवर कुरघोड्या करण्यासाठी बंडखोरी करताना दिसतात.

## ३. पुरुषी मानसिकता :

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्या कारणाने आपल्याकडील कुटुंबसंस्था ही पुरुषप्रधान असलेली दिसून येते. त्यामुळे धर्माने आणि परंपरेने पुरुषांना श्रेष्ठत्व, मुख्यत्वे प्रभुत्व प्राप्त झालेले आहे. त्याचे काही फायदे–तोटे आपल्या संस्कृतीला सहन करावे लागले आहेत.

पुरुषी वर्चस्वाचे आणि त्यांच्या अतिप्रमाणात दखलत्वाचे, अधिकाराचे तोटे स्त्रियांना सहन करावे लागताना दिसतात. अमुक एक गोष्ट पुरुषांनीच केली पाहिजे. स्त्रियांनी मर्यादाशील राहिजे पाहिजे. चूल आणि मूल या चौकटीत स्त्रियांना अडकवून ठेवण्यास पुरुषप्रधानता कारणीभूत झालेली दिसून येते. काही प्रमाणात कायद्याने त्यांना अधिकार दिले असले तरी स्त्री–पुरुष समानतेची दरी कायद्याने जरी समान दिसत असली तरी पुरुषी अहंकार, पुरुषी मानसिकता स्त्रियांना अजूनही त्यांचे अधिकार त्यांची मोकळीक, त्यांचे निर्णय घेण्याची स्वतंत्रता मिळण्यापासून वंचित ठेवताना आढळते. नाकापेक्षा मोती जड नको अशा वृत्तीतून स्त्रियांना अडाणी ठेवणे, त्यांना समाज, संस्कार, अधिकार, निर्णय, शिक्षण, स्वातंत्र्य या सर्व गोष्टींपासून काही प्रमाणात अलिप्त ठेवले जाताना दिसते.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून पुरुषी मानसिकता कशी आलेली आहे ते पाहणे येथे अभिप्रेत आहे.

## कथासंग्रह :

### १. ज्वालामुख :

**ज्वालामुख :**

या कथेतील नायक खूष आहे कारण त्याला मनासारखी पत्नी लाभली आहे. त्याला बायकोने खूष होऊन दिलेला ताजाताजा चहा अधिकच प्रसन्न करतो. (पृ.१) बायकोनेच चहा देणे आणि तो खूष होऊन देणे यामागे या नायकाची पुरुषी मानसिकता डोकावताना दिसते.

लग्नासाठी बायको निवडताना तो दहा मुली बघतो त्यातून त्याला जशी हवी होती तशी उंच, उच्चशिक्षित, गोड, गोंडस, देखणी, अंगाने भरलेली आणि सोशल बायको मिळवितो. त्यासाठी त्याने जाहिरात दिलेली असते. एक्झिक्युटिव्ह सारख्या माणसाची बायको म्हणून लोक तिच्याकडे बघणार म्हणून दक्षतापूर्वक सिलेक्शन त्याने केलेले असते. (पृ.२) संध्याकाळी तो खूष आणि प्रसन्न असतो कारण संध्याकाळी तो एखादी फिल्म बघतो, मद्य सेवन करतो, पत्नीच्या शरीराशी मुक्त क्रीडा इ. गोष्टी त्याला सहजतेने मिळतात. (पृ.४) एक पुरुष म्हणून परंपरेने त्याला हे सर्व अधिकार दिलेले दिसतात. कोणतीही गोष्टी त्याच्यासाठीच आहे आणि पत्नीने त्याच्यासाठी तत्पर असणे ही पुरुषी मानसिकता येथे डोकावताना दिसते. शिवाय पत्नीचे सिलेक्शन दहा जणींमधून तो करताना दिसतो. पत्नीच्या आवडी–निवडीचा विचार येथे आलेला दिसून येत नाही. या नायकाच्या माध्यमातून येथे लेखकाने पुरुषी मानसिकता रेखाटलेली दिसते.

**कीटक :**

शंकरराव केशवरावांच्या घरी स्थळ सुचविण्यासाठी जातात. केशवरावांच्या पत्नीचे निधन झाल्याने त्यांनी दुसरे लग्न करावे म्हणून ते चरितार्थासाठी करत असलेले वधू–वर सूचकचे काम घेऊन त्यांच्या घरी जातात. तेव्हा बायकोची भूमिका पटवून देताना ते म्हणतात, ‘नुसतं मुलांचच करायचं कोणी हा प्रश्न नाही केशवराव’...... ‘मुलांच्या वडिलांचं कोणी करायचं’ ‘म्हणजे तुमचं– हाही प्रश्नच आहे की!’ ....... ‘पुरुषांचं काय करायचं नसतं? खूप काही असतं. ते आपली बायको करीत असते. तुम्हांला गरम गरम जेवण वाढते–तुमचे कपडे आवरून ठेवते–तुमच्यासाठी कपडे धुवून ठेवते–आंघोळीचं पाणी देते–तुम्ही ऑफिसमधून घरी येता तेव्हा चहापोहे देते–खूपदा

चमचमीत पदार्थ बनवते–तुमच्या मुलांचं सगळं करते. कोणीतरी म्हटलंय बघा केशवराव – बायको म्हणजे पुरुषाची न दिसणारी सावलीच असते–' (पृ.१००) वरील संवादातून शंकररावांची पुरुषी मानसिकता डोकावते. घरातील सर्व कामे, नवऱ्याची सेवा ही घरातील स्त्रीनेच करावयाची असतात अशी मानसिकताच पुरुषाची दिसून येते.

**२. हद्दपार** :

**१** : एका 'ॲग्रिकल्चरल फायनान्स' च्या सेमिनारमध्ये प्रोफेसर पिंपुटकर आणि मिसेस घाटे पेपर रीडींग करतात. मिसेस घाटे यांच्या मतप्रदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली जातात. त्यांचे सर्वजण कौतुक करतात तेव्हा प्रोफेसर अभिमानाने सांगतात की, ती माझी सहकारी आहे. त्याच्या या वाक्याला एका अधिकाऱ्याने प्रतिसाद दिलेला पाहून तो अधिकच सुखावतो. वयाच्या पंचेचाळीशीनंतरही आपण दुसऱ्या एका स्त्रीला मोहीत करू शकलो–एका स्मार्ट, तल्लख आणि ॲंबिशस स्त्रीला–या जाणिवेने तो आणखीनच सुखावतो. एकप्रकारची पुरुषी परिपूर्णता त्याला जाणवू लागते. (पृ.२०,२१) मिसेस घाटे त्यांच्या रिसर्च, ललितलेखन, कादंबऱ्या आणि शेती, अर्थशास्त्र इ. विषयांवरच्या त्यांच्या ज्ञानाचे कौतुक करतात तेव्हाही ते एक सुंदर आणि बुद्धिमानी आपले कौतुक करतेय या जाणिवेने तो सुखावतो. या भावनेने ते एक पुरुष म्हणूनही सुखावतो. (पृ.२२) प्रोफेसर पिंपुटकर यांना वाटणारा मिसेस घाट्यांविषयीचा जिव्हाळा, त्यांनी केलेले कौतुक, त्यांच्यामुळे म्हणजेच एका स्त्रीमुळे आपले प्रसन्न झालेले व्यक्तिमत्त्व. एका स्त्रीला आपण मोहीत करू शकल्याची भावना या सर्व पुरुषी मानसिकता एकाचवेळी प्रोफेसर पिंपुटकरांच्या ठिकाणी एकवटलेल्या दिसतात.

प्रोफेसर पिंपुटकर मिसेस घाट्यांमध्ये गुंततात तेव्हा ते पत्नीला सांगतात, 'तू माझ्या मानानं फार खुजी राहिलीस. माझा तुझ्यातला इंटरेस्ट संपला. मी तुझ्याशी घटस्फोट घेईन आणि दुसरं लग्न करीन–' (पृ.३१) मुलंबाळं झाल्यानंतर, वयाच्या पंचेचाळीशीनंतरही मि. पिंपुटकर परस्त्रीकडे आकर्षित होऊन पत्नीचा त्याग करण्याची भाषा करतात. बायका–मुलांना उघड्यावर सोडून दुसरे लग्न करण्याची भाषा करतात, यावरून त्यांची पुरुषी मानसिकता समजण्यास मदत होते.

पुरुषी मानसिकता ही पुरुषांना गर्व वाटायला लावणारी, पुरुषी वर्चस्व गाजवायला लावणारी मानसिकता. या वृत्तीवर आपले मत मांडताना जयवन्त दळवी लिहितात,

“पिंपुटकर अनेकदा ...... आणि मग रोजच आपल्या बायकोच्या मंदपणाबद्दल तिची निर्भत्सना करीत राहतात. आपण तिच्यावर लादलेल्या संसारामुळे ती तशी झाली आहे हे ते विद्वान असूनही त्यांच्या लक्षात येत नाही. घाटेबाईंचे आपल्यावर प्रेम आहे असा त्यांचा दृढ समज होतो तेव्हा ते आपण घाटेबाईंशी लग्न करणार असेही बायकोस सांगतात.”[५]

पिंपुटकरांच्या पुरुषी मानसिकतेमुळेच शीलाला चूल आणि मूल सांभाळावे लागते, शिवाय मि. पिंपुटकर विवाहीत असून पत्नीचा सतत अपमान करून आपले घाटेबाईंशी असलेले संबंध पत्नीपर्यंत बिनधास्तपणे पोहचवितात. या त्यांच्या वृत्तीवर जयवंत दळतींनी अचूक निर्देश केलेला दिसून येतो.

**३. दावं :**

**दावं :**

या कथेतील नायकाचे आणि नायिकेचे चार वर्षापूर्वीच लग्न झाले होते. सामान्य गरीब परिस्थितीत ते दोघे संसार करत असतात. वर्ष–दोन वर्षातच त्या दोघांची भांडणे होऊ लागतात, एकमेकांचा तिरस्कार करू लागतात. ते ज्या खोलीत राहातात ती खोली नायकाच्या नावावर असते. खोली नायकाच्या नावावर असल्यामुळे तो भांडणे झाल्यावर पत्नीला खोली माझ्या नावावर आहे. तूच खोली सोडून जा असे सांगतो. (पृ.५६,५७) पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रत्यय या कथेतून दिसून येतो. भांडणे झाली तरी पत्नीनेच कमीपणा घेतला पाहिजे. लग्नानंतर घरावर पती–पत्नीचा समान अधिकार असूनही हा नायक वेळ आली तर पत्नीनेच बाहेर जावे अशी अपेक्षा करतो. त्याच्या या वृत्तीतून त्याची पुरुषी, अहंकरी वृत्ती डोकावताना दिसते.

**देऊळ :**

या कथेतील नायक गंगाधर एक मुलगी झाल्यानंतर मुलीला पत्नीला सोडून आश्रमात जातो. परंतु श्रावणात स्वामींच्या उत्सवाला तो गावात येत असतो आणि पत्नीला भेटण्याचा निरोप पाठवितो. आश्रमातच तो तिचा उपभोग घेतो आणि तिलाच पाप करण्यास प्रवृत्त केल्याचा

आरोप करतो. परंतु दरवर्षी तो हेच कृत्य करताना दिसतो. गंगाधरला सुरूवातीला घर, संसार, मुले, आई, वडील सर्वजण हवे असतात, नंतर तो संन्यास घेतो. पण त्याला पत्नी सुख हवे असते. तो समाजात ढोंगी संन्यासी बनून फिरतो, परंतु बायकोला मात्र हवा तेव्हा उपभोगासाठी गुप्तपणे बोलावतो आणि तिचा उपभोग घेतो. बायकोची, मुलीची कोणतीही काळजी न करता, त्यांची कोणतीही जबाबदारी न उचलता त्यांच्यावर मात्र आपला मालकीहक्क संन्यास घेतल्यावरही दाखवितो. (पृ.१२४,१२५) गंगाधरची ढोंगी संन्यासी वृत्ती त्याला पत्नीसुखापासून परावृत्त करू शकत नाही. तो एक पुरुष असल्याने आणि त्याची स्वामित्वाची भावना असल्याने त्याच्या कृतीतही पुरुषी मानसिकता दिसते.

**समाधी :**

भिक्याभट सिंधूवर वाईट नजर ठेवून असतो. सिंधूचे पुर्शाबरोबर लग्न लावून दिल्यानंतरही तो सिंधूकडे वासनांध नजरेने बघतो. त्याची पत्नी या गोष्टीस विरोध करते म्हणून तो तिचा खून करतो. बायकोच्या मृत्यूचा भिक्याभटाला पश्चात्ताप होताना दिसत नाही, उलट सिंधूच्या मार्गातील आपला अडसर बाजूला झाला म्हणून तो खुशीत दिसतो. बायकोच्या प्रेताची विल्हेवाट लावल्यावर तो लगेच घरी येऊन सिंधूकडे रांड म्हणून राहण्याची भाषा बोलतो. (पृ.१४७,१४८,१४९) भिक्याभट एक पुरुष असून तो एकाच वेळी दोन बायकांना वेठीस धरू पाहतो. पत्नी विरोध करते तर तिला संपवितो. सिंधूच्या मार्गातील तिच्या पतीस घराबाहेर काढतो. त्याची घरातील सत्ताशाही, हुकूमशाही, पुरुषी मानसिकता, लालसा त्याला एकापाठोपाठ एक वाईट कर्म करण्यास प्रवृत्त करते. हा नायक एक पुरुष असल्याने पत्नीवर, सिंधूवर आपले वर्चस्व गाजविताना दिसतो. पुरुषप्रधान मानसिकतेमुळे एकाच वेळी दोन स्त्रियांच्या जीवनात अंध:कार निर्माण होताना दिसतो.

भारतीय संस्कृतीने पत्नीला अर्धांगिनीचा दर्जा दिलेला असला तरी समाजात हे चित्र पहावयास मिळत नाही. समाजातूनच उमटलेल्या प्रतिबिंबाचा ठसा साहित्यात दिसून येतो. ह. मो. मराठे यांच्या या कथासंग्रहांमधून स्त्रीला समान न्याय, हक्क, दर्जा पुरुषांकडून मिळताना दिसूत नाही. स्त्री हे करमणुकीचे साधन आहे. तिने पतीची व घरातील इतर सदस्यांची काळजी घेणे,

पतीला मन मानेल तसे उपभोगासाठी तयार राहणे या गोष्टी पुरुषांनी स्त्रियांकडून गृहित धरलेल्या दिसतात. यामागे आपली पुरुषप्रधान संस्कृती आणि पुरुषी विचारांचा पगडा दिसून येतो. बाई, बाटली, नीतिमत्ता न पाळणे हे जणू पुरुषांना जन्माने प्राप्त असल्यासारखे पुरुष येथे वावरताना दिसतात. पत्नी मेली तर पतीने दुसरे लग्न करावे ही पुरुषी मानसिकता खूप खोलवर रूजलेली आहे तर स्त्रीने जोडीदार निधन पावला तर आपले ऊर्वरीत आयुष्य त्याच्या आठवणीत, दु:खात व्यतीत करावे असा संकेत झालेला दिसून येतो. स्त्रियांनी कायम चारित्र्यसंपन्न असले पाहिजे, मात्र पुरुषांनी एकापेक्षा अनेक स्त्रियांशी संबंध ठेवणे, स्वत:च्या बायकोचा अपमान करणे, प्रसंगी तिचे जीवन संपविणे ही हिंस्र पुरुषी मानसिकतेची उदाहरणे सांगता येतील.

शंकरराव आणि केशवराव या दोघांच्या संभाषणातूनही पुरुषी मानसिकता डोकावते. त्या संभाषणाच्या मतितार्थातून पत्नीने पतीची सेवा करणे हे गृहीतच धरलेले दिसते. प्रोफेसर पिंपुटकर वयाच्या पंचेचाळीशीतही घाटेंसारख्या स्त्रीला मोहीत करण्याच्या मानसिकतेने सुखावतात. गंगाधरसारखा संन्यास घेतलेला पुरुषही उपभोगासाठी पत्नीला हवे तेव्हा बोलावतो. संन्यास घेतल्यानंतरही तो पुरुषी मानसिकतेतून पत्नीला हवे तसे वागविताना दिसतो. भिक्याभटासारखा भिक्षुक परस्त्रीवर नजर ठेवून बायकोचा अंत करतो. पुरुषांनी स्वत:च्या उपभोगासाठी, मनमानीसाठी एका स्त्रीला संपवून दुसरीला जबरदस्ती करणे हे लोभी, कामसू पुरुषी मानसिकतेचे बोलके उदाहरण दिसून येते.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

निष्पर्णचा नायक बेकार अवस्थेत नोकरीच्या शोधात फिरत असताना खिशात पैसे नसताना पानाच्या टपरीवर जाताना दिसतो. शिवाय तेथील पाणवाल्याच्या विचारपूस करण्यावरून स्त्रीविषयीच्या विचारांनी नायक जो मनातील प्रतिमा तयार करतो त्यावरून त्याची पुरुषी मानसिकता समजण्यास मदत होते.

“वा राव! ह्ये काय इचारनं झालं? त्येच्यासाठी तर लगीन करायचं. साला संगतीला बाई असली की रात रंगलीच पायजे काय?” “तर हो. त्येच्यापायी तर सगळा परपंच करायचा. न्हाय

तर कोणी लावून घेतली असती ही खिटखिट! बाकी समदं ठीक हाय ना?" "संगतीची बाई ठीक असली की समदं ठीक होतय–" (पृ.१७) वरील विचारांच्या अनुषंगाने असे वाटते की पुरुषांच्या नजरेत बाई ही एक फक्त उपभोग्य वस्तू आहे.

जेव्हा नायकाला आणि त्याच्या पत्नीला नोकरी मिळत नाही तेव्हा तो पत्नीचा गर्भपात घडवून आणतो आणि पत्नी दवाखान्यात ॲडमीट असतानाच तो घाईघाईने पत्नीच्या नोकरीच्या चौकशीसाठी देसाईबाईंच्या घरी धाव घेतो. यावरून पुरुषाची स्वार्थी, लोभी, आपमतलबी मानसिकता समोर येते. सर्व भावना थिजून गेल्याप्रमाणे तो यंत्रवत पत्नीकडे पाहून फक्त नोकरी, पैसा याचाच विचार करताना दिसतो. (पृ.७२) पत्नीला त्याच्या सहवासाची, मदतीची, सहानुभूतीची, आधाराची नितांत आवश्यकता असतानाही तो तटस्थपणे व्यवहार करताना दिसतो. एक पुरुषच असे निर्णय घेऊ शकतो, पत्नीला मूल हवे असतानाही तिला फसवून तो गर्भपात घडवून आणतो. यावरून असे लक्षात येते की, तो पत्नीला गृहीत धरतो आणि तिचे आणि कुटुंबाचे जे काही निर्णय घेईल तो बरोबरच घेईल अशा मानसिकतेतून तो स्वत:ला श्रेष्ठ समजून सर्व भूमिका बजावताना दिसतो. त्याच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेवरूनही पुरुष कठोर असतो आणि त्याची पुरुषी मानसिकता, अहंकार त्याला निर्णय घेण्यासाठी कठोर बनवते हेच येथे मराठे सुचवताना दिसतात.

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीतील पुरुषी मानसिकतेवर भाष्य करताना नन्दा सुर्वे म्हणतात,

"या अनिर्बंध लेखनातून प्रकट झालेली पुरुषी मानसिकता अनेकदा ओंगळ टप्प्यावर गेली आहे. लेखनात खरं म्हणजे स्त्री–पुरुष हा लिंगभेद अभिप्रेत नसावा. पण पुरुषाला जसं उपहासात्मक पातळीवर स्त्रीचं ओंगळ रूप दिसतं, तसं त्याला पुरुषांचच ओंगळ रूप का नाही दिसत? यावर वाद होऊन समजा असा दावा करण्यात आला की भिन्नलिंगी आकर्षणातून माणसाच्या मनात असं येऊ शकतं. तर मग प्रतिवाद असा करता येईल की, बाईच्या मनात असा पुरुष द्वेषाचा ओंगळपणा आला आणि तिनं असच उपहासात्मक पातळीवर जाऊन लिहिलं तर ते

वाचकांकडून समाजाकडून किती खपवून घेतले जाईल? कदाचित ते पुरुषांच्या हातातलं टर उडवण्याचं साधन होईल.''[६]

नायकाची नोकरी जाऊन एक महिना होऊनही त्याला नोकरी मिळत नाही आणि वसू म्हणजेच नायकाची पत्नी आपल्या गरोदरपणात पूर्णपणे रमून गेलेली असते. स्त्रीसुलभ स्वभावामुळे या गोष्टी घडत असल्या तरी नायकाला मात्र ती वैरीण वाटते. पत्नीने आपल्याला सुख देण्याऐवजी जीवनात कटकटी, ताणतणावच निर्माण केले आहेत असे वाटते. दु:खाची सर्व कारणे पत्नीच आहे. या मानसिकतेतून तो पत्नीला सर्व कारणांचे मूळ मानतो. संसारासाठी उपजीविकेसाठी आपण एकट्यानेच प्रयत्न केले पाहिजेत असे कुठे आहे? आपल्या पत्नीनेही प्रयत्न केले पाहिजेत अशी मानसिकता या नायकाच्या ठिकाणी दिसून येते. म्हणूनच तो आपल्या पुरुषी अहंकारापोटी पत्नीविषयी, तूही विकली जा, मांड लिलाव असे शब्दप्रयोग करताना दिसतो. (पृ.३६)

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील दुसरे पुरुषपात्र ढोणकर हा पोलिस सबइन्स्पेक्टर. तो वृत्तीने बेफिकीर, उडाणटप्पू आणि बेदरकार दिसतो. तो पत्नीबरोबर माणुसकीशून्य व्यवहार करतो. लोक त्याला जाता-येता सलाम करतात. दारू, पैसा, पोरी यांचा त्याला काही तोटा नसतो. त्यामुळे त्याची स्वैराचारी मानसिकता तयार होते. (पृ.५६,५७,५८) या कादंबरीतील पुरुषी मानसिकतेवर भाष्य करताना प्रा. नीलिमा पालवणकर म्हणतात,

''ढोणकर आपल्या भोगवादी वृत्तीसाठी बायकोचा गर्भपात घडवून आणतो. त्यामागे आपल्याकडे वात्सल्य वैगेरे काही नाही, जे आपल्याला हवे ते मिळवायचे अशी त्याची बेछुट वृत्ती आहे. त्याच्या मते या देशात जगायचे तर असल्या लहानसहान क्रुरतेला डगमगून चालणार नाही. हा ढोणकर परदेशात जाण्याची स्वप्ने पाहतो. तू गोव्याल आलास तर तुला मुली पुरवीन असेही नायकाला सांगतो. ढोणकर हे पात्र फक्त उडाणटप्पू, बेदरकारच नाही तर क्रूर आणि भष्ट वृत्तीचेही आहे.''[७]

ढोणकर या पात्राविषयी प्रा.नीलिमा पालवणकर यांनी व्यक्त केलेले विचार पुरुषी मानसिकतेवर अचूक प्रहार करताना दिसतात. ढोणकर हा कायद्याचा रक्षक असूनही, स्वत:च्या

स्वार्थासाठी तो आपल्या पदाचा दुरूपयोग करून घेताना दिसतो. आपण जो विचार करतो तो काही चुकीचा नसून पुरुषांनी या सर्व गोष्टींचा उपभोग घेतला पाहिजे अशा वृत्तीचा दिसून येतो. त्यामुळेच तो नायकालाही अशाच विचारांची प्रेरणा देतो.

या कादंबरीतील तिसरे पुरुषपात्र असलेले सेक्रेटरी हेही भोगवादी, स्वच्छंदी, माणुसकीला काळिमा फासणारे पात्र मराठ्यांनी रेखाटले आहे. नायकाच्या लाचार परिस्थितीचा फायदा घेताना तो दिसतो. त्याची स्त्रियांविषयी असलेली भावना स्त्री म्हणजे उपभोगून टाकण्याची वस्तूच! देसाईबाईंचा तो असाच उपभोग घेताना दिसतो. कमी पैशात नोकरीवर ठेवून, स्वत: त्यांचा उपभोग घेऊनसुद्धा त्यांना नीती–अनितीविषयी काहीही वाटत नाही. सेक्रेटरी नायकासमोर देसाईबाईंविषयी असभ्य बोलतो आणि असभ्य कृती करतो आणि नायकाने पैशासाठी आपल्या पत्नीला पाठवावे अशी इच्छा व्यक्त करतो. (पृ.७५,७६) सेक्रेटरीच्या मानसिकतेवर प्रकाश टाकताना प्रा. नीलिमा पालवणकर म्हणतात,

"यू जस्ट थिंक ओव्हर दॅट मॅटर ऑर डोण्ट थिंक. तुम्हांला पैसे हवेत ते मी देतो. यू जस्ट सेंड युवर वाईफ टु मी ..... अँड बी हॅपी. तुला सांगू, या मिस देसाई. तिचे फादर एकदा नोकरी मागायला असेच आले. म्हणाले, सेंड द गर्ल टू मी अॅड बी हॅपी. हर फादर डाईड. कशानं? आपली मुलगी काय काम करते ते त्या म्हाताऱ्याला कळलं. दॅट ब्लडी ओल्ड मॅन डाईड ऑफ दॅट शॉक! नॉनसेन्स! नाऊ लूक टू मिस देसाई. सी इज क्वाईट हॅपी."[८] या संवादातून स्त्रीकडे एक वस्तू म्हणून पाहायचा सेक्रेटरी दृष्टिकोन स्पष्ट होतो. सेक्रेटरी ज्या पद्धतीची भाषा बोलतो, शिव्या देतो, नायकासमोर देसाईबाईला मिठीत घेतो, तिचे चुंबन घेतो, नायकाशी भांडण झाल्यावर त्याला बेदम मारतो, त्यावरून त्याची खलप्रवृत्ती आणि एखाद्या गुंडाला लाजविणारे वर्तन यावर प्रकाश पडतो.

या कादंबरीतील तीनही पुरुषपात्रे आणि त्यांची मानसिकता पाहता ती वेगवेगळ्या पातळ्यांवर असल्याचे दिसते. या कादंबरीतील नायक पुरुषी अहंकाराचा एक घटक असला तरी त्याने घेतलेले निर्णय काहीसे परिस्थितीला अनुसरून आणि अगतिक होऊन घेतलेले दिसतात.

तर ढोणकरची मानसिकता बेदरकारी, बनेलवृत्त, स्वार्थी आणि तिसरे पुरुषपात्र सेक्रेटरी यांची मानसिकता भ्रष्ट वृत्तीतून निर्माण झाल्याचे जाणवते.

**२. काळेशार पाणी :**

विष्णू गावकर ऊर्फ विष्णू गवस हा गावातील प्रतिष्ठित गावकर असतो. स्वत:चे लग्न झालेले असूनही तो भिकीला स्वत:ची रखेल म्हणून ठेवतो. त्याच्यापासून भिकीला दहा मुले होतात. मुलांची कोणतीही जबाबदारी तो उचलताना दिसत नाही. उलट जेव्हा त्याला लहर येईल तेव्हा भिकीने त्याला साथ द्यावी. आपल्या वासनासुखात त्याला मुलांचा व्यत्यय अजिबात खपत नसे. भिकी रहात होती ते घर छोटेच होते. तेथे स्वतंत्र ऐसपैस अशी कोणतीही व्यवस्था नव्हती. परंतु विष्णूला व्यत्यय खपत नसे. वेळकाळेचे भान न ठेवता तो भिकीकडे येतो आणि मुलांनी त्रास दिला तर त्यांच्या समस्या समजून न घेताच तो भिकी आणि मुलांवर चिडताना दिसतो. यावरून त्याची स्वार्थी, आपमतलबी आणि वासनांध प्रवृत्तीची मानसिकता पुढे येताना दिसते. मुलांनी किरकिर केली तर विष्णू भिकीला मुलांची किरकिर नको असे सांगतो.

तो तिच्याकडे येण्याआधीच तिने मुलांना झोपवावे अशी अपेक्षा तो व्यक्त करतो. यावरून त्याला भिकी पाहिजे पण तिची व तिच्या मुलांची जबाबदारी नको असे दिसते. भिकीला नवरा नसल्याने तिच्या असहाय परिस्थितीचा फायदा घेतो. तो भिकीला सोडण्याचीही भाषा करतो. मी अजून म्हातारा झालो नसल्याने अशा दहा बायका माझी रांड म्हणून मी ठेवू शकतो. अशा धमक्यांनी तो तिच्यावरील त्याचे वर्चस्व सिद्ध करतो. भिकीच्या कामाच्या वेळीही तो तिच्या पोटापाण्याच्या व्यवसायाचा विचार न करता तिला तिच्या झोपडीत घेऊन जातो. त्याच्या या बेफिकीर मनोवृत्तीतून त्याला त्याची फक्त वासनाच महत्त्वाची वाटताना दिसते. एक तरूण प्रतिष्ठित पुरुष असल्याचा गर्व–अहंकार त्याच्या ठायी दिसून येतो. आपण पुरुष असल्याने भिकीने आपले सर्व म्हणणे मान्य केले पाहिजे अस अट्टाहास तो धरतो. मुलांच्या आणि भिकीच्या इच्छेचादेखील तो विचार करताना दिसत नाही. येथे भिकीवर प्रेमापेक्षा अधिकार, स्वैराचारच होताना दिसतो. यामध्ये विष्णूची पुरुषी मानसिकता दिसून येते. भिकी भजी तळत असताना भर बाजारात विष्णू तिच्या उघड्या मांड्याकडे तर कधी रस्त्यावरून जाणाऱ्या बायांकडे बघत रहातो

यावरून त्याचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन समजून येतो. स्वत: एक पुरुष असूनही काहीच काम करताना तो दिसत नाही. मात्र सर्व वेळ तो स्त्रीकडे उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहतो. घरात लग्नाची बायको असूनही तो भिकीला रांड म्हणून ठेवतो. तिचा यथेच्छ उपभोग घेऊनही तो बाजारातील स्त्रियांकडे पहात बसतो. यावरून तो वासनांध वृत्तीचा पुरुष सिद्ध होतो. (पृ.३,५,६)

एकदा विष्णू दुसऱ्या वाडीतल्या गावताबरोबर मारामारी करून भिकीकडे येतो. तेव्हा भिकीने त्याचे अंग चोळून द्यावे अशा अपेक्षेने येतो. पण भिकी आणि पोरं भुकेली असल्यामुळे ती त्याच्याकडे दुर्लक्ष करते आणि त्याला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून देते तेव्हा विष्णू चिडून जाऊन तिला लाथ घालण्याची आणि जमिनीत गाडून टाकण्याची भाषा बोलतो. त्याचे हे वर्तन त्याच्या ठिकाणी असलेली पुरुषी मानसिकता दर्शविते. (पृ.२४,२५)

विष्णू मेल्यानंतर बाळ्याभट भिकीची काळजी घेतो, परंतु बाळ्याभट भिकीचा देहभोग घेण्याच्या इच्छेतूनच तिची काळजी घेतो. तिच्या गरीब, कंगाल जीवनाची दया हे निमित्तमात्र होते. दुसरीकडे वाण्याचा मारूती साटम तिच्यापेक्षा वयाने लहान असूनही भिकीच्या वृद्धत्वाकडे झुकलेल्या देहाचाही उपभोग घेतो. साटम भिकीचा उपभोग घेतो परंतु त्याची अगोदर कमळीवर नंतर चिमणीवरही त्याची लालसा दिसून येते. निराधार स्त्रीकडे पाहण्याचा समाजातील पुरुषांचा भोगवादी दृष्टिकोन येथे दिसतो. (पृ.४५,४७,६१,६२,६९)

पुरुषांचा स्त्रियांविषयी असणारा दृष्टिकोन आणि त्यांची पुरुषी मानसिकता यावर भाष्य करताना डॉ. पुष्पा राजापुरे म्हणतात,

"विष्णू असताना व त्याच्या मृत्यूनंतरही तिला काम देणारा बाळभट आणि कमळीची आसक्ती मनी धरूनच तिच्या उंबरठ्याआत येतात. यातील कुणीच तिच्यासाठी अथवा वयात येणाऱ्या तिच्या मुलींसाठी विधायक जीवनमार्ग घेऊन येत नाही, इतकेच नाही तर कमळी बरी होऊ शकत नाही, हे ध्यानात आल्यावर साटम आपली नजर चिमणीच्या म्हणजे कमळीच्या धाकट्या बहिणीकडे वळवितो. इतकेच नाही तर, 'तिका ह्या विषयातला कमळीपरीस लै कळला–' (पृ.११०) असा शेरा तिच्या मातेजवळ व्यक्त करून भिकीच्या मुलींच्या जीवनाची दिशा भिकीसारखीच असणार हे सूचित करतो. तर बाळभट कमळीचे ओरडणे, चित्कारणे

आपल्या भोगविलासातील अडचण मानून एका अतृप्त क्षणी भिकीला आपल्या मुलीला विहिरीत फेकून द्यायला प्रेरीत करतो. ही दोन्ही पुरुषपात्रे म्हणजे भिकीच्या सभोवतालच्या भोगनिष्ठ आणि वस्तुवादी समाजाचीच प्रातिनिधिक रूपे आहेत."[९] पुरुषांच्या भोगवादी मानसिकतेवर डॉ. पुष्पा राजापुरे यांनी अचूक भाष्य केले आहे.

पुरुषी मानसिकतेमुळे शोषण झालेल्या भिकीविषयी आपले विचार मांडताना अंजली कुलकर्णी म्हणतात,

"विष्ण्या, बाळ्या भट, साटम ही सगळी या शोषणव्यवस्थेची प्रतिके आहेत. परिणामांची भिती नसलेले हे पुरुष भिकीशी संभोग, वासनांच्या लीला करून निघून जातात. तिला एका पाठोपाठ एक होणाऱ्या मुलांची फिकीर, काळजी, त्यांच्या भुकेची तजवीज, कशाशीच त्यांना देणेघेणे नाहीय. हे शोषणच आहे. त्याबद्दलची तिची चीड, तिचा त्रागा पोटतिडकीचा आहे. पण त्याचीही दखल हे पुरुष घेताना दिसत नाहीत."[१०]

पुरुषांची मानसिकता स्त्रियांना शोषित होण्यास भाग पाडते. हे भाष्य अंजली कुलकर्णी यांनी यथोचित मांडले आहे. पुरुषी मानसिकतेमुळे स्त्रियांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या प्रश्नांकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

**३. कुरूक्षेत्र :**

वसंतराव दामले हे शिक्षक होते. ते सुमाला पहायला जातात. मी मुलगा आहे या भावनेतून तो आणि त्यांचे मामा सुमाला बरेच प्रश्न विचारतात, पण तिच्या गुणांचे कौतुक करताना दिसत नाहीत. उलट सुमाला पुढील शिक्षण तिच्या आईवडिलांनी देऊन तिला शिक्षिका बनवावे अशी अट घालतात. लग्नाचा सर्व खर्च सुमाच्या घरच्यांनीच करावा आणि पाच–सहा तोळे घालण्याची अपेक्षा व्यक्त करतात. वरील संवादावरून एक गोष्ट लक्षात येते की, वसंतराव दामले एक शिक्षक आहेत म्हणजे ते सुसंस्कृत, संस्कारी असायला काय हरकत आहे? पण ते खूप स्वार्थी, लोभी विचारसरणीचे दिसून येतात. पत्नी म्हणजे एक जिवंत मानवप्राणी आहे, ती एक स्त्री आहे, तिच्याही काही भावभावना असतील याचा तिळमात्र विचार न करता ते तिच्यावर

सर्व गोष्टी लादताना दिसतात. शिवाय वस्तू विकत घेतल्याप्रमाणे ते लग्नाची बोलणी करताना दिसतात. (पृ.८१,८२)

लग्न झाल्यानंतर पहिल्या रात्रीही ते पत्नीशी नीट संवाद साधताना दिसत नाहीत. उलट सुमाची गाणं म्हणून दाखविण्याची इच्छाही धूडकावून लावतात आणि सुमावर आपला अधिकार गाजवतात. आपण पुरुष आहोत म्हणजे आपण म्हणेल तसे सुमाने वागले पाहिजे असा आग्रह धरतात. (पृ.८८) सुमाने गाणंबिणं बंद करून फक्त मास्तरीण व्हावं आणि पगार कमवावा अशीच इच्छा वसंतराव दामले यांची असते. ते तिला याची आठवण करून देतात. बायको ही पैसा कमावण्याचं साधन आहे या वृत्तीतून ते बायकोकडे पाहतात. तिच्याशी संभाषण करताना पुरुषी अहंकारानेच ते संवाद साधतात. (पृ.९१) ते सुमाला जबरदस्तीने डी.एड. करायला भाग पाडतात आणि वर्षाच्या आत मूल झालं पाहिजे ही एकतर्फी इच्छाही ते सुमावर लादतात. सुमाचा नकार असतानाही ते सुमावर डोळ्यांचे अधूपण, शिक्षण, मातृत्त्व लादतात. बायको म्हणून तिने या सर्व गोष्टी नवऱ्याच्या इच्छेखातर केल्याच पाहिजेत त्यात कोणतीही तक्रार ते ऐकून घ्यायला तयार नसतात, (पृ.९३,९४) ते सुमाला शिव्या घालतात. वाईट शब्दांनी तिला टोचून बोलतात. स्वत: तिला डोळ्यांचा त्रास सुरू होतो तेव्हा तिची काळजी न घेता उलट ‘तू आंधळी झालीस की मजा होईल. मी दुसरी बाईल आणीन. तुला काही दिसणार नाही. तू बैस आंधळी होऊन कोपऱ्यात.’ (पृ.१०६) अशाप्रकारे तिचा अपमान करतात. एकदा तिला मारहाण करून तिला आणि बाळाला माहेरी नेऊन सोडतात आणि वर सुमाच्या आईला सुमाला माझ्याशी नीट वागायला सांगा असा सल्लाही देतात. संसारासाठी आपल्या मुलाच्या संगोपनासाठी ते खर्च करत नाहीत यावरून त्यांची अत्यंत लोभी आणि माणुसकीशून्य प्रतिमा समोर येते. (पृ.१२१,१२५) ‘पगार मिळतो तो काय करता?’ असे सुमाने विचारताच ‘उडवतो, दारूवर, बाईवर’ असे ओरडून एकदा नाही हज़ारदा उडवीन असे निक्षून सांगतात. (पृ.१३९) ते सुमाकडे एक उपभोग्य वस्तू, ऐश करण्यासाठी, पैसा मिळविण्याचे साधन म्हणूनच पाहताना दिसतात.

या सर्व गोष्टींचा विचार करता वसंतराव दामले यांची पुरुषी मानसिकता दारू, बाई, बाटली, पैसा, संपत्ती यांची हाव असणारी दिसून येते. स्वत: कष्ट न करता, संसाराची जबाबदारी

न उचलता आपल्या अपयशाचं खापर ते पत्नी आणि सासरचे लोक यांच्यावर फोडताना दिसतात. स्वत: मात्र खाणं-पिणं, पत्नीचा उपभोग सर्व काही वेळोवेळी घेतात. त्याच्यामधला अहंकार, दुसऱ्याच्या जीवावर ऐष आराम आनंद मिळविण्याची वृत्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

**४. देवाची घंटा :**

या कादंबरीतील नायक गोप्याभट हा मारूतीचा पुजारी. तो लग्न न करताच येसू नावाच्या तेलीण बाईशी संबंध ठेवतो. तिच्यापासून त्याला शंकऱ्या आणि चंद्री नावाची मुले होतात. कुटुंबाची पालनपोषणाची जबाबदारी उचलण्यासाठी पूजेतून मिळणारी दक्षिणा आणि लोकांनी दान केलेल्या वस्तू एवढीच मर्यादित साधनसामुग्री असते. परंतु मुलांचे आणि येसूचे चांगले संगोपन करण्यासाठी तो इतर काही कामधंदा करताना दिसत नाही. पुढे काही दिवसांनी त्यांच्यावर उपासमारीची पाळी येते तेव्हासुद्धा तो अधिक काही प्रयत्न करताना दिसत नाही. एक साधा भटजी असून तो बाई ठेवतो. पोरंबाळं संभाळायचा त्रास तो घेताना दिसत नाही. शिवाय येसूचा उपभोग त्याला सहजपणे मिळतो यावरून असे वाटते की, त्याला सर्व गोष्टी सहजतेने मिळालेल्या असल्याने तो त्यांचे मूल्य समजून घेताना दिसत नाही. शिवाय लग्न केलेल्या बायकामुलांची जबाबदारी कायद्याने आणि समाज, नीतिधर्माने ही त्या पुरुषाचीच असते. परंतु अनीतीने झालेली मुले आणि ठेवलेली बाई याविरूद्ध काही आवाज ऊठवताना दिसत नाही. असेल त्या परिस्थितीत ते जीवन जगताना दिसतात. त्यामुळे त्यांची कर्त्या पुरुषाविषयी जास्तीची अपेक्षा नसते. याचाच फायदा पुरुषांनी म्हणजेच गोप्याभटाने घेतलेला दिसून येतो. या सर्व परिस्थितीची कल्पना गोगटे वकिलांनी गोप्याभटाला उपहासाने केलेल्या संभाषणातून दिसून येते,

'मारूतीची पूजा कर. इथच-खा जेव-राहा. बुवांनी बांधलीच आहे एक खोली. अधून मधून तुझ्या येसूकडे जात जा. मजा आहे बुवा तुमची! साला, एक साधा भटजी, बाई ठेवतो! किंवा पोरं सांभाळायचा त्रास नाही, मजा मात्र मारायची.' (पृ.३४) या सर्व परिस्थितीवरून गोप्याभटाची मनमर्जी करणारी आणि बेफिकीरीची मानसिकता दिसून येते. नंतर गोप्याभट येसू आणि तिच्या दोन मुलांना सोडून आईवडिलांकडे निघून जाऊन लग्न केल्याचे वासूभट येसूला सांगतो.' या संदर्भावरूनही गोप्याभटाची निष्काळजीपणाची आणि स्वार्थी वृत्तीची छटा त्याच्या

वागण्यात दिसून येते. (पृ.९४) गोप्याभट येसूला सोडून गेल्यावर ती असहाय आहे असे पाहून वासूभट तिला मदत करण्याच्या निमित्ताने तिच्याशी लगट करतो. तिला मदत करण्यापेक्षा तिच्याकडून शरीरसुखाची तो वृद्ध असूनही अपेक्षा धरतो. (पृ.९७,१००) वासूभट येसूकडून आपली शारीरिक गरज भागवतो. पण तिच्या संसाराला हातभार लावण्यात तो आजारपणामुळे अयशस्वी होतो. तो आजारी असताना येसू त्याच्या घरी जाते, त्याची सेवा करते तेव्हा लग्नाचा विषय निघाल्यावर त्या दोघांमध्ये जे संभाषण होते त्यावरून वासूभटाची मानसिकता समजण्यास मदत होते,

"करणार होतो, गों. मुलगी सांगूनसुद्धा आली होती. पण म्हटलं, नकोच ती कटकट. नकोच तो संसाराचा बोवाह गळ्यात. लगीन करा, मग पोरं होणार. मग संसाराचा गाडा सुरू. बायका–पोरांना सांभाळा, त्यांच्यासाठी पैसा मिळवा, पैसा नाही, मग कर्ज काढा. त्यांचं शिक्षण, आजारपण. शी! त्यापेक्षा असा सडाफीटंग राहणं उत्तम." मग किंचित खाजगी आवाजात तो म्हणाला, "त्यापेक्षा तुझ्यासारखी कोणी भेटली, तर संबंध ठेवावे. हे उत्तम. आपलं काम केलं, की बाजूस." (पृ.१२४)

वासूभटाच्या या वक्तव्यावरून असे लक्षात येते की, वासूभटाला स्त्रीचा उपभोग पाहिजे पण तिची व तिच्या मुलांची, संसाराची जबाबदारी नको. जीवनात सर्व काही मौजमजा पाहिजे पण बांधिलकी आणि जबाबदारी टाळण्याची वृत्ती वासूभटात दिसून येते. येसूला जेव्हा तिसऱ्यांदा दिवस जातात तेव्हा ती वासूभटाकडे मदतीची अपेक्षा करते पण वासूभट हे पोर आपलं नाही असेच सांगतो. वसूचा उपभोग त्याने कित्येक वेळा घेऊनही ते मूल आपलं नाही म्हणून वसूला फटकारतो. येसूच्या तशाही अवस्थेत आणि वासूभट आजारी असतानासुद्धा तो येसूचा उपभोग घेतो. (पृ.१२६,१२७) यावरून त्याची स्त्रीलंपटपणाची, स्वार्थी, आपमतलबी मानसिकता समोर येते.

येसूच्या मृत्यूनंतर शंकऱ्या मंजुळेला घेऊन वासूभटाकडे जातो. वासूभटाकडून पैसे घेऊन मंजुळेला तिथेच सोडून जातो. वासूभट हे पाप आपलं नसल्याचे सांगत होता परंतु तो मंजुळेला सोडून गेल्यावर वासूभट त्या कोवळ्या जिवाला गोगटे वकिलाकडे सोडून देतो. ते पाप

गोगटे वकिलाचे आहे असे त्याला सांगतो आणि आपल्यावर आलेली मंजुळेची जबाबदारी गोगटे वकिलावर लादतो. (पृ.१५९,१६०,१६२) येसूचा उपभोग घेऊनही आणि येसूने वासूभटाला पूर्वकल्पना देऊनही वासूभट मंजुळेची जबाबदारी नाकारतो. शिवाय येसू मेल्यावर तो शंकऱ्या, चंडी, मंजुळा यांच्याशी असलेले संबंध संपविताना दिसतो. याचाच अर्थ हा वासूभट अतिशय आत्मस्वार्थी, आत्मकेंद्री मानसिकतेचा पुरुष दिसून येतो.

या कादंबरीतील तिसरे पुरुषपात्र असलेले गोगटे वकील विधुर असतात. ते तांबेबाई नावाच्या शिक्षिकेशी अनैतिक संबंध ठेवतात. पण तिच्या जबाबदाऱ्या नाकारतात. ती विधवा असून तिला गोगटे वकिलांपासून दिवस जातात. पण गोगटे वकील तिची कोणतीही दखल घेत नाहीत. आपले पाप समोर आल्याने आणि गोगटे वकील साथ देत नसल्याने त्या आत्महत्या करतात, परंतु गोगटे वकिलांना त्याचे काहीही सोयरसुतक नसते. त्या जिवंत असेपर्यंत त्यांनी तिचा उपभोग घेऊन आणि तिला अडचणी येऊनही पुरुषी अहंकारापायी आणि स्वच्छंदी वृत्तीपायी तिला आत्महत्येस प्रवृत्त करतात. (पृ.१०९,१३३)

एकीकडे तांबेबाईंचा उपभोग घेत असतानाच गोगटे वकील गोप्याभटाचा येसूचा आधार सुटल्यानंतर येसूचाही उपभोग घेतात. तिच्या असहायतेचा गैरफायदा घेतात. तिला कामाची लालूच दाखवून तिचा उपभोग घेतात, परंतु ती गरोदर असताना, अडचणीत असताना तिला कोणत्याही प्रकारची मदत करत नाहीत. उलट येसूच्या मृत्यूनंतर मंजुळेचीही जबाबदारी ते झिडकारतात. कठोर अंत:करणाने ते तिला मारूतीच्या मंदिरात पाबळीच्या पाण्यात मरणासन्न अवस्थेत सोडून देतात. (पृ.१११,११३,११७,१४१,१६४,१६५) गोगटे वकील हे पुरुषपात्र एकाच वेळी दोन स्त्रियांचा उपभोग घेताना दिसते, पण दोघीही गर्भवती असताना, दोघींनाही कामाची नितांत गरज असताना, मदतीची अत्यंत गरज असतानाही ते दोघींनाही झुलवत ठेवतात. शेवटी दोघीही आपापले मार्ग निवडतात. आणि त्यात दोघीही आपला अंत करवून घेतात. गोगटे वकिलांच्या कठोरपणाची, स्वार्थी वृत्तीची तर सीमाच राहिली नसल्याचे प्रत्ययाला येते. दोघींनाही ते सर्वप्रकारची मदत करू शकले असते परंतु संपूर्णपणे अलिप्त राहतात. त्या दोघींच्याही मृत्यूची सल त्यांना अजिबात दिसत नाही. एक पाषाणहृदयी पुरुष म्हणूनच पुढे येतात.

'देवाची घंटा' या कादंबरीतील पहिले पुरुषपात्र गोप्याभट आपली जबाबदारी सोडून येसू, चंद्री, शंकऱ्या यांना समस्येच्या खायीत सोडून स्वत: दूर जाऊन तिसरे लग्न करतात. तर दुसरे पुरुषपात्र वासूभट लग्न न करताच स्त्रीचा म्हणजेच येसूचा उपभोग घेऊनसुद्धा आपल्या मुलीचाही म्हणजेच मंजुळेचाही ते त्याग करतात. गोगटे वकील एकाच वेळी येसू, तांबेबाई यांचा उपभोग घेऊन त्यांच्या शेवटास कारणीभूत ठरतात.

समाजाने, परंपरेने, धर्माने श्रेष्ठत्व मिळालेली ही तीनही पुरुषपात्रे स्वत:च्या पुरुषत्वाच्या जोरावर स्त्री हे उपभोगाचे साधन समजून तिचा वापर करतात. आपल्याला मर्जीप्रमाणे ते त्यांचा उपयोग घेतात. मानवी भावभावना, प्रेम, दया, करूणा यांच्या गावीही दिसून येत नाही. स्वत:चेच चोचले पुरूविण्यासाठी स्त्री ही सहजसाधन म्हणून ते वापरतात. येसूसारखी असहाय स्त्री नीतिधर्माच्या चौकटीत न बसल्यानेच तीनही पुरुषांच्या पुरुषी मानसिकतेची शिकार झालेली दिसते. निसर्गाने बहाल केलेले पुरुषत्व पशूपातळीवर जाऊन त्याला वेगळे वळण लागल्याचे चित्रण मराठ्यांनी हृदयस्पर्शी केले आहे. पुरुषी मानसिकतेला कोणतीही जात–पात–धर्म–वय आड येत नाही, याचे अतिशय प्रभावशाली चित्रण मराठ्यांनी या कादंबरीत केले आहे. पुरुषाचे पुरुषत्व त्याला अहंकारापायी, लोभापायी, स्वार्थापायी अतिशय खालच्या पातळीवर नेऊन ठेवते. माणुसकीलाही लाजविणारे असेच वर्तन या पुरुषपात्रांच्या मानसिकतेमधून पुढे आलेले दिसून येते.

**५. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

रमेश पंडितला मूल होणार नाही हे सत्य समजल्यावर तो हे सत्य आपल्याप्रमाणेच आपल्या बायकोने स्विकारावे अशी अपेक्षा करतो. वास्तविक नलूला आई होण्याची, अपत्य प्राप्तीची तीव्र इच्छा दिसून येते. परंतु डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे रमेश पंडित बाबा होऊ शकत नसले तरी दुसऱ्या पुरुषाचे वीर्य वापरून त्या दोघांनाही मातापित्याचे सुख अनुभवता येईल. ही गोष्ट रमेश पंडितला मान्य असते परंतु नलूला ही गोष्ट अमान्य असते. स्वत:च्या पुरुषत्वाची उणीव या गोष्टीमुळे भरून निघणार असल्याने कदाचीत रमेश पंडित या गोष्टीसाठी तयार झालेला दिसतो. शिवाय नलूनेही ही अट मान्य करावी अशी आपेक्षा तो करतो. (पृ.५२,६४)

नलू अनोळखी पुरुषाचं वीर्य वापरण्यास विरोध करते तेव्हा रमेश पंडित तिला आपल्या मित्राचे–विष्णूचे वीर्य वापरण्याची कल्पना सुचवतो. पण डॉक्टरांची मान्यता नसल्याने त्यांना या गोष्टीसाठी थांबावे लागते. शेवटी रमेश पंडित विष्णूला आपल्या घरी घेऊन येतो. दोघांनाही प्रत्यक्ष संबंध ठेवण्याची विनंती करतो आणि त्यांना प्रायव्हसी किंवा एकांत मिळावा म्हणून बाहेर निघून जातो. (पृ.६२,७४) या प्रसंगात रमेश पंडितची मानसिकता तडजोडीची, पत्नीसुखाची दिसून येते. परंतु या गोष्टीला दुसरी बाजू आहे – नलू आई झाल्यानंतर रमेश पंडितही बाबा होणार होता. प्रत्यक्ष पिता बनण्याचे सुख जरी त्याच्या नशिबात नसले तरी समाजाच्या दृष्टीने तो पिता बनणार होता. लहान मूल वाढविण्याची, पित्याचे कर्तव्य करण्याची संधी त्याला मिळणार होती. त्याच्यातील शारीरिक दोष समाजाला माहीत नव्हते. त्यामुळे किमान समाजात तरी सन्मानाने पित्याचे कर्तव्य निभावता येणार असते. या सर्व गोष्टींचा विचार करून आणि स्वत:च्या बाबतीतले सर्व मार्ग संपल्यामुळेच तो हे कर्म करण्यास तयार झाल्याचे चित्र स्पष्ट होते. दुसरीकडे नलूला मातृत्व मिळाल्यावर ती सुखी आणि आनंदी रहाणार होती. पर्यायाने रमेश पंडितही सुखी होणार होता.

नलू गर्भवती असल्याचा रिपोर्ट डॉक्टरांनी दिल्यावर रमेश नलू आणि विष्णू तिघेही घरी येतात. घरी आल्यावर विष्णूने त्याच्या घरातून बाहेर जावे अशी इच्छा रमेश पंडितची असते. कारण नलू त्याची बायको असते आणि त्याला पतीच्या अधिकाराने, प्रेमाने नलूशी संवाद साधायचा असतो, ही रमेश पंडितची सहजसुलभ नैसर्गिक भावना असली तरी तो आता नलू आणि तिच्या पोटातील बाळावर आपलाच सर्वस्वी अधिकार आहे असे पहातो. (पृ.९०) तो नलूच्या आयुष्यातील विष्णूचे येणे सहजपणे सहन करू शकत नव्हता. पण त्यांच्या दोघांच्या सुन्या सुन्या झालेल्या आयुष्यात आनंद खेळावा म्हणून तो विष्णूला मनाविरूद्ध सहन करतो. आपल्या पत्नीवर फक्त आपलाच अधिकार असावा असे कोणत्याही पुरुषाला वाटणे साहजिक आहे परंतु नलूच्या बाबतीत समस्या वेगळी होती. नलूच्या सुखदु:खाचा थेट संबंध रमेशच्या आयुष्याशी होता. त्यामुळे रमेशला हे सर्व निमुटपणे सहन करावे लागते. (पृ.९४)

सर्व व्यवस्थित पार पडल्यानंतर रमेश पंडित नलूला विष्णूशी असलेले संबंध थांबविण्यास सांगतो. विष्णूशी नलूचे असलेले संबंध त्याला सहन होत नाहीत. परत तो फक्त एक मित्र म्हणूनच आपल्या आयुष्यात असावा अशी मानसिकता रमेश पंडितची असते. (पृ.९५) नलूवर अर्धा अधिकार विष्णूचा आलेला असतो हे सत्य रमेशला सहन होत नाही. शेवटी तो नलू आपल्या हातातून निसटत चाललीय हे लक्षात आल्यावर नलूला मूल हवे आहे हे सत्य माहीत असूनही तो नलूला आपल्याला हे बाळ नको म्हणून सांगतो. (पृ.११०) हा सर्व घटनाक्रम पाहता रमेश नलूने, विष्णूने आपल्या म्हणण्याप्रमाणेच बदलले पाहिजे अशी मानसिकता ठेवून असतो. काहीही झाले तरी पत्नीवर आपलाच अधिकार राहिला पाहिजे आणि तिने आपल्या म्हणण्यानुसार वागले पाहिजे अशी अपेक्षा करतो. पुरुष स्वत:चा अधिकार, अस्तित्व कधीही कमी होऊ देत नाही हेच मराठे यांना येथे सुचवायचे आहे असे दिसते.

या कादंबरीतील दुसरे पुरुषपात्र विष्णू हा दोन मुलांचा पिता असूनही मित्राच्या आग्रहाखातर नलूशी शरीरसंबंध ठेवतो पण त्यालाही नलू मित्राची बायको असूनही आवडत होती हे स्पष्ट होते. शिवाय स्वत:ची बायको असूनही दुसरी स्त्री उपभोग घेण्यासाठी मिळतेय म्हटल्यावर त्यालाही मनातून आनंद झाल्याचे दिसून येते. कारण फक्त अपत्यप्राप्तीसाठी एकत्र येण्याचे ठरवूनही नलूचे आणि विष्णूचे संबंध कायम राहतात. आपण एक पूर्ण पुरुष असल्यानेच दोन स्त्रिया आपल्या आयुष्यात आहेत याचा अभिमानही त्याच्या ठायी दिसून येतो. मित्राची अत्यंत काळजी करणारा विष्णू नंतर मित्राच्या भावभावना, गरजा लक्षात न घेता त्याच्या पत्नीवर, मुलावर आपला अधिकार दाखवायला लागतो. पूर्ण पुरुषाचा अहंकार त्याला हे सर्व करण्यास भाग पाडतो असेच दिसून येते. (पृ.८६,८७,८८,१०१,१०९) या दोन परस्परविरोधी पुरुषांच्या मानसिक प्रक्रिया पण दोघांनाही स्त्रीवर आपला अधिकार दाखवायचा असतो आणि स्त्री ही पुरुषांचीच मक्तेदारी असल्याची मानसिक भावना दिसून येते.

रमेश पंडितच्या माध्यमातून एक पुरुष पत्नीच्या आणि आपल्या अपत्यसुखापायी आपले सारसर्वस्व गहाण टाकून, पुरुषी अहंकार बाजूला सारून अपत्यसुखप्राप्ती करून घेणारा पुरुष पुढे

येतो तर दुसरीकडे विष्णूच्या रूपाने मित्राच्या असमर्थतेचा पुरेपूर फायदा उठविणारा पुरुष पुढे येतो.

**६. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

केतकी साने एव्हरफ्रेश केमिकल प्रॉडक्टस् प्रा. लि. या कंपनीत मार्केटींग ऑफिसर म्हणून काम करते. तिच्यासोबत ऑफिस सुप्रिटेंडेंट श्रीनिवास हे काम करत असतात. पण त्यांना आपली बॉस एक स्त्री आहे ही गोष्ट त्यांना सलते. एका स्त्रीला बॉस म्हणून बोलविणे त्यांना पसंत नव्हते. त्यांच्या वागण्याबोलण्यात एक पुरुषी अहंकार दिसून येतो. (पृ.८)

अविनाश साने आणि केतकी साने दोघेही नवराबायको वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये मार्केटींग मॅनेजर म्हणून काम करतात. पत्नीने रात्री झोपताना ऑफिसचे विषय बोलू नयेत असे अविनाशला वाटते. त्याला या गोष्टींचा खूप राग येतो. त्यामुळे पंधरा दिवस पती–पत्नीचे नातेसंबंध बिघडतात. आपली पत्नी आपल्यापेक्षा चांगले काम करतेय हे पाहून अविनाशला केतकीच्या ऑफिसच्या कामांविषयी द्वेष निर्माण होतो आणि त्याचे रूपांतर त्यांची नाती बिघडण्यात होते. अविनाशचा अहंकार दुखावतो त्यामुळे तो एक नवरा म्हणूनही पत्नीवर अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करतो, तिच्यावरचा राग व्यक्त करतो. तिच्याकडे पाठ फिरवितो. (पृ.६६,६७)

अविनाश साने आपल्या कामात वरिष्ठांच्या चुकीमुळे अयशस्वी होतो. तेव्हा तो घरी येऊन ड्रिंक आणि सिगारेट यांचा सहारा घेतो. कामाचा ताणतणाव किंवा इतर तणाव आले तर पुरुष नेहमी व्यसनांचा सहारा घेताना दिसतात किंवा स्त्रियांवर आपला अधिकार दाखविताना दिसतात. या प्रसंगातून पुरुषांची मनमानी, आपले आचार–विचार चांगलेच असल्याच्या भावनेने ते पुरुष असल्याचा फायदा घेताना दिसतात. (पृ.१०५)

आपले उत्पादन खपविण्यासाठी, आपली इमेज परत मिळविण्यासाठी अविनाश साने केतकीच्या सर्व कल्पना चोरतो. तरीही तो आणि त्याची कंपनी अयशस्वी ठरते. आणि केतकी आणि केतकीची कंपनी मार्केट काबीज करण्यात यशस्वी होते. केतकीचे म्हणजेच आपल्या पत्नीचे यश अविनाशला सहन होत नाही तेव्हा तो तिला तिच्या पदाचा राजीनामा द्यायला सांगतो. केतकीच्या स्कीम्स् चोरूनही अविनाश त्या यशस्वी करू शकला नाही म्हणून दुसरा पर्याय म्हणून

तो पत्नीला राजीनामा द्यायला सांगतो. अविनाशला आपल्या पत्नीकडून–स्त्रीकडून झालेला पराभव सहन होत नाही याचे बोलके प्रत्यंतर त्यांच्या दोघांच्या संभाषणातून दिसून येते,

"कोणत्याही पुरुषाला स्त्रीकडून झालेला पराभव सहन होत नाही. अविनाश म्हणाला आणि ग्लासातील व्हिस्कीचा घोट घशात ओतत सांगू लागला, आपण आपापल्या कंपन्यांची लढाई लढतोय. दोन प्रतिस्पर्धी कंपन्यांची मार्केटमधली लढाई, ती आपण घरात आणली. अढळ होतं ती लढाई घरात येणं. कारण? त्या लढाईतले प्रतिस्पर्धी सेनापती आपणच होतो. एक सेनापती जिंकला. दुसरा हरला. हरला तो पुरुषच आहे. पती आहे म्हणून सांगतो – तू दुसरी सेनापती. तू राजीनामा दे. आमच्या जोशाला आणि त्याच्या त्या भावाला वाटतंय, तुझ्या कल्पकतेमुळं तुमच्या स्कीम्स् यशस्वी झाल्या. तुझ्याबद्दल माहिती झालीय दोघांनाही. तू राजीनामा दे. त्यांना आनंद होईल. माय बॉसेस विल बी हॅपी. तुझ्यामुळे आपला प्रतिस्पर्धी प्रॉडक्ट मार्केट काबीज करू शकला असं त्यांना वाटतंय. मी उद्या त्यांना सांगतो. नाऊ मिसेस केतकी साने इज नॉट देअर. ही हॅज रिझाइन्ड. आता मी यश मिळवून दाखवतो. आय विल गिव्ह यू रिझल्टस्. डोण्ट ट्रान्सफर मी." (पृ.१३३)

अविनाश केतकीला राजीनामा देण्यासाठी संसार मोडण्याची भाषा करतो, आपल्याला अपमानित वाटत असल्याची भाषा करतो. (पृ.१३५) अविनाशच्या या बोलण्यावरून त्याचा पुरुषी अहंकार आणि अयशस्वीता प्रत्ययास येते. आपले यश, अधिकार, सत्ता, पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी तो पत्नीला म्हणजेच एका स्त्रीला मागे येण्याची भाषा करतो. ती मागे आली म्हणजे त्याचे मोठेपण आपोआप सिद्ध होईल अशी मानसिकता अविनाशची दिसून येते. अविनाश स्वत: कष्ट करण्यात, आपली हुशारी दाखविण्यात कमी पडतो पण याचे खापर तो पत्नीच्या माथी फोडतो. प्रतिस्पर्धी स्त्री नसावी असलीच तर विजय आपलाच व्हायला हवा अशी पुरुषांची मानसिकता असल्याचे येथे ह. मो. मराठे सुचविताना दिसतात.

**७. मार्केट :**

एस. के. केळकर मार्केटींग मॅनेजर पदावर काम करतात. त्यांच्याबरोबर लेडी स्टेनोटायपिस्ट काम करते. ह. मो. मराठे यांनी केळकरांची मानसिकता निवेदनातून स्पष्टपणे

मांडली आहे. ते म्हणतात, 'केळकर काम करत असताना ती समोरच्याच खूर्चीत बसलेली असे. तिचा ठसठशीत बांधा त्यांना सहज बघता येत होता. तिच्या सौंदर्याचं ओसरतं दर्शन होऊनही केळकर प्रभावीत होत आणि त्यामुळे त्यांचं काम अधिक उत्कट वेगाने होत होते.' (पृ.१३) वरील निवेदनावरून लक्षात येते की स्त्रीकडे एका वेगळ्या नजरेने पाहण्याची मानसिकता दिसून येते. कामाच्या ठिकाणीही स्त्रियांना अशा गोष्टींना सामोरे जावे लागते. काम करताना उत्तेजन मिळावे, स्फूर्ती मिळावी म्हणून लेडीज स्टेनो ठेवण्याची पुरुषांची मानसिकता ह. मो. मराठ्यांनी येथे रेखाटली आहे.

मिसेस अश्विनी केळकर, तनुजा केळकर या दोघी ज्या बॉसच्या हाताखाली काम करतात ते दोघेही त्यांच्याकडे लेडीज स्टेनोमुळे आपण जास्त उत्साही प्रभावी काम करू शकतो असे विचार मांडल्याचे दिसून येते. त्यांनी दोघांनीही आपापल्या स्टेनोचे कौतुक केलेलेही दिसून येते. लेडीज स्टेनोने सतत आपल्याबरोबर असले पाहिजे अशी मानसिकता पुरुषांची दिसून येते. (पृ.५४,७२) लेडी स्टेनो खुष रहावी, तिने आपली सर्व कामे करावीत, आपली मर्जी सांभाळावी म्हणून तिला साडीसारखे गिफ्टही देताना दिसतात. तिचे, तिच्या सौंदर्याचे खूप कौतुकही करताना दिसतात. (पृ.९१,९३,९४)

मि. मुळगांवकर ब्रँच मॅनेजर असतात आणि ते लोन मंजूरीचे काम करतात. अशाच एका प्रसंगी लोन मंजूर करण्यासाठी अडचणी असताना, कर्ज मंजूर करण्यासारखी परिस्थिती नसताना फक्त अश्विनी केळकर शब्द टाकतात म्हणून ते कर्ज मंजूर करतात. अश्विनी केळकरचे हे कर्जमंजुरीचे काम केले तर आपले मिसेस केळकरांवर उपकार होतील त्यामुळे त्या आपले सर्व म्हणणे ऐकतील अशी इच्छा धरून ते काम करतात. स्त्रियांच्या नजरेत चांगले बनून त्यांची सहानुभूती मिळविण्याची ही पुरुषी मानसिकता आहे हेच येथे स्पष्ट होण्यास मदत होते. (पृ.१३५)

आपली कामे बॉसकडून करून घेण्यासाठी आपली पत्नी बॉसचे कौतुक करते, त्याच्यासमोर पदर टाकते, त्यांच्याबरोबर पार्ट्या करते याची कोणतीही सल मि. केळकरांना दिसत नाही. उलट ते पत्नीला असे वागण्यास आणि कामे करून घेण्यास, पैसे मिळविण्यासाठी

उत्तेजनच देतात. स्त्री पुरुषांच्या हातातील खेळणे आहे, त्यांच्या मनोरंजनाचे, समाधानाचे साधन आहे हे या कादंबरीतील सर्वच पुरुष पात्रांच्या मानसिकतेतून दिसून येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या पत्नीनेही असे गैरवर्तन करणे, आपल्या मुलीच्या व पत्नीच्या बॉसनी त्यांच्याबरोबर असे अनैतिक वर्तन करणे हे मि. केळकरांना अजिबात चुकीचे वाटत नाही. उलट बिझनेस कल्चरमध्ये या गोष्टी अपेक्षित आहेत असे समर्थन येते. (पृ.१४३)

तनुजा केळकरचे बॉस दिल्लीत तिच्यावर बलात्कार करतात आणि तिच्याविरूद्ध खोटे आरोप करून तिला ताबडतोप कामावरून कमी करण्याच्या सूचना देतात. (पृ.१९९,२००) यावरून तनुजा केळकरचे बॉस असलेले दिवाण सर किती खालच्या थराला जातात आणि पुरुष आणि बॉस या दोन्ही अहंकारापोटी ते तनुजाचे करिअर आणि शील दोन्हीही संपुष्टात आणताना दिसतात. आपण पुरुष असल्याने, शिवाय अधिकारी असल्याने आपण काहीही करू शकतो याचा अहंकार मि. दिवाणांच्या वागण्यातून दिसून येतो.

या घटनेनंतर मि. दिवाण दुसरी लेडी पी. ए. ठेवतात. मि. केळकर दिवाणांकडे मुलीच्या संदर्भात जाब विचारण्यासाठी जातात पण दिवाणांकडून मिळालेली ऑफर स्विकारतात. दिवाणांच्या ऑफरमुळे ते मुलीचे दु:ख विसरून जातात आणि बिझनेस डील करतात. या प्रसंगाच्या अनुषंगाने दिवाण आणि केळकर यांची स्त्रियांकडे पाहण्याची स्वार्थी दृष्टी दिसून येते. मि. केळकर तर नातीगोतीही विसरतात. पैसा, पद, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी मुलीचा गेलेला बळीही त्यांना या गोष्टींपासून विचलित करताना दिसत नाी. या गोष्टीचा विपरीत परिणाम होऊन तनुजा आत्महत्या करते. या प्रसंगीही केळकर दिवाणांना जाब विचारण्यासाठी जातात परंतु दिवाणांनी देऊ केलेले एक लाख रूपये व जॉब या गोष्टींनी खूष होऊन ते मुलीचा प्रसंग विसरून स्वार्थी वृत्तीने तडजोड करतात. (पृ.२०७,२१४)

ह. मो. मराठे यांनी मार्केट कादंबरीमधील पुरुषांची मानसिकता अचूकतेने आणि वेगवेगळ्या पातळ्यांवर टिपलेली दिसून येते. पुरुष मग तो कोणत्याही नात्याचा असो, पदाचा असो त्याचा अहंकार आणि स्वार्थी वृत्ती त्याला काबूत ठेवता येत नाही. उलट पैसा, पद, प्रतिष्ठा

मिळविण्यासाठी स्त्रियांचा वापर करणे ही नित्याचीच बाब दिसून येते. स्वत:च्या प्रगतीसाठी मुलगी, पत्नी यांचा वापर करणारा पुरुषही येथे आढळतो.

**८. सॉफ्टवेअर :**

'बीवायपी ग्रुप ॲन्ड सन्स' या कंपनीचे सर्वेसर्वा असलेले एस. बी. यांचे अरूणाचलम हे एकुलते एक चिरंजीव. मि. अरूणाचलम स्त्रियांकडे भोगवादी वृत्तीने पाहताना दिसतात. स्त्री म्हणजे आपल्या हातातील चालते–बोलते बाहुलेच आहे. त्यांनी आपण सांगेल तसे वागलेच पाहिजे अशी त्यांची मानसिकता असलेली दिसून येते. (पृ.१०८)

अरूणाचलम आणि त्यांचे इतर सहकारी सहलीला जातात तेव्हा अरूणाचलमच्या कंपनीतील मिसेस गद्रे अरूणाचलमला आवडतात. अरूणाचलम मिसेस गद्रेशी निमित्त करून जवळीक साधण्याचा प्रयत्न करतात. मिसेस गद्रेंच्या सौंदर्याचे कौतुक करतात. तिच्याकडे वाईट नजरेने बघतात. गद्रेंना बायकोला चांगले कपडे घेण्यासाठी सांगतात. हवे तर पगारवाढ करण्याची, प्रमोशन करण्याची भाषा बोलतात. रात्री पार्टी चाललेली असताना अरूणाचलम पाच पेग संपविल्यावर आपला तोल जातोय असे भासवून मिसेस गद्रेंच्या अंगावर कलंडतात. अरूणाचलम आपली पत्नी सोबत असतानाही फक्त दोघांच्या मतभेदामुळे आणि तिच्याविषयीच्या नापसंतीमुळे तिच्या बरोबर न रहाता मिसेस गद्रेंशी अंगलट करतात. (पृ.१५८,१५९) अरूणाचलम मिसेस गद्रेंविषयी अशी भावना ठेवताना दिसतात कारण त्यांना माहीत असते आपण मि. गद्रेंचे बॉस आहोत. त्यामुळे ते आपल्याला काहीही करू शकत नाहीत. नोकरीसाठी गद्रेंना हा सर्व प्रकार सहन करावा लागतो. अरूणाचलम यांची स्त्रियांविषयीची भूमिका अतिशय भोगवादी दिसून येते. सुंदर स्त्री आपल्यालाच मिळावी अशी मानसिकता ते बाळगतात. स्त्रियांना त्यांच्या आवडीच्या वस्तू दिल्या तर त्या आपल्याला वश होतील अशा मानसिकतेतून ते मि. आणि मिसेस गद्रे यांच्याशी व्यवहार करतात. आपल्या आयुष्यात फक्त आपल्या आवडीची आणि सुंदर स्त्रीच आली पाहिजे अशी मानसिकता त्यांची दिसून येते.

अरूणाचलम मि. देशमुख यांची पी. ए. असलेल्या मिसेस गांधींवरही वाईट नजर टाकतात. तो देशमुखांना त्यांच्या पी.ए. मिसेस गांधींना चार दिवस तरी देण्याची विनंती करतात.

त्यांच्याकडे वासनासक्त नजरेने पहातात. यावरून मिसेस गांधीकडेही अरूणाचलम भोगवादी, वासनाधिन नजरेनेच पहातात. यावरून त्यांची स्त्रीलंपट भोगी दिसून येते. (पृ.१९५) मिसेस गांधींना कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटून अरूणाचलम त्रास देतात. मिसेस गांधींना प्रमोशन देऊन पार्टीत त्यांच्याशी गैरवर्तन करतात. ती अरूणाचलमच्या मनमानीला सर्वांसमक्ष विरोध करते म्हणून अरूणाचलम तिच्याविरूद्ध खोटे आरोप तयार करून तिला कामावरून काढून टाकण्याचा आदेश देतात. देशमुखांनी खोटा रिपोर्ट तयार करण्यास नकार दिला म्हणून त्यांनाही राजीनामा देण्यास भाग पाडतात. (पृ.१९६,१९९,२३१,२३७) अरूणाचलमच्या संपूर्ण वृत्तीचा आढावा घेतला तर लक्षात येते की, त्यांच्या लेखी स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे आणि ती कशाच्यातरी मोबदल्यात खरीदली जाऊ शकते अशी मानसिकता दिसून येते. एकीकडे आवडत्या परस्त्रीवर तो नजर ठेवून असतो, वाईट भावनेने, आसक्तीने व्यवहार करतो तर प्रत्यक्ष लग्नाच्या पत्नीला एक मूल झाल्यानंतरही प्रेम, सहवास देताना दिसत नाहीत. तिचाही फक्त कामापुरता उपभोग घेऊन तिला दूर करताना दिसतो. पत्नीने आत्महत्या करायचा प्रयत्न केला तर तिला त्यापासून परावृत्त न करता स्वत:च्या हाताने तिचा निर्दयीपणे गळा दाबतो. (पृ.२२२) हा सर्व घटनाक्रम पाहता आपण पुरुष असल्याचा आणि हवे ते मिळवून शकू असा अभिमान पुरुषांच्या मानसिकतेत दिसून येतो. अरूणाचलम पत्नीचा अडसर दूर करताना दिसतात कारण ती आयुष्यातून दूर गेली तर त्याला दुसऱ्या स्त्रीचा उपभोग विनाअडसर घेता येईल या मानसिकतेतून ते पत्नीचा अंत घडवून आणतात.

स्त्रीला तिचे मन, भावना, विचार, अस्मिता, अधिकार आहे याचा विचार न करता आपले वर्चस्व गाजविणारा, एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहणारा, आपल्या अधिकाराचा स्त्रीवर गैरवापर करणारा, स्त्रीच्या असहायतेचा फायदा घेणारा असा पुरुष मराठे यांनी रेखाटला आहे. वरील सर्व चित्रणातून पुरुषांची स्वार्थी, आपमतलबी, अहंकारी, वासनांध, अमानवी मानसिकता प्रत्ययास येण्यास मदत होते.

## ४. पुरुष आणि नैतिकता :

माणसाच्या सद्वर्तनाला प्रेरक ठरणारे व सद्वर्तनातून व्यक्त होणारे मूल्य म्हणजे नैतिक दृष्टिकोन. माणसाचा नैतिक दृष्टिकोन निकोप होण्यासाठी त्याला सत्य, नीतिमत्ता, नेमकेपणा, समतोल विचारसरणी, चारित्र्य, वस्तुनिष्ठा, तत्त्वनिष्ठा, प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता अशा गुणांचा विकास करावा लागतो.

या गुणांच्या आधारे तो समाजात स्वत:चे नैतिकदृष्ट्या चांगले स्थान निर्माण करून स्वत:ला सुसंस्कृत व चारित्र्यशील माणूस म्हणून मिरवितो. पुरुषांना प्रामुख्याने संपत्ती, सत्ता, खोटी प्रतिष्ठा, काम या गोष्टींचा जास्त मोह दिसून येतो. त्यामुळे भ्रष्टाचारासारखी प्रकरणे त्यांच्या हातून घडताना दिसतात. माणसाला चांगले काय, वाईट काय, कोणत्या परिस्थितीत कोणती गोष्ट इष्ट व कोणती अनिष्ट इ. गोष्टी नैतिकता शिकविते. नैतिकता हा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग आहे.

नैतिक घटकांच्या आधाराने नैतिक आचरण करणे हे व्यक्तीचे कर्तव्य असते. मानवी जीवनातील सर्व समस्यांचा साकल्याने विचार करून त्या सोडविण्यासाठी नीतिमत्तेचा अवलंब करून योग्य समर्थन करता येते आणि स्वत:बरोबरच समाजाची, राष्ट्राची प्रगती चांगली करता येते. पुरुष हा कुटुंबव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने त्याच्या नैतिकता या गुणावर त्याचा जीवनमानाचा स्तर ठरतो. समाजात मान, मर्यादा, प्रतिष्ठा, नावलौकिक राहण्यासाठी नैतिकता हा पुरुषाचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. नैतिकतेच्या आधारेच समाजातील सर्व व्यवहार सुरळीत चालतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांच्या आधारे पुरुषांची नैतिकता या घटकावर प्रकाश टाकताना त्याचे यश, अपयश नैतिकतेशी कसे निगडित आहे याचा विचार अभिप्रेत आहे.

## कथासंग्रह :

### १. सापेक्ष :

**सापेक्ष :**

या कथेतील प्रधान नावाचे अत्यंत संवेदनशील पात्र दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होताना दिसते. दुसऱ्या व्यक्तींवर झालेला अन्याय, अत्याचार त्यांना सहन होत नाही. म्हणून ते सत्य घटना छापण्यासाठी संपादकांना भेटतात, संपादक त्यांच्याकडे जास्त लक्ष देत नाहीत. परंतु प्रधानांची इतर सहकाऱ्यांनी थट्टा करू नये असे संपादकांना मनापासून वाटत असते. (पृ.५,८,९) एक चांगला नागरिक, संस्कारक्षम माणूस प्रधानांची नैतिकता चांगली दिसून येते तर दुसरीकडे संपादकांना काही मर्यादा पडत असल्याने त्यांना सत्य छापता येत नाही. प्रधानांच्या इच्छेला सहकार्य देता येत नाही म्हणून वाईटही वाटते, तर दुसरीकडे प्रधानांची कुणी थट्टा मस्करी करू नये म्हणूनही ते स्वतः काळजीपूर्वक वागताना दिसतात. या घटनेचा अन्वयार्थ बघता दोन्ही पुरुष पात्रांची नैतिकता सकारात्मक वृत्तीची असल्याचे जाणवते.

प्रधान पूर्वी ज्या कंपनीत काम करत असतात. तिथे नवीन जनरल मॅनेजर बदली होऊन येतात. नवीन जनरल मॅनेजरचे आणि प्रधान यांचे खटके उडतात. नवीन जीएम यांना पैसे खाण्यास प्रधान यांनी मदत केली नाही म्हणून त्यांना दुसऱ्या डिपार्टमेंटला पाठविण्यात येते. एकाच महिन्यात जीएम नी प्रधानांना तुमचे काम ठीक नाही म्हणत दुसऱ्या डिपार्टमेंटला पाठवले. तिथे प्रधानांना रूळायला वेळ लागला पण ते जम बसवू लागले, तेवढ्यात जनरल मॅनेजर प्रधानांना म्हणाले, 'तुमचं काम समाधानकारक नाही; मी तुमचं इनक्रीमेंट स्टॉप करतो.' (पृ.१९,२०) नवीन जनरल मॅनेजर प्रधानांसमवेत जाणूनबुजून दुवर्तन करताना दिसतात. त्यांचे विचार, नैतिकता यांच्यात तफावत आल्याने प्रधानांना चांगल्या वागणुकीमुळे नुकसान सोसावे लागते तर अनैतिकतेमुळे जनरल मॅनेजर प्रधानांवर एकामागोमाग एक अन्याय करतात.

२. वीज :

**बाजार :**

सुप्रसिद्ध फिल्मस्टार सुनिलकुमार यांचे लग्न झालेले होते तरी ते सुषमा नावाच्या मुलीच्या प्रेमात पडतात. त्यांच्या प्रेमप्रकरणाची सगळीकडे चर्चा होते त्यामुळे सुषमाची बेअब्रू होते. सुनिलकुमार पहिल्या पत्नीला घटस्फोट देऊन सुषमाबरोबर विवाह करणार असतात, परंतु पहिली पत्नी घटस्फोट देण्यास नकार देते. त्यांना दुसरे लग्न करता येत नाही. दुसरीकडे सुषमाला सुनिलकुमार यांच्यापासून दिवस राहिलेले असतात. सुनिलकुमारने स्वत:च्या प्रसिद्धीसाठी, चैनीसाठी सुषमाचा पुरेपूर वापर केलेला असतो. (पृ.६८,६९,७०,७१) या नायकाने एकाच वेळी दोन स्त्रियांना फसविलेले असते. स्वत:च्या प्रसिद्धीचा फायदा घेऊन या दोन्ही स्त्रियांवर अन्याय केलेला दिसून येतो. या नायकाची पत्नी सुषमाला गुंडांकरवी मारहाण करून घराबाहेर हाकलून देते. सुनिलकुमार याही परिस्थितीचा गैरफायदा घेताना दिसतात. ते या स्वत:च्या प्रेमप्रकरणावर सत्यकथा नावाचा चित्रपट काढणार असतात आणि त्या चित्रपटाच्या नायिकेसाठी अनसुया नावाची नवीन मुलगी निवडतात. (पृ.७२,७३) हा नायक स्वत:च्या फायद्यासाठी, स्वत:ची मार्केटमधील गेलेली किंमत परत वाढविण्यासाठी तो सुषमाचा वापर करतो. त्यांच्या या कृत्यातून त्याची अनैतिकता समोर येते. सुषमाला आपल्यापासून दिवस गेलेले असताना तिच्या बाळाची तिची जबाबदारी तो नाकारतो. तिची बेअब्रू होईल हे माहीत असूनही तो सत्यकथेवर आधारित चित्रपट तयार करण्याचा प्रयत्न करतो, यावरून त्याच्यातील माणुसकीच नाहीशी झाल्याचे दिसून येते.

**स्वप्नभूमी :**

या कथेतील अशोक आपली पत्नी मिरा हिला दिघेसाहेबांना एंटरटेन करण्यासाठी घेऊन जातो. मि. दिघे हे मिराचे बॉस मीराला भ्रष्टाचार लाचलुचपत आवडत नसते परंतु अशोक मात्र या सर्व गोष्टी करण्यास तयार असतो. त्याला यात काहीच गैर वाटत नाही. उलट तो याला बिझनेसमधील प्रॅक्टिस म्हणून संबोधतो. तो डील यशस्वी व्हावा म्हणून पत्नीचा उपयोग करून घेतो. पत्नी नकार देते, तेव्हा दहा लाखांचे नुकसान होणार असते, संतापून तो पत्नीला

घटस्फोटाची भाषा करतो. काहीही करून तो पत्नीला हे डील यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्यास भाग पाडतो. (पृ.८३,८४,८५,८७,८८) अशोक स्वत: धंद्यात यशस्वी होण्यासाठी भ्रष्टाचारासारख्या वाईट मार्गाला तर लागतोच परंतु बायकोला हे सर्व करण्यास प्रवृत्त करतो. यावरून त्याची घसरलेली नैतिकता समोर येते.

याउलट मि. दिघे त्यांच्या कामाच्या ठिकाणी म्हसकरांबरोबर पैसे खाण्याच्या कारणावरून भांडतात आणि स्वत: मात्र पैसे खातात. मि. दिघे डील यशस्वी करून होण्यासाठी अशोककडून पैसे खाणार असतात. शिवाय अशोकच्या पत्नीकडून एंटरटेनमेंट करून घेणार असतात. (पृ.८५,८६) मि. दिघ्यांची ही दुटप्पी भूमिका, नैतिकता खालच्या थरावर घेऊन जाणारी वाटते.

**पूर्णचंद्र :**

नाटक कंपनीत काम करणारा जगदीश वत्सला मिरजकरला नाटकात एक भूमिका करण्याची संधी मिळवून देतो. त्या बदल्यात तो तिच्याशी सरळ रखेलीसारखे संबंध ठेवतो. त्यांना एक मुलगा झाल्यावर जगदीश वत्सलाला दुसऱ्या पुरुषांशी संबंध ठेवून पैसे कमविण्यास भाग पाडतो. तिने नकार दिल्यावर मुलाला पुढे करून तिला जबरदस्तीने हे काम करण्यास भाग पाडतो. स्वत: लोकांना घेऊन येऊन तो तिला त्यांच्याबरोबर संबंध ठेवण्यास भाग पाडतो. त्या पैशांवर तो स्वत: चैन करतो. (पृ.११८,११९) रंगराव नावाचे दुसरे पुरुषपात्र वत्सलाबाईला जेवायला खायला घालते, कपडालत्ता देते, घर देते, पैसे देते आणि त्या बदल्यात त्यांना हवे ते मिळविते. परंतु वत्सलाबाईने जगदीशबरोबर कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवू नयेत अशी तंबी देते. जगदीशच्या जबरदस्तीला वत्सलाबाईंना शरण जावे लागते कारण जगदीश तिच्या मुलाचे हाल करतो. जगदीशबरोबर तिला बघितल्यावर रंगराव तिला लाथा–बुक्क्यांनी मारतो. (पृ.१२०,१२१) हे दोन्ही पुरुष वत्सलाबाईबरोबर संबंध ठेवण्यासाठी उत्सुक असतात परंतु तिला एका व्यक्तीबरोबर प्रामाणिक राहणे कठीण होते, कारण रंगराव पालनपोषण करतात म्हणून त्यांच्यासोबत राहणे, त्यांची मर्जी सांभाळणे तिला भाग पडते, तर जगदीश मुलाला मारहाण करेल, त्याला त्रास देईल म्हणून जगदीशची मर्जी सांभाळावी लागते. रंगराव एका वेळी पैशाच्या बळावर तीन–चार बायका सांभाळतो तर जगदीश एक बाईला पैसे मिळवून देण्याची वस्तू म्हणून

पाहतो. या दोन्ही पुरुषपात्रांची नैतिकता आपापल्या विचारांप्रमाणे असते परंतु समाजाच्या दृष्टिकोनातून त्या अयोग्य ठरतात. दोन्ही व्यक्तींकडून एका स्त्रीचा छळच होतो, त्याचे गांभीर्य या दोन्ही पुरुषांना दिसत नाही.

**३. पक्षिणी :**

**कभिन्न :**

हा नायक ट्रकवर ड्रायव्हरची नोकरी करत असताना एका ब्राह्मणाच्या मुलीला कोकणातून घरी घेऊन येतो. एक हजार रूपये देण्याच्या वायद्यावर त्याने त्या मुलीला स्विकारले असते. मुलीचा बाप पैसे देऊ शकत नाही तेव्हा तो त्याला मारहाण करून पैसे वसूल करतो. पैशाचा मोह त्याला आवरेना तेव्हा एका चांदण्या रात्री तो सासऱ्याला ठार मारतो आणि त्याचे सर्व पैसे लुबाडतो. (पृ.३३,३४) हा पुरुष एका गरीब ब्राह्मणाच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतो. एका मुलीवर अत्याचार करतो. पैशासाठी सासऱ्याचा खून करतो. या सर्व घटनांवरून त्याची पशुत्वाला गेलेली नैतिकता दिसून येते.

**सावित्री १–सावित्री २ :**

मोहनला त्याचे बॉस बढती देतात आणि मोहनची पत्नी मधुवंतीवर नजर ठेवतात. मोहनला अगोदर हे सर्व मान्य नव्हते, परंतु त्याला बढती मिळते, पैसे मिळतात म्हटल्यावर पत्नीचा विरोध असूनही तो तिला बॉसबरोबर संबंध ठेवण्यास तयार करतो. दारिद्र्यापासून सुटका करून घेण्यासाठी, आरामशीर, लक्झ्युरियस आयुष्य जगण्यासाठी तो पत्नीचा वापर करून घेण्याची युक्ती करतो. (पृ.९८,९९) स्वत:ची प्रगती होतेय म्हटल्यावर मोहन स्वत:च्या बायकोला बॉसबरोबर संबंध ठेवण्यास तयार करतो. खरेतर धर्मपरंपरेप्रमाणे पत्नीचे शील जपणे ही पतीची नैतिक जबाबदारी आहे. येथे मात्र पतीच तिचे शील बाजारू बनवितो. पैशासाठी झालेला लोभ माणसाची सद्सद्विवेक बुद्धी हरवितो हेच येथे सिद्ध होते.

४. दावं :

**देऊळ** :

या कथेतील नायक गंगाधर संन्यास घेतो पण वर्षातून एकदा श्रावणात तो गावी आला की सोडून दिलेल्या पत्नीला निरोप पाठवून बोलावून तिचा उपभोग घेतो. तिनेच पापाचरण करण्यास कारणीभूत ठरल्याचा आरोप करतो. आश्रमात तो साधू, संन्यासी म्हणून वावरतो परंतु अंतस्त: तो आई, वडील, पत्नी, मुलगी यांना सोडून देऊन स्वत: मात्र मजेत राहतो. कुटुंबाची जबाबदारी असताना संन्यास घेणे वाईटच त्यातही संन्यास घेतलेला असताना पत्नीशी स्वार्थापुरतेच लपून छपून संबंध ठेवणे हे त्यापेक्षाही वाईट स्वत:ची कौटुंबिक जबाबदारी सांभाळणे, त्यांचे पालनपोषण करणे हे त्याचे प्रथम नैतिक कर्तव्य असूनही तो त्याकडे दुर्लक्ष करतो. समाजाच्या नजरेत धूळ फेकतो. (पृ.१२४,१२५) अशी नैतिकता घसरलेली माणसे जर आध्यात्मिक क्षेत्रात आली तर धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्राला काळिमा लागल्याशिवाय राहणार नाही हेच येथे स्पष्ट होते.

**समाधी** :

सिंधूच्या आईवडिलांचा मृत्यू झालेला असल्यामुळे ती चुलत मामांकडे लहानाची मोठी होते. ती मोठी झाल्यावर तिचा खाण्या–पिण्याचा–लग्नाचा खर्च झेपणार नाही म्हणून तिचा भिक्षुक मामा भिक्याभटाला सिंधूला बरोबर घेऊन जाण्यास सांगातो, तिचे काय करायचे ते सर्व अधिकार तो भिक्याभटाला देऊन टाकतो. (पृ.१३७,१३८) सिंधूचे मामा भिक्षुक ब्राह्मण म्हणजे समाजातले आदराचे स्थान असलेली व्यक्ती. दुसरे पुरुषपात्र म्हणजे भिक्याभट. तोही ब्राह्मण म्हणजेच दोन्ही पात्रे समाजासाठी आदरनीय परंतु मामा तर भाचीला भिक्याभटाची कोणतीही चौकशी न करता, भाचीची कोणतीही काळजी न करता, जबाबदारी झटकून टाकतो, तर भिक्याभट लग्न झालेले असूनही कोणताही विचार न करता आपली बायको म्हणूनच तिला घरी घेऊन येतो. या दोन्ही पुरुषांची नैतिकता समाजात अनिष्ट वाटते.

तिसरे पुरुषपात्र पूर्शा म्हणजे श्रद्धाशील व्यक्ती. तो स्वामींची समाधी बांधण्याचे वचन देतो आणि ती समाधी बांधण्यासाठी पै–पै जमा करतो. भिक्याभटासारख्या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या माणसाच्या सहवासात राहूनही चांगलेच आचार–विचार जोपासताना दिसतो.

(पृ.१५४,१५५) पूर्शा त्याची पत्नी सिंधूकडेही सहानुभूतीने पाहतो. तिच्यावर मनापासून प्रेम करतो. स्वत: कष्ट करून समाधी बांधण्यासाठी, सिंधूला सांभाळण्यासाठी तयारी करतो. (पृ.१५८) या कथेतील हे पुरुषपात्र चांगली नैतिकता जोपासताना दिसते.

**५. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**डोळा :**

या कथेतील पुरुष आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी बापाला फसवून त्याचा चांगला डोळा विकण्यासाठी घेऊन जातो. दुसऱ्यांच्या शरीराचा एखादा अवयव फसवून विकणे हा खूप मोठा गुन्हा असूनही हा नायक स्वत:च्याच वडिलांना फसवून घेऊन जाताना दिसतो. ज्या वडिलांची म्हातारपणी सेवा करायची त्यांचा गेलेला डोळा परत दुसरा बसविण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाही. आर्थिक परिस्थितीशी झुंजत असलेला हा पुरुष असला तरी वडिलांचे डोळे विकून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे हे निश्चितच माणुसकीला काळिमा फासणारे आहे. (पृ.१३,१४) आर्थिक परिस्थिती नाजूक, हाताला काम नाही या येथील पुरुषाच्या वास्तव बाजू असल्या तरी भारतीय परंपरेने आई–वडिलांना दैवत मानले आहे आणि त्या दैवतांची अशी अवहेलना म्हणजे नैतिक पातळीवर धक्कादायक गोष्ट दिसून येते.

**६. युद्ध :**

**युद्ध :**

पांगारेंना अपघातात दोन्ही पायांना इजा होते. जनरल मॅनेजर जोग डॉक्टरांना त्याचे दोन्ही पाय कापून टाकण्यास सांगतात. खरेतर त्याचा एक पाय वाचू शकला असता, पण जोग जाणूनबुजून त्याचे दोन्ही पाय कापून टाकण्याचा डॉक्टरांना सल्ला देतात. कारण त्याचे दोन्ही पाय कापले गेले, तर त्याला अनफिट ठरवून कामावरून काढून टाकता येणार असते. काँपेन्सेशनचे पैसे वाचावेत, तो घरी बसला तर इतर कामगार काही मागण्या न करता शांततेत काम करतील म्हणून ते पांगारेचे दोन्ही पाय कापण्याचा सल्ला देतात. (पृ.५४,५५,५६) मानवता हाच सर्वश्रेष्ठ धर्म असताना वसंत जोग आपल्याच कंपनीतील एका कामगाराला त्याचा त्रास होऊ नये म्हणून कायमचे अपंगत्व लादण्याचा प्रयत्न करतो. स्वत:च्या मामुली स्वार्थासाठी दुसऱ्याच्या शरीराचे

महत्त्वाचे समजले जाणारे पाय हे अवयव कापून टाकणे म्हणजे त्या व्यक्तीवर घोर अन्याय ठरतो. जोग यांची माणुसकी, संस्कार, चांगली नैतिकता संपुष्टात आल्यानेच ते स्वार्थी आणि आपमतलबी विचार करताना दिसतात. पांगारेचे दोन्ही पाय कापून टाकले ही बातमी ऐकून वसंत जोग म्हणजे कारखान्याचे जनरल मॅनेजर खूष होतात.

**चौथा :**

केमिकल प्लांटमध्ये सात टेंपररी कामगार भाजून मरतात. सिनिअर कुलकर्णी ही बातमी घरी असलेल्या जनरल मॅनेजरला देतात. मॅनेजर या घटनेची जबाबदारी झटकतात. हे सातही कामगार जादा कामासाठी त्याच दिवशी बोलावले होते. त्यांना घरी जायला सांगण्यात आले होते, शिफ्ट संपून गेली होती अशी अनेक कारणे पुढे करून ते सर्व दोष कामगारांवरच लादतात. भावेला ही गोष्ट सहन होत नाही. भावे सिनियर कुलकर्णींना खोटा रिपोर्ट दिल्याच्या कारणावरून विचारणा करतो. भावे त्या मेलेल्या कामगारांच्या कुटुंबासाठी न्याय मागतो. त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न करतो. परंतु भावेवर चोरीचा गुन्हा लादून त्याला कामावरून काढून टाकले जाते. (पृ.८४,८६,९४) एकीकडे दुसऱ्यांवरचा अन्याय सहन न होणाऱ्या भावेची चांगली नैतिकता त्याला बेकार बनविते, तर दुसरीकडे जनरल मॅनेजर सात कामगार मृत्यूमुखी पडलेले असताना त्यांना कोणतीही मदत न करण्याची मानसिकता तयार करतात ती त्यांच्या खालावलेल्या नैतिकतेमुळेच; तर सिनियर कुलकर्णी वरिष्ठांची मर्जी सांभाळण्यासाठी चुकीच्या गोष्टींना खतपाणी घालतात. चुकीच्या गोष्टींचे समर्थन हे नैतिकता बिघडल्यानेच करतात असे म्हणावेसे वाटते.

ह. मो. मराठे यांच्या कथासंग्रहांमधील पुरुषपात्रांची नैतिकता विचारात घेता दुसऱ्यांना न दुखावणे, त्यांचा आदर करणे, भ्रष्टाचारविरोधी आचार–विचार ठेवणे अशी काही ठळक वैशिष्ट्ये या पुरुषपात्रांत आढळून येतात. स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्यांची, विशेषतः स्त्रियांची फसवणूक करून आपला सर्वप्रकारे फायदा करून घेण्यासाठी हे पुरुष पुढे आलेले दिसतात.

पत्नीचे शील जपणे, छोट्यांना प्रेम देणे, मोठ्या व्यक्तींचा आदर करणे, आईवडिलांची सेवा करणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्यच असते. परंतु काही पुरुषपात्रे या कथासंग्रहात वरील

गोष्टींसाठी अपयशी ठरलेले दिसतात. परस्त्री मातेसमान मानणाऱ्या आपल्या भारतीय संस्कृतीचा आदर न ठेवता परस्त्रीला स्वत:च्या उपभोगासाठी वापरण्याची चंगळवादी वृत्ती काही पुरुषपात्रांद्वारे समोर येते. दुसऱ्यांना हानी किंवा नुकसान पोहचवून स्वत:चा फायदा करून घेणारे महाठकही पहावयाला मिळतात. 'बळी तो कान पिळी' या न्यायाप्रमाणे भांडवलदार, मालक–कामगारांना तुच्छ वागवून आपली कलुषित नीतिमत्ता, नैतिकता जगासमोर आणतात. कुटुंबात, समाजात पर्यायाने देशातसुद्धा अशी पुरुषपात्रे ही समाजाला काळिमा फासणारीच वाटतात.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

गोडसे काकूंच्या रूममध्ये नायक रहात असतो काकू त्याला रूम सोडायला सांगतात कारण त्यांना हजार रूपये भाडे मिळणार असते. नायकाला खोलीची गरज असते म्हणून तो काकूंना राहू देण्याची विनंती करतो. पण काकूंना जास्त पैसे हवे असतात म्हणून त्या नायकाला खोली सोडण्यास भाग पाडतात. नायकाची नोकरी गेल्यानंतर काकू रस्त्यात भेटतात तेव्हा नायक वयाने मोठ्या असलेल्या काकूंच्या शरीराचे वर्णन अश्लील भाषेत, शिव्यांच्या माध्यमातून करतो. भूतकाळातील गोष्टी विसरून न जाता तो त्या गोष्टींमुळे झालेल्या मनस्तापामुळे काकूंकडे द्वेष भावनेने पाहतो, तर काकू आपल्याला नोकरीसाठी मदत करतील अशी आशा निर्माण होताच काकूंशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करतो. त्यांच्याशी चांगले संभाषण करतो, काकूंची सामानाची पिशवी स्वत:कडे घेतो. (पृ.८,१०,११,१३) या नायकाची काकूंविषयीची नैतिकता प्रसंगाप्रमाणे बदलताना दिसते. काकूंनी मदत केली तर त्या चांगल्या अन्यथा त्यांच्याविषयी तिरस्काराची भावना दिसून येते. वयाने मोठ्या असलेल्या काकूंविषयी या नायकाची आदराची भावना दिसून येत नाही.

नोकरीसाठी सहस्त्रबुद्धे काहीतरी मदत करू शकतात म्हणून नायक त्यांना चहा घेण्यासाठी विचारतो. पण सहस्त्रबुद्धे यांनी नकार द्यावा असेही त्याला वाटते. ज्या साहेबांकडे सहस्त्रबुद्धे शब्द टाकणार असतात तिथे त्यांचाच नातेवाईक ठेवणार असतात हे सर्व समजताच नायकाच्या तोंडातून अपशब्द निघतात. (पृ.१९,२०) या घटनेतही नायक स्वत:च्या स्वार्थी

विचारांसाठी समोरच्या दोन्ही व्यक्तींना स्वार्थी ठरवतो. आपले काही काम करत नाहीत म्हणून त्यांच्याविषयी नकारार्थी विचार करतो. प्रत्येकाला व्यक्तीस्वातंत्र्य असते आणि कुणी कुणाचे काम करायचे की नाही हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असून प्रत्येकाच्या ते नैतिकतेवरही ठरते परंतु समोरच्या व्यक्तीने आपले काम केले नाही म्हणून त्याला अपशब्द वापरणे हेही अनैतिकच म्हणावे लागेल.

नायक बारशाच्या निमित्ताने गोडसेकाकूंच्या घरी पैसे नसताना वाटी घेऊन येतो. रामागड्याने काकूंना निरोप द्यावा म्हणून त्याच्याबरोबर आदराने बोलून त्याला एक पावली देतो. यावरून नायकाचा खोटेपणा, फसवेपणा, दिखाऊपणा, नाटकीपणा दिसून येतो. (पृ.२७,२९)

नोकरीसाठी आपण एकट्यानेच प्रयत्न करावेत असे थोडेच आहे असे वाटून पत्नीनेही नोकरीसाठी स्वत:ला विकावे, स्वत:चा लिलाव मांडावा असा विचार नायक आपल्या पत्नीसंदर्भात करताना दिसतो. आपली पत्नी गर्भवती नसती तर तिला नक्की नोकरी मिळाली असती म्हणून तो पत्नीच्या गर्भारपणाचाही तिरस्कार करतो. पत्नीने आपला छळ करण्यासाठीच ती गर्भवती राहिली, तीच आपली वैरीण आहे आपल्या या बेकारीला या परिस्थितीला तो आपल्या पत्नीला कारण ठरविताना दिसतो. त्याच्या या विचार करण्याच्या भूमिकेवरून तो स्वार्थी वृत्तीचा, हेकेखोर दिसून येतो. (पृ.३६)

नोकरीच्या शोधात तो मुनीमजींकडे येतो. साठ–पासष्ठ वर्षांच्या मुनीमजींना पाहून ते मेले तर त्यांची नोकरी आपल्याला मिळेल या लालसेने तो त्यांच्या मरणाची अपेक्षा धरतो. (पृ.४४)

पत्नीला नोकरी मिळविण्यासाठी तो तिला फसवून पपया खायला घालतो आणि गर्भपात घडवून आणतो. (पृ.७०,७१) या क्रूर कृत्याचा भयानक परिणाम होतो. ते दोघेही आई–बाबा होण्यापासून वंचित होतात. वसूच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावरही तो आपला अधिकार गाजवितो. एका जिवाला जन्म घेण्यापूर्वीच संपवितो. मानवतेला काळिमा फासणारे हे कृत्य तो नोकरीसाठी करतो. परिस्थितीने त्याला या गोष्टी करण्यास भाग पाडले असले तरी येथे या नायकाची नैतिकता ढासळलेली दिसून येते. नायकाच्या पत्नीचा गर्भपात झाल्यावर नायक देसाईबाई आणि त्यांच्या सेक्रेटरीकडे पत्नीसाठी नोकरी मागण्यासाठी जातो, तेव्हा तो नायकाला त्याच्या पत्नीला

आपल्याकडे पाठविण्याची भाषा करतो; तेव्हा नायकाची विवेकबुद्धी जागृत होऊन तो त्यांना प्रतिकार करतो. आणि नोकरी नाही मिळाली तरी चालेल पण दुर्वर्तन करणार नसल्याच्या निश्चयाने तो प्रतिकार करताना प्रसंगी त्यांचा मार सहन करतो. (पृ.७६,७७) यावरून नायकाची पत्नीविषयी, आपल्या कर्तव्याविषयी, जबाबदारी विषयीची नैतिकता जागृत असल्याचे दिसते. या दोन परस्परविरोधी घटनांतून नायकाची नैतिकता परिस्थितीनुसार बदलत असल्याचे ह. मो. मराठे सूचित करतात.

नायकाची मन:स्थिती हताश असताना तो प्रसंगी नैतिक मूल्ये बाजूला ठेवून तडजोड करतो पण जेव्हा त्याच्या स्वत्वावर आणि पत्नीच्या शीलावर घाला पडतो त्यावेळी तो प्रतिकार करून आपले नैतिक गुणधर्म दाखवून देतो.

पुरुषांची नैतिकता यावर भाष्य करताना सौ. सुवर्णा दिवेकर म्हणतात,

“कथानायक बेकार झाला आहे. पण पत्नीला त्याचा पत्ता त्याने लागू दिलेला नाही कारण तो तिला गर्भधारणा झाल्याने आणि गरिबीचा का होईना, सुखाचा संसार मिळाल्याने ती आत्मसंतुष्ट आहे. तिचा आनंद हिरावून घेण्याचे क्रौर्य अद्याप कथानायकात नाही. तो लाचार झाला आहे. नकोशा माणसांचे पाय धरतो आहे. नोकरीसाठी तो काहीही करायला तयार आहे. पण चोहीकडून फक्त निराशा, अवहेलना वाट्याला येते, तेव्हा तो निर्दय होऊन स्वत:चा अंकुरच खुडून टाकतो.”[११]

सौ. सुवर्णा दिवेकर यांनी या कादंबरीतील नायकाच्या नैतिकतेवर केलेले भाष्य यथोचित वाटते. कारण सुरूवातीला नायकाची आपल्या पत्नीविषयीची नैतिकता चांगली दिसून येते. तो पत्नीला दु:ख, त्रास होऊ नये म्हणून पूर्णपणे काळजी घेतो. पण सर्व प्रयत्न करूनही पदरी निराशाच पडल्यावर शेवटी तो निर्दयीपणे पत्नीचा गर्भपात करतो. या सर्व घटनांमागे परिस्थितीचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव दिसून येतो. जसजशी परिस्थिती बदलते तसतसे नायकाचे नैतिक मूल्य ढासळत जाते. कधी तो सकारात्मक दृष्टिकोन ठेवतो तर निराशा पदरी पडल्यावर पूर्ण नकारात्मक भावनेने न्याय–अन्याय या गोष्टींचा विचार मागे ठेवून कृती करताना दिसतो.

या कादंबरीतील इतर पुरुष पात्रेही नैतिकदृष्ट्या चांगल्या वाईट गोष्टी करताना दिसतात. त्यामागेही काही ना काही कार्यकारणभाव दिसून येतो. नायक गोडसेकाकूंच्या घरी बारशाच्या निमित्ताने जातो तेव्हा रामागड्याला काकूंना आपण आलो असल्याचा निरोप द्यायला सांगतो, तेव्हा रामागडी निरोप देण्यात टाळाटाळ करताना दिसतो, परंतु नायकाने हातावर पावली ठेवताच थोड्या वेळाने तो काकूंचा निरोप घेऊन येतो. पैसे मिळाल्यावरच काम करण्याची वृत्ती या रामागड्यात दिसून येते. (पृ.२९) शेटजींना कामासाठी असिस्टंटची गरज असतानाही आणि बेकार नायक त्यांचे पाय धरून नोकरीसाठी गयावया करत असतानाही शेटजी नायकाला झिडकारतात आणि मागील नोकरी सोडण्याच्या प्रसंगाची आठवण करून देतात. (पृ.४४,४५,४६) शेटजींची ही कृती त्यांची नैतिकता दाखवून देते. नायकाने न सांगताच नोकरी सोडून जाण्याच्या प्रसंगाने त्यांनी नायकाविषयी मनात एक प्रतिमा तयार केलेली असते. त्यामुळेच ते नायकाला नोकरीची आणि त्यांना असिस्टंटची गरज असताना त्याला कामावर ठेवताना दिसत नाहीत. ढोणकर सामान्य बुद्धीमत्तेचा असूनही पोलिस सब इन्स्पेक्टरची नोकरी मिळवितो. त्याचा स्वभाव उडाणटप्पू, बेदरकार असतो. त्याच्या मते पैसा, पोरी, दारू या चैणीच्या गोष्टी असतात. तो भारत देशाला गावंढळ, दरिद्री म्हणून हिणवितो आणि अमेरिका, रशियाला जाण्याच्या गोष्टी करतो. ढोणकरची चैनी वृत्ती त्याचे माणूसपण हिरावून घेते आणि सद्सद्विवेकबुद्धी नाहीशी होऊन त्याला देशाविषयीही प्रेम वाटेनासे होते. (पृ.५५,५६) या सर्व गोष्टींना त्याचे ढासळलेले नीतिमूल्यच आहे असे म्हणता येईल.

शिक्षणसंस्थेचा सेक्रेटरी असलेले पुरुषपात्र तर नीतिमूल्यांची कोणतीही चाड ठेवताना दिसत नाही. तो नायकाच्या समोरच देसाईबाईंशी चाळे करतो. त्यांना हवे ते देसाईबाई देतात म्हणून त्यांना पाचशे रूपये पगार देत असल्याची कबुली देतो. ते सिगारेट, दारू, पत्ते, बाई या गोष्टींच्या आहारी गेलेले दिसून येतात. शिवाय नायकाला आपल्या पत्नीला पाठवून देण्याची सूचना करतो. ती चांगली असेल तर तिला ठेवून घेण्याची भाषा बोलतो. नायकाने प्रतिकार करताच तो नायकाला मारहाण करून शिव्या देतानाही दिसतो. वरील सर्व गोष्टींचा विचार करता सेक्रेटरी हे व्यक्तिमत्त्व स्त्रीलंपट, भ्रष्टाचारी, गुंडगिरीचे असलेले दिसून येते. शिक्षणक्षेत्रासारख्या

पवित्र ठिकाणी काम करत असलेले हे पुरुषपात्र नीतिमूल्यांची अवहेलना करताना दिसते. (पृ.७५,७६,७७) हे पुरुषपात्र शिक्षणक्षेत्रातला कलंक लावणारे पात्र ठरत असून व्यवहारातील नीतिमत्ताही ढासळलेली असल्याचे दिसून येते. स्त्रीला उपभोगाची वस्तू समजून तिच्यावर आपला अधिकार गाजविण्याची वृत्ती पुरुषजातीला कलंक लावणारी असून स्त्रीजातीचा अपमान करणारे ठरते. वरील सर्व पात्रांविषयीच्या नैतिकतेविषयी भाष्य करताना डॉ. अजित मगदुम म्हणतात,

"सर्व अंगावर गुलजार मांस उतू जात असलेला व हातांच्या सगळ्या बोटांत नाना रंगांच्या खड्याच्या अंगठ्या असलेला शेटजी, नायकाच्याच नोट्स वाचून थर्ड क्लास बी.ए. करून अमेरिकेला जाऊ पाहणारा पोलिस सब इन्स्पेक्टर ढोणकर, गल्ला गोळा करताना मानही वळवू न शकणारा हॉटेल मालक, भव्यविशाल गोडसेकाकू, पांढऱ्या शुभ्र पातळातल्या कलंकीत देसाईबाई, स्त्रीलंपट सेक्रेटरी या सर्व व्यक्तिरेखा लेखकाने विशिष्ट कोनामधून रेखाटल्याने त्या परिणामकारक आहेत. या पात्रांमुळे उपरोधाला धार येते. उपहास तीव्रतर होतो ही सारी माणसं तत्कालीन (तसेच आजच्याही) समाजाच्या नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक अध:पतनाच्या ठळक खुणा आहेत."[१२]

शेटजी, ढोणकर, सेक्रेटरी यांवर डॉ. अजित मगदुम यांनी केलेले नैतिकतेवरील भाष्य अचूक असेच आहे.

**२. काळेशार पाणी :**

विष्णू गावकर हा गावातील एक प्रतिष्ठित विवाहीत पुरुष, परंतु त्याने भिकी नावाची रखेल ठेवलेली असते. त्याच्यापासून भिकीला दहा मुले झालेली असतात. विष्णू गावकर भिकीची व तिच्या मुलांची संगोपनाची जबाबदारी उचलत नाही. त्यांच्यावर चांगले संस्कार करताना दिसत नाही. वडिलांचे कोणतेही कर्तव्य पार पाडताना दिसत नाही, पण भिकीवर तो आपला हक्क, अधिकार दाखविताना दिसतो. भिकी आणि तिची मुले यांच्या उदरर्निर्वाहचा विचार न करता तो भिकीला कामाच्या वेळीही उपभोगासाठी जबरदस्ती करतो. (पृ.४,५) यावरून विष्णू हा स्वार्थी, भोगलोलुप पुरुष म्हणून समोर येतो. येथे त्याची नैतिकता चांगली नसल्याचे चित्र समोर येते. त्याची भिकीविषयीची नैतिकता, मुलांविषयीची नैतिकता हा त्याच्या व्यक्तिमत्त्वासाठी कलंकच

वाटतो. भिकीने आपण सांगितलेली प्रत्येक गोष्ट ऐकावी असा अट्टाहास विष्णूचा दिसून येतो. तो भिकीला तू एकटीच मला रांड म्हणून नाही. गावात कित्येक स्त्रिया माझ्याकडे यायला तयार आहेत असेही सांगताना दिसतो. त्याच्या या वक्तव्यावरून तो स्त्रीलंपट आणि आपमतलबी नैतिकतेचा पुरुष वाटतो. त्याची स्वत:ची मुलेही त्याला त्याच्या आणि भिकीच्या मध्ये नको असतात. (पृ.६)

विद्यार्थीदशेतील सामंत कमळीला अभ्यासात मदत करतो. तिला चांगले बोलायला शिकवितो, चांगल्या विचारांची देवाणघेवाण करतो, तिला आपल्या घरी घेऊन जातो. कमळीकडून कशाचीही अपेक्षा न करता स्वच्छ मैत्रीभावाने सामंत कमळीबरोबर व्यवहार करताना दिसतो. (पृ.३२,३३,३४)

विद्यार्थीदशेतील सामंत वयाने लहान. त्याला शरीरसंबंध, अनैतिकता या गोष्टींचे पूर्णपणे ज्ञान नव्हते परंतु भिकी आणि कमळी दोघीही त्याला बळजबरी करतात. सामंतला या गोष्टीमुळे खूप अपराधी वाटू लागते. त्याच्या मनाच्या विरूद्ध त्याला भिकी आणि कमळीला सामोरे जावे लागते. त्याला भिती वाटू लागते. त्याचे अभ्यासातले लक्ष पूर्णपणे उडून जाते. (पृ.५२,५३) तो नापास होतो.

अपराधीपणाचा आणि अपयशाचा त्याला सामना करणे जड जाऊ लागले तेव्हा तो काळ्याशार पाण्याच्या कोंडीत आपले जीवन संपवितो. लहान वयातील सामंत अपराधी भावना मनात घेऊन काही दिवस जगतो पण अपयश पदरी पडताच दुहेरी दु:खाचा तो सामना करू शकत नसल्यामुळेच आपले जीवन संपवितो. येथे सामंताची नैतिकता चांगली असूनही त्याला परिस्थितीमुळे अनैतिक मार्गाने जावे लागते. चांगले कर्म, आचार, विचार करूनही त्याच्या चांगुलपणाचा आणि अजाणतेपणाचा फायदा घेतल्याचे चित्र समोर येते. (पृ.५५)

विष्णूच्या मृत्यूनंतर भिकीला बाळ्याभट आर्थिक मदत करताना दिसतो. तो नि:स्वार्थी भावनेने मदत करताना दिसत नाही. पैशांच्या बदल्यात तो तिच्याकडून माडांना पाणी घालून घेतो. मजुरीचे म्हणूनच तो तिला पैसे देतो परंतु रात्री भिकीकडे उपभोगाची लालसा धरून येतो. कमळी पुस्तक वाचत असताना बाळ्याभट भिकीबरोबर उपभोग घेतो. (पृ.४४,४५)

बाळ्याभटाच्या या दुहेरी वागणुकीमागे त्याची स्वार्थी भोगलोलुप वृत्तीच प्रत्ययास येते. पैशाच्या मोबदल्यात काम असा व्यवहार झालेला असतानाही असहाय भिकीचा तो फायदाच उचलताना दिसतो. एकीकडे सोवळेओवळे पाळणारा बाळ्याभट रात्री मात्र सर्व गोष्टी बाजूला सारून भिकीकडे येतो यावरून त्याची घसरलेली नैतिकता समोर येते.

मारूती साटम हे पुरुषपात्र किराणा मालाचे दुकान चालवते. कमळी दुकानात गुळ नेण्यासाठी येते तेव्हा तो गूळ पाहण्याच्या निमित्ताने तिला आतल्या खोलीत बोलावून तिला गच्च मिठीत घेतो. उमलण्याच्या वयातील कमळीवर साटम वाईट नजर ठेवून असतो. त्यामुळेच कमळी आजारी असतानाही, अंथरूणावर पडून असतानाही साटम तिच्या छातीवरून हात फिरविताना दिसतो. कमळीसाठी तो स्वत:च्या वडिलांनाही फसवून पैसे साठवितो. कमळीवर नजर ठेवून असणारा साटम चिमणीवर वाईट नजर ठेवतो आणि प्रसंगी वृद्धत्वाकडे झुकलेल्या भिकीचाही उपभोग घेतो. (पृ.६१,६२,६९) साटम हे पुरुषपात्र वासनाधीन दिसून येते. कमळी, चिमणी, भिकी यांना पाहताच त्याची नजर वासनेत बदलताना दिसते. समोरील स्त्रीच्या वयाचा, मनाचा तो विचारही करताना दिसत नाही.

पुरुषांच्या अनैतिक मानसिकतेचा बळी ठरणाऱ्या स्त्रियांच्या दु:खाला सीमा रहात नाही. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना दुय्यमत्व बहाल केल्यामुळे पुरुषांच्या आधाराशिवाय न जगणाऱ्या स्त्रियांची अजूनच वाताहत होते. स्त्रीकडे असहाय, अबला म्हणून पाहणे व तिच्यावर अधिकार गाजविणे, खरे खोटे चांगले वाईट यांचा कोणताही विचार न करता पुरुष स्वत:च्या भोगलोलुप, स्वार्थी स्वभावापायी स्वत:ची नैतिक मूल्ये हरवून बसतो यावर भाष्य करताना डॉ. पुष्पा राजापुरे म्हणतात,

"विष्णू असताना व त्याच्या मृत्यूनंतरही तिला काम देणारा बाळभट आणि कमळीची आसक्ती बाळगणारा साटम हे दोघेही तिच्या देहाची आसक्ती मनी धरूनच तिच्या उंबरठ्याआत येतात. यातील कुणीच तिच्यासाठी अथवा वयात येणाऱ्या तिच्या मुलींसाठी विधायक जीवनमार्ग घेऊन येत नाही, इतकेच नाही तर कमळी बरी होऊ शकत नाही, हे ध्यानात आल्यावर साटम आपली नजर चिमणीच्या म्हणजे कमळीच्या धाकट्या बहिणीकडे वळवितो, इतकेच नाही तर,

'तिका ह्या विषयातला कमळीपरीस लै कळता–' (पृ.११०) असा शेरा तिच्या मातेजवळ व्यक्त करून भिकीच्या मुलींच्या जीवनाची दिशा भिकीसारखीच असणार हे सूचित करतो. तर बाळभट आजारी कमळीचे ओरडणे, चित्कारणे, आपल्या भोगविलासातील अडचण मानून एका अतृप्त क्षणी भिकीला आपल्या मुलीला विहिरीत फेकून द्यायला प्रेरित करतो. ही दोन्ही पुरुषपात्रे म्हणजे भिकीच्या सभोवतालच्या भोगनिष्ठ आणि वस्तुवादी समाजाचीच प्रातिनिधिक रूपे आहेत."[१३]

पुरुषांच्या भोगवादी, चंगळवादी नैतिकतेवर डॉ. पुष्पा राजापुरे यांनी केलेले भाष्य काळेशार पाणी या कादंबरीतील पुरुष पात्रांवरही प्रकाश टाकते.

पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुषांनी स्त्रियांचे शारीरिक, मानसिक शोषण केल्याचे दिसून येते. या कादंबरीतील वेगवेगळ्या वयाच्या स्त्रिया आणि वेगवेगळ्या वयाचे पुरुष या शोषणव्यवस्थेचे घटक झालेले दिसून येतात. पुरुषांची स्त्रियांविषयीची नीतिमत्ता ढासळलेली दिसून येते. कारण त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोनच निकोप आणि संस्कारी दिसून येत नाही. स्त्री ही पुरुषाची सेवा करण्यासाठीच जन्मली आहे असा आविर्भाव या कादंबरीतील पुरुषपात्रांचा दिसून येतो. यावर आपले मत प्रकट करताना अंजली कुलकर्णी म्हणतात,

"विष्ण्या, बाळ्याभट, साटम ही सगळी या शोषणव्यवस्थेची प्रतीके आहेत. परिणामांची क्षिती नसलेले हे पुरुष भिकीशी संभोग, वासनांच्या लीला करून निघून जातात. तिला एका पाठोपाठ एक होणाऱ्या मुलांची फिकीर, काळजी, त्यांच्या भुकेची तजवीज, कशाशीच त्यांना देणेघेणे नाहीय. हे शोषणच आहे. त्याबद्दलची तिची चीड, तिचा त्रागा पोटतिडिकेचा आहे. पण त्याचीही दखल हे पुरुष घेताना दिसत नाहीत."[१४]

अंजली कुलकर्णी यांनी विष्ण्या, बाळ्याभट, साटम ही पुरुषपात्रे म्हणजे मानवतेला काळिमा फासणारी वाटतात. कारण या पुरुषांना मानवाची सर्वात मोठी गरज अन्नाची असल्याचे दिसून येते. परंतु त्यांच्यासमोर ही मुले भुकेली असताना, त्यांच्या संगोपणाची जबाबदारी टाळत आपली भोगेच्छा शमविण्यासाठी मानवी प्रेमभावना विसरल्याचे चित्र समोर येते.

माणसाची नैतिकता सभोवतालच्य परिसरावर, समाजावर, भौगोलिक वातावरणावर अवलंबून असते. काळेशार पाणी ही कादंबरी कोकणासारख्या भौगोलिक वातावरणावर आधारित आहे. यावर भाष्य करताना डॉ. किशोर सानप म्हणतात,

“भोवतालचे समाजवास्तव आणि भौगोलिक वास्तव माणसातल्या पशुत्वाला जागे करीत असते. भिकीच्याही बाबतीत तसेच घडताना दिसते. कोकणच्या भौगोलिक आणि सामाजिक वातावरणाचा आजवरचा इतिहास लक्षात घेतला तर कोकणी पुरुष हा आळशी, कामाच्या बाबतीत पूर्णपणे स्त्रीवर अवलंबून असल्याचे दिसते. घरची कामे आणि शेतीवाडीची कामे बहुतेक करून स्त्रियांनाच करावी लागतात. पुरुष मात्र आपले पौरूषत्व सर्वच बाबतीत स्त्रियांवर लादतो. उत्तम खाणे आणि उत्तम कामसंबंधासाठी आपला जन्म झाल्याची एक सुप्त जाणीव कोकणातल्या पुरुषांमध्ये असते. कोकणातल्या स्त्रियांनाही कामसंबंधासाठीच पुरुषांचा आधार महत्त्वाचा वाटतो. कामजीवनाचे एक विचित्र रसायन कोकणच्या भौगोलिक वास्तवाचे परिमाण आहे, असे दिसते. व्याभिचार आणि परस्त्रीशी संबंध ही स्वाभाविक आणि सामाजिक अशी गरज असल्याचा मनुष्यस्वभाव, कोकणात विशेषत्वाने दिसून येतो.”[१५]

भौगोलिक वातावरणाचा पुरुषांच्या नैतिकतेवर परिणाम होत असल्याचे निरीक्षण डॉ. किशोर सानप यांनी मांडले आहे.

**३. इतिवृत्त :**

मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे जनताचे संपादक श्रीरंग नाडकर्णी यांना जेवणासाठी निमंत्रण देतात. संपादकाचे आणि मुख्यमंत्र्यांचे हितसंबंध अधिक दृढ होतील या विचाराने नाडकर्णी मुख्यमंत्र्याची पार्टी स्विकारतात. परंतु मुख्यमंत्री या गोष्टीचा गैरफायदा घेतात. ते या भोजनाची बातमी पेपरमध्ये देण्यासाठी जनता च्या कार्यकर्त्यांवर दबाव टाकतात. संपादकाच्या लेखनीचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी करण्याचा मानस ठेवून ते त्यांना पार्टीला बोलावतात. लोकांपुढे या संबंधांचे प्रदर्शन, नाडकर्णींना पार्टी देऊन त्यांना आपलेसे केले तर आपल्या काही गुप्त गोष्टी बाहेर पडणार नाहीत या भूमिकेमुळे ते आपली सारासार बुद्धी बाजूला ठेवून नाडकर्णींवर दबाव आणतात. (पृ.४,५,१७,१८)

श्रीरंग नाडकर्णी आपल्या पदाशी इमान राखून असतात. कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे. कोणती बातमी द्यायची? कोणती टाळायची? हे सर्व त्यांना पूर्णपणे माहीत असून ते नि:स्वार्थीपणाने आणि जनतेच्य हिताचे निर्णय घेताना दिसतात. कोणत्याही दबावाला बळी न पडण्याचा त्यांचा स्वभाव त्यांना प्रामाणिकपणे काम करण्यास भाग पाडतो. प्रामाणिकपणामुळे त्यांची नैतिकता चांगली असल्याचे दिसून येते, तर अण्णासाहेब नीतिमूल्यांची पायमल्ली करताना दिसतात. (पृ.१७,१८,२०)

गोविंदराव दळवी हे एक मोठे कारखानदार, त्यांचा स्वत:चा दळवी ग्रुपच्या नावाखाली मोठा व्यवसाय असतो. त्यांचा मोठा मुलगा केमिकल्स तर दोन नंबरचा फर्टिलायझर्यचा व्यवसाय सांभाळतो. संपादक नाडकर्णी गोविंदराव दळवींच्या घरी जातात तेव्हा त्यांना दळवी ग्रुप समूहाकडून भोजन, चहापान गिफ्ट दिले जाते. गिफ्ट म्हणून दिलेले टेपरेकॉर्डर नाडकर्णी नाकारतात. विनाकारण दिलेले गिफ्ट नाकारताना त्यांची नैतिक मूल्ये जागृत असल्याचे दिसते. कोणाकडूनही काही विनामोबदला घेतले तर त्याचे ओझे बनून राहते आणि त्याची परतफेड कधीकधी अनैच्छिक पद्धतीने करावी लागते याची जाणीव नाडकर्णींना दिसून येते. परंतु दळवी ग्रुपकडून आग्रह झाल्यानंतर प्रेमाची भेट ते स्विकारतात. तरीही त्यांना ते गिफ्ट घेताना आनंद होताना दिसत नाही. त्यांच्यातील हा प्रामाणिकपणा चांगल्या नैतिकतेचा एक गुणधर्म आहे. (पृ.५२,५५,५८) भोजन, गिफ्ट या आपल्या नेहमीच्या कामातीलच एक भाग आहे असे समजून कोणाताही मोठा गवगवा न करता, प्रचार न करता ते सर्व समजदारीने हाताळतात. यावरून त्यांची सचोटीची संपदकीय वृत्ती समोर येते.

बाळासाहेब फळणीटकर हे फळणीटकर उद्योग समूहाचे चेअरमन. ते श्रीरंग नाडकर्णी यांना ‘जनता’ चे संपादक म्हणून मान्यता देतात तर अभ्यंकर यांना बिझनेस मॅनेजर म्हणून नियुक्त करतात, तेव्हा संपादक नाडकर्णी आपल्या पेपरमधून जनतेच्या भावना, प्रश्न, गाऱ्हाणी मांडतात. ‘जनता’ ला एक खरा आणि नीतिमूल्यांची जाण ठेवणारा सेवक मिळतो. श्रीरंग नाडकर्णी एक प्रामाणिक संपादक म्हणून ‘जनता’ च्या ऑफिसमध्ये काम करू लागतात. (पृ.६१,६२,६४,६६) मंत्र्याच्या विधायक गोष्टींचे कौतुक आणि अंधश्रद्धेने केलेल्या कृतींचा

निषेध ते सडेतोडपणे कोणाचीही भिती न बाळगता करतात. चांगल्या कामासाठी, योजनांसाठी जनजागृती करतात. (पृ.६८,६९) श्रद्धेच्या नावाखाली मंदिरांत चालणाऱ्या वाईट विधींचा निषेध रोखठोक नोंदवितात. आमजनतेच्या जीवनाला गरिबी, अज्ञान, अंधश्रद्धा यांचा विळखा पडलेला पाहून त्यात बदल घडविण्याच्या दृष्टीने 'जनता' च्या ध्येयधोरणांची आखणी करतात. (पृ.७१,७२)

भाई गोखल्यांच्या हॉटेल कामगारांच्या समस्यांच्या मोर्चाला संपादक नाडकर्णी पाठिंबा देतात. हॉटेल कामगारांचे प्रश्न, गरिबी, त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार यांकडे जातीने लक्ष घालतात. हॉटेल कामगारांची मुलाखत घेऊन त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची दखल घेण्यासाठी प्रशासन, सामान्य जनता यांच्यापर्यंत त्यांची गाऱ्हाणी मांडतात. (पृ.८७,८८,८९,९०) हॉटेल कामगारांबरोबरच हॉटेल व्यावसायिकांच्या समस्याही ते आपल्या पेपरमधून मांडतात. शिवाय कामगारमंत्री रामराव कदम यांची मुलाखत घेऊन त्यांच्यासमोर हॉटेल कामगारांची पिळवणूक कशी होते ते पटवून देतात आणि त्यांच्या मनात कामगारांविषयी सहानुभूती निर्माण करून मंत्रीमहोदयांकडून धोरणविषयक आश्वासन घेण्यात ते यशस्वी होतात. (पृ.१११) या सर्व घटनाक्रमांचा विचार करता संपादक नाडकर्णी हे अतिशय चांगल्या नीतिमूल्यांची जाण असलेले प्रामाणिक संपादक दिसून येतात. त्यांच्यातील नीतिमूल्येच त्यांना जनतेचे प्रश्न, दु:ख मांडण्यासाठी प्रोत्साहित करतात आणि संपादकीयात मांडण्यात ते यशस्वी ठरतात. कोणत्याही लोभाला, भितीला बळी न पडता, मोठ्या माणसांच्या भ्रष्टाचारी वृत्तीला खतपाणी न घालता ते सामान्य माणसांच्या व्यथांना वाचा फोडतात.

श्रीरंग नाडकर्णी यांची कामावरील निष्ठा, समाजाप्रतिचे उत्तरदायित्व आणि नैतिक नीतिमूल्यांचे संस्कार त्यांना चांगली कामे करण्यास प्रेरणा देतात. त्यामुळेच ते हॉटेल कामगार प्रकरण, मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे यांचा पर्यटन व्यवसायाच्या विकासाच्या नावाखाली चाललेला भ्रष्टाचार, दळवी उद्योगसमूहाच्या खत कारखान्यामुळे दुषित झालेल्या पाण्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या इ. प्रश्न प्रामाणिकपणे हाताळतात.

**४. कुरूक्षेत्र :**

गोसावी नावाच्या मुलाला स्कॉलरशिपचे पैसे मागितल्याच्या कारणावरून शांतीवन महाविद्यालयात मारहाण होते हे पाहून प्रा. उल्हास भावे त्याला मदत करण्याच्या उद्देशाने आणि त्याच्यावर झालेल्या अन्यायाची चीड येऊन गोसावीला मदत करण्यासाठी प्राचार्य बेलसरेंच्या ऑफिसमध्ये घेऊन जातात. त्याच्यासाठी न्याय मागतात त्यावेळी इतर सहकारी प्राध्यापक उल्हास भावेंची टिंगल करतात. प्राचार्य बेलसरे त्याला व्हाइस प्रिन्सिपॉलना भेटायला सांगून काम करण्याचे टाळतात. यावरून शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या प्राचार्यांची टाळाटाळ करण्याची अनैतिक प्रवृत्ती समोर येते, तर इतर सहकारी प्राध्यापकांसाठी अनेक वेळा उल्हास भावेंनी अन्यायाविरूद्ध आवाज ऊठवला होता. प्राध्यापकांचे थकलेले पगार, प्राध्यापकांना झालेली मारहाण या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी अगोदर मदत केलेली असतानाही इतर सर्वजण त्याची टिंगल करतात यावरून त्यांची बेफिकीर आणि स्वार्थी वृत्ती समोर येते, तर उल्हास भावेंचा कणवाळू, प्रेमळ, परोपकारी स्वभाव त्यांना अन्यायाविरूद्ध लढण्यास भाग पाडताना दिसतो. (पृ.१०,१२,१३)

डॉ. म्हसकर शांतीवन एज्युकेशन सोसायटीची स्थापना आंतरिक प्रेरणेने करतात आणि त्यांच्या सहकारी शिक्षकांनीही याच पद्धतीने काम करावे अशी अपेक्षा करतात. शांतीवन हे फक्त कॉलेज नाही ते विद्यापीठ व्हावे आणि या विद्यापीठातील मुले निर्मितीक्षम माणसे तयार व्हावीत. त्यांनी एकेक क्षेत्र जिंकून घ्यावे. प्रत्येक क्षेत्रावर कर्तबगारीचा ठसा उमटवावा असे उदात्त ध्येय ते मनी बाळगतात. सरकारी अनुदानाशिवाय हे कॉलेज डॉ. म्हसकरांना आपल्या कल्पनेनुसार चालवायचे होते. या महान पुरुषाची परोपकारी वृत्ती, समाज आणि शिक्षणक्षेत्राविषयीचे प्रेम त्यांना आदराच्या उच्च स्थानी घेऊन जाते. (पृ.६,२२) त्यांच्या विरोधी नैतिकता तुकाराम फराटे या सेक्रेटरीची दिसून येते. तुकाराम फराटे हे पैसा, प्रसिद्धी, पद या गोष्टींसाठी कोणत्याही थराला जाणारे व्यक्तिमत्त्व ह. मो. मराठे यांनी रेखाटले आहे. डॉ. म्हसकरांच्या मृत्यूनंतर चार–पाच वर्षांच्या काळात शांतीवन एज्युकेशन सोसायटीची पंचवीस हायस्कूले आणि कॉलेजे निर्माण होतात. लाखोंच्या पटीत सरकारी अनुदान उपलब्ध होऊ लागते. शेकडो शिक्षक–प्राध्यापकांवर

तुकाराम फराटे आपला अधिकार गाजवू लागतात. त्यांची स्वत:ची गाडी, बंगला, शेती, ट्रॅक्टर, साखर कारखान्यात डायरेक्टर पद, जिल्हा परिषदेवर निवड अशा यशाच्या एकेक पायऱ्या पादाक्रांत करतात. यशाबरोबर दरू, मांसाहार, फळे यांच्या मेजवाण्या त्यांच्या बंगल्यावर होऊ लागतात. एकीकडे तुकाराम फराटे आर्थिक सत्तेच्या पायऱ्या तुडवत तुडवत धुंद होतात. त्याची नीतिमत्ता मात्र दिवसेंदिवस बदलत चाललेली दिसते, तर दुसरीकडे याच महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकांचे पगार थकू लागल्याने शिक्षणात टाळाटाळ होऊन पर्यायाने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ लागते. (पृ.२२,२३)

होस्टेलच्या मुलांच्या राहण्याच्या, खाण्याच्या, पाण्याच्या, ड्रेनेजच्या समस्या भयंकर मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या असतानाही त्याकडे संस्थाचालक लक्ष देत नाहीत. ढेकूण, डास यांचा उपद्रव वाढूनही औषधोपचार होत नाहीत. तक्रार केली तर मुलांना उलट उत्तरे मिळतात. संस्थाचालकांचे आर्थिक हितसंबंध संस्थेचे अध्यक्ष असलेले तुकाराम फराटे यांच्याशी चांगले असतात. त्यामुळे ते विद्यार्थ्यांची पिळवणूक करतात. त्यांनाच धमक्या देतात. या सर्व अन्यायाविरोधी कृतींना वाचा फोडण्यासाठी प्रा. भावे पुढाकार घेतात. त्यांना या सर्व गोष्टींची चीड येते आणि प्रतिकार म्हणून ते मोर्चे, निदर्शने, संघटना अशा मार्गांचा अवलंब करतात. (पृ.२६,२७)

डॉ. म्हसकरांनी शिक्षणक्षेत्रांत चांगली प्रगती करण्यासाठी आपली सर्व संपत्ती संस्थेला देऊन टाकतात, तर तुकाराम फराटे सत्तेवर आल्यावर शिक्षक प्राध्यापकांची ग्रँटसुद्धा हडप करतात. या परस्परविरोधी कृती या दोन्ही व्यक्तिमत्त्वांच्या नैतिकतेवर प्रकाश टाकतात. नि:स्वार्थी, प्रामाणिक, परोपकारी डॉ. म्हसकर स्वत:ला या कामी वाहून घेतात, तर तुकाराम फराटे याच कामात वाहवत जाऊन स्वार्थी, लोभी, आपमतलबी बनतात. (पृ.३१) या सर्व घटना नैतिक मूल्ये जोपासण्यावर आणि सद्सद्विवेकबुद्धी जागृत असण्यावर अवलंबून असल्याचे मराठे सूचित करतात.

प्रा. उल्हास भावे तुकाराम फराटेंविरूद्ध विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यासाठी आवाज ऊठवतात, निदर्शने करतात प्रसंगी सर्व प्रकारचा त्रास सहन करतात. पेपरवाल्यांच्या मदतीने

लोकहितमध्ये बातमी छापून आणतात. या सर्व गोष्टींमागे प्राचार्य बेलसरेंचाही हात आहे असा आरोप करून तुकाराम फराटे बेलसरेंच्या घरी येऊन त्यांना धमकी देतात. नंतर उल्हास भावे बेलसरेंच्या घरी जातात तेव्हा प्राचार्य बेलसरे भूतकाळातील काही घटना उल्हास भावेला सांगतात. ते सांगतात की, डॉ. म्हसकरांचा गुढ मृत्यू आहे. त्यांनी आत्महत्या केलेली नाही. तुकाराम फराटे आणि म्हसकर यांचे पैसा मिळविण्याच्या मार्गावरून भांडण होते. डॉक्टर म्हसकरांच्या विरोधामुळे तुकाराम फराटे अस्वस्थ होतात. त्यांना विरोध सहन होत नाही. ते डॉ. म्हसकरांचा गळा दाबून खूण करतात. प्राचार्य बेलसरेंच्या समोर तुकाराम फराटे यांनी डॉ. म्हसकरांचा खूण केला आणि प्राचार्य बेलसरेंनी ही गोष्ट उघड करू नये म्हणून प्राचार्य बेलसरेंचा शेवट माफी मागितल्याने टळला असल्याचे ते सांगतात. (पृ.६३,६४) तुकाराम फराटेंच्या सर्व गोष्टींना मान्यता देण्यामागे प्राचार्य बेलसरेंच्या मनातील भिती हे एकमेव कारण दिसते. इच्छा असूनही ते तुकाराम फराटेंविरूद्ध आवाज ऊठवू शकत नाहीत. स्वत:चा जीव वाचविण्यासाठी प्राचार्य बेलसरेंना सर्व चुकीच्या गोष्टी घडताना निमुटपणे पहावे लागते. काही अत्यंत महत्त्वाच्या आणि गोफनीय गोष्टी ते इतके दिवस कोणालाही सांगत नाहीत. यामागेही त्यांना त्यांच्या जीवाचे आणि नोकरीचे भय दिसून येते. (पृ.६३,६४)

प्रा. उल्हास भावेंना डॉ. म्हसकरांचा खूण तुकाराम फराटेंनी केला आहे हे कळताच ते डॉ. म्हसकरांच्या मृत्यूच्या चैकशीची मागणी करतात परंतु सर्वांच्या न्यायासाठी अन्यायाविरूद्ध लढणाऱ्या प्रा. उल्हास भावेंचा शेवट होतो. तुकाराम फराटेंसारखी स्वार्थी, गुंडगिरी प्रवृत्तीची माणसे प्रा. उल्हास भावेंसारख्या चांगल्या माणसांना आपल्या मार्गातील अडसर समजून बाजूला करतात. त्यात त्यांना काही गैर वाटत नाही. तुकाराम फराटे हे व्यक्तिमत्त्व स्वत:च्या धुंदीपायी दोघांचा जीव घेताना दिसते. (पृ.७४) नैतिकता ढासळलेल्या तुकाराम फराटे यांची कार्यशक्ती कशी विघातक वळण घेते यांवर ह. मो. मराठे यांनी अचूक निर्देश केला आहे. पुरुषांचे यश–अपयश त्यांच्या नैतिक मूल्यांवर आधारले असल्याचे येथे प्रत्ययाला येते.

कादंबरीच्या उत्तरार्धात आलेले पुरुषपात्र वसंतराव दामले व्यवसायाने शिक्षक. ते सुमा नावाच्या मुलीला पाहण्यासाठी, तिला मागणी घालण्यासाठी येतात तेव्हा स्वत: शिक्षक असूनही

ते नीटनेटके येत नाहीत, कोणताही शिष्टाचार न पाळता ते वर्तन करतात. मुलीने नोकरी केलीच पाहिजे, त्यासाठी तिचे शिक्षण, नोकरीसाठीचे प्रयत्न सुमाच्या वडिलांनी केले पाहिजे शिवाय पाच–सहा तोळे सोने मागणी करून वर लग्नखर्चाची अपेक्षा वसंतराव दामले व त्याचे मामा बोलून दाखवितात. (पृ.८२)

वसंतराव दामले सुमाशी लग्न केल्यानंतर लग्नाच्या पहिल्या रात्री तिच्याशी नीट संवाद साधत नाहीत. दुसऱ्याच दिवशी तिला खेडेगावातील कोणत्याही कामाची सवय नसताना विहिरीवरून एकटीला पाणी आणण्यासाठी पाठवितात. शिवाय सुमा डोळ्यांनी अधू आहे याची कोणतीही दखल ते घेत नाहीत. धुण्याभांड्यासाठी बाई बघायची भाषा करताच वसंतराव दामले तिच्यावर ओरडून तिच्या बापाच्या श्रीमंतीची भाषा करतात. सुमाला कोणत्याही सुविधा नसताना तिच्याशीही ते चांगले बोलत नाहीत. तिने गाणेबिने सर्व सोडून देऊन शिक्षिका बनून नोकरी करून आपल्याला पैसे आणून द्यावेत अशी इच्छा दामले व्यक्त करतात. (पृ.९०,९१,९२) वसंतराव दामले स्वत:च्या सर्व इच्छा आकांक्षा सुमावर लादतात. तिला कोणतीही मदत करत नाहीत, उलट तिला उपहासाने डिवचतात. स्वत:ला फक्त बायकोने पैसा मिळवून द्यावा अशी प्रबळ इच्छा व्यक्त करतात. सुमाच्या तब्बेतीचा, तिच्या कुवतीचा कोणताही विचार न करता दामले तिला तू डी.एड. केले पाहिजे, मास्तरीण झाले पाहिजे, पगार कमावला पाहिजे शिवाय एक वर्षाच्या आत मूलही झाले पाहिजे असे सांगतात. (पृ.९४) यावरून असे वाटते की दामले सुमाकडे फक्त, उपभोगाची वस्तू, कामासाठीची व्यक्ती आणि मुले तयार करण्याचे यंत्र याच भावनेने पाहतात. (पृ.९४)

सुमा आपली पत्नी आहे. तिने आपली सर्व कामे केलीच पाहिजेत. आपल्या सर्व इच्छा पुरवल्या पाहिजेत. यासाठीच आपण तिला लग्न करून आणले आहे असा अहंकार बाळगून वसंतराव दामले तिची कोणतीही काळजी घेत नाहीत. उलट तिला शिव्या देऊन, तिच्या माहेरच्या माणसांचाही अपमान करतात. (पृ.९५) यावरून त्यांची नैतिक मूल्ये ढासळलेली दिसून येतात.

वसंतराव दामले दारू पिऊन सुमाला मारहाण करतात, तिला त्रास देतात. शिवाय सुमाला मुलगाच झाला पाहिजे अशी मानसिकताही त्यांची दिसून येते. सुमाला मुलगा झाला नाही तर तिचे दिवस भरले अशी धमकीही ते देतात. सुमाच्या लग्नाचा, शिक्षणाचा आणि बाळंतपणाचाही खर्च तिच्या वडिलांनीच करावा अशी अपेक्षा करतात. (पृ.१०२,१०३,१०४) या सर्व त्याच्या विचारप्रक्रियेवरून तो पारंपरिक विचारांचा पगडा असलेला, स्वार्थी वृत्तीचा दिसून येतो. आपण एक पुरुष आहोत शिवाय सुमाचा नवरा म्हणून आपलेच वर्चस्व सिद्ध करण्यासाठी वसंतराव दामले खूप खालच्या थराला जातात.

वसंतराव दामले सुमाची व तिच्या बाळाची नीट काळजी घेत नाहीत. बाळ झाल्यावरही ते तिला मारहाण करतात. माहेरी पाठवितात. सुमाच्या वडिलांचा अनादर करतात. बाळाला सांभाळायची जबाबदारी टाळतात. बाळाच्या दुधासाठी पैसे खर्च करतानाही विचार करतात. दारूवर मात्र पैसे उधळताना दिसतात. घरातील किराणा, दूध, धान्य या दैनंदिन गरजेच्या गोष्टीही ते घेत नाहीत. (पृ.१२४,१२५) वसंतराव दामले आपल्या रतिग्णीडेत बाळाचा अडथळा येतो, ते सारखं रडतं म्हणून त्यालाही शिव्या घालतात बाळाला लाथेने दूर ढकलून देतात. (पृ.१३७) सुमाला घरखर्चाला ते पैसे देत नाहीत. उलट सुमावरच चोरीचा आळ घेतात आणि आपला पगार आपण दारू आणि बाईवर उडवतो असे स्पष्टपणे सांगतात.

सुमाचे स्त्रीधन सुमाला फसवून वसंतराव दामले हडप करतात. सुमाने प्रतिकार करता दागिन्यांची चौकशी करता ते सुमाला पक्कडने मारतात. सुमाच्या बाबांचा विरोध होताच ते त्यांच्यावरही धावून जाऊन त्यांचा गळा धरतात. (पृ.१४७,१४८)

सुमाच्या डोळ्याचा रेटीना सरकून सुमाला अंधत्व येते परंतु सुमाच्या अंधत्वाचा दामलेंवर कोणताही प्रभाव पडत नाही. उलट त्यांना आनंदच होतो. शेवटी सुमाबरोबर घटस्फोट होऊन ते बाळाचा ताबा घेतात. सुमाच्या आईबाबांकडे आपले नुकसान झाले आहे म्हणून पंचवीस हजार रूपयांची मागणी करतात. घटस्फोट झाल्यानंतर दामले दुसरे लग्न करतात. दुसरे लग्न केल्यानंतरही ते सुमाला सेवाचाकरी करण्यासाठी परत येण्याचा निरोप पाठवितात. (पृ.१५४,१५५,१५८)

वसंतराव दामलेंसारखी माणसे ही समाजाला लागलेली कीडच आहे. पारंपरिक विचारसरणी, मागासलेले विचार, ऐतखाऊ वृत्ती, संधीसाधूपणा, स्त्रीला एक उपभोगाची वस्तू म्हणून पाहणे या गुणवैशिष्ट्यांमुळे दामले एक अत्यंत स्वार्थी, आपमतलबी, दुर्गुणदुराचाराचे भांडार असलेले व्यक्तिमत्त्व ह. मो. मराठे यांनी हुबेहूब साकारले आहे.

**५. कलियुग :**

असोशिएट व्हाइस प्रेसिडेंट सी. एम. कत्रे आपल्या ऑफिसच्या केबिनमध्ये येतात तेव्हा सर्वजण त्यांना आदराची वागणूक देतात. त्यांच्या पदाचा मान देतात. परंतु काही लोक तिरस्काराने हसतात. त्यापैकीच युनियन लीडर असलेला जगताप पाटील कत्रेंकडे तिरस्काराने पाहून त्यांच्याबद्दल 'सरळ करायला पायजेल' सारखे शब्द उच्चारतात. यावरून जगतापची कत्रे या वरिष्ठांकडे पाहण्याची नैतिकता चांगली दिसून येत नाही. आपले वरिष्ठ असलेल्या कत्रेंकडे आदराने विश्वासाने ते पाहत नाहीत. (पृ.२,३)

सरदेसाई आणि भावे या दोन कामगारांना कत्रे इन्क्रीमेंट देतात परंतु ते देताना त्यांनी पाळावयाच्या पथ्यांच्या आणि स्वत:च्या बाबतीतील काही नैतिक गोष्टींची ते चर्चा करताना दिसतात.

"पण याद ठेवा, पुढल्या वर्षी तुम्ही काहीतरी खास काम करून दाखवायला पाहिजे, 'यू मस्ट बी मोअर एफिशियंट, प्रॉडक्टीव्ह. ऑफिसचा वेळ सत्कारणी लावा. कंपनीचा पगार त्याचे रिटर्नस कंपनीला द्यायला लागा. खुर्चीवरून उठायचं नाही गप्पा करताना आणि जांभया देताना आणि सारखें संडासला जाताना आढळला तर मी इन्क्रीमेंट स्टॉप करीन तुमचं–' (पृ.७,८)

कत्रे यांच्या सडेतोड बोलण्यामागे आपल्या कामाप्रती निष्ठा, कामगारांना अयोग्य गोष्टींसाठी शासन, शिस्त यांसारखी कारणे दिसून येतात. यावरून त्यांच्या नैतिक मूल्यजाणिवा जागृत असल्याचे निर्दशनास येते. कत्रे या पदापर्यंत कष्ट आणि मेहनतीने आलेले दिसतात.

जगताप पाटील नावाचा कामगार युनियन लीडर गाडगीळ नावाच्या सुपरवायझरच्या खुर्चीत बसतो, अधिकाऱ्यांना अरे–तुरेची भाषा वापरतो, इतर कामगारांना भडकवितो, प्रॉडक्शनमध्ये मुद्दाम खंड पाडतो, मशीन फेल करतो, ॲब्सेंट राहतो, उगीचच इकडे तिकडे

रेंगाळतो, इतर कामगारांच्या कामात व्यत्यय आणतो. त्याच्या या सर्व कृतींमागे त्याचे कामावर निष्ठा नसल्याचे व वरिष्ठांप्रती आदर नसून द्वेषभावना असल्याचे सिद्ध होते. (पृ.८,९) जगताप कामावरून लवकर घरी येतो. येताना बापू पाटीलला घरी घेऊन येतो. बायकोला भजी करायला सांगून दारू पीत बसतो. कामाची टाळाटाळ करून नुसत्या युनियनच्या चर्चा करण्यात आनंद मानतो. छोटेसे घर असताना मुले अभ्यास करत असताना, त्यांचा कोणताही विचार न करता ते तेथे दारू पीत गप्पा मारत रात्री उशिरापर्यंत बसतात. जगतापच्या या अशा वागण्यामागे त्याला कुटुंबाची कोणतीही काळजी नसल्याचे दिसून येते, तर कामाप्रती त्याची बेफिकीरी दिसून येते. (पृ.१९)

सी. एम. कत्रे आधीच्या कंपनीत नोकरी करीत होते तिथेही ते प्रामाणिकपणे काम करीत होते. परंतु कंपनीने त्यांना भेटवस्तू देऊन विकत घेण्याचा प्रयत्न केला पण कत्रे यांनी भेटवस्तू नाकारल्यामुळे कंपनीने त्यांच्यावर आरोप करून त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाते. कत्र्यांनी भेटवस्तू नाकारणे, स्वत:च्या विवेकबुद्धीला न पटणारा निर्णय न घेणे हे त्यांच्या स्वच्छ चारित्र्याचे लक्षण दिसून येते. (पृ.२७,२८)

कत्रे एक प्रामाणिक कष्टाळू नेतृत्व दिसून येते तर त्याच कंपनीतील इतर लोक जसे जगताप, प्रधान, श्रोत्री, बापू पाटील इ. पुरुषपात्रे दुय्यम नैतिकतेचे दिसून येतात. त्यांची नैतिकता, सचोटी परिस्थितीप्रमाणे बदलताना दिसून येते. कत्रे काम न करणाऱ्या कामगारांना शासन करतात. परंतु ते शासन ते कंपनीच्या हितासाठी आणि आपल्या पदाची जबाबदारी म्हणून करतात. कामगारांना आणि युनियनला कत्रे नको असतात त्यामुळे ते कत्र्यांना हटविण्यासाठी कटकारस्थाने रचतात. (पृ.९०,९१)

कत्रे यांना हटविण्याच्या कारवाया सुरू झालेल्या पाहून कत्रे आपला बळी जाऊ न देण्याच्या तयारीला लागतात. राजीनामा देण्यास तयार नसतात याचे पर्यवसान कत्रे यांच्याकडूनही कारवायास सुरूवात होताना दिसते. कत्रे जगतापच्या विरोधात बापू पाटीलला चेतवितात. त्यामुळे बापू पाटीलकडून जगतापच्या मुलाची निर्घृण हत्या होते. कत्रे यांच्या आत एक नकळत हिंस्त्र श्वापद तयार होताना दिसते. (पृ.११५,१२४,१२६)

या कादंबरीतील युनियन, कामगार आणि वरिष्ठ यांच्यातील संघर्ष विकोपाला गेल्याने तीन जिवांचा बळी जातो. जगतापचे संपूर्ण कुटुंब आणि आयुष्यही उद्ध्वस्त होते, तर कत्रे प्रामाणिक राहूनही शेवटी त्यांना राजीनामा द्यावा लागतो. वरिष्ठांच्या राजकारणाचाच एक भाग बनलेली ही व्यक्तिमत्त्वे स्वत:चे स्वत्व हरवून बसलेली दिसतात. यामागे त्यांची अनैतिकता असल्याचे ह. मो. मराठे स्पष्ट करताना दिसतात.

**६. देवाची घंटा :**

गोप्याभट नावाचा मारूतीचा पुजारी लग्न झालेले असताना बायकोला सोडून, घरदार सोडून पळून जातो. एका मारूतीच्या देवळात मारूतीची पूजा करू लागतो तेथेच राहतो. नंतर तो येसू नावाच्या तेलीण स्त्रीला आपली रखेल म्हणून ठेवतो. तिच्यापासून त्याला शंकऱ्या आणि चंद्री नावाची दोन मुले होतात. येसू आणि तिची मुले मारूतीच्या मंदिरापासून खूप दूर भंडारीवाड्यात सुतार चाळीत राहतात. येसू त्याला आपण मारूतीच्या देवळात राहू तुम्ही पूजा करा, मी मंदिर झाडीन असे म्हणते. तेव्हा गोप्याभट तिला सांगतो मारूतीच्या देवळात बिऱ्हाड करायला तू माझी लग्नाची बायको नाही. लोक आपल्याला दगड मारतील असे म्हणतो. (पृ.१२,४८) मारूतीच्या देवळातील पुजाऱ्याने बाई ठेवणे हे समाजमान्य नाही हे गोप्याभटाला माहीत असूनही तो येसूला आपली रखेल म्हणून ठेवतो. समाजातील लोकांच्या नजरा चोरून तो रात्रीच येसूला भेटतो. यावरून त्याची भोगी आणि स्वार्थी वृत्ती समोर येते.

गोप्याभट येसूशी लग्न केलेले नसतानाही उपभोग घेत असला तरी तिची आणि तिच्या मुलांची तो काळजी आणि जबाबदारी घेताना दिसतो. यामुळे त्याची वडिलांच्या मायेची आणि एका जबाबदार पुरुषाची प्रतिमा समोर येते.

जोपर्यंत गोप्याभटाला मारूतीच्या देवळातील पेढे, अर्धुक, नारळ, तांदूळ, पैसे इ. मिळत होते तोपर्यंतच तो येसू आणि तिच्या मुलांची जबाबदारी उचलताना दिसतो. देवळात फुकट जे काही मिळत होते, तेच तो येसूला मदत म्हणून देताना दिसतो. इतर पुरुषांप्रमाणे तो काही कामधंदा करताना दिसत नाही. इतर पुरुषांप्रमाणे लग्नाच्या बायकोप्रमाणे तिची काळजी करताना दिसत नाही. आपली शारीरिक गरज भागविण्यासाठी तो त्याल गरज असेल तेव्हाच येसूकडे

येताना दिसतो. (पृ.५६) त्याच्या या वागण्याचा मुळाशी येसू म्हणजे उपभोगाची वस्तू दिसून येते. तिला छोटी–मोठी मदत केली तरी ती आपल्याला पाहिजे ते देते त्यामुळे जास्त काम करून त्यांची जबाबदारी उचलण्याची त्याला गरज वाटत नाही.

येसूला मदत करता येत नाही. पोटासाठी पैशाची गरज असताना गोप्याभट इतर काही पर्यायी काम करून पैसे मिळविण्यापेक्षा मारूतीच्या पवित्र मंदिरात चोरीचे काम करतो. पैसे मिळविण्यासाठी चोरीचा पर्याय कुटुंबासाठीच केला असला तरी या त्याच्या कर्मामागे त्याचा आळशीपणा, ऐतखाऊ वृत्ती, दुसऱ्यांवर अवलंबून राहण्याची वृत्ती दिसून येते. आयते काही मिळाले नाही तर चोरीसुद्धा करतो पण दुसरा कामाचा मार्ग शोधून पैसे मिळविण्यासाठी प्रयत्न करताना दिसत नाही. (पृ.६०,६३)

गोप्याभटावर चोरीचा आळ येऊन तो खूप आजारी पडतो. तेव्हा त्याचा बाप येऊन त्याला घेऊन जातो. गोप्याभट आजारी असताना वडिलांच्या इच्छेखातर अनिच्छेने आपल्या घरी जातो परंतु परत येताना दिसत नाही. आपल्यानंतर येसूची आणि मुलांची कोणतीही तजवीज नाही की पुढील दिवसांसाठी त्यांची काही सोय करत नाही. यावरून त्याची बदलती मनोवृत्ती दिसून येते. गोप्याभट हे पुरुषपात्र एकाच वेळी आपले कुटुंब, लग्नाची पत्नी, ठेवलेली रखेल, मुले यांची फसवणूक करताना दिसतो. ही फसवणूक तो जाणिवपूर्वक करत नसला तरी परिस्थिती त्याला हे करण्यास भाग पाडते. एकतर लग्नाची बायको, तिला सोडून देऊन तो तिच्यापासून मुक्तता मिळवितो. पण येसूची आणि तिच्या दोन मुलांचीही नंतर तो काही काळजी करताना दिसत नाही. त्यांच्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद नाही, येसूला काम नाही, दोन लहान मुले अशा परिस्थितीत ती लग्नाची बायको नसल्याने कायद्यानेही तिला पत्नीच्या हक्कापासून, मालमत्तेपासून वंचित रहावे लागते. एवढा बेजबाबदारपणा गोप्याभटाच्या नैतिक मूल्यांची अधोगतीच दाखवितो. काही अंशी परिस्थिती या सर्व घटनांना जबाबदार असली तरी गोप्याभटाची नैतिक घसरण आणि बेजबाबदारपणा दिसून येत असल्याचे ह. मो. मराठे सूचित करतात.

गोप्याभटाच्या सोडून जाण्यानंतर असहाय आणि उपासमार होणाऱ्या येसूला मदत करण्याच्या बहाण्याने वासूभट रात्री तिला सत्यनारायणाचा प्रसाद देण्याच्या निमित्ताने वासूभटाची

वासना जागृत होताना दिसते. प्रसाद देतानाची छोटीशी संधीही तो दवडताना दिसत नाही. प्रसाद देता देताच तो जाणिवपूर्वक तिच्या तळव्यांना स्पर्श करून घेतो. आपल्याकडे कधी–कधी कामासाठी येऊन जाण्याची सूचनाही देतो. (पृ.९४) काम मिळविण्यासाठी येसू वासूभटाकडे जाते तेव्हा सारवण काम करताना आणि ती तिथे चहा पीत बसलेली असताना वासूभट तिच्या देहाचे दर्शन न्याहाळीत बसतो. पेला धुण्यासाठी तिला मदत करताना लगट करताना दिसतो. जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा वासूभट वय झालेले असूनही एकही संधी सोडताना दिसत नाही. वासूभट पुजारी, ब्रह्मचारी असूनही येसूसारख्या तेलीण, दोन मुलांची आई असलेल्या येसूकडे वासनांध नजरेने पाहतो. तिला मदत करणे हे फक्त एक निमित्त दिसून येते. खरे तर तो येसूचा उपभोग घेण्याची इच्छा मनात धरून असतो त्यामुळे त्या हेतूने तो तिला मदत करताना दिसतो. (पृ.९८) समाजात सोवळे–ओवळे घालून फिरणारा वासूभटसुद्धा येसूसारख्या तेलीण स्त्रीशी संग करण्याची इच्छा धरतो. यावरून त्याची नैतिकता दिवसा वेगळी आणि रात्री वेगळी दिसून येते. कोणी बघू नये म्हणून तो रात्री चोरून येतो आणि लगेच येसूला दार बंद करायला सांगतो. कित्येक वेळा तो रात्री येऊन पहाटेच निघून जाताना दिसतो. एकदा आजारी असतानाही तो येसू घरी आलेली असताना तिच्या शरीराशी चाळा करताना दिसतो. शिवाय तो येसूला जर तू काही शिजवून आणलस तर खाईन. सोवळे ओवळे फक्त चुलीपुरतेच असते असेही सांगतो. (पृ.१०६,१०८)

वासूभटाला स्त्रीभोग पाहिजे असतो पण तिची जबाबदारी नको असते हे त्याच्या आणि येसूच्या झालेल्या संभाषणातून स्पष्ट होते. त्यावरून त्याची अनैतिकताच स्पष्ट होते.

"करणार होतो, गो. मुलगी सांगूनसुद्धा आली होती. पण म्हटलं, नकोच ती कटकट. नकोच तो संसाराचं बोवाळ गळ्यात. लगीन करा. मग पोरं होणार. मग संसाराचा गाडा सुरू. बायका–पोरांना सांभाळा, त्यांच्यासाठी पैसे मिळवा. पैसा नाही, मग कर्ज काढा. त्यांचं शिक्षण, आजारपण. शी! त्यापेक्षा असा सडाफटिंग राहणं उत्तम." मग किंचित खाजगी आवाजात तो म्हणाला, "त्यापेक्षा तुझ्यासारखी कोणी भेटली, तर संबंध ठेवावे, हे उत्तम. आपलं काम केलं, की बाजूस." (पृ.१२४) वासूभट येसूला होणारे तिसरे मुल आपले आहे हे माहीत असूनही नाकारतो,

त्याची जबाबदारी घेण्याचेही टाळताना दिसतो. (पृ.१२६) या सर्व घटनाक्रमांकडे पाहता वासूभट फक्त येसूचा उपभोग घेताना दिसतो. आणि स्वत:कडे काही नारळ पैसे असतील तरच तिला मदत करताना दिसतो. अन्यथा तो स्वत:चेच रडगाणे गातो. शिवाय तिच्याकडून कामे करवून घेतो तेही वेगळीच. इतक्या स्वार्थी मनोवृत्तीची माणसे, भट, ब्राह्मण पुजारी अशी चांगली आणि धार्मिक कार्ये करत असली तरी समाजासाठी कलंकच ठरतात.

कादंबरीतील गोगटे वकील मंदिरातील जमाखर्चाचा हिशोब ठेवण्यासाठी नेमलेले असतात. ते मदिरातील हिशोबासाठी सर्वप्रकारचा चोख बंदोबस्त करतात. तरीही गोप्याभटाकडे पैशांची चोरी किंवा पैसे बाजूला ठेवले असतील अशाच साशंक नजरेने पाहतात. गोप्याभटाला त्याच्या खाजगी आयुष्यावरून, येसूवरून अश्लील भाषा वापरताना दिसतात, त्याची पैशासाठी झाडाझडतीही घेताना दिसतात. (पृ.३३,३४,३५,३६,५८)

गोप्याभट मंदिरात शंभर रूपयांची चोरी करतो. पण येसूला ते मान्य नसते, म्हणून ती ते पैसे घेऊन वकिलांना परत करण्यासाठी येते तेव्हा वकील तिच्याकडे वासनांध नजरेने बघतात. तिच्याशी असभ्य भाषेत संभाषण करतात. (पृ.६७,७३) गोप्याभट आणि येसू यांच्याकडे वकील नेहमी तुच्छतेने व्यवहार करताना दिसतात, परंतु येसूकडे ते वाईट नजरेनेही पाहतात. वकील गोप्याभटाला बाई ठेवली म्हणून हिणवतात. परंतु स्वत: मात्र एका असहाय विधवा येसूचा उपभोग घेतात. तिला मंदिर झाडण्याचे काम देण्याचे आश्वासन देऊन तिचा उपभोग घेतात. परंतु तिला दुसरे काम देत नाहीत. उलट ती गरोदर असताना तिची चौकशी किंवा काळजी न करता तिच्याकडे जाऊन काही उपयोग नाही असा अभिप्रायही ते येसूला देतात. (पृ.१४१) गोगटे वकील येसूशी संबंध ठेवतो म्हणून गोप्याभटाला हिणवतात. पण येसू सुंदर असल्याने, एवढी सुंदर स्त्री गोप्याभटाला मिळाली याचा त्यांना हेवा वाटतो. शेवटी ते तिला आपलीशी करतात. एवढेच करून ते थांबत नाहीत, तर एका तांबे नावाच्या विधवा निराधार स्त्रीशी ते संबंध ठेवतात. तिच्या असहायतेचा फायदा उचलतात. आपली गैरसोय होऊ नये म्हणून जाणिवपूर्वक तिची बदली करत नाहीत. गोगटे वकील तांबेबाईंची, आपल्या होणाऱ्या बाळाची जबाबदारी नाकारतात. तेव्हा तांबेबाई आपले वाढलेले पोर घेऊन बावडीत आत्महत्या करते. (पृ.११५,१३५,१३६)

गोगटे वकील व्यवसायाने वकील असूनही, न्यायदानाचे पवित्र कार्य स्विकारलेले असूनही ते स्त्रियांचा उपभोग घेण्याच्या लालसेने आणि आपल्या कपटी स्वभावाने आपल्याला पाहिजे ते मिळवितात. गोप्याभट, येसू, तांबेबाई यांचे नैतिक शोषण करताना दिसतात.

गोप्याभटाच्या जाण्यानंतर, वासूभट, गोगटे वकील येसूचा उपभोग घेतात पण तिच्या संसाराला, मुलाबाळांना पुरेशी मदत करत नाहीत तेव्हा येसू चोरी करू लागते. अशीच एकदा ती रात्री चोरी करण्यासाठी सोनाराच्या विहिरीवर येते आणि पाय घसरून विहिरीत पडते तेव्हा लक्ष ठेऊन असलेला सोनार तेथे येतो पण येसूने विनवणी करूनही तो येसूला पाण्यातून वाचवत नाही. उलट आपली फळांची चोरी येसूच करते, असा दृढ विश्वास वाटून ते तिला भाला टोचतात. हाताच्या बोटांना भाला टोचल्याने, छातीला, तोंडाला भाल्याची जखम झाल्याने अखेर तिचा अंत होतो. तिला वाचविण्यासाठी मदत न करता सोनार तिचा मृत्यू घडवून आणतो व शेवटी काहीही झाले नसल्याच्या आविर्भावात शांतपणे विडी ओढत बसतो. एवढे क्रूर कृत्य सोनार करतो. यामागे त्याला त्याचे नुकसान टाळणे हा जरी हेतू असला तरी मानवता, दया, क्षमा हे गुण सोनाराच्या अंगी दिसून येत नाहीत. उलट ठोशास ठोशा, चुकीला मन मानेल ती शिक्षा अशा वृत्तीचे हे पुरुष पात्र आहे.

या कादंबरीतील गोप्याभट, वासूभट, गोगटे वकील हे येसूचे शारीरिक आणि मानसिक शोषण करतात. उपभोग घेतात पण नंतरच्या परिणामांची क्षिती त्यांना दिसत नाही तर सोनारासारखे पुरुष अबला, असहाय स्त्रीचा कोणताही विचार न करता तिने केलेल्या चोरीच्या गुन्ह्याच्या मागची पार्श्वभूमी समजावून न घेता स्वत:च तिला मृत्यूदंडाची शिक्षा देताना आपण सामर्थ्यवान असल्याची भावना त्यांना हे कृत्य करण्यास भाग पाडत असल्याचे चित्र ह. मो. मराठ्यांनी रेखाटल्याचे दिसते.

**७. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

रमेश पंडितला डॉक्टर मूल होणार नसल्याची बातमी देतात. तेव्हा रमेश पंडित नाराज होऊन त्याच्या जिवलग मित्राच्या विष्णूच्या घरी जातो. तो त्याच्या मुलांशी नेहमीप्रमाणे मनापासून खेळत नाही. तटस्थपणे, अलिप्तपणे तो मित्र, मित्राची मुले यांच्याशी व्यवहार करतो.

आपल्याला अपत्य होणार नाही या विचाराने त्याची विवेकबुद्धी नष्ट होऊन तो अलिप्त व्यवहार करतो. हा व्यवहार तो परिस्थितीशरणतेमुळे करत असला तरी त्याचे असे वागणे चुकीचेच वाटते कारण यामध्ये मुलांचा, मित्राचा काही दोष नसतो, शिवाय स्वत:लाही तो खूप मोठा अपराधी मानायला लागतो. (पृ.२०)

आपल्यामध्ये दोष असल्यामुळे नलूलाही आई होता येणार नाही या विचाराने तो अस्वस्थ होता. डॉक्टरांचा सल्ला घेऊन कृत्रीम गर्भधारणा करण्यासाठी स्वत:ची मनोधारणा करतो आणि नलूला तसे करण्याविषयी सांगतो पण नलू या सर्व गोष्टींसाठी नकार देते. (पृ.६३,६४) रमेश पंडित कृत्रीम गर्भधारणा करवून घेण्यास तयार होतो यामागे त्याची चांगली भावना दिसून येते. या निर्णयामुळे आपली पत्नी सुखी होईल, तिला मातृत्व लाभेल या पर्यायाने आपली उणीव भरून निघून आपल्याहाली पितृत्व लाभेल अशी दुहेरी विचारसरणी ठेवून तो नलूची मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न करतो, परंतु नलूने नकार दिल्यावर तो स्वत:च्या जिवलग मित्राचे विष्णूचे वीर्य वापरण्याची कल्पना करतो. यास डॉक्टरांचा विरोध झाल्याने तो नलू आणि विष्णू दोघांची समजूत घालून, हे पापाचरण नाही असे समजावून सांगून त्यांना प्रत्यक्ष संततीसाठीच संबंध ठेवण्यास भाग पाडतो. (पृ.६९,७१,७३,७९,८०,८१) नलू आई झाली तरच ती आनंदी राहील, आपण आई–बाबा होऊ, समाजाचा तिरस्कार दूर होईल, आपल्यावरील शाप दूर होईल अशा सर्व चांगल्या गोष्टी घडून येतील म्हणून तो हा निर्णय घेताना दिसतो. एकीकडे स्वत:च्या स्वार्थासाठी तो विष्णू आणि नलू यांना हे कृत्य करण्यास भाग पाडतो, तर दुसरीकडे तो पत्नीच्या आनंदासाठी पत्नीला परपुरुषाशी संबंध ठेवण्यासाठी स्वत:च्या भावनांचा सर्व त्याग करून प्रयत्न करताना दिसतो. एकाच वेळी त्याचे हे दुहेरी वर्तन त्याला समाजाला, डॉक्टरांना, धर्माला मान्य नसलेले कृत्य करण्यास भाग पाडते.

रमेश पंडित नलूला मातृत्व देऊ शकणार नसतो. म्हणून तो तिला विष्णूच्या स्वाधीन करतो. आपली पत्नी आपल्या मित्राशी समागम करतेय हे रमेशला सहन होत नसते परंतु नलू आई होईल आपण बाबा होऊ, नंतर सगळं परत पूर्वीसारखंच सुरळीत होईल या विचारांनी तो हा निर्णय घेतो. (पृ.९६) नलू आणि विष्णू यांचे खरोखरच प्रेमसंबंध निर्माण होतात. ते दोघेही त्यांचे

संबंध सुरूच ठेवतात. तेव्हा रमेश पंडितने विरोध करूनही ते दोघेही हे सर्व थांबवताना दिसत नाहीत. तेव्हा रमेश नलूला हे मुलच नको असा निर्णय घेतो. (पृ.१०६,१०८,१०९,११०) रमेश पंडित बाळासाठी काही काळ सर्वप्रकारचा त्याग करायला तयार होतो परंतु सर्व गोष्टी त्याच्या मनाविरूद्ध होऊ लागल्याने तो शेवटी बाळाचा जन्मच नाकारताना दिसतो. यावरून त्याची परिस्थितीनुसार बदलणारी नैतिकता समोर येते. आपले दोष झाकले जावेत, पत्नीही आपलीच ती आनंदी रहावी या स्वार्थी हेतूनेच त्याने विष्णू आणि नलूचे संबंध घडवून आणल्याचे चित्र समोर येते.

विष्णू रमेश पंडितचा चांगला मित्र असून त्याची मित्राविषयीची सहकार्याची, परोपकाराची, दयाळुपणाची भावना दिसून येते. त्यामुळे सुरूवातीला तो रमेश पंडितला धीर देतो. त्याच्या सर्व सुखदु:खात सामील होताना दिसतो. रमेशने नलूशी संबंध ठेवण्याचा प्रस्ताव मांडल्यावर विष्णू सुरूवातीला हे पाप आहे, हे समाजाविरूद्ध, धर्माविरूद्ध कृत्य असल्याने अमान्य करताना दिसतो. यावरून त्याची चांगली आणि सुसंस्कृत पुरुषाची प्रतिमा समोर येते पण दुसरीकडे मित्राला त्याच्या आनंदासाठी, पितृत्वासाठी सहकार्य नाकारण्याचेही त्याला कठीण जाते. (पृ.६९,७०)

सर्व प्रयत्नांना अपयश आल्यानंतर रमेश पंडित विष्णूला नलूशी प्रत्यक्ष संबंध ठेवण्यासाठी आग्रह करतो तेव्हा विष्णू चिडून त्याच्यावर रागावतो, त्याला शिव्या देतो. मी हे पाप करणार नाही हे अनैतिक कर्म करणार नाही असे निक्षूण सांगतो. (पृ.७९) त्याच्या प्रत्युत्तरावरून आणि प्रतिकारावरून विष्णू चांगल्या नैतिकचा पुरुष असल्याचा निष्कर्ष निघतो. परंतु ह. मो. मराठे यांनी हे पुरुषपात्र नैतिकदृष्ट्या चांगलेच रेखाटले असून त्याच्या अंतरंगाचा ठाव घेताना त्याला या ऑफरने आनंद झाल्याचेही ते नमूद करतात. यावरून त्याची कृती आणि उक्ती यांमध्ये तफावत दिसून येते. रमेशच्या आग्रहाखातर पण स्वत:च्या अंतर्मनात झालेल्या आनंदामुळे तो नलूशी संबंध ठेवण्यास तयार होतो. एकीकडे विष्णू नलू आणि रमेशला मदत करण्यासाठी मनाच्या विरूद्ध ही कृती करत असल्याचा भास होतो तर दुसरीकडे त्याला अंतर्मनात झालेल्या आनंदाचा तरंगही दिसून येतो. पण विष्णूने नलूला आणि रमेशला फसवून किंवा स्वत:च्या स्वार्थासाठी हे कृत्य केलेले नसते तर त्यांना मदत करणे, त्यांना आनंद मिळवून देणे हा त्याचा

मुख्य उद्देश दिसतो. पुढे पुढे तो नलूत गुंतत जातो. आपला विशिष्ट उद्देशासाठी आलेला संबंध न संपविता तो ते चालूच ठेवतो. रमेशने विरोध केल्यावरही, त्याला दु:खी झालेले पाहूनही, ही अनिती आहे हे माहीत असूनही विष्णू नलूच्या आहारी गेलेला दिसून येतो. (पृ.८६,८७,८९,९६,९७,१०१,११०) चांगली नैतिकता असलेला विष्णू जेव्हा नलूच्या सानिध्यात येतो तेव्हा त्याची नैतिकता बदलत जाते. मित्राचा, नलूचा, समाजाचा विचार न करता तो स्वत:च्या सुखासाठी, आनंदासाठी अनैतिकतेने नलूशी संबंध ठेवतो. यावरून त्याची नैतिकता असहाय व्यक्तीचा, मैत्रीचा फायदा उठवताना दिसून येते.

**८. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

सनशाईन क्लिनिंग सोप कंपनीचे मार्केटींग मॅनेजर अविनाश साने आपल्या पत्नीला एव्हरफ्रेश क्लिनिंग सोप कंपनीच्या मार्केटींग मॅनेजर पदावर पोहोचल्याच्या शुभेच्छा देतो, तिचा आत्मविश्वास वाढविताना दिसतो. धीर देताना दिसतो. तिच्या आनंदात, जबाबदारीत सहभागी होताना दिसतो. सर्वात पहिल्यांदा केतकीचे अभिनंदन करण्याचा प्रयत्नही करतो. त्याच्या या आचार–विचारांच्या पाठीमागे चांगली नैतिक मूल्ये दिसून येतात. एकतर एका स्त्रीचा–पत्नीचा कर्तृत्वाचा अभिमान अविनाशला दिसून येतो, तर पत्नीला तिच्या करिअरच्या कामात तिला मदत करणे हे आपले कर्तव्य समजून तो प्रेमाने आनंदाने तिला प्रोत्साहन देतो. त्यामुळे त्याच्या स्त्री–पुरुष समानतेच्या विचारांचाही आदर वाटतो. (पृ.८,९)

अविनाश साने केतकीला कामात मदत करतो. एकाच प्रकारच्या प्रॉडक्टच्या दोन वेगवेगळ्या कंपन्यांत दोघेही एकाच पदावर काम करत असले तरी अविनाशला जास्त अनुभव असल्याने तो केतकीला ॲड एजन्सी सुचविण्यासारखी, काम करण्याच्या काही महत्त्वाच्या गोष्टी सुचवितो. तो पत्नीला सांगतो की आपण नोकरी करतो त्या कंपन्या एकमेकांच्या स्पर्धक असल्या तरी प्रायव्हेट लाईफमध्ये आपण एकमेकांचे मित्रच आहोत. नवराबायको आहोत. (पृ.३२) त्याच्या या विचारांवरून त्याची संस्कारशील नैतिकता समोर येते.

कालांतराने परिस्थिती पालटते तेव्हा केतकी साने आपल्या मेहनतीने आणि कंपनीच्या सहकार्याने चांगले मार्केट मिळविते. प्रतिस्पर्धी असलेल्या नवऱ्याच्या सनशाईन कंपनीला मागे

टाकते तेव्हा हा अपमान अविनाशला सहन होत नाही. बायकोकडून होत असलेला पराभव त्याला सहन होत नाही म्हणून तो दारू,सिगरेटचा आधार घेतो. (पृ.१०४,१०६) शेवटी यश मिळविण्यासाठी तो पत्नीच्या काही स्कीम्स चोरतो आणि आपले उत्पादन वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग करतो. केतकी साने यांनी दाखविलेल्या त्याच्यावरील विश्वासाला तो पात्र ठरत नाही. (पृ.१२०) एकाच घरात रहात असल्याने, पत्नीच्याच बुद्धीचा वापर करण्यात येणार असल्याने अविनाशला हे सर्व करणे सहज शक्य होते. शिवाय पत्नी याविरूद्ध जास्त काही ॲक्शन घेऊ शकणार नाही असे गृहीत धरूनच तो ही कृती करतो. त्याच्या या कृतीमागे त्याची ढासळलेली नीतिमत्ता दिसते.

एवढे करूनही अविनाश सानेची कंपनी मागे पडते. केतकी साने आपल्या प्रयत्नांनी यशस्वी होते. पत्नीचे म्हणजेच एका स्त्रीचे यश अविनाशला सहन होत नाही. तेव्हा तो तिला ती यशस्वी झालेली असूनही राजीनामा देण्यास सांगातो. केतकीने राजीनामा दिला नाही तर घटस्फोट देण्याची भाषा करतो, त्यामुळे त्याला आपल्या अपयशापुढे संसारही महत्त्वाचा वाटत नाही हेच स्पष्ट होते. (पृ.१३३,१३५)

जोपर्यंत केतकी साने अविनाश सानेच्या पुढे जात नव्हती तोपर्यंत अविनाश साने केतकीला सर्वप्रकारची मदत करताना दिसतो. जोपर्यंत केतकी साने यशस्वी होत नाही तोपर्यंत दोघांचे कौटुंबिक संबंधही चांगले असलेले दिसून येतात. परंतु केतकीचे यश अविनाशला सहन होत नाही. कंपन्यांची स्पर्धा नवरा–बायकोत अंतर घडवून आणते. नाकापेक्षा मोती जड नको अशाप्रकारची मानसिकता अविनाशची झालेली दिसून येते. शैक्षणिक स्तर, आर्थिक स्तर उंच असलेल्या या कुटुंबातही स्त्रीचे यश सहन होत नाही. पुरुषांची नैतिकता पत्नीच्या, कुटुंबाच्या स्वत:च्या यश–अपयशाप्रमाणे चांगली–वाईट होत असल्याचे दिसून येते.

**९. मार्केट :**

मार्केटींग मॅनेजर असलेले केळकर बीवायपी कंपनीच्या अहुजांना दोन हजार डिफेक्टीव्ह बॅगा जबरदस्तीने आणि फसवून विकतात. बीवायपी कंपनीकडून तो परत करण्याचा निर्णय घेतला जातो. बॅगा कमी दर्जाच्या मालापासून बनविण्याच्या सूचना एम.डी. चे जावई यांनी दिलेल्या

होत्या. एम.डीं. चे जावई त्याच कंपनीत टेक्नीकल डायरेक्टर म्हणून काम करीत होते. खराब कंपनीने माल परत केला तर आपले मोठे नुकसान होऊ नये म्हणून एम.डी. केळकरांना हा प्रश्न काहीही करून सोडविण्याची विनंती करतात. तेव्हा केळकर गद्रेंमार्फत अहुजांना पार्टी देऊन त्यांना ड्रिंक्स देऊन पंचवीस हजार रूपये लाच देऊन गप्प बसण्याचे म्हणून देऊ करतात. (पृ.११,१५,३८) या व्यवहारातून समोर आलेले एम.डी., केळकर, अहुजा, टेक्नीकल डायरेक्टर सर्वच जण स्वत:च्या स्वार्थासाठी कामगारांचे शोषण करतात. वरपासून खालीपर्यंत भ्रष्टाचारी नैतिकता उद्योग व्यवसायात कलंक असल्याचे ह. मो. मराठे येथे या घटनेच्या मदतीने स्पष्ट करतात. ज्यायोगे धंदा करता येतो ती नीती आणि ज्यायोगे धंदा हातातून जातो ती अनिती असे उद्योगव्यवसायाचे गणितही यातून समोर येते.

मि. केळकर आपले बिझनेस डील पूर्ण करण्यासाठी पत्नी आणि मुलगी यांचाही वापर करताना दिसतात. त्या दोघींसोबत ते अहुजांना हॉटेलमध्ये पार्टी देतात. त्यांना ड्रिंक्स पाजतात. दारू पिल्यावर अहुजा तनुजाकडे वेगळ्या नजरेने पाहू लागतात. तरीही ते आपल्या मुलीला अहुजांना तोल सावरण्यास सांगतात. बायको आणि मुलीलाही ड्रिंक्स घेण्यासाठी प्रोत्साहन देतात. करिअरमध्ये चुकीच्या मार्गाने यश मिळविण्यासाठी ते पत्नी आणि मुलीचाही वापर करतात. (पृ.६८,६९) यावरून त्यांची घाणेरडी, लोभी, भ्रष्टाचारी, नैतिकता समोर येते.

खराब बॅगा कंपनीला जबरदस्तीने खपविण्यासाठी केळकर मि. अहुजांना दारू पाजून, लाच देऊन साधे सरळ असणाऱ्या अहुजांना भ्रष्टाचार करण्यास भाग पाडतात. परिणामी अहुजांची नोकरी जाते. बेइज्ज़ती होते, बेकारी येते. अहुजांच्या या परिस्थितीस स्वत: अहुजाही जबाबदार असले तरी केळकर स्वत:च्या स्वार्थापायी गरीब कामगार, अहुजा, यांचे नुकसान करतात. आपल्या स्वार्थासाठी ते यांना बळीचा बकरा बनवितात. (पृ.१४०,१५१)

मि. अहुजा हे कंपनीत काम करत असताना प्रमाणिकपणे काम करतात. त्यांच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. पण दारूच्या नशेत आणि एकदम काहीही न करता पंचवीस–तीस हजार रूपये एवढी रक्कम बघून ते कंपनीच्या बॅगव्यवहारात गैरव्यवहार करतात. याचा परिणाम त्यांची नोकरी जाते. बेइज्ज़ती होते. केळकरांडून पूर्ण फसविले जाते. (पृ.१४०,१५१) याला

कारण त्यांना असलेला पैशाचा लोभ आणि पैशाच्या मोहाने बदलत जाणारी नीतिमत्ताच दिसून येते.

मि. केळकर आपल्या स्वार्थासाठी आपल्या वडिलांना फसवितात. आपल्या सासऱ्यांनाही लुबाडण्याचा प्रयत्न करतात. आपली डील यशस्वी करण्यासाठी मुलगी तनुजाच्या बॉसबरोबर संबंध वाढवितात. तनुजाचे चारित्र्यहनन होत आहे हे माहीत असूनही ते सर्व गोष्टी बरोबर असल्याप्रमाणे आपली वागणूक ठेवतात, तर पत्नीला तिच्या बॉसकडून कर्ज मंजूर करून घेण्यासाठी पदर टाकण्याचीही भाषा बोलतात. हे सर्व गैरव्यवहार, भ्रष्टाचारी आहे हे मि. केळकरांना माहीत असूनही परिणामांची पर्वा न करता सुसाटपणे ते बिझनेस यशस्वी करण्यासाठी धावत सुटतात. या सर्व घटनांमागे त्यांची कमालीची स्वार्थी वृत्ती भ्रष्टाचारी आणि भोगलोलुप वृत्ती दिसून येते. स्वत:च्या स्वार्थासाठी आपलीच माणसे भरडली जातात याचेही त्यांना भान दिसत नाही. शिवाय पत्नी आणि मुलगी यांचे शील रक्षण करण्याची जबाबदारी असलेले केळकर स्वत:च त्यांच्या विनाशाला आणि तनुजाच्या बॉसकडून झालेल्या बलात्काराला आणि शोषणाला कारणीभूत ठरतात. (पृ.५४,६३,७३,७५,७७,८१,९१,९९,१००,१०२,१३५,१४३)

आपली मुलगी तनुजाच्या बलात्काराला काही अंशी आपणच जबाबदार आहोत हे मि. केळकरांना माहीत असूनही ते जाब विचारायला गेलेले असताना दिवाणांना जाब न विचारता त्यांच्याशी व्यावसायिक बोलणी सफल करतात. तिच्या बलात्काराचे आणि मृत्यूचेही भांडवल करून ते आपली व्यावसायिक आणि भ्रष्टाचारी वृत्ती कायम ठेवतात. या सर्वांमागे अत्यंत हीन दर्जाची नैतिक मूल्ये केळकर जोपासत असल्याची जाणीव होते. पैसा, पद, प्रतिष्ठा या सर्व मोहमयी गोष्टींपुढे नीतिमत्ता, नातीगोती यांना काहीच महत्त्व नसल्याचे केळकरांच्या माध्यमातून ह. मो. मराठे समाजापुढे आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात. (पृ.१९९,२०३,२०७, २०९,२१०,२१४)

या कादंबरीतील मुख्य पात्र मि. केळकर सर्व नीतिमूल्यहीन दिसून येते. ते व्यवसाय, कुटुंब, नातीगोती सर्वच ठिकाणी बाजी मारताना दिसतात पण अनितीने त्यांनी संपत्ती तर मिळविलेली दिसते पण त्याच्याबदल्यात स्वत:ची, कुटुंबाची बेइज्ज़ती झालेली दिसून येते.

एकुलत्या एका मुलीला गमवावे लागते. अश्विनी केळकरचे बॉस, तनुजाचे बॉस, अहुजा हेही बाई, बाटली यांच्या आहारी गेलेले दिसून येतात. सर्वच पुरुषपात्रांचा विचार करता त्यांच्या लेखी बाई, बाटली, पैसा, पद, प्रतिष्ठा या सर्व उपभोगाच्या वस्तू असून त्या उपभोगण्यासाठी काहीही करावे लागले तरी आपण ते केले तर त्यात आपला पुरुषार्थच मानणाऱ्या प्रवृत्तीचे दर्शन घडते.

**१०. सॉफ्टवेअर :**

मि. व्ही. एस. देशमुख बीवायपी उद्योगसमुहात कामासाठी येण्यापूर्वी पळसोपकर उद्योगसमुहात काम करत होते तेथे प्रामाणिकपणे पंधरा वर्षे काम करूनही त्यांना समाधानकारक वाटत नव्हते. त्यांच्या गुणवत्तेचे आणि कामाचे चीज झाल्यासारखे वाटत नव्हते, परंतु बीवायपी ग्रुपमध्ये जॉईन झाल्यावरही ते मोठ्या उत्साहाने आणि प्रामाणिकपणे काम करतात. कामाबरोबरच ते आपल्या पत्नी आणि मुलांची जबाबदारी तेवढ्याच प्रामाणिकपणे पार पाडतात. (पृ.१२,२८,६२) ते आपल्या कुटुंबाप्रमाणेच आपल्या कामाच्या ठिकाणी सर्वांशी स्नेहाने व्यवहार करतात. आपल्या लेडीज स्टेनो गांधींबरोबर आदराने वागताना बोलतात. त्याचबरोबर कंपनीतील इतर सहकाऱ्यांनी कामाशी प्रामाणिक राहून स्त्रीकामगार सहकाऱ्यांशी आदराने माणुसकीने, प्रेमाने वागावे अशा अपेक्षा व्यक्त करतात. (पृ.१६९,१७१)

मि. देशमुख अरूणाचलम यांच्या मनमानी स्वभावाला विरोध करतात. अरूणाचलमच्या स्त्रियांकडे वाईट नजरेने बघण्याच्या गोष्टींचा तिरस्कार करतात. आणि वाईट कृत्य करण्यापासून अलिप्त राहतात. शेवटी त्यांच्यावर खोटा आरोप ठेवून त्यांना राजीनामा देण्यास भाग पाडले जाते. देशमुख प्रामाणिक, हुशार, कर्तबगार, कर्तव्यनिष्ठ, स्त्रियांप्रती आदर असणारे व्यक्तिमत्त्व असूनही वरिष्ठांच्या चुकीच्या वागण्याचे ते बळी ठरतात. प्रामाणिकपणाचे फळ त्यांच्या नोकरी गमावण्यात होते. कुटुंबाला आर्थिक मदतीची गरज असण्याच्या काळातही ते कोणत्याही अभिषाला बळी पडत नाहीत. नोकरीचा राजीनामा देण्याची वेळ आली तरीही ते आपली नैतिक मूल्ये जोपासतात. (पृ.१५९,१६९,१७१,१८१,२०७,२३८,२४६) प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष असणारे देशमुख आपली कर्तव्यनिष्ठा सांभाळत यशाच्या शिखरावर चढतात पण नैतिक मूल्ये जोपासण्याच्या त्यांच्या प्रामाणिकपणामुळे त्यांना नोकरी गमवावी लागते. त्यामुळे कुटुंबाचीही आर्थिक जबाबदारी

त्यांना पेलणे अवघड होते. त्यामुळे त्यांची चांगली नैतिकता त्यांना त्यांच्या स्वत:च्या नजरेत त्यांना महान बनवत असली तरी समाजाच्या आणि कुटुंबाच्या नजरेतून ती वेगळी वळण घेताना दिसते. बीवायपी कंपनीचे सर्वेसर्वा असलेले एस.बी. पोंक्षे पैशासाठी अरूणाचलमचे म्हणजेच आपल्या मुलाचे लग्न त्याच्याविरूद्ध लावून देतात. त्याचे भयंकर परिणाम त्यांना आणि त्यांच्या कंपनीला भोगावे लागतात. अरूणाचलम एका मुलीला जन्म देतो, पत्नीचा उपभोग घेतो पण तिला प्रेम देताना दिसत नाही. तिला पत्नीचा दर्जा देताना दिसत नाही. उपभोगण्यासाठी मनाविरूद्ध लग्न केलेली पत्नी अरूणाचलमला चालते पण तिची जबाबदारी तिचा सहवास त्याला नको असतो. (पृ.१५९,१७७,२१२,२१३,२२२) यावरून त्याची रंगेल वृत्ती समोर येते. पत्नीच्या शेवटाला अरूणाचलम पूर्णपणे जबाबदार ठरतो.

अरूणाचलमची कामगारांप्रतीही चांगली भावना दिसून येत नाही. कामगारांवर दडपशाही, अधिकारशाही, आपले म्हणणे खरे करण्याची वृत्ती अंगी दिसून येते. कामगारांच्या पत्नी, उदा. मि. गद्रेंच्या पत्नीवर अरूणाचलम वाईट नजर ठेवतो. गद्रेसमोरच तो त्यांच्या पत्नीची स्तुती करतो, तिच्याशी लगट करतो. गद्रेंना इन्क्रीमेंट देण्याची भाषा करतो तीही त्याने बायकोचे लाड पुरवावेत म्हणून आणि ती सुंदर स्त्री आहे म्हणून. मि. अरूणाचलम मिसेस गांधींवरही वाईट नजर ठेवतो. तिच्याशी असभ्य वर्तन करतो. तिने त्यांच्या म्हणण्यानुसार वागले नाही म्हणून तिला कामावरून काढून टाकण्याची भाषा करतो. मिसेस गांधी आणि देशमुख या दोघांनाही आपला राजीनामा देण्याची वेळ येते कारण अरूणाचलम यांची वाढत चाललेली मनमानी, स्त्रीहव्यास. (पृ.१३१, १५९,१९५,२००,२४६) अरूणाचलम स्त्रीहव्यासापायी पत्नीला गमावतो मुलीचे मातृपितृत्व हिरावतो. कंपनीचे नाव खराब करतो. स्वत:ला बाई बाटलीच्या आहारी लोटून देतो. कामगारांवर अत्याचार करतो. प्रामाणिकपणे वागणाऱ्या देशमुखांसारख्यांवर त्यांच्या चुकीच्या वागण्याचा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. यामागे त्यांची रसातळाला गेलेली नीतिमूल्येच जबाबदार असल्याचे दिसून येते.

ह. मो. मराठे यांच्या एकूण कादंबऱ्यांमधील नायकांची नैतिकता या अनुषंगाने विचार करता या कादंबऱ्यांमधील पुरुषांची चांगली–वाईट नैतिकताच त्यांच्या प्रगती वा अधोगतीला

कारणीभूत असल्याचे दिसून येते. पुरुषप्रधान संस्कृती असलेल्या आपल्या समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देऊन त्यांचा वापर स्वत:च्या स्वार्थासाठी, भोगलोलुपतेसाठी, पैशासाठी, मनोरंजनासाठी करण्याकडे दिसून येतो. यावरून पुरुषांची स्त्रियांच्या बाबतीतली नैतिकता दिसून येते. समाजात वावरत असताना खरे–खोटे, भ्रष्टाचार, मानवधर्म, आचारधर्म, कर्तव्य, प्रेम, आदर, सहानुभूती या मूल्यांची पुरुष कशाप्रकारे उपयोगिता ठरवितो यांवरसुद्धा त्यांची नैतिकता सिद्ध होते. पुरुषांची स्वत:प्रती, कुटुंबाप्रती, समाजाप्रती, देशाप्रती असणारी सद्सद्विवेकबुद्धी त्यांची नैतिकता चांगली ठेवते तर कुसंस्कार, कुसंगत, कुविचार, कुकर्म त्याला अनैतिकतेकडे घेऊन जाताना दिसते.

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' मधील नायक गोडसेकाकूंच्या मदत करण्या वा न करण्यावर आपली त्यांच्याप्रती वागण्याची नैतिकता बदलताना दिसतो. सहस्रबुद्धे आणि त्याचा साहेब नोकरीसाठी मदत करत नाहीत म्हणून त्यांना अपशब्द वापरून नायक आपलीच नीतिमत्ता ढासळताना दिसतो. नोकरीसाठी पत्नीला सर्वप्रकारची तडजोड करायला लावणे, मुनीमजींच्या मृत्यूचा विचार करणे या गोष्टी नायकाची खालावलेली नैतिकता दाखवते, तर पत्नीचे शील विकले जाण्याची भाषा ऐकताच तो प्रतिकार करून आपला पतीधर्म पाळून आपली चांगली नैतिकता जागृत ठेवतो. 'काळेशार पाणी' मधील विष्णू गावकर प्रतिष्ठित व्यक्ती असूनही स्वत:च्या उपभोगासाठी भिकीचा रखेल म्हणून वापर करतो पण तिची व तिच्या मुलांच्या जबाबदारी टाळतो. यावरून त्याची स्वार्थी, भोगलोलुप नैतिकता दिसून येते. विष्णूच्या मृत्यूनंतर भिकीला मदत करणारा बाळ्याभट तिला तिच्या कामाचेच पैसे देतो, परंतु त्याच्या बदल्यात तो तिच्याकडे उपभोगाची लालसा ठेवतो. बाळ्याभटाची घसरलेली नैतिकता या कृत्यावरून सहज लक्षात येते. बाळ्याभटापेक्षाही घसरलेली नैतिकता मारूती साटम या पात्राची दिसून येते. तो भिकीसहीत तिच्या क्रमाने वाढणाऱ्या मुलींवर वाईट नजर ठेऊन असतो. या कादंबरीतील सर्वच पुरुष भिकीला नाममात्र मदत करतात मात्र तिच्या सर्वस्वाची अपेक्षा धरून राहतात.

'इतिवृत्त' मधील अण्णासाहेब जगदाळे संपादक नाडकर्णींना पार्टी देऊन आपली वाईट कटकारस्थाने लपविण्याचा प्रयत्न करतात तर श्रीरंग नाडकर्णी आपल्या पदाशी इमान राखून,

कोणत्याही दबावाला बळी न पडता जनतेच्या हिताचे निर्णय घेतात. यावरून अण्णासाहेब जगदाळे आणि नाडकर्णी यांची परस्परविरोधी नैतिकता समोर येते. 'कुरूक्षेत्र' मधील प्राचार्य बेलसरे गोसावीला मदत करत नाहीत; शिक्षणक्षेत्रात समोर दिसत असलेल्या भ्रष्टाचाराकडे ते डोळेझाक करतात. यावरून त्यांची कामाशी प्रामाणिक नसलेली वृत्ती समारे येते. उल्हास भावेंसारखे पुरुषपात्र संपूर्ण जीवन चांगल्या गोष्टी, समाजकार्य इ. गोष्टी करण्यासाठी वाहून घेतात, तुकाराम फराटेंसारखे पात्र आपली सर्व प्रकारची ताकदे विघातक कामांसाठीच वापरतात, तर वसंतराव दामलेंसारखे शिक्षक स्वत:च्या लोभापायी पत्नीबरोबरच सासरच्या लोकांचा छख करून आपली कपटी, धोकेबाज नैतिकता दाखवून देतात.

'कलियुग' मधील कत्रे वरिष्ठांचा आदर करतात तर शिस्तप्रिय राहून कामाप्रति चांगली नैतिकता दाखवून देतात. 'देवाची घंटा' मधील गोप्याभट हे पुरुषपात्र लग्नाच्या पत्नीला सोडून देऊन येसूबरोबर संबंध प्रस्थापित करतो. प्रसंगी तो मंदिरात चोरी करते. समाजाला आदरस्थानी असलेले हे पात्र आपल्या कर्माने आपली अनैतिकताच सिद्ध करते. गोप्याभटाने येसूला सोडून जाताच तिच्या असहायतेचा फायदा घेणारी वासूभट, गोगटे वकील यांसारखी पात्रेही नैतिकतेच्या सर्व सीमा ओलांडताना दिसतात. 'नो सेंटिमेंटस् प्लीज' मधील रमेश पंडित अपत्यसुखासाठी अनैतिकतेला कवटाळतो, तर विष्णू रमेश पंडित मित्रत्वाच्या नात्याने मदत करणे हा दिखाऊपणा ठेवून नलूबरोबर आपले संबंध वाढवत नेतो. मित्राची, आपल्या बायकोची फसवणूक होते. आपले कृत्य अनीतिचे आहे हे माहीत असूनही तो स्वत:च्या आणि नलूच्या आनंदासाठी अनैतिकतेचा सुरू असलेला वापर तसाच चालू ठेवतो.

'नरिमन पॉईंटचा समुद्र' मधील अविनाश साने पत्नीच्या कल्पना चोरून मोठा होण्याचा प्रयत्न करतो पण त्यात असफल झाल्यावर यशस्वी ठरलेल्या पत्नीला मागे खेचण्याचा प्रयत्न करतो. येथे त्याची पुरुषी अहंकारी, गर्व असलेली नैतिकता समोर येते. 'मार्केट' मधील केळकर पैशाच्या मोहापायी स्वत:चे वडील, बायको, मुलगी, सासरा, भाऊ इ. सर्व नात्यांचा स्वार्थी भावनेने उपयोग करून घेतो. चांगल्या वाईटाची कोणतीही सीमारेषा केळकर या पात्राच्या अंगी दिसून येत नाही. कंपनीत गैरव्यवहार करून स्वार्थ साधणे हेही यांचे स्वभाववैशिष्ट्य त्यांच्या

अंगी असलेली अनैतिकता सिद्ध करते. 'सॉफ्टवेअर' मधील व्ही. एस. देशमुख हे पुरुषपात्र प्रामाणिक, निष्ठावान, स्त्रियांचा आदर करणारे, कर्तव्यपालन करणारे असे दिसून येते. सर्वच पातळ्यांवर ते आपली चांगली प्रतिमा, नैतिकता सांभाळताना दिसतात.

स्थल, काल, वेळ, संस्कार, मोह, माया, पैसा, पद, प्रतिष्ठा, स्त्रीमोह या सर्व बाबी पुरुषांची नैतिकता किंवा अनैतिकता प्रकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात.

**समारोप :**

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचे विविध पैलू पाहता त्यांचे जीवनविषयक दृष्टिकोन, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष येथे लक्ष वेधून घेतात.

माणूस आणि त्याचे विविध पैलू विचारात घेता त्यातून त्यांचे वेगवेगळे दृष्टिकोनच प्रत्ययाला येतात. श्रद्धाशीलता हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू म्हणून नमूद करता येईल. येथील काही पुरुषपात्रे ही श्रद्धाशील आहेत. ही श्रद्धा देव आणि दैवावरील असलेली दिसून येते. मानवी जीवनात वाट्याला येणारे आजारपण हे औषधोपचारांशिवाय बरे होणार नाही आणि तिही एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच लागू पडतील हे वास्तव लक्षात न घेता आजारपणातून किंबहुना या जीवनातून मुक्त करण्याचे बळ डॉक्टरांमध्ये नसून परमेश्वरात आहे असे वाटणारे पुरुष येथे दिसतात. काही पुरुष स्वत:ची नोकरी सांभाळून भिक्षुकीचा व्यवसाय करताना आढळतात. देवपूजा, अभिषेक, ग्रंथपारायणे, वेगवेगळ्या देव–देवतांच्या अनुषंगाने वेगवेगळे पूजाविधी करणारे आणि करवून घेणारे पुरुष येथे आढळतात. श्रद्धाशील असणारी ही माणसे सत्त्वशील असलेली आढळतात. मानवी जीवनात वाट्याला येणारी संकटे आणि त्यातून सुटण्याचा मार्ग म्हणजे परमेश्वराची आराधना असे मानणारे पुरुष येथे आढळतात. संसाराची असारता पटल्यानंतर संसाराचा त्याग करून मठामध्ये जाऊन श्रवण–कीर्तन करणारे आढळतात.

काही पुरुष देवदेवतांची पूजा करताना दिसतात मात्र त्यात श्रद्धेपेक्षा उदरनिर्वाहाचे साधन हा दृष्टिकोन अधिक दिसतो. आपले मरण हे आपल्या हातात नसून परमेश्वराच्या हातात असल्याचा निर्वाळा देणारे पुरुष येथे आढळतात. त्यासाठी नामजप करतानाही दिसतात. आत्मा–परमात्मा, पिंडाला कावळा शिवणे यांसारख्या पारंपरिक श्रद्धा असलेले पुरुषही दिसतात. धर्म–

अर्थ–काम–मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी मोक्ष म्हणजे मुक्तीला प्राधान्या देणारी मानसिकता दिसून येते. या अनुषंगाने पाप–पुण्य, स्वर्ग–नरक या संकल्पनात पुरुष अडकलेले दिसतात. पाप–पुण्य, स्वर्ग–नरक यांसारख्या संकल्पनांशी निगडित मानसिकता असल्याने भितीपोटी का होईना काही पुरुष समाजात सद्‌वर्तन करताना दिसतात. देव–देवतांवर श्रद्धा असणारे जसे पुरुष आहेत तसेच आत्यंतिक श्रद्धेपोटी आई–वडिलांना परमेश्वर मानून त्यांची सेवा करणारे आढळतात.

माणूस हा मुळातच समाजशील प्राणी आहे. हे वास्तव असले तरी तेथे वावरत असतानाच नोकरी–उद्योग–व्यवसाय यांच्या अनुषंगाने त्यांना एकत्र यावे लागते. अशावेळी या क्षेत्रात वावरत असताना सर्वांनाच आपापल्या मनाप्रमाणे वागता येत नाही किंबहुना ते शक्य नाही हेच पदोपदी प्रत्ययाला येते. नोकरी करीत असताना वरिष्ठांकडून अधिकाराचा गैरवापर करून अन्याय, अत्याचार, शोषण करणे सुरू होते तेव्हा पुरुष बंडखोरी करताना दिसतात. कंपन्यांमध्ये काम करीत असतानाही हे चित्र दिसते. त्यातूनच मोठ्या कंपन्यांमध्ये कामगार संघटना, त्या टिकविण्यासाठी पदाधिकारी, कार्यकर्ते, कामगार पुढारी निर्माण होतात. त्याचेच पर्यवसन पुढे कंपनीमालकांविरूद्ध बंड करणे, संप करणे, मोर्चे काढणे, उपोषण करणे, काम बंद पाडणे यांसारख्या कृती पुरुष करताना दिसतात. येथे दिसून येणारी बंडखोरी स्वत:ची अस्मिता टिकविणे, अन्यायाला वाचा फोडणे आणि आपले अस्तित्व टिकविणे यांसाठी होत असलेली दिसून येते.

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान असल्याने कुटुंबव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत त्यांनाच महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. कोणत्याही स्वरूपाचे संस्कार, परंपरा, तत्त्वविचार, जगण्याची कार्यप्रणाली याला स्त्री साक्षीदार असली तरी पुरुषी मानसिकतेतूनच या सर्व गोष्टी आकाराला आलेल्या दिसून येतात. स्त्री ही कुटुंबव्यवस्थेचा अविभाज्य भाग असला तरी तिला तिचे असणारे अधिकार आजही पूर्णत: मिळताना दिसत नाहीत. पुरुषांना अपेक्षित असलेली कोणतीही गोष्ट चूक असो वा बरोबर असो स्त्रीने ती विनातक्रार स्विकारली पाहिजे ही मानसिकता कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषपात्रांच्या उक्ती–कृतीतून पदोपदी आढळते.

स्त्रीच्या भावभावना, तिचे विचार, कल्पनांना समाजजीवनात आणि कौटुंबिक जीवनात काही स्थान आहे हे गृहीतच न धरणारी पुरुषी मानसिकता येथे दिसते. त्यातूनच स्त्रीला एक उपभोग्य वस्तू मानणे, आपल्या मर्जीप्रमाणे वागण्यास भाग पाडणे, तिच्या असहायतेचा, हतबलतेचा, गरिबीचा, कौटुंबिक अडचणींचा गैरफायदा घेऊन त्यांचे शोषण करणारी मानसिकता येथील पुरुषपात्रांच्याद्वारा प्रत्ययाला येते.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांची नैतिकता पाहता नैतिकता ही संकल्पना एका विशिष्ट शरीरसंबंधाशी मर्यादित नसून ती व्यापक असल्याचे लक्षात येते. स्वत:च्या स्वार्थासाठी वडिलांचा डोळा विकणे, कंपनीमध्ये अपघातात एक पाय निकामी झाल्यानंतर त्याच्याजागी दुसरा कामगार भरता यावा, पैसे वाचावेत आणि इतरांनी भितीपोटी मागण्या न करता शांतपणे काम करावे यासाठी त्या कामगारांचे दोन्ही पाय कापण्याचा सल्ला देणे, ज्यांचा फायदा होतो त्यांच्याशी खोटेपणाने आपुलकी दाखविणे, त्यांचा आदर करणे, त्यांच्याकडून मदत होत नाही असे लक्षात येताच त्यांच्याविषयी वाईट विचार करणे, पत्नीला नोकरी लागावी म्हणून हतबलतेने प्रयत्न करणे, मात्र नोकरीची किंमत पत्नीच्या शीलाने मोजावी लागण्याचा प्रसंग येताच त्याला तीव्र विरोध करणे, स्वत:चे कौटुंबिक स्वास्थ्य घालवून इतर स्त्रियांची अभिलाषा धरणे, प्रसंगी तिच्या असहायतेचा, कौटुंबिक अडचणींचा दारिद्र्याचा गैरफायदा घेऊन तिचे मानसिक व शारीरिक शोषण करणे, कुटुंबव्यवस्थेचे संकेत बाजूला सारून अपत्यसुखासाठी वाममार्गाचा अवलंब करणे, स्वत:च्या पद, पैसा आणि प्रतिष्ठेचा वापर जनसामान्यांच्या हितासाठी करणे, प्रसंगी त्यांचाच गैरवापर करणे, समाजातील विविध प्रश्नांची जाण ठेऊन त्यांना न्याय देण्यासाठी आपल्या कृती आणि उक्तीने त्याचा पाठपुरावा करणे, कुटुंबाचा उद्धार होण्यासाठी आपल्याबरोबर पत्नीनेही मोठे व्हावे म्हणून नोकरी–व्यवसायात प्रोत्साहन देणे मात्र तिच्यातील अधिकची गुणवत्ता लक्षात आल्याने तिच्या कल्पना चोरणे आणि प्रसंगी तिचे यश सहन न होऊन तिला नोकरीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे यांसारखे पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समोर येतात.

वरील सर्व उदाहरणांचा विचार करता पुरुषांची स्वत:प्रती, कुटुंबाप्रती, समाजाप्रती वा देशाप्रती असणारी सारासार विचारसरणी त्यांची चांगली नैतिकता जपण्यास कारणीभूत ठरते तर

वाईट संस्कार, वाईट संगत, वाईट आचारविचार हेच त्यांना अनैतिकतेकडे घेऊन जाण्यास कारणीभूत ठरताना दिसतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांच्या विविध पैलूंचा विचार करता त्याची श्रद्धाशीलता, विविध पातळ्यांवर वावरत असताना त्याचे होणारे मानसिक दमन, कोंडमारा सहन न झाल्याने त्याचे व्यक्त झालेले उग्र रूप बंडखोरीच्या रूपाने लक्षात येते. पुरुष हा एकाधिकारशाहीचा वापर करण्याची मानसिकता असल्याने स्त्रियांप्रतीचा सहानुभाव अभावानेच आढळतो. तर स्त्रीला गौण लेखून तिचा हवा तसा वापर करणारी आणि उपभोग्य वस्तू माननारी मानसिकता लक्षात येते.

**संदर्भसूची :**


१. सारडा शंकर (संपा.), "निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी : संहिता आणि समीक्षा", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. १९८३, पृ. २५०.

२. तत्रैव, पृ. १०२, १०३.

३. तत्रैव, पृ. १०९,११०.

४. तत्रैव, पृ. १२७, १२८.

५. दळवी जयवन्त, 'ह.मों.च्या 'हद्दपार' मध्ये विवाहितेचे भागधेय', महाराष्ट्र टाईम्स, रविवार पुरवणी, १६ जुलै १९८१, पृ. ३.

६. तत्रैव, पृ. २२०.

७. तत्रैव, पृ. २४४.

८. तत्रैव, पृ. २४४.

९. सारडा शंकर (संपा.), "काळेशार पाणी: संहिता आणि समीक्षा", डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००८, पृ. १०४, १४१.

१०. तत्रैव, पृ. १६६.

११. सारडा शंकर (संपा.), ‘‘निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी : संहिता आणि समीक्षा’’, उनि., पृ. २११.

१२. तत्रैव, पृ. २००.

१३. सारडा शंकर (संपा.), ‘‘काळेशार पाणी: संहिता आणि समीक्षा’’, उनि., पृ. १४०, १४१.

१४. तत्रैव, पृ. १६६.

१५. तत्रैव, पृ. १७२.

*****

## प्रकरण पाचवे

# ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील निवेदन आणि भाषा

## १. निवेदनाचे स्वरूप :

### प्रस्तावना :

सुप्रसिद्ध कथा, कादंबरीकार, संपादक, पत्रकार असलेले ज्येष्ठ लेखक ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील निवेदनाचे स्वरूप कसे आहे? ज्या माणसांच्याभोवती कथानक फिरते त्या माणसांना मराठे कितपत न्याय देऊ शकलेले आहेत हे जाणून घ्यावयाचे आहे. लेखकाचा लेखन करण्यामागे स्वतःचा एक दृष्टिकोन असतो. तो दृष्टिकोन समार ठेवूनच लेखक निवेदन करतो. निवेदनाविषयी, त्याच्या संकल्पनेविषयी गंगाधर पाटील म्हणतात,

"एकामागून एक या क्रमाने येणाऱ्या कल्पित घटनांच्या अनुक्रमाचे निवेदकाने विशिष्ट दृष्टिने व विशिष्ट रीतीने केलेले शब्दरूप म्हणजे निवेदन."[१]

निवेदकाकडे मूल्यमापन करण्याची वैचारिक दृष्टी असल्याचे निदर्शनास येते. लेखक कधी प्रथमपुरुषी निवेदन करतो; ज्यात निवेदक केंद्रवर्ती असतो तर कधी ते तृतीय पुरुषी निवेदन करताना दिसतो. यात निवेदक, पात्रे, घटनाप्रसंग, वस्तू, स्थळ, काळ, प्रदेश या सर्व गोष्टींविषयी साक्षीभावाने लिहितो, या दोन्ही पद्धतीतही निवेदक पात्र प्रसंगांशी एकरूप झालेले दिसतो.

### कथासंग्रह :

#### १. सापेक्ष :

#### अँकर :

मुंबईच्या दैनिक वृत्तपत्राच्या आवृत्तीसाठी चाफेकरांची निवड सर्वानुमते झाल्यावर त्यांच्या कामकाजाच्या स्वरूपावर, कार्यपद्धतीवर निवेदन येते.

"जॉईन झाल्यापासून महिन्याभरातच चाफेकरांनी मुंबई आवृत्तीत चैतन्य आणलं. वेगवेगळ्या प्रश्नांवर नामवंत, जाणकारांच्या मुलाखती छापण्याचा धडाका त्यांनी लावला. मुंबईचे नागरी प्रश्न त्यांनी अधिक तपशीलवारीने मांडायला सुरूवात केली. रविवार आवृत्तीसाठी

वेगवेगळ्या थरांतील लेखकाचं सहकार्य मिळवलं. बातम्या आणि खास बातम्या, स्पेशल फिचर्स, खास पुरवण्या ...... स्वत: भालेराव एक विचारवंत संपादक होते, पण चाफेकर त्यांना कधीकधी आपल्यापेक्षा अधिक चैतन्यशील संपादक असल्याचे वाटून जाई. चाफेकरांच्या आधी रेसिडेन्शियल एडिटर असलेले गवांदे आणि चाफेकर यांची शैलीच वेगळी होती. वेगळी शैली असलेले चाफेकर वेगळीच मागणी मॅनेजमेंटकडे करतील अशी मात्र भालेरावांची अपेक्षा नव्हती.'' (पृ.३०) या निवेदनातून चाफेकरांच्या चांगल्या नेतृत्वगुणांवर प्रकाश टाकलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे त्यांची स्वतंत्र विचारसरणीही समोर येते.

**बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह :**

या कथेतून ह. मो. मराठे यांनी भिडे या पात्राची स्वभाववैशिष्ट्ये, परिस्थिती यांवर निवेदन केलेले दिसून येते. भिडेंच्या स्वभावाबरोबरच त्यांची कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती हुबेहूब उभी केल्याचे दिसते.

''भिडे हे एका उद्योगपतीचे मेहुणे, त्यांची अर्धवट बहीण त्यांनी भिड्यांच्या गळ्यात मारली. आणि हुंडा इतका दिला की त्यात भिड्यांनी गाडी घेतली, बंगला घेतला. मग भिड्यांना त्यांनी आपल्याच एका कंपनीत नोकरी देऊ केली. भिडे म्हणाले, मला संपादक आणि प्रकाशक व्हायचं आहे. उद्योगपतीने आपल्या एका कंपनीची 'पब्लिकेशन डिव्हिजन' सुरू केली. त्यासाठी पैसा दिला. भिड्यांना जनरल मॅनेजर नेमून टाकले. कारभाराचे सर्वाधिकार दिले. पंधरा वर्षात भिडे यांनी बरीच प्रकाशने सुरू केली. डिव्हिजन फारशी फायद्यात नव्हे, पण तोटाही न होता चालविली. त्यांनी उपसंपादक घेतले, सर्क्युलेशन मॅनेजर नेमला, ॲडव्हर्टाइजमेंट मॅनेजर म्हणून सुनील काणे यांना एका स्थानिक दैनिकाच्या जाहिरात विभागातून आणलं.'' (पृ.५४) पैशांच्या जोरावर आपली अर्धवट बहीण उद्योगपतीने गळ्यात मारली आणि पैशासाठी भिडे यांनी तडजोड केली. या दोन्ही उदाहरणांवरून समाजातील वेगवेगळ्या स्तरातील लोकांची स्वभाववैशिष्ट्ये समजण्यास मदत होते.

**जी सरकार :**

मोहनच्या कौटुंबिक परिस्थितीची, आईच्या भावनांची कल्पना पुढील निवेदनातून येते.

"रात्री तो घरी आला. जुन्या पडायला झालेल्या चाळीतली एक लहानशी अंधारी, हवाबंद खोली. पहिल्या मजल्यावरची. वर येताना वापरायचा लाकडी जिना पावसापाण्यानं भिजून भिजून कुजत आलेला. खोलीला खिडकी नाही. एक लहानसा झरोका. तिथच मोरी. खोलीत फक्त पंधरा पॉईंटचाच बल्ब लावण्याची मालकांची परवानगी. त्याच्या आयुष्याच्या चोवीस वर्षांत आपल्या खोलीत त्यानं कधीच त्यापेक्षा अधिक प्रखर प्रकाश पाहिला नाही. त्यातच खोली सोडा हा मालकांचा तगादा. मालकांचा तगादा वाढला की त्याची आई भिंतीवर टांगलेल्या आपल्या दिवंगत पतीच्या फोटोकडे बघत बसते. मालकांच्या पाया पडते. गुपचूप भाडं वाढवून देते." (पृ.८३) सर्व सुविधा नसलेल्या भाड्याच्या खोलीत राहतानासुद्धा मोहन आणि त्याच्या आईला घरमालकांची सतत मनधरणी करावी लागत असल्याचे चित्रण या निवेदनातून समोर येते. पुढे पुढे तर चाळमालक आपली जागा विकण्याचा विचार करतात तेव्हा मोहनला संताप येतो, त्यावर निवेदन येते.

"जेवण करून तो बाहेर पडला. त्याच्या चाळीला लागून असलेले वाडे, चाळी पाडल्या जात होत्या. तिथं नव्या टोलेजंग इमारती उभ्या होत होत्या. त्यांच्या मालकानं – आपली चाळ विकायला काढली होती. बिल्डर घ्यायला तयार होता. पण जुने भाडेकरू काढायची किंवा घालवायची अट होती. रोज मालक सांगत होता. जागा सोडण्यासाठी पैसे देण्याची तयारी दाखवीत होता. सगळं एक रॅकेट. एक दुष्टचक्र. जमीन कोणी निर्माण केली– त्यावर घर कोण बांधणार – ती विकत कोण घेणार – त्यातून पैसा कोण उभा करणार – त्या पैशातून सुख कोण भोगणार – शेवटी या सर्व व्यवस्थेत गरीब सामान्य माणूस कुठं आहे? शेतीची जमीन बड्यांनी लाटली म्हणून भूमिहीन झालेला शेतमजूर शहराच्या झोपडपट्ट्यात येऊन दाखल झाला आणि घरं बांधण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी पैसा नाही म्हणून शहरातली गरीब माणसं तशीच झोपडपट्ट्यात जाणार –

त्यानं एक सिगरेट घेतली आणि इराण्याच्या हॉटेलात बसून ती शिलगावीत विचार करू लागला. संतापू लागला. आतल्या आत धुमसणारे संवाद म्हणू लागला." (पृ.८५) या निवेदनाच्या माध्यमातून समाजातील रहाण्याच्या जागेच्या समस्येकडे लक्ष वेधलेले आहे.

**देशात सालं काही घडतच नाही :**

समाजात गुंड प्रवृत्तीच्या लोकांना सर्वजण घाबरत असतात. अशा प्रवृत्तीच्या माणसांना राजकीय, कायद्याचेही संरक्षण मिळत असते असे पुढील निवेदनातून अभिव्यक्त होते.

"पुन्हा तेच. उत्तरेत जा, नाहीतर दक्षिणेत जा. हेच ऐकायला मिळतं. गावात किंवा मोहल्ल्यात एखादा गुंड असतो. त्याच्या नावावर अनेक खून असतात. बरोबर इतर सर्व बेकायदेशीर धंदे. एखादा कायदेशीर धंदा. गॅरेज किंवा दुकान. किंवा कसलीतरी एजन्सी. बाकी सगळे बेकायदा धंदे. तो गुंड असतो. पैसा असतो. पोलिसवाले त्याचे बांधलेले असतात. लोकल लीडर्स त्याच्या खिशात असतात. या सर्वांमुळे तो माजलेला असतो. कोणी त्याचं काही करू शकत नाहीत. गरीब माणसं त्याच्या धाकाखाली, त्याच्या अत्याचाराखाली गुदमरून जीवन कंठत असतात." (पृ.१२९) गुंड प्रवृत्तीच्या माणसांच्या अन्याय अत्याचाराला कायद्याच्याच लोकांचे संरक्षण मिळत असल्याने त्यांचे अन्याय अत्याचार वाढत जाऊन त्याचे परिणाम गरीब माणसांना भोगावे लागतात हे वास्तव समोर येते.

या कथेच्या शेवटी दिल्लीच्या प्रेसक्लबमध्ये झालेल्या मुलाखतीत देशातील निवडणुका, सत्तास्पर्धा यांवर निवेदन येते.

"मग कोण कोण काय काय त्या जर्मन टीव्हीच्या रिपोर्टरला सांगू लागले मीही त्या रिपोर्टरला आणि सिनिअर पत्रकाराला काहीतरी सांगण्याची मनाची तयारी सुरू केली. देशात खूप काही काही घडत आहे – अगदी नवीन. लोकांचे आवडते सुपरस्टार्स निवडणुकीला उभे राहताहेत. त्यांच्या पडद्यावरच्या रूपाशी अत्यंत विसंगत जीवन जगणारे त्यांचे लाखो चाहते त्यांना मतं देताहेत – लोकशाहीच्या नावाखाली व्यक्तिगत सत्तास्पर्धा भराला आली आहे – आणि एकदीड रूपयांच्या देण्याघेण्यावरून माणसांचे मुडदे पडताहेत." (पृ.१४४) लोकांचे आवडते सुपरस्टार्स चित्रपटांत, नाटकांत चांगली भूमिका करत असले तरी त्यांचे प्रत्यक्ष जीवनात तेवढे चांगले योगदान नसले तरीही लोक त्यांना मत देतात. सामान्य माणसांच्या जीवनात कुणीही निवडून आले तरी काही फारसा फरक पडत नाही. त्यांनी दीड–दोन रूपयांसाठीही जीव मुठीत धरून जगावे लागते याचे भान येते.

२. वीज :

**स्वप्नभूमी :**

या कथेतील नायक अशोक राजे यांच्या व्यवसायावर पुढील निवेदनातून प्रकाश पडतो.

"तो आपल्या कारखान्यात बसला होता. इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये एक छोटीशी शेड आणि गेल्या पाच वर्षात त्यानं उभा करीत आणलेला आपला छोटासा कारखाना.

संध्याकाळ झाली होती . यंत्र आणि प्रॉडक्शन थांबलं होतं. कारखान्याची वेळ संपली होती. कामगार मंडळी घरी गेली होती. त्याच्या छोट्याशा कारखान्यात त्यानं स्वत:साठी छोटीशी केबिन बनवून घेतली होती. त्यात तो बसला होता. तो आणि त्याचा अकौंटंट–कम–प्रॉडक्शन मॅनेजर यांचा हिशोब बघणं चाललं होतं." (पृ.७९) पाच वर्षात हळूहळू प्रगती पथावर जात चाललेल्या व्यवसायाचा प्रत्यय अशोक राणे या पात्राच्या अणुषंगाने येणाऱ्या निवेदनातून समोर येतो.

**कुंती :**

जागा भाड्याने देणे आणि घेणे या दोन सहज वाटणाऱ्या गोष्टी परंतु दोन व्यक्तींमधला व्यवहार नीट जमला तरच घर भाड्याने देणे आणि घेणे सोयीस्कर होते अशाच दामले यांच्या खोलीच्या शोधावर येथे निवेदन येते.

"खोलीच्या शोधात दामले त्यांच्या वाड्यात आले त्याला आठ वर्ष झाली. त्यांच्या वाड्यात खोली होती, ती भाड्याने द्यायची होती. दामले त्या गावी एका खाजगी कारखान्यात नोकरीला आले होते. खोलीच्या अटी त्यांना मान्य होत्या आणि रमाबाईंना दामले भाडेकरू म्हणून मान्य होता. जागा भाड्याने द्यायची, भाडी वसूल करायची, कर भरायचे, प्रसंगी भाडेकरुंशी भांडण करायची–सर्व कामे रमाकाकूच बघत होत्या. वाडा त्यांच्या वडिलांचा. वारसा म्हणून त्यांच्याकडे आलेला. घरमालक म्हणून कराव्या लागणाऱ्या सर्व कामांची माहिती त्यांना तरी लहानपणापासूनच झालेली. लग्न झालं तरी नवऱ्यानं त्या कामांत कधी लक्ष घातलं नाही. पुढं नवरा नोकरीच्या निमित्तानं बाहेर गावीच राहू लागला. आणि बालपणापासूनच चालत आलेली त्यांची घरमालकीची कामं तशीच चालू राहिली." (पृ.९२) दामले आणि रमाकाकू यांच्यात

भाड्याच्या अटी मान्य झाल्या म्हणून त्यांचा भाड्याने रूम देण्या–घेण्याचा व्यवहार यशस्वी झाल्याचे या निवेदनातून स्पष्ट होते. रमाकाकूंचा नवरा या व्यवहारात लक्ष घालत नसल्याने रमाकाकूंना हे सर्व व्यवहार सांभाळावे लागत असल्याचेही स्पष्ट होते.

**हे असंच :**

जागेच्या समस्या आणि छोट्या जागेत बरीच माणसे त्यातच आईचे आजारपण या सर्व प्रतिकूल परिस्थितीचा या कथेतील नायक आणि नायिकेच्या जीवनावर कसा परिणाम होतो यावर येथे निवेदन येते.

"रोज हेच किंवा असंच. थोडं इकडं तिकडं कधी त्यानं थोबाड फोडीन म्हणायचं, कधी तिनं जीव देईन म्हणायचं किंवा पोरांना बदडायचं किंवा कधी आपलं डोकं थाडथाड बडवून घ्यायचं. एकुलत्या एका जुनाट खोलीतला संसार. त्यातच गेले कित्येक दिवस अंगाचं मुटकुलं करून पडलेली त्याची आई. सदा कटकट करणारी. केवळ एका जागी पडून असलेला गोळा. तिचं आणि सुनेच सदैव भांडण. कधीकधी शांत झोपलेला आईचा गोळा बघून त्याला आशा वाटे – बहुतेक मेली असणार आपली आई. पण छे! ती कूस बदली आणि आपण जिवंत असल्याचे दाखवून देई. त्यावेळी फारच निराशा होई. त्याला कल्पना होती. आईसंबंधी असले विचार मनात आणणं निर्दयपणाचं आणि अमानुषही आहे. पण त्याला त्याचाही नाइलाज होता. गेली किती तरी वर्ष त्याची आई तशी आजारीच होती. त्यातच त्याचं लग्न झालं. दोन मुलंही झाली. पण ऐसपैस हातपाय पसरून बसायला जागा नाही, तर झोपायला कुठली जागा? मोठी जागा घेण्याचा त्यानं प्रयत्न केला; पण जागांच्या वाढत्या किंमतीमुळं ती योजना नेहमीच लांबणीवर टाकत यावं लागलं होतं. तणातणी. सतत तणातणी. त्यातून वैताग. मनस्ताप." (पृ.१६६) मोठ्या जागेच्या अभावाने नवरा–बायकोला एकमेकांसाठी वेळ देता येत नाही. त्यातच आईची जबाबदारी, मुलांची जबाबदारी यांमुळे हे दोघे एकमेकांवर चिडत, रागावत असतात. घरात शांतता नांदावी म्हणून आईच्या मरणाचासुद्धा विचार या नायकाच्या मनात येतो. नायकाचा मानसिक संघर्षही या निवेदनातून येतो. या नायकाचे संपूर्ण भावविश्वच या निवेदनातून व्यक्त होते.

**३. ज्वालामुख :**

**कर्मफल :**

पंतांना त्यांच्याच मुलाकडून टॅक्सीत घालून पैशाची बॅग हिसकावून घेऊन त्यांना रस्त्याच्या कडेला फेकले जाते यांवर येथे निवेदन येते.

“कितीतरी वेळानं ते हळूहळू शुद्धीवर आले. पोलिसांनी, लोकांनी त्यांना घेरलं होतं. आधी त्यांना काहीच समजेना. मग हळूहळू त्यांना सगळे जाणवत, आठवत गेलं. बॅग. बॅग. त्यांनी उठायची धडपड केली. पण त्यांना धड उठताही येत नव्हतं. त्यांनी तसच क्षीण दृष्टीनं इकडे तिकडे बघितलं. नव्हती पाच लाख रूपयांच्या नोटांनी भरलेली त्यांची गरीब बापुडवाणी बॅग आसपास कुठंच नव्हती.” (पृ.१२५) पैशाचा मोह माणसाची सद्सद्विवेकबुद्धी नाहीशी करतो; त्यामुळे त्याला नाती गोती पैशापुढे तुच्छ वाटू लागतात आणि पंतांबरोबर घडलेल्या घटनेसारख्या घटना समाजात घडतात याचे प्रत्यंतर या निवेदनातून येते.

या कथा संग्रहातील निवेदन या विषयावर आपले मत मांडताना वामन देशपांडे म्हणतात,

“ह. मो. मराठे यांनी स्वत:ची स्वतंत्र विचारशक्ती कथेला बहाल केलेली आहे. झोपडपट्टीतल्या निराधार गरिबांच्या हिंसाचक्रात असंतोषाचा ज्वालामुखी भडकताना दिसतो. सर्व पातळीवरील जाणिवांना ह. मो. मराठे यांनी एक जाणिवपूर्वक अर्थ ‘ज्वालामुख’ ह्या संग्रहात निश्चितपणे दिलेला आहे. कथानक सांगणं हा हेतू नसून ह. मो. मराठे यांची शैली आणि सर्व थरांवर फिरणारी भेदक दृष्टी ही अधिक महत्त्वाची. ‘कर्मफल’ ही ह्या संग्रहातली कथा मला फार महत्त्वाची वाटली.”[२]

वामन देशपांडे यांनी या निवेदनशैलीवर मांडलेले विचार उचित वाटतात.

**४. पक्षिणी :**

**कभिन्न :**

या कथेतील नायकाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे निवेदन पुढे येते.

"आधी तो आत आला आणि मागून त्यापाठीची काळी, लांब, खवल्या–खवल्यांची वाटणारी सावली. तो चांगला उंच होता आणि सर्वांगी खरखरीत, खरवडल्यासारखा काळपट रंग होता. त्याचे पाय दीर्घ होते.

दोन पायांच्यावर धड होतं–दोन उंच खडकाळ डोंगर–सुळक्यांवर तोलून ठेवलेला पाषाण असावा, तसं. धडाला दोन हात फुटलेले होते मोठ्या वृक्षाच्या वटलेल्या निष्पर्ण फांद्यांसारखे. धडावर एक कभिन्न मस्तक. मस्तकावर उमटलेले नाक, कान, दात इ. अवयव आणि दोन डोळे तांबूस, सुन्न, पाषाणी नजरेचे. प्रखर प्रकाशझोताचे हिंस्त्र पट्टे गरगरवणारे." (पृ.३१) या निवेदनातून या नायकाचे उग्र रूप शब्दांकित झाले आहे.

**विरूप** :

बागूल खासदारांच्या घरी त्यांना भेटण्यासाठी जातो तेव्हा तेथील विविध आलिशान वस्तू पाहून तो भारावून जातो. इंदिराजींचा फोटो पाहून तो भारावतो तेव्हा त्याच्या नजरेतील आणि मनातील भाव पुढील निवेदनातून व्यक्त होतात.

"तो ऊठला आणि फोटोच्या समोर अगदी सन्निध जाऊन उभा राहिला. फोटोतल्या इंदिराजी हास्य करीत होत्या. त्यांच्या डोळ्यात आव्हानाला सामोरं जाण्याची शक्ती असल्याचे आणि ती शक्ती त्याच्या हास्यातून प्रकाशित होत असल्याचं त्याला जाणवून गेलं. इंदिराजींच्या गळ्यात हार घालताना खासदारसाहेबांच्या मुखावरही एक उत्सुकता होती. देशासमोरचे प्रश्न सोडविण्याचं, दीनदरिद्री लोकांना नवीन जीवन दाखविण्याचं, जे आव्हान इंदिराजींनी स्वीकारलं आहे. त्यातल्या जिम्मेदारीचा आपला वाटा उचलायची तयारी खासदारसाहेबांनी त्या हास्यातून जणू इंदिराजींना दाखवून दिली होती." (पृ.६१) इंदिराजी बागूलच्या आदर्श आहेत तो आदर येथे येतो.

बागूल या नायकाच्या घराच्या वातारवरणावर, परिस्थितीवर पुढे निवेदन येते.

"खोलीत प्रवेश करताना त्याला नेहमीच वाकावं लागे. आत शिरताच तिथला काळोख, कुबट वास आणि घोंघावणाऱ्या माश्या यांचा एक जथ्था त्यांच्यावर चाल करून आला. त्याची आई जया यांच्यावर चाल करून आला. त्याची आई तांबरलेल्या पत्र्याच्या खाटेवर जुनी पांघरूणं

पांघरून पडली होती. धाकटा भाऊ कळकट बॅगेवर वही ठेवून लिहीत होता आणि वयात येऊ लागलेली बहीण वातीच्या स्टोव्हवर ठेवलेल्या पातेल्यातला पदार्थ ढवळीत होती. हे दृश्य तो गेले कित्येक दिवस बघत होता. आई, आजारी असणारी, बहीण वयात येणारी, भाऊ अभ्यास करीत बसलेला. तो स्वत:ही तसाच त्याच जागी बसून अभ्यास करीत असे वक्रीभूत होत होत येणारा का असेना पण थेट सूर्याचा प्रकाश येत असलेली तीच तीन–चार चौरसफुटांची जागा त्या खोलीत होती.'' (पृ.६७) या निवेदनातून बागूलच्या घरातील समस्यांवर प्रकाश पडतो.

**मृगया :**

बाबूरावांच्या कंपनीतील बदलत्या तंत्रज्ञानाचा त्यांच्या जीवनावर परिणाम होणार असतो, त्यावर पुढे निवेदन येते.

''आपली सही होता होता बाबूरावांनी पुन्हा त्या सह्यांवरून नजर फिरविली. फक्त दोघांच्याच सह्या. इतर लोक कसे आले नाहीत अजून. मामा, अप्पा आणि दासबुवा तरी यायलाच हवेत. बाबूरावांना आपल्या अनुपस्थित सहकाऱ्यांची फार तीव्रतेने आठवण झाली. ते अजून आलेले नाहीत याची जाणीव होऊन त्यांना क्षणकाल एकाकीपणाची भावना चाटून गेली. किंचितसं निराधारपण वाटून गेलं. आपल्या उपस्थित सहकाऱ्यांच्या सह्यांवरून त्यांची नजर पुन्हा फिरली. त्यांना जाणवलं की, आजच्या त्यांच्या सह्यांत जीर्णपणाची नि:शक्तता आहे; आणि लगेच त्यांना जाणवलं की, आपल्याही सहीच्या बाबतीत तेच आहे. सहीची अक्षरं बिथरलेली आणि नि:शक्तपणे उभी केल्यासारखी भासताहेत. आपली सही काही नीट झालेली नाही. त्यांचा हात पुन्हा तिथंच फाशी दिल्यागत लोंबत असलेल्या पेन्सिलकडे गेला. पेन्सिलीनं आपली सही त्यांनी पुन्हा–पुन्हा गिरवली. वरच्या दोन सह्यातील अस्पष्ट अक्षरंही गिरवून स्वच्छ दिसतील अशी केली.'' (पृ.१०४) बाबूरावांच्या मनातील अस्वस्थतेचे दर्शन त्यांच्या वागण्याच्या देहबोलीतून निवेदनाद्वारे स्पष्ट होते.

बाबूराव आणि त्यांचे तीन मित्र कंपनीत काम करत असताना त्यांना सन्मान मिळत असे. त्यांनी कंपनीच्या कामात आपले मोठे योगदान दिलेले असते म्हणूनच नवीन तंत्रज्ञान, नवीन मशीन कंपनीत आल्यानंतर या सर्वांना कामावरून काढून न टाकता त्यांना सहानुभूतीने

गोडाऊनच्या बाजूला बसण्याची व्यवस्था केली जाते, हे निवेदनाद्वारे प्रखर सत्य समोर येताना दिसते.

"हॉलच्या भिंती भगभगीतपणे तिघांच्याही डोळ्यांसमोर उभ्या होत्या. भिंतीचे रंग उडाले होते. कोपऱ्यात कोळिष्टकं होती. आणि मुख्य म्हणजे त्या सगळ्याच हॉलमध्ये प्रकाशाचा अभाव होता. कोपऱ्यात आणि भिंतीच्या कडेकडेने अजून अडगळ होती. जुन्या फायली, खोकी, पत्र्याची एक दोन जुनाट कपाटे अशा गोडाऊनी सामानाचे अवशेष ठायीठायी होते. ते सामान थोडं बाजूला लोटून हा हॉल रिकामा करण्यात आला होता. आणि तिथं हे जनरल ॲडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंट उघडून तिथं बाबूरावादिकांची टेबलं मांडून ठेवण्यात आलेली होती." (पृ.१०६) बाबूराव आणि त्यांचे मित्र यांनी नवीन तंत्रज्ञानाबरोबर स्वत:ला तयार न ठेवल्याने त्यांची निरूपयोगी सामानाप्रमाणे स्थिती झाल्याचे या निवेदनातून स्पष्ट होते.

**५. दावं :**

**विहीर :**

आपटे भिक्षुकाच्या घरी वासूचा बाप आणि त्याचे कुटुंब आश्रयाला राहत असते, त्यावर पुढे निवेदन येते.

"वासूचा बाप कितीतरी वर्षांपूर्वी आपटे भटाकडे भिक्षुकी करून उपजीविका करण्यासाठी म्हणून आला. त्यानं मांघरात राहायची सोय करून घेतली. तिथंच दामूचा, वासूचा जन्म झाला. मेलेल्या एक–दोन पोरींचाही जन्म तिथलाच. आपटे भटाचं घर मोठं होतं. घराभोवती परडं होतं. परड्यात माडापोफळींची झाडंही होती. गोठा होता. गुरं, म्हशी होत्या. विहीर होती. परड्यातच मांघर होता. बागेची देखभाल करायला गडी होता. आपट्यांच्या घरी भटा–भिक्षुकांचा, पै–पावण्यांचा राबता असे. वासूची आई, वासूचा बाप आणि बालपणी कधी कधी दामू अन् वासूही आपट्यांच्या घरी राबत. सावकार आपटे आणि आपटीणकाकू त्यांना आश्रित समजून राबवून घेत. याचं कधीकधी वासूला वाईट वाटे, कधी कधी रागही येई. पण तो काही करू शकत नसे. आई–बापाचं, विशेषत: आईचं, त्यांच्या घरचं राबणं तो बघे, चिडे, चरफडे; पण काही करू शकत नसे." (पृ.१६२) भिक्षुक आपटे श्रीमंत होते त्यामुळे त्यांनी वासूच्या कुटुंबाला आश्रय

दिला. पण बदल्यात त्या कुटुंबाला राबवून घेतले गरिबी आणि श्रीमंतीतील दरी येथे निवेदनातून नेमकेपणाने व्यक्त होते.

**६. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**डोळा :**

या कथेतील नायक आपल्या म्हाताऱ्या बापाला फसवून डोळा विकण्यासाठी घेऊन जात असताना म्हातारा बाप एका डोळ्याने बदलत जाणाऱ्या जगाकडे कुतूहलाने बघत असतो. त्यावर येणारे हे निवेदन अंतर्मुख करणारे आहे.

"त्यानं बापाचं बोचकं पाठीवर मारलं आणि तो चालू लागला. म्हातारा एका डोळ्यानं भोवतीचं जग नव्याच कुतूहलाने आणि उत्सुकतेने बघू लागला. ते आता शहराच्या दिशेने चालले होते. रस्त्यावर बरीच वाहनं धावत होती. तरीही मुख्य शहर अजून दूर होतं. आजूबाजूला उंचउंच इमारती उभ्या होत्या किंवा उभारल्या जात होत्या. पूर्वी म्हातारा ओझ्यांची गाडी ओढत शहराच्या रस्त्यांवरून फिरत असे. पण तेव्हा इतक्या इमारती नव्हत्या. शहर इतकं वाढलं नव्हतं." (पृ.१३) या निवेदनातून वाढती लोकसंख्या, झपाट्यानं होणारे शहरीकरण, त्यातून निर्माण होणारे प्रश्न पुढे आणि आटत जाणारी माणुसकी पुढे येण्यास मदत होते.

**अयोध्या :**

लहान बाळाच्या बाळलीला सर्वांनाच मोहीत करत असतात. अनिल या बालकाचा निरागसपणा पुढील निवेदनातून प्रत्ययाला येते.

"घरभर थुईथुई नाचे म्हणून आजीचा–आजोबांचा लाडका; चांदीच्या वाजत्या नाण्यांसारखं किणकिण चकचकीत हसे म्हणून आई–बाबांचा लाडका; दंगेखोर म्हणून काका काकूंचा लाडका; लडिवाळपणामुळे मावसा–मावशीचा लाडका. शेजारच्या घरी जाऊन अचूक बिस्किटांचा डबा दाखवून काऊ काऊ करीत अवतीभवती घोटाळे म्हणून शेजारणींचा लाडका." (पृ.१७४) बाळाचे निरागसपण, नटखटपण, नातेवाईक, शेजारी यांचे नातेसंबंध दृढ करण्यात हे बाळ महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचा प्रत्यय येथे येतो.

**मोक्ष :**

या कथेतून कावळ्याचे आणि आत्म्याचे असलेले अनुबंध पुढे येतात.

"कावळा अजून दूरच होता. थोडा पुढे येत होता. पुन्हा मागं जात होता. आजोबांच्या जवळ उभ्या असलेल्या त्याला तिथून कावळे दिसत होते. दोघांच्या जोडीला आता तिघे आले होते. त्यातला एकजण अधिक धीराचा, शूर, धाडसी होता. तो अधिक पुढे यायचा प्रयत्न करीत होता. तुरूतुरू पुढं येत होता, पिंडाच्या आसपास पडलेले अन्नकण वेचीत होता आणि तसाच तुरूतुरू मागं जात होता." (पृ.१८९) पिंडाला कावळा शिवणे या गोष्टीला समाजात दिले गेलेले आत्यंतिक महत्त्व या निवेदनातून सूचित होते.

**पक्षी :**

या कथेतील नायक दहशतवादी संघटनेच्या प्रशिक्षणाचे काम करत असतो. तो अत्यंत धाडसी, शूर असतो परंतु नायिकेच्या स्पर्शाने त्याच्यातील माणूसपण जागे होते. यावर पुढे निवेदन येते.

"त्याला तिचा स्पर्श वेगळा जाणवला. हलका आत्मीय आणि नेहमीपेक्षा निराळा नेमबाजी आणि दहशतवादी कृत्यांचं प्रशिक्षण देताना त्यानं अनेकदा तिला स्पर्श केला होता, मारही दिला होता, तिचेही अनेक स्पर्श त्याला झाले होते, पण आताचा तिचा स्पर्श अगदी निराळा होता. डोळ्यातल्या पाण्याआडच्या जाणिवेइतकाच हळवा. तिची बोटं आपल्या हाती घेऊन तो तिच्या बोटांनी आपल्या डोळ्यातलं पाणी पुसून घेऊ लागला. मग त्यानं तिचा तळवा आपल्या तोंडापाशी आणला आणि तिच्या हाताच्या बोटांवर आपले ओठ टेकवले." (पृ.२११) माणूस कितीही क्रूर असला तरी त्याच्या आत एक प्रेमाचा अंकूर असतोच. योग्य परिस्थिती येताच तो अंकुरताना दिसतो.

या कथासंग्रहावरील निवेदनावर रवींद्र शोभणे लिहितात,

"नाट्यमयता हे ह. मों. च्या लेखणीचे वैशिष्ट्य मात्र या कथांमध्ये नेमकेपणाने उतरले आहे. वाचकांची उत्कंठा वाढवत ठेवणाऱ्या साध्या सोप्या निवेदनशैलीतल्या या कथा सर्वसाधारण

वाचकाला अनेकविध विश्वांचे दर्शन घडवतात. त्यामुळे बऱ्याच वर्षांनी आलेला हा ह.मों. चा कथासंग्रह त्यांच्या चाहत्यांना सुखावणाराच आहे.''[३]

रवींद्र शोभणे यांनी या संग्रहातील निवेदनावर केलेले भाष्य यथोचित वाटते.

**कुपुत्र :**

वाडा संस्कृती व फ्लॅट संस्कृती यातील भेद पुढील निवेदनातून स्पष्ट होतो.

''कुणाच्याच फ्लॅटची दारं सहसा बंद नसत. वारा येण्यासाठी ती उघडीच ठेवावी लागत. शिवाय पूर्वीपासूनही सवय. वाड्यात एकेका, दोन-दोन खोल्यातली बिऱ्हाडं कुठं दार बंद करून घेतात? पूर्वीचीच पद्धत वाड्याच्या रूपांतरानंतरही सुरू राहिली होती. बिल्डरने प्रत्येक डोअरबेलचं बटण बसवून दिलं होतं, म्हणून लोकांनी बेल्सही आणून बसवल्या होत्या. पण दार उघडण्यासाठी त्या वाजवण्याचा प्रसंग क्वचितच येई.'' (पृ.३६१) एकमेकांत मिळून मिसळून राहण्याच्या सवयीमुळे लोक वाड्यातून फ्लॅटमध्ये रहायला गेले तरी त्यांच्या वागण्यात बदल होत नाही. हेच या निवेदनातून पुढे येते.

**७. घोडा :**

**घोडा :**

सुधाकर बापट एम. डीं. ना भेटायला जातात परंतु एम. डी. त्यांना भेटण्यास नकार देतात. एम. डी. चा नकार ऐकून संतप्त आणि धुमसणाऱ्या सुधाकर बापटच मानसिक कोंडमारा पुढील निवेदनातून येतो.

''तो परत आपल्या जागेवर येऊन बसला. टाईपरायटरमध्ये कागद घातला. बटनं बडवू लागला. टु दि मार्केटिंग मॅनेजर, इंडियन ॲग्रीकल्चरल प्रोड्यूस कंपनी ....... बटणं वाजू लागली. वाजत राहिजी. टप् ....... टप् ........टप्टप् .......... टप ........ घोड्यांच्या टापांचा आवाज संसाररथाचा घोडा. संसाराचा रथ की संसाराचा टांगा? रथ, की टांगा? रथ की टांगा – मज कुणीतरी सांगा ...... चल रे घोड्या टपक् – टपक्. टपक् – टपक्.

ऑफिस संपल्याचा भोंगा वाजून बराच वेळ झाला तरी सुधाकर बापटच्या टाईपरायटरमधून घोड्यांच्या टापांचा आवाज निघतच राहिला.'' (पृ.३३) या निवेदनातून सुधाकर बापटच्या अस्वस्थ मन:स्थितीचे दर्शन होते.

**अग्नी :**

एका सामान्य कंपनी कामगाराच्या दिनचर्येवर पुढे निवेदन येते.

''रोज सकाळी पावणे आठला फॅक्टरीत हजर होई. इतर वर्करमंडळी हळूहळू येऊन दाखल होत. अतुल इंडस्ट्रीजमधली पहिली शिफ्ट आठला सुरू होई. घरून आणलेला डबा हाती धरून तो कार्डपंचिंगच्या मशीनसमोरच्या क्यूत उभा राही, इतरांसारखंच हजेरी कार्ड पंच झालं की खात्यात जाई. निळा डगला घालून दिलेलं काम करी. जेवणाच्या सुटीचा भोंगा झाला की बायकोनं दिलेली भाकरी खाई. संध्याकाळी फॅक्टरी सुटली की डबा घेऊन चाळीतल्या खोलीत परते.'' (पृ.५६) भिवा ओटवणेचा प्रामाणिकपणा, कामाच्या प्रति निष्ठा, शांत स्वभाव या निवेदनातून समोर येतो.

**टार्जेट :**

भुजबळ कंपनीतील काही मशिन्सचे पार्ट काढून घेऊन मशिन्स बंद पाडतो. त्यामुळे त्या फ्लोअरवरचे काम बंद होऊन इतर कामगारही काम करू शकत नाहीत यावर पुढील निवेदनातून प्रकाश पडतो.

''मिनिटाभरातच सुनील साने–चीफ एक्झिक्युटिव्ह, सिक्युरिटी ऑफिसर पाटील, दोन वॉचमन, सुपरवायझर देवस्थळी आणि दोन पोलिस यांनी त्यांना घेरले आणि खुद्द सुनील साने यांनीच भुजबळच्या पँटच्या खिशातून बंद पडलेल्या मशिन्सचे काही पार्टस् बाहेर काढले. त्या क्षणी भुजबळच्या सर्व अंगातून विजेप्रमाणे भितीची, असुरक्षिततेची एक भावना चमकून गेली.'' (पृ.११६) भुजबळची कंपनीच्या विरूद्ध काम बंद ठेवण्याची सूडाची भावना शेवटी त्याच्या अंगलट येते. चुकीचे कोणतेही कृत्य नुकसानच करते हेच या निवेदनातून स्पष्ट होते.

**मानवतावादी लेखकाचा मृत्यू :**

प्रसिद्ध नाटककार – कादंबरीकार, टीकाकार, समाजसेवक अप्पासाहेब पुणेकर वयोवृद्धपणामुळे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतात. त्यांची प्रकृती अधिकच खालावल्याने वृत्तपत्रांचे सर्व बातमीदार, वृत्तवाहिन्यांचे वार्ताहर त्यांच्या मृत्यूच्या बातमीची कशी तयारी करतात यावर मार्मिक निवेदन पुढे येते.

"दुसऱ्या दिवशी अप्पासाहेब पुणेकरांची कंडिशन अधिकच सिरिअस आणि क्रिटिकल झाली. त्यांच्या गंभीर आजाराची बातमी सगळीकडे प्रसिद्ध झाली. लोकांनी परिस्थिती ओळखली. दैनिक हालहवालमध्येच नव्हे तर, महाराष्ट्रातील सर्व दैनिकांच्या कचेऱ्यांत त्यांच्या विषयीचे मृत्यूलेख व एडिट पेजवरील लेख कंपोझला सुटले, फोटो गोळा होऊन त्यांचे ब्लॉक्सही झाले. साहित्यसंस्थांनी शोकसभांची आखणी सुरू केली व विद्वान वक्त्यांनी भाषणांची तयारी चालविली. पुण्या–मुंबईकडे अप्पासाहेबांचे प्रकाशक, चाहते आणि स्नेही प्रेतयात्रेतच सामील होण्याच्या तयारीने मुक्कामाला आले." (पृ.१४४) त्यांच्या आजारपणाचा, मृत्यूच्या दु:खाचा विचार न करता सगळ्यांची आपापल्या पद्धतीने बातमी देण्यासाठी ते जिवंत असतानाच कशी लगबग सुरू केलेली होती यावर येथे प्रकाश पडतो.

८. **युद्ध :**

**छोटे मासे :**

रत्नाकर हाऊस जर्नल्सचे रिपोर्टर म्हणून काम करतात. त्यांच्या कामाच्या पद्धतीवर येथे निवेदन येते.

"त्याच्या खुशीचं प्रतिबिंब त्याच्या कामातही पडू लागलं. तो उत्साहानं काम करीत होता. फॅक्टरी प्रिमाईसमधली न्यूज गोळा करीत होता. कामगारांना भेटत होता. त्यांचे काही कार्यक्रम असले तर स्वत: हजर राहून त्याचं रिपोर्टिंग करीत होता. त्यांचे काही कार्यक्रम असले तर स्वत: हजर राहून त्याचं रिपोर्टिंग करीत होता. मॅनेजर लोकांनाही अधूनमधून भेटत होता. त्यांच्याकडून आमच्या हाऊस जर्नल्ससाठी न्यूज आयटेम्स मिळवीत होता. प्रेसला द्यायची कॉपी तो स्वत: हौसेनं सुवाच्च अक्षरात पुन्हा लिहून काढीत होता. प्रुफ एकाऐवजी दोन वेळा चेक करीत होता.

प्रेसवर हेलपाटे घालीत होता. कधी कधी तर मशीनवर स्वत: उभं राहून क्वालिटी कंट्रोल करीत होता.'' (पृ.१४९) रत्नाकरची त्याच्या कामाविषयीची निष्ठा येथे प्रत्ययाला येते.

**अंगार :**

कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह आणि चीफ एडिटर असलेल्या एकबोटे या व्यक्तिमत्त्वावर येथे निवेदन येते.

''ते आपल्या गाडीतून उतरले आणि आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार आधी आमच्या खोलीत आले. आम्ही तिथं सगळेच काम करीत बसलो होतो. कुणी भाषांतर आणून ओरिजिनल लेख तयार करीत होता, कोणी आलेले लेख वाचीत होता. कुणी लेआऊट करून घेत होता.'' (पृ.२१२) एकबोटे या कंपनीचे सर्वेसर्वा असल्याने त्यांचे या कंपनीतील कामगारांच्या कामावर बारकाईने लक्ष असलेले दिसून येते. आत्मविश्वास, सचोटी आणि सहकाऱ्यांच्या मदतीने एकबोटे आपल्या कामाचा विस्तार वाढविण्याचा प्रयत्न करतात यावर हे निवेदन प्रकाश टाकते.

''एकबोटे यांनी प्रिंटिंग प्रेसचा विकास करायचा प्लॅन हाती घेतला होता. नवीन जागा घेऊन इमारत बांधायला काढली होती. नवीन सॉफिस्टिकेटेड मशिनरी बुक केली होती आणि ती येण्याच्या मार्गावर होती. प्रिंटिंग डिव्हिजन वाढवायला खूप संधी आहे. आणि ती साधून धंदा जोरात करावा असं त्यांनी ठरवलं होतं. त्या व्यापात ते अधिकाधिक अडकले होते.'' (पृ.२३७) व्यवसाय वाढविण्यासाठी एकबोटे सतत प्रयत्नशील असल्याने ते या कामात अधिकच व्यग्र झाल्याचे दिसून येते.

ह. मो. मराठे यांच्या या कथासंग्रहांमधील निवेदने कथेला गती आणि परिणामकारकता प्राप्त करून देताना दिसतात. निवेदनाद्वारे पात्रांचे गुण–दोष, कामाच्या प्रति निष्ठा, जबाबदाऱ्या, ताणतणाव इ. गोष्टींवर निवेदन करून त्या गोष्टींना अधोरेखित करतात. कथानकाची परिणामकारकता निवेदनामुळे वाढताना दिसते.

निवेदनातून ह. मो. मराठे चाफेकरांसारख्यांचे नेतृत्वगुण सिद्ध करतात. उद्योगपती आणि भिडे या दोन पात्रांच्या माध्यमातून पैशाबरोबर बदलत जाणारी स्वभाववैशिष्ट्ये दाखवितात, तर कधी पैशाअभावी पत्करावी लागणारी लाचारी दाखवितात. समाजातील काही लोकांची गुंडप्रवृत्ती,

तकलादू शासनव्यवस्था, भ्रष्टाचारी वृत्ती, हिंस्र प्रवृत्ती, दांभिकपणा, शहरीकरण, झोपडपट्ट्यांमधील जीवन अशा गोष्टींवर ही निवेदने प्रकाश टाकतात.

पात्रांच्या विविध समस्यांचा त्यांच्या मानसिकतेवर होणारा वाईट परिणाम, नष्ट होत जाणारी सद्‌सद्‌विवेकबुद्धी, नातेसंबंध, माणुसकी, नैतिकता इ. गोष्टींवरही येथे प्रकाश टाकलेला दिसून येतो. एकूणच या निवेदनांचा विचार करता ही निवेदने यथोचित आणि परिणामकारक उतरली आहेत असे म्हणता येईल.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

या कादंबरीतील निवेदक एक पात्र बनून कथा सांगताना दिसतो. या कादंबरीची सुरूवातच तृतीय पुरुषी निवेदनाने होते. ''हॉटेलच्या शेवटच्या पायरीवर तो उभा होता.'' (पृ.१) या वाक्यातून तो म्हणजेच नायकाविषयी निवेदक बोलतो त्यामुळे हे निवेदन त्याची त्यावेळची स्थिती स्पष्ट करण्यास मदत करते.

''व्हरांड्यातल्या एका बाकवजा खुर्चीवर तो अलगद बसला, जणू खुर्चीवर बसल्याचा अनुभवच नसल्यासारखा.

तो बसला नि आतून येणारे आवाजांचे गलके अंगावर झेलत राहिला. एका गलक्यावर बसून काकूंच हसू गडगडत त्याच्यापर्यंत आलं. तेव्हा तो एकदम होशियार झाला.'' (पृ.२७) या निवेदनातून नायकाची दु:खद, हताश मन:स्थिती आणि काकूंच्या घरचे आनंदी, प्रसन्न, गडबड गोंधळाचे वातावरण अशा दोन परस्परविरोधी गोष्टी एकाच वेळी एकाच ठिकाणी घडत असल्याचे दिसते.

''पुष्कळ वेळ तो रस्त्यावरच्या वाहत्या गर्दीच्या लोंढ्याला अडकून रस्तोरस्ती भटकला. आणि सेठ सुखलाल रामलाल यांच्या पेटीसमोर उभा राहिला. कापडाचे किरकोळ व ठोक व्यापारी ही लाकडी, गलेलठ्ठ, ठार निर्जिव जुन्या वळणाची चिरपरिचित अक्षरं पाहून तो पायऱ्या चढल्या. दरवाज्यातच उभं राहून त्यानं सलामी ठोकली– ''जयरामजी मुनीमजी.'' मुनीमजींनी

चष्मा सावरीत वर पाहिलं. तिथं असलेल्या एकेदोघा नोकरांनीही." (पृ.४०) या निवेदनातून नायक हताशपणे, नोकरी शोधण्यासाठी रस्तोरस्ती, गल्लोगल्ली फिरत असल्याचे दिसून येते.

"शेटजींनी फोन फिरवला. लोडाला रेलून ते बोलू लागले. त्यांच्या सर्व अंगावर गुलजार मांस उतू जात होतं आणि गळ्यातला सोन्याचा छडा त्यांच्या उरावर रूळत होता. हाताच्या सगळ्या बोटांत नाना रंगांच्या खड्यांच्या आंगठ्या होत्या." (पृ.४३) शेटजींची श्रीमंती यांच्यावर प्रकाश टाकण्यासाठी हे निवेदन आल्याचे दिसून येते. पुढे नायकाची अजूनच बिकट होत जाणारी मन:स्थिती पुढील निवेदनात स्पष्ट होते.

"अपेक्षांची चार झुरळं त्याच्याभोवती मघापासून फिरत होती. त्यांना त्यानं चिमटीत चिरडलं आणि वाहत्या गटारात टाकून दिलं. त्यांची प्रेतं घाणीच्या कडेवर बसून सुदूरपर्यंत वाहत गेलेली त्यानं पाहिली." (पृ.४६) शेटजींनी नोकरीसाठी नकार दिल्यावर झालेला अपेक्षाभंग या निवेदनातून अधिक तीव्रपणे जाणवतो. अपेक्षाभंगाचे ओझे घेऊन तो घरी जातो तेव्हा वसूला सामोरे जाण्याचे धाडस त्याच्या अंगी नसते,

"तो दरवाजावर टक् टक् करतो.

वसूचा टक्कदिशी कॉटवरून उठल्याचा आवाज. दार उघडणं.

तो स्वत:ला आत ढकलतो. एखाद्या निष्प्राण प्रेताच्या ओंडक्यासारखा.

चटकन दार लावून त्याची वसू त्याला मिठी घालते. आपलं मस्तक त्याच्या छातीवर वेगाने घुसळते. आपलं नितळ, निर्घोर, अलवार गर्भारपण त्याच्यावर उधळते." (पृ.५९) नायकाने त्याचे नोकरी नसल्याचे दु:ख वसूला सांगितले नसल्याने नायक एकटाच दु:खी असतो तर वसू गर्भारपणाच्या आनंदात असते असे विरोधी वातावरण या निवेदनातून त्यावेळच्या परिस्थितीची पूर्ण कल्पना देते. वसूला नायकाच्या दु:खाची कल्पना नसल्याने ती निश्चिंत असते.

"तो तिला थोपटायचा थांबला. टक लावून तिच्याकडे पाहू लागला. किती निश्चिंतपणे ही झोपलीय. तिला तिच्या आयुष्यातला आज कसा आहे आणि उद्या कसा उगवणार आहे याची काही काही माहिती नाही.

विस्तवाच्या लाटांवर हिचं चांदण्याचं अस्तित्व जळतयं." (पृ.६४) वसूचे निश्चिंतपण पाहून तिच्या निरागसपणावर नायक आपले जे विचार मांडतो त्यांवर हे निवेदन येते.

"थोड्या वेळाने तो पुन्हा देसाईबाईंच्या दारात हजर. त्याने घंटी वाजवली. गोऱ्यागोमट्या तरूणाने दार उघडलं त्याच्या तोंडात सिगरेट, हाती पत्ते आणि नजर मद्य प्याल्यागत तांबारलेली. दार उघडल्यानंतर तो परवानगी न विचारताच किंवा आत बोलावलं जाण्याची वाट न पाहताच आत आला. समोरच देसाईबाई. पांढरंशुभ्र पातळ. साध्वीसारखं अंगाभोवती लपेटून घेतलेलं. तोंडात सिगरेट आणि हातात पत्ते." (पृ.७४)

वरील निवेदनातून नायकाची नोकरीसाठीची अधिरता आणि देसाईबाईंची वेगवेगळी रूपे या निवेदनातून समोर येतात. एकीकडे पांढरेशुभ्र कपडे परिधान करून साध्वी बनण्याचे नाटक तर दुसरीकडे पार्ट्या, सिगरेट, हातात पत्ते हे व्यसनाधीन रूप या निवेदनातून समोर येते.

'निष्पर्ण' च्या निवेदनावर भाष्य करताना दीपक घारे म्हणतात,

"कादंबरीतील निवेदनाचे चढउतार पाहिले तरी हे लक्षात येते. विरोधी ताण निर्माण करतील अशा प्रसंगांची गुंफण, प्रतिमादेखील विरोधाभास वाटाव्यात अशा. त्यातून एक वेगळेच नाट्य निर्माण होते. नायकाला वाटणाऱ्या वस्तूबद्दलच्या भावना टोकाच्या आहेत. कधी कधी त्या तरल, काव्यात्म असा रोमँटिक मूड निर्माण करतात तर क्षणार्धात या कोमल भावनांचे रूपांतर तिच्याबद्दलचा निषेध व्यक्त करणाऱ्या त्राग्यामध्ये होते. वसू– पाण्यात चांदणं बुडावं तशी, कळाहीन आयुष्यावर साईसारखी पसरलेली. अशा वर्णनानंतर दोन वाक्यांनी लगेच तीच वसू– आताशा साली केतकीच्या घनगर्द हात्यासारखी आत्ममग्न होते. प्रेयसी, पत्नी क्षणार्धात वैरीण होते!"[४]

दीपक घारे यांनी ह. मो. मराठे यांच्या निवेदनातील बारकाव्यांवर केलेला निर्देश यथोचित वाटतो.

शरद काळे 'निष्पर्ण' कादंबरीतील घटक चर्चा करताना लिहितात,

१) इथल्या निवेदनाचं तृतीयपुरुषी, प्रथमपुरुषी असं संमिश्र स्वरूप असलं, तरी तृतीयपुरुषी निवेदनाचा बाज कायम राखला गेला आहे.

२) तसंच तृतीयपुरुषी निवेदनात काही वेळा निष्कारण येणारे पाल्हाळ इथं जाणता–अजाणता टाळलेले दिसते. त्यासाठी प्रत्यक्ष कथनपद्धत स्वीकारलेली दिसते. त्याला वाटलं, 'तो म्हणाला' हे शब्दप्रयोग अगदी मोजके (८५ पृष्ठांच्या १७००० शब्दांत उणेपुरे वीसेक–फारतर पंचवीस.)

३) पूर्णविरामाखेरीज बाकी विरामचिन्हांचा वापर अगदी त्रोटक वा अपवाद म्हणून.

अशा बारीकसारीक अनेक बाबींतून कथनाला अस्खलितपणा येऊन ते ओघवतं, वेगवान बनतं. झटकन कब्जा घेतं.''[५]

वरील निवेदनावरील शरद काळे यांनी मांडलेले विचार सार्थ वाटतात.

**२. काळेशार पाणी :**

या कादंबरीतील निवेदन या घटकाचा विचार करता छोट्या आणि गतिमान वाक्यांचा, प्रवाही भाषेचा वापर झालेला असल्याचे खालील काही उदाहरणांमधून निदर्शनास येते.

''कमळीला क्षणभर वाटून गेलं–आपल्या देहात अनोख्या झिणझिण्या चमकून गेल्या. पण अगदी क्षणकालच. तिनं घराकडे परतताना गूळ शेंगदाणे खायला सुरूवात केली. आणि त्या झिणझिण्या कुठच्या कुठं नाहिशा झाल्या.

कमळी घरी आली तर तिची आई आलेलीच होती. पोरीच्या हातातले गूळ–शेंगदाणे बघून तिचीही जीभ चाळवली.'' (पृ.१४)

वरील निवेदनातून लेखकाने कमळी आणि तिची आई यांची भूक रेखाटली आहे. भूकेपुढे कमळीला इतर गोष्टींचे भानच उरत नसल्याचे येथे स्पष्ट होताना दिसते.

''भिक्याच्या मरणानंतर फक्त एकच दिवस कमळी शाळेत गेली नाही. भिकीनं फक्त एकच दिवस आपलं हॉटेल रस्त्यावर मांडलं नाही. त्याच्या मरणाच्या तिसऱ्या दिवशी तिनं आपलं भजाचं दुकान रस्त्यावर थाटलं. कमळी शाळेत गेली तरी तिच्याशी कुणीच बोललं नाही. विष्ण्या मेल्याचं काल सर्वांनाच वर्गात कळलं होतं. कमळीचे वडील मेले असं वर्गात गोरे मास्तरांनी सांगितलं. तिच्या वर्गातली मूलं एकदम गप्प झाली. थोडा वेळ चुकचुकली. मधल्या सुट्टीत मास्तर एकत्र आले तेव्हा सर्वांनी भिकीचा भावी धगड कोण असेल याची रंगतदार चर्चा केली. आज तो वर्गात जाताच सगळेजण गप्प राहिले. ती एका जड अवघडलेपणात बसून होती. गंभीर आणि

अबोल.'' (पृ.३०) भिकी आणि कमळी विष्ण्याच्या मरणाचं दु:ख जास्त दिवस करत न बसता आपापल्या कामात गुंततात तर कमळीच्या वर्गातील मुलं भिकीच्या धगडावर चर्चा करतात. या निवेदनातून विष्ण्याचे असलेले नगण्य स्थान निदर्शनास येते. तर भिकीला कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी उचलावी लागत असल्याने तिने दु:ख करत बसण्यापेक्षा कामधंदा करत पैसे मिळवणे योग्य ठरवले हेच या निवेदनातून प्रत्ययाला येते.

''भिकीची वाट बघत सगळी पोरं बसली होती. कमळीही होती. सगळ्या जणांना चांगली भूक लागली होती. दुपारी पोट भरलं नव्हतं. हल्ली सर्वांची हीच अवस्था होती. कुणालाच पोटभर खायला मिळत नव्हतं. सगळी अर्ध्या पोटांवर जगत होती. इकडे तिकडे भटकता भटकता ज्याला ज्याला जिथं जिथं जे जे मिळेल ते ते खायला शिकली होती.

भिकी आल्यावर सगळी पोरं तिच्याभोवती जमा झाली. खायला मागू लागली.'' (पृ.४३)

वरील निवेदनातून लेखकाने भिकी आणि तिच्या मुलांची भूक आणि त्यांची परवड निदर्शनास आणली आहे.

''परीक्षेचा निकाल जाहीर झाला. सामन्त साधारण मार्कांनीसुद्धा पास झाला नव्हता. कमळीही नापास झाली होती. सगळ्यांना सामन्तचं आश्चर्य वाटत होतं. त्याचं नापास होणं सर्वांना धक्का देऊन गेलं, वर्गातल्या मुलांनी, सर्व मास्तरांनी त्यांला विचारलं पण तो काही बोलला नाही. कुणाशीच नाही. एकटाच भिंतीशी बसला होता. त्याचं तोंड इवलंसं झालं होतं, आणि डोळे ओघळायच्या बेताला आले होते.'' (पृ.५४) सामान्त हुशार असल्यामुळे त्याचे नापास होणे हे सर्वांसाठीच अनपेक्षित असल्याचे दिसून येते. नापास झाल्यामुळे त्याची अस्वस्थ झालेली मन:स्थिती येथे निवेदनातून स्पष्ट होते.

ह. मो. मराठे यांच्या 'काळेशार पाणी' या कादंबरीतील निवेदन या घटकावर प्रकाश टाकताना डॉ. पुष्पा राजापुरे लिहितात,

''साटमानं कमळीच्या कपाळावर हात ठेवला. कमळीला तो सामन्ताच्या गळ्यावरून फिरणाऱ्या भुताच्या हातासारखा वाटला. साटमाचा हात कमळीच्या कपाळावरून गळ्याकडे आणि तिथून तिच्या छातीकडे सरकला. कमळीच्या अंगावर पांघरूण होतं, त्याचा हात पांघरूणाखाली

तिच्या छातीवर फिरू लागला. हात फिरवता फिरवता साटम तिचे स्तन दाबत राहिला. पहिल्या भागातील निवेदनातून पुरुषाची भोगलोलुप वृत्तीच प्रभावीपणे प्रकट झाली आहे.

'नुक्ते उभारी धारण करू लागलेले तिचे स्तन आठ दिवसांच्या भयंकर आजारानं मावळू लागलेले होते.' या दुसऱ्या भागातील निवेदनामुळे स्त्रीच्या आजारपणातही स्त्रीच्या देहाकडे भोगाचे साधन म्हणून पाहणाऱ्या पुरुषांची हीनवृत्ती प्रभावीपणे साकार होण्याऐवजी तिचे स्तन 'मावळत' असल्याचे वास्तव (!) निवेदक व्यक्त करतो. परिणामी आजारी कमळीला त्याही स्थितीत देहभोग सोसावा लागतो, हे स्त्री म्हणून सोसाव्या लागणाऱ्या तिच्या आंतरिक दु:खाकडे इतकी डोळेझाक होते की, निवेदक तिचे अशाप्रकारचे दु:खच व्यक्त करीत नाही. अशा निवेदकाच्या निर्मितीमागील लेखकाची जीवनदृष्टि फार गंभीर नसल्याचेच सूचित करीत आहे."[६]

डॉ. पुष्पा राजापुरे यांनी या कादंबरीच्या निवेदनावर अत्यंत सूक्ष्मपणे निरीक्षण करून भाष्य केले आहे असे वाटते.

'काळेशार पाणी' च्या निवेदनावर आपले मत प्रकट करताना दीपक घारे म्हणतात,

" 'काळेशार पाणी' ही कादंबरी म्हणजे मिथ्यकथेचा व्यत्यास आहे असे आधी म्हटलेच आहे. आदिम प्रेरणा, त्यांची नेमक्या शब्दांत थोडी अतिवास्तव पद्धतीने मांडणी आणि प्रातिनिधिक, ठळक व्यक्तिरेखा या दृष्टिने ही मिथ्यकथा आहे. त्यात पाणी, विहीर या प्रतिमांबरोबरच 'फुलराणी' कवितेसारख्या आधुनिक प्रतिमाही येतात. कादंबरीचे निवेदनही छोट्या छोट्या वाक्यांनी आणि संवादांनी गतिमान ठेवलेले आहे."[७]

वेगवेगळ्या दृष्टिकोनातून निवेदनाचा दीपक घारे यांनी मांडलेला विचार समर्पक वाटतो.

**३. इतिवृत्त :**

"नाडकर्णींना तो शेरा झोंबला. कारण पूर्वी लिहिणाऱ्यांपैकी फक्त नाडकर्णींचाच कॉलम तेवढा बंद करण्यात आला होता. इतर सर्व सदर पूर्वीचेच लोक लिहित होते. नाडकर्णींची खात्री पटली – हा पूर्वीच्या कुठल्या तरी कृत्याचा सूड आहे.

नाडकर्णी अस्वस्थ झाले. त्यांचा कॉलम बंद करण्यात आल्याचं जाहीर करण्यात आल्यानंतर वाचकांची पत्रे आली तरी कॉलम पुन्हा चालू करण्यास त्यांना सांगण्यात आले नाही, तेव्हा तर ते अधिकच अस्वस्थ झाले. त्यांना वाटलं – नव्या संपादकाला आपली लोकप्रियता सहन होत नाही, होणार नाही. हा आपला अपमान तर आहेच, पण आपलं अस्तित्वच सीमित करण्याचा हा प्रयत्न आहे. आता आपणाला नवीन काही तरी शोधलं पाहिजे.'' (पृ.९,१०)

वरील निवेदनातून वरिष्ठांनी नाडकर्णींप्रती रचलेले कटकारस्थान दिसून येते.

''भोगल्यांनी आधी सर्व वर्तमानपत्रांवरून ओझरती नजर फिरवली आणि मग अग्रलेख नजरेखालून घातले. वर्तमानपत्रांनी मुख्यमंत्र्यांच्या नव्या आश्‍वासनासंबंधी अग्रलेख लिहिले होते. दैनिक लोकवार्ताच्या अग्रलेखाचं शीर्षक होतं : 'भरघोस आश्‍वासने.' सा. गावगाड्यान हेडिंग दिलं होतं : 'मुख्यमंत्र्यांचे नवे पाऊल.' 'जनता' च्या अग्रलेखाच्या शीर्षकाचे शब्द होते : 'नुस्ती आश्‍वासने नकोत–' भोगल्यांनी 'जनता' चा अग्रलेख घाईघाईनं वाचून काढला. तोवर अण्णासाहेब येऊन बसले. अण्णासाहेबांच्या धर्मपत्नी आल्या. भोगल्यांच कुटुंब आलं.'' (पृ.४३)

वरील निवेदनातून मुख्यमंत्री आणि त्यांच्या कुटुंबातील एकोपा दिसून येतो. शिवाय ते सर्व पेपरमधील बातम्यांवर लक्ष ठेवत असल्याचेही दिसून येते.

''गेल्या पंचवीस वर्षात त्यांनी बराच व्याप वाढवला होता. एक कारखाना, एक मॅंगेनीजची खाण, मुंबईच्या एका मोठ्या कापड गिरणीच्या डायरेक्टर बोर्डावर नेमणूक, गेल्या चारपाच वर्षात इथंच उभे केलेले पाचशे पॉवरलूम्स आणि गेल्या काही वर्षांपासून एक वर्तमानपत्र–'' (पृ.११६)

वरील निवेदनातून बाळासाहेब फळणीटकर यांचे वेगवेगळ्या क्षेत्रातील वर्चस्व दिसून येते.

**४. कुरूक्षेत्र :**

''प्राचार्य बेलसरे यांची एक नेहमीची सवय होती. कॉलेजात प्रवेश करता करता आधी डॉक्टरांचं दर्शन घ्यायचं. एखाद्या मंदिरात प्रवेश करताना श्रद्धाळू व्यक्तीनं चपला काढाव्या त्याप्रमाणे त्यांनी चपला काढून ठेवल्या आणि डॉक्टरांच्या पुतळ्यासमोर ते क्षणभर डोळे मिटून उभे राहिले. मग त्यांनी डोळे उघडले व समाधिस्थानाच्या भोवती नजर फिरवली. त्यांना

जाणवले, स्थानाची साफसफाई पुष्कळ दिवसात झालेली नसावी. रोज ते दर्शनार्थ येत हे खरं, पण कचरा पडला आहे याकडे त्यांचं लक्ष गेले काही दिवस गेलं नव्हतं हे खरं. ऑफिसात गेल्या गेल्या याविषयीची सूचना देण्याचं त्यांनी मनाशी ठरवून टाकलं.'' (पृ.११)

वरील निवेदनातून प्राचार्य बेलसरे यांना डॉ. म्हसकरांविषयी असलेला आदर दिसून येतो.

''तुकाराम फराटेची गाडी आली.

त्याचा बंगला तयार झाला.

त्याने शेती खरेदी केली, ट्रॅक्टर आणला.

त्याने साखरकारखान्यात डायरेक्टर पद मिळवलं.

तो जिल्हा परिषदेवर निवडून आला.

त्याच्या भावानं फर्निचरचं दुकान थाटलं, तो बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरही झाला. त्याच्या आणखी एका भावाने शाळा-कॉलेजांना लागणारी स्टेशनरी पुरवायची एजन्सी घेतली.

तुकाराम फराटेच्या बंगल्यावर कोंबड्या शिजू लागल्या, त्याच्या बंगल्यावर फळांच्या करंड्या येऊन धडकू लागल्या.

त्याच्या बंगल्यावर शिकलेले तरूण-तरूणी नोकरीसाठी खेट्या मारू लागले. तो पैलवान गडी घेऊन फिरू लागला.'' (पृ.२२,२३)

वरील निवेदनातून तुकाराम फराटेंचा शैक्षणिक क्षेत्रातील व इतरही कामाचा विस्तार, भ्रष्टाचार, गुंड प्रवृत्ती निदर्शनास येते.

**५. कलियुग :**

''कत्र्यांनी आपली कॉलर पकडून हिसका देऊन आपणाला सुपरवायझर गाडगीळच्या खुर्चीवरून खाली खेचलं. जगतापच्या ध्यानातच आलं नाही काय चाललंय ते. उभा झाल्यानंतर त्याच्या ध्यानात आलं की कंपनीचे एक बडे साहेब असलेल्या कत्रेसाहेबांनी, आपल्या मानगुटीला धरून आपणाला खुर्चीतून उठवून उभे केले आहे. आणि ते रागाने संतापाने डोळे लाल करून आपल्याकडे बघतायेत. त्यांनी आपणाला एक शिवीही घातली आहे.

हे सगळं इतकं अचानक घडलं की, जगतापला काहीच प्रतिक्रिया त्याक्षणी व्यक्त करता आली नाही.'' (पृ.१४)

वरील निवेदनातून अधिकारी असलेल्या कऱ्यांची नाराजी, आक्रमकता आणि जगतापची असहायता दिसून येते.

**६. देवाची घंटा** :

''आज शनिवार होता. गोप्याभट त्या दिवशी दिवसभर उपास करी आणि रात्री एकदाच जेवी. त्यामुळे तिनं शनिवारी मासे आणणं बंद केल होतं.

मासे नसल्यामुळे शंकऱ्याला थोडं वाईट वाटलं; पण शनिवार असल्यामुळं गोप्याभट रात्री येताना खूप कायमाय घेऊन येणार, याची त्याला खात्री होती.

तो भाकरी खाऊन ऊठला आणि खेळायला पळाला.'' (पृ.१०)

वरील निवेदनातून येसू, गोप्याभट यांची श्रद्धा दिसून येते तर येसूचा गोप्याभटाविषयी आदर प्रतित होतो.

''गोप्याभटाचं अंथरूण एका भिंतीच्या कडेशी पडल्यानं शंकऱ्याची पंचाईत होऊ लागली, ती अभ्यासाला बसण्याची. तो नेहमी दाराशी बसे. इतर वेळीही त्याच्या खोलीत त्याला अभ्यासासाठी ऐसपैस जागा मिळत नसेच; पण आता गोप्याभट चोवीस तास एका कोपऱ्यात पडलेला असल्यानं व तो सतत हूं हूं करीत पिरंगत असल्यानं शंकऱ्याला अभ्यास करताना संकोचल्यासारखं होऊ लागलं व कविता पाठ करताना गोप्या भटजींचं हूं हूं त्याच्या स्वरात मिसळून जाऊ लागलं.....'' (पृ.७०)

वरील निवेदनातून गोप्याभटाचे आजारपण, जागेची कमतरता शंकऱ्याच्या अभ्यासात अडथळा ठरत असल्याचे निदर्शनास येते.

**७. नो सेंटिमेंटस् प्लीज** :

''स्वयंपाकाच्या खोलीतून कपबशीचा विशिष्ट आवाज येईपर्यंत तो बैठकीच्या खोलीत वर्तमानपत्र चाळत राहिला. बातम्यांवरून त्याचे डोळे फिरत होते; पण त्याच्या कानात घुमत होते डॉक्टरांनी उच्चारलेले शब्द! नो होप्स, मि. पंडित, नो होप्स, नो होप्स..... तो ध्वनी आपल्या

कानात प्रचंड मोठ्यानं घणघणतोय असं त्याला वाटू लागलं त्यानं डोकं गच्च दाबून धरायचाही प्रयत्न केला.'' (पृ.२४)

वरील निवेदनातून मि. रमेश पंडित यांची मानसिक अस्वस्थता प्रकट होण्यास मदत होते.

''त्याच्या बुद्धीनं त्याला निर्णय दिला– नाही! हे पाप नाही. ही अनीती नाही. हे पुण्यकृत्य आहे. ही माझी विचारसरणीच बरोबर आहे. मला त्यांच्यापैकी कोणीही फसवलेलं नाही. शेवटी नीती आणि अनीती पापपुण्य यांचे संदर्भ तरी काय आहेत? धर्मशास्त्रानं ज्या पुरुषाचं ज्या स्त्रीशी लग्न लावून दिलेलं असेल त्यांचा लैंगिक व्यवहार हाच तिला नैतिक आणि पुण्यप्रद; आणि अपत्यसंभवासारख्या शारीरिक, मानसिक गरजेच्या पूर्तीसाठी इतर स्त्री–पुरुषांचा होणारा लैंगिक व्यवहार हा अनैतिक! हे कोणी ठरविलं? लग्नबंधनांनी एकत्र येऊ न शकलेल्या; पण एकमेकांवर प्रेम असलेल्या स्त्री–पुरुषांनी प्रेमाची असीम उत्कटता व्यक्त करण्यासाठी एकमेकांशी संभोग केला; तर ते तरी अनैतिक आणि पाप कसं?'' (पृ.८३,८४)

वरील निवेदनातून एकमेकांना न फसवता एकमेकांच्या संमतीने केलेल्या कृतीला पाप, अनिती न मानण्याचा विचार प्रकट होतो.

**८. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

''ती आपल्या खुर्चीत बसली. खुर्ची झुलली आणि तिलाही झुल्यावर बसल्यासारखं वाटलं. केतकी साने : मोर्केटींग मॅनेजर. एव्हरफ्रेश केमिकल प्रॉडक्टस् लिमिटेड. थोडा वेळ, म्हणजे अगदी एक–दोन मिनिटं ती स्वस्थ बसली. कुठून सुरूवात करावी, याचा विचार करीत. कालपर्यंतची गोष्ट वेगळी होती. डिपार्टमेंटचा प्रमुख दुसरा कुणीतरी होता. निर्णय घेण्याची जबाबदारी दुसऱ्या कुणाची तरी होती. पंधरा दिवसांपूर्वीपर्यंत देसाईंची. चांगली ऑफर आली म्हणून देसाई सोडून गेली. त्यानंतरच्या पंधरा दिवसात जबाबदारी कोणाचीच नव्हती. फार जबाबदारी नसलेले निर्णय ती घेत होती. थोडीशी जबाबदारी आहे अमुक एक निर्णय घेण्यात, अशी शंका आली तर थेट एम.डी. ना विचारायचं आणि त्यांचा आदेश म्हणून काय ते करायचं. आपली जबाबदारी मर्यादित होती. आजपासूनचं वेगळं. जबाबदारी आपण घ्यायची. निर्णय आपण

घ्यायचे. निर्णयानंतर येणारी जबाबदारीही आपलीच. झेपेल का हे आपणाला? का ....... ” (पृ.८)

वरील निवेदनातून केतकी साने या मार्केटींग मॅनेजर पदावर विराजमान झाल्यावर त्यांच्या मनात येणाऱ्या विविध प्रश्नांचा मागोवा घेण्यात आला आहे.

“अविनाश साने आपल्या ऑफिसात पोचला तरी तो कालच्या मन:स्थितीतून बाहेर आला नव्हता. काल संध्याकाळी तो आपल्या पत्नीबरोबर बागेत गेला असताना झालेल्या त्या दोघांचा संवाद दोघांच्याही मनात एकमेकांबद्दलचा दुजाभाव निर्माण करून गेलाच. हॉटेलात त्यांनी जेवण घेतलं पण विशेष काही न बोलता. रात्री झोपतानाही त्यांनी एकमेकांचा स्पर्श टाळला होता. गेल्या आठवड्यात ती दोघं किती ओढीने आणि उत्कटतेने एकमेकांना भेटत होती. तो किती मनापासून खूष झाला होता. त्याने तिला तिची नवी जबाबदारी पेलण्यासाठी केवढा दिलासा देऊ केला होता. आणि काल ती म्हणाली होती – आय मस्ट एक्स्टलॉइट द सिच्युएशन! सनशाईन बाजारात जात नाहीय, तिथं पोकळी निर्माण झालीय. ती पोकळी केतकी आपला माल टाकून भरून काढणाराय–” (पृ.४९)

वरील निवेदनातून पती–पत्नी यांच्यातील व्यवसायातील स्पर्धा त्यांच्या नात्यातही ताण निर्माण करत असल्याचे सूचन येते.

**९. मार्केट** :

“अहुजांना आयडिया सेल करण्यात केळकरांनी मोठीच कल्पकता आणि समयसुचकता दाखवली होती. अहुजांची आणि त्यांची भेट अचानक झाली होती आणि बोलता बोलता केळकरांनी ही कल्पना त्यांच्या डोक्यात घुसवली होती. गद्रे दोघांचा कॉमन फ्रेंड. एकमेकांची ओळख झाली. गद्रे यांनी ड्रिंक्स काढली. मग तिघांच्या गप्पा बऱ्याच रंगल्या. इनफॉर्मल झाल्या. बोलता बोलता कामगारांचे संप आणि बंद हा विषय निघाला. तिथून कामगार संघटनांतील राजकारण, कामगारांच्या मागण्या, ॲग्रीमेंट्स, कामगारांना द्यावयाचा बोनस, एक्सग्राशिया पेमेंट आणि दिवाळी भेटी असे विषय गप्पांत येत गेले. बोलता बोलता केळकरांच्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली.” (पृ.१५)

वरील निवेदनातून केळकरांची चतुराई आणि ड्रिंक्सचा उपयोग करून केळकरांनी अहुजांना आपल्या गप्पांच्या ओघात फसवल्याचे दिसून येते.

**१०. प्रास्ताविक :**

"श्रीकृष्णाच्या भक्तीपायी अलीकडे अलीकडे त्यांच्या मनात अध्यात्माचे आणि विरक्तीचे विचारही घोळू लागले होते. अध्यात्माचा त्यांनी विचार केला नव्हता. पण गीतेत सांगितलेला कर्मयोग त्यांना पसंत होता. गीताभाष्ये त्यांनी अभ्यासली नव्हती. पण त्यांच्याच बंगल्यावर मुक्कामाला राहून प्रवचने देणाऱ्या स्वामींच्या तोंडून त्यांनी गीतेचा अर्थ श्रवण केला होता. तेव्हापासून त्यांच्या मनात गीतेचं तत्त्वज्ञान आणि विरक्ती यांचे विचार येऊ लागले होते. त्यामुळे अलीकडे ते म्हणतही अनेकदा, आणखी दोनतीन कारखाने नीट सुरू करून ते मार्गी लावून दिले की आपण निवृत्त होणार." (पृ.४९)

वरील निवेदनातून शेटजींच्या आध्यात्मिक प्रवृत्तीवर प्रकाश पडतो.

"त्यांच्या प्रेसच्या आवारात गेटपाशी कामगारांची सभा चालूच होती. त्यांच्यातला दुसरा कोणीतरी भाषण करीत होता. अधिकच घणाघाती बोलत होता. गरज पडली तर अगदी या क्षणापासून संप सुरू करण्याची घोषणा त्यानं केली आणि त्याच्याही उद्गारांना जोरदार टाळ्यांनी कामगारांनी प्रतिसाद दिला. घोषणा देण्यात आल्या –

हमारी युनियन – हमारी ताकद

लडके लेंगे – लडके लेंगे – हमारी मांगे लडके लेंगे" (पृ.१२०)

वरील निवेदनातून कामगारांच्या मागण्या, संप, युनियन इ. कारखानदारी, औद्योगिक जगतातील प्रश्न निदर्शनास आणून देतात.

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील निवेदनाचा विचार करता ही निवेदने कादंबरीच्या कथानकाला पूरक आणि कथानक पुढे नेण्यास मदत करताना दिसतात. कादंबऱ्यांमधील विविध घटना प्रसंग मांडण्यासाठी, पात्रांच्या भावभावना, विचार–विकार, राग–लोभ, मानसिक घुसमट एखाद्या व्यक्ती–घटना–प्रसंग यांच्या विषयीच्या क्रिया–प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी कधी प्रथमपुरुषी तर कधी त्रयस्थ निवेदनपद्धतीचा उपयोग करून, कधी सर्वज्ञाच्या भूमिकेतून तर कधी

सर्वसाक्षीभावाने पात्रांचे अंर्तमन व त्यांचे बाह्यवर्तन ह. मो. मराठे अशा निवेदनांमधून प्रभावीपणे टिपतात. या निवेदनांमधून पात्रांचा शहरी वा ग्रामीण स्तर, त्यांचे आचार–विचार, रूढी–परंपरा, परिसर उलगडण्यास मदत होते.

## २. स्वगत :

पात्रांच्या उक्ती–कृतीतून कथा–कादंबऱ्यांमधील पात्रांचे व्यक्तिमत्त्व आकाराला येत असते. नाट्यात्म संवादामधून कथानकाला पुढे नेण्यास मदत होते. मात्र संबंधित पात्राला अभिव्यक्त करता येत नाही. एखाद्या पात्राच्या जीवनात घडलेला घटनेचा त्याच्या मनावर जो परिणाम होतो तो परिणाम ते पात्र इतर पात्रांबरोबर व्यक्त करीलच असेही नाही. अशावेळी त्या पात्राच्या मनातील त्या घटना–प्रसंगांच्या वा व्यक्तींच्या अनुषंगाने ज्या क्रिया–प्रतिक्रिया, मते, विचार असतात ती अशा स्वगतांच्या माध्यमातून लेखक मांडत असतो. येथे पात्र कुणाशीही बोलत नसून ते स्वत:शीच बोलण्यातून–स्वगतातून व्यक्त होते. एकूणच अशी स्वगते कथा–कादंबऱ्यांची कथानके–आशयविश्व पुढे नेण्यास मदत करीत असतात.

## कथासंग्रह :

### १. सापेक्ष :

**सापेक्ष :**

सिनियर असिस्टंट एडिटर कामात व्यग्र असतानाच प्रधान त्यांच्या ऑफिसात येतात परंतु प्रधानांशी संवाद न साधता त्यांना टाळण्याच्या उद्देशाने ते आपलं काम तसेच चालू ठेवतात. ‘‘माझं हाती घेतलेल काम संपलं. आता समोर बसलेल्या माणसाशी उपचार म्हणून तरी बोलायला हवं होतं. पण मी ते न करता इतर कामं करू लागलो. टपालातून आलेल्या बातम्यांवरून नजर फिरवणं, आजच्या स्फुटांचे विषय शोधणं, डेली मीटिंगच्या दृष्टिने काही पॉईंटस् मनाशी जुळवणं......

मी त्याच्यासमोर वर्तमानपत्र टाकलं होतं आणि कामात असल्याचं त्याला दाखवून देत होतो. जवळ जवळ अर्धा पाऊण तास तो तसाच बसून होता. वर्तमानपत्र वाचीत होता. कामात असतानाही मी अधूनमधून डोळ्याच्या कोपऱ्यांतून चष्म्या–आडून बघत होतो. तो कंटाळून जातो

का यासाठी.'' (पृ.२) मनाविरूद्ध गोष्टी न करण्यासाठी तो प्रधानला टाळताना दिसतो. समाजात सर्व स्तरावर चालणाऱ्या अशा गोष्टींवर या स्वगतातून मराठे प्रहार करताना दिसतात.

**प्रतिनिधी** :

संपादकांना कामात किती सजग रहावे लागते. सर्व सहकाऱ्यांच्या त्रुटींचा परिणाम संपादकाच्या कामावर कसा होतो ते पुढील स्वगतातून मराठे व्यक्त करताना दिसतात,

''पंधरा दिवसांत तो लेख घेऊन आला नाही. पुढल्या पंधरा दिवसांतही नाही. मी अस्वस्थ झालो. लेखकांना दिलेल्या विषयावरचे लेख वेळच्यावेळी हाती आले नाहीत की संपादकानं अस्वस्थ होणं स्वाभाविकच असतं. त्याला दिलेला विषय तसा फार तात्कालिक महत्त्वाचा नव्हता, हे खरं. पण एकदा लेख हाती येऊन तो फाईलला लावून ठेवला की निश्चिंत वाटतं. सोयीनुसार कोणत्याही महिन्याच्या अंकासाठी तो प्लॅन करता येतो. तो ठरलेल्या वेळी आला नाही म्हणून त्याला एकदोन पत्रं पाठवली, त्यालाही उत्तर नाही.'' (पृ.१०७,१०८) कामात प्रामाणिकपणा असल्याने या संपादकाला पत्रकाराच्या हलगर्जीपणामुळे अस्वस्थता आल्याचे जाणवते.

**देशात साल काही घडतच नाही** :

देशातल्या गरीब परिस्थितीकडे स्वत:च्या नजरेतून बघताना या कथेतील पत्रकार नायक म्हणतो,

''गरिबीची देशांतली रडकथा सगळीकडे सारखीच असते आणि ती ऐकून तिचा कंटाळाही येतो– मलाही आला होता. हा रिक्षावाला माझ्या मनात घुसून बसण्याचं कारण नव्हतं. तरी तो बसला होता. कारण सकाळी जागा झाल्या झाल्या मला सर्वात आधी तो आठवला होता. आणि त्याच्याविषयी माझ्या मनात काळजी निर्माण झाली होती.'' (पृ.१३८) देशात सर्वत्र गरिबीने सर्वसामान्य माणूस त्रासला असून पैसेवाल्यांना तो विषय ऐकायलाही नको वाटत असल्याचे चित्र या स्वगतातून समोर येते.

**२. वीज :**

**खुर्ची :**

या कथेतील नायक व्यवसायात अपयशी होऊन मानसिक दडपणाखाली घरातच एका खुर्चीत स्वत:ला आक्रसून घेत खुर्चीत बसून राहतो. स्वत:ला घरात कोंडून घेतलेल्या अवस्थेमुळे त्याच्या मनातील विचारांना वाट करून देताना तो म्हणतो,

''गेल्या किती दिवस आपण बाहेर गेलेलो नाही. खोलीच्या बाहेर पडायचं ते फक्त संडासाला जाण्यापुरतं. तेही कुणाचं लक्ष नाही, असं बघून पटकन खोलीबाहेर पडायचं आणि तसंच पटकन् आत जायचं. कुणाशी बोलायचं नाही की कुणाची चवकशी करायची नाही. त्यापेक्षा इतर कारणांसाठी बाहेर जाणं नाही. बाहेरच्या जगाशी आपला काही संबंधच उरला नाही. आपलं दुकान, आपल्या दुकानावर येणारी माणसं, आजूबाजूचे दुकानदार, व्यापारी, सगळा गजबजलेला परिसर – त्या सगळ्या जगाचा आणि आपला संबंध तुटून गेला आहे.'' (पृ.१५३) अपयशी झालेल्या व्यक्तीचे सर्व संबंध तर तुटतातच परंतु ती व्यक्ती स्वत:वरील विश्वासही गमावून बसत असल्याचे चित्र येथे स्पष्ट होताना दिसते.

**३. ज्वालामुख :**

**शाई आणि रक्त :**

संपादकाचा अनुभव पुढील स्वगतातून व्यक्त होतो.

''या साप्ताहिकाच्या दिवाळी अंकाला मी जी गोष्ट देतो, त्याबाबत आणखी एक किरकोळ जादा प्रकार असतो. तो म्हणजे मला पाहिजे तसं चित्र मी विनयकडून करून घेऊन पाठवून देतो. यात दोन तीन प्रकारची सोय असते. एक म्हणजे त्या संपादकाला माझा मजकूर कितीही उशिरा मिळाला तरी चालतो कारण मजकूर कंपोज होईपर्यंत मी चित्रही पाठवून देतो. संपादकाचा वेळ वाया जात नाही. कारण या घाईच्या दिवसांत चित्रकार चारचार दिवस कथा वाचायला घेतात. हा वेळ वाचतो. संपादकाच्या डोक्याला चित्रकार गाठा, चित्र करून घ्या हीही चिंता नसते. गोष्ट समजा आज पाठवली तर चित्र आजपासून तिसऱ्या दिवशी मी पाठवून देतो. गोष्ट कंपोज होऊन तयार होईपर्यंत चित्र संपादकाला मिळतं. ब्लॉक झाला की गोष्टीची पानं छापायला तयार होतात.''

(पृ.१७८) योजनापूर्ण पद्धतीने काम केले तर ते यशस्वी आणि सर्वांच्या वेळेची व श्रमाची बचत करणारे ठरते हेच येथे नमूद होते.

हा लेखक कथा लिहितो. तिचे कल्पनाचित्र रंगवतो. भविष्यात त्याचे काय परिणाम होऊ शकतात आणि त्या सर्व परिणामांचा स्वत:वर कसा परिणाम होतो ते सांगताना तो म्हणतो,

"मी माझ्या घरात अंथरूणात आहे. क्वाइट सेफ. अगदी सुरक्षित. अगदी सुरक्षित. मी डोळे मिटून घेतले. छातीची धडधड कमी होण्यासाठी श्वासोच्छवास नियंत्रणाखाली आणू लागलो. शांतपणे श्वास घेऊ लागलो. दीर्घ नि:श्वास सोडू लागलो. मन स्थिर करू लागलो." (पृ.११२) या स्वगतात हा नायक स्वप्नेरी दुनियेतून वास्तवात येतो तेव्हा तो स्वत:ला सुरक्षित आणि निश्चिंत समजत जातो. स्वप्न आणि वास्तव या दोन्हींमधील फरक या स्वगतातून स्पष्ट होतो.

**४. पक्षिणी :**

**पाट :**

या कथेतील नायक जेव्हा आईचे छत्र हरवून बसतो तेव्हा त्याच्या घरातल्या वातावरणाविषयी बोलताना म्हणतो,

"आताशा बाबा नुसते गुडघ्यात मान घालून बसतात. जेवायला बोलावलं तरी उठत नाहीत. उठले तर जेवताना किती वेळ नुसते बसून असतात. आई गेल्यापासून दादा आमच्या घरी जायला भितो. तेव्हापासून तर जावडेकरांच्या पडवीत बिऱ्हाड केलं. बाबांचं आपलं एकच. गुडघ्यात मान घालून बसणं. कधी कधी आढ्याकडे बघत. भात आमटीशी जेवायचं तेही विसरले. भात तर भातच खात बसतात. दादा रांधतो. मला जमत नाही. मी आपला पाटावर भांडी घासतो–" (पृ.१८) वरील स्वगतातून घरातील स्त्रीचे महत्त्वपूर्ण स्थान अधोरेखित होते.

**विरुप :**

या स्वगतातून या नायकाच्या घरातील वातावरण समजण्यास मदत होते.

"आपण आपल्या बापावर उगीचच राग धरतो. त्यांचा काय दोष? शिक्षण नाही, नोकरी नाही. भांडवल नाही. म्हणून ओढग्रस्तीचं आयुष्य त्यांच्या वाट्याला आलं. त्यांच्यामुळे आमच्या, माझ्या आईच्या, बहिणीच्या म्हणून कटकटी, भांडण, त्रागा, वैताग, एकमेकांना शिव्याशाप.

एकमेकांचे प्राण घ्यायला तयार होणं. आपणच हे आता थांबवण्यात पुढाकार घ्यायला हवा. नोकरी पकडायला हवी तोपर्यंत रिक्षा चालवूनही पैसा कमवायला हवा." (पृ.८७) या स्वगतातून नायकाला परिस्थितीच्या अनुभवाने स्वत:च्या पायावर उभे राहण्याच्या शहाणपणाची जाणीव झालेली दिसून येते.

**५. दावं :**

**कापुरुष** :

या कथेतील नायकाला पत्नी सोडून जाते तेव्हा तिच्याविषयीच्या विचारांना वाट मोकळी करून देताना हा नायक म्हणतो,

"काल संध्याकाळी सुनिला आपणाला सोडून गेली– आपला अखेरचा निरोपही न घेता त्या अपेक्षेने आपण खिडकीत उभे होतो. पण तिनं वळून बघितलं नाही. आपणाला तोडून, झिडकारून गेली. शेवट गोड व्हायला हवा होता. आपण तिला पोचवूनही आलो असतो. तिच्या ठिकाणापर्यंत. मित्राला मैत्रिणीला निरोप देऊन यावं तेवढ्या मनापासून. तेवढ्या सहज. रात्री ती कुठं राहिली असेल? मित्राकडे, की हॉटेलात, की रेल्वेस्टेशनवर? उफ्! ती खरच रेल्वेस्टेशनवर राहिली असेल– घरदार नसल्यासारखी?" (पृ.२३) वरील स्वगतातून या नायकाचे पत्नीप्रेम, तिच्याविषयीची काळजी दिसून येते.

**विहीर** :

या कथेतील स्वगतातून वासू आपल्या कौटुंबिक समस्यांचा विचार करताना दिसून येतो,

"वासूला प्रश्न पडला. आईचं खरं, की दामूचं खरं? तिची गोपाळ वझ्याशी आधीपासूनच भानगड होती; की आईच्या छळाला, तिरसटपणाला वैतागून ती पळून गेली? वासूला दुसऱ्या गोष्टीचीच शक्यता अधिक वाटायला लागली. आईच्या आधाशी स्वभावाची त्याला चांगली कल्पना होती. रागावलेली, तिरसटपणे बोलणारी, सतत आधाशी, हपापलेली अशीच आई त्याला माहीत होती. लाचार खुळ्यागत वागणारा भिक्षुक बाप आणि असली ही आई." (पृ.१७५) या स्वगतातून वासूच्या माध्यमातून लेखक त्यांच्या आईची स्वभाववैशिष्ट्ये मांडतो.

६. **इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**पायाशी :**

सिनियर एक्झिक्युटिव्ह आणि लेखक असलेला नायक अत्यंत कष्टाने आणि गरिबीतून वर आलेला. त्यामुळे तो सुखाची समाधानाची तृप्ती अनुभवताना स्वत:विषयी म्हणतो;

"एकाएकी त्याला वाटलं–आपल्यासारख्या माणसाच्या मनात मुळी ही आत्मतृप्तीची कल्पना आलीच कशी? आपल्यासारखा म्हणजे प्रखर समाजवास्तवाशी नातं सांगणाऱ्या. लेखनात जो प्रखर वास्तवाचे चटके आणि आग चितारतो त्याला, या आत्मतृप्तीच्या भावनेचा स्पर्श तरी कसा काय झाला?" (पृ.४०) या नायकाच्या वागण्या–विचारात आलेली तफावत या स्वगतातून व्यक्त झालेली आहे.

**मैत्र :**

या कथेतील विवेक दामले आपल्या नवीन ठिकाणच्या कामाचा अनुभव स्वगतातून व्यक्त करतात,

"मला बरं वाटत होतं. दिवसभर खूप कामात होतो. काम नवीन नव्हतं, पंचवीस वर्षाचा अनुभव असला तरी जागा नवीन होती. संस्था नवीन होती, माणसं नवीन होती, त्यांचे स्वभाव नवीन होते. पहिल्या दिवशी आपल्याबद्दल सर्वांच मत बरं होईल अशी काळजी घेऊन मी वागत होतो. त्याचं एकप्रकारचं टेन्शन नाही म्हटलं तरी मनावर होतंच. ते निघून जात होतं व्हिस्कीच्या एकेका घोटाबरोबर. आमच्याकडली माणसं, वातावरण त्याला माहीत होतच. काही काही माणसांबद्दल त्यांची मतं विचारली. त्यानं आपणहूनच काहीजणांबद्दल सांगितलं. माझी काही सर्वांची नावं पाठ झाली नव्हती. पण त्याला मात्र आमच्या संपादकीय स्टाफमधील बहुतेकांची नावं माहीत होती." (पृ.२७४) या स्वगतातून नवीन ठिकाणी काम करताना पुरुषांना कोणते ताण असतात, कोणती काळजी घ्यावी लागते त्यांचा नवीन अनुभव कसा असतो याची कल्पना येते.

**७. घोडा :**

**घोडा** :

सुधाकर बापटला जोगसाहेबांकडून एम.डी. कडून अन्याय सहन करावा लागतो तेव्हा त्याच्या मनात अन्यायाला विरोध करण्यासाठी विचारचक्र सुरू होते तेव्हा तो म्हणतो,

"रघुनाथ सोमण बावळट होता म्हणून त्याने राजीनामा लिहून दिला. आपण नाही देणार. आपण काय तुमच्या दयेमुळे इथं आहोत. साला घासतोय इथं आठ तास म्हणून फेकताय कवड्या. त्याही कुंथत. रघुनाथवर सरळ–सरळ अन्याय झाला आणि त्यानं तो सहन केला. पुअर गाय! त्यानं निदान भांडायला पाहिजे होतं, बंड करायला हवं होतं. आपणावर अन्याय होतोय एवढी रिॲक्शन तरी व्यक्त करायला हवी होती. युनियनला सांगायचं नाहीतर शेवटी लेबर कमिशनर, पण साला एम.डीं. च्या नजरेलाच भ्याला असेल." (पृ.२०) या स्वगतातून सुधाकर बापटच्या मनात अन्यायाविरूद्ध पेटत असलेली ज्वाला दिसून येते. अन्याय सहन करणे हे भ्याडपणाचे आहे असेही त्याचे मत दिसून येते.

**न्यूज स्टोरी** :

हिंदुस्थान ऑफिसचे चीफ सब असलेले गाडगीळ इमारत कोसळून मेलेल्या अर्थकाविषयी सहानुभूती वाटून म्हणतात,

"पहिल्या पानावरची मेजर बातमी मला सापडली होती मी भाषांतर हाणू लागलो. मुलाखतीचा मजकूर बराच होता. एकूण सूर जोरदार टीकेचा होता. भाषांतरही तेवढंच जोरदार व्हायला हवं होतं हा पहिल्या पानावरचा मेजर आयटेम होता आणि मी तो तसाच करणार होतो. भाषांतर करताना माझ्या मनात येत होतं – आता सत्तेच्या साठमारीचा खेळ पुन्हा एकदा सुरू होणार आहे. मंत्रिमंडळ कोसळेल किंवा आमदार साळुंखे याला मंत्रिपद मिळेल, पण याच्यापैकी कोणालाच त्या इमारत कोसळून मेलेल्या अर्थकाच्या दु:खाचं मात्र सोयरसुतक वाटणार नाही. बदमाष साले." (पृ.२३९) या स्वगतातून ह. मो. मराठे राजकीय वातावरणात माणुसकी कशी नाहीशी होते आणि सत्तास्पर्धा कशी सर्वसामान्य माणसाची पिळवणूक करते याचे बोलके उदाहरण दाखवून देतात.

## ८. युद्ध :

**युद्ध :**

जनरल मॅनेजर जोग शेटजींना म्हणजेच मालकांना भेटायला जाताना मालकांच्या मातोश्रींच्या स्मृतीदिनाच्या दिवशी घडलेल्या घटनेच्या संदर्भात मालकांची काय प्रतिक्रिया येईल यावर विचार करतात.

“काय सांगावं याचा माझ्या मनाशी निर्णयच होत नव्हता. तो कामगार अकस्मात येऊन टपकला असं सांगितलं असतं तरी त्यांनी तेच विचारलं असतं. तुमच्या कामगारांवर तुमचा वचक नाही काय? आणि त्यांनी असा प्रश्न विचारला असता तर त्याचा सरळ अर्थ असाच झाला असता. तुम्ही जनरल मॅनेजर पदावर बसायला लायक नाही. मी असा खुलासा केला नसता तर त्यांनी अर्थ लावला असता – तुमची फूस होती त्याला.” (पृ.३२) वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कात्रीत सापडणाऱ्या कनिष्ठ अधिकाऱ्याची दयनीय अवस्था येथे टिपली आहे.

जनरल मॅनेजर जोग कामगारांनी केलेल्या संपामुळे भयंकर संतापतात, अस्वस्थ होतात,

“या सगळ्यानं मला भयंकर संतापायला झालं. या सगळ्या प्रकारांबद्दलच माझ्या मनात खोलवर नफरत आहे ते लाल फडकं बघितलं की माझ्या तर तळपायाची आग मस्तकात जाते. कारण मला नीटसं सांगता येणार नाही. मी त्याबद्दल कधी विचारही केलेला नाही. पण ती लाल फडकी बघितली की घ्यावी अन् टराटर फाडून टाकून द्यावी असं मला वाटू लागतं.” (पृ.४७) संप, लाल झेंडे यांचे परिणाम कामावर कशाप्रकारे होतात हे जोग साहेबांना माहीत असल्याने त्यांना या लाल झेंड्यांचाच तिरस्कार स्वगतातून व्यक्त होतो.

**माकडीण आणि पिल्लू :**

असिस्टंट एडिटर टु हाऊ जर्नल्सचे जोगळेकर आपल्या वरिष्ठ अधिकारी मिसेस तेंडुलकराचे आपल्याविषयीचे मत मांडताना म्हणतात,

“मिसेस तेंडूलकरांचं मत माझ्याबद्दल आणि माझ्या कामाबद्दलही चांगलं बनत गेलं. माझं प्रोबेशन होत सहा महिन्यांचं. पण स्वत: मिसेस तेंडूलकरांनी अहलुवालियांना सुचवलं – धीस चॅप इज डुइंग वेल. स्पेशल केस म्हणून आपण त्यांचं प्रोबेशन चार महिन्यांतच संपवून त्याला कन्फर्म

करू आणि रेग्युलर स्केल देऊन टाकू आणि आपण अहलुवालियांना असं सांगितल्याचं त्यांनी लगेच मला सांगूनही टाकलं.'' (पृ.१०२) वरिष्ठांची मर्जी सांभाळली, कामात प्रामाणिकपणा ठेवला तर नोकऱ्या मिळविणे आणि त्या टिकवणे कठीण नसल्याचे या स्वगतातून स्पष्ट होते.

''मी शांतपणे सुलभाच्या म्हणण्यावर विचार करू लागलो. बराच वेळ कुठल्या कुठल्या दिशेनं विचार करीत गादीवर पडून राहिलो. तसाच झोपी गेलो. मध्येच केव्हातरी जागा झालो. तो या जाणिवेनं – नवी खोली घ्यायची म्हणजे आता दहा हजार हवेत. या खोलीसाठी डिपॉझिट म्हणून दिलेले पाच हजार जरी परत मिळाले तरी आणखी पाच हजार उभे करायला हवेत. म्हणजे पुन्हा बँक लोन – म्हणजे सॅलरी सर्टिफिकेट. म्हणजे नोकरी हवी.'' (पृ.१३१) या स्वगतातून नायकाच्या आर्थिक समस्या, जागेच्या समस्या समोर येतात.

**अंगार :**

कामगारांच्या मागण्या मालकांपुढे मांडण्यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यावाच लागतो. तो पुढाकार महाजन घेतात. या प्रसंगाविषयी मोटे म्हणतात,

''आमचा एकूण ग्रुप सात–आठ जणांचाच. तशी आमची काही युनियन नव्हती की असोसिएशन नव्हती. पण आमच्या मागण्या मॅनेजमेंटसमोर मांडताना महाजनने लीड घेतला. तोच आम्हांला घेऊन मॅनेजरांकडे गेला. तोच बोलला. वाटाघाटी ज्या काय करायच्या त्याही त्यानंच केल्या आणि आपण आपल्या सर्व मागण्या मान्य झाल्या नाहीत तर एकाही बाबतीत मॅनेजमेंटची ऑफर स्वीकारायची नाही हेही त्यानंच सांगितलं ठामपणे, म्हणूनच याला आम्ही पुढारी मानायला सुरूवात केली.'' (पृ.२०७) कामगारांच्या मागण्या मॅनेजमेंटसमोर मांडण्यासाठी कामगारहीत पाहणाऱ्या नेत्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन या स्वगतातून मराठे करताना दिसतात.

**लाव्हा :**

ॲडइंप्रेस प्रा. लि. चे सुधाकर भावे आणि वसंत कणेकर यांच्या संभाषणातून कणेकर भावेंना मोठा पगार मिळतो म्हणून आश्चर्य व्यक्त करतात. ते न आवडल्याने भावे स्वगतातून त्याच्यांविषयी प्रतिक्रिया व्यक्त करतात,

“त्याच्या स्वरात खंत होती की उपहास हे मला नक्की अंदाजता आलं नाही. पण पहिल्याच ओळखीत त्यानं अशी प्रतिक्रिया व्यक्त केली हे मात्र मला खटकलं. आमचा दोन दोन हजार रूपये पगार म्हणजे काही फार नव्हता. माझ्या वयाच्या इतर अनेकांनी वेतनाची ही पातळी कधीच गाठलेली मला माहीत होती. बँकेत ऑफिसर झालेले, प्रायव्हेट इंडस्ट्रीत मॅनेजेरियल लेव्हलवर काम करणारे, इतकच काय, स्वत:चे व्यवसाय करणारे माझ्या वयाचे व माझ्यापेक्षा कमी बुद्धी असणारे अनेकजण माझ्यापेक्षा जास्त मिळवून राहिले होते. त्यामुळे माझ्या या वेतनबद्दल हेवा करण्यासारखी, दुस्वास करण्यासारखी किंवा उपहासही करण्याजोगी परिस्थिती नव्हती.” (पृ.२४६) भावेंच्या मनात कणेकरविषयी नाराजीची भूमिका या स्वगतातून स्पष्ट होताना दिसते.

कष्टकरी जनतेचे लढे लढवीत असल्याचा आणि आयुष्य त्यासाठीच वाहून घेतल्याचा विचार कणेकर बोलून दाखवतात आणि भावेंना जनतेची दिशाभूल करून पैसे कमवत असल्याचा आरोप करतो तो आरोप सहन न झाल्याने त्याला सरळ प्रत्युत्तर न देता भावे स्वगतातून आपले विचार प्रकट करतात.

“त्याचे उद्‌गार माझ्या लक्षात राहिले. आम्ही कष्टकरी जनतेचे लढे लढवीत आयुष्य संपवायचं. त्याने असे कितीसे लढे लढवले ते तरी समजून घ्यावं असं मी ठरवलं. तो तसा नेहमीच आता भेटला असता. पुढच्या भेटीत त्याला थोडसं चिडवायचं असं मी ठरवून टाकलं.” (पृ.२६०) या स्वगतातून कणेकर आणि भावे यांचे आरोप–प्रत्यारोपाचे, तिरस्काराचे सत्रच सुरू राहणार असे वाटते.

ह. मो. मराठे यांच्या कथांमधील स्वगतांचा विविध अंगांनी विचार करता, ही स्वगते कधी मनाविरूद्ध घडणाऱ्या घटना टाळण्यासाठी लोकांनाच टाळतात, तर कधी या पात्रांना दुसऱ्यांच्या हलगर्जीपणाचा त्रास सहन करावा लागतो.

गरिबी आणि श्रीमंतीची दरीही स्वगतातून स्पष्ट होते तर गरीबीमुळे आलेले अपयश माणसाचा आत्मविश्वासही गमावते, नियोजनाचा अभाव माणसाला अयशस्वी करतो तर

अनुभवाचे शहाणपण माणसाला प्रगतीपथावर नेते, कामाच्या ठिकाणी, घरात पाळावयाचे शिष्टाचार, काळजी यांच्यावरही ह. मो. मराठे यांनी या स्वगतातून प्रकाश टाकलेला दिसून येतो.

या कथातील पात्रे स्वगतातून अन्यायाची चिड प्रकट करतात तर कधी संवेदनाशून्य मानसिकता व्यक्त करतात. ही पात्रे स्वगतातून आपल्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, नोकरी, व्यवसाय, जागा, शिक्षण इ. समस्यांवर दिशानिर्देश करताना दिसतात. नात्यांमधले ताणतणाव, तिरस्कार, स्वभाव वैशिष्ट्येही समजून घेण्यास स्वगत हे प्रभावी माध्यम ठरत असल्याचे दिसते. मराठे यांच्या कादंबऱ्यांमध्येही अशी अनेक स्वगते येताना दिसतात त्यांचा परामर्श घेऊ.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

उत्तमप्रकारे शिक्षण पूर्ण करूनही नोकरी मिळत नाही. नोकरी नसल्याने पैसे नाहीत आणि पैसे नसल्याने बेचैन झालेल्या नायकाचा या जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. त्यामुळे उद्ध्वस्त मन:स्थितीत हॉटेलविषयी तो म्हणतो, ''या हॉटेलात भयंकर घाणेरड्या दिसणाऱ्या पायऱ्या उखडून टाकल्या पाहिजेत. आणि ते काम मलाच केलं पाहिजे, तसंच ते महान कार्य आहे. जगातली पुष्कळशी महान कार्य आपणासाठी अडून बसलीत. ती एकदा पूर्ण करायला हवीत. नाही तर पुन्हा त्या अनंतकोटी ब्रह्मांडनायकाला लक्ष्मीबरोबरचा लव्ह–सीन टाकून अवतार घ्यावे लागणार, – म्हणजे बाबूभाईंना आणखी काही सिनेमे काढावे लागणार. त्यापेक्षा आपणच उठावं. उत्तिष्ठत ......जाग्रत ........ '' (पृ.२)

मानसिक अस्वस्थतेतून या जगातील चांगल्याचा धिक्कार करण्याची मनोभूमिकाच यातून व्यक्त होते. अशा उद्विग्नतेतून यातील नायक बाहेर पडू शकत नाही. लग्न झाल्याने खर्च वाढत राहतो. अशावेळी स्वत:चे आणि पत्नीचे स्वत्व गहाण टाकू पण कुणाचा तरी आश्रय घेऊ अशी मानसिकता तयार झाल्याने अत्यंत तुच्छतेची वागणूक देणाऱ्या काकूंकडेच जाऊन आश्रय घ्यावा मग त्यासाठी कितीही कोंडमारा सहन करावा लागला तरी चालेल अशी नायकाची धारणा होते. तेव्हा तो स्वत:शी म्हणतो,

''आपण काकूंकडेच जावं.

काकू काकू,

कृपा तुमची भाकू.

आम्हांला तुम्हीच कामाला ठेवा. आम्ही दोघंही ग्रॅज्युएट आहो. ग्रॅज्युएट घरगडी असणारं कुटुंब असा बोर्ड मी स्वत:च्या हस्ताक्षरात दाराव लावतो. किंवा रस्त्यावरही. तुमच्या घराची शोभा एकदम वाढेल. न केवळ शोभा; पण सामाजिक आणि सांस्कृतिक प्रतिष्ठाही. आम्ही दोघं अत्यंत सुखानं इथं राहू. तुमची घरकामं करू. तुमची पातळं मी धुवीन. तुमच्या सुनेची वसुमती धुवील. वसू तुमच्या सुनेपेक्षा थोडीशी हुशार होती ना, म्हणून ही तिला शिक्षा. तुमच्या नातवांची हगणी–मुतणी काढील. म्हतारी होईपर्यंत. स्वत:च्या मुलांचं हगणं–मुतणं काढणं या स्त्रीला हव्या असणाऱ्या सुखाची ती कधीच अपेक्षा करणार नाही. केलीन तर तिचं हृदय मी कापीन आणि तुमच्या दिवाणखान्यात टांगून ठेवीन. मी काही काही मागणार नाही. वसूही काही मागणार नाही. आमचं स्वत:चं आयुष्य आम्ही जगत आहोत हे आम्ही विसरू.'' (पृ.३७)

नायकाच्या हतबलतेची परिसीमाच येथे अधोरेखित होते. स्वत:चे स्वत्व गहाण टाकू पण जगण्यासाठीची किमान गरज पूर्ण व्हावी ही माफक अपेक्षा नायक येथे व्यक्त करतो. शिक्षणाचा फोलपणा मांडतो. पत्नीने सुखाची अपेक्षा केली तर तिचे हृदय कापून तुमच्या दिवाणखान्यात टांगण्यापर्यंत त्याची मानसिकता जाते. एवढेच नाही तर ''पगार वाटण्याच्या दिवशीचं त्याचं (देसाईबाईंचं) नेसायचं पातळ मी माझ्या आणि वसूच्या अश्रूंनी धुवीन.'' (पृ.३८) अशी उद्विग्नतेची भाषा नायकाच्या विदारक मन:स्थितीचे द्योतक आहे.

शेटजींकडे नायकाने काम केलेले असते पण दुसरी नोकरी लागल्याने तो ते काम सोडतो. ती नोकरी सुटल्यानंतर पुन्हा त्यांच्याकडे तो काम मागण्यासाठी येतो. शेटजी कामाच्या ठिकाणी नसतात. मुनीमजींची भेट होते. त्याला शेटजींकडे आपणाविषयी शिफारस करावी असे सांगताच तो ती नाकारतो, तेव्हा नायकाच्या मनात येते की,

''या क्षणी समजा मुनीमजी मेले, तर? आपणाला लगेच त्यांची जागा मिळेल. आपला प्रश्न सुटेल. शी: शी: .......

कावळा. दुसऱ्याच्या मरणावर टपून बसलेला! शेटजी येईपर्यंत बसावं. बाहेर जाऊन तरी काय करणार?" (पृ.४३)

माणसाची आत्यंतिक गरज कोणत्या वैचारिक थराला जाते त्याचेच हे प्रतीक आहे. आपणाला सहनुभूती न दाखविणाऱ्या मुनीमजींचा मृत्यू आपणास नोकरी मिळण्यास मदत करेल असा स्वार्थी टोकाचा विचार या स्वगतातून व्यक्त होतो.

नायकाची नोकरी मिळविण्यासाठीची धडपड संपत नाही. एक ढेकूण मारण्याच्या औषधाची बाटली आणून आपण आणि वसूने घ्यावी. वसूबरोबर बाळही संपेल असा असहायतेचा मनोदय व्यक्त करीत. ती घुसमट सहन न झाल्याने नायक पुढे म्हणतो,

"आम्ही सरणावर चढू तेव्हा ढोल वाजवू नका.

लताच्या रेकॉर्ड्स वाजवा.

त्यानंच आम्हाला मुक्ती मिळेल.

आम्हाला वेगळे मंत्र नकोत.

तिची गाणी हेच आमच्या अस्तित्वाचे आद्यतम मंत्र आहेत.

या हिंदुस्थान नामक रौख नरकात आम्ही खितपत पडलो आहोत.

आमच्या असह्य जिण्यावर बिचारीचे स्वर साईसारखे लपेटून आमचं जिणं सह्य करताहेत.

परमेश्वर तिच्या स्वरांना अमर करो.

लताच्या स्वरांनी सारं वायुमंडळ भरून जावो.

लताच्या स्वरांनी सारं नभोमंडळ व्याप्त होवो.

लताच्या स्वरांनी आमची अभागी, विदीर्ण हताश हताश हृदयं संपृक्त होवोत." (पृ.५०)

माणसाच्या प्रयत्नांचे सर्व मार्ग बंद होतात तेव्हा माणूस कोणत्या पातळीवर विचार करू लागतो याचेच हे द्योतक आहे. या जगण्यात काहीच अर्थ उरत नाही अशी हताशता मृत्यूतही आनंद मानण्यात पर्यवसीत होते हेच येथे नायकाच्या स्वगतातून व्यक्त होते. 'सरण', 'आद्यतम मंच', 'गाणी', 'रौख नरक', 'साईसारखे लपेटून', 'वायुमंडळ', 'नभोमंडळ', 'अभागी', 'हताश हताश' यासारखे शब्द नायकाच्या विदीर्ण हृदयाचे हुंकार वाटतात. आपल्या देशावर

प्रत्येकाचे प्रेम असते. मात्र याच देशात जेव्हा साधे जगण्याचे प्रश्न मिटत नाहीत तेव्हा तोच देश नायकाला नरक वाटतो हेच येथे स्पष्ट होण्यास मदत होते. अशीच अस्वस्थ करणारी स्थिती पुढील स्वगतातून व्यक्त होते.

"सज्ञन हो,

हे माझे प्रेत मला विकावयाचे आहे. हे खरेदी करून ते कुणी आपल्या दिवाणखाण्यातील काचेच्या आलमारीत ठेवील का? ते तुमच्या पोरीबाळींना, लेकीसुनांना, नातवंडापतवंडांना करमणूक म्हणून खेळायला उपयोगी पडेल." (पृ.७७)

नोकरीसाठी सेक्रेटरी आणि देसाईबाईकडून मिळालेली तुच्छतेची वागणूक नायकाला आपल्या व पत्नीवरील घाला वाटतो तेव्हा असे निर्वाणीचे शब्द त्याच्या मुखातून बाहेर पडतात.

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत अशी अंतर्मुख आणि अस्वस्थ करणारी स्वगते पानोपानी आढळतात.

**२. काळेशार पाणी :**

एक हतबल, असहाय स्त्री, तिची जगण्यासाठीची धडपड हेच या कादंबरीचे आशयसूत्र आहे. विष्ण्याने पोरे जन्माला घातली. आपला उपभोग घेतला पण जगण्याची व्यवस्था मात्र केली नाही. या दु:खाने त्रस्त झालेली भिकी म्हणते, "या सगळ्या पोरांना आता खायला काय घालायचं. आपण काय खायचं. या म्हाताऱ्या होत जाणाऱ्या वयात कामाला ताकद कुठून आणायची? त्यातच पुन्हा रात्रभर विष्ण्याचा भार सोसायचा ....... एक दिवस मोकळीक नाही." (पृ.६८)

'काय घालायचं?', 'काय खायचं?', 'ताकद कुठून आणायची?', 'भार सोसायचा', 'मोकळीक नाही' हे सर्व शब्द भिकीच्या हतबलतेचे आणि असहायतेचे द्योतक आहेत.

**३. इतिवृत्त :**

प्रा. गणपुले यांनी 'जनता' हा पेपर वाचल्यानंतर त्यांना मनस्वी समाधान वाटते. ते म्हणतात,

"नवे संपादक मोठे हुशार दिसतात. छान काढतील ते पेपर. कोणाचा का असेना, आणि कोणी का काढीना – आपल्याला चांगलं वर्तमानपत्र आणि त्याची चांगली सप्लिमेंट वाचायला मिळाली की झालं–" (पृ.९४) एक जिज्ञासू रसिक म्हणून प्रा. गणपुले यांची वर्तमानपत्राविषयीची भूमिका स्पष्ट होते.

'जनता' चे संपादक श्रीरंग नाडकर्णी सामाजिक बांधिलकीचा वसा जपणारा एक संपादक–पत्रकार. समाजाचा जबाबदार घटक म्हणून आपली काही जबाबदारी आहे असे त्यांना मनोमन वाटते, ते स्वगतपर म्हणतात,

"मुख्यमंत्री काही आपण बदलवू शकत नाही, तेव्हा आपणच बदललं पाहिजे! मुख्यमंत्र्याला का बदलता येणार नाही? जरूर आलं पाहिजे! या राज्याचा मुख्यमंत्रीच बदलला पाहिजे. आपण ते केलं पाहिजे. आपल्यावर ती जिम्मेदारी आहे. राज्यात कुठंही गेलं तरी लोक याच्याबद्दल वाईट बोलतात. भ्रष्टाचाराबद्दल बोलतात. खुद्द फळणीटकर आणि तेच याच्याविरूद्ध लिहू नको असं सांगतात. आधुनिक लोकशाही समाजाचा हा सर्वात भयंकर शत्रू आहे, आणि याच्याविरूद्ध लढाई नाही! राज्याराज्यात पसरलेले हे आधुनिक बकासूर. आर्थिक सत्ता यांच्या हातात. गुंडांचा ताफा यांच्या ताब्यात. साम–दाम–दंड–भेद यांच्या आधारानं यांनी सर्व सत्ता आपल्याकडं ठेवायची आणि इतरांनी नुसतं बघत बसायचं. मग जयप्रकाशांच्या आंदोलनाचा अर्थ काय? बिहारचा खरा संदेश कोणता? मी फक्त लेख लिहायचा आणि सोडून द्यायचं?

नाही. याहून अधिक मला काही केलं पाहिजे. एक प्रतिज्ञा आपण पूर्ण केली– एका वर्षाच्या काळात दैनिकाचा खप पंचवीस हजारांना नेऊन भिडवला. आता अधिक काही केलं पाहिजे. दुसरी कोणती तरी प्रतिज्ञा करून ती सिद्ध करण्यासाठी स्वत:ला त्यात गुंतवून घेतलं पाहिजे. ती माझी गरज आहे. वैयक्तिक जगण्याची गरज आहे." (पृ.२३२)

राजकारण्यांना बंदुकीच्या गोळीपेक्षा वृत्तपत्राची भीती अधिक वाटते असे म्हणतात. वृत्तपत्रकार समाजाचे दिशादर्शक आणि प्रबोधनकार असतात. सत्य पुढे आणणे ही त्यांची जबाबदारी असते. श्रीरंग नाडकर्णी एक सच्चा पत्रकार असल्याने लोकशाहीच्या मर्यादा स्पष्ट करीत दाखले देत पण मुख्यमंत्र्यांच्या साम–दाम–दंड–भेद या ताकदीला छेद देण्याचा चंग बांधतात. हे

स्वगत व्यक्तिनिष्ठ पातळीवरील प्रश्न मांडत नाही, तर सामाजिक बांधिलकीचा वसा जपणारा एक सत्यान्वेशी पत्रकार म्हणून पुढे येतो.

या कादंबरीतील स्वगते दीर्घ स्वरूपात येतात. विचार आणि मत प्रतिपादनासाठी ही स्वगते दीर्घतेचा आश्रय घेताना दिसतात.

**४. कुरूक्षेत्र :**

'कुरूक्षेत्र' मधील स्वगतेही अशीच दीर्घ आहेत. डॉ. म्हसकरांचा खून स्वत:च्या डोळ्यांनी पाहणाऱ्या प्राचार्य बेलसरे यांचे हे स्वगत आहे.

"रामशी विषय कसा काढावा, सुरूवात कशी करावी? हे बघ राम, एक रहस्य मी पंधरा–अठरा वर्ष हृदयात दडवून ठेवलं आहे. एक खून मी बघितला आहे. आय एम दि ओन्ली आय विटनेस! साधा खून नव्हे, साध्या माणसाचा नव्हे, डॉक्टर ....... डॉक्टर म्हसकर! कोणी? यू कान्ट बिलीव्ह ऑर इमॅजिन. तुकाराम दादा ....... येस, तुकारामदादा! संस्थेच्या धोरणावरून मतभेद. हे केवळ निमित्त. संस्था त्याला ताब्यातून घ्यायची होती. इतकी वर्ष गप्प राहिलो, का? नाही, मलाही नाही सांगता येणार. भगवंतांनी म्हटलं आहे – भगवंत म्हणजे भगवान श्रीकृष्ण रे, हिंदुस्थानचा एक महान फिलॉसॉफर त्यानं म्हणून ठेवलं आहे, किम कार्यम् किम अकार्यम इति कवयौप्यत्र मोहिता: मोहिता: म्हणजे संभ्रमित. कवी म्हणजे ते भावगीत रचणारे नाहीत रे! कवी म्हणजे विचारवंत. त्यांना संभ्रम पडतो. काय करावं, काय करू नये. इष्ट कर्तव्य काय, अनिष्ट कर्तव्य काय– माझ्यासारखंच रे त्यांचं किंवा त्यांच्यासारखंच माझं! कवयौप्यत्र मोहिता: मोहिता:" (पृ.७४)

डॉ. म्हसकरांचा तुकारामदादांकडून झालेला खून पंधरा–अठरा वर्षे मनात जपला पण ती अस्वस्थता त्यांना सहन होत नाही. आणि अखेरी रामभाऊंकडे जाऊन त्यांना हे वास्तव उघड करण्याच्या मानसिकतेत एकीकडे मानसिक कोंडमारा आणि एकीकडे भावनातिरेक मराठे यांनी पौराणिक दाखले देत परिणामकारकपणे टिपला आहे.

'कुरूक्षेत्र' या कादंबरीतील 'लग्न' या पुढील भागात सुमा नावाच्या डोळ्याने अधू असलेल्या स्त्रीची चित्तरकथा आली आहे. कुरूप, स्वार्थी मास्तरशी विवाह झाल्यानंतर तिच्या

जीवनाची ससेहोलपट सुरू होते. शहरी जीवन आणि ग्रामीण जीवन यातील भेद तिच्या स्वगतातून व्यक्त होतो.

"मी पूर्वी कधीच बघितलं नव्हतं असं खेडं. माझं सगळं आयुष्य आजवर शहरात गेलं होतं. हौसिंग सोसायटीत ब्लॉक होता. पाणी, संडास घरात. स्वयंपाकाला गॅस. अभ्यासाला टेबल. घरात रेडिओ, टी.व्ही. घरात ट्युबलाईटचा स्वच्छ प्रकाश. शहरात स्वच्छ रस्ते. नाटकं. सिनेमे. रोजचं वर्तमानपत्र. पण त्या खेड्यात त्यातलं काहीच नाही याची मला अगदी क्षणात कल्पना येऊन गेली आणि हिरमसून गेले." (पृ.८७)

अत्यंत थोडक्या शब्दात दोन वेगवेगळ्या परिसरातील जगण्यातील अंतर सुमाच्या स्वगतातून मराठे यांनी मांडले आहे.

आपल्या डोळ्याच्या अधुपणाचा, गाण्याच्या आवडीचा विचार न करणाऱ्या बेफिकीर, क्रूर पतीच्या इच्छेखातर सुमाला मास्तरीन होण्यासाठी डी.एड. करावे लागते. डी.एड. ला प्रवेश घेतल्यानंतर तिची होणारी ओढाताण तिच्याच शब्दातून–स्वगतातून मराठे मांडतात. ती म्हणते,

"माझं डी.एड. सुरू झालं. अभ्यास, कॉलेज, लेसन्सची तयारी, वर्गात मोठ्यांनं बोलायची तयारी करावी लागली. भीती वाटली आधी मुलांच्या समोर उभं राहयचं. टेन्शन यायचं मनावर. शिकवणं काही सोपं नसतं. अनोळखी मुलं आणि लेसन बघणाऱ्या बाई. बरीच तयारी करावी लागे. धावपळ होई. जिन्यांची चढउतार. बससाठी धावपळ. खेळांचा सराव. पी.टी. इतकं सगळं करायचं म्हणजे मोठं ओझं शिरावर ठेवल्यासारखं वाटे. संध्याकाही तर अगदी दमून गेल्यासारखं वाटे. डोळे दुखू लागत. पहिल्या आठवड्यातच अशी दमछाक झाली. वाटलं–कधी एकदा रविवार येतो आणि मी थोडी विश्रांती घेते." (पृ.९३)

डोळ्यांनी अधू असल्याने होणारा त्रास आणि त्यातच पुन्हा शिक्षणासाठी करावी लागणारी धावपळ, पतीकडून सहकार्य नाही अशा कोंडीत सापडलेल्या स्त्रींची मनोव्यथाच या स्वगतात येते.

५. **देवाची घंटा** :

या कादंबरीत येसू या निराश्रीत स्त्रीच्या जीवनाची फरपट आली आहे. आपल्या मुलांचा सांभाळ करण्याइतपतही तिची ऐपत नाही. ती म्हणते,

"माजी पोरा काल वाट बगी होती. काय तरी, एखादो पेडो खायक मेळात, म्हणान. नायतर आमच्या नशिबाक खंचसून पेडे बफर्यो? कंदी भटजी देवळातसून आणतीत, तितक्यांच. तर तांच् त्या वकिलाच्यान् बगवला नाय्. आनिक् पैशे. भटजी काय हजार रूपाचे नाय् देनत. काय देवाफुडे चार–आठ आने जमतीत, तेवडेच सुटे पैशे असत् म्हणान कोनाक् मगात् भटजी येसूक काय तरी. हजार–पाचशे रूपये देतात आठवड्याक्? ज्येंका असां वाटात असात त्येनी येवन बगूचा भटजी माकां किती देतंत, तां–" (पृ.४३)

येसू या स्त्रीच्या स्वगतातून दारिद्र्याचे अस्वस्थ करणारे चित्रण पुढे येते. कोकणी भाषेतील 'बगी', 'एखादा पेडो', 'खायक', 'मेळात', 'म्हणान', 'नायतर', 'निशबाक', 'खंचसून', 'बफर्यो', 'कंदी', 'देवळातसून', 'बगवला नाय', 'रूपाचे नाय', 'देनत', 'कोनाक', 'गमात', 'आठवड्याक्', 'त्येनी', 'माकां' असे अनेक कोकणी बोलीतील ग्राम्य शब्द येसूचा सामाजिक आणि आर्थिक स्तर समजण्यास मदत करतात.

पुढे बापू झांट्ये यांचे मारूतीला अनुसरून स्वगत येते. "देवा मारूतीराया, तूच तारणारा. तूच मारणारा. कोटीचा माझा माल. माझा एका कोटीचा माल. कस्टमवाला– त्यांना तू पत्ता दिलास. सरकारला तूच सांगितलस. तूच घात केलास रे, माझा. आता मी तुला मारणार. थपडा मारणार, लाथा मारणार. नाही रे, नाही देवा, मला तू देशील. खात्री आहे माझी. परीक्षा बघितलीस माझी. नापास झालो मी. क्षमा मागतो. आता पास कर. कृपा कर. दे, मला सोनं दे. सोन्याच्या चिपा. सोन्याचे गोळे सोन्याचे. एका कोटीचं सोनं–" (पृ.१६५)

ग्रामजीवनातील लोक विविध देवदेवतांना भजतात. आपली गाऱ्हाणी मांडतात. नवस–सायास करतात. बापू झांट्ये या व्यक्तीच्या मारूतीला आपले सोने परत मिळवून देण्यासाठी साकडे घालण्यातून हेच प्रतीत होते.

**६. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

ह. मो. मराठे कधी त्या पात्राच्या स्वगतातून त्याला बोलते करतात आणि कथानक पुढे नेण्यास मदत करतात. त्यांची सुख–दु:खे मांडतात. आशा–आकांक्षा, परिस्थितीने वाट्याला आलेली परवड, भीषण वास्तव मांडतात. मानवी जीवनात कुटुंबव्यवस्थेला आणि कुटुंबातील अपत्यप्राप्तील अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मात्र एखाद्या पुरुषाला आपणाकडील काही कमतरतेमुळे, शारीरिक वैगुण्यामुळे पत्नीस मूल राहू शकत नाही हे भीषण वास्तव पचवणे किती अवघड जाते ते मि. पंडित यांच्या स्वगतातून मराठे मांडतात. पंडितला डॉक्टरांकडून सत्य कळाल्यानंतर तो म्हणतो,

"सत्य!

एक भयंकर, भयंकर सत्य.

आपल्यात ती शक्ती नाही ....... पुरुषांच्या ठिकाणच्या ज्या पेशींमुळे नवीन आयुष्याला जन्म दिला जातो, त्या पेशी ...... त्या अत्यंत निर्माणक्षम पेशी ......निसर्गानं त्या आपल्याला प्रदान केलेल्या नाहीत. दान केलय फक्त एका भयंकर परिस्थितीचं." (पृ.३१)

मि. पंडित यांचा जीवघेणा मानसिक कोंडमारा मराठे येथे अत्यंत थोडक्या स्वगतातून व्यक्त करतात. मि. पडित यांना या वास्तवाला सामोरे जाणे अवघड जाते. घरी आल्यानंतर बेलजवळ बराच वेळ रेंगाळत राहतात. बेल दाबून आत जाण्यापेक्षा असंच माघारी फिरावं दूर निघून जावं असंही वाटून जातं. मात्र मनाची समजूत घालत ते स्वत:शीच बोलतात,

"छे! ही वास्तवतेपासूनची पळवाट ठरेल. मी पत्नीला मूल देऊ शकणार नाही. हे खरं आहे; पण मी इतर गोष्टींचा आनंदही देऊ शकणार नाही काय? केवळ एवढ्याच एका कारणासाठी मी आकाराला आणलेलं आयुष्य हातातून निसटू देऊ काय? नाही. असा पळपुटेपणा मी स्वीकारणार नाही. यापूर्वी कधीच स्वीकारला नाही." (पृ.४१)

**७. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

मराठे यांच्या कादंबऱ्यांमधून पात्रांची स्वगते विविध पातळ्यांवरून येतात. सुख–दुःखे, विचार–विकाराबरोबरच अगदी सर्वसामान्य पातळीवरील किरकोळ खरेदीवरही स्वगते आलेली आढळतात. केतकीच्या स्वगतातून क्लीनिंग सोपच्या वापराविषयी स्वगत येते.

"आपण कोणता बरं क्लीनिंग सोप वापरतो? कोणता वापरायचा हे कोण ठरवतं? आपला दुकानदार. महिन्याच्या यादीत हा एक आयटेम लिहिलेला असतो आपण. पण अमुकच पाहिजे असं आपण कधीच लिहीत नाही. दुकानदार पाठवील तो. ही बाई मात्र नेहमी विशिष्ट सोप वापरते. तोच पाहिजे. तोच पाठवण्याबद्दल ती दुकानदाराला बजावीत असेल. त्याच्याकडे नसला तर स्वतः दुसऱ्या दुकानातून आणीत असेल, पण तोच पाहिजे. आई तोच वापरते. लेकीला तोच वापरायला सांगते. का? तो खात्रीचा वाटतो. त्याच्यावर विश्वास बसला आहे. ब्रँड लॉयल्टी." (पृ.१६)

माणूस कोणतीही वस्तू खरेदी करताना तेवढा सजग असत नाही पण सजग असायला हवे हा साधा विचार या स्वगतातून व्यक्त होतो. याच केतकीच्या वैचारिकतेतून पुढे आपल्या पतीच्या सनशाईन प्रॉडक्टला पर्याय म्हणून एव्हरफ्रेश क्लीनिंग सोप हे प्रॉडक्ट बाजारात आणते आणि जाहिरातीच्या रूपात आपत्ती सुखस्वप्ने स्वगताच्या माध्यमातून पाहते.

"एव्हरफ्रेश क्लीनिंग सोप. नवा; अं हं केवळ नवा नव्हे, नवलाईचा. आपल्या घरी एव्हरफ्रेश क्लीनिंग सोप. शेजारच्या घरी एव्हरफ्रेश क्लीनिंग सोप. सोसायटीमधील सर्वांच्या घरी एव्हरफ्रेश क्लीनिंग सोप. दुकानात मागणी एव्हरफ्रेश क्लीनिंग सोपला. दुकानातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येकीच्या हाती एव्हरफ्रेश क्लीनिंग सोप." (पृ.४३) आपल्या कल्पकतेने नवीन सोप मार्केट काबीज करते. केतकीचे स्वप्न सत्यात उतरते. एव्हरफ्रेश कंपनीची जाहिरात पाहण्यासाठी ती ट्रेनने प्रवास करीत असताना तिची उत्सुकता अशीच स्वगतातून पुढे व्यक्त होते.

८. **मार्केट** :

केळकर हे अहुजांच्या कंपनीला सहा लाख रूपये नुकसान होण्यापासून वाचवितात. एम.डी. ना त्याचे समाधान वाटून आपणाला शाबासकी मिळेल या विचारात आणि पुढील काही गोष्टी कशा पूर्ण करता येतील या विचारात त्यांचे स्वगत येते. ते म्हणतात,

"एम.डीं.ना सगळं तपशीलवार रिपोर्ट केलं पाहिजे. काल रात्री नुसता मुद्दा तेवढा सांगितला. समक्ष सविस्तर समजून घ्यायला तेही उत्सुक असणार. त्यांना सगळं सविस्तर सांगितलं पाहिजे. दोनचार जोक्ससुद्धा रिपीट करायला हरकत नाही. दॅट विल क्रीएट न्यू रिलेशनशिप वुइथ एम.डी. एम.डीं. बरोबरचे संबंध अधिक इनफॉर्मल होतील. अधिक विश्वासाचे आज ते मला एक कर्तबगार मॅनेजर म्हणून मानतात. आजपासून कदाचित त्यांचा दृष्टिकोन अधिक सॉफ्ट होईल, अधिक स्नेहाचा, अधिक आत्मीय." (पृ.४३)

एक यशस्वी मॅनेजर म्हणून आपण ओळखले जाऊ हे केळकर यांचे स्वप्न या स्वगतातून अभिव्यक्त होते. आपल्या पदाशी इमान राखून व्यवसाय वाढविण्याचा, पैसे मिळविण्याचा आणि म्हातारपण सुखी जाण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज पुढे पृष्ठ १२५ वर येते.

९. **सॉफ्टवेअर** :

कधी स्वत:च्या तर कधी इतरांच्या हितासाठी विचार करणारी मानसे स्वगतातून मराठे उभी करतात. कंपनी आणि कामगार यांच्यात समन्वय असणे अपरिहार्य असते. मात्र तसे घडले तर कंपनीच्या व कामगारांच्याही हिताचे ते नाही अशी समन्वयाची भूमिका असणारे देशमुख आपल्या स्वगतात म्हणतात,

"अवास्तव मागण्या करणाऱ्या युनियन्स आणि आडमुठी भूमिका घेणारी मॅनेजमेंट यांच्या संघर्षात मध्यस्थी तरी कशी आणि कुणी करायची? कामगार आंदोलन दडपायचं आणि नेत्यांना फोडायचं हीच जर दृष्टी असेल–" (पृ.२०७) देशमुख यांच्या या स्वगतातून एकप्रकारचा सकारात्मक दृष्टिकोन आणि हतबलता प्रत्ययाला येते.

कधी शाळाविषयक दृष्टिकोन पात्रांच्या मनोगतातून व्यक्त होतो. इंग्रजी माध्यमातून शिक्षण न झाल्याने आपले नुकसान झाले. आपल्या मुलीला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालावे असा

पत्नीचा आग्रह असतानाही मनोहरपंत मुलीला मराठी माध्यमाच्या शाळेत घालताना आपल्या स्वगतात म्हणतात,

"बायकोनं एवढा सगळा युक्तिवाद करूनही मी ठामपणे मराठी माध्यमाच्याच शाळेत पोरीला घातलं होतं. ती आता नववीत आली होती. तिचं इंग्रजी अगदीच कच्च होतं. शेवटी उकीडवेबाईंचा क्लास जॉइन करायला लावला. आता सकाळ-संध्याकाळ तिच्या कपाळी ओरडत असतो- बाई गं, दहावीत निदान पासष्ट टक्के तरी मार्क्स हवेत पडायला, इंग्रजीतसुद्धा. तर निदान तू कॉमर्सला तरी जाशील. कॉमर्सला निदान सेकंड क्लास मिळवायलाच हवा. तर कुठंतरी चिकटशील. त्यायोगे तुझं लग्न होणं सोपं जाईल-" (पृ.४३)

मराठी माध्यमाच्या शाळेत घातल्याचा पश्चात्तापच पुढे याच स्वगतात व्यक्त होतो. मनोहरपंत या पत्रकाराला प्रामाणिकपणे पत्रकारिता करीत असताना अनेक वाईट अनुभवांना सामोरे जावे लागते. एकाच व्यवसायात काम करीत असताना एकमेकांविषयीचा वैरभाव मनोहरपंतांच्याही वाट्याला येतो. आपल्या स्वगतात ते म्हणतात,

"आजच नोकरी सोडावी. या क्षणीच. झक मारत गेला शेटजींचा गौरव अंक आणि त्यांच्या त्या कार्यक्रमाची टीव्ही न्यूज! काय आहे तुझ्या इथल्या एक्झिस्टन्सचा उपयोग! फक्त पगार देण्यासाठी कंपनी कोणालाच नोकरीवर ठेवीत नाही. फियास्कोसाहेबांनी करून दिलेली कठोर जाणीव. कंपनी कोणाची-नोकरीला कोण ठेवणार आणि दम कोण भरणार? मिस्टर फियास्को, तू आणि मी दोघेही कंपनीचे नोकर. दोघंही कंपनीसाठी काम करतो आणि कंपनीचा पगार घेतो. तरीही दोघे एकमेकांचं शत्रुत्व करतो. कशासाठी?" (पृ.५९)

मनोहरपंतांची मानसिक अस्वस्थताच या स्वगतातून व्यक्त होते. येथील संघर्ष चुकीच्या मानसिकतेमुळे निर्माण झालेला प्रत्ययाला येतो. आपण चुकीचे वागतो आहोत याचे भान फियास्को साहेबांना नाही हेही पटते.

ह. मो. मराठे यांच्या एकूणच कथा-कादंबऱ्यांमधील स्वगतांचा विचार करता ही स्वगते साचेबंद नाहीत. घटना-प्रसंगानुरूप, परिस्थितीनुरूप ती बदलताना दिसतात. ही स्वगते कधी पात्रांच्या मनातील भावभावना कधी उघडपणे तर कधी सूचकतेने व्यक्त करतात. कधी मनातील

चीड व्यक्त करतात तर कधी सकारात्मक दृष्टिकोन माणसाला जीवन सुकर करण्यास मदत करतात हा भाव व्यक्त होतो. कधी एकमेकांमधील सत्तास्पर्धा कथन करतात. पात्रांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी ही स्वगते परिणामकारकपणे व्यक्त होत कथानकाचा ओघ कायम ठेवण्यास पूरक ठरतात. ही स्वगते कृत्रिक वाटत नाहीत तर पात्रांची अंतर्मने उलगडण्यास मदत करतात.

### ३. संवाद :

कादंबरीमध्ये पात्रचित्रण हाच संवादाचा मुख्य हेतू असतो. संवादातून पात्रांची जीवनदृष्टी, स्वभाव, भावभावना, मानसिकता, सामाजिक, आर्थिक, नैतिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्तर समजायला मदत होते. पात्रापात्रांमधील परस्पर संबंधांवर संवादाच्या माध्यमातून प्रकाश टाकता येतो. संवादामुळेच कथानकाची, कादंबरीची गती समजते. "प्रत्यक्षाचा भास कायम राहील अशी संवादांची लांबी रूंदी असल्यास ते संवाद अधिकच परिणामकारक ठरतात. खटकेबाज, चतुर, रोचक असे संवाद कादंबरीमध्ये योजल्यास तो प्रसंग आणि त्या प्रसंगाचा पात्रावर झालेला स्थूल आणि सूक्ष्म अशा दोन्ही प्रकारचा परिणाम साधता येतो. यासाठी कादंबरीमधील संवाद संक्षिप्त, पात्रांच्या आविर्भावाची जोड असणारे, त्यांना साजेशी भाषा वापरणारे, त्यात सहजता असणारे, अकृत्रिम असे संवाद परिणामकारक आणि कथानकाला जिवंत करणारे ठरतात."[८]

ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधून आलेल्या संवादाच्या माध्यमातून पुरुषचित्रण समजून घेणे येथे अभिप्रेत आहे.

### कथासंग्रह :

**१. सापेक्ष :**

**सापेक्ष :**

'मग?' मी वाचारलं.

'यात खरं सत्य काय असेल?'

'तुमचा अंदाज काय आहे?'

'ही स्त्री भाजलेली नाही – तिला जाळण्यात आलं आहे.' तो त्वेषपूर्ण पद्धतीनं म्हणाला.

‘कशावरून?’

‘रीड बिटवीन दि लाइन्स’ (पृ.५)

वरील संवादातून प्रधानांचा त्या भाजलेल्या स्त्रीवरील अन्यायाला वाचा फोडण्याचा निर्धार दिसून येतो. ती स्त्री भाजलेली नसून तिला जाळण्यात आल्याचे सिनियर असिस्टंट एडिटरच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न प्रधान करताना दिसतात.

**अँकर :**

‘मंजिरी ट्रिपचं काहीतरी म्हणत होती.’ पत्नी म्हणाली.

‘कुठं?’

‘यंदा दिल्लीला जाताहेत वाटतं.’

‘किती द्यायचे?’

‘हजार बाराशे तरी हवेत.’

‘देतो.’

पुन्हा ते टाइममध्ये बुडाले.

‘बिलही आलं आहे विजेचं.’

‘भरा, मग.’

‘तीनशे आलंय वाटतं, यावेळी.’

‘बापरे, तीनशे?’ टाइममधून मान वर करीत त्यांनी विचारलं

‘होय ना!’ पत्नी म्हणाली, आणि बाबांची औषधेही संपली आहेत. (पृ.४१)

वरील संवाद संपादक भालेराव आणि त्यांच्या पत्नीमधील आहे. भालेराव एवढे मोठे संपादक असूनही त्यांच्या काळज्या मात्र सामान्य माणसांसारख्याच दिसून येतात. वरील संवादातून घरातील कर्त्या पुरुषांच्या जबाबदाऱ्या त्यालाच पार पाडाव्या लागत असल्याचे चित्र ह. मो. मराठे रेखाटतात.

**बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह** :

'ॲम गीव्हिंग अप धीस जॉब.'

'जॉब.'

'जॉब सोडताय?' बायकोनं काळजीच्या स्वरात विचारलं.

'येस' तो त्वेषाने म्हणाला, 'आय डोण्ट वाँट टु सर्व्ह दीज डर्टी पीपल–'

'आणि ....... पण–'

'डोण्ट वरी. ॲम गेटींग अनदर जॉब. फ्रॉम टुमारो ओन्ली–' (पृ.५३)

वरील संवाद साळवी आणि त्यांच्या पत्नीतील आहे. वरील संवादातून साळवी ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणी ते समाधानी, आनंदी दिसून येत नाहीत त्यामुळे ते ती नोकरी सोडून नवीन नोकरी करण्याचा मानस व्यक्त करताना दिसतात.

**जी सरकार** :

'कोण तो आमच्या आज्ञेचा अवमान करणारा?' सरकारस्वारी गरजली.

'मी–' किशोर बसल्या जागेवरूनच म्हणाला.

'तू? तू?' सरकारस्वारी अधिकच थरथरत प्रश्न करती झाली.

'मला एकेरी संबोधायचं कारण नाही–' किशोर तशाच घट्ट स्वरात म्हणाला, 'इथं इतर कोणाला नसला तरी मला आत्मसन्मान आहे तू म्हटलेलं मला मुळीच खपणार नाही. कोणताही प्रश्न विचारण्यापूर्वी तुम्ही किंवा आपण म्हणा...... '.

'तुम्ही? तुम्ही?'

'होय, तुम्ही किंवा शक्यतो, आपण.' (पृ.८०)

वरील संवाद साहेबराव शिर्के ऊर्फ सरकारस्वारी आणि किशोर पेंडसे यांच्यातील आहे मालक आणि नोकर यांच्यातील दरी यातून दिसून येते.

**देशात सालं काही घडतच नाही :**

‘धंदा मिळतो का रोज?’ थोडा वेळ गेल्यावर मी विचारलं. कधी मिळतो–कधी नाही. रिक्षावाले पण खूप झालेत ना.

‘नोकरी करायची–’

‘अडाणी आहे मी सायेब. शाळेत नाही गेलो.’

‘घरी कोण कोण?’

‘आई–बाप, बहीण, भाऊ सर्व आहेत.’

‘बाप भाऊ काय करतात?’

‘हे असंच काय– काय–’

‘घर कोणत्या भागात?’

‘गरिबाला घर कुठलं साहेब? राहतो झोपड्यात.’

‘गावात झोपडपट्टी आहे का?’

आहेच की आता गरिबांनी झोपडी बांधून राहायचं नाही तर–’ (पृ.१२४,१२५)

वरील संवाद पत्रकार आणि रिक्षावाला यांच्यातील आहे या संवादातून रिक्षाचालकाचा जीवनपट समोर येतो. त्यांच्या व्यवसायातील अडचणी समजतात. शिक्षण नसल्याने रिक्षा चालवणे आणि रिक्षा चालविण्याचा व्यवसायामुळे घरची आर्थिक परिस्थिती सुधारणे शक्य होत नाही हेच समोर येते.

**भले गृहस्थ पंडित :**

‘चितळ्यांचा फोन आला होता–’

‘कधी?’

‘झाले दोन दिवस.’ पंडित थांबले आणि म्हणाले,

‘पसंती आहे त्यांची–’

‘आहे?’ बहिणीने आनंदाने विचारलं.

रोहिणीनेही ते ऐकलं. ती क्षणभर रोमांचित होऊन गेली.

‘आहे, पण–’

‘उडी कितीची?’

‘परवा सांगितलं तेच. तीस हजार हुंडा. लग्न खर्च आपण करायचा. शिवाय चितळ्यांचीही दक्षिणा. सगळं मिळून पन्नास हजारांच्या पुढं जाणार?’

वरील संवाद पंडित आणि त्यांच्या बहिणीमधील आहे. या संवादातून दोघांना असलेली रोहिणीच्या लग्नाची चिंता दिसून येते.

**२. वीज :**

**कुंती :**

‘दुसऱ्या लग्नाच विचारत होता ना – बघा मुलगी.’

‘मुलगी नव्हे नुसती दामले – सून. माझ्यासाठी सून?’

‘म्हणजे?’

‘दामले, आता तुम्ही काही आमचे जावई नाही. लेक होती तोवर तुमच्याशी जावयाचं नातं. संपलं. आता तुम्ही मुलासारखे. तुमच्यासाठी मुलगी शोधायची म्हणजे माझ्यासाठी सूनच नव्हे का?’ (पृ.१००)

वरील संवादातून रमाबाईंना जावयाची वाटणारी काळजी, प्रेम व्यक्त होते. त्यांचे सासू आणि जावयाचे नाते आई–मुलामध्ये रूपांतरीत होत जाताना दिसते.

**खुर्ची :**

‘अग सुगंधा–’ त्यानं प्रयत्नपूर्वक आपल्या घशातून शब्द उमटवले.

‘आई कुठं गेलीय सांगा आधी!’ ती म्हणाली.

‘मला नाही ग माहीत?’ तो खचलेल्या स्वरात म्हणाला.

‘मला खायला का नाही ठेवून गेली काही?’

‘ठेवलं होतं काही तरी–’

‘शी! ती उद्गारली, ‘हे काय खाणं? अर्धी पोळी आणि गूळ? घाणेरडं झालंय घर!’ (पृ.१४८)

वरील संवाद या कथेतील नायक म्हणजेच सुगंधाचे वडील आणि मुलगी सुगंधा यांच्यातील आहे. दोघांच्या संवादातून सुगंधाच्या आईचे घराकडे होणारे दुर्लक्ष आणि मुलगी, वडील यांना वाटणारा सुगंधाच्या आईविषयी राग व्यक्त होतो.

**३. ज्वालामुख :**

**ज्वालामुख :**

‘गुड मॉर्निंग.’

‘काय म्हणतोय अभ्यास?’

‘छान चाललय.’

‘तू काय स्टडी करते आहेस?’

‘मॅथस, पा.’

‘आणि तू रे?’

‘सायन्स डॅड.’

‘दॅटस गुड.’ तो म्हणाला, ‘अभ्यास करा पोरांनो, अभ्यास करा. क्लासला जाताना?’

‘होय, पपा.’

‘शिकवणीच्या बाईही येतात ना?’

‘होय पपा.’ (पृ.६)

वरील संवाद ज्वालामुख कथेतील नायक आणि त्यांच्या मुलांमधील असून या नायकाचे मुलांशी असलेले प्रेमाचे, मैत्रीचे नाते दिसून येते. त्याचबरोबर त्यांच्या शिक्षणाची काळजीही दिसून येते.

**निशाण :**

‘बोला काय?’ सदाशिवने विचारलं.

‘फॅक्टरी कधी सुरू व्हायची?’ मोरेने विचारलं.

‘मालकांना विचारा–’ सदाशिव म्हणाला.

‘मालकांना नाय– तुलाच इचारनार.’

‘का?’

‘तू संपावर जायला सांगितलं आमाला संपावर जायला–’

‘आमी संपावर गेलो. मालकांनी कारखाना बंद केला. आता आमी खावं काय ते सांग.’ पावसकर म्हणाला. (पृ.३४)

वरील संवाद सदाशिव आणि मोरे, पावसकर यांच्यामध्ये झालेला आहे. संपामुळे कामगारांच्या जीवनात काय काय समस्या येऊ शकतात, उपासमारही सहन करावी लागत असल्याचा निष्कर्ष या संवादातून निघतो.

**ज्वाळा :**

‘काय मोहिते बरोबर ना?’

‘मेहेरबानी, साहेब–’

‘मेहेरबानी नव्हे. मी म्हणतोय ते बरोबर की नाही ते सांग.’

‘काय साहेब?’

‘जेव्हा मी अडचणीत असेन तेव्हा तू मला मदत–’

‘हे काय बोलताय साहेब, नवीन?’ (पृ.६१)

वरील संवाद मोहिते आणि मलिकसाहेब यांच्यातील आहे. मोहितेला मदत करून त्याच्याकडून आपल्या स्वार्थाची कामे करून घेण्याचा मानस ठेवून मलिकसाहेब त्याला मदत करताना दिसतात.

**आजोबा :**

‘झाली तुझी निघायची वेळ?’ अण्णांनी विचारलं. तो प्रश्न विचारता विचारता त्यांना किंचित गलबलल्यागत वाटून गेलं.

‘हो.’ मुलगा तुटकपणे म्हणाला आणि घड्याळाकडे बघू लागला.

‘माझ काय केलं आहेस?’

‘काय करणार?’ मुलगा म्हणाला, ‘भात कालवून ठेवलाय पातेल्यात. तो खा. लोणी लावून ब्रेड ठेवलाय तो खा मधल्या वेळी. थर्मासमध्ये चहा आहे. नेहमीसारखं वझेवैनी येतील. तुम्हांला चहा ओतून देतील. तो प्या.’ (पृ.७०)

वरील संवाद अण्णा आणि अरूण यांच्यातील आहे. या संवादातून अरूणला म्हाताऱ्या वडिलांची सेवा, नोकरी, घर सर्वकाही एकट्यालाच सांभाळावे लागत असल्याचे दिसते तर अण्णांना घरात एकटे असल्याने जेवणासाठी तडजोड करावी लागते. तर पुढे –

‘काय रे, कोणाची चिठ्ठी?’

‘तुमच्या सुनेची.’

‘चिठ्ठी.’

‘होय.’ अरूण खचून जात म्हणाला, ‘ती येणार नाही इथं आता.’

‘म्हणजे?’

‘म्हणजे कधीच येणार नाहीय. मला मिनूला सोडून चाललीय. घटस्फोट हवाय तिला.’

‘घटस्फोट? अरे, काय सांगतोस काय?’ त्यांनी भांबावून जात, गोंधळून जात, हतबद्ध होत विचारलं.

‘हे पत्र वाचा.’ (पृ.७६)

वरील संवाद अण्णा आणि अरूण यांच्यातील असून या संवादातून अरूण आणि त्याची पत्नी यांचे बिघडलेले घटस्फोटापर्यंतचे संबंध दिसतात. अण्णांना मुलाची, मिनूची, सुनेची वाटणारी काळजीही या संवादातून डोकावताना दिसते.

**कीटक** :

‘जायलाच हवं का इतक्या उन्हाचं?’

‘नको जायला? नको जायला? न जाऊन कसं भागणार? हातपाय हलवायला हवेत. काहीतरी उद्योग करायला हवेत. काहीतरी उद्योग करायला हवा. माणसांना गाठायला हवं. तर पोटाला काहीतरी खायला मिळणार–’

‘त्यात माझा खर्च–’

‘मग नको करायला? आणि हा खर्च काय नविन आहे?’

‘हो चाललाच आहे कित्येक वर्ष. औषधावारीच हजारो रूपये गेले असतील. हे पैसे वाचले असते तर बंगला झाला असता बांधून.’ (पृ.८५)

वरील संवाद शंकरराव आणि त्यांची आजारी पत्नी यांच्यातील आहे. शंकररावांना काम केल्याशिवाय दोघांचा उदरनिर्वाह, औषधपाणी करता येणार नसल्याचे या संवादातून दिसते. पत्नीचे आजारपण वर्षानुवर्षे चालत आल्याने शंकररावांना तिच्या आजारपणावर खूप खर्च करावा लागत असल्यानेही त्यांना घर घेता आलेले नसल्याचे समजते.

**कर्मफल :**

‘कायमचाच संपवून टाकणार आहे. टाकणार होतो.’

‘मग?’ बायको म्हणली, ‘संपवा काम ते. किती काळजी वाटते.’

‘नुस्ती काळजी नव्हे. मन–मन पाप करू बघत होतं माझं आज– पंत सांगू लागले.’

‘म्हणजे?’

‘वाटलं– पैसे घेऊन पळूनच जावं. किती होते माहीत आहेत? दोन लाख! नगद दोन लाख. नोटाची भरलेली बॅग दोन लाखांच्या नोटांनी भरलेली. कल्पना करू शकशील दोन लाख म्हणजे किती रक्कम ते? आपले सगळे प्रश्न संपून टाकले असते. पण नाही, धीर झाला नाही. मनाला वळण नाही ना तसं. शेटजींना म्हणालो तसं. पाया पडलो. मनातलं पाप कबूल केलं?’ (पृ.१२१)

वरील संवाद पंत आणि त्यांची बायको यांच्यातील आहे. या संवादातून पंतांचा श्रद्धाळू स्वभाव, प्रामाणिकपणा दिसून येतो. धार्मिक वृत्तीचे पंत असूनही त्यांना घरच्या समस्यांमुळे पैसे

घेऊन पळून जाण्याचा मोह होतो परंतु ते त्यांच्या वरील संस्कारामुळे ते कृत्य करताना दिसत नाहीत.

**उजाड** :

‘आरडाओरडा केला नाही? तुमच्या ओळखीच्या पोराचा खून होतोय– तुम्ही मित्र बघताय–’

‘नाही केला.’

‘का?’

‘बॉसनच खून केला त्याचा.’

‘कोण बॉस?’

‘सुभाष.’

‘तुझ्याकडे येतो कधी कधी, तो?’

‘हं.’

‘म्हणजे– तू पण–’

‘आम्ही सगळे–’ (पृ.१५८)

वरील संवाद दिलीप आणि त्याच्या आईमध्ये झालेला आहे. वरील संवादातून दिलीप वाईट संगतीत असून तो एका खुनासाठी साक्षीदार असल्याचे दिसून येते.

**४. हद्दपार** :

**४.१** : ‘‘समजायला मी काय मिसेस् घाटे थोडीच आहे? मी आहे एक निर्बुद्ध संसारी काकूबाई!’’

‘‘होय, होय, होय! तू तशीच झाली आहेस. एकदा नव्हे, शंभरदा मी हाच शेरा मारीन! आणि त्याबद्दल तुला खंतही वाटत नाही.’’

‘‘झालेय खरी तशी मी. तुम्हांला न शोभणारी. तुमच्या बौद्धिक अपेक्षा पूर्ण करू न शकणारी, गावंढळ. पोरा– संसारात बुडालेली. तिचे शब्द आता तिच्या घशात घुटमळू लागले. आत्मकरूण झाले.’’

‘‘पण हा सगळा तमाशा रिक्षातच झाला पाहिजे का?’’

“मग घरी वेळ कुठं असतो तुम्हांला? फक्त मिसेस घाटे येतील, तेव्हाच काय तो वेळ– बौद्धिक आनंदासाठी?” (पृ.१५)

वरील संवाद कथेतील नायक आणि नायिका यांच्यातील आहे. या कथेतील नायक मिसेस घाट्यांकडे आकर्षित झालेला असल्यामुळे तो पत्नीची मिसेस घाट्याबरोबर बरोबरी करून पत्नीचा अपमान करतो असे दिसते.

**४.२ :** “हे पाहा, मला तुझ्याशी काही बोलायचं आहे.”

“मग इथं बोलू शकता. पण मला आश्चर्य वाटतं– थोडं बोलावं. इतक्या योग्यतेची मी कधीपासून झाले?”

“तू आता अशीच का बोलत राहाणार आहेस माझ्या मनावर घाव घालीत?” तो त्राग्याकडून काकुळतीकडे झुकत म्हणाला.

“नाही बोलत. पण काय सांगायचं, ते तिथं नाही का सांगता येणार?”

“नाही. इथं मुलं आहेत.”

“असू देत. मुलांना सगळं समजलेलं बरं. ती लवकर शहाणी होतील.”

“त्यांनी नकोय व्हायला.” (पृ.४२)

वरील संवाद प्रोफेसर पिंपुटकर आणि त्यांची पत्नी यांच्यातील आहे. या संवादातून या पती–पत्नीमध्ये आलेला दुरावा कमी करण्याच्या प्रयत्नात असलेले पिंपुटकर काकुळतीला आलेले दिसतात.

**५. पक्षिणी :**

**मी थोडासा अश्वत्थामा :**

“जोशी. यू आर स्टिल हिअर?”

“साहेब थोडेसे पैसे पाहिजेत हो पैसे. माझी माणसं घरी आजारी आहेत. त्यांना पाठवीन थोडे.”

“सॉरी. आय कान्ट डू एनिथिंग. यू कॅन गो.”

“साहेब. इथं आम्ही राबतो ते कशासाठी?”

“बिकॉज यू गेट सॅलरी.”

“यापेक्षा अधिक किंमत नाही आमची?”

“यू कारकून्स कॅनॉट क्लेम इट. यू कॅन गो.” (पृ.४७)

वरील संवाद जोशी आणि त्यांच्या साहेबांच्यातील आहे. या संवादातून जोशीला करावा लागणारा आर्थिक संघर्ष समोर येतो.

**पक्षिणी :**

“आणखी एक लक्षात ठेवा. आम्हांला माणसं हवीत ती फॅक्टरी – वर्कमध्ये फुल इंटरेस्ट घेणारी हवीत. काल मी दोघांना कमी करण्याच्या नोटिसा दिल्या आहेत. तुम्ही विचार करा. तुम्ही राहता कुठं?”

“सिटीत सर. इथून वीसेक मैल येतं–”

“ओह– रोज तुम्ही इतक्या दूर येता? मग तर इट इज क्वाइट इंपॉसिबल फॉर यू टु अटेण्ड ऑफिस इन्टाइम आणि मुलं किती आहेत?”

“एकच सर–”

“दॅटस नाइस. नाऊ द कंट्री डसण्ट वॉण्ट यू टु प्रोड्युस मोअर चिल्ड्रेन – हॅ हॅ – टेक इट लाइटली– पण तुमची मॅटर्निटीची लीव्ह वगैरे येणार असेल तर मला आत्ताच सांगा.” (पृ.१२७)

वरील संवाद मिसेस कमल देशपांडे आणि त्यांचे बॉस यांच्यातील आहे. वरील संवादातून बॉस मिसेस देशपांडेंना त्यांच्या कामाचाप्रति जागरूक करताना दिसतात.

“तुम्ही अगदी निर्लज्ज झाला आहात. बायकोचे दिसवभरात काय हाल होतात तेही तुम्ही विचारत नाही. पाहात नाही.”

“माझे डोळे फुटलेत. मी आंधळा आहे.”

“फुटू देत. फुटू देत. माझे पण फुटू देत–”

“फुटतील. तुझे शाप असले तर फुटतीलही.”

“अगदी दोघांचे एकाच वेळी फुटतील. मनं उर फुटून गेलीच आहेत–”

“तात्त्विक बोलू नका. तात्त्विक बोलू नका. म्हणून पुन:पुन्हा ओरडतेय. व्यवहाराचं बोला. (पृ.१३३)

वरील संवाद मि. आणि मिसेस देशपांडे यांच्यातील आहे. वरील संवादातून दोघांचे ताणतणाव, नात्यातील दुरावा दिसून येतो.

**६. दावं :**

**कापुरुष** :

तो म्हणे, ‘सुनी, तू फार थकलेली दिसतेस! कशाला करतेस एवढी धडपड? समाजसेवा काय तूच केली पाहिजेस अस आहे?’

‘मग मी काय घरी बसून मांस वाढवून घेऊ?’

‘मांस वाढवून घे असं नाही–पण प्रकृतीला जप. बघ किती खराब झाली आहेस. आधी तबियत सांभाळ–मग समाजसेवा! तो सांगे.’

‘सॉरी – मला तुमचं पटत नाही. शोषितांसाठी काम करताना थोडं झिजलं तर झिजू दे शरीर.’

‘पण माझ काय?’

‘काय तुमचं?’

‘तू – तुझं शरीर – मला तुझं गुलजार शरीर हवं – पूर्वी कशी तू छान होतीस!’ (पृ.२९,३०)

वरील संवाद सुनीला आणि तिचा नवरा यांच्यातील आहे. या संवादातून सुनीलाचे कुटुंबाकडे, स्वत:कडे, नवऱ्याकडे झालेले दुर्लक्ष दिसून येते, तर या नायकाचे सुनीलावरील असलेले प्रेम, काळजीही या संवादातून प्रतित होते.

**वाल्या कोळी व बायको :**

‘अशी गप्प राहू नकोस. सांग, सांग काय ते. सांग – यू वॉंटेड टु टेल समथिंग. सांग काय ते. आता नाही ना मी दरिद्री उरलो? गरिबीच्या खालची पातळी?’ त्याचा स्वर कडवट होऊ लागला होता.

‘नाही.’

'झालो ना आता मी श्रीमंत? एवढा मोठा फ्लॅट, फर्निचर, गाडी – मिळालं तुला हवं ते सगळं? दागदागिने? कालच एक नेकलेस?'

'मला नको होतं–' ती म्हणाली.

'काय?'

'नेकलेस आणि इतरही सगळं–'

'नको होतं? नको होतं? पण तूच तर सर्व मिळवायला लावलंस, तूच. आठवत नाहीत तुला तुझे शब्द? तुम्ही गरीब आहात–त्याच्या खालची पातळी. दरिद्री–जन्मभर दारिद्र्यात खितपत.' (पृ.५१)

वरील संवाद या कथेतील नायक आणि नायिका यांच्यातील आहे. वरील संवादातून नायक अपमानित झाल्याचे आणि वाईट मार्गाने धन, संपत्ती मिळवित असल्याचे जाणवते. नायिकेला आता आपल्या वागण्या–बोलण्याचा पश्चात्ताप झालेला दिसून येतो.

**दावं :**

'डॉक्टरबाई चौकशी करत होत्या तुमची–' त्यानं काही उत्सुकता दाखवली नाही तीच म्हणाली,

'एक आनंदाची बातमी सांगायची होती तुम्हांला–'

तरीही त्यानं औत्सुक्य दाखवलं नाही.

पुन्हा तीच म्हणाली,

'आनंदाची बातमी कसली नाही विचारलंत?' तरीही त्यानं काहीच विचारलं नाही.

पुन्हा तीच म्हणाली,

'दिवस गेलेत मला, आणखी एक दावं आलं माझ्या गळ्यात–' (पृ.६७)

वरील संवाद या कथेतील नायक आणि नायिकेतील असला तरीही नायिकेकडून तो एकतर्फी झालेला दिसून येतो. नायक या संवादात सामिल होण्याचे टाळताना दिसतो, कारण त्याला बायकोची होणाऱ्या बाळाची, खर्चाची जबाबदारी टाळायची असते. वरील संवादातून नायकाला आपण पिता होण्याचाही आनंद झालेला दिसत नाही.

**कृमी** :

'काही विशेष – तू हसत नाहीस?'

'विचार करत्येय. सांगावं का नाही–'

'सांग बेशक सांग! तुझा नवरा कलेक्टर आहे. जिल्ह्याचा सर्वोच्च अधिकारी आहे – राज्याच्या गृहमंत्र्यांचा खास दोस्त आहे!'

'उद्या तुमच्याविरूद्ध मोर्चा निघणार आहे–' ती चाचपडत म्हणाली.

'मोर्चा? कोण काढणार आहे?'

'इथली महिला सभा.'

'ओऽ! वंडरफुल! अन् हे तुला कसं काय माहिती?'

'ती रोहिणी बर्वे आली होती इथं. त्या गजानन बर्वेची बायको. ऑर्गनाइज करतेय मोर्चा–घेराव–धिंड!'

'ब्लॅकमेल करायला आली होती?'

'नाही वाटलं तसं.'

'मग? सांगायला सावध करायला आली होती. ' (पृ.८३)

वरील संवाद कलेक्टर आणि त्याची बायको यांच्यातील आहे. त्यांच्या संवादातून कलेक्टरसाहेबांनी काहीतरी भ्रष्टाचारी काम केलेले असल्यामुळे त्यांच्याविरूद्ध मोर्चा निघणार असल्याने त्यांची पत्नी चिंतेत दिसते.

**समाधी** :

'आता नीट जेवा–खायचं, नीट औषधपाणी करायचं' ती म्हणाली.

'पैसे कुठून आणायचे?' त्याचा विकलांग प्रश्न.

'का? तुम्ही आणलेले ते आहेत ना. ते पुरतील तोवर. नंतर तुम्ही बरे व्हाल. भिक्षुकी तरी कराल की नाही चार घरची?'

‘ते? ते पैसे? अगो रांडे, ते बाबांच्या समाधीसाठी कमावून आणलेत. त्यातली पै नाही खर्च करायची कुणी!’ (पृ.१५७)

वरील संवाद पूर्श्या आणि सिंधू यांच्यातील आहे. वरील संवादातून पुर्श्या आजारी असतानाही समाधीसाठी साठवलेले पैसे खर्च करत नाही यावरून त्याची बाबांबरील श्रद्धा दिसून येते.

**७. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**पुत्रजन्मोत्सव** :

“नाव काय ठेवायचं, सांगा बरं” तिने एके दिवशी त्याला विचारलं.

“कुणाचं”

“आपल्या मुलाचं!”

“पण मुलगा होणार का मुलगी हे कुठं माहीत आहे?”

“कळेल की सेंटरवर दोन महिन्यांनी.”

“पण मला वाटतं मुलगाच.”

“का? मुलगा का? मुलगी का नाही?”

“ते नाही मला माहीत. पण मुलगाच. मला मुलगाच हवाय.”

“तू आईच्या पोटात होतीस तेव्हा तुझ्या आईला पण असंच वाटत होतं – मुलगा होणार पण तू झालीस. मुलगी.”

“होय ना!”

“बरं झालं – मला चांगली बायको मिळाली. मुलगी म्हणून तुझ्या आईन तुला टर्मिनेट केलं असतं तर?”

“होय बाई! आईनं मला वाढू दिलं. ती भाग्यवान पिढी होती. त्यांना दोन मुलांची परवानगी होती. आपल्या पिढीला एकच.” (पृ.२७)

वरील संवाद या कथेतील पती–पत्नीमधील आहे. या नायकाच्या संवादातून त्याचे स्त्रियांविषयी असलेले आदराचे स्थान, मुलगा–मुलगी भेदाभेद नसलेला दिसून येतो. या संवादातून काळाप्रमाणे लोकसंख्या वाढल्याने एकच अपत्य जन्माला घालणे अनिवार्य असल्याचेही दिसून येते.

**अयोध्या :**

"म्हणता म्हणता तेवीस वर्षांचा झाला. पुढच्या वर्षी करून टाकू लग्न नाहीतरी ठरवून ठेवलंच आहे त्यानं. कशाला वेळ काढायचा?"

"तुझा चान्स गेला – मुली बघण्याचा!"

"जाऊ दे. त्याची त्यानं शोधलीय ना! मला आनंद आहे."

"हे बघ. त्याला वेगळं बिऱ्हाड करायला लावायचं हं, मी फ्लॅट बघायला सुरूवात करतो त्याच्यासाठी."

"आता पार्ल्यात नाही मिळायचा. बोरिवलीपर्यंत जावं लागेल."

"म्हणजे काही लांब नाही हाँ."

"त्याचा संसार मांडून द्यायला घेईन मी आठवडाभर रजा."

"लागलीस वाटतं त्याच्या वेगळ्या संसाराचं स्वप्न बघायला?"

"नको बघू?"

"आपल्या आयुष्यातून आकाराला आलेलं एक वेगळ आयुष्य नाही? त्याच्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याला त्याची अशी छान ओळख मिळत गेली." (पृ.१८२,१८३)

वरील संवाद अनिलचे आई–वडील, सुहास आणि सुमन यांच्यातील आहे. वरील संवाादातून अनिलचे आई–वडील फक्त अनिलच्या आनंदाचाच विचार करताना दिसतात. प्रसंगी स्वत: तडजोड करून ते मुलाला सर्व सुखसोयी, सुविधा मिळवून देताना दिसतात.

**भारतातील उन्हाळा :**

"पुना ऑफिस. ज्योगलेकर." ऑपरेटरने लगेच फोन जोडला. जोगळेकर होतेच.

“ज्योगलेकर, खन्ना हीअर.”

“येस्सर–”

“इज द वीकली रिपोर्ट करेक्ट?”

“होय, सर. शंका का आली?”

“सेल्स आर नॉट सॅटिसफॅक्टरी. उन्हाळा तर इतका आहे.”

“इतर ठिकाणचे रिपोर्टस् आले सर, तुमच्या टेबलावर?”

“म्हणूनच तर विचारतोय.”

“फक्त पुणे विभागाचेच घटलेत का?”

“नाही सगळीकडचे रिपोर्टस तसेच आहेत. समथिंग सिरियसली रॉंग!” खन्ना स्वगत पुटपुटल्याप्रमाणे म्हणाले. अन् त्यांनी विचारलं, “सांगा, काय झालय? कॅन यू टेल समथिंग?”

“सर–” जोगळेकर सांगावं की नाही याचा विचार करून म्हणाले, “मला वाटतं– आपल्या कॉम्पिटीटर्सनी प्रचंड जाहिरात हॅमर केलीय. न्यूजपेपर्स., टेलिव्हिजन, रेडिओ, थिएटर्स – कदाचित त्याचा परिणाम–” (पृ.२२५,२२६)

वरील संवाद जोगळेकर आणि खन्ना यांच्यातील असून तो व्यावसायिक चर्चा करण्याच्या स्वरूपातील, फोनवरील आहे. या संवादातून सेल्स कमी होण्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न दिसून येतो.

**मैत्र** :

“वेलकम वेलकम टू अवर टाऊन.”

“पण पुन्हा हातात हात घेऊन म्हणाला, अत्यंत मनापासून आणि शुभेच्छापूर्वक स्वागत. नवीन असाइनमेंट तुम्हांस अत्यंत आनंदाची, समाधानाची आणि भरभराटीची जावो!”

“ए, फॉरमॅलिटीज पुरेत हं–” मी त्याला दाटलं आणि गाडीत उरलेल्या एकदोन बॅगा खाली घेण्यासाठी धावलो.

“डोण्ट वरी यार. या छोट्या शहरात वर्तमानपत्रांचे संपादक म्हणजे राजे असतात. तुझं सामान घरपोच येईल.”

“ते खरं रे, पण मला ते आवडणार नाही ना. आपलं सामान आपणच नको का उतरून घ्यायला?” (पृ.२६४,२६५)

वरील संवाद विवेक दामले आणि एकनाथ यांच्यातील आहे हे दोघे जिवलग मित्र असले तरी एकमेकांचे प्रतिस्पर्धीही आहेत. छोट्या शहरात संपादकाला महत्त्व असले तरी विवेक दामले आपला स्वाभिमानी स्वभाव टिकून ठेवताना दिसतो. म्हणूनच स्वत:ची कामे स्वत: करताना दिसतो.

**कुपुत्र** :

“मी शाळेतून आले आणि पाठोपाठच.”

“तू ओळखलंस?”

“न ओळखायला काय झालं? मुलगाच आहे ना आपला? किती खराब झालाय. इतकी वर्ष सक्तमजुरी भोगून–”

“बोलला काही?”

“काय बोलणार?”

“काय केलंन् आल्यापासून?”

“तिथ्थं बसून आहे. कपडे तेच आहेत अंगावर. बरोबर पिशवी आहे वाटतं एक. ठेवलीय खाली.”

“चहाबिहा विचारलास?”

“दिला. चहा घेणारेस का विचारलं, हं म्हणाला. दिला, प्याला. पोळी खाणारेस का विचारलं. नको म्हणाला.”

“आणखी काही बोललीस? तू? तो?”

“काय बोलणार? तो अशा परिस्थितीतून आलेला ........ ” (पृ.३६२,३६३)

वरील संवाद श्रीपादराव आणि त्यांच्या पत्नीमधील आहे. वरील संवादातून त्यांचा मुलगा श्री खुनाची शिक्षा भोगून घरी परतलेला असून तो शांत–शांत असलेला दिसून येतो. श्री चे आईवडील तो खुनी असूनही तो परतल्यावर त्याला घरात घेतात. त्याच्या खाण्यापिण्याविषयी चौकशी करताना दिसतात.

**८. घोडा :**

**घोडा :**

"काय ऐकलं की नाही, तुम्ही?"

"काय?"

"मी संपाची भाषा केली म्हणून मला मेमो दिला एम्. डी. सायबांनी."

"असं? कवा?"

"झाले दोन दिवस."

"राणे डोसा खात राहिला. विशेष चौकशी नाही, उत्सुकताही नाही."

"तुम्ही काय तरी लक्ष घातलं पाहिजे यात."

त्यानेच सुचवलं राणेला. म्हणाला, "एवढंसं बोललं तर शिस्तीच्या नावाखाली मेमो. काढून टाकण्याची धमकी. आपल्या कामगारांना आधीच पगार कमी. बोनस कमी. कॅन्टीन नाही. इतर फॅक्टऱ्या बघा–पन्नास –साठ पैशांत वर्करर्सना मस्त जेवण मिळतं. आपल्या कंपनीनं का करू नये असं? तुमच्या युनियननं विचारायला पाहिजे?" (पृ.२५)

वरील संवाद सुधाकर बापट आणिश जगन्नाथ राणे यांच्यातील आहे. कामगारांवर अन्याय झाला तर कामगार संप, मोर्चा करून विरोध करतात, तर कंपनीचे नुकसान होऊ नये म्हणून कंपनीचे मालक संपाची भाषा बोलणाऱ्या लोकांना मेमो देतात हेच वरील संवादातून दिसून येते. या दोन्ही बाजू पाहता कंपनी व्यवस्थित चालविण्यासाठी मेमो देणे हा त्याचाच एक भाग, तर संपाची भाषा, अन्यायाला विरोध हा कामगारांचा हक्क दिसून येतो. प्रत्येक व्यक्तीनुसार, पदानुसार

नीती–अनिती, अधिकार कर्तव्ये बदलत असतात हे. ह. मो. मराठे या संवादातून प्रभावीपणे मांडताना दिसतात.

**मशीन** :

“कंपनी आपलं खातं बंद करतीय म्हनं?”

“अस ठरतय बुवा.” इंजिनिअर मोघमपणे म्हणाला.

“मग?”

“मग काय?”

“कसं व्हायचं?”

“कोणाचं?”

“आमचं–तुमचं–”

“आमचं काय व्हायचं? आम्ही इंजिनिअर मंडळी. एक तर कंपनी आम्हांला नव्या मशीनवर काम करायला देईल.”

“जमेल?”

“न जमायला काय झालं? शिक्षण झालेलं असतं–आठ दिवस ट्रेनिंग घेतलं की पुरे. वाट्टेल ते काम जमतं आम्हांला–नायतर बघायची दुसऱ्या कंपनीत नोकरी–” (पृ.४६)

वरील संवाद खाशाबा आणि त्याच्या खात्यातील इंजिनिअर यांच्यातील आहे. शिक्षणाचा अभाव, नवीन तंत्रज्ञान वापरण्याची माहिती नसणे या गोष्टींमुळे खाशाबाला नोकरीची चिंता सतावते तर शिक्षण आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची कला या गोष्टीमुळे इंजिनिअरला कामाचे स्वरूप बदलले तरी काळजी वाटताना दिसत नाही.

**अग्नी** :

“काय भिवा, लै दिसांनी आलास?” शेटनं विचारलं. तेव्हा गरजू हसत तो म्हणाला,

“हां, काम निघालं–म्हणूनशान आलो–”

“काय काम काढलंस एवढं?”

“काम हेच, कामधामाचं.”

“कामधामाचं काय रे?”

“काम पायजे होतं.”

“काय रे बाबा? फॅक्टरीत सर्विसला हाईस ना तू?”

“हां, तसा हाय. पण काय खरं न्हवं.”

“काय रे?”

“ह्येच–संप आणि काय?”

“का? संप सुरू हाय फॅक्टरीत?”

“व्हय झाले दोन म्हयने. कदी संपायचा आन् पगारपानी सुरू व्हायाचं, देव जाणं.” (पृ.६३,६४)

वरील संवाद भिवा ओटवणे आणि तांबट (शेटजी) यांच्यातला आहे. भिवा ओटवणेच्या कंपनीत संप सुरू असल्याने पोटापाण्याची सोय करण्यासाठी तो पूर्वी करत असलेले काम परत करण्यासाठी शेटजीकडे जाताना दिसतो.

**सापळा** :

“काय होतंय काय तुम्हांला? गेले तीन–चार दिवस मी बघतेय–यू आर सो डिस्टर्बड्–”

“काही नाही. तू झोप.”

“मी नाही झोपणार. मला माहीत झालं पाहिजे, काय झालंय–”

“देवकुळेचा खून झालाय. पण मला त्यातलं काही माहीत नाही.”

“पण मी कुठं म्हणतेय तुम्हांला काही माहीत आहे?”

“मला खरंच माहिती नाही. देवकुळेचा खून झालाय हे माहीत आहे. पण इतर काही माहीत नाही. मला तसंच सांगितलंय सोनीसाहेबांनी–मला काहीही माहीत नाही. सुषमा–” (पृ.८५)

वरील संवाद रणदिवे आणि त्यांची पत्नी सुषमा यांच्यातील आहे. देवकुळेच्या खुनाचे साक्षीदार असलेल्या रणदिवेंना सोनीसाहेब काहीही माहिती न देण्यास बजावतात तर त्यांचे मन

त्यांना स्वस्थ बसू देत नाही. ही द्विधा मनस्थिती ह. मो. मराठे यांनी अचूकपणे या संवादातून टिपली आहे.

**टार्जेट** :

"बसा. बसा खुर्चीत." साने म्हणाले.

"नको साहेब, थँक्यू."

"ठीक आहे. असं म्हणत सान्यांनी भणगेकडे बघितलं."

"हा तुमचा चेक. भणगे गंगारामसमोर पाकीट ठेवीत म्हणाले. तुमच्या रजेचा पगार, ओव्हरटाइम, बोनस आणि ग्रॅच्युईटी. कंपनीकडून घेतलेला ॲडव्हान्स आणि कंपनीच्या ज्या मटेरिअलचं, मशिन्सचं नुकसान तुमच्यामुळं झाल्याचं सिद्ध झालं आहे. त्याची कॉस्ट–तशी अगदीच मामुली आहे–इतकं वजा करून उरलेल्या रकमेचा चेक आहे." भणगे थांबले.

वरील संवाद गंगाराम आणि सानेसाहेब यांच्यातील आहे. या संवादातून कामगार आणि मालक यांच्या नात्यावर प्रकाश पडतो. गंगारामला कामावरून काढून टाकले असताना शेवटच्या क्षणीही कंपनीने त्याच्याकडून येणारी सर्वप्रकारची वसुली गंगारामचा कोणताही विचार न करता वजा करून घेतलेली दिसते. एकीकडे जबरदस्तीने राजीनामा तर दुसरीकडे कंपनीची सर्व प्रकारची नुकसान भरपाई या दोन्ही गोष्टी अन्यायकारक असूनही गंगाराम या सर्व परिस्थितीपुढे हतबल दिसून येतो.

**९. युद्ध** :

**युद्ध** :

'सहकार्य मिळेल, पण आधी मागण्यांकडे बघायला पायजे तुम्ही.' पांगारे पुन्हा आग्रहाच्या भूमिकेत म्हणाला.

'आता मागण्याच तुम्ही उकरून काढू नका. पुढल्या कराराच्या वेळी बघू. धंदा नीट झाला तर ना तुमच्या मागण्या मान्य होणार?'

'धंदा बराबर होत असतोच साहेब. फक्त कंपनी सांगते धंदा नीट चालत नाय–' पांगारे आता स्वर भडकवीत म्हणाला.

'पांगारे–' मी म्हणालो, 'आज माझ्या नव्या पदावरचा पहिला दिवस. आज तुम्ही हे काय लावून धरलंय–'

'मी युनियनचं काम करतो साहेब, कामगारांचं हित मला बघावं लागतं. आता त्यांच्या या मागण्या मान्य करून .......'

'मला वाटतं– पांगारे आणि तुम्ही इतर कामगार मित्रहो, हा विषय आता थांबवावा–' मी चिडूनच त्यांना सांगितलं. (पृ.१६)

वरील संवाद जोगसाहेब आणि युनियन लिडर पांगारे यांच्यातील आहे. हे दोघेही आपापल्या जबाबदाऱ्या आपापल्या पदानुसार प्रामाणिकपणे निभावतात. परंतु कामगार आणि मालक यांच्यातील दरी या संवादातून दिसते.

**चौथा :**

'सर व्हेरी सिरिअस ॲक्सिडेंट. केमिकलची टाकी ब्लास्ट झालीय– कामगार भाजलेत.'

'भाजलेत? किती?'

'एकूण सात जण, सर–जस्ट नाऊ. सगळे तडफडताहेत. दे नीड इमिजिएट हेल्प. काय करू?'

जी. एम. तसे तिथं नुकतेच आले होते. काय आदेश द्यावा. हे त्याक्षणी त्यांना सुचेना.

'डॉक्टरांना बोलावू?'

'.......... ?'

'पोलिसांना इन्फॉर्म करू?'

'........... ?'

'जनरल हॉस्पिटलला पाठवू? पण ते खूप लांब आहे, सर–'

'............ ?'

'ॲम्बुलन्स बोलावू? अँड सर, फायर ब्रिगेडही इथं जवळ नाहीय–'

'लोकली काय करता येईल बघा– डोण्ट इन्फॉर्म एनीवन– मी आलोच–' (पृ.६२,६३)

वरील संवाद सिनिअर इंजिनिअर कुलकर्णी आणि कंपनीचे जनरल मॅनेजर यांच्यातील आहे. वरील संवादातून कंपनीच्या अपघातात झालेल्या जीवित हानी आणि नुकसान यांची तीव्रता लक्षात येते. अशा प्रसंगी तातडीने काय निर्णय घ्यावेत हे न समजल्याने आणि वरिष्ठांची परवानगी घेतल्याशिवाय निर्णय घेऊ न शकल्याने पेशंटना लवकर मदत न मिळाल्याचेही दिसून येते.

**छोटे मासे** :

'या फीचरचा लेआऊट तुम्ही केलाय खरा पण मला वाटतं तो थोडा बदलून घ्यावा. फारच बेढब.'

'आता तू मला शिकवायला पण लागलास वाटतं.'

मी तिखटपणे म्हणालो, 'लेखाच्या लायकीप्रमाणे झालाय लेआऊट.'

माझे शब्द त्याला लागले. खचलेल्या स्वरात त्याने विचारलं.

'लेख आवडला नव्हता तुम्हांला?'

'फारसा नाही.'

'मग छापायला–'

'तू कर्णिकांच शिफारसपत्र घेऊन आला होतास ना–' (पृ.)

वरील संवाद रत्नाकर गोखले आणि जोगळेकर यांच्यातील आहे. या संवादातून या दोघांमध्ये असलेली दरी दिसून येते. जोगळेकर गोखलेवर आपलाच अधिकार दाखवत असल्याचेही दिसून येते.

**केळकर हसला** :

'या. आय होप, यू पीपल हॅव कम वुइथ पॉझिटिव्ह आन्सर.' शेवडे म्हणाले.

'नो. वुई हॅव कम वुइथ निगेटिव्ह आन्सर.'

शेवडेसाहेबांनी हातातले कागदपत्र टेबलावर ठेवले आणि केळकरला विचारलं.

'का बरं? आय थॉट, यू हॅव ॲक्सेप्टेड कंपनीज न्यू प्रपोझल–'

‘वुई हॅव रिजेक्टेड इट–’ केळकर पुन्हा ठाशीव स्वरात म्हणाला.

शेवडेसाहेब आता अधिक सावधपणे बसले व त्यांनी विचारलं, ‘का बरं?’

‘बिकॉज.’ केळकर उत्तरला, ‘वुई आर नॉट फायटिंग ओन्ली फॉर धिस. केवळ पगारवाढ ही आमची मागणी नाही. ती मागणी आहेच, पण त्याशिवाय इतरही महत्त्वाच्या मागण्या आहेत. आम्ही ते सर्व निवेदनात मेन्शन केलं आहे आमच्या कामाचं स्वरूप, आम्हांला सन्मानाची वागणूक मिळेल याची गॅरंटी–’

‘पण त्याचा विचार इन्डिव्हिज्युअली मॅनेजमेंट करू इच्छिते–’

‘सन्मानाची वागणूक द्यायची किंवा नाही हेही मॅनेजमेंट व्यक्ती बघून ठरवणार की काय, शेवडेसाहेब?’ केळकरने विचारले. (पृ.१९०)

वरील संवाद शेवडे आणि केळकर यांच्यातील आहे. या संवादातून कंपनीकडून कामगारांना त्यांचे न्याय व हक्क मिळत नसल्याने कामगार कंपनीकडे आपल्या न्याय व हक्कासाठी मागण्या करताना दिसतात.

**अंगार :**

‘काल तुम्ही अंडर प्रोटेस्ट पगार घेतला–’ त्यांनी नाराजीच्या स्वरात प्रश्न केला.

‘साहेब, सर्वांनीच.’

‘ती सामुदायिक कृती होती?’

‘होय, सर.’

‘पण तुम्ही तर खूष होता पगारवाढीवर.’

‘पण महाजननं जे सांगितलं, त्यामुळं–’

‘तुम्ही स्वत:ची बुद्धी का नाही चालवली?’

‘म्हणजे–’

‘अंडर प्रोटेस्ट अशी कृती करायला तुम्ही नकार द्यायचा.’

‘पण सामुदायिक कृती म्हटल्यावर–’ (पृ.२२०)

वरील संवाद महाजन आणि एकबोटे यांच्यातील आहे. या संवादातून महाजन कामगारांच्या बाजूने कंपनीला प्रश्न करतात तर कंपनीच्या बाजूने एकबोटे नेतृत्व करताना दिसतात.

**लाव्हा :**

'चलू या. मी सूतोवाच केलं.'

'घाई का?'

'कामं वाट बघताहेत टेबलावर.'

'असं काय अर्जंट आहे? बसा थोडा वेळ.'

'अर्जंटच आहेत सगळी. दोन चार क्लाएंटस्च्या जाहिरातीची आर्टवर्क्स आज पुरी व्हायचीत. डिझाइन्समध्ये सडन चेंजिस सुचतात– कॉपी मॅटर चेक करायची–वसुली–'

'तुम्ही अगदी यशस्वी धंदेवाईक झालाय हं–' (पृ.२५४,२५५)

वरील संवाद ॲडइंप्रेस प्रा. लि. चे पार्टनर सुधाकर भावे आणि वसंत कणेकर यांच्यातील आहे. या संवादातून भावे आपल्या कामात खूप व्यग्र असलेले दिसतात. शिवाय त्यांच्या कामाचे स्वरूपही बदलत असलेले दिसते.

भालेकर आणि मंजिरी या नवरा–बायकोच्या संवादातून घरातील समस्या समोर येतात. साळवी आणि त्यांच्या पत्नीतील संवाद साळवींच्या कामाच्या ठिकाणचे असमाधान व्यक्त करते. साहेबराव शिर्के आणि किशोर पेंडसे यांच्यातील संवाद श्रेष्ठ कनिष्ठता व्यक्त करते. पंडित आणि त्यांची बहीण यांच्यातील संवाद सामान्य माणसाची लग्नाची चिंता दर्शवतो. अण्णा आणि अरूण यांचा संवाद दोघांना करावी लागणारी तडजोड दर्शवतो. पंत आणि त्यांच्या पत्नीमधील संवाद कितीही संकटे आली तरी संस्कार माणसाला चांगलीच शिकवण देत असल्याचे बोलके उदाहरण म्हणून पुढे येते. सुहास साठे आणि सुमन साठे या आदर्श पति–पत्नीमधील संवाद दोघांची तडजोड करून मुलाला सर्व सुखसोयी देण्याची मानसिकता समोर आणते. वेगवेगळ्या नात्यांचा, समस्यांचा, प्रेमाचा, जिव्हाळ्याचा, काळज्यांचा, नातेसंबंधांचा वेध या संवादातून घेतलेला दिसतो.

ह. मो. मराठे यांच्या कथासंग्रहांमध्ये विविधप्रकारचे संवाद लेखन आलेले दिसते. त्यामध्ये शैक्षणिक, ओद्योगिक, आध्यात्मिक, राजकीय जीवनावरील कामगार–मालक संवादही आलेले दिसतात. ह. मो. मराठे यांनी विविध संवादांच्या माध्यमातून कधी परिणामकारक भाष्य केले आहे तर कधी निवेदन केले आहे. छोटे–मोठे संवाद कथांची परिणामकारकता वाढवितात. सहजसुंदर, ओघवते संवाद वाचकांचे लक्ष केंद्रित करून ठेवतात. दोन व्यक्तींमधील संवादातून कथेचे कथानक पुढे सरकत राहते, तर त्यातून निघणारा आशय कथेला उंची प्राप्त करून देतो. छोट्या–मोठ्या संवादातून पात्रांची ओळख परिणामकारक होताना दिसते. दोन किंवा अनेक व्यक्तींच्या संवादांचा अभ्यास केला तर त्या संवादातून दिसणारे त्या–त्या व्यक्तींचे गुण–अवगुण समजतात.

## कादंबरी :

### १. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :

'कशाची काळजी? मी आहे ना?'

'तुला नाही कळायचं. पण आता आपण लवकर आटपू या.'

'हो. मी केलाय विचार. सध्या मला तरी नोकरी आहेय. तू थोडक्यात संसार करशील ना? आपणाला मिळणाऱ्या पगारातच भागवायचं. तुला पण एखादी नोकरी बघायला हवी. च्यायला, एकट्याला मिळणाऱ्या शे–दीडशेत कसं भागवायचं?' (पृ.५,६)

वरील संवादातून नायकाची मध्यमवर्गीय आर्थिक स्थिती दिसून येते.

"काय काकू, आज पायीच?"

"अरे मिस्टर गेलेत ना बाँबेला गाडी घेऊन!"

"अस्सं? त्यांच्या काय म्हणा– सारख्या बाँबे–पुणं–दिल्ली अशा ट्रिप्स असतातच."

"बिझनेसचा व्याप वाढवून ठेवलाय ना त्यांनी!"

"तुम्ही आता दुसरी एक गाडी घ्या, काकू. तुमच्यासाठी. बाजारहाट वगैरेसाठी."

"घ्यायचीय ना. पुढच्या महिन्यात येतीय्." (पृ.८)

वरील संवादातून काकूंची आर्थिक सुबत्ता आणि त्यांच्या मिस्टरांचा कामाचा व्याप यांची कल्पना येते.

"अरे तुला मिळाली का दुसरी खोली?"

"नाही. शोधतोय."

"शोधा बाबांनो लवकर. आम्हांला हवी आमची खोली."

"हो. ना. पण एवढी परीक्षा आटपू दे–"

"हे बघ, तुझी परीक्षा संपो नाही तर न संपो, तू आपली खोली सोड. आम्ही घरं बांधली ती धर्मशाळा म्हणून नव्हे. एकदा मेले चिकटले की चिकटलेच. महिना चार रूपये तर देतोस. तू आपली खोली आजच्या आज मोकळी कर कसा."

"प्लीज काकू, एवढी परीक्षा तरी आटपू दे–"

"नाही. तुझ्या परीक्षेसाठी मी माझे हजार रूपये बुडवू का? मेन रोडवरची जागा. त्यात कॉर्नर. क्लासवाला हजार रूपये देतोय. तू आपली जागा खाली कर. उगीच कटकट करू नकोस! भिकारी ते भिकारी आणि वर पुन्हा माजोरी." (पृ.१०)

वरील काकू आणि नायकातील संवादातून काकूंची धनलालसा, खोलीवरील आपला अधिकार आणि नायकाची अगतिकता, आर्थिक परिस्थिती इ. गोष्टींवर प्रकाश पडतो.

"उडत गेलीस तू आणि तुझी जागा. मी रस्त्यावर बसून अभ्यास करीन. आगरकरांनी नाही केला?"

"मग केव्हा सोडतोस?"

"उद्या सोडतो. च्यायला हवी कशाला तुझी फुकटची भांचोदगिरी?"

वरील छोट्याशाच संवादातून नायकाची स्वाभिमानी वृत्ती आणि काकूंना खोली खाली करण्याची असलेली घाई दिसून येते.

"खरच काकू. तेव्हा अक्कल नव्हती. माफ करा. पोराचं काय एवढं मनावर घेता?"

"पोर असायला काय झालं? पोर काय इतकं उर्मट नाही बोलत."

“चुकलं म्हणतोय ना? तुम्ही कुठं न् मी गरीब माणूस कुठं! पण प्लीज, देसाईबाईंना सांगा तुमचं त्या नक्की ऐकतील. फार हाल चाललेत हो. त्यांतच बायकोला दिवस गेलेत.”

काकू चमकून थबकल्या.

“दिवस गेलेत?”

“हो. होय ना. म्हणून तर, म्हणून फार गरज आहेय. तीन एक महिने–”

“दिवस गेले नि अजून आम्हांला पत्ता नाही.”

“हॅ हॅ – सांगणारच होतो तुम्हांला.” (पृ.१४)

वरील नायक आणि काकू यांच्या संवादातून नायकाची बेकारी, नायकाची पत्नी गर्भवती असणे, नायकाची आर्थिक स्थिती खराब असणे अशा गोष्टींवर प्रकाश पडतो.

“ही घ्या काकू.”

“काय हे?”

“बारशाची म्हणून आपली एक लहानशी भेट.”

काकूंनी वस्तू घेतली, आणि क्षणार्धात खुर्चीवर ठेवून दिली.

“कशाला आणलीस?”

“आपली भेट म्हणून.”

मला कळतय काकू–हलकी आहे खूप. तुमच्या श्रीमंती वस्तूंत ती अगदीच कवडी–किंमतीची आहे.

“देसाईबाई आल्या असतील तर प्लीज बाहेर घेऊन या. बोलू आपण आताच–” तो विषयाला लोंबकळायचाच प्रयत्न करतो.

“अरे पण या धांदलीत?”

“काकू मला फार गरज आहे–”

“गरज फार असेल तर आधी नको का जागं व्हायला?”

“नाही सुचलं. प्लीज पाच मिनिट काढा ना काकू!”

“बघते येतात का–लोचटपणा करतोय एकेक जण––” (पृ.३१)

वरील बारशाच्या वेळच्या नायक आणि काकू यांच्यातील संवादातून नायकाची आर्थिक परिस्थिती नसतानाही नोकरीसाठी चाललेली काकूंची मनधरणी, नोकरीसाठी चाललेला काकूंबरोबरचा लाळघोटेपणा आणि काकूंची नायकाकडे पाहण्याची तुच्छ बुद्धी दिसून येते.

“शेटजी प्लीज. कृपा करा. नाही म्हणू नका. शंभराच्या ऐवजी ऐंशी द्या. पाऊणशे द्या. फार गरज आहे हो. अन्नाला लावा. मी बेकार. बायको गर्भार. मोठी बिकट परिस्थिती आलीय म्हणून. प्लीज,

“नाही म्हणून नका– तुमचे उपकार जन्मभर स्मरेन–”

शेटजींनी त्याला झिडकारल्यासारखं करून आपले पाय सोडवून घेतले.

“मी बघतो. पण हे असलं करू नका. तुमच्यासारख्या शिकल्यासवरल्या ग्रॅज्युएट माणसांनी आमचे अडाण्यांचे पाय धरायचे म्हणजे अगदीच ऑकवर्ड होतं.”

“मी गरजू आहे शेवटी. आज मी अडचणीत आहे.”

“तुम्हांला घेतलंही असतं मी. पण तुमचं लक्ष सरकारी नोकरीकडे असणार. मागच्यासारखेच एके दिवशी तुम्ही गुल होणार. आमचं काम सफर होतं की नाही.” (पृ.४६)

वरील शेटजी आणि नायकाच्या संवादातून नायकाची बेकारी, अगोदरची शेटजींकडची सोडलेली नोकरी आणि परत शेटजींकडेच नोकरीसाठी याचना या गोष्टी तर दिसतातच परंतु अडाणी असलेल्या शेटजीकडे ग्रॅज्युएट नायक नोकरीसाठी याचना करतो. यातून समाजव्यवस्थेतील तफावत दिसून येते. शिक्षण असूनही रोजगाराची भेडसावणारी समस्या यावरही प्रकाश पडतो.

“कुठं असतोस हल्ली?”

“आहे तिथच–”

ही एक ट्रिक मोठीच छान सापडलीय आपणांला.

“तू कुठं असतोस?”

“गोव्याला.”

‘‘साला तू कुठं तरी मास्तर होतास म्हणे?’’

‘‘काही दिवस होतो. पण मला त्या धंद्याचं बिलकुल लायकिंग नायन्. लोक तर साले नाक मुरडतात.’’

‘‘मग हल्ली काय करतोस?’’

‘‘पोलिस सब इन्स्पेक्टर. साला म्हटलं एक दिवशी डॅश द्यायची–’’

डॅश डॅश–

‘‘आता साला लोक जाता येता सलाम करतात. दारू, पैसा, पोरी. काय तोटा नाय. आता प्रमोशनला ड्यू आहे.’’

वरील ढोणकर आणि नायकाच्या संवादातून ढोणकरची बेदरकार रंगेल वृत्ती, आत्मविश्वास आणि परिस्थिती आपल्या म्हणण्याप्रमाणे चालते असा विश्वास या संवादातून दिसून येतो.

‘‘साला ते तर आहेच. ते सोडतो काय? पण त्याच्यावर एक औषध आहे. जाताना दोन पपया नेणार नि खायला घालणार गुपचूप. उद्यापर्यंत खेळ खलास.’’

‘‘पाडवणार?’’

‘‘अलबत. आपणाकडे वात्सल्य वगैरे काही नाही. आपणाला नको ना? कट्. जे हवं ते दोनचार दिवस घ्यायचं. जादा कटकट नही मंगता.’’

‘‘तुला काही वाटायचं नाही गर्भ पाडवायला?’’

‘‘छोडो यार. स्वत:च्या बायकोच्या पोटात वाढणार म्हणून जरा वाटेलही. पण त्याच क्षणी स्वत:ला सावरायचं. हे बघ, या देशात जगायचं तर असल्या लहान सहान क्रुरतेला डगमगून भागणार नाही.’’ (पृ.५७,५८)

वरील नायक आणि ढोणकर यांच्यातील संवादातून ढोणकरचा बेदरकारपणा, बनेलवृत्ती, स्वार्थी, भोगवादी, चंगळवादी वृत्ती दिसून येते. या वृत्तीमधून ढोणकर बायकोचा गर्भपात करण्याचा

विचार करतो परंतु नायक परिस्थितीने अगतिक होऊन आणि मित्राच्या प्रेरणेने आपल्याही बायकोचा गर्भ पाडवण्याचा विचार करतो.

“कधी म्हणता?”

“परवा दुपारीसा–”

“हां–हां म्हणजे मिसेस गोडश्यांच्याकडे–”

“तर–आपल्याकडची जागा–”

“मी तुम्हांला म्हणाले ना, वुई प्रिफर अनमॅरिड गर्ल्स्–”

“पण....... पण माझ्या मिसेसची काही अडचण नाहीय–”

“त्या प्रेग्नंट आहेत म्हणालात काल तुम्ही–”

“येस, येस. शी वॉज यस्टर्डे. पण आता काही अडचण नाहीय–”

“हाऊ?”

“ॲबॉर्शन–” (पृ.७३)

वरील देसाईबाई आणि नायक यांच्यामधील संवादातून नायकाची पत्नीच्या नोकरीसाठी चाललेली धडपड. तिचे आपणहून घडवून आणलेले दोनच दिवसांत ॲबॉर्शन आणि देसाईबाईंचा लग्न झालेल्या बायकांना नोकरीसाठी नकार या सर्व गोष्टी स्पष्ट होतात.

“भिकारचोटा, हे गर्भाचं प्रकरण बोलू नकोस बाहेर कुठं....... राक्षस झाला आहात तुम्ही. राक्षस झालाहात–”

“होय झालोय हो. व्हायला नको होतो. पण काय करू? तिचं गर्भारपण, औषधं, बाळंतपण ......पैसे. पैसे हवेत. कुठून आणू? तिला यातलं काही माहीत नाही. नोकरी सुटल्याचं पण माहीत नाहीय– तिला काही माहीत नाहीय– कसं सांगू तिला? कोणत्या तोंडानं?”

त्याला एकदम भडभडून आलं तो मट्‌कन त्यांच्या पायाशी बसला नि त्यांच्या मांडीवर डोकं ठेवून बांध फुटून रडू लागला.

त्यांनी त्याला थोपटलं. आपल्या धोतराच्या सोग्यानं त्याचे डोळे पुसले. चल. आता रडून काय होणारैय? ‘‘चल. दवाखान्यात चल. कपडे असेच राहू देत. उद्या करूया व्यवस्था. तिच्या खाण्यापिण्याची काय सोय केली आहेस? नसेलच काही. मी मुलाहाती कण्हेरी पाठवून देतो ती दे तिला.’’ (पृ.८३)

वरील नायक आणि सहस्त्रबुद्धे यांच्या संवादातून नायक अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीत असल्याचे दिसते. नायक पैशासाठीच वसूचा गर्भपात करतो परंतु नंतर त्याला आपल्या राक्षसी कृत्याचा पश्चात्ताप होत असल्याचे दिसते. सहस्त्रबुद्धेंच्या सहृदय वृत्तीवरही प्रकाश पडतो.

**२. काळेशार पाणी :**

‘तू इथं रहातेस?’ त्यानं मुंबईच्या थाटात प्रश्न केला.

‘तिथ पाणंदीतून वाट आहे.’ कमळीनं आपलं दार दाखवलं.

‘आणि भजी पण विकतेस?’

‘हो आईनं बसवलय.’

‘आई कुठं?’

‘घरी गेलीय?’

कमळीला वाटलं, रस्त्यावरच्या भारवाल्या बायांसारखाच हाही आई घरी कशाला गेलीय म्हणून विचारणार. पण त्यानं तस विचारलं नाही.

‘नेहमी विकतेस?’

‘हो, कधी कधी. आईला काम असेल तेव्हा.’

‘कमळीनं त्याला त्यातल्या त्यात चांगल्या पानावर ठेवून भजी देऊ केली.’

‘घे.’

‘मला नको.’

'घे ना–' कमळीचे डोळे त्याच्या डोळ्यात बुडून गेले. त्याचेही. दोघांच्याही अंगावरून सायंकाळचा वारा रूमझुमून गेला.

'तू आता आमच्याच शाळेत राहणार?'

'वर्षभर.'

'मग?'

'परत मुंबईला. यंदा हवा बदलायला आलोय. गेल्या वर्षी आजारी होतो.'

'मुंबईला होतास? पुस्तकातल्या सारखीच आहे कारे मुंबई?'

'भलतीच मोठी. खूप–' (पृ.९)

वरील संवाद विद्यार्थीदशेतील कमळी आणि सामंत यांच्यातील आहे. लहान वयातही कमळीला भजी विकावी लागतात. ती ग्रामीण भागातील असल्याने तिला असलेले मुंबईचे कुतूहल दिसते. सामंत आजारी होता म्हणून तो वर्षभरासाठी ग्रामीण भागात एक उपचाराचाच भाग म्हणून येतो आणि तेथेच शिक्षण घेतो. दोघांचे संबंध मैत्रीचे असल्याचे त्यांच्या संवादावरून स्पष्ट होते.

'माकाच हवे हत. भूक लागली हा–'

'असा सरळ बोल–' मारूती म्हणाला नि त्यानं चांगले भरपूर मूठ शेंगदाणे नि गुळाचा खडा तिच्या हातावर ठेवला.

'पैशे मगे आये देत–'

'तुज्या नावावर उधारी मांडून ठेवतंय– तूच दी.'

'मी खयसून देव? मी काय पैशे मिळवतंय?'

'वर्सा– दोन वर्सांनी दी–'

'वर्सा–दोन वर्सांनी तरी कशे देऽ व?'

'माज्याकडे न्हिजाक ये. मी फेडून घेयन.' मारूती म्हणाला आणि त्यानं कमळीला डोळा घातला.

वरील संवाद कमळी आणि मारूती साटम यांच्यातील आहे. वरील संवादातून कमळीचे कोवळे वय आणि मारूती साटमची कमळीकडे पाहण्याची अनैतिक दृष्टी प्रतित होते. कमळीची

आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याचेही येथे प्रत्ययाला येते. कमळीला न समजणारा मारूतीचा संवाद तिचे बालवय अधोरेखित करतो.

‘घे.’

‘पण इतक्या फुलांचं काय करू?’

‘आंगठ्या कर.’

‘आणि देऊ कुणाला?’

‘नवऱ्याला दे–’ त्याच्या आईनं आपल्या एका मैत्रिणीला म्हटलेलं त्यानं ऐकलं होतं, तसंच तो तिला म्हणाला.

ती उगीचच लाजली. मग चिडका स्वर करीत म्हणाली.

‘तू उगीचच्या उगीच मला चिडवू नको हा–’

‘अगं चिडवत नाहीय तुला. गमतीनं म्हणालो. तू गप्प गप्प आहेस ना म्हणून.’

तिनं फुलांची एक आंगठी करून त्याला दिली. त्यानं ती बोटांच्या फटीत ठेवली, नि मनसोक्त हुंगली.

‘मला कशाला यायला सांगितलस?’

‘तुझे काल वडील वारले ना? म्हणून तुला खूप रडायला आलं का गं?’

वरील कमळी आणि सामंताच्या संवादावरून कमळीचे वडील वारल्यामुळे कमळी दुःखी असेल म्हणून सामंत तिचे सांत्वन करतो. त्याच्या बालवयातील मैत्रीचे, गमती–जमतीचे प्रसंगही या संवादातून प्रतित होतात.

‘तिनं विचारलं, तू वडिलांना काय म्हणतोस?’

‘बाबा.’

आपण विष्ण्याला कधीच ‘बाबा’ म्हटलं नाही, आणि आपणांला बाबा म्हणायला कुणी शिकवलंही नाही. त्या वेळी कमळीला फार फार वाईट वाटलं. तरीही तिच्या मनात एक प्रश्न निर्माण झालाच. तिनं विचारलं,

‘पण आपण बापाला बाबा का म्हणायचं?’

‘ते वडील असतात. त्यांनी आपणाला जन्म दिलेला असतो. ते आपला सांभाळ करतात. आपणाला जेवायखायला घालतात–’

‘हट्. विष्ण्या कधीच–’

‘विष्ण्या म्हणालीस तू परत–’

‘बाबा. पण आमचे बाबा कधीच आम्हांला खायला घालीत नसत. आई सारखी त्यांच्यावर रागवायची–’

‘तरीसुद्धा आपण वडिलांना बाबा म्हणायचं असतं......’ (पृ.३२)

वरील सामंत आणि कमळीच्या संवादातून सामंतवरील चांगले संस्कार आणि कमळीवरील असंस्कार प्रतित करतात. विष्णूने आपले वडिलांचे कर्तव्य पार पाडले नसल्याचेही या संवादातून प्रतित होते.

‘त्याचे लेक होय गो तू?’ प्रश्नानंतर थोडा वेळ थांबून मग ते बोलत राहिले,

‘तो महा नीच माणूस. जन्मभर रांडेच्यानं तुझ्या आयशीस छळलंन. सदानकदा मेला त्या भिकीच्या पडवीवर पडलेला. कामधामाच्या नावानं शंख. काय शेतात होईल तितक्या भातावर दिवस ढकलायचे. घराकडे लक्ष नाही. तुझ्या आईला सदानकदा मारझोड. जन्मभर रडली बिचारी. आता त्या भिकीला म्हणावं, घे एकदा सगळं मढ्यावर घालून आपल्या–तुझ्या आयशीच बरं आहे ना?’

‘हो–’ मग लगेच खुलासा करत कमळी म्हणाली,

‘भिकीच माझी आई–’

ते एकदम चमकल्यासारखे झाले. भिकीची मुलगी आपल्याकडे आलीय हे बघून खवळूनच उठले.

‘त्या रांडेची पोर तू! मग तू इथं कशी? अरे हिला कशाला आणलीस इथं? चल चल, नीघ आधी, त्या रांडेची अवलाद आमच्या घरात नको. चल नीघ–’

वरील संवाद सामंतचे मामा आणि कमळी यांच्यात झालेला आहे. नैतिकतेने जन्माला आलेल्या मुलांना समाजात मानसन्मान, सहानुभूती मिळते तर अनैतिकतेने जन्मलेल्यांना अवहेलना वाट्याला येते हेच सत्य या संवादातून मराठे यांनी प्रतिपादन केले आहे. तर शोषण होत असलेल्या विवाहीत स्त्रीकडे समाज सहानुभूतीने पाहतो तर असहाय शोषित स्त्रीला अजूनच शोषण सहन करावे लागते हे प्रत्ययाला येते.

**३. इतिवृत्त :**

'नाडकर्णी.'

'मी वैद्य बोलतोय ऑफिसमधून–काही विशेष नाहीय. पण भोगल्यांचा फोन आला होता आता एका बातमीसंबंधी–'

'कोण भोगले?'

'तुम्हांला माहिती नाही साहेब?'

'तुम्ही सांगा–'

'हे भोगले म्हणजे मुख्यमंत्र्यांचे साडू–'

नाडकर्णींनी क्षणभर विचार करत पुढं विचारलं,

'कोणत्या आयटेमबद्दल विचारत होते?'

'तुम्ही आज रात्री मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर जेवायला गेला होता–'

'मग'

'त्याची बातमी दिली की नाही विचारत होते– त्यांना फ्रंट पेजवर पायजे– माझं प्रूफपण ओके झालं– आता अर्ध्या तासात मशीन सुरू होईल– दोन वाजलेत आता. अण्णासाहेबांना सांगायच म्हणत होते झोपायला जाण्यापूर्वी–'

'कोण झोपायला जाण्यापूर्वी?'

'अण्णसाहेब.' (पृ.२,३)

वरील संवाद भास्कर वैद्य आणि नाडकर्णी यांच्यातील आहे. मुख्यमंत्री अण्णासाहेब छोट्या गोष्टींची पण मोठी बातमी करण्याची इच्छा धरतात. संपादकाचे आणि आपले संबंध स्नेहाचे आहेत हेच दाखविण्याचा हेतू दिसतो. वरील संवादातून वृत्तपत्रीय कामकाजात राजकारणी लोकांचा होत असलेला हस्तक्षेप दिसून येतो.

'काय करणार आहात?'

'मी सांगतो त्याला बोलावून–'

अण्णासाहेबांनी चेहऱ्यावर नापसंती व्यक्त करीत म्हटलं,

'काही तरी करू नका.'

'अहो पण पुण्यामुंबईसारखं इथं? इतका ऊर्मटपणा? संपादक झालास म्हणून काय आकाशातून आलास की काय? मी आत्ताच फोन करतो त्याला–'

'नाडकर्णी मोठ्या पेपरमध्ये काम करून इथं आलेत हे विसरू नका.'

'आणि त्यांनीही अण्णासाहेब या राज्याचे मुख्यमंत्री आहेत व भोगले त्यांचे पाव्हणे आहेत हे विसरू नये.' भोगले म्हणाले.

चीफ सेक्रेटरी गोसावी आले म्हणून मुख्यमंत्री ऊठून गेले.

'नाडकर्णी रोज टीकाच करणार काय आता यांच्यावर?' अण्णासाहेबांच्या धर्मपत्नीनं विचारलं.

'बघू ना कशी करतो?' (पृ.४४)

वरील संवाद मुख्यमंत्री अण्णासाहेब जगदाळे, भोगले आणि अण्णासाहेबांची पत्नी यांच्यातील आहे. नाडकर्णी आपल्या कार्याशी एकनिष्ठ असल्याचे परंतु भोगले अण्णासाहेबांच्या मर्जीप्रमाणे वागत नसल्याचे प्रतित होते. ते मुख्यमंत्र्यांवरही टीका करताना दिसतात. भोगल्यांना आपण मुख्यमंत्र्याचे पाव्हणे असल्याचा उपयोग करून घ्यायचा असल्याचे चित्र समोर येते.

'मग त्या परवाच्या बातमीचं काय करता?' भोगल्यांनी म्हटलं.

'कुठली?'

'मुख्यमंत्र्याकडच्या भोजनाची–'

‘अहो ते खाजगी स्वरूपाचं जेवण होतं. त्याची बातमी कसली द्यायची?’

‘अण्णासाहेबांना पायजे ती बातमी यायला–’

‘मी सांगितलं ना–मी अण्णासाहेबांना सांगेन म्हणून मी ती बातमी देणार नाही. त्यात बातमी देण्यासारखं काही नाही.’

‘हे फायनल समाजायचं का?’

‘माझी हरकत नाही– नाडकर्णी म्हणाले. आणि पुन्हा अण्णासाहेबांनी विचारलंच तर त्यांना सांगा–नाडकर्णी कधीतरी भेटतील तेव्हा बोलतील.’ (पृ.५१,५२)

वरील संवाद संपादक नाडकर्णी आणि भोगले यांच्यातील आहे. नाडकर्णी खाजगी गोष्टींची जाहिरात करत नाहीत तर भोगले खाजगी, वैयक्तिक गोष्टींनाही प्रसिद्धी देण्यासाठी नाडकर्णींवर दबाव आणत असल्याचे प्रत्ययाला येते.

इतकी माहिती देऊन आमदार नाईक म्हणाले,

‘अण्णासाहेबांचं कुलदैवत आहे ही देवी.’

‘कोण अण्णासाहेब?’

‘मुख्यमंत्री आपले. हे त्यांचं कुलदैवत. वर्षातून एकदा अण्णासाहेब सहकुटुंब देवीला येतात. पूजा–अभिषेक करतात. गावभोजन घालतात. देवीला सोन्याचा मुखवटा दिलाय त्यांनी सीएम झाल्याबरोबर पहिल्या वर्षी–’

‘नवस फेडला?’ नाडकर्णींनी हसत विचारलं.

‘तर काय! किती दिवस नवस बोलून बसले होते–’

‘मला मुख्यमंत्री कर– सोन्याचा मुखवटा करीन! देवी नवसाला पावली!’ (पृ.६८)

वरील संवाद आमदार गजानन नाईक आणि संपादक नाडकर्णी यांच्यातील आहे. वरील संवादातून अण्णासाहेब श्रद्धाळू असल्याचे चित्र आणि देवीचे जागृत देवस्थान यावर लक्ष वेधले जाते. मुख्यमंत्री झाल्यावरही ते देवीला विसरताना दिसत नाहीत.

‘नाव काय तुझं?’

‘गंगाराम.’

‘किती वर्ष त्या हॉटेलमध्ये काम करतोस?’

‘दोन वर्ष झाली.’

‘का आलास हॉटेलमध्ये नोकरीला?’

‘आधी तो काहीच सांगेना, मग भाईंनी त्याला सांग’ असं सांगताच तो म्हणाला,

‘घरून पळून आलो.’

‘का पळून आलास?’

‘बापानं हाकलून लावलं?’

‘हाकलून लावलं? का?’

‘बाप म्हणायचा–तुला खायला घालायला माझ्यापाशी पैसा नाय.’ (पृ.८७)

वरील संवाद नाडकर्णी आणि हॉटेल कामगार गंगाराम यांच्यातील झालेला आहे. वरील संवादावरून गंगारामची आर्थिक परिस्थिती स्पष्ट होते. गरिबीमुळे गंगारामच्या वडिलांना त्याचा सांभाळ करणेही अवघड होते हेच चित्र येथे समोर येते.

‘अहो तुम्हांला एक सांगायचंच राहिलं–’

‘नवी औषधं आणायचीत ना?’

‘मरो हो औषधांचं. ती जन्माचीच मागं लागलीत.’

‘मग दुसरं काय?’

‘तुमचे ते कविराज की कोणीतरी–’

‘कविराज कसले? कविमर्कट–’

‘तेच ते तर तुम्ही बिहारला गेला त्या मुदतीत ते इथं आले. त्यांनी तुमची कसली ती कॅसेट घेतली काढून टेपरेकॉर्डरमधून–’

‘अस्सं? कधी? आणि एकटेच होते?’

‘एकटेच कसे असतील? बरोबर होते कोणीतरी चार लोक. भोगले का कोण–’

‘माय गॉड! काय केलं त्यांनी? काही दंगामस्ती? शिवीगाळ? तुला काही त्रास दिला त्यांनी? डिड यू इन्फॉर्म दि पुलीस?’

‘नाही हो. दंगामस्ती नाही. म्हणाले, माझी मुलाखत टेप केलीय. संपादकसाहेबांनी. ती जरा द्या.’

‘मग दिलीस?’

‘हो. दुसरं काय करणार? पाचसहा जण होते ते. आणि मी एकटी घरात. अशी दुबळी. रमाबाईपण नव्हती.’

‘घेऊन गेले कॅसेट?’

‘हो.’

‘अधिक काही नाही ना?’

‘नाही. ते भोगले कोण ते म्हणाले, जपून राहायला सांगा सायबांना–’ (पृ.२१७,२१८)

वरील संवाद श्रीरंग नाडकर्णी आणि त्यांच्या पत्नीत झाला आहे. वरील संवादातून कविराजांवरील पुरावे नष्ट केल्याचे समोर येते. राजकारणी लोकांचा साम–दाम–दंड–भेद येथे समोर येतो.

**४. कुरूक्षेत्र :**

‘नको सर–’

‘का?’

‘मला भिती वाटते–पुन्हा मार पडेल–’

‘तू असा भितोस म्हणूनच अन्याय सहन करतोस आणि भिणाऱ्यांना नेहमीच अन्याय सहन करावा लागतो. तू पोलिस कंप्लेंट करतोस का?’

‘नको सर–’

‘अरे नको काय नको? अशा पद्धतीने तर तुझे पैसे मिळणार नाहीतच, पण फुकटचा मार खात मरशील.’

वरील संवाद गोसावी नावाचा विद्यार्थी आणि प्रा. भावे यांच्यातील आहे. या संवादातून गोसावीची भिती समोर येते. त्याच्यावर झालेला अन्याय आणि त्या अन्यायाविरूद्ध लढण्याची प्रेरणा प्रा. भावे देत असल्याचे प्रतिपादन येते.

'भाव्याला काय सांगितलं?' पुन्हा प्रश्न आला.

'कुठं काय? त्याला म्हटलं......'

'त्यो आला होता कशाला थितं?'

'आमची माणसं असत्यात सगळीकडे. बोला, काय सांगितलं त्येला? दादाचा आवाज अधिकच दरडावणारा.'

'काही नाही. काही नाही. आंदोलन मागे घे म्हटलं.'

'हेच ना! की आणखी काय? बेलसरे मास्तर, आनखी काय नाय ना सांगितलं?'

'नाही. नाही.'

'सांगितल असलं तर कळलं आमाला. परिणाम बरे न्हाई व्हायचे मास्तर!' (पृ.६५,६६)

वरील संवाद तुकाराम फराटे आणि प्राचार्य बेलसरे यांच्यात फोनवर झाला आहे.

'आता तुमची मुलगी मास्तरीण नसली तरी तिला करता येईल–'

'पण तिला शिक्षणाचा त्रास झेप–'

'मग हे जमणार नाही. काय?' मामा म्हणाले. (पृ.८२)

वरील छोटासा संवाद सुमाचे बाबा आणि वसंतराव दामले यांचे मामा यांच्यातील आहे. वरील संवादातून लग्नाची बोलणी करताना मुलाकडील लोकांनी टाकलेली अट दिसून येते. सुमाचे कमकुवतपणही या संवादातून सिद्ध होते.

'मला नाही तो मुलगा आवडला.'

'का पण?'

'भिती वाटली मला त्याची?'

'का?'

'दिसतो किती उग्र–' (पृ.८३)

वरील संवाद सुमा आणि तिची आई यांच्यातील आहे. या संवादातून सुमाचा नकार स्पष्ट होतो. मुलाविषयीची सुमाच्या मनातील भितीही प्रतित होते.

'डोळ्यांना जप नाय तर जपू नको. पण तू मास्तरीण झालं पायजेस– डी.एड. झालं पायजेस–'

'खर्च कोण देणार शिक्षणाचा?'

'का? बाप नाही का तुझा?' (पृ.९५)

वरील संवाद वसंतराव दामले आणि त्यांची पत्नी सुमा यांच्यातील आहे. शिक्षणाचा खर्च सुमाच्या आईवडिलांनीच करावा अशी लोभी वृत्ती दामले यांची समोर येते.

'काय गं?'

मला तिला काही सांगताच येईना.

'अगं, काय झालं?'

'मला झेपेल का सगळं?'

'सगळं म्हणजे!'

'हा अभ्यास, पाठ, प्रोजेक्टस्, परीक्षा आणि त्यात हे–'

'मग काय करणार? झेपवायला हवं. दोनही इच्छा तुझ्या नवऱ्याच्याच ना?' (पृ.१०३)

वरील संवाद सुमा आणि तिची आई यांच्यातील आहे. वरील संवादातून सुमाची हतबलता, ताण समोर येतो. ती गर्भवती असल्याची कल्पनाही या संवादातून येते.

'जा जाऊन ये.'

'आणि बाळ? त्याची दुधाची बाटली, दुपटी ......... '

'त्याला राहू दे इथं. सांभाळीन त्याला दोन दिवस.' आईनं सांगितलं.

'नको, बाळाला घेऊन चल.' यांनी फर्मावलं.'

'अहो, पण तिची प्रकृती अशी–' आईनं कारणं पुढं केली.

'काही धाड भरलेली नाही आणि माझी अक्का आलीय. तिला बघायचय बाळाला–' हे म्हणाले.

'मग त्यांना घेऊन यायचं–' आई.

'घेऊन यायचं? कशाला? अपमान करून घ्यायला?'

त्यांचा प्रश्न, पुन्हा तापलेला आवाज.

'कोण कशाला अपमान करील?'

'कराल, तुम्ही कराल. मला नाही जनावर म्हणाला?' (पृ.११८)

वरील संवाद सुमा, सुमाची आई आणि सुमाचे पती वसंतराव दामले यांच्यातील आहे. वरील संवादातून या तिघांचीही मने एकमेकांविषयी कलुषित दिसून येतात. दामलेंची हेकेखोर वृत्तीही येथे दिसून येते.

**५. कलियुग :**

'पण साहेब त्याची परिस्थिती–'

'माझा इलाज नाही.'

'पण साहेब–'

'पण नाही आणि बीण नाही. कंपनी हे युनिट पूर्णपणे बंदच करतेय–'

'काही कामगारांना तरी ठेवा साहेब, दुसऱ्या एखाद्या युनिटमध्ये सामावून–'

'–नो नो नो.'

'मग नुकसानभरपाई तरी–'

'–मी सगळ्यांचे राजीनामेच मागणार आहे.'

'राजीनामा? म्हणजे नुकसानभरपाई देण्याचा विचार नाही?'

'देऊ ना. पण जेवढी कमीतकमी देता येईल तेवढी–'

'–नो. ऐसा नही चलेगा.' (पृ.२१)

वरील संवाद कत्रे आणि जनरल मॅनेजर यांच्यातील आहे. वरील संवादातून कत्रे यांचा कामगाराविषयी कळवळा दिसून येतो, तर जनरल मॅनेजर फक्त कंपनीचाच फायदा पाहतात असे दिसते. असे खटकेबाज संवाद प्रसंगांना उठाव आणतात.

‘त्यातले आता फ्लोअरवर कोणकोण आहेत?’

‘बरेच असतील. वाघमारे आहे, चव्हाण आहे– पण सर, प्लीज–’

‘काय–’

‘मी रिपोर्ट केल्याचं कुठं येऊ देऊ नका–’

‘डोण्ट वरी, चला माझ्याबरोबर.’ (पृ.६१,६२)

वरील संवाद कत्रे आणि चौघुले यांच्यातील आहे. या संवादातून कामगारांची भिती निदर्शनास येते.

**६. देवाची घंटा :**

“अरे, तू किती वेळ इथं बसला आहेस ....... तुला जायचं नाही का?” म्हाताऱ्यानं विचारलं.

“नाही.”

“मग इथंच राहणार आहेस?”

“होय.”

“किती वेळ? किती दिवस?”

“मरेपर्यंत.”

म्हातारा चक्रावला थांबून त्यानं पुढं चवकशी सुरू केली,

“कोण गाव?”

“मस्वां.” गोप्या वैतागानं म्हणाला.

“नाव काय?”

“गोपाळा”

“आईबाप?”

“मेले, असं समजा.”

“पोरं–बाईल?”

“मेली, असं समजा.”

“तूही मेलायस, असं समजू का?”

“कसं समजाल? मी तुमच्यासमोर साक्षात उभा आहे. मी गोपाळाच आहे. मी काही भूत नाही.”

“भूत? मारूतीरायाच्या देवळात भूत? अरे, इथं अखंड रामनामजप चालतो. काय बिशाद आहे भूत येण्याची?” (पृ.१६,१७)

वरील संवाद गोप्याभट आणि मारूतीच्या देवळाचे मालक असलेले बुवा यांच्यातील आहे. वरील संवादावरून बुवांची मारूतीवरील श्रद्धा. आणि गोप्याभटाचा कुटुंबाविषयी असलेला तिरस्कार प्रतित होतो.

“ रिकामीच हाडलंस पिशवी? भटजी नाय हो ते घराकडे?”

“होते.”

“मग दिल्यांनी नाय काय?”

शंकऱ्या आढेवेढे घेत म्हणाला,

“तुकाच बोलावल्यांनी हा सांजे. त्येंनी–”

“मियां जाय्‌नच. पण तुका त्येंनी काय नाय दिल्ल्यांनी?”

“भटजी शीक आसत. निजान होते, मी गेलंय, तर–”

“कशान, रे, शीक? तुमां इचारलंस नाय?”

“इचारलंय. काय बोल्ले नाय. तुकां बोलवल्यांनी हा सांजे. मी म्हटलंय, ‘काय तरी मागल्यान हा आयेन.’ तर म्हणाले, ‘तिकांच बोलावलं हंय, म्हणान् सांग.’ आणि माकां जा म्हणाले. मग मी काय मागत नाय रवलंय थंय–” (पृ.१०३,१०४)

वरील संवाद येसू आणि शंकऱ्या या दोघांमधील आहे. या संवादातून दोघांची भूकेतून निर्माण झालेली गरज दिसून येते. तर वासूभटाचे आजारपण यांवरही प्रकाश पडतो. कोकणी बोलीतील हे संवाद लक्ष वेधून घेतात.

**७. नो सेंटिमेंटस् प्लीज :**

"तुझा आनंद त्यात असला, तरी माझं सुख त्यात नाही. आनंदही नाही. मी काय वाटेल ते झालं, तरी मी ठरविलेल्या मुलीखेरीज दुसरीशी लग्न करणार नाही." आई म्हणाली.

"असं असेल तर मी तुला संपले. मी जीव देईन किंवा घरातून निघून जाईन." (पृ.३४)

वरील संवाद रमेश पंडित आणि त्याची आई यांच्यातील आहे. वरील संवादात या दोघांमध्ये विचारांत एकवाक्यता दिसून येत नाही.

"काय म्हणाले डॉक्टर?" नलून विचारलं.

"डॉक्टर म्हणाले .......डॉक्टर म्हणाले........ हे मला जमणार नाही."

"काय ते?" विष्णूनं विचारलं.

"नलूच्या उदरात तुझं बीज ठेवणं–"

"नाही?" नलूनं हताश होत विचारलं.

"का?" विष्णूनं प्रश्न केला.

"त्यांना काही शंका येताहेत. त्यांना वाटतं, की हे आपल्याला वाटतं तेवढं सोपं नाही, खूप गुंतागुंतीचं आहे."

"म्हणजे मेडिकली?"

"मेडिकली नव्हे. तशी काही अडचण नाही. त्यांना वाटतं, यातून काही कॉम्प्लिकेशन्स निर्माण होतील."

"पण तेच तर पूर्वी म्हणाले होते ना, काही अडचणी नाहीत यात, म्हणून?"

"होय, म्हणाले होते. पण आता म्हणतात, की मला हे जमणार नाही!"

"का?"

"ते संकेताच्या विरूद्ध आहे. या बाबतीतला संकेत त्यांना फार महत्त्वाचा वाटतो. असा प्रयोग ज्यांच्यावर करायचा, तो पुरुष व स्त्री एकमेकांना माहीत नसावीत, हेच अधिक चांगलं, असं त्यांच मत आहे." (पृ.७६)

वरील संवाद नलू, विष्णू आणि रमेश पंडित यांच्यातील आहे. वरील संवादातून नलूच्या आई होण्याविषयी चर्चा चालू आहे. उपचार घेताना काही नियम संकेत पाळावयाचे असतात हे प्रतित होते.

**८. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

"काय?"

"तुम्ही त्यांना लगेच काँटॅक्ट करावं."

"काही विशेष?"

"डोण्ट नो. मला काही म्हणाले नाहीत."

"स्वर कसा होता–पीए चा?"

"नॉर्मल, मॅडम."

"दॅटस् फाईन!" केतकी म्हणाली, मला कालपासून तुम्ही बॉस बॉस म्हणताय त्याऐवजी मॅडम म्हणा.

"ओके मॅडम."

"आणखी काही?"

"नो मॅडम." (पृ.२१)

वरील संवाद केतकी साने आणि श्रीनिवास यांच्यातील आहे. केतकी साने आपला पदभार काळजीपूर्वक सांभाळत असल्याचा प्रत्यय या संवादातून येतो.

"कशी मिळाली ही माहिती तुम्हांला?"

"फ्रॉम रिलाएबल सोर्स."

"आर यू शुअर?"

"हंड्रेड पर्सेंट!" (पृ.४७,४८)

वरील संवाद एम. डी. आणि केतकी साने यांच्यातील आहे. वरील छोट्या संवादातून बिझनेसमधील महत्त्वाच्या गोष्टींवर चर्चा होताना दिसते.

“सेल्स प्रत्येक महिन्याला घटताहेत असं दिसतय.” जोशी म्हणाले.

“प्रत्येक महिन्याला घटत नाहीयत बट द ट्रेंड इज डाऊनवर्डस्.”

“गेलं वर्षभर?”

“ऑलमोस्ट. थोडं आधीपासूनच–”

“तुमच्या लक्षात येत नव्हतं?”

“येत होतं.”

“येत होतं? मग उपाययोजना का नाही केली? झोपला होता?” (पृ.९२)

वरील संवाद अविनाश साने आणि जोशी यांच्यातील आहे. वरील संवादातून कंपनीची डबघाईला येत चाललेली परिस्थिती प्रतित होते.

**९. मार्केट** :

‘हमे अभीतक डाऊट है–’

‘किसका–’

‘व्हेदर वुई कॅन ॲक्सेप्ट दॅट लॉट–’

‘पुन्हा तेच पुन्हा तीच शंका. पुन्हा तीच भिती.’

‘केळकरांचं हृदय आता एवढंसं झालं.’

‘क्या?’ केळकरांनी काहीशा चिडलेल्या स्वरातच विचारलं आणि म्हटलं,

‘मघाशी तर सगळा खुलासा झाला ना? आता काय आणखी नवीन?’

‘नवीन काही नाही. जुन्याच तक्रारी–’

‘कशाच्या?’

‘वही हॅण्डल, बेल्ट, लॉक. एकूण क्वालिटी.’ (पृ.२३)

वरील संवाद अहुजा आणि केळकर यांच्यातील आहे. वरील संवादातून खराब बॅगांविषयीच्या तक्रारी समोर येतात, तर दोघांनी केलेल्या या प्रकरणातील भ्रष्टाचारामुळे त्यांच्यावर असलेला ताणही प्रतित होतो.

‘केळकर हिअर. गुड इव्हिनिंग–’

‘गुड इव्हिनिंग–’ एम्. डी. सौम्य स्वरात म्हणाले.

‘सर, ऑपरेशन अहुजा सक्सेसफुल. संपूर्ण सक्सेसफुल! आत्ताच घरी येतोय. आल्या आल्या आधी तुम्हांला रिपोर्ट करतोय. आत्तापर्यंत तीन चार तासा त्याच्याशिवाय बसलो होतो, त्याचंच ब्रेनवॉशिंग करीत. शेवटी विकेट पडली.’

‘किती?’

‘पंचवीस हजार.’

‘कोई बात नही.’

‘डीटेल्स उद्या सांगतो. आता फक्त रिपोर्ट केलं.’

‘थँक्यू. गुड नाईट.’

‘गुड नाईट!’

वरील संवाद केळकर आणि एम. डी. यांच्यातील फोनवर झालेला आहे. या संवादातून केळकरांचा आत्मविश्वास आणि कामात यशस्वी होण्यासाठी साम–दाम–दंड–भेद पैकी दाम याचा उपयोग येथे केलेला दिसून येतो.

‘चला, निघताय ना? मला पण सोडा गाडीने–’

दोघे बाहेर पडू लागली. तात्यांना ती म्हणाली,

‘तुम्ही कुठं चाललाय? गाडीने सोडते तुम्हांला–’

तात्या उभे राहिले. फ्लॅटच्या बाहेर पडत म्हणाले,

‘गाडीने? विनोबांनी अख्ख्या देशाची पदयात्रा केली–’ (पृ.४८)

वरील संवाद अश्विनी केळकर आणि त्यांचे वडील तात्या यांच्यातील आहे. वरील संवादातून तात्यांची साधी राहणी आणि विनोबांवरील गाढ श्रद्धा दिसून येते.

‘करून टाकते आहेस ना तू जोशांचं काम?’

‘अहो, ते माझ्या हातात का आहे? ’

'पण ज्याच्या हातात आहे, तो आहे ना तुझ्या हातात?'

'म्हणजे काय?' अश्विनीबाईंनी थोडं गोंधळून विचारलं.

'म्हणजे तो– मुळगावकर– तुझं ऐकतो ना? खूष आहे ना तो तुझ्यावर? मग करून घे जोशीचं काम त्यांच्याकडून.'

'अहो, पण– संबंध काय आपला जोशींचा?'

'संबंध? आहे ना. आहे संबंध. त्याचं काम तू करून दिलंस तर तो खूष होईल. काहीतरी सुटेल आपणाला या ट्रँझॅक्शनमधून.' (पृ.१२५)

वरील संवाद अश्विनी केळकर आणि एस. के. केळकर यांच्यातील आहे. वरील संवादातून केळकरांचा पैशाचा हव्यास दिसतो. पैसे मिळविण्यासाठी ते पत्नीचा वापर करून घेताना दिसतात.

**१०. सॉफ्टवेअर :**

'तुम्ही यायला तयार आहात आमच्या ग्रुपकडे?'

'इटस माय प्लेझर.'

'कधीपासून येऊ शकाल?'

'ते बघावं लागेल. तिथली पेंडिंग कामं. शिवाय कधीपासून रिलीव्ह होऊ शकेन.'

'लवकरात लवकर तुम्ही याल असं मी समजतो.'

'आय विल ट्राय.'

'यू विल बी प्लेस्ड ॲट कार्पोरेट लेव्हल.'

'ओह! इटस माय ऑनर!'

'युवर सॅलरी विल बी प्रोटेक्टेड. व्हॉट डु यू गेट देअर?'

'राउंड अबाउट टु अँड हाफ थावजंड– इनक्ल्युडिंग एव्हरीथिंग.'

'दॅट मीन्स थर्टी थावजंड पर ॲनम.'

'दॅटस् राइट.'

'यु विल गेट समथिंग राऊंड फॉर्टी थावजंड पर ॲनम.'

'सो काइंड ऑफ यू.' (पृ.५६)

वरील संवाद देशमुख आणि एस. बी. यांच्यातील आहे. वरील संवादातून देशमुखांना अगोदरच्या नोकरीपेक्षा चांगली नोकरी मिळाल्याचे समजते.

'मला घ्यायचे नाहीत दागिने–विकायचे आहेत........ '

'जुने विकून नवीन घ्यायचेत?'

'नाही. नुसते विकायचेच आहेत. भांडवल उभं करायचं आहे.'

'का? काय धंदाबिंदा करताय का काय?'

'हां. तशा विचारात आहे खरी.' (पृ.१८२)

वरील संवाद मिसेस देशमुख आणि सोनार यांच्यातील असून भांडवलासाठी त्या स्वतःचे दागिनेही विकताना दिसतात. यावरून त्यांच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना येते.

**११. प्रास्ताविक :**

''मला नाहीय आता वेळ.''

''काढायला हवा थोडा. एवढे थांबलेत ते तुमच्यासाठी तर–''

''मी जाणार नाही– समजलं?''

''मी सांगते ते ऐका. आपण सोसायटीत राहतो. तुमची मतं वेगळी असली तरी तुम्ही इतरांच्या मतापासून किंवा कृतीपासून फटकून राहून शकत नाही.''

मी तिच्याकडे रोखून बघत तिला प्रश्न केला,

''तुलाही राग आहे का या झोपडपट्टीचा?''

''होय.'' ती ठामपणे म्हणाली, ''आहे. ही झोपडपट्टी इथून हलली तर मला हवी आहे. गॅलरीचा काहीसुद्धा मनासारखा उपयोग करता येत नाही.''

''मग तू जा. मी पटकन् म्हणालो, आधीच इतकी टेन्शन्स माझ्यावर–'' (पृ.१२)

वरील संवाद लेखक पत्रकार असलेले मनोहरपंत आणि त्यांच्या पत्नीतील आहे. या संवादातून समाजात राहताना वैयक्तिक मते कधी–कधी बाजूला ठेवावी लागत असल्याचा प्रत्यय येतो.

**समारोप :**

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील संवादांचा विचार करता पात्रांचे व्यक्तिमत्त्व, त्या पात्रांची मानसिकता, त्यांचा स्तर, त्यांची परंपरा यांचा प्रत्यय या संवादातून येतो. पात्रांच्या परस्परसंबंधांवर प्रकाश टाकण्यास हे संवाद मदत करतात. कथा–कादंबऱ्यांमध्ये घडणाऱ्या घटनांना पात्रांमुळेच जिवंतपणा येतो. साहजिकच त्या–त्या वेळी साधल्या जाणाऱ्या संवादातून कथानक उलगडत जाते. घडणाऱ्या घटनांना एक प्रकारची गती प्राप्त होते. प्रत्यक्षाचा भास कायम राहिल्याने हे संवाद अधिक प्रभावी ठरतात. या सर्व गोष्टींचा विचार करता कथा–कादंबऱ्यांमधील खटकेबाज, रोचक, संक्षिप्त, पात्रांच्या आविर्भावाची जोड घेऊन त्यांना साजेशी भाषा असलेले, सहजता असलेले अकृत्रिम आणि कथानकाला जिवंतपणा आणणारे असेच संवाद आहेत, हीच मराठे यांच्या भाषेची व संवादांची वैशिष्ट्यपूर्णता म्हणता येईल.

## ४. भाष्य :

कथा–कादंबऱ्यांमध्ये निवेदकाचे यथोचित असे भाष्य महत्त्वपूर्ण कार्य करते. या भाष्यांधारे निवेदक पात्रांच्या मानसिक स्थितीचा, त्यांच्या उक्ती–कृती यांचा वा एखाद्या घटना–प्रसंगाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. त्यामागे विशिष्ट अशा मूल्यांचे अधिष्ठानही असते. याबरोबरच माणसाच्या जीवनासंबंधीचा तत्त्वविचारही अभिव्यक्त होत असतो. भाष्याविषयी गंगाधर पाटील म्हणतात,

“निवेदक कथाकथन करीत असता एखाद्या प्रसंगाचे, पात्राचे, स्थळाचे वर्णन करीत असतो. ते करीत असता तो त्या पात्राविषयी प्रसंगाविषयी आपले मत, अभिप्राय स्पष्टपणे किंवा अप्रत्यक्षपणे मांडीत असतो. त्यांच्या संबंधीच्या ह्या मताला, अभिप्रायाला, विचाराला वा चिंतनाला भाष्य (कॉमेंटरी) असे म्हटले जाते.”[९] अशी विविध भाष्ये कथा–कादंबऱ्यांमधून जाणून घेणे येथे अभिप्रेत आहे.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये अशी विविध भाष्ये आलेली आहेत त्यांचाच विचार करणे येथे अभिप्रेत आहे.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष :**

**सापेक्ष :**

प्रधान आणि मॅनेजर यांच्या भेटीवर आधारित भाष्य येथे येते.

''सिगरेट पेटवून त्यानं मस्त धूर सोडला, पहिल्या भेटीच्या वेळी तो पार उद्ध्वस्त आणि वेडेपणाच्या पायरीपर्यंत पोचलेला दिसत होता. पण आज तो पुष्कळ नॉर्मल दिसत होता. अर्थात आतून आतून अस्वस्थ वाटत होता. पण आज वेडेपणाची झाक कमी झालेली दिसत होती. मनावरचं टेन्शनही कमी झालेलं दिसत होतं. कदाचित मी त्याच्याबद्दल जी सहानुभूती दाखवीत होतो, त्याचाही तो परिणाम असणं शक्य होतं.'' (पृ.१९) दु:खी, अन्याय, अत्याचार सोशित असलेला, मानसिक ताण असलेल्या व्यक्तीला समजून घेतले, त्यांना सहानुभूती दाखविली तर त्यांच्या असणाऱ्या समस्यांची तीव्रता कमी होण्यास मदत होते हेच येथे हे भाष्य सुचविते.

**अँकर :**

चाफेकर या संपादकाच्या चांगल्या कार्यावर भाष्य येथे येते. समाजातील असलेले मानाचे स्थान अधोरेखित केल्याचे दिसून येते;

''चाफेकरांनी थोड्याच काळात स्वत:साठी वेगळं स्थान मिळवलं. एक स्वतंत्र संपादक म्हणून आपली लोकप्रियता सिद्ध केली. मुंबईच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक जगात स्वत:ची जागा निश्चित केली. स्वत:बरोबर स्वत:च्या दैनिकाचीही. समारंभांना प्रमुख पाहुणे म्हणून चाफेकर हजर राहू लागले, सत्काराचे हारतुरे चाफेकरांच्या हस्ते स्वीकारण्यात उत्स्वमूर्तींना धन्यता वाटू लागली. तिथे त्यांचा परिचय करून देताना त्यांच्या दैनिकाचा उल्लेख होऊ लागला. रविवार आवृत्तीतला चाफेकरांचा खास लेख मुद्दाम वाचायचा विषय होऊ लागला. चाफेकरांनी आपली विस्तृत मुलाखत घ्यावी अशी इच्छा सार्वजनिक जीवनातील नामवंतांना होऊ

लागली.'' (पृ.३३) लोकप्रियता सिद्ध केलेल्या संपादकांना समाजात मानाचे स्थान तर मिळतेच पण मोठमोठ्या नामवंत लोकांचा सहवासही लाभत असल्याचे या भाष्यातून स्पष्ट होते.

**जी सरकार** :

साहेबराव शिर्के आणि मोहन कुलकर्णी या दोन मालक आणि कामगार यांच्यातील संबंधावर प्रकाश टाकणारे पुढे भाष्य येते.

''गेले अनेक दिवस त्याच्या मनात ते शब्द, तो अभिप्राय घुमत होता. साहेबरावांनी किती अचूक वर्णन केलं होतं – दारिद्रयाचा वारसा. वारसाहक्कानं प्राप्त झालेलं दारिद्रय–हक्काचं दारिद्रय.'' (पृ.९१) गरिबी आणि श्रीमंतीची दरी ही खूप पूर्वापार म्हणजे वाडवडिलांपासून चालत आल्यामुळे साहेबराव शिर्के आणि मोहन कुलकर्णी यांच्या संबंधांमध्येही ती कायम असल्याचे भाष्य येथे येते. काळ बदलला तरी गरीब श्रीमंत हा भेदभाव तितक्याच प्रमाणात बदलला नसल्याचे चित्र येथे स्पष्ट होताना दिसते. पुढे मोहन कुलकर्णी या पात्राच्या गरिबीबरोबरच त्याला कौटुंबिक समस्यांशी सामना करण्यासाठी नोकरीच्या ठिकाणी कराव्या लागणाऱ्या तडजोडीवर पुढे भाष्य येते.

''आज ऑफिसात तो मान खाली घालून काम करीत होता. एकदोन मुलाखती लिहून काढायच्या राहिल्या होत्या. त्याने दोनचार तासांत संपवून टाकल्या. मग एक इंग्रजी लेख वाचून त्यावरून मराठी लेख करायला घेतला. संध्याकाळी ऑफिस सुटायची वेळ होईपर्यंत तो आणखीही थोडं काम संपवून सीनियर एडिटरला चकित करून टाकणार होता.'' (पृ.९७) कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी, आर्थिक समस्यांचा सामना करण्यासाठी वेळप्रसंगी पुरुषांना स्वतःची सर्व तत्त्वे, मते बाजूला ठेऊन कामे करावी लागत असल्याचे या भाष्यामुळे गडद होते.

**देशात सालं काही घडतच नाही** :

सामान्य गरीब जनता पैशासाठी स्वतःचे मतसुद्धा विकते; तेही परिस्थितीमुळे यावर पुढे भाष्य येते.

“हा रिक्षावाला काय किंवा याच्यासारखे इतर लाखोजण काय– निदान त्यांच्या मनातील असंतोषाला पडद्यावर तरी अभिव्यक्ती सापडते आहे. ती सापडलीच नसती तर? प्रत्यक्षात ही माणसं परिस्थितीने इतकी बांधलेली की, या रिक्षावाल्याला साधं मतपत्रिकेवरही आपल्या इच्छेनुसार शिक्का मारायचं स्वातंत्र्य नाही! गुणबहूविषयी याला अजिबात काही वाटत नसलं तरी हा त्याला मत देणार. दादाची दहशत म्हणून. कदाचित रूपया दोन रूपये जादा मिळतील म्हणूनही. असे जादा पैसे मिळावे म्हणून त्यानं मत देणं हीही त्याची परिस्थितीच.” (पृ.१३४) गरीब, लाचार, कमी शिक्षण असलेल्या लोकांना थोड्या पैशाच्या माध्यमातून एकप्रकारे विकत घेतले जात असल्याचे चित्र येथे प्रत्ययाला येते. स्वत:ची मते बाजूला ठेवून, दहशतीला घाबरून स्वत:च्या आर्थिक परिस्थितीला हातभार लागावा म्हणून विनासंकोच मत विकणाऱ्या लोकांची वाणवा नसल्याचेही येथे स्पष्ट होते.

**भले गृहस्थ पंडित :**

विश्वनाथ द्वारकानाथ पंडित या सामान्य जीवन जगणाऱ्या व्यक्तीच्या रोजच्याच गोष्टीवर भाष्य पुढे येते.

“घरी आल्यावर पेपर चाळतात. तोवर चहा तयार होऊन त्यांच्यासमोर येतो. चहा घेता घेता ते पेपरचा तो मजकूर वाचतात. तो त्यांना फारच चवदार वाटतो. मग तो अग्रलेख असो, सिनेमाचे परीक्षण असो, दक्षिण आफ्रिकेतील वर्णविद्वेषाची बातमी असो की मुंबईच्या अंडरवर्ल्डमधील दादा–दादांमधील मारामाऱ्या असोत. खरं म्हणजे सगळ्याच प्रकारच्या बातम्या ते सारख्याच निर्लेप वृत्तीनं वाचतात. पण त्यातल्यात्यात चहा पिताना ते जो मजकूर वाचतात, तो अधिक चविष्ट लागतो असा मात्र त्यांचा स्वत:चा अनुभव आहे.” (पृ.१४५) चहा आणि पेपर यांचं समिकरण हे सामान्य माणसाचं अतूट समिकरण आहे. या छोट्याशा समिकरणाचा उपयोग करून त्यावर भाष्य करून मराठे मात्र मोठा आशय व्यक्त करतात. वर्तमानपत्र हे समाजाचा आरसा असल्याने पंडितांच्या माध्यमातून पुरुषांची समाजाशी असलेली बांधिलकी येथे स्पष्ट होते.

२. वीज :

**वीज :**

एखाद्या सामान्य माणसाच्या गरजा किती मर्यादित असतात परंतु त्या पूर्ण करतानाही आर्थिक जमाखर्चाचा ताळमेळ बसत नसतो तेव्हा या सर्व गोष्टींमागील कारणमीमांसा देण्यासाठी पुढे भाष्य येते.

"बाईंचे यजमान आपला महिन्याचा पगार वेगवेगळ्या खात्यांवर वाटतच खोलीत परतले. कंपनीकडून कर्ज घेतलं त्याचा हप्ता; कंपलसरी सेव्हिंग्ज खात्याचा हप्ता; बँकेच्या कर्जाचा हप्ता; प्रॉव्हिडंड फंडाचा हप्ता; दुष्काळग्रस्तांसाठी देण्यात आलेला एक दिवसाचा पगार; लांब नोकरीवर जातायेताना खाजगी बस होती त्या मासिक भाड्याचा हप्ता; खोलीभाड्याची रक्कम ते खोलीत आले आणि हताशपणे बसले." (पृ.५२) नोकरदार माणसांचा अर्धा पगार महिन्याच्या सुरूवातीलाच कायमस्वरूपी, नियमित होत असल्याने उरलेले दिवस कसे पैसे पुरवायचे याची चिंता त्याला पगाराच्या दिवसाच्या रात्रीच लागलेले दिसून येते.

**स्वप्नभूमी :**

पती–पत्नीचे नाते स्नेहाचे, विश्वासाचे, त्यागाचे, समर्पणाचे असते परंतु काही कारणास्तव मतभेद झाले तर याचा परिणाम सर्वच गोष्टींवर होताना दिसतो. नवऱ्याची मर्जी न सांभाळल्याने अशोक आणि मीरा यांच्यात मतभेद होतात त्यावर भाष्य पुढे येते.

"मीरा–अशोक घरी परतली.

वाटेत कुणीच कुणाशी बोललं नाही.

फ्लॅटचं दार उघडून ती आत आली.

समोरच्या कोचावर त्यानं स्वत:ला झोकून दिलं. तिथं तो धुमसत, संतापत बसून राहिला. संताप मनात मावेना तेव्हा तो बाहेर पडला. शब्दरूप धारण करू लागला." (पृ.८७) अशोकच्या मनाप्रमाणे मीराने त्याच्या बॉसला एंटरटेन न केल्याने त्याचे डील अयशस्वी होते. या सर्वांचा परिणाम त्याच्या संतापात होतो. झालेला संताप तो कधी शांत बसून तर कधी शब्दरूप धारण करून व्यक्त करत असल्याचे येथे प्रत्ययाला येते.

**कुंती :**

दामल्यांची मुलगी त्यांना आईविषयी विचारणा करते तेव्हा मरण पावलेल्या पत्नीचा वियोग आणि मुलीचे प्रेम अशा कात्रीत सापडलेल्या दामल्यांच्या विमनस्क स्थितीवर पुढे भाष्य येते.

''दामल्यांनी तोंड कसंनुसं केलं. पोरीच्या प्रश्नाला काही उत्तर देण्याऐवजी ते तिला नुसतेच कुरवाळत राहिले थोपटत राहिले. गेली दोन वर्ष तसं मुलीकडे दुर्लक्षच झालं. या काळात सर्वात महत्त्वाचा विषय होता ते त्यांच्या बायकोचं आजारपण. त्या आजारपणाच्या सावटाखाली सर्वांचे सर्वप्रकारचे आनंद झाकोळून गेले होते. त्यातच मुलीचं वाढणं, शहाणं होणं, हट्ट करणं. ती सहाव्या वर्षात गेली म्हणून एक दिवस तिचं नाव शेजारच्या शाळेत घालण्यात आलं. तिच्या शाळेत जाण्याचा समारंभ झाला नाही. कपडेही नवे मिळाले नाहीत. दामल्यांचा सगळा पगार तर तिच्या आईच्या औषधापाण्यासाठी संपत होताच, आणि वर कर्ज होत होतं. पोरीला चांगले कपडे घेता आले नाहीत. खाऊ आणता आले नाहीत. तिचे लाड करता आले नाहीत.'' (पृ.९५) आईच्या नसण्याने मुलीची झालेली हेळसांड, तिचे कोडकौतुक करता न आल्याने दामल्यांचा मनातील अस्वस्थता येथे व्यक्त होते.

**पूर्णचंद्र :**

रंगराव आणि जगदीश या दोन पुरुषांच्या मनमानीमुळे वत्सला मिरजकर या असहाय्य स्त्रीला सहन कराव्या लागणाऱ्या अन्यायावर पुढे भाष्य येते.

''अशी तंबी देऊनही ती जगदीशच्या तावडीतून आपली सुटका करून घेऊ शकली नव्हती. एकदा रंगराव अचानक आला असता ती जगदीशबरोबर असलेली त्याला आढळली. संतापाने बेभान होत रंगरावाने तिला जगदीशसमोरच लाथांनी तुडवून काढली ते सगळं तिनं सहन केलं होतं. अवाक्षराने तक्रार न करता, तोंडावाटे रडण्याचा स्वरही न उच्चारता.'' (पृ.१२२) जगदीश वत्सलाबाईंच्या मुलाला वेठीला धरून तिचा शारीरिक छळ करतो, तर रंगराव तिला सहारा दिला म्हणून तिच्यावर अधिकार गाजवतो. या दोन्ही पुरुषांनी वत्सलाबाईंना उपभोग्य वस्तू मानून आणि गरीब बिचारी कुणीही हाका अशाप्रकारे वागणूक दिलेली दिसून येते. असहाय

स्त्रियांना आधार देणारे पुरुषसुद्धा त्यांना आधार तर देतात, परंतु आपला अधिकार बजावत असल्याचे वास्तव या भाष्यातून अधोरेखित होते.

**खुर्ची** :

या कथेतील नायकाच्या आर्थिक, व्यावसायिक चढउतारावर भाष्य पुढे येते.

"त्याचा व्यवसाय तसा बरा चालला होता. त्याचं लग्न झालं तेव्हा त्याचा धंदा जोरात होता. त्याच्यात उमेद होती. घर सजलेलं होतं. लग्न झालं आणि त्यानं ते अधिकच सजवलं. सामानसुमान, भांडीकुंडी, दागदागिने, साड्या, फर्निचर – उमेदीनं त्यानं धंदा वाढवायला घेतला. कर्ज वाढलं, पण धंदा वाढला नाही. फक्त कर्जे वाढत गेली. तरी त्याच्यात उमेद कायम होती. बरीच वर्षे ती उमेद कायम ठेवीत त्यानं धंदा चालवला. तो चालवण्यासाठी कर्ज, आधी नातेवाईकांकडून मदत या नावाखाली, नंतर बँकाकडून. आता बँकाची कर्ज थकली, जप्तीची पाळी आली. तेव्हा सावकारांकडून एका कर्जाचं व्याज फेडण्यासाठी दुसरं कर्ज, ते फेडण्यासाठी आणखी कर्ज.

शेवटी कर्ज देणाऱ्यांनी त्याला चारी बाजूंनी घेरलं. धंद्याच्या ठिकाणी या, देतो असं सांगितलेला तिथं जाई. त्याचं तोंड चुकवण्यासाठी हा घरी. मग कर्ज वसुलीसाठी लोक घरी येऊ लागले. मोठ्या आवाजात बोलणी. भांडणं. शेजाऱ्यांनी संशयाने डोकावून बघायचं. कोणीकोणी दिलेली जिवे मारण्याची धमकी." (पृ.१५०) व्यवसाय, कामधंदा आणि आर्थिक परिस्थिती या नाण्याच्या दोन बाजू असतात. एक कोलमडली तर दुसरीवर आपोआप परिणाम होतो. त्याप्रमाणे या नायकाचा व्यवसाय डबघाईला आला तरी त्याने उमेद न सोडता कर्ज घेऊन पैशांची सोय करून व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न केला परंतु तो यशस्वी न झाल्याने त्याला दोन्हीकडे अपयश येते. याचा परिणाम त्याचा आत्मविश्वास घसरतो आणि त्याला कुटुंबात व समाजात मानहानी सहन करावी लागते. छोट्या भाष्यातून मोठा आशय येथे ह. मो. मराठे यांनी व्यक्त केला आहे.

### ३. ज्वालामुख :

**ज्वालामुख :**

सुखी, समाधानी, प्रसन्नचित्त, ऐश्वर्यसंपन्न माणसाचे मनही आनंदी असते हे पुढील भाष्यातून येते.

"मनपसंत कपडे पहेनून, केस विंचरून, हाती ऑफिसला जाण्याची ब्रीफकेस घेऊन तो आरशासमोर उभा राहतो. एकदा स्वत:कडे अभिमानाने बघतो. स्वत:वरच खूष होतो, प्रसन्न होतो. बायकोच्या चुंबनाने त्या प्रसन्नतेवर आणखी एक रंगाचा थर चढवतो करिअरसाठी आत्तापासूनच धडपडणाऱ्या पोरांचा त्यांच्या खोलीत जाऊन निरोप घेतो आणि अतिशय आत्मविश्वासाने जिन्याच्या पायऱ्या उतरून आपल्या गाडीत जाऊन बसतो." (पृ.३) सर्व सुखसोयी पायाशी लोळण घेत असलेला हा नायक कामाप्रती, स्वत:प्रती, कुटुंबाप्रती प्रेम जिव्हाळा टिकवून ठेवण्यात यशस्वी झालेला दिसतो. शिक्षण, करिअर, कुटुंब, समाज, आर्थिक सुबत्ता या गोष्टी माणसाच्या यशापयशात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे भाष्य मराठे यांनी या नायकाच्या भूमिकेतूमन केलेले दिसते.

याच कथेच्या शेवटी हा आनंदी नायक दु:खी कष्टी झालेला दिसून येतो. मुलाच्या वाईट कृत्याचा, आजीला चाकू दाखविण्याच्या प्रसंगाचा या नायकाच्या मनावर परिणाम होतो. तो मुलाला शिक्षा करतो. पुन्हा अशी चूक घडणार नाही याची खात्री करण्याचा प्रयत्न करतो. पण मुलगा कबुलीजबाब देत नाही तेव्हा हा नायक हतबल होतो.

"त्या रात्री त्याला झोप आली नाही. त्याला स्टिरिओवरची गाणी ऐकावीशी वाटली नाहीत. फोमच्या डबल बेडवर बायकोच्या गरम मिठीत शिरावंसं त्याला वाटलं नाही. त्याला वाटत राहिलं – सहस्रमुखांचा ज्वालामुखी सभोवती उसळला आहे. त्याची मुखं ठायी ठायी उघडली गेली आहेत. त्यातलंच एक आपल्याही घरात ......." (पृ.१७) या कथेच्या शेवटी नायकाच्या मुलाच्या कुविचारांचा परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावा लागतो, संपूर्ण कुटुंबात एक भितीची लाट कोसळते, क्षणार्धात आनंदी असलेले कुटुंब ज्वालामुखी झाल्याप्रमाणे दु:खात बुडून जाते हे स्पष्ट होते.

**निशाण :**

या कथेतील अण्णा तुळपुळे या कामगाराची नोकरी जाते परंतु तरीही तो आयुष्यभर लाल झेंड्याचे काम करण्याचे ठरवितो. लेनिन हे त्याचे आदर्शस्थान असते,

"त्याने लेनिनचा पुतळा कोनाड्यात देवांच्या मूर्तींच्या बरोबरीने ठेवला तेव्हापासून त्याने फक्त थोडेसे शब्द बदलून घेतले. घरी रहायची सूचना बायकोनं केली की तो सांगतो, या बाबाची परवानगी नाही. घरी थांबायला. ऊठ जीवा, तुला लढलं पाहिजे. स्वत:साठी नव्हे–लाल झेंड्यासाठी. आणि कुरकुरणारी, खडखडणारी सायकल काढून तो बाहेर पडतो. त्याच्या सायकलच्या हँडलला अडकवलेलं छोटसं लाल निशाण वाऱ्यावर फडफडू लागतं." (पृ.२३) कुटुंबाची जबाबदारी नाकारून नोकरी सोडून अण्णा तुळपुळे लेनिनच्या विचारांच्या प्रभावाने प्रभवित होऊन कामगारांच्या संघटना बांधून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्वत:ला झोकून देतो.

अण्णा तुळपुळेंच्या प्रभावाने सदाशिवही संपात ओढला जातो. हरिहर इंडस्ट्रीमध्ये संप चालू असतो. त्या संपात सहभागी झालेल्या सदाशिवच्या घरी, इतर कामगारांच्या घरी उपासमार होऊ लागते त्यावर पुढे भाष्य येते.

"टाळेबंदीच्या चाळिसाव्या रात्री हरिहर इंडस्ट्रीजमधले, अनेक कामगार घरोघरी अर्धपोटी बसून होते, तसाच सदाशिवही बसला होता. एवढ्याशा टीचभर खोलीत एक बल्ब मिणमिणत होता. डास भुणभुणत होते. वारा यायला खिडकीच नसल्याने खोलीतली गरम हवा अधिकच कोंदट झाली होती. खोलीच्या कोपऱ्यात अभ्यास करीत त्याचा धाकटा भाऊ बसला होता. लग्नाला आलेली आणि अर्धवट शिक्षण सोडून घरी बसलेली बहीण तिथंच शेजारी बसली होती. आई चुलीशी खुडबुडत होती." (पृ.३४) आधीच गरिबीने त्रस्त असलेल्या सदाशिवची संपामुळे आर्थिक परिस्थिती अजूनच बिकट होते. नोकरीची नितांत गरज असल्याचे सदाशिवला समजत असूनही संप–टाळेबंदीच्या विचारांनी प्रेरित होऊन तो स्वत:ची, घरातील माणसांची कोणतीही काळजी न करता संप, मोर्चात ओढला जात असल्याचे वास्तव चित्रण या भाष्यातून स्पष्ट होते.

**काळ :**

या कथेतील नायकाला खेड्यात वास्तव्याला असताना त्याचे आणि त्याच्या भावाचे कुटुंब यांची जबाबदारी आर्थिक अडचणींमुळे पार पाडणे अशक्यप्राय होते, तेव्हा तो शहरात जाण्याचा विचार करतो. त्याच्या कौटुंबिक पार्श्वभूमीवर भाष्य पुढे येते.

"खेड्यातून बायकोला आणि दोन पोरींना घेऊन तो चार वर्षांपूर्वी शहरात आला होता. खेड्यात तो आणि त्याचा थोरला भाऊ एकटेच होते बाप नव्हता. आय होती. अर्ध्या एकराचा कोरडवाहूचा तुकडा होता. भावाची पाच माणसं, याची चार. शिवाय आई. सगळ्यांच्या वाट्याला पुरता एक एक घासही येईनासा झाला. रोज भांडणं. जावाजावांची. भावाभावांची. पोरांना मारझोड. उपाशी पोटांतून भांडणाचे आणि शिव्याचे शब्द अधिकच जोराने बाहेर पडत. संसाराचं समाधान काय ते नाहीच त्याला. त्याच्या बायकोला. ती वैतागू करवाडू लागली. आदळआपट करू लागली. शहरात जाऊन कामधंदा शोध, आपण समदी जाऊया शहरात असे त्याला म्हणू लागली. सारखं सारखं." (पृ.१२९) मोठे कुटुंब, आर्थिक ओढाताण, हाताला काम नाही अशा परिस्थितीत कराव्या लागणाऱ्या पुरुषांच्या संघर्षाचे चित्रण या भाष्यातून समोर येते.

**भिंत खचली :**

झोपडपट्टीवासीयांच्या समस्या, तेथील माणसांना करावी लागणारी तडजोड, संकटे यांवर भाष्य पुढे येते.

"त्याची झोपडी कोसळलेल्या भिंतीच्या अगदी जवळच होती. पण ती बचावली होती. तो आणि त्याची माणसं बचावली होती. म्हातारी आई, बायको, दोन पोरं सगळी सुखरूप राहिली होती. भिंतीचा आणखी दोन चार हात तुकडा कोसळला असता तर तो आणि त्याचं कुटुंब .....पण दैवानं खैर केली होती. सगळे बचावले होते." (पृ.१४५) झोपडपट्टीत रहणाऱ्या माणसांचे जीवन दारिद्र्यात, घाणीत व्यतीत होतेच परंतु नैसर्गिक आपत्तींना कधी तोंड द्यावे लागेल याचा भरवसा नसतो, तेव्हा अशा आपत्तीतून बचावले तर त्यांचे दैव बलवत्तर असे म्हणून सर्वजण जगत असल्याचे वास्तव या भाष्यातून समोर येते.

'ज्वालामुख' या कथासंग्रहावर भाष्य करताना वामन देशपांडे म्हणतात,

“प्रस्तुत संग्रहातली ‘उजाड’ ही कथा घेतली तरी एक जाणवत राहते की जक्कल खून खटल्यातले धागेदोरे, वृत्तपत्रांतून वाचलेले आणि मानवी मनाला हादरा बसणारी क्रूर विचारपद्धती ह. मो. मराठे यांनी किती जाणिवपूर्वक हाताळली आहे. आणि हे हाताळणेसुद्धा कथेचा विषय होऊ शकते. आणि शक्याशक्यता हा मानवी संबंधावर प्रकाश टाकणारा कथाप्रकार पुन: ‘शाई आणि रक्त’ मध्ये नव्याने वाचायला मिळतो. ‘भिंत खचली’ ह्या कथेतही गरिबी माणसाला कुठल्या थरापर्यंत विचार करीत नेते याचे वर्णन आलेले आहे. ही कथासुद्धा वृत्तपत्रीय घटनेवर आधारित आहे. पण ह. मो. मराठे यांनी स्वत:ची स्वतंत्र विचारशक्ती कथेला बहाल केलेली आहे. झोपडपट्टीतल्या निराधार गरिबांच्या हिंसाचक्रात असंतोषाचा ज्वालामुखी भडकताना दिसतो. सर्व पातळीवरील जाणिवांना ह. मो. मराठे यांनी एक जाणिवपूर्वक अर्थ ज्वालामुख ह्या संग्रहात निश्चितपणे दिलेला आहे. कथानक सांगणे हा हेतू नसून ह. मो. मराठे यांची शैली आणि सर्व थरांवर फिरणारी भेदक दृष्टी ही अधिक महत्त्वाची. ‘कर्मफल’ ही ह्या संग्रहातली कथा मला फार महत्त्वाची वाटली. मानवी दु:खाचा गडद वळेसर इथे फार प्रभावीपणे गुंफलेला आहे.”[१०]

**४. हद्दपार :**

**४.२ :** दुसऱ्या कथेतील प्रोफेसर पिंपुटकर यांना मिसेस घाट्यांनी नकार दिल्यावर खऱ्या अर्थाने त्यांना घराविषयी आपुलकी वाटू लागते. इतके दिवस त्याचे घराकडे लक्ष नव्हते. या दोन्ही परिस्थितीतील बदल पुढील भाष्यातून लक्षात येतो.

“घरात तो एकटाच होता. कॉलेजातला पोरगाही नव्हता. इतर दोघी मुली अजून शाळेतून आलेल्या नव्हत्या. बायको कुठं गेली, माहीत नव्हतं. असा एकटा तो कितीतरी वर्षांनी घरात राहिला होता. त्यानं आसपास दृष्टी फिरवली. गेल्या कित्येक वर्षात त्यानं इतकी संभ्रमित दृष्टी आजूबाजूच्या वस्तूंवरून फिरवली नव्हती. त्याला गरज नव्हती. आणि सवडही नव्हती. बायको होती, म्हणून गरज नव्हती आणि अभ्यासाच्या लेखनाच्या, बाहेरगावच्या दौऱ्यांच्या व्यापामुळं सवड नव्हती. कोपऱ्यात छताशी लोंबणारी जळमटं, खिडकीची फुटलेली काच, भिंतीना आलेले पोपडे, कशाकडेही त्याला यापूर्वी लक्ष द्यावं लागलं नव्हतं. म्हणून या गोष्टी त्याच्या ध्यानातही आल्या नव्हत्या.” (पृ.३४) पुरुष आपल्याच मस्तीत जीवन जगत असताना त्यांचे घराकडे

पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते, तर बाहेरच्या परिस्थितीने पाठ फिरविली तर त्यांचे संपूर्ण घरातील बारिक–सारिक गोष्टींकडे लक्ष वेधले जाते. या दोन्ही टोकाच्या भूमिका पुरुषांना कुटुंबात स्थान मिळविण्यासाठी, नातेसंबंध जपण्यासाठी, कौटुंबिक जीवन यशस्वी होण्यासाठी मारक ठरत असल्याचे या भाष्यातून दिसून येते.

पती–पत्नीमधील नातेसंबंध दुरावल्याने प्रोफेसर पिंपुटकरांची पत्नी शीला त्यांना सोडून वर्माकडे जाते तेव्हा पिंपुटकरांची परिस्थिती पुढील भाष्यात येते.

“तो एकटाच उरला. असहाय्य होऊन खुर्चीत बसला. भिंतीवरून, गेली वीस वर्ष जमा करीत आणलेल्या एकेका वस्तूवरून त्यानं नजर फिरवली. त्याला वाटलं, हे आता आपलं उरलं नाही. हे विश्व आपल्याला परकं झालं आहे. आपल्यालाच या जगानं हद्दपार करून टाकलं आहे.
पोरकेपणाच्या जाणिवेचा एक लोंढा त्याच्या सर्व अस्तित्वाला व्यापीत गेला आणि त्याच क्षणी त्याला मिसेस घाट्यांची तीव्रपणे आठवण झाली.” (पृ.४६) प्रोफेसर पिंपुटकरांना सर्व कुटुंबातून आधार तुटल्याची जाणीव होताच त्यांना खूपच एकटे वाटू लागते, परंतु त्या एकटेपणातही त्यांना मिसेस घाट्यांची आठवण येते. मिसेस घाट्यांशी संबंध जोडणे या कारणास्तव त्यांना कुटुंबापासून दूर जावे लागते. तरीही त्यांना मिसेस घाट्यांची आठवण येते, यावरून त्यांची मिसेस घाट्यांशी असलेली आंतरिक ओढ दिसून येते.

**५. पक्षिणी :**

**कभिन्न :**

या कथेतील नायक स्वत:ची लग्नाची बायको असूनही दुसरी बाई घरात घेऊन येतो. त्यावर पुढे भाष्य येते.

“विजेच्या लोळासारखी त्याची बायको काळोख कापीत धावून आली. झडप घालून तिनं बयेचा कब्जा घेतला. आपल्या शरीरातलं सगळं बळ एकवटून ती तिला झोडपू लागली. बया दिङ्मूढ होऊन बघत असतानाच तो रान पेटावं तसा अवाढव्यपणे पुढं झाला. त्यानं तिला चिमटीत गच्च उचललं अन् आपल्या खोलीत भिरकावून दिलं. आपल्या नजरेचा भयानक झोत त्यानं

तिच्यावर स्थिर केला.'' (पृ.३८) या भाष्यातून या नायकाचा निडरपणा, नायकाच्या बायकोची चीड यांमधील द्वंद्व अधोरेखित होते.

**विरूप** :

बागूल न्हावी यांचा जीवनप्रवास पत्र्याच्या चाळीत गरिबीत चाललेला असतो. लहानपणी त्याने बापाचा मार निमुटपणे खाल्लेला असतो पण मोठा होत जाताना तो विरोध करताना दिसतो.

''त्याला क्षणभर वाटून गेलं. बापाचा उगारलेला हात गच्च धरून सर्व ताकदीने पिरगळवा आणि जन्मल्या क्षणापासून त्याने आपल्या शरीरावर उमटवलेल्या क्रूर वळांचा तेवढ्याच क्रूरपणे बदला घ्यावा.

पण हाती रॉकेलची बाटली हिकळवीत त्याचा बापा आपलं काटकुळं शरीर ओढीत दारातून बाहेर पडून गटाराच्या कडेकडेनं चालू लागला. ते बघून त्याचा क्रोध जिरला. त्या बापाविषयी त्याला कणव, कीव आणि सहानुभूती वाटायला लागली.'' (पृ.७९) अन्याय सहन करताना त्याचा विरोध करताना नात्यांचा अडसर ठरत नसतो हे येथे अधोरेखित होते. पण वडिलांचा आदर, आपली कर्तव्ये यांची जाणीव होताच बागूलचा क्रोध मावळताना दिसतो. एका ठराविक काळात वाटणारा अन्याय, अत्याचार कालप्रवाहात सौम्य होत जात असल्याचे वास्तव या भाष्यातून उलगडत जाते.

**६. दावं** :

**कापुरुष** :

या कथेतील नायक आणि त्याची पत्नी सुनिला यांचे नातेसंबंध घटस्फोटापर्यंत येऊन पोहचतात आणि सुनिला घर सोडून निघून जाते त्यावर पुढे भाष्य येते.

''त्यानंतर अगदी कालपर्यंत त्यानं तिची चवकशी केली नव्हती कोणी तिच्याविषयी काही सांगितलं तर उत्सुकता दाखविण्यापासून त्यानं स्वत:ला आवरून धरलं होतं आणि घरात एकटाच असताना वीस वर्षांचा इतिहास त्याच्या अंगावर कोसळे तेव्हाही त्यानं स्वत:ला सावरून धरलं होतं.'' (पृ.२३) नवरा–बायकोच्या नात्यात आलेले अंतर, त्यांना शरीराने वेगळे करते परंतु

मनाने ते नेहमीच एकमेकांचा विचार करत असल्याचे आणि पत्नीचे घरातील वास्तव्य किती महत्त्वाचे असते ते एकटे असल्यावर पुरेपूर जाणवत असल्याचे या भाष्यातून स्पष्ट होते.

**वाल्या कोळी व बायको :**

गरिबीत संसार करावा लागल्याने या कथेतील नायिका नायकाचा अपमान करते. नायक अपमानाने गरिबीवर सूड उगविण्याचा आटोकाट प्रयत्न करतो तेव्हा त्याच्या श्रीमंती वागणुकीवर पुढे भाष्य येते.

"आताशा तो इतका धुमसत नव्हता. पण त्याच्या मनात चीड होतीच. फक्त त्या धुमसण्याला आणि चिडीला श्रीमंतीची पुटं चढल्याने ते दिसून येत नाहीत – तिला वाटून गेलं त्या पुटाचा परिणाम म्हणून त्याचं धुमसणं जाणवत नसेल. पण माझं गुदमरणंही जाणवू नये का? आपलं गुदमरणं आणि भयकंपित होणं. अलिकडे तर तो बेफिकीरही झाला आहे. जाईन तुरूंगात – म्हणजे काय?" (पृ.४९) श्रीमंतीची नशा माणसामधल्या चांगल्या वाईटाचा फरक नाहीसा करते हेच या भाष्यातून स्पष्ट होते.

**कृमी :**

कलेक्टरसारख्या माणसाच्या वागण्या–बोलण्यावर कशाप्रकारचे साहेबी वर्चस्वाची पुटं चढलेली असतात ते या कथेतील कलेक्टर साहेबांच्या निमित्ताने पुढे येतात.

"रात्री थोड्या उशिरानच साहेब परतले आपल्या बरोबरच्या माणसांशी त्यांनी उभ्या–उभ्या आदबशीर व इतमामाला साजेलसा माफक हास्यविनोद केला. मग बरोबरच्या माणसांना, पी.ए. ला निरोप दिला. पी.ए. ने दाखविलेल्या फायली चाळल्या. काही जरूरी मेसेजेस आहेत का बघितलं. आवश्यक त्या सह्या केल्या." (पृ.८२) मोठ्या व्यक्तींना त्यांच्या मोठ्या आदर सत्काराबरोबरच मानसन्मानाबरोबर तेवढीच कामेही तत्परतेने करावी लागत असल्याचे भाष्य येथे येते.

**७. इतिहासातील एक अज्ञात दिवस :**

**दंगल :**

दंगलीत होणाऱ्या आर्थिक नुकसानीबरोबरच जीवितहानी होते. दंगलीत जाळपोळ करणाऱ्या माणसांच्या संवेदनाच जणू बोथट होत असतात.

"अर्धा जळालेला म्हातारा आता अधिकच क्लान्त होऊन गेला. भुकेनं त्याची आतडी कुरतडली जाऊ लागली होती. वेदनांनी त्याच्या लुळ्या पडलेल्या सर्वांगाला जणू आग लागली होती, घशाला कोरड पडली होती. व्याकूळ होऊन तो नुसतं व्याँव् व्याँव् असं खोल कण्हत होता." (पृ.५८) दंगलीत जळालेला म्हातारा परिस्थितीपुढे किती हतबल ठरतो यावर हे सूचक भाष्य येते. एकीकडे वयपरत्वे आलेली हतबलता त्यातच भरीस भर वेदना या दोन्ही गोष्टींनी त्याच्या दु:खात अजूनच भर पडल्याचे या भाष्यातून स्पष्ट होते.

**भारतातील उन्हाळा :**

व्यवसायातील चढउतार, कनिष्ठ आणि वरिष्ठ यांच्यातील व्यावसायिक संवाद यांवर पुढे भाष्य येते.

"खन्ना थांबले आणि पालसाहेबांच्या प्रतिक्रियेची, त्यांच्या पुढील सूचनांची वाट बघू लागले. पण पालसाहेब काही म्हणाले नाहीत. गप्प राहिले. तेही खन्नांना जाणवलं. इकडे खन्नाही गप्पचं. आता आपण काय बोलावं याचा विचार करीत. पण तसं गप्प राहणं खूपच अवघडलेपणाचं होतं. कारण रिसिव्हर त्यांच्या कानातोंडावरच होता. आणि पलिकडून पालसाहेबही काही बोलत नव्हते." (पृ.२२९) व्यावसायिक बोलणी करताना फोनचा जास्तीत जास्त वापर होत असला तरी समोरच्या व्यक्तीच्या प्रतिक्रिया प्रभावीपणे समजण्यास फोनमुळे काही अंशी का होईना अडथळा ठरत असल्याचे चित्र या भाष्यातून स्पष्ट होते.

**मैत्र :**

संपादकीय काम करताना काळाबरोबर सुसंगत राहून साम, दाम, दंड, भेद इ. मूल्यांचा उपयोग करून संपादक आपला न्युजपेपर त्या प्रवाहाबरोबर ठेवण्यासाठी नवनवीन युक्त्या योजत असतात त्यावर येथे भाष्य येते.

"वसंतराव भोसले म्हणजे नाशिकच्या जनसंदेश दैनिकाचे मालक. संपादकही तेच होते. आमचं वर्तमानपत्र तिथून सुरू झाल्यापासून त्यांच्या खपावर परिणाम झाला होता. आमचं वर्तमानपत्र शहरी वळणाचं होतं, तिथल्या शहरी मानसिकतेच्या वाचक वर्गाला ते आवडलं. वसंतरावांना थेट स्पर्धा निर्माण झाली होती. ते सावध झाले होते, साशंकही झाले होते. त्यांनी पैसा गुंतवून अपटुडेट प्रिंटिंग मशिनरी आणली होती. आता त्यांना हवा होता एक कार्यकारी संपादक." (पृ.२६४) वसंतराव भोसले म्हणजेच जनसंदेश चे मालक यांच्या बुद्धीचातुर्यावर येथे भाष्य येते.

**८. घोडा :**

**घोडा** :

कंपनीतील मालक आणि कामगार यांच्यातील मानसिक संघर्ष दाखवताना ह. मो. मराठे सुधाकर बापट या पात्राच्या माध्यमातून तेथील वातावरण जिवंत करतात.

"लंच अवरनंतर सुधाकर बापट पुन्हा कामाला बसला. मनातल्या मनात धुमसत. संतापत. टाईपरायटर बडवत. जोगांनी उच्चारलेले शब्द – अशाने कंपनीचा टाईपरायटर मोडेल – पुन्हा पुन्हा त्याच्या कानात घुमत होते, आणि पुन्हा–पुन्हा तो टाईपरायटर बडवीत होता." (पृ.१६) जोगसाहेबांनी सुधाकर बापटला बोलल्यानंतर सुधाकर बापटच्या मानसिक अवस्थेवर भाष्य करून मराठे यांनी बापट हे पात्र संवेदनशील दाखवून दिले आहे.

**मशीन** :

तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावर परिणाम होऊन माणसे बेकार होऊ लागली आणि त्या परिस्थितीचा कामगारांच्या मनावर कसा–कसा परिणाम होतो यावर पुढे भाष्य येते.

"दिवसभर तो काम करीत होता, पण कामात लक्ष नव्हतं, समजले त्या बातमीविषयीच तो विचार करीत होता. तो ज्या मशीनवर जॉब करीत होता, ती मशीन तो निदान पाच–सात वर्षं हाताळत होता. प्रत्येक पार्टन् पार्ट त्याच्या ओळखीचा झाला होता. त्याच्या शरीराला त्या भागाचा स्पर्श ओळखीचा झाला होता. काही ठिकाणी रफ, काही ठिकाणी प्लेन, त्या मशीनचा आवाज त्याच्या कामात घुमत आला होता. अनेक वर्षे मशीनवर उभं राहिलं की शरीराला ठराविक लयीत

बसणारे सूक्ष्म हादरे त्याच्या परिचयाचे झाले होते. काय झालं म्हणजे मशीन फेल होतं हेही त्याला माहीत होतं. त्याला काळजी वाटत होती. मशीन विकलं आणि आपलं खातं खरोखरीच बंद केलं तर? त्याचा साथीदार बेफिकीर होता. एक काम नाय, दुसरं!" (पृ.४५) खाशाबा ज्या मशिनवर काम करत असतो त्या मशिनबाबतीतल्या सर्व बारिक–सारिक गोष्टी त्याला माहीत झाल्याचे या भाष्यातून पुढे येते.

**सापळा :**

रणदिवेंसमोर देवकुळेचा खून होतो तो प्रसंग रणदिवेंना अस्वस्थ करतो परंतु फॅक्टरीत इतरांच्या लेखी ती एक इतिहासजमा गोष्ट असते. कामाच्या गतिमान प्रवाहात मानवाची किंमतच कमी झालेले या भाष्यातून व्यक्त होताना दिसते,

"आठ दिवसांनी तो फॅक्टरीत परतला तेव्हा त्याच्या लक्षात आलं की फॅक्टरीतल्या बहुतेक सर्वांच्या दृष्टीने देवकुळेचा खून ही इतिहासजमा झालेली घटना आहे. तपासाचं काम चालू असल्याचं भासवीत होते, इतकंच. देवकुळेची ग्रॅच्युइटी आणि कंपनीन सहानुभूती म्हणून दिलेली रक्कम त्याच्या बायकोला पोचवण्यात आली होती. तिनं दुसऱ्या बाळंतपणासाठी म्युनिसिपालटीच्या दवाखान्यात नाव नोंदवलं होतं." (पृ.८८) देवकुळेच्या खुनामुळे निर्माण झालेली पोकळी त्याच्या फॅक्टरीत तसेच घरात जाणवत असल्याचे या भाष्यातून कळते.

**टार्जेट :**

इंडस्ट्रीजमध्ये चांगल्या उच्चशिक्षित लोकांना मागणी असते त्याप्रमाणे लालासाहेबांनी सुनिल साने यांच्यातील चांगले गुण हेरून त्यांना नोकरी दिली होती त्यावर पुढे भाष्य येते.

लाला इंडस्ट्रीजचा चीफ एक्झिक्युटिव्ह म्हणून तो जॉईन झाला त्याला फक्त दोनच महिने होऊन गेले होते. चेअरमन एस लाला ह्यांनी स्वत: त्याला हेरल होतं आणि नागपूरहून उचलून पुण्याला आपल्या एका युनिटचा चीफ एक्झिक्युटिव्ह म्हणून आपलं होतं. दोन हजार रूपये पगार दिला होता. गाडी दिली होती. रहायला फ्लॅट दिला होता. लालासाहेबांची आणि त्याची भेट अशीच एका इंडस्ट्रिअल एक्झिबिशनमध्ये झाली. ओळख वाढली. तीन चारदा ते नागपूरला गेले तेव्हा मुद्दाम त्याला बोलावून घेतलं होतं, चर्चा केली होती आणि स्वत:च त्याला ऑफर दिली

होती. त्यांची ऑफर ऐकून तो रोमांचित झाला होता.'' (पृ.९७) उच्च शिक्षण असलेल्या नायकांना नोकरीबरोबरच पैसा, प्रतिष्ठा, मानसन्मान आपोआप मिळत असल्याचे या भाष्यातून स्पष्ट होते.

**मानवतावादी लेखकाचा मृत्यू :**

नाटककार, कादंबरीकार, टीकाकार, समाजसेवक असलेल्या अप्पासाहेब यांच्यावर पुढील भाष्य येते,

''अप्पासाहेब त्याचं तसं आदराचं स्थान होतं. हायस्कुलात असताना त्यानं त्यांच्या कथा–कादंबऱ्या, नाटकं अधाशासारखी वाचली होती. त्यांची भाषणं कानांत जीव ओतून ऐकली होती. त्यांच्या गावातील भाषणांचे रिपोर्टस् मन:पूर्वक लिहिले होते. त्यांचे मानसन्मान झाले तेव्हा त्याचं हृदय आनंदानं उचंबळून आलं होतं. एम.ए. च्या परीक्षेसाठी नेमलेल्या पुस्तकांचा अभ्यास करताना त्यानं त्यांची मदत मिळविली होती. खुद्द अप्पासाहेबांच्या काही पुस्तकासंबंधीचे आपले काही विचार त्यानां ऐकवले होते आणि ते विचार नवीन आणि विचारात घेण्यायोग्य आहेस असा खुद्द अप्पासाहेबांचा अभिप्राय मिळविला होता.'' (पृ.१२८) विष्णू दिगंबर म्हसकर या वार्ताहराचे अप्पासाहेब हे आदर्शस्थान असल्याने त्यांना त्यांच्याविषयी कमालीचा आदर दाखविणारे हे भाष्य त्या दोन व्यक्तिंमधील आपुलकी व्यक्त करताना दिसते.

**हुतात्मा :**

सीमाप्रश्न सोडविण्यासाठी उपोषण करणे या अहिंसेच्या मार्गाचा अवलंबून करून आमदार गोवेकर चार आमदारंसोबत प्राणांतिक उपोषणास बसतात. त्या परिस्थितीवर येथे भाष्य येते.

या कथासंग्रहातील घोडा, मशीन, अग्नी, सापळा, टार्जेट या कथांमधील पुरुषांवर भाष्य करताना राम मंत्री म्हणतात,

''या पाचही कथांत वास्तव जीवनाचे खरेखुरे दर्शन होते. तरीही मानवी मनाच्या विविध प्रवृत्ती तितक्याच समर्थपणे लेखक रेखाटतो. मॅनेजर कोणी (घोडा), राजवाडे (मशीन), मोहन पाटील (अग्नी), सोनी (सापळा), सुनिल साने (टार्जेट) ही माणसे या यंत्रसंस्कृतीत यंत्राप्रमाणे बनलेली भावनारहित यंत्रेच आहेत. यंत्रे मानवी भावनांचा चुराडा करतात एवढेच नाही तर त्यांना

यंत्रेच बनवतात. करिअर, पैसा आणि स्वार्थ यापलीकडे जगात काही नाहीच असे वाटणारी ही यंत्रे आपल्या सर्व समाजजीवनावर प्रहार करीत आहेत, असे स्पष्टपणे वाटू लागते.''[११]

या कथासंग्रहातील पुरुषांच्या वास्तव जीवनावर राम मंत्री यांनी केलेले भाष्य यथोचित वाटते.

''लोकांच्या नाजूक भावना ज्या प्रश्नांभोवती गुंतून पडल्या होत्या, त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सीमाभागातील नेते चार–पाच दिवस मंत्रालयासमोर उपोषण करीत आहेत. आणि त्याची कोणीच दखल घेत नाही, त्यातलं न्यूज पोटेंशिअल वाढण्याऐवजी कमी होतंय, हे काहीतरी निराळंच घडत होतं. आमदार गोवेकर क्षीण होत होते, त्यांचा आवाज बसला होता. त्यांना डॉक्टर येऊन तपासून जात होते; पण राजकीय निर्णयांच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकेल अशी कोणतीही प्रभावशाली व्यक्ती पाचव्या दिवशीही उपोषक आमदारांच्या बाजूला फिरकली नाही.'' (पृ.१८३) उपोषण करून मागण्या मान्य करणे हा प्रभावशाली मार्ग असला तरी निर्णय घेणाऱ्या व्यक्तींचा जोपर्यंत वरदहस्त लाभत नाही तोपर्यंत त्यातून काहीही मार्ग निघत नसल्याचे या भाष्यातून समोर येते.

**९. युद्ध :**

**चौथा :**

सात कामगारांचा स्फोटात भाजून मृत्यू झाल्याची घटना या कथेतून आली आहे. संवेदनशील भावेंच्या माध्यमातून या घटनेकडे ते तळमळीने पाहताना दिसतात त्यावर भाष्य पुढे येते.

''संध्याकाळी खानावळीतून जेवण करून तो परत खोलीवर आला. त्यानं लायब्ररीतून नवं पुस्तक आणलं होतं. त्याच्या एका आवडत्या लेखकाची नवी कादंबरी – कोळशाच्या खाणीत एकाएकी गाडल्या गेलेल्या दोनशे कामगारांची हृदयद्रावक कहाणी. त्यानं मुखपृष्ठावर छापलेले हे शब्द पाहिले. आणि त्याच्या नजरेसमोर तरळू लागले ते सातजण – रसायनांच्या भडक्याने भाजून करपून तडफडून मेलेले–'' (पृ.७३) या कथेतील विषय आणि भावेंच्या आवडत्या

लेखकाच्या कादंबरीचा विषय सारखाच असल्याने भावेंच्या मनातील कामगारांची तडफड पुन्हा एकदा नजरेसमोर तरळू लागल्याचे स्पष्ट चित्र या भाष्यातून उभे राहते.

या कथासंग्रहातील भाष्यावर आपले विचार प्रकट करताना उमेश तेंडुलकर लिहितात,

"आधुनिक मूल्यव्यवस्था व औद्योगिक संस्कृतीकडे संक्रमित होणाऱ्या मानसिकतेमधील विविध ताणतणाव व त्यातून अनुभवाला येणारे स्फोटक क्षण हा या संग्रहाचा प्रधान विशेष जाणवतो आणि हे युद्ध सनातनी असले तरी आधुनिकतेच्या संदर्भात त्याचे स्वरूप पालटले आहे."[१२]

या कथासंग्रहावर भाष्य करून उमेश तेंडुलकर यांनी बदलत जाणाऱ्या वरील सर्वच गोष्टींकडे निर्देश केलेला दिसतो. एकूणच काय कंपनी कामगार व कंपनी यांच्या माध्यमातून कामगारांच्या वाट्याला अपघाताच्या निमित्ताने येणारे दाहक वास्तव समजण्यास येथे मदत होते.

ह. मो. मराठे यांच्या विविध कथासंग्रहातून अनेक विषयांवरच्या कथा आलेल्या आहेत. त्या कथेतील पुरुषपात्रांच्या आचार–विचारांवर येथे भाष्य येते. त्या पात्रांच्या चांगल्या वाईट आचार–विचारांना अधोरेखित केलेले दिसते. कधी भाष्य करून या पात्रांची मानसिकता दाखविली जाते, तर अन्याय, अत्याचार सहन करता करता कधी ही पात्रे बंड करून ऊठतात तेही सहजतेने भाष्यातून व्यक्त होताना दिसते. एखाद्या पात्राच्या घटनेकडे प्रसंगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामागे कोणता कार्यकारणभाव आहे हे भाष्यातून सहज लक्षात येते.

ह. मो. मराठे यांच्या कथा उद्योग व्यवसाय, भांडवलदार, कारखानदार, कामगार इ. च्या अनुषंगाने प्रामुख्याने आलेल्या दिसतात. वरिष्ठ–कनिष्ठ, मालक–नोकर, कारखानदार–कामगार अशा विविध पातळ्यांवर चालणारे भावविश्व ह. मो. मराठे समर्थपणे भाष्यातून उलगडत नेताना दिसतात. पात्रांच्या सुखदु:खाची तीव्रता, मानसिक, आर्थिक संघर्ष, नैतिकता इ. गुण–अवगुणांवरही भाष्यातून प्रकाश टाकला जातो. त्यामुळे पात्रांच्या बाह्य अंगाबरोबरच त्यांचे अंतरंग समजण्यास, त्यांच्याशी समरस होण्यास हातभार लागतो.

**कादंबरी :**

**१. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी :**

सदर कादंबरीत अशी विविध भाष्ये आलेली आहेत. कादंबरीचा प्रारंभच भाष्याने होतो. नायकाची मानसिक स्थिती टिपताना निवेदक म्हणतो,

''हॉटेलच्च्या शेवटच्च्या पायरीवर तो उभा होता. समोर सुरू झालेली पायऱ्यांची चढण. त्या पायऱ्यांवर किड्या किड्यांचंसं वाटणारं महारोग्याच्या रोगजर्जर थुंकीसारखं डिझाइन. त्या पायऱ्यांवरून क्रमानं नजर फिरवली. मग तशीच ती त्यानं इमारतीच्या भिंतीवरून सरड्यासारखी वर चढवली. ही प्रचंड उंच इमारत आकाशात घुसून बसलेली.

थोडा वेळ तो तसाच शेवटच्च्या पायरीवर उभा.'' (पृ.१)

माणूस स्वत:च्या जीवनात सुखी असेल तर त्याला सर्व जग सुखी दिसते आणि दु:खी असेल तर सर्व जग त्याला दु:खी दिसते असे म्हटले जाते. याचाच काहीसा प्रत्यय या नायकाच्या मानसिक स्थितीवरून लक्षात येतो. एका मोठ्या हॉटेलच्या शेवटच्या पायरीवर उभा असताना ते हॉटेल सुंदर वाटत नाही. पायऱ्यांवरील डिझाइन सुंदर वाटत नाही, तर ते डिझाइन त्याला 'महारोग्याच्या रोगजर्जर थुंकीसारखं' वाटतं, तर दुसरीकडे 'नजर ....... भिंतीवरून सरड्यासारखी वर चढवली' यातून स्वत:ची क्षुद्रताच सूचित केल्याचे प्रत्ययाला येते.

हॉटेलमधून बाहेर पडताना दाराशी ''गरिबाला पैसा दे भगवान'' म्हणून आर्जवे करणारा भिकारी नायकाचे लक्ष वेधून घेतो. त्यावर भाष्य करताना तो म्हणतो,

''भिकाऱ्याचं हसणं, रडणं आणि विव्हळणं. सारंच केविलवाणं. आकाश फाडून टाकणारं. लोक पोरंटोरं त्याची गंमत करत होती. आपलं मनरंजन करत होती. एखाद्या पैशाच्या संभाव्य प्राप्तीच्या वांझ वांझ, फाटक्या फाटक्या आशेनं भिकाऱ्याचं अधिकच दयनीय केविलवाणं हसणं.'' (पृ.७)

भिकाऱ्याच्या दु:खाचं तर कुणालाही काहीही देणंघेणं नाही. उलट त्याच्या अवस्थेची थट्टा करणारी इतरांची मानसिकता येथे दिसते. दुर्बलांना या जगात जगण्याचा अधिकारच नाकारणारी येथील स्थिती या भाष्यातून स्पष्ट होते.

दुसऱ्याला सुख–दु:खाचा विचार करायला या जगात कुणालाही वेळ नाही. माणूस हा परिस्थितीचा बळी आहे. हेच चित्र पुढील भाष्यातून येते. नायकाची स्थिती मांडणारे भाष्य येथे येते.

''तो काकूंच्या आउटहाऊसमध्ये म्हैस बांधायच्या खोलीच्या शेजारच्या खोलीत काही महिने कॉलेजात असताना राहिला होता. कशी का असेना, पण ज्या शहरात त्याला कुणी पायरीशी उभं केलं नसतं त्या शहरात काकूंची एका नातलगामार्फत गयावया केल्यानंतर त्याची राहण्यापुरती सोय झाली होती. त्या खोलीसमोरून जाता–येताना काकू त्याच्याकडे अशा काही नजरेनं बघायच्या की त्याला आपलं आयुष्य कोळ्यानं खाल्लेल्या किड्यापेक्षा अधिक महत्त्वाचं वाटत नसे. काकूंच्या नजरेचा विषय होताना तो अनेक मरणं मरायचा. आणि एक दिवस अचानक काकूंनी खोली सोड म्हणून सांगितलं.'' (पृ.१०)

एखाद्या अडचणीची, हतबलतेची फिकीर नसणाऱ्या निष्ठुरतेचा प्रत्यय काकूच्या रूपाने नायकाला येतो. पैसा महत्त्वाच्या मानणाऱ्या काकूंना नायकाच्या परीक्षेचेही काही देणे घेणे नाही. एका लोभी स्त्रीचा प्रत्यय तिच्या या वागण्यातून येतो. तपशील न देता येणारे हे भाष्य सूचकतेने काकूंच्या स्वभावावर आणि 'आयुष्य कोळ्यानं खाल्लेल्या किड्यापेक्षा अधिक महत्त्वाचं वाटत नसे' या नायकाच्या जगण्यावर आलेल्या भाष्यातून त्याची क्षुद्रता आणि असहायतेवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

या जगात जन्माला आल्यानंतर जगावेच लागते अपरिहार्यपणे. यावर पुढे भाष्य येते.

''वाळलेल्या पानागत प्रवाहातून तो फरफटत चालू लागला. ही तर सवयच झालीय, गर्दीच्या लोंढ्यात मिसळलं की आपोआप वाहायला होतं. स्वत:ची प्रेरणाशक्ती लागतच नाही. लोक वाहतात म्हणून आपण वाहतो. जगाच्या सुरूवातीपासून हे असंच. लोक वाहतात म्हणून इतर वाहतात.'' (पृ.१६)

भाष्य आणि स्वगत या दोन्हींचे मिश्रण एकजीव होऊन येथे आले आहे. जगाच्या या रहाटगाडग्यात माणसाला सामील व्हावेच लागते. या जगाशी जुळवून घ्यावेच लागते. येथे स्व–इच्छेचा प्रश्न येत नाही हे वास्तव नायकाच्या रूपाने मराठे यांनी मांडले आहे.

माणसाच्या वाट्याला आलेल्या दु:खातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नाही तेव्हा तो उद्ध्वस्त होण्यापासून वाचवू शकत नाही. नायकाची ही उद्ध्वस्तता आणि उद्वीग्नता पुढील भाष्यातून येते.

"गेले कित्येक दिवस दाबून ठेवलेला खोलवरचा हुंदका त्याच्या आतड्यातून वेगानं वर उफाळला नि त्याच्या गळ्यात गिरमिटला. सगळा विश्वगोल जळतजळत आपल्यावर कोसळतोय असं त्याला वाटलं.

तो गुदमरला. आत्यंतिक व्याकुळला. वादळात झाडं पिळवटावी तशी त्याची सगळी आतडी दु:खभारानं पिळवटली, धमन्यातलं सगळं रक्त पेटलंय असं त्याला वाटलं.

मग त्यानं आणखी एक कडक लाल कढत कढत रक्तासारखा चहा ढोसला.

मग त्यानं आणखी एक सिग्रेट फुंकली.

त्या धुराच्या वलयात त्यानं स्वत:च्या दु:खसमन्वित हृदयाची एकेक अगतिक थडथड विसर्जित करून टाकली. आपल्या एकेका तप्त पण विफल नि:श्वासाला वाढत्या अंधारात जड जड प्रवाहात बुडवून टाकलं. तो तिथंच बसून राहिला. वसूचा नसल्यासारखा. जगाचा नसल्यासारखा. स्वत:चा नसल्यासारखा, नसल्याचसारखा." (पृ.५२)

मानवी जीवनात दु:खाचा अतिरेक झाला की, माणूस वैचारिक पातळीवर कोणत्या थराला जातो याचेच हे भाष्य द्योतक आहे. 'खोलवरचा हुंदका', 'आतड्यातून वेगानं वर उफाळला', 'गळ्यात गिरमिटला', 'विश्वगोल जळजळणे', 'गुदमरला', 'आत्यंतिक व्याकुळला', 'वादळात झाडं पिळवटावी', 'सगळी आतडी दु:खभारानं पिळवटली', 'धमन्यातले रक्त पेटणे', 'रक्तासारखा चहा', 'हृदयाची अगतिक थडथड', 'विफल नि:श्वास', 'अंधाराचा जड जड प्रवाह', 'स्वत:चा नसल्यासारखा', 'नसल्यासारखा' हे सगळे शब्द नायकाच्या जगण्याचे अस्वस्थ हुंकार म्हणूनच बाहेर पडलेले दिसतात. अर्धांगिनी असलेल्या पत्नीचे नातेही त्याला

असून नसल्यासारखे वाटते. एवढेच नाही तर आपण आपलेही नाही अशी निर्वाणीची भाषा त्याच्या मुखातून आणि पर्यायाने भाष्यातून व्यक्त होते.

पैसा हा माणसाच्या जगण्याचा मूलाधार आहे. तो मिळविण्यासाठी तो सतत प्रयत्नशील राहतो. येथील नायकाला नोकरीला मुकावे लागते. आवक बंद होते, गर्भवती असलेल्या पत्नीला नोकरीस ठेवण्यास नकार मिळतो तेव्हा पत्नीला अज्ञानात ठेवून नायक पत्नीला पपई खायला देऊन तिचा गर्भपात करतो. आपण फार मोठी चूक करतो आहोत हे वास्तव कळूनही तो ती चूक करतो. पपई खायला दिल्यानंतर तिचे होणारे हाल पाहायची त्याची क्षमता नाही. त्यावरील पुढे येणारे भाष्य मन हेलावून टाकते.

"मग तो तिथं थांबलाच नाही. भूत लागलेल्या माणसासारखा घराबाहेर पडला. संध्याकाळी मावळत्या सूर्याच्या उतरत्या उन्हातील दीर्घ दीर्घ सावल्यांच्या संगतीने तो खोलीवर आला तेव्हा वसू कॉटवर निपचित पडली होती. कॉटवरचे कपडे रक्ताळले होते. जमिनीवर रक्ताचे डाग ओघळले होते. शांतपणे व शक्य तेवढ्या खंबीरपणे तो वसूच्या उशाशी उभा राहिला." (पृ.७१)

नोकरीच्या अमिषापोटी स्वत:च्या पत्नीच्या भावभावनांचा आणि गर्भातील बाळाचा बळी देणारा एक खलपुरुष म्हणूनच नायकाची प्रतिमा या भाष्यातून प्रत्ययाला येते.

अशाप्रकारे 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीतील प्रामुख्याने नायकाचे अंतर्मन, त्याच्या भावभावना, क्रियाप्रतिक्रिया, त्याच्या हालचाली या भाष्याधारे टिपल्याचे स्पष्ट होते. अल्प अशा भाष्याद्वारा त्या समग्र व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकल्याचे येथे प्रत्ययाला येते.

**२. काळेशार पाणी** :

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा. त्यातही भूकेचा प्रश्न अधिक महत्त्वाचा. निराश्रित भिकी आणि तिच्या मुलांच्या अनुषंगाने तो प्रश्न सदर कादंबरीत प्रामुख्याने येतो. त्यावरील अनेक भाष्ये लक्ष वेधून घेतात. भज्याचा गाडा चालवून चरितार्थ चालविणाऱ्या भिकीच्या मुलांची खाण्यासाठी चाललेली धडपड पुढील भाष्यात येते.

“आई अशी आली की कमळीला तिथून सटकणं भाग पडायचं. पण तरी जाता आईचा डोळा चुकवून ती भज्यांच्या परातीवर हात मारून हाताला येतील तितकी भजी तोंडात कोंबायची. जीभ भाजत असली तरी भजी चघळायची. पाणंदीतून घराकडे पळायची. घर शाळेसारखंच पडकं, मोडकं आणि काळपट रंगाचं होतं. दारातला उकिरडा कोंबड्यांनी उकरून ठेवलेला असायचा; आणि कमळीच्या धाकट्या भावंडांचा गोंधळ असायचा. भुकेनं व्याकुळ व्हायला आलेली कमळी सगळ्यांना बदडायची व मग आंघोळीचं नाहीतर कपडे धुवायचं निमित्त करून जोश्यांच्या कोंडीकडे पळायची. तिथल्या पाण्यावरून वाहणाऱ्या थंड वाऱ्यात ओणवलेल्या माडाच्या झाडाच्या जड जड सावलीत पुष्कळ वेळ बसून राहायची. दुपारच्या सूर्याची उन्हं पानापानांतून ओघळून पाण्यात झिळमिळायची आणि भुकेच्या पोटानं कमळी आपले डोळे त्या उन्हांवरून फिरवत राहायची.” (पृ.४)

भज्याचा गाडा चालवून उदरनिर्वाह करणाऱ्या भिकी आणि तिच्या मुलांची अन्नासाठी चाललेली धडपडच येथे प्रत्ययाला येते. वरील भाष्यात एकट्या कमळीची भूक भागविण्यासाठीची धडपड येते. पृ. २२ वर कमळीची हतबलता आणि इतर मुलांची भूक भागविण्यासाठी आईकडे आर्जवे येतात.

निराश्रित भिकीच्या असहायतेचा गैरफायदा घेत विष्ण्या तिचे शारीरिक शोषण करीत दहा मुलांना जन्म देतो. त्यांच्या उदरनिर्वाहासाठी काहीही उपाय तो करीत नाही. त्याचे निधन झाल्यानंतर कमळीच्या शाळेतील सामन्त मधल्या सुट्टीत सांत्वनासाठी तिच्याकडे येतो. मात्र त्याला काय बोलावे हेही कळत नाही. त्यावरील पुढे आलेले सूचक भाष्य लक्षवेधी असेच आहे.

“मधल्या सुट्टीत सामन्त तिच्याजवळ येऊन उभा राहिला. काही बोलला नाही. अशा प्रसंगी काय बोलतात हे त्याला मुळीच माहीत नव्हतं. तो नुसताच तिच्यासमोर उभा राहिला. कमळीनं त्याच्याकडे बघितलं. त्याचे डोळे भरलेल्या तळीसारखे गडद गहिरे बनून राहिले होते. त्यानं तिच्या डोळ्यात बघितलं. शब्दांनी व्यक्त करायची तऱ्हा त्याला ठाऊक नव्हती म्हणून तो बघण्यानं सहानुभूती व्यक्त करीत होता. एक शब्दही त्यानं उच्चारला नाही. केवळ त्या बघण्यानंच कमळीचे डोळे भरून आले.” (पृ.३०)

सांत्वनाची भाषा माहीत नसली तरी कमळीविषयीची सहनुभूती त्याला वाटत असल्याचे सूचन या भाष्यातून होते. ज्या सामन्तची सहानुभूती कमळीलाही वाटत होती, सामन्त तिच्यासमोर डोहात उडी घेऊन आत्महत्या करतो, तेव्हा ती सैरभैर होते. अंथरूणाला खिळून राहते, त्यावेळी भिकी व कमळीच्या घरातील स्थितीवरील भाष्य पुढे येते.

"गेले साताठ दिवस भिकीनं कमळीवर उपचार केले होते. धूप, अंगारे, दृष्ट काढणे, भुताला नारळ–कोहळ–सगळे प्रकार तिनं बहुतेक करून टाकले होते. तरी कमळीला गुण नव्हता. सामन्ताला बुडून मेलेला बघितल्यापासून ती जी हादरली–भेदरली होती ती तशीच होती. कोंडीवरून आल्यापासून कमळीनं कोपरा पकडला होता. पहिले तीनचार दिवस तर कमळी अंथरूणावर होती. गेले दोनतीन दिवस अंथरूणावर उठायला लागली होती. इकडे तिकडे फिरत होती. पण तिच्या वागण्या–बोलण्यात काही जीव उमटत नव्हता. दिवसा ती भिऊन गप्पगार ओझ्याखाली पडपल्यागत असायची. रात्रीचा काळोख भरायला लागला की कोपरा धरायची. दोनतीन कांबळी अंगाला लपेटून भिंतीच्या आधारानं कलंडायची. भावंडं आसपास असली तर ते तिला आता हवंसं झालं होतं. दिव्याच्या अंधुक लालसर प्रकाशात भिंतीवरच्या सावल्यांनी भेडसावली जात ती स्वत:ला मिटून घेत तोंड बंद करून बसून राहायची." (पृ.५९)

भाकरीच्या तुकड्यासाठी आगपाखड करणाऱ्या कमळीला सामन्त मानसिक आधार वाटायचा, पण त्याने समोर डोहात आत्महत्या करणे ती सहन करू शकत नाही हे वास्तव या भाष्यातून पुढे येते. त्याबरोबरच अज्ञान माणसाला अंधश्रद्धांच्या खाईत लोटायला कारणीभूत कसे ठरते. ग्रामीण पार्श्वभूमीवरील अंधश्रद्धा दारिद्र्याने आणि अज्ञानाने पिचलेल्या भिकीच्या अंगारे–धुपारे, भुताला नारळ वाढविण्यातून पुढे येते.

कितीही अंगारे–धुपारे केले तरी कमळी बरी होत नाही हे वास्तव लक्षात आल्यानंतर ती अस्वस्थ होते. बाळ्याभटाकडून तिचे शारीरिक शोषण सुरूच असते. मात्र तो आपले शारीरिक शोषण करतो असे तिला वाटत नाही. आपली शारीरिक भूक भागविण्यासाठी तो भिकीकडे आल्यानंतर कमळीच्या ओरडण्याने तसाच परत जातो. तेव्हा ती कमळीला दटावते. पुन्हा तो येतो तेव्हाही ती किंचाळते बाळ्याभटाला हे सहन होत नाही. कमळी जगली काय अन् मेली काय

तिचा काही उपयोग नाही म्हणून रागाने चडफडत तिला विहिरीत ढकलून दे असे भिकीला सांगतो. त्यावरील भाष्य हृदय हेलावून टाकणारे असेच आहे.

"तत्क्षणी भिकी उठली, तिला आपल्या नेसणाचीही शुद्ध राहिली नाही. ती झटक्यानं धावत भीतीने थडथडणाऱ्या कमळीपाशी गेली. तिला उचलून घेऊन बाहेरच्या सुन्न अंधारातून धपाधपा धावत महापुरुषाच्या विहिरीवर गेली. त्याच आवेगानं तिनं तिला विहिरीत भिरकावून दिलं. त्या खोल खोल कभिन्न काळोखानं भरलेल्या, काळ्याशार पाण्याच्या विहिरीतून धप्प असा आवाज घुमत घुमत वर आला आणि भिकीच्या कानांवर आदळला. तेव्हा भिकीनं जिवाच्या आकान्तानं एकच आरोळी मारली – आणि तशीच धावत येऊन तिनं बाळ्याभटाच्या पायांना मिठी घातली." (पृ.७२)

माणसाच्या जीवनात भूकेचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हे विदारक वास्तव यातून पुढे येते मात्र त्याहीपेक्षा आपल्या शारीरिक भूकेपायी दुसऱ्याच्या मुलीचा घात करण्यास कारणीभूत ठरणारा बाळ्याभट माणुसकीला काळिमा फासणारा पुरुष म्हणूनही या भाष्यातून पुढे येतो.
स्वतःच्या जगण्याचे प्रश्न सोडवू न शकणाऱ्या अभागिनी स्त्रीच्या जीवनाचे धिंडवडे हेच वरील सर्व भाष्यांचे मुख्य सूत्र असल्याचे पदोपदी प्रत्ययाला येते.

**३. इतिवृत्त :**

या कादंबरीत अशाच स्वरूपाची व्यक्तींची वैशिष्ट्ये, स्वभावविशेष स्पष्ट करणारी आणि कथानकाला पुढे नेणारी अशी भाष्ये येतात.

"नाडकर्णींनी तटस्थपणे उत्तर दिलं आणि ते बोलणं मनात थरू दिलं नाही. आबा कर्णिक भला आणि प्रांजळ माणूस. अकारण लोभ करणारा. आपल्यावर कर्णिकांचा इतका लोभ का असावा हेही त्यांना कधी कळलं नव्हतं. पण हे कोडं मात्र त्यांना होतं. पण ते सोडवायचा प्रयत्नही त्यांनी केला नव्हता. एका सिनिअर संपादकाचा व हिकमती पत्रकाराचा लोभ आपणाला लाभला आहे, निरपेक्ष लोभ लाभलेला आहे, याच भावनेनं नाडकर्णी भारावून जात होते." (पृ.११)

नोकरी–उद्योगाच्या निमित्ताने एकमेकांवरील विश्वास आणि सहकार्याच्या भावनेतून एकमेकांविषयीचा वाटणारा आदर आबा कर्णिक यांच्या रूपाने नाडकर्णी व्यक्त करतात असा

मनोदय या भाष्यातून अभिव्यक्त होतो. आबा कर्णिक यांचा सहानुभावच यातून स्पष्ट होण्यास मदत होते.

"तासाभरात त्यांनी अग्रलेख पूर्ण केला आणि त्यावरून पुन्हा नजर फिरवली. सरकारवर टीका होती, पण सौम्य होती. काल मुख्यमंत्र्यांनी शेतीविकासाच्या योजनांची जी मोघम घोषणा केली होती त्याचा अधिक तपशील फार काळजीपूर्वक ठरवावा लागेल अशी सूचना होती. राज्यात पुढीलवर्षी होणाऱ्या नगरपालिकांच्या निवडणुकांवर डोळा ठेवून करण्यात आलेल्या फसव्या घोषणांचं स्वरूप मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनांना आलं तर ती या राज्यातील गरीब जनतेची दिशाभूल ठरेल असा इशारा होता. राज्याला राजकारणात मूठभर बड्या शेतकऱ्यांचं आणि बड्या व्यापाऱ्यांचं जे वर्चस्व आहे त्या हितसंबंधांना धक्का लावल्याशिवाय शेतीविकासाच्या खऱ्या अर्थपूर्ण योजना अंमलात आणणंच शक्य नाही, असा निष्कर्ष काढण्यात आला होता व इथंच मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी लागणार आहे असं प्रतिपादन करण्यात आलं होतं. या कसोटीला उतरण्यासाठी व कार्यक्रम कठोरपणे राबविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती नेतृत्वापाशी असली पाहिजे, असाही अभिप्राय संपादकांनी व्यक्त केला होता." (पृ.२१)

कोणत्याही वृत्तपत्राचा संपादक हा आपल्या अग्रलेखातून एखाद्या घटना–प्रसंगाचा, निर्णयाचा सखोल विचार करून वाचकांचा, लाभार्थींचा प्रतिनिधी, मार्गदर्शक दुवा म्हणून कार्य करीत असतो. साहजिकच या भाष्यातून एका विशिष्ट घटकाचा उदोउदो न करता सारासार विवेकाने सर्वच स्तरातील त्या घटकाचा विचार अभिप्रेत ठरतो असा सार यातून निघतो. शेतकरी असो वा व्यापारी सर्वांना सामावून घेणारा निर्णय घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन येथे येते. तर पुढे –

"त्यांना उद्यागपती व्हायचं नव्हतं किंवा दैनिकही चालवायचं नव्हतं. त्यांना राजकारणात आपलं जीवित व्यतीत करायचं होतं. बेचाळीसच्या काळात त्यांनी सभामोर्चात भाग घेतला होता. स्वातंत्र्यानंतर त्यांनी काही काळ काँग्रेसच्या आणि नंतर समाजवाद्यांच्या राजकारणाशी जवळीक साधायचा प्रयत्न केला, पण त्यांच्या लवकरच लक्षात आलं की, राजकारण आणि कारखाने या दोन गोष्टी एकाच वेळी सांभाळता येणार नाहीत. लवकरच त्यांच्या हेही लक्षात आलं की,

आपणाला राजकारणात फारसा थाराही बदलत्या वातावरणात मिळणार नाही. विभाजनाचं आंदोलन तीव्र झालं तेव्हा त्यांची ती इच्छा पुन्हा एकदा उफाळून आली. चळवळीला पैसा पुरवायला तर ते नेहमीच तयार होते. त्यांनी भरपूर पैसा पुरवलाही. पण तरीही ते नेते होऊ शकले नव्हते. मुख्यमंत्रीपद गेलं. त्यानंतर मात्र त्यांनी ठरवलं की, आपणाला राजकारण पूर्ण वर्ज्यच करायला हवं. आपले उद्योगधंदे सांभाळणं, वाढवणं, मुलाला त्यात तयार करणं एवढंच करायला हवं.'' (पृ.११७)

प्रत्येक व्यक्तीचा त्याचा त्याचा म्हणून एक पिंड असतो. बळजबरीने एखादी गोष्ट आपण करीत असू तर त्यात यशस्वी होता येणे अवघड ठरते. कारखाने आणि राजकारण यात कारखाने चालविणे, उद्योगधंदे वाढविणे यातच आपण यशस्वी होऊ शकतो ही धारणा या भाष्यातून येते.

``मुख्यमंत्र्यांनी बोलविलेल्या अनौपचारिक भेटीसाठी नाडकर्णी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले तेव्हा इतर दोन्ही स्थानिक वर्तमानपत्रांचे संपादक आपल्या आधीच तिथं येऊन बसलेले नाडकर्णींना दिसले. काणे आणि शिंदे. नाडकर्णींचा अंदाज होता आपणाला एकट्यालाच मुख्यमंत्र्यांनी बोलावलेलं असेल. पण इतरही संपादक येऊन बसलेले बघून नाडकर्णींना काहीसं आश्चर्य वाटलं आणि आनंदही झाला. मुख्यमंत्री आपणाशी काही बोलू इच्छितात असा निरोप त्यांच्या सेक्रेटरीनं फोनवर दिला तेव्हा नाडकर्णींनी अनेक तर्क केले होते. विभाजनानंतर जनतेचा अपेक्षाभंग झाला आहे असं तुम्हांला का वाटतं अशा विषयापासून हॉटेल कामगारांच्या परिस्थितीची पाहाणी करण्यासाठी नेमावयाच्या समितीपर्यंत आणि दळवींच्या फॅक्टरीविरूद्ध दूषित पाण्यासंबंधातील बातम्यांपर्यंत कोणता तरी विषय आपणाला विश्वासात घेऊन मुख्यमंत्र्यांना बोलावयाचा असेल. पण इतर संपादक हजर असलेले बघून असा कोणताच विषय नाही याबद्दल त्यांना खात्री वाटू लागली.'' (पृ.१५३)

राजकारणी लोक अत्यंत मुत्सुद्दी असतात. सर्वांशी सलोख्याचे संबंध ठेवणे यातच आपले हित असल्याचे सूत्र त्यांना गवसलेले असते. त्यात बंदुकीच्या गोळीपेक्षा वृत्तपत्रांची म्हणजेच पर्यायाने पत्रकारांची भीती राज्यकर्त्यांना अधिक वाटत असते असे म्हणतात. येथे नाडकर्णींना

फक्त आपणालाच बोलावलेले आहे असे वाटते हा भ्रम दुसरे पत्रकार अगोदरच आल्याने त्यांचा भ्रमनिरास होतो हेच या भाष्यातून सूचित होते. तर पुढे –

"कालच त्यांनी आजच्या अग्रलेखाची अनाउन्समेंट बघितली होती. बातमी आणि ती अनाउन्समेंट भोगल्यांनी कालच त्यांना सविस्तर सांगितली होती. आपण उच्चारलेला शब्दन शब्द जनता नं छापलेला काल त्यांनी बघितला होता. वार्ताहर परिषदेच्या वेळी झालेली ऑफ दि रेकॉर्ड बोलणी आणि हास्यविनोदही काल नाडकर्णींनी छापलेला त्यांनी बघितला होता व कालच त्यांची नापसंतीची भावना झाली होती. अग्रलेखाची कालची अनाउन्समेंट बघूनच आजच्या अग्रलेखाचा सूर काय असेल याचा त्यांना अंदाज आला होता." (पृ.१६९)

पत्रकारितेतील अनेक खुबी मराठे यांनी येथे टिपल्या आहेत. भोगले आणि नाडकर्णी यांच्यातील पत्रकारितेतील काही गोष्टी सूचकतेने येथेही टिपल्या आहेत.

"फणसाच्या झाडाखाली बसून चहा पितापिता बाळासाहेब फळणीटकर अग्रलेख वाचीत होते. नेहमी नाडकर्णी दोन कॉलम अग्रलेख लिहीत. आज त्यांनी त्याच्या दुप्पट लांबीचा अग्रलेख लिहिला होता. बाळासाहेबांनी भराभरा अग्रलेखावरून नजर फिरवायला सुरूवात केली.

नाडकर्णींनी म्हटलं होतं – अण्णासाहेबांची फेरनियुक्ती हा राज्यात सर्व थरांवर माजलेल्या भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचा, त्याला संरक्षण देण्याचा प्रयत्न आहे. यापुढं हा भ्रष्टाचाराचा भस्मासूर अधिकच माजल्याशिवाय राहाणार नाही." (पृ.२५७)

पत्रकार आणि पर्यायाने वृत्तपत्र हे समाजातील विविध घटकांचे दिशादर्शक, मार्गदर्शक म्हणून काम करीत असतात. अण्णासाहेबांसारख्या व्यक्तीची फेरनियुक्ती हा भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचा, भ्रष्टाचाराला संरक्षण देण्याचाच भाग ठरेल असे भाकित या अग्रलेखातून मांडणे – एवढा परखडपणा कदाचित धोकादायक ठरू शकतो याचे भान असूनही सच्चा पत्रकार हे आव्हान पेलतो हे परखड वास्तव या भाष्यातून अधोरेखित होते. तर सत्ताकरणाच्या जोरावर अनेक सुविधा मिळविण्याचा डाव पुढील भाष्यात येतो.

"अभ्यंकर सेंट्रल ऑफिसवर आले तेव्हा बाळासाहेब फळणीटकर चेअरमन यांच्याच खोलीत त्यांचा मुलगा बसला होता. फळणीटकर ग्रुपच्या इतर कंपन्यांचे काही अधिकारीही होते.

बिझिनेस एक्स्पान्शच्या नव्या स्कीमसंबंधी त्यांची चर्चा चालली होती. अनेक नव्या स्कीम्स सरकारला सादर करायच्या होत्या. नवे कारखाने उभारायचे होते. राज्याच्या अविकसित भागात दोन युनिटस् टाकण्याची योजना मुलानं मांडली होती. अविकसित भागातील युनिटसाठी अधिकाधिक सरकारी साहाय्य कसं मिळविता येईल याच्या योजना दोघांच्या विचाराधीन होत्या.'' (पृ.२६०)

राजकारणी लोक किती सत्तापिपासू असतात यावरील हे मार्मिक भाष्य आहे. चेअरमन बाळासाहेब फळणीकर यांचा मुलगा आपल्या वडिलांच्या राजकीय शक्तीचा वापर करून नवनवे उद्योग स्थापन करून सरकारी सोयी–सवलतींचा कसा अधिकाधिक फायदा उठविता येईल याचाच विचार करताना दिसतो. ही सर्वच भाष्ये परिणामकारक उतरली आहेत.

**४. कुरूक्षेत्र :**

शिक्षणक्षेत्रातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने या कादंबरीत भाष्ये येतात.

''आपल्या संघटनेत त्याने कॉलेजातल्या अनेक मुलांना सामील करून घेतले. त्यांची शक्ती अनेक प्रश्नांवर संघटित केली. कॉलेजच्या रस्त्यावर पोरींची टिंगल करीत बसणारे मवाल्यांचे अड्डे आपल्या संघटनेतील मुलांच्या मदतीने त्याने आटोक्यात आणले, तेव्हा कॉलेजातील मुलींनी त्याला धन्यवाद दिले. होस्टेलच्या परिसरात वावरणाऱ्या वेश्यांचा बंदोबस्त करण्यासाठी त्याने आपल्या संघटनेतील मुलांचा वापर केला तेव्हा होस्टेलच्या रेक्टरनी त्याचं कौतुक केलं. गावात एका धनाढ्य व्यापाऱ्याने हुंड्यापायी आपल्या सुनेला जाळून मारल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं, तेव्हा त्यानं न सांगताच त्याच्या कॉलेजातील मुलांनी एक दिवस हुंडाविरोधी जनजागरण दिन पाळून भाषणे केली, हुंडा न घेण्याच्या शपथा घेतल्या आणि गावातून मिरवणूक काढून लोकांना या भीषण प्रथेबद्दल विचार करायला प्रवृत्त केलं. सरकारी दूध योजनेतील दुधात पाणी मिसळणाऱ्या सेवकांना त्याच्या संघटनेच्या पोरांनी रेडहँन्डेड पकडलं तेव्हा त्याची व त्याच्या संघटनेची, त्यांनी हाती घेतलेल्या प्रश्नांची माहिती ठळकपणे स्थानिक वार्ताहरांनी छापली होती. विद्यार्थी जगातले लहान–सहान प्रश्न त्याने व त्याच्या संघटनेने हाती

घेतले तेव्हा विद्यार्थ्यांना तो मित्र वाटला. आपल्या लहानसहान प्रश्नांची दाद लावून देणारा साहाय्यकर्ता वाटला.'' (पृ.२०)

आजची तरूण पिढी हीच उद्याच्या उज्वल भवितव्याची साक्ष ठरते. साहजिकच छोट्या–मोठ्या घटनांनी त्यांची मने जागती ठेवली तर उद्याच्या उत्तम नागरिक घडण्यातील ती महत्त्वाची पायरी ठरेल याचे भानच या विद्यार्थ्यांच्या संघटना बांधण्यातून आणि घडणाऱ्या घटनांच्या संदर्भात आपली प्रतिक्रिया देणे असो, वाईटाचा निषेध करणे असो वा चांगल्याचा अंगिकार करणे असो यातून दिसून येते.

''डॉक्टर म्हसकरांच्या आत्महत्येनंतर शांतीवन एज्युकेशन सोसायटी झपाट्याने वाढली. चार–पाच वर्षाच्या काळात पंचवीस हायस्कुलं आणि पंधरा कॉलेजं संस्थेनं खोलली. त्यात हजारो विद्यार्थी शिकू लागले. शेकडो शिक्षक–प्राध्यापक शिकवू लागले. विविधप्रकारच्या सरकारी अनुदानाच्या रकमा लाखोंच्या घरात जमू लागल्या. सर्वांवर शेवटचा अधिकार सेक्रेटरी तुकाराम फराटे यांचा.'' (पृ.२२)

सत्तापिपासू आणि स्वार्थाने झपाटलेल्या व्यक्तींना बाह्य जगताचे भान रहात नाही याचेच हे भाष्य निदर्शक ठरते. डॉक्टर म्हसकरांसारख्या प्रामाणिक माणसाचा अडसर दूर करून आपला स्वार्थ साधणाऱ्या तुकाराम फराटे यांचे क्रूर रूप पुढे येते. संस्थेच्या शाखा वाढल्या, शिक्षक–प्राध्यापकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढली डॉक्टर म्हसकरांचा मात्र हकनाक बळी गेला हे भीषण वास्तव या भाष्यातून पुढे येते. इतरांचे शोषण करून शिक्षणक्षेत्रात भ्रष्टाचार करणाऱ्या फराटे यांच्यावरच पुढे भाष्य येते.

''शांतीवन महाविद्यालयाच्या होस्टेलवर निदर्शनं झाली त्या वेळी तुकारामदादा शहरात नव्हते. आता त्यांची विधानपरिषदेवर नियुक्ती झाली होती आणि मुंबईतच ते अधिवेशनाच्या व इतर कामांच्या निमित्ताने तळ ठोकून होते. त्यांच्या संस्थेला आणखी काही कॉलेजं काढायला परवानगी हवी होती; पण विद्यापीठ ती देत नव्हतं, त्याबाबतीत त्यांना वरून काही हालचाल करायची होती. त्यांच्याच संस्थेच्या एका कॉलेजात त्यांच्या नात्यातल्या एका बाईला प्राचार्य म्हणून घ्यायचं होतं. हे कसं साधता येईल या प्रयत्नात ते होते.'' (पृ.२७)

शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र, त्याचा आब राखणे शिक्षणसंचालकांची जबाबदारी ठरते, मात्र सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर आपली मनमानी पूर्ण करण्याचा आटोकाट प्रयत्न कसा केला जातो हे वास्तव या भाष्यातून पुढे येते. एखादी शाखा काढायची ती विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी. त्यांच्या हितासाठी. येथे मात्र आपल्या नातलगांची वर्णी लावणे पैसा मिळविणे हीच धारणा फराटे यांची दिसून येते. घटना–प्रसंग, व्यक्ती यांच्या अनुषंगाने येणारी ही भाष्ये कथानकाला पुढे नेत वर्मावर बोट ठेवणारी आली आहेत.

**५. देवाची घंटा :**

या कादंबरीतही व्यक्ती, परिस्थिती यांच्या अनुषंगाने भाष्ये येतात.

"त्याचं बिऱ्हाड रस्त्याकडेच्या एका चाळवजा घरात होतं. छप्पर नळ्यांचं होतं आणि भिंती लाल मातीनं माखलेल्या होत्या. मालकानं चाळ बांधताना रस्ता समोरच असल्यानं दुकानाचे गाळे काढले होते. पण एका गाळ्यातलं एक विडीकाडीचं दुकान सोडलं, तर उरलेल्या चार गाळ्यात बिऱ्हाडंच होती. रस्त्याच्या बाजूला भिंतीऐवजी फळ्या असल्यानं राहणाऱ्यांना मधलीच एखादी फळी उघडून खोलीचं दार म्हणून त्या फटीचा वापर करावा लागे." (पृ.८)

'चाळवजा घरात', 'छप्पर नळ्यांचं', 'भिंती लाल', 'मातीनं माखलेल्या', 'विडी–काडीचं दुकान', 'भिंतीऐवजी फळ्या' यांसारख्या शब्दांमधून अठराविश्वे दारिद्र्यात खितपत असलेल्या कुटुंबावरील भाष्य अधिक परिणामकारकपणे येते. कुटुंबाची स्थिती आणि घरची परिस्थिती काय असेल हेच यातून स्पष्ट होते.

"गोप्याभट अजूनही दर शनिवारी असे मूठभर सुटे पैसे तिला देत होता. रोज नाही, तरी आठवड्यातून तीन–चार रात्री तिच्याकडे मुक्कामाला राहून जात होता. शनिवार ठरलेलाच. कितीही रात्र झाली, तरी त्यानं यायचं, येताना पिशव्या भरून आणायच्या, पोरांना पेढे, गूळ–खोबरं खाऊ घालायचं, तिनं रांधलेला गोडा स्वयंपाक जेवून मारुतीचा उपास सोडायचा आणि रात्री तिच्याकडेच मुक्काम करायचा. तिच्या हाती बचकभर नाणी द्यायचा आणि पहाटे ऊठून निघून यायचं – हा त्याचा क्रम अद्यापही सुरूच होता." (पृ.२५)

देव ही संकल्पनाच मुळात पावित्र्याचं प्रतीक. त्याचा पुजारी हा असाच पवित्र असणे अभिप्रेत आहे. मात्र येथे गोप्याभट हे पात्र मारूतीचा पुजारी म्हणवून घेतो आणि एका असहाय स्त्रीच्या दारिद्रयाचा गैरफायदा घेऊन तिच्या शरीराचे शोषण कसे करतो हे उघडपणे या भाष्यातून येते. गोप्याभटाच्या अखेरच्या जगण्यावर पुढे भाष्य येते.

"गोप्याभटाचं अंथरूप एका भिंतीच्या कडेशी पडल्यानं शंकऱ्याची पंचाईत होऊ लागली, ती अभ्यासाला बसण्याची. तो नेहमी दाराशी बसे. इतर वेळीही त्याच्या खोलीत त्याला अभ्यासासाठी ऐसपैस जागा मिळत नसेच; पण आता गोप्याभट चोवीस तास एका कोपऱ्यात पडलेला असल्यानं व तो सतत हूं हूं करीत पिरंगत असल्यानं शंकऱ्याला अभ्यास करताना संकोचल्यासारखं होऊ लागलं व कविता पाठ करताना गोप्या भटजीचं हूं हूं त्याच्या स्वरात मिसळून जाऊ लागलं......" (पृ.७०)

स्वत:ची नैतिकता हरवून आयुष्यभर येसूचे शोषण करणारा गोप्याभट जीवनाच्या अंतिम टप्प्यातही तिची पाट सोडत नाही. वार्धक्याने गलितगात्र झालेल्या अवस्थेत झोपडीत एका कोपऱ्यात विव्हळत राहतो त्याचा त्रास मुलांनाही कसा होतो याचे सूचन येथे येते. तर पुढे येसूच्या आणि तिच्या मुलांची परवड येते.

"पहाटे येसूला जाग आली, ती तिच्या पोटात उठलेल्या भुकेनं. तिच्या शेजारीच दोन्ही मुलं झोपली होती. काल सबंध दिवस त्यांच्या पोटात काही गेलं नव्हतं. शंकऱ्या तसाच शाळेत गेला होता. चंद्रीनं शाळेत जायला नकार दिला होता. रात्री आई काही न खाता निजली होती. शंकऱ्या आणि चंद्रीही तशीच झोपली होती." (पृ.८५)

माणसाच्या जीवनात भूक ही मूलभूत गरज. ही गरज पूर्ण झाली नाही तर माणूस किती विव्हल होतो आणि त्याची काय दशा होते हेच येसू, शंकऱ्या आणि चंद्रीच्या भूकेच्या प्रश्नातून पुढे येते असेच अस्वस्थ करणारे भाष्य पुढे येते.

"दोघंही खाली वाकली. जमिनीवर सांडलेल्या शितकणांसाठी कुत्र्यांसारखी एकमेकांना झोंबू लागली. त्या झोंबाझोंबीत शंकऱ्या प्रबळ ठरला. त्यानं चंद्रीला ढकलून दिलं. जमिनीवरच्या

भाताच्या डिखळीवर ताबा मिळविला. चंद्रीही तिथंच सरपटू लागली व ओल्या मातीत बरबटलेले भातकण वेचून वेचून खाऊ लागली व खाता खाता शंकऱ्याला शिव्या देऊ लागली.'' (पृ.१५७)

जमिनीवर सांडलेल्या शितकणांसाठी शंकऱ्या आणि चंद्री यांची चाललेली झोंबाझोंबी शितकणांचे मातीत मिसळणे, शंकऱ्याने ताबा मिळवून ते शितकण खाणे या सर्वांमधून भूकेच्या प्रश्नाला एक अस्वस्थ करणारे रूप प्राप्त होते. आपली बहीणही भूकेलेली आहे तिलाही थोडे मिळावे ही भावनाही येथे गळून पडताना दिसते.

''त्यानं देवासमोर ओंजळ पसरली. बसल्या जागेवरून आपलं डोकं वाकवून वरच्या पायरीवर ठेवलं.

त्याच्या कपाळाला थंड थंड स्पर्श जाणवला. त्यानं तिथं चाचपून पाहिलं. त्याच्या हाती सापडला मंजुळेचा थंड, कोवळा मृतदेह.

''सोन्याच्या चिपाऽ, सोन्याचे गोळे, सोन्याच्या चिपा, सोन्याचे गोळे–'' असं बडबडत त्यानं तो मृतदेह छातीशी कवटाळला. आनंदानं नाचू लागला. डोकीवरच एक मोठी घंटा होती. मंजुळेचा मृतदेह उराशी कवटाळून तो घंटा घणघण बडवू लागला.

तिचा आवाज बराच काळ घुमत राहिला.'' (पृ.१६५)

माणसाचे दारिद्रय आणि मनातल्या इच्छा यांची सांगड बसत नाही. विविधप्रकारची स्वप्ने पाहणाऱ्या मनाला सोन्याच्या चिपा, सोन्याचे गोळे तर मिळत नाहीतच पण अखेरी मंजुळेच्या मृत्यूने दुःखाचा कडेलोट आणि पुढे भ्रमिष्टपण वाट्याला कसे येते याचे विदारक वास्तव या भाष्यातून पुढे येते.

गोप्याभट, येसू, शंकऱ्या, चंद्री यांच्या जीवनानुभवांच्या अनुषंगाने येणारी ही भाष्ये अंतर्मुख करणारी अशी उतरली आहेत. त्या त्या व्यक्ती, घटना–प्रसंगांना साकार करताना मराठे यांची लेखणी धारदार रूप धारण करते याचा पदोपदी प्रत्यय येतो.

### ६. **कलियुग :**

कत्रे या करारी अधिकाऱ्याच्य अनुषंगाने येथे भाष्य येते.

"मुख्य गेटच्या बाहेर कत्रेसाहेबांची गाडी आली की वॉचमन गेट उघडून देताना त्यांना आधी एक सलाम ठोकी. कत्रेसाहेबांची गाडी गेटच्या आत शिरून मुख्य ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंगपासून जाईपर्यंत वॉचमनच्या टपरीतून टेलिफोन ऑपरेटरबाईकडे आणि तिथून सगळ्या डिपार्टमेंटमध्ये क्षणार्धात मेसेज जाई– कत्रेसाहेब आले– आणि त्या संदेशासरशीच सर्वांच्या मनातून भीतीची एक सूक्ष्म लहर निनादत जाई. परिणामत: हरेक माणूस आपल्या कामाकडे अधिक दक्षतेने लक्ष देई." (पृ.१)

एखाद्या कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकाऱ्याचा संबंधित कार्यालयावर किती जरब, वचक असू शकतो याचे हे भाष्य द्योतक आहे. वॉचमनचा सलाम, टेलिफोन ऑपरेटरची धडपड आणि –कत्रेसाहेब आले– या दोनच शब्दांच्या कुणाच्यातरी आवाजाने सर्वांचीच उठणारी तारांबळ कत्रेसाहेबांचा करारीपणा दर्शविण्यास पुरा ठरतो. अगदी थोड्या शब्दात त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव देण्याची मराठे यांची शैली येथे प्रत्ययाला येते. कत्रे यांच्याविषयीच पुढेही भाष्य येते.

"मीच बघतो त्याच्याकडे या उद्‌गारांतून कत्रे काय सूचित करताहेत हे चौघुले यांना नीटसं समजलं नाही. त्यांची इच्छा जगतापला लगेच मेमो द्यावा अशी होती. पण तो कामगार पुढारी असल्याने कत्रे यांच्याशी विचारविनिमय करणं त्यांना आवश्यक वाटलं होतं. त्यांच्या सल्ल्याने काय करायचं ते केलं म्हणजे आपली जोखीम कमी झाली अशी त्यांची भूमिका होती." (पृ.१०)

कत्रे साहेबांचा करारीपणा याही भाष्यातून पुढे येतो. जगताप या कामगार पुढाऱ्यावर कारवाई करणे इतके सोपे नाही हे लक्षात आल्यानंतर चौघुले टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करतात पण कत्रेसाहेबांच्या 'मीच बघतो त्याच्याकडे' या वाक्यातून बरेच काही सूचित होते. एखाद्या पात्राचे, घटना–प्रसंगाचे सविस्तर तपशील कधी मराठे देतात तर येथे सूचकतेने त्या पात्राचे वेगळेपण नमूद करतात.

"कत्रे मोठ्यानं हसले. खूप मोठ्याने. त्यांच्या हसण्याचा आवाज विचित्रपणे प्रतिध्वनित होतोय असं पाटीलला वाटू लागलं. त्याच्या पोटात एव्हाना अर्धी बाटली देशी दारू गेली होती.

त्याचं डोकं आतआत गरगरल्यागत होत होतं. चक्करल्यागत वाटत होतं. जगताप त्याच्या माथ्यात घुमू लागला होता.'' (पृ.१०९,११०)

कमीतकमी तपशीलातून अधिकाधिक सूचन हा मराठे यांच्या लेखनाचा वेगळेपणा येथेही जाणवतो. कत्रे यांचे मोठ्याने हसणे पाटीलच्या पोटात अर्धी बाटली देशी दारू गेल्यानंतर जगताप त्याच्या माथ्यात घुमू लागणे यातून जगतापच्या संदर्भात पुढे घडणाऱ्या वाईट गोष्टींचे सूचन या भाष्यातून येते.

**७. सॉफ्टवेअर :**

या कादंबरीत येणारी भाष्ये ही सूचकतेने न येता तपशीलाने येतात.

''देशमुख त्यांना आवडले होते. तीनही सेशन्समध्ये त्यांनी चर्चेत महत्त्वाचा भाग घेतला होता. महत्त्वाचे मुद्दे मांडले होते. त्यांचा पेपरही चांगला होता. काही मूलभूत मुद्दे त्यांनी उद्योग–व्यावसायिकांच्या समोर ठेवले होते. एस. बी. सरकारी धोरणांच्या विरोधी भूमिका घेऊन बोलले, तेव्हा दोघांचा किंचित खटकाही उडाला.'' (पृ.४)

एका विचारी विधायक वृत्तीच्या देशमुख या पात्राचा चांगुलपणा स्पष्ट करणारे असे हे भाष्य आहे.

''डेव्हलपमेंट ग्रुप ही मूळ कल्पना देशमुखांचीच. ते आणि त्यांच्या गावचे पाच लोक मिळून त्यांचा डेव्हलपमेंट ग्रुप तयार झाला होता. देशमुख मूळचे कोकणातल्या एका खेड्यातले. त्याचे वडील तिथं शाळामास्तर म्हणून होते. त्यांची हयात तिथंच गेली. देशमुखांचा जन्म आणि बालपण तिथलंच. मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण तालुक्याच्या गावाला झाल्यानंतर त्यांच्या वडिलांनी त्यांना पुण्याला पाठवलं. बरोबर त्याच गावचे इतर चारजणही आले. ते पाचही जण पुण्यातच शिकले. पुण्यातच त्यांना कामधंदा मिळाला. पुण्यातच त्यांचे संसार वाढले. ते पुणेकरच होऊन गेले. निमित्तानिमित्ताने ते भेटत राहिले. गावाकडच्या बालपणीच्या काळातल्या आठवणी उगाळत राहिले.'' (पृ.३२)

कोकणातील शाळामास्तरचा एक संसारी मुलगा स्वत:सह इतर पाच जणांना सोबत घेऊन डेव्हलपमेंट ग्रुप तयार करतो. यातून एक चांगला माणूस म्हणून देशमुख यांची प्रतिमा लक्षात राहण्यास या भाष्याने मदत होते.

''देशमुखांच्या डोळ्यांवर झोप जमा होत होती. झोपेच्या आधीन होतानाही त्यांचं हृदय आपणाला लाभत असलेल्या प्रतिष्ठेच्या, कामाच्या समाधानाच्या आनंदानं नुसतं फुलून येत होतं. झोपेच्या वाटेत विलीन होतानाही ते म्हणत होते– किती जबाबदारी वाढलीय माझी. किती काम वाढलंय. संपूर्ण कॉम्प्युटर डिव्हिजनचा शिल्पकार. इमारत बांधण्यापासून तो इंजिनिअर्सची आणि कामगारांची भरती करण्यापर्यंत, त्यांच्या ट्रेनिंगपासून तो सेल्सचं नेटवर्क तयार करण्यापर्यंत मार्केट काबीज करायचंय, एसबींनी–'' (पृ.१८८)

आपण केलेल्या कार्याने स्वत:ला समाधानी मानणे हा मानवी स्वभावधर्म आहे. देशमुख यांना कॉम्प्युटर डिव्हिजनचा शिल्पकार असणे, इमारत बांधणी, इंजिनिअर्स आणि कामगार भरती करणे, त्यांना ट्रेनिंग देऊन सेल्सचे नेटवर्क तयार करणे यासारख्या जबाबदारीच्या सर्व बाबी पार पाडत असताना वाटणारे मनस्वी समाधान या भाष्यातून येते.

या कादंबरीतील भाष्ये पात्रांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकताना सविस्तर तपशील देऊन त्या पात्राचा–स्वभाव, गुणधर्म अधोरेखित होतो.

**८. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

पती–पत्नीचे नाजूक नाते उत्पादनक्षेत्रातील चढाओढीत कसे तुटत जाते यावर येथे भाष्ये येतात.

''ती बोरिवली स्टेशनवर उतरली आणि ब्रिज ओलांडून चालू लागली. रस्ते ओलांडीत आपल्या कंपनीपर्यंत पोचली. तिला आठवण झाली. काही वस्तू नेल्या पाहिजेत घरी. म्हणून ती आपल्या नेहमीच्या स्टोअर्समध्ये शिरली. तिच्या हव्या त्या वस्तू तिनं खरेदी केल्या. दुकानात इतरही काही महिला खरेदीसाठी आल्या होत्या. प्रत्येकजण आपणाला हव्या त्या वस्तूची मागणी करीत होती. नेहमीच त्या दुकानात ती जात असे आणि आपणाला हवी ती खरेदी करीत असे. इतरही अनेकजणी तिथं येत आणि त्यांना हव्या त्या वस्तू खरेदी करत. कधी तिला जाणवतही

नसे की इतर बायका काय काय खरेदी करताहेत. आजही तिला जाणवलं नसतं पण एका महिलेने मागितलेल्या वस्तूने तिचे लक्ष वेधून घेतलं. ती मागत होती क्लीनिंग सोप. सनशाइन क्लीनिंग सोप." (पृ.१५)

बोरिवली स्टेशन उतरून घराकडे जात असताना केतकी साने यांना दुकानातून वस्तू नेण्याच्या सवईत एक दिवस एका महिलेकडून 'क्लीनिंग सोप' मागितला जातो, तेव्हा 'सनशाइन क्लीनिंग सोप' सर्वांनी विकत घेतला पाहिजे यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या योजन्याची आणि मार्केट काबीज करण्याची ईर्षा निर्माण होते. ही ईर्षा, ही स्पर्धा दुसऱ्या कुणाबरोबर नाही तर आपल्या पतीच्या क्लीनिंग सोपबरोबर आहे हे सूचन या भाष्यातून येते.

"अविनाश साने आपल्या ऑफिसात पोचला तरी तो कालच्या मन:स्थितीतून बाहेर आला नव्हता. काल संध्याकाळी तो आपल्या पत्नीबरोबर बागेत गेला असताना झालेला त्या दोघांचा संवाद दोघांच्याही मनात एकमेकांबद्दलचा दुजाभाव निर्माण करून गेलाच. हॉटेलात त्यांनी जेवण घेतलं पण विशेष काही न बोलता. रात्री झोपतानाही त्यांनी एकमेकांचा स्पर्श टाळला होता. गेल्या आठवड्यात ती दोघं किती ओढीने आणि उत्कटतेने एकमेकांना भेटत होती. तो किती मनापासून खूष झाला होता. त्याने तिला तिची नवी जबाबदारी पेलण्यासाठी केवढा दिलासा देऊ केला होता." (पृ.४९)

कोणत्याही स्वरूपाची स्पर्धा ही स्पर्धा असते. त्यात हार आणि जीत या दोनच गोष्टी लक्षात घेतल्या जातात. त्यात प्रत्येकाला आपली जीत महत्त्वाची असते. तेथे सर्व नाती गौण ठरतात. पती–पत्नीमधील ही सत्तास्पर्धा या भाष्यातून मुखर झाली आहे.

"तिच्या मनातला संताप तिच्या शब्दांत ठासून भरला होता. तिला खूप मोठ्यानं ओरडून बोलायचं होतं, पण रात्र झाली होती. मोठ्यानं ओरडणं ठीक नव्हतं. पण संतापाचे कढ शब्दात ठासून भरल्यामुळं ते अधिक ठसठसून बाहेर पडत होते." (पृ.१२१)

'जग काय म्हणेल' हे तीन शब्द माणसाची पाठराखण करीत असतात. त्या तीन शब्दांना साक्षी ठेवून माणूस तडजोडीने जगत असतो. साने यांनीही अशीच तडजोड स्वीकारली आहे. मनातला प्रक्षोभ मनात दाबून वावरताना मनाची जी घुसमट होते ती येथे अभिव्यक्त झाली आहे.

कधी पात्रांच्या बोलण्यातून, वागण्यातून तर कधी अंत:स्फोटाच्या सूचक उल्लेखाने माणसाची विविध रूपे या भाष्यांमधून साकार झालेली आहेत.

**९. प्रास्ताविक :**

या कादंबरीत सकारात्मक विचारसरणीला अनुसरून वैशिष्ट्यपूर्ण भाष्ये येतात.

"श्रीकृष्णाच्या भक्तीपायी अलीकडे अलीकडे त्यांच्या मनात अध्यात्माचे आणि विरक्तीचे विचारही घोळू लागले होते. अध्यात्माचा त्यांनी विचार केला नव्हता. पण गीतेत सांगितलेला कर्मयोग त्यांना पसंत होता. गीताभाष्ये त्यांनी अभ्यासली नव्हती, पण त्यांच्याच बंगल्यावर मुक्कामाला राहून प्रवचने देणाऱ्या स्वामींच्या तोंडून त्यांनी गीतेचा अर्थ श्रवण केला होता. तेव्हापासून त्यांच्या मनात गीतेचं तत्त्वज्ञान आणि विरक्ती यांचे विचार येऊ लागले होते. त्यामुळे अलीकडे ते म्हणतही अनेकदा, "आणखी दोनतीन कारखाने नीट सुरू करून ते मार्गी लावून दिले की आपण निवृत्त होणार." (पृ.४९)

मानवी जीवनात काम, क्रोध, मद, मोह, माया, मत्सर हे षड्विकार कोणालाही सुटले नाहीत. याचे प्रत्यंतर ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील विविध पात्रांच्या उक्ती–कृतीतून सातत्याने येते. यांच्या मनात अध्यात्म आणि विरक्ती यांचे विचार हळूहळू रूजू पाहतात. प्रत्यक्ष गीताभाष्यांचे अध्ययन–पठन केलेले नसले तरी बंगल्यावर प्रवचने देणाऱ्या स्वामीजींकडून गीतेचे जे तत्त्वज्ञान समजले त्यात गीतेतील कर्मयोग त्यांना अधिक भावतो. विरक्तीचा विचार आला तरी आणखी तीन–चार कारखाने उभे करून निवृत्त होण्याचा विचार खरोखरच्या विरक्तीला जवळ जाणारा निश्चितच नाही. मानवी जीवनात मोह माणसाला सुटत नाही हाच सूचक भाव मराठे या भाष्यातून मांडताना दिसतात.

"त्या धगीनेच याला अल्पावधीतच साहित्यातला सुपरस्टार बनवला.

राजकारणातल्या ढोंगबाजीविषयी हा लिहितो तेव्हा वाचकांच्या मनातली राजकारणातल्या ढोगबाजीविषयीची सुप्त चीड उफाळून ऊठते.

कामगारवर्गाच्या पिळवणुकीविषयी हा लिहितो तेव्हा कष्टमय जीवनाला अनुभव घेणारा वाचक मालकवर्गाविषयी संतापून ऊठतो.

युवकांच्या मनातील धुमसत्या असंतोषाविषयी हा लिहितो तेव्हा असंख्य धुमसत्या युवकांना वाटतं; अरे, हे शब्दातून मांडलं गेलेलं धुमसणं आपल्याच अतं:करणातलं आहे.

स्त्रियांच्या दु:खाविषयी हा लिहितो तेव्हा लहानमोठी दु:खं सोसत जाणाऱ्या स्त्रियांना वाटतं, हा आपल्याच दु:खांना वाचा फोडतोय.

सामाजिक अन्यायाविषयी आणि शोषणाविषयी हा लिहितो तेव्हा वाचकांना वाटतं, या शोषणाचे बळी खुद्द आपणही आहोत." (पृ.८९)

राजकारण, कामगारांचे प्रश्न, शोषण, युवकांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक प्रश्न अशा अनेक प्रश्नांवरील लेखन वाचकांना आवाहक ठरते. एकतेतील अनेकता आणि अनेकतेतील एकता हे साहित्याचे सूत्र येथे गवसते. मानवी जीवनातील एखाद्या घटकाविषयीचे लेखन त्या घटकाशी संबंधित असले तरी ते अनेकांचे होते. याची प्रचिती या भाष्यातून येते.

"अत्यंत बैठ्या अशा मोठ्या आकाराच्या दिवाणावर अनिल अस्ताव्यस्त पसरला होता. शेजारी सिगारेटीच्या थोटकांचा मोठा ढीग आणि जळक्या काड्यांचा पसारा. कागदाचे बोळे सगळीकडे पसरलेले. तो स्वत: अत्यंत अस्ताव्यस्त, विस्कटलेला." (पृ.१०२)

मानवी जीवनाचे अपूर्णत्व प्रत्येक माणसाला जाणवते. अत्यंत मोजक्या शब्दात माणसाची उद्ध्वस्तता, एकलकोंडेपणा, जीवनाचा उबग, अस्वस्थता या भाष्यातून व्यक्त झाली आहे. 'सिगारेटच्या थोटकांचा मोठा ढीग', 'जळक्या काड्यांचा पसारा', 'कागदाचे बोळे', 'स्वत: अत्यंत अस्ताव्यस्त', 'विस्कटलेला' हे अनिलच्या संदर्भात येणारे मोजके संदर्भ अनिलच्या उद्ध्वस्त जीवनाचे भग्नावशेष वाटावेत असेच आहेत. सविस्तर तपशील न मांडता आलेले हे मोजके संदर्भ त्याच्या जगण्याचे विविध संदर्भ सूचवून जातात.

ही सर्व भाष्ये कथानकाला पुढे नेत पात्रांच्या जगण्याचे विविध संदर्भ मांडून जातात.

कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली ही भाष्ये महत्त्वपूर्ण ठरतात. कारण या भाष्यांमुळे कथा–कादंबऱ्यांमधून अभिव्यक्त झालेला अनुभव अधिक प्रगल्भ आणि मूल्यमापनात्मक होतो. या भाष्याद्वारा निवेदक पात्रांच्या मन:स्थितीचा, त्याच्या क्रिया, प्रतिक्रियांचा, उक्ती–कृतीचा किंवा एखाद्या घटना–प्रसंगाचा अर्थ उलगडून सांगताना आढळतो. त्यामागे निश्चित अशा नैतिक

मूल्यांचे अधिष्ठान असते. याबरोबरच माणसाविषयीचा किंवा एकूण जीवनाविषयीचा तत्त्वविचारही मांडत असतो. कधी तो प्रत्यक्षपणे येतो तर कधी अप्रत्यक्षपणे. त्यामुळे पात्रांच्या, निवेदकाच्या मूल्यमापनदृष्टीमधील सुसंवाद – विसंवाद यांच्या आकलनासाठी त्याची मदत होते.

या भाष्यांद्वारा कधी पात्राच्या लकबी, हालचाली, उक्ती–कृती टिपलेल्या आढळतात. अगदी अल्प असे भाष्य करून त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळेपणा आणि ठसा उमटविण्याचे कार्यही ही भाष्ये करतात. कधी त्या पात्राच्या नैतिक पातळीचाही शोध घेतलेला आढळतो. एकूणच या भाष्यांचा विचार करता ही भाष्ये कथा–कादंबऱ्यांमधील पात्रांना, घटना–प्रसंगांना उठाव आणतात, जिवंत करतात, त्यांचे स्थान कधी उघडपणे तर कधी सूचकतेने स्पष्ट करतात. या भाष्यांद्वारा लेखकाची साहित्यकृतीतील जीवनविश्वाकडे पाहण्याची मूल्यदृष्टी प्रत्ययाला येण्यास मदत होते. वरील सर्व गोष्टींचा विचार करता ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली भाष्ये परिणामकारक उतरली आहेत असे म्हणता येईल.

## ५. वर्णन :

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली वर्णने ही विविध प्रकारची आहेत. त्यातही प्रामुख्याने व्यक्तिवर्णने, निसर्गवर्णने, स्थलवर्णने आधिक्याने आढळतात. पात्र हे घर आणि समाजाशी जोडलेले असते आणि समाज हा एखाद्या विशिष्ट स्थळाशी जोडलेला असतो. यातूनच कथा–कादंबऱ्यांमधील वातावरण निर्माण होत असते. डॉ. र. बा. मंचरकर वर्णन या संकल्पनेविषयी म्हणतात, “चित्रशैली, अलंकरण व कल्पनाविलास यांमुळे वर्णन प्रतीतिक्षम होतात. वर्ण्यविषयाच्या अंगोपांगांचे ज्ञान, तल्लख संवेदनशीलता आणि नितळ शब्दकळा त्यासाठी हवी असते.”[१३] या डॉ. मंचरकरांच्या वर्णनाविषयीच्या भूमिकेतून वर्णनाविषयीच्या क्षमता आणि आवश्यक असणारे गुण स्पष्ट होण्यास मदत होते. ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील वर्णने त्या भूमिकेतून तपासणे येथे अभिप्रेत आहे.

## कथासंग्रह :

### १. सापेक्ष :

**बॉम्बे रिप्रेझेंटिव्ह :**

ह. मो. मराठे 'सापेक्ष' कथासंग्रहातील या कथेतील मोहन साळवी या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व वाचकांसमोर हुबेहूब उभे करण्यासाठी जी विशेषणे वापरतात, वाक्यरचना करतात त्यातून मोहन साळवींची एक प्रतिमा डोळ्यांसमोर तरळते.

'मोहन साळवींचं व्यक्तिमत्त्व उमदं होतं. तो इंग्रजी सफाईदार बोलायचा. बोलतानाचे त्याचे हावभाव अमेरिकन पद्धतीचे होते. त्यामुळे बोलण्याच्या मुद्द्याला भावनात्मक उत्कटतेची जोड देत तो बोलतो आहे असं वाटे. निळसर रंगाच्या पँटमध्ये खोवून तो पांढरा फुलशर्ट घाली आणि त्यावर एखादा गडद पण प्रसन्न कलरशेडचा टाय बांधी. त्यानं गुळगुळीत दाढी केलेली असे. केस किंचित अवखळपणे भाळावर रूळत ठेवूनही व्यवस्थित भांग पाडण्याची त्याची पद्धत होती. नीटनेटका पोषाख, सफाईदार इंग्रजी बोलणं आणि तसच सफाईदार मॅनर्स.' (पृ.५०,५१) ह. मो. मराठे यांनी साळवींचं व्यक्तिवर्णन करण्याबरोबरच त्यांचे गुणविशेषही वर्णन केलेले दिसतात.

**जी सरकार :**

या कथेतील मोहन ज्या परिस्थितीत आणि ज्या ठिकाणी राहतो त्याचे वर्णन करताना ह. मो. मराठे लिहितात,

'रात्री तो घरी आला. जुन्या पडायला झालेल्या चाळीतली एक लहानशी अंधारी, हवाबंद खोली. पहिल्या मजल्यावरची. वर येताना वापरायचा लाकडी जिना. पावसा–पाण्यानं भिजून भिजून कुजत आलेला. खोलीला खिडकी नाही. एक लहानसा झरोका. तिथच मोरी. खोलीत फक्त पंधरा पॉईंटचाच बल्ब लावण्याची मालकांची परवानगी. त्याच्या आयुष्याच्या चोवीस वर्षांत आपल्या खोलीत त्यानं कधीच त्यापेक्षा अधिक प्रखर प्रकाश पाहिला नाही. त्यातच 'खोली सोडा' हा मालकांचा तगादा. मालकाचा तगादा वाढला की त्याची आई भिंतीवर टांगलेल्या आपल्या दिवंगत पतीच्या फोटोकडे बघत बसते. मालकांच्या पाया पडते. गुपचूप भाडं वाढवून

देते.' (पृ.८३) मोहनच्या घरातील आणि आजूबाजूच्या परिसराच्या वर्णनातून त्याची हालाखीची आर्थिक परिस्थिती, मोहनच्या आईची चिंता याची कल्पना येते.

**देशात सालं काही घडतच नाही :**

निवडणुकीचे दिवस असताना समाजात ज्या घडामोडी घडतात त्याचे प्रातिनिधिक स्वरूपात कमितापच्या ऑफिसचे वर्णन करताना मराठे लिहितात,

'कमितापचं इलेक्शन प्रचाराचं ऑफिस लांबूनच ओळखू येण्यासारखं होतं. एखाद्या थिएटरवर त्याचा नवा सिनेमा रिलिज होताना जसे मोठमोठे बोर्डस् लावलेले असतात, तसे मोठमोठे चित्रफलक लावलेले होते. त्याच्या वेगवेगळ्या चित्रपटांतील भूमिकांत त्याला चितारण्यात आला होता. एका चित्रात तो फाइट करताना दिसत होता. दुसऱ्या चित्रात मोठ्यांदा आरोळी मारताना, तिसऱ्यात आगीत सापडलेल्या लहान बाळाला जळत्या व कोसळत्या घरातून बाहेर आणताना, चौथ्यात एका आंधळ्या भिकाऱ्याला मदत करताना, पाचव्यात रिक्षा चालवताना, सहाव्यात खाणीत कोळसा खणताना, सातव्यात गळ्यात लाल रूमाल बांधून आणि हाती पिस्तौल घेऊन सूड भावनेने धगधगत कोणावर तरी धावून जाताना.

भोवती प्रचंड गर्दी होती. लहान पोरं, बेकार आणि रिकामटेकडे युवक, पोरी असं पब्लिक त्या त्या ऑफिसभोवती प्रचंड गर्दी करून उभं होतं आणि कमितापच्या वेगवेगळ्या पोझिशनवर, त्या विशिष्ट ॲक्शन्स ज्या सिनेमातल्या आहेत त्यांवर चर्चा करीत होतं. मघाशी रिक्षावाल्यानं माहिती दिलीच होती – शहरातल्या सगळ्या थिएटर्समधून फक्त कमितापचीच पिक्चर्स सुरू आहेत.' (पृ.१३१)

वरील वर्णनातून ह. मो. मराठे यांनी निवडणुकीच्या प्रचाराचे चित्र उमेदवार निवडूण येण्यासाठी वापरत असलेल्या नवनवीन योजना यांचे वर्णन तंतोतंत केलेले आढळते.

या कथेतील वर्णन या अनुषंगाने विचार मांडताना उमेश तेंडुलकर म्हणतात,

" 'देशात सालं काही घडतच नाही!' मध्ये इलेक्शनचे वातावरण उपरोधिक शैलीत चितारले आहे. लोकांचे आवडते सुपरस्टार निवडणुकीला उभे राहताहेत. त्यांच्या पडद्यावरच्या रूपाशी अत्यंत विसंगत जीवन जगणारे त्यांचे लाखो चाहते त्यांना मत देताहेत. लोकशाहीच्या

नावाखाली व्यक्तिगत सत्तास्पर्धा भराला आली आहे. एक दोन रूपये देण्याघेण्यावरून माणसांचे मुडदे पडताहेत. देशात इतकं सगळं घडत असताना तुम्ही म्हणता ....... देशात सालं काही घडतच नाही! या कथेतील कमिताप, गुणबहू ही नावे पाहून ही वर्णने कुठल्या व्यक्तींची आहेत हे सांगणे न लगे."[१४]

ह. मो. मराठे यांनी कथांमधील पात्रांचे वर्णन करताना त्यांना शोभणारीच नावे दिली आहेत असे मत समर्पक वाटते.

एकूणच 'सापेक्ष' कथासंग्रहातील वर्णन या मुद्द्यावर आपली भूमिका मांडताना उमेश तेंडुलकर पुढे लिहितात,

" 'सापेक्ष' मधल्या सर्वच कथा वृत्तपत्रीय अनुभवांशी या ना त्या रूपांनी निगडित आहेत. हा झगडा, संघर्ष, बळी पडणे, कोंडलेले जीवन हे सारे ठराविक मर्यादित जीवनाशी संबंधित आहे. श्री. ह. मो. मराठे त्याच विश्वात वावरत असल्यामुळे वर्णनाला वास्तवता आली आहे."[१५]

उमेश तेंडुलकरांना या कथासंग्रहातील वर्णनाच्या वास्तवतेवर मांडलेले मत उचित वाटते.

**२. वीज :**

**पुर्णचंद्र :**

या कथेतील रामभाऊ या पात्राचे वर्णन ह. मो. मराठे अतिशय बारकाईने करून ते पात्र वाचकांसमोर हुबेहूब उभे करताना म्हणतात,

"तो समोरच्या खुर्चीत बसला होता. खुर्ची वेताची, लांबट व काळ्या पडत आलेल्या रंगाची, जुनाट शेपची होती. आणि रंगरावाने कधीतरी ती तिथं आणून टाकलेली होती. ....... त्याच खुर्चीत तोही बसला होता. मांडीवर मांडी चढवून. त्याची पँट चुरगळलेली होती. फोल्डपाशी सायकलीच्या चेनच्या चाकाचे दात लागून फाटली होती व तिथून तिची सुतं बाहेर आली होती. शर्टही चुरगाळलेलाच होता. शर्टपँटीचं कापड अगदी साधं, बिनचकाकीचं होतं. त्याचा रंगही उडून गेला होता. त्यानं शर्टाच्या बाह्या कोपरापर्यंत दुमडून घेतल्या होत्या. शर्टाची कॉलर फाटून गेली होती आणि ते लांबूनही ते स्पष्टपणे दिसून येत होतं. त्याचे केस बहुतांश पांढरे झाले होते आणि ते त्याच्या डोईवर अजागळपणे वाढून राहिले होते. ते त्याने पंधरा दिवसांपूर्वीच कापून घ्यायला हवे

होते. पण न्हाव्याला दोन रूपये देणं त्याला पगाराला एक आठवडा असताना परवडलंच नसतं, याची त्यालाही पुरेपूर जाणीव होती. ही जाणीव दु:खद होती आणि त्याची त्यालाच करूणा वाटावी इतकी कठोर होती. त्याच्या चष्म्याच्या काचांवर चरे पडले होते आणि त्याने चष्म्याची फ्रेम जणू काही मुद्दामच पिवळसर जुनाट घेतली होती. त्या फ्रेममुळे आणि त्याच्या पांढऱ्या केसांमुळे तो बराच प्रौढ वाटत होता आणि त्याला जोड मिळाली होती त्याच्या चेहऱ्यावरील भावांची– असमाधान, ताणलेपणा, भयाकुलता, दाब आणि अतृप्तता अशा भावांचं एकत्रपण तिथं गच्चपणं साठून राहिलं होतं.''(पृ.१०६) रामभाऊंचे बारकाईने केलेले वर्णन त्यांचे वय, असमाधान वाचकांसमोर जिवंत पात्र उभे करते.

**खुर्ची** :

या कथेतील नायकाचे वर्णन आणि तो रहात असलेल्या जागेच्या वर्णनावरून नायकाच्या परिस्थितीची जाणीव होते.

''तो आहे पंचेचाळीशीचा. फार तर एक दोन वर्षांनी अधिक; पण दिसतो साठीचा.
केस पूर्ण पिकून गेलेले. शरीर खंगलेलं–वाळलेलं.

शरीर वाकलं आहे ते खुर्चीत बसून–बसून. गेले किती तरी दिवस तो नुस्ता खुर्चीत बसून आहे. दिवसाचे निदान सोळा तास. कधी कधी अधिक तासही. महिन्याचे तीस दिवस आणि वर्षांचे बारा महिने. अशी दोन की तीन वर्षे तो नुस्ता खुर्चीत बसून आहे. बसून बसून शरीर वाकून गेलं आहे.

चेहरा ओढलेला. डोळे खोल, खंगून गेलेले. डोळ्यात, चेहऱ्यावर एक भय. पराभूत झाल्याचा जीवघेणा भाव सदैव माखून ठेवलेला.

आताही तो तसाच खुर्चीत बसला आहे. खुर्ची साधी आरामखुर्ची. रंग उडालेली, कापड फाटू फाटू आलेली. दोन खोल्यांपैकी बाहेरच्या खोलीत ठराविक कोपऱ्यात त्याची खुर्ची ठेवलेली असते. तशीच आताही ठेवलेली आहे.

खुर्चीत तो बसलेला आहे. अंगात एक जुना पायजमा–शर्ट. हातात एक वर्तमानपत्र बहुतेक आजचं असेल कदाचित कालचंही. त्याला शिळं वर्तमानपत्रसुद्धा चालतं. ताजच लागतं असं नाही.

शेजारी जे मिळेल ते मुलीला पाठवून तो मागवून घेतो. शेजारीही रोजरोज वर्तमानपत्र देऊन देऊन कंटाळलेले. त्यामुळं हातात येईल ते वर्तमानपत्र दिलं जातं. ते याच्याकडे येतं. हा ते वाचीत बसून राहातो तारीखही न बघता.

जणू त्याच्या दृष्टिने कोणत्या तारखेला काही अर्थच उरलेला नाही.'' (पृ.१४६)

या नायकाच्या शरीर, मन आणि घराच्या वर्णनातून लेखकाची सुक्ष्म वर्णनक्षमता लक्षात येते.

**३. ज्वालामुख :**

**ज्वालामुख :**

या कथेतील नायकाच्या घराच्या बाजूच्या परिसराचे वर्णन करताना लेखक लिहितात की,

''समोरच्या छोट्याशा टेकडावर अजून काही गुलजार झाडं उभी आहेत. त्या झाडांच्या दर्शनानं त्याची प्रसन्नता वाढते. त्या टेकाडाच्या पायथ्याला बिलगून हायवेला मिळणारा वळणदार रस्ता आहे. वळणदाराच नव्हे नुसता डौलदार. होय, डौलदार. ही टकडी पार करण्यासाठी या रस्त्यानं जे संथ वळण मारलं आहे ते एखाद्या पुष्ट युवतीच्या बाकदार शरीरासारखं डौलदार आहे. ते वळण बघत बघत गरम चहाचा एखादा लयदार घुटका घेताना फार बसं वाटतं त्याला. त्या वळणावर एखादी स्कूटरस्वार चालली असेल तर ते सर्व वळण अधिकच सुंदर होऊन जातं.'' (पृ.१,२) तरूण युवतीच्या शरीराशी केलेली टेकडीची तुलना त्या जागेचे सौंदर्य अधिक खुलवताना दिसते.

**कीटक :**

शंकरराव कामासाठी बाहेर पडतानाच्या त्यांच्या वर्णनावरून त्यांच्या राहणीमानाचा अंदाज येतो,

''घट्ट आवळून बांधलेली चुरगळलेली पँट. सायकलच्या चेनमध्ये अडकून पँट फाटते म्हणून अधिकच दुमडलेले फोल्ड. खांद्याला अडकवलेली एक जुनी शबनम. तीत डायऱ्या, पत्ते, जन्मकुंडल्या, पत्रिका, पेन्सिलचे तुकडे. डोकीवर एक हॅट. प्लॅस्टिकची. पावसाळ्यात

रेनकोटबरोबर वापरायची. उन्हाळ्यात तीच उन्हापासून बचाव करण्यासाठी.'' (पृ.८५) या वर्णनातून शंकररावांच्या परिस्थितीचा अंदाज येतो.

**४. पक्षिणी :**

**विरूप** :

या कथेतील नायकाच्या घराचे वर्णन करताना ह. मो. मराठे म्हणतात,

''खोलीत प्रवेश करताना त्याला नेहमीच वाकावं लागे. आत शिरताच तिथला काळोख, कुबट वास आणि घोंघावणाऱ्या माश्या यांचा एक जथा त्याच्यावर चाल करून आला. त्याची आई तांबारलेल्या पत्र्याच्या खाटेवर जुनी पांघरूणं पांघरून पडली होती. धाकटा भाऊ कळकट बॅगेवर वही ठेवून लिहीत होता. आणि वयात येऊ लागलेली बहीण वातीच्या स्टोव्हवर ठेवलेल्या पातेल्यातला पदार्थ ढवळीत होती. हे दृश्य तो गेले कित्येक दिवस बघत होता. आई आजारी असणारी, बहीण वयात येणारी, भाऊ अभ्यास करीत बसलेला. तो स्वत:ही तसाच त्याच जागी बसून अभ्यास करीत असे. वक्रीभूत होत होत येणारा का असेना पण थेट सूर्याचा प्रकाश येत असलेली तीच तीन-चार चौरसफुटांची जागा त्या खोलीत होती.'' (पृ.६७) या वर्णनातून मराठे अस्वच्छता, दारिद्रय, आजारपण, जागेची कमतरता इ. गोष्टी एकाच वेळी मोठ्या कुशलतेने समोर ठेवतात.

**सावित्री १-सावित्री २** :

या कथेतील फ्लॅटचे वर्णन करताना आधुनिक सोयीसुविधांनी सज्ज असलेल्या घराचे वर्णन दिसून येते.

''फ्लॅट खूप मोठा आणि प्रशस्त आहे. आधुनिक बांधकाम असलेला आहे. सर्व प्रकारच्या आधुनिक सुखसोयी आहेत. उंची कापडाचे पडदे झुळझुळताहेत. उंची, मऊ, आरामशीर फर्निचर आहे. नव्या धर्तीच्या पेंटिंग्जनी भिंतींची भगभगीत पोकळी भरून काढली आहे. एक पेंटिंग आहे घनगर्द आमराईचे. एक आहे सरळसोट वाढणाऱ्या एकाकी सुरूचे. आणि एक आहे पोएट्री नावाचे- एका विस्कळीत विस्कटलेल्या पक्षिणीचा सिंबॉल आहे त्यात.

सगळ्या फ्लॅटभर दिव्यांचा प्रकाश पसरला आहे. म्हटला तर सौम्य म्हटला तर उमदा आणि रोगट. क्लान्त. अमावस्येच्या रात्री बिनदिव्याचे शहर भासावं तसं काहीसं सगळं वातावरण भासत आहे.'' (पृ.९३,९४) या वर्णनातून हे घर एखाद्या श्रीमंत, हौशी, कलासक्त माणसाचे असावे असे वाटते.

**५. दावं :**

**भमाशंकर चाळीतील जोशी काकू :**

या कथेतील चाळीचे वर्णन येते ते असे –

''भीमाशंकर चाळीत एकूण एकवीस बिऱ्हाडं आहेत. खाली सात, मधे सात आणि वरच्या मजल्यावर सात. समोर सदैव वाहता रस्ता, कचऱ्याचे ढीग, वाहतं गटार, त्याच्या आसपास कुत्री–डुकरं इ. आहेत. चाळीच्या दोन्ही बाजूंना त्या–त्या मजल्यावरच्या बिऱ्हाडकरूंसाठी पायखाने वगैरे.

बहुतेक सर्व खोल्या भरलेल्या आहेत. इतक्या भरलेल्या की माणसांचा, त्यांच्या विविध हालचालींचा, त्यांच्या भावभावनांचा, सुख–दुःखांचा, आशा–निराशांचा, काळज्या–चिंतांचा भार तरी त्या इमारतीला कसा सहन होत असावा, असा प्रश्न बघणाऱ्याला पडावा.'' (पृ.९१) वरील वर्णनातून चाळीतील समस्या तेथील लोकजीवन यांचे चित्र स्पष्ट होण्यास मदत होते.

**ससा :**

या कथेतील निसर्गवर्णन करताना मराठे म्हणतात,

''भोवतीचं निसर्गचित्र रंगसम्राट चित्रकारानं रेखाटावं तसंच होतं. शांत, स्थिर, रंगांनी आणि रेषांनी, आकारांनी आणि आकृत्यांनी गजबजलेलं. तरी दोघं बसली होती ती कातळाची जागा. बाजूला दगड, धोंडे आणि खडकावरच वाढणारं रानगवत. थोडा पलिकडे रस्ता. बहुतांशी निर्मनुष्य. नितळ आणि स्वच्छ. रस्त्याच्या पलिकडे शेतं. त्या पलिकडे झाडी. ती थेट डोंगरांना जाऊन भिडलेली. डोंगर आकाशाला भिडल्यासारखे दिसणारे, क्षितिजाला बिलगलेले. फक्त रंग आणि आकार! पावसाळा संपून गेल्यानंतरची मोकळी–मोकळी सांजहवा. संध्याकाळ होऊन

गेलेली. प्रकाश धूसर–धूसर, क्षीण–क्षीण होत आलेला.'' (पृ.१०६) वरील वर्णन निसर्गरम्य, शांत हिरव्यागार रानातील असल्याचे हुबेहूब चित्र समोर येते.

**देऊळ** :

या कथेतील पात्र वर्णन करताना लेखक म्हणतात,

''तो नेहमी सारखाच मळकट खाकी चड्डी, अंगात गाठावलेलं बनियन, दात पुढं आलेले आणि किळस वाटावे इतके कळकटलेले. केसांचा सफाचट केलेला, दाढीचे खुंट वाढलेले, डोळे हरवलेले.'' (पृ.११७) दत्तूच्या या वर्णनावरून त्याचे घाणेरडे, अजागळ, अस्ताव्यस्त व्यक्तिमत्त्व समोर येते.

**समाधी** :

या कथेतील पुर्शा नावाच्या पात्राला शब्दरूप देताना मराठे लिहितात,

''तो एकदम हडकून गेला होता.

ओढला होता. करपून गेला होता.

केस पांढरेफोक झाले होते. गवत वाढावं तसे वाढले होते. डोळे खोल गेले होते. गालफडं बसली होती. चेहराभर, डोळ्यांत, सगळ्या शरीरावर निस्तेज ग्लानी पसरलेली दिसत होती.

कपडे मळून गेलेले, चुरगळून गेलेले.

वर्षानुर्षांच्या दुष्काळातून, टंचाईतून आलेला, दुखणाईत दिसत होता.

छाती धपापत होती.

अंगात त्राण नसलेल्या दीर्घ मुदतीच्या दुखणेकऱ्यासारखी त्यानं मान बाकाच्या कठड्यावर टेकवून धरली होती. आपले क्षीणसे डोळे त्याने मिटून घेतले होते.'' (पृ.१३१) पुर्शाची झालेली उपासमार, एकटेपण, दु:ख या वर्णनातून हुबेहूब साकार झालेले दिसते.

**विहीर** :

मालवणच्या बंदराचे वर्णन करताना मराठे लिहितात,

"बोट बंदरात उभी राहिली तेव्हा सगळीकडे मिट्ट काळोख होता. समुद्राचं पाणी बोटीला आपटून खळबळत होतं. पाठीमागं किल्ला काळोखात खोदल्यासारखा उभा होता. किनाऱ्यावरचे माड काळ्या रेषेत बुडून गेले होते. हिरव्या बत्तीचा ठिपका तेवढा दिसत होता.

वासू डेकावर उभा राहून बघू लागला. मैलभर आडव्या–तिडव्या पसरलेल्या काळ्याशार पाण्यावर बोटीचं प्रतिबिंब तरंगत होतं. त्या प्रतिबिंबापासून काळं–काळं–काळोखं पाणी दूरवरच्या किनाऱ्यापर्यंत फाकलेलं होतं. त्याच्या पलिकडे मालवण गांव शांत निजलेलं होतं. किनाऱ्यावरून सुटलेले पडाव अजून दिसत नव्हते." (पृ.१६०) मालवण बंदराचे केलेले वर्णन वाचकाला प्रत्यक्ष मालवण बंदरात असल्याची जाणीव करून देतात.

**६. घोडा :**

**घोडा :**

या कथेतील केणीसाहेबांच्या ऑफिसचे वर्णन करताना ह. मो. मराठे म्हणतात,

"गँगवेच्या दोन्ही बाजूंना पार्टिशन टाकून केलेली छोटी–मोठी चकचकीत केबीन. सेल्स मॅनेजर, फायनान्स मॅनेजर, ऑफिस सुपरिटेंडेंट, बिझिनेस मॅनेजर – ओळीने लटकणाऱ्या पाट्या.

शेवटी एम.डी. ची केबिन–दोन कट्ट्यांची. बाहेर व्हिजिटर्स रूम. तिथं छान फर्निचर ठेवलेलं. खाली गालीचा. त्याच हॉलमध्ये आणखी एक छोटं पार्टिशन टाकून एम. डी. साहेबांची सेक्रेटरी. शेजारी मोठं काचेचं दार. दारावर मोठी पाटी : जी. एस. केणी, मॅनेजिंग डायरेक्टर. काचेतून केणीसाहेब सरळ दिसत नाहीत. त्यांचं टेबल कोपऱ्यात आहे. बाहेरून फक्त त्यांच्या समोरच्या खुर्च्या अर्धवट दिसतात. टेबलाचा एक कोपरा दिसतो. खालचा लाल–लाल गुबगुबीत गालिचा." (पृ.८) या वर्णनातून केणीसाहेबांची केबीन प्रत्यक्ष नजरेसमोर असल्याचा भास होतो.

**सस्ती गंमत :**

या कथेतील सुरूवातीलाच ह. मो. मराठे एका औद्योगिक प्रदर्शनाचे वर्णन करतात,

"ग्राऊंड मोठं आणि मध्यवर्ती, म्हणूनच बहुधा कृषी औद्योगिक प्रदर्शनाच्या संयोजकांनी ते निवडलं होतं. त्यांची जागेची निवड अचूक ठरली होती. कारण प्रदर्शन बघायला शहराच्या सर्व

भागातून गर्दी लोटली होती. माणसं त्यांचे पोषाख आणि त्यांची एकूण वागण्या–बोलण्याची पद्धती यावरून ती कोणकोणत्या भागातली व कोणकोणत्या आर्थिक, सामाजिक थरातली आहेत याचा सहज अंदाज बांधता येत होता. शहरातल्या सर्व लोकॅलिटीज् आणि सगळे सोशिओइकॉनॉमिक स्तर यांचं प्रातिनिधिक प्रतिबिंब प्रदर्शनाला भेट देण्यासाठी आलेल्या लोकांत पडलेलं होतं. प्रदर्शनाची मांडणी भव्य आणि आकर्षक होती. जाड्या व म्हाताऱ्या बायाबापड्यांनाही बसून आकाशाचा फेरफटका करून घेता येईल व एक्साइटमेंट अनुभवता येईल असे विजेचे प्रचंड पाळणे हे प्रमुख आकर्षण होतं. पाळण्यात बव्हंशी उच्च श्रीमंत वर्गातील बाया बसून गरगरत होत्या आणि अल्लडपणे अंमळसं थ्रिल अनुभवीत होत्या. पोरांकरिता खेळणी घर होतं. त्यात विजेवर चालणाऱ्या रेल्वेपासून सायकल चालवणाऱ्या माकडापर्यंत सर्व खेळणी होती. तरूण आणि प्रौढशा पुरुषवर्गाकरिताही वेगवेगळ्या आकर्षणाचे स्टॉल्स होते. नकली बंदुकीच्या गोळ्या मारून फुगे फोडण्याच्या खेळापासून इतर एक–दोन प्रकारचे जुगारसदृश खेळ होते. त्या ठिकाणी गर्दी होती. ती मुख्यत: कॉलेज विद्यार्थ्यांची आणि त्यांच्याच वयाच्या तरूणांची. अशाप्रकारे मनोरंजनाच्या सर्व केंद्रावर झुंबड उडाली होती व राज्याने कृषी–औद्योगिक क्षेत्रात केलेल्या प्रगतीचं दर्शन घडावं म्हणून मांडलेल्या स्टॉल्सकडे कुणीच फारसं फिरकत नव्हतं. तरी संयोजकांचं फारसं बिघडत नसावं अस वाटतं. कारण ते एकंदर रिस्पॉन्सवर व येणाऱ्या लोकांकडून प्रवेशपत्रिकांच्या रूपाने गोळा होणाऱ्या गल्ल्यावर संतुष्ट दिसत होते.'' (पृ.१५३,१५४) वरील कृषी–औद्यागिक प्रदर्शनाचे बारीक–सारीक तपशीलासह वर्णन समोर येते.

अशाप्रकारे ह. मो. मराठे यांच्या कथांमध्ये व्यक्तिवर्णने, निसर्गवर्णने, स्थलवर्णने पदोपदी आढळतात.

## कादंबरी :

### १. काळेशार पाणी :

ग्रामजीवन आणि तेथील परिसर वाचकांसमोर हुबेहूब उभी करणारी चित्रशैली हा ह. मो. मराठे यांच्या लेखनाचा विशेष म्हणून नोंदविता येईल. ओढ्याचे वर्णन करताना ते लिहितात,

“वहाळ तसा खूप मोठा नव्हता. उन्हाळ्यात त्याचं पाणी बहुधा आटूनच जायचं. पण पावसाळ्यात भरून धो धो वाहायचा. खूप लांबून देवचाराच्या डोंगरातून तो वाहात आला होता. जोश्यांच्या कुळागाराच्या जवळ वहाळात एक मोठी कोंडी तयार व्हायची. खूप वर दुसरी एक मोठी कोंड सतत तयार होऊन राहिलेली असे. ती नेहमी भरून असे. तिला भुताची कोंड म्हणत. कोंडीवर वडाचं एक भलं मोठं जुनाट भयाण दिसणारं झाड ओणवलं होतं. इतरही अनेक मोठमोठी उंच उंच गर्द झाडं तिथं वाढली होती. त्यामुळं तिथलं सगळं वातावरण भयाण, अंधारं, जड जड होऊन गेलं होतं. पावसाळ्यात धो धो पावसाचा नाद वडाच्या झाडाच्या आश्रयानं घुमत राहायचा. वहाळाच्या खळखळाटानं तो आवाज आणि कोंडीचा परिसर अधिकच भयाण वाटायचा.” (पृ.४८)

कोकण परिसर, तेथील ओढे, गर्द झाडी, देवचाराच्या डोंगरातून सारख्या शब्दातून त्या विशिष्ट परिसराचा आलेला संदर्भ, कोंडी, वहाळ सारखा कोकणी बोलीतील संदर्भ, भुताची कोंडसारखे त्याला लावलेले विशेषण आणि अंधश्रद्धेतून आलेला शब्द, धो धो सारख्या शब्दातून पाण्याच्या प्रवाहाचा होणारा आभास. जुनाट भयाण दिसणारं झाड हा वडाचा आलेला संदर्भ हे सर्व त्या परिसराशी एकजीव होऊन अभिव्यक्त होताना दिसते.

व्यक्तिवर्णने आणि प्रसंगवर्णने एकात्म होऊन साकारताना दिसतात. विष्ण्या आणि भिकी यांच्यातील संघर्ष टिपताना मराठे लिहितात,

“विष्ण्यासमोर भिकी उभी होती. ती आता संतापानं चांगली थरथरत होती. तिचे डोळे रागानं लाल झाले होते. त्या लाल डोळ्यांनी एखाद्या फुटक्या अंत:करणाच्या माणसानं बघावी तशी ती विष्ण्याच्या काळसर तांबूस प्रकाशातल्या चेहऱ्याकडे बघत होती. शब्दांचे घाव विष्ण्याच्या अगदी मर्मावर घालीत होती. विष्ण्या त्या शब्दांनी आज घायाळ झाला. पंधरा वर्षाच्या काळात भिकीचं हे रूप कधीच दिसलं नव्हतं. त्याच्या अंगातला ठणका आणि कणकण वाढली. तो थकून खाली बसला. भिंतीला टेकला.” (पृ.७०)

एका असहाय, निराश्रीत स्त्रीचा हवा तसा आणि मर्जीला वाट्टेल तेव्हा उपभोग घेणारा, मुले जन्माला घालणारा, मात्र त्यांच्या उदरनिर्वाहाचा कसलाही विचार न करणाऱ्या विष्ण्याची

मनमानी पंधरा वर्षे मूकपणे सहन करणाऱ्या भिकीचा त्रागा, मनातील त्वेष उफाळून आल्याचे चित्र मराठे यांनी येथे अगदी परिणामकारकपणे उभे केले आहे. 'संतापानं', 'थरथरत', 'डोळे रागानं लाल झाले', 'फुटक्या अंत:करणाच्या माणसानं बघावी तशी', 'शब्दांचे घाव', 'मर्मावर', 'घायाळ', 'अंगातला ठणका', 'कणकण' यासारखे शब्द ही परिणामकारकता वाढविण्यास पूरक ठरतात. एखाद्या रणरागिणीचे रूपच भिकीच्या रूपाने उभे राहते, तर एखाद्या हतबल पुरुषाचे चित्र विष्ण्याच्या रूपाने उभे राहते.

कधी पात्रांच्या प्रत्यक्ष उक्ती–कृतीतून तर कधी भासाच्या रूपाने व्यक्तिवर्णने, स्थलवर्णने मराठे करताना दिसतात. असेच एक वर्णन येते ते पुढीलप्रमाणे–

"भिकी चुलीकडे जाण्यासाठी वळली. तिची लांबट होत जाणारी काळीकुट्ट सावली समोरच्या भिंतीवर पसरलेली कमळीनं पाहिली, आणि भेदरून गेली. ती सावली आपल्या अंगावर येत आहे असं तिला वाटलं. वहाळातल्या पाण्याच्या पुराच्या लोंढ्यासारखी ती सावली कमळीच्या अंगावर झेपावत आली. त्या काळ्या प्रवाहातून पोहत पोहत सामन्त आला. कमळीनं त्याला मिठी घातली. पण तो प्रवाहातून वाहात पुढे गेला. भुतांनी त्याला उचलून नेलं......कमळीच्या पोटात भयाचा स्फोट झाला. ते भय तिच्या सगळ्या रक्तात भिनलं आणि सगळं रक्त गार गार होऊन गेलं. तिच्या पोटामधून एक किंकाळी उसळून वर आली; पण घशातच गरगरत राहिली." (पृ.१०२)

परीक्षेत नापास झाल्यानंतर सामन्त आणि कमळी दोघेही दु:खी होतात. सामन्त हे सहन करू शकत नाही. सामन्त कमळीच्या डोळ्यासमोर डोहात उडी घेऊन आत्महत्या करतो. त्याची कमळीला भिती बसते. त्या भितीपोटी ती आजारी पडते. तिला होणारा भास मराठे यांची लेखणी तपशीलवार वर्णनातून परिणामकारकपणे टिपते.

**२. इतिवृत्त** :

ह. मो. मराठे यांची लेखणी सूक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षणे नोंदविताना दिसते. मुख्यमंत्र्यांबरोबर दैनिकाचा संपादक म्हणून नाडकर्णी पार्टीला हजर राहिल्यानंतर पार्टीच्या ठिकाणचा हॉल पाहून ते स्तिमित होतात. त्या हॉलचे वर्णन करताना मराठे लिहितात,

“हॉल प्राचीन शिपशारया ढंगाचा, भव्य आणि प्रशस्त होता. मोठाली झुंबरं टांगलेली होती. मोठाली पेंटिंग्ज भिंतीवर टांगलेली होती. कोपऱ्यात गणपतीची संगमरवरी मूर्ती. एका भिंतीवर एका शिकारीच्या दृश्याचा मोठा फोटो. त्याच्या विरूद्ध बाजूच्या भिंतीवर एका नंग्या साधूचा मोठा फोटो. एका भिंतीवर राज्याचा मोठा नकाशा टांगलेला.” (पृ.७)

या हॉलच्या वर्णनातील ‘शिल्पाच्या ढंगाचा’, ‘भव्य आणि प्रशस्त’, ‘मोठाली झुंबरं’, ‘मोठाली पेंटिंग्ज’, ‘संगमरवरी मूर्ती’, ‘शिकारीच्या दृश्याचा फोटो’, हे सगळे शब्द एका ऐश्वर्यसंपन्न दालनाचे चित्र डोळ्यासमोर उभे करतात. तर आमदार गजानन नाईक यांच्या गावी नाडकर्णींच्या स्वागताचे वर्णन करताना ते लिहितात,

“आमदार गजानन नाईक यांच्या गावी नाडकर्णींच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती. नाडकर्णींना आणायला नाईकांनी जीप पाठविली होती आणि बरोबर कार्यकर्ते दिले होते. गावाच्या शिवेवर नाडकर्णींना घेऊन येणारी जीप पोचली तेव्हा मोगरशिंग वाजवून त्यांचं स्वागत करण्यात आलं. आमदार नाईकांनी पुढं होऊन त्यांच्या गळ्यात हार घातला. फोटोग्राफर आवर्जून आणण्यात आला होता, त्यानं भराभर फोटो घेतले. गावच्या शाळेतील मुलंमुली रस्त्याच्या दुतर्फा उभी करण्यात आली होती. त्यांनी नाडकर्णींना मानवंदना दिली.” (पृ.६७)

एखाद्या स्वागतसमारंभाची पूर्वतयारी व प्रत्यक्ष स्वागत या छोट्याशा प्रसंगाचे मराठे यांनी केलेले हे वर्णन अल्पाक्षररमणीयत्वाचा एक चांगला नमुना म्हणून नोंदविता येईल. अगदी थोडक्या शब्दात तो समग्र प्रसंग उभा करण्याचे मराठ्यांचे कौशल्य येथे प्रत्ययाला येते.

**३. कुरूक्षेत्र :**

मुलगी पाहण्यासाठी गेलेल्या मुलाचे वर्णन करताना मराठे लिहितात,

“त्याचा रंग काळा होता. चेहरा थोराड होता. नाक कसंतरीच फुगलेलं होतं. एक डोळा तिरळा होता आणि चेहऱ्यावर थोडे थोडे देवीचे व्रणही होते. काळी, थोराड चेहऱ्याची आणि देवीचे व्रण असलेली काही काही माणसं सुंदर आणि आकर्षक दिसतात. पण तो मात्र तसा दिसत नव्हता.

तो खुर्चीवर बसला होता. बहुतेक पायजमा आणि शर्ट अंगात असावा. टोपीही घातलेली होती की, काय ते आता आठवत नाही. पण पायजमा आणि शर्ट अंगात होता, एवढं नक्की. पायजमा काळसर लाल मातकट होता आणि शर्टही तसलाच.'' (पृ.८१)

'रंग काळा', 'चेहरा थोराड', 'नाक कसंतरीच', 'एक डोळा तिरळा', 'चेहऱ्यावर थोडे थोडे देवीचे व्रण', 'पायजमा', 'काळसर लाल मातकट', 'शर्टही तसलाच' हे सर्व शब्द एखाद्या सर्वसामान्य दारिद्र्याने पिडलेल्या आणि कुरूप माणसाचे शब्दचित्र उभे करण्यास समर्थ ठरतात.

**४. कलियुग :**

ह. मो. मराठे व्यक्तींची वर्णने करीत असताना कधी त्यांचे शारीरिक वर्णन करतात तर कधी एखाद्या व्यक्तीच्या अस्तित्वाचे, त्याच्या धाक, दराऱ्याचे इतरांवर पडणाऱ्या प्रभावाच्या रूपाने व्यक्त करतात. कत्रेसाहेबांचे असेच सूचक वर्णन येते.

''मुख्य गेटच्या बाहेर कत्रेसाहेबांची गाडी आली की वॉचमन गेट उघडून देताना त्यांना आधी एक सलाम ठोकी. कत्रेसाहेबांची गाडी गेटच्या आत शिरून मुख्य ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिलिंगपासून जाईपर्यंत वॉचमनच्या टपरीतून टेलिफोन ऑपरेटरबाईकडे आणि तिथून सगळ्या डिपार्टमेंटमध्ये क्षणार्धात मेसेज जाई– कत्रेसाहेब आले– आणि त्या संदेशासरशीच सर्वांच्या मनातून भीतीची एक सूक्ष्म लहर निनादत जाई. परिणामत: हरेक माणूस आपल्या कामाकडे अधिक दक्षतेने लक्ष देई.'' (पृ.१)

शारीरिक वर्णनातून जशी एखादी व्यक्ती डोळ्यासमोर उभी राहते तशीच त्या व्यक्तीच्या अस्तित्वाने इतरांवर पडणाऱ्या प्रभावानेही त्या व्यक्तीचा रूबाब, तोरा, दरारा जाणवण्यास मदत होते. कत्रे साहेबांच्या रूपाने हे लक्षात येण्यास मदत होते.

**५. देवाची घंटा :**

व्यक्तिवर्णनाच्या विविध शैली मराठे यांच्या कादंबरी लेखनात आढळतात. शारीरिक, वेशभूषा तसेच इतरांवरील प्रभाव दाखवून मराठे व्यक्तीला उठाव देतात. शरीराची ठेवण आणि वेशभूषा यांच्या रूपाने वसगडेकरांचे वर्णन येते.

"मुंबईच्या माणसासारखे वसगडेकर पांढरे स्वच्छ कपडे करी व दुकानात बसे. त्याचे कसे पांढरेधोप पिकले होते व बारीक चकचकीत काड्यांचा, जाड भिंगाचा चष्मा तो लावी." (पृ.६)

अत्यंत थोडक्या शब्दात वसगडेकरांचे व्यक्तिचित्र उभे करण्याची मराठे यांची हातोटी येथेही प्रत्ययाला येते. स्थलवर्णनातही त्यांचे कौशल्य प्रत्ययाला येथे. कोकणातील खेड्याचे वर्णन करताना ते लिहितात,

"खोली फार मोठी नव्हती. लहानसं दुकान बसेल, एवढी. पाठच्या बाजूला एक दार होतं. पलीकडे उघडा. माळ होता. पावसाळ्यात तिथं भात लावलं जाई. उन्हाळ्यात तो कोरडाच असे. मळा ओलांडून पलीकडे गेलं, की खाडी लागे. भरतीचं पाणी मळ्यात बरंच आत चढून येई. मळा मधोमध येईल अशातऱ्हेनं मळ्याच्या चारी अंगांनी वाडी वसलेली होती. तुरळक तुरळक घरं होती. घरांच्या पाठची परसवं होती. लोक उन्हाळ्या–पावसाळ्यात सकाळी ऊठून खाडीकडे जात. बाचकामाणसं गडग्याच्या किंवा मेरेच्या आडोशानं बसत. मळ्यात गाई–गुरं, म्हशी, कुत्री भटकत असत." (पृ.९)

'उघडा माळ', 'मळा', 'खाडी', 'परसवं', 'वाडी', 'गडग्या', 'मेरे', 'गाई–गुरं', 'कुत्री' यासारख्या शब्दांमधून समग्र वाडीचे चित्र येथे येते. खेड्यापाड्यातील दारिद्र्याने पिचलेल्या घराचे–येसूच्या घराचे वर्णन करताना मराठे लिहितात,

"येसूनं लुगड्याचा पडदा लावून आपल्या खोलीचे दोन भाग केले होते. बाहेर झोपायची जागा; आत चूल. चुलीच्या खणात चूल होती. तिनं परवा रात्री चुलीबाहेर काढून विझविलेली लाकडं तशीच होती. सगळीकडे राख पसरली होती. चुलीच्या वरच्या भिंतीला खुंट्यांवर तिनं एक फळी ठेवली होती. धुरानं काळपटलेल्या त्या फळीवर आणि शेजारच्या कोनाड्यात येसूनं टिनचे डबे ठेवलेले होते. सगळे डबे धुरानं काळवंडलेलेच होते. दुसऱ्या कोनाड्यात येसूनं ठेवलेला एक कानफुटका कप होता." (पृ.१५०)

अठराविश्वे दारिद्र्यानं पिचलेल्या येसूच्या एका खोलीच्या घराचे अस्वस्थ करणारे चित्रण मराठ्यांनी टिपले आहे.

**६. नरिमन पॉईंटचा समुद्र :**

या कादंबरीत फारशी वर्णने येत नाहीत. मात्र केतकीच्या समुद्र पाहण्यातून समुद्राचे आणि कार्यालयाचे एकत्र वर्णन मराठे करतात.

"अठराव्या मजल्याच्या खिडकीतून नरीमन पॉईंटचा समुद्र किती खोल दिसत होता! खोल आणि दूर! खिडकीचा पडदा दूर करून केतकीनं बंद काचेआडूनच समुद्राकडे बघितलं. आजवर तिनं इतक्या उंचीवरून समुद्र कधी बघितला नव्हता असं नाही. अनेकदा बघितला होता. बघितला होता? छे! नुसता दिसला होता. तिचं ऑफिस नरीमन पॉईंटच्या एका उत्तुंग इमारतीमधील अठराव्या मजल्यावर होतं. त्याला खिडक्या होत्या, खिडक्यांना पडदे होते .......आजूबाजूला एवढ्याशा जागेत चाळीसपन्नास माणसं टेबलं टाकून बसलेली असत. टायपिंगचे आवाज, फोनच्या रिंग्जचे आवाज आणि सर्वांच्या बोलण्याचे आवाज." (पृ.५)

समुद्र आणि कार्यालय या दोन्हींचे एकत्र वर्णन येथे येते. स्वत:चा व्याप सांभाळताना साधे बाहेर डोकावायलाही वेळ नाही हे महानगरीय जीवनातील प्रखर वास्तव मराठे येथे या वर्णनातून मांडतात.

**७. मार्केट :**

तनुजा केळकर या तरूणीचे वर्णन करताना मराठे लिहितात,

"एकवीस वर्षाची उमदी, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची, फ्लुएंट इंग्लिश बोलणारी, व्हेरी मॉडर्न इन मॅनर्स, कॉन्व्हेंट एज्युकेटेड, एम.बी.ए. होऊन ज्युनियर एक्झिक्युटिव्हच्या मॅनेजिंग डिरेक्टरांची पर्सनल सेक्रेटरी म्हणून काम करणारी तरूणी झाली होती. फार स्लिम नव्हे की फॅटी नव्हे. खूप उंच नव्हे की ठेंगू नव्हे. पाच फूट तीन इंच. वजन प्रपोर्शनेटली आवश्यक तेवढं कांती नितळ, स्तन गोलाकार आणि घोटीव, नितंब पुरेसे उठावदार, नाक सरळ, डोळे सतेज, दृष्टी चलाख. हाताची बोटं. निमुळती, तांबूस रंगाची. त्यांना नेल पॉलिश. बोटांचा गव्हाळ रंग आणि नखांचा लाल रंग आणि त्यामागचा निमुळता गोरा पान, गुबगुबीत तळवा बघितला की पांढरट. रंगाच्या पाकळ्या आणि तांबूस रंगाचं केसर असलेलं फूल बघत आहोत असं बघणाऱ्याला वाटे." (पृ.५३)

तनुजा केळकर या तरूणीच्या सौंदर्याच्या अनुषंगाने तिचे नखशिखांत वर्णन येते. 'उमदी', 'प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची', 'स्लिम नव्हे की फॅटी', 'उंच नव्हे की ठेंगू', 'कांती नितळ', 'नाक सरळ', 'डोळे सतेज', 'बोटांचा गव्हाळ रंग', 'नखांचा लाल रंग', 'गुबगुबीत तळवा' हे सर्व शब्द तरूणीच्या सौंदर्याचा प्रत्यय देतात. अनेक विशेषणे वापरून येथे व्यक्तिवर्णन येते.

तर अगदी थोड्या शब्दांद्वारा 'रामायणी' या आलिशान हॉटेलचे वर्णन येते.

"रामायणी हे शहरातलं नवं आलिशान हॉटेल दिमाखदार आसनं आणि भरगच्च इंटेरियर डेकोरेशननं नुसतं नववधूसारखं सजलं होतं. मंद प्रकाश आणि थंड शांतता तिथं नांदत होती. पूर्वरात्र होती. अर्धी अधिक आसनं भरली होती आणि उरलेली शहरातल्या नवश्रीमंत गिऱ्हाइकांच्या प्रतीक्षेत होती." (पृ.६७)

आलिशान हॉटेलचं सविस्तर वर्णन न करता 'आलिशान हॉटेल', 'दिमाखदार आसनं', 'भरगच्च इंटेरियर', 'मंद प्रकाश', 'थंड शांतता', अशा मोजक्याच पण सूचक अशा शब्दांनी हॉटेलचे आलिशानपण नमूद केले आहे.

**८. सॉफ्टवेअर :**

व्यक्ती, स्थलवर्णनाबरोबरच कार्यालयाचे वर्णन हाही मराठ्यांच्या लेखनाचा वेगळा पैलू जाणवतो. कार्यालयाचे वर्णन करताना ते लिहितात,

"बाहेरच्या खोलीचं इंटेरियर डेकोरेशन प्रसन्न आणि लोभस होतं. टवटवीत पानाफुलांच्या कुंड्या, लालसर रंगाचा गालिचा. कंफर्टेबल कुशनवाल्या आरामशीर खुर्च्या बसायला. साखळकरांसाठी अर्ध्या उंचीचं पार्टीशन टाकलेली सुटसुटीत खोली. तिथं डिसेंट पद्धतीनं मांडलेलं रॅक. शेजारी स्टीलचं कपाट. टेबलांवर दोन सुंदर टेलिफोन्स, इंटरकॉम, शेजारी एक वर्ड प्रोसेसर." (पृ.४३)

'इंटेरियर डेकोरेशन', 'टवटवीत पानाफुलांच्या कुंड्या', 'गालिचा', 'कुशनवाल्या आरामशीर खुर्च्या' यासारख्या शब्दांनी छोट्याशाच पण सुंदर कार्यालयाचे वर्णन येते. अशाच सुंदर कार्यालयाचे वर्णन पृ. ४४ वरही येते.

९. प्रास्ताविक :

या कादंबरीत प्रत्यक्ष विशिष्ट व्यक्तीचे वर्णन येत नाही. मात्र एखाद्या आदर्श पुरुषाचे व्यक्तिमत्त्व कसे असावे याचा निर्देश येतो.

"एक दिव्य दृष्टीचा, जिगरबाज, धोरणी, कामगारांचा कनवाळू, पापभिरू, दूरदर्शी आणि यशस्वी उद्योगपती असं त्यांचं चित्र निदान त्यांच्या गौरवांकात तरी रेखाटलं जायला पाहिजे होतं." (पृ.७७)

सदर व्यक्तीच्या अनुषंगाने आलेली विशेषणे आदर्श व्यक्ती कशी असावी याचेच द्योतक वाटतात.

ह. मो. मराठे यांनी व्यक्तिवर्णनाच्या विविध पद्धती अवलंबिल्या आहेत. कधी प्रत्यक्ष वर्णन करून, कधी पात्राच्या कृतीतून, कधी गुणाद्वारा व्यक्तिचित्रण केले आहे, तर कधी त्रयस्थपणे साक्षीभावाने व्यक्तिवर्णन येते. स्थलवर्णनात ते कधी सूक्ष्मातिसूक्ष्म असे वर्णन करतात तर कधी सूचकतेने करतात याचा प्रत्यय येतो. या वर्णनात रंग, रूप, नाद, लय यांची प्रचिती येते. एकूणच काय मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून ही वर्णने परिणामकारकपणे येतात. डॉ. र. बा. मंचरकर यांना अभिप्रेत असलेले वर्ण्यविषयाच्या अंगोपांगांचे ज्ञान, तल्लख संवेदनशीलता आणि नितळ शब्दकळा अपेक्षित असण्याची गरज मराठे यांच्या वर्णनात पूर्ण होते असे म्हणता येईल.

## ६. म्हणी व वाक्प्रचार :

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील विविध अंगांचा अभ्यास करत असताना त्यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील म्हणी व वाक्प्रचाराचा विचार येथे करावयाचा आहे.

ह. मो. मराठे यांची प्रभावीपणे साकार करणारी लेखनशैली म्हणी व वाक्प्रचारांचा वापर करताना दिसते. काही म्हणींचा प्रत्यय प्रसंगांनुसार, स्थळ, काळ, वेळेनुसार बदललेला किंवा त्यात थोडा बदल करून म्हणीवजा वाक्येही लिहिलेली दिसून येतात. कमी शब्दातून अधिकाधिक आशय प्रकट करण्यासाठी आणि आशयाला परिणामकारक उठाव देण्यासाठी लेखकाने पात्रांच्या तोंडी अशा म्हणी योजिलेल्या आढळतात.

**कथासंग्रह :**

१. **वीज** : (स्वप्नभूमी) – "जळात राहून माशाशी वैर" (पृ.७९).

२. **दावं** : (विहीर) – "ईश्वरेच्छा बलियेसी" (पृ.१८८).

३. **घोडा** : (न्यूज स्टोरी) – "देव तारी त्याला कोण मारी" (पृ.२३५).

पात्रांची मनोभूमिका प्रभावीपणे जाणवून देण्यासाठी म्हणी वा म्हणीसदृश वाक्ये भाषेची परिणामकारकता वाढवितात. लोकभाषेची ही लेणी मराठे यांच्या कथांमध्ये आढळतात.

**कादंबरी :**

१. **इतिवृत्त** : 'तळे राखी तो पाणि चाखी' (पृ.१७०).

२. **देवाची घंटा** : 'करून करून भागला आणि देवपुजेला लागला' (पृ.२७), 'आयत्या बिळावर नागोबा' (पृ.३०).

३. **मार्केट** : 'मौनं सर्वार्थ साधनम!' (पृ.४९).

**वाक्प्रचार :**

पात्रांच्या मनोभूमिका परिणामकारकपणे जाणवण्यासाठी पात्रांच्या तोंडी अगदी सहजतेने येणारे वाक्प्रचार हा ह. मो. मराठे यांच्या लेखनाचा एक महत्त्वपूर्ण विशेष. याचे प्रत्यंतर त्यांच्या कथांमध्ये येते.

**कथासंग्रह :**

१. **सापेक्ष** : (सापेक्ष) – 'नेत्रपल्लवी करणे' (पृ.४), 'संगनमत करणे' (पृ.१४), (अँकर) – 'समर्थन देणे' (पृ.३३), 'रस्सीखेच करणे' (पृ.४३), (जी सरकार) – 'बुद्धी पाजळणे' (पृ.९०), (देशात सालं काही घडतच नाही) – 'दयाबुद्धी दाखवणे' (पृ.१२८), 'अनुकंपा वाटणे' (पृ.१३३), 'हमरीतुमरीवर येणे' (पृ.१४३).

२. **वीज** : (वीज) – 'घायाळ होणे' (पृ.१५) 'खिल्ली उडवणे' (पृ.१५), (दृश्य तेच आहे) – 'अंगावर शहारे येणे' (पृ.३६), (कुंती) – 'विळख्यात सापडणे' (पृ.९०), 'उधाण येणे'

(पृ.९४), ‘खूणगाठ बांधणे’ (पृ.९४), (पूर्णचंद्र) – ‘पाणउतारा करणे’ (पृ.१२४), (लष्कर आलं) – ‘आहूती देणे’ (पृ.१४१).

३. **ज्वालामुख** : (ज्वालामुख) – ‘हंबरडा फोडणे’ (पृ.१४), (कर्मफल) – ‘जिवात जीव नसणे’ (पृ.११०), (काळ) – ‘कफल्लक होणे’ (पृ.१२९).

४. **हद्दपार** : ‘टोमणा मारणे’ (पृ.१६), ‘हद्दपार करणे’ (पृ.१८), ‘निर्भत्सना करणे’ (पृ.५१)

५. **पक्षिणी** : (पक्षिणी) – ‘उबग येणे’ (पृ.९), (विरूप) – ‘दातओठ खाणे’ (पृ.७०), (सावित्री १ – सावित्री २) – ‘सुगावा लागणे’ (पृ.९६), (मृगया) – ‘भुरळ पाडणे’ (पृ.११२)

६. **दावं** : (कापुरुष) – ‘पूर्णविराम देणे’ (पृ.२१), ‘शिक्कामोर्तब करणे’ (पृ.३४), (वाल्या कोळी व बायको) – ‘सुड उगवणे’ (पृ.४४), (कृमी) – ‘गृहित धरणे’ (पृ.७२), (समाधी) – ‘चिथावणी देणे’ (पृ.१३४), ‘संभ्रमित होणे’ (पृ.१४१), (विहीर) – ‘पाणी मुरणे’ (पृ.१७१).

७. **इतिहासातील एक अज्ञात दिवस** : (तो एक क्षण) – ‘बंड करणे’ (पृ.१५०), (मैत्र) – ‘आनंदाच्या उकळ्या फुटणे’ (पृ.२८०), ‘खजिल होणे’ (पृ.२८५), (माती ... मूर्ती) – ‘समारोप करणे’ (पृ.३२४), (कुपुत्र) – ‘वर्मी घाव घालणे’ (पृ.३५७).

८. **घोडा** : (सापळा) – ‘कंप सुटणे’ (पृ.७१), (टार्जेट) – ‘कात्री लावणे’ (पृ.९९), (मानवतावादी लेखकाचा मृत्यु) – ‘भ्रमनिरास होणे’ (पृ.१२७), ‘व्याकुळ होणे’ (पृ.१४३), (हुतात्मा) – ‘सोक्षमोक्ष लावणे’ (पृ.१७६), (बातमी) – ‘झोप उडणे’ (पृ.२०८), ‘वाभाडे काढणे’ (पृ.२१८).

९. **युद्ध** : (युद्ध) – ‘सुतोवाच करणे’ (पृ.१४), ‘गरळ ओकणे’ (पृ.२२), (माकडीण आणि पिल्लू) – ‘सूड उगवणे’ (पृ.१४१).

**कादंबरी :**

१. **निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी** : ‘प्रेस्टीज कमी होणे’ (पृ.१४), ‘भीड घालणे’ (पृ.१४), ‘श्रुद्रपणा दाखवणे’ (पृ.२१), ‘कृपाकटाक्ष टाकणे’ (पृ.२८), ‘कवडी किंमत नसणे’ (पृ.३५),

'स्वाहा करणे' (पृ.४७), 'नाक मुरडणे' (पृ.५४), 'गणपती लिंपणे' (पृ.५५), 'परागंदा होणे' (पृ.५९), 'अपेक्षाभंग होणे' (पृ.७७).

२. **काळेशार पाणी** : 'अंग शहारणे' (पृ.७), 'धाक दाखवणे' (पृ.२२), 'घायाळ होणे' (पृ.२५), 'अक्कल शिकवणे' (पृ.३७), 'ग्लानी चढणे' (पृ.५३).

३. **इतिवृत्त** : 'कोड्यात टाकणे' (पृ.४), 'नम्रता पांघरणे' (पृ.७), 'संघर्ष करणे' (पृ.१४), 'वंदन करणे' (पृ.२१), 'फिकीर न करणे' (पृ.२६), 'खजिल होणे' (पृ.३८), 'वाचा फोडणे' (पृ.७७), 'ऊर भरून येणे' (पृ.९०), 'काळजात लक्क होणे' (पृ.११३), 'खसखस पिकणे' (पृ.१६५), 'वर्णी लावणे' (पृ.१६६).

४. **कुरूक्षेत्र** : 'अज्ञान पांघरणे' (पृ.१२), 'धसाला लावणे' (पृ.२३), 'पत जाणे' (पृ.३०), 'खुडूक कोंबडी होणे' (पृ.१०५), 'पाय धरणे' (पृ.१२२).

५. **कलियुग** : 'इशारा करणे' (पृ.३), 'मर्जी सांभाळणे' (पृ.११), 'नक्षा उतरवणे' (पृ.१४), 'मर्जी संपादन करणे' (पृ.२९), 'माथा भडकणे' (पृ.३८), 'आवाज चढवणे' (पृ.४३), 'मन बिथरणे' (पृ.५३), 'अंगचोरपणा करणे' (पृ.७३), 'धडा शिकवणे' (पृ.९०), 'प्रतिकार करणे' (पृ.११९), 'झडप घालणे' (पृ.१२७).

६. **देवाची घंटा** : 'मातब्बरी वाटणे' (पृ.९), 'ऊर्जितावस्था येणे' (पृ.१२), 'बरकत येणे' (पृ.१९), 'टंगळमंगळ करणे' (पृ.२३), 'अकलेचे खंदक' (पृ.४४), 'डोळे वटारणे' (पृ.४५), 'वाऱ्यावर सोडणे (पृ.५७), 'आकांडतांडव करणे' (पृ.५७), 'हंबरडा फोडणे' (पृ.१४६).

७. **नो सेंटिमेंटस् प्लीज** : 'कोंडी होणे' (पृ.२२), 'चकित होणे' (पृ.६१), 'हताश होणे' (पृ.६२), 'अंतर पडणे' (पृ.९०).

८. **नरिमन पॉईंटचा समुद्र** : 'थट्टा करणे' (पृ.१०), 'खूणगाठ बांधणे' (पृ.२६), 'संधी साधणे' (पृ.४२), 'उधळपट्टी करणे' (पृ.९७).

९. **मार्केट** : 'निरूत्तर होणे' (पृ.२०), 'गळ्यात मारणे' (पृ.८०), 'शुभस्य शीघ्रम' (पृ.१०१,१०२), 'शिमगा करणे' (पृ.१४५), 'हडप करणे' (पृ.१९६).

**१०. सॉफ्टवेअर** : 'कवाडं बंद करणे' (पृ.६), 'लाजिरवाणे होणे' (पृ.४२), 'सांगड घालणे' (पृ.५३), 'आशाळभूत नजरेने पाहणे' (पृ.७२), 'जीभ विटाळणे' (पृ.७८), 'जखडून ठेवणे' (पृ.१७८).

**११. प्रास्ताविक** : 'उपहास करणे' (पृ.१०), 'फेटाळून लावणे' (पृ.४३), 'मगरमीठी पडणे' (पृ.८६), 'घोडं मारणे' (पृ.१५६).

ग्रामजीवनातील आणि शहरी जीवनातील लोकांना प्रभावीपणे साकार करणारी ह. मो. मराठे यांची लेखनशैली पदोपदी जाणवते. प्रसंगानुरूप पात्रांच्या तोंडी येणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार एखाद्या घटनेचा, प्रसंगाचा पात्रावर होणारा परिणाम प्रभावीपणे कथन होण्यासाठी मदत करताना दिसतात. कुठेही ओढूनताणून या म्हणी वा वाक्प्रचार येत नाहीत. लोकभाषेची ही लेणी मराठे यांच्या भाषेचा एक विशेष म्हणून नोंदविता येईल.

**७. शब्दकळा :**

शब्दकळा हा शैलीविचाराचा एक घटक आहे. यामध्ये शब्द आणि त्यांच्या रचनेचा विचार अभिप्रेत आहे.

"शब्दकळेचा अभ्यास हा शब्दांपुरता मर्यादित नसून शब्दाधारे साधलेल्या अर्थाच्या आकृतीशी व प्रवृत्तीशी निगडित असतो."[१६]

लेखकाने वापरलेले शब्द आणि त्यांचा आशयाशी संबंध यावरून शब्दांचा विचार होतो. ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध ग्रामीण, कोकणी, शहरी व्यवसायाशी निगडित अशा शब्दांचाच येथे विचार अभिप्रेत आहे. ह. मो. मराठे यांच्या कथांमधून येणाऱ्या शब्दांचा येथे विचार करू.

**कथासंग्रह :**

**१. सापेक्ष** : (सापेक्ष) – 'कोंडाळ', 'हुसकवा' (पृ.२३), (बॉम्बे रिप्रेझेंटेटिव्ह) – 'ओसीज', 'इनक्रीज' (पृ.४९), 'उमदं', 'चिकू' (पृ.५०), 'गॉडफादर', 'सोल्युशन' (पृ.५६), (जी सरकार) – 'बंधुगण', 'परवलीचा' (पृ.८२), (देशात सालं काही घडतच नाही) –

‘टेकनिकलर’, ‘फेनॉमेनॉ’, ‘डैलाग’ (पृ.१२७), ‘बापुडवाणं’, ‘अजिजीचं’, ‘दयाबुद्धीची’ (पृ.१२८), ‘फॉर्म’, ‘मिनिस्ट्रीतून’, ‘इलेक्शनमध्ये’ (पृ.१३९), ‘हमरीतुमरी’, ‘धरतीलबिरतील’ (पृ.१४३), (भले गृहस्थ पंडित) – ‘साभिप्राय’ (पृ.१६०), ‘अनुमोदन’ (पृ.१६२), ‘अभिवादन’ (पृ.१६२), ‘उसनवारी’ (पृ.१८३).

२. **वीज** : (वीज) – ‘तसराळं’ (पृ.६), ‘खंतावलेल्या’ (पृ.७), ‘निखालस’, ‘पुरोगामीत्वाचा’, ‘हुळहुळून’, ‘तरतरीतपणे’ (पृ.२२), (बाजार) – ‘स्कूप’, ‘गॉसिप’ (पृ.६०), ‘ग्लॉसी’, ‘ड्रेपरी’ (पृ.६२), ‘सांगीवांगी’, ‘भोवळ’ (पृ.७५), (पूर्णचंद्र) – ‘गांजलेपण’, ‘झकास’, ‘टिनपाट’ (पृ.११०), ‘करवादायचा’, ‘भसाभसा’, ‘खीळ’ (पृ.११६).

३. **ज्वालामुख** : (ज्वालामुख) – ‘ढुशा’, ‘पागडी’ (पृ.११), ‘भोसकाभोसकी’, ‘घाईघाईनं’ (पृ.१५), ‘जाळपोळ’, ‘लुटालुट’, ‘मोठमोठ्यानं’ (पृ.१६), (निशान) – ‘स्वयंपाकी’ (पृ.४०), ‘कोनाड्यातल्या’ (पृ.४१), (ज्वाळा) – ‘डाचतय’ (पृ.६७), ‘पल्लेदार’ (पृ.६८), (कर्मफल) – ‘उनाड’ (पृ.११५), ‘अश्राप’, ‘गुमान’, ‘आडदांड’ (पृ.१२०), (काळ) – ‘बावून’, ‘कातळावर’ (पृ.१२७), ‘जुनेर’, ‘आमास्नी’ (पृ.१२८), ‘झेलपाटत’, ‘हाईत’, ‘इल्के’ (पृ.१३४), ‘कवाशी’, ‘समदी’ (पृ.१३५), ‘मलूल’, ‘शिकपना’, ‘इक्कं’, ‘वोशदपानी’, ‘अशे’ (पृ.१३७).

४. **हद्दपार** : (१) – ‘तोंडदेखलं’, ‘सरबत्तीच’ (पृ.११), ‘अजागळ’ (पृ.१२), (२) – ‘डीपेस्ट’, ‘सिंपथी’, ‘अफेक्शन’, ‘निःसत्व’ (पृ.२५).

५. **पक्षिणी** : (माधुकरी) – ‘उबग’, ‘थंडाई’, ‘फर्लांग’ (पृ.९), ‘प्वॉर’, ‘रगत’ (पृ.१०), (पाट) – ‘नुक्ती’, ‘चुडत’, ‘हीर’, ‘कवातो’ (पृ.१५), ‘तातुल्यानं’, ‘चांडाळाला’ (पृ.१६), ‘कामेरी’, ‘झगरे’, ‘पानगे’, ‘केळंबा’, ‘पेळेवर’ (पृ.२०), ‘कवात्याचे’, ‘व्हाळातल्या’, ‘किशांच्या’ (पृ.२२), ‘रेहेवेचा’, ‘सलां’, ‘परवचा’, ‘बाकबूक’, ‘कुळागारात’, ‘कोंडीत’ (पृ.२३), ‘गंजीफ्राळ’, ‘आठळ्या’ (पृ.२४), ‘कायली’ (पृ.२५), (कभिन्न) – ‘कचदिशी’,

‘लोढण’ (पृ.३६), (मी थोडासा अश्वत्थामा) – ‘कडणीवासा’ (पृ.४५), ‘लुबड्या’ (पृ.४५), ‘हुलपलेल्या’ (पृ.४६).

**६. दावं** : (देऊळ) – ‘कातरवेळचा’, ‘मिंधेपणाची’, ‘बायाबापड्या’, ‘पांगड्या’ (पृ.१२२), ‘हुळहुळू’, ‘बोलावलेनी’ (पृ.१२३), ‘वळकटी’, ‘कर्दमात’, ‘खच्चून’ (पृ.१२४), ‘कैदाशीण’, ‘रंडकीसारखी’, ‘कुंथत’ (पृ.१२७), ‘कुलटे’, ‘जारकर्म’, ‘रोंरावत’, ‘खिसकल’ (पृ.१२८), (समाधी) – ‘सटवाये’, ‘तिनंसांज’, ‘फुरंगटून’, ‘बाधेल’ (पृ.१३५), ‘देवचारा–हडकीच्या’ (पृ.१४३), (विहीर) – ‘चालचलणूक’, ‘आयशीचं’ (पृ.१७३), ‘जाराचा’, ‘काय्येक’ (पृ.१७५).

**७. इतिहासातील एक अज्ञात दिवस** : (डोळा) – ‘हाशहुश’, ‘दबादबा’, ‘पाठंगुळी’ (पृ.१०), (दंगल) – ‘अर्धमृत’, ‘मुटकुळं’, ‘लुटालुट’ (पृ.५१), ‘क्लान्त’, ‘संचारबंदी’, ‘कर्फ्यू’ (पृ.५८), (गोकुळ) – ‘बुजबुजाट’ (पृ.८२), ‘उंडारणार’ (पृ.८३).

**८. घोडा** : (घोडा) – ‘आभूम’, ‘जडशीळ’, ‘नीरवता’ (पृ.९), ‘चिथावणी’ (पृ.१०), ‘डिनाय’ (पृ.११), ‘झुपकोर’, ‘टुमरूक’ (पृ.१३), ‘सहवाससहवासाने’, ‘सीनिअरिटीवाईज’, ‘डेसिग्नेशनवाईज’, ‘त्यातल्यात्यात’, ‘वाटावाटीही’, ‘उखाळ्यापाखाळ्या’ (पृ.१४), (अग्नि) – ‘आंबटाकडलं’, ‘कसब’ (पृ.६१), (टार्जेट) – ‘काबूत’, ‘तामिली’ (पृ.११३), (मानवातावादी लेखकाचा मृत्यू) – ‘खबदाड’ (पृ.१२९), ‘गव्हल्या’ (पृ.१३५).

**९. युद्ध** : (युद्ध) – ‘गरळ’, ‘दीडदमडीचा’ (पृ.२२), (अंगार) – ‘सणसणत’ (पृ.२२९), (लाव्हा) – ‘बॅलट’, ‘डेमॉक्रसी’ (पृ.२४७), ‘पेरोलवर’ (पृ.२५५).

**कादंबरी** :

**१. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी** : ‘किड्याकिड्यांचंसं’ (पृ.१), ‘उत्तिष्ठत... जागृत...’ (पृ.२), ‘कॅडॅक’, ‘लिडबिडलेली’ (पृ.३), ‘पोरंटोरं’, ‘बयेला’ (पृ.७), ‘लिबलिबित’, ‘कायमाय शब्दमूल्य’, ‘गरगरत’ (पृ.१६), ‘धडधडलं’, ‘फडफडलं’, ‘गुळगुळीत’, ‘झगझगीत’, ‘प्वॉर’

(पृ.२८), ‘गपगार’, ‘गडगडत’, ‘अदमासानं’ (पृ.३०), ‘लुसलुशीत’, ‘सांगणार–बिंगणार’, ‘हिनकळले’ (पृ.३५), ‘शिळंपाकं’, ‘उष्टंमाष्टं’ (पृ.३८), ‘एमे–बिमे’, ‘व्हिलनिश’ (पृ.५५), ‘थरथर’, ‘कणाकणांतून’ (पृ.६५), ‘तिरमिरीनं’, ‘गदागदा’ (पृ.६७), ‘हुळहुळायला’, ‘भणभणायला’ (पृ.७६), ‘किनकिनाट’, ‘गुंतागुंतीचे’ (पृ.७८).

२. **काळेशार पाणी** : ‘चिटाच्या’ (पृ.१), ‘वाकड्या तिकड्या’, ‘कुळागराच्या’, ‘वहाळात’, ‘खळखळाटानं’ (पृ.२), ‘नेसणं’ (पृ.३), ‘इलीटा’, ‘पाणंदीतून’ (पृ.४), ‘व्हाळात’, ‘चिरगुंटावर’ (पृ.६), ‘बगीहतस’, ‘मुंबयसून’ (पृ.१०), ‘न्हिझाक’, ‘झिणझिण्या’, ‘हाडलसं’ (पृ.१४), ‘धगड’, ‘घाटी’ (पृ.२६), ‘खळ्यात’, ‘रास’, ‘खूळ’ (पृ.२८), ‘घरंगळलं’, ‘गलबलल्यासारखं’ (पृ.३२), ‘कातळावरच्या’, ‘भिरभिर’ (पृ.३३), ‘आयशीस’, ‘रांडेच्यानं’, ‘बखोटीला’ (पृ.३६), ‘कित्याक’, ‘हाडा’, ‘जाशात’, ‘गेल्लस’, ‘बोलवल्यान’, ‘गाळी’ (पृ.३८), ‘लुगडं’, ‘खोलयेत’, ‘दियो’ (पृ.४५), ‘तरास’, ‘अन्यास’ (पृ.४९), ‘म्हयन्याक’, ‘न्हिजाचा’, ‘फटक्येचो’, ‘फुड्यात’, ‘भड्यानो’ (पृ.६६), ‘शितळीच’, ‘कभिन्न’ (पृ.७२).

३. **इतिवृत्त** : ‘प्रूफ’, ‘हेडलाइन’ (पृ.१), ‘स्नॅप्स’, ‘अग्रलेख’ (पृ.४), ‘प्रेसवाल्या’ (पृ.५), ‘झोंबरी’, ‘कॉमेंटरी’, ‘कॉलम’ (पृ.९), ‘शेरा’, ‘कोंडी’, ‘फेरफटक्या’, ‘पुरवणी’ (पृ.१०), ‘एडिटर’, ‘चेअरमन’ (पृ.१४), ‘फोरमन’ (पृ.२३), ‘बॉयला’, ‘खुलासा’, ‘पॉलिसी स्टेटमेंट’ (पृ.३०), ‘कंपोझ’, ‘प्रसिद्धी’ (पृ.३२), ‘वार्ताहर’, ‘कव्हरेजमध्ये’, ‘फेरफार’, ‘टाइप’, ‘कॉपी’, ‘स्टाफ’ (पृ.३४), ‘प्लेसमेंट’, ‘गॅलीप्रुफ’, ‘लेआउट’ (पृ.४१), ‘रिप्रेझेंट’, ‘कव्हर’, ‘प्रादेशिक’ (पृ.४८), ‘फोटोग्राफर’, ‘कॅमेरा’ (पृ.१७७).

४. **कुरूक्षेत्र** : ‘निर्मितीक्षम’, ‘कर्तबगारीचा’, ‘कार्यक्षम’, ‘कल्पक’ (पृ.६), ‘नवस्वतंत्र’, ‘गौरवोद्‌गार’ (पृ.७), ‘गोषवारा’, ‘कृतिप्रवण’, ‘निदर्शन’ (पृ.८), ‘स्कॉलरशिपच्या’ ‘ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये’, ‘लांछनास्पद’, ‘डिसअपॉईंट’ (पृ.१०), ‘प्रस्थापनेसाठी’ (पृ.१८), ‘इच्छामरण’, ‘तुच्छतावाद’, ‘महात्मा’ (पृ.३८), ‘मस्तवाल’, ‘बंदोबस्त’, ‘सत्याग्रह’ (पृ.४८), ‘मारलं–बिरलं’, ‘पिडायला’, ‘बाईस्नी’ (पृ.५०), ‘म्हंतो’, ‘गपा’ (पृ.५४), ‘झोंबाझोंबी’, ‘तिरमिरून’ (पृ.५६), ‘तुमालाबी’, ‘नगा’, ‘हिंदकळत’, ‘पेप्रात’ (पृ.५९),

‘थोराड’ (पृ.८१), ‘भुरूक-भुरूक’, ‘कावरे बावरे’, ‘भुईभुई’ (पृ.८२), ‘तडाख्यातच’ (पृ.१३०), ‘कोकलतयं’, ‘जोजवलं’, ‘विचका’, ‘करवादले’ (पृ.१३७).

५. **कलियुग** : ‘असोशिएट’, ‘व्हाईस’, ‘प्रेसिडेंट’, ‘रायटर्स’, ‘टायपिस्ट’, ‘अकौंटंस्’, ‘कॅलक्युलेटर्स्’, ‘जॉब्ज’, ‘ॲडमिनिस्ट्रेटिव्ह’, ‘डिपार्टमेंटमध्ये’ (पृ.१), ‘सॉफिस्टिकेटेड’, ‘ड्यू’ (पृ.५), ‘इन्क्रीमेंट्स’, ‘ॲग्रीमेन्टमधील’ (पृ.६), ‘मेमो’, ‘ॲबसेंटी’ (पृ.९), ‘इनडिसिप्लीन’, ‘शिफ्टला’ (पृ.१३), ‘प्रिमाईसच्या’ (पृ.१८), ‘ऑनेस्टी’, ‘पर्सोनेल’ (पृ.२३), ‘ऑर्डिनरी वर्कर’ (पृ.२८), ‘इनफॉर्मल’, ‘डिस्टर्बन्स’, ‘प्रॉफिटस्’ (पृ.३८), ‘व्हॅल्युएबल’, ‘एव्हिडन्स’, (पृ.४२), ‘फाईल्स’, ‘फाईन’, ‘वॉर्निंग्ज’, ‘इन्क्वायरी’, (पृ.७२).

६. **देवाची घंटा** : ‘भाडा’, ‘फिरवूक’, ‘खोपटातच’, ‘पांढरेधोप’ (पृ.६), ‘फुई फुई’, ‘खर्रखर्र’, ‘कनवटीची’, ‘काखोटीला’ (पृ.७), ‘गडग्याच्या’, ‘पायरी’, ‘चिरे’, ‘आलिमनच्या’ (पृ.९), ‘कांबख’, ‘ऊर्जितावस्था’, ‘तुर्तास’, ‘बायलेक’, ‘उकिडवा’ (पृ.१२), ‘कफनी’, ‘चिपळ्या’ (पृ.१५), ‘मृदंग’, ‘कोठी’, ‘मस्णं’ (पृ.१६), ‘प्रवचन’, ‘कीर्तन’, ‘मर्जी’ (पृ.१८), ‘देवस्थान’, ‘जागृत’ (पृ.१९), ‘तसबीरी’, ‘बरकत’ (पृ.२७), ‘पंचायतनात’, ‘देवस्थानच’, ‘वडिलोपार्जित’, ‘कोप’, ‘भक्तजनांनी’, ‘नोंदबुकात’ (पृ.२९), ‘आवकीचा’, ‘नाशिवंत’ (पृ.३०), ‘अर्धुक’ (पृ.३५), ‘खयसुन’, ‘झिल’ (पृ.४३), ‘धुपारती’, ‘प्रदक्षिणा’ (पृ.४७), ‘सोग्याचं धोतर’, ‘देवदर्शनार्थ’ (पृ.४८), ‘भटजीवांगडा’ (पृ.५५), ‘गाभारा’, ‘शेंदुर’, ‘देवाधिदेवा’, ‘निर्विघ्नपणं’ (पृ.५९), ‘सांगात’, ‘जाशात’, ‘चिरगुटावर’, ‘पोतं’ (पृ.६३), ‘जोडल्यागत’, ‘व्हय’ (पृ.७३), ‘तरास’, ‘आदार’, ‘कोनाचो’, ‘नुस्तया’, ‘मर्तिक’ (पृ.७४), ‘न्हाळाचं’, ‘बखोटीस’ (पृ.७५), ‘मंदाग्नी’ (पृ.७८), ‘लोढणं’, ‘नुस्तं’ (पृ.७९), ‘नीरफणस’, ‘पाणंदीतून’, ‘फाटफटी’ (पृ.८५), ‘हिसकाहिसकी’ (पृ.८८), ‘नेसणं’, ‘उपडा’ (पृ.९८), ‘भड्या’ (पृ.१२७), ‘फडको’, ‘फ्रॉकबिक’, ‘पोसावल्या’ (पृ.१२८).

७. **नो सेंटिमेंटस् प्लीज** : ‘प्रविष्ट’ (पृ.६), ‘कॉम्प्लिकेशन्स’ (पृ.८), ‘लकब’ (पृ.११), ‘कावून’ (पृ.३०), ‘परसु’, ‘परडं’ (पृ.३६), ‘इन्सिमिनेशन’, ‘टेस्ट-ट्युब बेबी’ (पृ.५८), ‘बाष्कळ’ (पृ.१००).

८. **नरिमन पॉईंटचा समुद्र** : ‘ब्रँड लॉयल्टी’ (पृ.१७), ‘व्हेटो’ (पृ.१८), ‘कॅनव्हसिंग’ (पृ.२७), ‘बालामृताच्या’ (पृ.३०), ‘खुळचट’ (पृ.३३), ‘डिग्लॅमराइज’ (पृ.४०), ‘हझार्ड’ (पृ.४३), ‘अनिमिष’ (पृ.६५), ‘मेथॉडिकली’ (पृ.७५).

९. **मार्केट** : ‘इंटरकॉमवर’ (पृ.४), ‘इनफॉर्मल’, ‘एक्सग्राशिया’ (पृ.१५), ‘सिंपथॅटिक’ (पृ.२०), ‘बुडीतखात्यात’ (पृ.२२), ‘इंपोर्ट’, ‘ऑथेंटीक’ (पृ.३१), ‘एनसायक्लोपीडिया’ (पृ.३३), ‘एथिक्स’ (पृ.३७), ‘औद्धत्याच्या’ (पृ.४१), ‘केडरमध्ये’ (पृ.५३), ‘दुभत्यापुरती’ (पृ.५६), ‘प्रायोपवेशनानंतर’ (पृ.७८), ‘चकार’ (पृ.१६५), ‘कपर्दिकही’ (पृ.१९८).

१०. **सॉफ्टवेअर** : ‘शिलगावली’ (पृ.११), ‘शेलकी’ (पृ.१४), ‘एलॅबोरेटिव्ह’ (पृ.४८), ‘भृकुटिभंगाकडे’, ‘वेठबिगारी’ (पृ.५१), ‘ताबडणार’ (पृ.१०८), ‘ह्युमिलिएशनची’ (पृ.१३५), ‘ॲकॉमोडेट’ (पृ.१३७), ‘आर्टिइंटेली’ (पृ.१९३), ‘भ्याल्यागत’ (पृ.२१३), ‘कॉस्मोकेमचे’ (पृ.२४९).

११. **प्रास्ताविक** : ‘नगरपिते’, ‘नगरखाते’ (पृ.१), ‘नरकपुरी’ (पृ.६), ‘रिशफलिंग’ (पृ.१२), ‘फेन्सिंग’ (पृ.१५), ‘कोंडाळ्यावरचं’, ‘हॅवजवाल्यांसारखी’, ‘दादल्याचं’ (पृ.२२), ‘मायथॉलॉजिकल’ (पृ.२६), ‘पॉवर्टीलाईनखालच्या’ (पृ.३३), ‘फियास्को’ (पृ.५३), ‘झंगड’ (पृ.९३), ‘टोमणावलं’, ‘कॅपिटॅलिस्ट’ (पृ.१५०), ‘फूटिंगवर’ (पृ.१६६).

ह. मो. मराठे एक सुप्रसिद्ध लेखक, पत्रकार, संपादक असल्याने त्यांच्या लेखनात स्थल–कालसापेक्ष शब्दांचा वापर दिसून येतो. ‘निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी’ मध्ये त्यांची शब्दकळा ग्रामीण, रांगडी, सुटसुटीत, अनलंकृत, धीट आणि शिवराळ स्वरूपाचीही दिसून येते. शिवाय मराठी शब्दांप्रमाणेच इंग्रजी, कोकणी शब्दांचाही भरपूर वापर केल्याचे दिसून येते. संस्कृत–इंग्रजी–मराठी अशा संमिश्र भाषांमधून आलेले शब्दही दिसून येतात. हिंस्र, बीभत्स, ओंगळवाणे शब्दप्रयोग जरी येथे आले असले तरी ते प्रादेशिकतेमुळे आले असावेत असे वाटते. मालवणी कोकणी शब्दांचा वापर कादंबरीची प्रादेशिकता प्रकट करते. बोलीभाषेतील शब्दांच्या वापरामुळे पात्रांचे संवाद, त्यांचे दैन्य, दु:ख जिवंत करतात. ‘इतिवृत्त’ मधील शब्दवैभव संपादकीय, पत्रकारी भाषेतील आहेत. या क्षेत्राशी असणारे नवनवीन शब्द आणि त्याला

मिळालेली इंग्रजी शब्दांची जोड 'इतिवृत्त' कादंबरी वृत्तपत्र आणि संपादकीय कार्यक्षेत्र यांचे जवळून दर्शन घडविते. तर 'कुरूक्षेत्र' ही कादंबरीत शिक्षणक्षेत्राशी संबंधित असे शब्द येतात. त्याचबरोबर इंग्रजीचाही मुक्त वापर दिसून येतो. 'कलियुग' ही उद्योगक्षेत्रातील शब्दसामर्थ्याचा परिचय करून देते तर 'देवाची घंटा' आध्यात्मिक, धार्मिक, पुजाअर्चेशी संबंधीत येणारे शब्द आणि त्यांना आलेला ग्रामीण भाषेचा स्पर्श आढळून देते. 'नो सेंटिमेंटस् प्लीज' या कादंबरीतून मेडिकल, वैद्यकीय परिभाषेतील मराठी इंग्रजी शब्द येतात, तर 'नरिमन पॉईंटचा समुद्र', 'मार्केट', 'सॉफ्टवेअर', 'प्रास्ताविक' या कादंबऱ्यांमधून उद्योग व्यवसाय क्षेत्राशी त्या त्या पदानुसार, व्यवसायानुसार शब्दकथा येते.

ह. मो. मराठे यांनी नोकरी–व्यवसाय, वृत्तपत्र, ग्रामजीवन, ब्राह्मण भटांच्या समस्या, शैक्षणिक क्षेत्र, धार्मिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, विविध प्रादेशिक शब्द त्याचबरोबर मराठी, इंग्रजी, संस्कृत, हिंदी शब्दांचाही वापर केलेला आहे. लोकांच्या मनातील भाव अचूक टिपण्याची शक्ती, त्यांच्या जीवनाशी एकरूप झालेली आशयघनता ही त्यांच्या शब्दकळेची वैशिष्ट्ये म्हणून नोंदविता येतील.

**समारोप :**

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील भाषेचा विचार करता पात्रांच्या तोंडी येणारी भाषा व्यक्ती–स्थल–कालानुरूप बदलणारी, साधी, सोपी आणि परिणामकारक असल्याचे प्रत्ययाला येते. काही कादंबऱ्यांमध्ये निवेदनाचा वापर अधिक आढळतो. तसेच इंग्रजी शब्द व वाक्ये, संवाद यांचाही वापर अधिक आढळतो.

कादंबरीतील विविध घटना–प्रसंग साकार करण्यासाठी, पात्रांच्या भावभावना, विचार–विकार व्यक्त करण्यासाठी कधी त्रयस्थ निवेदन–पद्धतीचा उपयोग करून कधी सर्वज्ञाच्या भूमिकेतून तर कधी सर्वसाक्षीभावाने पात्रांचे अंतर्मन व बाह्य वर्तन मराठ्यांची भाषा प्रभावीपणे टिपते. कधी प्रथमपुरुषी निवेदनाच्या माध्यमातून त्याच्या व्यथा–वेदना, भावभावना, क्रिया–प्रतिक्रिया पात्रांच्या मुखातून व्यक्त केलेल्या दिसून येतात. त्यामुळे अशा पात्रांच्या व्यक्त

होण्यातून, त्या पात्राचा शहरी वा ग्रामीण स्तर, त्याच्या रूढी–परंपरा, परिसर यांची उकल होण्यास मदत होते.

पात्रांच्या जीवनात घडलेल्या घटना–प्रसंगांचा त्यांच्या जीवनावर झालेल्या परिणामांबद्दल इतर पात्रांशी संवाद साधून त्याचे अंतर्मन व्यक्त होईलच असे नाही. अशावेळी त्या पात्रांच्या मनातील भावभावना विचार–विकार, क्रिया–प्रतिक्रिया, मते स्वगतांच्या द्वारा लेखक मांडताना दिसतो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली ही स्वगते साचेबंद नाहीत. घटना–प्रसंगानुरूप, परिस्थितीनुरूप, पात्रानुरूप ती बदलताना दिसतात. ही स्वगते पात्रांचे अंतर्मन कधी उघडपणे तर कधी सूचकतेने व्यक्त करतात. कधी चीड व्यक्त होते, कधी सकारात्मक दृष्टिकोन व्यक्त हो, कधी व्यवस्थेविषयीचा तिरस्कार व्यक्त होतो तर कधी सत्तास्पर्धा कथन होते. पुरुषपात्रांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी ही स्वगते परिणामकारक उतरलेली पहावयास मिळतात. कथा–कादंबऱ्यांमधील कथानकाचा ओघ कायम ठेवण्यास ही स्वगते पूरक ठरतात.

संवाद हे त्या व्यक्तीशी, समाजाशी, परिसराशी जोडलेले असतात. साहजिकच त्या पारिसारिक, सामाजिक, भाषिक वैशिष्ट्यांसह हे संवाद आकाराला येतात. अशा संवादातून पात्रांची जीवनदृष्टी, त्यांचा स्वभाव, भावभावना, मानसिकता, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्तर समजण्यास मदत होते. पात्रापात्रांमधील परस्परसंबंधांवर हे संवाद प्रकाश टाकताना दिसतात. कादंबरीची गती कायम ठेवण्यास संवाद मदत करतात. कथा–कादंबऱ्यांमध्ये घडणाऱ्या घटनांना पात्रांमुळे जिवंतपणा येतो, तर वेळोवेळी साधल्या जाणाऱ्या पात्रांच्या संवादांमुळे कथानक उलगडत जाते. घडणाऱ्या घटनांना गती प्राप्त होते. प्रत्यक्षाचा भास कायम ठेवण्यास हे संवाद मदत करतात. एकूणच मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील संवादांचा विचार करता हे संवाद खटकेबाज, रोचक, पात्रांच्या स्तरानुसार बदलणारी भाषा असलेले, सहजता असलेले, अकृत्रिम असे हे संवाद कथानकाला जिवंतपणा मिळवून देण्यास साहाय्यभूत ठरतात. हीच मराठे यांच्या संवादांची वैशिष्ट्यपूर्णता म्हणून नमूद करता येईल.

कथा–कादंबऱ्यांमधील निवेदकाचे औचित्यपूर्ण भाष्य महत्त्वपूर्ण कार्य करते. पुरुषपात्रांच्या मानसिक स्थितीचा, उक्ती–कृतीचा, घटना–प्रसंगांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न होताना दिसतो.

राजकारण, कामगार, कामगारांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, सामाजिक प्रश्न त्यावरील लेखन आवाहक ठरते. मानवी जीवनातील एखाद्या घटकाविषयीचे लेखन त्या विशिष्ट घटकाविषयी असले तरी तशा अवस्थेत जीवन जगणाऱ्या अनेकांविषयीचे होते याची प्रचिती या भाष्यातून येण्यास मदत होते. माणसाविषयीचा वा जीवनाविषयीचा तत्त्वविचारही या भाष्यातून स्पष्ट होतो. तो कधी प्रत्यक्षपणे येतो तर कधी अप्रत्यक्षपणे येतो. त्यामुळे पात्रांच्या मूल्यमापन दृष्टीमधील सुसंवाद–विसंवाद समजण्यासाठी मदत होते.

ही भाष्ये पात्रांच्या लकबी, हालचाली, उक्ती–कृती टिपतात. अल्प अशी ही भाष्ये संबंधित व्यक्तिमत्त्वाचा वेगळेपणा सिद्ध करण्यासाठी मदत करतात. एकूणच या भाष्यांचा विचार करता ही भाष्ये कथा–कादंबऱ्यांमधील पात्रांना, घटना–प्रसंगांना उठाव आणतात, त्यांना जिवंत करतात, त्यांचे स्थान कधी उघडपणे तर कधी सूचकतेने स्पष्ट करतात. या भाष्यांद्वारा लेखकाची साहित्यकृतीतील जीवनविश्वाकडे पाहण्याची मूल्यदृष्टी प्रत्ययाला येण्यास मदत होते. एकूणच या भाष्याचा विचार करता ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली ही भाष्ये परिणामकारक उतरली आहेत असे म्हणता येईल.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली वर्णने ही बहुविध स्वरूपाची आहेत. त्यात प्रामुख्याने व्यक्तिवर्णने, स्थलवर्णने, निसर्गवर्णने अधिक आढळतात. कोणतेही पात्र हे घर आणि समाजाशी जोडलेले असते. समाज हा एखाद्या स्थळाशी परिसराशी जोडलेला असतो, त्यातूनच कथा–कादंबऱ्यांमधील वातावरणनिर्मिती निर्माण होत असल्याची प्रचिती येते. र. बा. मंचरकर यांना अभिप्रेत असलेल्या चित्रशैली, अलंकरण व कल्पनाविलासामुळे ही वर्णने प्रतितिक्षम होत असल्याचा प्रत्यय येतो. साहजिकच वर्ण्यविषयाच्या अंगोपांगांचे ज्ञान होण्यासाठी आवश्यक असणारी संवेदनशीलता आणि नितळ शब्दकळा मराठे यांच्या लेखनात आढळते. व्यक्तिवर्णनाचा, स्थलवर्णनाचा, निसर्गवर्णनाचा विचार करता ही वर्णने कधी प्रत्यक्षपणे तर कधी सूचकतेने येताना आढळतात. या वर्णनात रंग, रूप, नाद, लय याची प्रचिती येण्यास मदत होते. एकूणच काय ही वर्णने परिणामकारक आणि यथोचित उतरली आहेत असे म्हणता येईल.

आशय–विषयाशी एकरूपता साधण्यासाठी पात्रांच्या तोंडी म्हणी, म्हणीवजा वाक्ये, वाक्प्रचार येतात. त्या पात्रांना परिणामकारकपणे साकार करण्यासाठी त्याची मदत होते. त्यात पारिसारिक वैशिष्ट्यांचाही परिणाम जाणवतो. कमीतकमी शब्दातून अधिकाधिक आशय व्यक्त करण्यासाठी त्याची मदत होताना दिसते. ग्रामीण वा शहरी जीवनातील लोकांना त्यांच्या वैशिष्ट्यांसह अभिव्यक्त करण्यासाठी त्याची मदत झालेली दिसते. लोकभाषेची ही लेणी मराठे यांच्या भाषेचा एक विशेष वा वेगळेपणा म्हणून नमूद करता येईल.

मराठे यांच्या लेखनशैलीचा आणखी एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे व्यक्ती–स्थल–काल–उद्योग–व्यवसायानुरूप पुरुषपात्रांच्या तोंडी आलेली शब्दकळा व्यक्ती कुटुंबाशी वा कुटुंब समाजाशी संबंधित असते. त्यात समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, शिक्षण, नोकरी, व्यवसाय यांचा संबंध निकटचा असतो. साहजिकच अशा विविध क्षेत्रात व्यक्ती वावरत असते. त्या क्षेत्राशी संबंधित अशी विशिष्ट शब्दकळा आशयाला अधिक समृद्ध करते. ग्रामजीवनाला तसेच शहरी जीवनाला अधिक उठाव देणारी अशी परिणामकारक शब्दकळा हा मराठे यांच्या लेखनशैलीचा, भाषिक वैशिष्ट्यांचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून नमूद करता येईल.

**संदर्भसूची :**


१. पाटील गंगाधर, ‘‘कथनमीमांसा’’, समाविष्ट ‘अनुष्टुभ’, सप्टेंबर–डिसेंबर दिवाळी १९९१, पृ. ९७.

२. देशपांडे वामन, ‘ललित’, जानेवारी १९८७, पृ. ४८.

३. शोभणे रवींद्र, ‘‘इतिहासातील एक अज्ञात दिवस–ह. मो. मराठे’’, ‘ललित’, फेब्रुवारी २०१०, पृ. ४४.

४. सारडा शंकर (संपा.), ‘निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी: संहिता आणि समीक्षा’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु. आ.१९८३, पृ. १६९.

५. तत्रैव, पृ. १८७.

६. सारडा शंकर (संपा), ‘काळेशार पाणी:संहिता आणि समीक्षा’, डिंपल पब्लिकेशन, नवघर, ठाणे, २००८, पृ. १४९.

७. तत्रैव, पृ. १६२.

८. भोसले (डॉ.) पांडुरंग, ‘नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा’, पांडुरंग प्रकाशन, पंढरपूर, २००३, पृ. ८५, ८६.

९. पाटील गंगाधर, ‘‘कथनमीमांसा’’, समाविष्ट, ‘अनुष्टुम’, सप्टेंबर–डिसेंबर, दिवाळी अंक, १९९१, पृ. १२०.

१०. देशपांडे वामन, ‘ललित’, जानेवारी, पृ. ४८.

११. मंत्री राम, ‘महाराष्ट्र टाइम्स’, १८ सप्टेंबर १९८३, पृ. ३.

१२. तेंडुलकर उमेश, ‘‘झपाटलेपणातून आविष्कृत झालेल्या कथा’’, ‘महाराष्ट्र टाइम्स’, रविवार, दि. १३ डिसेंबर १९८७, पृ. ३.

१३. भोसले (डॉ.) पांडुरंग, ‘नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा’, चेतक बुक्स, दु. आ.२०१४, पृ. ८९.

१४. तेंडुलकर उमेश, उनि., पृ. ३.

१५. तत्रैव, पृ. ३.

१६. जाधव रा. ग., ‘‘वाङ्मयीन निबंधलेखन : स्वरूप आणि साधने’’, मराठी संशोधन मंडळ, खंड–३, मुंबई, १९८७, पृ. २००७.

*****

## प्रकरणे सहावे

# उपसंहार

माणूस हा मुळातच समाजशील प्राणी आहे. स्वत:ला अभिव्यक्त करण्यासाठी त्याने विविध कलांची निर्मिती केली. बदलत्या कालप्रवाहात त्यात परिवर्तने होत आली. साहित्य हेही त्याला अपवाद नाही. व्यक्ती, त्याच्या भावभावना, विचार, विकार, राग–लोभ, जीवन जगत असताना त्यांच्या वाट्याला येणारे सुख, दु:ख, अन्याय, अत्याचार, वैफल्यग्रस्तता, निराशा, मानसिक कोंडमारा, त्यातून येणारी उद्ध्वस्तता, एकाकीपण, कुटुंबव्यवस्थेतील विविध नाती, त्यांचे सहसंबंध, समाज या समाजव्यवस्थेत येणारे राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण, संस्कृती, तत्त्वज्ञान अशा अनेक गोष्टींचा परिणाम माणसाच्या जीवनावर होतो. त्याचेच बऱ्याचअंशी प्रतिबिंब साहित्यात उमटलेले पहावयास मिळते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात उदारीकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण, माहिती तंत्रज्ञानाचे युग आले. या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर झाला. भारतीय कुटुंबव्यवस्था ही पुरुषप्रधान आहे. साहजिकच पुरुषप्रधानतेमुळे कुटुंबव्यवस्थेत आणि समजव्यवस्थेत अधिकारांची विभागणी झाली. पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे बरीचशी सूत्रे पुरुषांकडे आली. बऱ्याचशा चुकीच्या गोष्टी स्त्रियांवर लादण्यात आल्या. परिस्थितीच्या रेट्याने जीवनात हतबलता येऊन त्यांना बऱ्याच गोष्टी मूकपणे सहन कराव्या लागतात. त्याचे कारण बऱ्याच वेळा आपल्या वाट्याला आलेली कोंडी फोडणे अशक्यप्राय झाल्याने त्या असहायपणे सर्व सहन करतात, तर कधी जमेल तेवढा प्रतिकार करतात. बदलत्या काळात स्त्री–पुरुष समानतेची द्वाही फिरविली जात असली, घटनेने त्यांना समान दर्जा दिलेला असला तरीही समानतेची वागणूक विशिष्ट मर्यादेपर्यंतच स्त्रियांच्या वाट्याला आलेली दिसून येते. वरील सर्व गोष्टींचा विचार करून ह. मो. मराठे यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाच्या लेखनीतून हे कसे उतरले आहे हे जाणून घेणे महत्त्वपूर्ण वाटते. स्त्री आणि पुरुष कुटुंबव्यवस्थेतील संसाररथाची दोन चाके, असे असले तरी पुरुषप्रधानतेमुळे या संसाररथाला बरेच धक्के बसताना दिसतात हे नाकारता येत नाही. त्यामुळेच "ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण : एक आकलन" या विषयाची मांडणी करण्यात आली. वर नमूद केलेली

पुरुषप्रधानता लक्षात घेऊन ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष कोणकोणत्या रूपात आढळतो हे जाणून घेण्याच्या उद्देशाने या शोधप्रबंधाची सहा प्रकरणात विभागणी केली आहे.

'ह. मो. मराठे व्यक्ती आणि वाङ्मय' या पहिल्या प्रकरणात त्यांचे बालपण, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, नोकरी, नोकरीतील स्थित्यंतरे, पत्रकार, संपादक व साहित्यनिर्मितीचा शोध घेण्यात आला आहे. 'ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष व कुटुंबव्यवस्था' या दुसऱ्या प्रकरणात पुरुषांचे कुटुंबातील स्थान, त्याचे नातेसंबंध, त्याचा मानसिक व आर्थिक संघर्ष जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यामधील पुरुष व समाजव्यवस्था' या तिसऱ्या प्रकरणात पुरुषांची सामाजिक बांधिलकी, त्यांची नोकरी, त्यांचा व्यवसाय, पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांचे समाजातील स्थान आणि महत्त्व जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषांचे विविध पैलू' या चौथ्या प्रकरणात जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात प्रामुख्याने पुरुषांची श्रद्धाशीलता, त्यांची बंडखोरी, त्यांची मानसिकता आणि नैतिकता तपासण्याचा प्रयत्न केला आहे. 'ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील निवेदन आणि भाषा' या पाचव्या प्रकरणात निवेदनाचे स्वरूप, स्वगत, संवाद, भाष्य, वर्णन, म्हणी व वाक्प्रचार, शब्दकळा समजून घेतली आहे. अखेरच्या सहाव्या प्रकरणात वरील पाच प्रकरणांच्या अभ्यासाअंती हाती आलेली निष्कर्ष व निरीक्षणे नोंदविण्यात आली आहेत.

"ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुषचित्रण : एक आकलन" या विषयाच्या एकूणच अभ्यास, संशोधनाअंती जे निष्कर्ष व निरीक्षणे हाती लागतात ती पुढीलप्रमाणे –

ह. मो. मराठे पत्रकार, संपादक आणि एक सिद्धहस्त लेखक म्हणून अधिक लक्षात राहतात. कथा, कादंबरी, आत्मचरित्र, वौचारिक असे साहित्यप्रकार त्यांनी प्रामुख्याने हाताळलेले आहेत. या सर्व लेखनात एक सामाजिक भान सर्वत्र जाणवते. प्रारंभीच्या काळात अनेक हालअपेष्टा सहन करीत आईच्या संस्कारात त्यांची जडणघडण झालेली आहे. वडिलांच्या

चुकीच्या वर्तणुकीचे चटकेही त्यांच्या वाट्याला आलेले दिसतात. कुटुंबव्यवस्थेत जे पुरुष कुटुंबातील व्यक्तींच्या गरजा, आवडीनिवडी पूर्ण करतात, त्यांचे छंद जोपासतात, त्यांचे हवे नको ते पाहतात त्यांना माणुसकीची, आपलेपणाची सहृदयतेने वागणूक मिळते, त्या पुरुषांनाच कुटुंबात मानाचे स्थान मिळते, तर जे पुरुष वरील गोष्टींना तडा देतात, आपली मनमानी चालवितात, अनैतिकतेने वागतात, कुटुंबाकडे दुर्लक्ष करतात, ऐतखाऊपणा, लोभी, आपमतलबी राहून घरातीलच सदस्यांना प्रामुख्याने पत्नीला मागे खेचण्याचा प्रयत्न करतात. तिच्याशी स्पर्धा करून स्वत: असमर्थ असूनही समर्थतेचा आव आणतात त्यांचे कुटुंबातील स्थान नगण्य ठरलेले दिसून येते.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेला पुरुष मुलगा, पती, वडील, भाऊ, काका, मामा, आजोबा अशा विविध नात्यांनी आलेला दिसतो. स्वत:च्या वडिलांचा फसवून डोळा विकणारा मुलगा, स्वत:च्या यशाची शिढी म्हणून पत्नीचे शील वापरणारा पती, पत्नीला पत्नी म्हणून चांगले स्थान न देता तिची प्रतारणा करत तिच्यातील उणिवा समोर आणत परस्त्रियांना राजरोसपणे घरात आणणारे, काही इतर स्त्रियांशी लगट करणारे, काही पत्नीच्या व्यंगाचा, तिच्या मर्यादांचा, तिच्या छंदांचा विचार न करता बेफिकीरपणे वागणारे पुरुष आढळतात. वडील म्हणून येणारे काही पुरुष आपले वडिलांचे नाते जबाबदारीने जपताना दिसतात, तर काही आपल्या मुलांच्या चुकीचे समर्थन करून त्याला खतपाणी घालणारे दिसतात. इतर नात्याने आलेले पुरुषही याला फारसे अपवाद नाहीत.

कुटुंबातील विविध अडचणी, मतभेद, स्वत: केलेल्या चुका, नोकरी–व्यवसायाच्या ठिकाणची वरिष्ठांची मनमानी, वरिष्ठ पदावर काम करीत असताना वाट्याला येणारी अधिकची जबाबदारी कामाच्या ठिकाणी येणारा अतिरिक्त ताण, चुकीचे घेतलेले निर्णय या बाबी पुरुषांच्या मानसिक संघर्षास कारणीभूत ठरताना दिसतात.

यंत्रसंस्कृतीत बदलत्या काळातील नवे तंत्रज्ञान आत्मसात न करण्याची प्रवृत्ती, अपुरे वेतन, बदलत्या काळाला सामोरे जाण्याविषयीची असमर्थता, ऐतखाऊ वृत्ती, भ्रष्टाचार, भोगलोलुपतेमुळे स्वत:हून निर्माण केलेले प्रश्न हीच पुरुषांच्या आर्थिक संघर्षाची कारणे दिसतात.

समाजव्यवहारात वावरत असताना ज्या समाजाशी आपली नाळ जोडली आहे त्या समाजाचे उत्तरदायित्व मानून काम करणारे असेही पुरुष आढळतात. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी कामगार संघटना उभी करणे, आपल्या समस्या वरिष्ठांपुढे मांडणे, निवेदन देणे किंवा प्रसंगी आंदोलनाचा पवित्रा घेणारे असे पुरुष आढळतात. याबरोबरच वृत्तपत्र हे समाजाचे मार्गदर्शक, दिशादर्शक, त्यात काम करणारा पत्रकार, संपादक सामाजिक जाणिवेने भारलेला वस्तुनिष्ठ विचारसरणीचा, परखडपणे भूमिका मांडणारा असा अपेक्षित असतो ती भूमिका यशस्वीपणे पार पाडणारे पत्रकार–संपादक आढळतात. शिक्षणक्षेत्र हे विद्यादानाचे क्षेत्र आहे तो खरेदी–विक्रीचा व्यवसाय नव्हे याचे भान बाळगून आपले महाविद्यालय शैक्षणिक उपक्रमांची प्रयोगशाळा ठरावी असा मनोदय व्यक्त करणारे आणि त्या दिशेने विद्यार्थी आणि शिक्षकांत जाणिवजागृती करणारे असेही पुरुष आढळतात.

मानवी जीवन सुकर होण्याचा एक मार्ग नोकरी–व्यवसाय दिसून येतो. ही नोकरी प्रामाणिकपणे, सचोटीने करणारे पुरुष आपल्या नोकरी व्यवसायात यशस्वी होताना दिसतात. पद, पैसा आणि प्रतिष्ठा या तीनही गोष्टी मिळविण्याचा एक राजमार्ग म्हणून नोकरी–व्यवसायाकडे पाहणारे पुरुष येतात. आपण करीत असलेली नोकरी किंवा प्रामुख्याने वरिष्ठ पद इतरांच्या शोषणाचा एक मार्ग असल्याचे सुतोवाच काही पुरुषपात्रांच्या द्वारा प्रत्ययास येते, तर काहीजण ती एक संधी म्हणून इतरांच्या हितासाठी त्याचा वापर करताना आढळतात. काही व्यावसायिक स्पर्धेतून कुटुंबाची वाताहत करून घेतानाही आढळतात. सरळमार्गी नोकरी करीत असताना वरिष्ठांच्या मनमानीला प्रतिकार करणारे नोकरदार पुरुषही आढळतात.

स्त्री पुरुष समानतेचा कितीही डांगोरा पिटला जात असला तरी प्रत्यक्षात स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा, कळसुत्री बाहुलीसारखी आपल्या बोटावर नाचविण्याची पुरुषांची दृष्टी मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये पदोपदी प्रत्ययाला येते. निराश्रीत स्त्रियांचा हवा तसा वापर करून घेणे, तिच्यापोटी मुले जन्माला घालणे, तिचा मन मानेल तेव्हा वापर करणे, मात्र तिच्या जगण्याच्या प्रश्नांकडे डोळेझाक करणे, व्यवसायवाढीची पायरी म्हणून कधी तिला नाचविणे, तिचा गैरवापर करून आपल्या सोयीने तिचा वापर करणे स्वत:च्या प्रमोशनसाठी

बॉसकडे पत्नीला पाठविणे किंबहुना जीवनात अशा किरकोळ तडजोडी कराव्याच लागतात असे समर्थन करणे यातून पुरुषांचा आपमतलबी, स्वार्थी, ढोंगी असाच दृष्टिकोन प्रत्ययाला येतो. काही पुरुष मात्र स्त्रीचे म्हणजेच प्रामुख्याने पत्नीचे स्थान, तिचे श्रेष्ठत्व अबाधित ठेवून तिला आपलेपणाची, माणुसकीची वागणूक देताना दिसतात.

शिक्षण हे माणसाच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा पैलू, शिक्षणाच्या माध्यमातून पत्रकारितेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळा ठसा उमटविणारे पुरुष येतात. भरपूर शिक्षण घ्यावे त्यामुळे आपले जीवन सुकर होईल अशी अपेक्षा ठेवून शिक्षण घेणारे मात्र हा भ्रमनिरास झाल्याने शिक्षणाविषयीची नकारात्मक भूमिका व्यक्त करणारे पुरुष येतात. शिक्षकी पेशात काम करणारे काही पुरुष आपल्या ज्ञानाबरोबरच संशोधनपर लेखन, प्रबोधनपर व्याख्याने यांच्या निमित्ताने ज्ञानप्रसाराचे कार्यही करतात. शिक्षण हे माणसाला संस्कारित करते, त्याला माणूस म्हणून घडविते, त्याला सारासार विवेक शिकविते, उत्तम जीवनधारणा निर्माण करते त्यामुळे शिक्षण हे एक पवित्र क्षेत्र आहे असे असले तरी त्याची दुसरी बाजू तेवढीच मन हेलावून टाकणारी असल्याचे प्रतिपादन मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये येते. शिक्षणसंस्था ही शैक्षणिक प्रयोगांची प्रयोगशाळा असावी अशी विचारधारा असली तरी याच शिक्षणसंस्था, त्यांचे संस्थाचालक व पदाधिकारी भ्रष्टाचाराचे विविध प्रयोग करताना आढळतात.

समाजात विविध क्षेत्रात उत्तम कार्य करून स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविणाऱ्या व्यक्तींना मानाचे स्थान मिळालेले दिसून येते.

माणूस हा मुळातच श्रद्धाशील आहे. मग ती श्रद्धा आई–वडील, विविध नाती वा देवदेवतांवरील असेल. ती भारतीय संस्कृतीत बरीच खोलवर रूजलेली आहे. त्यामुळेच येथील काही पुरुषपात्रे आईवडिलांनाच देव मानताना दिसतात. काही देवदेवतांची पूजा करून भिक्षुकीचे कार्य करताना दिसतात. पूजा–प्रवचनांच्या निमित्ताने ते भक्ती आळवितात. त्यातील काही पुरुष भक्तीभाव असलेले तर काही उदरनिर्वाहाचे साधन म्हणून उपचार पूर्ण करतात. काही संसाराची आसक्ती पटून संन्यस्त वृत्ती धारण करतात मात्र ही वृत्ती विरक्तीचे रूप दाखवित असली तरी आतील आसक्ती उघड होताना दिसते. काहींना तर ही वृत्ती आपल्या अडचणी सोडविण्याचे

साधन वाटते. या सर्व गोष्टी लक्षात घेता काही पुरुष पूर्ण श्रद्धेने आपला जीवनव्यवहार प्रामाणिकपणे पूर्ण करतात तर काही पुरुष श्रद्धा आणि भितीपोटी का होईना वाईट गोष्टींपासून अलिप्त राहताना आढळतात.

माणसाने कितीही शांतपणे, समाधानाने आणि सुखाने जगण्याचा प्रयत्न केला तरी ते जगणे त्या पद्धतीने जगता येत नाही. निमित्त काही का असेना संघर्ष होतो आणि जेथे संघर्ष होतो तेथेच बंडखोरीचा प्रारंभ होतो. नोकरीच्या ठिकाणी अल्प मोबदल्यात काम करावे लागले की बंडखोरी करण्याची म्हणजेच न्यायासाठी लढण्याची मानसिकता तयार होते. काही ठिकाणी वरिष्ठांची मनमानी, त्रास देणे, तुच्छ लेखने यांमुळेही बंडखोरी करण्याचे प्रसंग उद्‌भवतात. शैक्षणिक क्षेत्रातही विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे हक्क हिरावून घेतले की ते बंडखोरी करून उठतात. स्त्रीने पुरुषांच्या करमणुकीचे साधन म्हणून रहावे, तिने पतीची व घरातील सर्वांची निष्ठेने सेवा करावी, चूल आणि मूल एवढ्यापुरतेच सीमित रहावे. पतीचे निधन झाल्यानंतर तिने दुसरा विवाह करू नये, मात्र मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पुरुष या सर्व मर्यादा ओलांडताना दिसतो.

चांगली नैतिकता हा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा पैलू. पत्नीचे शील जपणे, लहानांना आपुलकीने वागविणे, मोठ्या व्यक्तींचा आदर करणे, आई–वडिलांची सेवा करणे, परस्त्री मातेसमान मानणे, चंगळवादी संस्कृती नाकारणे, दुसऱ्यांचे हित पाहणे, देशनिष्ठा असणे हे काही ठळक नैतिकतेचे विशेष म्हणून नोंदविता येतील. मात्र येथील काही पुरुष परस्त्रीकडे मातेसमान, पुजनीय म्हणून पाहताना दिसत नाहीत उलट उपभोग्य वस्तू, करमणुकीचे साधन म्हणून पाहतात. स्वार्थापोटी स्वत:चेच हित पाहणारे आढळतात. अधिकाराचा गैरवापर करून मनमानी चालवू न दिल्याने काही नोकरांना नोकरीवरून काढणारेही आढळतात. काही पुरुष आपली नैतिकता मोठ्या निष्ठेने जपताना आढळतात.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील निवेदने कथानकाला गती प्राप्त करून देताना दिसतात. निवेदनाद्वारे पात्रांचे गुण–दोष, काम, जबाबदाऱ्या यांवरील निष्ठा, ताणतणाव, विचार–विकार, भाव–भावना या गोष्टी व्यक्त होतात.

मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील स्वगते साचेबंद नाहीत. घटना–प्रसंगानुरूप, परिस्थितीनुरूप ती बदलताना आढळतात. ही स्वगते पात्रांच्या मनातील भावभावना कधी उघडपणे तर कधी सूचकतेने व्यक्त करतात. अंर्तमनाचा वेध घेणारी ही स्वगते परिणामकारकपणे व्यक्त होत कथानकाचा ओघ कायम ठेवण्यास मदत करतात.

मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून आलेले संवाद त्या विशिष्ट समाजाशी, परिसराशी एकनिष्ठत्वाने सिद्ध होतात. बऱ्याच ठिकाणी आलेले खटकेबाज संवाद त्या कथानकाला उठाव देतात.

कथा–कादंबऱ्यांमध्ये आलेली भाष्ये महत्त्वपूर्ण ठरतात कारण अभिव्यक्त झालेला अनुभव अधिक प्रगल्भ आणि मूल्यमापनात्मक होतो. या भाष्यांद्वारा या निवेदक पात्रांच्या मन:स्थितीचा, त्याच्या क्रिया–प्रतिक्रियांचा, उक्ती–कृतीचा किंवा एखाद्या घटना–प्रसंगाचा अर्थ उलगडून सांगताना आढळतो. अगदी अल्प अशा भाष्यातून त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळेपणा आणि ठसा उमटविण्यचे कार्यही ही भाष्ये करतात. एकूणच या भाष्यांद्वारा लेखकाची साहित्यकृतीतील जीवनविश्वाकडे पाहण्याची मूल्यदृष्टी समजण्यास मदत होते.

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमध्ये विविध स्वरूपाची वर्णने येतात. त्यात विशेषत: व्यक्तीवर्णने, स्थलवर्णने, निसर्गवर्णने अधिक येतात. व्यक्तीवर्णनांचा विचार करता कधी प्रत्यक्ष वर्णन, कधी पात्रांच्या कृती, तर कधी गुणवर्णन करून व्यक्तीवर्णन येते, तर कधी त्रयस्थपणे साक्षीभावाने, व्यक्तीवर्णन येते. स्थलवर्णनात आणि निसर्गवर्णनात ते कधी सूक्ष्मतिसुक्ष्म अशा गोष्टींसह वर्णन करतात, तर कधी सूचकताही प्रत्ययाला येते. एकूणच या वर्णनात रंग, रूप, नाद, लय यांची प्रचिती येते. ही सर्व वर्णने परिणामकारक उतरली आहेत.

कथानकात घडणाऱ्या घटना प्रसंगांना अधिक ठळकपणे पारिसारिक वैशिष्ट्यांसह व्यक्त होण्यासाठी वेळोवेळी पात्रांच्या तोंडी आलेल्या म्हणी, वाक्प्रचार, त्या–त्या परिसराला, वातावरणाला अनुरूप अशी शब्दकळा, कथानकातील अनुभवविश्व परिणामकारक आणि समृद्ध करते.

ह. मो. मराठे यांच्या एकूणच कथा–कादंबऱ्यांचा विचार करता कोकणच्या पार्श्वभूमीवरील विशेषत: मालवणी परिसरातील बोलल्या जाणाऱ्या कोकणी बोलीचा प्रभावीपणे वापर आढळतो. मराठे यांच्या बहुतांश कथा–कादंबऱ्यांमध्ये इंग्रजी वाक्यांचा आणि शब्दांचा मोठ्या प्रमाणात वापर आढळतो. मात्र ते इंग्रजी शब्द त्या विशिष्ट पदावरील व्यक्तीच्या स्तरानुसार आलेले आहेत त्यामुळे लेखनाची ती अपरिहार्यता म्हणूनही नमूद करता येईल.

बऱ्याच कथा–कादंबऱ्यांमध्ये ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर येणारे सर्वसामान्य माणसांचे विशेषत: स्त्रियांचे अस्वस्थ करणारे जगणे वास्तवपणे अधोरेखित होताना अधिक अश्लीलतेचा आश्रय घेताना दिसते.

वरील सर्व घटकांचा विचार करता एकूणच मानवी जीवन अत्यंत व्यामिश्र स्वरूपाचे आणि गुंतागुंतीचे असल्याचा प्रत्यय येतो. कुटुंब आणि समाजात वावरणारा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून पुरुषांकडे पाहता येईल. भारतीय कुटुंबव्यवस्था ही पुरुषप्रधान असल्याने समाजव्यवस्थेत असणाऱ्या रूढी–परंपरा, चाली–रीती, जीवनधारणा, तत्त्वविचार या सर्व गोष्टी पुरुषांनीच निर्माण करून रूढ करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पुरुषसत्ताकतेमुळे मानवी जीवनाला व्यापून उरणाऱ्या षड्विकारांचे प्राबल्य पुरुषांमध्ये अधिक आढळते. साहजिकच या प्राबल्याचे सोसणे मात्र स्त्रीच्या वाट्याला येते हे प्रखर वास्तव ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून परिणामकारकपणे उतरले आहे.

एकूणच काय ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून येणारा पुरुष विविध भूमिकांतून वावरताना दिसतो. कुटुंबात वावरत असताना सदाचरण व प्रामाणिकपणे जीवन जगला, सर्व कर्तव्ये जबाबदारीने पार पाडली, कुटुंबातील आपली भूमिका लक्षात घेऊन विविध नाती जपलेलाच पुरुष यशस्वी होताना दिसत असला तरी मानसिक आणि आर्थिक संघर्षांशी सातत्याने सामना करताना दिसतो. आपला नोकरी, व्यवसाय सांभाळत असताना समाजाचे उत्तरदायित्व मानून काही पुरुष स्वत:चे सर्वस्व गमवावे लागले तरी समाजाचे ऋण निभावताना दिसतात. नोकरी–व्यवसायाच्या निमित्ताने पद, पैसा, प्रतिष्ठा यांच्यासाठी तो स्त्रियांचे शोषण करताना दिसतो. शिक्षणाकडे सर्वांगीण विकासाचे साधन म्हणून न पाहता तो ते फक्त पैसे मिळविण्याचे

साधन म्हणूनच पाहतो. चांगले काम करीत असणाऱ्या पुरुषास समाजात चांगले स्थान मिळतेच परंतु सत्ता, संपत्ती आणि पदाच्या जोरावर वाईट प्रवृत्तीचे पुरुषही आपले स्थान अबाधित ठेवताना दिसतात. येथील पुरुषांची श्रद्धाशीलता ही हतबलता आणि गरजेवर अवलंबून दिसते. बंडखोरी हा त्यांचा अंगभूत गुण असल्याचा प्रत्यय येतो. स्त्रीला एका विशिष्ट मर्यादेत तो महत्त्व देत असला तरी आपल्या अंकित ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करताना आढळतो. बरेचसे पुरुष स्वार्थी, भ्रष्टाचारी, चंगळवादी वृत्तीमुळे नैतिकता घसरलेले दिसत असले तरी काही पुरुष मात्र सद्सद्विवेकबुद्धी, सदाचार, सुंसंस्कार यांच्या जोरावर आपले नैतिक अधिष्ठान टिकविताना दिसतात.

या सर्व बाबी लक्षात घेता कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था या दोन्हींतही पुरुषांचेच वर्चस्व सिद्ध होते. मात्र या व्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असलेली स्त्री या प्रवाहातून बाजूला फेकलेली दिसते. पुरुष सगुणाचा पुतळा नाही असे लक्षात येत असले तरी तो दुर्गुणांची खाणही नाही मात्र स्त्रीच्या अधोगतीला कारणीभूत ठरणाऱ्या ज्या गोष्टी दिसून येतात त्या पुरुषाने बाजूला केल्या तर भारतीय कुटुंबव्यवस्था आणि समाजव्यवस्था परिपुष्ट होण्यास निश्चितपणे मदत होईल हेच या संशोधनाचे फलित म्हणता येईल.

मराठीतील सिद्धहस्त लेखक असलेल्या ह. मो. मराठे यांची लेखणी विविध साहित्यप्रकारात संचार करताना आढळते. त्यामुळे त्यांच्या साहित्याचे पुरुषचित्रणाबरोबरच साहित्याच्या अनुषंगाने स्त्रीचित्रण, मुलांचे भावविश्व, वैचारिकता, समाजशास्त्रीय अभ्यास, भाषिक अभ्यास अशा विविध अंगांनी अभ्यास करता येईल. मराठे यांच्या काही कथांवर दूरदर्शन मालिका प्रसारित झालेल्या आहेत. ग्रामजीवनातील आणि शहरी जीवनातील त्यांच्या कादंबऱ्यांमधील प्रखर वास्तव विचारात घेता त्यांच्या कादंबऱ्यांवर आधुनिक वास्तवावर प्रकाश टाकणारे चित्रपट, नाट्यरूपांतरे निर्माण होऊ शकतील त्यामुळे एक वेगळे जीवनविश्व समोर येईल असे मनोमन वाटते.

*****

## साधनग्रंथ :


### कथासंग्रह :

१) "सापेक्ष", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जुलै १९८६.

२) "वीज", सन पब्लिकेशन्स, पुणे, ऑगस्ट १९८६.

३) "ज्वालामुख", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट १९८६.

४) "हद्दपार", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. एप्रिल १९९१.

५) "पक्षिणी", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, जानेवारी १९९७.

६) "दावं", लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. १९९८.

७) "इतिहासातील एक अज्ञात दिवस", पारस पब्लिकेशन्स, कोल्हापूर, जून २००९.

८) "घोडा", अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑगस्ट २००९.

९) "युद्ध", अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑगस्ट २००९.

### कादंबरी :

१) "निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी", मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, जानेवारी १९७२.

२) "काळेशार पाणी", नीलकंठ प्रकाशन, पुणे, सप्टेंबर १९७२.

३) "इतिवृत्त", मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, ऑक्टोबर, १९८२.

४) "कुरूक्षेत्र", सन पब्लिकेशन्स, पुणे, जानेवारी १९८५.

५) "कलियुग", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट, १९९१.

६) "देवाची घंटा", अमोल प्रकाशन, पुणे, डिसेंबर, १९९४.

७) "नो सेंटिमेंटस् प्लीज", अमोल प्रकाशन, पुणे, जून, १९९६.

८) "नरिमन पॉईंटचा समुद्र", नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली–मुंबई, जुलै २००१.

९) "मार्केट", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. फेब्रुवारी २००७.

१०) "सॉफ्टवेअर", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. ऑगस्ट, २००७.

११) "प्रास्ताविक", विभासा पुस्तक महाल, पुणे, नविन आवृत्ती जून, २००९.

## ह. मो. मराठे यांची लेखनसंपदा :

**कथासंग्रह :**

१. ''सापेक्ष'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जुलै १९८६.

२. ''वीज'', सन पब्लिकेशन्स, पुणे, ऑगस्ट १९८६.

३. ''ज्वालामुख'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट १९८६.

४. ''हद्दपार'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. एप्रिल १९९१.

५. ''पक्षिणी'', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, जानेवारी १९९७.

६. ''दावं'', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. १९९८.

७. ''इतिहासातील एक अज्ञात दिवस'', पारस पब्लिकेशन्स, कोल्हापूर, जून २००९.

८. ''घोडा'', अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑगस्ट २००९.

९. ''युद्ध'', अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑगस्ट २००९.

**व्यंगकथासंग्रह** :

१. ''दि बिग बॉस'', सायली प्रकाशन, पुणे, दु.आ. फेब्रुवारी २००८.

२. ''मुंबईचे उंदीर'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी २०११.

३. ''चुनाव रामायण'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी, २०११.

४. ''श्रीमंत श्यामची आई'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी, २०११.

**संपादित कथासंग्रह :**

१. ''आजची नायिका'', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, जुलै, १९९४.

२. ''ह. मो. मराठे यांच्या निवडक कथा'', संपादक दीपक घारे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जानेवारी, २००५.

**कादंबरी :**

१. ''निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी'', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, जानेवारी १९७२.

२. ''काळेशार पाणी'', नीलकंठ प्रकाशन, पुणे, सप्टेंबर १९७२.

३. ''इतिवृत्त'', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, ऑक्टोबर, १९८२.

४. ''कुरूक्षेत्र'', सन पब्लिकेशन्स, पुणे, जानेवारी १९८५.

५. ''कलियुग'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट, १९९१.

६. ''देवाची घंटा'', अमोल प्रकाशन, पुणे, डिसेंबर, १९९४.

७. ''नो सेंटिमेंटस् प्लीज'', अमोल प्रकाशन, पुणे, जून, १९९६.

८. ''नरिमन पॉईंटचा समुद्र'', नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली–मुंबई, जुलै २००१.

९. ''मार्केट'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. फेब्रुवारी २००७.

१०. ''सॉफ्टवेअर'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. ऑगस्ट, २००७.

११. ''प्रास्ताविक'', विभासा पुस्तक महाल, पुणे, नवीन आवृत्ती जून, २००९.

**आत्मचरित्र** :

१. ''बालकाण्ड'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ., जून, २००५.

२. ''पोहरा'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. जून, २००८.

**व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रह** :

१. ''एक माणूस–एक दिवस–भाग–१'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी, १९९६.

२. ''एक माणूस–एक दिवस–भाग–२'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, सप्टेंबर, १९९७.

३. ''एक माणूस–एक दिवस–भाग–३'', औदुंबर प्रकाशन, मुंबई, नोव्हेंबर, १९९९.

**स्फुटलेखन संग्रह** :

१. ''उलटा आरसा'', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, जुलै, १९९६.

२. ''पहिला चहा भाग–१'', पुष्पक प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, २००४.

३. ''पहिला चहा भाग–२'', पुष्पक प्रकाशन, पुणे, २००४.

४. ''स्वर्गसुखाचे पॅकेज'', सायली प्रकाशन, पुणे, २०१०.

५. ''वीज टंचाईच्या ओव्या'', सायली प्रकाशन, पुणे, जानेवारी, २०११.

६. ''माधुरीच्या दारातील घोडा'', सायली प्रकाशन, पुणे, १९९४.

**वैचारिक लेखसंग्रह** :

१. ''दिनमान'', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, जुलै, १९९४.

**इतर लेखन** :

१. ''वंश विद्वेषाच्या वणव्यात श्रीलंका'', चंद्रकला प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, १९८६.

२. ''मधलं पान'', पुष्पक प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, २००२.

३. ''न लिहिलेले विषय'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी, २००५.

४. ''ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार? '', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, चौ. आ., जानेवारी, २००९.

५. ''ब्राह्मणमानस'', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ. ऑगस्ट, २०१०.

६. ''विद्रोही ब्राह्मण'', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ. जानेवारी, २०११.

७. ''ब्राह्मणनिंदेची नवी लाट'', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ., जानेवारी, २०११.

८. ''ब्राह्मण चळवळ कशासाठी'', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ., जानेवारी, २०११.

९. ''गंध, शेंडी, जाणवे आणि ब्राह्मणचळवळ'', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ. फेब्रुवारी, २०१२.

१०. ''संत तुकारामांचा खून खरेच का ब्राह्मणांनी केला असेल? '', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ., फेब्रुवारी, २०१२.

११. ''आधी रेखल्या बंदुका आता उगारल्या तलवारी! (अर्थात ब्राह्मणांवर!) '', विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, जानेवारी, २०१२.

*****

## संदर्भग्रंथसूची :


१. अदवंत, म. ना. : मराठीतील काही कथाकार, अनमोल प्रकाशन, पुणे, १९७०.

२. कवठेकर, बाळकृष्ण : वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा, नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, १९७८.

३. कुलकर्णी, वा. ल. : वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु.आ. १९६०.

४. कुरूंदकर, नरहर : धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७१.

५. कुलकर्णी, वा.ल. : वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु.आ. १९६७.

६. कुलकर्णी,(डॉ.) मदन : समकालीन साहित्य:प्रवृत्ती आणि प्रवाह, (डॉ. द. भि. कुलकर्णी अभिनंदन ग्रंथ), विजय प्रकाशन, नागपूर, १९८५.

७. कुलकर्णी अ. अ. : प्रदक्षिणा खंड–१, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, सुधारित चौ. आ. १९६८.

८. गाडगीळ, गंगाधर : खडक आणि पाणी, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९६०.

९. गाडगीळ, गंगाधर : आजकालचे साहित्यिक, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, १९८०.

१०. जाधव, रा. ग. : नववाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७२.

११. जाधव, रा. ग. : निळी पहाट, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, दु.आ. १९७९.

१२. जाधव, रा. ग. : नवसमीक्षा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८२.

१३. जाधव मनोहर (संपा.) : साहित्य:शोध आणि संवाद, सुविद्या प्रकाशन, पुणे, २०००.

१४. जाधव, रा. ग. : वाङ्मयीन निबंध लेखन स्वरूप आणि साधने, मराठी संशोधन मंडळ, खंड–३, मुंबई, १९८७.

१५. जोग, ल. ग. : कादंबरी चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, १९९३.

१६. जोशी, प्र. न. : मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास,प्रसाद प्रकाशन,पुणे, १९७९.

१७. देशपांडे, अ. ना. : आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९६७.

१८. नेमाडे, (डॉ.) भालचंद्र : टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.

१९. फडके, ना. सी. : प्रतिभासाधन, प्रकाशक–राम जयवंत देशमुख, पुणे, १९७७.

२०. बापट, प्र. वा. : मराठी कादंबरी:तंत्र आणि विकास, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७३.

२१. बेडेकर, दि. के. : साहित्य निर्मिती व समीक्षा, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९५४.

२२. भागवत श्री. पु. व इतर (संपा) : साहित्य:अध्यापन आणि प्रकार, (प्रा. वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ), मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८७.

२३. भोसले, (डॉ.) पांडुरंग : नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा, पांडुरंग प्रकाशन, पंढरपूर, २००३.

२४. शेवडे, (डॉ.) इंदुमती : मराठी कथा:उगम आणि विकास, सोमय्या प्रकाशन, मुंबई, १९७३.

२५. सारडा शंकर (संपा.) : निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी : संहिता आणि समीक्षा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. १९८३.

२६. सारडा शंकर (संपा) : काळेशार पाणी : संहिता आणि समीक्षा, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००८.

२७. हातकणंगलेकर, म. द. : मराठी कथा:रूप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन, पुणे, १९८६.

**नियतकालिके :**

१. कुलकर्णी, गो. ग. : काळेशार पाणी, सत्यकथा, जुलै, १९७४.

२. देशपांडे, वामन : ललित, जानेवारी, १९८७.

३. निपुणगे, ह. ल. : पहिला चहा, भाग–२, पुष्पक प्रकाशन, पुणे, २००४.

४. पाटील, गंगाधर : कथनमीमांसा,समाविष्ट अनुष्टुभ, सप्टेंबर–डिसेंबर दिवाळी, १९९१.

५. मेश्राम, (डॉ.) केशव : ह. मो. मराठे यांच्या निष्पर्ण वृक्षावर, शब्दव्रत, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २०००.

६. लिंबाळे, शरणकुमार : वादंग, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१०.

७. वाळिंबे, वि. स. : ललित, शिफारस, ललित, फेब्रुवारी, १९८४.

८. शोभणे, रवींद्र : इतिहासातील एक अज्ञात दिवस–ह. मो. मराठे, ललित, फेब्रुवारी, २०१०.

९. सिंधये, (डॉ.) मेधा : बालकाण्ड–ह. मो. मराठे, साहित्यसूची, सप्टेंबर, २००२.

१०. उपाध्ये, निला : एक जळजळीत जीवनानुभव, महाराष्ट्र टाइम्स, ५ ऑगस्ट, २००१.

११. उदारे, रमेश : मार्मिक भाष्य, सामना, फेब्रुवारी २००५.

१२. जोग–केतकर, मीना : श्रीलंकेचे अभ्यासपूर्ण दर्शन, लोकसत्ता, १५ मार्च, १९८७.

१३. जांभळे, परेन शिवराम : ह. मो. मराठे यांच्या धारदार लेखनीचा बोरू होऊ लागला, नवशक्ती, ९ ऑगस्ट १९९२.

१४. तेंडुलकर, उमेश : झपाटलेपणातून आविष्कृत झालेल्या कथा, महाराष्ट्र टाइम्स, १३ डिसेंबर १९८७.

१५. दळवी, जयवंत : ह. मों. च्या हद्दपारमध्ये विवाहितेचे भागधेय, महाराष्ट्र टाइम्स, रविवार पुरवणी, २६ जुलै १९८१.

१६. देशपांडे, वामन : एक माणूस एक दिवस, महाराष्ट्र टाइम्स, १२ नोव्हेंबर, २०००.

१७. प्रतिनिधी : निराशाजनक कथासंग्रह, नवशक्ती, १६ नोव्हेंबर १९७२.

१८. प्रतिनिधी : सकाळ, २९ जून, २००३.

१९. भार्गवे, वृंदा : बालकांड चा पुढला भाग, महाराष्ट्र टाइम्स, ३ फेब्रुवारी, २००८. पृ.३.

२०. मगदुम, अजित : समाजातील विकृतीकरणावर प्रकाश, महाराष्ट्र टाइम्स, १३ नोव्हेंबर, १९८८.

२१. मंत्री, राम : वेगळेपणाने ऊठून दिसणारा घोडा, महाराष्ट्र टाइम्स, दि. १८ सप्टेंबर, १९८३.


२२. रत्नपारखे लक्ष्मण : नवे साहित्य, भीषण वास्तवाचे चित्रण करणाऱ्या कथा, केसरी, ३ जुलै १९८३.


*****

# परिशिष्टे

## परिशिष्ट क्र. १

### ह. मो. मराठे यांचे हस्ताक्षर



— ह. मो. मराठे

## परिशिष्ट क्र. २

## ह. मो. मराठे यांना आजवर मिळालेले पुरस्कार व मानसन्मान

पुरस्कार :

१. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी – उत्कृष्ट कादंबरीचा म. सा. प. पुणे चा पुरस्कार

२. पक्षिणी – उत्कृष्ट कथासंग्रहाचा महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार

३. सॉफ्टवेअर – उत्कृष्ट कादंबरीचा राज्य सरकारचा पुरस्कार

४. बालकाण्ड – १) केशवराव कोठावळे पुरस्कार २) भैरूरतन दमाणी पुरस्कार

५. मधलं पान – १) रणजीत देसाई पुरस्कार २) ना. ह. आपटे पुरस्कार

६. सु. ल. गद्रे मातोश्री (साहित्यिक) पुरस्कार

७. 'न्यूज स्टोरी' – वर्षातील सर्वोत्कृष्ट कथेचा ग. रा. बाळ पुरस्कार

८. इतिवृत्त – वाल्मीक पुरस्कार

मानसन्मान :

१. गोमंतक मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपद (२००१)

२. पुणे म. सा. प. चे खेड विभागीय साहित्य संमेलन अध्यक्षपद – २००४

३. नागपूर येथील ८० व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात 'खास मुलाखती' साठी निमंत्रित

४. 'कोकण साहित्य भूषण' पुरस्कार

परिशिष्ट क्र. ३

ह. मो. मराठे व मार्गदर्शक यांच्याशी चर्चा करताना

## परिशिष्ट क्र. ४

## ह. मो. मराठे यांची लेखनसंपदा

**कथासंग्रह :**

१. ''सापेक्ष'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जुलै १९८६.

२. ''वीज'', सन पब्लिकेशन्स, पुणे, ऑगस्ट १९८६.

३. ''ज्वालामुख'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट १९८६.

४. ''हद्दपार'', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. एप्रिल १९९१.

५. ''पक्षिणी'', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, जानेवारी १९९७.

६. ''दावं'', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. १९९८.

७. ''इतिहासातील एक अज्ञात दिवस'', पारस पब्लिकेशन्स, कोल्हापूर, जून २००९.

८. ''घोडा'', अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑगस्ट २००९.

९. ''युद्ध'', अजब पब्लिकेशन्स, कोल्हापूर, ऑगस्ट २००९.

**व्यंगकथासंग्रह** :

१. ''दि बिग बॉस'', सायली प्रकाशन, पुणे, दु.आ. फेब्रुवारी २००८.

२. ''मुंबईचे उंदीर'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी २०११.

३. ''चुनाव रामायण'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी, २०११.

४. ''श्रीमंत श्यामची आई'', डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी, २०११.

**संपादित कथासंग्रह :**

१. ''आजची नायिका'', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, जुलै, १९९४.

२. ''ह. मो. मराठे यांच्या निवडक कथा'', संपादक दीपक घारे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, जानेवारी, २००५.

**कादंबरी :**

१. ''निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी'', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, जानेवारी १९७२.

२. ‘‘काळेशार पाणी’’, नीलकंठ प्रकाशन, पुणे, सप्टेंबर १९७२.

३. ‘‘इतिवृत्त’’, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, ऑक्टोबर, १९८२.

४. ‘‘कुरूक्षेत्र’’, सन पब्लिकेशन्स, पुणे, जानेवारी १९८५.

५. ‘‘कलियुग’’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट, १९९१.

६. ‘‘देवाची घंटा’’, अमोल प्रकाशन, पुणे, डिसेंबर, १९९४.

७. ‘‘नो सेंटिमेंटस् प्लीज’’, अमोल प्रकाशन, पुणे, जून, १९९६.

८. ‘‘नरिमन पॉईंटचा समुद्र’’, नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली–मुंबई, जुलै २००१.

९. ‘‘मार्केट’’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. फेब्रुवारी २००७.

१०. ‘‘सॉफ्टवेअर’’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. ऑगस्ट, २००७.

११. ‘‘प्रास्ताविक’’, विभासा पुस्तक महाल, पुणे, नवीन आवृत्ती जून, २००९.

**आत्मचरित्र** :

१. ‘‘बालकाण्ड’’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ., जून, २००५.

२. ‘‘पोहरा’’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, दु.आ. जून, २००८.

**व्यक्तिचित्रणपर लेखसंग्रह** :

१. ‘‘एक माणूस–एक दिवस–भाग–१’’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, फेब्रुवारी, १९९६.

२. ‘‘एक माणूस–एक दिवस–भाग–२’’, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, सप्टेंबर, १९९७.

३. ‘‘एक माणूस–एक दिवस–भाग–३’’, औदुंबर प्रकाशन, मुंबई, नोव्हेंबर, १९९९.

**स्फुटलेखन संग्रह** :

१. ‘‘उलटा आरसा’’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, जुलै, १९९६.

२. ‘‘पहिला चहा भाग–१’’, पुष्पक प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, २००४.

३. ‘‘पहिला चहा भाग–२’’, पुष्पक प्रकाशन, पुणे, २००४.

४. ‘‘स्वर्गसुखाचे पॅकेज’’, सायली प्रकाशन, पुणे, २०१०.

५. ‘‘वीज टंचाईच्या ओव्या’’, सायली प्रकाशन, पुणे, जानेवारी, २०११.

६. ‘‘माधुरीच्या दारातील घोडा’’, सायली प्रकाशन, पुणे, १९९४.

**वैचारिक लेखसंग्रह :**

१. ‘‘दिनमान’’, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, जुलै, १९९४.

**इतर लेखन :**

१. ‘‘वंश विद्वेषाच्या वणव्यात श्रीलंका’’, चंद्रकला प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, १९८६.

२. ‘‘मधलं पान’’, पुष्पक प्रकाशन, पुणे, ऑगस्ट, २००२.

३. ‘‘न लिहिलेले विषय’’, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, फेब्रुवारी, २००५.

४. ‘‘ब्राह्मणांना आणखी किती झोडपणार? ’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, चौ. आ., जानेवारी, २००९.

५. ‘‘ब्राह्मणमानस’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ. ऑगस्ट, २०१०.

६. ‘‘विद्रोही ब्राह्मण’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ. जानेवारी, २०११.

७. ‘‘ब्राह्मणनिंदेची नवी लाट’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ., जानेवारी, २०११.

८. ‘‘ब्राह्मण चळवळ कशासाठी’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ., जानेवारी, २०११.

९. ‘‘गंध, शेंडी, जाणवे आणि ब्राह्मणचळवळ’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ. फेब्रुवारी, २०१२.

१०. ‘‘संत तुकारामांचा खून खरेच का ब्राह्मणांनी केला असेल? ’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, दु.आ., फेब्रुवारी, २०१२.

११. ‘‘आधी रोखल्या बंदुका आता उगारल्या तलवारी! (अर्थात ब्राह्मणांवर!) ’’, विद्वेषाच्या विरोधात जागृती मंच, पुणे, जानेवारी, २०१२.

*****

## निर्देशसूची :

### अ. ग्रंथकार सूची :

अजित मगदुम : पृ. २६५, २६६, ३५१.

आशा सावदेकर : पृ. २३०.

उमेश तेंडुलकर : पृ. ५०७, ५३१, ५३२.

किशोर सानप : पृ. ११०, २१०, २११, २१२, ३५४, ३५५.

केशव मेश्राम : पृ. १०६, १५१, १९२, ३०४.

जयवंत दळवी : पृ. ७, ८.

नन्दा सुर्वे : पृ. ३२०.

नीलिमा पालवणकर : पृ. २९१, ३२१, ३२२.

पुष्पा राजापुरे : पृ. ६०,६१,२४९,२५०, ३२४, ३२५, ३५३, ३५४,४०५, ४०६.

मीना जोग–केतकर : पृ. ३९.

मेधा सिंधये : पृ. २९.

य. दि. फडके : पृ. १५०.

यशवंत जोशी : पृ. ३४.

रमेश उदारे : पृ. ३६.

राम मंत्री : पृ. १०, ५०५, ५०६.

लक्ष्मण रत्नपारखे : पृ. २४५.

वामन देशपांडे : पृ. ३३, ३९१, ४९७.

वासुदेव मुलाटे : पृ. १९४.

वि. स. वाळिंबे : पृ. १५७.

शरद काळे : पृ. ४०३, ४०४.

शरणकुमार लिंबाळे : पृ. १७, १०५.

सुवर्णा दिवेकर : पृ. ३४९.

**ब. स्थलनाम सूची :**


अयोध्या : पृ. २, ९, ९६, २६४, ३९५, ४५१.

आळंदी : पृ. २.

उज्जैन : पृ. २.

औरंगाबाद : पृ. ८, १३५, २०५, ५७१, ५७२, ५७६, ५७७, ५८२.

ओंकारेश्वर : पृ. २.

कुरुंदवाड : पृ. २.

कोल्हापूर : पृ. २, ३, ४, ९, १०, ३७, ४५, ५७१, ५७२, ५८२.

कोकण : पृ. २३, २४, २९, ३०, ३१, १२१, २६९, ३४३, ३५४, ३५५, ४३०, ४८१, ५२४, ५४०, ५४४, ५५१, ५५६, ५६९, ५८०.

गोवा : पृ. ४५, १२१, १२५, ३१७, ४११.

झोळंब : पृ. १, २९.

ठाणे : पृ. १३, १४, ४१, २०४, २८४, ३८३, ५६१, ५७२, ५७४, ५७६, ५८२, ५८४.

तेलबांध : पृ. २९.

नरसोबाची वाडी : पृ. २.

नानोडा : पृ. २, २९.

नाशिक : पृ. २, ३५, २२३, ५०३.

पुणे : पृ. ४, ६, ८, १२, १८, २०, २३, २४, २५, २६, २७, ३५, ३६, ३७, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४७, ४८, २०४, २१८, २२५, २२६, ३९९, ४५२, ५२४, ५७१, ५७२, ५७३, ५७४, ५७५, ५७६, ५७७, ५८३, ५८४.

प्रयाग : पृ. २.

मथुरा : पृ. २.

| | |
|---|---|
| मुंबई | : पृ. ४, ५, ६, ७, १२, १३, १५, १७, २०, २२, २४, २९, ३०, ३२, ३४, ३५, ३७, ३८, ४९, ८४, ९३, ११३, १४३, १५४, २०५, २१८, २१९, २२१, २२७, २३१, २४४, २८३, २८६, २९८, ३०६, ३८३, ३८५, ३९९, ४०७, ४६८, ४६९, ४७३, ४८९, ४९१, ५१९, ५४४, ५६०, ५६१, ५७१, ५७३, ५७५, ५७६, ५८२, ५८३, ५८४. |
| सावंतवाडी | : पृ. २९. |
| सुर्लं | : पृ. २, २९. |
| श्रीलंका | : पृ. ३८, ३९, ५७४, ५८४. |


*****